लाल बहादुर शास्त्री प्रशासन अकादमी
Lal Bahadur Shastri Academy
of Administration
मसूरी
MUSSOORIE
पुस्तकालय
LIBRARY
अवाप्ति संख्या
Accession No. Mar 3463
वर्ग संख्या
Class No. 954.79092
पुस्तक संख्या
Book No. नरट

अलिजा बहादर शिंदे सरकार यांचे

महाप्रतापी सेनापतीसाहेब

बक्षीबहादर जिवबादादा केरकर.



जन्म इ० स० १७४० मृत्यु इ. स. १७९६

श्लोक.

जिवबाबक्षी सेनानी प्रतापतपनः स्वयं ॥
सदासीद्विजयी जिष्णुर्वसंतः सर्वसंपदां ॥ १ ॥

वैद्य ब्रदर्स प्रेस

शिंदेशाहीचा खरा इतिहास

अथवा

बक्षीबहाद्दर मुजाफरदौल

जिवाजी बल्लाळ ऊर्फ जिवबादादा केरकर

बहाद्दर फत्तेजंग यांचें चरित्र.

लखबादादा लाड, जगोबा बापू वगैरे पुरुषांच्या

हकीकतींसह.

हा ग्रंथ

नरहर व्यंकाजी राजाध्यक्ष

यांनीं तयार केला.

(या कामीं रा. परशुराम रामचंद्र सिनारी व रा. अनंत शिवराम नेरूरकर यांनीं मदत केली).

तो

मुंबईंत

जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

(सर्व हक्क मालकानें राखून ठेविले आहेत.)

इ० सन १९०७.

किंमत ५ रुपये.

[हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिष्टर केलें आहे.]

और* राजा राउ, मनमो कोउ न लाऊं, एक माधवराव सराहूं कै सराहूं जगदीसको.



श्रीमन्महाराज माधवरावसाहेब शिंदे

सरकार अलिजाबहाद्दर दाम इकबालहू

यांस,

त्यांच्या पूर्वजांच्या शौर्याच्या आणि त्यांच्या जिवबादादादि प्रधान-
मंडळाच्या अतुलशौर्यमुत्सद्दीपणाच्या वर्णनानें मंडित असा हा
ऐतिहासिक ग्रंथ परमादरानें व निस्सीम भक्तीनें
आमचे यजमानसाहेबांस समर्पण केला असे.

नरहर व्यंकाजी राजाध्यक्ष,

ग्रंथकर्ता.

---

* अर्थः—इतर राजे व राव आह्मी मनांत आणीत नाहीं. एक तर **माधवराव शिंदे** महाराजांचा स्तव करू किंवा **जगदीशाचा** करू.

प्रस्तावना.

ज्ञानोपार्जनाचीं जीं अनेकविध साधनें आहेत, त्यांत थोर पुरुषांच्या चरित्रांची प्रमुखत्वानें गणना केलेली आहे. याचें मुख्य कारण हेंच कीं, या कष्टमय संसारयात्रेंत मनुष्यास तीं सन्मार्गदर्शक होतात. ह्मणूनच देशाच्या इतिहासरूपी कोंदणांत जीं अनेक मानवरत्नें चमकतात, त्यांचा जीवनवृत्तांत अनेक दुर्गम स्थळांतूनही हुडकून काढण्याचे प्रयत्न सर्व देशांत—विशेषतः पाश्चात्य राष्ट्रांत—मोठ्या जोरानें चालू आहेत. आमच्या लोकांतही ह्या विषयीं अलीकडे विशेष आस्था दिसूं लागली आहे. अशा प्रकारच्या थोर पुरुषांचे साधारणतः दोन वर्ग करितां येतील. ज्यांनीं आपल्या आंगच्या अलौकिक गुणांनीं संपूर्ण जगाचें कल्याण केलें, किंवा तें करण्याचा प्रयत्न केला, त्यांची गणना पहिल्या वर्गांत करितां येईल. पृथ्वीच्या पाठीवर असे पुरुष प्रायः विरळाच आढळावयाचे. अशा सत्पुरुषकोटींत श्रीमच्छंकराचार्य, ज्ञानेश्वर, सोहिरोबा, नामदेव, एकनाथ, तुकाराम, साक्रेटीस इत्यादि थोर मनुष्यें गणिलीं जातात.

ह्यांच्या खालचा जो दुसरा वर्ग आहे, त्यांतील मनुष्यें आचरणानें शुद्ध, सर्व प्रकारच्या व्यावहारिक सद्गुणांनीं परिपूर्ण व स्वपरहितनिरत असतात. ह्या वर्गाचीं मनुष्यें पृथ्वीवरील निरनिराळ्या भागांत भिन्न भिन्न काळीं अनेक होऊन गेलीं आहेत. त्यांच्या अटोकाट ज्ञानाचा, कुशाग्र बुद्धीचा, लोकोत्तर शौर्यसाहसाचा, अपूर्व योजकतेचा व स्पृहणीय उद्योगपरतेचा त्यांच्या त्यांच्या देशबांधवांस पुष्कळ उपयोग होऊन त्यांचें कोटकल्याण झालें आहे. त्यांच्या दृष्टीचा टप्पा प्रायः स्वदेश व स्वधर्म ह्यांच्या उन्नतीच्या पलीकडे गेलेला नसतो. कदाचित् गेलाच तरी त्याचें क्षेत्र फार आकुंचित असतें. ह्या वर्गांतील पुरुषांचे मुख्य गुण ह्मटले ह्मणजे स्वदेशाभिमान आणि स्वधर्माभिमान धरून तदनुरूप कर्तव्य बजाविणें व आपल्या भोंवतालच्या लोकांमध्यें स्वदेश व स्वधर्म यांजविषयीं अभिमान जागृत करून त्यांस कर्तव्यतत्पर करणें हेच होत. हे पुरुष आपल्या लोकांच्या व आपल्या धर्माच्या अभ्युदयार्थ निरपेक्ष बुद्धीनें वाहिलेले असतात. असले मनुष्य सर्वत्र परमवंद्य होतात. आपल्या ह्या भरतभूमींत अशा प्रकारचीं जीं नररत्नें गेल्या पांच सहाशें वर्षांत पैदा झालीं, त्यांमध्यें प्रमुखस्थान श्रीशिवाजी महाराजांस देतां येईल.

वर सांगितलेल्या दुसऱ्या वर्गाच्या दुसऱ्या कोटींत ज्यांची गणना करितां येईल, असे पुरुष आपल्या महाराष्ट्रांत मागील दोन तीन शतकांत बरेच पैदा झाले. हे पुरुष अर्थातच छत्रपति शिवाजी महाराजांनीं स्वदेशाची परकीयांच्या हातून मुक्तता करून स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा केल्यावर त्यांच्या मागून राज्यास जीं गंडांतरें आलीं होतीं, तीं टाळून त्यास बळकटी आणण्यांत व त्याची अभिवृद्धि करण्यांत महत्त्वाचा कार्यभार उचलून त्यांत इष्ट हेतूची ज्यांनीं सिद्धता केली, ते होत. शौर्य, चातुर्य, राजकीय धोरण वगैरे गुणांनीं स्वदेशहितकार्याची उठावणी कमी अधिक प्रमाणानें प्रत्येकाकडून झाली. ह्मणूनच हिंदुपद्पादशाहीच्या देदीप्यमान डोलाऱ्याची सतत दीडशें पावणेदोनशें वर्षें सारखी मिरवणूक होत गेली. अशा सत्पुरुषांच्या मालिकेंत ज्यांचीं नांवें गुंफतां येण्यासारखीं आहेत, त्यांतीलच एक पुरुष ह्या चरित्राचा नायक आहे.

अशा प्रकारें जे पुरुष इतिहासांतरीं प्रसिद्धीस येतात, त्यांच्या अंगीं साधारणपणें जे गुण असावे लागतात, त्यांत शिपाईबाणा व मुत्सद्दीपणा हे दोन किंवा निदान त्यांपैकीं एक तरी गुण अवश्य असतो. हे दोनही गुण पूर्णपणें अंगीं असून इतरही देशोन्नतिसाधक गुण ज्यांनीं आपलेसे केले होते, असे बक्षी

बहाद्दर जिवबा दादा केरकर हे थोर प्रतापी पुरुष गेल्या शतकांत होऊन गेले. इ. सन १७६१ सालीं पानपत येथें जो राष्ट्रीय धरणीकंपाचा मोठा धक्का बसला, त्यामुळें मराठी साम्राज्याचा डोलारा कंपायमान होऊन त्याचे निरनिराळे भाग डळमळून पतनोन्मुख झाले होते. अशा वेळीं ज्या ठिकाणाहून हा धक्का बसला, त्याच्या सन्निध असलेल्या शिंदेशाहीस तर तो फारच जाणवला. तींतील राज्यभार वाहणारे कर्ते पुरुष खपले. आणि ती राज्यसंस्था निर्नायक व अव्यवस्थित होऊन अगदीं मोडकळीस आल्यासारखी झाली. सबब तिला सांवरून धरण्यास व झालेली मोडतोड भरून काढून तिला पूर्वस्थितीवर आणण्यास तशाच एखाद्या कर्त्या पुरुषाची फारच आवश्यकता होती. अशा प्रसंगीं महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबाबा आणि त्यांचे सर्वकार्यकर्ते सेनापति जिवबादादा, ही जोडी सुदैवानें उदयास आली. ह्या जोडीमुळेंच शिंद्याच्या राज्याची व परंपरया साऱ्या मराठी राज्याची स्थिरस्थावरता होऊन त्याचा पुढें उत्कर्ष झाला. राजाचे अंगीं जे गुण असावे लागतात, ते पूर्णपणें पाटीलबावांमध्यें होते. परंतु पानपतच्या लढाईंत झालेल्या शारीरिक व्यंगामुळें त्यांच्यानें लढायांतील बिकट श्रम-साहसाचीं कामें सतत रेंटण्यासारखीं नव्हतीं. तीं कामें जिवबादादांसारख्या 'भारती वीरानें' शिंदेशाहीच्या अभ्युदयार्थ आपलें तनमन वाहून कशीं उत्तम प्रकारें बजाविलीं व राज्योत्कर्ष घडवून आणण्याचे कामीं जी जी बाजू लंगडी पडे, तिकडे तिकडे टेंका देऊन त्यांनीं चोहोंकडे समतोलपणा कसा राखिला, हें पुढील कथानकावरून दिसून येणार आहे.

या प्रतापी पुरुषाच्या शौर्यचातुर्यादिकांच्या पुष्कळ कर्णोपकर्णश्रुत गोष्टी गोमान्तक व त्याच्या आसमंतात् प्रसिद्ध आहेत. त्या ऐकिल्यापासून ह्या थोर पुरुषाविषयीं जो साहजिक प्रेमभाव उत्पन्न झाला, त्यामुळें त्या सर्व ऐकीव माहितीस विश्वसनीय आधार मिळवून त्याचें चरित्र लिहून प्रसिद्ध करावें, असें वाटूं लागलें. परंतु ज्या अलिजाबहाद्दर महादजी शिंद्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं मोठमोठीं कामें बजाविलीं, त्या पाटीलबावांच्या चरित्रांत या प्रसिद्ध पुरुषाविषयीं फारच थोडी माहिती दिलेली असल्यामुळें ऐकीव माहितीचा व त्या पुस्तकाचा मेळ घेतां येईना. तेव्हां ऐकिलेल्या सर्वच गोष्टी खऱ्या धरून त्यावरून काल्पनिक गोजिरवाणें चरित्र लिहून प्रसिद्ध करणें, ह्मणजे तशा प्रकारचीं जीं कित्येक पुस्तकें आहेत, त्यांत भर घातल्याचेंच श्रेय मिळविणें होय. तें नको होतें. कारण ऐतिहासिक पुरुषाच्या चरित्रांत किंवा कोणत्याही इतिहासाच्या पुस्तकांत सर्व माहिती खरीखुरी घडलेली अशी आधारपूर्वक द्यावी, तरच त्या पुस्तकास ऐतिहासिक दृष्ट्या खरी योग्यता प्राप्त होते. परंतु आमच्या दुर्दैवानें आमच्या देशांतील थोर पुरुषांचे किंवा राज्यांचे इतिहास लिहिण्यास बऱ्याच ठिकाणीं पत्रादिकांचे आधार न मिळाल्यामुळें पुष्कळ उणीव राहिलेली आहे. जुन्या बखरी, तवारिखा, शकावल्या, कैफियती, पोवाडे वगैरे जे प्रसिद्ध झालेले व कांहीं अप्रसिद्ध असे लेख आढळतात, त्यांत खऱ्याखोट्याची व कालविपर्ययाची इतकी कांहीं भेसळ झालेली आहे कीं, त्यांतून सत्य निवडून काढणें आणि कोणत्याही महत्त्वाच्या गोष्टीची शहानिशा करणें, हें काम बिकट किंबहुना कित्येक स्थळीं फार दुष्कर झालें आहे. शुद्ध इतिहास लिहिण्यास आधार मुख्यत्वें त्या त्या प्रकरणीं झालेल्या पत्रव्यवहाराचा होय. परंतु हा पत्रव्यवहार त्याशीं संबंध असलेल्या सर्व पक्षांकडील मिळाला पाहिजे. मग त्या त्या काळच्या स्थितीचें व प्रसंगांचें सूक्ष्म अवलोकन करून व सर्व बाजूंचा मेळ घेऊन शुद्ध इतिहास रचण्यास चांगलें साधन सांपडतें. परंतु आज तागाईत अशा महत्त्वाचा किती तरी पत्रव्यवहार वाळवीच्या व कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडलेला आहे! शिवाय,

अनास्थेनें अगर महत्त्व न जाणल्यानें किंवा गोपनस्फोटाच्या भीतीनें व पृच्छकांविषयींच्या निवळ तिरस्कारबुद्धीनें ज्यांनीं आपल्या जुन्या कागदपत्रांच्या रुमालांस सूर्यदर्शनाची व सांप्रतच्या बदललेल्या हवामानाची बाधा होऊं न देण्यांतच धन्यता मानिली, त्यांजकडून खऱ्या इतिहासाच्या प्रसिद्धीचें केवढें मोठें नुकसान झालेलें आहे ? आह्मीं तयार केलेल्या ह्या चरित्रांतील कित्येक बाबतीं-संबंधानें तरी हीच स्थिति आहे. आह्मांस मिळालेल्या पत्रांनीं आमचें जरी बरेंच मोठें काम झालें आहे, तरी कित्येक महत्त्वाच्या बाबतींतील पत्रव्यवहार वरील कारणामुळें लुप्तप्राय झाल्यामुळें, अगर अनेक कारणांनीं उपलब्ध न झाल्यामुळें त्या त्या प्रकरणांविषयीं निवळ जुन्या बखरींवर व त्यांवरून तयार केलेल्या पुस्तकांवर आह्मांस अवलंबून राहावें लागलें आहे. अर्थात् तेथें आमचा निरुपाय आहे. तरी आह्मांस मिळालेल्या पत्रांच्या अस्सल पुराव्यावरून हा एवढा ग्रंथ पुष्कळ आधारपूर्वक लिहितां आला, यामुळें आह्मांला फार समाधान वाटतें. व ह्या पुराव्यावरून आह्मांस पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक हकीकतीपेक्षां पुष्कळ नवीन व सविस्तर माहिती ह्या ग्रंथांत देतां आली, ह्यामुळें इतिहासप्रिय जनांसही असेंच समाधान वाटेल, अशी आह्मी आशा करितों.

सांप्रत चोहोंकडून जुने कागदपत्र, बखरी वगैरे मिळविण्याचा रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, रा. रा. वासुदेव वामन शास्त्री खरे, रा. रा. दत्तात्रय बळवंत पारसनीस वगैरे इतिहासशोधक लोक जारीनें प्रयत्न करीत आहेत. ह्मणून तशा लेखांविषयीं लोकांत आस्था वाढली आहे; व त्यामुळें पुष्कळ पत्रव्यवहार प्रसिद्ध होत आहे. ईश्वरकृपेनें त्यांचे ते प्रयत्न सफल होऊन सर्व बाजूंकडील कागदपत्रें प्रसिद्ध झालीं व त्यांत आह्मीं प्रतिपादिलेलीं मतें कदाचित् खोटीं ठरलीं, तर तीं आह्मी मोठ्या संतोषानें मागें घेऊन द्वितीयावृत्तीचा प्रसंग आल्यास त्याप्रमाणें ह्या चरित्रांत दुरुस्तीही करूं. नवीन शोधकांच्या हेतूंप्रमाणें सत्य मतांचेंच प्रणयन करण्याचा आमचा हेतु आहे व त्यासच अनुसरून आह्मीं निःपक्षपात बुद्धीनें–मिळालेल्या पुराव्यावरून–आमचीं अनुमानें व मतें ठरविलीं आहेत, हें सांगणें नकोच. सर्व कागदपत्र प्रसिद्ध होऊन जुना चिटोराही मिळण्याची आशा राहिली नाहीं, असें झालें ह्मणजे मग समग्र हिंदुस्थानचा, महाराष्ट्रादि देशविभागांचा किंवा विवक्षित राष्ट्राचा अगर पुरुषांचा इतिहास लिहावा, असें इतिहास-शोधकांचें ह्मणणें आहे; व तें बरोबरही आहे. परंतु तसा समय येईपर्यंत उपलब्ध साधनांचा उपयोग करून चरित्र किंवा इतिहास लिहिणें हें अगदीं बरोबर नाहीं, असें मात्र आमचें मत नाहीं. कोण-तीही गोष्ट घाईनें न करितां विचारपूर्वक व शोधपूर्वक सावकाशीनें करावी हें खरें. तरी तसा काळ येईपर्यंत सत्यासत्यमिश्रणाच्या भयानें इतिहासाचें अगदींच अज्ञान ठेवावें, हें बरें दिसत

१. जुन्या पत्रादिकांचा आधार न मिळाल्यामुळें या चरित्रांत अवश्य देण्याजोगी किती तरी माहिती राहून गेली आहे! त्यापैकीं चरित्रनायकाचें लग्न कधीं झालें, त्यांना मुलगे केव्हां झाले, त्यांनीं आपले बंधु व इतर मंडळी तिकडे कोणकोणत्या वेळीं नेली, त्यांजकडे क्रमानें कोणकोणत्या कामगिऱ्या संपविल्या, वगैरे माहिती देतां आली नाहीं. तसेंच पाटीलबावांचा व त्यांचा पत्रव्यवहार जो अनेक प्रकारच्या विश्वसनीय माहितीनें भरलेला असावयाचा, तो मुळींच न सांपडल्यामुळें राजकारस्थानसंबंधीं व राज्यव्यवस्थेसंबंधीं ह्मणण्यासारखी कांहींच माहिती देतां आली नाहीं. जिवबादादांच्या व पाटीलबावांच्या व त्याचप्रमाणें इतर मुत्सद्यांच्या ज्या मसलती ठरत, जीं संभाषणें होत, व तशींच इतर राजेरजवाड्यांशीं व त्यांच्या वकीलांशीं जीं महत्त्वाचीं बोलणीं चालणीं होत, त्या बाबतींत तर आतां विशेष माहिती उपलब्ध होण्यास साधनच नाहीं. चरित्राच्या सर्व अंगांवर प्रकाश पडण्यास ह्या माहितीची विशेष जरूरी होती. परंतु त्यास उपाय नाहीं.

नाहीं. 'जेवीन तर तुपाशीं, नाहीं तर उपाशीं' ह्या ह्मणीस अनुसरून ग्रंथरचना लांबणीवर टाकणें, हें श्रेयस्कर होणार नाहीं. पुढें शोध लागून मागील ग्रंथ सुधारण्याचें काम जसें इतर विविधविषयक ग्रंथांसंबंधानें होतें, तसें ऐतिहासिक ग्रंथांसंबंधानेंही होईल. आणखी दुसरा असाही एक विचार आहे. तो हा कीं, शोधकांच्या मतें सर्व बाजूंचे पुरावे संपले, असें समजून पुढें शुद्ध ग्रंथरचना झाली, आणि अचानक कांहीं कारण घडून येऊन पूर्वकालीन एकाद्या विशेष गूढ गोष्टीचा गोपनस्फोट झाला, तर मागील तर्क, अनुमानें व निश्चित केलेलीं मतें ह्यांवर कुऱ्हाड पडणार नाहीं कशावरून? तेव्हां चरित्रादि ग्रंथ लांबणीवर टाकण्यास हेंही कारण पुरेसें नाहीं. शिवाय, इतिहासजिज्ञासूंस पुढील शुद्ध इतिहासामृताच्या वर्षावाबद्दल अनिश्चित काळच्या गप्पा सांगून तसेंच तृषित ठेवण्यापेक्षां हातीं असलेलें पाणी निवळून त्यांस देणें फारसें गैर आहे, असें कोणीही ह्मणणार नाहीं!

पाणिपतच्या महायुद्धांत मराठ्यांचा भयंकर नाश होऊन, त्यांची उत्तरेकडील सत्ता हटून गेली. त्यांत व त्याचे पूर्वीपासून जीं युद्धाचीं प्रकरणें उत्पन्न झालीं होतीं, त्यांत शिंद्यांचे एकाहून एक रणधुरंधर वीर जयाप्पा, दत्ताजी, जनकोजी, हे कामास आले; आणि नांव घेण्यासारखे काय ते एक महादजी शिल्लक राहिले. त्यांचा लढाईत पाय तुटलेला व त्यांस चालतांना तीन मनुष्यांची मदत लागे. यास्तव त्यांस तें पद द्यावें कीं देऊं नये, ह्याबद्दल पेशवे दरबारांत बरेच दिवस वाटाघाट चालून शेवटीं पाटीलबावांस त्यांची सरदारी मिळाली. तरी वरील कारणांमुळें गेलेली सत्ता पुनः प्रस्थापित करणें आणि पुढें नवनवीं राजकारणें उपस्थित होतील तसतसे मुलूख जिंकून रियासतीचा उत्कर्ष करणें, ह्या भविष्यकालीन आशाजनक साम्राज्यसुखाचा प्रत्यक्षानुभव घेणें अशक्य नाहीं, असें खात्रीपूर्वक सांगणारा कोणी तरी खंबीर साह्यकर्ता त्यांना हवा होता. याप्रकारें पाटीलबावांच्या मनांतील अत्यंत महत्त्वाचा हेतु, त्या वेळची त्यांची संकटप्रचुर स्थिति, आणि हिंमतबहाद्दर साह्यकर्त्याची वाण, ह्या गोष्टींचा हुबेहुब देखावा ज्या इतिहासशोधकांच्या मनावर उमटेल, त्यांस ईशसत्तेनें अशा प्रकारचा गुणसंपन्न पुरुष कोकणांतून आपोआप चालून येऊन, त्यानें वरील प्रकारच्या स्थितींत, ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं, त्या महत्त्वाच्या पण बिकट झालेल्या राज्यकारभारास खांदा दिला, ह्याबद्दलची संपूर्ण हकीकत पुढील चरित्रांत आढळून येईल.

इ. स. १७६१ पासून १७९६ सालपर्यंत ह्मणजे सुमारें पस्तीस छत्तीस वर्षें जिवबादादांनीं शिंद्यांच्या मुख्य सेनापतीचें व मुख्य मसलतगाराचें काम केलें. त्यांत त्यांना भोंवतालच्या शत्रूंच्या प्रबलतेमुळें शिंद्यांच्या ताब्यांतील प्रांतांचे जे अंमल 'गैरशिस्त' झाले होते, ते पुनः जिंकून घेऊन कबज करण्याचे कामीं व पुढें प्रसंग येत गेले तसतसे नवे मुलूख व खंडण्या मिळवून त्या राज्याची शक्ति वाढविण्याचे कामीं रजपूत, मोंगल, शीख, रोहिले, जाट इत्यादि शूर व काटक लोकांबरोबर पुष्कळ वर्षें एकसारखें झगडावें लागलें. हिंदुस्थानच्या उत्तरेकडील मध्य आशियांतून येऊन ज्यांनीं शेंकडो वर्षें येथें फार कडकपणें सार्वभौमत्वाचा अधिकार गाजवून एतद्देशीय राजेरजवाड्यांस हुकूमबंदे केले होते, त्यांची ती सार्वभौम पदवी हाताखालीं घालून–केवळ स्वसूत्रानुसारी करून, एतद्देशीयांमध्यें—त्यांतही मराठ्यांमध्यें–नैसर्गिक तेजस्विता आहे, हें जगाच्या प्रत्ययास आणून देण्याचें मोठ्या शौर्याचें व कडीबाज मुत्सद्दीपणाचें काम त्यांना करावें लागलें. शिंद्यांच्या ह्या वाढत्या वैभवाविषयीं मत्सरयुक्त झाल्यानें, किंवा त्यांच्या पुढील हेतूंविषयीं साशंक झाल्यानें, ज्यांनीं त्यांच्या

१. कीनसाहेबकृत माधवरावं शिंद्यांचा इतिहास व नातूकृत महादजींचें चरित्र पहा.

उत्कर्षमूलक प्रयत्नांस 'आडकाठी' घालण्याचें काम केलें, त्यांचे ते प्रयत्न ह्मणून पाडून इष्ट हेतु जोरानें व मसलतीनें सिद्धीस नेण्याचे कामीं पाटीलबावांस लागेल त्या प्रकारच्या साहित्याचा पुरवठा करावा लागला. शिंद्यांचे यजमान जे पेशवे त्यांना हरएक अडचणीच्या प्रसंगीं मदत देऊन, बाहेरच्या प्रबल शत्रूंस मराठ्यांमधील जूट, जोमदारपणा व राजकारस्थानांतील अक्कल ह्यांचा त्यांच्या मनावर चांगला ठसा उमटण्यासारखा प्रत्यय आणून द्यावा लागला. मिळून पेशवे सरकारचे प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस व त्यांचे आवडते व हस्तक जे होळकर, विंचूरकर, अल्लीबहाद्दर, पटवर्धन वगैरे, त्यांची हरएक बाबतीची खातरी करून देणें आणि हैदर, टिपू, निजाम, इंग्लिश, रजपूत, जाट, शीक, रोहिले, गिलचे, यांजबरोबर प्रसंगानुसार सामने खेळून किंवा स्नेह-संबंध राखून त्यांचे ठिकाणीं मराठ्यांविषयीं वचक व आदर उत्पन्न करणें, ह्या पाटीलबावांच्या उद्देशास त्यांना पूर्ण पाठिंबा द्यावा लागला. त्याचप्रमाणें शिंद्यांच्या रियासतींत पराक्रमी, विश्वासू, पाणीदार व स्वामिसेवापरायण अशा लोकांचा भरपूर पुरवठा करून व मुबलक शूर सेना आणि चांगली राज्यव्यवस्था ठेवून चोहोंकडे उत्कृष्ट वजन व आबादानी ठेवण्याचे कामीं पाटीलबावांच्या मदतीसाठीं त्यांना अहर्निश झटावें लागलें; व त्यांनीं तीं कामें पार पाडलीं. ह्या सर्व महत्त्वाच्या हकीकती ह्या चरित्रांत भागशः सादर केल्या आहेत. हें चरित्र ह्मटलें ह्मणजे त्या काळचा सुमारें चाळीस वर्षांचा समग्र हिंदुस्थानचाच बहुतेक इतिहास होय, हें वाचकांस आतां आढळून येईल.

चरित्रनायक, जिवाजी बल्लाळ ऊर्फ जिवबादादा केरकर, यांच्या अनेक आख्याइका आमच्या कानीं आल्या तेव्हांपासून ह्मणजे सुमारें पांच सात वर्षें आह्मी त्यांचें चरित्र लिहिण्याच्या खटपटीस लागलों. पहिल्यानें त्यांच्या कीर्तीप्रमाणें बरीचशी माहिती सुप्रसिद्ध **विविधज्ञानविस्तार** मासिक पुस्तकांत (पुस्तक ११ यांत) "शेणवी वीर व मुत्सद्दी" या नांवाची जी बखर प्रसिद्ध झाली आहे, तींत आढळली. पुढें त्या बखरीच्या खरेपणाविषयीं, तद्विषयक अन्य लेखांचा तिशीं पडताळा पाहूं लागलों. तेव्हां या कामासाठीं इतर बखरी, पोवाडे, मराठी व इंग्रजी इतिहास, हीं आह्मांस चाळावीं लागलीं. त्यांशीं ती बरीच मिळती आहे असें दिसून आलें. परंतु तत्संबंधाची इतर ग्रंथांतील माहिती त्रुटित आहे व कित्येक ठिकाणची इतर ग्रंथांत दुर्मिळही आहे, असें आढळून आलें. सबब, आणखी विशेष आधार मिळविल्यावांचून असल्या अपुर्त्या आधारावरून चरित्रलेखनाचें काम बरोबर होणार नाहीं असें वाटून या पुरुषाचे वेळचीं जुनीं पत्रें मिळवून त्या बखरींतील मजकुराचा मेळ कितपत बसतो, हें पाहण्याच्या प्रयत्नास लागलों. जिवबादादा केरकरांचे वंशज गोमांतकांतील केरी गांवीं राहतात. तेव्हां तेथें जाऊन काय काय जुने कागदपत्र मिळतात ते पाहावे ह्मणून केरीस गेलों. प्रस्तुतचे केरकर श्रीमंत बक्षीबहाद्दर गणपतराव ऊर्फ बाबासाहेब हे सज्जन गृहस्थ थोर दिलाचे, शांत व गुणज्ञ आहेत. त्यांना आह्मीं आपला मनोदय कळविला. तो ऐकून त्यांस फार समाधान वाटलें. आणि त्यांनीं आपलीं जुनीं दप्तरें आह्मांस दाखविण्याविषयीं आपले कारभाऱ्यांस कळवून चरित्रलेखनाविषयीं प्रोत्साहनही दिलें. त्यांजकडून त्या काळच्या बऱ्याच जुन्या गोष्टी अधिक समजल्या. या घराण्यांतील प्रसिद्ध पुरुष कै. वा. पुरुषोत्तमराव ऊर्फ लालासाहेब केरकर यांजपासून पूर्वीं बऱ्याच गोष्टी समजल्या होत्या. ह्मणून हल्लींही तशाच माहितगार व वृद्ध मनुष्यांकडून जिवबादादांची व त्या वेळच्या इतर पुरुषांची माहिती मिळविली. अशा लोकांकडील माहिती सत्यासत्याचे मिश्रणामुळें जरी बरीच भेसळीची असते, तरी तींत तथ्यही बरेंच असतें,

असें आह्मी श्रीमंत बाबासाहेब केरकर यांच्या येथील दप्तरें शोधून जीं पत्रें मिळविलीं, त्यांवरून दिसून आलें. हा पत्रसंग्रह अनेक जुन्या रुमालांतून व रद्दी, जीर्ण व वाळवीनें खराब झालेल्या गाबाळांतून पुष्कळ दिवस खर्चून मोठ्या प्रयासानें निवडून काढिला. त्याचप्रमाणें आराबा व चिखली, प्रांत गोमांतक, एथेंही जाऊन लखबादादा लाड यांच्या घराण्यांतून पत्रें मिळविण्याची खटपट केली, व सांगायास फार संतोष वाटतो कीं, लखबादादांचे वंशज रा. रा. साबाजीराव शंकर लाड यांनीं आह्मांकरितां विशेष मेहेनत घेऊन वाळवीच्या मक्ष्यस्थानीं पडत चाललेल्या पत्रांतील बरींच पत्रें निवडून काढून मागाहून तीं आमचेकडे मोठ्या अगत्यानें पाठवून दिलीं. हे तरुण गृहस्थ सुशिक्षित असून इंग्रजी व मराठी भाषांचे चांगले मर्मज्ञ आहेत. याशिवाय खुद्द आमचे पूर्वज कै. वा. ती. साबाजी नारायण राजाध्यक्ष हे जिवबादादांच्या वेळीं सरदार असून त्यांचे बंधु सदाशिव नारायण हे मामलतदार आणि मुलगे व्यंकाजी साबाजी हे एकांडे अशा हुद्यांवर शिंदेशाहींत होते. तेव्हां त्या वेळचा आमचे येथील पत्रव्यवहार शोधून त्यांतूनही कांहीं उपयोगी पत्रें निवडून काढिलीं. शिवाय आणखी या प्रांतांतील जे जे शिंदेशाहींत त्या वेळीं—आरवली गांवचे साबाजी वासुदेव रेगे वगैरे—रोजगारी होते, त्यांच्या घराण्यांतूनही अशींच पत्रें मिळविलीं. कांहीं पत्रें, कैफियती, बखरी (खर्ड्यांची हस्तलिखित) व प्रसिद्ध विश्वसनीय माहिती इंदूर एथून आमचे मित्र रा. रा. लक्ष्मणराव शिवराम वेंगुर्लेकर यांनीं फार श्रम घेऊन व ठिकठिकाणीं फिरून आह्मांकरितां पाठवून दिली. त्याचप्रमाणें कोल्हापुराहून विद्वद्वर्य वे० शा० सं० रा. रा. कल्याणशास्त्री जनवाडकर श्रुतिशिरोभूषण, पेनशनर नि॥ श्री. महाराज सरकार कोल्हापुर, यांजकडूनही कांहीं माहिती आली. असाच आणखी बऱ्याच सज्जन व माहीतगार मंडळीनें आह्मांस माहितीचा पुरवठा केला. या सर्व मंडळीचे आह्मी फार फार आभार मानितों. त्यांत श्रीमंत बाबासाहेब केरकर, साबाजीराव शंकर लाड व रा. रा. लक्ष्मणराव शिवराम वेंगुर्लेकर यांचे आह्मांवर बहुत उपकार आहेत. हीं सर्व पत्रें व इतर लेख मिळून एकंदर संख्या सुमारें एक हजार आहे. त्यांपैकीं निवडक पत्रें वगैरे सुमारें ४२८ लेख आह्मीं या ग्रंथाचे शेवटीं दिले असून त्या त्या पत्रांचे लेखांक चरित्रांत जेथें जेथें त्यांतील प्यारे किंवा कांहीं भाग आधारासाठीं दाखल केले आहेत, तेथें तेथें खुणा करून खालीं टीपांत दिले आहेत. या सर्व अस्सल पत्ररूपी खऱ्या पुराव्यावरून पूर्वोक्त विविधज्ञानविस्तारांतील "शेणवी वीर व मुत्सद्दी" या बखरीच्या उत्कृष्टत्वाबद्दल व अक्षरशः सत्यतेबद्दल आमची बालंबाल खातरी झाली. तशीच ती वाचकांचीही व्हावी, यासाठींच आह्मीं त्या बखरीचा उतारा या चरित्राचे शेवटीं परिशिष्टरूपानें दिला आहे. या बखरींत अतिसंक्षिप्तपणा एवढाच कायतो ठळक दोष आह्मांस आढळला !

एवढी सिद्धता झाल्यावर पुढें आह्मीं या विषयाच्या उपयोगी पडतील असे अनेक ठिकाणचे बरेच इंग्रजी व मराठी ग्रंथ मिळविले. आणि एकंदर हकीकतींचा क्रमवार मेळ बसवून हें पुढील चरित्र तयार केलें. ही कृति कशी काय वठली आहे, ह्याचा विचार सुज्ञ वाचक करतीलच. या कामाकरितां जमविलेल्या पुस्तकांपैकीं ज्यांचा आह्मांस उपयोग झाला, त्यांत मुख्यत्वें ग्रांट डफ साहेबांची बखर व रा. रा. वि. र. नातूकृत महादजी शिंद्यांचें चरित्र, हीं मुख्य होत. या पुस्तकांपासून चांगली मदत झाली ह्मणून आह्मी त्या उभयतां ग्रंथकारांचे फार आभार मानितों. त्याचप्रमाणें इतर ग्रंथकार, ज्यांच्या ग्रंथांची यादी यापुढें आह्मीं जोडिली आहे, त्यांपासूनही चरित्रलेखनाचे कामीं आह्मांस जी

थोडीबहुत मदत झाली, तिजबद्दल त्या त्या ग्रंथकर्त्यांसंबंधानें कृतज्ञता प्रकट करणें हें आमचें कर्तव्य होय. ह्मणून त्यांचेही आह्मी आभारी आहों. या चरित्रांत ज्या ज्या ग्रंथांतील थोडाबहुत मजकूर आह्मीं आधाराकरितां किंवा विशेष माहितीकरितां घेतला आहे, तो अवतरणांतर्गत असून त्या त्या पृष्ठाखालीं टीपांत त्या त्या ग्रंथांचीं पृष्ठें वगैरे दाखल केलीं आहेत. कदाचित् इतिहासग्रंथांत प्रसिद्ध असल्यामुळें किंवा नजरचुकीनें अशा मजकुरास त्या त्या ग्रंथांचें पृष्ठ दाखविणें राहिलें असेल; एरवीं मुद्दाम या कामीं दुर्लक्ष केलेलें नाहीं.

ह्या चरित्रांत ज्या ज्या महत्त्वाच्या गोष्टी आह्मीं नमूद केल्या आहेत, त्यांस जेथल्या तेथें आधार दिलेच आहेत. परंतु कित्येक स्थळीं आह्मांस समजलेल्या—व विचार करून आह्मीं विश्वसनीय ह्मणून मानिलेल्या—माहितीवरच आह्मांस अवलंबून राहावें लागलें आहे. अशी माहिती ह्मटली ह्मणजे चरित्रनायक घराहून निघून शिंद्यांच्या राज्यांत सेनापतित्व करूं लागण्याच्या पूर्वील भागांत बरीचशी आहे, ती होय. पुढें त्यांनीं कोंकणांतून जे लोक तिकडे नेले व शिंद्यांच्या राज्यव्यवस्थेंत ज्या सुधारणा घडवून आणिल्या, त्यांतीलही कांहीं माहिती अशाच प्रकारची आहे. पुढें श्रीमत्सोहिरोबानाथ आंबिये साधु यांजविषयींची हकीकत दिलेली आहे, तीही बहुतेक अशाच प्रकारची आहे. वृद्ध लोकांच्या तोंडून परंपरागत चालत आलेली जी माहिती मिळते, तींत बरेंच तथ्य असतें. परंतु पुष्कळ गोष्टींचीं प्रत्यंतरें घेऊन काळजीपूर्वक तींतील सत्य निवडून काढिलें पाहिजे. हें काम आमच्या मतें आह्मीं अगत्यानें लक्षपूर्वक केलें आहे. आह्मांस जिवबादादांच्या वेळचा सर्व पत्रव्यवहार जर मिळाला असता, तर त्या काळच्या सुमारें चाळीस वर्षांचा संपूर्ण इतिहासही लिहितां आला असता. परंतु केरकरांच्या घराण्यांतील बहुतेक पत्रें वाळवीनें खाल्ल्यामुळें व बेद्यांत ह्यांस आपलें घर सोडून आरंवद्यास यावें लागल्याकारणानें जी धांदल झाली, तींत खराब झालीं. बंडाची चोहोंकडे शांतता होऊन राजकीय भानगडी नाहींतशा झाल्यावर जेव्हां केरकरांचीं मनुष्यें केरीस आपले घरीं गेलीं, तेव्हां इतर नुकसानीबरोबर कागदपत्रांचीही गैरविल्हे झाली असल्याचें त्यांस आढळून आलें. निरनिराळ्या रुमालांतील पुष्कळ कागदपत्रांचा चोळामोळा होऊन कागदांच्या एका गंजावर एक कुत्री व्यालेली होती! शेवटीं वाळवीनें खराब झालेल्या व अशा रीतीनें निरुपयोगी झालेल्या कागदांच्या गंजास त्यांनीं अग्निनारायणाच्या स्वाधीन केलें. श्रीमंत बाबासाहेब केरकर यांच्या तोंडून ही उद्वेगजनक हकीकत ऐकून आमचें अंतःकरण अगदीं चिरून गेलें! शुद्ध इतिहासाचें केवढें भयंकर नुकसान हें!! असा अनिष्ट प्रकार घडून न येता, तर सर्व कागदपत्रांचें क्रमवार फेरिस्त आमचे हातीं लागलें असतें! कारण, जे पत्रांचे संच आह्मांस निरनिराळ्या दप्तरांत आढळले, ते क्रमवार लावलेले होते. या सुव्यवस्थेबद्दल व कागदपत्रांच्या काळजीपूर्वक रक्षणाबद्दल जिवबादादांचे वडील बंधु नरोबादादा ह्यांस फार आस्था असावी असें दिसून आलें. परंतु कोंकणांतील ह्या कागदपत्रांच्या नुकसानीपेक्षां हिंदुस्थानांत जिवबादादांचे बंधु शिवबा नाना, जगोबा बापू यांजकडे व इतर सरदार लोकांकडे जो त्यांचा परस्पर पत्रव्यवहार चालत होता, तो नाहींसा झाला तेणेंकरून झालेलें नुकसान फारच जास्त आहे. अशा प्रकारचें गुलाम कादराशीं युद्ध करून त्याचा पराभव केल्याबद्दलचें जिवबादादा यांनीं शिवबा नानांस ते मेवाडास असतां मेरटेहून ता. २० डिसेंबर सन १७८८ रोजीं लिहिलेलें नं. ३७ चें एकच पत्र आह्मांस मिळालें आहे. हीं तिकडच्या तिकडे परस्परांस जीं पत्रें जात असत, तीं सर्व कच्या वर्तमानाचीं, सविस्तर लिहिलेलीं अशीं असत. आणि कोंकणांत जीं पत्रें येत असत, त्यांत मुख्य मुख्य तेवढीच राजकीय हकीकत संक्षेपानें ते लिहीत असत. तेव्हां कोंकणांतील पत्रांत ऐतिहासिक

मजकुराचें बहुतेक दिग्दर्शनच आढळतें. इत्यादि कारणांनीं ह्या ग्रंथांत वर दर्शविलेली अपूर्णता राहिलेली आहे. महाराज अलिजाबहाद्दर शिंदे सरकारचीं जुनीं दप्तरें, त्याचप्रमाणें इतर राजे-रजवाड्यांचीं व सरदार लोकांचीं दप्तरें, ह्यांतील ऐतिहासिक लेखपत्र प्रसिद्ध होतील तेव्हां शुद्ध व संगतवार इतिहास बनविण्यास फार सोपें जाईल. अशा प्रकारचे प्रयत्न आमच्या सारख्यांकडून होणें शक्य नाहीं. ह्मणून साध्य तेवढ्या गोष्टींवर समाधान मानून राहणें भाग पडलें!

ऐतिहासिक ग्रंथ लिहीत असतां त्यांत ज्यांचा ज्यांचा संबंध येतो, त्यांच्या त्यांच्या बऱ्या वाईट कृतीं-प्रमाणें ओघानें कांहीं टीकारूप विधान करावें लागतें. हकीकती जसजशा घडल्या असतील, तसतशा त्या देऊन, त्यांवरून होणाऱ्या अनुमानांचें काम वाचकांकरितां ठेवून, आपण इतिहासविषयक मर्मज्ञतेचा व नीतिज्ञतेचा डौल न मारतां, तशा विधानांविषयीं मुग्धता स्वीकारावी, असें कांहीं लोकांचें मत आहे; व त्यांत बराच सत्यांशही आहे. शिवाय, त्या त्या स्थळांसंबंधानें जसें एकास वाटतें, तसेंच दुसऱ्यासही वाटलें पाहिजे, असा अर्थ नाहीं. या दृष्टीनेंही ती मुग्धता शहाणपणाची असते. परंतु हें मत सर्वत्र उपयोगी पडतें असें वाटत नाहीं. कारण असे ग्रंथ ज्यांना त्यांविषयीं शुद्ध अनुमानें काढितां येतील, अशांच्याच हातीं जातील असें नसून, त्या कामास केवळ अपात्र अशा लो-कांच्या हातींही ते जाण्याचा पुष्कळ संभव असतो. तेव्हां त्यांना त्या अनुमानांचा बराच उपयोग होण्यासारखा असतो. शिवाय, अशा ग्रंथकारांस आपलीं मतें नमूद करितांना केवळ दिवसाची रात्र करितां येईल असेंही वाटत नाहीं. तीं सदोष–किंबहुना विपरीत–असल्यास सुज्ञ लोक त्यांवरून फसणार नाहींत. आह्मीं या चरित्रांत कित्येक ठिकाणीं अल्पस्वल्प टीकारूप मजकूर लिहिला आहे. विचाररूप चष्मे भिन्न भिन्न असल्यामुळें तो सर्वांस सारखाच मान्य होईल असा अर्थ नाहीं. परंतु त्याचीही गति आह्मीं वर दर्शविलेल्या मतानुसार लागावयाची! ऐतिहासिक ग्रंथकार बनल्यानें कोणालाही दुसऱ्यावर कांहीं निमित्त योजून कडक वाक्प्रहार करण्याचा अधिकार पोहोंचत नाहीं, हें तत्त्व आह्मांस संमत आहे. व त्यास अनुसरून आह्मीं तशा प्रसंगीं होतील तेवढे सौम्य शब्द योजलेले आहेत. परंतु चुकून अंमळ तीव्र शब्द पडले असल्यास सुज्ञ लोक क्षमा करितील अशी आशा आहे. तशा टीकारूप शब्दांवरून त्या त्या व्यक्तींविषयीं आमची कमी सन्मानबुद्धि आहे, असें कोणींही समजूं नये. आह्मीं दिलेलीं दूषणें त्या त्या प्रसंगापुरतींच होत.

पुढील चरित्रावरून जिवबादादा हे चरित्रनायक होण्यास किती लायक होते, हें कळून येईल. 'ज्या देशास स्मरणीय भूतकाळ नाहीं, त्याला स्पृहणीय भविष्यकाळही नाहीं,' अशा अर्थाची इंग्रजींत एक ह्मण आहे. तींतील तत्त्व विचारी पुरुषांस फार मान्य आहे. ईश्वरी कृपेनें आमच्या देशास स्मरणीय भूतकाळ होता ही गोष्ट, अशा प्रकारच्या ऐतिहासिक पुरुषांच्या चरित्रावरून सिद्ध होणारी आहे. तेव्हां अर्थात् पूर्व पिढीवर नजर देऊन आह्मीं मनःपूर्वक उद्योग केल्यास या देशास उत्कर्षकाल खचित प्राप्त होईल, असें फलज्योतिष वरील सिद्धांताच्या आधारें आह्मांस वर्तवितां येतें. तेव्हां ह्याबद्दल नीट मनन करून सध्यांची तरुण होतकरू मंडळी प्रस्तुतच्या स्थितींत शक्य तेवढें आपलें कर्तव्य आस्थापूर्वक करितील, तर आपल्या देशाचा उत्कर्ष करण्याचें परमपूज्य कर्तव्य बजावण्यास त्यांचे ते प्रयत्न साधक होतील, यांत तिलप्राय शंका नाहीं.

आमचे चरित्रनायक हे एक थोर पुरुष गत शतकांत होऊन गेले. त्यांचे उन्नतिप्रद गुणांपैकीं शौर्य, धैर्य, उद्योगिता, योजकता, स्वामिनिष्ठा, दृढनिश्चय, सद्वर्तन, भूतदया[१] इत्यादि गुण प्रस्तुत

१. "थोर थोर मागें जाहाले व पुढें होतील. परंतु असे भूतदया आण अजातशत्रु होणें दुर्लभ." पहा पत्र नंबर ४२८.

स्थितींत आपल्यास अनुकरणीय आहेत. ह्या व अशा प्रकारच्या चरित्रांवर लक्ष देऊन ते गुण आपलेसे केल्यास आपलें कोटकल्याण झाल्यावांचून राहणार नाहीं. दारिद्र्यानें पीडलेले, दुःखानें गांजलेले, संकटांनीं घेरलेले आणि सर्व प्रकारच्या निराशांनीं व्यापिलेले, अशांनीं हें जिवबादादांचें चरित्र गुणग्रहण करण्याच्या इच्छेनें काळजीपूर्वक वाचिलें, तर ते कधींहीं उद्योगविमुख होणार नाहींत. देशकालवर्तमानानुसार उपाययोजना राजनिष्ठपणाची व दूरदर्शित्वाची मात्र पाहिजे.

प्रवासाचीं साधनें सुलभ नाहींत, कोणी पुरस्कर्ता नाहीं, अनेक विषयांवरील पुस्तकांच्या अध्ययनानें मन सुसंस्कृत झालेलें नाहीं, भूगोलादि साधनांच्या अभावामुळें स्वप्रांतापलीकडील काडीइतकी माहिती नाहीं, अशा जिवबानें गरिबीच्या स्थितींतून व सामान्य प्रतीच्या जनसमुदायांतून उठून केवळ उद्योगाच्या व दृढनिश्चयाच्या बळावर केवढी कमाई केली ! तो तरवारीचा काळ होता ही गोष्ट आपण बाजूस ठेवूं. पण त्यांची उद्योगरति, स्वामिनिष्ठा, पितृभक्ति व त्यांचें बंधुप्रेम, सत्यवादित्व, न्यायप्रियता, दयाशीलता, निर्व्यसनता व निगर्विता इत्यादि त्यांचे आंगचे अनुकरणीय गुण आपल्यास खरोखर स्पृहणीय आहेत. घराहून निघाल्यापासून धन्याच्या अनेक महत्त्वाच्या कार्यांमुळें ज्याला पुनः आपल्या घरीं सुद्धां येववलें नाहीं, त्याच्या ठिकाणीं स्वामिकार्यतत्परता किती प्रबल होती, याची सहज अटकळ होईल. लढायांतील, शत्रूकडील, स्वसैन्यांतील व प्रसंगवशात् यजमानाकडील कामगिऱ्यांत उद्भवलेल्या अनेक प्रकारच्या पेंचांनीं जर्जर झाल्या वेळींही ज्याचा धैर्यमेरु अणुमात्र ढळला नाहीं, लहानपणीं भोगिलेल्या विपत्तीमुळें नैराश्य व पुढें प्राप्त झालेल्या भाग्योदयामुळें उन्माद ह्यांचा विटाळ ज्याच्या चित्तास लेशमात्र शिवला नाहीं, सर्व प्रकारच्या स्थितींत नम्रता व सदाचरण हीं ज्याचीं अढळ राहिलीं, त्याच्या चरित्रापासून तरुणांस किती तरी बोध घेतां येईल !

येथवर चरित्रनायकाच्या गुणांचें व योग्यतेचें आह्मीं जें वर्णन केलें, त्यावरून—ह्मणजे पुढील चरित्रांत ह्यासंबंधीं सविस्तर माहिती आहे ह्मणून—त्याची योग्यता मोठी ठरते. परंतु असा खरा प्रकार असतां, आजवर प्रसिद्ध झालेल्या त्या कालच्या इतिहासविषयक पुस्तकांत जिवबादादांसंबंधीं अशी विशेष माहिती कां आढळत नाहीं, हा मोठाच प्रश्न आहे. पण त्याचें कारण असें दिसतें कीं, श्रीमंत अलिजाबहादर महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबावा हे राज्याचे धनी असून सर्व प्रकारच्या राजगुणांनीं परिपूर्ण होते, तेव्हां त्या सर्व हकीकती त्यांच्याच नांवें प्रसिद्ध झाल्या असाव्या. किंवा कदाचित् ह्यांच्या संबंधाचे लेखपत्र पुढेंही झाले नसावे ! परंतु ह्या साधार चरित्रावरून आतां [१]कोणच्याही संशयांस जागा उरणार नाहीं. प्रत्यक्ष पुराव्यापुढें नुसत्या अनुमानास किंमत नाहीं, हें कोणीही कबूल करील.

शेवटीं आमच्या सन्मान्य आश्रयदात्यांचे (ज्यांच्यांतील काहीं ठळक अशा सद्गृहस्थांच्या नामनिर्देशानें ग्रंथाच्या अंतिम भागास शोभा आली आहे) आभार मानून, ज्या मंगलधाम प्रभूच्या कृपाप्रसादानें आमचा हा चरित्ररूपी लहानसा ग्रंथ शेवटास गेला, त्याचे पदारविंदास अनन्यभावें नमन करून हा प्रास्ताविक अल्प लेख पुरा करितों.

मु० शिरोडें, ता० वेंगुर्लें, जि० रत्नागिरी.
ता० १ आगष्ट सन १९०७.

नरहर व्यंकाजी राजाध्यक्ष.


१. या इतिहासांत बऱ्याच प्रसिद्ध पुरुषांची थोडथोडी माहिती आलेली आहे. तींत त्यांचे त्यांचे वंशजांनीं आपले जवळ असलेल्या माहितीची भर घालून आपले पूर्वजांचीं सविस्तर चरित्रें प्रसिद्ध करावीं, अशी आमची त्यांस विनंती आहे.

या ग्रंथास आधारभूत पुस्तकाची यादी.

१ विविधज्ञानविस्तार पु. ११ यांतील "शेणवी वीर व मुत्सद्दी," ही बखर.
२ टॉड साहेबकृत राजस्थानचा इतिहास.
३ म्यालेसन साहेबकृत हिंदुस्थानचा इतिहास, पूर्वार्ध (गोडबोलेकृत मराठी भाषांतर).
४ ग्रांट डफकृत मराठ्यांची बखर.
५ हिंदुस्थानकथारस (रा. सा. वि. कों. ओककृत.)
६ पेशव्यांची बखर.
७ भाऊसाहेबांची बखर.
८ श्रीशिवछत्रपतीचें सप्तप्रकरणात्मक चरित्र.
९ सोहिरोबा आंबियेकृत पदसंग्रह (संग्रहकार रा. रा. भगवंत बाळकृष्ण पै).
१० भारतवर्ष मासिक पुस्तकांतील पत्रें (ऐतिहासिक).
११ सरस्वतीमंडल (रा. सा. रा. भि. गुंजीकरकृत).
१२ भ्रमनिरास (,, ,,).
१३ अलिजा बहाद्दर महाराज माधवराव शिंदे यांचें चरित्र (रा. रा. वि. र. नातूकृत.)
१४ पोवाड्यांचें पुस्तक (मे. आक्वर्थ साहेबांनीं प्रसिद्ध केलेलें.)
१५ अहेवाल (हिंदुस्थानी.)
१६ नीतिपर पुस्तकमाला भाग १ (पोतदारकृत.)
१७ शिंद्यांच्या घराण्याचा इतिहास (सरंजामेकृत.)
१८ सिद्धांतशिरोमणिप्रकाश (सुबाजी बापूकृत.)
१९ होळकरांची कैफीयत.
२० कीन साहेबकृत माधवराव शिंद्यांचा इतिहास.
२१ नाना फडणविसांचें चरित्र (रा. रा. वासुदेव वामनशास्त्री खरेकृत.)
२२ परशुराम भाऊ पटवर्धन यांचें चरित्र (रा. रा. सहस्रबुद्धेकृत.)
२३ नागपूरकर भोंसल्यांची बखर (काशीराव राजेश्वर गुप्तेकृत.)
२४ खर्ड्याचे स्वारीची बखर (काव्येतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झालेली.)
२५ ,, (हस्तलिखित, हिंदुस्थानांतून आलेली.)
२६ छत्रपति धाकटे रामराजे व शाहूमहाराज यांचीं चरित्रें (मल्हार रामराव चिटणीसकृत.)
२७ यादी कारकीर्द विठ्ठल शिवदेव विंचूरकर.
२८ मराठ्यांचा पत्रपद्धति इतिहास.
२९ ऐतिहासिक गोष्टी भाग १।२ (लोकहितवादिकृत.)
३० पंतप्रधानाची शकावली.
३१ विंचूरकर घराण्याचा मोठा इतिहास (हरि रघुनाथ गाडगीळकृत.)
३२ मराठ्यांच्या मर्दुमकी भाग १ (केसरी वर्तमानपत्रांतील.)
३३ बालबोध मासिक पुस्तकांतील ऐतिहासिक गोष्टी व चरित्रें.
३४ मधुमक्षिका वर्तमानपत्र वर्ष १, अं. ४५।४६.
३५ डेविड सिंक्लेअरकृत हिंदुस्थानचा इतिहास (लुकतुकेकृत भाषांतर.)
३६ मध्यप्रांताचा इतिहास (मालकम साहेबकृत.)
३७ सारस्वतोपायन.
३८ नाना आणि महादजी (प्रो. चिं. गं. भानुकृत.)
३९ नाना फडणीस यांचें अल्पचरित्र (,,)
४० पत्रें जिववादादा व लखवादादा यांचे घराण्यांतील व त्या वेळच्या इतर घराण्यांतील.
४१ कैफीयत घनश्यामराव नारायण बक्षी यांची.
४२ लेखरत्नमाला (छापलेलीं पत्रें.)
४३ कोल्हापूर व कर्नाटक प्रांताचा इ. भा. २.
४४ उदेपूरचा इतिहास (लोकहितवादिकृत.)
४५ गोमांतकाचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास.
४६ ऐतिहासिक लेखसंग्रह मा. पु. पत्रव्यवहार.
४७ ग्रंथमाला मा. पु. तील ऐति. पत्रव्यवहार.
४८ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें (रा. रा. वि. का. राजवाडेकृत.)
४९ पत्रें व यादी वगैरे (काव्येतिहाससंग्रहांतील.)
५० मराठी शालापत्रक मा. पु. तील ऐतिहासिक लेख.
५१ बालांकुर मासिक पुस्तक ६, अंक ९ ते १२, एप्रिल, मे, जून, जुलई सन १८९९.
५२ भाषासार (सुधाकर पंडितकृत हिंदुस्थानी पुस्तक.)
५३ भोपाळ संस्थानचा इतिहास (माधवराव व्यंकटेश लेलेकृत.)

विषयानुक्रमणिका.

जिवबादादांचे घराण्याचा वंशवृक्ष.



१. हे घनश्यामराव बाबा वारल्यावर त्यांच्या बायकोनें नारायणराव ऊर्फ बापूसाहेब या नांवाच्या मुलास दत्तक घेतलें होतें. तेही हल्लीं वारले, व त्यांस जिवाजीराव या नांवाचा लहान मुलगा आहे. हे ग्वाल्हेरींत राहतात.

शिंदेशाहीचा खरा इतिहास

अथवा

बक्षीबहादर

जिवाजी बल्लाळ ऊर्फ जिवबादादा केरकर यांचें चरित्र.

(लखबादादा लाड वगैरे पुरुषांच्या हकीकतींसह.)

भाग १ ला.

जिवबादादांची जन्मभूमि.

इ० स० १५०० पासून स० १७४० पर्यंत.

सार्वभौम इंग्रज सरकारच्या ताब्यांत हल्लीं जीं कित्येक एतद्देशीय मांडलिक संस्थानें आहेत, त्यांपैकींच दक्षिण हिंदुस्थानांतील सांवतवाडी हें एक छोटेखानी संस्थान होय. सुमारें पावणेदोनशें वर्षांपूर्वींच्या ह्या संस्थानाच्या हद्दी पाहिल्या असतां, त्या महाराष्ट्र देशांत मराठ्यांची शौर्यश्री पहिल्यानें ज्यांनीं गाजविली, त्या मावळ्यांचें आद्यवसतिस्थान जो सह्याद्रि त्यानें या संस्थानाची पूर्व दिशा सांभाळिली असून, पश्चिमेस आरबी समुद्राचा भव्य किनारा, दक्षिणेस पोर्च्युगीज लोकांचा मुलूख ज्यास फिरंगाण ह्मणतात तो, व उत्तरेस कोल्हापूरकरांचा मुलूख, अशा होत्या. या संस्थानाचे अधिपति राजेबहादर सरदेसाई-सावंत भोंसले या उपनांवाचे-आहेत. हल्लींच्या सर्व एतद्देशीय संस्थानिकांत—लहानशाच मुलखांत कां होईना, पण-शिवछत्रपतींच्याही पूर्वींपासून स्वपराक्रमानें आपला अंमल स्थापित करून ज्यानें तो आजतागायत कायम राखिला आहे, असें दक्षिणेस हें एकच घराणें दिसतें. हल्लीं या संस्थानाचें क्षेत्रफळ सुमारें ९०० चौरस मैल असून त्याचा वसूल सुमारें चार लक्ष रुपये आहे.

हा मुलुख पूर्वीं कुडाळ प्रांत या नांवानें प्रसिद्ध होता. सुमारें पांचशें वर्षांपूर्वीं ह्या प्रांतावर 'देसाई' ह्या उपनांवाच्या सारस्वत ब्राह्मणांचा अंमल होता. सूर्यभान व चंद्रभान ह्या दोघां बंधूंचीं नांवें त्या प्रांतीं अझून प्रसिद्ध आहेत. हे त्या वेळीं कुडाळ प्रांताचा राज्यकारभार चालवीत होते. त्यांचें वास्तव्य कुडाळ ह्मणून हल्लीं जो वाडी संस्थानचा महाल आहे, त्या ठिकाणीं होतें. त्यांनीं दिलेल्या सनदा, इनामें वगैरे त्या प्रांतीं अझून चालत आहेत. पुढें कालांतरानें त्यांचें स्वामित्व नष्ट होऊन

१. हें संस्थान पहिले खेमसावंत व त्यांचा पुतण्या लखमसावंत, यांनीं सन १६१२-१३ सालीं स्थापिलें. यांची छत्री ओटवणें येथें आहे.

२. सरदेसाई यांजकडील जुन्या सनदांत सावंत भोंसले सरदेसाई 'प्रांत कुडाळ व महालानीहाय' असेंच आहे.

३. कुडाळापासून नजीकच वालावली ह्मणून एक गांव आहे. तेथें 'श्रीनारायणाचें' देवालय बांधून सदरहू देसाई यांनीं त्या देवस्थानाच्या खर्चाकरितां गांवाच्या उत्पन्नापैकीं सुमारें अर्ध्या उत्पन्नाच्या सनदा व खर्चाचें व्यवस्थापत्र करून दिलें आहे. तेव्हांची ती व्यवस्था पाहिली ह्मणजे ती लावणाऱ्या पुरुषाच्या शहाणपणाची मोठी धन्यता वाटते.

त्या प्रांतावर विजापुरकरांचा पूर्ण अंमल बसला, व त्या मुलखाच्या बंदोबस्ताकरितां त्यांनीं एक सुभेदार नेमिला. हा सुभेदार बांदें ह्मणून या संस्थानाचा जो एक महाल आहे, त्या ठिकाठीं राहत असे. त्या वेळीं तें शहर 'एदिलाबाद' ह्या नांवानें प्रसिद्ध होतें. विजापुरकरांच्या कारकीर्दींतील कांहीं मशिदी, तलाव, मोठमोठ्या विहिरी, वगैरे कित्येक अवशिष्ट राहिलेलीं जुनीं कामें तेथें अझून दृष्टीस पडतात. हल्लींचे वाडीचे सरदेसाई यांचा खेमसावंत या नांवाचा मूळपुरुष त्या वेळीं विजापुरकरांच्या दरबारीं एक सरदार होता, व पुढें बादशहाकडून सदरहू सुभेदारीच्या जागीं त्याचीच नेमणूक झाली. परंतु पुढें जेव्हां शिवाजी महाराजांच्या प्रतापसूर्यापुढें या अस्तास जाणाऱ्या बादशाही ताऱ्याचें तेज फिक्कें पडूं लागलें, तेव्हां तो छत्रपतींच्या सेवेस तत्पर झाला. शिवाजी महाराजांनीं त्यास साऱ्या कोंकणपट्टीचा सरदेसाई करून ' प्रांताच्या निम्मे वसुलांत त्यानें ३००० पायदळ बाहेर मुलखीं चाकरीस नेण्यास तयार ठेवावें व मुलखाच्या बंदोबस्तास लागेल ती फौज ठेवावी व बाकी निम्मे वसूल आपल्यास द्यावा' असें ठरविलें होतें. हा ठराव करण्यास सावंतांनीं आपल्या प्रधानांपैकीं पितांबरराव गुळगुळे चिटणीस या नांवाच्या एका शहाण्या मनुष्यास वकील ह्मणून पाठविलें होतें.[२] हा ठराव एक तर आपल्या स्वातंत्र्यास धक्का पोंचविणारा आहे व दुसरें शिवाजी महाराजांची सत्ता त्या वेळीं चांगली स्थिरस्थावर झालेली नव्हती, अशा या दोन कारणांमुळें तो राजे सावंत भोंसले यांस मान्य नव्हता. एकीकडून दिल्लीपति व दुसरीकडून विजापुरकर असे दोन मोठे घणवे, शिवाजी महाराजांनीं नुकत्याच उभारलेल्या महाराष्ट्रराज्यरूपी कोमल लतेस होरपळून टाकून तिचा नायनाट करण्यासाठीं, पेटत असल्यामुळें स्वकीयांकडे वारंवार नजर पुरविण्यास त्यांस अवकाश नव्हता. सबब सावंतांस त्यांजकडून अपाय होण्याची विशेष धास्ती वाटली नाहीं. या कारणामुळेंच आयती आलेली संधि न दवडतां सरदेसाई हे विजापुरकरांस पुनः जाऊन मिळाले. शिवाजी महाराजांच्या मागें अनेक व्यवसाय असल्यामुळें त्यांस अशा किरकोळ बाबींकडे लक्ष पुरविण्यास अवकाश नव्हता; तरी पुढें सवड मिळतांच (१६६२ त) त्यांनीं सरदेसाई यांजवर स्वारी करून त्यांचा मुलुख काबीज केला. तेव्हां सावंत शिवाजी महाराजांस पुनः शरण गेले. पुढें शिवाजी महाराजांनीं पूर्वीं ठरलेल्या शर्तींवरच तो मुलूख सरदेसाई यांजकडे राखिला.[३]

त्या वेळीं सरदेसाई यांच्या ताब्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें एकंदर १० महाल होते.

१ वाडी	२ कुडाळ	३ बांदें
४ डिचोली	५ सांखळी	६ पेडणें
७ चंदगड	८ जांबोटी	९ साळशी
	१० फोंडें	

यांपैकीं पेडणें महालांत समुद्राच्या लगत्यास केरी ह्मणून जें एक गांव आहे, तेंच आमच्या चरित्रनायकाची जन्मभूमि होय. त्यांचे पूर्वज कुशस्थली ऊर्फ कवळें या नांवाचें गोमांतक प्रांतीं जें रमणीय

---

१. गोडबोलेकृत म्यालेसन साहेबांच्या इतिहासाचें भाषांतर, पूर्वार्ध, पृष्ठ ३०५.

२. मल्हार रामराव चिटणीसकृत शिवछत्रपतीची बखर, पृष्ठ ५६. हे चिटणीस विजापुरकर बादशहाच्या सनदेवरून चिटणीस या पदाचा उपभोग घेत होते, व पुढें राजे सावंत भोंसले यांनींही चिटणिशी त्यांजकडेच बहाल केली. ती अद्यापि त्यांचे वंशांत तशीच चालू आहे. याबद्दलची माहिती 'पत्रें व यादी', पृ० ३७०, यांत आहे.

३. गोडबोलेकृत म्यालेसनच्या इतिहासाचें भाषांतर, पूर्वार्ध, पृष्ठें ३०५।३०६.

प्रसिद्ध क्षेत्र आहे, त्याच्या नजीकच्याच एका गांवचे कुळकर्णी होते. त्यांचें मुळचें उपनांव संजगिरे. हे जातीचे स्मार्त सांप्रदायी वत्सगोत्री सारस्वत ब्राह्मण होत.

शेजारीं असलेल्या फिरंगाणांतील प्रदेशासुद्धां हा सर्व मुलूख एकीकडून सह्याद्रि व दुसरीकडून समुद्र अशा उभयतांच्या सान्निध्यामुळें चांगला शोभिवंत दिसतो. एकीकडून केळी, नारळी, पोफळी, इत्यादिकांचें बागायती उत्पन्न, तसेंच दुसरीकडून भात, नागला, वरी, कुळीथ वगैरे कोकणी धान्यांचें शेतकी उत्पन्न; याप्रमाणें दोन्ही प्रकारच्या उत्पन्नावर या प्रांतींच्या लोकांची बऱ्याच प्रकारें उपजीविका होते. सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध असे जे गोमांतकी आंबे, त्यांचें पीक येथें बरेंच होतें. एथील हवापाणी निरोगी असून या प्रांतीं ठिकठिकाणीं तळीं, विहिरी, नदीनाले यांची उत्तम सोय आहे; व अनेक प्रकारचीं बागबागाइतें आणि सर्व हिंदुलोकांस पूज्य अशीं क्षेत्रें व देवस्थानें आहेत. त्यांहींकरून हा मुलूख सुरम्य व गजबजलेला दिसतो. या प्रदेशीं सृष्टिसौंदर्यही कमी आहे असें नाहीं. एकीकडे सह्याद्रीच्या गगनचुंबित शिखरांतून 'उंच माना करून' प्रतापशाली शिवछत्रपतींचें व शूर मराठ्यांच्या पूर्ववैभवाचें स्मरण देणारे रांगणा, मनोहर, मनसंतोष वगैरे अजस्र किल्ले आणि दुसरीकडे स्वभावतःच उच्छृंखल व भूमंडळास स्वाहा करण्याचें सामर्थ्य असतांही सृष्टिनिर्मित मर्यादांनीं निगडित झाल्यामुळें पिंजऱ्यांत सांपडलेल्या एखाद्या वाघाप्रमाणें आपल्या अखंड गर्जनांनीं दशदिशा दणाणून सोडणारा गंभीर काळाभोर अफाट सागर पाहून कोणाचें मन आश्चर्यानें थक्क होऊन जाणार नाहीं? मोठमोठे उंच पर्वत व डोंगर, त्यांचे तुटलेले विशाल व भयंकर कडे, त्यांवरील दाट व किर्र झाडी, मधून मधून दिसणारे गगनचुंबित विविध वृक्ष, तसेच अनेक प्रकारचे पक्षी व भयंकर श्वापदें, आनंददायक हवा, शुभ्र दहिंवर, आकाशाचे तऱ्हतऱ्हेचे रंग, त्यांतील विचित्राकृति अभ्रपटलें व त्यांतून पडणारा मुसळधार पाऊस, यांजमुळें या प्रांतींच्या पर्वतावरील प्रदेश फारच प्रेक्षणीय व विस्मयजनक होतात. सदैव खळखळ वाहणाऱ्या नद्यांच्या विशाल पात्रांची उपयुक्तता व शोभा खरोखरच मन वेधून टाकिते. एथील सुपीक भूप्रदेश लोकांना सर्व प्रकारें सुखकर आहे; इतकेंच नव्हे, तर सूर्यकिरणांस थारा न देणारीं आणि हिंस्र पशूंचें निरंतर वसतिस्थान झालेलीं अशीं अतिभयानक आणि विस्तृत अरण्यें देखील आश्चर्य, भीति, उद्वेग इत्यादि विकारांनीं व त्यांजपासून होणाऱ्या अनेक प्रकारच्या उपयोगांविषयींच्या विचारांनीं प्रेक्षकांचें मन गुंग करून टाकितात. या प्रकारचें हें सृष्टिवैभव विचारी पुरुषांच्या चित्तास मोह पाडल्याशिवाय कसें बरें राहील? धनसमृद्धि नसली तरी सृष्टिसौंदर्य व आरोग्यसंपत्ति, यांविषयीं हा प्रांत वर्णनीय आहे. या प्रांतांतून ज्या अनेक लहानमोठ्या नद्या निरनिराळ्या दिशांनीं वाहतात, त्यांमुळें या प्रदेशास पराकाष्ठेचें स्वाभाविक सौंदर्य आलें आहे; एवढेंच नव्हे, तर त्याखेरीज त्या प्रवासी व उद्योगी लोकांस एका गांवाहून दुसरे गांवीं जाण्यास फारच सोईच्या झाल्या आहेत. गोमांतक प्रांतीं सुखसंचार करण्यास जरी सर्वत्र मोठमोठ्या सडका नाहींत[1], तथापि हे सृष्टिनिर्मित प्रवाह आगगाड्यांच्या कृत्रिम सडकांप्रमाणें कोणाही स्थलांतर करूं इच्छिणारास फारच सोईवार व सुखावह झालेले आहेत. एकंदरींत हा प्रांत अत्यंत रमणीय व सुखदायक आहे.[2]

१. सध्यां गोमांतकांत रस्ते, तारायंत्रें वगैरे बाबतींत थोडथोडी सुधारणा होत आहे.

२. त्रेतायुगांतील पुराणप्रसिद्ध जो परशुराम (भार्गव राम), त्यानें सारें भूमंडळ निःक्षत्रिय केल्यावर दिग्विजयावसानीं एक महायज्ञ केल्याचें प्रसिद्ध आहे. तो यज्ञ वर सांगितलेल्या पेडणें महालांतील हरमल गांवीं झाला, असें ह्मणतात. (पहा सह्याद्रिखंड, अध्याय १ ल, व सरस्वतीमंडल पुस्तक पृ० ९.) अद्यापि तेथें त्या यज्ञाची खूण पटविणारा भस्माचा पर्वत दृष्टीस पडतो. तेथून नजीकच जो डोंगर आहे, त्यावर एक देवालय असून सध्यां तें मोडकळीस आलेलें आहे. त्या

वर ज्यास फिरंगाण किंवा गोमांतक असें ह्मटलें आहे, तो पोर्च्युगीज लोकांचा मुलूख सरदेसाई यांच्या मुलखाच्या दक्षिणेस सुमारें तितक्याच क्षेत्रफळाचा आहे. या देशांत सुमारें चारशें वर्षांपासून पोर्च्युगीज लोकांचा अंमल चालू आहे. युरोपियन लोकांपैकीं प्रथमतःच हिंदुस्थानांत प्रवेश करून व्यापारादिकांची हालचाल केली ती यांनींच. इतिहासांत हे फिरंगी या नांवानें प्रसिद्ध आहेत. सोळाव्या शतकाच्या प्रारंभीं 'वास्को दि गामा' नांवाच्या त्यांच्यांतील एका धाडशी पुरुषानें प्रथमतः हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पाऊल ठेविलें व पुढें क्रमाक्रमानें गोवें किंवा गोमांतक, दमण, मुंबई, इत्यादि प्रदेशीं त्यांनीं आपल्या लोकांचा अंमल बसविला. पुढें कांहीं वर्षांनीं मुंबई बेट हें पोर्च्युगीजांकडून इंग्रजांस आंदण मिळालें. बाकी प्रदेशावर आजतागायत त्यांचाच अंमल अबाधित चालत आहे.

आमचें हें आर्यावर्त ह्मणजे 'सुवर्णभूमि' असा त्या काळीं आसपासच्या व दूरदूरच्या सर्व राष्ट्रांत त्याचा लौकिक होता, व तोच येथील रहिवाशांच्या अनेक हालअपेष्टांस, नानाविध दुःखांस व 'निरयगती' पेक्षांही अगणित अधिक जाचणाऱ्या परवशतेस मुख्यतः कारणीभूत होऊन बसला. एतद्देशीयांच्या हातचें स्वामित्व जाऊन जेथें जेथें परकीयांचा अंमल बसला, तेथें तेथें घडून आलेली पहिली व अत्यंत शोचनीय गोष्ट ह्मटली ह्मणजे त्यांच्या हातून झालेला धर्मच्छल, ही होय. त्यांत मुसलमानांनीं व त्यांच्याहीपेक्षां फिरंग्यांनीं या बाबतींत मोठाच कहर करून सोडला. 'ते फिरंगी लोक फारच हेकट होते, त्यांचे आचारविचार, भक्ष्य, वेष इत्यादि पाहून ब्राह्मणांस फार त्रास होई. तथापि त्या फिरंगी लोकांना स्वतांची जाति आणि धर्म हीं मात्र खरीं आणि इतर सर्व लोक रानटी आणि त्यांचे धर्म अगदीं अडाणी व मूर्खपणाचे, असें वाटत असे. त्यांत हिंदूंचा आर्यधर्म हा तर भूतपिशाचादिकृत कांहीं तरी जादूमार्ग आहे, असें ते समजत. त्यांच्या स्वदेशीं त्या वेळेस परधर्मी लोकांचा मोठा छळ चालला होता. आणि आपल्या मताहून भिन्न मताचे जे लोक त्यांचा समूळ विध्वंस करावा किंवा दांडगाईनें त्यांस स्वमतांत आणावें यांत मोठें पुण्य आहे, असें मुसलमान लोकांप्रमाणें तेही मानीत असत. आणखी कोणत्याही बऱ्यावाईट साधनांनीं जर सर्वांचा एक धर्म झाला आणि एक जात केली, तर आपल्या राज्याला मोठी बळकटी येईल असें जें कित्येक अविचारी राज्यकर्त्यांचें मत असतें, त्याप्रमाणें त्यांचेंही असे. त्यामुळें त्यांनीं हिंदूंचा धर्म समूळ उपटून टाकण्याचा दुष्ट निश्चय केला. आणि त्यांजवर पराकाष्ठेचा क्रूरपणा चालविला. तेथील लोकांचीं घरें, गांवें आणि देवळें बाटविणें, मूर्ति फोडणें, यज्ञोपवीतें तोडणें, शेंड्या कापणें आणि अभक्ष्य वस्तु त्यांच्या तोंडांत दांडगाईनें खुपसणें, या कृत्यांचा त्यांनीं सपाटा चालविला.' त्यी जुल-

देवालयांतील श्रीनारायणाची सर्वांगसुंदर मूर्ति सूर्यभान राजानें (पूर्वीं सांगितलेल्या कुडाळ प्रांताधिकाऱ्यानें) तेथून (सुमारें १० कोसांवर असलेल्या) वालावली गांवीं स्थापिली. ही मूर्ति काळ्या वाळूची असल्यामुळें तिला स्नान घालतांना खालीं वाळू जमते. वरील डोंगरांत एका ठिकाणीं काळा खडक खोदून मोठमोठ्या गुहा केलेल्या आहेत. व त्यांस बाहेरून चतुष्कोणाकृति सहा दरवाजे राखिलेले आहेत.

१. सुमारें सन १८९१ सालच्या टाइम्स आफ् इंडियाच्या एका अंकांत सांत फ्रांसीस नांवाच्या पोर्च्युगीज साधूचें चरित्र छापिलें आहे. त्यांत त्या एकट्यानेंच हिंदुस्थानांत हजारो एतद्देशीयांस बाटविल्याचें लिहिलें आहे. यावरून त्या साऱ्या लोकांकडून हें बाटविण्याचें काम किती झालें असेल, ह्याचा अंदाज सहज होईल. शिवाय, गोमांतकाच्या इतिहासांत, पृ० ६४ एथें ह्मटलें आहे कीं, फक्त सांत फ्रांसिसानेंच बारा लक्ष लोक बाटविले ! ! व जे बाटत नव्हते, त्यांस जिवंत जाळून मारिलें ! ! !

मांच्या प्रतीकारार्थ हिंदु लोकांनीं शक्त्यनुसार प्रयत्न केले. पण ते सर्व निष्फळ झाले. कारण, त्यांचें दैव हात धुऊन त्यांच्या पाठीस सारखें लागलेलें! तशांत शत्रु पडले एकजुटीनें प्रयत्न करणारे व एतद्देशीय तर बोलून चालून कलहप्रिय. यामुळें त्यांस फिरंग्यांचा जुलूम मुकाट्यानें सोसावा लागला. बरें, त्याचा प्रतिकार करावा म्हटल्यास त्यांना आपल्या मुलखाचा त्याग करून देशांतर करावें लागलें असतें; परंतु त्यांचा जमीनजुमला घरदार सर्व कांहीं तेथें असल्यामुळें त्यांना त्याचा त्याग करवेना. आणि राहावें म्हटल्यास आज हिंदु तर उद्यां क्रिस्तांव अशी अत्यंत करुणास्पद स्थिति! यामुळें कोणत्याही मार्गाचें अवलंबन करण्याचा त्यांचा निश्चय होईना. एतावता सहस्रावधि कुटुंबें शोकार्णवांत बुडालीं, लक्षावधि लोकांचे बळी पडले आणि अवशिष्ट राहिलेले सर्व वाट फुटेल तिकडे पळून गेले. घरेंदारें ओस पडलीं; देवालयांतील मूर्ति फोडून छिन्नविच्छिन्न केल्या; याप्रकारें सर्व लोकांवर मोठाच कहर गुदरला!!!

फिरंगी लोकांनीं जो प्रळय मांडिला, त्यापासून अनेक अनिष्ट प्रकार घडले. हजारो लोकांचा स्वधर्म सुटला. बाटलेल्यांस पुनः हिंदुधर्मांत घेण्याची सवड नसल्यामुळें ते लोक दुःखसागरांत बुडून गेले. त्यांचें हें झालेलें नुकसान कोणत्याही रीतीनें भरून येण्यासारखें नव्हतें. बाटण्याच्या भीतीनें जे लोक आपलीं घरेंदारें, वतनवाड्या व सर्व वित्तविषय टाकून ग्रामांतरास गेले, त्यांचीही स्थिति कमी करुणास्पद नव्हती. अशा स्थितींत गेलेले त्यांचे दिवस किती क्लेशपूर्ण व संकटप्रचुर होते, याचा अंदाज कोणासही सहज करितां येईल.

अशी चोहोंकडे भयंकर धामधूम चालली असल्यामुळें आमच्या चरित्रनायकाचे विठ्ठलपंत नांवाचे कोणी पूर्वज आपला जमीनजुमला, घरदार इत्यादिकांवरील ममत्व सोडून शेजारच्या सरदेसाई यांच्या मुलुखांतील पेडणें महालांतील मोरज नांवाच्या गांवीं आपल्या ओळखीच्या एका गृहस्थाचे घरीं येऊन राहिले.

त्या काळीं एतद्देशीय संस्थानांत दंगेधोपे, लुटालूट, पळापळ इत्यादि प्रकार मुळींच नव्हते असें नाहीं. तथापि इतर प्रांतांपेक्षां सरदेसाई यांच्या प्रांतांत या बाबतींत पुष्कळ अंशीं स्थिति चांगली होती. सरदेसाई यांनीं आपल्या रयतेस त्रास पोहोंचूं नये, म्हणून चांगला बंदोबस्त ठेविला होता. कारण, शेजारच्या फिरंगी लोकांचा उपद्रव आपल्या मुलखांत होऊं नये, हें एक; आणि आपले यजमान छत्रपति यांचें सारें लक्ष आपल्या प्रजेच्या हिताकडे असल्याचें ते पाहत असत, हें दुसरें. अशा दुहेरी कारणांमुळें ते आपल्या मुलखाच्या बंदोबस्ताकरितां फार जपत असत, व तेणेंकरून त्या काळींही त्यांचे राज्यांत बरीच शांतता होती.[१] यामुळें पूर्वोक्त जुलमास त्रासून देशांतराकरितां निघालेलीं गोमांतकांतील पुष्कळ ब्राह्मणांचीं घराणीं या प्रांतीं येऊन स्थायिक वतनदार होऊन राहिलीं.

सरदेसाई हे छत्रपतींचे अंकित झाले म्हणून वर लिहिलेंच आहे. तदनुरूप ते पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत छत्रपतींशीं स्नेहभावानें राहिले. एकदा जेव्हां शिवाजी महाराज आपल्या मुलखाच्या बंदोबस्ताकरितां

१. अशी गोष्ट सांगतात कीं, सरदेसाई यांनीं थोड्या खर्चांत पुष्कळसे लढाऊ लोक आपल्या पदरीं राखण्याची एक युक्ति केली होती. ती अशी:—प्रत्येक नोकरास एका वर्षासाठीं म्हणून फार थोडा मुशाहिरा ठरविला होता. पण त्यांत त्यानें उभ्या वर्षांत काय ती एक महिनाभरच नोकरी करावी, आणि बाकी अकरा महिने आपला खासगी धंदा करावा, असें ठरविलें होतें, व प्रसंग पडेल तेव्हां सर्वांनां एकत्र जमावें, असें केलें होतें. अशा रीतीनें कायमच्या फौजेशिवाय एक हजार लोकांसाठीं जो खर्च व्हावयाचा, त्यांतच बारा हजार लढाऊ लोक त्यांनीं आपल्या ताब्यांत ठेविले होते.

दक्षिणेंत आले होते, तेव्हां सरदेसाई यांच्या मुलखांतील व्यवस्था पाहून त्यांस समाधान वाटलें. सदरील मुलखांत रेडी गांवीं यशवंतगड नांवाचा एक किल्ला समुद्राच्या लगत्यास असलेल्या एका डोंगराच्या शिखरावर बांधलेला होता. तेथील बिकट जागा व शत्रूस अजिंक्य अशी त्या किल्ल्याची बांधणी पाहून त्याचा आणखी जास्त बंदोबस्त करावा, असें त्यांच्या मनांत आलें. मग त्यांनीं बराच खर्च करून किल्ल्याचीं कित्येक कामें फार मजबूत केलीं व आंत राहावयाचे सोईकरितां कांहीं वाडे, विहिरी, तळाव, पागा वगैरे नवीन बांधविल्या. पुढें खेमसावंत यांचा पुत्र फोंडसावंत हा सन १७०९ मध्यें गादीवर बसला, व याच्याच कारकीर्दींत इंग्लिश सरकारचा वाडकरांशीं पहिल्यानें संबंध जुळला. इंग्रजांचे गलबतांस समुद्रांत चांचे लोकांचा फारच उपद्रव होऊं लागला होता. त्यांचा बंदोबस्त करावा व पश्चिम हिंदुस्थानांतील एखाद्या राज्याशीं आपला स्नेह असावा, अशा दुहेरी हेतूनें त्यांनीं फोंडसावंत यांजबरोबर स० १७३० त तह केला. पुढें छत्रपति शाहू महाराजांनीं सरदेसाई यांस त्यांच्या जहागिरीची सनद करून दिली. याप्रमाणें इंग्रजांशीं स्नेह व छत्रपतींची पूर्ण मर्जी या दोन गोष्टींमुळें या लहानशा संस्थानिकास त्या वेळीं बरेंच वजन प्राप्त झालें. पण तें फार दिवस टिकलें नाहीं. फोंडसावंताचा वडील मुलगा नारसावंत यानें आपल्या बापाविरुद्ध बंड केल्यामुळें त्यास पकडण्याचे कामीं कांहीं लोकांची नेमणूक झाली होती. पुढें त्यांची यांची जी झटापट झाली, तींत नारसावंत गोळी लागून ठार झाला. त्यामुळें फोंडसावंत यास पुत्रशोक होऊन त्याला राज्य नकोसें झालें, व नंतर लौकरच त्यानें आपला नातू रामचंद्र सावंत, ह्मणजे सदरील नारसावंत याचा पुत्र, याचे आधीन आपलें राज्य केलें. सरदेसाई यांचें वैभव कोल्हापुरचे महाराजांस पूर्वींपासूनच सहन होत नव्हतें; यामुळें ते सरदेसाई यांचा द्वेष करीत. शिवाय, इंग्लिशांचा पूर्वीं संपादिलेला स्नेहही फार दिवस टिकला नाहीं. कारण, वाडकरांच्या राज्यांतील पुष्कळ चांचे लोक इंग्रजांच्या व फिरंगी लोकांच्या गलबतांस फारच उपद्रव देऊं लागले. सबब, या गोष्टीच्या बंदोबस्तासाठीं इंग्रज व फिरंगी हे दोघेही त्यांच्याबरोबर लढाईस उठले. कोल्हापूरकरांस हेंच पाहिजे होतें. इंग्लिशांनीं सरदेसाई यांचा रेडी येथील यशवंतगड हा किल्ला घेतला व चांचे लोकांचा बंदोबस्त केला. पण, पुढें त्यांनीं तो किल्ला सरदेसाई यांस परत देऊन त्यांजपासून असा करार करून घेतला कीं, इंग्रजांचे गलबतांस सरदेसाई किंवा त्यांच्या राज्यांतील कोणापासूनही उपद्रव होऊं नये. त्या वेळीं खेमसावंत ऊर्फ राजश्री हे गादीवर होते. बऱ्याच दिवसांपासून या राज्यास उतरती कळा लागली होती. इंग्लिश, फिरंगी व कोल्हापूरकर असे तिघेही सरदेसाई यांस प्रतिकूल झाल्यापासून त्या राज्याचें पुष्कळ नुकसान झालेलें होतें. पण आमच्या चरित्रनायकानें याच संधीस प्रसिद्ध महादजी शिंदे यांची बहीण लक्ष्मीबाई इच्याशीं राजश्रींचा विवाह घडवून आणिला. याबद्दलची हकीकत प्रसंगानुसार दिली आहे. असो. हा विवाह घडून आल्या दिवसापासून शिंदे सरकारच्या वतीनें आमच्या चरित्रनायकानें सावंतांस वेळोवेळीं साह्य केल्यामुळें त्यांस कोणापासून फारशी बाधा झाली नाहीं.

विठ्ठलपंत संजेगिरे यांची कालक्रमणा मोरज गांवीं कशी काय चालली होती, याविषयींची बरोबर माहिती उपलब्ध नाहीं. पण त्यांच्या दोनतीन पिढ्या तेथें गेल्या, व तेथें त्यांनीं कुळकर्ण वतन संपादिलें, एवढी माहिती मिळते. मोरज गांवापासून जवळच ह्मणजे अजमासें आठदहा मै-

१. यांचे पूर्वज विजयानगरच्या राजाचें निलगिरीवर जें सैन्य होतें, त्याचे सेनापति होते; ह्मणून त्यांस संजगिरे हें उपनांव पडलें आहे. विजयानगरचे राज्यांत पुष्कळ सारस्वत ब्राह्मण कारभारी—कामदार—होते. या लोकांचीं देसाई, सामंत, देशप्रभु, देसक, पै, कामती, नाडकर्णी, नाडगौडा, शानभोग, देशपांडे, वगैरे जीं उपनांवें आहेत, तीं तिकडचींच होत.

लांच्या अंतरावर हरमल व केरी असे एकास एक लागून दोन गांव आहेत. तेथें विठ्ठलपंतांनीं किंवा त्यांच्या पुढील वंशजांनीं कांहीं जमीनजुमला संपादिला होता. तो त्यांच्या कुळांच्या हातीं असून त्या धामधुमीचे दिवसांत त्या जमिनींपासून व्हावी तशी उपार्जना होत नव्हती. आणि स्वतःचें वास्तव्य त्या गांवीं असल्यावांचून इच्छेनुरूप जमिनीची निगा होणें अशक्य होतें. यास्तव तेथेंच घर बांधून राहावें, असें त्यांच्या मनांत येत असे. पण त्याप्रमाणें घडून येईना. व पुढें प्रपंच वाढला असतां अशाच स्थितींत दिवस घालविण्याची सोय राहिली नाहीं असें पाहून त्यांच्या घराण्यांतील एक पुरुष केरी गांवीं येऊन राहिला. केरी हा गांव नदीच्या तोंडावर आहे. त्या नदीस तेरेखोलची खाडी असें ह्मणतात. खाडीच्या तोंडाशींच दुसऱ्या बाजूस डोंगरावर एक किल्ला आहे, त्यास तेरेखोलचा किल्ला असें ह्मणतात. रेडी गांवानजीक शिवाजी महाराजांनीं जो लिंगाणा नामक किल्ला बांधिल्याचें प्रसिद्ध आहे, तो हाच किल्ला असावा. शिवाजी महाराज कांहीं दिवस रेडी येथें राहिले होते व त्या मुदतींत त्यांनीं रेडीच्या यशवंतगड किल्ल्यानजीक घुलघुसा ऊर्फ दुर्गाड या भागावर मोठमोठ्या दगडी इमारती बांधिल्या होत्या असें सांगतात. अद्याप त्या जमिनीवरील उंचवटे खोदले तर दगडी बांधकामें, विटा वगैरे दृष्टीस पडतात. असो. केरी गांव नदीतीरीं असल्यामुळें खाडीच्या खाऱ्या पाण्याच्या संसर्गानें त्या गांवाचा बराच भाग नापीक झाला होता. संजगिरे यांचें वास्तव्य त्या गांवीं झाल्यापासून त्यांनीं आपल्या मालकीची जमीन बरीच नांवारूपास आणिली. पुढें चरित्रनायकाच्या वैभवाच्या वेळीं नदीस मोठा बांध घालून खाडीचें खारें पाणी गांवांत भरत होतें तें बंद करून त्यांनीं त्या गांवाला सुपीकपणा आणिला. ही हकीकत योग्य स्थलीं दिली आहे.

आमच्या चरित्रनायकाचे आजे विठ्ठलपंत यांस गणपतराव, बळवंतराव व रामकृष्णराव असे तीन मुलगे होते. हे तिघेही बंधु बुद्धिमान्, उद्योगी व मनमिळाऊ होते. विठ्ठलपंतांच्या पश्चात् कुटुंबाचा सर्व भार गणपतराव यांजवरच पडला. परिवार बराच मोठा होता. तरी शेतभात, बागाईत, कुळकर्ण इत्यादिसंबंधी उद्योगानें हें कुटुंब साधारण स्थितींत बऱ्याच लौकिकानें सुयंत्र चाललें होतें. याच संधीस यांनीं आरंवदें गांवीं नवीन कटुबांण जमीन संपादिली. हे तिघेही भाऊ एकमेकांच्या विचारानें वागून प्रापंचिक कामांत किंबहुना सर्वच बाबतींत यश देणारा जो उद्योग, त्याची अनन्यभावें आराधना चालवीत होते.

ज्येष्ठ बंधु गणपतराव यांस नरोबा, जिवबा व शिवबा असे तिघे मुलगे झाले. त्याचप्रमाणें कनिष्ठ बंधु रामकृष्णराव यांसही जगन्नाथ, बाळाजी व साबाजी असे तीन पुत्र झाले. हीं मुलें निरोगी, धीट, चलाख व गुणी असून आपल्या बाललीलांनीं वडिलांस हर्षनिर्भर करूं लागलीं. या मुलांपैकीं जिवबा हेच आमचे चरित्रनायक होत. बळवंतरावांस पुत्र नव्हता ह्मणून जिवबांस त्यांनीं दत्तक घेतलें होतें; यास्तव हे जिवाजी बल्लाळ झाले. यांच्या बाळपणच्या हकीकती व रोजगारासाठीं हे देशांतरीं केव्हां गेले, ह्याबद्दलचें सविस्तर वृत्त पुढील भागांत देऊं.

१. यांचें नांव गणपतराव होतें असें समजतें. मूळ पुरुष विठ्ठलपंत. त्यांजपासून चरित्रनायकाचे आजे विठ्ठलपंत यांच्या दरम्यान यांच्या कुटुंबांत जे पुरुष झाले, त्यांची नांवनिशी मिळत नाहीं. पुढील वंशावळ सोबत दिली आहे.

२. नियमित सरकारसारा ठरवून त्या रकमेस एखादें ठिकाण कायम करून देणें, ह्या प्रकारास कटुबाण ह्मणतात.

भाग २ रा.

बालपण व पूर्ववृत्तांत.

इ० स० १७४० पासून स० १७५६ पर्यंत.

जिवबाचा जन्म इ० स० १७४० त झाला. हा व याचे दोघे बंधु व रामकृष्णरावांचे जगन्नाथ ऊर्फ जगोबा वगैरे तीन मुलगे, अशीं हीं सहा मुलें हुशार व सर्वांस आवडणारीं होतीं. पोरवयांतील आवडीप्रमाणें यांनीं अनेक प्रकारच्या खेळांत कालक्षेप करावा. पण त्या वयांतसुद्धां त्यांना वडिलांनीं चांगली शिस्त लावून दिली होती. सूर्योदयापूर्वीं उठणें, शौचमुखमार्जनादि विधि उरकल्यावर सूर्यास नमस्कार करणें व वडील माणसांच्या नजरेआड फार वेळ न राहणें, ह्या गोष्टी त्यांना अगदीं आवश्यक करून ठेविल्या होत्या. शिवाय, वडील माणसें सांगतील तें लागलीच ऐकणें, सत्य व नम्र बोलणें आणि सर्व वडील माणसांची भीड राखणें व त्यांची अदब ठेवणें, हें तीं मुलें मोठीं होऊं लागलीं तसतसें त्यांना शिकविलें. त्या वेळच्या रीतीप्रमाणें भूपाळ्या, श्लोक वगैरेंचा अभ्यास त्यांजकडून घरींच करविला. आणि तीं शाळेंत जाण्याच्या लायकीचीं झाल्याबरोबर त्यांना पंतोजीच्या हवालीं केलें. जुन्या पद्धतीचें शिक्षण, ह्मणजे लिहितां वाचतां येणें, साधारण प्रतीचे हिशोब करितां येणें, अनेक मायन्यांचीं मोडी लिखितें वाचणें, त्याचप्रमाणें श्लोक, भूपाळ्या, प्रातःस्मरणादि कांहीं पद्यें शिकविणें, एवढेंच काय तें होतें. कांहीं वर्षांनीं त्यांत हीं मुलें तयार झालीं. गणपतराव आपल्या मुलांच्या अभ्यासाकडे व त्यांच्या खासगी वर्तनाकडे फार लक्ष पुरवीत, व पंतोजीकडून जरूर त्या सुधारणा करवीत.

योग्य काळीं त्यांचे उपनयनसंस्कार झाले, व तेव्हांपासून संध्यापूजनादि आन्हिक ब्रह्मकर्म उपाध्यायाकडून त्यांस शिकविण्याची तजवीज ठेविली होती. शाळेंतील अभ्यास व हा ब्रह्मकर्माचा अभ्यास हे निरनिराळ्या वेळीं सुरू ठेविले होते. पुढें शाळेंतील शिक्षण नांवाला मात्र सुरू होतें. अक्षरें घटविणें, बखरी वाचणें, खतें पत्रें लिहिणें व जमाखर्च समजून घेणें व लिहिणें, हीं कामें वडील माणसें व पंतोजी यांजकडून समजून घेऊन व स्वतः परिश्रम करून त्यांत हीं मुलें बरींच तयार झालीं. प्रपंचस्थिति साधारण प्रकारचीच असल्यामुळें या मुलांस हरएक कामांत आपल्या वडील माणसांस मदत करावी लागत असे. आणि तीं प्रकृतीनें सुदृढ होतीं ह्मणून हौसेनें घरगुती कामांत वडिलांस पुष्कळ उपयोगींही पडत असत. नेहमीं कामकाजांत राबूं लागल्यामुळें त्यांचीं शरीरें निरोगी आणि भरदार होऊं लागलीं. मुलांची मदत वाढल्यामुळें वडिलांस शेतवाडी, बागाईत वगैरे मोठ्या प्रमाणावर करण्यास उमेद आली, व दिवसेंदिवस त्या घराण्याची स्थिति सुधरत चालली.

जिवबाचें शरीर फार मजबूत व भव्य होतें. तो निमगोरा असून त्याचा चेहरा सतेज दिसे. कोणत्याही घरगुती कामाला आरंभ केल्यावर त्यांत कितीही श्रम पडले तरी तो ते मोजीत नसे. बाकीचे बंधु थकल्यास त्यांस उत्तेजन देऊन काम शेवटास नेल्याशिवाय विश्रांति घ्यावयाची नाहीं, अशी त्यांच्यामध्यें तो ईर्ष्या उत्पन्न करी. जिवबाची शक्तिमत्ता, कसदारपणा आणि दृढनिश्चय ह्या गुणांचा पगडा त्याच्या बंधूंवर पडूं लागल्यामुळें ते त्याच्या अनुमतानें व धोरणानें वागूं लागले. जिवबाची धर्मश्रद्धा उत्तम असल्यामुळें नित्यनैमित्तिक कर्में करणें, व्रतें वैकल्यें पाळणें आणि प्राकृत ग्रंथ वाचणें, इकडेही त्याचा कांहीं वेळ खर्च होत असे. कथाप्रसंगांतील युद्धादिकांचीं वर्णनें त्यानें बायका

व समवयस्क मुलें यांपुढें आवेशयुक्त व रसभरित वाणीनें करावीं. ह्या सर्व गोष्टी लक्षांत आल्यामुळें गणपंतरावांस जिवबाची योग्यता निराळी आहे असें वाटूं लागलें. हा मुलगा पुढें कीर्ति मिळवील अशी त्यांनीं अटकळ केली. परंतु ती अटकळ घरच्याघरीं राहूनच संपन्न होऊन चारचौघांत नांव मिळविण्यापुरतीच होती. याहून उच्च प्रतीच्या स्थितीला आपण पोहोंचूं याबद्दलचे विचार मनांत येण्यास साधनानुकूल्यच नव्हतें.

आपली शरीरसंपत्ति वाढवून अधिकाधिक श्रमसाहसाचीं कामें करण्याचा जिवबानें पुढें सराव ठेविला. आपली प्रकृति बिघडल्याचें निमित्त करून रोज सकाळीं दूध पिण्याचा व खूब रपेट करून येण्याचा त्यानें परिपाठ ठेविला. घरांत दूधदुभतें बरेंच असल्यामुळें त्याचा हा बेत सहज सिद्धीस गेला. पाण्यांत पोहणें, होड्या लांबवर वल्हवून नेणें, झाडांवर चढणें, दूरवर धावून येणें, कुस्ती खेळणें, जोर काढणें इत्यादि शक्तिवर्धक कामें, त्यानें फार करावीं. हीं कामें करीत असतां तो आपल्या बंधूंसही सोबतीस घेत असे. ह्या शक्तिवर्धक खेळांपासून त्यांना फार फायदा झाला. जिवबाला चांगलें पोहतां येत असे. एकेक हाकपर्यंत पाण्यांतून डोकें वर न करितां पोहत जावयाचें इतकें त्याचें बाहुबल व दम छाटण्याची शक्ति होती. बंदुकीचें नेम धरण्याचें काम त्याला चांगलें साधलें होतें. त्याचप्रमाणें घोड्यावर बसण्याचाही त्याला फार नाद असे. कोणाचाही घोडा बसण्यास मिळण्यासारखा असला तर त्यानें ती संधि फुकट जाऊं देऊं नये. त्याच्या उघड्या पाठीवरच बसून त्यानें त्यास पुष्कळ लांबून दमवून आणावें. घोडा केवढाही मोठा असला तरी हा आपल्याला पाडील, व तेणेंकरून आपल्यास अपाय होईल, अशी भीति त्यास कधीं शिवली नाहीं. आणि त्याप्रमाणें तो घोड्यावरून कधीं पडलाही नाहीं व ह्मणूनच घोड्यावर बसण्याच्या त्याच्या उमेदीचा कधीं हिरमोड झाला नाहीं. त्याचें धैर्य विलक्षण असल्यामुळें, त्याच्या सोबत्यांपैकीं कोणी केवढ्याही शक्तीचा असला तरी त्याला जिवबाबरोबर झोंबी घेण्यास खातरी वाटत नसे. दोनचार सोबती जमून जरी त्याजवर चालून आले तरी त्यांशीं सामना करून त्यांजपासून पराभव न पावतां जिवबा आपला विजयी व्हावयाचाच, अशा प्रकारची त्याची शक्ति व युक्ति होती.

एके प्रसंगीं त्याच्या शक्तिमत्तेचा अचाट प्रभाव दिसून आला. आणि त्यामुळें त्याजमध्यें विलक्षण सामर्थ्य आहे असें सर्व लोक ह्मणूं लागले. ती हकीकत अशीः—गोवें प्रांत फिरंगी लोकांनीं घेतला होता. त्या प्रांतांत त्यांची अप्रतिहत सत्ता चालत असून त्यांचा दरारा असा कांहीं बसून गेला होता कीं, तज्जातीय लोकांनीं कांहीं केलें तरी त्यांच्या विरुद्ध कोणी चकार शब्द काढीत नसे. सर्व प्रजा त्यांस थरथर कांपत होती. गोरा सोलजर दृष्टीस पडला कीं, खेडवळ लोकांनीं दारांस कड्या लावून घ्याव्या, इतके ते त्यांना वचकून असत. रयतेकडून आपल्यास कांहीं अटकाव व्हावयाचा नाहीं ह्मणून दारू पिऊन धुंद झालेले आडदांड सोलजर लोक तिच्या बागबागाइतांची मन मानेल तशी नुकसानी करीत. एकदा तिघे फिरंगी सोलजर समुद्रकांठानें एके नावेंत बसून केरी गांवाजवळ आले, व त्यांनीं ती नाव तेरेखोलच्या खाडींत घालून किनाऱ्यास आणून ठेविली. आणि आपण नजीकच्या बागेंत शिरून माडझाडांवरील नारळांचा फडशा पाडूं लागले. त्या वेळीं जिवबा त्या बागेजवळच होता. त्यानें लांबून सोलजरांचें हें कृत्य पाहिलें. तेव्हां त्याला त्यांचा फारच राग आला. सोलजर नारळ पाडीत पाडीत त्या होडीपासून दूर आहेत असें पाहून जिवबानें ती नाव ढकलीत ढकलीत रेतींत दहावीस हात आलीकडे आणून ठेवून आपण तेथून दूर जाऊन उभा

राहिला. इतक्यांत ते सोल्जर बागाची यथेष्ट नामधूस करून नाव ठेविलेल्या ठिकाणाजवळ आले, आणि पाहतात तों ती तेथून दहावीस हातांवर कोणीं रेतींत ओढून नेऊन ठेविली आहे. मग ते रागावून चोहोंकडे पाहून आपसांत फिरंगी भाषेनें बोलूं लागले. ती मौज पाहून जिवबा धट्टपणानें त्या होडीजवळ येऊन उभा राहिला. त्यास पाहतांच ते समजले कीं, हें कृत्य याचेंच आहे. मग ते तिघेही चवताळून त्याच्या अंगावर गेले. त्यांपैकीं दोघांनीं जिवबाचे दंड करकचून दाबून धरिले आणि तिसरा आपली बुटांची लाथ त्यावर मारणार तोंच जिवबानें त्या दोघांसही हिसडून आपल्यापासून दूर केलें, आणि त्यांचे हात करकचून असे मुरगाळले कीं त्यांची गाळणच उडाली! आणि तिसरा नावेशीं होता त्याची तंगडी धरून त्यास नावेंत ढकलून दिलें. तिघांही सोल्जरांस हें कृतकर्माचें यथास्थित प्रायश्चित्त मिळण्याबरोबर त्यांना नेटिवांची शक्तिमत्ता कोणत्या प्रकारची असते ह्याचा चांगला उमज पडला! मग त्यांनीं मोठ्या परिश्रमानें ती नाव ओढून पाण्यापर्यंत आणून तींत बसून जे तडक चालते झाले, जे पुनः केरीच्या बाजूस कधींही फिरकले नाहींत!

मोठीं ओझीं उचलणें, तऱ्हतऱ्हेच्या पैजा जिंकणें, कुस्तींत दुसऱ्यास चीत करणें, अशा प्रकारचे जिवबाच्या शक्तीचे प्रत्यय पुष्कळ वेळां आले होते. पण दांडग्या तिघां गोऱ्या सोल्जरांस चीत करून त्यांची खोड मोडल्यानें सर्वांस फार आश्चर्य व आनंद वाटला. जिवबाच्या वडिलांस ही गोष्ट समजल्यावर यवनजातीच्या सोल्जरांस शिवल्याबद्दलच ते त्याच्यावर रागावले, आणि त्याजकडून सचैल स्नान करवून नवीन यज्ञोपवीत धारण करविलें. त्या काळच्या समजुतींत व आजच्या समजुतींत केवढें हें अंतर! लोकसमजुतींत काल असाच फरक करीत असतो.

जिवबास लिहितां वाचतां येऊं लागल्यापासून व विशेषतः मोडीवाचनासाठीं त्या काळच्या पद्धतीप्रमाणें जुन्या हस्तलिखित बखरी त्याच्या हातीं पडल्यापासून त्याचा बराच काळ त्या बखरींच्या वाचनांत जाऊं लागला. बखरींत निरनिराळ्या प्रसंगांचें वर्णन सरासरीच केलेलें असे. कारण, हल्लींप्रमाणें प्रौढ व चटकदार भाषेंत खुलवून लिहिण्याची तऱ्हा त्या काळीं नव्हतीच ह्मटलें तरी चालेल. पण घडलेली खरी हकीकत साध्या व सुबोध भाषेंत लिहिलेली असे, व तेवढीच जिवबाचें अंतःकरण वेधण्यास पुरे होई. सिंहगडची मोहीम, अफझुलखानाची स्वारी इत्यादि त्या बखरींतील वीरश्री उत्पन्न करणारीं प्रकरणें वाचलीं ह्मणजे जिवबाच्या अंगांत तिचा बराच संचार होई. बखरींतील हे आवडते प्रसंग जिवबाला अगदीं मुखोद्गत होऊन गेले होते. आपला देश, त्याचें प्राचीन वैभव, पूर्वींच्या काळीं होऊन गेलेले अनेक भाग्यशाली पुरुष, त्यांनीं आपल्या लोकोत्तर गुणांनीं व अचाट बुद्धीनें या देशावर केलेले महदुपकार इत्यादि गोष्टींचें तो नित्य चिंतन करीत असे. त्याची समजूत अशी झाली होती कीं, मनुष्याचें मुख्य कर्तव्य ह्मटलें ह्मणजे धर्मसंरक्षण व देशसेवा होय. त्यांत जो आपला देह झिजवील तोच खरा भाग्यशाली व तोच सगळ्या दुनियेंत पूज्य.

जिवबाच्या सहवासानें व त्याशीं नेहमीं चालत असलेल्या संभाषणाच्या योगेंकरून त्याच्या बंधूंसही त्याचे आवडते विचार मान्य होऊं लागले होते. तरी पण जिवबासारखा त्याच विषयाचा त्यांला नाद नव्हता, व जिवबाची उडी साध्य आहे अशी त्यांची खातरीही पण झाली नव्हती. जिवबास ज्या ज्या वेळीं सवड मिळे त्या त्या वेळीं तो आपले बंधु व सोबती यांजबरोबर संभाषण करून त्यांच्यांत हुरूप उत्पन्न करी. परंतु मुलेंच तीं. त्यांच्या लक्षांत त्या विषयाचें महत्त्व व जागृति हीं यावीं कशीं? कांहीं वेळ गेल्यावर त्यांचा हुरूप मंद होई. कारण तो स्वाभाविक नव्हता, व त्यांच्या वयमानाप्रमाणें त्या गोष्टी

त्यांस नीटशा कळण्याजोग्याही नव्हत्या. नरोबाच काय तो वयानें साधारण मोठा होता. पण कामकाजापुढें त्यांस अवकाश नव्हता हें एक, आणि जिवबा वडील भावाची भीड धरून इतरांप्रमाणें त्याजपाशीं तितकें अघळपघळ बोलत नसे, हें दुसरें. अशा कारणांनीं त्यास जिवबाच्या ह्या विचारांची फारशी माहिती नव्हती. मात्र ह्याचें लक्ष गांवांत राहून शेतीभाती किंवा कुळकर्ण करण्याकडे नाहीं, रोजगारास जाऊन नांव मिळवावें ह्या बाजूकडे त्याचा कल आहे, हें त्यास व त्याच्या वडील माणसांसही माहीत होतें. परंतु स्वतः त्यांचा तिकडे कल नसल्यामुळें ते त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत. त्यांनीं दुर्लक्ष करण्याचें दुसरेंही एक कारण होतें; तें असें कीं, जरी जिवबाचा पाणीदारपणा इतर मुलांहून वेगळ्या प्रकारचा दिसतो, व त्यास अशा स्थितींतच दिवस घालविणें इष्ट वाटत नसून रोजगारास जाण्याची त्याची मोठी उमेद आहे, तरी---ज्या अर्थी आपलें घराणें अगदीं साधारण प्रतीचें, आपल्यांत कोणी रोजगारी नाहीं किंवा कोठेंच आपला वशीला नाहीं, त्या अर्थी-अशा गैरमाहीत मुलास कोणीकडे पाठवावें? ह्यास कोण विचारील ? असें त्यांस वाटत असे; व असें वाटणें साहजिकच होतें.

इतिहासावरून बहुधा असें दिसून येतें कीं, पुढें उदयास येणाऱ्या पुरुषांच्या अंगीं लहानपणीं महत्त्वाच्या एकादा दुसऱ्या गुणाची झुळूक प्रसंगविशेषीं दृष्टीस पडते. अगर कांहीं गुण त्यांच्या अंगीं स्वभावतःच असलेले वारंवार आढळून येतात. पण बालवयांतील ह्या गुणांकडे लोकांचें बहुधा सर्वत्र दुर्लक्षच आढळून येतें, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जो विशेष गुण मुलाच्या भावी आयुष्यांतील एक ठळक बाब होतो किंवा जो त्याच्या वैभवास कारणीभूत होऊन त्यास शोभा आणणारा होतो, त्या गुणाचें बाल्यावस्थेंतील संकुचित व अंधक स्वरूप विद्युद्दर्शनाप्रमाणें कधीं चमत्कारास, कधीं उपेक्षेस, कधीं भीतीस व कधीं तिरस्कारासही कारण होतें. परंतु हा विशेष गुण पुढील वैभवोन्नतीचा बीजांकुर आहे असें त्या वेळीं कोणास तरी वाटतें काय ? हा मुलगा पुढें महान साधुपुरुष, रणधुरंधर, विद्वान, धाडशी, वक्ता, चतुर मुत्सद्दी, सत्यव्रत, धनवैभवसंपन्न, कल्पक, शोधक इत्यादि विशिष्टगुणमंडित पुरुष निपजेल असें खात्रीपूर्वक भाकीत कोण करील ? त्या वयांतील बऱ्याच दिवसांच्या अनुभवावरून व लक्षपूर्वक अवलोकनावरून अशा प्रकारचें भाकीत चतुर पुरुष कधीं कधीं करितात, नाहीं असें नाहीं; व कित्येक वेळां तें खरेंही ठरतें. परंतु अशीं उदाहरणें किती विरळ ! खरोखर मुलांच्या भावी स्थितीची अटकळ बिनचूक करतां येण्याचें कसब जर लोकांस साधत जाईल तर किती बहार होणार आहे ! त्या त्या भावी स्थितीला उत्तेजक व साधक अशा प्रकारची होईल तेवढी तयारी प्रारंभापासून ठेवतां येऊन परिस्थितीप्रमाणें निसर्ग व श्रम यांचें सामर्थ्य पूर्णपणें प्रकट होईल ! मुलगा पुढें अनेक धंद्यांपैकीं अमुकच धंद्यांत निष्णात होईल ह्याचा काळजीपूर्वक निर्णय करून, त्याच धंद्याच्या मार्गास मुलास लावून देणें अधिक फायदेशीर आहे, असें पाश्चात्यांच्या अनुभवावरून सिद्ध झालें आहे. परंतु प्रकृत प्रसंगीं तसें कांहीं झालेलें नव्हतें. जिवबाच्या भावी पराक्रमाचा महावृक्ष त्या वेळीं एका लहानशा बीजांत विलीन होता. पुढें विधिघटनेनेंच तो अंकुरित होऊन नैसर्गिक हवापाण्यानेंच फोंफावला. त्याची दाट, शीतल व सुखकर छाया लाखो जणांस मिळाली. पण एवढ्या वैभवाचें मूलबीज लहानपणच्या त्याच्या स्वभावांत व वर्तनांतच होतें हें वरील हकीकतीवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

जिवबाची एक बहीण मळगांव, संस्थान सावंतवाडी, येथें दिली होती; तिकडे एकदा जिवबा गेला होता. त्या वेळीं त्यांचे घरानजीकच गडगा बांधण्याचें काम चाललें होतें. त्या कामासाठीं लावि-

लेले मजूर साधारणपणें एकेका ओझ्याचे दगड लावीत होते. परंतु तें काम ह्या केरकर जिवबास पसंत पडेना, आणि मनासारखें काम करण्याचा उत्साह त्यास स्वस्थही बसूं देईना. सोळा सतरा वर्षांचेंच वय. तरी त्याचा विलक्षण मजबूत आंगलोट, ऐन उमेदींतील तरतरी आणि पुऱ्या कसलेल्या ज्वानाप्रमाणें पीळदार दंड व भरदार छाती, यांच्या योगें त्या तरुण बांडास तशा तऱ्हेचा गडगा ह्मणजे केवळ पोरखेळ होय, असें वाटूं लागलें. सबब लागलेंच त्यानें आसपासचे मोठमोठे दगड आणून गडगा घालण्याचें काम सुरू केलें. तो गडगा अद्यापि जशाचा तसा आहे. जे दगड, जिवबानें आणून गडग्यास लाविले, ते दोन तीन असामींशिवाय उचलण्याजोगे नव्हेत! यावरूनच त्याच्या शरीरसामर्थ्याची साधारणपणें अटकळ करितां येईल. जिवबा मळगांवीं कांहीं दिवस राहिल्यावर तेथें कोणी बैरागी आला. त्यानें त्या मुलाला पाहून घरच्या मालकास प्रसन्न चित्तानें ह्मटलें, ' ए लडका मुशाफरीकुं निकल जावे तो उसकूं रोकना नहीं. ये बडा भागसाली निकलेगा. वो जहां जावे वहां उसकी फत्ते हो जायगी. ये मेरा सवाल ध्यानमें रखना.' जिवबावर बहिणीची प्रीति तर अत्यंत होतीच. परंतु त्याच्या गुणांमुळें तेथील सर्व मंडळीस तो फार प्रिय वाटत असे. त्यांत बैराग्याच्या त्या भविष्यसूचक वाणीनें त्यांना अत्यानंद होऊन जिवबाकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें. मग कांहीं दिवसांनीं जिवबा घरीं आला.

तो मळगांवाहून घरीं आल्यावर पूर्वक्रमाप्रमाणें प्रापंचिक कामांत रावूं लागला. पुढें एके दिवशीं दोन प्रहरीं आपल्या ओटीवर निजला असतां कोणी पुरुष स्वप्नांत येऊन त्यानें त्यास ह्मटलें, "काय निजला आहेस ? ऊठ. हिंदुस्थानांत जा. तुला मोठें वैभव प्राप्त होईल." पुढें जागा होऊन जिवबा पाहतो तों कोणी पुरुष नाहीं. हें केवळ स्वप्न आहे, असें जाणून त्यानें ती गोष्ट आपल्या वडिलांस सांगितली. त्याला दिवसा पडलेल्या ह्या स्वप्नामुळें गणपतरावांस आपल्या मुलास पुढें कदाचित् भाग्याचे दिवस येतील असा विचार मनांत येऊन फार समाधान वाटलें. परंतु तें उघड न दाखवितां ते जिवबास ह्मणूं लागले, 'अशीं स्वप्नें पुष्कळ पडतात. पण त्यांत कांहीं अर्थ नसतो. स्वस्थपणें गाढ झोंप लागली नाहीं ह्मणजे अशीं कांहीं तरी स्वप्नें पडतात. तेव्हां तीं खरीं मानून कोठें तरी उठून जाण्याचें साहस केलें तर पश्चात्ताप मात्र होईल. सबब असल्या स्वप्नांवर भिस्त ठेवून मन अस्वस्थ करून घेऊं नकोस.' अशा प्रकारें बापानें जिवबास समजावून सांगितलें असतां त्याची जरी खात्री झाली नाहीं, तरी बापापुढें आपलें शहाणपण चालविण्यास त्यास धीर झाला नाहीं. गणपतरावांच्या मनांतही मुलाच्या ह्या स्वप्नाविषयीं अनेक प्रकारचे विचार येऊं लागले. पण शेवटीं त्यांनीं ठरविलें कीं, पुढील 'अदृष्ट व अतर्क्य लाभाचे भरीं भरून आपल्यास सर्व प्रकारें समाधान देणाऱ्या प्रियपुत्रास देशांतरास पाठवावें हें बरोबर नाहीं. खरेंच आहे. स्वप्नांतील दृष्टांतावर विश्वास ठेवून जिकडील कांहीं माहिती नाहीं, जिकडे कोणी आपला पुरस्कर्ता नाहीं, जिकडे जाण्यायेण्याची रहदारी नाहीं, व जिकडे जाऊन नशीबाची परीक्षा पहावी ह्मटलें तर जवळ धनादि साधनसामग्री नाहीं, आणि खात्रीनें लाभ होईलच असें ह्मणण्यास कोणतेंच प्रमाण नाहीं, अशा स्थळीं अकल्पित व असंभवनीय भावी वैभवावर विश्वास ठेवून–ज्याच्या सान्निध्यानें व साहाय्यानें प्रस्तुत स्थितींत बरेंच सुख होत आहे अशा–पितृनिष्ठ, उद्योगी व उपयोगी मुलास जवळून घालविणें हें गणपतरावांस कसें आवडावें? वडिलांच्या मनाची स्थिति, आणि आपल्या मनाचीही भावी वैभवाच्या असंभवनीयतेनें होणारी ओढाताण, हीं लक्षांत आणून जिवबानेंही तो नाद सोडून दिला. आणि पूर्ववत् आपला प्रापंचिक व्यवसाय पाहण्याचा क्रम चालविला. जिवबाचें हें शहाणपणाचें आचरण पाहून वडिलांसही समाधान वाटलें. परंतु हें समाधान फार दिवस टिकलें नाहीं. जिवबानें जरी

अशा अडचणींमुळें व वडिलांच्या आग्रहामुळें आपला बेत फिरविला होता, तरी त्याच्या आंगची करामत, त्याची हिंमत आणि मनाशीं दृढ करून ठेविलेले त्याचे विचार हीं त्याला चैन पडूं देईनात. त्याच्या मनांत वारंवार असें येऊं लागलें कीं, 'ह्या उमद्या वयांत साधारण शेतकऱ्याप्रमाणेंच जर आपण काबाडकष्टांत व इतर किरकोळ उद्योगांत काळ घालविला तर आपण होऊनच आपलें बहुमोल आयुष्य फुकट घालविलें असें होणार नाहीं काय ? प्रपंचसंबंधी उद्योगाची मजल ह्याच प्रमाणानें—मुंगीच्या पायांनीं—पुढें जावयाची. मर्दानें लौकिकाचीं कृत्यें करून नांव मिळवावें हेंच योग्य. अनेक प्रकारच्या घटना व उलाढाली मनांत घोळतात, त्या सर्व साध्य नसल्या तरी साऱ्याच असाध्यही नसतात, अशी माझी मनोदेवता मला वारंवार प्रोत्साहन देते. परंतु आहे ह्या स्थितींत राहून हे विचार काय उपयोगी ? एकाद्या राजाचा चांगलासा आश्रय असावा, पराक्रमी लोकांची त्यास जरूरी असावी आणि माझ्या ह्या दंडांनीं, मर्दुमकीनें व हिंमतीनें तेथें थोडाबहुत आपला पराक्रम दाखवावा! हजारो लोकांचें बरें करावें, त्यांचे आशीर्वाद घ्यावे, आणि सत्कीर्ति साधावी, हेंच जन्माचें सार्थक्य. असें निर्माल्यवत् पडून राहून केवळ भूभार व्हावें हें किती लाजिरवाणें आहे ! खरोखर मी इच्छितों असा सुदिन कधीं येईल काय ?' अशा प्रकारच्या विचारांनीं जिवबाच्या अंतःकरणांत कायमचें ठाणें दिलें; आणि त्यामुळें घरखटल्याच्या उद्योगांत व गोष्टींत पूर्वीप्रमाणें त्याचें मन रमेना. ह्या गोष्टीचीं कारणें त्यानें आपल्या बंधूंस वारंवार सांगावीं, व त्यांच्या मनांत ते विचार भरवून द्यावे. पण त्यानें एकदम उठून देशांतरीं जावें ही गोष्ट त्यांना भयंकर व वेडेपणाची वाटे; व त्या बाबतींत जिवबाच्या युक्तिवादानें त्यांचें चांगलेंसें समाधान होत नसे.

अशा प्रकारें कांहीं दिवस गेल्यानंतर पुनः मागच्याप्रमाणेंच जिवबास स्वप्न पडलें. तेव्हां त्यानें ज्योतिष्यांकडे जाऊन स्वप्नाभिप्राय त्यांस कळवून त्यांतील फलितार्थ त्यांस विचारिला. ज्योतिषीबुवांनीं तो प्रश्न विचारपूर्वक पाहून सांगितलें कीं, 'स्वप्न तर उत्तम आहे. स्वप्नाप्रमाणें येथून हिंदुस्थानांत निघून गेल्यास तुला मोठें वैभव प्राप्त होईल, असें ह्या वेळच्या लग्नावरून दिसतें.' स्वप्नांतील दृष्टांताचा ह्या दुसऱ्या वेळीं जिवबाच्या मनावर पूर्णपणें ठसा उठल्यामुळें आणि तदनुरूप फळ निघाल्यामुळें रोजगारास जाण्याची त्याच्या मनानें पराकाष्ठेची उचल घेतली. आणि तेव्हांपासून त्यावांचून दुसरा कोणताच विषय त्याच्या मनांत भरेनासा झाला. मग जिवबानें हें पडलेलें स्वप्न, त्याचें ज्योतिषीबुवांनीं सांगितलेलें फळ व रोजगारासाठीं निघून जाण्याचा झालेला आपल्या मनाचा निर्धार, हीं तिन्हीं वडिलांस स्पष्टपणें कळवून, 'मला जाण्याची परवानगी द्या' अशी अश्रुपूर्ण नेत्रांनीं त्यांस विनवणी केली. अशा प्रकारें ही गोष्ट वडिलांस व घरांतील सर्व मनुष्यांस समजल्यावर त्या सर्वांच्या अंतःकरणांत त्याच्या भावी वैभवाविषयींचा कल्पनाजन्य आनंद, तो गेल्यावर होणारें वियोगजन्य दुःख व दुसरे अनेकविध विचार यांनीं केवळ गर्दी करून सोडिली. जिवबाचा पाणीदारपणा, त्याची हिंमत आणि त्याचे विचारांची दिशा इत्यादि गोष्टींनीं त्यांच्या मनावर अगोदरच आपल्या व त्याच्या समागमाची ताटातूट होण्याचा दिवस लांब नाहीं असा परिणाम करून ठेविला होता. आणि एक वेळ स्वप्न पडलें असून दुसरें तशाच प्रकारचें वैभवोन्नतिसूचक स्वप्न पुनः पडावें ह्याचा आणि जिवबाच्या भावी उदयाचा कांहीं तरी कार्यकारणसंबंध खचीत असला पाहिजे, असे आशाजनक विचार त्यांच्या अंतःकरणांत वारंवार डोकावून त्यांना जिवबाच्या बेतास अनुकूल अशी जागृति देत. ते लपवून त्याचा बेत पूर्वीप्रमाणें हाणून पाडण्यास त्यांचें मन फारसें अनुकूल होईना. दुसरें,

जिवबा सत्यवादी, निग्रही, मर्यादशील व सर्वांहून वेगळ्या अवसानाचा असल्यामुळें त्याच्या मनांत जाण्याविषयीं भरलेली उचल आणि त्याप्रमाणें त्यानें कळविलेला निश्चय हीं वाऱ्यावारी सहज नकाराच्या शब्दांनीं उडून जाण्यासारखीं नव्हतीं. तेव्हां जिवबास वडिलांनीं जाण्याविषयीं बाह्यात्कारीं जरी आपली पूर्ण संमति दिली नव्हती तरी त्यांच्या कलावरून आपल्या जाण्यास त्यांचा विशेष अवरोध होणार नाहीं असें त्यास खास वाटलें. वडिलांनीं एवढेंच ह्मटलें कीं, 'कोणत्या भरंवशावर आह्मीं तुला जा ह्मणावें? तूं आतां लहान नाहींस, समजूतदार आहेस. तेव्हां आतां पुढें काय करावें, ह्याचा तुझा तूंच विचार पहा.' एवढें अवसान मिळण्याबरोबर जिवबानें स्वप्नांतील दृष्टांताचा जोरदारपणा, शकुनज्ञानें खात्रीपूर्वक दाखविलेली आशा, आपल्या मनांत बेधडक निघून जाण्याविषयीं वारंवार उत्पन्न होणारी स्फूर्ति आणि मळगांवांत त्या बैराग्यानें दिलेला आशीर्वाद व केलेली सूचना हीं सर्व यथास्थितपणें सर्वांच्या मनांत भरवून दिलीं, व हीं सर्व बाजूस ठेवून दुराग्रहानें आपल्यास रहावून घेतल्यास सर्वांबरोबर अशा स्थितींतच घालवावे लागणारे दिवस, आणि त्यामुळें दैवबशात् कधींकाळीं लाभणाऱ्या भाग्यासंबंधानें होणारें अपरिमित नुकसान, ह्याचें चित्र जेव्हां सर्वांच्या हृत्पटावर रेखाटलें तेव्हां गणपतरावांनीं सर्वांच्या विचारें त्यास जाण्याविषयीं अनुमोदन दिलें. मग उशीर काय? जाण्याची एकसारखी उत्कंठा लागलेली होतीच. एकदाचा होकार मिळतांच जिवबानें तेथून निघण्यासाठीं सर्वांचा निरोप घेतला. मग जिवबा सर्वांचा प्रीतिपूर्वक निरोप घेऊन बाहेर जाण्यास सिद्ध झाला. पुत्रमोह मोठा विलक्षण आहे! अनेक साधकबाधक गोष्टींचा विचार करून व भाग्यसूचक चिन्हांनीं चकित होऊन जिवबाच्या वडिलांनीं जरी त्यास निरोप दिला होता, तरी तो जाण्यास निघतेसमयीं अत्यंत वाईट वाटून गळ्याशीं दाटून आलेला हुंदका त्या सर्वांस आवरेना. सर्वांनीं पुनः पुनः जिवबाकडे पहावें, आणि 'आतां ह्याच्या पुनर्दर्शनाचा योग परमेश्वर कधीं घडवून आणील तो आणो' असें ह्मणून वारंवार डोळे पुसावे, असें चाललें होतें. जिवबाच्या सख्ख्या व चुलत बंधूंस तर त्याच्या जाण्यामुळें अत्यंत वाईट वाटलें. आजपर्यंत त्याच्या मनांत भरून गेलेले विषय केवळ वायफळ गप्पा नव्हत, त्यांत पुष्कळ अर्थ आहे, असें जरी त्यांस आलीकडे वाटायास लागलें होतें, तरी त्याची मजल येथपर्यंत जाईल व इतक्यांतच त्याचा व आपला वियोग होईल असें त्यांस कधीं वाटलें नव्हतें. आपल्या मनोरूपी उदधीवर हजारो तरंग उठतात तशीच जिवबाच्या विचारतरंगांची गोष्ट आहे, अशी त्यांची समजूत होती. पण पूर्वसंकल्पाप्रमाणें मनाचा धडा करून जेव्हां जिवबा निघाला, तेव्हां त्यांना जें रडूं कोसळलें तें कांहीं केल्या आवरेना. ते जिवबाजवळ येऊन कांहीं बोलायाचा प्रयत्न करीत; पण वडील माणसें जवळ होतीं तेव्हां तोही उपाय राहिला नव्हता. शेवटीं ते टपू टपू टिपें गाळीत जिवबाकडे एकसारखे टक लावून पाहत राहिले. पुष्कळ लांबच्या, गैरमाहितीच्या व अनिश्चित कालावधीच्या प्रवासास निघाल्यामुळें घरच्या मनुष्यांप्रमाणें जिवबासही कमी वाईट वाटलें, असें नाहीं. त्यानें आपला गहिंवर दाबून धरण्याचा मोठा प्रयत्न केला, तरी तो व्यर्थ जाऊन अखेर त्याला अश्रु पुसावे लागलेच. त्या वेळचा तो एकंदर देखावा अत्यंत हृदयद्रावक होता.

पुत्रमोहानें व्याप्त झाल्यामुळें गणपतरावांस पुढें कांहींच बोलवेना. वडील गहिंवरलेले पाहून जिवबासही गहिंवर आला. मग जिवबानें पित्याच्या पायांवर मस्तक ठेविलें. पण त्याला वर उठवलें नाहीं. गणपतरावांनीं त्याला वर उठवून त्याचे नेत्र पुसले. इतक्यांत बापूमहाराज ऊर्फ बापूमामा या नांवाचे जे सारस्वत ब्राह्मण ज्ञातीचे सत्पुरुष शिरवडें येथें राहत असत, ते तेथें आले. त्यांच्याही चरणांवर

मस्तक ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला. मग घरांतील सर्व मंडळीकडे पाहून मनानेंच 'येतों' ह्मणून तो निघाला. अंगणांतून पाऊल बाहेर पडतांच शिंक झाली. तों त्यानें पुढें केलेला पाय मागें घेतला व बापूमहाराजांकडे येऊन त्यांस 'शिंकेनें काय सुचविलें' ह्मणून विचारिलें. बापूमहाराजांनीं लागलेंच उत्तर दिलें कीं, 'शिंक होतांच पाय मागें न घेतां चालूं लागतास तर तूं राजाच झाला असतास, पण अझून असाच चालता हो, ह्मणजे तुला प्रधानपदाचा अधिकार मिळेल. असें ह्या शिंकेचें शुभफल आहे. खचीत तुझा भाग्योदय होणार. एकदम निघून जा.' अशा प्रकारें प्रोत्साहन देणारें हें साधुवचन कानीं पडतांच अगोदरच पडत्या फळाची आज्ञा मानणाऱ्या जिवबाची स्वारी पुनः बापूमामांस साष्टांग प्रणिपात करून त्या फलश्रवणानें झालेल्या आनंदभरांत, तडक चालती झाली. ही गोष्ट इ० सन १७५६ त घडली.

---

१. हे सत्पुरुष कर्नाटक प्रांतांतून शिरवडें, ता० वेंगुर्लें, जि० रत्नागिरी, येथें कामत उपनांवाच्या एका सारस्वत ब्राह्मणज्ञातीच्या गृहस्थांच्या येथें येऊन राहिले होते. यांचें उपनांव कोणी असें होतें. यांनीं केलेले अलौकिक चमत्कार या प्रांतीं सर्वत्र प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं एक दोन येथें देतों:—

(१.) हे सत्पुरुष दरसाल पंढरपुरी जात असत. एके वर्षी ते तिकडे जात असतां आजरें गांवीं त्यांचा मुक्काम झाला. त्या गांवी एका श्रीमान् सावकाराचा एकुलता एक मुलगा असून तो पुष्कळ दिवसांचा आजारी होता. तो त्या दिवशीं आसन्नमरण होऊन घटका दोन घटकांचा सोबती आहे असें वर्तमान बापूमहाराजांस कोणीं सांगितलें. तेव्हां त्यांनीं तत्काळ तेथील लोकांस सांगितलें कीं, 'सावकाराच्या घरांत एक साप दोन वर्षांपूर्वी दगडांच्या बांधणींत अमुक बाजूस अडकला आहे. तोही असाच आसन्नमृत्यु झालेला आहे. आणि त्यामुळेंच ह्या मुलावर हा प्रसंग गुदरला आहे. सापाला तेथून काढिल्यास ह्या मुलास उतार पडेल.' असें ह्मणतांच सावकारानें लगेच भिंत पाडवून सांगितल्या जागीं पाहिलें, तों आंत प्रेतवत् झालेला सर्प सांपडला. बाहेरचा वारा लागण्याबरोबर कांहीं दिवसांनीं तो सजीव झाला. मग तेथें भांड्यांतून दूध आणून ठेविलें तें पिऊन तो चालता झाला. इकडे त्या वेळेपासून मुलास उतार पडत जाऊन तो साफ बरा झाला. हल्लीं त्या सावकाराचे घरीं ह्या साधूची पुण्यतिथि पाळतात.

(२.) आरवली (शिरवडेंनजीक) गांवीं पांडुरंग दळवी या नांवाचा तरुण मुलगा (वंशांत तेवढाच असलेला) आजारी पडून मृत्यु पावला. त्याचें प्रेत रस्त्यानें चालविलें होतें. इतक्यांत त्या वाटेनें हे सत्पुरुष आले. ते तें प्रेत पाहतांच ओरडून ह्मणाले, 'अरे ह्यास कोठें नेतां? अझून ह्यास मुलें व्हावयाचीं आहेत, मागें फिरवा.' असें ह्मणतांच तें प्रेत पुनः घराकडे आणिलें. मग ह्यांनीं खोबरेल तेल मागवून तें आपल्या मस्तकाला चोळायास सांगितलें. त्याप्रमाणें करितांच तो मुलगा उठून बसला. मग त्याला मुलेंबाळें होऊन तो ह्मातारा होऊन वारला. ह्या सत्पुरुषाच्या कृपेनें हा वांचला नसता तर ह्या दळवी घराण्याचा समूळ नाश झाला असता. हे दळवी सारस्वत ब्राह्मण गृहस्थ असून ह्यांचीं घराणीं हल्लीं आरवली, बागणी, हलकर्णी, ग्वाल्हेर येथें आहेत. ग्वाल्हेरीस हल्लीं भाऊमहाराज दळवी नामक जे साधु वारले ते ह्यांचेच वंशज होत.

अशा प्रकारें अनेक चमत्कार दाखवून, बापूमहाराज एके दिवशीं अदृश्य झाले. मग दृष्टांत देऊन त्यांनीं आपण गुप्त झाल्याचें स्वप्नांत सांगितलें. त्या तिथीस ह्मणजे ज्येष्ठ शुक्ल प्रतिपदेस शिरवडें येथें सदर कामत यांच्या घरीं यांची पुण्यतिथि घालितात. उत्सव चांगला होतो. यांच्या योग्यतेवरून व वरील स्मारकाप्रीत्यर्थ ह्मणून आरवली येथून कथाकीर्तनादिसंबंधी नेमणूक करून दिलेली अद्यापि चालू आहे.

भाग ३ रा.

कोल्हापूर व पुणें येथील कारकीर्द.

इ० स० १७५६ पासून स० १७६० पर्यंत.

केरी येथून आपल्या घरच्या मंडळीचा निरोप घेऊन जिवबा निघाले ते मजल दर मजल चालून कोल्हापुरास येऊन पोहोंचले. प्रवासांत जिवबांचे हाल झाले हें सांगायास नकोच. वाटेची माहिती नाहीं, मुक्कामास उतरावयाचें तेथें कोणी आप्तइष्ट वगैरे नाहीं, जवळ पैशाची पुंजीही नाहीं, मग प्रवास कोणत्या प्रकारें होईल याची अटकळ वाचकांस सहजच होईल. वाटेंत हाल सोसावे लागले तरी, धीर हा मनुष्यास मोठा पाठिंबा असल्यामुळें त्याचा आश्रय करून, जिवबांनीं कशाचीही परवा न करितां एके दिवशीं दोन प्रहरीं कोल्हापूर गांठलें. कोल्हापुरास पोहोंचल्यावर, आधीं पोटाची तजवीज पहावी मग पुढचें पुढें असें मनांत आणून, आतां कोणीकडे जावें व कोठें सोई होईल या चिंतेंत ते आहेत इतक्यांत त्यांस सुचलें कीं, अगोदर देवदर्शन घ्यावें व नंतर कोठें तरी सोई पहावी. मग प्रसिद्ध अंबाबाईचे देवळांत जाऊन त्यांनीं देवीचें दर्शन घेतलें, आणि बाहेर आले. तों आंतून कोणी गृहस्थ[1] बाहेर आले. त्यांचें पूजासाहित्य वगैरे घेऊन आलेला ब्राह्मणही त्यांजबरोबर जाण्यासाठीं बाहेर आला. त्यानें जिवबा नवखे मनुष्य असें जाणून त्यांस कोण कोठून आलां वगैरे प्रश्न केले. जिवबांनीं सांगितलें कीं, 'मी सावंताच्या वाडीकडील सारस्वत ब्राह्मण जातीचा असून घरचा गरीब आहें, कोठें तरी धंदारोजगार पाहण्यासाठीं बाहेर निघालों आहें. येथें माझी कोणाशीं ओळखपाळख नाहीं तेव्हां आतां दोनप्रहरच्या वेळीं कोठें जावें या विचारांत आहें.' हें त्यांचें चाललेलें भाषण त्या थोर गृहस्थांनीं ऐकिलें, आणि लगेच जिवबांस त्यांनीं ह्मटलें, 'तर मग विचार कसला करतां? आह्मांबरोबर आतां चला, ह्मणजे तुमची सोई होईल. पुढचें पुढें पाहतां येईल.' जिवबांस एवढें आश्वासन मिळण्याबरोबर दोनप्रहरची चिंता निवारण झाल्याचा संतोष होऊन ते लागलेच त्या गृहस्थाबरोबर निघाले. हे गृहस्थ देशस्थ ब्राह्मण असून घरचे चांगले संपन्न होते. तेथें त्यांच्या घरीं पोहोंचल्यावर धन्याच्या हुकुमावरून निरनिराळ्या सेवकांनीं त्यांची चांगली सोई लाविली. मग जेवण झाल्यावर घरच्या यजमानांनीं सांगितलें कीं, 'तुह्मी रोजगाराची सोई लागेपर्यंत येथें आमचे घरीं खुशाल रहा, परकीपणा मानूं नका.' तें ऐकतांच जिवबांस संतोष होऊन त्यांनीं यजमानसाहेबांच्या औदार्याबद्दल कृतज्ञता दर्शविली.

ह्याप्रमाणें जिवबांची तेथें सोई लागल्यावर चार सहा दिवसांत त्यांनीं सर्व कोल्हापूर फिरून पाहिलें. तेथील राजवाडे, देवालयें, तलाव, पेठा, वाडे व दुसरीं पाहण्यासारखीं सर्व कामें पाहिल्यावर त्यांस फार आनंद वाटला. कारण त्यांनीं अशा प्रकारचें शहर पूर्वी कधींही पाहिलें नव्हतें. हें शहर मोठें असून राजधानीचें स्थान असल्यामुळें त्यांतील सर्व प्रकारचे देखावे व ऐश्वर्य पाहून जिवबांस फार समाधान वाटलें. तेथील सर्व मौजा पाहण्याचें संपल्यावर जिवबांचें लक्ष आपण ज्या हेतूनें इकडे

---

१. ह्या गृहस्थांचें नांव समजलें नाहीं. जिवबादादासारख्या कृतज्ञ पुरुषानें त्यांच्या उपकारांची फेड केली असलीच पाहिजे. परंतु त्या वेळचीं पत्रें न मिळाल्यामुळें त्यासंबंधीं माहिती मिळत नाहीं. बाकी ह्या हकीकती इकडे प्रसिद्ध आहेत.

आलों, त्या हेतूच्या सिद्ध्यर्थ खटपट कशी करावी, या विचाराकडे लागलें. त्यांचे अन्नदाते यजमान त्यांस कोठें तरी कारकुनीची असामी लावून देण्यास तयार होते. परंतु जिवबांच्या मनांत तें काम भरेना. त्यांचा कल खरडे घांसण्याच्या उद्योगाकडे फारसा नव्हता. शिपाईबाणा पतकरून शौर्य दाखवावें इकडेच त्यांच्या मनाचा कल फार होता. ह्मणून शिपाइगिरीसंबंधानें आपल्या अंगीं जें कसब पाहिजे तें संपादन करण्याकडे आपली सर्व हिंमत खर्च करावयाची असें त्यांनीं आपल्या मनांत ठरविलें.

कारकुनी व शिपाइगिरी ह्यांत महदंतर आहे. कारकुनी पेशांत प्रावीण्य संपादन केल्यास व त्यांत दैवानें हात दिल्यास मोठी योग्यता मिळते. तसेंच शिपाइगिरींत झाल्यास महत्पद प्राप्त होतें. परंतु कारकुनींतील नांव शांततेवर अवलंबून आहे आणि ही शांतता राखण्याचें काम पहिल्यानें तरवारीसच करावें लागतें. तरवारीच्या जोरानें चोहोंकडील गडबड मोडून जिकडे तिकडे स्थिरस्थावर करून ठेविल्यावर मग लेखणीला आपलें कसब चालवितां येऊन व्यवस्थितपणा व सुधारणा हीं करितां येतात. मर्दुमकीच्या कामीं नांव मिळविणें आणि त्या मर्दुमकीचा राष्ट्रहिताच्या कामीं उत्तम प्रकारें उपयोग होणें ही गोष्ट फार अगत्याची आहे. आणि अशा प्रकारच्या विचारांनीं तर जिवबांचें मन अगदीं व्यापलेलें होतें, व सुदैवानें ते विचार उद्दीपित होण्यासारख्या श्रीशिवछत्रपतीच्या वंशाच्या राजधानींत ते येऊन पोहोंचले होते. तसेंच राज्यसंबंधाचे जे सर्व तर्क त्यांच्या अंतःकरणांत एकसारखे चालले होते, त्यांना व्यवस्थित विचारांचें स्वरूप प्राप्त होण्याची व तत्संबंधाचे सर्व प्रकारचे देखावे दृष्टीस पडण्याची ह्या राजधानींत मुबलक सवड होती. त्या काळीं शूरास फार मोठा मान मिळे. प्रस्तुतप्रमाणें एकच्छत्राखालीं सारा देश येऊन जिकडे तिकडे शांतता व स्तिमितता हीं वास करीत नव्हतीं. चोहोंकडे शौर्याची मोठी जरूरी होती. तेव्हां अर्थातच शूर पुरुष निपजूं लागले. परिस्थिति ही मनुष्याच्या मनावर फार मोठा परिणाम करिते, असा साधारण नियम आहे. तेव्हां शूर पुरुष निपजणें हें त्या काळीं ठीकच होतें. शौर्याच्या कामांकडे जिवबांच्या मनाची प्रवृत्ति होण्यास ह्या वरील गोष्टी कारणीभूत झाल्या. स्वाभाविक आवड व तत्कालीन परिस्थिति ह्यांचा हा सुंदर मिलाफ होता.

कोल्हापूर शहर फिरून पाहिल्या वेळीं अनेक प्रेक्षणीय स्थलें व शेंकडो चमत्कार त्यांच्या नजरेस पडले. त्यांत त्यांचें चित्त तालीमबाजांचे आखाडे, शर्यतीचीं मंडळें, लष्करी लोकांचे बंदुकांचे नेम, भाल्यांच्या फेंकी व तरवारींचे हात ह्या गोष्टींनीं फार वेधलें होतें. परंतु शिपाइगिरीचा पेशा पतकरण्यापूर्वी अगोदर कारकुनीच्या कसबाची माहिती करून घ्यावी आणि मग आपल्या आवडत्या उद्योगास लागावें असा दूरदृष्टीनें त्यांनीं निश्चय केला. कारण शिपाइगिरीच्या कसबांत एकदा मन रमून गेल्यावर मग इतर कसबाकडे वळावें अशी बुद्धि होण्याचा संभव कमी आहे, असा त्यांचा तर्क होता. यास्तव त्यांनीं आपल्या यजमानास आपला बेत सांगून त्यांजकडून सर्व कामगारांची ओळख करून घेतली. त्यामुळें त्यांना कोठेंही मज्जाव झाला नाहीं एवढेंच नव्हे, तर त्यांस त्या त्या कामाची लिहिण्यासंबंधी माहिती करून देण्यास कारकून मंडळीनें मोठ्या संतोषानें फार चांगली मदत केली. हरएक प्रकारचे पत्रव्यवहार कसे चालतात, ते त्यांनीं पाहिले. समजून घेऊन ते लिहिणें स्वतः करण्याचा त्यांनीं सराव ठेविला. त्याचप्रमाणें निरनिराळ्या बाबतींचीं हिशोबी कामें विचारून घेऊन त्यांतील थोडथोडी माहिती करून घेतली. त्यांचा चौकसपणा वर्णनीय होता. हिशोबी कामें फार

बिकट, तेव्हां त्यांत समजूत करून घेण्याजोगीं स्थळें पुष्कळ, ह्मणून एकच गोष्ट निरनिराळ्या इसमांस विचारून स्पष्टपणें समजून घ्यावी असा त्यांनीं क्रम ठेविला. तेणेंकरून पुनः पुनः विचारून एकासच त्रास देण्याचा प्रसंग त्यांनीं आणिला नाहीं. कांहीं दिवस गेल्यावर जिवबांस निरनिराळ्या लेखी कामांची दिशा समजूं लागली. आणि त्यांत सरासरी निर्वाहा-पुरती त्यांची गति झाली. मग ह्याच कामांत नैपुण्य संपादण्याच्या भरीं भरल्यास आपल्या आव-डीचें काम शिकण्याचें लांबणीवर पडेल, आणि अशा प्रकारें दिवसगत लागल्यास आपल्या आश्रय-दात्यावर आपल्या खर्चाचें विनाकारण फाजील ओझें पडेल, असा विचार करून जिवबांनीं तालीम वगैरे गोष्टी शिकण्याची आपली आवड यजमानास कळविली. आणि त्यांच्या परवानगीनें ते तालमीच्या आखाड्यांत जाऊं लागले.

हा आखाडा चांगला प्रसिद्ध होता. जिवबा तेथें नित्य जात असत. त्या आखाड्यांत कांहीं तरुण मुलगे व कांहीं पोक्त पहिलवान नित्य जमत असत. जिवबाच्या वयाचे मुलगे दंड काढूं लागले ह्मणजे ह्यांनींही काढावे, ते मुद्गलांच्या जोड्या फिरवूं लागले ह्मणजे ह्यांनींही फिरविण्याचा प्रयत्न करावा, असें करितां करितां त्या मुलांची व त्यांना शिकविणाऱ्या वस्तादजींची व ह्यांची बरीच दोस्ती जमली. मग त्यांनीं ह्यांना जोर, जोडी ह्यांचे पुष्कळ प्रकार शिकविले. जिवबांचें शरीर लहान-पणापासून शारीरिक खेळांत बरेंच कसलेलें असल्यामुळें फार चपळ होतें. त्यामुळें त्यांस शिकविण्यास त्यांना विशेष श्रम पडले नाहींत. जोरजोडीमध्यें चांगली तयारी झाल्यावर त्यांनीं जिवबांस मलखांबावरील कसरत शिकविण्यास प्रारंभ केला. थोड्याच दिवसांत मलखांब, जोर, जोडी या तिहींत त्यांची चांगली तयारी दिसून आली. त्यांचा नीटस आंगलोट, शरीराची बळकट व भक्कम काठी आणि तारुण्याच्या भरामुळें व खाण्यापिण्याच्या उत्कृष्ट बेतामुळें दिवसेंदिवस वृद्धि पावणारी त्यांची वाढ पाहून त्या तालीमखान्यांतील सर्व मंडळीस वाटलें कीं, कांहीं दिवसांनीं हा पटाईत मल्ल निपजेल. मग त्यांनीं दंड ठोकून एकमेकांशीं सामना खेळण्याचें कसब शिकण्याला सुरुवात केली. ह्या कामीं जिवबांनीं बरेच दिवस अभ्यास चालवून पवित्र्यांवर मजबुदीनें उभें राहण्याची, तऱ्हतऱ्हेचे पेंचांची व पकडापकडींची चांगली माहिती करून घेतली. दिवसेंदिवस जिवबा-बरोबर सामन्यांत थोडेच मल्ल टिकूं लागले. जिवबाच्या विलक्षण शक्तिमत्तेपुढें व त्याच्या युक्तीच्या पेंचांपुढें टिकाव लागणें कठीण, असे उद्गार ते सर्व लोक काढूं लागले. तऱ्हतऱ्हेचे दंड काढणें शरीराच्या निरनिराळ्या प्रकारच्या आकृति तयार करणें, अनेक प्रकारच्या उड्या मारणें, पैजेंत सर्वांपुढें अति त्वरेनें पळणें, इत्यादि कामांत त्यांजपुढें कोणीच टिकत नसे. मुद्गलांनीं त्यांनीं आपलें शरीर ठेंचून घेऊन दगडासारखें कठीण केलें होतें. त्यामुळें त्यांच्यांशीं सामन्यांत जोडीदार हो-ण्यास बाकीच्यांस मोठा विचार पडत असे. एके दिवशीं जिवबांनीं आपल्या यजमानास ह्मटलें कीं, 'मीं तालमीची थोडीशी तयारी केलेली आहे ती आपण पहावी, अशी इच्छा आहे. सवड असेल त्या वेळीं तेथपर्यंत यावें अशी विनंती आहे.' त्यांनीं ह्मटलें, 'तुमची तयारी असल्यास मौज पाहण्यास आमचें काय वेंचतें?' मग जिवबा आपल्या यजमानासहवर्तमान त्या आखाड्यांत गेले. इतर कांहीं मंडळी-सही आमंत्रण केलें होतें. सर्व जमल्यावर आखाड्यांतील मंडळीनें आपापलें कसब दाखविण्यास सुरु-वात केली. जिवबांच्या यजमानास ह्या विद्येची चांगली माहिती होती. जोर, जोडी, मलखांब या बाब-तींत जिवबांचें कसब त्या मंडळींतील निवडक लोकांच्या बरोबरीनें झालेलें पाहून त्यांस फार समाधान

वाटलें. पुढें कुस्त्यांस प्रारंभ झाला. कांहीं वेगवेगळ्या सामनेवाल्या जोड्यांचें काम पाहिल्यावर, जिवबांस आपलें कसब दाखविण्याविषयीं त्यांनीं सांगितलें. तेव्हां त्यांचा जोडीदार सामन्यासाठीं तयारीनें पुढें उभा राहिला. तें पाहून त्याशीं जिवबानें सामना चालविला. पवित्र्यांवर राहून व अनेक प्रकारचे पेंच दाखवून त्यांनीं मोठ्या आवेशानें व अभिमानानें झटापट चालविली होती. दोघेही खूब मजबूत व डावपेंचांत पुरे निष्णात होते. त्यामुळें त्यांचा मोठ्या बहारीचा सामना झाला. शेवटीं जिवबांनीं आपल्या जोडीदारास चीत केलें, त्या वेळीं त्यांच्या यजमानास अत्यानंद झाला. जिवबांनीं थोड्याच अवकाशांत एवढी उत्कृष्ट तयारी दाखविली हें पाहून त्यांनीं जाणलें कीं, हा पुढें उदयास येणारा पुरुष दिसतो. तेथील सर्व मंडळीनेंही जिवबांच्या कसबाविषयीं फार फार तारीफ केली. मग सर्व मंडळी घरोघर गेली. त्या दिवसापासून जिवबांच्या यजमानानें त्यांस मल्लविद्येंतील श्रमास उपयोगी पडेल असा चांगला खुराक देण्याचा बेत ठेविला.

पुढें जिवबा इतर आखाड्यांत जाऊन तेथील कमजास्ती कसबाचे प्रकार आढळल्यास त्यांतही पटाईत व्हावें ह्मणून तिकडे जाऊं लागले. चोहोंकडील कसब, व्यवस्था आणि शौर्य पाहिल्यानें अनेक प्रकारचे अनुभव येऊन एककल्लीपणा जातो, आणि सुधारणाही होते. मग जिवबांची तालमीच्या सर्व आखाड्यांत फार प्रसिद्धि झाली. आणि तालमीचीं सर्व कामें व कसरती त्यांना उत्तम प्रकारें करतां येऊं लागल्या. तेव्हां हे आखाडे सोडून दांडपट्टा, तीर, बोथाटी, तरवार, भाला ह्या संबंधी कामें ज्या आखाड्यांतून चालत, तिकडे जाण्याचा त्यांनीं क्रम ठेविला. त्यांनीं सर्वांची ओळख पूर्वींच करून ठेविली होती; आणि त्यांची सर्व मंडळींत प्रसिद्धीही झालेली होती. तेव्हां हें नवीन काम शिकण्यास त्यांस कांहीं अडचण पडली नाहीं. जिवबांच्या गुणांमुळें त्यांना दर्दी वस्तादजी आणि कसलेले खिलाडू उमेदवार यांची वाण मुळींच नव्हती. मग नित्यनियमानें हे दांडपट्टा, तरवार वगैरेसंबंधी काम चालवून त्यांत त्यांनीं बरेंच नैपुण्य मिळविलें. आणि पुढें पुढें त्यांचा हात फार सफाईनें व कुशलतेनें चालूं लागला. तशा गरिबीच्या स्थितींत देखील स्वीकृत कार्यास अवश्य असे सुयोग एकवटले होते, ही एकच गोष्ट घेतली तरी ती त्यांच्या भावी भाग्योदयाचें पूर्वचिन्हच होय, असें ह्मटलें पाहिजे. मनास आवडणारा उद्योग, पूर्ववयांतील स्वाभाविक उत्साह व उत्कृष्ट शरीरचापल्य, शिकविणारांची विपुलता, मनःपूर्वक प्रीति ठेवणारे सोबती, हौसेनें व थाटानें खर्च चालविणारा निरपेक्ष आश्रयदाता, व कोणत्याही अन्य उपद्व्यापाची मागून जिकीर नाहीं, अशा प्रकारची अनुकूल स्थिति असल्यामुळें जिवबांचा कार्यक्रम फार समाधानकारक चालला होता. आतांपर्यंत शिपाइगिरीसंबंधी जीं जीं कसबें आपण शिकलों, तीं आपल्या ठायीं पूर्णपणें आलीं, त्या बाबतींत शिकावयाचें ह्मणून आतां कांहीं राहिलें नाहीं, अशी वृथाभिमानाची बाधा जिवबांस कधींच झाली नाहीं. जे जे प्रसिद्ध तालीमबाज, अगर दांडपट्टा, तरवार चालविणारे, आढळतील त्यांचें त्यांचें कसब त्यांनीं पहावें; तें आपल्या आंगीं आणण्याचा यत्न करावा; त्यांत सिद्धि मिळवावी; त्यांशीं सामने करावे व त्यांची खातरी करून द्यावी, व सर्वांशीं उत्तम स्नेह राखावा अशी त्यांची हातोटी होती. तेथील अनुभवावरून लोकांनीं ताडिलें कीं, तरवार चालविण्याचे कामीं हा पुढें मोठें नांव मिळवील. स्वीकृत उद्योगांत सर्व लक्ष घालून तो नेटानें चालविण्याची त्यांस मोठी आवड होती.

पुढें घोड्यावर बसणें आणि त्यावरून निशाण, तरवार, भाला वगैरे चालविणें हें कसब शिकावयाचें राहिलें. पण हीं कामें लष्करी शिपायांत मुख्यत्वें चालायाचीं. तेव्हां तेथील अंमलदारांकडे

आपला प्रवेश कसा होतो? तेथें आपल्या यजमानामार्फतच गेलें पाहिजे, असें ठरवून त्यांनीं ती गोष्ट त्यांच्या कानावर घातली. तेव्हां यजमानसाहेबांनीं जिवबांस बरोबर घेऊन लष्करी अंमलदारांशीं त्यांची ओळख करून दिली. आणि त्यांचा हेतु त्यांस कळवून त्यांच्या शिक्षणाची तेथें सोई होईल असें त्यांजकडून जिवबांस आश्वासन देवविलें. मग जिवबांनीं सर्व आखाड्यांतील स्नेही मंडळीचा निरोप घेतला व पुढें त्यांनीं घोडेस्वाराच्या फौजांत, किंवा सरदार लोकांकडे—जेथें आपला हेतु सिद्धीस जाईल तिकडे—नित्य जाण्याचा क्रम ठेविला. घोड्यावर बसून त्यास साध्या किंवा भरधांव चालीवर फिरवून आणावयाचें त्यांस माहीत होतें; परंतु निरनिराळ्या चाली, मंडळावर घोडे फेरून आणणें, उड्या मारणें, अडत्या उडून पार जाणें, वगैरे कसबांची त्यांस माहिती नव्हती ती त्यांनीं तेथें करून घेतली. ह्या कामास जी धिटाई किंवा छाती पाहिजे ती त्यांच्यांत पूर्णपणें होती. मग हळहळू एक एक प्रकार शिकून त्यांनीं त्या कामींही उत्कृष्ट तयारी दाखविली. जसजशा त्यांच्या ओळखी वाढत गेल्या तसतसें त्यांनीं जे जे ह्मणून घोड्यावर बसण्यांत पटाईत होते त्यांजकडून माहिती करून घेऊन थोड्याच दिवसांत त्यांनाच थक्क करून सोडलें! जिवबा आल्यावर नुसत्या गप्पा झोंकून वेळ घालवावयाचा नाहीं, तर घोड्यांसंबंधी कांहीं तरी काम सुरू केलेंच पाहिजे, असा त्या मंडळींत त्यांनीं आपल्याविषयीं आदर उत्पन्न केला. आपला वेळ फुकट घालवावयाचा नाहीं यासाठीं ज्या ज्या ठिकाणीं आपल्या कामास हरकत येणार नाहीं, अगर आळस होणार नाहीं, त्या त्या ठिकाणींच जावयाचें असा ते नीट विचार करून पूर्वींच ठरवून ठेवीत असत. ह्मणून त्यांच्या शिक्षणास कधीं खळ पडत नसे. मग अनेक वेळां त्यांनीं पैजेनें मोठमोठ्या अडत्यांवरून पार जाऊन शाबासकी मिळविली. शर्यतींत सामनेवाल्याच्या बरोबरीनें जाऊन त्यांनीं चांगलें नांव मिळविलें आणि कित्येक वेळां शर्यत जिंकून इनामेंही मिळविलीं. घोड्यावरून तरवार, भाला यांची फेंक करणें, बंदुकीनें नेम मारणें, इत्यादि कामांसाठीं सरदार लोकांस व त्यांच्या तैनातींतील शिपाई लोकांस हुरूप आणून लटक्या लढाया केल्या; आणि आपलें कसब वाढविलें. तेवढ्या मुदतींतच हा उत्तम घोड्यावर बसणारा अशी ख्याति झाली परतु हा पुढें उत्कृष्ट योद्धा निपजेल अशी त्यांनीं सर्वांची खातरी करून सोडिली. मग अश्वपरीक्षा, घोड्यांचीं औषधें, इत्यादि माहिती त्यांनीं चांगल्या माहीतगार लोकांकडून मोठ्या गोडीगुलाबीनें करून घेतली. आणि कोल्हापुरांतील आपला शिपाइगिरीचा अभ्यास संपविला.

जिवबांचा कोल्हापुरांत आठदहा महिने मुक्काम होता. तेवढ्या मुदतींत वरतीं सांगितल्याप्रमाणें त्यांनीं शौर्याच्या उपयोगी अशी सर्व प्रकारची माहिती मिळविली. ह्यांत फार जपून वेळ खर्च करावयाचा आणि इष्ट हेतूच्या सिद्ध्यर्थ दृढनिश्चयानें झटायाचें हे त्यांचे दोन अमोलिक गुण स्पष्टपणें दिसून आले. शिवाय आपल्या गुणांनीं दुसऱ्यांच्या अंतःकरणांत आपल्याविषयीं आदर उत्पन्न करण्याचें कसब त्यांना चांगलें साधलें होतें. खरी नम्रता, शुद्ध आचरण आणि उद्योगी स्वभाव हींच मनुष्याविषयीं आदर उत्पन्न होण्याचीं मुख्य साधनें होत. तो नुसत्या आर्जवानें उत्पन्न व्हावयाचा नाहीं.

आपलें शिकण्याचें काम संपल्याचें जिवबांनीं यजमानास कळविल्यावर ते ह्मणाले, 'कांहीं दिवस दम धरा, ह्मणजे तुमची एथें कोठें तरी सोई होते कीं काय, तें पाहतों. पहिल्यानें लहानशी नोकरी मिळेल, पुढें वेळ येईल त्याप्रमाणें कांहीं जास्ती मिळूं लागेल.' जिवबा ह्मणाले, 'सध्या इकडे लष्करीखात्यांत शिपायाशिवाय वरच्या जागीं असामी लागण्याचा संभव नाहीं. कारण तूर्त लढाया-

दिकांचे प्रसंग नाहींत. आणि अन्य प्रकारची नौकरी करण्याची माझी इच्छा नाहीं. तेव्हां पुण्यास जाण्याचा माझा बऱ्याच दिवसांपासून बेत आहे. पुणें ही सध्या महाराष्ट्राची मुख्य राजधानी असल्यामुळें तेथें माझ्या इच्छेप्रमाणें कोठें ना कोठें सोई लागण्याचा संभव आहे. पेशवे सरकारचा आपल्या ताब्यांतील संस्थानिकांशीं व बाहेरील शत्रुमित्रांशीं नेहमीं अनेक प्रकारचा व्यवहार असतो. बाहेरील शत्रूची खोड मोडण्याचीं तेथें अनेक प्रकरणें नेहमीं उपस्थित होतात असें ऐकतों. तेव्हां तिकडे जाऊन कोठें तरी मनोदयानुरूप रोजगार पहावा अशी इच्छा आहे; सबब जाण्याविषयीं मला आपण आनंदानें परवानगी द्याल अशी मी आशा करितों.' तें ऐकून ते ह्मणाले, 'जिवबा, तुमचा विचार गैर दिसत नाहीं. एथें तुह्मी ह्मणतां तशी सोई लागण्याचा तूर्त कोठें संभव दिसत नाहीं. पुण्याची आज भरभराट आहे आणि पेशवे सरकारचा आज चोहोंकडे उत्कर्ष आहे. तेव्हां तिकडे तुमचा कार्यभाग इकडच्यापेक्षां चांगल्या तऱ्हेनें व लौकर होईल. आणि तुमच्या आंगीं जे गुण आहेत त्यांचें तेज तिकडे पडण्यास पुष्कळ मार्ग आहेत. तूर्त तुमची तेथें कोणाची ओळख नाहीं, यासाठीं मी पुण्याचे सरदार बर्वे आमचे मित्र आहेत त्यांस पत्र देतों, तें त्यांस नेऊन द्या ह्मणजे तेथें पहिल्यानें तुमची ते सर्व सोई करून देतील.' असें ह्मणून त्यांनीं त्यांस पोषाख, कांहीं वाटखर्ची व पोंचविण्यासाठीं मोतद्दारासहित एक घोडा इतकें साहित्य दिलें. जिवबांनीं आपल्या अन्नदात्या यजमानास सप्रेम वंदन करून ह्मटलें, 'निरपेक्ष बुद्धीनें गरीबांवर दया करावी हा सज्जनांचा धर्मच आहे. मजसारख्याकडून आपल्यास उपकारांचा मोबदला कसा मिळणार ? आपल्यासारख्या थोरांस त्याची जरूरही नाहीं. आपल्या कुटुंबाचें ईश्वरापाशीं कल्याण मागावें याहून आपल्या उपकारभागाच्या फेडीस मजजवळ कांहीं साधन नाहीं. आतां गरीबावर असाच लोभ असावा.' असें ह्मणून त्यांनीं त्यांजपाशीं निरोप मागितला. त्या वेळीं त्यांचे नेत्र भरून आले, गळा दाटून आला. आणि तशा स्थितींत त्यांना यजमानाकडे नीट निरखून पाहवलें सुद्धां नाहीं. यजमानसाहेबांनीं हें जाणून ते उठून जिवबांस पोहोंचवायास गेले. जातांना ह्मणाले, 'तुह्मी खचीत भाग्यशाली व्हाल, असे तुह्मांमध्यें गुण आहेत. ईश्वर तुह्मांस हात देऊन या स्थितींतून वर काढील. तुह्मीं लौकिक मिळविलेला या कानांत पडला ह्मणजे आह्मांस सर्व पावलें.' असें ह्मणून त्यांची रवानगी केली.

कोल्हापुराहून निघून जिवबा पुण्यास येऊन पोहोंचले. ते तेथील सरदार बर्वे यांच्या येथें आले.[१] बर्वे हे पेशव्यांचे सरदार असून त्यांजकडे फौजेचें एक पथक होतें. त्यांजकडे जिवबांनीं कोल्हापुराहून आणिलेलें पत्र दिलें तें वाचून पाहून त्यांची बर्व्यांनीं सर्व प्रकारची सोई करून दिली. मग दुसऱ्या दिवशीं पत्र देऊन त्या आणिलेल्या मनुष्याची कोल्हापुरास रवानगी केली. जिवबा पुण्यास सन १७५७ च्या आरंभीं पोहोंचले होते.

---

१. ह्या संधीस किबे नामक गृहस्थांनीं जिवबादादांस घोडे घेऊन दिल्याचें सांगतात.

२. हे बर्वे कोण व त्यांचें पूर्ण नांव काय, हें कांहीं कळत नाहीं. त्या वेळचा पत्रव्यवहार सांपडला असता तर सर्व कांहीं तपशीलवार समजलें असतें. परंतु तो सांपडत नसल्यामुळें 'शेणवी वीर व मुत्सद्दी' या बखरीवर व वृद्धकथांवर विश्वासावें लागलें, शिवाय जिवबादादांच्या घरी केरी येथें जी त्यांची बखर पूर्वीं तयार होत होती तींत ह्या हकीकतीचीं टांचणें आहेत. ही बखर ग्वाल्हेरीहून आलेले वृद्ध गृहस्थ भास्करराव सुभेदार हे लिहीत होते. परंतु कांहीं प्रापंचिक घोटाळ्यामुळें काम शेवटास गेलें नाही.

पुढें जिवबांच्या अंगीं शिपाइगिरीसंबंधी जें कसब होतें, तें हळू हळू बव्र्यांच्या पथकांतील लोकांच्या दृष्टोत्पत्तीस आलें. त्यावरून खुद्द बव्र्यांची व त्यांच्या ताब्यांतील सर्व लोकांची त्यांजवर प्रीति जडली. पुढें त्यांनीं बव्र्यांस विनंती केली कीं, फौज अशी बैठी न राखतां तिजकडून शिपाइगिरीचीं कोणतीं ना कोणतीं तरी कामें रोज घेण्याविषयीं जर मला आज्ञा होईल, तर थोड्याच दिवसांत ह्या लोकांची मी योग्यता वाढवून दाखवीन. बव्र्यांनीं या गोष्टीस मोठ्या आनंदानें अनुमोदन दिलें आणि आपल्या सर्व लोकांस 'जिवबा काम घेतील, त्यांचा हुकूम मानीत जावा,' अशी ताकीद दिली. एवढी परवानगी मिळतांच जिवबांनीं शिपाई लोकांकडून त्या वेळच्या रीतीप्रमाणें कवायती, कसरती वगैरे घेण्याचा उद्योग जारीनें सुरू केला. हुकूम होतांच दौड करणें, माघारें फिरणें, बाजूस वळणें, पाठलाग करणें, एकदम लटका गोळीबार करणें, स्वारांच्या टोळ्या करून लटके सामने करणें, निशाणें मारणें, शर्यती लावणें इत्यादि नित्य कांहीं ना कांहीं तरी कामें करून घेण्याची वहिवाट ठेविल्यामुळें फौजेंतील लोकांत तरतरी राहूं लागली. पहिल्या पहिल्यानें त्या लोकांस हें कठीण वाटत असेः परंतु पुढें हें आंगवळणीं पडल्यामुळें त्यांना जड वाटेनासें झालें. अशा प्रकारचीं कामें करून घेत असतां ज्याची त्या कामीं जास्त हुशारी व चलाखी दिसून येईल त्यास यजमानसाहेबांकडून इनाम देवविण्याची तजवीज ठेविली. त्यामुळें त्या लोकांत ईर्ष्या वाढून आपण अधिक बहादुरी दाखवून इनाम मिळवावें किंवा चारचौघांत नांव करून घ्यावें असें त्यांस वाटूं लागलें. स्वतः जिवबा, शौर्याचीं, पैजेचीं व जोखमाचीं कामें करून दाखवूं लागले. तेव्हां तशीं कामें आपणही करून दाखवावीं, असें त्या लोकांस वाटणें साहजिक होतें. त्या काळीं लष्करी लोकांस कवायतीचें वगैरे शिक्षण नसे, तरी लढायांचे प्रसंग पुष्कळ पडत असल्यामुळें त्यांमध्यें शौर्य जागृत राहत असे, व शस्त्रेंही गंजत नसत. परंतु जिवबांच्या ह्या खटपटीमुळें त्या पथकांतील लोकांत शिस्त, चलाखी, धाडस व श्रम सोसण्याची शक्ति हीं फार वाढलीं.

आपल्या पथकांतील लोकांची तयारी दिवसेंदिवस उत्तम होत चाललेली पाहून बव्र्यांस फार समाधान वाटे आणि त्यामुळें व जिवबांच्या सुस्वभावामुळें त्यांजवर त्यांची मर्जी फार बसली. त्याचप्रमाणें त्या लोकांचीही त्यांजवर मर्जी असे. ह्याप्रमाणें जिवबांनीं बव्र्यांकडे सुमारें एक वर्ष काढिलें. बव्र्यांबरोबर त्यांनीं श्रीमंत पेशव्यांच्या वाड्यांत जात येत असावें. तेणेंकरून ,बव्र्यांमुळें ह्यांची श्रीमंतांशीं ओळख झाली. बव्र्यांचा यांजवर जसजसा लोभ जडत चालला तसतशी त्यांची किल्लीकोठी, हिशोबठिशोब वगैरेवरील देखरेख, आपण न करितां ते ह्यांसच सांगत असत. ह्या कामींही त्यांना जिवबांची दक्षता चांगली दिसून आल्यामुळें त्यांनीं श्रीमंतांकडे खासगी व्यवस्था ठेवण्यांत व शिपाइगिरीच्या कामांतही त्यांच्या वाकबगारीची फार तारीफ केली होती, व त्याच संधीस श्रीमंतांस वांकनिशीचे कामावर कोणी तरी लायक मनुष्य पाहिजे होता. ह्मणून त्यांनीं वांकनीस कोण ठेवावा? अशी बव्र्यांकडे सहज गोष्ट काढिली. बव्र्यांनीं जिवबांची शिफारस केली. श्रीमंतांच्या लक्षांत जिवबा होतेच. त्यांनीं ही गोष्ट मान्य करून त्यांस पाठवून देण्याविषयीं बव्र्यांस सांगितलें. बव्र्यांनीं घरीं येऊन जिवबांस सर्व मजकूर कळविला. तो ऐकून त्यांस आनंद झाला. 'आपल्या कृपेनें माझें काम झालें,' असें सांगून त्यांनीं बव्र्यांचे फार आभार मानिले. आणि ते तेथील सर्वांचा निरोप घेऊन श्रीमंतांकडे दाखल झाले. श्रीमंतांनीं वांकनिशीचें काम जिवबांच्या हवालीं करून तें विश्वासूपणानें व बिनबोभाट चालविण्याविषयीं त्यांना सांगितलें. त्याप्रमाणें त्यांनीं तें काम हातीं घेऊन

मोठ्या दक्षतेनें चालविलें. कधीं अव्यवस्था किंवा कोणाची तक्रार अगर नाखुषी हीं उरूं दिलीं नाहींत, त्यामुळें श्रीमंतांचाही त्यांजवर लोभ जडत चालला.

एकदा महादजी शिंदे पुण्यांत आले होते. त्या प्रसंगीं हे शूर घराण्यांतील पुरुष जाणून सन्मानार्थ श्रीमंतांनीं त्यांना मेजवानी दिली. मेजवानीचा थाट उत्तम प्रकारचा होता. वाढपे वाढीत होते, व जिवबा सर्व व्यवस्था पाहत होते. सर्व पदार्थांची अनुकूलता होती पण महादजींस आवडणारा एक पदार्थ मात्र कमी होता. महादजींस तिळांची चटणी फार आवडत असे, व तें जिवबांसही माहीत होतें. जेवतांना सर्व पदार्थ निरखून पाहून महादजींनीं सहज वांकनिसांकडे नजर केली. तों त्यांच्या मनांत आलेली गोष्ट जिवबांस समजली. त्यांनीं तत्काळ सांगितलें, 'आज सोमवार होता ह्मणून करविली नाहीं.' तें ऐकून महादजींस त्यांच्या चतुरतेचें व समयसूचकतेचें मोठें कौतुक वाटलें. मग ते हसले, आणि आपल्या मनांतील अर्थ जाणून वांकनिसांनीं सांगितलेलें गुज त्यांनीं श्रीमंतांस समजाविलें, तें ऐकतांच श्रीमंतांसही हसूं आलें.

याप्रमाणें जिवबादादा वांकनिशीचे कामावर असतां त्यांनीं तें काम चांगल्या प्रकारें करून श्रीमंतांस संतोष दिला. ते त्या कामावर असतां सवड मिळे तेव्हां आपल्या आश्रयदात्या बर्व्यांकडे कधीं कधीं जात येत असत. अशा प्रकारें सुमारें एक वर्ष गेल्यावर सरदार बर्वे आजारी पडून वारले. त्या वेळीं त्यांचे मुलगे लहान असल्यामुळें सरदारीच्या कामावर कोणी तरी लायक मनुष्य वहिवाटदार नेमून दिला पाहिजे, अशी श्रीमंतांकडून बर्व्यांच्या मनुष्यांस ताकीद मिळाली. त्या वेळीं सर्वांनीं असें ठरविलें कीं, जिवबादादांनीं येथील सर्व वहिवाट पूर्वीं केली आहेच. ते शूर असून सर्व लोक त्यांच्या हाताखालीं राहण्यास फार खुषी आहेत. त्याअर्थीं त्यांनाच ह्या सरदारीची वहिवाट सांगावी. मग असा निश्चय करून श्रीमंतांस त्यांनीं त्याप्रमाणें कळविलें. श्रीमंतांनीं जिवबादादांची लायकी पूर्वीं मयत सरदार बर्व्यांकडून ऐकिली होती. आणि त्यांचा पाणीदारपणा त्यांनीं ओळखिला होता. ह्मणून त्यांनीं जिवबादादांस बोलावून आणून विचारिलें कीं, 'बर्व्यांच्या पथकावरील सरदारीची वहिवाट पाहण्यास तुह्मांस सांगण्याची त्यांची इच्छा आहे. पण तुह्मांकडून तें काम निभेल कीं काय?' जिवबांनीं उत्तर केलें कीं, 'श्रीमंतांनीं वहिवाट मला सांगितल्यास मी योग्य प्रकारें तें काम बजावीन अशी माझी उमेद आहे. काम देऊन अनुभव पहावा.' तेव्हां त्यांनीं जिवबादादांस सरदारी सांगून त्यांची तिकडे रवानगी केली.

श्रीमंतांच्या हुकुमाप्रमाणें जिवबादादा बर्व्यांच्या सरदारीची वहिवाट करूं लागले. त्या वेळीं पूर्ण मुखत्यारीनेंच ते तें काम पहात असल्यामुळें फौजेची एकंदर व्यवस्था त्यांना मनाप्रमाणें ठेवतां आली. त्यांनीं शिपाई, घोडे व सरंजाम निवडक ठेविला. सर्व लष्करी लोकांकडून नित्य काम घेऊन, हुकुमाप्रमाणें लोकांनीं व्यवस्थेनें व शिस्तवार काम करावें असें त्यांना शिकविलें. त्यांचें

---

१. वांकनिशीचे कामावर जिवबादादा असल्याबद्दलची व सदर मेजवानीचे प्रसंगीं घडलेल्या गोष्टीबद्दलची हकीकत असलेलें त्या वेळचें पत्र जिवाजीराव यशवंत केरकर (जिवबादादांचे नातू) यांस सांपडलें होतें तें त्यांनीं केरी येथें पाठविलें होतें. हलीं तें पत्र आढळत नाहीं. इतर शेंकडो मोलवान पत्रांबरोबर ह्याही पत्राचा नाश झाला. मागें रा० भास्करराव सुभेदार ग्वाल्हेरीहून केरीस आले होते. ते फार वृद्ध व माहीतगार होते. त्यांनीं स्वतः जिवबादादांची बखर लिहिण्यास सुरुवात केली होती तींतही हा मजकूर आहे.

२. वि० ज्ञा० विस्तार पु० ११ पृ. ७९.

युद्धकौशल्य अनेक युक्तींनीं वाढविलें त्यामुळें त्यांच्या युद्धशिक्षणाविषयीं व टापटिपीविषयीं चोहोंकडे प्रशंसा होऊं लागली.

धाडस हा गुण जिवबादादांमध्यें मोठ्या प्रमाणानें वसत होता. एकदा ह्या गुणाचा चांगलाच प्रत्यय आला. महादजी शिंदे व तुकोजी शिंदे हे पुण्याकडे असतां एके वेळीं शिकारीमाटीं एका रानांत गेले होते. बरोबर जिवबादादाही होते. शिकार करीत असतां एकाएकीं एक मोटा वाघ महादजींच्या अंगावर आला. जवळपास पुष्कळ हत्यारबंद नोकर होते. परंतु वाघावर जाण्याची किंवा बंदुक झाडण्याची कोणाची छाती होईना. जिवबादादांनीं महादजींवरील प्रसंग पाहून ते तरवार उपसून वाघावर धावले आणि डावा हात कपड्यानें गुंडाळून तो वाघाच्या तोंडांत सारून तरवारीनें त्याचे तुकडे केले. त्यामुळें महादजींच्या जिवावरील संकट टळलें. त्या वेळेपासून जिवबादादांच्या पराक्रमाविषयीं महादजींची पूर्णपणें खातरी झाली.[1]

पुढें जिवबादादांस कांहीं दिवसांनीं कर्नाटकांत जाण्याचा प्रसंग आला. ह्मैसूरच्या राजानें खंडणीच्या वसुलासाठीं परभारें लावून दिलेला मुलुख परत घेतल्यामुळें तो घेण्यासाठीं फौजेसहित गोपाळराव हरि पटवर्धन यांची पेशव्यांकडून नेमणूक झाली. त्यांच्या मदतीस जीं पथकें दिलीं त्यांत बर्व्यांचें पथक घेऊन जिवबादादांस जाण्याची आज्ञा झाली. त्याप्रमाणें ते सैन्यासहित त्यांजबरोबर निघाले. गोपाळराव हरि यांनीं सर्व सैन्य बरोबर घेऊन एकाएकीं ह्मैसूरकरांच्या ताब्यांतील बंगलोर शहरास वेढा दिला आणि आंतील सर्व व्यवहार बंद पाडिले. ह्मणून त्यांशीं लढाई करण्याकरितां ह्मैसूरकरांचा सेनापति हैदरखान आला होता. कांहीं वेळ दोन्हीं सैन्यें स्वस्थ पडून होतीं. शेवटीं युद्धाशिवाय मराठ्यांचा वेढा उठत नाहीं असें पाहून हैदरानें लढाईस प्रारंभ केला. बराच वेळ लढाई चालून ह्मैसूरकरांचे कांहीं लोक पडल्यावर हैदरानें अनुमान केलें कीं लढाई अशीच पुढें चालविल्यास नाश मात्र फार होईल, त्यापक्षीं तूर्त मराठ्यांची समजूत काढून त्यांस वाटेस लावावें, यांतच आपलें हित आहे. मग लढाई बंद करून मराठ्यांशीं तह केला. तहांत पूर्वींच्या कराराप्रमाणेंच खंडणीची भरपाई केली. सोळा लक्षांचें सोनें तोलून दिलें. आणि सोळा लक्षांच्या हुंडीचिठ्ठ्या दिल्या. तेव्हां खंडणीच्या वसुलासाठीं जो प्रांत मराठ्यांस लावून दिला होता तो मराठ्यांनीं ह्मैसूरकरांस कायमचा सोडून देऊन त्यांशीं तह केला, आणि मराठे मागें परतले. स. १७६९ त कर्नाटक प्रांतीं पटवर्धन, रास्ते, पेठे व बर्वे हे पेशव्यांचे प्रमुख सरदार होते. बर्व्यांतर्फे जिवबादादा तेथें सुभेदार होते.

ह्मैसुराकडील बंदोबस्त करून गोपाळराव हरि मद्रासेकडे निघाले. त्या वेळीं मद्रास येथें इंग्रजांस वेढा घालून फ्रेंच त्यांजबरोबर लढाई करीत होते. त्या दोघांहीबरोबर लढून त्यांजकडून खंडणी घ्यावी असा उद्योग मराठ्यांनीं आरंभिला, परंतु त्यांत त्यांना ह्मणण्यासारखा फायदा झाला नाहीं. ह्मणून फ्रेंचांच्या ताब्यांतील त्रिपतीचें देवस्थान त्यांनीं घेतलें. पुढें तेथील यात्रेंत बहुत पैसा मिळण्यासारखा होता, परंतु इकडे पुण्याहून त्यांना फौजेसह लवकर येण्याविषयीं बोलावणें गेल्यावरून तेथें कांहीं लोक ठेवून गोपाळराव पुण्याकडे परतले आणि जिवबादादा कर्नाटक प्रांतीं सुभ्याचे कामावर राहिले.

---

१. पोतदारांची नीतिपर पुस्तकमाला, भाग १, गोष्ट १३.

भाग ४ था.

शिंदे घराण्याची माहिती.

इ० स० १७३० पासून स० १७६० पर्यंत.

आमच्या चरित्रनायकानें आपल्या आयुष्याचा बहुतेक भाग ज्या शिंदेशाहीची एकनिष्ठ सेवा करण्यांत खर्ची घातला, तसेंच इतिहासप्रसिद्ध 'पाटीलबावां'च्या अंगच्या राजपदोचित अनेक गुणांनीं व जिवबादादांच्या अप्रतिम साह्यानें ज्या शिंदेशाहीचा इतका लौकिक वाढला कीं, शिंद्यांएवढा बलाढ्य सरदार आपल्या पदरींचसा काय, पण साऱ्या हिंदुस्थानांतही दुसरा सांपडावयाचा नाहीं, असें पेशव्यांस भासविलें. त्या शिंदेशाहीची उभारणी कशी झाली व पाटीलबावांपर्यंत तींत कोण कोण पुरुष प्रसिद्ध झाले, ह्याबद्दल एथें थोडक्यांत माहिती देणें हें अप्रासंगिक होणार नाहीं, असें आह्मांस वाटतें.

[1]साताऱ्यापासून सहा कोशांवर कोरेगांव तालुक्यांत कण्हेरखेड ह्मणून एक गांव आहे, तें शिंद्यांचें मूळ ठिकाण होय. हे शिंदे तेथील पाटील असत. त्यांपैकीं राणोजी शिंदा या नांवाचा एक हुशार पाटील शिलेदारीच्या बाण्यानें रहात असे. त्यानें शाहूमहाराजांचे कारकीर्दींत बाळाजी विश्वनाथाची चाकरी धरिली. राणोजी शूर असल्यामुळें त्याजवर पेशव्यांची मर्जी असे. पुढें रामचंद्रबाबा सुखठणकर, हे बाजीरावसाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत एक मुत्सद्दी होते. त्यांनीं राणोजीच्या गुणांवरून त्यास योग्यतेस चढवावें ह्मणून, त्याची बाजीरावांकडे हुजरेगिरीवर मुद्दाम नेमणूक करविली. पुढें एके दिवशीं बाजीरावसाहेब व रामचंद्रबाबा हे खलबतखान्यांत खलबतास बसले होते तेथें त्यांना बराच वेळ लागला. खलबतांतून उठल्यावर रामचंद्रबाबा बाहेर आले. तों राणोजी श्रीमंतांचे जोडे उराशीं धरून निजलेला असून, त्याच्या हातापायांवर राजचिन्हांच्या रेषा उमटल्या आहेत, असें त्यांनीं पाहिलें. मग ती गोष्ट त्यांनीं बाजीरावसाहेबांस दाखवून ह्मटलें, 'हा पुरुष भाग्यशाली होणार आहे. यास चांगलें काम देऊन वाढविल्यास हा नांव मिळवील.' तें ऐकून बाजीरावसाहेब ह्मणाले, 'याला मोठें काम दिल्यास, तें चांगल्या रीतीनें पार पडेल, अशी हमी तुह्मी घेत असल्यास, तसें काम देऊं.' [2]मग ती गोष्ट रामचंद्रबाबांनीं मान्य करितांचे राणोजीस पेशव्यांनीं माळवेप्रांताच्या सुभ्याचीं वस्त्रें देऊन, [3]त्याची दिवाणगिरी रामचंद्रबाबांस सांगितली.

१. शिंदे, साळुंके वगैरे हे मूळचे सिंधपंजाब देशचे क्षत्रिय आर्य, वैदिक धर्माचरणाचे रजपूत राजे होत. त्यांच्या उत्तरेकडून दक्षिणेकडे स्वाऱ्या होत, तेव्हां त्यांनीं दक्षिणदेश काबीज करून इकडे वसाहती केल्या. त्यांचें राहणें या महाराष्ट्रदेशांत आल्यामुळें त्यांस मराठे हें नांव प्राप्त झालें. या स्वाऱ्यांबरोबर त्यांचे मुत्सद्दी, प्रधानमंडळ, शिपाई वगैरे होऊन आलेले गौडांतर्गत सारस्वत ब्राह्मणही या प्रांतीं राहिले. आणि सारस्वतांचा जुना संबंध या प्रांतीं होताच. यास्तव आपले धनी जे रजपूत यांस ते दक्षिणेंत स्वाऱ्या करण्याचें उत्तेजन देत. याप्रमाणें मराठ्यांची माहिती आहे. शिंदे यांचें गोत्र कौंडण्य, शेष कुल, साम वेद, ज्योतिर्लिंग व कालिका देवी. देवकांत आघाडा पूजितात. निशाण नामांकित, वाहन लाल घोडा, याप्रमाणें आहे. प्रकारांतरानें इतर सर्व मराठ्यांचा कुलाचार आहे.

२. विविधज्ञानविस्तार पुस्तक ११, पृष्ठ ७९, ह्या बखरींत ह्या प्रसंगीं श्री० बाजीरावसाहेब पेशव्यांचे ऐवजीं श्रीमंत नानासाहेब पेशवे, असें चुकून ह्मटलें आहे.

३. " रामचंद्रबावा शेणवी तो * * * कारकुनी व शिपाईगिरी या दोहों कामांत निपुण असा पाहून, त्यास बाजीरावानें शिंद्याचा दिवाण केला. " ग्रांट डफचे बखरीचें क्यापटन डेविड केपनकृत मराठी भाषांतर, पृष्ठ १९३.

राणोजी शिंदे फार शूर व धोरणी होता. बरेच वेळां त्यानें शौर्य गाजविल्यावरून बाजीराव बल्लाळ पेशवे, यांची त्याजवर कृपा होतीच. त्यांत रामचंद्रबाबांनीं त्याची शिफारस करून तींत भर घातल्यामुळें राणोजी एवढ्या वैभवास चढला, ही हकीकत बरीच प्रसिद्ध आहे. बाजीरावसाहेब पेशवे खरे परीक्षक असून, शौर्याशिवाय त्यांजमध्यें दुसरेही पुष्कळ उत्तम गुण होते. त्यांच्या कारकीर्दींत शौर्यश्री मराठी राज्यांत पुनः अवतीर्ण झाली होती, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ते गुणाचे चहाते असून, कोणत्याही विशिष्ट वर्गास किंवा स्वार्थादि कोणत्याही एकदेशीय स्वभावास वाहिलेले नसल्यामुळें शिंदेहोळकरादि बरींच मरदारघराणीं त्या वेळीं उदयास आलीं. आणि त्या योगानेंच मराठी राज्यांतील जोमदारपणा वाढला. आणि पेशव्यांचें राज्य नष्ट झालें, तरी अद्यापि मराठेशाहीची निशाणी अवशिष्ट राहिली.

बाजीरावसाहेबांनीं हिंदुस्थान, माळवा, बुंदेलखंड, भोपाळ, फिरंगाण, हबसाण, इत्यादि प्रांतांत आपला अंमल बसवून चौथाई, सरदेशमुखी, मोकाशी इत्यादि हक्कांचें स्वामित्व स्थापन केलें. त्या कामीं ज्या विख्यात पुरुषांनीं त्यांस आपल्या शौर्यादि गुणांच्या योगानें योग्य साहाय्य केलें, त्यांत मल्हारराव होळकर व राणोजीराव शिंदे, हेच प्रमुख होते. इ० स० १७२४ त बऱ्हाणपुराजवळ मोगल व बाजीराव यांची मोठी लढाई होऊन त्यांत बाजीरावास जयप्राप्ति झाली. त्या वेळीं राणोजी हाच बाजीरावाच्या हाताखालीं मुख्य सेनानायक होता. पुढें बाजीरावानें मोगलांच्या मुलखांत यथेच्छ धामधूम करून दिल्लीपर्यंत चाल केली. त्या वेळीं मराठी कावा चुकून आठ हजार फौज बादशाही स्वारांच्या तावडींत अचूक सांपडण्याचा वेळ आला असतां, मोठ्या धैर्यानें राणोजीच मोगलांच्या फौजेवर तुटून पडल्यामुळें, तिची वाताहत झाली. आणि मराठी फौज यशस्वी होऊन माघारें परतली. पुढें इ० स० १७३६ त जेव्हां मराठ्यांचा अगदीं नायनाट करण्याचा विडा उचलून निजामसाहेबांची स्वारी दक्षिणेकडे येऊं लागली, तेव्हां राणोजीराव शिंदे, मल्हारराव होळकर, ह्याच वीरश्रेष्ठांच्या अतुल बळावर पेशव्यानें निजामास भोपाळच्या किल्ल्यांत कोंडून, त्यास इतकें जेरीस आणिलें कीं "मी मोठ्या संकटांत पडलों आहें, मला लवकर येऊन सोडवा; नाहींपक्षीं माझी धडगत नाहीं." अशा मजकुराचीं गुप्त पत्रें त्यानें दिल्लीस पाठविलीं. तरी कांहीं इलाज चालेना. शेवटीं त्याला बाजीरावासच शरण यावें लागलें. मग जेव्हां सर्व माळवाप्रांत आणि नर्मदा व चंबळा या दोन नद्यांमधला सारा मुलूख मराठ्यांस दिला, तेव्हां त्यास जिवानिशीं सोडिलें! पुढें लौकरच फिरंगी लोकांबरोबर युद्धप्रसंग आला. साष्टीप्रांतांतील कांहीं मुलुख फिरंगी बळकावून बसले. त्यांच्या पारिपत्यासाठीं चिमाजीआप्पा राणोजी वगैरे सरदारांस घेऊन निघाले. त्यांत एकट्या राणोजीनेंच जे स्वतंत्र रीतीनें पराक्रम केले, ते पाहून चिमाजीआप्पानें तोंडांत बोट घातलें. अस्तु. अशा अनेक प्रसंगीं आपली स्वामिभक्ति व युद्धकौशल्य व्यक्त करून राणोजीनें पेशव्यांस संतुष्ट केलें.

---

१. दिल्लीपति व मराठे, ह्यांजमध्यें सन १७३४ सालीं तह झाला. त्यांत ठरलेले करार बोलल्याप्रमाणें बाजीरावसाहेब पाळतील अशाबद्दल बादशहानें राणोजीची खातरी घेतली होती. त्याचप्रमाणें एका प्रसंगीं निजाम व बाजीराव यांमध्यें झालेल्या तहांतही निजामानें राणोजीसुद्धां ८ जामीन घेतले होते. यावरून राणोजीची योग्यता केवढी होती, हें वाचकांच्या लक्षांत येईल. पहा ग्यालेसनच्या इतिहासाचें भाषांतर पृ० १५०।५१ व हिंदुस्थानकथारस पृ० १०५.

शिंदेशाही उभी करण्यांत ज्या विख्यात पुरुषाचें साह्य झाल्याबद्दल वर लिहिलें, त्या रामचंद्रबाबाविषयीं मिळालेली माहिती एथें संक्षेपतः सादर करितों.

रामचंद्रबाबा हे कोकणांतील आरवली नामक गांवचे कुळकर्णी होते. हे चांगले बुद्धिमान असून तेथें साधारण स्थितींत होते. कारण बुद्धीचा प्रभाव दाखवावयास स्थल किंवा प्रसंग तसेच पाहिजेत. ते आपल्या स्थितीस कंटाळून रोजगाराच्या हेतूनें आपला गांव सोडून निघाले. ते प्रथमतः गोमांतकप्रांतीं कवळेंक्षेत्रीं आपली उपास्य कुलदेवता श्रीशांतादुर्गा इच्या दर्शनास गेले. दरिद्रदशा असल्यामुळें आंगावर जीर्ण वस्त्रें असून जवळ सोर चार आण्यांचे पैसे होते. तेवढ्यांत अभिषेक नैवेद्य करावा ह्मणून त्यांनीं पुजाऱ्यांस सांगितलें; परंतु तेवढ्यांत हें काम होणार नाहीं, ह्मणून त्यांनीं साफ सांगितलें. मग काय करणार! नाइलाजानें त्यांनीं देवीची षोडशोपचारें मानसिक पूजा करून, तिच्या पूजेनिमित्त आणिलेले ते पैसे देवालयासमोरच्या दीपमाळेखालीं जमिनींत पुरून ठेविले. आणि पुढचा रस्ता धरिला. बहुतेक लोकांस आतां जशी मुंबई, त्याचप्रमाणें त्या काळीं छत्रपतींचें वसतिस्थान जें सातारा शहर, तें उदरनिर्वाहासाठीं जाण्याचें स्थान होतें. तेथें ते पोहोंचल्यानंतर कचेश्वर बाबा ह्या थोर पुरुषानें त्यांस आपल्या घरीं राहावून घेतलें. व त्यांच्या आंगची नैसर्गिक योग्यता पाहून कचेश्वरबाबांनीं तेव्हांच भाकीत करून ठेविलें कीं, 'रामचंद्र मल्हार हे लवकरच वैभवास चढतील.' त्याप्रमाणें पुढें घडूनही आलें. बाळाजी विश्वनाथ पेशवे झाल्यानंतर रामचंद्रबाबा हे त्यांजकडे जाऊं येऊं लागले. सहज कामकाज पाहतां पाहतां बाबा हे चांगले कारकून असून पाणीदार पुरुष आहेत, असें त्यांच्या लक्षांत आलें. पुढें एके दिवशीं बाळाजी विश्वनाथ आणि पुरंदरे बुद्‌बळांचा डाव खेळत असतां, त्यांत कांहीं अडचणीचा प्रसंग आल्यामुळें खेळ तटून राहिला. उभयतां खेळणार; परंतु दोनचार दिवस त्या डावाचा विचार करीत असतां त्यांना कांहीं तोड सुचेना. एके दिवशीं रामचंद्रबाबा पेशव्यांच्या मागें ओणव्यानें राहून डाव पाहत होते. तों अडचणीचा निकाल कसा करावा हें त्यांच्या लक्षांत आलें. तेव्हां त्यांनीं पेशव्यांस अमुक प्रकारें मोहरें ठेविल्यास व पुढें असा डाव खेळल्यास सारी अडचण मोडेल ह्मणून सल्ला दिली. रामचंद्रबाबांच्या त्या सल्लतीनें सर्व गूढ उकललें आणि पेशव्यांस फारच आनंद वाटला. एवढी लहानशी गोष्ट, ते पेशव्यांचे आवडते होण्यास, कारण झाली. पुढें जसजसा त्यांच्या बुद्धीचा प्रकाश पडूं लागला, तसतशीं त्यांजकडे पेशव्यांकडून कामें सोपविण्यांत येऊं लागलीं. यानंतर बाजीरावसाहेब, पेशवेपदारूढ झाले. त्यांसही रामचंद्रबाबांची योग्यता पूर्णपणें माहित होती. यास्तव त्यांनीं राज्यव्यवस्थेच्या कामीं चांगली शिस्त बसविण्यासाठीं बाबांची नेमणूक केली. त्यांनीं प्रथमतः एकंदर राज्याची प्रांतवार नीट व्यवस्था लावून दिली. जमाबंदी नियमित केली, वसूलबाकीसंबंधी नियम ठरविले, खर्चाचे तनखे निरनिराळे तोडून दिले, हिशोबी कामांचे व इतर लेखी कामांचे जे गोंधळ होते, ते नवीन नियम करून साफ मोडून टाकिले, आणि पुढील कामें ठरविलेल्या नियमांप्रमाणें शिस्तवार चालू ठेविलीं.

१. रामचंद्रबाबा हे मुळीं आरवली गांवचे कुळकर्णी होते. पुढें त्यांच्या भाऊबंदांत कांहीं कारणानें त्यांचें पटेनासें झालें. त्यामुळें त्या भाऊबंदांनीं वाडी सरकारचा राजाश्रय संपादून त्यांस त्या गांवांतून घालवून दिलें. तेव्हां मालवणप्रांतीं आचरें गांवीं आपले आप्त कानविंदे ह्मणून होते, त्यांच्या आश्रयानें तेथील कुळकर्णांत हिस्सा संपादून मग ते साताऱ्यास निघून गेले. आचरें एथें व देवगड तालुक्यांत भाईन ह्मणून गांव आहे तेथेंही, हल्लीं ह्या घराण्याचा वंश आहे.

२. विविधज्ञानविस्तार पु० ११, पृ० ९२.

तेणेंकरून रामचंद्रबाबांचें नांव महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झालें. तोडरमल्ल, मलिकंबर, अकण्णा, मादण्णा या प्रसिद्ध पुरुषांप्रमाणेंच पेशव्यांच्या राज्यांत रामचंद्रबाबा होऊन गेले. "रामचंद्रबाबा कर्ते पुरुष * * * माळव्याचे महालाचा आकार पाहून वांटण्या केल्या. निमे शिंदे, निमे होळकर, ऐशी वहिवाट चालली. परंतु वांटणीचा तपशील येणेंप्रमाणें:—श्रीमंत ४५ (लक्ष) शिंदे २२॥ होळकर २२॥ पवार १० याप्रमाणें आकार पाहून माळवा वांटून दिल्हा." ह्याप्रमाणें महत्त्वाचीं कामें रामचंद्रबाबांच्याच शहाणपणानें पार पडतें. शिवाय नानासाहेब व मुख्यत्वें सदाशिवरावभाऊ यांस राजकीय शिक्षण देण्याचें महत्त्वाचें कामही याच थोर पुरुषाकडे होतें. हीं सर्व कामें त्यांनीं चांगल्या रीतीनें पार पाडिलीं.

पुढें बाजीरावसाहेब पेशवे इ० स० १७४० त मरण पावले. तेव्हां रामचंद्रबाबांस दक्षिणेंत यावें लागलें. बाजीरावसाहेबांच्या मागून नानासाहेब पेशवे झाले. बाजीरावसाहेबांची सर्व कारकीर्द लढाया व सरदार आणि मुत्सद्दी यांचे आपआपसांतील खासगी द्वेषासंबंधाचे खटले, यांत बहुतेक खर्च झाल्यामुळें मुलखांतील लावून दिलेल्या व्यवस्था कांहीं शिथिल पडत चालल्या होत्या; त्यांकडे त्यांना पुनः लक्ष देऊन चोहोंकडे चांगला बंदोबस्त राखावयाचा होता. त्याप्रमाणें त्यांनीं मोठ्या दक्षतेनें ठिकठिकाणच्या अव्यवस्था मोडून राज्ययंत्राचे सर्व अवयव सुरळीतपणें काम करूं लागतील असें केलें. "बाळाजी बाजीरावाचे वेळेस प्रजेला काय काय सुख होतें, तो शोध केला असतां असें दिसतें कीं, मक्त्याच्या मामलतींची चाल मोडली, व कोणी लुटारू आला असतां गांवकरी यांणींच मारावा असें ठरविलें. तेणेंकरून प्रजा सुख पावली. मग पेशव्यांनीं प्रांतांत जागोजाग सुभेदार व मामलतदार ठेवून त्यांचे चवकशीवर सरसुभेदारही केले. आणि वसूल जमा करणारांची पहाणी व्हावी असाही त्यानें बेत ठरविला होता. याशिवाय जो हिशोब देईना, त्याचें पारिपत्य करून हिशोब घेत असत. पुण्यांत बाळकृष्ण गाडगीळ मोठा कुलीन शास्त्री तो न्यायाधीश केला. त्यायोगें शहरचे लोक फार सुख पावले. या सर्व उत्तम रीतींचें मूळ रामचंद्रबाबा शेणवी."

नानासाहेब पेशवाईचें काम पाहूं लागल्यावर, कांहीं दिवसांनीं गृहकलह उत्पन्न झाला. त्याचें कारण असें कीं, सातान्यास चिमाजीआप्पा कैलासवासी झाल्यानंतर छत्रपतींच्या आग्रहावरून नानासाहेबांनीं सदाबाभाऊंस पुण्यास आणिलें होतें. पण त्यांची स्त्री गोपिकाबाई, ह्यांस तें आवडलें नाहीं. त्यांचें ह्मणणें "असे भाऊबंद जवळ आणून आपले पोरांस ठिकाण नाहीं असें करतील." असें होतें. ह्मणून गोपिकाबाईनें पेशव्यांचे अनेक तऱ्हेनें कान भरून भाऊंशीं विरोध मांडिला. नानासाहेबांनींही सारासारविचार न करितां, त्यांस दरबारी महत्त्वाचें काम न सांगतां, नुसत्या खर्डेघांशाच्या कामावर नेमिलें, व त्यांस कदाचित् कोणी वर येण्याची सल्लामसलत देईल ह्मणून त्यांच्याशीं कोणीं संभाषणच करूं नये, असा सक्त बंदोबस्त केला. असो.

१. होळकरांची कैफीयत पृष्ठ, १०।११ पहा.

२. हिंदुस्थानांत शिंदे, होळकर वगैरे पेशव्यांचे सरदार होते; तरी दिल्ली, काशी, अयोध्या, माळवा वगैरे प्रांतांतील महत्त्वाची राजकीय कामें ते रामचंद्रबाबांकडून करून घेत असत. पहा काव्येतिहाससंग्रहांतील पत्रें व यादी, पृ० ३२।६८।७५।८१.

३. पेशव्यांच्या दरबारांत रामचंद्रबाबांची योग्यता एवढी मोठी होती कीं, राजेरजवाड्यांकडून पेशव्यांप्रमाणेंच त्यांना मोठमोठ्या नजरा मिळत असत. पहा भारतवर्ष मा० पु० २, अं० ४, जुलै १८९५, पृ० ३४.

४. ग्रांट डफकृत मराठ्यांचे बखरीची सन १८२९ सालची मराठी भाषांतराची आवृत्ति, पृ० २३९.

वर लिहिल्याप्रमाणें सदाशिवराव भाऊ हे केवळ परतंत्रतेंत दिवस काढीत होते. चिमाजी-आप्पासारख्या वाघाचा बचडा व आपला प्रिय शिष्य, याची ती शोचनीय स्थिति पाहून रामचंद्रबाबांस फार वाईट वाटत असे, व त्याबद्दल श्रीमंतांकडे त्यांनीं पुष्कळ रदबदलीही केली. पण तिचा कांहींच उपयोग न होतां उलटी "त्यांजवर श्रीमंतांची मर्जी क्रुद्ध होऊन त्यांस आज्ञा झाली कीं, तुह्मी कारभारांत एकंदर बोलूं नये." असें होतांच बाबांनीं या गोष्टींत मन घालण्याचें अगदींच सोडून दिलें. तथापि तो पुरुष पेशव्यांच्या घराण्याचा अभिमानी व त्यांचा अभीष्टचिंतक असल्यामुळें त्याच्यानें स्वस्थ बसवलें नाहीं. दुसरी काळजीची गोष्ट अशी होती कीं, नानासाहेब पेशव्यांची स्त्री गोपिकाबाई, ही भाऊंस अगदीं पाण्यांत पाहत होती, व तेणेंकरून आपल्या भाऊंच्या जिवास केव्हांना केव्हां तरी दगा पोंचण्याचा संभव आहे, असा त्यांस पुरा वहीम आला होता. आतां पुढें काय युक्ति योजावी, असा त्यांस विचार पडला. त्यांना बिकट अडचणींतून आपला मार्ग काढावयाचा होता. ज्याला एकदा आपलेंसें ह्मटलें, त्या सदाशिवरावाचा अभीष्टचिंतक दरबारांत कोणीच राहिला नाहीं, इतकेंच नव्हे तर नानासाहेब गोपिकाबाईचे कौटिल्यामुळें इतके भारून गेले होते कीं, दरबारांतील यःकश्चित् लोकांप्रमाणेंही भाऊंशीं कधींकाळीं देखील संभाषण करावयास ते तयार नसत. या कलहाग्नीचा पुढें किती भयंकर परिणाम होईल, याची नानासाहेबांस कल्पनाही नव्हती! "एके दिवशीं एक मारेकरी भाऊवर तो कचेरींत काम करीत बसला असतां पक्का वार करीत होता, पण पाठीमागें असणाऱ्या मनुष्यानें त्याचा हात धरिल्यामुळें त्यापासून फारशी इजा झाली नाहीं."[१]

एथपर्यंत मजल पोंचल्यावर आतां उपेक्षा करण्यास मुळींच अवकाश राहिला नाहीं, असें जाणून भाऊंचा एकदा कसा तरी एथून पाय काढविलाच पाहिजे यासाठीं काय उपाय योजावा, याची त्यांस एकसारखी चिंता लागून राहिली होती. एके दिवशीं भाऊ दरबारांत लिहीत बसले आहेत असें पाहून, त्यांजबरोबर कोणींही संभाषण करितां नये. अशी सक्त ताकीद असल्यामुळें जातां जातां भाऊंच्या कानावर जाईल अशा रीतीनें आपल्याशींच बाबा ह्मणाले कीं, "कांहीं पाणी असेल असें आह्मी ह्मणत होतों, परंतु तें कांहीं दिसत नाहीं. यांणीं खर्डेच लिहावे." बाबांचा आशय जाणून भाऊंनीं लागच उत्तर दिलें. "पाणी बहुत आहे. सोन्याचें ताट झालें, तरी त्यास कुडाचें उठिगण पाहिजे."[२] हें उत्तर ऐकून बाबांस समाधान वाटलें. मग एके दिवशीं एकांतीं गांठ घेण्याची संधि आणून बाबांनीं त्यांस बराच हितोपदेश केला. "श्रीमंत कारभारास बसतात तेथेंच तुह्मीं बसत जावें." "तुह्मीं कारभारामध्यें बोलूं नये, पण त्यांणीं कांहीं विचारिलें असतां त्याचा मात्र जाब द्यावा." असें सांगितल्यावर भाऊंनीं तसाच क्रम ठेविला. व पुढें चार सहा महिने लोटल्यावर भाऊंची त्या नजरकैदेंतून सुटका होण्याचा योग आला.

नानासाहेब जसे सातारकर छत्रपतींचे पंतप्रधान होते, तसेंच आपल्या भाऊस कोल्हापूरकर छत्रपतींचे पंतप्रधान करावें, असें नवीनच कारस्थान योजून, तें नानासाहेबांस खरें दिसण्याकरितां कोल्हापुरदरबारांत संधान बांधून, त्यांजकडून 'सदाशिवरावभाऊंस आह्मी आपले पेशवे करितों,' असें रामचंद्रबाबांनीं पत्र आणून ठेविलें होतें. नंतर एके दिवशीं कर्नाटकप्रांतीं बंडें उद्भवल्याबद्दल ति-

१. पहा पेशव्यांची बखर सन १८९० ची आवृत्ति, पृ० ५१ वरील टीप १० व ग्रांट डफकृत मराठ्यांची बखर.
२. कर्तबगार पुरुष असला, तरी त्याला चांगल्या मदतगाराचा पाठिंबा पाहिजे, हा अर्थ. ३. पेश० ब० पृ०, ४९.

कडील अधिकाऱ्यांचीं पत्रें आलीं होतीं. त्या वेळीं कचेरींत रामचंद्रबाबा, भाऊ आदिकरून मंडळी होतीच. तीं पत्रें वाचून पाहिल्यावर बंडाचे बंदोबस्ताचे कामीं कोणाची योजना करावी, हा पेशव्यांस विचार पडला. ही संधि पाहून बाबांनीं भाऊंस खूण केली कीं, आतां बोलावयाची संधि हीच आहे. त्याप्रमाणें भाऊंनीं लगेच उठून नानासाहेबांस विनंती केली कीं, "मला आज्ञा झाली असतां मी जाऊन बंडाचा बंदोबस्त करून येईन. करणार स्वामीचा प्रताप." हें भाऊंचें उमेदीचें व वीरश्रीचें भाषण ऐकून नानासाहेबांस कांहींसें बरें वाटलें. पण भाऊ अद्याप कोठें स्वाऱ्याशिकाऱ्यांत गेलेला नसल्यामुळें अशा आणीबाणीच्या वेळीं त्यास पाठविण्याचा नानासाहेबांस धीर होईना. भाऊंनीं फारच आग्रह धरिल्यामुळें त्यास कर्नाटकांतल्या बंदोबस्तासाठीं जाण्याची परवानगी मिळाली. व ती पडत्या फळाची आज्ञा मानून बाबांच्या सांगण्याप्रमाणें तोच मुमुहूर्त ह्मणून भाऊंनीं श्रीमंतांच्या पायांवर डोकें ठेवून निरोप घेतला. पण ही गोष्ट गोपिकाबाईसाहेबांच्या कानावर गेली नव्हती व तिला कळल्यावर पेशव्यांचे मनांत अनेक तऱ्हांनीं विपर्यास आणून ती भाऊंस माघारा बोलाविल्याशिवाय कदापि राहणार नाहीं, हें रामचंद्रबाबांस पुरतेपणीं माहीत होतें. ह्मणूनच भाऊ जाण्यासाठीं निघाल्यावर एकटें गांठून बाबांनीं सांगितलें कीं, "तुह्मांस जावयाची आज्ञा झाली; परंतु, तुह्मांस पाठीमागें यावें ह्मणून सरकारचा सांडणीस्वार जाईल. यासाठीं येथून कूच करून वीस कोसांचा मुक्काम करावा. तेथेंही माघारीं येण्याची चिठ्ठी तुह्मांस पोंचेल. तरी तुह्मीं माघारीं येऊं नये. त्या चिठ्ठीचें उत्तर पाठवावें कीं, स्वामी राज्यावर आहेत, मी बेरोजगारी! तेव्हां मला पोटाचा उद्योग पाहिला पाहिजे. ह्यासाठीं मला कोल्हापूरचे राजमंडळाचें बोलावणें आलें आहे, तिकडे मी जातों. हें खटलें संभाळण्यास पाठवावयाचा असेल तो पाठवावा." असें सांगून कोल्हापुराहून आलेलीं पत्रें भाऊंच्या हवालीं केलीं. त्या पत्रांत सदाशिवरावभाऊ आपल्याकडे येतील, तर त्यांस "पारगड, कलानिधि व चंदगढी, हे तीन किल्ले आणि वर्षास पांच हजार रुपये उत्पन्न होत, अशी जहागीर दिली" होती. याप्रमाणें धोरणानें पुढें येणाऱ्या संकटाबद्दल आगाऊ तजवीज रामचंद्रबाबांनीं करून भाऊंस निरोप दिला.

शहाण्याची बलाय दूर! महत्त्वाच्या राजकीय कारस्थानास जी बुद्धिमत्ता लागते, ती साधारण कारकुनांत कधींही आढळावयाची नाहीं. एवढेंच केवळ नव्हे, तर तेथें हुशार कारकुनाचीसुद्धां बुद्धिमत्ता पुरी पडत नाहीं. शेवटीं बाबांनीं भविष्य केलें होतें, तेंच खरें झालें. एकांतीं गांठ पडतांच "श्रीमंतांचे बुद्धीस बाईनें भ्रंश केला" व तिच्या आज्ञेप्रमाणें लागलाच एक सांडणीस्वार भाऊंस परत बोलावण्याकरितां पाठविण्यांत आला. तो स्वार भाऊंस भेटल्यावर पूर्वीं ठरल्याप्रमाणें त्यांनीं श्रीमंतांस सांगून पाठविलें. तेव्हां नानासाहेब कांहींसे शुद्धीवर आले! व रामचंद्रबाबांस बरोबर घेऊन भाऊंस परत आणण्यासाठीं ते निघून गेले. व इतःपर "सारा राज्यकारभार आजपासून तुझ्यावर ठेविला. तुझ्या इतलाशिवाय मी चालावयाचा नाहीं." असें शपथपूर्वक भाऊंस सांगून त्यांची समजूत केली व त्यांस पुण्यास आणविलें. याप्रमाणें सदाशिवरावभाऊंस राज्यकारभारांत मुळींच हात घालूं द्यावयाचा नाहीं, असा आग्रह धरून नानासाहेबांनीं आपल्या हितार्थ जो जो यत्न केला, तो तो रामचंद्रबाबांनीं आपल्या शहाणपणानें शेवटास जाऊं दिला नाहीं. मनाप्रमाणें भाऊंस

१. ग्रांट डफची बखर, पृ० १९३ व पेशव्यांची बखर, पृ० ५१ टीप ९ वी.

२. पहा पेशव्यांची बखर, पृ. ४३–५१ वरील माहिती.

महत्पद मिळवून देऊन पेशव्यांचे " राजद्वारचा कारभार आपल्या इतलयाशिवाय होऊं नये येविशीं कारस्थान करून * * रामचंद्रबाबा कारभार करूं लागले." यावरून त्यांचे मुत्सद्दीपणाबद्दलचें वाचकांस अनुमान होईल.

रामचंद्रबाबा जसे चतुर मुत्सद्दी, तसे ते मोठे शूर योद्धे होते. वाडीसरकारचा मुलुख, आंग्र्यांनीं लढून घेतला होता. तो त्यांनीं आंग्र्यांचा पराभव करून वाडकरांस परत दिला. शिवाय उत्तर हिंदुस्थानांत शिंद्यांस पुष्कळ लढायांत आणि पेशव्यांस इंदूर, कलबुर्गे, रायचूर, खेड, सांगोलें, घोडनदी, भालकी, श्रीरंगपट्टण, होळीहुन्नर वगैरे ठिकाणीं झालेल्या लढायांत मोठ्या शौर्यानें लढून विजय संपादून दिला.

रामचंद्रबाबा मोठे दानशूर होते. त्यांचा पुण्यांत सातमजली वाडा होता. त्यांनीं संपत्तिही पुष्कळ मिळविली होती. तिचा त्यांनीं सत्कार्यीं विनियोग करून दानशूरांच्या कोटींत आपलें नांव चिरस्थायी करून ठेविलें. काशी, गया, प्रयाग, पुष्कर इत्यादि पुण्यक्षेत्रीं यात्रेकरू व बैरागी लोकांसाठीं त्यांनीं मोठमोठ्या धर्मशाळा बांधून ठेविल्या आहेत. अवंतिका (उज्जनी) नगरींतील 'द्वादश ज्योतिर्लिंगां'तील प्रसिद्ध महाकाळेश्वराचें देवालय, तेथील क्षिप्रानदीवरील मोठा घाट, व त्यावरील देवालयें, तसेंच त्या पंचक्रोशींतील ११० देवालयें रामचंद्रबाबांनीं बांधिलीं. श्रीगोकर्णमहाबळेश्वरास प्रतिमहाशिवरात्रीच्या पूजेस बाबांची गंगोत्री कावड येत असते व प्रत्यहीं रामेश्वरास गंगोत्रीची कावड व रामेश्वरची काशीस, अशी त्यांनीं व्यवस्था करून ठेविली असून ती अद्याप चालत आहे.

याप्रमाणें आपल्या हयातींत अनेक प्रकारें धर्मकृत्यांत खर्च करून शेवटीं अंतकाळीं शिलक राहिलेल्या संपत्तीचे त्यांनीं तीन भाग केले. त्यांतील एक भाग धर्मादायाकडे काढिला. एक भाग आपल्या पुत्रास दिला व राहिलेला तिसरा भाग त्यांनीं मुलाप्रमाणें मानिलेल्या सदाशिवरावभाऊंस दिला. भाऊंस कांहीं कमी नव्हतें. पण ती बाबांची देणगी त्यांस स्वतांच्या ऐश्वर्यापेक्षां महत्त्वाची वाटली. अशा प्रकारें त्यांनीं आपल्या जिंदगीची सुव्यवस्था केली.

रामचंद्रबाबांस रारदौंडी, कासेगांव वगैरे ठिकाणीं जहागीर होती. त्यांनीं देवालयें बांधून त्यांस इनामें करून दिलेलीं अझून चालत आहेत. त्यांचा पुत्र सदाशिव रामचंद्र, तोही पेशव्यांकडे महत्त्वाच्या कामगारीवर होता. त्यासंबंधाच्या गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत. असो. शिंदेशाहीच्या

---

१. धाकटे रामराजे व शाहूमहाराज यांचें चरित्र पृ. १०.　　२. पहा पत्र नंबर ३०.

३. रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, प्रस्तावना पृ. १२ व त्या संबं० पत्रें पृ. १४ ते ६६ व पंतप्रधानाची शकावली पृ. १३ व धाकटे रामराजे व शाहू यांचें चरित्र पृ. ५१९.

४. पंतप्रधानाची शकावली पृ. २४.

५. ही माहिती तीर्थवासी बैरागी लोकांच्या सांगण्यावरून समजते. शिवाय वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७८ पहा.

६. ग्रांटडफची बखर.

७. या थोर पुरुषानें चतुर मुत्सद्दीपणानें, अत्यंत शौर्यानें, व खऱ्या राजहितदृष्टीनें वर तपशील दिल्याप्रमाणें एवढें समाधानकारक काम बजाविलें असतांही कित्येक अनुदार इतिहासलेखकांनीं त्यानें पेशव्यांच्या घरांत कलह लाविले इत्यादि त्याजवर दोषारोप केलेले आहेत ! यावरून एकंदर विचार करून कोणाहीविषयीं अभिप्राय देणारांची व दुसऱ्याच्या योग्य गुणांचें गौरव करणारांची जगांत केवढी कमताई आहे, याचें चांगलें ज्ञान होतें. रामचंद्रबाबांनीं खरा पक्ष घेऊन चांगली तोड लाविली. अन्यायानें कोणीं दुसऱ्याचें अहित केलेलें, अगर विनाकारण कोणीं द्वेष केलेला त्यांस खपत नव्हता एवढेंच.

उत्कर्षास कारणीभूत झालेल्या या पुरुषाच्या माहितीसंबंधानें लांबत चाललेल्या या लेखाची समाप्ति करून शिंद्यांच्या घराण्याकडे वळूं.

राणोजीनें रामचंद्रबाबांवर राज्यकारभारसंबंधीं सर्व कामकाजें संपविलेलीं असल्यामुळें त्याला पेशव्यांस हरएक लढाईत मदत करण्यास, आपला मुलुख वाढविण्यास, हवी तेवढी सवड सांपडली. तेणेंकरून शिंद्याचा दिवसेंदिवस उत्कर्ष होऊं लागला. रामचंद्रबाबा दक्षिणेंत आले, तरी त्यांनीं राज्यव्यवस्थेची बसविलेली घडी बिघडत नसे. याप्रमाणें आपल्या आंगच्या शौर्यसाहसादि गुणांनीं प्रसिद्धीस येऊन आपले वंशपरंपरेचें जें पाटीलकीचें काम त्यांतून आपल्या वंशजांस मुक्त करून राणोजी इ० स० १७५० त मयत झाला. त्या वेळीं त्याच्या ताब्यांत साऱ्या माळव्यांतील अर्धा अधिक मुलुख होता.

राणोजीला पहिल्या बायकोचे जयाप्पा, दत्ताजी व जोतीबा व दुसऱ्या बायकोचे महादजी आणि तुकोजी असे पांच पुत्र होते. त्याच्या मागून जयाप्पास सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. "नंतर जयाप्पा शिंदे यांस कारभारी रामचंद्रबाबा शेणवई सरकारांतून नेमून दिले.[1]" पुढें हे राणोजीचे पांचही पुत्र आपल्या बापाप्रमाणेंच शूर, उद्योगी, साहसी व हिंमतवान असे निघाले. त्यामुळें शिंदे घराण्याचा लौकिक फार वाढला. सन १७५१ च्या सुमारें राघोबादादानें मोगलांच्या मुलखावर स्वारी केली. त्यांत जयाप्पा, दत्ताजी व महादजी ह्या तिघांही बंधूंनीं आपली अप्रतिम शौर्यश्री गाजविली. दिल्लीच्या बादशहाच्या मुलखास रोहिल्यांचा मनस्वी उपद्रव होऊं लागला. त्यांच्या बंदोबस्तासाठीं त्या दरबारच्या वजीरानें जयाप्पा शिंदे, मल्हारराव होळकर व सुरजमल जाट, यांजकडे मदत मागितल्यावरून ते आपापल्या फौजांनिशीं रोहिल्यांच्या पारिपत्यास गेले. व बादशहाच्या इच्छेप्रमाणें रोहिल्यांची धामधूम मोडून काढिली. त्यावरून अलमगीर बादशहा संतुष्ट होऊन त्याणें त्या त्रिवर्गास रोहिलखंडांत कांहीं मुलुख दिला. याच संधीस शिंदे, होळकर, पवार वगैरे मराठी सरदारांनीं जो एकत्र मुलूख संपादिला, त्याचे वांटणीच्या बाबतींत त्या सरदारांमध्यें तंटा उत्पन्न झाला. तो तोडण्यासाठीं पेशव्यांनीं पूर्वीप्रमाणें रामचंद्रबाबांची त्या कामावर योजना केली. व त्यांनीं सर्व मुलुखाची यथायोग्य वांटणी केली. त्यांत शिंद्यांच्या वहिवाटीस सुमारें पाऊण कोटी वसुलाचा मुलूख आला होता. या बाबतींत होळकरास कांहीं वाईट वाटलें. व त्यावरून त्यांनीं रामचंद्रबाबांबरोबर द्वेष ठेविला. त्यांनीं पुढें जयाप्पाचें मन वळवून रामचंद्रबाबांस काढण्याचा प्रयत्न केला. त्या वेळेपासून जयाप्पांचें रामचंद्रबाबांवर पूर्ववत् प्रेम न रहातां तें कमी कमी होत चाललें. ही गोष्ट लक्षांत येतांच दक्षिणेंत पेशव्यांनीं बोलाविलें होतें, ह्मणून ते पुण्यास आले. पुढें जयाप्पावर मोठा प्रसंग येऊन ते मारले गेले. तो प्रकार असाः—

मारवाडप्रांतीं जोधपूरचा राजा अभयसिंग मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र विजयसिंग व पुतण्या रामसिंग या दोघांत गादीसाठीं कलह लागला. पूर्वीं रामसिंगाचा बाप अजितसिंग ज्या वेळीं मरण पावला, त्याच वेळीं त्याचा पुत्र हा जो रामसिंग, त्यास गादी प्राप्त व्हावयाची. पण त्या वेळीं तो दुर्व्यसनी निघाला. ह्मणून त्याचा चुलता अभयसिंग हा गादी बळकावून बसला होता. तो मरण पावतांच आपलें हक्काचें राज्य आपण परत मिळवावें, अशी रामसिंगास इच्छा उत्पन्न होऊन, त्यानें जयाप्पा शिंदे यांजपाशीं मदत मागितली. त्या वेळीं शिंद्यांकडे रामाजी अनंत दाभोलकर हे कारभारी

---

१. पंतप्रधानांची शकावली, पृ. १०.

होते[1]. तेव्हां दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे वगैरे खाशी मंडळी आणि राघो राम पागे, दत्तोजी पाटील वगैरे आपल्या पदरचे बलिष्ठ सरदार यांजसहित जयाप्पानें मारवाडप्रांतीं चाल केली. हें वर्तमान विजयसिंगास कळतांच त्यानेंही आपली कडेकोट तयारी चालविली. मारवाड, बिकानीर, किसनगड वगैरे संस्थानिक हे विजयसिंगाच्या पक्षाकडील असून ते आपापल्या लष्करासहवर्तमान त्याचे मदतीस येऊन ठपले होते. व त्याजपाशीं त्या वेळीं सुमारें दोन लक्ष फौज जमा झाली होती. शिंद्याकडे सगळी तीस हजार फौज होती. व त्याशिवाय रामसिंगाच्या पदरचे कांहीं रजपूत लढाऊ लोक होते. रजपुतांसारखे खरे हिंमतबहाद्दर लढाऊ शत्रु व त्यांचा सैन्यसमूहही फार मोठा. अशा प्रसंगीं जयाप्पा जर कच्चा धैर्याचा असता, तर शत्रूचा तो अवाढव्य दळभार पाहून रामसिंगाचा पक्ष सोडून समरभूमीवरून तो मागच्या मागेंच पलायन करिता. पण पडला खंबीर छातीचा पुरुष! त्यानें आपल्या सर्व सरदारांस जवळ बोलावून सांगितलें कीं, "गडे हो, आजपर्यंत आह्मां मराठयांच्या मर्दुमकीबद्दल जो दिगंतरीं लौकिक पसरला आहे, त्याची खरी परीक्षा होण्याची वेळ येऊन ठपली आहे. शत्रूकडील सैन्याची संख्या जरी मोठी दिसते, तरी ती सगळी खोगीरभरती असून त्यांत दम धरून लढणारे असे फारच थोडे आहेत. माझी पूर्ण खातरी आहे कीं, आजपर्यंत हरएक प्रसंगीं तुह्मीं सर्वांनीं जी हिंमत दाखविली, तशीच दृढनिश्चयानें या प्रसंगीं दाखवाल, तर विजयश्रीचे अधिकारी तुह्मीच आहां." याप्रमाणें आपल्या सैन्यास प्रोत्साहन देऊन जयाप्पानें पहिल्या सलामीलाच तोफखान्याची सरबत्ती दिली. त्या वेळीं आगीचा एकच डोंबाळा झाला. त्याबरोबर विजयसिंगानेंही तोफांची सरबत्ती करवून मराठयांस अग्नियंत्रांनीं उलट जबाब दिला. अशा प्रकारें तोफखाने सुरू झाल्यामुळें उभय पक्षांकडील शेंकडो लोक मरून पडूं लागले. पुढें ह्या दोहों पक्षांकडील वीरांस जें युद्धस्फुरण चढलें होतें, त्यास ह्या तोफखान्याच्या सरबत्तीमुळें हरकत होऊं लागली. तेव्हां तोफांचें काम जुजबी ठेवून ते एकमेकांत घुसून तरवार चालवूं लागले. त्या वेळीं "तरवारींची खणाखणी झाली" अशा प्रकारें मोठ्या कडाक्याचें युद्ध जुंपलें. उभय दळांतील वीर रणोत्साहानें गर्जत होते. शत्रुपक्षाकडे अपार सैन्य असल्यामुळें मृत्युमुखीं पडलेल्या शिपायांची ते परवा करीत नव्हते. "त्यांत ते आधींच रजपूत, त्यांत मारवाडी, हाडे, त्यांचे मर्दुमीचें नवल नाहीं परंतु मराठ्यांनीं फार शर्थ केली. ऐसें युद्ध गनिमांत कोणीं केलें नाहीं." ही लढाई एकसारखी दोन दिवस चालली होती. त्यांत विजयसिंगाकडील पुष्कळ सैन्याचा फडशा उडाला व राहिलेले लोक पळूं लागले.[3] तेव्हां तो विजयसिंग रातोरात सर्व सैन्य घेऊन नागोरच्या किल्ल्यांत जाऊन बसला. जयाप्पानें लागलीच किल्ल्यासभोंवार आपल्या फौजेचा गराडा देऊन आंत दाणापाणी

१. हे रामाजी अनंत दाभोलकर अकोळनेरचे इनामदार. (राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें.)

२. रजपुतांत स्त्रिया देखील पुरुषांच्या शौर्यासंबंधानें तारतम्य बाळगितात. तें असें कीं, पुरुषांच्या पाठीवर शस्त्रादिकाचा वार पाहिल्यास, ती शत्रूस पाठ दाखविल्याची खूण समजून, त्या त्यांचें मुखावलोकन करण्यास खुषी नसतात. (भाऊ० ब० पृ० १४).

३. या लढाईंत जयाप्पानें जें विलक्षण शौर्य दाखविलें, त्याची कीर्ति त्या प्रांतीं भाट लोक अद्यापि गातात. त्यांतील एक पद्य असें आहे:--"याद घणा दीन आवशी आप्पा वाला हेल ॥ भागातीनो भूपति माल खजाना मेल." आपाच्या वेळची लोकांस पुष्कळ दिवस आठवण राहील. त्या वेळीं तीन भूपति आपलें सामानसुमान व जडजवाहीर टाकून पळून गेले. हे भूपति मारवाड, बिकानीर व किसनगड येथील राजे होत. टॉडसाहेबकृत राजस्थानचा इति. । भा० ब० पृ० १५.

जाण्याची बंदी केली. तरी आंत त्यानें बरेच दिवस टिकाव काढिला. शेवटीं अशानें यश येत नाहीं, अशी त्याची पूर्णपणें खातरी झाली. तेव्हां त्यानें मल्हारराव होळकराकडे मदत मागितली. परंतु त्यांनीं सांगितलें, "शिंदे व आह्मी एकाच धन्याचे सरदार, ह्मणून तुह्मास मदत देतां येत नाहीं. तुमचा इलाज नसल्यास तुह्मीं मोगलाई मसलत चालवावी !" असा वकीलांकडे निरोप येतांच विजयसिंग त्याच तजविजीस लागला. एके दिवशीं प्रातःकाळीं जयाप्पा मुखमार्जनादि विधि उरकून स्नानासाठीं चौरंगावर उभे असतां अकस्मात् तिघे मारेकरी शस्त्रें दडवून वेष पालटून घोड्यापुढील दाणे वेंचून खाण्याच्या बहाण्यानें तेथें नजीक आले. इकडे "खिसमतगार हांडा बासन सांभाळावयास गुंतले. आबदागिऱ्या मात्र डोईवर छाया भरून उभा होता. जयाजी शिंदे यांस अदत अशी होती कीं स्नानानंतर मुखावर धोतर घेऊन क्षणभर डोळे चोळीत रहावें ***तों मारेकरी यांनीं उठोन एका एकीच चोहींकडून कुशीस सुऱ्यांचा मार केला. कामकारगर (लागू) होतांच जयाजी शिंदे चौरंगावरून जमिनीवर आले." याप्रमाणें या प्रतापी पुरुषाचा अंतकाळ समीप आला. [1]जय-प्राप्तीसाठीं त्या बाणेदार रजपुतांस सुद्धां अशा नीच कृत्याचा अवलंब करावा लागला. ही केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे ! बिकट प्रसंगावांचून मनुष्याच्या मनाची खरी पारख होत नाहीं ! वेळ हाच मनुष्यास योग्य शिक्षण मिळण्याचा धडा आहे. असो. एवढी धडपड करून आणि भयंकर पाप जोडून विजयसिंगास जयप्राप्ति झाली काय ? ती कसची होते ! शिंद्याच्या घराण्याचा बाणेदार-पणा अशा प्रसंगींही चांगला कसास लागला. जेव्हां जयाजी शिंदे घायाळ होऊन निचेष्टित पडले. तेव्हां दत्ताजी शिंदे, त्यांची ती आसन्नमरणावस्था पाहून धाय मोकलून रडूं लागले. इकडे बिजे-सिंग मोठ्या हर्षानें फौज घेऊन युद्धास आला. तेव्हां जयाजींनीं भावास ह्मटलें "वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस ! हें क्षात्रधर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं, तुह्मीं शत्रुपराभव करावा." रणधीर वीर दत्ताजी शिंदे यांतील इंगित व प्रसंग जाणून शत्रूवर तुटून पडले. शत्रूंची आशा व्यर्थ गेली. शूरवर जयाप्पा, दत्ताजीस पाठविल्यावर लवकरच वारले. परंतु शिंद्याची ही कीर्ति दिगंतरीं गाजली. जयाप्पा वारले तरी दत्ताजी, महादजी, जन-कोजी, हीं वीररत्नें जिवंत असतां विजयश्री बिजेसिंगासारख्या घातकी मनुष्यास वरील हें अगदीं असंभवनीय ! त्यांना लागलीच दुप्पट वीरश्री चढून त्यांनीं प्रतिज्ञाच केली कीं, रजपुतांचा पुरा सूड उगवूं, त्या वेळींच येथून हालूं.

याप्रमाणें ठराव होऊन मराठे निश्चयानें सगळ्या फौजेनिशीं एक जागीं मेख गाडून राहिले. नागोरावर पूर्ववत् गोळागोळी होतच होती. असे पूर्ण अठरा महिने झाले. तेव्हां बिजेसिंगाची साफ निराशा होऊन, त्यानें सलूयाचें बोलणें लाविलें. शेवटीं उभय पक्षीं तह ठरला. त्यांत एक कोटी रुपये खंडणी व अजमीर, मेडतें व बिकानीर अशीं ठाणीं बिजेसिंगापासून मराठ्यांस मिळालीं. ह्यांपैकीं निम्मे रामसिंगास दिलीं, व निम्मे ठाण्यांचा बंदोबस्त केला. ज्या रामसिंगास मदत देण्याचें कबूल केलें, त्यास--प्राणांत संकटासही न जुमानतां--मनोदयानुरूप अर्थसिद्धि करून देऊन मराठे कृतकार्य होऊन परतले आणि आपल्या राजधानींत--उज्जनींत--येऊन राहिले. जयाप्पाच्या मागून गादीचे मालक रीतीप्रमाणें जनकोजी शिंदे झाले.

[2]त्या संधीस लष्करच्या पगाराची पुष्कळ दिवसांची बाकी थकल्यामुळें त्या लोकांचा पैसा मिळण्या-

१. भाऊ सा० ब० पान १७. २. भाऊसाहेबांची बखर पृ० १८.

बद्दल शिंद्यामागें एकसारखा तगादा लागला होता. त्या लोकांस घरीं जातांना एक वर्षाचा तरी पगार दिला पाहिजे होता. परंतु खजिन्यांत पैशाची अगदीं टंचाई असल्यामुळें शिपायांच्या देण्याची तोड पाडतां येईना. परंतु ह्या वेळीं अचानक एक काम उत्पन्न झालें, त्यामुळें ती चिंता दूर झाली.

बुंदीचा राजा मरण पावला. त्या वेळीं त्याच्या चुलत्याचा पुत्र होता. तो मयत राजाच्या अल्पवयी मुलास गादीवर बसण्यास अडथळा करूं लागला. तेव्हां त्या मुलाच्या आईनें मदतीसाठीं शिंद्याकडे वकील पाठविले. आणि कळविलें कीं " तुह्मी येथवर येऊन मुलास तक्तीं बसवून टिळा लावावा. तुह्मांस पाऊण कोटी रुपये देतों." ही तिची विनंती मान्य करून दत्ताजी, जनकोजी व महादजी फौज घेऊन त्याच्या पारिपत्यास निघाले. आणि लढाई करून त्या दायादाचें पारिपत्य केलें आणि राजपुत्रास गादीवर बसविलें. तेव्हां बुंदीच्या राणीनें देऊं केलेले पाऊण कोट रुपये दिलेच व त्याशिवाय " बहुमान, हत्ती, घोडे, अमोल्य वस्त्रें, शिरपेंच, मोत्यांचे तुरे, पदकें, आणि मुक्ताफळांच्या माळा येणेंप्रमाणें दिलें. तें घेऊन उज्जनीस येऊन पोंचले." याप्रमाणें ऐवज हातीं आल्यावर लष्कराचा पगार देऊन शिंद्यांनीं आपल्या मस्तकावरील काळजीचें थोडेंसें ओझें हलकें केलें. आणि दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे देशीं चांभारगोंद्यास आले.[1]

पुढें सन १७५९ मध्यें राघोबादादानें उत्तर हिंदुस्थानावर स्वारी केली. त्या मोहिमेंत दत्ताजी शिंदे, महादजी शिंदे व जनकोजी शिंदे आणि मल्हारराव होळकर वगैरे सरदार प्रमुख होते. माळवा, बुंदेलखंड वगैरे मुलखांची खंडणी घेत घेत ही प्रचंड फौज लाहोरापर्यंत जाऊन पोहोंचली. याच मोहिमेंत राघोबादादानें दक्षिणच्या घोड्यांस अटक नदीचें पाणी पाजिलें. मराठ्यांचा बलिष्ठ शत्रु अहमदशहा अबदाली ह्यानें नुकताच तो मुलूख काबीज केला होता. त्याच्या लोकांस तेथून हांकून लावून तेथें मराठ्यांचा अंमल बसविला, व त्या प्रांताच्या बंदोबस्ताकरितां दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे व साबाजी शिंदे आणि राघो राम पागे वगैरे शूर पुरुषांस सैन्यासहवर्तमान ठेऊन राघोबादादा पुण्यास यावयास निघाले. ही पराजयाची वार्ता अबदालीस कळतांच तो खवळलेल्या चित्त्यासारखा कुतुबखान, नजीबखान, इत्यादि पराक्रमी सरदारांसहवर्तमान लाहोरांत दाखल झाला. इकडे दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, राघो राम पागे, भोइटे इत्यादि मोठ मोठे खंदे वीर, भरपूर रणसामग्रीनें सज्ज होऊन अबदालीच्या सैन्याच्या तोंडावर गेले. उभयपक्षांची बरीच खडाजंगी उडाली. बंदुकांचे ताशेऱ्यांवर ताशेरे झडूं लागले. तोफा, सुतरनाला, जेजाला, जंबुरे वगैरे अग्नियंत्रांचा अखंड वर्षाव सुरू झाला. क्षणांत दहा, वीस, पन्नास, शंभर असे दोहों पक्षांकडील लढवय्ये लोक पटापट मरून पडूं लागले ! शेवटीं प्रतिपक्षाचा सैन्यसमुदाय फारच मोठा असून ते लोक काटक असल्यामुळें मराठ्यांच्या फौजेनें माघार घेतली. तरी दत्ताजी शिंदे यांनीं पुष्कळ वेळपर्यंत टिकाव धरून शत्रूंकडील शेंकडो वीरांस कापून काढिलें. पण ही लढाई ह्मणजे पुढील वर्षी जो मराठ्यांचा भयंकर संहार व्हावयाचा होता, त्याच्या प्रस्तावनेदाखल होती. मराठ्यांची सद्दी फिरण्याची ही वेळ असल्यामुळें त्यांना यशःप्राप्ति झाली नाहीं. ठिकठिकाणीं शिंदे व इतर मराठे सरदार यांनीं शौर्यानें युद्ध केलें, परंतु यवनांचा जोर अतिशयित वाढतच गेला. मराठ्यांचे सर्व पराक्रम व्यर्थ जाऊन त्यांचे पुष्कळ लोक मृत्युमुखीं पडूं लागले. साबाजी शिंदे जे पूर्वी लाहोरच्या बंदोबस्तास ठेविले होते, त्यांचे पुत्र बयाजी शिंदे, तसेच मालोजी शिंदे, हे समर-

१. भाऊसाहेबांची बखर पृ० २१. शिंदे यांस चांभारगोंदेकर ह्मणत, होळकर० कैफी० पृ० १७.

भूमीवर क्षात्रधर्मोचित शौर्य गाजवून ठार झाले. त्वेषानें शत्रूंशीं जी जी लढाई करावी, तींत शौर्याचा उपयोग न होतां अपेश येऊं लागलें. तात्पर्य या प्रसंगीं अबदालीची सद्दी जबरदस्त होती. आणि तो प्रसंग जाणून युक्तीनें मागें सरावें असें दत्ताजी वगैरे समशेरबहादरांचें शील नव्हतें. त्यामुळें क्षणोक्षणीं विशेष अपकर्षाचा प्रसंग येत गेला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं तान्हाजी खराडा वगैरे पुष्कळ लोकांनीं दत्ताजीस विनंती केलीः—" अबरू जावयाचा प्रसंग आला, निशाण काढतां उत्तम आहे. " तेव्हां त्या बाणेदार वीरानें भविष्यार्थ जाणून उत्तर केलें. "हा खंदारचा पातशहा अबदूल-अली चालून आला आहे. या रानांत ईश्वरें मृत्यु आणिला तरी उत्तम आहे. * * * आह्मां क्षत्रियांचे स्वधर्म हेच कीं, रणांत विन्मुख न होतां मृत्यु आल्यास सर्वही साधनें साधिलीं. तेंही कर्म ईश्वरें दाटून ओढून आणिलें. अशांत कोणी अभागी आहे तो विन्मुख होईल, रण सोडून निघाल्यास दोहींसहि मुकावें. इकडे नरकसाधन, इकडे अपेश मरणाहून ओखटें. यांत मरतांच उत्तम." असें ह्मणून गाडून उभे राहिले, तों निशाणापाशीं जनकोजी शिंदे लढत होते. त्यांचे उजवे दंडास गोळी लागून हाड बाहेर आलें. हें पाहतांच दत्ताजी शिंद्यांसहित अठरा असामींनीं दहा हजार फौजेनिशीं कुतुबशहा समोर उभे होते त्यांजवर घोडे घातले. शौर्याची शर्थ केली. त्यांत अकरा खासे ठार झाले. पुढें दत्ताजी शिंदे जोरानें लढत होते. तों दुर्दैवाचा तडाका कठीण ! अकस्मात् एक गोळी येऊन दत्ताजी शिंद्यांच्या बगलेस बरगडींत लागली. तोंच पाटील आपल्या लाल-मणी घोड्यावरून खालीं आले. हा अनर्थप्रकार पाहतांच, राघो राम पागे व राजाराम चोपदार नजीक होते, त्यांनीं इत्यर्थ केला कीं. "बहुत दिवस यांचें अन्न भक्षिलें, आणि पाहिजे तितके विलास यांच्या जिवावर केले, आतां यांस टाकून जावें याहून मरण बरें." असें ह्मणून राघो रामांनीं त्या चोपदारास कुतुबशहाकडे पाठविलें. आणि शिंदे घायाळ पडल्याचें वर्तमान सांगून त्यांस येथून काढून नेण्यास हरकत न व्हावी अशी विनंती करण्याची युक्ति सांगितली. परंतु त्या अनिष्ट प्रसंगीं कोणती युक्ति उपयोगीं पडणार ! कुतुबशहानें निरोप ऐकतांच लागलाच तो तेथें आला. आणि दत्ताजी शिंदे उताणे पडले होते, त्यांस ह्मणाला, " पटेल ! हमारे साथ तुम और लढोगे ? " दत्ताजीनें त्याचा मतलब जाणून बाणेदारपणानें उत्तर दिलें:—" निशा अकताला बचेंगे तो और बी लढेंगे. " वहावारे वीरशिरोमणे ! " मरणं प्रकृतिः शरीरिणां. " कधीं तरी मरण हें आहेच. परंतु त्यास भिऊन शत्रूस जीवदान मागण्याचें नामर्दपणाचें काम तूं केलें नाहींस ! खरें शौर्य व खरा बाणा तो हा ! परंतु आपल्या धन्यास हा दुष्ट कुतुबशहा आतां ठार करितो असें जाणून त्या स्वामिसेवा-तत्पर राघोबा पाग्यानें त्यास विनंती केली कीं, " साहेब इस्को बचावो. क्रोड रुपये पाहिजे तरी देऊं." पण तें न ऐकतां कुतुबशहानें कमरेचा सुरा ओढून लाथेनें ढकलून पालथा घालून दत्ताजी शिंद्याचा शिरच्छेद केला. तेणेंकरून मराठ्यांच्या फौजेंत हाहाकार झाला. ही गोष्ट सन १७६० सालीं दिल्लीनजीक रडबारे येथें घडली.

याप्रमाणें नरवीरश्रेष्ठ दत्ताजींचा शेवट झाला. जयाप्पा मागेंच मृत्यु पावल्याचें लिहिलें आहे. राणोजीच्या पहिल्या बायकोचा तिसरा मुलगा जोतिबा तो पूर्वीच दीगनजीक कुंभेरीच्या वेढ्यांत प्राणास मुकला होता. आतां दुसऱ्या बायकोचे महादजी व तुकोजी आणि जयाप्पाचे चिरंजीव जनकोजी एवढे प्रसिद्ध पुरुष शिंद्यांच्या घराण्यापैकीं अवशिष्ट राहिले. दत्ताजीचें शिर कुतुब

१. भाऊसाहेबांची बखर पृ० ६७।६८.

शहानें भाल्यास टोंचून नेऊन आपल्या महत्पराक्रमाची ती निशाणी ह्मणून तें अहमदशहा दुराणीस अर्पण केलें ! तें पाहतांच दुराणीच्या आनंदसमुद्रास भरतें आलें ! पुढें दत्ताजीच्या देहाचें विधिपूर्वक दहन करावें, ह्मणून दुराणीकडे सुजाउद्दौल्याच्या मार्फत मोठी भीड घातली. सुजानें शहास विनंती केली कीं, " माझा बाप मनसूरअली पूर्वी गनीमाचे पेंचांत आला. ते समयीं मनसूरअलीनें आपली दाढी राणोजी शिंदे यांचे हातीं दिली कीं, इची शरम राखावी. असें बोलल्यावर राणोजी शिंदे यांनीं अबरू रक्षून गंगापार करून दिले. त्या ताराईत आह्मी राज्य खाऊन सुखरूप आहों. त्या राणोजी शिंदे यांचे पुत्र दत्ताजी शिंदे. वरकड अवघी बेइमानी आह्मांकडून घडली. परंतु एवढी तरी उत्तीर्णता व्हावें (वी)." याप्रमाणें सुजानें थोडेंसें कृतज्ञताबुद्धीस जागून दत्ताजीचें शिर मराठ्यांच्या हवालीं केलें. मग त्यांचें धड शोधून आणून " माहित्य उत्तम प्रकारें करून चंदनकाष्ठें, बेलकाष्ठें व तुळसीकाष्ठें [घालून] यथाविधि यमुनातीरीं दहन केलें."

मग मराठ्यांचें अवसान खचून ते पळत सुटले. जनकोजी बावा घायाळ ! त्यांस सांभाळून ते पळत होते. गिलच्यांनीं त्यांचा अठरा कोसपर्यंत पाठलाग केला. आणि ते माघारे परतले. पुढें जनकोजींस लोकांनीं मोठ्या तजविजीनें गोटांत आणिलें. त्यांस दत्ताजींची कांहीं एक हवाल ठाऊक नव्हती. जनकोजी आल्याचें समजतांच दत्ताजीची स्त्री भागीरथीबाई आणि जनकोजीची स्त्री काशीबाई ह्या लगबगीनें तेथें आल्या. जनकोजीस घायाळ पाहून त्या घाबरल्या. जनकोजींनीं भागीरथीबाईस विचारिलें, काका कोठें आहेत ? तें ऐकतांच तिला त्यांतच आपल्या दैवदुर्विलासाचा सर्व अर्थ कळून आला. ती खचीत समजली कीं, पाटील रणांत पडले. मग त्या दुःखास काय पारावार आहे ? जनकोजी घायाळपणामुळें अगदीं ग्लान झाले होते, त्यांत हा हृदय दुखंड करणारा प्रसंग ! ते शोकविव्हल होऊन दीन स्वरानें रडूं लागले. तें पाहून भागीरथीबाईनें आपलें सर्व दुःख मनांतल्या मनांत गिळून जनकोजी शिंद्यांस निषेधपूर्वक ह्मटलें, " बाबा ? तूं रंडेसारखा रडतोस ! जयाजी शिंदे यांचे पोटीं चौघी लेकी जाहल्या. तेसीच तूं एक आणखी जाली असतीस तरी आणिक एक जांवाई येता. पाटील काय घेऊन गेले ? दुनिया, दौलत, महाल, मुलूक, खजिना, हत्ती, घोडे सर्व तुह्मांपाशीं ठेवून गेले. तुह्मी हिंमत धरून त्यांचें सार्थक करावें, आतां रडून होणें काय ? " असें हिंमत देऊन बोलतांच जनकोजी शिंदे उगेच राहिले. अहाहा, काय त्या वीरपत्नीचें मानसिक धैर्य ! समयज्ञता, चतुरता, सहनशीलता, राजकारणकुशलता, या थोर कुलांतील पुरुषांस शोभणाऱ्या अत्युत्कृष्ट गुणांचा त्या स्त्रीचे ठिकाणीं किती छानदार मिलाफ झाला होता ! अशा प्रकारची योग्यता पुरुषांत आढळणेंही दुर्मिळ. मग ती स्त्रियांमध्यें आढळल्यास तिची महती किती वर्णन करावी ! अनिष्ट वेळ नाचवील त्याप्रमाणें नाचणारेच बहुतेक सारे आढळतात. परंतु, त्याला खातरींत न आणतां आणि धन, मान, प्रीति, आदर, सुख इत्यादि मोहक वस्तूंच्या वियोगानें विव्हल न होतां, त्यास चकित करून आपल्या मागून नाचविणारीं भागीरथीबाईसारखीं माणसें दुनियेंत किती विरळ ! काशीबाई देखील अशीच धीराची व चतुर बायको होती. चोहींकडून शत्रूची भीति. घोडीं, जनावरें व मनुष्यें खराब झालेलीं. अशा स्थितींत पळत असतां धीर सुटून भयभीत झालेल्या पुरुषांस त्या योग्य मसलती देत. त्यांत भागीरथीबाई नऊ महिन्यांची गरोदर. तशा

स्थितींत घोड्यावरून धूम ठोकण्याचें काम केवढ्या कष्टाचें! परंतु त्यांनीं त्या अनिष्ट वेळास दाद दिली नाहीं.[1]

शिंद्यांच्या घराण्याची आह्मांस द्यावयाची होती तेवढी हकीकत पुरी झाली. तरी आणखी एका स्त्रीनें दुराणीशीं ह्यापुढें झालेल्या युद्धांतच जें मानसिक धैर्य दाखविलें, त्याची हकीकत वाचकांस कळविल्याशिवाय हा भाग पुरा करवत नाहीं. शिंद्यांकडील हें वर्तमान मल्हारराव होळकर जयपुराकडे होते, त्यांस माहीत नव्हतें. तें समजतांच ते ससैन्य ताबडतोब निघाले. दिल्लीपासून कच्चे ऐशीं कोसांवर, कोटपुतळीस, शिंद्यांचा मुक्काम असतां, नजीक दोन कोसांवर होळकरांनीं मुक्काम केला. तेथें सविस्तर वर्तमान समजलें कीं, "दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद झाला. जनकोजी शिंदे जखमी व बायका व लुटलेलें लष्कर" असें येथून नजीक आहे. हें ऐकतांच मल्हारराव शोकाकुल झाले. त्या वेळीं त्यांची स्त्री गौतमाबाई हिनें निषेध केला कीं, "सुभेदार, तुमचें वृद्धपण जालें. शिंदे यांचीं मुलें ह्मणजे काय? त्यांचे तोंडचें जार वाळलें नाहीं. त्यांनीं एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. एरवीं हा मृत्युलोकच आहे. जाला प्राणी वांचत नाहीं. परंतु इहलोकीं कीर्त करून परलोकसाधन करणें, हेंच दुर्लभ. हें मूल जनकोजी शिंदे, यानें एवढा पराक्रम केला! तुमचे दिवस समीप आले. तरि हिंमत धरून मारतां मारतां मरावें. हा प्रलाप स्त्रीजातीनें करावा; असें पुरुषास बोलिलें नाहीं. प्रस्तुत जवळ जखमी व मुलें बाळें आहेत, तर ऐसेंच जाऊन भेटून त्यांचें समाधान करावें." या प्रोत्साहनानें सुभेदारांनीं आपला शोक आटपून ते शिंद्यांच्या लष्करांत गेले. आणि सर्वांचें सांत्वन केलें आणि दोन्ही सैन्यें एके जागीं झालीं. इतक्यांत दुराणीची फौज यांजवर चालून येत असल्याची बातमी आली. त्या वेळीं मल्हाररावांनीं जनकोजीस बुद्धिवाद सांगितला, तुह्मी जखमी आहां. दुराणीची दौड भारी. यासाठीं सड्या फौजेंत तुमचे रामाजीपंत व आमचे गंगाधरपंत ठेवून आह्मी चमेलीपार होऊं. परंतु त्या जनकोजी रावास हा नेभळा विचार मानवला नाहीं. त्यांनीं सांगितलें कीं, तुह्मी चला. माझा नेमच आहे कीं, पाटील मृत्यु पावले, तेथें आपला देह टाकावा. जनकोजींचा निश्चय फिरेना. हें पाहून, मल्हारराव चिंताक्रांत झाले. कारण दुराणीपुढें आपला निभाव लागणार नाहीं, हें त्यांना ठाऊक होतें. आपले यजमान चिंताक्रांत पाहून गौतमाबाईनें जोरदार भाषेनें त्यांचे कान उघडले. ती ह्मणाली, "सुभेदार, तुमची साठी बुद्धि नाठी, तैसा विचार जाला आहे. अपकीर्ति मिळवून किती पन्नाशा जगणें आहे? बहुत गेले गुजरले, थोडके राहिले आहेत. जनकोजी शिंदे मूल होत्साता त्याची एवढी हिंमत! आणि तुह्मी हा विचार काय ह्मणोन ध्यानांत आणिला?" हीं त्या काळच्या वीरपत्न्यांचीं भाषणें कोणा स्वदेशाभिमानी पुरुषाच्या अंतःकरणास चटका लावून सोडणार नाहींत?

असो. वर लिहिल्याप्रमाणें महादजी, तुकोजी व जनकोजी असे तिघे पुरुष शिंद्यांच्या घराण्यांत शिलक राहिले. ह्या घराण्याचा लौकिक सर्वश्रुत आहेच. व "व्हावें शस्त्रेंचि रणीं वीरांचें गलित न वपु रोगानें" हें क्षात्रधर्माचें आदितत्त्व ह्याच घराण्यानें परिपूर्ण पाळिलें. पुढें जगत्प्रसिद्ध

१. ह्या पळांत भागीरथीबाईस इतरांबरोबर जाण्याचें झेंपेना, तेव्हां ती जनकोजीस ह्मणते, "बाबा मजला आतां घोडियावर बसून पळावयाची निभावणी पडत नाहीं. तुह्मीं झाडून पुढें चालावें. माझे समागमें जिव्हाळियाचा मनुष्य असेल तो द्यावा. गिलचा दृष्टीस पडे तोपावेतों मजला रक्षावें. निदान निभावणी दिसेनाशी झाली ह्मणजे दोन तुकडे करावे."

पाणीपतच्या समरभूमीवर सर्व मराठे वीरांनीं आपल्या पराक्रमाची, धैर्याची व दृढनिश्चयाची जी शर्थ करून दाखविली, व जींत ह्या तिघांही वीरांनीं आणि मुख्यत्वें जनकोजी बावांनीं शत्रूंकडून सुद्धां शाबास ह्मणवून घेतलें, त्या घोरतर संग्रामाशीं आमच्या चरित्रनायकांचा संबंध असल्यामुळें पुढील भागांत ती हकीकत देण्याच्या तजविजीस लागतों.

भाग ५ वा.

पाणीपत येथील घनघोर संग्राम.

इ० सन १७६०।६१ तील.

पाणीपतची रणभूमि ही पुरातन कालापासून भयंकर लढायांविषयीं फार प्रसिद्ध आहे. पांच हजारांहूनही जास्त वर्षें होतील तेव्हां कौरवपांडवांचें जें महायुद्ध झालें, तें एथेंच. त्या वेळीं ही रणभूमि कुरुक्षेत्र[1] या नांवानें प्रसिद्ध होती. कौरवांच्या अकरा आणि पांडवांच्या सात, अशा अठरा अक्षौहिणी[2] ह्मणजे सुमारें ४० लक्ष सैन्याचा या महायुद्धांत राज्याच्या दायभागाकरितां संहार झाला. ह्या प्रसिद्ध भारती युद्धानंतर ह्याच रणभूमीवर इ० स० ११९१ त महंमद घोरी आणि पृथ्वीराज ह्यांचें तुमुल युद्ध होऊन घोरीचा पराभव झाला. पुढें १५२६ त मोगल बादशहा बाबर आणि दिल्लीचा बादशहा इब्राहिम लोदी, ह्यांची मोठी लढाई होऊन बाबरास जयप्राप्ति झाली. पुढें इ० स० १५५६ त हुमायून व अकबर, या दोघांनीं दिल्लीपति झालेल्या शिरशहाच्या घराण्यांतील शेवटच्या शिकंदर नामक बादशहाशीं लढाई करून त्याचा पराभव केला. अशा रीतीनें संग्रामाविषयीं आधींच प्रसिद्ध असलेल्या पाणीपतच्या समरभूमीवर, अफगाणचा बादशहा अहमदशहा अबदाली आणि पेशव्यांतर्फे श्रीमंत भाऊसाहेब (सदाशिव चिमणाजी पेशवे) व विश्वासराव साहेब यांची तारीख १४ जानुआरी सन १७६१ रोजीं घनचक्कर लढाई होऊन तींत विजयश्रीनें अबदालीस माळ घातली. आणि मराठ्यांचा ' न भूतो न भविष्यति ' अशा प्रकारचा नाश झाला. ह्या लढाईंत आमचे चरित्रनायक कर्नाटकावरील कामगारीवरून बर्व्यांचें[3] पथक घेऊन गेले होते. मराठ्यांच्या सैन्याचे अधिपति जे भाऊसाहेब पेशवे, त्यांनीं आपल्या खास ताब्यांत हुजुरात फौज ठेविली असून तीं फौज घेऊन या महायुद्धांत त्यांनीं जे अलौकिक पराक्रम केले, त्यांतच बाकी पथकांबरोबर बर्व्यांच्या पथकाचे अधिकारी जिवबादादा यांनीं आपल्या सैन्यसामुग्रीच्या मानानें पराक्रम

१. भारतामध्यें ह्या युद्धाचें वर्णन देतांना श्रीमद्भगवद्गीतेच्या आरंभीं धृतराष्ट्रानें संजयास प्रश्न केला आहे, तेथें ह्या स्थलाचा उल्लेख आहे. " धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः । मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥"

२. अक्षौहिणी या संख्येनें किती सैन्य समजावें हें अमरकोश, श्रीमद्भागवत व महाभारत, या तीन ग्रंथांत निर्दिष्ट केलें आहे:—एकेभैकरथा त्र्यश्वा पत्तिः पंचपदातिका. (एक हत्ती, एक रथ, तीन घोडे आणि पांच पदाति (पायीं जाणारे) मिळून जो सैन्यसमूह त्यास पत्ति असें ह्मणतात). पुढें 'पत्त्यंगैस्त्रिगुणैस्सर्वैः क्रमादाख्या यथोत्तरं' या हिशोबानें सेनामुख, गुल्म, गण, वाहिनी, पृतना, चमू, अनीकिनी, दशानीकिनी, अक्षौहिणी, हीं क्रमानें तिपटीनें वाढत जातात. मिळून अक्षौहिणीचा हिशोब असा होतो:—तींत रथ २१८७०, गज २१८७० (यांत २ पार्ष्णिग्राह, १ अंकुशग्राह व १ योध, असे असतात), पदाति १०९३५०, व अश्व ६५६१० मिळून एकंदर मुख्य योद्धे २१८७०० होतात. शिवाय त्यांचे परिचारक वेगळे.

३. वि० ज्ञा० वि० पुस्तक १९, पृ० ७९ व या पु० पृ० ४१ वरील टीप पहा.

केले आहेत. परंतु त्याबद्दलची सविस्तर माहिती कोठें उपलब्ध नाहीं.[1] या लढाईंत जिवबादादांनीं कोणते पराक्रम केले त्याबद्दल सविस्तर माहिती देण्यास आमचे जवळ आज आधार नाहीं. चरित्रनायकाच्या या लढाईंतील संबंधाशिवाय बाकी सविस्तर हकीकत देणें जरूर दिसत नाहीं. या महायुद्धांतील हकीकती इतरत्र अनेक उपलब्ध आहेतच. जिवबादादा कर्नाटकांतून या लढाईसाठीं निघून आले, त्यामुळें मराठ्यांचे हितसंबंधास कांहीं धोका आला, तो असा.

कर्नाटकप्रांतांतून पटवर्धन, जिवबादादा वगैरे पेशव्यांचे सरदार ह्या लढाईसाठीं निघून आल्यामुळें म्हैसूरप्रांतीं हैदरास बाहेरील कोणी शत्रु उरला नाहीं. ह्मणून तो फार प्रबल झाला. आणि त्यानें राजाची सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचा यत्न चालविला. राज्यांत तो ह्मणेल ती पूर्वदिशा होऊं लागली. तेथील हिंदु राजा चिक्क कृष्णराय, आणि त्याचा कारभारी नंदराज, ह्यांचा अधिकार हैदरानें संकुचित करितां करितां शेवटीं तो नामशेष केला. आणि मराठे पाणिपताकडे गुंतले ही त्याच्या वैभववृद्धीस विशेष साधक गोष्ट झाली. एकंदरींत पुढील सन १७६१ साल मराठ्यांस अत्यंत अवनतीचें गेलें. त्या सालीं त्यांचा मोठा नाश होऊन त्या धक्क्यामुळें त्यांचे चोहोंकडील शत्रु फार बळावले.

पाणीपतच्या लढाईचा शेवटचा घनघोर संग्राम होण्यापूर्वीं पुष्कळ दिवसपर्यंत उभयपक्षांच्या अनेक लढाया व झटापटी होऊन एकमेकांनीं एकमेकांचें शौर्य जोखलें. त्यांत उभयपक्षीं पुष्कळ प्राणनाश होऊन शेवटीं विजयश्री कोणास माळ घालिते, हें कोणासही निश्चित कळेना. दोन्ही पक्ष प्रबल, शूर, साहसी व संकटास न गडबडणारे होते. पण पुढें दुर्दैवानें मराठी लष्करास दाणागोट्याची भयंकर तूट पडूं लागली. त्यांच्या आगापिछाडीच्या बाजूंस गिलचे व इतर मुसलमान सरदार यांचा मनस्वी त्रास होऊं लागल्यामुळें त्यांना निर्वाहाची सामुग्री बाहेरून आणतां येईनाशी झाली. या निरुपायामुळें शेवटीं ता. १४ जानेवारी सन १७६१ रोजीं मराठ्यांनीं आपल्या लष्कराभोंवतीं केलेल्या खंदकाबाहेर ते पडून लढाईस सज्ज झाले. तेव्हां उभय दळें समरांगणीं एकवटून मोठा संग्राम सुरू झाला. त्यांतही सकाळपासून अडीच प्रहर दिवस येई तोंपर्यंत मराठ्यांचीच सरशी होती. " पेशव्यांचे फौजेनें त्यांस मागें फिरविलें. इतक्यांत विश्वासरावसाहेब हत्तीच्या अंबारींत बसले होते. तेथें जंबूरचा गोळा लागून मरण पावले. तेव्हां मालक पडले ह्मणून सर्व फौज भिऊन पळं

१. पाणीपतच्या लढाईच्या वर्णनाची बखर श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांच्या आज्ञेवरून देवराव बालक नामनाथ नांवाच्या कोणी मनुष्यानें लिहिली असून, ती केरकरांच्या घरीं होती. तींत जिवबादादांनीं त्या लढाईंत केलेले पराक्रम वर्णिलेले होते, असें समजतें. त्या बखरीचा पहिला अर्धा बंद हलीं केरकरांच्या दप्तरांत आढळला. त्याची नकल पुढें पत्रव्यवहारांत नं० २ येथें दिली आहे. बाकी बंदांचा पुष्कळ शोध केला, परंतु इतर पुष्कळ महत्वाच्या पत्रांबरोबर कालोदधींत ते बंद गडप झाले ते झालेच. ह्या बखरीचा इतरत्र शोध चालविला आहे, मिळाल्यास प्रसिद्ध करूं.

२. हा हैदर मोठा धूर्त, कारस्थानी व चतुर होता. याच गुणांमुळें हा म्हैसूरचा राजा झाला होता. याला मनुष्याची पारख ही उत्तम होती, परंतु याची दूरदृष्टि टिपूमध्यें नव्हती असें पुढील हकीकतीवरून दिसेल. " आपाजी राम वागळे नाडकर्णी (अंकोलेकर) हा कर्नाटकांत हैदर अलीचा कारभारी होता. तो असेपर्यंत हैदराचें राज्य उत्कर्ष पावलें. परंतु हैदराचा मुलगा टिपु सुलतान यानें त्याला दूर करून आपला मामा कारभारी केला. त्या नव्या कारभाऱ्यानें फितूर करून लौकरच राज्य घालविलें." सरस्वतीमंडल पृ. ३८ व पत्रें व यादी.

लागली. तेव्हां गिलच्यांनीं मागें वळून मोठी गर्दी करून लढाई केली. त्या गर्दीत भाऊसाहेब पेशवे व जनकोजी शिंदे मरण पावले. बहुतेक लोक मेले व पळून गेले.'

एकंदरींत या पळांतून वांचून आलेले लोक थोडे होते, असें "शेणवी वीर व मुत्सद्दी" या बखरीवरून दिसतें. तींत महादजी शिंदे व जिवबादादा, यांसंबंधानें असें लिहिलें आहे. "गणोजी शिंदे यांचे वंशांत महादजीराव शिंदे यांचे पायास तबल लागला. आणि जखमी (होऊन) वांचून आले. त्या वेळीं त्या लढाईतून जिवबादादा एक घोड्यानिशीं संग्रामांतून पार पडून आले[२]." या दोन पुरुषांशिवाय मल्हारराव होळकर, नारो शंकर, बाळोबातात्या पागनीस, नाना पुरंदरे, बाळाजी जनार्दन भानु, जे पुढें नाना फडणवीस या नांवानें प्रसिद्धीस आले, ते व दुसरीं कित्येक मनुष्यें दक्षिणेंत जीव बचावून आलीं. अजमासें सर्व सैन्याचा एक चतुर्थांश परत आला असावा. या लोकांस मार्गांत अनेक संकटें सोसावीं लागलीं. पण सुरजमल जाट या थोर मनाच्या पुरुषानें मागें झालेला आपला अपमान विसरून ह्या दीन अनाथ झालेल्या लोकांस फारच चांगली मदत केली. त्यानें एक लक्ष रुपये व वस्त्रें मल्हारराव होळकर, नाना पुरंदरे व पार्वतीबाई (भाऊसाहेब यांच्या पत्नी), यांजकडे पाठवून दिलीं; शिवाय पळांतील प्रत्येक मनुष्यास पांच रुपये व वस्त्रें, असें देऊन आपली सदयता व्यक्त केली. ह्याबद्दल त्याची स्तुति करावी तितकी थोडी!

सुजाउद्दौल्यानें भाऊसाहेबांस कांहीं साहाय्य केलें नाहीं. तरी शेवटीं प्रसिद्ध पुरुषांचे जे मुर्दे सांपडले होते, त्यांस हिंदुधर्माप्रमाणें मृठमाती व विधियुक्त संस्कार होण्याचे कामीं स्वतः द्रव्य खर्चून चांगली मदत केली. हेंही विसरण्यासारखें नाहीं. पहिल्यानें विश्वासराव साहेब, तुकोजी शिंदे, संताजी वाघ व यशवंतराव पवार, असे चार मुर्दे तीन लक्ष रुपये देऊन गिलच्यांकडून सोडवून आणून, त्यांचें विधियुक्त दहन करवून, त्यांच्या अस्थि वाराणशीस रवाना केल्या; व नंतरही ज्यांनीं ज्यांनीं मागणें केलें, त्यांचे मुर्दे तसेच सोडवून आणवून, त्यांची चांगल्या रीतीनें व्यवस्था करविली.

१. वि० वि० पु० ११ यांतील बखर पहा.

२. वि० वि० पु० ११ पहा.

३. भाऊसाहेब यांनीं पार्वतीबाई वगैरे बायकांच्या संरक्षणाचे कामावर विसाजी कृष्ण यांस नेमून त्यांजबरोबर पांचशें धनगरांचा मजबूत पाहराही नेमून दिला होता. आणि आपण पराभव पावून पडलों, तर त्यांस दक्षिणेंत सुरक्षित पोंचवाव्या, किंवा तसें न साधल्यास त्यांस ठार मारून निघून जावें, अशी आज्ञा केली होती. पण पुढें "मोड झाला, लोक पळूं लागले. ते समयीं विसाजी कृष्ण व लोक यांनीं धास्त खाऊन बाईची आस्था सोडून आपले जीव वांचविले. कोणीकडे गेले त्याचें ठिकाण नाहीं! भाऊसाहेबीं सांगितलें होतें त्याप्रमाणें कांहींच घडलें नाहीं." विसाजी कृष्णाकडून जरी पार्वतीबाई वगैरे स्त्रियांचें रक्षण झालें नाहीं, तरी त्या होळकराच्या स्वारींतून पुण्यास सुखरूपपणें पोंचल्या. भाऊसा० बखर पहा.

४. जनकोजी शिंदे यांजकडे आरवली गांवचे बळवंतराव मांगजी दळवी ह्मणून जे एक गृहस्थ होते, त्यांचा एक पुरुष लढाईंत पडला होता. सर्वत्र सामसूम झाल्यावर त्यास ते त्या रणांत शोधून दमले. एवढ्या लक्षावधि प्रेतराशींत त्याचा पत्ता कोठें लागतो आहे! मग इंग्रजांतर्फे सुजाउद्दौल्याकडे आरवली गांवचाच सोहिरो आपाजी रेगे ह्मणून एक वकील होता त्याजकडून नबाबाकडे संधान लावून कार्य साधलें. मग पुनः "सुजाउद्दौल्यानें गिलच्यांस तीन लक्ष रुपये खंडणी देऊन धर्मार्थ बंद सोडवून दिले. रणांतही सुजाउद्दौल्यानें शोध करून मातबर मातबर ओळख ज्यांची निघाली, त्यांस उत्तम गति केली." या गोष्टीस सदहू दळवी यांचे श्रम कारणीभूत होते.

इकडे दक्षिणेंत पुण्यामध्यें नानासाहेब पेशव्यास पाणिपतचें वर्तमान पुष्कळ दिवस समजलें नव्हतें. दुराणीचा पेंच भारी असून भाऊसाहेब इरेस गुंतले आहेत, असें वर्तमान त्यांस समजलें होतें. ह्मणून ते बरोबर जानोजी भोंसल्याची फौज व खासगी फौज, शिवाय बाबूजी नाईक बारामतीकर, गोपाळराव बर्वे, सदाशिव रामचंद्र सुखठणकर (रामचंद्रबाबांचा पुत्र), यमाजी शिवदेव व विठ्ठल विश्राम वर्दे¹ सबनीस वगैरे सरदारांसुद्धां पन्नास हजार फौज व खजीना घेऊन गेले. ते नर्मदेच्या अलीकडे पोंचल्यावर तेथें एक सावकाराचा जासूद पत्र घेऊन जात होता, तें पत्र नानासाहेबांच्या हातीं लागलें. त्यांत पाणिपतच्या लढाईच्या परिणामाविषयीं सांकेतिक भाषेनें लिहिलें होतें कीं "दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहोरा सांडल्या, आणि रुपये व खुर्दा किती हरवला याचा पत्ताच नाहीं." हें पत्र वाचून नानासाहेबांस लढाईच्या परिणामाविषयीं बहुतेक अनुमान झालें आणि ते अंतःकरणांत अगदीं खचून गेले. तरी त्यांनीं खेरें वर्तमान समजेपर्यंत आपलें मानसिक दुःख गिळून कुच तसेंच पुढें चालविलें. ते नर्मदातीरीं पोहोंचल्यावर त्यांस नाना फडणवीस, नाना पुरंदरे, पार्वतीबाई वगैरे भाऊसाहेबांकडील माणसें भेटलीं. आणि त्यांनीं पाणिपतचें सर्वस्वनाशाचें भयंकर वर्तमान त्यांस सांगितलें. तें ऐकतांच त्यांच्या शोकास पारावार राहिला नाहीं. त्या शोकातिशयानें ते केवळ भ्रमिष्टच होऊन गेले. मग तेथून माघारीं पुण्यास येण्यासाठीं निघाले. नानासाहेबांचें चित्त थाऱ्यावर यावें ह्मणून भोंवतालच्या मंडळीनें हवे ते प्रयत्न केले. तरी त्यांस कशानेंच आराम वाटेना. त्या भयंकर नाशानें त्यांचें अंतःकरण शोकव्याप्त होऊन त्यांनीं अन्नपाणीही सोडिलें. ते पुण्यास आल्यावर राजवाड्यांत न राहतां पर्वतीच्या देवालयांत जाऊन राहिले. तें त्यांनींच बांधविलें होतें. तेथेंच ते शेवटपर्यंत होते. भाऊसाहेबांची मूर्ति त्यांच्या डोळ्यांपुढून जाईना. पुढें 'भाऊ' 'भाऊ' करीत सहा महिन्यांचे आंत त्याच देवालयांत ते मरण पावले.

या पाणिपतच्या लढाईनें मराठ्यांचें जें भयंकर नुकसान झालें, त्याचें वर्णनही करवत नाहीं. या लढाईमुळें मोठमोठीं कर्तीं माणसें गेलीं. हें नुकसान सर्वांत मोठें होतें. शिवाय मराठ्यांची उत्तरेकडील सत्ता हटून गेली, व मुसलमान, जाट वगैरे शत्रूंस कांहीं वर्षें उत्तर हिंदुस्थानांत "निर्वीरमुर्वीतलम्' झालें. ह्या स्थितीपासून जरी ते पुढें बरेच सांवरले, तरी एकंदरींत मराठ्यांच्या ऱ्हासाच्या

१. विठ्ठल विश्राम सबनीस हे नानासाहेबांबरोबर ह्या स्वारींत होते (भा.ब.पृ.१३०). विठ्ठल विश्राम सबनीस हे सावंतवाडी सरकारचे मुख्य प्रधान जिवाजी विश्राम सबनीस यांचे सख्खे बंधु होत. हे पेशवाईत मोठे शूर व मुत्सद्दी होऊन गेले. नानासाहेब व थोरले माधवराव पेशवे, यांची यांजवर फार मर्जी असे. पेशवे सरकाराकडील पुष्कळ पत्रव्यवहार सावंतवाडींत त्यांच्या घरीं आहे. हे पेशव्यांचे सेनापति असून यांजकडे जी फौज होती, तिचे खर्चास यांस १८ लक्षांची जहागीर होती. यांनीं वाडीसरकारचें राज्य नारो त्रिंबकाकडून सोडवून दिलें. नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दींत कारभाऱ्यांचें व यांचें जमेना (ऐति. ले. सं. अं. २९, सन १८९९, पृ. १११४). तेव्हां यांजकडील जहागीर *काढून पटवर्धनांस दिली. पटवर्धनांस ही जहागीर सन १७७४ त दिली (पहा मोडककृत कोल्हापूर व क. प्रां. इति. उत्त. पृ. ५८). हे वाडींत आल्यावर हेऱ्यांचे राजे यांनीं आपल्या जुन्या कारभाऱ्यांस तुर्कवाडी गांव इनाम करून देवविला तो त्यांजकडे हल्लीं चालत आहे. शिरवडें, ता० वेंगुर्लें, जि० रत्नागिरी, या गांवीं विठ्ठल विश्राम वर्दे सबनीस या नांवानें मिठागर त्यांजकडे चालत आहे. या थोर मुत्सद्याबद्दल पुष्कळ ऐतिहासिक माहिती आहे. पण ती देण्याचें हें स्थळ नव्हे.

* पहा भारतवर्ष पु. २, अं. ४, पृ. ३२. (यांनीं बेळगांव शहापूर वगैरे ठिकाणचे किल्ले लढाई करून मिळविले होते.)

पायाची कोणशिला अहमदशहा अबदालीनें बसविली हें खचीत! ह्या प्रसंगीं संपूर्ण महाराष्ट्र देश दुःखानें व्यापून गेला होता.

इकडे जनकोजीरावांच्या मागें राणोजीच्या और्स संततीचा नष्टांश झाला. तेव्हां आतां शिंद्याच्या सरदारीचीं वस्त्रें कोणास द्यावीं, याविषयीं पेशव्यांच्या दरबारांत वाटाघाट सुरू झाली. त्या वेळीं मराठी राज्याची स्थिति फारच शोचनीय झाली होती[१]. नानासाहेब पेशवे त्या वेळीं जरी जिवंत होते, तरी ते शोकसागरांत बुडून गेल्यामुळें राज्यकारभार रघुनाथराव ऊर्फ दादासाहेब पाहत असत. परंतु त्या वेळचा कारभार शिस्तवार न चालण्यास बरींच कारणें झालीं होतीं. जो तो पितृशोक, भ्रातृशोक, पुत्रशोक, मित्रशोक इत्यादि धक्क्यांनीं खचून गेलेला होता. त्यामुळें योग्य सल्ला देण्यास जसें मुत्सद्दीमंडळ जवळ असावें, तसें नव्हतें. प्रसिद्ध आनंदीबाईच्या मनांतून नानासाहेबांची इहलोकची यात्रा–जी लवकरच संपण्याचा संभव होता, ती–संपली म्हणजे पेशवेपदाधिकार आपल्या नवऱ्यास मिळावा, असें होतें. दादासाहेबांचें महादजीशीं नीट नव्हतें, व नारो शंकरावर त्यांची प्रीति होती. इत्यादि कारणांनीं पाणिपतच्या स्वारींतून जीव बचावून आलेल्या महादजी शिंद्यांस शिंद्यांच्या गादीची रिकामी झालेली मालकी न देतां, ती नारो शंकर राजेबहादर यांस द्यावी असें त्यांनीं ठरविलें.

नारो शंकरांनीं पेशव्यांची उत्तर हिंदुस्थानांतील मुलखाच्या बंदोबस्ताची व वसुलाची कामगिरी बजावून त्यांची प्रीति संपादिली होती, व भाऊसाहेबांनीं दिल्ली सर केल्यावर त्यांस कांहीं फौजेनिशीं दिल्लीच्या रक्षणार्थ ठेविलें होतें. शेवटीं पानीपत येथें मराठ्यांचा मोड होऊन पळापळ सुरू झाल्यावर होळकरांचे दिवाण गंगोबा तात्या हे पळून तेथें आले. त्यांजकडून 'पुढील प्रसंग कठीण' असें समजतांच ते दक्षिणेंत आले होते. राणोजीचा मुलगा पाणिपतच्या संग्रामांत प्रत्यक्ष हजर असून त्या लढाईची निशाणी आंगावर घेऊन "विच्छिन्न गात्र शूर शोभे ब्रह्मस्व तें उदारास" ह्या तत्त्वाचा प्रभाव दाखवून आपल्या बापाची, क्रमानें पुतण्यास प्राप्त झालेली, गादी आर्जवानें मागण्यास पेशव्यांकडे हजर झाला असतां, दादासाहेबांनीं सारासार विचार न करितां नारो शंकरास शिंद्याची जहागीर देण्याचा बेत केला! सरकारसेवेप्रीत्यर्थ कुळाचें कूळ खर्ची घातलेल्या घराण्यास हें दादासाहेबांचें योग्य बक्षीस खरें! नानासाहेबांनीं राज्यकारभारांतून मन अगदीं काढून घेतलें, ते शोकनिमग्न होऊन राहिले, आणि एवढीं राज्यसूत्रें राज्यव्यवहारशून्य राजरपारख्याच्या हातीं पडलीं! मग महादजी आपणांस गादी मिळविण्याकरितां चोहोंकडे संधानें बांधीत फिरूं लागले. अशा संधीस पेशव्यांच्या पदरच्या दोघां शूर व मुत्सद्दी पुरुषांनीं महादजीचा पक्ष मोठ्या अभिमानानें उचलून तदर्थ खटपट चालविली, व सुदैवेंकरून ती फलप्रदही झाली. हे दोघे शूर पुरुष राघो राम पागे व जिवबादादा होत. यांनीं नानासाहेब पेशव्यांची गांठ घेऊन या थोर जहागिरीसंबंधानें अन्याय

---

१. पंडित काशीराय यांनीं आपल्या पारशी बखरींत भाऊसाहेब पेशवे ह्यांचें वर्णन केलें आहे, तें असें:—"सदाशिवरावभाऊ लहानपणापासून राज्यव्यवस्थेची हरएक शाखा (मुलकी व लष्करी बंदोबस्त) व राज्याची वहिवाट रामचंद्रबाबा शेणवी यांचे हाताखालीं शिकला होता. दिवस उगवल्यापासून मध्यरात्रपर्यंत तो सरकारी काम करीत असे. तारतम्य, अनुभव व सामर्थ्य, ह्या गुणांनीं त्यानें लोकांस आपलेंसें करून घेतलें होतें. त्याचें सामर्थ्य व अक्कल यांजवर लोकांचा भरवंसा होता. दक्षिणेंतील महत्त्वाचीं कित्येक कामें याच्याच हातून शेवटास गेलीं होतीं." * * * "या पानपतच्या मोहिमेपूर्वी भाऊंच्या अंगीं सदोदित चांगली समजूत व पदोपदीं दक्षता दिसत होती." रा. रा. ना. वि. बापटकृत पानपतची मोहीम पृ. ५२६.

होत होता, तो नाहींसा केला. श्रीमंत नानासाहेब स्वतः कामकाज पाहत नसत. पण दोघां मुत्सद्यांनीं त्यांच्या लक्षांत या संबंधानें कसा अन्याय होत आहे, शिंद्याचें घराणें सरकारकामावर कसें खर्च झालें, आणि अवशिष्ट राहिलेले राणोजीचे पुत्र महादजी, हे त्या अधिकारास सर्वपरी पात्र व योग्य वारस कसे आहेत, हें पूर्णपणें बिंबवून दिलें. तेव्हां महादजींचें काम फत्ते झालें. "शेणवी वीर व मुत्सद्दी" या बखरींत या संबंधानें पुढील मजकूर आढळतोः— "नारो शंकर यांजला सुभ्यास नेमावें अशी योजना जाहली. नंतर राघो राम पागे श्रीमंतांचे पदरचे शूर आणि लौकिकवान यांणीं हा प्रकार ऐकून दरबारास येत होते. मार्गांत जिवबादादांची व यांची भेट जाहली. नंतर राघो राम पागे यांणीं सांगितलें "शिंदे यांचे सुभ्यावर त्यांचें काम करण्याजोगा

१. पाटीलबावा राणोजीचे अनौरस किंवा दासीपुत्र होते, असा जो लोकप्रवाद आहे तो चुकीचा आहे. हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल. "बाजीराव बल्लाळ ह्मणजे थोरले बाजीराव यांचा पराक्रमी सरदार राणोजी शिंदा हा उत्तर हिंदुस्थानांत स्वारीस गेला असतां, दतिया संस्थानच्या रजपूत राजाशीं त्याची मोठी लढाई झाली. तींत मराठ्यांनीं रजपुतांचा मोड केला. तेव्हां रजपूत पुढें पळत आहेत व त्यांच्या पाठीस विजयी मराठे लागले आहेत, असें त्या राजाच्या कन्येनें आपल्या महालांतून पाहिलें. आणि आपल्या दासीस सांगितलें कीं, रजपुतांच्या पाठीवर तरवारींचे घाव मारणारे कोण आहेत व त्यांचा पराक्रमी सरदार कोण आहे, ह्याचा शोध करून ये. दासीनें शोध करून येऊन सांगितलें कीं, ज्यांनी रजपुतांस जिंकिलें ते मराठे लोक आहेत. व त्यांच्या सरदाराचें नांव राणोजी असें आहे. तें ऐकून ती राजकन्या बोलली, शत्रूस पाठ दाखविणाऱ्या ह्या रजपुतांपैकीं कोणास तरी वरण्याचा प्रसंग मला येणार, त्या पक्षीं ह्या पराक्रमी मराठ्या राणोजीसच वरावें हें बरें. मग ती राजकन्या कोणास न समजतां आपल्या त्या विश्वासू दासीसहवर्तमान राणोजीकडे निघून आली. तिला त्यानें आपल्याजवळ ठेविलें. ह्मणजे क्षत्रियास योग्य अशा गांधर्वविधीनें तिचें पाणिग्रहण *केलें. हिच्याच पोटीं महादजी व तुकोजी, हे वीर जन्मले. राणोजी व ती राजकन्या ह्यांचा विवाह वाजतगाजत झाला नाहीं ह्मणून मराठे लोक महादजी शिंद्यास दासीपुत्र समजतात. मराठे लोक आपणास क्षत्रिय ह्मणवीत असून ते गांधर्वविवाहास विवाह समजत नाहींत हें त्यांचें मोठेंच अज्ञान आहे, असें ह्मटलें पाहिजे. तात्पर्य मराठ्यांचें बीज व रजपूतांचें क्षेत्र यांपासून पाटीलबावा हा नामांकित महाराष्ट्र वृक्ष उत्पन्न झाला." मराठी शालापत्रक पु. २, अं. ४, पृ. १२५।१२६.

२. हे राघो राम मुळचे आरंवडें ह्मणून सावंतवाडी संस्थानांत गांव आहे, त्या ठिकाणचे राहणारे होते. यांचें मुळचें उपनांव राजाध्यक्ष. यांचे वडील प्रसिद्ध रांगणे किल्ल्याचे किल्लेदार होते. ह्मणून त्यांचे वंशजांस रांगणेकर असेंही ह्मणतात. पुढें राघो राम, बागणीकर मंत्र्यांचे आश्रयास गेले. हे मोठे हुषार असल्यामुळें यांचें † सातारच्या दरबारीं वळण पडलें. तेथें यांची योग्यता पाहून पेशव्यांनीं ह्यांस आपलेकडे मागून घेतलें. आणि आपल्या पागेचे मुख्य अधिकारी केलें. हे फार शूर असून घोड्यावर बसण्यांत फार पटाईत होते. हल्लींपर्यंत 'राघो रामकी जय' असा उच्चार करून घोड्यावर बसण्याची शिपाई व शूर लोकांत चाल होती! रामचंद्रबाबांच्या मागण्यावरून यांची नेमणूक शिंद्यांचे दरबारीं पेशव्यांनीं केली होती. शिंद्यांकडे असतां जयापाच्या वेळीं नागोरच्या वेढ्यांत आणि दत्ताजी शिंद्याच्या वेळीं कुंजपुऱ्याचे वगैरे लढायांत मोठें शौर्य गाजवून हे उदयास आले. शिंद्यांस यांच्या शौर्याचा व मुत्सद्दगिरीचा चांगला उपयोग झाला. यांनीं आपल्या आंगरख्याचा छातीवरील बंद कधींच बांधला नाहीं. हे नेहमीं हत्यारबंद व सावध असत. हे तरवार हातीं लागलीच मिळावी ह्मणून जेवतेवेळीं सुद्धां ती जवळ बाळगीत असत. अशा प्रकारचे हे शूर व आपल्या धन्याच्या कल्याणासाठीं सदा तत्पर होते.

* ग्रांट डफचेंही ह्मणणें महादजीची आई रजपूत जातीची होती, असें आहे. वरील हकीकतीवरून महादजी दासीपुत्र नव्हते, हें ह्मणणें पुढें सुसूत्र जुळतें.

† भाऊसाहेबांची बखर पहा.

कोणी राहिला नाहीं, जाणून दुसरा नेमण्याची योजना श्रीमंत करीत आहेत. शिंद्याची सरदारी मुळीं रामचंद्रबाबानें उभी करून अठराही कारखान्यांवर शेणवई गृहस्थ ठेवून शेणवी लोकांची रयाशत असें सर्वत्रीं लौकिकांत आहे, आणि आतां असा प्रकार होणार याची तजवीज कशी करतां ?" त्यावरून जिवबादादा बोलले कीं, "याविशीं आतांच श्रीमंतांशीं बोलून याची बनेल त्या प्रकारें तजवीज करून शिंद्याची गादी कायम करूं". असें यांचें बोलणें होऊन श्रीमंत नानासाहेबांपाशीं विनंती केली, 'आज शिंद्याच्या सरदारीचीं वस्त्रें महादजी शिंदे, राणोजी शिंदे याचा पुत्र, यास द्यावीं.' त्यावरून पेशवेसाहेब ह्मणूं लागले, 'त्याजकडून एवढें काम कसें होईल ? त्यांणीं हे प्रकार अद्यापि पाहिले नसून हा एवढा मोठा प्रकार कसा निभेल ? त्यापेक्षां तुह्मी जिमा घेतां तर तुह्मांस सुभा सांगतों.' त्यावरून जिवबादादा व राघो राम बोलले जे, 'वस्त्रें हिंदुस्थानसुभ्याचीं महादजी शिंदे यांचे नांवें द्यावीं. बाकी सर्व बंदोबस्त आह्मी करूं. सरकारांनीं याविषयीं काळजी करूं नये. येविसीं जिमा आमचा. ही शिंद्याची रयाशत आमची शेणवई लोकांची. निमित्त शिंदे *** नांव चालवावें, एतदर्थ आह्मी हा जिमा घेत आहोंत.' त्यावरून महादजी शिंदे यांस वस्त्रें देववून उभयतां, बराबर फौजा घेऊन हिंदुस्थानांत आले." या प्रकारें महादजींसच शिंद्याच्या गादीचीं वस्त्रें मिळून, ते तिचे अधिकारी झाले. ही गोष्ट सन १७६१ सालच्या मध्याच्या सुमारें घडली.

महादजींनीं आपणास शिंदेशाहीची गादी मिळावी ह्मणून भगीरथ प्रयत्न केले होते. पण ते सफल झाले नाहींत. ह्या संधीस त्यांची स्थिति अगदीं निकृष्ट होती. ते अधिकारप्राप्तीच्या प्रयत्नांसाठीं प्रायः एकटे फिरत असत.

यानंतर महादजी शिंद्यांनीं आपल्या राज्यांत दाखल होऊन दिवसेंदिवस त्याची सुधारणा व वृद्धि कसकशी केली आणि उत्तरेकडे पेशव्यांची किंबहुना सर्व मराठ्यांची सत्ता बहुतेक नष्ट होऊन गेली असतां, व रजपूत, जाट, मोगल, रोहिले, शीक हे स्वतंत्र होऊन त्यांनीं आपल्या मानेवरील मराठ्यांचें जूं झुगारून दिलें असतां, त्यांनीं व जिवबादादांनीं त्यांवर आपली 'कारवाई बहाल' करवून अटकेपर्यंत आपल्या दिग्विजयी निशाणाचे झेंडे कसे लाविले, ह्याचें साद्यंत वृत्त भागशः क्रमाक्रमानें पुढें देण्यांत येईल. यासाठीं चरित्राच्या या मुख्य भागांकडे वाचकांनीं आतां लक्ष द्यावें.

---

१. वंगदेशांत ह्मणजे बंगालदेशांत तेथील राजानें यज्ञार्थ कनोजहून मुख्य पांच ब्राह्मण नेले. ते तिकडे गेल्यावर त्यांत उत्तर व दक्षिण अशा दोन श्रेणि ह्मणजे भाग झाले. पैकीं उत्तरभागास बारेंद्रसेनी व दक्षिणभागास राढियासेनी, असें ह्मणतात. 'श्रेणि' यापासून सेनी हा शब्द झाला आहे. नंतर त्यांतही वतनसंबंधानें एक रुपयांत सहा आणे, व दहा आणे असे भाग झाले. त्या भागांस छाआनी व दशानी, अशीं नांवें चालत आहेत. गौड ब्राह्मणांपैकीं सारस्वत छेणी वंगप्रांतांतून दक्षिणेंत आले. त्यांस दक्षिणेंत शेणी हेंच नांव चालूं लागलें. त्या अर्थानें या सर्वांस इकडे शेणवी हें नांव झालें आहे. सदरहू नांवें उत्तरेस हल्लीं चालत असल्याची माहिती वे० शा० सं० कल्याणशास्त्री श्रुतिशिरोभूषण यांनीं त्या ठिकाणीं प्रत्यक्ष जाऊन मिळविलेली, आह्मांस सांगितली. ती येथें दिली आहे. हा तिकडे चालत असलेला प्रकार प्रत्यक्ष प्रसिद्ध आधार आहे, व तिकडील लोकांस हें सर्व माहित आहे.

२. विविधज्ञानविस्तार पु. ११, पृ. ८०.

३. म्यालेसनसाहेबांच्या हिंदुस्थानच्या इतिहासाचें गोडबोलेकृत भाषांतर, पृ. १५२, व महादजींचें नातूकृत चरित्र, पृ. ८८. यांत मनसूर शहावली नांवाचा एक अवलिया फकीर होता, त्याचीही महादजींनीं राज्यप्राप्त्यर्थ सेवा केली होती, असें लिहिलें आहे.

भाग ६ वा.

महादजींची गादीवर स्थापना व त्यांच्या राज्याचा विस्तार.

इ. स. १७६१ पासून स० १७७३ पर्यंत.

नानासाहेब पेशव्यांनीं महादजी शिंद्यांस त्यांच्या गादीचे अधिकारी केलें. तरी रघुनाथरावाच्या मनांतून तो अधिकार त्यांना पचूं न देतां, आपल्या मताचा कोणी हस्तक तेथें ठेवावा, असें फार होतें. लौकरच ह्मणजे ता० २३ जून, सन १७६१, रोजीं नानासाहेब मृत्यु पावले. आणि त्यांचे द्वितीय चिरंजीव माधवरावसाहेब, हे पेशवेपदाधिकारी झाले. पण सर्व कारभार रघुनाथरावच पाहत असत. त्यांचें मन जरी महादजींविषयीं शुद्ध नव्हतें, तरी महादजींनीं त्याबद्दल विशेष फिकीर केली नाहीं. कारण मुळीं आपल्यास गादी देणारे नानासाहेब व तरुण पेशवे माधवरावसाहेब, या उभयतांचीं मनें आपल्याविषयीं शुद्ध असल्याचें त्यांना पक्कें माहीत होतें. नंतर महादजींनीं पुढें राज्यांत कशा बंदोबस्तानें जावें, ह्याविषयीं जिवबादादांचें मत घेतलें. तेव्हां राज्याच्या बंदोबस्तास आवश्यक अशी फौज आपल्यापाशीं असल्याशिवाय व्यवस्था सुरळीत चालावयाची नाहीं. यासाठीं अगोदर शूर लोकांची भरती करून फौज सिद्ध करावी, असा त्यांचा विचार ठरला. शिंद्याच्या फौजेपैकीं कांहीं फौज जयाप्पा व दत्ताजी यांनीं शत्रूंबरोबर चालविलेल्या लढायांत खपली होती व पुढें पानपतच्या संग्रामांत पुष्कळ फौज खपली. बाकीची फौज चोहोंकडे अस्ताव्यस्त स्थितींत होती. त्यामुळें बरोबर फौज घेऊन गेल्याशिवाय आपला तेथें बस बसणार नाहीं, असा जो त्यांनीं विचार ठरविला होता, तो बरोबर होता. कारण ह्यांना तेथें व्यक्तिभूत नवा अंमल बसवावयाचा होता; तशीच रघुनाथराव दादासाहेब व त्यांच्या पक्षाच्या नारो शंकर वगैरे मंडळीवर ह्यांना छाप बसवावयाची होती. व खुद्द शिंद्याच्या राज्यांतील लहान थोर मंडळीचीं मनें आपल्या कर्तबगारीनेंच आकर्षित करावयाचीं होतीं. तेव्हां चांगल्या बंदोबस्तानें जाण्यावांचून ह्या वेळीं गत्यंतर नव्हतें, असें ह्मटल्यास चालेल. ह्मणून त्यांनीं पुण्यास असतांनाच फौज चाकरीस ठेवण्याची तजवीज चालविली.

शिंद्याच्या घराण्यांतील सर्व पुरुष मरून गादीस वारस एकटे महादजीच राहिले आहेत आणि पेशव्यांनीं त्यांना ह्या गादीचे अधिकारी केलें, ही गोष्ट शिंदेशाहींत सर्वत्र महशूर झालेलीच होती. शिंदेशाहीचे अभिमानी रामचंद्रबाबा यांनीं कोंकणांतून कित्येक निवडक लोक हिंदुस्थानांत[१] निरनिराळ्या कामगारीवर नेऊन नेमिले होते. ते व जिवबादादांनीं कोंकणांतून जे लोक नेले, त्यांपैकीं भिवराव मोदी, बाळोबातात्या पागनीस, येसाजी वासुदेव रेगे आरवलीकर, शिवबा नाना (जिवबादादांचे धाकटे बंधु), अंताजी रघुनाथ कवठणकर, यशवंतराव शिवाजी वागळे, व्यंकाजी रामचंद्र रेगे इत्यादि पुरुष पुढें फार प्रसिद्धि पावले. ह्या शूर व राजकारणी लोकांस सरदाऱ्या व निरनिराळ्या अधिकाराचीं कामें देऊन निरनिराळ्या प्रांतांतून शूर शिपाई निवडून जमविण्याची ताकीद दिली. ह्या कामीं जिवबादादा व राघो राम पागे, ह्यांनीं सक्त तजवीज चालविली. कोंकण प्रांताचा संबंध मूळपासून शिंदेशाहीस होताच. त्यामुळें जिवबादादा व राघो राम पागे, यांनीं वर लिहिलेले लोक

१. रामचंद्र नारायण पन्हाळकर वगैरे सारस्वत सरदारमंडळी पूर्वीपासून शिंदेशाहींत होती. पहा पन्हाळकरांची कैफीयत नं० ८२४. तसेंच त्यांचे बंधु विठ्ठल नारायण हेही त्या वेळेपासून तेथें होते.

शिंदेशाहींत नेले. त्याशिवाय महादजींची केदारजी शिंदे, खळोजी शिंदे, आनंदराव शिंदे, रामजी पाटील जाधव वगैरे जी मंडळी होती, तीही यांतच सामील झाली. नंतर फौजेची भरती होतांच महादजीसहित जिवबादादा व राघो राम पागे उज्जनीस जाण्यासाठीं निघाले. त्यांत फक्त स्वारच सोळा हजार होते, शिवाय पायदळही बरेंच होतें. ही फौज शिंदेशाहीची जुनी राजधानी उज्जनी एथें जाऊन पोहोंचली. तेथें गेल्यावर राज्यांत सर्व अव्यवस्थाच होती. ह्मणून प्रारंभीं शक्य व जरूर तेवढा बंदोबस्त करून महादजी शिंद्यांनीं प्रसिद्ध रीतीनें सर्व सरदार लोकांस जमवून राज्याधिकार हातीं घेतला. त्या वेळेपासून पाटीलबावांचा जो एकदा बस बसला, तो शेवटपर्यंत कमी तर झाला नाहींच, पण अधिकाधिक वृद्धिंगत होत गेला. महादजींचा भाग्यरवि जो त्या वेळीं उदयाचलावर आला, तो पुढें उत्तरोत्तर आपल्या उज्ज्वल प्रभेनें राज्यांतील सर्व लोकांस अत्यंत आनंदप्रद होऊन वैभवप्रकाश वाढवीतच गेला.

शिंद्याचे राज्याचा अंमल उज्जनीच्या पुढें साठ कोशपर्यंत चालत होता. पण पानपतच्या लढाईपासून 'अंमल होते ते गर्दीमुळें गैरशिस्त जाहले' होते. ते पुनः कबजांत घेण्यासाठीं जिवबादादा व राघो राम पागे यांनीं महादजीस उज्जनीसच ठेवून आपण उभयतां फौजेसहित जाऊन जो अंमल 'गैरशिस्त' झाला होता, तो पूर्ववत् स्थापित करून बंदोबस्त केला, आणि माघारे उज्जनीस आले. अशा प्रकारें शिंद्याच्या मूळ राज्यांत चोहोंकडे चांगली व्यवस्था होऊन पाटीलबावांचा अंमल स्थिरस्थावर झाल्यामुळें जिवबादादा आदिकरून मंडळीच्या आश्रयासाठीं कोकणांतून लक्ष्मण अनंत लाड ऊर्फ लखबादादा वगैरे मंडळी शिंदेशाहींत जाऊं लागली. त्यामुळें राज्यांत उपयोगी व शाहाण्या माणसांचा भरपूर भरणा होऊन पुढें जी कायमची व्यवस्था करावयाची होती, त्या कामीं उत्कृष्ट मदत झाली. त्या राज्यव्यवस्थेचा प्रकार असाः—

१. गांवचे कामगार पाटील, पटवारी, कानगोचौधरी, सरमंडळलोई, व रईस (जमेदार) ह्या किताबांचे असत. त्यांची अधिकारानुरूप निवड व त्यांच्या कामाची व्यवस्था लावून तीं तीं कामें त्यांजकडे कायम केलीं.

२. परगण्यावर (तालुक्यावर) तहशीलदार, कमाविसदार किंवा मामलतदार ह्या नांवाचे अधिकारी त्या त्या परगण्याच्या बंदोबस्तावर होते. त्यांचीही निवड करून योग्य इसम नेमून दिले. त्यांनीं बंदोबस्त ठेवून आबाद राखावी असें केलें.

३. त्याचप्रमाणें प्रांत (जिल्हे) ह्या भागांवर सुभे, व त्यांवर मुख्य सरसुभे नेमिले व त्यांनीं दरबारांत दिवाणाकडे हिशेब गुदरावे असा ठराव केला.

महादजी बहुधा मक्त्याच्या मामलती देत असत व त्या आपले सेनापति व इतर सरदार यांस सांगत असत. त्यांतून त्यांनीं आपले सैन्याचा खर्च भागवावा अशी वहिवाट होती. मक्त्याच्या मामलतीपासून इतरत्र जो त्रास रयतेस होत असे, तसा त्रास ह्या मामलतींपासून होऊं नये, अशी योजना होती. ह्या मामलती देण्यापूर्वीं रयतेकडून सरकारदेण्याचा पैसा निश्चित केलेला असे. त्याबाहेर वसूल केल्याचा कोणाचा गिल्ला मुळींच येतां नये, अशी सक्त ताकीद असून ह्याची

---

१. महादजी राज्यांत जातांना त्याला एक पथक मिळालें, असें रा० नातू हे महादजीच्या चरित्रांत पृ. ८८, यांत लिहितात. त्याची हकीगत वर लिहिल्या प्रकारची आहे.

राज्यांत सर्वत्र प्रसिद्धि करविली होती. रयतेकडून फाजील पैसा तर घ्यावयाचा नाहींच, परंतु दुष्काळादि आपत्ति प्राप्त झाल्यास उत्पन्नाच्या मगदुराप्रमाणें व मानाप्रमाणें सरकारदेण्यांत सूट मिळे. आणि मदतीसाठीं जरूरी पाहून थोड्या बहुत रकमाही देत असत. ह्यामुळें रयत आबाद होती, असें पत्रव्यवहारावरून दिसून येतें. ही व्यवस्था प्रांतासंबंधानें झाली. आतां दरबारी व्यवस्था केली तीः—

४. सेनापति (बक्षी) जिवबादादा. हे सर्व फौजेवर मुख्याधिकारी होते. हे सेनापति असून दरबारांतील मुख्य ममलतीचीं कामें ह्यांच्या सल्ल्याशिवाय होत नसत. ज्या ज्या वेळीं पाटील-बावांस राज्य सोडून बाहेर जाण्याचा प्रसंग येई, त्या त्या वेळीं ते राज्याची मुखत्यारी सर्व जिवबा-दादांवरच संपवीत असत.

५. नायब बक्षी राघो राम पागे. ह्यांचेंही वजन शिंद्याच्या दरबारीं चांगलें असून, हे सरकारच्या प्रधानमंडळांतील वजनदार व अनुभवी सरदार होते.[१]

६. कारभारी (दिवाण) बाळाजी अनंत पिंगे ऊर्फ बाळोबातात्या पागनीस. हे पहिल्यानें सर्व पागांवरील मुख्य अंमलदार होते. ह्मणून ह्यांस पागनीस ह्मणत असत. परंतु पुढें ह्यांची योग्यता विशेष आहे असें समजून आल्यावर ह्यांस दिवाण नेमिलें. स्वराज्य व परराज्य, यांसंबंधीं हरएक कामकाजें हे पाहत असत.

७. फडणिशी, दप्तरदारी व परराज्यसंबंधी तहाची कामें सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण हे पाहत असत. हे वर्णनीय मुत्सद्दी होते[२]. व यांचे नायब भाऊ फडणीस ह्मणून देशस्थ होते.

८. तोफखाना, दारूकोठी व वळकट किल्ले, यांच्या रक्षणाचें काम, लखबादादा लाड यांजकडे असे. हे फार शूर व मोठे मसलती होते.[३]

९. मोदीखाना (कोठी) भिवराव मोदी यांजकडे होता.[४]

१०. बक्षीगिरीसंबंधीं कारभाराच्या—सैन्याचा हिशोब ठेवणें, नेमणुका करणें, पगार देणें वगैरे—कामावर बाळाजी राम केरकर ऊर्फ बाळाभाऊ बक्षी (जिवबादादांचे चुलत बंधु) हे होते.[५]

११. खासगीकडील कारभार बळवंतराव महादेव शिरोडकर व जनानखान्यासंबंधी काम श्रीगोंद्या-कडील कोणी देशस्थ होते, ते पहात असत. ह्यांस खासगीवाले ह्मणत.

१२. पागांची व्यवस्था धोंडीबादादा पागनीस हे पहात असत. पूर्वी ही व्यवस्था बाळोबातात्यांकडे

---

१. हे मोठे शूर असून शिंदेशाहीचे पूर्ण अभिमानी होते. ह्यांची कारकीर्द पुढें थोडेच दिवस चालली.

२. ह्यांच्या उत्कृष्ट मुत्सद्दीपणाबद्दल त्या कालीं सर्वत्र लौकिक होता. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७६।७७, यांत यांच्या अलौकिक शहाणपणाचें वर्णन केलें आहे. पत्रें व यादी पृ. १६९।१७१.

३. लखबादादा हे पहिल्यानें बाळोबातात्यांकडे, ते पागनीस असतां, कारकुनीचे कामावर होते. पण पुढें बाळोबा-तात्या दिवाण झाल्यावर हे पागनीस झाले आणि त्यानंतर यांस किल्लेदार नेमिलें. आंग्र्याच्या किल्ल्यावर असतां हे फारच प्रसिद्धि पावले.

४. भिवराव मोदी यांस मोदींचे जागीं पेशव्यांनींही कबूल केल्याबद्दल पुढें चिठी दिली आहे. यांचे मागून साबाजी मोदी व त्यानंतर बाजीबा मोदी, यांना त्या कामावर नेमिलें.

५. हें जिवबादादांचे तर्फेनें काम. पुढें पुढें हें नारायणराव बक्षी (दादांचे चिरंजीव) व लढाईत सांपडल्यावरून पाळिलेले नारबा, हे पाहत असत. पाळलेला मुलगा नारबा, हा पुढें दरबारी कामांत चांगली योग्यता पावला.

वडिलार्जित चालत आली होती. त्यांजकडून लखबादादांकडे आली व नंतर हे पाहूं लागले. ह्या एकंदर ५२ पागा होत्या.

१३. पीलखाना (हत्तींची पागा). या कामाचे भिंवराव मोदी, त्यांचे मागून साबाजीराव मोदी व नंतर बाजीबा मोदी, असे अधिकारी झाले.

१४. **सरसुभे**—अजमीरचे सरसुभे शिवाजी नाना (शिवबानाना जिवबादादांचे बंधु) होते. जावद प्रांत माळवा, एथें विश्राम नरहर केरकर (जिवबादादांचे पुतणे) व मेवाड प्रांतीं अंबाजी इंगळे असे होते.

१५. **सुभे**—जिवाजीराव यशवंत वर्दे, सदाशिव नारायण, बाळाप्पा अण्णा, रामचंद्र गंगाधर वगैरे नेमिले.

१६. **मामलतदार**—कृष्णोबा भाऊ कालेलकर, लक्ष्मण नारायण वागळे, सदाशिव वासुदेव वगैरे नेमून, त्यांजकडून प्रांतवार उत्कृष्ट बंदोबस्त ठेवविला.

१७. **पेशव्यांकडून शिंद्यांकडे वकील**—सदाशिव रामचंद्र सुखठाणेकर (रामचंद्रबाबांचे चिरंजीव) व नायब वकील नारो शिवदेव, हे होते.

१८. **शिंद्याकडून पेशव्यांकडे वकील**—रामजी पाटील जाधव हे होते.

१९. **रजपूत राजांकडे वकील**—सदाशिवपंत जोधपुरीं, माधवराव तात्या गंगणेकर हे भरतपुरीं व याचप्रमाणें प्रत्येक दरबारीं निरनिराळे वकील होते.

२०. **न्यायाधीश**—न्यायाधिशीचें काम प्रत्येक ठिकाणीं नेमिलेले सरसुभे, सुभे व किल्लेदार, हे पहात असत व फार महत्त्वाचीं कामें सरकारापुढें येत असत. त्या वेळीं जिवबादादांच्या विचाराप्रमाणें त्यांचा निकाल पाटीलबावा लावीत असत. फिरते स्वारीवर जिवबादादा असले ह्मणजे त्या त्या प्रांतांचीं कामें जिवबादादांकडेसच जावीं व त्यांनींच त्यांचा निकाल लावावा, अशी वहिवाट असे. मोठें प्रकरण असलें तर सरकारापर्यंत जात असे. शिवाय रयतेस न्याय यथापद्धत व सुलभ रीतीनें मिळण्याकरितां पंचांमार्फत न्याय तोडण्याची सर्वत्र जारीनें वहिवाट होती. त्यामुळें उभय पक्षांस पसंत अशा बरोबरीच्या लोकांकडून आपल्या संपूर्ण गोष्टी ऐकवून योग्य निकाल बिनखर्चीत मिळविण्यास रयतेस मोठी सोय असे.[3]

रयतेचा हरएक प्रकारचा न्याय ज्या त्या गांवांत गांवच्या पाटील वगैरे अधिकाऱ्यांकडे येत असे. तेथेंच त्या गोष्टींचा निकाल बहुतकरून लागत असे. परंतु तेथें निकाल न लागला किंवा तो उभय पक्षांस न पटला, तर वर लिहिल्या क्रमानें पुढें जात असे. ठिकठिकाणचे मामलतदार व किल्लेदार जरूर ते फिरते लोक ठेवून फौजदारी किंवा पोलीस कामाचा बंदोबस्त ठेवीत.

याप्रमाणें राज्यकारभाराचा बंदोबस्त चालला असतां, दक्षिणेंत पेशव्यांचे दरबारीं चुलते पुतणे यांचा बेबनाव आला. व माधवराव लहान असल्यामुळें राघोबादादा कारभार पहात. इतक्यांत उत्तर हिंदुस्थानांत गोहदवाल्या जाटानें ग्वाल्हेर प्रांतीं दंगा आरंभिला. त्यामुळें राघोबादादा फौज घेऊन हिंदुस्थानांत गेले. त्यांच्या पक्षाकडे नारो शंकर राजेबहादर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, सखाराम भगवंत बोकील ऊर्फ सखाराम बापू, व आबा पुरंदरे, हे सरदार व मुत्सद्दी असून त्यांना

१. वि. ज्ञान. वि. पुस्तक ११, पृ. ७७ व पोवाड्यांचें पु० पृ. १५४.

२. पहा सनद नं० ४३ व महादजींचें चरित्र पृ. १५१.

३. पहा पत्र नं० १.

हरएक प्रसंगीं सल्लामसलती देत. उत्तरेकडील स्वाऱ्या सुरू असतां राघोबादादांनीं शिंदे घराण्याची सरदारी पूर्वीं मानाजी फांकड्यास देण्याबद्दल खटपट चालविली होती, परंतु ती साधली नव्हती. त्यामुळें ती नारो शंकरांस तरी देऊन आपला महादजीच्या विरुद्ध असलेला पक्ष कोणत्याही रीतीनें सिद्धीस न्यावा, असा त्यांनीं मनांत बेत योजिला होता. त्याप्रमाणें ग्वाल्हेर प्रांतीं गेल्यावर तेथील सुभ्याचें काम नारो शंकरांस दिलें. राण्याशीं लढाई करून तेथील आधिपत्य मिळविण्याची गोष्ट अजून पुढेंच होती. तरी ती सहज साधून जाऊं व तसें केलें ह्मणजे पुढें नारो शंकरांस शिंद्यांचें राज्य देण्यास सोपें पडेल, असा त्यांचा मनोदय होता. राघोबादादांनीं जाटांशीं लढाई करण्यासाठीं शिंदे, होळकर वगैरे मोठमोठ्या सरदारांस मदतीसाठीं बोलाविलें. ते येऊन पोहोंचल्यावर लढाईची तयारी केली.

इकडे जाटही आपल्या फौजेसह मराठ्यांवर चालून आला. त्यांचें ह्यांचें बरेच दिवस युद्ध सुरू होतें. लढाई चालू असतां महादजी जाटास सामुग्री पुरवितो, असा त्याच्या शत्रूंनीं त्यांजवर आरोप आणिला होता. तेणेंकरून दादासाहेबांच्या अवकृपेंत आणखी भर पडली. परंतु जाटाशीं महादजींचें सख्य मुळींच नसून त्यांनीं त्याशीं लढून पुढें ग्वाल्हेर घेतली. यावरून त्या ह्मणण्यास थारा राहत नाहीं. पण 'महादजी यांजवर दादासाहेबांची इतराजी होऊन पारिपत्य करावें ऐसें जालें. इतकें वर्तमान रावसाहेबांस (माधवरावांस) कळून (मल्हारराव) होळकर व विठ्ठल शिवदेव ह्यांस हातची चिठी आली कीं, कळेल तसें करून महादजी शिंदे यांचा बचाव करावा. तेव्हां उभयतांनीं दादासाहेब यांस बहुत तऱ्हेनें समजावून शिंदे यांजवर सरफराशी करविली.'[3] पुढें लढाईंत जाटाचा बराच पराभव झाला, तरी ग्वाल्हेरचा फारच बळकट किल्ला हातीं आला नाहीं. मग जाटाकडून बरीच खंडणी घेऊन दादासाहेब दुसरीकडे स्वारीस गेले.

यापुढें राघोबादादांचें सारेंच करणें तरुण पेशव्यांस नापसंत होऊन त्यांच्या हातांत कारभार ठेवणें सुरक्षित नाहीं, असें जाणून माधवरावसाहेबांनीं आपल्या पक्षाचें मुत्सद्दीमंडळ तयार केलें. 'माधवरावसाहेब ह्यांचें वय लहान. परंतु गोपिकाबाई व बापूराव फडणीस व त्रिंबकराव मामा व बाबूजी नाईक व पिराजी नाईक निंबाळकर, हुजुरात वगैरे एकत्र होऊन सन सलास सितेनाचे (सन १७६२) सालीं दादासाहेब यांनीं कारभार न करावा हें मनांत आणून दादासाहेबांचे निसबतीनें सरदार जे आहेत त्यांसुद्धां कैद करावे असा विचार जाहला.' हा मजकूर मल्हारराव होळकर यांस समजतांच त्यांनीं 'विठ्ठल शिवदेव यांस खबर देऊन त्यांस वाफगांवांस पोंचते केले. त्याचप्रमाणें नारो शंकर वगैरे मंडळी विंचुरास येऊन दाखल झाली.' अशा प्रकारें दादासाहेबांचा बंदोबस्त झाल्यावर महादजी शिंदे यांची एक काळजी दूर झाली. व त्यांची जहागीर त्यांजकडे कायम होण्याबद्दल श्रीमंत माधवराव पेशव्यांनीं करावयाची ती व्यवस्था केली. ह्मणजे महादजी शिंद्यांस पूर्वीं नानासाहेबांनीं वस्त्रें दिल्याप्रमाणें माधवरावांनीं महादजीकडे त्यांचा सुभा बहाल केला. त्या वेळची खालीं लिहिल्याप्रमाणें चिठी सांपडली आहे तिचा तपशीलः—

१. ग्वाल्हेर येथें नारो शंकरांचा वाडा आहे, तो या वेळीं बांधिला.

२. माधवराव पेशवे सुज्ञ असून ते महादजींची योग्यता जाणून होते.

३ । ४ । ५. पहा याद्री कारकीर्द विठ्ठल शिवदेव विंचूरकर. अनुक्रमें पृ. १५।१०.

६. महादजीस पहिल्यानें वस्त्रें माधवराव पेशव्यांनीं दिलीं, असें कित्येक अलीकडील ग्रंथकार ह्मणतात, तें चुकीचें

सुभा राजश्री महादजी शिंदे वि॥[1]
जिवाजी बल्लाळ बक्षी मु॥[2]
शिलेदार सुरुसन सलाम[3]
भिंवराव मोदी[4].

इतकाच मजकूर चिठींत आहे. ही चिठी पेशव्यांकडील अगर तिकडून आलेल्या चिठीची नक्कल असावी. पेशवे शिंद्यांस सुभे ह्मणत. तेव्हां या वेळीं सुभे महादजी होते व जिवाजी बल्लाळ ऊर्फ जिवबादादा बक्षी (सेनापति) होते. पेशव्यांनीं पूर्वी सुभा नेमिल्यानंतर पुढें घोटाळा चालला होता, तो मोडून सन १७६२ त त्यांनीं महादजींस पुनः त्या जागीं कायम केलें, असें स्पष्ट सिद्ध होतें.

याप्रमाणें माळवे प्रांतीं आपल्या मूळ राज्यांतील 'गैरशिस्त' झालेले अंमल पुनः मोठ्या प्रयत्नानें कायम करून वर सांगितल्याप्रमाणें अठराही कारखान्यांवर लोक नेमून व प्रांतोप्रांतींचा यथास्थित बंदोबस्त करून पाटीलबावांनीं राज्यव्यवस्थेची घडी नीटपणें बसविली. त्यामुळें रयतेचें लक्ष सरकाराकडे लागून सरकारांतून योजिलेलीं कामें बिनहरकत होऊं लागलीं, व पुढें सर्वत्र स्वस्थता व आबादानी दिसूं लागली. न्याय मनसुबा उत्तम रीतीनें होऊं लागला. अशा रीतीनें पाटील-बावा राज्यकारभार हाकीत असतां, त्यांना दक्षिणेंत येण्याचें कारण घडून आलें तें असें:–जयाप्पा शिंदे वारल्याबद्दल मागें लिहिलें आहेच. त्यांची बायको सखूबाई यांजकडून श्रीगोंद्याहून (शिंद्याच्या जाहागिरीच्या गांवाहून) पाटीलबावांस बरेच वेळां निरोप गेले होते कीं, आपली मुलगी लक्ष्मीबाई ही उपवर जाहली. यासाठीं तिला योग्य वर पाहून तिचें लग्न करावें. परंतु पाटीलबावांस महत्त्वाच्या राजकीय कामांमुळें आजवर फुरसत मिळाली नव्हती. पण पुनः तिक-डीचें पत्र आल्यावरून त्या गोष्टीचा त्यांस विचार करणें भाग झालें. मग त्यांनीं ही गोष्ट जिव-बादादा, बाळोबातात्या वगैरे मंडळीपाशीं काढिली. त्यापूर्वी एकदा कोकणांतून नरोबादादांनीं जिवबादादांस वाडकरांसंबंधानें एक महत्त्वाची सूचना केली होती. ती ही कीं, वाडकर राजे खेमसावंत यांस शिंद्याचे एथील मुलगी देण्याचा योग घडवून आणाल तर त्यांत अनेक प्रकारचे फायदे होतील. खेमसावंत राजे तरुण व रूपगुणसंपन्न असून त्यांचें कुलशील उत्तम आहे. तेव्हां असें घडून आल्यास त्यांत कांहीं गैर न होतां हा संबंध उभय पक्षीं हितावह होईल, व शिंद्यासारख्या बलाढ्य व वैभवसंपन्न राजास कोकणचा व वाडीकर राजे भोंसले यांचा अभिमान

आहे. वस्त्रें नानासाहेब पेशव्यांनीं दिलीं व त्यास रघुनाथरावाची हरकत होती, ती माधवरावांनीं दूर केली.

१. वि॥. ह्म. विशेष

२. मु॥. मुखत्यार अ. मुत्सद्दी मुकत्यार या अर्थी.

३. इसवी सन १७६२ साल.

४. हें शिंद्यांचें राजमंडळ पेशव्यांकडून मंजूर झालें, त्या वेळीं ह्यांना मोदी नेमिलें.

५. या संधीस पेशव्यांचा माळवे प्रांताकडील सुभेदार महादाजी गोविंद याची व महादजी शिंदे यांची लढाई होऊन महादाजी गोविंद यांस ठार मारिलें. पहा पे. ले. सं. मा. पु. अं. २६, पृ. १०२४, सन १८९९. त्या वेळीं थोरले माधवराव हे पेशवे होते.

उत्पन्न होईल. जिवबादादांस आपल्या वडील बंधूचे हे विचार पसंत पडून ते योग्य संधीची वाट पाहत होते. तेव्हां हा सुयोग चालून आलेला पाहून जिवबादादांनीं पाटीलबावांस विनंती केली कीं, सावंतवाडी संस्थानचे सध्यांचे राजे खेमसावंत हे आपल्या पुतणीस योग्य वर आहेत. माझी सल्ला कशी काय आहे, ह्याविषयीं सावंतवाडीस मनुष्य पाठवून तिकडील माहिती आणविल्यावर खातरी होईल. सर्व मुत्सद्दीमंडळीचेंही मत दादांप्रमाणेंच पडलें. मग पाटीलबावांनीं कांहीं लोक सावंतवाडीस पाठविले. इकडे जिवबादादांनीं ही खबर घरीं नरोबादादांस व त्याचप्रमाणें वाडीच्या मुत्सद्दीमंडळास कळविली. शिंद्याकडीलही लोक सावंतवाडीस येऊन पोहोंचले. ते मोठ्या इतमामानें आले होते. बरोबर हत्ती, घोडे वगैरे असून त्यांचे पोषाख व अलंकार मोठ्या किंमतीचे होते. एक दिवस दरबारासाठीं ठरविला. आलेल्या लोकांचे ऐश्वर्यापुढें राजेसाहेबांचें ऐश्वर्य सामान्य वाटण्यासारखें असल्यामुळें दरबारांतील सबनीस, चिटणीस वगैरे मुत्सद्यांनीं तोड काढिली कीं, सरकारच्या संग्रहास असलेले उंची पोषाख व अलंकार वगैरे नौकरचाकरांस देऊन खुद्द राजेसाहेबांनीं साधा पोषाख करावा! मग याप्रमाणें राजेसाहेब व त्यांचे मुत्सद्दी आणि दरकदार स्थानापन्न झाल्यावर त्या पाहुणेमंडळीची भेट घेतली. यांतील मर्म त्या आलेल्या मंडळीच्या लक्षांत आलें. पण दरबारची ही चतुरता पाहून त्यांना समाधान वाटलें. त्याचप्रमाणें दरबारची पद्धत व तेथील बोलणीं चालणीं पाहून त्यांचा ग्रह चांगला झाला. मग शिंदे सरकारचा मनोदय त्यांनीं मुत्सद्यांच्या कानावर घातल्यावर त्यांनीं त्या गोष्टीस सर्वानुमतें रुकार दिला. नंतर मंडळीनें जाण्याविषयीं निरोप घेतला व दरबारचें काम आटोपलें. पुढें ते लोक उज्जनीस गेल्यावर त्यांनीं सावंतवाडीकडील सर्व हकीकत पाटीलबावांस कळविली. मग पाटीलबावांनीं हें स्थळ पसंत करून जामूद पाठवून लग्नतिथी मुकरर केली. आणि ते सर्व लवाजम्यासहवर्तमान श्रीगोंद्यास निघून आले. राज्यव्यवस्था मुख्यत्वेंकरून राघो राम पागे यांजवर संपविली होती. आणि जिवबादादा व बाळोबातात्या, हे श्रीमंतांबरोबर होते. त्या वेळीं बराचसा फौजफांटा हत्ती, घोडे, पालख्या, नालक्या वगैरे वाहनें इत्यादि सरंजाम श्रीगोंद्यास शिंद्यांच्या स्वारींत होता. वाडकरही आपल्या ऐपतीच्या मानानें इतमाम बरोबर घेऊन येऊन पोहोंचले. पाटीलबावांनीं या लग्नाचा बेत मोठ्या थाटमाटाचा ठेवण्याविषयीं आज्ञा केल्याप्रमाणें सर्व यथास्थित बेतबात ठेविला होता. मंडपाची शोभा, व आंतील सर्व सरंजाम, हीं पाहून प्रेक्षक आश्चर्यानें थक्क होत असत. मग सुमुहूर्तीं लग्नविधि मोठ्या थाटानें उरकून चार दिवस नाच तमाशे, बैठका, आतषबाजी, मेजवान्या, संतर्पणें इत्यादिकांची गर्दी उडाली. शिंदे सरकार समर्थ म्हणून पुष्कळ प्रांतांतील कारागीर, भिक्षुक व गुणिजन, ह्यांनीं श्रीगोंदें फुलून गेलें होतें. त्या सर्वांस अत्यंत संतोष वाटेल असा पाटीलबावांनीं खर्च केला. नवरी लक्ष्मीबाई, व वर खेमसावंत, यांस तर सोनें व रत्नें यांच्या अलंकारांनीं व उंची पोषाखांनीं मढवून काढिलें. व त्याचप्रमाणें वाडींतील

१. हा संबंध घडवून आणण्याविषयीं पेशव्यांकडील मुत्सद्दी विठ्ठल विश्राम व त्यांचे बंधु जिवाजी विश्राम सबनीस, यांनींही खटपट केली होती. व पुढें हा संबंध जुळून येऊन त्यांना यशही आलें. "जिवाजी विश्राम सबनीस म्हणून एक ब्राह्मण खेमसावंताच्या पदरीं होता. त्यानें खेमसावंताकरितां आपलें वजन पुणें दरबारांत खर्चून महादजी शिंद्याची मुलगी (पुतणी परंतु मुलीप्रमाणें मानलेली) लक्ष्मीबाई त्यांची बायको होईसारखें केलें." गोमा. इ. पृ. ९१.

राजघराण्यांतील लोकांचा व त्यांची आप्तमंडळी आणि सरदार, दरकदार, मानकरी वगैरे सर्व लोकांचा उत्तम प्रतीचा सत्कार केला. या लग्नाचे कामीं पाटीलबावांनीं लक्षावधि रुपये खर्च करून आपल्या गतधवा वडील भावजई सखूबाईसाहेब यांच्या दृष्टीचें पारणें फेडलें. ही गोष्ट सन १७६३ त घडली.

याप्रमाणें लग्नसोहळा आटोपल्यावर जिकडील तिकडे निरवानिरव करून पाटीलबावा दक्षिणेंत पुण्यास श्रीमंत माधवराव साहेब पेशव्यांस भेटायास आले. श्रीमंतांस भेटून त्यांनीं आपल्या जहागिरीसंबंधीं व उत्तरेकडील राजेरजवाड्यांच्या कारस्थानासंबंधीं सर्व माहिती श्रुत केली. पाटीलबावांविषयीं श्रीमंतांचा ग्रह मूळचाच चांगला होता. आणि आतां त्यांस मिळालेली चांगल्या योग्यतेची मंडळी व तिच्या सल्ल्यानें त्यांनीं केलेली राज्यव्यवस्था, ह्यांबद्दलची सर्व हकीकत ऐकून श्रीमंतांस फार समाधान वाटलें. मग पाटीलबावांचा मुक्काम पुण्यांत कांहीं दिवस झाला. इतक्यांत वर्तमान आलें कीं, दिल्लीपति शहा आलम बादशहा व अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला, ह्यांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून ते बुंदेलखंडांत शिरले. आणि झांशीवर चाल करून तें शहर सर केलें. हें ऐकण्याबरोबर पेशवे व शिंदे ह्यांस अतिशयित क्रोध आला. माधवराव पेशव्यांस तर पानिपतच्या लढाईपासून मुसलमान व त्यांच्या उत्तरेकडील मुलखासंबंधाच्या वगैरे कुरापती, ह्यांचें नांव निघालें ह्मणजे मोठा संताप उत्पन्न होत असे. आपली शक्ति वाढवावी व मुसलमानांस चांगला हात दाखवावा, हेच विचार त्यांच्या मनांत रात्रंदिवस घोळत असत. त्यांत हें वर्तमान ऐकल्याबरोबर अगोदर तिकडील प्रांतांच्या रक्षणासंबंधानेंही काळजी उत्पन्न झाली. परंतु, पेशव्यांची उत्तरेकडील मुख्य ढाल शिंदे. तेव्हां त्यांनीं ह्या स्वारीवर त्यांचीच नेमणूक केली. त्याप्रमाणें अर्थातच पाटीलबावांस लष्करासहित तिकडे जाणें भाग झालें.

मग पाटीलबावा सैन्यासहवर्तमान उज्जनीस पोहोंचल्यावर तेथून लौकरच सड्या स्वारीनिशीं झांशी एथें शत्रूस सामना देण्यासाठीं निघून गेले. इतक्यांत शहाआलम व सुजा उद्दौला, हे तेथून निघून बंगालचा नबाब मीर काशीम, हा शरण आल्यावरून, त्यास इंग्लिशांच्या शहांतून सोडविण्यासाठीं तिकडे गेले. त्या दोघांचा बुंदेलखंडांतून मराठ्यांस हांकून लावावें असा संकल्प होता. आणि त्या वेळीं शिंदे फौजेसह दक्षिणेंत असल्यामुळें त्यांच्या हालचालीस ह्मणण्यासारखा अडथळाही झाला नसता. परंतु वरील कारणामुळें आपला हेतु अपूर्ण ठेवून त्यांस मीर काशिमाच्या मदतीस जाणें भाग पडलें. जातेवेळीं झांशीच्या बंदोबस्तास कांहीं लोक ठेवून ते गेले होते[2]. परंतु जिवबादादांनीं त्यांजवर चाल करून जाऊन त्यांस हाकून लाविलें. आणि पूर्व-

१. महादजींच्या योग्यतेसंबंधानें त्यांचे चरित्रकार आ. नातू ह्मणतात:–"पुढें महादजी मोठा सरदार, मुत्सद्दी व कार्यकर्ता झाला, त्याचें कारण त्याचे पूर्व वयांत त्यास जें शिक्षण मिळालें, तें होय. हें शिक्षण पुस्तकी नसून प्रत्यक्ष होतें. विशेष जबाबदारी शिरावर नसतां या मराठ्यांचे वैभवाचे काळांत त्याला हिंदुस्थानचीं सर्व कारस्थानें दृष्टीस पडत होतीं. तो आपल्या बंधूबरोबर व पेशव्यांबरोबर बहुतेक स्वाऱ्यांत असल्यामुळें मराठ्यांचा विजय कसा होत होता व पानिपतचें संकट महाराष्ट्रावर कां ओढवलें, हेंही तो लक्षपूर्वक पहात होता. जात्या धूर्त पुरुषास याहून जास्त शिक्षणाची जरूर नव्हती. * * * हिंदुस्थानचें आधिपत्य जें पुढें महादजीकडे आलें, त्यांत त्याच्या ज्या वीर बंधूंनीं आपले प्राण धारातीर्थीं अर्पण केले, त्यांचा किती अंश आहे, हेंही स्पष्ट दिसणार आहे." पृ. ४३ २ ग्रांट डफची बखर.

वत् तेथें मराठ्यांचा अंमल स्थापिला. आणि तेथील बंदोबस्त करून फौजेसुद्धां पाटीलबावा उज्जनीस येऊन दाखल झाले.

उज्जनीस आल्यानंतर लष्करची सुधारणा करण्याबद्दल जिवबादादांनीं पाटीलबावांची परवानगी घेतली. पाटीलबावांनीं व त्यांनीं पुढें मोठमोठ्या घटना घडवून आणण्याबद्दल जे बेत योजिले होते, ते सिद्धीस जाण्यास राज्याची अंतर्व्यवस्था व शक्ति, हीं उत्कृष्ट असलीं पाहिजेत, त्यांवांचून ते साधावयाचे नाहींत, हें त्यांच्या लक्षांत पुरतेपणीं होतें, व त्याप्रमाणें राजकीय अंतर्व्यवस्था योग्य प्रकारें केली होतीच. व त्या व्यवस्थेमुळें सर्व कारभार सुरळीत व समाधानकारक चालला होता. परंतु आपल्या राज्यास कोणीकडूनही अपाय येऊं नये, संस्थानिकांकडून खंडण्या वगैरे यावयाच्या त्या वक्तशीर व बिनतक्रार याव्या, आणि भोंवतालच्या शत्रूंवर चांगला वचक राहून कोणी चढाई करून आल्यास त्याची चांगली खोडकी जिरवावी, इतकें होण्यास सैन्यबल चांगलें पाहिजे, पण तें असावें तसें नाहीं; यासाठीं तें वाढविण्याची प्रस्तुत फार आवश्यकता आहे, ही गोष्ट पाटीलबावांच्या मनांत भरवितांच त्यांनीं दादांस आपली संमति दिली. मग जिवबादादांनीं त्या प्रांतीं स्वतः हिंडून व आपल्या तर्फेचे हुषार लोक पाठवून निरनिराळ्या जातींचे शूर, काटक व हिंमतदार लोक चाकरीस ठेवण्याचा सपाटा चालविला. जिवबादादांची लोक निवडून काढण्याची विलक्षण हातोटी असे. मनुष्याच्या चेहऱ्यावरून, सांगितलेलें कामकाज बजावण्याच्या त्याच्या शिस्तीवरून व त्याच्या चालीरीतींच्या धोरणावरून त्यांनीं उपयोगी मनुष्य चटकन् निवडावे ! त्यांनीं निवडलेला मनुष्य बहुधा गचाळ, लबाड किंवा बेशिस्त निघत नसे. शिपाई ठेविला कीं, त्याला आपल्या लष्करांतच अखेरपर्यंत राहण्याची आस्था उत्पन्न व्हावी, अशाबद्दल जिवबादादा फार काळजी घेत असत. शिपायांकडून हुकुमाप्रमाणें शिस्तवार काम घेण्याबद्दल ते कडक नजर पुरवीत. व त्यांच्या वर्तनावरही त्यांचा डोळा असे. परंतु त्यांचें खाणेंपिणें, लत्ताकपडा, औषधपाणी इत्यादिसंबंधानें त्यांनीं सुरेख व्यवस्था ठेविली होती. शिवाय कोणीं उत्तम तऱ्हेनें शौर्य गाजविलें किंवा दुसरी कोणतीहि चाकरी चांगल्या प्रकारें बजावून समाधान दिलें, तर त्या मानानें त्यास बक्षीस द्यावें किंवा त्याचा गौरव करावा आणि सवडीप्रमाणें पलटणांतून फिरून लोकांचे अर्ज ऐकावे, त्यांचा लागलाच निकाल लावावा व त्यांचा समाचार घ्यावा, अशी त्यांची वहिवाट होती. त्यामुळें फौजेंतील सर्व लोक त्यांजवर पित्याप्रमाणें लोभ ठेवीत असत. या त्यांच्या कीर्तीमुळें हजारो लोक त्यांजकडे लष्करांत राहावयास येत असत. त्यांना लोक मिळण्याची वाण कधींच पडली नाहीं. याप्रमाणें कित्येक महिने क्रम चालवून त्यांनीं शिंद्याचें मोठें जंगी लष्कर जमविलें. आणि त्याच्या लहान मोठ्या तुकड्या करून, त्या योग्यतेप्रमाणें निरनिराळ्या सरदारांच्या ताब्यांत दिल्या. शिंदे घराण्यांतील राहिलेले कांहीं पुरुष व जाधव, इंगळे वगैरे तिकडील सरदार आणि राणाखानभाई वगैरे विशेष कारणांवरून केलेले सरदार, यांच्या ताब्यांत कांहीं जुन्या व कांहीं नव्या फौजेच्या तुकड्या देऊन त्यांवर निरनिराळ्या कामगिऱ्या संपविल्या होत्या. आणि कोकणांतून नेलेल्या सरदारांच्या ताब्यांत केवळ नवीन फौजेच्या तुकड्या देऊन त्यांपैकीं कांहीं सरदार आपल्या दिमतींत आणि कांहीं मुलुखगिऱ्यांवर नेमिले होते. अशी व्यवस्था असून निरनिराळ्या ठिकाणच्या फौजांचें नियमन एका शिस्तीनें व्हावें म्हणून कधीं कधीं हुकूम होतांच ती एकत्र जमावी

अशी योजना केली होती. ह्यामुळें सर्व ठिकाणच्या फौजांत सुसूत्र व्यवस्था राहत असे. आणि त्या फौजांचा परस्पर संबंधही कधीं तुटत नसे.

जिवबादादांनीं सैन्यांत अशी तरतरी राखिली होती कीं, फौजेंतील शिपाई लोकांस नेहमीं लष्करी शिक्षण मिळून ते आपल्या कामांत हुषार, दक्ष व निरलस रहावे. त्यांनीं स्वतःप्रमाणें सर्व सरदार लोकांस हाच क्रम लावून दिला होता. त्यामुळें लष्करी शिस्तीची टापटीप, कैदवारपणा व वेळोवेळ होणाऱ्या हुकमाप्रमाणें सर्व शिपाई लोकांचें सूत्रबद्ध वर्तन, हीं शिंद्याच्या लष्करांत रेखल्यासारखीं आढळून येत. हें पाहून सर्वांस आश्चर्य वाटे. फौजेच्या मुख्य अंमलदाराकडून सूचनेचें शिंग होतांच लष्करी लोकांनीं सज्ज होऊन तत्काळ संकेतस्थळीं जमावें आणि हुकूम होतांच तमतशी हालचाल ठेवावी. लढाईसाठीं किंवा दुसरीकडे छावणी नेण्यासाठीं कूच करण्याचा हुकूम होण्याबरोबर तयारीनें बिनतक्रार निघावें. हुकुमाबाहेर इकडे तिकडे एक केंसभर पाऊल टाकावयाचें नाहीं व त्रास पडल्याबद्दल नाखुषी दाखवावयाची नाहीं; शिवाय नेहमींचें काम निशाण मारणें, तरवारीनें सामने करणें, तिरंदाजी करणें, तोफा रोखणें, मोर्चे बांधणें, शिस्तीनें एकदम चाल करून जाणें, हुकुमाबरोबर सैन्याचे निरनिराळे भाग होणें व पुनः संकेताप्रमाणें एकत्र होणें, दौडीनें पाठलाग करणें, शत्रूची फौज आंगावर घेऊन संधि साधून त्यांजवर उलटून पडणें व जुन्या रीतीनें उडत उडत छापे घालणें इत्यादि शेंकडो प्रकारचें शिक्षण सवडी सवडीनें देऊन त्यांनीं सर्व फौज अगदीं तरबेज केली होती. तसेंच युद्धोपयोगी बंदुका, तोफा, सुतरनाळा, गरनाळा, जंबुरे, बाण, कडाबिनी, भाले, बर्च्या, अनेक प्रकारच्या तरवारी, सुरे, इत्यादि शस्त्रें व भरपूर दारूगोळा वगैरे सामान आणि किल्ल्यांतील दाण्यागोट्याची मुबलक बेगमी करून ठेवण्याची पाटीलबावांकडून तजवीज करविली. त्याचप्रमाणें किल्लेकोटांचीही दुरुस्ती वगैरे करून ते मजबूत केले. व अशाच रीतीनें सर्व गढ्या व बाऱ्या यांची मजबुती करून, तीं सर्व ठिकाणें शत्रूंस अजिंक्य करून ठेविलीं. जिवबादादांनीं ह्या ज्या सुधारणा आरंभिल्या, त्यांस पुष्कळच पैसा खर्च झाला. तरी सुधारणेचें कोणतेंही काम त्यांनीं उत्पन्न केलें असतां पाटीलबावांनीं मंजुरी देण्यास मागें पुढें पाहूं नये. कारण ह्या वेळीं हात आंखडता धरल्यानें आपली शक्ति न वाढतां पुढील वैभवसंपादनाचें महत्त्वाचें कार्य साधणें कठीण पडेल, हें त्यांस माहीत होतें. शिवाय जिवबादादांची मागणी किंवा शिफारस अयुक्त किंवा गैरशिस्त कामासंबंधानें मुळींच नसे, ह्याबद्दल त्यांना अनेक वेळां अनुभव आला होता.

जिवबादादा शिंद्यांचे सेनापति होते. तरी राज्यप्रकरणीं हरएक महत्त्वाचें काम त्यांच्या सल्ल्याशिवाय होत नसे. पाटीलबावांच्या मुत्सद्दीमंडळांत जिवबादादाच अग्रगण्य होते. हरएक बाबतींत श्रीमंतांस सल्ला द्यावयाची ती प्रत्येक प्रकरणाचा नीट विचार करून ते देत असत. त्या सल्ल्याप्रमाणें निकाल दिल्यानें चांगली व्यवस्था व न्याय होत असे, असें अनुभवानें पाटीलबावांस कळून येई. त्यामुळें त्यांचें पाटीलबावांकडे वजन मोठें असे. बाळोबातात्याही कारभाराच्या कामांत निष्णात असून चांगले मुत्सद्दी होते. राज्यांतील सर्व खात्यांचे–अठराही कारखान्यांचे–हिशोब व जाबजबाबाचीं कामकाजें ते पाहत असत. व ते नेहमीं श्रीमंत पाटीलबावांसंनिध मसलती देण्यास राहत असत. सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण हेही चतुर मुत्सद्दी होते. राज्यकारभारांत सल्ला मसलत देणें व परराज्यसंबंधाची वकिली करणें ह्यासंबंधानें त्यांचा चांगला उपयोग होत असे. हे मुत्सद्दी व पाटील, जाधव, इंगळे, फाळके व शिंदे घराण्यांतील सर्व मंडळी ह्या सरदारां-

सहवर्तमान पाटीलबावा दरबारी कामकाज पाहत असत. सर्वत्र न्यायमनसुबी यथास्थित व्हावी अशी व्यवस्था पाटीलबावांनीं ठेविलेली होती. त्यामुळें रयतेच्या गाऱ्हाण्यांचा योग्य निकाल लागे. रयतेच्या हक्कांस कोणीं धक्का पोहोंचवूं नये, कोणावर जुलूम जबरी होऊं नये, सर्व लोकांस त्यांच्या त्यांच्या स्वकष्टार्जित मिळकतीचा उपभोग निर्विघ्नपणें घेतां यावा, व लोकांचे सामाजिक व धार्मिक व्यवहार यथान्याय व यथापद्धत चालावे अशाबद्दल दरबाराकडून चांगलें लक्ष पुरविलें जात असे. या उत्कृष्ट बंदोबस्तामुळें सर्व रयत आबाद व संतुष्ट राहून शिंदेशाहीचा जोम वाढत चालला.

याप्रमाणें पाटीलबावा समाधानकारक रीतीनें राज्यकारभार हाकीत असतां इकडे होळकरशाहींत कांहीं महत्त्वाचें राजकारण उपस्थित झालें, त्यामुळें त्यांस तिकडे जावें लागलें. सुभेदार मल्हारराव होळकर इ० स० १७६५ त मृत्यु पावले. ते जिवंत असतांच त्यांचा पराक्रमी पुत्र खंडेराव कुंभेरीच्या वेढ्यांत सन १७५४ त मरण पावला होता. त्याची बायको ह्मणजे मल्हाररावांची सून—प्रसिद्ध साध्वी—अहिल्याबाई होळकरीण व तिचा मुलगा मालीराव, हींच कायतीं मल्हाररावांच्या मागून राज्यास खरीं वारस होतीं. पण मल्हाररावांच्या मरणानंतर थोडक्याच दिवसांनीं मालीराव मरण पावल्यामुळें होळकरांची गादी रिकामी पडली. तेव्हां ती दौलत राखावी कीं खालसा करावी, असा रघुनाथराव दादासाहेबांनीं प्रश्न उपस्थित केला. दादासाहेबांचा कल होळकरांच्या दौलतीस योग्य वारस नाहीं, या सबबीवर ती खालसा करावी, असा असून त्यांस होळकरांचा दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड याचें आनुकूल्य मिळालें ! दिवाणसाहेबांनीं ही दौलत पेशव्यांच्या घरांत घालून त्यांत आपला लाग साधण्याची निमकहरामी केली, तरी ही गोष्ट शिंदे, भोंसले व गाइकवाड यांस मुळींच आवडली नाहीं. हें माहीत असतांही राघोबादादांनीं पाटीलबावांस होळकरांची दौलत खालसा करण्याचा हुकूम फर्माविला ! ज्या होळकरांनीं मोठमोठे पराक्रम करून मराठेशाही नांवारूपास आणण्यास परोपरीनें साह्य केलें, ज्यांच्या योग्यतेवरून त्यांस पेशवे 'काकासाहेब' या बहुमानवाचक नांवानें हाक मारीत असत, ज्यांनीं पेशव्यांच्या हरएक राजकारणांत आपल्या अकलेचा, हिंमतीचा व शक्तीचा खर्च करून त्यांचीं महत्त्वाचीं कामें सिद्ध केलीं, ते निपुत्रिक मरण पावले ही सवड मिळण्याबरोबर त्यांच्या दौलतीवर दादासाहेबांनीं अशी लोभदृष्टि ठेवावी, हें अत्यंत गर्ह्य होतें. शिवाय यांत धोरण व दूरदृष्टि, हींही नव्हतीं. कारण मोठ्या सामर्थ्याचे व मराठी राज्यास आधारस्तंभ असे जे हे शिंदे होळकरादि शूर सरदार, ते पेशव्यांच्या दिमतींत असले, तर त्या त्या भागांतील हालचाल जिवंत राहून हरवक्त शत्रूंस दाबांत ठेवण्यास व हुसकून लावण्यास जें मोठें साह्य व्हावयाचें, तें सरदारांच्या मुलखासुद्धां सर्व राज्य एकवट केल्यानें केवळ एकाच्याच अकलेवर व सामर्थ्यावर अवलंबून राहावें लागल्यामुळें त्यास प्रसंगीं धोका येण्याची मोठी भीति असते. परंतु राघोबा भरारीस तें काय होय ! पाटीलबावांनीं आपल्या मुत्सद्यांच्या अनुमतानें साफ सांगितलें कीं, सरकारानें दुसरी हवी ती कामगिरी सांगावी, परंतु हें काम माझ्याकडून होण्यासारखें नाहीं. महादजींस ह्या स्वार्थपरतेचा त्वेष आला आणि पंकांत रुतलेल्या गाईप्रमाणें संकटांत सांपडलेल्या महासाध्वी अहिल्याबाईच्या विनंतीवरून तिच्या राज्याच्या रक्षणार्थ त्यांनीं आपली फौज इंदुरास नेली. ही फौज जिवबादादांनीं नेलेली असून ते इंदुरास बरेच दिवस राहिले होते. अहिल्याबाईनें भोंसले, गाईकवाड यांसही मदतीस बोलविलें होतें. त्याप्रमाणें तेही ससैन्य येऊन ठेपले. अहिल्याबाईच्या संकटावरून बाकी सरदार लोकांसही आपल्यावरील भावी प्रसंगाची अटकळ

झाल्यामुळें तिला मदत देण्याचे कामीं सर्वांची एकवाक्यता होणें साहजिक होतें. इतर सरदारां-पेक्षां शिंद्याचे फौजेचा होळकरांस मोठा पाठिंबा मिळाला. त्यांची फौज जय्यत असून जिवबादादां-सारखे पाणीदार सेनापति त्या राज्याच्या रक्षणार्थ टपून बसले होते. मग दादासाहेबांनीं जेव्हां हा रागरंग पाहिला, तेव्हां त्यांनीं निरुपायानें आपलें ह्मणणें मागें घेतलें. पुढें श्रीमंत माधवराव पेशव्यांनीं अहिल्याबाईच्या विनंतीप्रमाणें होळकरांची गादी तुकोजी नांवाच्या त्यांच्या जवळच्या वारसास दिली. याप्रमाणें बरोबरीच्या राजे लोकांनीं नेट धरिल्यामुळें होळकरांची गादी कायम राहून तुकोजीराव होळकर गादीचे मालक झाले. तुकोजीराव अहिल्याबाईपेक्षां वयानें मोठे असतां ते आपल्यास अहिल्याबाईचा पुत्र असें ह्मणवीत असत आणि शेवटपर्यंत तिच्या हुकुमांत वागून तिच्या मताप्रमाणें राज्यकारभार हाकीत असत. मग अहिल्याबाईनें तुकोजीरावांकडून ह्या सर्व सरदारांस एक मोठी मेजवानी देवविली. पुढें त्यांनीं निरोप मागितल्यावरून अत्यंत आभारपूर्वक त्यांस निरोप दिला. ह्याप्रमाणें होळकरांच्या गादीचें ह्या वेळीं रक्षण झालें. ह्मणून ती त्यांजकडे आजतागाईत निर्बाध चालली आहे.

मग शिंदे उज्जनीस जाऊन राज्यकारभार पाहूं लागल्यावर त्यांस मेवाड ऊर्फ उदेपूर एथें नवीन मुलूख मिळण्याचें राजकारण चालून आलें. मेवाडांत राज्य करीत असलेला राजसिंग नांवाचा राणा सन १७६२ त वारला. तेव्हां त्याची गादी त्याचा चुलता हरशी यानें बळकाविली. वास्तविक तो त्या गादीचा खरा वारस नव्हता, व त्याच्याविषयीं लोकमतही बरें नव्हतें. ह्मणून लोकांनीं रतनसिंग नामक राणा पुढें करून हरशीच्या विरुद्ध त्याची कमळनेर एथें स्थापना केली. पुढें ह्या दोहों पक्षांचीं आपसांत युद्धें सुरू होऊन दोघांही तक्तनशीनांनीं मदतीसाठीं शिंद्याकडे बोलणीं घातलीं. त्यांत रतनसिंगाचा पक्ष महादजींस खरासा वाटून त्यांनीं त्यास मदत देण्याचें कबूल केलें. परंतु हरशीनें रतनसिंगाविरुद्ध शिंद्याची आपल्यास मदत मिळविण्याकरितां त्यास सव्वा कोटी रुपये देण्याचें आमिष दाखविलें. ही देणगी जरी मोठी होती, तरी स्वीकृत सत्पक्ष सोडून हरशीच्या देणगीस ते भुलले नाहींत. हरशीस मदत देण्याचें नाकारून त्यांनीं वाटेस लाविलें. मग रतनसिंगाच्या मदतीसाठीं फौज घेऊन पाटीलबावा तिकडे गेले. कांहीं मुक्काम चालून एके ठिकाणीं तळ देऊन ते राहिले असतां हरशीच्या लष्कराचा त्यांजवर एकाएकीं छापा पडला. कांहीं आगा नसतां अकस्मात् छापा पडल्यामुळें शिंद्याच्या लष्कराचा कांहींसा बेत विसकटून त्यांस माघारें उज्जनीस यावें लागलें.

ह्याच संधीस राघो राम पागे व पाटीलबावा यांत वितुष्ट पडलें तो प्रकार असाः—महादजींच्या दरबारीं राघो राम पागे यांचें वजन मोठें होतें. हे शिंदे घराण्याचे मोठे अभिमानी असत. महादजींच्या कारकीर्दीपूर्वीं पुष्कळ वर्षांचे हे जुने सरदार असल्यामुळें त्या घराण्यांतील सर्वांच्या मानपानास व दर्जास ते जपून सर्वांस संतुष्ट राखीत. परंतु पुढें दत्ताजी शिंदे व जनकोजी शिंदे यांच्या बायका व पाटीलबावा यांजमध्यें प्रारंभीं कांहीं अल्प गोष्टीवरून वांकडें आलें. बायांचा पागे यांजवर विश्वास असे. ह्मणून राघो राम पागे यांनीं त्या उभय पक्षांचा समेट होण्याचा प्रयत्न केला. परंतु कांहीं उपयोग न होतां तें वितुष्ट वाढत चाललें. बायांच्या ह्मणण्यास कांहीं मान देऊन त्यांची समजूत करण्याची तडजोड पाटीलबावांनीं काढिली नाहीं, ही गोष्ट राघो राम पागे यांना आवडली नाहीं व अर्थातच त्यांचा बायांच्या पक्षाकडे जास्त ओढा झाला. असें परस्पर मन शुद्ध नसतां

एके दिवशीं राघो राम पागे यांजकडे जडावाचें काम केलेला एक कंबरपट्टा होता तो मागण्यासाठीं त्यांजकडे पाटीलबावांनीं एक जासूद पाठविला. पण तो देणें त्यांना आवडलें नाहीं. कारण शूर आहे तो प्रसंगीं स्वतः वापरावयाच्या वस्तु दुसऱ्यास देऊं इच्छित नाहीं. तेव्हां त्या जासुदास पागे ह्मणाले, 'आह्मी वापरायाचा कंबरपट्टा सरकारानें मागून न्यावा ही गोष्ट रीतीस बरी दिसत नाहीं.' आणि ते ह्मणाले, 'आज कंबरपट्टा मागितला, उद्यां एकाद्याची बायको चांगली वाटली ह्मणून तिचा अभिलाष होईल तेव्हां हें ठीक नाहीं.' इतकें बोलून कंबरपट्टा हुजऱ्यापाशीं दिला. हुजऱ्यानें हें सर्व बोलणें पाटीलबावांच्या कानावर घातलें. तेव्हां त्यांस मोठा राग येऊन त्यांनीं तो कंबरपट्टा तसाच पागे यांजकडे पाठविला. पूर्वीं बायांसंबंधानें कांहीं वितुष्ट होतेंच. त्यांत ही भर पडली! असें होतां होतां पुढें "शिंदे (महादजी) नवे सरदार, कारभारी वडिलांचे हातचे. त्यांचें यांचें न बने" ह्मणून उघडपणें राघो राम पागे, बाजी नरसिंह व राघो मल्हार ही मंडळी बायांच्या पक्षास मिळाली.[1]

याप्रमाणें शिंद्यांच्या दरबारीं दोन फळ्या झाल्या. पण ही गोष्ट मेवाडवाल्यांच्या पथ्यावर पडली. राणा हरसी हा आपला पक्ष प्रबल करण्याच्या विचारांत आहे, इतक्यांत अशी एक गोष्ट घडून आली कीं, कोट्याचे राजाचा प्रधान प्रसिद्ध झालिमसिंग ह्याचें व तेथील राजाचें कांहीं कारणानें वांकडें आल्यामुळें, तो तें दरबार सोडून मेवाडच्या राजाच्या आश्रयास आला. "तो शहाणा व कर्तृत्वी असल्याबद्दल त्याचा सर्व राजस्तानभर लौकिक होता. ह्मणून राणा हरशी यानें त्यास मोठ्या संतोषानें आपल्या पदरीं ठेविलें. याप्रमाणें झालिमसिंगाची उदेपूरच्या दरबारीं सोय जमली. नंतर त्याचे मसलतीनेंच राणा उरसी (हरशी) नें मराठ्यांचा सरदार रघु पागेवाला (राघो राम पागे) आणि दौलामियां ह्मणून एक मुसलमान सरदार होता तो, अशा दोघांना त्यांचे सैन्यासहवर्तमान सहायास बोलावून घेतलें."[2] पुढें पागे बायांच्या सांगण्यावरून हरसीस मदत देण्यासाठीं गेले. इकडे पाटीलबावा फौज सिद्ध करून हरसीच्या पारपत्यास जाऊं लागले. तेव्हां जनकोजी शिंदे यांच्या बायकोच्या सांगण्यावरून राघो राम पागे यांनीं त्यास अडथळा केला. तेव्हां उज्जन मुक्कामीं दत्ताच्या आखाड्यावर मोठी लढाई होऊन तींत पागे पडले.[3] पागयांच्या पडण्यासंबंधानें खरी हकीकत अशी कीं, ही लढाई भरांत आली असतां बावन पागे ह्मणून कोणी सारस्वत गृहस्थ सरदार होते त्यांनीं संधि साधून राघो राम पागे यांस ठार मारिलें. व डोकें महादजी शिंद्याकडे पाठविलें.[4] ह्या मोठ्या पराभवानें बायांचा पक्ष अगदीं खचला. व पुन त्यांच्या पक्षाचा अभिमान धरणारा कोणी मिळेना. ह्मणून त्या हालचाल सोडून पूर्ववत् पाटीलबावांच्याच ताब्यांत वागूं लागल्या.

या वेळीं पाटीलबावांच्या लष्कराची तयारी चांगली असून युद्धोपयोगी सामानसुमानाचा पुरवठाही भरपूर केलेला होता. सेनापति जिवबादादा यांनीं शत्रूस चांगला हात दाखवावा व शत्रूचा अचानकपणें केव्हांही छापा आला तरी सर्व लष्कर लढाईस जय्यत तयार राहावें ह्मणून त्याची उत्तम व्यवस्था ठेविली होती. ह्या लष्करांत रतनसिंगाचीही फौज होती. मग या फौजेशीं सामना देण्याकरितां हरशीही

१. होळकराची कैफीयत पृ. १०।११.

२. टॉडसाहेबकृत राजस्तानचा इतिहास व लोकहितवादिकृत उदेपूरचा इतिहास पृ. २१४.

३. होळकराची कैफीयत पृ. १०।११ व वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८०.

४. बावन पागे यांची कैफीयत, पत्र नं. ४२४. हे बावन पागे रामचंद्र नारायण पऱ्हाळकर हेच होत.

मोठ्या फौजेनिशीं दाखल झाला. लौकरच उभय पक्षांची मोठी लढाई झाली. तींत हरशीचा पूर्ण पराभव होऊन त्याचे पक्षपाती कांहीं राजे व सरदार पडले. रजपुतांच्या मोठ्या सैन्याची दाणादाण उडाली. या लढाईंत जिवबादादांच्या पराक्रमाची व त्यांच्या सेनापतित्वसंबंधीं कौशल्याची रजपुतांस पहिल्यानेंच ओळख पटली व त्यांना त्यांचा जो वचक बसला, तो शेवटपर्यंत दूर झाला नाहीं. मग राणा हरशी शिलक राहिलेल्या लोकांसहवर्तमान उदेपुरास निघून गेला.

हरशीस उदेपुराहून हुसकून द्यावें असा रतनसिंगाच्या पक्षपाती लोकांचा शिंद्यांस आग्रह पडल्यामुळें जिवबादादा आपली सर्व फौज घेऊन उदेपुरीं चाल करून गेले. तेथें पोहोंचल्यावर शहरास आपल्या फौजेचा गराडा देऊन एकलिंगाच्या डोंगरावरून शहरावर तोफांचा मारा चालविला. त्या तोफांच्या गोळ्यांनीं शहरांत अनर्थ माजला. शहरांतील लोक व हरशीची फौज, हीं गडबडून गेलीं. तरी हरशीनें आपली फौज सिद्ध करून मराठ्यांवर तोफांचा उलट मारा चालविलाच होता. जिवबादादांनीं आपल्या फौजेच्या कित्येक तुकड्या शूर सरदारांच्या ताब्यांत देऊन त्या शहरांतून बाहेर पडणाऱ्या रस्त्यांच्या नाक्यानाक्यांनीं ठेवून शहरांत चालणारी रहदारी बंद केली. हें वेढ्याचें काम बरेच दिवस चालल्यामुळें आंतील लोक सामानसुमानाच्या व अन्नाच्या तोट्यानें मेटाकुटीस आले. तरी अरवली डोंगरांतील काटक लोक त्यांस गुप्त मार्गानें साहित्य पुरवीत असत. यामुळें त्यांस बरेच दिवस नेट धरितां आला. तरी पुढें त्यांनीं मनांत आणिलें कीं, अशानें किती दिवस निभाव लागेल? शिवाय हरशीच्या फौजेंत सिंधप्रांतांतील लोकांचा भरणा होता; ते लोकही मनापासून लढेनात. अशा पंचाइतींत हरशी पडला असतां त्यास सुचलें कीं, आपला दिवाण अमरचंद ज्यावर इतराजी करून आपण त्यास दूर केलें आहे, त्यास या प्रसंगीं बोलावून आणून त्याची सल्ला घ्यावी. तो दिवाण चतुर व धोरणी असून, सर्व लोकांवर त्याचें विलक्षण वजन होतें. त्यास आणितांच त्यानें सर्व लोकांस उत्तेजन देऊन त्यांमध्यें जबरदस्त ईर्ष्या उत्पन्न केली आणि सर्व प्रकारची तयारी करवून लढाईचें काम नेटानें चालविलें. तेव्हां अर्थातच बाहेरील वेढा पुष्कळ दिवस ठेवावा लागला. तो तसाच कित्येक महिने पडला होता. बाहेरून नित्यशः तोफांच्या गोळ्यांची वृष्टि होऊं लागल्यामुळें आंतील लोकांचा व इमारतींचा पुष्कळ नाश होऊं लागला. त्याचप्रमाणें आंतील माऱ्यानें वेढ्यांतील मराठ्यांचे लोकही पुष्कळ मरून पडत व जायां होत. पण दिवसेंदिवस आंतील लोकांस तो कोंडमारा असह्य झाला. तेव्हां त्यांनीं तहाचें बोलणें सुरू केलें. इकडे रतनसिंगाकडून मदतीसंबंधानें खर्चास पैसा मिळेना. तेव्हां त्यांचें तहाचें बोलणें मान्य करावें असें त्यांनीं ठरविलें. तहांत अमरसिंग सत्तर लाख रुपये देण्यास कबूल झाला. पण रतनसिंगानें सल्ला दिली कीं, शहर खालीं कराल तर ह्याच्या चौपट द्रव्य सहज मिळेल. तें ऐकून पाटीलबावांस लोभ सुटून त्यांनीं आपली मागणी वाढविली. हें पाहून त्या अमरचंदास त्वेष येऊन त्यानें केलेला तहनामा फाडून त्याचे तुकडे महादजीकडे पाठवून दिले. तेव्हां पाटीलबावांनीं जाणलें, कीं शहर खालीं करण्यास आणखी कांहीं कालावधि लागेल, तोंपर्यंत खर्चही फार लागेल. तेव्हां हें भांडण असेंच रेंगाळत ठेवण्यांत अर्थ नाहीं, असें जाणून पाटीलबावांनीं तहास आपली मान्यता दिली. त्या वेळच्या पत्रांत "मेवाडची सल्ला होत आहे येथील जाबसाल उरकलेवर लष्करचें कुच होऊन उज्जनीकडे जातील" इतकाच ह्या बाबतीचा मजकूर आहे. शेवटीं साठ लाखांवर बोलणें ठरून पैकीं तेहतीस लक्ष रुपये रोख मिळाले व बाकी-

बद्दल मोरवण, निमच व जावडा हे प्रांत महादजींकडे रुपयांची फेड होईपर्यंत गहाण ठेविले. हा तह सन १७७० त झाला. हे प्रांत पुढें पाटीलबावांकडेसच राहिले. पुढें पाटीलबावांनीं मनांत आणिलें कीं, हे प्रांत जिवबादादांनीं पराक्रमानें काबीज केले असल्यामुळें ते त्यांच्याच तर्फेच्या मनुष्याकडे संपविणें बरें. ह्मणून त्या प्रांतावर शिवबानाना (जिवबादादांचे धाकटे बंधु) यांसच सुभे नेमिले[२]. पुढें ते त्याच सुभ्याच्या कामावर सन १७९० सालपर्यंत होते. त्या मुदतींत त्यांना हातांत तरवार धारण करून आपल्या ताब्यांतील प्रांताच्या रक्षणाचें काम करावें लागलें.

याच संधीस पाटीलबावांस दक्षिणेंत येणें भाग पडलें. कारण रघुनाथराव दादासाहेब पेशवे आणि श्रीमंत माधवराव पेशवे यांचें आपसांत पूर्वीपासून नीट नव्हतें. पेशव्यांस दादासाहेबांचीं बरींच कृत्यें पसंत नसत, व तशा कृत्यांशिवाय स्वस्थ बसणें दादासाहेबांना आवडत नव्हतें. ह्मणून त्यांस कैद करून त्यांचा बखेडा मोडावा, असा पेशव्यांचा बरेच दिवसांचा विचार होता. तरी परमावधि होईपर्यंत त्यांनीं गम खाल्ला होता. पण ह्या संधीस सखाराम बापू वगैरे दादासाहेबांच्या पक्षाच्या मंडळीनें त्यांस गादीवरील पेशव्यांविरुद्ध हितवाद सांगितल्यामुळें व खुद्द आनंदीबाईनें त्यांस राज्याचा हिस्सा अझून कां घेत नाहीं ह्मणून फार भंडावून सोडिल्यामुळें, रघुनाथरावाच्या मनांत अधिकारप्राप्तीची लालसा उत्पन्न झाली. शिवाय होळकराच्या व्यवस्थेंत आपलें कांहीं चालूं दिलें नाहीं, ह्मणून ते अगोदरच बेदिल झाले होते. तेव्हां दौलतीची वांटणी करून घेण्याकरितां भोंसले व गाईकवाड यांस अनुकूळ करून घेऊन बरीच फौज जमवून त्यांनीं पेशव्याशीं लढाई करण्याचा बेत केला. या कामीं दादासाहेबांचा व तत्पक्षपाती भोंसले वगैरे सरदारांचा नीट समाचार घेण्यासाठीं श्रीमंत माधवराव पेशव्यांनीं पाचारण केल्यामुळें महादजींस दक्षिणेंत यावें लागलें. शिंदे येऊन श्रीमंतांस मिळाल्यावर त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं त्यांस उत्कृष्ट मदत केली; आणि सन १७६८ त दादासाहेबांस कैद केलें. शिंद्यांच्या कामगारीवरून त्यांजवर पेशव्यांचा फार लोभ जडला. आणि त्यांनीं त्यांस आपल्या हुजूर पागेवर मुख्य सरदार नेमिलें, व दक्षिणेंत त्यांस कांहीं गांवही इनाम करून दिले. पुढें श्रीमंतांचा त्यांजवर इतका लोभ जडला कीं "दरबारांत हरएक कामांत त्यांची सल्लामसलत आधीं हवी लागे."[१]

शिवबानाना करकर आपल्या अधिकाराचें काम मोठ्या दक्षतेनें पाहत असत. परंतु त्यांना तेथील रजपूतांकडून फारच उपद्रव पोहोंचूं लागला. एकदा शिंद्यांची मोठी फौज जवळपास नाहीं, असें पाहून माळव्यांतील मंडोसर (मंडळेश्वर) च्या किल्ल्यास रजपुतांनीं वेढा घातला. त्या प्रसंगीं रजपूत संस्थानिकांच्या सैन्याची बरीच मोठी जमात असून शिवबानानाकडे चालचलाऊ कामापुरती फौज होती. तितक्यानें त्यांचा निभाव लागावा कसा ? असें होतें तरी त्यांनीं बरेच दिवस नेटानें युद्ध करून आपलें रक्षण केलें होतें. पण बाहेरील मोठ्या वेढ्यामुळें आंतील थोड्या लोकांचा तग निघणें कठीण होतें. शिवबानानावरील ह्या मोठ्या संकटाची बातमी अहिल्याबाई होळकरीण इजला लागल्यामुळें जिवबादादांनीं आपली गादी कायम राखण्यासंबंधानें पूर्वी आपल्यावर जे उपकार

१. ऑ. वि. र. नातूकृत महादजी शिंद्यांचें चरित्र पृ. ९९.

२. उदेपूरच्या इतिहास पृ. २४८.

३. म्यालेसनच्या हि. इतिहासाचें गो. कृत भाषांतर पृ. १५३.

केले होते व होळकर आणि शिंदे ह्यांचा जो स्नेहसंबंध चालत आला होता, त्यावर नजर देऊन तिनें ह्या आणीबाणीच्या प्रसंगीं तुळाजीराव शिंदे व श्रीभाई, या सरदारांबरोबर सैन्याची मोठी मदत पाठविली. त्या मदतीच्या साह्यानें शिवबानानांनीं शत्रूचा अगदीं पराभव करून त्यांस दूर हाकून लाविलें व राण्याचा मुख्य प्रधान मालदास मेहता यास ठार मारिलें. ह्याप्रमाणें शिवबानाना त्या प्रांताच्या रक्षणार्थ कष्टी मेहनत घेत असत. मेवाडप्रांतीं हे असेपर्यंत त्या प्रांताची व्यवस्था त्यांनीं चांगली ठेविली होती. ह्यांचें काम रयत व शिंदे सरकार, ह्यांस फार पसंत पडे. सरकारचें येणें वाजवी तेवढें रयतेस त्रास न देतां व तिजवर फाजील बोजा न टाकतां सोईसोईनें युक्तीच्या पोटीं वसूल करून हे त्यांची न्यायमनसुबी शहाणपणानें करीत असत. त्यामुळें हे तिकडे सर्वांस फारच प्रिय झाले होते. हे कोकणांत आपल्या मुलीच्या लग्नासाठीं आले होते तितक्या मुदतींत त्यांना येण्याविषयीं वारंवार बोलावणीं गेलीं. पुष्कळ कामें हे नसल्यामुळें खोळंबून राहिलीं व त्या प्रांतांतील रयतेचाही त्यांस लवकर येण्याबद्दलचा आग्रह पडला. या संबंधानें त्या वेळच्या पत्रांत पुढील मजकूर आढळतो:—"मेवाडचे मामलतीचा तुह्मी असतां बंदोबस्त करून गेलां त्याप्रमाणें (चाललें होतें नंतर) चिमण चौधुरी यास कैद केला × × × परभारेंचीं पत्रें मेवाडचीं येतात. व येथेंही राजकारण होऊन आलें होतें, असें प्रकरण तेथील आहे. येथें दरबारीं रुपयेची ओढ, मात्र कोठें अंतर पडेल तरी नाना प्रकारचा उपद्रव आहे. चिमण चौधुरी यास पत्रें चोहोंकडील आलीं होतीं. सोडावा असा चौंकडील आग्रह. परंतु तुह्मी आल्याशिवाय न सोडावा असें चित्तांत आलें. त्यावरून सोडला नाहीं. तुह्मीं आल्यावर जें होणें तें होईल. पाटील यांनीं सरकार हुंडे येथील मामलत चि. रा. बाळा (बाळाभाऊ बक्षी) स सांगितली. तुह्मांस घरीं जाऊन बहुत दिवस लागले. मुहूर्त करून निघून आलां असतां तरी उत्तम. नाहीं तरी पत्र पावतांच जलदीनें यावें. दुसरे मार्गीं काशिदास भेटी जाहली तरी उज्जनीवरून मेवाडांत जावें. आह्मीं येथून काशीद पाठविला. हा तुह्मांस वाटेंत भेटेल. मेवाडची सर्व भिस्त आपलेकडे. याकरितां सत्वर यावयाचें करावें × × × रा. दादा (जिवबादादा) ह्मणतात आपण परभारें मेवाडांत जावें, येविशीं पत्रें गेलींच आहेत. परंतु उज्जनीस आल्यावर तजवीज होईल ती खरी." अशा रीतीनें लोकप्रीति व राजप्रीति संपादून व शहामतीनें प्रांताचें रक्षण करून शिवबानानांनीं मेवाडांत मोठा लौकिक मिळविला. या "स्वारींत सांपडली तेवढी हरएक संधी साधून त्याणें नर्मदेच्या उत्तर प्रदेशीं आपला दरारा चांगला बसविला." ही त्यांची झालेली कीर्ति अगदीं योग्य होती.

याप्रमाणें मेवाडांत मुलूख संपादून तेथील अंमल पक्का केल्यावर शिंद्याचें लक्ष त्याच्या आजूबाजूच्या प्रांताकडे वेधलें. राजपुतान्यांत रजपुतांच्या मुलखास व सत्तेस कोणीं धक्का लाविला तर सर्व रजपूत राजांस त्याबद्दलचा अभिमान उत्पन्न होऊन ते त्या गोष्टीच्या प्रतीकारार्थ सवड शोधीत असत. अशी तेजस्विता त्या काळीं तेथें नांदत होती. अर्थातच शिंद्याचा तेथील अंमल त्या संस्थानिकांस दुःसह वाटूं लागला. तसेंच त्या संस्थानिकांचीं आपसांत मोठीं वैमनस्यें असल्यामुळें विशेष प्रसंगीं त्यांची ती ऐक्यत्वाच्या अभिमानाची वृत्ति मावळून ते आपसांत तंटे करीत व युद्धें

१. टाडकृत राज. इति. व उदेपूरचा इति. पृ. २४९.

२. पहा पत्र नंबर १.

३. ग्यालेसनच्या इतिहासाचें भाषांतर पृ. १५२.

माजवीत. त्यामुळें शिंद्याच्या तेथील सत्तेस व खंडण्यांच्या वसुलास हरकती होत. शिवाय रांगडे, जाट वगैरे त्या प्रांतांतील संस्थानिक व जमेदार मराठ्यांशीं वैरभाव ठेवीत. त्यामुळें तिकडे नेहमीं कट्टया तयारीनें ससैन्य सरदार ठेविल्यावांचून मुळींच निभाव लागत नसे. खंडण्या वगैरे बाबतीचें उत्पन्न होत नसे, ह्यांत विशेष नाहीं; पण मराठ्यांच्या तिकडील मुलखांस पाणिपतच्या लढाईपासून त्यांचा पुष्कळ उपद्रव पोहोंचूं लागला. ही गोष्ट बिलकूल उपेक्षणीय नव्हती. ह्या वेळीं प्रसंग अशा प्रकारचा होता कीं, शिंद्यांनीं पूर्वीं मोठमोठे पराक्रम करून आपल्या मूळ राज्याबाहेर जे प्रांत, खंडण्या व हक्क संपादिले होते, त्यांची विशेष आशा न बाळगितां जागच्या जागीं राहून प्रबल शत्रूंच्या तडाक्यांतून जो मुलूख राहील, तो उपभोगून स्वस्थ असावें एक, किंवा स्वराज्यसंरक्षणार्थ व पूर्वीं संपादिलेल्या खंडण्या, हक्क इत्यादिकांच्या रक्षणार्थ निवडक शूर फौज ठेवून व शूर सरदार जवळ बाळगून आपलें महत्त्व, वैभव व दरारा कायम ठेवण्यासाठीं शत्रूंच्या मणगटाशीं मणगट घांसण्यास तयार असावें एक. यांतून पाटीलबावांनीं दुसरी बाजू पसंत केली. खरेंच, जो आपलें वैभव वाढविण्याचा-निदान आहे तें चांगल्या स्थितींत राखण्याचा-झटून प्रयत्न करीत नाहीं, त्याचें तें वैभव दिवसेंदिवस क्षीण होत गेलेंच पाहिजे. पाटीलबावांनीं जी ही बाजू पसंत केली, ती सिद्धीस नेणारीं चांगल्या योग्यतेचीं माणसें त्यांना प्राप्त झालीं, हेंच त्यांच्या अभ्युदयास-किंबहुना त्या काळच्या मराठेशाहीच्या अभ्युदयास-कारण झालें. हें कसें, तें वाचकांस खुलासेवार आतां कळणार आहे.

पुढें पाटीलबावांनीं तिकडील राजेरजवाड्यांकडे खंडण्यांच्या वसुलासाठीं रीतीप्रमाणें स्वार, शिलेदार वगैरे पाठविले. परंतु सोईचीं उत्तरें न मिळतां त्यांना बहुतेकांनीं पिटाळून लाविलें. त्यामुळें जिवबादादांस लष्करासहित तिकडे जावें लागलें. या वेळीं त्यांजबरोबर यशवंतराव शिवाजी वागळे व देवजी गौळी हे शूर सरदार होते[१]. जिवबादादांनीं पहिल्यानें शेरच्या किल्यास वेढा देऊन मोर्चे बांधून तोफ चालविली. तेव्हां आंतील किल्लेकऱ्यांनीं उलट तोफ चालवून बाहेरील शत्रूस प्रतिकार करण्याचा यत्न केला. परंतु शिंद्याच्या तोफखान्याची आग मोठी! त्यांपुढें इलाज चालेना. शेवटीं जिवबादादांनीं काय केलें, तें तिकडून आलेल्या पत्रांतील भाषेनेंच सांगतों:—"पतकांतील (जिवबादादांच्या पतकांतील) वर्तमान शेरीच्या (शेरगडच्या) किल्यावर श्रीमंत यजमान साहेबांचें निशाण चढलें. किला हस्तगत जाहाला. किलेदार राजश्री देवजी गंवू (गौळी) तूर्त ठेविले. किल्यावर आपल्या पतकांतील जाधव बारगीर आहे. तूर्तकाळीं किला आपले स्वाधीन आहे." याप्रमाणें किल्ला सर झाल्यावर किल्याखालील मुलखावर अंमल करून तेथें शिबंदी नेमिली. व मुलखाच्या बंदोबस्ताकरितां बळवंतराव रघुनाथ दळवी व शिधोजी गौळी, असे दोन योग्य कामगार नेमून जिवबादादांनीं फौजेसहित आपला मोर्चा दुसरीकडे वळविला. परंतु शेरगडचें वर्तमान ऐकून शिंद्याच्या पराक्रमी फौजेशीं सामना करून आपलें सर्वस्वी नुकसान करून घेण्यास संस्थानिक धजेनात. त्यांनीं मनांत युक्ति योजिली कीं, सध्या खंडणीचा थोडाबहुत ऐवज देऊन जिवबादादांची कशी तरी समाधानी करून त्यांस मार्गस्थ करावें, आणि पुढें सवड मिळेल तेव्हां शिंद्याचें वर्चस्व झुगारून द्यावें! याप्रमाणें संस्थानिकांनीं खंडण्यांची तोड काढितांच जिवबादादांनीं मराठ्यांचे तिकडील हक्क ताजे करून व मेवाड आणि माळवा, या प्रांतांत

१।२. पत्र नंबर १.

तमाम अंमल बसवून, ते उत्तरेकडे जाण्यास निघाले. उत्तरेकडे त्यांना काय कामगारी होती ती पत्रावरूनच देतों:–" तूर्त यजमानाची स्वारी नरवरवाल्याचें पारपत्य करून खंडणी घेऊन गोहदवाल्या राण्याच्या गळ्या घेऊन राण्याचें पारिपत्य करून ग्वाल्हेर घ्यावी, हें मानस आहे." याप्रमाणें त्या कामगारीवर जिवबादादा फौजेसह निघाले.

पाणिपतच्या नाशापासून मराठ्यांकडे घडून आलेले दुष्परिणाम त्यांना बराच काळ भोंवले. त्यांतच गोहदवाला जाट मूळचा एक जमीदार, केवळ मराठ्यांच्याच कृपेनें वाढलेला असतां, ती स्वार्थसाधनाची संधि साधून त्यानें चोहोंकडे पाय पसरून आपलें ग्वाल्हेरचें राज्य फार विस्तृत केलें. तो मराठ्यांस मोजीना व त्यापासून पुढें पुढें मराठ्यांस फार त्रास पोहोंचूं लागला. ह्मणून राघोबादादांनीं त्या महायुद्धाचे दुसरे वर्षीं हिंदुस्थानांत स्वाऱ्या केल्या. त्या वेळापासून त्या उद्धट जाटाशीं कित्येक वेळां (सन १७६२–६६) युद्धप्रसंग करून शेवटीं त्याचे ताब्यांतील ग्वाल्हेरचा किल्ला हातीं येत नाहीं असें पाहून, त्यापासून खर्च घेऊन तें असाध्य काम सोडून दिलें[2]. परंतु ह्या वेळापासून राण्याची उमेद न खचतां मराठ्यांचे शक्तीचा अजमास जाणून तो अधिकच शेफारला. त्याचा उपद्रव दतिया, झांशी, ओडसें, नरवर, सबळगड वगैरे प्रांतांत अतिशय होऊन तेथें त्यानें रयत पिळून काढिली. व त्याचे नातवाईकांनीं वरील प्रांतांत निरनिराळीं संस्थानें स्थापिलीं. ह्या सर्वांनीं फौजफांटा पुष्कळ ठेवून उत्तरेकडील मराठ्यांची सत्ता नामशेष केली. तेव्हां गोहदवाल्याचा हा शिरजोरपणा असाच चालूं द्यावा कीं त्याजबरोबर युद्ध करून त्याची रग जिरवावी, याविषयीं पाटीलबावा व जिवबादादा यांचीं खलबतें चाललीं. त्यांत जिवबादादांनीं सांगितलें 'जाटाचें प्राबल्य आज एवढें आहे. ह्याची ह्या वेळीं उपेक्षा केली, तर पुढें त्यापासून आपल्या प्रांताचें रक्षण करणें व आपले तिकडील हक्क राखणें कठीण जाईल. आतां जाट फार प्रबल आहेत आणि त्यांस वठणीस आणावयास पुष्कळ प्रयास पडतील व त्या कामीं द्रव्य व मनुष्येंही खपतील, हें खरें. तरी अशा विचारानें माघार घेतल्यास आपलें असलेलें राज्यही सुखानें भोगतां येईल, असें समजतां नये. हें काम बिकट खरें, तरी सरकारास पसंत पडल्यास लढाईची सारी जोखीम मी पतकरतों. आपण लागेल ती मदत मात्र पुरवावी. लढाईतील परिणामाविषयीं आपण बेफिकीर असावें.' असें जिवबादादांचें उत्साहाचें भाषण ऐकतांच पाटीलबावांस आनंद होऊन त्यांनीं लढाईची सर्व सिद्धता चालविली. जाटाची शक्ति मोठी, त्याच्या भाऊबंदांचें त्यास पाठबळही मोठें आणि ग्वाल्हेरचा किल्ला अतिशय मजबूद, ह्मणून अजिंक्य. यासाठीं वरील मोहिमेंत साहित्य तसेंच पाहिजे होतें. ह्मणून जिवबादादांनीं फौजेंत जारीनें सुधारणा चालविली. पाहिजे होते तितके नवे लोक ठेवून सर्व फौज युद्धकलेंत निष्णात होण्याकरितां त्यांना निरनिराळ्या युद्धप्रसंगाच्या तालमी सुरू केल्या. अनेक प्रकारच्या लहानमोठ्या तोफा, जेजाला, सुतरनाळा, कडाबिनी,

---

१. पत्र नंबर १.

२. होळकराची कैफीयत पृ. ३२।३४ व ग्रांट डफचा इतिहास. तसेंच नातूकृत महादजीचें च. पृ. ९४ व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांची कारकीर्द पृ. १५. ह्या लढाईंत रघुनाथरावदादा यांच्या फौजेची फार हलाखी झाली, सर्व सरदारांनीं उरलेल्या सैन्यासह माघारा पाय घेतला. "परंतु चांगलें सामान शिंद्याचें आहे (होतें). शिंद्यास दहा लक्षांची जहागीर नवी तिकडे दिली." ऐतिहासिक लेखसंग्रह मा० पु. अंक २८, पृ. ३०८७, स. १८९९, ता. १ आक्टोबरचें पत्र १७६६.

बंदुका वगैरे मारक अग्नियंत्रें व अनेक प्रकारचीं शस्त्रास्त्रें व दारूगोळा यांचा ठिकठिकाणीं चांगल्या बंदोबस्तानें भरपूर पुरवठा करून ठेविला. जिवबादादांच्या तालमींतली फौज युद्धाच्या कामीं बिलकूल डगमगणारी नसे. चांगल्या युद्धशिक्षणामुळें तिच्यांत जोम अतिशयित असे. त्यांच्या प्रत्येक हुकुमाचा अंमल बिनचूक व लागलाच होत असल्यामुळें आणि सामुग्रीची व निवडक अधिकाऱ्यांची तूट कधींच पडत नसल्यामुळें युद्धांत फत्ते त्यांचीच होत असे, हें प्रत्येक लढाईच्या उत्कृष्ट परिणामावरून दिसून येई.

मग जिवबादादांनीं जाटांच्या मुलखीं त्यांचे किल्ले, त्यांचा फौजफांटा, त्यांतील रस्ते, नाक्याच्या जागा वगैरे संबंधानें यच्चयावत् माहिती मिळविण्याकरितां कांहीं हुषार लोक निरनिराळया धंद्यांच्या निमित्तानें पाठविले. त्यामुळें तिकडील कच्ची माहिती वेळोवेळ त्यांना मिळूं लागली. मग पाटीलबावांकडे जाऊन त्यांनीं त्यांना आपला पुढील बेत समजाविला. ते ह्मणाले, 'गोहदवाला जाट सर्व जाट संस्थानिकांत फार प्रबल आहे. शिवाय त्याच्या ताब्यांतील ग्वालेहरचा किल्ला फार मोठा असून तो अतिशयित मजबूद आहे. तेव्हां प्रथमतः लहान लहान संस्थानिकांची खबर घेऊन मग त्या प्रबल शत्रूवर हात टाकावा असें मीं योजिलें आहे. आणि हाच विचार श्रीमंतांनीं पसंत करावा अशी मी सल्ला देतों. ज्याप्रमाणें एकादा मोठा सणाटा वृक्ष तोडावयाचा असला ह्मणजे अगोदर त्या भोंवतालची झाडी तोडितात व मग त्याच्या फांद्या तोडून त्याला मोकळा करितात आणि एकदम मधलें खोड तोडण्याचें आरंभिल्यास फार मेहनत पडून काम पलयांत येत नाहीं ह्मणून शेवटीं त्याच्या मुळावर घाव घालितात, त्याचप्रमाणें लहानसहान गढ्या, गड घेऊन मग मोठ्या किल्ल्यास हात घालावा असा माझा विचार आहे.' पाटीलबावांनीं दादांची ही मसलत मान्य केली. आणि ते ह्मणाले, 'तुह्मीं विचारपूर्वक ठरविलेली मसलत अगदीं बरोबर लागू पडण्यासारखी आहे. हिंमत आणि अक्कल यांच्या जोडगोळीनेंच शत्रूंचीं ठाणीं हस्तगत व्हावयाचीं. आतां तुह्मी चांगल्या बंदोबस्तानें फौज घेऊन निघा, मागून पाहिजे तें साहित्य होण्यास इकडून विलंब लागणार नाहीं.' मग श्रीमंतांचा प्रेमपुरःसर निरोप घेऊन व नम्र भावानें त्यांस मुजरा करून सन १७६७ च्या अखेर जिवबादादा पुढील कार्यभागास निघाले.

जिवबादादा पहिल्यानें नरवरवाला राणा जाट, याच्या मुलखावर चाल करून गेले. शिंद्याची फौज जाटांच्या पारपत्यासाठीं तयार होत आहे, ह्याची त्या सर्व संस्थानिकांस आगाऊ बातमी होतीच. नंतर हे चालून येतांच नरवरवाला आपल्या किल्ल्यांत सर्व सिद्धता ठेवून व आजूबाजूच्या संस्थानिकांस मदत पाठविण्याविषयीं कळवून शत्रूंची मार्गप्रतीक्षा करीत राहिला.

मग शहराबाहेर बऱ्याच अंतरावर आपल्या सैन्याची छावणी देऊन फौजेच्या कांहीं टोळ्या घेऊन जिवबादादांनीं किल्ल्यास वेढा दिला. आणि मोर्चे बांधून त्यांवरून तोफांची मारगिरी सुरू केली. राण्यानेंही किल्ल्यांतून उलट तोफ चालविली. अशा रीतीनें कांहीं दिवस लढाई चालली. परंतु बाहेरून सुटणाऱ्या लाल गोळ्यांच्या वृष्टीस खळ ह्मणून पडेना. आणि तोफखान्यावरील ठेविलेले लोक वरचेवर मरूं लागल्यामुळें राण्याचा तोफखाना बंद पडूं लागला. बाहेरून सुरू असलेल्या भयंकर आगीनें आंतील सैन्य खपत चाललें. नरवरवाल्यास वरचेवर मदतीसाठीं फौजा येत होत्या. परंतु जिवबादादांनीं शहराबाहेर ठेविलेल्या फौजेंतील सरदार त्यांचा यथास्थित समाचार घेत असत. यामुळें राण्याचा इलाज चालेनासा झाला. अशा प्रकारें शत्रूस दुर्बल करून जिवबा-

दादांनीं शिंद्याचें निशाण किल्ल्यावर चढवून आंतील लोकांस हाकून लाविलें. तेव्हां राणा शिंद्याचा अंकित झाला. जिवबादादांनीं तो सारा मुलूख खालसा करून ठिकठिकाणीं आपल्या तर्फे अंमलदार नेमून व्यवस्था लाविली. व सर्व रयतेस धीर देऊन शिंद्याकडून तुमचें यथान्याय रक्षण होईल, अशाबद्दल त्यांची खातरी केली. आणि आपल्या फौजेची छावणी नरवरांत केली.

पुढें छावणी तेथेंच ठेवून जिवबादादांनीं जाटांच्या बाकी प्रांतांतील गढ्या, खोरीं घेण्याचा सपाटा चालविला. त्या संस्थानिकांनीं पुष्कळ धडपड केली, तरी शिंद्याच्या अतुल सामर्थ्यापुढें त्यांचा निभाव लागला नाहीं. जिवबादादांनीं आपल्या फौजेच्या टोळ्या त्या प्रांतांत सर्वत्र पसरून शत्रुपक्षाकडील एकमेकांच्या मदतीस जाणाऱ्या फौजांची गांठ ह्मणून पडूं दिली नाहीं. शिवाय जाटांतील प्रमुख संस्थानिक गोहदवाला जाट राणा लकिंदरसिंग, हा शिंद्याचें सामर्थ्य जाणून आपल्या मदतीसाठीं कित्येक संस्थानिकांची निवडक फौज घेऊन अजिंक्य मानलेल्या ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत कडेया तयारीनिशीं शत्रूची वाट पहात बसला होता. जाट राजांची बहुतेक शक्ति तेथेंच एकवटलेली असल्याकारणानें इतर संस्थानिकांत प्रतिकारसामर्थ्य बेताचेंच राहिलें होतें. ह्मणून जिवबादादांस त्यांस जिंकून त्या त्या प्रांतांत शिंद्याचा अंमल स्थापण्यास विशेष प्रयास पडले नाहींत. तरी त्यांना पक्कें माहीत होतें कीं, गोहदवाल्या जाटाशीं जो लौकरच युद्धप्रसंग व्हावयाचा, त्यांत उभयतांचा युद्धकंडु शमन होण्याची वेळ प्राप्त होऊन ह्याचा वचपा निघणार आहे. आणि याविषयींचेच विचार त्यांचे मनांत एकसारखे घोळत होते.

याप्रमाणें हा वेळपर्यंत लढाया करून जिवबादादांनीं ग्वाल्हेर प्रांत शिवाय करून जाट लोकांच्या बाकी बहुतेक साऱ्या गढ्यानगढ्या घेऊन, ते गोहदवाल्या जाटाशीं सामना देण्यास निघाले. प्रथमतः गोहदच्या किल्ल्यावर राण्याची तयारी केवढी आहे, ह्याचा अजमास काढिला. लकिंदरसिंगानें तेथें कांहीं फौजफांटा व दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामान एका सरदाराच्या ताब्यांत ठेवून तेथील बंदोबस्त केला होता. तेव्हां तो किल्ला ताब्यांत घेण्याचा त्यांनीं उद्योग चालविला. किल्लेदारानेंही तोफांची मारगिरी चालू करून बरेच दिवस किल्ला भांडविला. पण जिवबादादांनीं नेटानें युद्ध चालवून किल्ल्यावर शिंद्यांचें निशाण फडकविलें. गोहदचा किल्ला शत्रूंच्या हातीं जाणार ही जाटांची खातरीच होती, तरी ते ग्वाल्हेरच्या आपल्या जंगी तयारीच्या उमेदींत स्वस्थ होते. ग्वाल्हेरचा किल्ला अजस्र असून, रघुनाथराव दादासाहेब पेशवे, सरदारांच्या फौजांसह पुष्कळ काळपर्यंत निर्वाण मांडून बसले असतां त्यांनाही जो हस्तगत झाला नाहीं, तो एकट्या शिंद्याच्या हातीं जाईल, असें जाटांस मुळींच वाटलें नाहीं. ग्वाल्हेरचा किल्ला घेण्यास बाहेरून मारगिरी कोणीकडून चालविली पाहिजे, हें बरेच दिवस कळेना. पुढें जिवबादादांनीं एक माऱ्याची जागा शोधून काढिली. त्या किल्ल्याच्या एका अंगानें एक टेंकडी होती. ती माऱ्यास सोईची नव्हती तरी तिजवर दीड पुरुष उंचीचा भराव घातल्यास त्यावरून किल्ल्यावर बरोबर तोफ लागू करितां येईल, असा त्यांनीं रात्रीचे प्रसंगीं तेथें जाऊन अजमास केला. मग शिपाई लोकांस पैशाची लालुच दाखवून त्यांनी खालून एकेक टोपली माती वर—त्या ठरविलेल्या ठिकाणीं—नेऊन टाकून प्रत्येकीं तीन तीन रुपये द्यावे असें ठरविलें. काम फार अडचणीचें, दीर्घ श्रमाचें, असून प्रसंग जिवावरचा होता. तरी त्या कामास हजारों लोकांनीं कंबर बांधिली व रात्रीच्या रात्रींत तो भराव पुरा करून त्यावर तोफा चढविल्या. ह्या कामीं खर्च पुष्कळ आला तरी काम मोठें नामी झालें. मग हवी तेवढी फौज वर चढवून बाकी फौजेचा कि-

ह्याभोवतीं वेढा दिला आणि तोफखान्याचा जबरदस्त मारा सुरू केला. किल्ल्यांतील लोकांस ह्या नवीन कामगारीची कांहींच हवाल ठाऊक नव्हती. एकाएकीं शिंद्याच्या जिनसी तोफांचे गोळे आंत अचूक येऊन पडूं लागतांच ते चकित झाले ! त्यांनींही लागलाच मारा सुरू केला आणि अशा रीतीनें उभय पक्षांकडून कडाक्याचें युद्ध सुरू झालें. जिवबादादांचे प्रतिस्पर्धी जाट सामान्य नव्हते. त्यांची तयारी उत्कृष्ट होती व आश्रयस्थान बिनमोल होतें. तेव्हां अर्थातच हें युद्ध बरेच दिवस लांबलें. या नवीन तयार केलेल्या माऱ्याच्या जाग्यावरून तोफांचे गोळे नेमके किल्ल्यांत पडत त्यामुळें आंतील पुष्कळ लोक मरून पडत व जायबंदी होत. अशा रीतीनें नाश होत असतांही जाटांनीं धैर्य धरून लढाई चालविलीच होती. परंतु लकिंदरसिंग लढाईची व्यवस्था लावीत किल्ल्यांतून फिरत असतां अकस्मात् तोफेचा गोळा लागून मरण पावला. त्यामुळें त्याच्या लोकांत मोठा आकांत झाला. लढाईची एवढी घटना घडवून आणणारा शूर व मसलती मुख्य जाट राजा मरण पावतांच बाकीचे लोक गडबडून गेले आणि लढाईचें काम ढिलें पडलें. ती संधि साधून जिवबादादांनीं आपल्या फौजेंतील शूर व काटक लोकांस हरप्रयत्नानें किल्ल्यावर चढून जाण्यास हुकूम केला. हल्लीं त्या किल्ल्यावर चढून जाण्यास जी सोई आहे, ती त्या वेळीं नव्हती आणि तशा प्रसंगीं वर जाणें ह्मणजे रणदेवतेस प्राण बलि देणें होतें. परंतु शिर हातांत घेऊन अत्यंत साहस केल्याशिवाय किल्ला हातीं येणें शक्य नव्हतें. ते जवानमर्द वीर जिवाची परवा न करितां मोठ्या तजविजीनें भराभर वर चढूं लागले. जिवबादादांनीं हत्यारबंद लोकांची एक टोळी किल्ल्याचे पायथ्याशीं खडी उभी करून ठेविली आणि त्यांस बजाविलें कीं, किल्ल्यांतून खालीं उतरेल त्यास तत्काल तोडून टाका. मग ते शत्रूकडील लोक असोत किंवा आपले शिपाई असोत. याप्रमाणें वर चढून जाण्यासाठीं शूर लोकांच्या टोळ्या तयार आहेत, ते लोक आपलें काम धैर्यानें बजावताहेत आणि डोंगरावरून तोफांचे एकसारखे गोळे येऊन आंतील लोकांचा फडशा पडत आहे. इतक्यांत किल्ल्यांतील लोकांनीं वर चढून गेलेल्या मराठ्यांच्या लोकांस पाहतांच जाणलें कीं, शत्रूनें वेळ साधिली. आतां वर राहून आपला निभाव लागणार नाहीं ह्मणून त्यांनीं दरवाजे खुले करून खालीं उतरून लढाई सुरू करावी असा निश्चय केला. "किल्ल्यांत फौज सर करून पांचलीं. निघून जाण्यास मार्ग नाहीं असें जाणून त्याचे जातवाले व कुटुंबी एक जातीचे पांचशें मनुष्य व दहा हजार लोक किल्ल्यावर होता. राण्यानें महालाचे दरवाजे उघडून बाहेर निघून लढाई करून तितकेही तरवार करून मेले. तीन हजार मनुष्य कट्टा होऊन मेले. अशा तऱ्हेनें कट्टा केलों." याप्रमाणें निकराची लढाई होऊन जाटांचा पराभव झाला. मग किल्ल्यावर चढून जिवबादादांनीं शिंद्याचें निशाण वर लावविलें. किल्ला हस्तगत होतांच गोहदवाल्याचीं जीं जीं ठाणीं होतीं, तीं तीं स्वाधीन करून घेण्यासाठीं ते निघाले. मुख्य सैन्याची वाताहत झाल्यावर बाकी जाट लोक साहजिकच हतवीर्य झाले होते. ह्मणून ह्या प्रचंड सैन्याबरोबर सामना देण्यास त्यांत ताकद थोडीच राहिली होती. त्यामुळें यांस लढाई करून हाकून लावण्यास जिवबादादांस कांहीं प्रयास पडले नाहींत. मग त्यांनीं गोहदवाल्या जाटाच्या गढ्या व किल्ले घेण्याची सुरुवात केली. सबळगड, बागचिनी, आंत्री, तवर, घार, पहाडगड, मानगड, सीकरवारी, खेची,

१. हा राणा ह्मणजे लकिंदरसिंग राण्याचा वारस होय. हा त्याचे जागीं अधिकारारूढ झालेला होता. २. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८०।८१. ३. "ग्वाल्हेरचा किल्ला लकिंदरसिंगाच्या ताब्यांतून कोणत्या सालीं गेला, हें पक्कें कळत नाहीं. परंतु तो याच सुमारास (१७६७) गेला असावा. तो शिंद्याच्या हातीं लागला." ग्वाले. इति. पृ. १००.

अहिरवाडा, शहाबाद, बजरंगड वगैरे "ग्वालेरचे चाळीस महालांत गांवोंगांवीं लढाऊ गड त्याशिवाय चाळीस मोठे किल्ले ते जंग करून खालीं करून आपले शिंदे सरकारचे अमल कायम बसविले[१]." अशा रीतीनें राण्याचा सर्व प्रांत काबीज करून त्या त्या ठिकाणीं आपले लोक नेमून तेथील बंदोबस्त यथास्थित केला. यापुढें जाट संस्थानिकांत कांहींच दम राहिला नाहीं.

याप्रमाणें जिवबादादांनीं हें महत्कृत्य सिद्धीस नेऊन जाटांचा कायमचा बंदोबस्त करून टाकिला आणि शिंद्याचे राज्यास एक मोठा प्रांत जोडिला. त्यामुळें शिंद्याचें वैभव फार वाढलें. येणेंकरून पाटीलबावांची जिवबादादांवर मर्जी बसली इतकेंच नव्हे, तर त्यांची सर्वत्र कीर्ति पसरली. कारण हें संपादित वैभव सामान्य नव्हतें व त्या वेळीं त्यांनीं जो पराक्रम केला, तो तर असामान्य होता. "ग्वाल्हेरीखालीं चाळीस महाल पांसष्ट लक्षांसी जमा. इतका मुलुख प्रथम घेतला. तेथें जिवबादादांचे पराक्रमाचा लौकिक, यश आणि कीर्ति देशोदेशांतरीं लोकांनीं ऐकिली." ह्या त्यांच्या पराक्रमानें फार खूष होऊन "शिंदे सरकार महादजीबावानें सर्व फौजेचे सेनापत्यास बक्षीगीर असें नामाभिधान आहे ते बक्षीगिरी त्या वेळीं जिवबादादांस दिली. आणि बहुत गौरव केला[२]."

पाणिपतच्या लढाईमुळें मराठ्यांची उत्तरेकडील सत्ता बहुतेक नष्ट झाल्यासारखीच होती, ती पुनः स्थापित करून पूर्ववत् बस बसवावा आणि याप्रमाणें उत्तर प्रांतीं आपला दरारा बसवून साधल्यास पुढें हिंदुस्थानची हद्द ओलांडून गिलचांस चांगला हात दाखवावा, असे विचार श्रीमंत माधवराव साहेब पेशवे यांच्या चित्तांत नेहमीं घोळत असत. मग हें कार्य साधण्यासाठीं त्यांनीं विसाजी कृष्ण बिनीवाले व रामचंद्र गणेश कानडे, यांजबराबर बरीच फौज देऊन त्यांस सन १७६९ सालीं हिंदुस्थानांत पाठविलें. आणि महादजी शिंदे व तुकोजी होळकर, यांस फौजेसहित त्यांना मदत करावी ह्मणून लिहिलें. पुढें ही फौज हिंदुस्थानांत गेल्यावर संकेताप्रमाणें पाटीलबावा व होळकर, हे सैन्यासहवर्तमान त्यांस जाऊन मिळाले. ह्या मराठ्यांच्या स्वारींत शिंद्याची फौज पुष्कळ असून त्या वेळीं घडून आलेल्या सर्व गोष्टी त्यांच्याच शक्तीवर अवलंबून असत. सेनापति जिवबादादाच ह्या प्रसंगीं बरोबर होते. ही एकंदर फौज पन्नास हजारांवर होती. अगोदर दिल्लीस जाऊन तिकडील कारभार हाताखालीं घालावा, असा पहिल्यानें बेत केला होता. परंतु पुढें दुसरा बेत ठरला कीं, रजपूत राजे पाणिपतच्या लढाईपासून देत आल्या वहिवाटीप्रमाणें खंडण्या न देतां आपआपल्या ठिकाणीं बळावून आहेत. ते मराठ्यांस न जुमानतां त्यांची सत्ता उलथून पाडण्यासाठीं टपून आहेत. ह्मणून अगोदर त्यांजवर स्वाऱ्या करून त्यांस चांगला हात दाखवावा व पूर्ववत् खंडण्या सुरू करून मग दिल्लीकडे जावें. अशा संकल्पानें ते रजपुतस्थानाकडे वळले. ही जंगी स्वारी पाहून रजपुत राजे प्रबल मराठ्यांपुढें आपलें काहीं चालावयाचें नाहीं, असें मनांत समजले. तरी त्यांनीं प्रतीकार करण्यासाठीं कांहीं खटपट करून पाहिली. पण त्या हालचालीपासून त्यांना उपयोग होण्याचें चिन्ह कांहींच दिसेना ह्मणून त्यांनीं मराठ्यांचें वर्चस्व कबूल करून पूर्ववत् खंडण्या देण्यास हरकती आणिल्या नाहींत. मग प्रत्येक रजपूत राजाशीं त्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें वेगवेगळा ठराव केला.

१ । २. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८१. ३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८१ व पत्र नंबर १. जिवबादादांस बक्षीगिरी पूर्वींच मिळाली होती, ती या वेळीं गौरवानें प्रसिद्ध केली इतकेंच. पूर्वींही शिंद्यांचे फौजांवर मुख्य सरदार हेच होते. परंतु बक्षी हें अधिकारपद देण्याइतकें त्या वेळीं वैभव नव्हतें.

त्या संस्थानांच्या तपशीलः—

१ मारवाड ऊर्फ जोधपूर	५ बुंदी	९ केरवली	१२ डोंगरपुर	१६ चंदेरी
२ मेवाड ऊर्फ उदेपूर*	६ बिकानीर	१० कृष्णगड ऊर्फ किशेनगर	१३ अलवर	१७ भेदोर
३ जयपूर ऊर्फ जयनगर	७ झालवाडा		१४ शिरोही	१८ माचेरी
४ कोटा	८ प्रतापगड	११ बांसवाडा	१५ दतिया	

येणेंप्रमाणें मोठमोठ्या व लहान संस्थानांकडून खंडण्या घेऊन मराठ्यांनीं त्यांना अंकित करून सोडलें. ह्या कामीं मराठ्यांस बराच मोठा लाभ झाला. फक्त जयपूरवाल्यांकडूनच दहा लक्ष खंडणी घेतली. रजपूत राजे मराठ्यांविरुद्ध नेहमीं खटपटी करीत असत. परंतु मराठ्यांच्या प्राबल्यापुढें त्यांचें कांहीं चालत नसे. ह्मणूनच ते मराठे दूर जातांच खंडण्या देण्यास कांहीं तरी खुसपट काढीत असत. परंतु शिंद्यासारखा प्रबळ सरदार नजीक पडल्यामुळें त्यांचें खंडण्या न देण्याचें धाष्ट्यं पुष्कळ रक्तपाताशिवाय लेशमात्र सिद्धीस जात नसे. जिवबादादा फौजेसह त्यांजवर जाऊन तिकडील खंडण्या वसूल करीत होतेच. तरी ते पराक्रमी व मानी रजपूत राजे त्यांना सोईनें वसूल घेऊं देत नसत. लढाईतून ताजेतवाने होतांच पुढील प्रसंगीं त्यांनीं दंड ठोकून लढाईस उभें राहावेंच, असें नेहमीं चाले.

याप्रमाणें रजपुतांचें पारिपत्य झाल्यानंतर ही मराठ्यांची बडी स्वारी खंडण्या घेत घेत जाटांच्या मुलखांत गेली. इतरांप्रमाणें भरतपूरवाला जाट सामोपचारानें बधणारा नव्हता. त्याला आपल्या सामर्थ्याची घमेंड असून मराठ्यांचें वर्चस्व कबूल करणें, हें त्याला विषवत् वाटत होतें. मराठ्यांस हें वर्तमान समजतांच ही स्वारी भरतपूरच्या जाट राजाच्या पारिपत्यास निघाली. तो राजा फार फौजबंद असून मराठ्यांचा पाणिपतास पराभव झाल्यापासून तो बलिष्ठ झाला होता. पाणिपतच्या लढाईच्या अगोदरची ज्या सुरजमल जाटाची हकीकत गत प्रकरणांत दिली आहे, तो जाट राजा मरून ह्या वेळीं त्याचा मुलगा जवाहीरसिंग भरतपूरच्या गादीवर बसला होता. मराठे आपल्यावर चाल करून येत आहेत हें पाहून त्यानें युद्धाची कडेकोट तयारी केली. मराठे भरतपुरास पोहोंचतांच त्यांनीं पहिल्यानें शहरास वेढा दिला. आणि शहराभोंवतीं नाक्यानाक्यांनीं आरावा पसरून त्यांतील किल्ले, कोट व इतर इमारतींवर तोफांची मारगिरी चालविली. जवाहीरसिंगाचीही तयारी कमी नव्हती. त्यानेंही उलट तोफ चालू केली. ह्याप्रमाणें चाललेल्या युद्धांत उभय पक्षीं प्राणहानि पुष्कळ झाली. पुढें शहरांतील मोठमोठ्या इमारतींचा सफाई नाश होऊं लागला व बाहेरील व्यवहारही बंद पडला. त्यामुळें आंत कोंडून मरण्यापेक्षां धाडसानें बाहेर पडून मराठ्यांशीं निकराचें युद्ध करावें ह्मणून जवाहीरसिंग हा आपल्या शूर लोकांसह बाहेर आला. उभय सैन्याचे लोक एकमेकांत घुसून मोठीच मारहाण चालली. ह्या प्रसंगीं जिवबादादा आपल्या निवडक घोडेस्वारांनिशीं शत्रुसैन्यावर एकदम तुटून पडले. थकलेल्या जाट लोकांस हा जोराचा हल्ला बिलकूल परतवितां येईना. ह्या प्रसंगीं त्यांचे पुष्कळ लोक मृत्युमुखीं पडले. त्यामुळें निरुपायानें त्यांना मागें हटावें लागलें. मग त्यांनीं मराठ्यांशीं तहाचें बोलणें सुरू केलें. त्यांत त्यानें पांसष्ट लक्ष रुपये म-

* १ सार्द्री २ सालुंब्रा (चोंडावत) ३ बिनोढी ४ अमाईत ५ गनोरा ६ बेदनूर ७ भेदर (सुक्तावत) ८ देवगड ९ गोगुंडा १० देलवाडा ११ बैदला १२ कोठारिया १३ कान्होर १४ बेनेरा १५ शहापुरा १६ आमेटवाले १७ बेगु १८ सिंगिगगडवाला १९ कुशीतळ २० कोचवड. हीं वीस संस्थानें एका उदेपूरच्या खालीं होतीं.

राठ्यांस द्यावे, असा ठराव झाला. पैकीं दहा लक्ष रुपये रोख देऊन बाकी ऐवज हप्तेबंदीनें देण्याचीं कबुलायत लिहून दिली. ह्या लढाया 'कुंभार भरतपुर वाडीगड येथें झाल्या. फौज तीस हजार लुटली. दहा हत्ती दोन हजार घोडे व तोफखाना वगैरे मराठ्यांस मिळाला.' याप्रमाणें भरतपुरवाल्यास अंकित करून मराठ्यांचें लष्कर दिल्लीवर जाण्यासाठीं निघालें. परंतु पावसाळा समीप आल्यामुळें पुढें जाण्याचें रहित करून ते दीग एथें छावणी करून राहिले. पुढें पावसाळा संपेपर्यंत ते दिवस त्यांनीं आजूबाजूच्या प्रांतासंबंधाचा विचार करण्यांत घालविले.

या हिंदुस्थानांतील स्वाऱ्यांत पाटीलबावाच प्रमुख असत. त्यांच्या फौजेनेंच मुख्यत्वें विजय संपादिले होते. बाकी फौज त्यांच्याच धोरणानें वागत असे. शिंद्याचे सेनापति जिवबादादा हे मोठे पराक्रमी व मुत्सद्दी होते, व शत्रुपक्षास त्यांचा विलक्षण दरारा वाटत असे. त्यांच्या आंगच्या असामान्य गुणांमुळें शिंद्याची त्यांच्या कारकीर्दींत दिगंत कीर्ति होऊं लागली. ह्या शूर व स्वकार्यदक्ष सेनापतीच्या अत्युत्कृष्ट मदतीमुळें पाटीलबावांच्या युक्तिवादास व कार्यक्षमतेस भरपूर अवकाश मिळाला. आणि त्यामुळें त्यांचें सर्वांवर चांगलें वजन पडूं लागलें. तें एवढें कीं, पेशव्यांचे फौजबंद दोन सरदार बिनीवाले व कानडे तसेच होळकरही बरोबर असतां ह्या बड्या स्वारींत हरएक गोष्ट करणें सवरणें झाल्यास ती पाटीलबावांच्याच विचारें होत असे. ह्मणून "या स्वारीचें सारें यश महादजीनेंच संपादिलें" अशी त्यांची प्रसिद्धि झाली. तीस ते सर्वथैव योग्य होते यांत शंका नाहीं.

मराठे राजकीय कारस्थानानिमित्त दिल्लीस जाण्यासाठीं प्रस्थान काढून दीग एथें तळ देऊन राहिले आहेत, अशा स्वास्थ्यप्रसंगीं दिल्लीकडील बादशाही कारभाराचें गतकालीन व चालू स्वरूपाचें थोडक्यांत पर्यालोचन करून त्याचें वास्तव चित्र वाचकांपुढें मांडिल्यास तें प्रसंगोचित होईल व पूर्वापरसंबंध नीट कळेल ह्मणून तिकडे वळतों.

दिल्लीचें पादशाही तक्त ह्मणजे त्या वेळच्या हिंदुस्थानच्या सार्वभौम सरकारची मुख्य गादी होती. बादशहाच्या ताब्यांत प्रस्तुतच्या सार्वभौम इंग्रज सरकाराप्रमाणें हिंदुस्थानचे बहुतेक प्रदेश आले होते किंवा स्वतंत्रपणें आपआपल्या मुलखीं अमल करणारे राजे लोक त्या काळीं नव्हते, असें जरी ह्मणतां यावयाचें नाहीं, तरी सर्व संस्थानिकांस पादशाही अमलाचा धाक जबरदस्त होता. आणि त्याच्या बलिष्ठपणामुळें आपली सत्ता अगदीं अशाश्वत आहे, हें ते नेहमीं लक्षांत वागवीत, व त्यामुळें त्यांच्या कृपेची इच्छा करीत, एवढी गोष्ट अगदीं खरी आहे. अशा प्रकारची पादशाही कदर सर्व हिंदुस्थानभर चालू राहण्याला त्या गादीवरील जे पुरुष कारण झाले, त्या बहुतेकांच्या अंगीं शौर्य, धैर्य, राजकारस्थान, निरलसता इत्यादि गुणांचें पुष्कळ वास्तव्य होतें. ही गोष्ट आल्तमश, बहलोलखान लोदी, अलाउद्दीन खिलजी, बाबर, शीरशहा, अकबर, शहाजहान, अवरंगझेब इत्यादि बादशहांच्या कारकीर्दींकडे लक्ष दिल्यास तेव्हांच कळून येणार आहे. जोंवर कोणत्याही प्रांताकडे यांची करडी नजर व समुद्रासारख्या पसरणाऱ्या शूर पठाणादि जवानमर्द वीरांची धाड फिरली नाहीं, तोंवर त्या प्रांतांचें स्वातंत्र्य कायम राही. आणि एकदा का ते समशेरबहाद्दर खान तिकडे वळले कीं, लगेच त्या प्रांताधिकाऱ्याच्या स्वातंत्र्यनदीस ओहोटी लागे. जबरदस्त काटकपणा, शौर्यानें व दमदारपणानें लढण्याचे कामीं अढळ उद्योग, आणि राज्यसंपादनांत पराकाष्ठेची हांव, या

---

१. पत्रें व यादी पृ. ५१०. २. ग्रांट डफची बखर. ३. म्यालेसनकृत हिंदुस्थानच्या इतिहासाचें भाषांतर पृ. १५३.

गुणांमुळें त्यांना इष्टसिद्धिही ठेवल्याप्रमाणें तयार असे. दुसरी गोष्ट त्या वेळेस चक्रनेमिक्रमन्यायानें उत्कर्षाच्या अत्युच्च भागाकडे त्यांचें गमन होत होतें. दैवाचें आनुकूल्य ही बाब दीर्घोद्योगाच्या जोडीस मिळाली तर होणारी वैभवोन्नति अलोट असते, ही गोष्ट आपल्या नेहमींच्या पाहण्यांतली आहे. त्याप्रमाणें मुसलमानांचा तो काल वैभवास्वादांत गेला आणि ही गोष्ट जगाच्या राहटीसही असंबद्ध नव्हती. पण थोडा थोडका नव्हे, तर कमींत कमी (कायमचा असा) पांचशें वर्षांचा हा काल आह्मांस किती दुःखकारक गेला असेल बरें ! ह्या कष्टमय स्थितींत इतके दिवस काढावे लागल्यामुळें हिंदु लोकांच्या आंगीं किती त्राण उरण्यासारखें होतें, ह्याची कल्पना विदेशी लोकांसही सहज होण्यासारखी आहे. पारतंत्र्यशृंखला आणि त्यांत विधर्मी राजांचा धर्मप्रकरणासारख्या जीवापलीकडे महत्त्वाच्या व नाजूक वाटणाऱ्या बाबींत सुद्धां असह्य छल, ह्यांनीं केवळ गोगलगाय झालेले हिंदु लोक कावून गेले होते. त्यांना जीव नको, संसार नको आणि ही विटंबना नको, असें होऊन गेलें होतें[1] ! लोकांस सुख देणारे बादशहा झालेच नाहींत व सर्वत्र सदोदित अन्याय, जुलूम व बेबंदशाही, हीं माजलेलीं होतीं असें नाहीं. कांहीं बादशहा सुशील व न्यायी होते व त्यांनीं प्रजेस सुख देणाचे प्रयत्नही केले. परंतु त्या त्या प्रसंगीं सुद्धां त्यांच्या त्या गुणांचा व न्यायकारकीर्दीचा उपभोग अवांतर अनेक कारणांनीं प्रजेस पूर्णपणें घेतां आला नाहीं. समदृष्टि, न्याय व प्रजापालनदक्षता ह्या श्रेष्ठराजसद्गुणमंडित बादशहांत अकबराचें नांव प्रमुखत्वानें सांगण्यांत येतें व तें बहुतांशीं यथार्थही आहे. परंतु त्या कारकीर्दींत सुद्धां वरील प्रकारचे अपवादक प्रसंग नाहींत असें नाहीं व यांत कांहीं विशेष आश्चर्य आहे असें नाहीं. न्यायी व प्रजापालनदक्ष अशा स्वदेशी व स्वधर्मी राजांच्या कारकीर्दीशीं, विदेशी व विधर्मी राजांच्या कारकीर्दींची तुलना करणेंच एकपक्षीं गैर आहे. परकीयांस आपली कारकीर्द निर्दोष ठेवण्यांत कित्येक गोष्टी अपरिहार्य अडचणीच्या असतात यांत शंका नाहीं. असो. हिंदूंचा हा अपकर्ष जसा कल्पनातीत होता, त्याचप्रमाणें मुसलमानांचा उत्कर्ष व त्यांची सद्दी, हीं सर्वांस चकित करून सोडणारीं होतीं. ह्या उन्नति व अवनति यांच्या आश्चर्यकारक खेळाचा प्रभाव त्या काळीं कसा दिसून येत होता ह्याविषयीं प्रसंगानुरूप दोन शब्द लिहून मग तत्कालीन इतिहासाकडे वळूं.

बादशहानें हिंदु संस्थानिकांस राजा ही पदवी दिली किंवा ती घेण्यास अगर चालविण्यास संमति दिली, तर मात्र ती त्यांजकडे चालत असे. साधारण जमेदार व संस्थानिक तर राहोतच, परंतु जयपुर, जोधपुर अशा मोटमोठ्या संस्थानचे अधिपति, शूर रजपूत राणे, दिल्लीपतीच्या मेहेर नजरेची अपेक्षा

१. ही पांच सहाशें वर्षांतली हिंदु संस्थानिकांची व हिंदु प्रजेची स्थिति किती शोचनीय झालेली होती ह्याची बरोबर कल्पना करितां येण्यास, त्या काळच्या मुसलमान बादशहांनीं व त्यांच्या कृतांतसदृश सरदारांनीं हिंदु लोकांवर निरनिराळ्या प्रसंगीं जे जुलूम चालविले होते, त्यांत झालेला प्राणनाश, वैभवाचा ऱ्हास व धर्मच्छल यांच्या माहितीचे कोणीं शोधकानें सालवार तक्ते तयार केले, तर मात्र बरेंच साधन होईल. परंतु त्यांपासून प्रत्येक हिंदूचे दुःखोद्गार मात्र जागृत होण्याशिवाय दुसरा कोणताही फायदा व्हावयाचा नाहीं.

२. परंतु यांत एक लक्षांत ठेवण्यासारखा विचार आहे. मुसलमानांचा जो क्रूरपणा हिंदूंच्या प्रत्ययास आला, त्यांत भिन्न धर्माचीच बाब मुख्य होती. लोकांस बाटवावें, देवळें पाडावीं व त्यांतील देवांच्या मूर्तींवर गाईच्या रक्ताचें सिंचन करावें, हीं कृत्यें व तीं करीत असतां प्रतीकार करणारांची कत्तल करावी, ह्यांत त्यांच्या क्रौर्याचा बहुतेक भाग खर्च झाला आहे. लढायांतील क्रौर्य सर्वसाधारणच होतें. इतकें झालें तरी ते या देशांत स्थायिक होऊन राहिल्यामुळें त्यांच्यापासून त्या काळीं सुद्धां उपयोगही पुष्कळ झाला आहे.

करीत व त्यांच्या हुकुमांत तत्पर असत! रजपुतांसारख्या विक्रमशाली, तेजस्वी पुरुषांनीं बादशहांचें असें मिंधें रहावें, आणि त्यांशीं शरीरसंबंध घडविण्यासारख्या अत्यंत अपमानकारक व लज्जास्पद गोष्टींस पर्यायानें तरी वश व्हावें, ही गोष्ट मुसलमानांच्या तेजस्वितेची च भाग्यशालित्वाची पूर्णपणें साक्ष पटविते. ज्या मुली बादशाही घराण्यांत दिल्या गेल्या, त्या यःकश्चित् गरीबगुरीब लोकांच्या होत्या असें मुळींच नाहीं. तर वरील प्रकारच्या शूर राण्यांच्या घराण्यांतील त्या होत्या. कालप्रभाव मोठा विलक्षण आहे! आपल्या स्त्रियांची अब्रू मलिन होईल व त्या शत्रूच्या हातीं लागतील ह्मणून खाई खणून किंवा मजबूत जागेंत कोंडून त्यांत त्यांस अग्निनारायणाच्या स्वाधीन करून केशरी पोषाखानें ज्या समशेरबहाद्दरांनीं युद्धार्थ शत्रूस आव्हान करावें, त्याच शूरवरांनीं अशा नीच कृत्यास सहाय व्हावेंना? परंतु करतील काय बिचारे? प्रबल शत्रूच्या ह्मणण्यास मान न वांकवण्याचा इलाज नव्हता! असो. अशा प्रकारें ज्यांनीं अतुल वैभव भोगिलें, त्यांचें दरबार कशानें शृंगारलें होतें ह्मणाल, तर ठिकठिकाणीं आपापल्या अधिकारानुरूप 'जो हुकूम' ह्मणून उभे राहिलेल्या हिंदुराजेरूप चाकर लोकांनीं! आपली मिसल बादशाही दरबारांत बरीच वरच्या प्रतीस लागावी ह्मणून ज्या राजे लोकांच्या मोठमोठ्या खटपटी व व्यूह चालावे, त्यांच्या तत्कालीन पराक्रमशैथिल्याची व नष्टवैभवाची शिकस्त ती आणखी किती सांगावयाची! ह्या राजे लोकांकडे त्यांच्या योग्यतेनुरूप सेवाधर्माचीं कामें संपविलीं होतीं. मग 'परमगहनो योगिनामप्यगम्यः' असा बिकट मानिलेला 'सेवाधर्म'[1] अपरिचितत्वामुळें व जन्मतः प्राप्त झालेल्या श्रेष्ठत्वामुळें त्यांच्या हातून कसा पार पडत असेल, आणि त्यांत चूकमुक्र किंवा कसूर झाल्यास त्यांना त्याचें फळ कोणत्या प्रकारचें भोगावें लागत असेल व तेणेंकरून त्यांच्या मनास किती दुःसह ताप होत असेल, ह्याची केवळ कल्पनाच केली पाहिजे!

आमचे परमवंद्य शौर्यशाली शिवाजी महाराज, अवरंगझेबाच्या दरबारांत (सन १६६६ सालीं) प्रविष्ट झाल्याबरोबर त्यांना मोठी उमेद होती कीं, दक्षिणेंत बडी धामधूम करून मोगलांस केवळ शल्य होऊन राहिल्यामुळें बादशहाकडे आपलें विलक्षण वजन पडेल. पण अवरंगझेबासारखा कडवा, अभिमानी व पाताळयंत्री पुरुष त्यांची कुठें वर्णी लागू देतो! शिवाजीस दरबारांत मध्यम प्रतीच्या सरदारांत सुद्धां बसविण्याची त्याची इच्छा नव्हती. ह्मणून त्यानें त्यांस एकदम पांच हजाऱ्यांत बसविण्याचा हुकूम फर्माविला! मानधन शिवाजी महाराजांस हा एवढा अपमान सहन व्हावा कसा? पण त्यांच्या मानीपणास व इच्छेस तेथें कोण पुसतो? बादशहाच्या हुकुमाप्रमाणें जिकडील तिकडे वासलात लागल्यावर शिवाजीनें जेव्हां पाहिलें कीं, एथें मोठमोठे मियांसाहेब, खानसाहेब अशीं जाड बुडाचीं ढेलें दिवाणगिरी व इतर मोठमोठ्या अधिकाराचीं कामें क्रमाक्रमानें मोठ्या ऐटीनें बादशहांस सुनावीत आहेत. त्यांची दरबारांत विलक्षण बडेजार ठेविली जात आहे. त्यांचा मानी व करारी स्वभाव व अगदीं खालच्या दर्जाच्या मानलेल्या हिंदु लोकांविषयीं त्यांच्या लाल व चंचल नजरेंत खेळणारा तिरस्कार यांचें मनास त्रासदायक तर खरें, परंतु एका दृष्टीनें नमुन्यासाठीं प्रेक्षणीय असें प्रदर्शनच मांडिलेलें आहे! विजयसिंग, रामसिंग असे मोठमोठे हिंदु राजे व राजपुत्र यांची नजर एकसारखी पातशहांच्या नेत्रकटाक्षांकडे आहे. खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान

---

१. आत्मतत्त्वानुभव घडावा व निजानंदांत सदैव तृप्त असावें, या परमार्थसिद्धीकरितां चित्तैकाग्र्य, अत्यंत नम्रीभाव व सतत सेवानुवृत्ति स्वीकारून जो सेवाधर्म चालवावयाचा, तो त्या गोष्टीकरितां जसा बिकट, तसाच व्यवहारांतील सेवाधर्म राजे लोकांस अपरिचितपणामुळें खरोखरच बिकट होतो.

होऊन पुढें होणारा हुकूम झेलण्यास ते अगदीं तत्पर असलेले दिसताहेत. जेथें हिंदु ह्मणजे 'हिसाब' नाहीं. अशा प्रकारचा हा सर्व अपमानास्पद देखावा पाहून शिवाजीच्या तळव्याची आग मस्तकास गेली. आणि महाराज संतप्त होऊन मनचे मनांत पुटपुटूं लागले. ते मनांत ह्मणाले, आपल्या पराक्रमानें या यवनांस शेंकडो वेळां तोबा तोबा करावयास लाविलेल्या या शूर बच्याची बादशहानें केली एवढीच किंमत असावी होय? मी वाघ! परंतु एथें या दुर्लंघ्य सांपळ्यांत सांपडलों. तेव्हां मनांतील सर्व तळमळ आतां पराधीनतेंत आठवून कांहीं उपयोग नाहीं! परंतु समर्थांची कृपा व या भवानीचें (हातांत असलेल्या तरवारीचें) साह्य असल्यास- आणि तें खास असणारच–हा वीर गडी, अवरंगझेबा, तुला अशा तशानें बधणारा नव्हे! त्या वेळीं महाराजांचें आंग वीरश्रीनें केवळ फुलून राहिलें होतें! परंतु ही मनोवृत्ति त्यांना अगदींच झांकतां आली नाहीं. आणि तेथेंच कारस्थान चुकलें! चतुर, धोरणी व कपटपटु अवरंगझेबाच्या मनावर त्या कुरकुरीचा व नाखुषीचा परिणाम होऊन शिवाजीस लागलेंच कडक प्रतिबंधांत रहावें लागलें. बादशहाच्या मूळच्याच इच्छेस शिवाजीची नाखुषी ही आयतीच भर सांपडली! तात्पर्य, त्या कालीं दिल्लीपतीचें ऐश्वर्य शिखरास जाऊन पोंहोंचलें होतें व आमचे राजे लोक त्यांपुढें मेषपात्र झालेले होते हें वाचकांस कळून आलेंच असेल.

परंतु अशा वैभवोन्नतीच्या शिखरावर बसून सार्वभौमसत्तेच्या दराऱ्यांत मजेनें काळ घालविले- ल्या दिल्लीपतीचे पुढील दिवस अवरंगझेबामागून त्याच दमाचे राहिले नाहींत. वर सांगितलेल्या चक्रनेमिक्रमन्यायानें त्या गादीस अवनतावस्था येऊं लागली होती. अवरंगझेबानें आपला राज्यविस्तार अतिशयित करून, रजपुतांसारख्या शूर लोकांस आपले कायमचे शत्रु करून, रयतेवर धर्मसंबंधी अति जुलूम चालवून आणि आपल्या मुलांवर सुद्धां पूर्णपणें विश्वास न ठेवून, आपल्या हातीं आपल्या नाशाचें बीज पेरून ठेविलें होतें. आणि त्यानंतर झालेले बादशहा त्या मोठ्या अधिकारास पूर्ण लायक नसल्यामुळें दिवसेंदिवस त्यांची सत्ता क्षीण होऊं लागली होती. पाणिपतची लढाई हो- ऊन तींत मराठ्यांचा पूर्णपणें पराभव झाला त्या वेळीं दिल्लीच्या गादीचा अधिकारी शहाआलम हा बंगालचा नबाब व इंग्लिश, यांजबरोबर लढत होता. ह्मणून अहमद अबदालीनें शहाआलमाचा पुत्र जवानबख्त ह्यास बादशहाचे ऐवजीं नेमून त्याची वजीरी अयोध्येचा नबाब सुजा उद्दौला ह्यास सांगितली. व नजीब उद्दौल्यानें पूर्वीच अमीर उल उमराव हें महत्त्वाचें पद मिळविलें होतें तें त्याजकडेस कायम केलें. सुजा व नजीब हे दोन्ही अबदालीचे मुख्य मसलतगार, हितकर्ते व मित्र होते. व त्यांनींच त्याला एवढा विजय संपादून दिला होता. त्यांचे अशा प्रकारें उपकार फेडून अहमदशहा अबदाली आपले मुलखीं निघून गेला. पुढें त्या व्यवस्थेप्रमाणें नजीब उद्दौला दिल्लीस जाऊन जवानबख्तास नामधारी बादशहा करून आपणच प्रमुखत्वानें सर्व कारभार हाकूं लागला. दिल्लींत त्याच्या हुकुमाशिवाय कोणतीच गोष्ट होईनाशी झाली. याप्रमाणें या मतलबी व दीर्घसूत्री मनुष्यानें आजपर्यंत अनेक कापट्ययुक्ति व लपंडाव योजून आपलें महत्त्व वाढविलें. सुजा उद्दौ- ल्यास दिवाणगिरी नांवाचीच हवी होती. त्याच्या मागें त्याच्या राज्याचें काम होतें. ह्मणून तो अ- योध्येस निघून गेला. तेथें आपल्या राज्याचा बंदोबस्त करून तो काशीस गेला. तेव्हां शहाआलम फौजेसहित त्याला येऊन मिळाला. त्या दोघांचा झांशीस जाऊन तेथून मराठ्यांस घालवून द्यावें असा बेत होता. परंतु बंगालचा नबाब मीर काशीम यानें इंग्लिशांशीं लढण्यासाठीं त्याला आपल्या मदतीस बोलाविलें. त्याप्रमाणें इंग्लिशांशीं त्यांची लढाई झाली. त्या लढाईंत इंग्लिश विजयी झाले.

मग शहाआलम बादशहा इंग्लिशांच्या आश्रयास गेला. त्याच्या मनांत आपली दिल्लीची गादी नजीब उद्दौल्याच्या शहांतून आपल्यास इंग्लिश सोडवून देतील असें होतें. सुजा उद्दौला इंग्लिशांशीं द्वेष करून पश्चात्तापांत पडला. त्याच्या राज्यापैकीं बराच भाग इंग्लिशांनीं घेतला. पण इ. स. १७६५ चे आगष्टांत त्यानें इंग्लिशांशीं सख्य करून अलहाबाद व खोरा, हे प्रांत खेरीज करून बाकी आपलें राज्य त्यांजपासून मिळविलें. हे दोन सुजा उद्दौल्याचे प्रांत इंग्लिशांनीं शहाआलमाचे खर्चास लावून दिले. याप्रमाणें दिल्लीचा खरा हक्कदार बादशहा इंग्लिशांच्या आश्रयानें ते देतील त्या भाकरीवर निर्वाह करून आपल्यास ते पुढें गादीवर बसवितील या आशेनें दिवस कंठित राहिला ! याहून कालगतीच्या विचित्रत्वाविषयीं आणखी पुरावा तो किती पाहिजे ! परंतु या दिल्लीप्रकरणाच्या वरील प्रास्ताविक भागाचें पर्यवसान एवढ्यांतच झालें असें नाहीं. दैवदुर्विलासाचा खरा प्रत्यय तो पुढेंच यावयाचा आहे त्याचें वर्णन यथास्थलीं येईलच.

शहाआलम इंग्लिशांच्या आश्रयास स्वस्थ होता खरा, परंतु त्याला तें बिलकूल सुखदायक वाटलें नाहीं. कारण दिल्लींत नजीब उद्दौल्यानें आपल्या मुलास नांवानें बादशहा करून आपणच सर्व सत्ता बळकावली आहे, त्याचा बंदोबस्त केव्हां एकदा होतो या विचारानें त्यास चैन पडत नसे. इकडे दीग एथें मराठ्यांचा तळ पडला होता. आणि त्यांचा विचार एकदम दिल्लीस जाण्याचा होता, व महादजी शिंदे आणि रामचंद्र गणेश कानडे ह्यांना तर नजीब उद्दौल्याचें पारपत्य लौकर करावें अशी ईर्ष्या होती. परंतु विसाजी कृष्णास तें पसंत पडेना. ह्मणून पुढें काय करावें, हें पुण्यास श्रीमंत माधवराव साहेब पेशवे यांस लिहून पाठवून विचारिलें. त्यांनीं लिहिलें कीं, नजीबाचें पारिपत्यच झालें पाहिजे. परंतु तूर्त शहाआलम बादशहा इंग्लिशांच्या आश्रयास आहे त्याला आपल्या आश्रयास आणण्याचे कामीं नजीब उद्दौला उपयोगीं पडेल या धोरणानें त्याशीं तह करावा. मग त्याप्रमाणें त्यांनीं नजीबाशीं तह ठरविला. पाणिपतच्या युद्धांत महत्त्व पावलेल्या नजीबाचे हे दिवस अपकर्षाचेच होते. त्यानें मनांत आणिलें कीं, आतां यापुढें आपले योजिलेले व्यूह सिद्धीस जाण्याची आशा तर नाहींच, पण मराठे आपल्यास कधीं तरी अधिकारभ्रष्ट करून पूर्वद्वेषाचें उसनें फेडिल्यावांचून रहावयाचे नाहींत. दुष्टपणें वागणारास त्याचें अंतःकरणच खात असतें. तेथें कोणाचा इलाज ! शेवटीं याच धास्तींत तो सन १७७० त नजीबगड गांवीं मरण पावला.[1] नंतर त्याचा मुलगा झबेताखान आपल्या बापाचें काम पाहूं लागला. इकडे मराठे व शहाआलम यांचीं बोलणीं सुरू होतीं, व बादशहास मराठे आपल्यास गादीवर बसवितील अशी आशा वाटूं लागली होती.

पुढें अगोदर दिल्लीकडे न जातां मराठ्यांनीं रोहिलखंडांत स्वारी केली. आणि तो सर्व मुलूख आपल्या ताब्यांत घेतला. तेव्हां इंग्लिशांस मोठें आश्चर्य वाटलें, व शहाआलमाचें सुद्धां मराठ्यांकडे अंग आहे अशी त्यांची खातरी झाली. पुढें शहाआलमानेंही इंग्लिशांकडे बहुत दिवस राहून आपल्यास गादीवर बसविण्याचें काम त्यांच्यानें होईना ह्मणून आपण मराठ्यांच्या आश्रयास जातों, असें त्यांस सांगितलें. आणि मराठ्यांकडे आपल्यास गादीवर बसविण्याचें बोलणें सुरू

१. ह्या प्रसंग ह्मटला ह्मणजे गुलामकादरानें बादशहा व त्याचीं मनुष्यें, यांचे केलेले हाल हाच होय. तो प्रकार १० व्या भागांत पूर्णत्वानें आला आहे.

केलें. तेव्हां सहजच हें कारस्थान मराठ्यांकडे चालून आलें. परंतु इंग्लिशांच्या ताब्यांतील शहाआलम बादशहास आणून दिल्लीपति करण्याचें फार महत्त्वाचें, वजनदारीचें व शौर्याचें काम होतें. तें करण्यास मराठी लष्करांत त्या वेळीं एक महादजी शिंदेच समर्थ होते. अशाप्रकारचें जोखमाचें काम शूर सेनापति जिवबादादा यांच्या योगानें सिद्धीस नेण्यास कांहीं कठीण पडत नसे. मग शिंद्यांनींच जाऊन हें काम सिद्धीस न्यावें असें ठरून महादजी व जिवबादादा लष्करासहित इंग्लिशांकडे जाऊन तेथून बादशहास घेऊन आले. नंतर सन १७७१ सालचे डिसेंबर महिन्याचे शेवटीं शहाआलमास मोठ्या समारंभानें त्यांनीं दिल्लीच्या गादीवर बसविलें. ह्यामुळें मराठ्यांची कीर्ति वाढली.

दिल्लीचे गादीशीं हिंदूंचा संबंध पृथ्वीराज चव्हाण या रजपूत राजानंतर इ. स. ११९३ पासून सुटलेला सुमारें पांचशें वर्षांनीं शिवाजी महाराजांच्या वेळीं पर्यायानें कांहीं अंशीं जडून आला. तरी मराठ्यांची मदत घेण्याचा वगैरे विशेष संबंध बाळाजी विश्वनाथापासून सदाशिवरावभाऊ पेशवे यांजपर्यंत चालू होता. पण आपल्या अधिकारांत दिल्लीचे तक्तावर बादशहा बसविण्यासारखें कर्तबगारीचें मोठें काम मराठ्यांकडून यापूर्वी कधीं झालें नाहीं. तें जिवबादादांच्या पराक्रमामुळें महादजी शिंद्यांकडून घडून आलें. ही गोष्ट त्यांस भूषणीय व मराठ्यांच्या इतिहासांत अत्यंत संस्मरणीय होय.

पुढें रोहिलखंडांत रोहिल्यांचा कांहीं उपद्रव होऊं लागल्यामुळें त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठीं मराठी लष्कर तिकडे गेलें. ही गोष्ट सुजा उद्दौल्यास इष्टच वाटली. कारण नजीब उद्दौल्याचा मुलगा झबेताखान यास मराठे अधिकारभ्रष्ट किंवा निःसत्त्व करितील आणि तसें झालें ह्मणजे दिल्लीकडील एकच्छत्री अधिकार सहजच कालांतरानें आपल्या हातीं येईल असें त्यास वाटलें. परंतु पुढें ही त्याची समजूत बदलली. मराठ्यांनीं रोहिलखंडांत जातांच तिकडील एकूनएक प्रांत, किल्ले व गढ्या घेण्याचा सपाटा चालविला. मराठ्यांपुढें रोहिल्यांचें कांहींएक चालेना. मराठ्यांच्या पराक्रमानें त्यांनीं इतकी धास्ती घेतली व ते इतके भयचकित झाले कीं, ते जमातीनें व सामुग्रीनें मोठमोठ्या सुदृढ किल्ल्यांत जरी राहिलेले असले, तरी मराठे येताहेत इतकें ऐकण्याबरोबर ते तेथून पळ काढीत! मग याप्रमाणें रोहिल्यांचा व अर्थात् झबेताखानाचा बहुतेक सर्व मुलूख घेऊन तेथें आपले लोक ठेवून मराठ्यांनीं बंदोबस्त केला. तेव्हां सुजा उद्दौल्याच्या डोक्यांत प्रकाश पडला कीं, पाणिपतच्या लढाईत मराठ्यांशीं आह्मी विरुद्ध झालों त्याचें प्रायश्चित्त आह्मांस क्रमानें भोगावयास लावण्याचा मराठ्यांचा पक्का इरादा आहे. जी गत आज झबेताखानाची, तीच उद्यां माझी! हें मनांत येतांच त्यानें रोहिले सरदारांस आश्रय दिला, आणि त्यांजपासून चाळीस लक्ष रुपये घेऊन दोघांनीं मिळून मराठ्यांचें पारिपत्य करावें असा ठराव केला.

इकडे रोहिल्यांचें पारिपत्य करून बादशहाचा अंमल विस्तृत केल्यावर मराठे दिल्लींत आले. आणि आपणास या कामीं आलेल्या मोठ्या खर्चाबद्दल बादशहाकडे त्यांनीं पैशाची मागणी केली. बादशहास गादीवर बसविण्याची व त्याच्या सत्तेस प्रतिबंधक जे रोहिले वगैरे बादशहाचे शत्रु, त्यांचा अगदीं बंदोबस्त करून स्वस्थपणानें गादीचा त्यास उपभोग घेतां यावा एवढी महत्त्वाची कामगारी केल्याबद्दल मराठ्यांस आलेला खर्च बादशहाकडून मिळणें वाजवी होतें. पण बादशहास ही मागणी रुचली नाहीं. संकटाचा प्रसंग निघून गेल्यावर मनुष्याच्या मनाची स्थिति बदलते, हें

खरें, पण शहाण्यानें कृतज्ञतेस विसरतां नये. पुढें मराठे आपली चिकाटी सोडीनात, आणि बादशहा-कडून तर पैसा मिळेना. तेव्हां ही गोष्ट विकोपास गेली. मराठ्यांच्या अतृप्तपणाचें निमित्त दाखवून बादशहानें त्यांची खोड मोडण्यासाठीं आंतून गुप्त मसलती चालविल्या! त्या मराठ्यांस समजतांच पुण्यास पेशव्यांस लिहून त्यांच्या विचाराप्रमाणें या प्रकरणाचा निकाल लावावा असें ठरलें, व त्याप्रमाणें विसाजी कृष्णानें पुण्यास लिहून पाठविलें. तिकडून उत्तर येण्याआधींच श्रीमंत माधवराव पेशवे क्षयाचे विकारानें थेऊर मुकामीं इ. स. १७७२ च्या नोव्हेंबर महिन्याच्या १८ व्या तारखेस मृत्यु पावले. सबब उत्तर येणें लांबणीवर पडलें. इकडे बादशहानें मराठ्यांचें शल्य काढून टाकण्यासाठीं नजफखान नामक सरदाराबरोबर फौज देऊन मराठ्यांवर त्यांची योजना केली. कारण बादशहाचे या वेळीं पूर्वींचे दिवस राहिले नव्हते!

नजफखान फौजेसह मराठ्यांवर चालून आल्यामुळें पुण्याच्या उत्तराची वाट न पाहतां मराठ्यांनीं त्यांशीं लढण्याची तयारी केली. बादशाही फौजेंत रोहिले व इतर सर्व मुसलमान सरदार एक होऊन आले होते. ह्या उभयपक्षांचा युद्धप्रसंग दिल्लीजवळ सन १७७२ च्या डिसेंबर महिन्याच्या १९ व्या तारखेस होऊन त्यांत मोगलांचा साफ पराभव झाला. आमच्या चरित्रनायकांनीं नजफखानास पिटवून लावण्याचे कामीं मोठी बहादुरी दाखविली. अशा रीतीनें बादशाही फौजेचा मोड केल्यावर मराठ्यांचा व बादशहाचा तह झाला. त्यांत बादशहाकडून पेशव्यांच्या सन्मानार्थ त्यांस बक्षी हा किताब मिळाला व मराठ्यांच्या तर्फें हस्तक ह्मणून बादशहाकडे झबेतखान रहावा, जाटां-कडून बादशहानें घेतलेलें सरंपूर त्यांचें त्यांस द्यावें[२], आणि इंग्लिशांनीं नजीब उद्दौल्यापासून पूर्वी घेतलेले परगणे खोरा व खरा हे बादशहाकडे असत तेही जाटांस द्यावे, इतकें ठरवून मराठ्यांचें लष्कर माघारें फिरलें. सर्व सरदार आपआपल्या ठिकाणीं गेले आणि विसाजी कृष्ण व रामचंद्र गणेश फौजेसह पुण्यास आले.

इकडे पुण्यास माधवराव पेशवे मरण पावल्यावर त्यांचे धाकटे बंधु नारायणराव यांस पेशवाईचा अधिकार मिळाला. पण रघुनाथरावाचीं पेशवेपदाच्या लोभानें कारस्थानें चालत. शेवटीं नारायणराव ता. ३० आगस्ट सन १७७३ रोजीं मारले गेले. त्यामुळें हैदर व निजाम वगैरे मराठ्यांच्या शत्रूंस ह्यांच्या विरुद्ध खटपटी करण्यास ही अमोलिक संधि मिळाली. इत्यादि कारणांनीं महादजी शिंद्यांस दक्षिणेंत येण्याविषयीं पेशवे दरबाराकडून बोलावणीं गेलीं. त्यामुळें त्यांना दक्षिणेंत यावें लागलें. तेव्हां अर्थात् दिल्लीकडील कारस्थानांकडे लक्ष देण्यास त्यांना सवड मिळाली नाहीं; त्याचप्रमाणें आपले यजमान पुण्याकडे गुंतल्यामुळें जिवबादादा हे राज्यरक्षणार्थ व तत्संबंधीं कराव्या लागणाऱ्या स्वाऱ्या इत्यादिकांसाठीं उज्जनीस आले. शिवाय नारायणराव पेशव्यांस मारणारे गारदी परराज्यांत पळून गेले. त्यांस धरून आणण्याचें काम शिंद्यावर सोंपविलेलें त्यांना करावें लागलें.

दिल्लीहून जिवबादादा उज्जनीस आल्यावर कांहीं दिवस दरबारी कामकाजाची व्यवस्था पाहून मग राज्यांत ठिकठिकाणीं फिरून किल्लेकोट, गढ्या व हरएक राजकीय लष्कराच्या उपयोगाचीं व

१. ग्रांट डफची बखर पृ. २५५.

२. ह्या वेळीं जाटांची मदत मराठ्यांस असावी.

३. ह्या पुस्तकाचे १९ व्या भागांतील १२ वें कलम पहा.

इतर बाबतींचीं स्थळें मजबूद व व्यवस्थित अशीं करण्याच्या कामीं त्यांनीं फार श्रम घेतले. जेथें ज्या ज्या प्रकारची उणीव आढळली, ती ती दुरुस्त करवून सर्व ठिकाणीं भरपूर सामानसुमान, लोक व योग्य अंमलदार नेमून कोणत्याही प्रसंगीं अव्यवस्था व कमकुवतपणा आढळून येऊं नये, अशाबद्दल करावयाची तेवढी सोई केली. हे राज्यांतून फिरूं लागले ह्मणजे त्या त्या प्रांतांतील अंमलदार आपलीं कामें कशीं बजावितात, रयतेस त्यापासून सुख होतें कीं नाहीं, रयतेस ज्या ज्या बाबतींत त्रास पोहोंचत असेल, त्याबद्दल लक्षपूर्वक शोध घेऊन अंमलदार रयतेच्या गाऱ्हाण्यांची नीट दाद घेतात कीं नाहींत हें पाहत असत, आणि कांहीं न्यूनाधिक असेल त्याचा निकाल लावीत. तेणेंकरून रयत लोकांस आपल्या दुःखाचें परिमार्जन करून घेण्यास व गैरसोईची दुरुस्ती करविण्यास सोपें जात असे, व सर्व कामगारांवर चांगला वचक राहत असे. मुख्य राजधानीच्या ठिकाणीं किंवा एकाद्या आरामस्थलीं बसून संपूर्ण प्रजेस सुखदायक असा कारभार हाकतां येणें कठीण. तो सर्वत्र हिंडून व खऱ्याखुऱ्या स्थितीचें नीट निरीक्षण करून व शक्य तेवढ्या उणिवा काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यास मात्र सुखकर रीतीनें हाकतां येईल. असो. याप्रमाणें काम पाहून जिवबादादा वर लिहिल्याप्रमाणें राजघातक गार्द्यांच्या तपासासाठीं निघाले, आणि त्यांस पकडून पुण्यास पाठवून दिलें. ही गोष्ट सन १७७३।७४ त घडली.

इतकें होत आहे तों मेवाडप्रांतीं जाण्याची कामगारी आली. त्या प्रांतीं उदेपुरच्या दरबारांत सोळा उमराव होते. पैकीं बेगू येथील रावळ राजानें इ. स. १७७५ त बंड केलें. तें मोडण्यासाठीं त्या राजानें शिंद्याकडे मदत मागितली, ह्मणून जिवबादादा फौज घेऊन तिकडे गेले; आणि तें बंड मोडून राण्याचा अंमल पक्का केला. ह्या कामगिरीबद्दल त्यांनीं शिंद्यास आणखी कांहीं प्रांत दिला. नंतर जिरण एथें आमेटवाले उमराव होते. त्यांच्याशींही कांहीं कारणानें हरक्या खाळावर मोठी लढाई होऊन जिवबादादांचे चुलत बंधु जगोबाबापू ऊर्फ जगन्नाथ राम यांनीं जिरण घेतली[1]. या लढाईत जगोबाबापूकडील शिधोजी गौळी नामक सरदार ठार झाला. याप्रमाणें मेवाडाकडील काम आटपून जिवबादादा ग्वाल्हेरीस गेले.

अशा तऱ्हेचे मराठी राज्याच्या उत्कर्षाबद्दल प्रयत्न चालले असतां मध्येंच त्यास विघ्नभूत असें एक बडें प्रकरण उपस्थित झालें. त्यामुळें तो उत्कर्ष होणें बाजूस राहून मराठ्यांस फार त्रास सोसावा लागला. त्या प्रकरणामुळें ह्मणजे आपल्यास पेशवाई मिळण्यासाठीं मोठे प्रयत्न करणाऱ्या रघुनाथरावानें इंग्लिशांचें साह्य मिळविलें ह्मणून, इंग्लिश हे मराठ्यांस एक नवे शत्रु उत्पन्न झाले. त्या बाबतींत शिंद्यातर्फे आमच्या चरित्रनायकास जीं महत्त्वाचीं कामें करावीं लागलीं त्यासंबंधाच्या इतिहासाकडे वळूं.

१. जिरण एथें किल्ला आहे. आमेटवाले रजपूत यांनीं मोठा तलाव खोदून त्याची माती टाकून तिचा मोठा ढीग केला व त्या ढिगावर हा किल्ला बांधिलेला आहे. सदर लढाईपूर्वी वस्ती किल्ल्यांत होती, ती नंतर बाहेर झाली आहे. तेथें जगोबाबापूंनीं धुळकोट बांधिलेला अद्याप आहे.

भाग ७ वा.

इंग्रजांबरोबर लढाया.

इ० स० १७७४ पासून स० १७८४ पर्यंत.

माधवरावसाहेब पेशवे यांचें मरण पेशवाईच्या जबरदस्त हानीस कारण झालें. पेशवाई उतरत्या पंथास लागण्यास जी कारणपरंपरा पुढें जुळत गेली, तिच्या आदिघटनेचें हें सूक्ष्म बीज होतें. माधवरावांमागून त्यांचे बंधु नारायणराव हे पेशवे झाले. त्यांची कारकीर्द थोडेच दिवस चालली. त्यांजमध्यें वडील बंधूंचें राज्यकारभार चालविण्याचें कौशल्य नव्हतें असें दिसतें. तथापि मुत्सद्यांच्या शहाणपणानें राज्यकारभाराची घडी विशेष न बिघडतां कशीबशी चालली असती. परंतु, स्वहितोद्देशानें पेशवाईच्या नाशास कारण झालेल्या रघुनाथरावाच्या राज्यलोभास ते बळी पडले. आणि रघुनाथरावानें एकदाचा पेशवेपदाचा तिलक बलात्कारानें आपल्या कपाळीं लावून घेतला. परंतु पुतण्याचा नाश करणाऱ्या दादासाहेबांस पेशवेपद मिळावें ही गोष्ट बहुतेक मुत्सद्दीमंडळ व रयत यांतून कोणासच संमत नव्हती. त्यांची दृष्टि मयत पेशव्याची स्त्री गंगाबाई गरोदर होती तिला पुत्र होईल आणि त्याचे नांवें राज्यकारभार चालवितां येईल, या महत्त्वाच्या गोष्टींकडे होती. त्या वेळीं नाना फडणवीस, सखाराम बापू, हरिपंत फडके वगैरे शहाणे मुत्सद्दी रघुनाथरावाच्या विरुद्ध होते. त्यांनीं सर्व सरदारांचीं अंतःकरणें आपणांकडे ओढून घेऊन रघुनाथरावाविरुद्ध आपला पक्ष बळकट केला. या वेळीं या गुप्त कटास योग्य अशी संधिही त्यांना मिळाली. नारायणरावाच्या वधामुळें पेशवाई निर्नायक झालेली आहे ह्मणून आतां आपणास मराठ्यांपासून उपद्रव न होतां त्यांचा मुलुख घेण्यास मुबलक सवड मिळेल, अशा प्रकारें निजाम व हैदर मनांत मांडे खात होते. आणि त्यांनीं तसे प्रयत्नही चालविले. यासाठीं रघुनाथरावांस फौजेसह तिकडे जावें लागलें. दादासाहेबांस आपल्या उपद्यापी मुत्सद्दीमंडळास मागें ठेवणें भीतिप्रद वाटल्यामुळें त्यांना गोरवून आपल्याबरोबर नेणें भाग पडलें. दादासाहेब मोठी फौज बरोबर घेऊन हैदरावर निघाले. जातांना अगोदर निजामाचा समाचार घेतल्यावांचून पुढें जाणें सुरक्षित न वाटून त्यांनीं त्याजवर स्वारी केली, आणि बेदर मुक्कामीं त्याचा पराभव केला. त्यामुळें निजामानें तह केला. त्यांत पेशव्यांस वीस लक्षांचा मुलूख मिळाला. परंतु पुढें निजामानें दादासाहेबांबरोबर सख्य ठेवून त्यांजपासून तो मुलुख परत मिळविला. नंतर दादासाहेब कर्नाटकांत हैदरावर चालून गेले. ह्या मुदतींत हें मुत्सद्दीमंडळ दादासाहेबांची आज्ञा वरकरणी मानीत असे. परंतु त्यांचें सारें लक्ष गंगाबाई प्रसूत होऊन तिला मुलगा होईल या गोष्टीकडे वेधलें होतें. आपली बाजू खंबीर करण्यासाठीं त्यांनीं कडेकोट तयारी केली होती. शिंदे, होळकर वगैरे फौजबंद शूर सरदारांनीं सूचनेबरोबर आपल्यास मिळावें, असें त्यांनीं ठरवून ठेविलें होतें. मग ते एकेक कांहीं कांहीं निमित्त करून पुण्यास आले. आणि शेवटीं फौजेंत दादासाहेबच एकटे राहिले. ह्या विरुद्ध पक्षांत सखाराम बापू, नाना फडणवीस, मोरोबादादा फडणीस, बजाबा पुरंदरे, हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा व बाबूजी नाईक बारामतीकर, हे प्रमुख असत. ह्यांनीं पुण्यास येतांच गंगाबाईस पुरंदरच्या किल्ल्यावर मोठ्या बंदोबस्तांत ठेवून तिला पुढें पुत्र होईल या भविष्यावर 'गर्भवासी श्रीमंत

सवाई माधवराव' या नांवाचे शिक्के करून राज्यकारभार चालविला. ह्या कारभारीमंडळास बारभाई ह्मणत असत. पुढें हें सर्व कारस्थान दादासाहेबांस समजलें. तेव्हां ते हैदराच्या स्वारीची निरवानिरव करून ताबडतोब फौज घेऊन पुण्याकडे वळले.

साबाजी भोसले व मुधोजी भोसले यांजमध्यें वाद चालला होता. त्या कामीं साबाजीनें निजामाची मदत मागितली होती या सबबेनें त्याचें पारिपत्य करावयाचें ठरून त्याजवर त्रिंबकराव मामास फौजेसह दादासाहेबांनीं पाठविलें. परंतु दादासाहेबांवर जगच फिरलेलें! तेव्हां सगळेंच कारस्थान उलटें होऊन ते दोघे एकमतानें दादासाहेबांवरच उलटले! पण दादासाहेबांनीं त्रिंबकराव मामाच्या फौजेस एकाएकीं गांठून तिचा मोड केला, आणि त्रिंबकरावास ठार मारिलें.¹ पण त्यांना कांहीं उपयोग न होतां पुण्यांतील बारभाईनीं आपलें कारस्थान चांगलें रंगारूपास आणून रघुनाथरावांच्या मागें मोठ्या फौजेसहित हरिपंत फडक्यांस लाविलें. तेव्हां राघोबा भरारींची स्वारी नर्मदा उतरून शिंदे व होळकर इंदुरास होते, तिकडे त्यांची मदत मिळेल अशा आशेनें गेली. राघोबादादा राज्यलोभासाठीं अशा भराऱ्या मारीत आहेत, तों इकडे पुरंदरीं गंगाबाई प्रसूत होऊन ता० १८ एप्रिल इ० स० १७७४ रोजीं पुत्र प्रसवली. त्याचें नांव सवाई माधवराव ठेविलें. याप्रमाणें बारभाईनीं रचिलेल्या खटपटीस देवही अनुकूल आहे असें ठरलें. मात्र बजाबा पुरंदरे, मोरोबा फडणीस वगैरे मंडळी पुनः दादासाहेबांचा पक्ष स्वीकारून ह्या बारभाईंच्या कटांतून फुटली. तरी नाना व बापू ह्या खंबीर मुत्सद्यांनीं आपल्या शहाणपणानें असल्या अपशकुनांस दाद दिली नाहीं. दादासाहेब मदतीसाठीं आपल्याकडे आले, तेव्हां त्यांचा बाह्यात्कारीं तरी बहुमान ठेवणें शिंदेहोळकरांस भाग होतें व त्याप्रमाणें त्यांनीं त्यांची बरदास्त ठेविली व आपला उद्देश त्यांस स्पष्ट कळूं दिला नाहीं, आणि बारभाईंचें कारस्थान तेजींत आल्यावर दादासाहेबांकडील पैरवी कमी केली. दादासाहेबांकडे अशा प्रसंगींही सुमारें चाळीस हजार फौज होती.

दादासाहेबांनीं आपल्यास मुख्य कारभाऱ्यांपैकीं कोणी अनुकूळ नाहींत व शिंदेहोळकर यांचेंही आपल्याविषयीं चित्त शुद्ध नाहीं, असें जाणून त्यांनीं सन १७७४ च्या सपटंबर महिन्यांत आपल्यास मदत देण्याविषयीं इंग्रजांशीं बोलणें सुरू केलें. परंतु तें जमलें नाहीं. हरिपंत फडके दादासाहेबांच्या पाठीवर होतेच. त्या दोघांची लढाई गुजराथेंत महीनदीचे कांठीं ता० १७ फेब्रुआरी सन १७७५ रोजीं होऊन दादासाहेबांचा पराभव झाला. हरिपंत फडक्यांस शिंदे व होळकर यांची चांगली मदत मिळाली. ह्मणून राघोबादादांच्या शौर्याचा विशेष उपयोग झाला नाहीं.

राघोबादादांस एतद्देशीय राजेरजवाड्यांपैकीं कोणीं मदत केली नाहीं. इंग्रज लोक त्यांस मदत देण्यास राजी होते. परंतु त्यांचें मागणें साष्टी व वसई, हीं ठाणीं त्यानें आपल्यास द्यावीं असें

१. ग्रांट डफ ह्मणतात 'रघुनाथराव व त्रिंबकराव यांची लढाई पंढरपूर व कासेगांव यांचे मध्यें झाली. तींत त्रिंबकरावास मोठमोठ्या जखमा लागून ते रघुनाथरावाच्या हातीं लागले.' हे त्रिंबकराव सदाशिवरावभाऊंचे मामा होते. पुढें त्यांना कैदेंत ठेविलें असतां आनंदीबाई त्यांजवर वारंवार फटके मारवी, व "आतां कसें! मेले चालले मसलती करून राज्यांत बखेडे घालायाला!!" असें त्यांस टोंचून बोले. त्या वेळचें त्या निधड्या शूराचें उत्तर लक्षांत ठेवण्याजोगें आहे. तो तिला खडखडीत जाबसाल करी कीं, "दुष्टे मी एक मेलों तरी हरकत नाहीं. तुझे दुसरे × × × पुण्यास पुष्कळ बसले आहेत, ते तुझ्या हातीं कधीं राज्य लागूं देणार नाहींत!" पे. व. पृ. ९६.

होतें. तीं ठाणीं देण्याचें रघुनाथरावांच्या मनांतून नसल्यामुळें इंग्लिशांकडून त्यांस मदत मिळ-ण्याचें लांबणीवर पडलें. पुढें आपला इलाज चालत नाहीं व राज्यलोभ तर सुटत नाहीं अशा फिकिरींत पडलेल्या राघोबानें ता० ६ मार्च सन १७७५ रोजीं सुरत मुक्कामीं मुंबईकर इंग्रजांशीं तह ठरविला. त्यांत ठरलें कीं, साष्टी, वसई वगैरे मुंबईजवळचे प्रांत आणि भडोच व सुरत परगण्यांचा वसूल मिळून एकुणीस लक्षांचा मुलुख इंग्रजांस द्यावा आणि त्याबद्दल तीन हजार फौज इंग्रजांनीं रघुनाथरावाच्या साह्यार्थ द्यावी. त्या फौजेचा खर्च रघुनाथरावानें द्यावा. याप्रमाणें रघुनाथरावाची इंग्लिशांकडे कबुलायत गुदरली. इतकें झाल्यावर इंग्लिश रघुनाथरावाचे प-क्षपाती झाले.

पुढें दादासाहेब इंग्लिशांच्या फौजेसह गुजराथेंत असतां त्यांची व हरिपंत फडके यांची आराम एथें गांठ पडून ता० १८ मे सन १७७५ रोजीं लढाई झाली. ह्या प्रसंगीं हरिपंतांच्या मदतीस [१]शिंदे होळकर यांची कांहीं फौज होती. स्वतः पाटीलबावा व जिवबादादा दुसरीकडे गुंतले होते. इंग्रजांचे फौजेंत कर्नल किटिंग साहेब मुख्य होता. ह्या लढाईंत उभय पक्षांचे पुष्कळ लोक मेले. निश्चित यश कोणत्याच पक्षास मिळालें नाहीं.

पुढें मुंबईवाले इंग्लिश यांनीं पुण्याच्या गादीवरील पेशव्याविरुद्ध रघुनाथरावास मदत दिली, हें गव्हरनर जनरल वारन हेस्टिंग्स ह्यांस मान्य न झाल्यामुळें त्यांनीं पुणेकर कारभाऱ्यांशीं स्वतंत्र तह करण्यासाठीं अप्टन नामें एक हुषार वकील त्यांजकडे पाठविला, आणि त्यांशीं पुरंदर मुक्कामीं नवा तह ठरविला. त्या तहांत ठरलें कीं, 'साष्टी इंग्लिशांकडे रहावी, व ती परत दिल्यास पेशवे सरकारानें तीन लक्षांचा दुसरा मुलुख मोबदला द्यावा. भडोच परगणा तीन लाखांचा इंग्रजांस स्ने-हाखातर द्यावा, व रघुनाथरावाबरोबर सुरत एथें झालेला तह रद्द समजावा. त्याला इंग्लिशांनीं मदत करूं नये, व तो स्वस्थ राहत असल्यास त्यानें पंचवीस हजार रुपये दरमहा घेऊन गोदा-तीरीं कोपरगांवीं रहावें. त्याच्या तैनातीस एक हजार घोडे असावे. व त्याला किंवा पेशवे सरका-रचे राज्यांतील कोणत्याही बंडखोर किंवा फितूर इसमास इंग्रजांनीं मदत देऊं नये.' ही गोष्ट ता० १ मार्च सन १७७६ रोजीं घडली.

पाणिपत्रच्या लढाईंत सदाशिवरावभाऊंचें प्रेत कोणास सांपडलें नव्हतें. त्यावरून गर्दींत भाऊ गडप झाले असें कोणाचें ह्मणणें, व कोणाच्या मतें ते त्या अपयशामुळें रण सोडून निघाले, ते दुसरे ठिकाणीं सुरक्षित असावेत. ह्या दुसऱ्या लोकवदंतेचा फायदा दोघां लबाड व मतलबी माण-सांनीं घेऊन ते निरनिराळ्या वेळीं पुढें आले आणि आपण सदाशिवरावभाऊ असें भासवूं लागले. एवढेंच नव्हे तर त्यांनीं राज्यप्राप्तीसाठीं बंडें आरंभिलीं. पैकीं एक तोतया काशीस प्रसिद्ध होऊन गडबड चालवूं लागला. शिंद्यास ही बातमी लागल्यावरून जिवबादादांनीं काशीस जाऊन त्याला पकडलें. पुढें त्यास चुनारगड किल्ल्यांत कैद करून ठेविलें होतें. तो कैदेंत असतांच गोरखपूर एथें मरण पावला. पण दुसऱ्या तोतयानें आपल्या प्रयत्नास बरेंच रूप आणिलें. तो पहिल्यानें झांशी प्रांतांत प्रसिद्ध होऊन व तेथें लोक जमा करून त्यानें कित्येक किल्ले घेतले. त्या वेळीं त्यास मल्हारराव होळकरांनीं पकडून सन १७६२ त पुण्यास पाठविलें होतें. पण नारायणराव पेश-

१. महादजींचें नातूकृत चरित्र पृ. १२३.

त्याच्या खुनाचे गडबडींत तो संधि साधून पळून गेला आणि त्यानें पुनः लोक जमवून बंड केलें. पुढें तो वाढतां वाढतां रत्नागिरीस आला. तेथें पेशव्यांतर्फें रामचंद्र नाईक परांजपे सुभेदार होता. त्यानें लांच घेऊन किल्ला तोतयाच्या स्वाधीन केला. ही गोष्ट सन १७७६ त घडली. याप्रमाणें तोतया सदाशिवरावाचें बस्तान जुळत चालल्याचें समजल्यावरून तें बंड मोडण्याची पेशव्यांनीं खटपट चालविली. ह्या तोतयास इंग्रजांचाही आश्रय होता. आणि ही गोष्ट तर पुरंदरच्या तहाविरुद्ध होती. अशाप्रकारें तोतयाचें प्रस्थ वाढल्यामुळें पेशव्यांनीं शिंद्यास त्याचें पारिपत्य करण्याविषयीं सांगितलें. आणि आपलेकडील भिंवराव पानशे यांजबरोबर कांहीं फौज देऊन त्यांस तिकडे पाठविलें. पाटीलबावांनीं पानशांबरोबर रामजी पाटील जाधव ह्यांची नेमणूक केली. ह्या उभयतांनीं तोतयाचा पराभव करून त्यास कैद केलें आणि लागलीच त्याची रवानगी पुण्यास केली. तेथें त्यास नाना फडणवीस ह्यांनीं ता० १७ डिसेंबर सन १७७६ रोजीं हत्तीच्या पायीं बांधून ठार मारविलें.

ह्या तोतयाचे प्रकरणांत इंग्लिशांनीं त्यास मदत केल्यावरून पेशव्यांस वाईट वाटून त्यांनीं इंग्लिशांसंबंधानें मनांत अढी ठेविली, व अशा रीतीनें उभयतांमध्यें वैमनस्य आलें. पुढें त्या दोन्ही सरकारांमध्यें ह्या संबंधाचा विचार होत आहे, तों हा कलह पेटण्यास दोहों बाजूंस दोन गोष्टी कारण झाल्या. मुंबई सरकारानें पहिल्यानें सुरतेस तह करून राघोबादादांस मदत दिली व ती रद्द करून हिंदुस्थान सरकारानें नवा तह ठरवून पुणेकर मुत्सद्यांशीं सख्य ठेविलें. ह्या दोन गोष्टी जेव्हां विलायत सरकारास समजल्या, तेव्हां तेथील अधिकाऱ्यांत त्याबद्दलची बरीच वाटाघाट चालून असें ठरलें कीं, मुंबईकरांनीं सुरतेचा केलेला तह हितप्रद असतां गव्हरनर जनरलनें या कामीं उगाच हात घालून नवा तह ठरविला. तो आह्मांस पसंत नाहीं. मग ह्याप्रमाणें त्यांनीं कलकत्त्यास वारन हेस्टिंग्सला लिहिलें. इकडे पुण्यांतील प्रमुख मुत्सद्दी सखाराम बापू बोकील ह्यांनीं गादीवरील पेशव्याविरुद्ध रघुनाथरावाच्या तर्फे गुप्त मसलती चालविल्या होत्या. तेव्हां नाना फडणविसादि इतर मुत्सद्यांस ह्याबद्दलचा बंदोबस्त करणें भाग झालें. सखाराम बापूंच्या ह्या कटांत मोरोबादादा फडणवीस व बजाबा पुरंदरे हे सामील होते ह्मणून अगोदर त्या दोघांस कैद करून सखाराम बापू बडें प्रस्थ–थोर मुत्सद्दी त्यांस कैद केल्यास शत्रूंस आब कळेल व भीति राहणार नाहीं–ह्मणून त्यांस उघड कैद न करितां त्यांजवर देखरेखीसाठीं पाहारा मात्र ठेविला. ह्या सर्व गोष्टी नाना फडणीसांनीं शिंद्यावर संपविल्या. त्या त्यांच्या तर्फे जिवबादादांनीं मोठ्या युक्तीनें पार पाडिल्या. मग "ह्याप्रमाणें बंदोबस्त करून व नाना फडणीसाचें दरबारांत वर्चस्व स्थापून महादजी आपल्या जांबगांवीं गेले." हें सर्व घडून आल्यानंतर इंग्लिश व मराठे ह्यांजमध्यें पक्का द्वेष उत्पन्न झाला.

१. हें तोतयाचें बंड एक वर्ष चाललें होतें. त्यास इंग्रज, हैदर, निजाम, कोल्हापूरकर व रघुनाथराव हे सहाय होते. त्यानें पहिल्यानें पेशव्यांचा पराभव केला होता. पुढें महादजींनीं त्याचा पराभव केला आणि पेशव्यांचें संकट दूर केलें.

२. नाना या मंडळीच्या भीतीनें पुरंदर एथें पळून गेले होते. यावरून विरुद्ध पक्षाच्या प्राबल्याची व शिंद्याच्या मदतीची वास्तविक योग्यता कळेल.

३. महादजी शिंदे यांचें ना. नातूकृत चरित्र पृ. १३१, पेश. बखर, पृ. १०३।१०४ व ग्रांट डफची बखर.

मुंबई सरकारानें पहिल्यानें राघोबादादास मदत देऊन जे ठराव केले, तेच विलायत सरकारास पसंत वाटल्यामुळें त्यांनीं मुंबई सरकाराची पाठ थोपटली, आणि गव्हरनर जनरलास ठपका दिला. ह्यामुळें गव्हरनर जनरल वारन हेस्टिंग्स ह्यानें पुणेकर पेशव्यांविरुद्ध आपलें धोरण चालू ठेविलें. हें पाहून इकडे नाना फडणवीस वगैरे पुणेकर मुत्सद्यांनीं इंग्रजांच्या मनांत आपल्याशीं पुरंदरच्या तहाप्रमाणें स्नेह चालवावयाचा नाहीं असें जाणून इंग्लिशांशीं युद्धप्रसंग येईल तर तशी तयारी ठेवावी ह्मणून जारीनें प्रयत्न आरंभिले. नानांनीं शिंदे व इतर सरदार यांस इंग्रजांचें धोरण व पुढें येणाऱ्या प्रसंगाकरितां लागणारी तयारी ह्या बाबतींत पुनः पुनः लिहून त्यांना इंग्लिशांविरुद्ध उठविण्याचा प्रयत्न आरंभिला. आणि हरिपंताच्या ताब्यांतील खुद्द पेशव्यांचे लष्कराची जारीनें तयारी ठेविली. शिवाय फ्रेंचांचा एक वकील पुण्यास आला होता त्यास त्यांनीं पुष्कळ दिवस ठेवून घेतलें. त्यांत मतलब हाच कीं, येणेंकरून इंग्लिशांस दहशत बसावी. इकडे विलायत सरकारच्या हुकुमास अनुसरून पेशवाईचीं सूत्रें आपल्या तर्फेच्या मनुष्याच्या हातीं ठेवावीं ह्मणून वारन हेस्टिंग्स ह्यानेंही कडेकोट तयारी चालविली.

फौजेस कवाईत शिकवून तिची उत्तम तयारी ठेवणाऱ्या व दिवसेंदिवस वैभवास चढत चाललेल्या प्रबल शत्रूबरोबर (इंग्रजांबरोबर) जे दोन हात करावयाचे, त्यासाठीं आपलीही तयारी तशीच उत्तम असावी, अशी पेशव्यांचे मुख्य कारभारी नाना फडणीस ह्यांची फार फार इच्छा होती. व ह्मणूनच त्यांनीं शिंदे, होळकर वगैरे सरदारांस फौजेच्या चांगल्या तयारीनिशीं सरकारच्या सैन्यास येऊन मिळावें अशाबद्दल वारंवार आग्रहानें लिहिलें होतें. परंतु ह्या दिवसांत शिंदे व नाना, यांचें चित्त असावें तसें शुद्ध नव्हतें असें दिसतें. त्या वेळच्या त्या उभयतांच्या पत्रव्यवहारावरून खरा प्रकार काय होता व पाणी कुठें मुरत होतें ह्या गोष्टीचा शोध लागण्यास बरेंच साह्य होतें. तरी त्यांच्या अंतस्थ व बाह्य खटपटींची इत्थंभूत माहिती मिळाल्याशिवाय व सर्व पत्रव्यवहार उघडकीस आल्याशिवाय ह्याचा नीट खुलासा होणार नाहीं. तरी पुढें आलेल्या पुराव्यावरून खालील-प्रमाणें अनुमान निघतें.

नानाच्या शहाणपणाविषयीं व पेशव्यांसंबंधानें ते अत्यंत राजनिष्ठ होते ह्याविषयीं बहुधा मतभेद नाहीं. परंतु शिंदे घराण्याच्या मागील इतिहासाकडे नजर दिल्यास पाटीलबावांसारखा शूर, धोरणी व चतुर सरदार नानांच्या विचाराबाहेर जाण्यास तो स्वार्थापुढें पेशव्यांच्या हिताची परवा करीत नव्हता, असें तरी एक कारण असावें; किंवा त्यास सरकारच्या कामास दिरंग लागला तरी सर्व गोष्टींचा नीट विचार करून मग काय ती मदत करावी, असें तरी वाटत असावें. पूर्वेतिहासा-वरून पहिल्या कारणास थारा राहत नाहीं. आणि तें खरें मानिल्यास प्रबल झालेल्या पाटी-लबावांनीं पेशवे सरकार हे आपले धनी आहेत व त्यांस योग्य प्रसंगीं मदत देणें हें आपलें कर्तव्य आहे, असें समजून आपल्या सुरक्षिततेचा बंदोबस्त ठेवून वेळोवेळ त्यांनीं जी पेशव्यांस मदत दिली, ती तरी त्यांनीं कां दिली हा प्रश्न उभा राहतो. त्याचें समाधान दोन तऱ्हांनीं करितां येईल. एक त्यांनीं मदत दिली नसती तर त्यांचें वैभव टिकलें नसतें, या अर्थानें त्यांनीं दिली असावी; व दुसरें तसें करणें हें आपलें कर्तव्य आहे ह्मणून ती दिली असावी. पाटीलबावांच्या प्राबल्याचा व त्यांना ठिकठिकाणीं आलेल्या यशाचा विचार केल्यास पहिलें कारण खरें दिसत नाहीं. कारण होळकर, भोसले, गाइकवाड व इतर मराठे सरदार यांचें पेशव्यांविरुद्ध जूट करण्यास त्यांच्या

मेंदूंत अक्कल व जिव्हेंत सामर्थ्य होतें. शिवाय स्वतः त्यांची सैन्यशक्तिही कमी नव्हती. तेव्हां त्यांना मदत दिल्याशिवाय गत्यंतर नव्हतें असेंच केवळ ह्मणतां येत नाहीं. तेव्हां अर्थातच ती आपलें कर्तव्य ह्मणून दिली त्यांनीं असली पाहिजे. पाटीलबावा पेशवे सरकारच्या हिताहिताची परवा करीत नव्हते असें त्यांच्या मागील व पुढील वर्तनक्रमावरून दिसून येत नाहीं. स्वार्थासंबंधाचा शोध करितांना फार दूरवर नजर पोहोंचविली पाहिजे. राणोजीपासून शिंद्यांचें पेशव्यांशीं जें वर्तन होतें, तें ह्या वेळींही बदललें होतें असें समजण्यास कांहीं पुरावा नाहीं. पेशव्यांनीं पराक्रमावरून जहागीर देऊन सरदार बनविल्यावर स्वतंत्रपणानें लढाया करून मुलूख वाढवणें, आसपासच्या संस्थानिकांवर आपली छाप ठेवणें, अगत्याचा प्रसंग येईल त्या वेळीं पेशवे सरकारास मदत करणें वगैरे गोष्टी जशा राणोजीकडून किंवा जयाप्पादत्ताजीकडून घडत होत्या, तशाच पाटीलबावांकडूनही घडून येत असत. मात्र आपल्या प्रत्येक हितसंबंधाचे वेळेस शिंद्यांनीं हजर असावें, त्या वेळीं आपल्या कोणत्याही अडचणी पुढें आणूं नयेत, असा जो नानांचा आग्रह, तो त्यांस सर्वांशीं पसंत नव्हता. शिवाय नानांस आपला उत्कर्ष सहन होत नाहीं, असा त्यांचा ग्रह होता. तथापि पेशव्यांची योग्य बाजू संभाळण्यास पाटीलबावांची तक्रार होती असें नव्हे. जेव्हां जेव्हां मदतीसाठीं किंवा कोणतीही गोष्ट घडवून आणण्यासाठीं नानांकडून लिहून येई, तेव्हां तेव्हां त्यांना कामाचें महत्त्व, आपल्या अडचणी व भोंवतालची स्थिति यांचा विशेष विचार करावा लागे. त्यांच्या राजकीय कामाची व्याप्ति फार व इतर सरदारांहून निराळ्या प्रकारची होती. ह्मणून कधीं कधीं नानांच्या ह्मणण्याप्रमाणें घडून येण्यास दिरंग लागे. नानांच्या पत्रांत पाटीलबावांसंबंधानें जो गौरव व जी दिलसफाई दृष्टीस पडते, ती जर अकृत्रिम असती, तर पाटीलबावा विनाकारण कुतर्क काढून शुद्ध व हितप्रद स्नेहांत व राजनिष्ठेंत अंतर पडेल असें कां लिहिते, तें समजत नाहीं. त्यांना केवळ दांडगाईनेंच वागावयाचें होतें व नानासारख्यांचें दिल समजण्याची त्यांना अक्कल नव्हती, असें कोणीच ह्मणत नाहीं. त्यांची राजनिष्ठा पुढें प्रत्येक वेळीं व्यक्त झाली आहे. मग हें गौडबंगाल काय असावें? आमचें तर असें मत आहे कीं, हा लढा पेशवे व महादजी यांजमध्यें नसून, नाना व महादजी यांच्यांत होता. आणि त्यास कारणें जरी व्यक्तिविषयक नव्हतीं, तरी अभिमान व्यक्तिविषयक होता हें खचित! मग पुरावा पुढें येईल त्याप्रमाणें दोषाधिक्य कोणाकडेही ठरो. त्या उभयतांची दिलसफाई नसण्यास ह्या वेळीं एक प्रासंगिक कारण झालें होतें. "मल्हारराव होळकर वारले, व त्यांच्या संस्थानास वारस त्यांची सून अहल्याबाई ही राहिली. मग तुकोजी होळकरास अहल्याबाईतर्फे मुखत्यार नेमून त्या संस्थानची व्यवस्था लाविल्याचें मागील भागांत लिहिलेंच आहे. ह्या प्रसंगीं नानांनीं अहल्याबाईस अशी निकड लाविली कीं, "बाईनें डौलाचे खर्चापुरता ऐवज ठेवून तेथील वहिवाट बाकीकडील महालकरी तिहीं महालीं आहेत, त्यांनीं करावी. बाकीचे महाल राहिले. त्यास होळकरास ममलतसंबंधें पैका लागेल तो बाकीचे महालांपासून घेतील." असें पाटीलबावांमार्फत बाईस निक्षून कळावें. ही गोष्ट पाटीलबावांस मान्य झाली नाहीं[२]. कारण अशा प्रकारें सरदारांच्या दौलतींत एक एक निमित्तानें ढवळाढवळ झाल्यास अर्थातच सर्वांच्या दौलती संपुष्टांत येतील. आज जें संकट होळकरांस, तेंच उद्यां आह्मांस. मग पाटीलबावांनीं लिहिलें कीं, "खावंदांचे घरींहून जावसाल होणें ते यथायुक्त होत असावे.

१।२. पत्रें व यादी पृ. २१२ व लेखसंग्रहमाला पृ. २५।२६.

पूर्वीच्या चाली पहाव्या. तीं धोरणें पुढें चालवीत असावीं. न ऐकेल त्यास समजून सांगावें. तें न होतां बाईस संपुष्टांत घालावी अशीच साऱ्यांची मर्जी एकसा दिसते यावरून आश्चर्य आहे. अहल्याबाई होळकरांची सून. तिचा अपमान केला असतां लौकिकांत ठीक दिसेल कीं काय ? होळकर व शिंदे यांचे महाल बरोबरीचे असतां होळकरांचा वसूल कमी कां, याचाही विचार धनीपणाचा कारभार जिकडे असेल त्यांनीं करावा. एकाचाच पक्ष धरून लिहिणें बोलणें युक्त नाहीं. " व "तीही केवळ अपमान करून घ्यावयाजोगी नाहीं. होळकरानें फत्तेगडचे आलीकडे आजपावेतों चाकरी कोणती केली ? सरंजामाचा वसूल आजपावेतों किती आला ? " ह्या उताऱ्यावरून नाना व महादजी यांमधील लढा कोणच्या बाबतींत होता, हें दिसून येतें. सरदारांच्या दौलतीवर नानांनीं फाजील डोळा ठेविलेला तेजस्वी महादजींस खपत नव्हता. एक वेळ वहिवाट पडूं दिली ह्मणजे ती बोकांडीं बसते या गोष्टीवर पाटीलबावांनीं कटाक्ष ठेविल्यामुळें ते अराजनिष्ठ होते व नानांच्या लेखाचा भलताच अर्थ करून कुत्सितपणानें सामर्थ्याच्या जोरावर ते कांहीं तरी लिहीत, असें जें कित्येकांनीं ठरविलें आहे, तें यथार्थ दिसत नाहीं. शिवाय शिंद्यास असाच वाढूं दिल्यास तो पेशव्यांसही भारी होईल, तेव्हां त्याची सत्ता व वैभव हीं मर्यादित असावीं अशी नानांची समजूत असून त्यांचे सर्व उद्योग त्याच धोरणानें चालले आहेत, असा महादजींस पक्का संशय होता. या सर्व विचारांवरून महादजीवरील आरोपांत तथ्यांश कितीसा शिल्लक राहतो याची कल्पना सुज्ञ वाचकांस होईल. पाटीलबावा हे स्वतः धोरणी असून त्यांचे कारभारीही दौलतीच्या हितसंबंधाविरुद्ध खटपटी करणारांचें कांहीं चालूं देणार नव्हते. नानांकडून ज्या ज्या बाबतींत विरुद्ध खटपटी होत असत, त्या त्या बाबतींत त्यांनीं नानांचें कांहीं चालूं दिलें नाहींच. परंतु त्या प्रयत्नांमुळें नानांचा हेतु उघड होऊन हे विशेष सावध राहूं लागले. 'शिंदे शुद्ध सरदार राहावे' ह्मणून नानांचे हे प्रयत्न होते, व ह्या अंतस्थ कारणामुळेंच त्यांच्या पत्रव्यवहारांतील लढा दृष्टोत्पत्तीस येत आहे. वस्तुतः पेशव्यांविषयीं पाटीलबावांच्या मनांत किंतु नव्हता. असो. अशा प्रकारें एकमेकांचे कावे ओळखून जरी हे कागदी घोडे नाचले, तरी शेवटीं पाटीलबावांनीं आपलें कर्तव्य बजावण्यास कसूर केली नाहींच, हें पुढील हकीकतीवरून कळेल.

वर सांगितल्याप्रमाणें पेशवे व इंग्लिश यांची सर्व सिद्धता झाल्यावर लढाईचा विचार कायम ठरला.[2] आणि इ० स० १७७८ त गव्हर्नर जनरल साहेबांनीं आपली फौज गाडर्डसाहेबाच्या हाताखालीं देऊन त्यांची दक्षिणेंत पेशव्यांवर रवानगी केली. ह्या सैन्यांत कर्नल इगर्टन व क्या-

१. 'इंग्लिशांशीं लढण्यासाठीं मोठी फौज तयार करण्याचे कामांत अहिल्याबाईकडून जेवढ्या फौजेची मदत व्हायाला पाहिजे तेवढी होत नाहीं. कारण बाईस धर्मादायाचे कामांत अतिशय खर्च होत असतो त्यामुळें फौजेच्या खर्चास तुकोजी होळकरांस व्हावा तेवढा पैशाचा पुरवठा होत नाहीं. यासाठीं तशी व्यवस्था व्हावी,' असा नानांचा आग्रह होता. परंतु मल्हाररावांपासून सरकारास मदत करण्याचें जें धोरण होतें, तें किंवा दुसरी कोणतीही पद्धति बाईनें न बदलतां जो कांहीं हरएक बाबतींत अल्पस्वल्प फेरबदल केला, तो योग्य होता. आपल्या धर्मादायामुळें राज्यव्यवस्थेंत तिनें काडीभर ढिलेपणा पडूं दिला नव्हता, ही गोष्ट सर्वमान्य आहे. अहिल्याबाईची एकंदर कारकीर्द चांगली व पद्धतशीर होती, असें सर्व लोक मानितात. मग पाटीलबावांनीं असत्पक्षाभिमान धरिला व कुत्सितपणानें कांहीं तरी 'विक्षेपाचा ग्रंथ रचिला' या नानांच्या ह्मणण्याची सत्यता लक्षांत येत नाहीं.

२. म. ग्रा. वि. पु. ११, पृ. ७७.

प्टन स्टुअर्ट (इस्टुर फांकडा), कोबर्न व नारनॉक हे प्रमुख सरदार होते. ह्यांनीं रघुनाथराव दादासाहेब पेशव्यांसही आपले बरोबर आणलें. कारण ते त्यांची वाटच पाहत होते. ते त्यांस बरोबर घेऊन येत असतां नानांनीं पुण्यांत फौज सिद्ध करून तिच्या कित्येक तुकड्या निरनिराळ्या घांटांनीं त्यांजवर कोकणांत पाठविल्या. त्या टोळ्यांवर भिंवराव पानशे, बाजीपंत जोशी व गणेशपंत बेहेरे हे सरदार होते. ह्या फौजेंत नुसते स्वारच दहा हजार होते. ह्यांनीं तळेगांवानजीक वडगांव एथें आपल्या फौजेचें मुख्य ठाणें केलें. ही बातमी समजतांच इंग्रजांनीं गणेशपंत बेहेऱ्यांवर हल्ला करून त्यांचा मोड केला. त्यांत बेहेऱ्यांस दोन जखमा लागल्या. दुसरीकडे इंग्रज व हरिपंत लढत होते. त्यांतही इंग्रजांचा पराभव झाला नाहीं. इंग्रजांनीं पारनेर किल्ल्यास वेढा देऊन तोही घेतला. शिवाय इंग्रजांच्या मदतीस मद्रासेहून तीन हजार आणि सुरतेहून दोन हजार शिपाई आले. या प्रकारें इंग्रजांचें प्राबल्य होत चाललें. ह्या वेळेपर्यंत झालेल्या लढायांत इंग्रज हटले नाहींत, इतकेंच नव्हे, तर त्यांचा दिवसेंदिवस विशेष जोरा पाहून "त्या समयीं सरकारची आज्ञा पुण्यांत कारभारी होते त्यांस झाली कीं, इंग्रजांचे लढाईची सरसी आहे. याजकरितां शहरावर इंग्रज चालून आला असतां शहरांत व सरकारवाड्यांत कडबा भरून आग लावून द्यावी[1] !! " अशा संकटाच्या प्रसंगीं नानांनीं पाटीलबावांस सैन्यासह त्वरित येण्याविषयीं लिहिलें. " त्यावरून शिंदे दरकुच निघाले. ते पुरंदर मुक्कामीं येऊन दाखल झाले. सर्वांच्या भेटी झाल्या. " पाटीलबावांबरोबर सेनापति जिवबादादा होते. तसेच होळकरही ससैन्य आले. ही मोठी मदत येण्याबरोबर नानांची मोठी काळजी दूर झाली.

पुढें दोहींकडील तयारी झाल्यावर इंग्रजांची फौज ता० २३ डिसेंबर सन १७७८ रोजीं बोरघांट चढून आली, व त्यांनीं दाभाड्यांचें तळेगांव एथें आपला तळ दिला. शिंदे फौजेसहित मदतीस आल्यामुळें मराठ्यांचा पक्ष प्रबळ झाला. इंग्रज घांट चढून आल्यानंतर, शिंदे, होळकर येण्या-पूर्वीं हरिपंत वगैरे मराठे सरदारांबरोबर त्यांच्या बऱ्याच लढाया झाल्या, तरी इंग्रजांचा पराभव झाला नाहीं. त्यामुळें मराठ्यांवर आपल्यास जय मिळविणें फार कठीण नाहीं, अशी त्यांच्या पराक्रमी सरदारांची समजूत होती. त्यांच्या सैन्याची तयारीही उत्तम होती, व मराठ्यांच्या सैन्याशीं ज्या तऱ्हेनें सामना दिला पाहिजे, ती तऱ्हा जाणणारे रघुनाथरावही बरोबर होते. त्यामुळें त्यांस खातरी वाटत असे ती पुष्कळ अंशीं बरोबर होती. ह्या होणाऱ्या मोठ्या लढाईपूर्वीं होळकर आपल्यास अगोदर येऊन मिळेल, अशी रघुनाथरावांची अटकळ होती व तशी त्यांनीं इंग्रजांस भर दिल्यावरून ते पुढें कारलें येथें गेले. तेथें पोहोंचल्यावर पाटीलबावांच्या विद्यमानें जिवबादादा व हरिपंत यांजमध्यें पुढें कसकशी लढाई चालवावी, फौजेची रचना कशी करावी, वगैरे सर्व बेत ठरले. " अघाडीस तोफखाना पसरून त्याचे पाठीमागें पायदळ उभें करून त्याच्या मागें स्वार उभे राहिले.[2] " मग सर्वांनीं असें ठरविलें कीं, आजची लढाई मोठ्या शर्तीची करून इंग्रजांचा मोड होईल तें केलें पाहिजे. अशा प्रकारचीं भाषणें करून सर्व योद्ध्यांमध्यें युद्धस्फुरण उत्पन्न केलें. तिकडे इंग्रजांनींही सैन्याची आपल्या शिस्तीप्रमाणें रचना करून तेही युद्धास सज्ज झाले. आणि दोहों बाजूंकडून लढाईस तोंड लागलें. " तोफांशीं तोफा चालूं लागल्या. पायदळाच्या बंदुकींचा

१. पेशव्यांची बखर पृ. १००.

२. पेशव्यांची बखर पृ. १००।१०१.

मारे, त्यानें गर्दी धुराची मोठी झाली. कोणी कोणास दिसेनासें झालें. त्या वेळेस ईश्वराची करणी! सरकारचे फौजेच्या पाठीशीं वारा. इंग्रजांचे तोंडावर वारा. त्या वाऱ्याचे गर्दींत लढाईची गर्दी. असा मोठा लढाईचा आकांत वर्तला." याप्रमाणें लढाई ऐन भरांत आली असतां मराठ्यांकडे सैन्याची तयारी कशी आहे व कोणकोणत्या बाजूंकडून त्यांचा मारा सुरू आहे, हें पाहण्याकरितां इष्टुर फांकडा (क्याप्टन स्टुअर्ट) गोरा झाडावर चढून दुर्बीण लावून फौजेचें अवलोकन करूं लागला. " तों इतक्या संधीस गोलंदाजास तात्यांची आज्ञा झाली कीं, समय हाच आहे. आतां शिस्तबी (नेम धरून) निशाण लावून तोफ डागावी." गोलंदाजानें त्याप्रमाणें करितांच इंग्रजास गोळा लागून खासा (स्टुअर्ट) ठार पडला. ही गोष्ट कारलें येथें ता० ४ जानेवारी सन १७७९ रोजीं घडली. यापूर्वी मराठ्यांस विशेपसें यश येत नव्हतें; तें मान यापुढें अगदीं उलटलें.

क्याप्टन स्टुअर्टसाहेब पडला व आपले लोकही बरेच पडल्याचें पाहून इंग्रज निराश होऊन आपलें सैन्य घेऊन कारल्याहून खडकाळ्यावरून तळेगांव येथें आले. तेथें मराठ्यांची फौज होतीच. आणि कारलें एथें असलेलें मराठ्यांचें लष्करही इंग्रजांची पिछाडी गांठीत आलें. ही मराठ्यांची सर्व फौज एकत्र होतांच तेथें लढाईस सुरुवात होऊन खूप चकमक झडली. त्यांत मराठ्यांचेही कांहीं लोक पडले. तरी इंग्लिशांची हानि फार झाली. तेव्हां इंग्लिशांनीं, आतां मराठ्यांपुढें टिकाव लागत नाहीं असें पाहून आपलें तोफा वगैरे जड सामान तळ्यांत बुडविलें. आणि डेरे पाडून घेऊन पळ सुरू केला. पुढें दोन तीन दिवस मराठ्यांनीं इंग्लिशांचा पाठलाग केला, आणि त्यांचे शेंकडो लोक ठार मारिले. तेव्हां आतां शरण गेल्याखेरीज मराठे आपणांस जाऊं देणार नाहींत असें त्यांना पूर्णपणें कळून चुकलें, व राघोबाच्या सर्व गप्पा अगदीं शुष्क आहेत हें त्यांनीं जाणलें. ह्या लढाईंत जिवबादादांनीं मोठा पराक्रम केला. त्या वेळच्या पत्रांत एवढाच मजकूर आहे. " इंग्रज ज्यार (जेर) केला. आणि वेढा देऊन आहेत. फौज सहा हजारपर्यंत मारली. मुख्य इंग्रजही (वर लिहिलेला स्टुअर्ट) पडला. " याप्रमाणें इंग्लिश लोक आपण मराठ्यांच्या पाठलागांत व वेढ्यांत सांपडलेलों असून या संकटांतून आतां जिवानिशीं कसें पार पडतों या विवंचनेंत आहेत, अशी त्यांची स्थिति पाहतांच त्यांच्या जिवावर इष्ट मनोरथ सिद्धीस नेणार दादासाहेबही केवळ हताश होऊन त्यांनीं आतां शत्रु मानलेल्यांसच शरण गेल्यावांचून गत्यंतर नाहीं असें ठरविलें. व ता० १० जानेवारी रोजीं शिंदे होळकरांस पत्र लिहिलें कीं, "पुण्यांतील मुत्सद्दी मंडळी बंड करून पेशव्यांचे राज्याचा नाश करीत आहेत. त्यांना तुह्मीं पुरातन सरदारांनीं तरी मदत देणें इष्ट नाहीं. यासाठीं तुह्मां उभयतांबरोबर स्नेह करावा अशी माझी इच्छा आहे." त्यावरून पाटीलबावांनीं दोन माणसें त्यांजकडे गुप्त वेषानें पाठविलीं व त्यांजबराबर राघोबादादांनींही आपण शिंद्याचे स्वाधीन होण्यास कबूल आहों, असा निरोप पाठविला. इंग्लिशांनींही आपल्या सुटकेचें बोलणें करण्याकरितां मि. फार्मर यांस मराठ्यांकडे पाठविलें. तेव्हां ता० १४ रोजीं मि. फार्मरची व महादजी शिंदे, नाना फडणवीस व हरिपंत फडके, यांची दरबारांत भेट झाली. मिस्तर

१. पेशव्यांची बखर पृ. १००।१०१.
२. पत्र नंबर ५.
३. नातूकृत महादजींचे च० पृ. १३३.

फार्मरनें इंग्लिशांनीं पेशव्यांच्या मुलखांत शिरण्याचीं कारणें सांगितलीं व पुढें आपल्या फौजेस सुरक्षितपणें जाऊं दिल्यास तुमचा आमचा स्नेह कायम राहील असेंही कळविलें. परंतु त्यांचा दम कितपत आहे हें मराठ्यांस केव्हांच कळून चुकलें होतें. मग त्यांनीं एकच सांगितलें कीं, दादासाहेबांस स्वाधीन केल्याशिवाय पुढील बोलणें ऐकून घेण्यास आह्मी तयार नाहीं. मग अर्थातच इंग्लिशांस रघुनाथरावांस त्यांचे नशीबाचे स्वाधीन करून आपल्या सुटकेचे उपाय योजणें भाग झालें. व त्याप्रमाणें त्याच दिवशीं दादासाहेब शिंद्याचे स्वाधीन झाले.

मग मि० फार्मरसाहेबांनीं मुत्सद्यांकडे बोलणें लाविलें कीं, आतां आह्मांस परत जाऊं द्यावें. तेव्हां ज्यांच्या पराक्रमानें मराठ्यांस विजय प्राप्त झाला, त्यांच्या सल्याबाहेर आपल्यास कांहीं करितां यावयाचें नाहीं ह्मणून त्याला नाना व हरिपंत, यांनीं पाटीलबावांकडे नेलें. दरबारांत पाटीलबावाच प्रमुख होते. ह्मणून अर्थात् सर्व बोलणें त्यांच्याच बरोबर सुरू झालें. मि० फार्मरसाहेब बोलण्यांत दम दाखवितो इतकें लक्षांत येतांच पाटीलबावांनीं लगेच स्वच्छ सांगितलें कीं, "लढाई करण्याबद्दल बाऊ दाऊं नका. त्याबद्दलची आपणाला मुळींच परवा नाहीं. परंतु ज्या अर्थी तुह्मीं कर्नल अपटन यानें पुरंदर येथें केलेला तह मोडून पेशव्याचे मुलखांवर स्वारी केली व मराठ्यांचें लाखों रुपयांचें नुकसान केलें, त्या अर्थी याच ठिकाणीं तह केल्याखेरीज तुह्मांस आह्मी परत जाऊं देणार नाहीं." हें पाटीलबावांचें निकराचें बोलणें ऐकतांच इंग्लिश वकिलानें सांगितलें कीं, आपणास तह करण्याची परवानगी नाहीं. तेव्हां पाटीलबावांनीं त्यास विचारिलें कीं, तुह्मांस पुरंदरचा तह मोडण्यास मात्र अधिकार आहे हें कसें? तें ऐकून तो वकील निरुत्तर झाला! मग इंग्लिशांनीं मराठ्यांशीं महादजीच्या विद्यमानें तह केला. ह्या कामीं फार्मर व इतर इंग्लिश सरदार व त्यांजकडील वकील ह्यांच्या व जिवबादादांच्या वारंवार भेटी होऊन तहाचीं कलमें घाटत होतीं. जिवबादादांनीं पुढें पाठलाग न चालवितां इंग्लिश फौजेस आपल्या कचाटींतून सुरक्षित ठेविली ह्मणून त्यांचे आपल्यावर मोठे उपकार आहेत. असें इंग्लिश सरदार समजत असत. व पुढें तहांतही त्यांनीं याबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्या तहांत "इंग्लिशांहीं कबूल केलें कीं सन १७७३ पासून जो हिंदूंचा मुलूख घेतला आहे, तो माघारा द्यावा. व कलकत्त्याहून लष्कर मुंबईंत येत आहे तें माघारें फिरवावें. × × × याशिवाय इंग्लिशांहीं आपला भडोच शहरचा भाग शिंद्यास द्यावा आणि त्या शिंद्याचे कारभारी लोक यांस मुत्सद्दीखर्चाबद्दल ह्मणून एकेचाळीस हजार रुपये द्यावे, व ह्या गोष्टी अमलांत येईपर्यंत दोनें इंग्लिश कामदार ओलीस द्यावे." मग ह्या सर्व गोष्टींबद्दल जरूर त्या व्यवस्था करून घेतल्या. एकेचाळीस हजार रुपये लागलेच जिवबादादांकडे पटविले. इतकें झाल्यावर मराठ्यांनीं इंग्लिशांस परत जाऊं दिलें, व पूर्वीं कैद केलेल्या गोऱ्या लोकांस सोडून दिलें. हा तह ता० १६ जानेवारी सन १७७९ रोजीं तळेगांवानजीक वडगांव येथें झाला.

---

१. मिस्तर फार्मर व चार्लस स्टुअर्ट, हे दोघे साहेब ओलीस ठेविले होते. महादजी शिंद्याशीं वेगळाच तह केलेला नातूकृत म. शि. चरित्राचे शेवटीं 'अ' परिशिष्टांत दिला आहे.

२. ह्या लढाईंत जिवबादादांनीं केलेल्या पराक्रमावरून इंग्लिशांनीं त्यांची योग्यता ओळखिली. पुढें आपली सुटका ही त्यांचेच मार्फत करून घेतली. त्या उपकारासाठीं त्यांनीं एकेचाळीस हजार रुपये त्यांस देण्यासाठीं शिंद्यांकडे पाठविले. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ह्या दिवसांत जिवबादादांचा मुक्काम वडगांव येथें होता. त्यांच्या येथें सदर मुक्कामच्या छ. २६ जिल्हेज ह्म. ता. १५ जानेवारी स. १७७९ च्या लष्करी खर्चासंबंधी यादी आहेत.

एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या आपसांतील तंट्यांत युरोपियन लोक कोणत्याही एका पक्षास काखोटीस मारून त्या निमित्तानें या देशांत थोडथोडा मुलुख मिळवून मोठ्या युक्तीनें 'चंचुप्रवेशो मुसलप्रवेशः' करितात, ही गोष्ट नानांस अगदीं आवडत नव्हती. परंतु इंग्रजांसारख्या उत्कृष्ट तयारीच्या सैन्यावर जय मिळविणें कठीण होतें. ही गोष्ट त्यांना पूर्णपणें अवगत होती. आजवरच्या लढाईंत ह्मणण्यासारखें यश येत नाहीं, हें पाहून त्यांना फारच काळजी लागून राहिली. परंतु शेवटीं शिंद्याच्या मोठ्या मदतीनें नानांची काळजी दूर झाली एवढेंच नव्हे, तर इंग्लिशांना शरण येण्याचा प्रसंग आला. ह्यावरून शिंद्याचें सामर्थ्य व तदंगभूत जिवबादादांचा पराक्रम, हीं सर्वत्र जाहीर झालीं. नानांचें समाधान झालें, व इंग्लिशांसही मराठ्यांच्या–व विशेषतः शिंद्याच्या–शक्तीचा व दमदारपणाचा प्रत्यय आला. ज्या प्रतापी मराठ्यांनीं शेंकडो मोठमोठ्या मोहिमांत आपली कीर्ति दिगंत पसरिली, त्यांची ती कीर्ति कायम ठेवण्यांत व कालदेशवर्तमानानुरूप आपल्या शक्तिमत्तेंत वगैरे सुधारणा करण्यांत ह्या काळांत शिंद्याची योग्यता किती जास्त होती, ह्याचाही वरील गोष्टीनें खुलासा होतो. त्याचप्रमाणें ह्या काळीं नानांची लेखणी व शिंद्याची तरवार, हीं मराठी राज्याच्या रक्षणास व उत्कर्षास मुख्यत्वें साधनीभूत झालीं होतीं हीही गोष्ट उघड दिसून येते. ह्या दोघांचें परस्परांविषयीं शुद्धांतःकरण नव्हतें हीच काय ती एक मोठी उणीव होती. आणि ती नसती तर केवढी बहार झाली असती! असो. पाटीलबावांची शौर्यासंबंधानें जशी कीर्ति झाली, तशीच त्यांना चांगली राजनीति अवगत होती व ते थोर दिलाचे पुरुष होते याविषयींही इंग्लिश लोकांत त्यांची कीर्ति पसरली. त्यांनीं कैद केलेल्या इंग्लिश लोकांस व ओलीस घेतलेल्या आफिसरांस फार चांगल्या रीतीनें वागविलें. तेणेंकरून इंग्लिशांचा त्यांजविषयीं चांगला ग्रह झाला.

वरील प्रसंगानें इंग्लिशांस जो कमीपणा आला, तो त्यांच्या मनांत नेहमीं डांचत असे. निरुपायानें जरी त्यांनीं हा तह केला होता, तरी पुनः युद्धप्रसंग आणून मराठ्यांस चांगला हात दाखविण्याची संधि ते पहात होते. कलकत्त्याहून जें लष्कर इकडील इंग्लिश सैन्याच्या मदतीस येत होतें, तें वडगांवच्या तहाप्रमाणें मागें परतण्याचें ठरल्याप्रमाणें त्यांहीं मागें परतविलें नाहीं; तें मुंबईकडे येऊं लागलें असें पाहून शिंद्याच्या लष्करानें त्या सैन्याबरोबर लढाई चालविली. त्यामुळें त्या सैन्यास मुंबईकडे जातां आलें नाहीं. ह्मणून कलकत्ता सरकारास त्या मुख्य सरदाराचा राग आला आणि त्यास मागें बोलावून त्या जागीं कर्नल गोडर्डसाहेबाची नेमणूक केली. तो शूर होता. त्यानें त्या सैन्यांत येतांच मराठ्यांच्या मुलखांत शिप्रीपासून सुरतेपावेतों ठाणीं बसविलीं. हें पाहून महादजी शिंदे यांनीं पुनः आपले सरदार त्यांजवर पाठविले. त्याबद्दल पत्रांत लिहिलें आहे कीं, 'अंबाजी इंगळे व सदाशिव मल्हार (भाऊ दिवाण) यांच्या व त्यांच्या लढाया होत आहेत. तुरकस्वार पुढें वाढून आले होते. त्यांजवर लढाई करून कांहीं मारले. कांहीं पळाले. दोनचार धरून आणले."[1] ह्याप्रमाणें इकडे चाललें होतें. परंतु इंग्रजांशीं चांगला सामना द्यावा ह्मणून पाटीलबावा मोठ्या फौजेसह निघाले. बरोबर सेनापति जिवबादादा होते. मग पुढें जाऊन "सामखेडनजीक भेलसें पांच कोशांवर येथें मुकाम केला. आणि फौजेची एक टोळी देऊन राणेखानभाईस पुढें पाठविलें आणि जीं ठाणीं इंग्रजांनीं बसविलीं होतीं, तीं उठविण्यासाठीं चंदेरीकर, खेची, आणि राजगडवाले ह्यांस सां-

---

१. लेखरत्नमाला पृ. ३३.

गितलें. त्याप्रमाणें चंदेरीकरांनीं बरींच ठाणीं उठविलीं. मग पाटीलबावा आल्याचें ऐकून पुढें यावयाचें तहकूब करून इंग्लिशांनीं सुरतेजवळ मुक्काम केला. जिवबादादांनीं चोहोंकडील नाक्यांवर बंदोबस्त ठेवून रसद बंद केली[२]. तेव्हां आतां आह्मांस माघारें जाऊं द्या, असें त्यांनीं बोलणें घातलें होतें. परंतु तें बाह्यात्कारें असें जाणून मराठ्यांनीं आपल्या तयारींत ढिलाई पडूं दिली नाहीं. कर्नल गोडर्डसाहेबांनींही ह्या प्रबल सैन्याशीं सामना देण्यासाठीं आपणास मदत करावी ह्मणून कित्येक संस्थानिकांकडे बोलणें लाविलें होतें. पैकीं भोंसले आणि भोपाळवाले नबाब ह्यांनीं त्यांस मदत केली. ह्या संधीस रघुनाथराव पेशवे ह्यांस बुंदेलखंडांत बारा लक्षांची जहागीर देऊन तिकडे पाठविण्याचें नाना व शिंदे ह्यांचे विद्यमानें ठरलें, व त्याप्रमाणें त्यांस तिकडे कांहीं लोक देऊन पाठविलें. परंतु रस्त्यांत रघुनाथरावास कोणीं हितवाद सांगितला कीं, बुंदेलखंडांत जहागीर देण्याच्या निमित्तानें तुह्मांस नेऊन झांशीच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवणार आहेत. तेव्हां चोळी महेश्वरास पोहोंचल्यावर राघोबादादांनीं शिंद्याच्या लोकांवर हल्ला करून त्यांस पिटून लावलें, आणि आपण त्वरेनें भडोच एथें इंग्रजांचा आश्रय मागण्यासाठीं निघून गेले. तेथें इंग्लिशांनीं त्यांचा सन्मान तर केला नाहीं, पण आश्रय मात्र दिला. मग जून महिन्याच्या बारावे तारखेस रघुनाथराव आपले पुत्र बाजीराव व अमृतराव हे दोघे बरोबर घेऊन सुरतेस जनरल गोडर्डसाहेब ह्यांचे भेटीस गेले. त्या वेळीं त्यानें दरमहा पन्नास हजार रुपये खर्चास देऊन त्यांस ठेवून घेतलें. दरम्यान नाना फडणवीस व जनरल गोडर्डसाहेब ह्यांची भेट होऊन परस्पर स्नेह ठेवण्यासंबंधें बोलणें झालें. नानांनीं सांगितलें कीं, साष्टी बेट व राघोबा आमचे स्वाधीन केल्यानंतर तहाचा विचार केला जाईल. ही गोष्ट विचाराची होती. तेव्हां त्याबद्दल लागलेंच उत्तर मिळालें नाहीं. पुढें मराठ्यांचा मतलब इंग्लिशांचीं मुख्य ठाणीं घ्यावयाचा आहे असें जनरल गोडर्डसाहेबांस समजल्यावरून तह होत नाहीं अशी उभय पक्षीं खातरी झाली, व नानाही निघून गेले. नंतर गोडर्डसाहेब हे सुरतेस येऊन त्यांनीं तेथें नाना फडनवीसाचा वकील होता, त्यास निरोप दिला. मग पेशव्यांच्या मुलखावर स्वारी करण्याची गोडर्डानें तयारी चालविली. तो ता० १ जानेवारी सन १७८० रोजीं तापी उतरून गुजराथेंत पेशव्यांचे मुलखावर निघाला, आणि डभोई शहरावर चाल करून तें ता० १८ रोजीं घेतलें. तसाच पुढें अमदाबाद शहर घेण्याचा उद्योग चालविला. ता० १० फेब्रुआरी रोजीं त्यानें अमदाबादेस वेढा दिला. अमदाबादेच्या किल्ल्यांत एक ब्राह्मण सुभेदार किल्लेदार होता. त्याजपाशीं आरब वगैरे मिळून सहा हजार पायदळ फौज व दोन हजार स्वार असें एकंदर आठ हजार सैन्य होतें. त्या किल्ल्यावर इंग्रजांनीं बाहेरून व इंग्रजांवर मराठ्यांनीं आंतून तोफांचा भडिमार चालविला. याप्रमाणें पांच दिवस लढाई चालली. तेणेंकरून उभय पक्षांकडील बरेच लोक मरून पडले व जायां झाले. पुढें तटास खिंडार पडल्यामुळें इंग्लिशांचें सैन्य वर जाऊं लागलें. त्या वेळीं तेथेंही मोठी चकमक झडली. परंतु त्यांत मराठ्यांकडील पुष्कळ लोक खर्चीं पडल्यामुळें इंग्रजांची सरशी होऊन त्यांनीं तें शहर घेतलें. गोडर्डसाहेब सेनापतित्वाच्या कामीं चांगला हुशार होता.

रघुनाथरावास शिंदे झांशीस पाठवीत असतां तो हातांतून निसटून इंग्रजांकडे गेला. यांत शि-

१. ह्या वेळीं कोट्याचे राजाकडून लालाजी बल्लाळ गुळगुळे या प्रसिद्ध सरदाराबरोबर शिंद्याचे मदतीस सैन्य आलें होतें, त्याचाही बराच उपयोग झाला. पहा पत्रें व यादी पृ. २१६. हे सावंतवाडी नजीकचे आचरें गांवचे राहणारे.

२. पत्रें व यादी व लेखरत्नमाला पृ. ३३.

ह्याचें कपट असावें असा नानांस संशय येऊन उभयतांमध्यें पत्रव्यवहार व बोलणींचालणीं झाली. त्यांत एकमेकांमधील सलोखा कमी होऊन वैमनस्य वाढलें. त्या संबंधाची खरीखुरी सविस्तर माहिती मिळत नाहीं. सबब त्या बाबतींत कांहीं विशेष मत देतां येत नाहीं. इकडे मराठ्यांचा बहुतेक गुजराराथ प्रांत इंग्लिशांनीं पादाक्रांत केल्याचें समजल्यावरून पाटीलबावा फौजेसहवर्तमान जांबगांवावरून तिकडे जाण्यास निघाले. होळकरही पाटिलबावांबरोबर होते. ते कासार बारी उतरून बडोद्यापासून पन्नास साठ कोसांवर आल्यावर ते आपल्यावर येताहेत अशी बातमी जनरल गोडर्डला लागली. शिंदे आपल्यास येऊन मिळतील असें गोडर्डसाहेबास वाटत होतें. परंतु तो निवळ भ्रम होता. पुढें ता० २९ फेब्रुआरी रोजीं शिंदेहोळकरांची फौज नर्मदापार होऊन गुजराथेंत गेल्यावर तिचा पांवागडच्या रस्त्यावर डभोईच्या आसपास तळ पडला. ह्यापूर्वींच पाटीलबावांनीं इंग्रजांवर भगीरथराव शिंदे व पाराजीपंत यांस त्यांजबरोबर सहा हजार फौज देऊन पाठविलें होतें. तरी तूर्त इंग्रजांबरोबर लढाईचा प्रसंग न आणितां ते सलोख्यानेंच परत जातील असा यत्न करून पहावा असें पाटीलबावांच्या मनांत होतें. नाना व पाटीलबावा ह्यांचीं मनें परस्पर शुद्ध नव्हतीं, असें वर लिहिलें आहेच. त्यावरून इंग्रजांशीं मोठी लढाई देण्याची पाटीलबावांची उत्सुकता नव्हती. ह्मणून त्यांनीं वडगांवच्या तहाच्या वेळीं जे दोन साहेब ओलीस घेतले होते, त्यांना परत सन्मानानें जनरल गोडर्ड यांजकडे पाठविलें. आणि स्वतः आपण होऊन लढाई करण्याची आमची इच्छा नाहीं असें त्यांजवळ उद्गार काढिले. परंतु ह्या सौजन्याचा परिणाम उलट झाला. लढाईची टाळाटाळी करण्यांत महादजींचा जो हेतु होता, तो लक्षांत न आणतां गोडर्डसाहेब समजला कीं, मराठ्यांची तयारी फार कमी असल्यामुळें ते प्रतिष्ठेनें स्नेहसंबंध असावा असें दाखवीत आहेत ! तेव्हां अशा वेळीं जर यांची उपेक्षा केली व त्यांच्या कमकुवतपणाचा फायदा घेतला नाहीं, तर आपण होऊनच शत्रूस जास्त प्रबल होण्याची सवलत दिली असें होणार आहे. असा विचार करून त्यानें लढाईची तयारी जारीनें चालविली. शिंदे सलोखा होणार या समजावर गैरसावध राहणार आहेत, तेव्हां संधि साधून त्यांजवर छापा घालावा आणि त्यांचा पराभव करावा, असा त्यानें विचार केला. ह्या प्रसंगीं मराठ्यांची मुख्य फौज आणि इंग्रजांची फौज ह्यांच्या दरम्यान भगीरथराव शिंदे व पाराजीपंत ह्यांची फौज होती. आणि जिवबादादांनीं आपल्या मुख्य लष्करासभोंवतीं पाहारेवाल्यांच्या टोळ्या ठेवून बंदोबस्त राखिला होता. पुढें तारीख २ एप्रिल सन १७८० रोजीं रात्रीं गोडर्डसाहेबानें आपले निवडक लोक घेऊन मोठ्या बंदोबस्तानें भगीरथरावांच्या सैन्यांतून पार जाऊन शिंद्याच्या मुख्य सैन्यावर छापा घातला. त्या वेळीं जिवबादादांस आपल्यावर असा एकाएकीं हल्ला येईल असा संशयसुद्धां नव्हता. तरी नित्याच्या शिरस्त्यामुळें मोठ्या पहांटेस सर्व घोडेस्वार व फौज सावध व तयार असल्यानंतर गोडर्डचा छापा आल्यामुळें जिवबादादांना तत्क्षणींच आपली फौज गोळ्यांच्या टप्प्याबाहेर नेऊन उभी करितां आली. त्या वेळीं थोडीशी गोळागोळी झाली. तरी कांहीं विशेष परिणाम न होतां इंग्रजांस मागें फिरावें लागलें. ह्या प्रसंगीं शिंद्यांची फौज गाफल असती तर गोडर्डच्या ह्या छाप्यानें त्यांची चांदीच उडाली असती. परंतु पाटीलबावा व जिवबादादा हे शूरवर व युद्धकलानिष्णात पुरुष मुळींच गडबडले नाहींत. त्यांनीं आपली सारी फौज मोठ्या युक्तीनें बचाविली. त्यांच्या सावधगिरीनें व युद्धनैपुण्यानें आपले सर्व श्रम व्यर्थ गेले ह्मणून गोडर्डसाहेब

१. पहा पत्र नंबर १२.

विस्मित झाला. या वेळीं मराठ्यांच्या टोळ्यांनीं आजूबाजूचा प्रांत बेचिराख करून शत्रूंस दाणा-वैरण मिळूं नये असें केलें होतें. तेव्हां एथें लढत राहण्यांत फायदा नाहीं. सबब पुनः एकदा छापा घालून मराठ्यांचा नाश करण्याची खटपट साधेल तर पहावी असें मनांत योजून बाह्यात्कारीं विशेष हालचाल न करितां स्वस्थ राहिलेल्या गोडर्डनें ता० १९ एप्रिल रोजीं पुनः तसाच छापा घातला. परंतु महादजी शिंद्यांनीं आपल्या सैन्यास एकदम एका बाजूस नेऊन उभें केल्यामुळें मोठी लढाई झाली नाहीं. दुरूनच गोळागोळी चालली होती. ह्या हल्ल्यांत इंग्लिशांच्या मदतीस अयोध्येच्या नबाबाचे स्वार होते. त्यांपैकीं मराठ्यांच्या गोळीबारानें कित्येक मरण पावले, व इंग्लिश फौजेच्या गोळीबारानें शिंद्याचेही कांहीं लोक मेले. तरी एवढ्या खटपटींत इंग्लिशांस कांहीं फायदा झाला नाहीं. प्रत्यक्ष लढाईस उभें न राहतां एकाएकीं छापा घालून काय थोडेंबहुत यश मिळेल तें पदरांत पाडून घ्यावें. असें करण्यांत गोडर्डसाहेबाचा हेतु काय होता व पाटीलबावा लीलेनेंच गोडर्डास झुलवीत कां अलग राहत होते, ह्याचीं कारणें त्या वेळच्या इतिहासावरून अशीं दिसतातः—

या मोहिमच्या वेळीं गुजराथेंत "महागाई व ममलतीमुळें लाखों रुपयांची ओढ (शिंद्याचे) सरदारीस जहाली" होती. फत्तेसिंग गायकवाड याची मदत गोडर्डसाहेबास होती. त्याचप्रमाणें अयोध्येचे नबाबाकडील आणि मुंबईच्या वगैरे सैन्याची त्यास मदत होती. महादजी हे आपला प्रांत मोडून आले होते. त्यामुळें भोंवतालच्या शत्रूंपासून राज्यरक्षणाचें व हरएक कारस्थानाचा विचार करण्याच जोखीम व दगदग त्यांना होतीच. गुजराथचा तो प्रदेश मुळचा रखरखीत वाळवंटाचा व वर त्या दिवसांत कडकडीत उन्हाळा होता. फत्तेसिंग गायकवाडाची मदत इंग्लिशांस होती ह्मणून "गोविंदराव गायकवाडास (मसलत करून) आपले मदतीस आणिलें." तरी वरील कारणांनीं सैन्याची स्थिति असावी तशी नव्हती. ती सुधरण्यास "पर्जन्यकाळ संपेपर्यंत तरी फुरसत पाहिजे होती." व या विचारामुळेंच "महादजीच्या मनांत लढाई लांबवावी असें होतें". महादजींचे सेनापति जिवबादादा व बाळोबा तात्या, सदाशिव मल्हार वगैरे मुत्सद्दी यांचेंही मत महागाई फार असल्यामुळें त्रासलेलें लष्कर व जनावरें घेऊन लढाईस जाणें बरें नव्हे असें पडलें. शिवाय तुकोजीराव होळकरही या वेळीं "महादजी शिंद्याचा मित्र होता" तो बरोबर असून त्याचेंही मत पावसाळा संपेपर्यंत लढाई करूं नये असेंच पडलें. तेव्हां हें सैन्य त्यांच्या प्रांताच्या शिवेच्या आसपास डभोईकडे उतरलें होतें. शिंद्याच्या सैन्याची अंतःस्थिति अशी होती. तरी गोडर्डास त्याची दहशत कमी होती असें नाहीं. पण त्यानें ताडिलें कीं, पावसाळा संपेपर्यंत सैन्याची सुधारणा करून मग लढाईस उभें राहावें असा शिंद्याचा बेत आहे, व तसें झाल्यास आपल्या सैन्याचा फार नाश होईल. यासाठीं मराठ्यांनीं ए-

१. पहा पत्र नंबर १२.

२. नातूकृत महादजींचें चरित्र पृ. १४६.

३. म्यालेसनच्या इतिहासाचें भाषांतर पृ. १५५.

४. या प्रसंगीं शिंद्याच्या लष्करास केवढ्या अडचणी होत्या पहा. "इंग्रेज नर्मदेचे कांठीं पार आहेत. दोन तीन पलटणें आलीकडे होतीं. यास्तव बक्षी (जिवबादादा) व भगीरथराव व पागाजीपंत सडे तिकडेच होते. मृग सात रोज राहिला. देश वाईट! छावणीची सोय नाहीं! पाऊस लागल्यानंतर जाणें कठीण पडेल. याकरितां बक्षी वगैरे बोलावून घेतले, ते आज आले." पत्रें व यादी पृ. १९०.

५. हिंदुस्थानकथारस पृ. ८९.

व्हांच लढाईस तयार व्हावें ह्मणून त्यानें लढाईच्या पुष्कळ कुरापती काढिल्या. तरी महादजीनें लढाईची घाई केली नाहीं. दुसरें असें होतें कीं, या संधीस इंग्रज व हैदर यांच्या लढाया चालत. तेव्हां गोडर्डास हें लढाईचें काम आटपून तिकडे जावयाचें होतें, आणि हैदरानें महादजीकडे वकील पाठवून त्यांचा स्नेह संपादिला होता. तसाच या वेळीं महादजी व नाना यांचा नीट सलोखाही नव्हता. तेव्हां लढाईशिवायच काम भागतें आहे ह्मणून लष्कराची खराबी करण्यास महादजी तयार झाले नाहींत. एरवीं महादजी इंग्रजांस भीत होते असा अर्थ मुळींच नव्हता. व ही गोष्ट इंग्लिश लोकही पूर्णपणें जाणून होते. व या वेळीं सेनापतित्व करण्याचे कामांत महादजी फार चतुर अशी शत्रूचीही खातरी झाली. ह्मणून "शिंद्यापुढें आपला कांहीं इलाज चालत नाहीं असें पाहून जनरल गोडर्डसाहेब तो मुलूख सोडून पार झाले." पण जातांना त्यांनीं मनांत आणिलें कीं, महादजीस एथून घालविला पाहिजे. नाहीं तर तो आपला पिच्छा सोडणार नाहीं. सबब त्या साहेबानें वारन हेस्टिंग्स ह्यांस युक्ति सुचविली कीं, फौज तयार करून शिंद्याच्या ग्वाल्हेर प्रांतावर स्वारी घालावी, ह्मणजे तो आपल्या प्रांताच्या रक्षणार्थ तिकडे जाईल. इकडे कोकणांत इंग्रजांच्या इतर फौजांनीं मराठ्यांचे वसई वगैरे प्रांत घेतले होते ते पुनः घेण्यासाठीं नाना फडणविसांनीं परशुरामभाऊ पटवर्धन, रास्ते, पानसे वगैरे सरदार तिकडे पाठविल्यामुळें गोडर्डसाहेबास अगोदर तिकडे जाणें भाग पडलें. या कारणानें गुजराथची मोहीम संपली. याप्रमाणें लढाई न करितां दहशतीवरच महादजींनीं गोडर्डाची मुंबईकडे रवानगी [४] केली.

पुढें हेस्टिंग्ससाहेबानें मराठ्यांचे उत्तर हिंदुस्थानांतील प्रांत घेऊन त्यांस चांगली दहशत बसविण्यासाठीं तिकडे फौज पाठविण्याचा निश्चय केला. व ह्या कामासाठीं कर्नल पोफाम व कर्नल सूर ह्या सरदारांबरोबर २४०० लष्करी पायदळ व पलटणी स्वारांची एक टोळी व गोरे गोलंदाज ह्यांसहित लहान लहान तोफा, असें लष्कर देऊन सन १७८० च्या फेब्रुआरी महिन्यांत त्यांना ग्वाल्हेरीकडे पाठविलें. या सैन्याचें आधिपत्य कर्नल पोफॉम याजकडे असून तो फार शूर होता. वारन हेस्टिंग्ससाहेबांनीं आपल्या ह्या सैन्यास राघोगडवाले वगैरे रजपूत राजे व गोहदवाले वगैरे जाट राजे यांनीं भरपूर मदत करावी ह्मणून त्यांजकडे बोलणेंचालणें करून तजवीज करून ठेविली होती. ही मंडळी मराठ्यांस व त्यांतही शिंद्यांस अगदीं पाण्यांत पाहत असे. ह्मणून अर्थातच मराठ्यांविरुद्ध होणाऱ्या लढायांत त्यांचें इंग्लिशांना साह्य मिळणें सोपें गेलें. मग पोफॉम साहेब गोहदेनजीक फौज घेऊन जातांच संकेताप्रमाणें ही सर्व मदतगार मंडळी आपापल्या फौजांसह मोठ्या उत्सुकतेनें इंग्लिशांच्या सेनेस येऊन मिळाली. तेणेंकरून इंग्लिश सरदारांस मराठ्यांचे मुलूख काबीज करण्याचे कामीं उत्तम साह्य झालें. ह्या सैन्यानें गोहद व तिच्या आसपास मराठ्यांची कांहीं फौज होती ती जिंकली. इंग्लिशांच्या मदतीस जे जाट वगैरे लोक आले होते, ते आपला मुलूख शिंद्यांनीं घेतलेला पुनः केव्हां

१. लेखरत्नमाला पृ. ३९।४०.

२।३. म्यालेसनच्या इतिहासाचें भाषांतर पृ. १५५.

४. या तळेगांव व गुजराथ एथील मोहिमांसंबंधानें प्रभाकर कवीनें एका पोवाड्यांत थोडक्यांत ह्मटलें आहे कीं, "तळेगांवावर इंग्रज हरला । इष्टुर साहेब रणींच विरला । उरला इंग्रज घांट उतरला । सरंजाम गलबतांत भरला । रातोरात मुंबईंत शिरला । सर्वंच गाडर पुढेंच सरला । पुण्याकडे कधींच पाहिना । अशी रिपूची मस्ती जिरविली." आक्वर्थकृत पोवाड्यांचें पु. पृ. १३७.

मिळवूं अशी वाट पाहत होते. त्यांना इंग्लिशांची मदत मिळतांच व मराठ्यांच्या मुख्य फौजा दुसरीकडे गुंतल्या आहेत अशी संधि मिळतांच आपला हेतु साधण्यास दुप्पट जोर आला.[१] ती मंडळी त्याच प्रांतांतील रहिवासी असल्यामुळें त्यांना तिकडील खडानखडा माहिती होती. त्यामुळें कोणतीं स्थळें कशा बेतानें हल्ला करून घ्यावीं ही माहिती इंग्लिशांस कळून तो मुलूख घेणें सोपें झालें. पुढें गोहदच्या राण्याच्या माहितीवरून काल्पीच्या पश्चिमेस लहर ऊर्फ लाहोर नामें किल्ला आहे तो घ्यावा, असें पोफामनें ठरविलें, आणि फौज घेऊन तिकडे गेले. आणि किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला. तेव्हां किल्ल्यांतील लोकांनींही उलट मारगिरी चालविली. ह्या प्रसंगीं इंग्लिशांचे दोन गोरे अमलदार व सुमारें सव्वाशें शिपाई ठार झाले. तरी किल्ल्यांतील लोकांची पुष्कळ नासाडी झाल्यामुळें व लौकर मदत मिळण्याची त्यांना आशा नसल्यामुळें त्यांचा निरुपाय झाला व इंग्लिशांनीं किल्ला सर केला. हें यश मिळतांच पोफामसाहेबांनीं जाटाच्या मदतीनें ग्वाल्हेर घेण्याचा विचार चालविला व ताबडतोब तिकडे जावें असें ठरविलें. परंतु पुढें पावसाळा नजीक आल्यामुळें त्या आधीं हें काम होणें दुरापस्त जाणून दोन महिनेपर्यंत ग्वाल्हेरच्या किल्ल्यापासून पांच कोशांवर छावणी देऊन ते राहिले. आणि तेथून ग्वाल्हेरचा किल्ला कसा हस्तगत होईल ह्याबद्दलचा त्यांनीं विचार चालविला. शेवटीं राण्याच्या मदतीनें पोफॉमसाहेबानें युक्ति योजिली कीं, किल्ल्यावर चढून जाण्याची जी चोरवाट ठरविली आहे, त्या वाटेनें एके रात्रीं सर्वत्र सामसूम झालें असतां पहिल्यानें दोनशें काळे शिपाई व त्यांजबरोबर कांहीं गोरे शिपाई देऊन त्यांनीं गुपचूप किल्ल्यांत उतरावें. मग त्यांमागून शिपायांचीं पलटणें युद्धोपयोगी शस्त्रांसह पाठवावीं. मग ह्या संकेताप्रमाणें ते लोक वर जाऊन पोहोंचतांच "त्यांहीं त्या किल्ल्याचे तटाची भिंत दहा हात उंच होती, ती शिडी लावून वर चढून आंत शिरले. मग त्या भिंतीच्या आंत त्यांस ८० हात सुमारें चढाव लागला. तोही चढून गेले. त्यापुढें दुसरी भिंत वीस हात उंचीची लागली. तेव्हां त्यांजबरोबर जे त्यांस माहीतगारी करून देणारे लोक होते, ते बहुधा युक्तीनें त्या भिंतीवर चढले. आणि तेथून दोरीची शिडी लाविली. मग त्यावरून एकेक शिपाई चढून आंत उतरून त्या भिंतीजवळ बसले. याप्रमाणें वीस शिपाई व एक साहेब आंत उतरून बसले." पुढें कांहीं शिपायांनीं चुकीनें बंदुकीचे बार काढिल्यामुळें आंतील लोक जागे होऊन लढाईची तयारी करिताहेत, तों बाहेरील सैन्यही वर येऊं लागलें. हा सैन्यसमुदाय व त्यांची आटोकाट तयारी पाहतांच अगोदर गैरसावध व त्यांत तयारीही सरासरीच होती, ह्मणून ते लोक किल्ल्यावरून उतरून पळाले. मग अर्थात् विशेष खटपट न पडतां व लोक जायां न होतां ग्वाल्हेरीचा किल्ला ता० ४ आगस्ट १७८० रोजीं सूर्योदयीं इंग्रजांचे हातीं आला. ह्याप्रमाणें हकीकत घडल्यानंतर जिवबादादांचें जें पत्र आलें, त्यांत ते लिहितात. "इंग्रजांनीं ग्वाल्हेर घेऊन सरोंजपर्यंत प्रांत सर केला. त्यामुळें फौजसुद्धां इकडे येणें प्राप्त जाहालें."[२] पुढें ग्वाल्हेर वगैरे घेऊन इंग्रजांनीं आपल्या मुलखांत धुमाकूळ घातल्याचें समजतांच पाटीलबावा पावसाळयांत सप्टेंबरच्या सुमारें होळकरांसह माळव्यांत येऊन त्यांनीं उज्जनीस तळ दिला.

गुजराथेंत गोडर्डानें मराठ्यांचे मुलूख काबीज केल्यावर पाटीलबावा सैन्यासह तिकडे गेले. आणि

१. ग्रांट डफची बखर (१८२९ ची आवृत्ति) पृ. २८९.

२. पहा पत्र नंबर १२.

तिकडे त्यांनीं लढाईचे विशेष प्रसंग तर आणिले नाहींत, परंतु इंग्रजांबरोबर असें काव लढविलें कीं, तेणेंकरून गोडर्डसाहेबाचें त्यांचेपुढें कांहीं न चालतां एकदा शिंदा एथून कसा निघतो, असें त्यास होऊन गेलें. इंग्रजांचें सैन्य शिंद्याच्या जोरापुढें मंदप्रभ झालें. त्यांचीं कोणतींच कृत्यें साधेनात. आणि हरिपंत वगैरे पेशव्यांच्या फौजबंद सरदारांकडून ज्या गोष्टी साध्य झाल्या नाहींत, त्या गोष्टी शिंद्यांनीं युक्तीच्या वाटे घडवून आणिल्या. परंतु पुढें त्यांच्याच माळव्यांतील व ग्वाल्हेर प्रांतांतील मुलखावर स्वाऱ्या करून इंग्लिशांनीं तिकडील प्रांत सर केल्यामुळें त्यांना तिकडे जाणें प्राप्त झालें. असा खरा प्रकार असतां ह्या प्रसंगीं शिंद्यांचें वर्तन पेशव्यांशीं अराजनिष्ठपणाचें व आपमतलबाचें झालें व त्यामुळें मराठी राज्य परशत्रूच्या तावडींत जाण्यास संधि मिळाली, असें कित्येक लोक प्रतिपादितात. पण हें मत केवळ एकतर्फी व आग्रहाचें दिसतें. ह्या संबंधाचें अपयश महादजींचे माथीं मारतांना पुष्कळ गोष्टींचा विचार केला पाहिजे. त्यांनीं ह्यापूर्वीं, ह्या प्रसंगीं व ह्यानंतर पेशव्यांस जी मदत केली, ती पेशव्यांचा व आपला संबंध पूर्णपणें लक्षांत आणूनच केली. शिंद्यांची जशी शक्ति जास्त, तशी त्यांनीं आपल्या यजमानास केलेली मदतही मोठी होती. व त्यामुळेंच पेशव्यांचा दरारा सर्वत्र कायम राहिला होता, हें कोणींही विसरतां नये. आतां नाना त्यांना वेळोवेळीं जो हुकूम देत किंवा त्यांनीं घेतलेल्या आक्षेपांवर परस्पर दिलसफाईचा, स्नेहप्रदर्शक व प्रसंगीं नम्रतेचाही मजकूर लिहीत, त्याप्रमाणें पाटीलबावा लगेच वागत नसत, हें दाखवितांना आह्मीं मागें एकदा ज्यांचा विचार केलेला आहे, अशा त्यांच्या ज्या कांहीं वास्तविक अडचणी होत्या, त्यांचा अवश्य विचार झाला पाहिजे. नाना आणि महादजी यांचीं एकमेकांविषयीं मनें शुद्ध नव्हतीं, ह्या बाबतींत दोष काय तो महादजींचा, असें ह्मणणारे जो पुरावा पुढें आणितात, तो बिलकूल पुरेसा नाहीं. त्या उभयतांतील पत्रव्यवहाराचें वास्तविक हृद्य समजण्यास नानांच्या पत्रांतील नम्र भाषाच केवळ उपयोगी पडावयाची नाहीं. तेजस्वी पुरुषांना अंतस्थ काव्यांनीं चीड येते. आपलें महत्त्व वाढविण्याचे प्रयत्न प्रत्यक्ष किंवा पर्यायानें हाणून पाडण्याचे कामीं नानांकडून प्रयत्न झाल्याशिवाय राजकारस्थाननिपुण, चतुर व दूरदर्शी अशा पाटीलबावांचे ठिकाणीं नानांविषयीं एवढी अढी राहणें सुसंगत दिसत नाहीं. पेशव्यांच्या हिताशिवाय स्वहिताचे कामीं आपली शक्ति व हिंमत महादजींनीं खर्चावयाची नव्हती, स्वहित करावयाचेंच तर पेशव्यांचें कोणतेंही काम नाहीं त्या वेळेस करावयाचें, ह्या गोष्टी स्वराजनिष्ठेचा पोवाडा गातांना गोड दिसतात व नाना फडणविसांनीं आपली शक्ति, अक्कल व हिंमत केवळ पेशव्यांच्या कल्याणार्थ आमरण खर्च केली, हेंही प्रमाण पुढें आणतांना बरें दिसतें खरें. तरी पाटीलबावांवर जबाबदारी केवढी होती, त्यांना कर्तव्य केवढें होतें, व रजपूत, मुसलमान, शीख, जाट, इंग्रज इत्यादिकांपासून आपलें राज्य व सर्व हितसंबंध सुरक्षित राखणें किती कठीण होतें, ह्या गोष्टी त्या वेळच्या त्यांच्या स्थितीशीं तादात्म्य पावल्यावांचून नीट कळावयाच्या नाहींत. ह्या वेळीं गायकवाड तर उघड इंग्लिशांस सामील झाले होते व भोंसलेही इंग्लिशांस मिळाले होते. तशी पेशव्यांविरुद्ध कोणतीही गोष्ट ज्यांकडून घडली नाहीं, त्यांजवर नानाप्रमाणें ते पेशवेनिष्ठ नव्हते असें समजून अराजनिष्ठेचा आरोप आणणें गैर होय. नानांचें तेंच काम होतें. पण पाटीलबावांचा संबंध पुष्कळ वेगळा होता. शिवाय राजपक्ष व सरदारपक्ष यांत आपआपली बाजू सुरक्षित ठेवण्यासंबंधानें सुधारलेल्या आधुनिक कालांतही जर पाटीलबावांच्या वेळेपेक्षां भिन्न स्थिति आढळत नाहीं, तर पाटीलबावांवरच एवढा गहजब कां? मराठी राज्य घालविण्यास पाटीलबावा

पर्यायानें कारण झालें, ह्या विलक्षण शोधाची व बादरायणसंबंधाची मीमांसा त्या कालचा सारा उपलब्ध इतिहास व पत्रव्यवहार चाळून पाहिला, तरी आह्मांस करितां येत नाहीं. कोणी कांहींही ह्मटलें तरी पाटीलबावांचा एकंदर मराठी राज्यास जो उपयोग झाला, तो अप्रतिम होता व ते आणखी दहा वीस वर्षें वांचते तर मराठेशाहीचा किंबहुना सर्व हिंदुस्थानचा इतिहास निराळा लिहावा लागता ! असो. आपले प्रांत इंग्लिशांनीं सर केले ह्मणून महादजींस तिकडे जावें लागलें. तेव्हां नानांच्या आग्रहाप्रमाणें कोंडाई बारीवर व गुजराथेंत इंग्रजांच्या छातीवर शिंदेहोळकरांनीं राहावें ह्या लिहिण्याप्रमाणें त्यांना लगेच वागतां आलें नाहीं यांत त्यांचा अन्याय नव्हता हें वाचकांच्या लक्षांत सहजच येईल.

महादजी शिंदे उज्जनीस आल्यानंतर त्यांनीं आपल्या सैन्याची स्थिति मुळच्यापेक्षां पुष्कळ सुधरून तें वाढविलें, आणि मिळण्यासारखी होती तिकडून मदतही मिळविली. या जय्यत तयारीचें कारण उघडच हें होतें कीं, त्यांना आपल्या राज्यांतील इंग्रजांनीं घेतलेले प्रांत पुनः हिसकावून घ्यावयाचे होते, आणि सर्वांवर आपलें वजनही बमवावयाचें होतें. ह्या वेळच्या खुद्द शिंद्यांकडील फिरत्या स्वारीच्या सैन्यासंबंधानें जिवबादादा पत्रांत लिहितातः—"फौज दक्षणी व गोसावी, नागे व बैरागी व दळ येणें (?) व इकडील हिंदुस्थानिक राजे रजवाडे मिळोन एक लक्ष फौज गु॥ (पा॥) आजपर्यंत आहे." इंग्रजांच्या मदतीस सर्व जाट व कांहीं रजपूत राजे असल्यामुळें त्यांचा पराभव करावयास व हैदर, निजाम आणि दिल्लीचा बादशहा यांजकडील कारस्थानें सुरू ठेवण्यास फौजेची भरती जास्त पाहिजे होती. त्यामुळें त्यांनीं एवढी फौज फिरतांना बरोबर बाळगिली होती व शिवाय राज्यरक्षणार्थ ठिकठिकाणीं गुंतलेली फौज वेगळीच होती. यापुढेंही पाटीलबावांचा राजकीय पसारा वाढत चालल्यामुळें त्यांनीं फौज कधीं कमी केली नाहीं. कारण पडेल तसतशी ती ते आणखीही वाढवीत. परंतु या अवाढव्य फौजेच्या जंगी खर्चामुळें सरदारीस नेहमीं ओढ असे, आणि तिच्या पायीं सेनापतित्वामुळें आमच्या चरित्रनायकास नेहमीं सर्वप्रकारें घस सोसावी लागत असे. हा प्रकार योग्य स्थलीं वाचकांस कळून येईलच.

मग ह्याप्रमाणें तयारी झाल्यावर पाटीलबावांनीं जिवबादादांच्या हाताखालील फौज घेऊन कर्नल कामॉकच्या फौजेवर हल्ला करण्यासाठीं शिप्रीची वाट धरिली. कामॉकला मदतीसाठीं कर्नल मूर

१. प्रो. भानु 'नाना आणि महादजी' या पुस्तकाचें पृ. ६६ यांत ह्मणतात, "महादजींच्या कर्तेपणाला अनावर महत्त्वाकांक्षेची भर पडल्यामुळें मराठी राज्याला निराळें वळण लागलें. या कारणामुळें पेशव्यांचे मुतालकीबद्दल शिंदेहोळकरांच्या पुण्यास लढाया होऊन मराठ्यांचें क्रूरत्व पुण्यनगरीस भोगावयास लागलें; रावबाजीस पुण्याच्या गादीवर शह मिळून त्यांनीं इंग्लिशांस विरेस घातलें आणि शिंदे यांचीच जागा पटकावून १८१८ सालीं इंग्लिशांनीं पेशवाईस निजधामास पाठविलें !" पाटीलबावांच्या संबंधानें हें भयंकर मत अगदीं अयथार्थ होय. हें इतिहासज्ञांस आह्मीं सांगायास नकोच ! शिवाय नाना फडणीस जरी पेशवाईचे हितकर्ते होते व बुद्धिमत्ता, राजकारणकुशलत्व व आंगावर घेतलेल्या जबाबदारीच्या कामाचा आटोप, यांसंबंधानें त्यांची योग्यताही जरी बरीच होती, तरी मत्सरी स्वभावामुळें आलेली परोत्कर्षासहिष्णुता, आपल्या अप्रतिबंध सत्तेविषयींची अनावर हौस व मुद्दाम चालविलेलें अनुदार पद्धतींचें राज्यधोरण, या दोषांमुळें मराठेशाहीच्या इतिश्रीचें खापर जर कोणाच्या डोक्यावर फोडावयाचें असेल, तर प्रो. भानूसारख्यांनीं नानांची अग्रस्थानीं योजना केली पाहिजे ! याविषयीं प्रसिद्ध विद्वद्वर्य रा. रा. बा. गं. टिळक व मराठ्यांचे सुप्रसिद्ध इतिहासकार ग्रांट डफ यांचे अभिप्राय या पुस्तकाच्या १४ व्या भागांतील टिपा १ व २ यांत अनुक्रमें पहावे.

फौज घेऊन येत होता. त्यांची गांठ पडण्यापूर्वींच कार्मॉकच्या फौजेशीं सामना करावा म्हणून हे जलदीनें निघाले. पण हे तिकडे पोहोंचण्यापूर्वींच त्या सैन्यानें सरोंज गांठलें. त्या ठिकाणींच मराठे व इंग्लिश ह्यांच्या सैन्यांची गांठ पडली. मग जिवबादादांनीं लागलाच इंग्रजी सैन्याभोंवता आपल्या फौजेचा गराडा देऊन इंग्रजांना कोंडिलें, आणि त्यांवर तोफांचा व बंदुकांचा एकदम भडि-मार चालविला. कार्मॉकनेंही आपल्या तोफा रोंखून व त्यांमागें कवायती पलटणें उभीं करून गोळागोळी चालविली. परंतु शिंद्यांकडील तोफखान्याची आग भारी! त्यांनीं एकसारखा सात दिवसपर्यंत तोफांचा भडिमार चालविल्यामुळें इंग्रजी सैन्यांतील शेंकडो लोक रणांगणीं पटापट मरून पडूं लागले. मराठी फौजेचें इंग्लिश सेनेभोंवतीं कडें पसरलेलें होतें. त्यांचा चोहोंकडून असा भयंकर मारा होऊं लागल्यामुळें कार्मॉक केवळ घाबरून गेला, आणि त्यानें हर इलाजानें आसपा-सच्या इंग्लिश सेनाधिकाऱ्यांस आपल्या मदतीस येण्याविषयीं मोठ्या काकुळतीचे निरोप पाठविले; परंतु कोणी आले नाहींत. पुढें त्यानें आपलें सैन्य माऱ्यास पडूं नये म्हणून हळू हळू पिछेहट चालविली. परंतु शिंद्याच्या प्रबल सैन्यापुढें तो किती पळेल? एके दिवशीं, ता० ७ मार्च सन १७८१ रोजीं, मध्यरात्रीं सर्वत्र सामसूम झालें असें पाहून मोठ्या सावधगिरीनें संधि साधून तो गुपचूप पळून गेला; पण हें समजतांच जिवबादादांनीं त्याचा पाठलाग चालविला. कार्मॉक एकसा-रखा सतरा दिवस पळत होता. आणि शिंद्याच्या ह्या फौजेकडून एकसारखा त्याला उपद्रव होत होता. तेणेंकरून तो अगदीं थकून गेला. शेवटीं पळून आपला बचाव होण्यासारखा नाहीं असें जाणून त्यानें मुक्काम केला. आणि रात्रीचा अकस्मात् छापा घालण्याचें मनांत आणून एके रात्रीं शिंद्यांचें सैन्य गैरसावधपणें निजलें आहे असें पाहून त्यानें आपले लोक घेऊन त्यांजवर एकाएकीं छापा घातला. त्यामुळें त्या गैरसावध स्थितींत त्याला मराठ्यांचे बरेच लोक मारतां आले. एवढें करून तो झटपट आपल्या तळावर गेला. इतक्यांत सुदैवानें त्याला कर्नल मूरसाहेब फौजेसह येऊन मिळाला. तेणेंकरून त्याला मोठी उमेद आली.

पाटीलबावांवर असा प्रसंग गुदरला तरी त्यांनीं हिंमत बिल्कूल सोडिली नाहीं. 'तो खरा मराठा वीर धीर धरून तेव्हांच सांवरला'. आपले शूर सरदार जगोबा बापू, शिवबा नाना, राणेखानभाई, राघोबा वैद्य, अंबाजी इंगळे वगैरे, फौजेसह दुसरीकडे इंग्रजांबराबर लढत होते, ते सर्व एकत्र केले व मदतीसाठीं कांहीं राजेरजवाड्यांचें सैन्यही आणिलें. हें सर्व सैन्य जमल्यावर जिवबादादांनीं सर्व सरदारांकडे लढाईसंबंधीं वेगवेगळीं कामें वांटून देऊन लढाई कशा बेतानें चालवावयाची तें समजा-वून दिलें. ग्वाल्हेर प्रांतांतील सालबाईची गढी एथें कर्नल कार्मॉक व मूर यांच्या एकत्र झालेल्या फौजेशीं यांची गांठ पडली. पाटीलबावांनीं इंग्लिश फौजेभोंवतीं आपल्या ह्या सैन्याचा मजबूद वेढा देवविला. त्यांचें ठिकठिकाणचें सैन्य आणखीही मदतीस येतच होतें. अशा रीतीनें "थोडक्याच दिवसांत चोहींकडून घोडेस्वारांची गर्दी करून त्याणें तें इंग्रजांचें सैन्य जागच्या जागीं खिळून टा-किलें. त्याला मागें कीं पुढें जाण्याची सवड ठेविली नाहीं."[1] आणि त्या फौजेवर एकसारखा मारा सुरू केला. इंग्लिशांकडूनही उलट मराठी सैन्यावर गोळीबार होऊं लागला. परंतु मराठी सैन्य पुष्कळ आणि इंग्लिश फौज कोंडली गेली होती, यामुळें इंग्रजांना आपल्या बचावासाठीं इकडे तिकडे सरकतां येईना. ह्मणून त्यांचा जास्त नाश होऊं लागला. ह्याप्रमाणें मराठ्यांनीं इंग्रजी फौजेस 'जेरीस

१. म्यालेसनच्या इतिहासाचें भाषांतर पृ. १५७.

आणिलें'. पुढें ह्या वेढ्यांतून इंग्रजी फौज मोठ्या शर्तीनें सुटली. तरी पुढें नेहमीं लहानमोठीं युद्धें सुरूच होतीं. ह्यापुढें सुमारें दोन महिनेपर्यंत पाटीलबावांच्या सैन्यानें इंग्लिशांच्या फौजेस एकसारखा उपद्रव दिला. तेणेंकरून त्या फौजेपैकीं बरेच लोक खपले. आणि बाकी सैन्य इतकें जेरीस आलें कीं, ही लढाई एकदा केव्हां आटपेल असें त्यांस होऊन गेलें होतें ! ह्या प्रसंगीं शिंद्यांचीच जरी सरशी होती, तरी इंग्रजांस शह देऊन एथेंच लढाईस गुंतून राहिल्यास इतर महत्त्वाचीं कामें तशींच राहतील, तीं राहूं नयेत, ह्मणून इंग्लिशांबरोबर तह करून इकडील लढाईचें काम आटपावें, आणि ग्वाल्हेर प्रांत घेणें वगैरे जीं महत्त्वाचीं कामें रात्रंदिवस मनांत घोळत होतीं, तीं सिद्धीस नेण्यासाठीं फौज घेऊन तिकडे जावें, असें पाटीलबावांनीं जिवबादादांच्या विचारें ठरविलें. शिंद्यावर जय मिळविण्याचा इंग्रज लोकांचा इलाज नव्हता. ते तहास कबूल होतेच. आपल्या सैन्याचा ठिकठिकाणीं पराभव होत आहे ह्यासाठीं मराठ्यांबरोबर तह करून ही फार दिवस लांबलेली लढाई एकदाची संपवावी असा विचार वॉरन हेस्टिंग्स यांनीं करून इंग्रज सरकारतर्फे अंडरसनसाहेब यांस पुण्यास पेशव्यांचे दरबारीं वकील पाठविले. त्यांस त्यांची आज्ञा होती कीं, 'इंग्रज व मराठे यांच्या परस्परहितसंबंधांत सर्वत्र जे जे लढे असतील, ते ते मोडून उभय पक्षांस सोइस्कर असा तह घडवून आणावा.'

मग अंडरसनसाहेब पुण्याचे दरबारीं आल्यावर त्यांनीं नाना फडणवीस वगैरे मुत्सद्यांस आपल्या येण्याचें कारण सांगितलें. त्या वेळीं नाना फडणिसांनीं सांगितलें कीं, ह्या लढाईच्या प्रकरणांत केवळ महादजी शिंदेच प्रमुख आहेत. तेव्हां जो तह व्हावयाचा, तो त्यांच्याच मार्फत झाला पाहिजे. ह्यासाठीं तुह्मी तिकडेसच जावें. हा तह होण्याचें बरेच दिवस घाटत होतें व ह्या तहांत निजाम, हैदर व इतर राजेरजवाडे ह्यांच्या मराठ्यांशीं असलेल्या हितसंबंधाचाही निकाल लागावयाचा होता ह्मणून त्या सर्वांचे वकील सालबाई एथें पाटीलबावांच्या दरबारीं आले. ह्या प्रसंगीं पाटीलबावांचें वजन सर्वत्र चांगलें होतें. व त्यांच्या उत्कर्षानें सर्व राजेरजवाडे चकित होत असत. मग पाटीलबावांनीं प्रसिद्ध दरबार भरवून इंग्रज वकील अंडरसनसाहेब ह्यांची इतर दरबारच्या वकिलांसह भेट घेतली. रीतीप्रमाणें सत्कार झाल्यावर मि० अंडरसनसाहेबांनीं इंग्रज सरकारतर्फे ज्या ज्या गोष्टी सांगावयाच्या, त्या त्या त्यांस कळविल्या, व त्याचप्रमाणें इतर वकिलांनींही आपआपल्या सरकारतर्फे विचार कळविले. तें सर्व ऐकून घेऊन पाटीलबावांनीं आपले मुत्सद्दी जिवबादादा, बाळोबा तात्या, सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण यांशीं त्या बाबतींचा विचार चालविला. हें काम फार महत्त्वाचें असल्यामुळें त्या सर्व गोष्टींचा निकाल एकाच बैठकींत होणें शक्य नव्हतें. मग त्या संबंधानें बरेच दिवस भवति न भवति चालून शेवटीं तहाचीं कलमें ठरलीं तीं अशीं:---

"पुरंदरच्या तहानंतर इंग्रजांनीं घेतलेला मुलूख आणि भडोच व त्याखालील इंग्रजांस देऊं केलेला तीन लक्षांचा मुलूख हे सर्व मराठ्यांस मिळावे. गुजराथेंत व गायकवाडांचे संबंधानें पुरंदरच्या तहापूर्वीं ज्याप्रमाणें परस्परांचे हक्क होते ते कायम ठेवावे. राघोबादादानें दरमहा २५००० रुपये घेऊन आपल्या खुषीस येईल तर शिंद्यापाशीं रहावें. परंतु सरकारच्या राज्यांत त्यांनीं बिलकूल हात घालूं नये, व त्यास इंग्रजांनींही मदत देऊं नये. हैदरानें जो मुलूख इंग्लिशांपासून अगर कर्नाटकच्या नबाबापासून घेतला असेल, तो त्यास परत देण्यास लावावें. पोर्टुगीज लोकांशिवाय इतर युरोपियन लोकांस मराठ्यांच्या राज्यांत वसाहत करण्यास देऊं नये. आणि खुद्द महादजीस भडो-

च शहर मिळावें.'' हा तह सन १७८२ च्या मे महिन्यांत ता० १७ रोजीं सालबाई एथें झाला. या "सालबाईच्या तहावेळीं असेंही ठरलें होतें कीं, मराठे व इंग्लिश ह्यांपैकीं ज्याकडून तो तह प्रथम मोडला जाईल, त्याचा पक्ष सोडून शिंद्यानें दुसऱ्या पक्षास मिळावें आणि दोघांनीं एकत्र होऊन मर्यादोल्लंघन करणाऱ्या पक्षाचें पारिपत्य करावें. ह्यावरून त्या प्रसंगीं महादजी शिंद्याचें बळ व वजन किती होतें हें सहज लक्षांत येतें[२].''

ह्याप्रमाणें तहाचीं कलमें ठरलीं, तरी तो सर्वांकडून मंजूर होऊन अमलांत यावयास बरेच दिवस लागले. पेशव्यांच्या दरबारीं हें तहाचें प्रकरण ता० २४ फेब्रुआरी सन १७८३ पर्यंत भिजत पडलें होतें. याचें कारण त्यांत ज्या राजेरजवाड्यांचा संबंध होता, त्यांच्या संबंधाचे लढे पुनः पुनः उद्भवून त्यांचा ज्यास त्यास समाधानकारक असा निकाल लागत नव्हता. परंतु शेवटीं त्या ठरावावर सर्वांच्या सह्या होऊन तो बहाल झाला. अखेरीस हें प्रकरण कलकत्त्यास लाटसाहेब वॉरन हेस्टिंग्स यांनीं मागविलें. त्यामुळें हे सर्व वकील तिकडे गेले. त्या प्रसंगीं शिंद्यांनीं आपल्या तर्फे सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण यांस तिकडे पाठविलें. तिकडे गेल्यावर भाऊ दिवाणांनीं केलेल्या वकिलातींत त्यांचा मुत्सद्दीपणा, धोरण व चातुर्य, हीं सर्वांच्या उत्कृष्टपणें प्रत्ययास आलीं. त्यांचा अजमास बहुधा बिनचूक खरा ठरे. कलकत्त्यास गेल्यावर तेथें काय काय बोलणींचालणीं होणार, कोणाकोणाच्या काय काय हरकती येणार, पुढें त्यांचा अमुक अमुक प्रकारें निरास केल्यावर शेवटीं निश्चित काय ठरणार, हें जसें काय त्यांना आगाऊच समजलें होतें! त्यांनीं "जातेवेळीं पुढील धोरण बांधून शिक्कामोहर मालकाची (महादजी शिंद्यांची) सही असें करून (ते ठरावाचे कागद) नेले ते एके बैठकीस दिले. (ते) पाहून लाटसाहेबांनीं त्यांची फार तारीफ केली कीं, आम्ही विलायतेहून मसलत योजून आलों. (पुढें आम्ही) असे तऱ्हेनें जाब बोलणार हें तुम्हांस आमचे मनांतील कसें समजलें? जें आम्हीं विचारिलें त्याचें समाधान करून आपली कारवाई बहाल ठेवून समाधानी केलीत. यावर बोलण्यास जाब राहिला नाहीं[३].'' याप्रमाणें लाटसाहेबांकडूनही यांचा गौरव होऊन शिंद्यासंबंधीं व त्याचप्रमाणें पेशवे, भोंसले, गायकवाड वगैरे राजेरजवाड्यांसंबंधीं सर्व तह यांच्याच मार्फत होऊन ते सर्वांस कबूल झाले. यांच्या या कामगारीवर लक्ष देऊन "यांस चार लक्षांची जागा गुजराथेंत बडोदेंअमदाबादेजवळ भडोच महाल इनाम दिला तो भाऊ दिवाणांनीं शिंदे सरकारास दिला.'' हे इतिहासांत भाऊ बक्षी या नांवानें प्रसिद्ध आहेत. हे मुत्सद्दी असून शूरही होते. ह्यांनीं इंग्रजांबरोबरील लढायांत, व पाटणा व मेरत एथील रजपुतांबराबरील लढायांत चांगलें शौर्य दाखविलें[४]. या प्रतापी व चतुर मुत्सद्याचे वंशज ग्वाल्हेरीकडे आहेत असें समजतें.

याप्रमाणें इंग्रजांनीं मराठ्यांबराबर तह केला. तरी गोहदवाले जाट ग्वाल्हेरचा किल्ला सोडीनात. तो लढून घेतल्याशिवाय मिळत नाहीं, असें पाहून पाटीलबावांचें मन तिकडे वळलें. आणि पुनः फौजेची जमवाजमव करून ते ग्वाल्हेरीस गेले. गोहदवाला राणा ग्वाल्हेरच्या अजिंक्य कि-

१. महादजी शिंद्याचें चरित्र पृ. १६१।१६२.

२. हिंदुस्थानकथारस पृ. १११.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७६।७७. ह्या तहाअन्वयें भडोच ताब्यांत घेण्यास शिंद्यांचे सरदार भास्कर महादेव, हे ता. ९।६।८३ रोजीं गेले होते. गुज. दे. इ. पृ. २९३.

४. लेखरत्नमाला पृ. ३३ व टाडकृत राजस्तानचा इतिहास.

ल्यांत जय्यत तयारीनिशीं होता. त्यांच्या मदतीस इंग्रजांचीही फौज होती. कारण तहाचीं कलमें अमलांत आलेलीं नव्हतीं. अशा प्रकारचा हा किल्ला व सर्व ग्वाल्हेर प्रांत स्वाधीन करून घेण्याचें काम फार बिकट होतें. ह्यासंबंधानें खुद्द जिवबादादाच लिहितात, "इंग्रजांचा पराभव जाहाला. ग्वाल्हेर किल्ला इंग्रजांनीं गोहदकर जाटास दिला. तेव्हां किल्ला घेणें एतदर्थीं थोरली मसलत पडली आहे." अशा तऱ्हेचें हें काम बिकट होतें तरी जिवबादादांनीं मोठ्या युक्तीनें नाक्यानाक्यांनीं किल्ल्याभोंवतीं फौज ठेवून योग्य ठिकाणीं मोरचे करून त्यांवरून तोफांचा भडिमार चालविला. पण ह्या बळकट किल्ल्यास नुसत्या तोफांनींच कांहीं होणार नाहीं ह्मणून मोठमोठे सुरुंग घालण्याचें काम सुरू केलें. ही हकीकत पत्रांतील शब्दांनींच देतों. "ग्वाल्हेर किल्ल्यास उरवाईकडून तोफांची मारगिरी व मोरचे लाविले आहेत. सुरुंगही चालतो × × × प्रस्तुत तो सुरुंग उडविला. त्यावरून उरवाईचा बुरूज तीन हिसे पडला. हालीं आणखी दोनतीन सुरुंग चालविले आहेत. तोफांची मारगिरी सुरूच आहे. खासा स्वारी (महादजी शिंदे) मोरच्यांवर जात असते." याप्रमाणें सुरुंग उडवून बुरूज वगैरे पाडण्याचा आणि चोहोंकडून तोफा, गर्नाळा, सतरनाळा ह्यांतून लाल गोळ्यांचा एकसारखा पाऊस पाडण्याचा जेव्हां झपाटा सुरू झाला, तेव्हां त्या अजस्र किल्ल्याचें व त्याचप्रमाणें आंतील लोकांचें भयंकर नुकसान होऊं लागलें. वरून होणारी गोळ्यांची वृष्टि आणि त्यांतच अकस्मात् सुरुंग उडाल्यामुळें होणारा प्रचंड स्फोट, ह्यांमुळें आंतील शेंकडो लोक मृत्युमुखीं पडत, व जखमी होत. राण्यानेंही बाहेरील मराठ्यांच्या फौजेवर तोफांची मारगिरी चालविली होती. व तेणेंकरून वेढा घातलेल्या लोकांपैकींही कांहीं लोक मरत असत. उभय पक्ष जोरदार असल्यामुळें ही लढाई अशा रीतीनें पुष्कळ दिवस चालली होती. कित्येक महिने किल्ला भांडला तरी पुरेल अशी युद्धसामुग्री व अन्नसामुग्री किल्ल्यांत जय्यत असल्यामुळें शत्रु लौकर पेचांत येण्यासारखा नव्हता. तरी दिवसेंदिवस राण्याच्या लोकांचें भारी नुकसान होऊं लागल्यामुळें तो टेंकीस आला. मराठ्यांस बाहेरून हवें तें सामान व लोक आणवितां येत असत. ह्मणून त्यांचा जोर पूर्ववत् कायम राहिला. शेवटीं मराठ्यांकडून होत असलेल्या माऱ्याची आग थांबेना तेव्हां आंतील लोकांचा अगदीं निरुपाय झाला, आणि तेणेंकरून त्यांचा लढाईचा जोर कमी झाला. मग जिवबादादांनीं मोठमोठे सरदार व शूर लोक आपलेबरोबर घेऊन किल्ल्यावर चढून जाण्याची तयारी केली. आणि त्याप्रमाणें लागलेच वर चढून जाऊन जवांमर्दीनें किल्ला हस्तगत केला. आंत गेल्यावर राणा छत्रपत ह्यास कैद करून बंदोबस्तांत ठेविलें. त्या गर्दींत आंतील कांहीं लोक चालून आले, त्यांची कत्तल उडविली. शरण आलेल्यांस जीवदान देऊन जवळ राखिलें. कित्येक चोरवाटांनीं जीव बचावून पळून गेले. सर्व राज्याचें मुख्य ठिकाण असा किल्ला हस्तगत झाल्यावर ग्वाल्हेर प्रांत व गढ्या घेण्यास काय उशीर? यापुढील हकीकत जिवबादादा अशी लिहितात:—"जाटांच्या मुलखाचें पारिपत्य करून गढीनगढी घेतली. बरोबर फौज लाख आहे. नित्य खर्च भारी. लाखो रुपयांचा पेंच!" लढायांचीं व राज्यें काबीज करण्याचीं सुखें या प्रकारचीं असतात! ही गोष्ट रमजान चंद्र २ ता० १ आगस्ट सन १७८३ रोजीं घडली. याप्रमाणें पाटीलबावांनीं इंग्रजांचा व जाटांचा पराभव

१. पहा पत्र नंबर १२.

२. लेखरलमाला पृ. ६१.

३. पहा पत्र नंबर १८ व लेखरत्नमाला पृ. ३१.

करून गेलेले सर्व मुलूख व ग्वाल्हेरच्या किल्ल्यासारखा अतिशयित मजबूद किल्ला घेतला, आणि जाट पुनः वर डोकें करणार नाहींत, अशी त्यांची खोड मोडिली. या पराक्रमानें पाटीलबावांची कीर्ति दिगंत पसरली. याविषयींच्या आनंदप्रदर्शनार्थ गुलाम कादर व काशीचा राजा चेतसिंग, यांनीं पाटीलबावांस नजराणे पाठविले.

गोडर्डसाहेबानें पूर्वीं जी पाटीलबावांबरोबर लढाई चालविली होती, त्या प्रसंगीं कित्येक रजपूत राजांनीं शिंद्याच्या द्वेषामुळें इंग्रजांस मदत दिली होती. त्यांचें पारिपत्य करून त्यांस त्या द्वेषाचा परिणाम दाखविण्यासाठीं शिंद्यांनीं आपल्या सैन्याचा मोर्चा तिकडे वळविला; त्याबद्दलची साद्यंत हकीकत खालीलप्रमाणें आहे.

माळव्यांत राघवगड ह्मणून एक बळकट ठिकाण आहे. तेथें चव्हाण कुळांतील रजपूत राजे राज्य करीत. त्यांतील बलभद्रराजा, शिंदेहोळकरांशीं स्नेहानें वागून त्यांच्या स्वाऱ्यांबरोबर फिरत असे. पुढें बळवंतसिंग नामक राजा राज्य करीत असतां त्याचा व पाटीलबावांचा नजराण्यासंबंधानें कांहीं तंटा उपस्थित झाला होता. व त्यानंतर त्यानें इंग्रजांस मदत केल्यामुळें पाटीलबावांनीं त्याजवर फौज पाठवून त्याचा पराभव केला, आणि बळवंतसिंग आणि त्याचा मुलगा जयसिंग, ह्यांस कैदेंत ठेविलें. पुढें त्या संस्थानांतील शीरसिंग नामक ठाकूर शिंद्याच्या मुलखास व लोकांस फार त्रास देऊं लागला, आणि वाघरी लोकांच्या सहाय्यानें त्यानें जयसिंगास कैदेंतून मुक्त केलें. पुढें तो राजपुत्र जयपूरवाल्यांच्या आश्रयास गेला. आणि तेथून पाटीलबावांशीं संधान बांधून आपल्या पित्याची (बळवंतसिंगाची) त्यानें सुटका करविली. त्या प्रसंगीं लढाईच्या खर्चाचा पैसा व खंडणी सुरळीत दिल्यास त्याचा मुलूख त्यास द्यावा असें ठरलें होतें. ह्या कामगारीवर शिंद्यांनीं बाळाराम इंगळे यांची नेमणूक केली होती. परंतु पूर्वीं शीरसिंगानें तो मुलूख ओस पाडिला होता. तेव्हां त्यांतून पैसा मिळण्याचें काम होईना. ह्मणून बळवंतसिंग पुनः जयपुराकडे गेला. आणि दुर्जनसालास सांगून त्यानें शिंद्याचे सर्व प्रयत्न हाणून पाडावे, अशी तजवीज चालविली. शेवटीं सामोपचारानें हें प्रकरण निभत नाहीं असें पाहून पाटीलबावांनीं जिवबादादांस सांगितलें कीं, सक्त प्रयत्न करून राघोगड संस्थान खालसा करावें. मग जिवबादादांनीं तिकडे कांहीं सरदारांची रवानगी केली. परंतु हें काम लांबलें. ह्याबद्दल बाळाभाऊ बक्षी लिहितात कीं, "रामजी पाटील व देवबा गौळी व खंडोजी इंगळे असे मिळून आज सहा महिने अगोदर गेले आहेत. त्यास हल्लीं आह्मांस तिकडे रवाना करून दिले आहेत. आह्मांबरोबर सात हजार गोसावी व तीन हजार पलटण व चार हजार स्वार व तोफखाना अशी समागमें आहे, ईश्वरें यश दिलें ह्मणजे चांगलें आहे." ह्याप्रमाणें फौजा रवाना करून मग कांहीं दिवसांनीं जिवबादादा तिकडे गेले. आणि त्यांनीं त्यांशीं लढाया करून त्यांना अगदीं जेरीस आणिलें. तेव्हां दुर्जनसाल निराशा सागर प्रांतांत पळाला. बाकी राहिलेल्या लोकांचा पूर्णपणें पराभव करून जिवबादादांनीं राघोगड संस्थान कबजांत आणिलें. मग त्यांनीं नरवर संस्थान खालसा करण्यासाठीं जगोबा बापूस पाठविलें. त्यांनीं नरवरास फौजेसहित जाऊन त्यांशीं लढाई करून त्यांचा साफ पराभव केला. त्या वेळच्या पत्रांत लिहिलें आहे कीं, "मातुश्री × × बापूस (जगोबा बापूस) भेटण्यासाठीं नरवरचे मुक्कामीं गेली होती. त्यास नरवराचा किल्ला वडिलांनीं

१. पहा पत्र नंबर ४.

२. आ. नानूकृत महादजी शिंद्याचें चरित्र पृ. १७८.

हस्तगत केला."[1] मग पुढें याचप्रमाणें सबळगड, भेदोर, चंदेरी, मवासे, गिरासें वगैरे सर्व तत्प्रांतस्थ संस्थानें इंग्रजांच्या स्वाऱ्यांमुळें मूळ संस्थानिकांनीं हस्तगत करून तेथें आपला अंमल स्थापिला होता, तीं संस्थानें घेऊन त्यांस त्या प्रांतांतून हाकून लावण्याचें काम जिवबादादांनीं पुष्कळ दिवस एकसारख्या नेटानें लढाया करून सिद्धीस नेलें. आणि त्या त्या ठिकाणीं शिंद्याचा अमल कायम करून टाकिला, व तेथील बंदोबस्तासाठीं अवश्य तेवढी फौज व अधिकारी लोक नेमून दिले. नेहमीं उपद्रव देणाऱ्या व खंडण्यासंबंधानें वारंवार लढायांचे प्रसंग आणणाऱ्या या संस्थानिकांस स्थानभ्रष्ट केल्यावर कांहीं दांडगे लोक जमा करून लुटालूट करण्याखेरीज त्यांना दुसरा आधार राहिला नाहीं.

पुढें ह्या लुटारू लोकांस शिंद्याचे हे नवीन मुलूखच लुटालुटीस योग्य स्थान मिळालें. अमीरखान पेंढारी पुष्कळ लोक जमा करून लुटालूट करीत असे. तोही त्यांना येऊन मिळाला. अशा रीतीनें ह्या लुटारू पेंढाऱ्यांचा आपल्या प्रांतांत पुष्कळ उपद्रव होऊं लागल्यामुळें पाटीलबावांनीं जिवबादादा व बाळोबा तात्या ह्यांच्या विचारें ठरविलें कीं, आतां उज्जनीस नेहमीं राहून इकडील बंदोबस्त होणें दुरापास्त आहे. तेव्हां उज्जनी ही राजधानीची जागा सोडून ग्वाल्हेरच राजधानी करावी. असा विचार ठरला खरा, तरी तो अमलांत येण्यास पुष्कळ दिनावधि पाहिजे होता. कारण सरकारी कामकाजासंबंधाचे व खुद्द राजकुटुंबांतील मनुष्यांस अवश्य असे अनेक वाडे, किल्लेकोट वगैरे इमारती तयार होऊन ग्वाल्हेर ही खरी राजधानी करण्याचें काम थोड्या वर्षांत साधणारें नव्हतें; त्याला बराच अवकाश हवा होता. आणि कित्येक कामांस आरंभ केला नाहीं तोंच अनेक प्रकारच्या भानगडीचीं महत्त्वाचीं शेंकडो कामें पुढें येऊन उभीं रहावयाचीं ! त्यामुळें त्या वेळापासून राजधानीसंबंधाच्या कामास हळू हळू आरंभ करून तेथें रामचंद्र गंगाधर रेगे हे सुभे नेमिले. आणि तेथें कधीं कधीं छावणी करण्याची वहिवाट ठेविली. पुढें दौलतरावांच्या वेळीं ती पूर्णपणें राजधानीची जागा झाली.

इंग्रजांबरोबरच्या लढायांत पाटीलबावांस शेवटीं जयप्राप्ति झाली, व त्यांच्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. तरी ह्या कामीं त्यांना अत्यंत श्रम पडले. जिवबादादांसारख्या महापराक्रमी सेनानीनें व त्याचप्रमाणें पुष्कळ शूर सरदारांनीं अव्याहत उद्योग करून निरनिराळ्या आणीबाणीच्या प्रसंगीं आपलें रणचातुर्य खर्च केलें, तेव्हां त्यांना शत्रूंच्या दाढेंतील मुलुख ओढून काढितां आले. परंतु आपल्या सैन्याची तयारी इंग्रजी सेनेच्या कवायती शिक्षणापुढें कित्येक प्रसंगीं कमी प्रतीची दिसून आल्यामुळें व कवायती शिक्षण मिळालेले लोक थोडे असले तरी उपयोग फार होतो, त्यांच्या संकेतसूचक शब्दांनीं व खुणांनीं सगळी फौज यंत्रवत् तें तें काम लागलीच करूं लागते, आणि त्यामुळें अव्यवस्था किंवा गोंधळ न होतां युद्धाचें काम योजल्याप्रमाणें सिद्धीस नेतां येतें, ह्या गोष्टी प्रत्यक्ष नजरेस आल्यामुळें आपणही अशीच कवाईत शिकविलेली फौज तयार ठेवावी, असें पाटीलबावांनीं मनांत आणिलें. हुकुमावांचून पाऊल टाकायाचें नाहीं आणि हुकूम होतांच तो तत्काळ अमलांत आणावयाचा, हा इंग्रजी फौजेंतील लोकांचा मुख्य गुण पाटीलबावांच्या मनांत फार भरला. हा गुण शिपायांच्या अंगीं पूर्णपणें दिसून आला, ह्मणजे त्यांजकडून हवें तें काम सोईनें करून घेतां येईल, असें त्यांनीं बोलून दाखविलें. कवाईत शिकलेल्या फौजेची क्षणांत हवी तशी

---

१. पहा पत्र नंबर ३.

रचना करितां येते; लढाई चालू ठेवून हवी तेवढी फौज थोड्या अवकाशांत चरांत छपवितां येते; सर्वांकडून एकाच वेळीं गोळीबार करितां येतो; तोफाबंदुकांच्या भडिमारासही न जुमानतां तशांतूनही शत्रूवर तुटून पडण्यास अमलदाराचा हुकूम पुरेसा होतो; पराभवामुळें माघार घ्यावी लागली तरी अव्यवस्था न होतां मागें परततां येते; इत्यादि इंग्रजी कवायती शिक्षणाचे प्रत्यक्ष परिणाम पाहून पाटीलबावांस मौज वाटली. आणि हर इलाज करून इंग्रजी पलटणांप्रमाणें आपणही कवायती पलटणें तयार करावयाचीं, असा त्यांनीं निश्चय केला. पाटीलबावा गुणांचे चहाते होते. खरे गुण जेथें आढळत, तेथें त्यांचें चित्त वेधत असे. त्यांच्या उत्कर्षाची गुरुकिल्ली याच गुणांत होती. गुणी मनुष्यें जवळ करावीं, त्यांच्या गुणांचें चीज करावें, तशा मनुष्यांवर विश्वास ठेवावा, आपण चैनींत स्वस्थ न बसतां संपविलेले उद्योग तीं तीं मनुष्यें योग्य रीतीनें करितात कीं नाहींत हें सवडीप्रमाणें पाहत असावें, असा त्यांचा क्रम होता. सुदैवानें त्यांना चांगलीं माणसें मिळाल्यामुळें त्यांचा एकसारखा उत्कर्षच होत गेला. जिवबादादांच्या अंगचे एकंदर गुण आपल्या उत्कर्षास मुख्यत्वें कारण आहेत, हें ते पूर्णपणें जाणून होते. म्हणूनच त्यांच्या राज्यांत या बक्षीबहाद्दरांची योग्यता सर्वांहून जास्त होती. जिवबादादांनीं पाश्चात्य कवायती शिक्षणाचा गंध नसतां आपल्या फौजेची जी सुधारणा केली, ती पाटीलबावांस अभिमान बाळगण्याजोगी वाटत असे. म्हणूनच इंग्रजी कवायती शिक्षणाप्रमाणें किंबहुना त्याहून जास्त शिक्षण देऊन कांहीं फौज तयार केली, म्हणजे हिंदुस्थानांत सांप्रत असलेल्या सर्व गजेरजवाड्यांस आपण अजिंक्य होऊं अशीही महत्त्वाकांक्षा ते त्यांच्याच जिवावर बाळगीत. कवायती शिक्षण देऊन नवीन तऱ्हेची फौज तयार करण्याचे कामीं जिवबादादांनीं आनंदानें सल्ला दिली. इतकेंच नव्हे तर कवाईत शिकविणारे हुशार गोरे लोक मिळत तोंपर्यंत त्यांनीं स्वतः कवायतीची थोडथोडी माहिती मिळवून एक पलटण तयार केली. तींतील लोक फौजेंतील इतर लोकांपेक्षां काम सरस करितात, असा प्रत्यक्ष अनुभव पाटीलबावांस आणून दिला. मग पाश्चात्य गोरे अमलदार मिळवून नवीन पलटणें तयार करावीं, यावांचून पाटीलबावांस कांहीं वेळ दुसरा विषयच विशेष गोड लागेनासा झाला. जिवबादादांनीं गोमांतकांतील पोर्च्युगीज फौजेची कवाईत पाहिली होती. तेव्हां त्यांना हा प्रकार केवळ अश्रुतपूर्व नव्हता. पाटीलबावांची उत्कंठा पाहून त्यांनीं गोमांतकांत इलाज ठेवून कवाईत शिकविण्याच्या कामीं निपुण असे लोक आणविले. हे लोक कोठून, केव्हां व कसकसे आणिले, हें तपशीलवार कळत नाहीं. गोलंदाज वगैरे तोफखान्यासंबंधाचे लोक शिवोली वगैरे गांवांतून नेले. कांहीं गोवें सरकारामार्फत थेट फ्रान्सहून आणविले. कारण त्या काळीं फ्रेंच लोक कवाईत शिकविण्याच्या कामांत निष्णात होते. खुद्द गोव्याहून नेलेल्या लोकांचे वंशज अद्याप तिकडे आढळतात. ह्या नेलेल्या लोकांपैकीं पेरोन, डि बॉयनें, मुकीर वगैरे अमलदार फार हुषार होते. सांगस्तर नांमे साहेबाकडून तोफा ओतविण्याचें काम सुरू केलें; त्यानें साठ उत्कृष्ट तोफा ओतून दिल्या. याप्रमाणें कवाईत शिकविण्याचें व नवीन तोफा वगैरे ओतविण्याचें काम जारीनें चालू झालें. पहिल्यानें दोन नवीन पलटणें कवाईत शिकवून तयार केलीं. तीं तयार झाल्यावर पाटीलबावांनीं त्यांच्या कवायतीचें व लष्करी शिक्षणाचें काम पाहिलें. तेव्हां त्यांना फार आनंद झाला. मग

१. डि बॉयन हा पोर्च्युगीज (फरांशीस) होता. पहा लोकहितवादीकृत उदेपूरचा इतिहास पृ० २५४. याशिवाय शिंद्यांच्या पलटणींत इंग्रज लोक सुद्धां नोकर होते. पहा पत्र नंबर २४९.

अशा तऱ्हेचीं आणखीही पलटणें तयार करावीं, अशी त्यांना उमेद आली. ह्याप्रमाणें पुढें बऱ्याच अवधीनें एकंदर चोवीस पलटणें तयार केलीं. त्या प्रत्येकांत सातशें शिपाई असत. प्रत्येक पलटणास मैदानांत लढाईच्या उपयोगी अशा हलक्या हलक्या पांच पांच तोफा दिल्या. त्या चोवीस पलटणांपैकीं आठ आठ पलटणांचा एक एक ब्रिगेड नामक भाग करून एकेका ब्रिगेडास पांचपांचशें स्वार नेमिले. ह्या सर्व पलटणांवर मुख्य अंमलदार डि बॉईन यास नेमून ह्या नव्या फौजेच्या खर्चास पुरेसा मुलूख तोडून दिला. त्या मुलखाच्या वसुलापैकीं दरशेंकडा दोन दोन रुपयेप्रमाणें स्वामित्व डि बॉइनानें घ्यावें, असें ठरवून त्याला जातीनें दरमहा एक हजार रुपये पगार केला. डि बॉयनास ह्या लष्कराचें आधिपत्य मिळण्याबरोबर त्यानें बरेच युरोपियन अंमलदार त्या पलटणांत नोकरीस लाविले. याप्रमाणें पाटीलबावांकडे युरोपियन थाटाचीही बरीच फौज जमून सर्व अंगांनीं त्यांची शक्ति वाढत चालली.[1]

इतकेंच करून पाटीलबावा थांबले नाहींत. यापुढें त्यांनीं जिवबादादांकडून सैन्यांत पुष्कळ सुधारणा करविली. प्रथमतः फौजेंत त्यांनीं रजपूत व मुसलमान लोक पहिल्यापेक्षां जास्त चाकरीस ठेविले. पूर्वीं स्वार चोळणे घालीत असत ती चाल मोडून स्वारांनीं खोटेपर्यंत विजारा घालाव्या अशी वहिवाट सुरू केली. त्याच प्रमाणें पूर्वीं लष्करांत गोसावी लोक फारसे नव्हते. परंतु ते बहुतेक शूर असतात हें पाहून ते अधिक ठेविले. आणि त्यांचा एक मोठा समुदाय करून त्याचें आधिपत्य हिंमतबहाद्दर नामक कोणी शूर व पाणीदार पुरुष—गोसाव्यांचा गुरु (अर्थात् त्यांस पूज्य)—होता, त्यास दिलें. ह्या व दुसऱ्या पुष्कळ सुधारणा वाढत्या शक्तीप्रमाणें व वाढत्या पसाऱ्याप्रमाणें करून फौजेंत सर्व जातींचे व सर्व धर्मांचे हिंमतदार व पाणीदार लोक भरून जिवबादादांनीं शिंद्यांच्या फौजेची सर्वोत्कृष्ट तयारी ठेविली होती. पाटीलबावांनीं अशा प्रकारच्या सुधारणा करविल्यामुळें त्यांचें सामर्थ्य फार वाढलें.

ह्यापुढेंही सुधारणा थांबल्या होत्या असें नाहीं. सन १८०१।०३ पर्यंत कवायती सैन्यांत आणखी पुष्कळ लोकांची भरती करून दुसरी सुधारणा केली, ती अशीः–प्रत्येक कंपूंत दहा हजार लोक ह्याप्रमाणें तीन कंपू तयार केले. ह्मणजे पाटीलबावांच्या पदरीं युरोपियन थाटाची तीस हजार फौज लढाईस हवी तेव्हां सज्ज होती. शिवाय स्वार एक लक्ष आणि पायदळ पन्नास हजार आणि तोफा पांचशें. एवढी अलिजाबहादरांची जय्यत रणसामग्री होती ! ही सर्व फौज निवडक असल्यामुळें शिंद्यांच्या शक्तिमत्तेची सर्वांस दहशत होती.

एवढ्या मोठ्या फौजेस अन्नाचा वगैरे कदाचित् तोटा पडेल तर तो पडूं नये ह्मणून त्यांनीं एक युक्ति योजिली. ती अशी कीं, फिरत्या सैन्यासाठीं हरएक प्रकारचें धान्य व इतर सामान हवें तेव्हां ठिकठिकाणीं मिळण्यास अडचण पडूं नये, ह्मणून हजारों बैलांवरून लमाणाचा व्यापार सुरू करविला. ह्या तांड्याबरोबर ओझ्यासाठीं उंट, हत्ती वगैरे अवश्य तेवढीं मोठ्या शक्तीचीं टांकण जनावरें नेमून दिलेलीं असत. त्यांतील माल लष्करी लोकांशिवाय इतरांस मिळूं नये, असा निर्बंध असे. हा बाजार लष्कराबरोबरच असे, त्यामुळें त्यास लष्करी बाजार ह्मणत. शिंदेशाहींत तो मोदीखाना ह्या नांवानें प्रसिद्ध होता.

१. ग्रांट डफची ब. पृ. ३१०।३११

भाग ८ वा.

सत्पुरुषदर्शन.

सन १७८०.

कविमंत सोहिरोबा बांदे ग्रामीं वसे महा द्विज हा
ज्याची देखुनि कविता हरि स्वजनां भूवरी ह्मणे द्विज व्हा ॥ १ ॥

विठोबा अण्णा दप्तरदार.

ज्या सत्पुरुषाच्या प्रसंगोचित वर्णनानें आमचें मन, वाणी आणि लेखणी, हीं पवित्र करण्याचा आतां सुयोग आला आहे, ते साधुवर्य श्रीमत्सोहिरोबानाथ आंबिये, हे सावंतवाडी संस्थानांतील बांदे गांवचे राहणारे होत. यांचा थोडासा जीवनवृत्तांत अगोदर देऊन, ते शिंद्यांच्या राज्यांत गेल्यावर घडलेली साग्र हकीकत या भागांत देण्याचा आमचा विचार आहे.

बांद्यांत येण्यापूर्वी यांचे पूर्वज गोमांतकांत राहत होते. यांचें जन्म शके १६३६ च्या सुमारास झालें. हे कुळकर्णीपणाचा धंदा करीत असत. वाडी दरबारांतून सरकारी कामासंबंधें यांना बोलावणें गेल्यावरून हे कागदपत्र घेऊन तिकडे गेले. त्या वेळीं श्रीमंत खेमसावंत हे राजे होते. ही गोष्ट शके १६७१ तील असून त्या वेळीं सोहिरोबांचें वय ३५ वर्षांचें होतें. खेमसावंत लहान होते, ह्मणून त्यांचे चुलते सोमसावंत ऊर्फ आबासाहेब, हेच कामकाज पाहत असत. त्यांचा स्वभाव फारच कडक होता. दरबारी काम, तेथें अनेक प्रकारची भानगड ही असणारच. दरबारी लोक कागदपत्र पाहत होते, त्यांत कोठें कांहीं चुकांबद्दल विचारपुस चालली होती. तेव्हां तें निमित्त धरून आबासाहेब कांहीं लावून बोलले. तें यांना विषम वाटलें व अशासंबंधानें यांना पूर्वींही त्रास आलेलाच होता. ह्मणून त्यांनीं कागदपत्र व लेखणी जवळ होतीं, तीं राजेसाहेबांच्या पायांशीं ठेवून त्यांस प्रणाम केला, आणि कामाच्या निमित्तानें दरबारांत पुनः न येण्याची शपथ वाहून त्यांनीं निरोप मागितला. राजेसाहेबांनीं त्यांची विरक्त वृत्ति पाहून त्या प्रसंगीं विशेष वाटाघाट न करितां त्यांस रजा दिली. मग उशीर झाला असतांही उदास चित्तामुळें वाडींत राहणें त्यांना पसंत न वाटून ते तसेच बांद्यास निघाले. जातांना क्षुधाशमनार्थ वाटेवर उपयोगीं पडावा ह्मणून एक फणस विकत घेतला. दोन प्रहरचा वेळ, क्षुधा तर मी मी ह्मणत आहे, आणि तशा वेळीं चालण्याचे श्रम! तेव्हां रस्त्यांत मध्यें इनसुली नामक गांवचें दाट जंगल आहे, तेथें ते थकून विश्रांति घेण्यासाठीं बसले. बरोबर आणिलेला फणस फोडून आतां खाणार तोंच त्या जंगलांतून "बाबू हमकू कुच देता है" असा ध्वनि निघाला. सोहिरोबा दचकून चोहोंकडे पाहूं लागले. तों त्यांना जवळपास कोणी मनुष्य दिसेना. तेव्हां मनुष्य असल्याशिवाय हा शब्द कसा उत्पन्न झाला, याचें त्यांना परमाश्चर्य वाटून ते त्याच विचारांत आहेत, तोंच समोर एक दिव्य मूर्ति प्रकट झाली. त्या तेजोनिधीचा तो भव्य चेहरा, तो जोगवेष, व प्रतिक्षणीं निरनिराळ्या रीतीनें भासमान होणारें तें अप्रतिम तेज, हीं अवलोकन करून

---

१. बांदें गांव वाडीहून सुमारें आठ मैलांवर असून त्याच्या व वाडीच्यादरम्यान इनसुली गांवचें दाट जंगल आहे.

२. ज्यांनीं सोहिरोबांस दर्शन दिलें, ते गोरक्षनाथ किंवा गैबनाथ (श्रीमच्छिंदरनाथांचे शिष्य) होते, असें ह्मणतात, वामनास मलयाचळावर दर्शन देणारे हेच अवधूत होत. हीं सर्व आदिनाथ शिव याचींच अवतारस्वरूपें होत.

सोहिरोबा अगदीं चकित होऊन गेले. पण लगेच शुद्धीवर येऊन त्यांनीं त्यांच्या चरणीं साष्टांग प्रणिपात करून तो फणस त्यांस प्रेमपुरस्सर अर्पण केला. सोहिरोबांचें अंतःकरण अगदीं विरक्त झालेलें होतें. त्यांत त्या दिव्य पुरुषास डोळेभर अवलोकन केल्यावरून त्यांच्या अंतःकरणांत सद्भाव दाटला. सर्व गोष्टींची विस्मृति होऊन त्या दिव्य मूर्तीच्या चरणीं अंतःकरण अगदीं गुंगून गेलें. अपरंपार सागरांत गटंगळ्या खात असतां अकस्मात् एकाद्या खंबीर नावाड्यानें आपल्या नावेंत नेऊन सुस्थळीं बसवावें, तशी गत वाटून त्यांच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. त्या मूर्तीवांचून त्यांच्या दृष्टीला व मनाला दुसरा विषयच नाहींसा झाला. विचाराचे पाय पंगु झाले. एतावता तद्विषयक आनंदानें सोहिरोबांवर आपला अंमल पूर्णपणें बसविला. एवढी तयारी होऊन राहिल्यावर मग कृपा होण्यास काय उशीर ? त्या सिद्ध पुरुषानें तो सर्व फणस भक्षण करून त्यांतील पांच गरे सोहिरोबांस प्रसाद ह्मणून देऊन त्यांच्या मस्तकीं आपला वरद हस्त ठेविला, आणि ब्रह्मोपदेश करून आपण अदृश्य झाले. इकडे सोहिरोबा समाधिसुखांत तल्लीन होऊन राहिले. अहाहा ! ज्याच्या अनंतजन्माचे सुकृतसंभार एकदम फळाला आले, त्या पुरुषाचें केवढें हें महद्भाग्य ! ह्या एका गोष्टीनें केवढा चमत्कार झाला पहा ! जो सोहिरोबा यःकश्चित मनुष्य होता, तो सर्वांस वंदनीय असा महान् साधु बनला. याप्रमाणें गैबनाथांचे साक्षात्कारानें व पूर्ण कृपाप्रसादानें सोहिरोबानाथ साधु वाडीप्रांतांत चोहोंकडे फार प्रसिद्ध झाले. त्यांचें अत्यंत निर्मल वर्तन, कडकडीत वैराग्य आणि अखंड भगवच्चिंतन पाहून लोकांची त्यांच्या शुद्ध साधुत्वाविषयीं पूर्ण खात्री होऊन त्यांची त्यांजवर निष्ठा जडत चालली. सोहिरोबानाथांनीं प्रापंचिक मायापाशांतून आपलें मन अगदींच काढिलें. नेहमीं भगवद्वर्णनपर व ब्रह्मतत्त्वपर पदें व अनेक कविता तात्कालिक स्फूर्तीनें कराव्या व तशा प्रकारचे ग्रंथ रचावे, हाच त्यांचा व्यवसाय झाला.

कांहीं काल गेल्यावर सोहिरोबानाथ हिंदुस्थानप्रांतीं तीर्थाटनास जाण्यासाठीं निघाले. जातां जातां ग्वाल्हेर एथें पोहोंचल्यावर जिवबादादांस आपल्या प्रांतींचे प्रसिद्ध साधु सोहिरोबा आल्याची बातमी लागली. तेव्हां ते त्यांच्या दर्शनास गेले, व त्यांनीं त्यांस मोठ्या समारंभानें आपल्या एथें आणून ठेविलें.

पुढें जिवबादादांच्या एथें कोंकणांतील कोणी साधु आले असून ते कविताही करितात अशी कीर्ति पाटीलबावांस ते स्वाऱ्यांच्या व्यवस्थेंत असतांना लागली व जिवबादादा तिकडेच गुंतलेले आहेत असें समजलें. तेव्हां ग्वाल्हेरींत जाऊन त्या साधूचें दर्शन घ्यावें असें त्यांनीं मनांत आणिलें. शिंदे सरकार आल्यानंतर जिवबादादा त्यांस भेटायास गेले. तेथें उभयतांचें ह्याच बाबतींत पहिल्यानें बोलणें झालें. त्या वेळीं शिंद्यांच्या इच्छेवरून जिवबादादांनीं सोहिरोबानाथांस दरबारास आणितों असें कबूल केलें, व त्यांनीं ही गोष्ट नाथांस विदित केली. त्यांजकडून कुठेंही जाण्यास ना नव्हतीच. मग ठरलेल्या दिवशीं सोहिरोबानाथांस घेऊन जिवबादादा दरबारांत गेले. त्यांस पाहतांच पाटीलबावांनीं सामोरें जाऊन त्यांना आणून मुद्दाम तयार केलेल्या आसनावर बसविलें, आणि विनयपूर्वक कुशलप्रश्न विचारून त्यांच्या साधुत्वाबद्दल व कवित्वाबद्दल फार स्तुति केली. महादजी शिंदे स्वतः कविता करीत असत. तेव्हां आपण केलेल्या कवितांची एक वही त्यांनीं सोहिरोबांस दाखविली. ती वाचून पाहून सोहिरोबांनीं शिंद्यांस ह्मटलें, ' ही प्रासादिक नाहीं. सच्चिदानंद परमेश्व-

---

१. सोहिरोबानाथकृत पदसंग्रह पु. पृ. ५.

राच्या गुणवर्णनावांचून जी कविता, ती आह्मांस आवडत नाहीं.' हें ऐकतांच महादजी शिंद्यांस वाईट वाटलें व त्यांचा चेहरा किंचित् रागाचा दिसला. तें पाहतांच लागलेंच सोहिरोबानाथांनीं पुढील पद ह्मटलें.

पद.

अवधूत नहिं गरज तेरी हम बेपर्वा फकीरी ॥ ध्रु० ॥ तुम हैं राजा मैं हैं जोगी पथर पथर क्या कूरा । चार कोट जहागीर तुमारी । वोही पंथ हमारा ॥ १ ॥ सोना चांदी हम नै चहिये अलख भुवनकों बासी । महाल मुलुख सब झांटबराबर हम गुरुनाम उपाशी ॥ २ ॥ तुम ढालीबंद हम झोलीबंद चारकोट जहागीरी । त्रिकालमों दुवाय फिरती घरघर अलख पुकारी ॥ ३ ॥ तुम बी डुबे हम बी डुबाये तेरा हम क्या लिया । कहे सोहिरा सुनो महादजी प्रकाश जोग गमाया ॥ ४ ॥

असें ह्मणून लगेच जाण्यासाठीं उठले. पण पाटीलबावांनीं त्या निस्पृह व निःसंग साधूचें तेज पाहून पुनः गादीकडे बोट दाखवून ह्मटलें, 'महाराज, या आसनावर क्षणभर बसावें.' पण सोहिरोबानाथ किंचित् शांत होऊन न बसतां उभे राहूनच ह्मणाले—

पद २.

दौलत देख दिवाना मेरी । अपना मौजेन करना फेरी ॥ ध्रु० ॥ कोइ दिन वनयांके दूकाने । कोइ दिन पर्वतपर ठीकाने ॥ १ ॥ तनके करत कारभार । हमारे छत्तिस खिजमतगार ॥ २ ॥ मन पवनकी पागा । सोहें पीलखानेकी जागा ॥ ३ ॥ करम कारखाना । हमारा नशीब जामदारखाना ॥ ४ ॥ जब सोहिरा तख्तपर बैठे । तब सब दुनिया लंडपर बैठे ॥ ५ ॥

'निस्पृहस्य तृणं जगत्' या उक्तीप्रमाणें सोहिरोबानाथांस थोरांच्या मनाप्रमाणें वागून किंवा तोंडदेखलें गोड बोलून कांहीं मिळवायाचें नव्हतें. मनांत एक व जनांत एक, असा दुटप्पीपणा साधूंना करितांच यावयाचा नाहीं. त्यांचें 'चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता' असेंच वर्तन असावयाचें. पाटीलबावांनीं त्या वेळीं पूर्णपणें जाणलें कीं, सोहिरोबानाथ हे द्रव्यदारादिकांचे कामनार्थी व उदरंभर टाळकुटे साधु नव्हत. यांचें वैराग्य निस्सीम असून यांची योग्यता अप्रतिम आहे. मग त्यांना साष्टांग प्रणिपात करून त्यांनीं ह्मटलें, 'सत्पुरुषांचा अवतारच जर लोकोपकारार्थ आहे, तर आमच्यासारख्या अज्ञ शरणागताची वाणी भगवत्स्मरणानें पुनीत व्हावी, अशी कृपा कर-

---

१. महादजी शिंद्यांनीं केलेल्या कविता प्रसिद्ध झाल्या होत्या ह्मणतात. आह्मांस आमच्या एका मित्रानें त्यांचें एक पद ह्मणून दाखविलें. तें असें:—

पद.—चला चला तुह्मी नंदगृहाप्रति चला । यशोदे उदरीं पुत्र जन्मला परम हर्ष पावलारे ॥ ध्रु० ॥ सकळ मिळुनि तुह्मी दधि नवनित घट भरुनि पाहुं मुलारे । मंगलद्रव्यें घेउनि वाद्यें गजर करुं बहु भलारे ॥ १ ॥ नंदांगणिं ते गोप येउनी मिळविति दधि हळदिलारे । आंगिं परस्पर चिन्हित करितां वरद पाणि उमटलारे ॥ २ ॥ हर्षित अवनी मंगल दावित वासर अति शोभलारे । वैकुंठ केवळ गोकुळ भासत 'माधव' शिशु प्रगटलारे ॥ ३ ॥

ण्यास हेच पाय समर्थ आहेत. आह्मां मंदभाग्यांचें ऐश्वर्य कसचें? सकल ऐश्वर्यें या चरणांचे ठिकाणीं लोळत आहेत.' अशी महादजींची नम्रता पाहून सोहिरोबानाथांनीं कांहीं वेळ बसून त्यांना पुढील पदांनीं उपदेश केला.

पद.

प्राण्या तुझ्या परिणामीं कठिण प्रकार ॥ ध्रु० ॥ न करिसी भजन। न करिसी पूजन। नाहीं तुला आत्मज्ञानाचाहि अधिकार ॥ १ ॥ तुला संत भेटेल कोठिंचा। परि लाभ नाहीं भेटिचा। शिकविल्या बोला देसी वेंठिचा हुकार ॥ २ ॥ तुला याद नाहीं आदली। कल्पना हे तुज बाधली। नाहीं योगारण्यें साधली। मनमृगाची शिकार ॥ ३ ॥ आपणामाजी थोर। परि तूं देवापाशीं चोर। अवघा पदरीं बांधुनि घोर। करिसि लटकी लकार ॥ ४ ॥ ज्याचें तुज पाशीं काज। तुला ह्मणती ते महाराज। होय होय जी जी करुनी करिती जयजयकार ॥ ५ ॥ अधःपदा धाडिल। शेखीं पेंचा पाडिल। दोहींकडे नाडिल। स्थूळ बुद्धिचा अहंकार ॥ ६ ॥ सोहिरा ह्मणे झांकळशी। जन्ममरणा आकळशी। जोंवरी अंतरदृष्टि नोळखशी ब्रह्मनिराकार ॥ ७ ॥

पद.

निराकार निर्द्वंद्वा निर्गुण परब्रह्मा। तुझेनि योगें परम सुख आह्मां ॥ ध्रु० ॥ तुझिया स्वरूपाची नकळे मजला मति। वाचा कृष्ण कृष्ण ह्मणवुनि गाती। निरंजना पावो तुज श्रीपति। तुझी देईं मजला निजभक्ति ॥ १ ॥ तुझा तूंचि बोलविशी वाचेकरवीं। अनुभवाचीं बोलणीं ऐशीं बरवीं। मनकमळ प्रकाशीं आत्मरवी। तुझे ज्ञानयोगीं हा मिरवीरे ॥ २ ॥ निराकार तुझा तूंचि सहज महाराजा। सर्वस्वरूपीं अससी तूं विराजा। तूंचि जीवन नलिनी काय कंजा। तुझिया नामाचा त्रिभुवनिं गराजा ॥ ३ ॥ सोहिरा तुझ्या नामेंचि रुतला। प्रेमयुक्त तेथेंचि गुंतला। परमामृत सेवुनियां शांतला। ज्याचे दृष्टी भव हा विरूंतला ॥ ४ ॥

असें ह्मणून क्षणैक आनंदानें तल्लीन झाले. त्या वेळीं महादजींसहवर्तमान सर्व दरबारी लोकांस त्या सत्पुरुषाची विलक्षण योग्यता दिसून आली. जो कडकडीत वैराग्यानें कामनारहित झालेला, शुद्ध ज्ञानाग्नीनें झगझगलेला, भक्तिरसानें तुडुंब भरलेला आणि भूतदयेनें ओथंबलेला, अशा त्या सिद्ध पुरुषाचे चरणीं तात्कालिक उपरतीनें मस्तक नमविणार नाहीं असा कोण आहे? मग सर्वांनीं त्यांना पुनः पुनः वंदन केलें. पाटीलबावांच्या हुकुमावरून मोहोरांचें तबक पूर्वींच सोहिरोबानाथांच्या पुढें आणून ठेविलें होतें. परंतु द्रव्य व इतर ऐहिक विषय, यांना वमनाप्रमाणें निस्सार मानणारे सोहिरोबानाथ तिकडे ढुंकूनही न पाहतां उठून चालते झाले. यांत कांहींच विशेष नव्हतें. कारण ज्यांच्या ठिकाणीं

अखंडानंदाचा ठेवा असतो, त्यांना ह्या क्षुद्रानंददायक नाशवंत वस्तु कशा मोह पाडतील ? श्रीमद्भगवद्गीतेंतील यासंबंधाच्या श्लोकावरील टीकेंत श्रीज्ञानोबारायांनीं हाच भाव व्यक्त केला आहेः—

सांगें कुमुददळाचेनि तार्टी । जो जेविला चंद्रकिरणें चोखटीं ।
तो चकोर कायि वाळुवंटीं । चुंबीत असे ॥ १ ॥

पण अशा रीतीनें आत्मानंदांत अखंड तृप्त असणारे साधु जगांत अत्यंत विरळाच आढळावयाचे. ह्मटलेंच आहेः—

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे । साधवो न हि सर्वत्र चंदनं न वने वने ॥

मग पाटीलबावा व दरबारी मंडळी सोहिरोबानाथांस सरकारवाड्याबाहेर बरेच दूर पोहोंचवायास गेली. नंतर सोहिरोबानाथ व जिवबादादा आपल्या वाड्याकडील रस्त्याकडे वळतांच नाथांचा निरोप घेऊन पाटीलबावा मंडळीसह परतले. पाटीलबावांचा ईश्वरभक्तीकडे मूळचाच ओढा होता. परंतु सोहिरोबानाथांच्या उपदेशानें ह्यापुढें तो फार वाढला, आणि ते निर्मळ मनाचे कृष्णभक्त बनले. ते हातांत सदैव नामस्मरणार्थ स्मरणी बाळगूं लागले. नंतर सोहिरोबानाथ ग्वाल्हेरींतून लौकरच निघून गेले[२]. आणि जिवबादादाही हा सत्संगतीचा लाभ घेऊन इंग्रजांवरील लढाईवर गेले. त्या युद्धासंबंधाची हकीकत मागील भागांत येऊन गेलीच आहे.

१. आं. नातूकृत महादजी शिंद्यांच्या चरित्रांतही ते कृष्णभक्त असल्याची माहिती दिली आहे. पृ. २६८.

२. मग श्रीमत्सोहिरोबानाथ तीर्थाटन करून उज्जनीस मठ बांधून राहिले. तेथें त्यांचा शिष्यसमुदाय पुष्कळ होता. हिंदुस्थानांत चोहोंकडे त्यांची कीर्ति पसरली. त्यामुळें शेंकडो लोक त्यांच्या दर्शनासाठीं येऊं लागले. त्यांचें लोकोत्तर विषयवैराग्य, त्यांची निस्सीम परमेशभक्ति, त्यांची आश्चर्यजनक निस्पृहता व त्यांचा निर्मल उपदेश, ह्यांचा लोकांवर तत्काल उत्कृष्ट ठसा उमटत असल्यामुळें त्या सत्पुरुषाचें महत्त्व व कीर्ति यांचा सतत प्रसारच होत गेला. पुढें सुमारें दहा वर्षें ते तेथें राहून एके दिवशीं मठांतून अकस्मात् नाहींसे झाले. जाण्याचे वेळीं त्यांनीं एक पद लिहून ठेविलेलें शिष्यमंडळीस आढळलें. त्या पदावरून त्यांची निधनतिथि कळते. तें पद असें:—

पद–दिसणें हें सरलें । अवघें प्राक्तन हें मुरलें ॥ ध्रु० ॥ आलों नाहीं गेलों नाहीं मध्यें दिसणें हे भ्रांति । जागृत होतां स्वप्नचि हरपे कर्पुरन्यायें जग हें हरलें ॥ दि० ॥ १ ॥ दिसणें हाची जन्म योगियां ना दिसणें हा मृत्यु ह्मणा । गैबिप्रसादें गैबिच झालों आपआपणामध्यें लपलें ॥ दि० ॥ २ ॥ मच्छिंद्र गोरख जालिंदर हे न्याया आले स्वस्वरूपीं । जातां जातां गमन ग्राम तो समूळ कोठें ना गमलें ॥ दि० ॥ ३ ॥ ह्मणे सोहिरा सतरा चवदा मधुमासाच्या दशम दिनीं ॥ सगुण स्वरूपीं निर्गुण ठेले अनुभव हरले स्वरूप कळे ॥ दि० ॥ ४ ॥

याप्रमाणें आपली गमनवार्ता लोकांस मागून कळण्याची तजवीज ठेवून श्रीमत्सोहिरोबानाथ या नश्वर भूलोकाचा त्याग करून–परंतु कीर्तिरूपानें एथें उरून–परधामाप्रत गेले. वस्तुतः ते आलेही नाहींत व गेलेही नाहींत. यासंबंधानें त्यांनीं वरील पदांत किती अत्युन्नत अद्वैतविचार गोंवले आहेत ! श्रीमद्रामदासस्वामींच्या पुढील उक्तीप्रमाणेंच त्यांनीं केलें.

भलारे भला बोलती तें करावें । समस्तां जनांचें मुखें येश घ्यावें[*]।
परी शेवटीं सर्व सोडोनि द्यावें । मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ १ ॥

भाग ९ वा.

जिवबादादांवर इतराजी, टिपूवरील मोहिम, लालसोटची लढाई व आग्र्याचा वेढा.

इ० स० १७८४ पासून स० १७८८ पर्यंत.

ह्या संधीस आमच्या चरित्रनायकास एका अत्यंत अनिष्ट व अत्यंत आश्चर्यकारक स्थितीचा अनुभव घ्यावा लागला. ती स्थिति एकसारखी अडीच किंवा तीन वर्षें होती ह्मटलें तरी चालेल! ही अनिष्ट स्थिति ह्मणजे केवळ नुकसानीचीच बाब नसून ती अत्यंत अपमानाचीही होती! हें गूढ कोडें काय होतें, याची आह्मी हकीकत देऊं लागलों ह्मणजे वाचक आश्चर्यानें चकित होतील. परंतु तें आनंदपर्यवसायी असल्यामुळें त्यांना त्या स्थितींत अधिक वेळ न ठेवितां, त्याचे दुव्वे चरित्रनायकाच्या पूर्वोत्तर कारकीर्दीच्या सांखळींत यथास्थलीं अडकवून, ती सर्व सांखळी सारखीच सोज्वळ आहे असें दाखवितां येईल.

हें गूढ कोडें ह्मणजे पाटीलबावांची जिवबादादांवर झालेली इतराजी होय! जिवबादादांसारख्या स्वामिसेवातत्पर सेनापतीवर पाटीलबावांसारख्या सकलराजगुणसंपन्न सुजाण धन्याची इतराजी होणें ह्मटलें ह्मणजे त्याला कांहीं तशींच बलवत्तर कारणें असलीं पाहिजेत, असें सहज कोणासही वाटणार आहे. एरवीं अशी भलतीच गोष्ट कशी घडेल? परंतु हा नियम जगानें अबाधित पाळला तर दुष्ट मनुष्यांच्या दुष्कृति, चहाडखोरांच्या चहाड्या, व कपटी मनुष्यांचें कपटजाल किंवा अनिष्ट ग्रहांची बाधा, हीं सर्व अकृतकार्य होतील! त्यांचाही प्रभाव जगाच्या प्रत्ययास आला पाहिजे. शिवाय हिरा झाला ह्मणून त्याला शाणोलेख नको असें कोण ह्मणेल?

जिवबादादा हे शिंद्यांचे मुख्य सेनापति असून शिंदेशाहींतील कर्ते पुरुषही तेच होत. त्या उभयतां स्वामिसेवकांच्या मसलतींत ठरलेली गोष्ट पुढें शौर्यानें व युक्तीनें पार पाडण्याचें काम जिवबादादांचें. अशाप्रकारें योजिलेल्या मसलती शेवटास नेत गेल्यामुळें पाटीलबावांची जिवबादादांवर अत्यंत कृपा असे. ही गोष्ट शेणवीमंडळाविरुद्ध असलेल्या दोनचार सरदारांस मनांतून आवडत नव्हती. ह्मणून शिंदेशाहींतील सरदारांचें प्रत्ययास येणारें अभेद्य जूट फोडावें, अशी इच्छा करणाऱ्या कित्येक परोत्कर्षासहिष्णु मतलबी लोकांनीं त्या सरदार लोकांस भेदण्याचा अव्याहत उद्योग सुरू केला. राज्यांतील दृश्य किल्लेकोट शाबूद ठेवून मनोदुर्गांतील कित्येक ढिले झालेले दुर्विचाररूपी दगड तेथून युक्तीनें हालवून काढण्याचें काम वरील प्रकारचे लोक मोठ्या शिताफीनें पार पाडितात! अशा रीतीनें भेदलेले सरदार सवड साधून जिवबादादांच्या व तत्पक्षीय लोकांच्या विरुद्ध मजकूर पाटीलबावांच्या कानावर जाईल असा कावा लढवीत असत. परंतु पाटीलबावा पडले गंभीर मनाचे पुरुष. ते ह्या सर्व गोष्टी पोटांत ठेवीत असत! पुढें ज्या रांगड्यांचीं संस्थानें जिवबादादांनीं जिंकून घेतलीं होतीं, ते लोक लहान लहान टोळ्या करून शिंद्यांच्या मुलखांस वारंवार त्रास देत असत. त्यांजवर जिवबादादांनीं वारंवार लोक पाठवून त्यांचा अगदीं बंदोबस्त करून टाकिला. तो इतका कीं, पुनः त्यांची तशी जूट कधीं जमली नाहीं. तेणेंकरून ते रांगडे लोक जिवबादादांचा फारच द्वेष करीत असत. परंतु त्यांच्या हातून जिवबादादांचें काय नुकसान होणार? शेवटीं या कामीं त्यांनीं एक युक्ति लढविली व ती लागूही पडली. त्यांत जेथून काम मुळींच साधूं नये, तेथूनच त्यांनीं खूप शिताफीनें

साधून घेतलें. ही तर अजब आश्चर्याची गोष्ट! त्यांनीं खुद्द पाटीलबावांकडेसच संधान बांधिलें. तें असें कीं, वारंवार पाटीलबावांकडे जाऊन त्यांनीं त्यांचें फार अगत्य दाखवावें. 'तुह्मां आह्मांत आतां शत्रुत्व राहिलें नाहीं. तेव्हां यापुढें तरी एकमेकांचें कल्याण चिंतून सुखासमाधानानें दिवस घालवावे.' अशी आपली इच्छा त्यांनीं पाटीलबावांना मोठ्या नम्रतेनें दर्शविली. आणि त्याप्रमाणें त्यांनीं पुष्कळ वेळां खरें अगत्य दाखविलें. रांगड्यांच्या आपसांत ज्या गोष्टी चालत, त्यांतसुद्धां पाटीलबावांविषयींची काळजी!! त्या सर्व हकीकती परभारें पुष्कळ वेळां कानावर आल्यामुळें पाटीलबावांस त्यांचा तो अगत्यवाद केवळ दर्शनी नव्हे असें वाटलें. दुसरी गोष्ट, ज्यांच्या हातीं फौजफांटा वगैरे उपद्रव देण्याचीं साधनें नाहींत व ज्यांना कोणी फौजबंद सरदार मदतगारही दिसत नाहींत, त्या दैवानेंच निरुपद्रवी बनविलेल्या लोकांकडून आपल्यास कोणता अपाय व्हावयाचा आहे? असा विचार करून पाटीलबावांचाही त्यांजवर लोभ जडत चालला. ह्या कावेबाजांनीं शिताफी लढवून पाटीलबावांची व त्यांच्या राज्याची इतकी काळजी दाखविली कीं, त्यांच्यासारखा व्यवहारचतुर पुरुष सुद्धां त्यांच्या कपटजाळांत अडकला!

आपलें बस्तान बरेंच बसत चाललेलें पाहून रांगड्यांनीं हळू हळू जिवबादादांच्या कामगाऱ्यांसंबंधानें गोष्टी काढण्याची वहिवाट ठेविली. त्या प्रसंगीं जिवबादादासंबंधानें पाटीलबावांचा उत्तम अभिप्राय पडावयाचाच, व हें सर्व रांगड्यांस ठाऊकच होतें. परंतु आपण जिवबादादांच्या विरुद्ध आहों असें न दाखवितां त्यांच्या कित्येक स्वाऱ्यांपैकीं व कामगाऱ्यांपैकीं ज्या बाबतींत कांहीं संशय उत्पन्न होईल, तीं कामें मोठ्या युक्तीनें विचारण्याकरितां ह्मणून पाटीलबावांपुढें त्यांनीं मांडिलीं. आणि त्यासंबंधानें त्यांनीं त्यांच्या मनांत असें भरवून दिलें कीं, 'जिवबादादा जितकें निरपेक्षपणा व आपले ठायीं निष्ठा दाखवितात, तितकें निरपेक्ष व स्वामिनिष्ठ त्यांचें वर्तन नाहीं. त्यांना शिंदेशाहीच्या कल्याणापुढें स्वहित मुळींच दिसत नाहीं, असाच आमचाही आजवर समज होता. परंतु तो मोठा मतलबी व कावेबाज मनुष्य! त्यानें आजवर हें राज्य अशा हिकमतीनें लुटलें आहे कीं, आपल्यासारख्या खडान्खडा माहिती काढणाऱ्या यजमानांसही त्यांनीं शेंकडो वेळां नकळत हातावर तुरी दिल्या आहेत! कांहीं कांहीं संशय येऊं लागतांच आह्मी त्यांच्या स्वाऱ्या कामगाऱ्यांचा छडा लाविला. तेव्हां पूर्णपणें खातरी झाली कीं, त्यांची सर्व ठिकाणीं मारखी लूट सुरू आहे. पण ही बातमी आपल्यापर्यंत यावी कशी? त्यांनीं सर्व राज्य आपल्या जातीच्या कोकणी लोकांनीं भरलेलें आहे. बहुतेक सरदार व अमलदार त्यांचे. ते काय ते सरकारच्या भरंवशाचे! आणि बाकी एथून तेथून सर्व गैरभरंवशाचे! आजकाल जिवबादादाच्या गोटासमोर शेंपांचशें महेश्वरी धोतरजोडे वाळत असतात! मिळून हें सारें राज्य शेणवी जातीच्या वैभववृद्धीकरितां व निवळ चैनीकरितां आहे असेंच झालें! दुसरें काय ह्मणावयाचें?' ह्या प्रकारचा त्या रांगड्यांचा हितवाद—पण वास्तविक ह्मणावयाचें तर हितशत्रुत्व—पुष्कळ दिवस चालल्यामुळें, व पाटीलबावांच्या राज्याची पराकाष्ठेची कळकळ दाखवून ते नक्राश्रु ढाळीत असल्यामुळें यांनाही वाटलें कीं, 'या सर्व कागाळ्यांत खचीत कांहीं तरी काळेंबेरें असावें! एरवीं रांगडे शत्रुत्व लक्षांत ठेवून हें सांगत असतील ह्मणावें, तर तें शत्रुत्व मालकाशीं अ-

---

१. पण हे धोतरजोडे नेसणारे लोक किती शूर, मुत्सद्दी व स्वामिभक्त सरदार होते; हें यासोबतचा इतिहास व पत्रें यांवरून समजून येणार आहे.

सावें, जिवबादादांकडे त्याचा संबंध काय? इतके दिवस आह्मांकडून एका छदामाचीही अपेक्षा न करितां हे लोक आमच्या दौलतीची जी कळकळ बाळगितात, ती खचीत दिखाऊ नव्हे.' असें मनांत आणून ते जिवबादादांच्या स्वामिनिष्ठेसंबंधानें व प्रामाणिकपणासंबंधानें बरेच साशंक झाले. त्यांचा खर्चाच्या कामीं जरा आंखडताच हात असे, व परिणामदृष्ट्या तो दुर्गुणही नव्हता. परंतु रांगड्यांनीं अनेक खोट्यानाट्या चुगल्या सांगून त्यांचें मन कलुषित केल्यापासून जिवबादादांच्या हरएक हालचालीवर ते करडी नजर ठेवूं लागले. मनुष्यास एकदा संशयानें घेरलें ह्मणजे लक्ष्य विषय त्याला सगळाच उफराटा दिसूं लागतो. त्याची खरी खरी वस्तुस्थिति त्याच्या लक्षांत येत नाहीं! संशयपिशाच्चिकेपुढें पूर्वानुभव व व्यवहारचतुरता यांचीही मात्रा चालत नाहीं! जिवबादादांच्या वैभवाविषयीं, त्यांच्या आप्तेष्टांच्या सरदाऱ्यांविषयीं किंवा त्यांनीं आजवर बजाविलेल्या कामगाऱ्यांविषयीं ज्या पाटीलबावांस तिळमात्र संशय येत नसे, त्यांनाच आतां त्यांच्या दारापुढें वाळत असलेल्या धोतरजोड्यांसारख्या क्षुल्लक बाबतीसंबंधानेंही, ही सारी लूट चालली आहे, असें वाटूं लागलें! एकूण त्या चहाडखोरांची शाबास खरी! जिवबादादा व पाटीलबावा यांच्या मनाचा सांधा जो इतका बेमालूम जडून गेला होता व जो निखळण्यास नांवास सुद्धां खऱ्या कारणाचा लवलेश नव्हता, तो त्या पाताळयंत्री मतलबी रांगड्यांनीं पुष्कळ दिवस मोडून अनेक लपंडाव योजून अगदीं खिळखिळा केला! पुढें असा चमत्कार होऊं लागला कीं, जिवबादादांचें हरएक कृत्य शिंद्याच्या कल्याणाचें असतांही तें पाटीलबावांस स्वार्थपरायणतेचें वाटूं लागलें.

रांगडे संस्थानिक कफल्लक झाल्यामुळें जिवबादादांवर असा आरोप आणितात ह्मणावें, तर कित्येक आपलेही सरदार त्यांच्या मतास पर्यायानें अनुमोदन देतात, असें पाटीलबावांच्या प्रत्ययास आलें! परंतु ह्या मंडळीचा हा कट आहे आणि आरोप आणणारांवांचून पुराव्यास दुसरें कोणतेंच साधन नाहीं, हें आपभोगानें त्यांचे शंभर अन्याय भरेपर्यंत पाटीलबावांस कळून आलें नाहीं, ही महदाश्चर्याची गोष्ट! जिवबादादांस अनिष्ट वेळ आल्यामुळें सर्व अशक्य गोष्टींसही शक्यता प्राप्त झाली! पाटीलबावांच्या अंतःकरणांत जिवबादादांसंबंधानें बराच संशय आलेला आहे, ह्या गोष्टीचा चोहोंकडे हळू हळू पुकारा झाला. कित्येक विघ्नसंतोषी दुष्ट लोकांनीं आगींत तेल ओतून आपलें दुष्टत्व व्यक्त केलें! पाटीलबावांस रांगड्यांनीं भुरळच घातली, त्यामुळें जिवबादादांच्या विरुद्ध जो मजकूर त्यांच्या कानावर जाई, त्याच्या सत्यासत्यतेबद्दल कांहींच विचार न करितां तो सर्व खराच आहे, असें ते धरून चालूं लागले. पुढें ह्या गोष्टी इतक्या विकोपास गेल्या कीं, जिवबादादांकडून बक्षीगिरी काढावी आणि रांगड्यांतील मुख्य, व त्यांचे मतें परम विश्वासास्पद, फार शूर, व खरी कळकळ बाळगणारा नौबतराय, याजकडे ती द्यावी असा त्यांनीं निश्चय केला!

ह्या सर्व हकीकती जेव्हांचे तेव्हां जिवबादादांस व बाळोबा तात्यांस कळत असत. परंतु गोष्टी विकोपास जाईपर्यंत त्यांनीं विशेष हालचाल केली नाहीं. कधीं कधीं रांगडे लोक हे विश्वास ठेवण्यास पात्र नाहींत, ते आपलीं संस्थानें गेल्यामुळें मनांत अत्यंत द्वेषबुद्धि ठेवून बाहेरून आपल्यास हितवाद सांगतात, परंतु हें सर्व ढोंग आहे, असें ते पाटीलबावांकडे सवड साधून बोलत असत. परंतु जों जों या बाबतींत विशेष सांगूं जावें, तों तों हालवून खुंटा बळकट होत आहे, असें त्यांच्या प्रत्ययास येऊं लागलें! शेवटीं नौबतरायाकडे बक्षीगिरी देण्याचा निश्चय झाला असें समजल्यावर जिवबादादांनीं पाटीलबावांस स्वच्छ सांगितलें कीं, 'श्रीमंतांची निष्कारण गैरमर्जी झाली,

याच गोष्टीचें मला दुःख वाटतें. बाकी माझा अधिकार गेल्याचें मला खरोखर दुःख नाहीं. या रांगड्यांच्या पोटांतील कावा श्रीमंतांच्या लक्षांत जरी आज येत नाहीं, तरी याचा प्रत्यय येण्यास उशीर लागणार नाहीं.' परंतु पाटीलबावांनीं ज्या अनेक गोष्टी आजवर ऐकून त्यांवरून पुढील बेत ठरविला होता, तो अशा सांगण्यानें ते थोडाच मागें घेणार होते. श्रीमंतांनीं त्याबद्दलची कशी तरी निरवानिरव केली. परंतु त्यांचा ग्रह बदलण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. हें जाणून जिवबादादा निरोप घेऊन गेले. त्यांनीं मनांत पक्की गांठ बांधिली कीं, रांगडे व त्यांच्या कटांत सामील होणारे इतर कित्येक लोक, यांनीं पाटीलबावांचें मन अगदीं कलुषित केलें आहे. तेव्हां त्यांच्या दुष्ट करणीनें कांहीं नुकसान झाल्यावांचून श्रीमंतांचा ग्रह बदलावयाचा नाहीं. परंतु इतकें झालें तरी जिवबादादांस चैन कसें पडावें ? रात्रंदिवस ज्यांच्या मनांत शिंदेशाहीच्या अभ्युदयाचे विचार घोळत राहावयाचे, धन्याचें तिळभरही अहित झालेलें ज्यांच्यानें पाहवत नसे, आणि त्याकरितां पाहिजेत तितके श्रम सोसण्यास जे तयार असावयाचे, त्यांना हा भलताच प्रकार किती दुःखद झाला असेल बरें ? शिवाय अंतःकरणांत पापबुद्धीचा किंवा दुर्विचाराचा लेशही नसतां केवळ मतलबी व दुष्ट लोकांच्या सांगीवरून फसून पाटीलबावांनीं आपलेविषयीं चित्त गढूळ होऊं दिलें आणि या पल्यापर्यंत गोष्टी येऊं दिल्या, हें सर्व त्या निस्सीम स्वामिनिष्ठाच्या अगदीं जिव्हारीं लागलें. आपला अधिकार जाईल व त्यामुळें आपलें वैभव कमी होईल, ह्या गोष्टी त्यांच्या मनास लागून राहिल्या होत्या असें नाहीं. परंतु आपला आजपर्यंतचा लौकिक काय व त्यामुळें लोकांत आपलें वजन किंवा मानमान्यता केवढी आणि हा अकारण प्रसंग काय ! ह्या विचारानें त्यांना फार वाईट वाटत असे. बाकी स्वतः त्यांना विशेष लोभ नव्हता. कीर्तिप्रद कृत्यें करून लोकांत लौकिक मिळवावा, सर्वांकडून बरें ह्मणून घ्यावें, आपल्या हातून होईल तेवढा परोपकार करावा व स्वीकारिलेला पक्ष प्राणांतींही सोडूं नये, असाच त्यांचा अखंड बाणा होता. पाटीलबावांच्या मनांत जिवबादादांविषयीं जो विनाकारण विपर्यास आला, त्याविषयीं सर्वांस पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. कोणाच्या लक्षांत त्याचें कांहीं कारण येईना. रांगडे व कांहीं दुष्ट लोक पाटीलबावांस नानाप्रकारचा खोटा मजकूर समजावतात, हें सर्वांस ठाऊक होतें. परंतु पाटीलबावा साधारण प्रतीचे मनुष्य नव्हते. त्यांना भुरळ पाडण्यास ह्या नीच लोकांनीं कोणकोणत्या युक्ति योजिल्या होत्या, हें सर्व जिवबादादांच्या पक्षांतील लोकांस कळण्याजोगें नव्हतें. कारण त्या त्यांच्या मसलती फार गुप्तपणें चालत असत व पाटीलबावाही करडी नजर ठेवूं लागल्यामुळें तिकडे बोलाविल्यावांचून जाण्याचा सरावही यांना ठेवितां येईना. जरी प्रसंगानुसार बाळोबा तात्या, सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण इत्यादि शहाण्या मुत्सद्यांनीं पाटीलबावांस हितबोध करण्यास कमी केलें नाहीं, तरी पाटीलबावांस रांगड्यांनीं जसे काय भारून टाकिलेले ! तेव्हां अर्थात् तें सर्व फुकट गेलें.

पुढें पाटीलबावांनीं जिवबादादांस लहान स्वाऱ्यांचीं कामें सांगण्याची कांहीं दिवस वहिवाट ठेविली. ही त्यांना पुढें त्याच थरावर नेऊन बसविण्याची आगामी सूचना होती ! ह्या वेळीं रांगडे लोक पाटीलबावांच्या अत्यंत प्रीतींतले झालेले होते. पाटीलबावांचा सर्व भर काय तो त्यांजवर. इतकी भुरळ पाडण्यास त्यांनीं योजिलेल्या साधनांची कल्पनाच करितां येत नाहीं. जिवबादादांस ह्या प्रसंगीं अनिष्ट ग्रहांचा योग आला होता. त्या योगानें कांहीं कुटुंबसंबंधीं नुकसान झालें आणि इकडे राजदरबारीं मान कमी झाला ! रांगडे लोकांपैकीं नौबतराय व दयाराम पुरब आणि

दौलतीकडील सखाराम चिमणाजी, यांजवर पाटीलबावांचा फार लोभ जडला. शेवटीं पूर्वीं संकेत ठरल्याप्रमाणें नौबतरायाकडे बक्षीगिरीचा ह्मणजे मुख्य सेनापतीचा अधिकार पाटीलबावांनीं दिला. आणि अर्थात् जिवबादादा साधारण सरदार बनले !! ही महत्त्वाची गोष्ट लागलीच चोहोंकडे प्रसिद्ध झाली. इतकें झालें तरी स्वामिसेवातत्पर, निष्कलंक व धैर्यशाली जिवबादादा बिलकूल गडबडले नाहींत. झालेल्या प्रकारामुळें अनुभवांत तितकी भर पडल्याचें त्यांनीं मंडळींत बोलून दाखविलें. जिवबादादांची नैसर्गिक योग्यता केवढी मोटी आहे, हें सर्व राजेलोक पूर्णपणें जाणून होते. ह्मणून त्यांनीं—मुख्यत्वें प्रमुख रजपूत राजांनीं—त्यांना बहुमानपुरःसर आपल्याकडे बोलाविलें, आणि शिंदेशाहींतल्याप्रमाणेंच तुमचा इतमाम चालवूं अशाबद्दल निश्चयाचें बोलणें लाविलें. परंतु शिंदेशाहीच्या ठिकाणीं एकनिष्ठ असणाऱ्या जिवबादादांस त्यांचें तें बोलावणें विषवत् कटु वाटलें. त्यांना तसें वाटणें हें साहजिकच होतें. कारण पाटीलबावांच्या मनांतून आपण उतरलों असें पाहून परकी राजांस आपल्याकडे बोलावून बहुमान करण्याची ही संधि मिळाली, तेव्हां अशा स्थितींतल्या बोलावण्यावरून त्यांना सुख कसें लागावें? शिवाय पाटीलबावांची इतराजी जरी निष्कारण होती, तरी ती सर्वांसतशीच वाटेल ह्मणून कशावरून? संशयाची निवृत्ति होऊन तत्संबंधी हकीकतीचें वास्तविक स्वरूप प्रकट झाल्यावांचून सत्यनिष्ठांस खरोखर चैन पडत नसतें. ह्या दुहीचा फायदा घेण्यास भोंवतालील राजेलोक तयार आहेत, व आपण एथून निघाल्यास शिंद्यांच्या हितास खरोखर धक्का बसण्याचा संभव आहे, इत्यादि विचारांनीं जिवबादादांचें चित्त अगदीं अस्वस्थ झालें. पण त्यांचा उपाय चालत नव्हता. ह्मणून त्यांना स्वस्थ राहणेंच भाग झालें. या बाबतींत पाटीलबावांस पुष्कळ चांगल्या योग्यतेच्या मनुष्यांनीं सदुपदेश केला. खुद्द श्रीमंत पेशव्यांनींही लिहिलें कीं, 'रांगड्यांवर तुह्मी विश्वास ठेवीत आहां, परंतु तुह्मांस ते फशीं पाडतील. यासाठीं त्यांशीं संबंध मुळींच ठेवूं नका.' परंतु होणार चुकत नाहीं! त्याप्रमाणें पाटीलबावांनीं या बाबतींत कोणाचेंच सांगणें ऐकिलें नाहीं. जिवबादादांस रांगडे हे किती कावेबाज, दगेखोर व अविश्वासास्पद आहेत हें पूर्णपणें माहीत होतें. त्यांनीं मनांत गांठ बांधिली होती कीं, हे लोक पाटीलबावांस खचीत कधीं तरी दगा देणार आहेत. पाटीलबावांनीं त्यांची जरी निष्कारण मानखंडना केली होती, तरी ह्यांची धन्यावरील निष्ठा कमी झाली नव्हती. आणि त्यामुळें त्यांनीं आपल्या तर्फेच्या सर्व सरदारांस सांगून ठेविलें होतें कीं, तसाच प्रसंग आल्यास मोठ्या सावधगिरीनें व सक्त बंदोबस्तानें रांगड्यांवर उलटून ताबडतोब मला खबर द्या. अशी योजना करून त्यांनीं तेथून निघून दहा कोसांवर जाऊन मुक्काम केला. पुढें त्यांनीं भविष्य केल्याप्रमाणेंच सर्व कांहीं घडून आलें! हें पुढील पत्रावरून कळून येईल. "नोबतराय याजकडे तोफखाना पलटणें बक्षीगिरी सांगितली. त्याजवर अखत्यार पाटीलबावांनीं बराच दिला आहे. परंतु हिंदुस्थानी माणूस आर्जवी. फार तऱ्हेनें आर्जव करून मेळून घ्यावें; समयास बनेल तशी वर्तणूक करावी; अशी (त्यांची) चाल आहे. ह्या मंडळीनें पाटीलबावांच्या गोटाभोंवतीं गराडा दिला. हिंदुस्थानी यांनीं दौलत गारद केली होती. पाणपत होण्यांत बाकी नव्हती. परंतु श्रीमंतांचे पुण्येंकरून व पाटीलबावांचे दैवेंकरून बचाव जाहला. ही गोष्ट थोरली जाहाली. सांप्रत पाटीलबावाही आपले जागां खिन्न आहेत. श्रीमंतांनीं लिहिलें व घरच्या मंडळीनेंही सांगितलें. परंतु होणारा सारखी बुद्धि झाली.

१. पत्रें व यादी पृ. ३०४.

हिंदुस्थानी यांचे विश्वासावर गेलों त्याचें फळ पावलों असें ह्मणत असतात. हिंदुस्थानी बेइमान; वेळेस त्यांणीं घालविलें, हें आतां प्रत्ययास आलें." पुढें ही बातमी संकेताप्रमाणें जिवबादादांस कळविल्यावर त्यांनीं येऊन रांगड्यांचें यथास्थित पारिपत्य केलें, आणि त्यांचा कायमचा बंदोबस्त करून टाकिला. हें सर्व झाल्यावर पाटीलबावांचे डोळे नीट उघडले, आणि जिवबादादांस ते त्यांचे संबंधानें मन कलुषित होण्यापूर्वीं जसे समजत होते, तसेच किंबहुना त्याहूनही ते जास्त योग्यतेचे आहेत ह्या गोष्टीचा त्यांना पूर्ण प्रत्यय आला! रांगड्याचे हेतु काय होते, जिवबादादांविरुद्ध एवढें कुभांड उपस्थित करण्यांत त्यांचा मतलब कोणता, त्यांना कसकशा मदती मिळत गेल्या, त्यांचा कट कसा स्थापन झाला, वगैरे यच्चयावत् माहिती पाटीलबावांना मागाहून लागली. व त्या माहितीवरून जिवबादादांच्या निर्मलतेविषयीं त्यांची बालंबाल खातरी होऊन, निष्कारण त्यांचा अपमान केल्याबद्दल त्यांना अत्यंत वाईट वाटलें. ह्या स्वामिसेवकांच्या ह्यानंतरच्या भेटीचा पहिलाच प्रसंग फार स्मरणीय व बहारीचा झाला. पाटीलबावांस आपण भलतीच गोष्ट केल्यामुळें कांहीं बोलवेना! आणि जिवबादादांस या घडलेल्या प्रकाराचें कांहीं विशेष भूषण न वाटतां दैवाच्या विचित्र खेळाच्या प्रभावामुळें कांहीं बोलवेना! शेवटीं बऱ्याच वेळानें उभयतांचा सुखसंवाद होऊन पाटीलबावांनीं जिवबादादांचें फार गौरव करून त्यांचें समाधानही केलें. पुढें पाटीलबावांची मर्जी जिवबादादांवर फार प्रसन्न झाली. त्यासंबंधानें जगोबा बापू लिहितातः—"वडिलांवर यजमानाची इतराजी जाहाली. त्या दिवसापासून दिवस श्रीनें वाईट आणिले होते. परंतु कांहीं कुटुंबाचे दैवयोगेंकरून श्रीनें कृपादृष्टीनें शुभ दिवस आणिले आहेत. यजमान कृपा चांगली करितात." पुढील पत्रांत लिहितात—"कामकाज दादांचे हातें घेत आहेत. पूर्वींपेक्षां कृपा अधिक झाली. लुच्यांनीं भासविलें होतें." पुढील पत्रीं पाटीलबावा फार खुष झाल्यावर प्रत्यय आल्याबद्दल लिहितातः—"बाळोबाची (बाळाभाऊ बक्षी याची) यजमानांनीं बंदोबस्ती चौघे मुत्सदी आहेत त्याप्रमाणें अब्रूयोग्य खर्चाचा बंदोबस्त करून दिला." असो. याप्रमाणें जिवबादादांवर दुष्टांनीं कितीही किटाळें आणिलीं, तरी शेवटीं 'सत्यमेव जयते' हें तत्त्व सत्य ठरून ते पूर्ववत् मुख्य सेनापति झाले.

असो. याप्रमाणें चरित्रनायकाच्या सत्कीर्तिसूर्यावर आलेलीं अभ्रें अनिष्ट दशा संपतांच आपोआप निघून जाऊन पुनः चोहोंकडे सोज्ज्वल प्रकाश पडूं लागला. सर्व कामकाजें यथास्थित चालूं लागलीं. मागें सातव्या भागांत सांगितल्याप्रमाणें पाटीलबावा दक्षिणेंत आल्यानंतर रघुनाथरावांसंबंधानें जीं महत्त्वाचीं कारस्थानें चाललीं होतीं, त्यांमुळें व तदर्थच चाललेल्या इंग्रजांबरोबरच्या लढायांमुळें सन १७७३ पासून १७८४ पर्यंत त्यांना दिलीदरबाराकडे लक्ष देतां आलें नाहीं. कारण पेशव्यांच्या वरील महत्त्वाच्या कामगारीपुढें त्यांना बाकीचीं सर्व कामें एकीकडे ठेवावीं लागलीं. पण त्या सालीं (सन १७८४) सवड मिळतांच बादशाही कारभार स्वतः हातीं घेण्यासाठीं ते तिकडे वळले.

१. भारतवर्ष मा. पु. २, अंक ३, पृष्ठ ३०।३१.

२।३।४. पद्य पत्रें नंबर २२।२०६.

५. जिवबादादांवरील इतराजी दोन तीन वर्षें चालली होती. या बाबतींतील बहुतेक पत्रव्यवहार हल्लीं सांपडत नाहीं. तो सांपडता तर पुष्कळ मनोरंजक, विशद व सकारण हकीकत देतां आली असती, निवळ ऐकींव माहिती देण्यांत अर्थ नसतो.

दिल्लीपति शहाआलमास त्याच्याच उमरावांनीं नामधारी बादशहा करून ठेविलें होतें. त्या लोकांनीं मनसोक्त कारभार करून राज्यांत हवी तशी पुंडाई माजविली होती. ह्या गोष्टीचा बंदोबस्त आतां जरूर केला पाहिजे व शिंद्यांशिवाय दुसऱ्या कोणाकडून तो होणार नाहीं, असें त्यानें मनांत आणिलें. कारण हे बादशाही उमराव सामान्य नव्हते. "नबाब नजबखान, दुसरे आगाशफी, तिसरे अबदुल हयातखान नबाब, व हमदानी नबाब व इस्माल बेग नबाब व गुलाम कादर असे असे व अफराशा नबाब व नजब कुलीखान नबाब व खान दौराखाँ नबाब सरनाम असा उमरावांचा समुदाय दिल्लीचे पातशाहींत होता. तसेंच त्यांकडे फौजखर्चास न्यारे न्यारे आपआपले सलतनाचे मुलूख लागले होते. ते 'पातशाही हुकुमांत वागावें' ती मर्यादा सांडून पातशहाचा हुकूम न वागविला आणि आपले जागीं आपण हुकुमाची मर्यादा सांडून वागूं लागल्यावरून पातशहा यानें शिंदेसरकार कामकर्ते, असें जाणून शिंद्यास सांगून गुप्तरूपें फर्मान पाठविलें कीं 'हे लोक बेहुकुमी करूं लागले, तक्तार्शी फिरले आहेत, हे हरामखोरीवर आले. त्यापेक्षां तुह्मी येऊन सलतनांतील जे लोक अमर्याद जाहले आहेत त्यांचें पारिपत्य करून तहद उमराव लोक यांजकडे मुलुख सरकारी आहे त्यासुद्धां अमल करावा.' याप्रमाणें पातशहाचा हुकूम दक्षिणी लोकांस गेल्याचें त्या लोकांस वर्तमान समजल्यावरून बाकी सर्व उमराव आपआपले जागीं होते, परंतु गुलाम कादर व नबाब इस्माल बेग व हमदानी हे होते त्यांणीं पातशहास कैद करून आपण राज्य करावें अशी मसलत केली." असें वर्तमान दिल्लींत चाललें होतें, तेव्हां शहाआलम बादशहाच्या आग्रहावरून पाटीलबावांनीं ही महत्त्वाची आणि जोखमाची पण फायदेशीर कामगिरी जिवबादादांवर संपविली. जिवबादादांनीं शत्रु फार प्रबळ आहेत असें जाणून, मोठ्या तयारीनिशीं आग्र्याच्या बाजूनें कूच केलें, आणि तेथें मोठ्या मर्दुमकीनें शत्रूंचीं पारिपत्यें केलीं. ही हकीकत जगोबा बापूच्या त्या वेळच्या पत्रांतूनच देतों. "इस्माल बेग व गुलाम कादर उभयतां आग्रेच्या किल्याच्या बाहिर तीन कोशांवर फौज घेऊन किल्ले यास मोरचे लाविले होते. त्यास, तीर्थस्वरूप राजश्री (जिवबा)दादा दरोबस्त फौज घेऊन अगोदर एक महिना उभयतांच्या पारिपत्याकरितां आले होते. मागोन नवी फौज देशाहून आली दहा हजार. तेव्हां श्रीमंत यजमानांनीं कृपा करून मजलाहि बरोबर पाठविलें. आण मी यावयाचे अगोदर वडिलांनीं अमित्रांशीं (शत्रूंशीं) तीन वेळ लढाई घेतली. तेव्हां एक वेळ वडिलांच्या अंगावरून तोफेचा गोळा गेला. तेव्हां दोन दिवस वडिलांस श्रम जाहले. त्या अगोदर आठ रोज लढाई जाहली. तेव्हां बसायाची घोडीस गोळी कपाळावर चां(द होता तेथें लागली त्यामुळें ती घो)डी दुसरीवर पडली. ऐसें मोठें काम खोटेंच जाहालें होतें. परंतु श्रीचे कृपेंकरून सर्व कुटुंबाचे आशीर्वादें वडिलांवरील अरिष्ट गेलें. चवथी लढाई घेऊन × × उभयतांस आगरेवर मोडिलें." याप्रमाणें मोठ्या पराक्रमानें जिवबादादांनीं शत्रूचा पराभव केला. पण हीं कामें किती जड जोखमाचीं असतात! हल्लींचीं पाश्चात्य तऱ्हेचीं सेनापतीचीं कामें आणि त्या वेळचीं कामें ह्यांत बरीच तफावत आहे. पाश्चात्य सेनापति लढाऊ सैन्यापासून अलग राहून, तेथून जरूर ते हुकूम सोडतात आणि त्याप्रमाणें युद्ध चालतें. परंतु पूर्वीं सेनापति सैन्याच्या पुढें होऊन, सर्व हालचाल समक्ष करवीत, व स्वतःही तरवार चालवीत. त्यामुळें हल्लींप्रमाणें सेनापतीचें त्या वेळचें काम निर्भय नव्हतें. असो. पुढें पळून गेलेल्या शत्रूच्या

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८१.

२. पद्य पत्र नंबर २२.

पारिपत्यासाठीं जिवबादादा वीस हजार फौज घेऊन मागोमाग गेले. आणि त्यांमागून जगोबा बापूही आपलेकडील फौज घेऊन दिल्लीस गेले.

दिल्लीच्या दरबारांत मुख्यत्वें वजीरीबद्दलच हे दंगे परस्परांत सुरू होते. ते असे कीं, नजबखान वजीर मेल्यावर, अफराशा हा वजीर होता. त्यानें आगाशफी यास दग्यानें मारलें. त्या रागानें आगाशफीचे बंधूनें अफराशास दग्यानें मारलें. यामुळें बादशहास मोठा राग येऊन त्यानें या कामांत खून करणारे पुढारी इसम, महंमद बेग हमदानी व त्याचा पुतण्या इस्मायल बेग, यांचें पारिपत्य करण्यासाठीं अफराशाचें सर्व लष्कर पाटीलबावांकडेस पाठवून दिलें. त्यानंतर हमदानीवर जिवबादादा चालून गेले. तेव्हां हमदानी "तोफा वगैरे सरंजाम बादशाहाचा होता तो स्वाधीन करून भेटीस आला. आण लष्करास निरोप दिल्हा. येणेंकरून हा प्रांत, (महादजी) यांचे स्वाधीन जाहाला. बादशाहा × × आगरेहून आला. त्याची व श्रीमंतांची भेट जाहाली." इस्मायल बेग व गुलाम कादर पळून गेले. त्यांचें दादांनीं यथास्थित पारिपत्य करून त्यांना दिल्लीप्रांताच्या पलीकडे हांकून लाविलें. ही गोष्ट सन १७८४ च्या जुलैच्या पूर्वी घडली. मग जिवबादादा दिल्लीस आले. आणि त्यांनीं पाटीलबावांस दिल्लीस बोलाविल्यावरून त्यांची स्वारीही तिकडे गेली. नंतर त्यांनीं बादशहाकडे जाऊन त्याची भेट घेतली. तेव्हां तो फार खुष होऊन त्यानें शिंद्यांस आपला सर्व कारभार सांगितला. "त्यानंतर शिंदा मुख्यत्वें दिल्लीचा कारभार करूं लागला. त्यावर बादशहाची कृपा होऊन बादशहानें त्यास आपला सेनापति करून दिल्ली व आगरें हीं दोन्ही त्याचे स्वाधीन केलीं. असा शिंद्याचा उत्कर्ष झाल्याचें वर्तमान पुण्यास येऊन पेशवे व नाना फडणीस वगैरे कारभारी यांस विस्मययुक्त आनंद झाला. त्यावरून पेशव्यांहीं एक फौजेची टोळी त्या शिंद्याकडे पाठविली. त्यांत अर्थ असा कीं या कामांत पेशवे यांचा अंश आहेसें सर्वांत प्रसिद्ध व्हावें." याप्रमाणें दिल्लीचा कारभार महादजी शिंदे यांचे हातीं आला. 'त्या वेळीं आग्र्याचा किल्ला व महाल लखबादादास सांगून त्याजला तेथें ठेविलें.'

इकडे दक्षिणप्रांतीं हैदर (म्हैसूरचा राजा) इ० स० १७८२ चे डिसेंबरचे ७ वे तारखेस वारला. तो शूर, मुत्सद्दी व राज्यकारस्थानांत फार निष्णात होता. त्याजपाशीं आपाजी राम नामक एक सारस्वत ब्राह्मण कारभारी होता. तो त्याच्या राज्याच्या सर्व अंतर्व्यवस्थेचीं कामकाजें पाहत असून, त्यास प्रसंगीं उत्तम ससलतही देत असे. आपाजी रामाप्रमाणेंच त्याचा बंधु नारो राम वागळे नाडकर्णी अंकोलेकर, हा शहाणा मुत्सद्दी असून हैदराकडून पेशव्यांचे दरबारीं वकील होता. हैदर मरण पावल्यावर त्याचा मुलगा टिपू हा म्हैसूरच्या गादीवर बसला. हा इतिहासांत टिपू सुलतान या नांवानें प्रसिद्ध आहे. टिपू हा शूर असून, फार धाडशी होता. परंतु बापाचें राज्यव्यवहारचातुर्य व धोरण याजमध्यें नव्हतें. हा स्वभावाचा अत्यंत क्रूर असून याला कोणतेंही अन्यायाचें व जुलमाचें कृत्य करावयास कांहींच शंका वाटत नसे. याच्या स्वैरपणास व जुलमी

१. पद्य पत्र नंबर ४०६, महादजीचें चरित्र पृष्ठ १८२ व ग्रांट डफची बखर पृ. २९९.

२. पद्य पत्र नंबर ४०६.

३।४. ग्रांट डफचा इतिहास भा. पृ. २९९ व वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७७।८१।९१.

५. ऐतिहासिक लेखसंग्रह मा. पु. (सन १८९९) अं. २९, पृ. ११२५. प्रसिद्ध नारो राम मंत्री हे या नारो रामाहून वेगळे होत.

कृत्यांस आला पडण्यास बापाच्या वेळचा शहाणा कारभारी पुरेसा होता. परंतु टिपूनें कारभार आपल्या मामास सांगितल्यामुळें राज्यांत अनीतीस व जुलूमजबऱ्यांस ऊत आला. मग अर्थातच आपाजी कारभारी होता तोंपर्यंत जी उत्तम व्यवस्था होती, ती पुढें या सुलतानशाहींत राहिली नाहीं. हैदराच्या ताब्यांत जो मुलूख होता, तो सुपीक असल्यामुळें व सर्वांवर त्यानें करड्या नजरेनें अमल चालविल्यामुळें, त्याच्या मरणसमयीं त्याजपाशीं तीन कोटी रुपये रोख आणि पुष्कळ जवाहीर व मौल्यवान् दागिने, यांचा मोठा सांठा असून लढाऊ सैन्य ऐशीं हजार होतें. एवढें वैभव प्राप्त झाल्यावर टिपूनें आपल्या जुलमी कारकीर्दीस प्रारंभ केला. त्याच्या निर्दयपणाच्या व अनन्वित कृत्यांनीं सर्व लोक फार त्रासून गेले. लोकांवर हवा तसा जुलूम केल्यामुळें त्याजपाशीं पैसाही पुष्कळ जमला. तेव्हां त्यानें नवी फौज ठेवून व फ्रेंचांशीं स्नेह बाळगून आपली शक्ति वाढविली. नरगुंदकर, कित्तूरकर, सावनूरकर, सौंदेकर वगैरे सरदार त्याला भिऊन तो सांगे त्याप्रमाणें वागत असत. नरगुंदकर पहिल्यानें पेशव्यांचे ताब्यांत होते. नरगुंदचा किल्ला व त्याचे आसपासचा मुलूख मिळून झालेलें नरगुंद संस्थान मलप्रभेचे दक्षिणेस सहा कोसांवर आहे. हा संस्थानिक पूर्वी पेशव्यांस खंडणी देत होता. परंतु पुढें हैदरानें कृष्णानदीचे दक्षिणेकडील मराठ्यांचा मुलूख घेतला, त्यामुळें तो हैदराकडे आला. तरी त्याजकडून खंडणी वगैरे तो मराठ्यांस देत होता त्याप्रमाणेंच घेण्याचा हैदरानें क्रम ठेविला असून, मामूल वहिवाटींत विशेष फरक केला नव्हता. परंतु टिपूनें ही दूरदृष्टीची रीतभात टाकिली, व त्याजकडे तो अमर्याद पैसा मागूं लागला. तेव्हां नरगुंदकरानें ही गोष्ट पेशव्यांचे कानावर घातली. सबब नाना फडणवीस यांनीं टिपूस सामोपचारानें सांगून पाहिलें कीं, "जाहागीरदार आपल्या मार्गानें वागत असतां दुसरी मुद्रा झाली, तरी त्यापासून अधिक घेणें हें ठीक नव्हे." परंतु त्यांस टिपूनें कळविलें कीं, आपल्या राज्यांत इच्छेस येईल त्याप्रमाणें प्रजेपासून आह्मी वसूल घेऊं. या कामीं तुह्मांस विचारण्याचें जरूर नाहीं. आणि इतकेंच करून तो थांबला नाहीं. त्यानें त्या पैशाच्या वसुलास तत्काळ सैन्य पाठविलें. तेव्हां नानांनींही नरगुंदकरांचे मदतीस परशुराम भाऊ, गणेशपंत बेहेरे, वगैरे सरदार पाठविले. त्यांच्या टिपूशीं कित्येक चकमकी झडल्या. तेव्हां त्या प्रांताची दोन वर्षांची खंडणी तुह्मांस देतों, अशी टिपूनें त्यांची समजूत काढून त्यांना माघारें लाविलें. मग ते लांब गेले असें पाहून, नरगुंदकरांवर हल्ला करून, नरगुंदचा किल्ला घेतला. आणि त्यांस अक्षय्य बंदींत घालून त्यांचे कन्येशीं जबरदस्तीनें विवाह केला! त्यानें कृष्णेच्या दक्षिणेंतील बहुतेक हिंदू धरून बलात्कारानें त्यांच्या सुंता केल्या.[1] त्याचप्रमाणें श्रीमच्छंकराचार्यस्वामीचे शिष्यांवरही जुलूम होऊं लागल्यामुळें त्या दोन हजार ब्राह्मणांनीं त्रासून जीव दिले. नरगुंदच्या किल्ल्याप्रमाणेंच कित्तूरचा किल्लाही टिपूनें हस्तगत करून, सौंदेकर यांचाही प्रांत घेतला. याप्रमाणें सर्व लोक अत्यंत कावून गेले. सौंदेकरांकडील कोणी अभिमानी सारस्वत गृहस्थानें तिकडे चाललेल्या जुलमाची दाद जिवबादादांकडून लागेल ह्मणून त्यांचे चिरंजीव नारायणराव यांजकडे सहाय्य मागितलें. त्या पत्रांत ते गृहस्थ लिहितातः– "श्रीमंत राजश्री सौंदेकर राजे हे फिरंगाणांत आहेत. त्यांची मोकळीक होऊन सौंदे संस्थान सोडविणेविशीं यत्न करितों. त्यास गलीम भारी. टिपू सुलतान असें ह्मणतांच लोक भितात! त्यास ते प्रांतांतील पुंड

१. सरस्वतीमंडल पृ. ३८.

२. ग्रांट डफची बखर पृ. ३०१.

पाळेकर व सरदार वगैरे दहा हजार रयित पावेतों आज चार वर्षें तागायत अरण्यवासी जाहली आहे! त्यास आह्मीं आज चार वर्षें पावेतों हे प्रांतीं गहून हरतऱ्हेनें यत्न केला. परंतु सफळ जाहला नाहीं + + + त्यास आपण कृपा करून आश्रयपत्र पाठविलेस आपले भेटीस येतों[१]."

अशा प्रकारें टिपूची भयंकर कारकीर्द चालू होती. व त्या प्रांतांतील, व तो स्वारी करून जाईल तिकडील सर्व लोक अत्यंत त्रस्त होऊन, आतां आपल्याम या दुःखांतून कोण सोडवील? ह्मणून चिंताक्रांत झाले. ह्या संधीस, ह्मणजे सन १७८५ सालीं, शिंदे व जिवबादादा दिल्लीआग्र्याकडील कारस्थानांत गुंतले होते. ह्मणून त्यांना दक्षिणेकडील ह्या टिपूच्या अन्यायी वर्तनाबद्दल त्याची खोड मोडण्यास येतां आलें नाहीं. शेवटीं ह्या सर्व लोकांच्या कागाळ्या पेशव्यांकडे आल्यामुळें, व नरगुंदकरांचे प्रकरणीं त्यानें देऊं केलेली रकम न देतां तो (टिपू) उलट धमकावणीही दाखवूं लागल्यामुळें, त्याचें पारिपत्य करण्याचें नाना फडणविसांनीं योजिलें, आणि टिपूवर जाण्यासाठीं जंगी तयारी आरंभिली. कारण टिपूचें सैन्यबळ फार असून, तो पराकाष्ठेचा धाडशी होता. नानांनीं निजाम व भोंसले, ह्यांना आपल्या पक्षाकडचे करून घेऊन त्यांनीं लढाईचे मदतीस यावें असें ठरविलें. इंग्लिशांकडे मदत मागितली होती; परंतु ती त्यांजकडून मिळाली नाहीं. पेशव्यांचे सेनापति हरिपंत फडके हे येदगीर मुक्कामीं निजाम व भोंसले यांस मिळाले. नानाही निजामअलीशीं कांहीं बोलणें बोलावयाचें होतें ह्मणून बरोबर गेले. मग तुकोजी होळकर व गणेशपंत बेहेरे, यांजबरोबर पंचवीस हजार फौज देऊन त्यांना टिपूचें लष्कर कित्तूरपाशीं होतें त्यावर पाठविलें, आणि मुख्य लष्कर टिपूच्या मुलखांत बदामीवर चाललें. पण पुढें पर्जन्यकाळ समीप आल्यामुळें बदामीचे आसपास हें सैन्य तसेंच राहिलें. निजाम मात्र आपले सेनापतीस पंचवीस हजार सैन्यासह हरिपंताच्या मदतीस ठेवून निघून गेला. पुढें उभय सैन्यांच्या बरेच वेळां लहानसान चकमकी झडल्या. तरी मोठी लढाई सुरू करण्यासारखें सैन्यबळ मराठ्यांकडे नसल्यामुळें तशी लढाई झाली नाहीं. नाना वरचेवर हरिपंतांस पैशाचा व फौजेचा पुरवठा करीत. पण टिपूशीं सामना देण्यास जी तयारी पाहिजे होती, ती होईना. "टिपू फिर्गी पांच लक्ष जीवें[२]. मसलत दिवसेंदिवस वाढत चालली. नाना फडणीस यांनीं हरिपंत तात्यांचे खर्चाची हिंमत करण्यास कमी केलें नाहीं व हरिपंत तात्यांनीं दुतर्फा पैसा उत्पन्न करण्यास कमी केलें नाहीं. परंतु मोहिमशीर फौजेस घरींहून मदत व मागितला पैसा अशा महर्गतेंत कोठून पुरणार? तेव्हां फौज गळून मसलत जड पडली[३]. हें वृत्त पुण्याहून वकिलांनीं शिंदे यांस लिहिलें त्याजवरून + + टिपूची मसलत आपले हातें सुधारावी + + ही उमेद धरून जिवबादादा व गोपाळराव व डभई (डि बॉयन) यांच्या पलटणांशीं हिंदुस्थान जिल्ह्यांत सोडून जातीनें (जिवबादादा) पन्नाससाठ हजार फौज व दोन अडीच कंपू घेऊन दरकुच देशास चालले[४]." याप्रमाणें भंडार कवडीच्या मुक्कामीं येऊन पोहों-

१. पहा पत्र नंबर १०.

२. पांच लक्ष ही संख्या जनावरांसुद्धां होती असें वाटतें. टिपूचें सैन्य पेशव्यांच्या सैन्यापेक्षां जास्त व जय्यत तयारीचें होतें. तरी पांच लक्षांची संख्या विलक्षण फुगविलेली दिसते. ती जनावरांसुद्धां तेवढी होती असें मानिल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

३. टिपूवर गेलेली पेशव्यांची फौज दोन वेळ मागें हटली होती. पहा कोल्हापूर व कर्नाटक प्रांताचा मोडककृत इति. पृ. ७४.

४. होळकराची कैफीयत पृ. ५८ व नागपूरकर भोंसल्यांची बखर पृ. १३२.

चल्यावर नाना फडणीस व हरिपंत यांस धीर आला व आतां टिपूशीं खडाजंगीची लढाई करण्यास हरकत नाहीं, असें त्यांना वाटलें. टिपूनें पेशव्यांच्या सैन्यासभोंवतालचा प्रांत जाळून लुटून फस्त केला होता. आणि त्या सालीं दुष्काळही होता. त्यामुळें पेशव्यांच्या लष्करांत अन्नाची महागाई फार झाली. त्यांत मधून मधून लढायाही होत. त्यामुळें सैन्यही बरेंच खपलें होतें. या दोनही गोष्टींची काळजी जिवबादादा आल्यावर दूर झाली. त्यांचे लष्कराबरोबर मोदीखाना असल्यामुळें अन्नाचे पुरवठ्याची वाण नव्हती व फौजही पंच्यायशीं हजार होती.

ही टिपूवरील मोहीम सन १७८५ पासून सारखी एक वर्ष चालू होती. पण बदामी किल्ल्याचे जवळ पेशव्यांचे सैन्यास टिपूनें फिरकूं ह्मणून दिलें नव्हतें. याच संधीस इंग्रज व टिपू यांजमध्यें तह झाल्यामुळें इंग्रजलोक या लढाईपासून अलग राहिले होते. पेशव्यांजवळ निजाम, भोंसले, होळकर, जाधव, निंबाळकर घाटगे, शितोळे, आंग्रे, पाटणकर, थोरात वगैरे राजे व सरदार यांचीं सैन्यें होतीं. परंतु टिपू पडला त्या प्रांतांतील वाघ ! आणि त्यास फिरंगी (फ्रेंच) व त्या प्रांतांतील दुसरे नबाब मिळून त्याजकडे लष्कराचा भरणा वर लिहिल्याप्रमाणें बराच मोठा झाला होता. परंतु या स्वारींत "शिंद्याकडील जिवबादादा हे प्रसिद्ध सरदार " येत होते. ते भरपूर सरंजामानिशीं येऊन पोहोंचल्यावर त्यांच्या दहशतीनेंच शत्रु चपापून गेले व ते आल्यावर दरबार होऊन सिद्धांत ठरला कीं, " टिपूचें सर्व राज्य घ्यावें. आणि त्याचे सहा विभाग करून त्यांतील दोन विभाग पेशवे यांनीं घ्यावे व दोन निजामअलीनें स्वीकारावे व एक शिंद्यास द्यावा व एक होळकरास द्यावा. " असें ठरवून पूर्वीं ठरल्याप्रमाणें तुकोजीराव होळकर व गणेशपंत बेहरे यांची त्यांजबरोबर पंचवीस हजार फौज देऊन टिपूचें कांहीं लष्कर कित्तूरजवळ होतें तिकडे रवानगी केली. आणि पेशवे, निजाम, जिवबादादा आदिकरून सर्व सेनाध्यक्षांनीं मुख्य लष्कर घेऊन एकदम बदामी किल्ल्यावर चाल करावी असें ठरलें. इकडे टिपूनेंही मोठी तयारी केली होती. पुढें मराठ्यांचें लष्कर तारीख १ मे सन १७८६ रोजीं बदामीस जाऊन दाखल झालें, आणि लागलाच किल्ल्यास घेरा घातला. " या किल्ल्याचें शहर मोठ्या मैदानांत असून त्यासभोंवतीं तट आहे. त्याच्या मध्यभागीं गढी आहे आणि त्या तटाच्या दोहों बाजूंस बाहेरचे अंगें दोन डोंगरी किल्ले आहेत." याप्रमाणें या मजबूद व 'भेसूर' किल्ल्यावर मराठ्यांनीं एकसारखा वीस दिवस तोफांचा भडिमार चालविला होता. परंतु त्या तटास खिंडार ह्मणून पडलें नाहीं ! तेव्हां किल्ला ताब्यांत कसा येतो ? याचा त्यांस मोठा विचार पडला. जिवबादादांस असे 'व याहूनही बिकट किल्ले घेण्याचे प्रसंग उत्तर हिंदुस्थानांत वरचेवर येत होते. यास्तव त्यांनाच सर्वांनीं पुढें कसें करावें याबद्दल मसलत विचारिली. तेव्हां त्यांनीं एकच सांगितलें कीं, अशा लढायांनीं किल्ला हातीं यावयाचा नाहीं. या वेळेस मोठें धाडस करून किल्ल्यावर गेलें पाहिजे. तेव्हां 'ज्यांस सरकारची कामगारी बजवावयाची असेल, त्यांनीं आह्मांबरोबर चलावें. निवडक लोकांनिशीं किल्ल्यावर चढून एकदम छापा घातल्याशिवाय लौकर कार्यसिद्धि व्हावयाची नाहीं.' हें ह्मणणें सर्वांस मान्य झालें. मग जिवबादादा, हरिपंत, परशुराम भाऊ, गोपाळराव, डि बॉयन व इतर मराठे सरदार व निजामाक-

१. पेशव्यांची बखर पृ. ११८.

२. मागच्या पानावरील २ री टीप पहा.

३. नातूकृत महादजी शिंदे यांचें चरित्र पृ. १९३.

४. ग्रांट डफकृत ब. पृ. ३०३.

५. ग्रांट डफची बखर पृ. ३०४ व पोवाड्यांचें पु. पृ. १३१.

डील सरदार, हे निवडक साडेतीन हजार लोकांसह ता० २० मे सन १७८६ रोजीं कट्टा करून शिड्या लावून किल्ल्याच्या तटावर चढले. नंतर खालीं उतरून किल्ल्यांत जात असतां, आंत सुरुंग पुरले होते त्यांस आंतील लोकांनीं एकदम बत्ती दिली. तेव्हां मोठा आवाज होऊन शिपाईलोकांपैकीं एकाएकीं सातशें लोक मरून पडले. तरी त्या भयंकर हानीकडे लक्ष न देतां मोठा त्वेष आलेले ते लोक ठिकठिकाणीं पुन्हा शिड्या लावून आंत शिरले. आणि मध्यभागीं गढी होती, तेथें पोहोंचल्यावर तुंबळ युद्ध होऊन, मराठ्यांनीं किल्ल्यांतील बरेच लोक मारिले. त्या धास्तीनें इतर सैन्याची दाणादाण उडाली. नंतर तें मराठ्यांचें लष्कर किल्ल्यांतील निरनिराळ्या ठिकाणीं दबा धरून बसलेल्या लोकांकडे वळलें, आणि त्यांजवर त्यांनीं जोरानें हल्ले करून लोक कापून काढण्याचा सपाटा चालविला. तेव्हां ते टिपूचे सर्व लोक जीव घेऊन बाजूंच्या दोन्ही किल्ल्यांवर चढून जाऊन त्यांच्या आश्रयानें राहिले, आणि तेथून त्यांनीं दगडांचा व बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव करून मराठ्यांचा बराच नाश केला. तरी तो सर्व मारा सहन करून मराठे शूर वीर त्या दोन्ही किल्ल्यांवर चढले. "ते मराठे व मोंगल यांचे अतूट उद्योग व मोठा वेग पाहून ते किल्लेकरी (भय)भीत होऊन केवळ जीवदान मात्र मागून त्यांस ते दोन्ही किल्ले त्यांनीं दिले[१]." या लढाईत शत्रूचे चार हजार लोक जखमी झाले व जागच्याजागीं नऊशें लोक ठार झाले, आणि मराठ्यांस लूट पुष्कळ मिळाली. याप्रमाणें युद्ध होऊन बदामीचा अजिंक्य किल्ला पेशव्यांच्या ताब्यांत आला. या स्वारींत जिवबादादांच्या पराक्रमाची फार तारीफ झाली.

यानंतर नाना फडणवीस, मुधोजी भोंसला आणि जिवबादादा, हे तेथून निघून मागें परतले. निजामअली त्यापूर्वींच गेला होता. इस्मायल बेग व गुलाम कादर, यांचें व महादजींचें वैमनस्य होतेंच. त्यांचे फिसरतीनें शीख लोकांनीं याच संधीस बादशहाचे मुलखांत उत्तरेकडे स्वारी केली होती. परंतु जिवबादादा टिपूवरील मोहिमेंत गुंतल्यामुळें पाटीलबावांनीं शिखांच्या स्वारीवर हैबतराव फाळके व अंबाजी इंगळे, यांची रवानगी केली. पुढें टिपूवरील स्वारीचें काम लौकर आटपून येण्याविषयीं पाटीलबावांकडून लिहून आल्यावरून जिवबादादाही हिंदुस्थानांत जाण्यास गेले. आणि शिखांचा जोर जास्त असल्यामुळें त्यांना फौजेसह तिकडे जावें लागलें. ते शिखांच्या चोहोंकडील स्वाऱ्यांचा बंदोबस्त करीत करीत पत्याळेकडे चालले.

इकडे मुधोजी भोंसल्यांनीं आपला पुत्र खंडोजी भोंसले याजबरोबर फौज देऊन त्यास हरिपंतांच्या मदतीस ठेविलें होतें. त्याचप्रमाणें तुकोजी होळकरही त्यांचे मदतीस होते. नंतर त्यांनीं टिपूच्या मुलखावर स्वारी करून सावनूरपर्यंत चाल करून दोन लाख रुपये खंडणी घेतली. नंतर गजेंद्रगड वगैरे कित्येक किल्ले घेऊन ते कोपाळगड येथें गेले. हें टिपूस समजल्यावरून तो जातीनें या लष्करास सामना देण्यासाठीं निघाला. हीं दोन्ही लष्करें सावनुरावर पंधरा दिवस तळ देऊन होतीं. एके दिवशीं मोठ्या पहांटेस टिपूनें मराठ्यांच्या लष्करावर एकाएकीं छापा घातला. परंतु मराठ्यांची तयारी चांगली असून तुकोजीराव होळकर आपल्या जय्यत फौजेनिशीं सदा सावध असत, त्यामुळें त्याच्या हातीं कांहीं लागलें नाहीं. नंतर हीं लष्करें पांच कोसांच्या अंतरानें मजबूद ठिकाणीं ठाणीं धरून राहिलीं. उभयतांचें बळ समसमानच होतें. ह्मणून लढाईस कोणीच आरंभ करीना. शेवटीं

१. ग्रांट डफची बखर पृ. ३०४.

२. होळकरांची कैफीयत पृ. ५५ व नातूकृत महादजींचें चरित्र पृ. २००.

टिपूनें मनांत आणिलें कीं, 'मराठ्यांशीं पुढें शत्रुत्व चालवून आपली धडगत दिसत नाहीं. बदामीप्रमाणें आपलें एक एक ठाणें ते काबीज करितील. यासाठीं आतां युद्धाच्या भरीस न पडतां तह करून हें प्रकरण मिटवून पुढें आपल्या कामास लागावें, हेंच हितप्रद आहे.' मग त्यानें मराठ्यांना आपण तह करण्यास कबूल आहें, असें कळविलें. तेव्हां उभयपक्षांच्या विचारें तह ठरला तो असाः—"बदामी, कित्तूर, नरगुंद व दुसरे मराठ्यांनीं घेतलेले प्रांत त्यांस दिले व रोख तीस लक्ष रुपये देऊन दहा लक्ष आणखी देण्याचें कबूल केलें. व सावनूरच्या नबाबासही आपल्या मुलखांतील कांहीं भाग द्यावयास तो सिद्ध झाला. पण त्यास (सावनूरकरास) टिपूचा विश्वास येईना ह्मणून तो मराठ्यांच्या लष्कराबरोबर पुण्यास गेला."

याप्रमाणें टिपूवरील स्वारींत पेशवे जय पावले. टिपू हा केवळ हिंदूंचाच नव्हे तर कांहीं प्रसंगीं मुसलमानांचाही कर्दनकाळ झाला होता. त्याच्या अनन्वित कृत्यांनीं लोकांचा नाइलाज होऊन गेला होता. सैन्यबलानें तो इतका प्रबल होता कीं, त्याचा पराभव करण्याच्या कामीं पेशवे आपल्या मदतीस निजाम, भोसले, सावनूरकर नबाब, होळकर इत्यादिकांस ससैन्य घेऊन पुष्कळ दिवस कट्टया निश्चयानें लढत असतां त्या बहाद्दरानें त्यांस मुळींच दाद दिली नव्हती. अशा प्रबल शत्रूचा पराभव करून बदामीसारखा बळकट किल्ला एका दिवसांत लढून घेण्याचें काम फारच बिकट व मोठ्या धाडसाचें होतें. तें जिवबादादा आल्यावर केवळ त्यांच्याच युक्तीनें व हिमायतीनें पार पडलें. ही गोष्ट त्या पुरुषाच्या मोठ्या योग्यतेची दर्शक होय. त्या दिवशीं जिवबादादांबरोबर राहून सर्वांनीं यथाशक्ति कामगारी बजाविली होती; परंतु जिवबादादांच्या लष्करांतील रजपूत, मराठे, जाट, रोहिले, फिरंगी वगैरे लोक उत्तम रीतीनें लढले, त्यामुळें मराठ्यांचा जोर वाढून शत्रूचा नाइलाज झाला, व हेंच बदामी हस्तगत होण्याचें मुख्य कारण होय. अशाप्रकारें या ह्मैसूरच्या वाघाच्या उत्कर्षास मराठे विघ्नभूत झाल्यामुळें पुढें जरी त्यानें फ्रान्स देशच्या दिग्विजयी नेपोलियन बोनापार्टाशीं सख्य ठेवून त्याची मदत मिळविण्यापर्यंत मोठमोठे पल्ले बांधिले होते, तरी इंग्लिशांना त्याचा समूळ नाश करण्याचें काम तितकें जड झालें नाहीं. त्या कालीं जिवबादादांच्या लष्कराचा धाक सर्व शत्रूंस फारच वाटत होता. त्यांच्या कानांवर टिपूचे भयंकर जुलूम आलेच होते. तेव्हां त्याचा पराभव करून धन्याचें यश त्यांनीं उज्ज्वल केलें व त्यांच्या तर्फे पेशव्यांची कामगारी बजावून त्यांजकडून शाबासकी मिळविली. ही केवढ्या आनंदाची गोष्ट !

जिवबादादांच्या अतुल पराक्रमानें महादजी शिंद्यांचा एकसारखा उत्कर्षच होत गेला, व पेशवे सरकारास मोठी मदत झाली.

१. ग्रांट डफची बखर पृ. ३०५.

२. कोल्हापूर व कर्नाटक प्रांताचा मोडककृत इ. पृ. ७५ व होळकराची कैफीयत पृ. ५८.

३. पोवाड्यांचें पुस्तक पृ. १३१.

४. शिंद्यांचें लष्कर पेशव्यांच्या मदतीस आल्याशिवाय कोणतेंच महत्त्वाचें काम उलगडलें नाहीं. पहा नातूकृत महादजीचें चरित्र पृ. २०५, पत्रें व यादी यांतील पत्रव्यवहार व या पुस्तकासोबतचा पत्रव्यवहार. जिवबादादांच्या अतुल यशामुळें पेशव्यांच्या दरबारीं पुढील श्लोक लोकांच्या ह्मणण्यांत येत असे, असें ह्मणतात.

माधवो ह्यादजीबावा जिवबादादाऽर्जुनः परः । धर्माणां श्रीमतां स्वार्थे युद्धं भारतसंमतम् ॥

असो. याप्रमाणें टिपूचा बंदोबस्त होऊन दक्षिणेंतील कामगारी संपल्यावर तिकडे उत्तरेस बादशाहीं कारभारासंबंधानें कोणकोणत्या हकीकती घडल्या तें पाहूं.

महादजी शिंदे यांस वजीरी मिळाल्यामुळें सर्व मुसलमान उमराव त्यांचा आंतून द्वेष करूं लागले. ह्या वेळीं बादशाही फौजेंत महंमद बेग हमदानी हाच प्रमुख सरदार होता. तो बाह्यात्कारीं पाटीलबावांशीं गोडीनें वागत असे. परंतु सर्व मुसलमान सरदारांस त्याच्या आश्रयानें महादजींच्या विरुद्ध मसलती बांधतां येत असून, त्या बाहेर फुटत नसत. हें कारस्थान पुष्कळ दिवस सुरू होतें. मागें सांगितल्याप्रमाणें इस्मायल बेग व गुलाम कादर यांस जिवबादादांनीं हांकून लाविलें खरें. तरी इस्मायलाचा महंमद बेग हा चुलता असल्यामुळें, त्याच्या वशिल्यानें ते दोघेही त्याच्या फौजेंत सामील झाले. ह्या गोष्टी महादजींच्या नजरेंतून चुकून गेल्या असें नाहीं. तथापि ते धोरणी व दूरदर्शी असल्यामुळें त्यांनीं उघड रीतीनें आपल्या विरुद्ध जाणाऱ्यांशिवाय बाकी गोष्टींकडे कानाडोळा केला, आणि उघडपणें द्वेष करणारांच्या जहागिरी वगैरे जप्त करून त्यांची खोड मोडली. तेव्हां त्यांचा चोहोंकडे दरारा बसत चालला.

महंमद बेग हमदानीजवळ फौज पुष्कळ असून, तींत कांहीं कवाईत शिकलेले कंपूही होते. अशा फौजबंद सरदारानें कांहींएक गडबड करूं नये, म्हणून महादजींनीं राघवगड संस्थानिकाकडील येणें वसूल करण्याचे कामीं त्याची रवानगी केली होती. मग तिकडून तो परत आल्यावर त्याजवर फौज कमी करण्याबद्दल पाटीलबावांनीं छकड बसविली. परंतु त्यानें कांहीं सबबी सांगून टाळाटाळी चालविली, आणि रजपूत व इतर मुसलमान यांस बंड करण्याविषयीं आंतून भर दिली. इतक्यांत राजा हिंमतबहादरानें बुंदेलखंडांत दंगा मांडिला.

रजपूत राजांकडे शिंद्यांचें चौथाई हक्काबद्दल स्वतःचें येणें होतें. शिवाय बादशहास त्यांनीं द्यावयाच्या खंडण्या, वजीरीचा अधिकार प्राप्त झाल्यामुळें महादजींसच वसूल करावयाच्या होत्या. शिंद्यांचा हा दुजोरा रजपुतांस अगदीं असह्य झाला. ते शिंद्यांचा फारच द्वेष करूं लागले. त्यांना महंमद बेग हमदानी दिल्लीकडील अंतस्थ स्थितीची यथायावत् बातमी देत असे. महादजींनीं जयपूरवाल्याकडे पैशाची मागणी केली. परंतु त्यानें दांडगाईचा जबाब दिल्यावरून पाटीलबावा व जिवबादादा इ० स० १७८६ त स्वतः जयपुरास[1] गेले होते. त्या वेळीं ऐवज किती द्यावयाचा तें ठरून त्यानें पहिला हप्ता भरला; पण दुसऱ्या हप्त्याच्या वेळेस शिंद्यांकडून गेलेल्या रायाजी पाटलाचा रजपुतांनीं मोड करून त्यास हांकून लाविलें. ह्या गोष्टीनें पाटीलबावांस फारच चीड आली. ही गोष्ट इ० स० १७८७ च्या आरंभीं घडली. ह्या वेळीं जिवबादादा शिखांवरील स्वारींत पत्याळेच्या बाजूस गुंतले होते.

रजपुतांवर स्वारी करून त्यांजवर आपलें वर्चस्व पुनः स्थापित केल्याशिवाय आतां गत्यंतर नाहीं, असें जाणून महादजींनीं मोहिमेची झटून तयारी चालविली. परंतु शिंद्यांवरील हा प्रसंग मोठ्या अडचणीचा होता. कारण त्यांच्या विरुद्ध सर्व रजपूत राजे एक झाले होते. मुसलमान सरदार तर अगदीं बिथरले होते. शिखांवरील स्वारीमुळें बरीच फौज तिकडे गुंतली जाऊन जिवबादादांसारखे प्रतापी सेनापति त्याच कारणानें इतक्यांत येण्याजोगे नव्हते. बादशाही फौजेच्या पगाराची बाकी पुष्कळ

---

१. पहा पत्र नंबर २६, वि. ज्ञान. वि. पु. ११, पृ. ९१ व सनद नंबर ४३.

थकली असून त्यांचा मागून एकसारखा तगादा होता. अशा रीतीनें सर्व राजकीय वातावरण बदललें होतें, तरी खंबीर मनाच्या पाटीलबावांनीं बिलकूल धीर सोडिला नाहीं. त्यांनीं होईल तितकी तयारी करून व मुसलमान सरदारांस थोपवून धरून, लढाईसाठीं बरीच मोठी फौज जमविली. त्या फौजेंत डि बॉयन, आपा खंडेराव, राणाखान, देवजी गौळी, मुसा रुस्तुम फिरंगी, खंडोजी व बाळोजी इंगळे व रायाजी पाटील हे स्वतः शिंद्यांचे सरदार असून, महंमद बेग हमदानी व इस्मायल बेग हे बादशाही सरदार पंचवीस हजार फौज, कांहीं कवायती पलटणें व तोफखाना यांसुद्धां तींत होते. अशा तयारीनें महादजी शिंदे इ० स० १७८७ च्या भर उन्हाळ्यांत जयपुराकडे जातीनें निघाले.

इकडे रजपुतांनीं मोठी तयारी केली होती. रजपुतांच्या बाजूस अंबरचा राणा, जयपुरचा राणा प्रतापसिंग, जोधपूरचा राजा विजेसिंग व त्याच्या ताब्यांतील इतर संस्थानिक राठोड राणे व उदेपूरचा राणा हे प्रमुख असून, ही फौज एकंदर एक लक्ष होती, व तोफा चारशें होत्या. ह्या उभय सैन्यांची गांठ जयपूरच्या पूर्वेस ४३ मैलांवर लालसोट नामक गांवाजवळ तोंग एथें पडली. दोन्ही सैन्यें सज्ज होऊन लढाईस उभीं राहिल्यावर आयत्या वेळीं बादशाही फौजेनें आपल्या पगाराची बाकी चुकती केल्याशिवाय आपण लढाईस उभे राहत नाहीं, असा दंगा मांडिला, आणि महंमद बेग व इस्मायल बेग हे उघड रीतीनें शत्रूस जाऊन मिळाले. तेव्हां लढाईचा सर्व भार शिंद्यांच्याच फौजेवर पडला. तरी महादजींनीं न गडबडतां ताबडतोब लढाईस सुरुवात केली. मोगली फौज रजपुतांस मिळतांच त्यांस उत्तेजन येऊन त्यांनीं मराठ्यांवर मोठ्या जोराचा हल्ला केला. तेव्हां शिंद्यांच्या स्वारांचा पराभव होऊन ते मागें सरले. परंतु या प्रसंगीं डि बॉयनाच्या पलटणींनीं मोठें शौर्य दाखवून टिकाव धरिला, आणि गोळ्यांची सारखी वृष्टि चालविली. त्यामुळें शिंद्यांचे फौजेचा बराच बचाव झाला. दोहोंकडील तोफांचा जबर मारा चालून शेंकडो लोक समरांगणीं मरून पडत असतां शिंद्यांच्या लष्करांतून आलेला तोफेचा एक गोळा महंमद बेग हमदानीस लागून तो ठार झाला. भेदाचा परिणाम हृदयभेदरूपी व्हावा हें न्यायास अनुसरूनच झालें ! महंमद बेग मरतांच त्याची जागा इस्मायल बेगानें घेऊन तो मराठ्यांवर तुटून पडला. परंतु मराठ्यांपुढें त्याचें कांहीं न चालतां त्याला मागें हटावें लागलें. हें पाहून जोधपूरच्या राठोर लोकांपैकीं चिलखतें घातलेल्या दहा हजार स्वारांनीं मराठ्यांवर निकरानें चाल केली. ही प्रचंड फौज अंगावर आलेली पाहून डि बॉयनानें आपल्या फौजेचा पोकळ चौरस व्यूह करून त्याच्या अग्रभागीं तोफा रचून राठोडांच्या स्वारांवर तोफांचे गोळ्यांचा भडिमार सुरू केला. त्यायोगें त्यांचे शेंकडो लोक मरून पडूं लागले. परंतु त्या शौर्यशाली राठोडांनीं न डगमगतां डि बॉयनाच्या तोफखान्यावर तशा आगींतूनही चाल करून त्या गोलंदाजांची कत्तल उडविली ! तेव्हां डि बॉयनाचा पराभव झाला व अर्थातच तोफखाना बंद पडला. रजपुतांचें हें शौर्य वर्णनीय होतें, यांत शंका नाहीं. तोफखाना बंद पडतांच डि बॉयनानें बंदुकांचा जबरदस्त मारा करून राठोडांस पुढें फिरकूं दिलें नाहीं. ते नाइलाज होऊन मागें फिरले. ही लढाई सारखी तीन दिवस चालली होती. शिंद्यांचे सरदार राणाखान भाई, आपाजी खंडेराव वगैरे दुसरीकडे रजपुतांशीं लढत होतेच. पण बाकी राहिलेली मोंगली फौज ऐशीं तोफांनिशीं अकस्मात् इस्मायल बेगास जाऊन मिळतांच मराठ्यांचा कमजोर झाला व रजपुतांची सरशी होऊन मराठे पराभव पावले. या पराभवामुळें शिंद्यांच्या उत्तरेकडील राज्यास मोठा धक्का बसला. ही गोष्ट इ. स. १७८७ च्या मे महिन्याच्या अखेरीस घडली.

नंतर एक दोन दिवस मराठ्यांची फौज लालसोटच्या आसपास होती, व पुनः रजपुतांवर हल्ला करण्याचा तिचा विचार चालला होता. परंतु त्या फौजेंत अन्नाची तूट पडल्यामुळें व वारंवार रजपुतांच्या हल्ल्यांनीं महादजींचें लष्कर जेरीस आल्यामुळें, त्या बिकट प्रसंगीं महादजींनीं आपली फौज अलवरकडे नेली, आणि त्यांनीं आपलें जड सामान व बुणगें कुशळगडाकडून ग्वाल्हेरीस नेऊन ठेविलें. मग आपल्या लष्करासुद्धां मोठ्या त्वरेनें हटत हटत दीग किल्ल्याकडे जाऊन, लष्करी टोळ्या आजूबाजूस गुंतलेल्या त्यांनीं एकत्र केल्या. या बिकट प्रसंगांतून कसें निभावून जावें व आपलें वजन कसें राखावें, हा त्यांस मोठा विचार पडला. पाटीलबावांवर हे दिवस मोठ्या संकटाचे गुदरले होते. रजपूत व मोंगल सरदार शिरजोर झाल्यामुळें शिंद्यांच्या सर्व सत्तेस छाट बसल्यासारखा झाला. तेव्हां कोणीकडून तरी मदत मिळविल्यावांचून गत्यंतर नाहीं, असें महादजींस वाटलें. व त्यांनीं ताबडतोब आग्रा, अलीगड वगैरे ठाणीं मजबूत केलीं. आणि भरतपूरच्या जाटाकडून दीगचा किल्ला घेतला होता, तो त्यास परत देऊन त्याचा स्नेह संपादिला. यामुळें भरतपूर एथें शिंद्यांचे फौजेस आश्रय मिळाला. महादजींची बाकी फौज अलीगड, आग्रा आणि दिल्ली एथें होती. पैकीं अलीगड व दिल्ली घेऊन गुलाम कादरानें तेथें आपला झेंडा लाविला. फक्त आग्रा मात्र लखबादादांच्या स्वाधीन असल्यामुळें तो मुसलमानांच्या हातीं आला नाहीं. इकडे रजपूत राजे शिंद्यांबरोबरच्या लढाईंत विजयी झाल्यामुळें पुढें शिंद्यांच्या फौजेचा पाठलाग वगैरे करण्याचें सोडून अगोदर रजपूतस्थानांतील आपले जे प्रांत शिंद्यांनीं घेतले होते, ते परत घेऊन आपली तिकडील सत्ता व हितसंबंध दृढ करण्यासाठीं तिकडे गेले ! आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपापले गेलेले प्रांत जिंकून घेऊन पुनः पूर्ववत् आपली सत्ता कायम केली. अशा रीतीनें महादजींची तिकडील सर्व सत्ता लोप पावली, इतकेंच नव्हे, तर ज्या आग्र्याच्या रक्षणाचें काम लखबादादा झटून करीत होते, तेंही ठाणें घ्यावें ह्मणून इस्मायल बेगानें मोठ्या फौजेनिशीं त्या किल्ल्याभोंवतीं वेढा दिला. तेव्हां अगोदर सर्व काळज्या एकीकडे ठेवून आग्र्याचा शह उठविणें पाटीलबावांस भाग झालें. ह्या संबंधानें त्यांनीं काय काय तजविजी केल्या तें कळविण्यापूर्वीं आग्र्याच्या किल्ल्याची माहिती, व ज्या महापुरुषानें मोठ्या बहादुरीनें त्याचे रक्षणाचें काम चालविलें होतें, त्या लखबादादांची माहिती देऊं. आणि मग तिकडे वळूं. ही लढाई इ. स. १७८७ च्या सपटंबरच्या आरंभीं सुरू झालेली होती.

"आगरियाचा किल्ला यमुनेच्या तीरीं आहे. एकीकडून यमुनेचा खंदक व एकीकडून खणून खंदक. दोन्ही तोंडें यमुनेस मिळवून खंदकांत पाणी बेमुबलक. दरवाजियापुढें खंदकावरून फळ्यावरून जावें यावें. फळ्या काढल्यावर यत्न नाहीं. तो किल्ला केवळ असाध्य. एकांत एक पांच परीघ किल्ल्यास. दर परिघास दोनशें तोफा व शिवाय धाकटीं यंत्रें. अशी किल्ल्यावर बाराशें तोफ वगैरे. तो दुर्ग केवळ अवघड. आगरियाप्रमाणें भुइकोट किल्ला कोठें उपमेस नाहीं. ज्या वेळेस अकबरशहा पातशहा यांणीं किल्ला बांधिला, त्या वेळेस किल्लेदार, आंतील सामान यंत्रधारी, व गोलंदाज ठेविले. ते वंशपरंपरा किल्ल्यांत राहत आले. अलीकडे अवरंगजेब महाबळी आदिकरून पातशहा जाले. आणि गनिमांचीही प्रबळता जाहाली. पलीकडे अटकेपर्यंत मुलूख काबीज केला. परंतु किल्ला

१. इस्मायल बेगास आग्र्यास येण्यापूर्वीं त्याच्या फौजेनें फत्तेपूर एथें आपल्या पगाराच्या रोजमुऱ्यासाठीं अडविलें होतें. परंतु त्यानें त्यांची कशी तरी समजूत घालून तो आग्र्यास आला. या संबंधाचें लखबादादांच्या घरीं पत्र आहे.

कोणास आला नाहीं. सुरजमल्ल जाट यास शहरची गिर्दनबाजी दिली होती. परंतु त्यास किल्ला असाध्य. त्याचें वेतन ज्यांणीं आगरियाचें स्वामित्व करावें त्यांणीं किल्ल्यांतील पोटापाणियाची बंदोबस्ती करावी. तो किल्ला अकबरशहा पातशहा यांणीं कांहीं पृथ्वीदिग्विजय करून रुपये मिळवून बांधिला असें नाहीं. त्यास किमया अवलिया फकिरापासून प्राप्ति होती. त्या किमियाचे द्रव्यें करून एवढें असाध्य दुर्ग निर्माण केलें होतें. दारूगोळा यंत्राचें साहित्य याजप्रमाणें कोणत्याहि किल्ल्यावर नाहीं." "केरवलीसंस्थानचे अधिपति जाधव हे आपणास यदुकुलोत्पन्न श्रीकृष्णापासून झालेले असें ह्मणतात. त्यापैकीं राजा गोपाळदास याणें अकबर बादशहाच्या हुकुमावरून आग्र्याच्या किल्ल्याचा पाया घातला. कारण जोशांनीं बादशहास असें सांगितलें होतें कीं श्रीकृष्णाच्या वंशांतील कोणा पुरुषाचा हात लागेल तर किल्ला चिरस्थायी होईल." अशा प्रकारच्या किल्ल्याच्या रक्षणार्थ महादजींनीं जो किल्लेदार नेमिला, तोही तसाच खंबीर होता. त्याच्या विलक्षण शौर्यामुळें व धाडशी स्वभावामुळें शिंद्यांच्या राज्यरूपी इमारतीची ढांसळून पडणारी एक बाजू मोठ्या कुशलतेनें राखली गेली. तेव्हां अशा पराक्रमी पुरुषाचें अल्पसें वर्णन एथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं, असें वाटतें. सबब आतां तिकडेच वळूं.

सावंतवाडी संस्थानांतील पेडणेंमहालांत आरोबा व चिखली ह्मणून गांव आहेत. लखबादादा हे तेथील राहणारे वतनदार सुखवस्तु सारस्वत गृहस्थ होत. संस्थानांतील पारसें व आरोबा एथील जे प्रसिद्ध देसाई सरदार आहेत, त्यांस त्यांची देसाइगिरी व सरदारी मिळवून देणारे लखबादादांचे पूर्वजच होत. ह्यांचें उपनांव लाड. ह्यांनीं त्या वेळचे दक्षिणेकडील प्रमुख सत्ताधारी विजापूरचे बादशहा यांजकडून सदर जहागिरीसंबंधाची सनद देसाई यांस देवविली. त्या उपकाराबद्दल देसाई यांनीं यांस दिलेल्या मोठ्या उत्पन्नाच्या जमिनी यांच्या घराण्याकडे अद्यापि चालत आहेत, आणि त्या वेळेपासून देसाई यांचा कारभार या घराण्याकडे चालतो. लखबादादा प्रौढ होतांच हिंदुस्थानांत रोजगारासाठीं जावें, असें त्यांच्या मनांत भरलें. आणि हे तेथून निघून शिंदेशाहींत बाळोबातात्या पागनीस मुख्य मुत्सद्दी होते त्यांजकडे उज्जन एथें जाऊन लिहिण्याचे कामावर कारकून राहिले. पुढें बाळोबातात्यांस कारभार मिळाला, आणि त्यामुळें त्यांचे पिढीजाद पागनिशीचे कामावर दुसरा नेमून देणें त्यांस भाग पडलें. तेव्हां त्यांनीं तें काम लखबादादांस सांगितलें. शिंद्यांच्या बावन्न पागा होत्या. त्यांवर लखबादादांचा अंमल चालूं लागला. त्या पागा सेनापति जिवबादादांच्या हाताखालीं असल्यामुळें लढांईत लखबादादांची हुशारी त्यांच्या लक्षांत येऊं लागली, व प्रसंगीं यांचा मोठा उपयोग होईल अशी त्यांची खात्री झाली. ते त्यांना असेंच शौर्यानें काम करण्याविषयीं वारंवार उत्तेजन देत असत. त्यामुळें लखबादादा दिवसेंदिवस उदयास येऊन योग्यता पावले होते.

---

१. भाऊसाहेबांची बखर पृ. ३२.

२. म्यालेसनच्या इतिहासाचें गोडबोलेकृत भा. पृ. ९१.

३. पारसें, आरोबा, चिखली व वागाळी एथें या लाडांचीं घराणीं आहेत. प्रसिद्ध डाक्टर भाऊ दाजी, हे त्यांपैकीं पारसें येथील घराण्यांतील होत. हे सन्मान्य पुरुष जसे उत्तम भिषग्वर्य तसेच उत्कृष्ट विद्वान्, शोधक व मोठमोठ्या संस्थांचे उत्पादक व सहाय्यकर्ते होते. सौजन्य, परोपकारिता, लोकनायकत्व इत्यादि गुणांत असे कीर्तिमान् पुरुष अलीकडे थोडेच निर्माण होतात, या थोर पुरुषानें आपल्या असामान्य गुणांनीं या देशांत तर काय परंतु युरोपांतही मोठी कीर्ति मिळविली.

लखबादादा आग्र्याच्या किल्ल्यावर कांहीं लोकांसह होतेच. ह्या संधीस शिंद्यांवर गुदरलेल्या मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगामुळें त्यांचे भोंवतालील शत्रु जोरावून त्यांनीं त्यांची सत्ता संपुष्टांत आणिल्याचें वर लिहिलेंच आहे. त्याचप्रमाणें इस्मायल बेगानें सर्व मुसलमान सरदारांसहवर्तमान बादशाही फौज घेऊन आग्र्याच्या किल्ल्याभोंवतीं वेढा घातलेला होता. परंतु ही मुसलमानी फौज तेथें येण्यापूर्वीं लखबादादांनीं हें भविष्य जाणून किल्ल्यांत सर्व प्रकारची तयारी मोठ्या झपाट्यानें चालविली होती. किल्ल्यांत धान्यादिकांचा सांठा नव्हता, ह्मणून त्यांनीं चोहोंकडून धान्यादि निर्वाहोपयोगी पदार्थांचा पुरवठा करण्याची तजवीज अगोदर जारीनें चालविली. ह्या कामीं त्यांना स्वतः कर्ज काढूनही ह्या तयारीचें काम करावें लागलें. पुढें पाटीलबावांनींही साहित्याचा पुष्कळ पुरवठा केला. पण नंतर जेव्हां किल्ल्यास वेढा पडला, तेव्हां पुढील उद्योग अर्थातच बंद झाले. लखबादादा किल्ल्यांत अडकून पडले असतां त्यांचीं व दुसऱ्या मुत्सद्द्यांचीं माणसें व त्यांची घोड्याची पागा हीं मलपुरास होतीं. त्यांच्या सुरक्षिततेस धोका येईल ह्मणून त्यांनीं पाटीलबावांस लिहून, तीं माणसें व पागा गोहदेस किल्ल्यांत राजधर यांची हवेली होती, तेथें बंदोबस्तांत ठेवविलीं. वेढा घालणाऱ्या मुसलमानांबरोबर लढून किल्ल्याचें रक्षण करण्यासाठीं पाटीलबावांनीं आपाजी खंडेराव, रामजी पाटील, देवजी गौळी, डि बॉयन, मुसा रुस्तुन, या सरदारांस पाठविलें. त्यांच्या मुसलमानाशीं नेहमीं चकमकी झडत. त्यांत उभयपक्षांचेंही नुकसान होत असे. परंतु दिवसेंदिवस मुसलमानांचा जोर वाढत चालला. त्यांशीं मोठ्या शौर्यानें लढण्याचें काम लखबादादांनीं किल्ल्यांतून अव्याहत उद्योगानें चालविलें होतें. या कामीं त्यांचें अप्रतिम शौर्य व संकटास दाद न देण्याचा विलक्षण गुण, हीं दिसून आलीं. आग्र्याच्या अजस्र किल्ल्यांतून शत्रूंवर तोफांची अखंड वृष्टि करितां येण्यासाठीं त्यांनीं तटांवर नाक्यानाक्यांनीं मोठमोठ्या बिडी तोफा ठेवून दिल्या होत्या. आणि त्यांमधून ठिकठिकाणीं लहान तोफा, जंबूरख शतरनाळा–सूत्रनाळी तोफा–जेजाला वगैरे रोंखून ठेवून, बाहेरच्या हालचालीप्रमाणें त्या डागण्याचें काम त्यांनीं झपाट्यानें चालविलें. त्यामुळें वेढ्यांतील लोक नित्यशः बरेच मरून पडत व जखमी होत. पण त्याचप्रमाणें बाहेरून शत्रूंकडील किल्ल्यांत येऊन पडणाऱ्या गोळ्यांनीं त्यांचेंही नुकसान होत असे.

इतक्यांत पाटीलबावा सैन्य घेऊन स्वतः आले. त्यांनीं हरी पर्वतावर मोर्चे लावून तेथून इस्मायल बेग यांच्या फौजेवर तोफखान्याचा मारा चालविला. दक्षिणेचे बाजूकडून रायाजी पाटील व देवजी गौळी यांचे मोरचे लागलेले असून, तेथून शत्रूंवर त्यांचा मारा सुरू होता. बाकी सरदारही शत्रूच्या हालचालीच्या धोरणानें भोंवताल्न मोरच्यांवरून तोफांचा व बंदुकांचा मारा चालवीतच होते. अशा प्रकारें उभय पक्षांकडून लढाई सुरू होती. परंतु पुढें इस्मायलानें तेथून फौजेचा तळ हालवून तिचे तीन भाग केले. पैकीं एक भाग राजघाटाच्या सुमारास, एक लाहकडीच्या सुमारास व एक दिल्ली दरवाजाकडे असे नेऊन, तेथून पलटणांकडून सपाट्यानें गोळीबार व तोफांची अखंड वृष्टि सुरू केली. त्याच्या तोफखान्यांत चाळीस तोफा अशा होत्या कीं, त्यांच्या माऱ्याखालीं शत्रूची फौज मुळींच ठरत नसे. हें पाहून पाटीलबावांनींही आपली सर्व फौज मूळ ठिकाणाहून हालवून मुसलमानांस गांठून त्यांजवर मारगिरी बरोबर लागू होईल अशा नाक्यांच्या ठिकाणीं तिच्या टोळ्या ठेविल्या. त्यांत एक बाजू रायाजी पाटील यांस सांगितली; एक बाजू मुसा लुस्तुन फिरंगी यास सांगितली; एके बाजूस आपलीं पलटणें व स्वार यांसह स्वतः पाटीलबावा उत्कृष्ट माऱ्याच्या तीन तोफा घेऊन राहिले;

आणि एके बाजूस मानसिंग, मानाजी मोरे वगैरे सरदारांना ठेवलें. आणि अशा प्रकारें शत्रूवर चोहोंकडून गोळ्यांचा एकसारखा वर्षाव चालविला. तरी मुसलमानांकडून होणाऱ्या अग्निगोलकांच्या जबरदस्त वृष्टीपुढें मराठ्यांकडील फौज घाबरून गेली ! ही निकराची लढाई एकसारखी दोन दिवस चालू होती. पुढें मुसलमान मोठा जोर करून मराठ्यांच्या मोरच्यावर चालून आले. त्या वेळीं तरवार, भाले, बंदुका यांनीं हातघाईची लढाई होऊं लागली. मुसलमानांनीं तिन्ही मोरच्यांवर अशाच प्रकारें गर्दी केली. त्या समयीं उभय दळांत तरवारींची खणाखणी चालून बरेच शूर शिपाई धारातीर्थीं पतन पावले. मराठ्यांनींही शौर्याची शिकस्त करून मुसलमानांस घेरून त्यांस राजघांटाच्या मैदानांत आणिलें. त्या दिवशीं, ह्मणजे ता० १४ सप्टेंबर सन १७८७ रोजीं शुक्रवारीं, दोन प्रहरीं मोंगलांनीं पुनः चढाई केली. त्या वेळीं उभय दळें लढत लढत सुलतानगंजांत येऊन दाखल झालीं. मुसलमानांचा जोर पाहून खुद्द पाटीलबावांनीं त्यांतील अघाडीच्या टोळीवर 'शेंपन्नास स्वारांनिशीं उडी घेतली' आणि सपाट्यासरशी 'पांचपंचवीस माणसें मारलीं.' मराठ्यांकडीलही अचल भारती गोसावी, भोजराज दत्तो, रामजी तार्पाकर, शिवाय पांचपन्नास शिपाई व घोडीं ठार व जखमी झालीं.[1] शुक्रवार व शनिवार या दोन दिवशीं या प्रकारें लढाई चालून रविवारीं (ता० १६ सप्टेंबर) पुनः मोंगल चढाई करून आले. त्या वेळीं मोंगल व मराठे यांच्या चोहोंकडे टोळ्याटोळ्यांच्या लढाया सुरू झाल्या. मुसलमानांनीं चौत्रा व सायर या ठाण्यांतील मराठ्यांच्या टोळ्यांशीं लढून त्यांचा पराभव केला, व त्या ठाण्यांत ते बंदोबस्तानें राहिले. मग तेथें पठाणांची बाकी फौजही येऊन सामील झाली. नंतर उभयपक्षांची तेथें मोठी चकमक झडून दोहोंकडील मिळून पन्नास साठ शिपाई पडले. बाहेर ही लढाई चालली असतां किल्ल्यांतही तिचा उपसर्ग होत होता. 'ते समयीं सहजांत बचाबा किल्लेंतील हा उभा होता त्यास गोळी लागून (तो) ठार जाहाला. चेनरामास धरून घेऊन गेले. हें वर्तमान पाटीलबावांस कळण्याबरोबर 'ते परभारें यमुनेच्या दरवाजानें येऊन किल्लेंत दोन प्रहरीं सामील जाहाले.' पाटीलबावांस किल्ल्यांत सुरक्षित पोहोंचवून 'देवजी गौळी, रायाजी पाटील व मुसा लुस्तुन हे ससैन्य बाहेर पडले. पुढें धारराव शिंदे लष्करसह त्यांना मिळाले.'[2]

बाहेर या लढाया सुरू होत्या, तरी मुसलमानांकडून किल्ल्यावर तोफांचा भडिमार कमी होत नव्हता. त्यामुळें वरचेवर आंतील लोक व जनावरें जखमी होत व मरत. त्याचप्रमाणें सामानाचीही अत्यंत नासधूस होत असे. ह्या सर्वांची तोड पाडून किल्ल्यांतून उलट मुसलमानांवर मारा चालविण्याचें काम लखबादादांनीं मोठ्या दक्षतेनें व हिंमतीनें चालविलें होतें. अशाखालीं कित्येक महिने गेले. ह्या प्रसंगीं किल्ल्यांत लखबादादांसारखा दृढनिश्चयाचा, टेंकीचा व अपूर्व शौर्याचा पुरुष नसता, तर त्याचें रक्षण मुळींच झालें नसतें. त्याला आंतून निरनिराळ्या कामगाऱ्यांवर जे लोक ठेविलेले होते, त्यांतून जे मरून पडत व जखमी होत त्यांऐवजीं दुसरे मनुष्य निवडून ठेवण्याचें व जखमी झालेल्यांची शुश्रूषा करविण्याचें काम अगोदर पाहावें लागे. त्याचप्रमाणें लोकांस उत्तेजन देऊन त्यांजकडून लढाईचें काम एकसारखें सुरू ठेवावें लागे. आणि सामानसुमानाचा पुरवठा संपूं लागल्यामुळें गुप्त रीतीनें व मोठ्या मुष्किलीनें त्याची जमवाजमव करावी लागे. पाटीलबावा किंवा इतर कोणी सरदार थोडे दिवस मदतीसाठीं ह्मणून आंत आले, तरी बाहेरील लढाईची व्यव-

---

१. हे जखमी झाले होते.

२. हा सर्व वृत्तांत लखबादादा लाड यांच्या घरच्या ४०८ नंबरच्या पत्रावरून लिहिला आहे.

स्था करण्यासाठीं त्यांना पुनः परत जाणें भागच पडत असे. ह्या सर्व गोष्टींचा विचार केल्यास लखबादादांची योग्यता विलक्षण होती असें दिसून येतें.

अशा रीतीनें लढायांची खडाजंगी चालली असतां, आंतील लोकांस अनंत अडचणींनीं घेरलेलें होतें. बाहेरून किल्ल्यांत व किल्ल्यांतून बाहेर पैरवी ठेवण्याचें पुढें पुढें तर फारच कठीण होत चाललें. मुसलमान लोकांस ह्या अडचणी मुळींच नव्हत्या. त्यांना लागेल त्या पुरवठ्याची तोड लावण्यास मुबलक सवड होती. किल्ल्यांतील लोक अशा संकटावस्थेंत दिवस काढीत होते, तरी त्यांनीं आंतून तोफांच्या मारगिरीचें काम अव्याहत सुरू ठेविलें होतेंच. इतक्यांत इस्मायल बेगाच्या मदतीस गुलाम कादर फौज घेऊन येतो, अशी बातमी आली. आणि मोगल, रोहिले, रजपूत राजे हे एक होऊन इंग्लिशही त्यांस मिळतात, असें वर्तमान येऊन थडकलें! शिखांनीं स्वारी करून बेदा मांडिल्याचें मागें लिहिलेंच आहे. त्याशिवाय अफगाणिस्थानचा बादशहा तिमोरशहा यानेंही याच संधीस फौज पाठवून उत्तरेकडे मोठी धामधूम चालविली होती. त्या दोघांचा चांगला बंदोबस्त करण्यासाठीं जिवबादादा हे राणेखान भाई वगैरे कांहीं सरदारांसह ससैन्य तिकडे गुंतले होते. पण त्यामुळें पाटीलबावांना मोगलांशीं टक्कर देऊन त्यांची बडी धामधूम मोडण्याचें काम कठीण झालें. त्यांस वाटलें कीं, ह्या उप्पर दिरंगाई केल्यास आग्र्याचा बळकट किल्ला हातचा जाऊन मुसलमान फार बलिष्ठ होतील, व बादशाही कारभारासही मुकावें लागून आपल्या सत्तेस व मिळविलेल्या लौकिकास मोठा छाट बसेल. ह्या प्रकारें चोहोंकडून एकदम काहूर उठतांच पाटीलबावांनीं पुढील तजविजीसाठीं मोठ्या युक्तीनें आग्र्याचा किल्ला सोडिला, आणि ते ग्वाल्हेरीस गेले. ह्या आणीबाणीचे प्रसंगीं पाटीलबावांस मोठ्या सैन्याच्या मदतीची जरूर होती. सबब त्यांनीं पूर्वींच पुण्यास नाना फडणवीस ह्यांजकडे मदतीविषयीं आग्रहाची विनंती केली होती. परंतु त्यांजकडून तसें कांहीं घडलें नाहीं. कारण "त्या वेळेस पुण्याचे दरबारांत मुख्य दिवाण नाना फडणवीस होते. त्यांचे मनांत महादजी शिंदे यांचा अधिकार मर्यादित राहावा व जेपूर वगैरे रजपूत राजांवर दाब राहणें तो महादजी शिंदे यांचे विद्यमानें न राहातां परभारें राहावा असें असून, त्याविषयीं त्यांनीं शिवाजी विठ्ठल यांस आंतून सूचनाही केली होती. त्यामुळें शिवाजी विठ्ठल हरवक्त महादजी शिंदे यांचे स्वारीशिकारींत सामील न राहातां अलग राहत असत."[१] असा आंतला प्रकार होता, ह्मणून महादजी शिंद्यांस पुण्याकडील मदत पोहोंचेना. तरी त्यांनीं नानांस पुनः आग्रहानें लिहिलें कीं, "अशा बंडाव्यानें केवळ माझें स्वतःचें विशेष नुकसान होण्याजोगें नसून सर्व मराठ्यांच्या राज्यालाच मोठा धक्का बसणार आहे. कारण इंग्रज लोक रजपूत लोकांशीं व बादशहाशीं संधान बांधणार आहेत. आणि तसें झाल्यानें इंग्रजांचा हिंदुस्थानांत अंमल व योग्यता वाढून मराठ्यांना सर्व लोक पाण्यांत पाहूं लागतील × × × आपल्या मनामध्यें जर शंका असेल, तर फितूर मोरोबाचें पारिपत्य करण्यास कोणीं सहाय्य केलें? सखाराम बापू यास तुमच्या ताब्यांत कोणीं दिला? तोतयाचें बंड कोणीं मोडलें? टोपीवाल्यांची तळेगांव मुक्कामीं कोणीं खोडकी जिरविली? त्याचप्रमाणें पुढें त्यांच्याशीं लढाई करण्यामध्यें कोणीं विशेष मदत केली? व मराठ्यांना हितकारक असा तह त्यांच्याशीं (कोणीं)

१. विंचूरकर घराण्याचा इतिहास पृ. १०५. शिवाय "नानाच्या मनांत शिंदा फार, वाढूं देऊं नये" असें होतें ग्रांट डफ लिहितात. ग्रांट डफची बखर पृ. ३२०.

करविला? या गोष्टींचा विचार करावा." "त्यास हे समयीं सर्वांहीं आपला धनी एकच आहे असें ध्यानांत आणून निर्मत्सरपणें एकचित्त होऊन आपलें राष्ट्र सांभाळावयाचा अभिमान धरिला पाहिजे." इतकें लिहिलें तरी नानांनीं शिंद्यांस— त्यांनीं आपल्या कारकीर्दींत एकदाच मागितलेली—मदत दिली नाहीं! नानांकडून मदत मिळण्याची आशा बाळगणें व्यर्थ आहे असें जाणून, महादजींनीं जिवबादादांस तिकडील कामाची आटपाआटप करून लौकर निघून येण्याविषयीं लिहिलें. इतकें होत आहे, तों गुलाम कादर फौजेसहवर्तमान इस्मायल बेगास येऊन मिळाला. अर्थात् बाहेरील भरभक्कम वेढ्याच्या मोठ्या उपद्रवामुळें किल्ल्यांतील लोकांचें दिवसेंदिवस मोठें नुकसान होऊं लागलें.

गुलाम कादराची फौज बहुतेक रोहिले जातीची असून, ती काटक होती. ही मोठी मदत मिळण्याबरोबर इस्मायलानें लढाईचें काम मोठ्या नेटानें चालविलें. त्यांच्या प्रतीकारार्थ शिंद्यांचे सरदारही आपल्याकडून लढाईची शिकस्त करीत. तरी मुसलमानांपुढें त्यांच्यानें टिकाव धरवेना. दुष्काळांत तेरावा महिना ह्मणतात त्याप्रमाणें याच वेळीं महादजींकडे जी जाटांची फौज होती, त्या फौजेपैकीं जहांगिर नामक सरदार तीन पलटणें घेऊन इस्मायल बेगास जाऊन मिळाला. त्यामुळें शिंद्यांचा जोर कमी होऊन मुसलमान बळावले.

अशा संकटप्रचुर स्थितींत जवानमर्द शूरवीर लखबादादांनीं मुसलमानांस दाद न देतां सात महिने काढिले! या समयीं खंबीर मनाच्या व प्रसंगास न डगमगणाऱ्या महादजींनीं फौजेची सिद्धता करण्याचा आपला उद्योग जारीनें चालविलाच होता. ते युद्धोपयोगी माणूस जिकडून तिकडून आणून फौजेची भरती करीतच होते. शिवाय बादशहाचे पदरीं सुमरूची बेगम ह्मणून एक पराक्रमी व फौजबंद स्त्री होती. तिलाही त्यांनीं मदतीस बोलाविलें, व तिला खर्चासाटीं पन्नास हजारांच्या हुंड्या पाठविल्या. ती चार पलटणांसहित शिंद्यांकडे येण्यास निघाली. इतक्यांत जिवबादादांनीं जगोबा बापूस फौजेसह पुढें रवाना केलें होतें, तेही येऊन पोहोंचले. तेव्हां "खुद्द शिंदेसरकार अलिजाबहाद्दर महादजी शिंद्यांची स्वारी धवलपुरास येऊन चंबळेचे किनाऱ्यावर मुकाम केला. आणि जगोबा बापूस सांगितलें कीं, तुह्मीं सडी फौज घेऊन जाऊन मदत करून किल्ल्याचा घेरा उठवावा. त्यावरून त्याच वेळीं फौज घेऊन पार उतरले. दुसरे दिवशीं जाऊन लढाई केली." "ते फौजेनें हजार दीडहज़ार रोहिले ठाणेंठाणेंत होते, ते मारून दहा तोफा आणिल्या. आणि गांव मारूं लागले. तेव्हां ठाणा बसला. ह्मणोन (गुलाम कादर) हरामखोर फौजसुद्धां पार गेला." याप्रमाणें गुलाम कादर वेढ्यांत इस्मायल बेगाहून पृथक् होता, त्याची जगोबा बापूंनीं दाणादाण उडविल्यावर तो त्वरेनें निघून जात असतां इस्मायल बेगानें त्याला गळीं पडून राहाण्याविषयीं परोपरीनें विनवून पाहिलें. परंतु तो फक्त तीन हजार रोहिले त्याच्या मदतीस ठेवून यमुनापार झाला. शिवाय त्याच्या जाण्याचें जें दुसरें कारण होतें, तें पुढें समजेल.

१. रा. रा. वि. र. नातूकृत महादजी शिंदे यांचें चरित्र पृ. २०५.

२ ग्रांट डफची ब. पृ. ३०७।३०८.

३. वि. शा. वि. पु. ११, पृ. ९१.

४. पद्दा पत्र नंबर ४१०.

इकडे ही लढाई चाललेली असतांच जिवबादादा शिखांचा बंदोबस्त करून व त्यांना गुलाम कादराच्या जाहगिरीवर स्वारी करण्याविषयीं सांगून राणाखान वगैरे सरदारांसुद्धां ते आग्रा एथें येऊन दाखल झाले. त्यांच्या सांगण्याप्रमाणें गुलाम कादराच्या जाहगिरीवर मेरटच्या सुमारास शिखांनीं दंगा मांडला. ह्मणून अर्थातच गुलाम कादरास फौज घेऊन तिकडे जाणें प्राप्त झालें. त्यामुळें त्याला विसावा खाऊन आग्र्याकडे येतां आलें नाहीं. जिवबादादा आल्यामुळें शिंद्यांची बाजू खंबीर झाली, आणि त्यांच्या अनिष्ट दिवसांचें पूर्वीचें सर्व मान बदललें. परंतु किल्ल्यांतील लोकांच्या हालांस मात्र पारावार नव्हता. वेढा आठ दहा महिने पडल्यामुळें आंतील लोकांस खाण्यास अन्न नाहीं व बाहेरून मिळण्याची आशा नाहीं, अशी स्थिति झालेली होती. अशा स्थितींत बाहेरून एकसारखा मारा होत असतां लढाई सुरू ठेवून किल्ला भांडविणाऱ्या शौर्यसागर लखबादादांची शहामत खरी! ह्या वेळीं लखबादादांकडे किल्ल्यांत मानसिंग, मानाजी मोरे, अचलभारती गोसावी, भोजराज दत्ता, रामजी तापीकर[1], नरसिंगराव देशमुख (शितोळे), गणपतराव भास्कर, गणेश विठ्ठल नाबर, सखोबादादा आरंवदेकर, लक्ष्मण रघुनाथ धोंड, भिकाजी विठ्ठल व रामराव सदाशिव, ही मंडळी मुख्य होती, व ह्यांनीं लखबादादांच्या हुकुमाप्रमाणें चांगलीं कामें बजाविलीं होतीं. हे त्यांजबरोबर पराक्रम करणें व सर्व प्रकारचा त्रास सोसणें, या कामीं त्यांचे वांटेकरी झाले होते. शेवटीं अन्नावांचून आंतील मनुष्यें मरूं लागलीं. ती आपदा तर भयंकर होती. "किल्लेंत सामान पैमाभार नव्हतें त्यामुळें किल्लें-तील लोक फारच घाबरे जाहाले होते. परंतु वडिलांनीं (लखबादादांनीं) दम धरला. नाहीं तर किल्ला न राहता! श्रीमंत महाराज (पाटीलबावा) यांनीं तीन चार पत्रें वडिलांस किल्लेंत लिहिलीं कीं तुमच्या मर्दुमीस जोडा नाहीं! आणखी दोन दिवस जसें कळेल तसें काढून राहावें[3]!" स्वामि-कार्याप्रीत्यर्थ हाल झाले तरी बेहेत्तर. परंतु त्यानें कृतज्ञतापूर्वक पाठ थोपटल्यानें जें समाधान होतें, त्याचा अनुभव लखबादादांसारख्या बहाद्दरासच विचारला पाहिजे! असो. अशा प्रकारें दोन दिवस दम धरिला पाहिजे होता खरा. परंतु अन्नावांचून कामें उठावीं कशीं? पण त्या बहाद्दरानें त्यालाही युक्ति कशी लढविली पहा! "गुलाम कादर याजकडील मणियारसिंग याचे बहादरीनें (लखबादादांनीं सर्व लोकांसहवर्तमान) निघावें असें (त्यांशीं पूर्वी स्नेहाचें बोलणें चालविल्यावरून) ठरलें होतें. ज्येष्ठ शु॰ १३[4] जे दिवशीं किल्लेंतून बहाद्दरीनें निघणार होते. मोर्चेची जकडबंदी केली होती. ती कोठवर लिहावी! दर माणसास पंचवीस रुपयेप्रमाणें कबूल करून वीस माणसें किल्लेंत पत्रें देऊन पाठविलीं होतीं. परंतु ते आंत पोंचत नाहीं (से) झाले. त्यांपैकीं एक माणूस मात्र आंत गेलें. पत्रांत लिहिलें होतें कीं आह्मी पूर्णिमेचे[5] दिवशीं लढाई खामीखाँ[6] घेतों. तुह्मीं पौर्णिमापावेतों हरत-ऱ्हेनें दम धरावा. आमची फत्ते जाहली तर उत्तम. नाहीं तर तुह्मीं बहाद्दरीनें निघावें. तेव्हां (लखबा) दादांनीं मणियारसिंग याशीं सांगितलें, आह्मी त्रयोदशीस निघूं ह्मणत होतों; परंतु मुहूर्त

१. पहा पत्र नंबर ४१०.
२. ही मंडळी जखमी झालेली उपचारांनीं पुन: बरी होत आली होती.
३. पत्र नंबर ४१२.
४. ता. १६ जून स. १७८८.
५. ता. १८ जून.
६. नि:संशय.

नाहीं. प्रतिपदा तृतीयापर्यंत मुहूर्त पाहून निघतों. ह्मणोन सबब त्यास सांगून सचोटी राखिली." याप्रमाणें निघून जाण्याचा घाट घालून पुष्कळ महिनेपर्यंत लढाईनें थकलेल्या खानसाहेबांस अनायासें किल्ला हातीं देण्याचें आमिष दाखवून लखबादादांनीं तेवढी वेळ मारून नेली! नाहीं तर मरणावांचून दुसरा इलाजच नव्हता! ही सर्व स्थिति जाणत असतांही दोन दिवस वेळ काढण्याचें कारण असें होतें कीं, अविंधांबरोबर रेंगाळत युद्ध केल्यास आंतील लोक हातीं लागत नाहींत! तेव्हां सर्व प्रकारची अशी सिद्धता करावयाची कीं, शत्रूची दाणादाण करून एकदम वेढा उठवून लावावा! पुनः त्यासंबंधीं लढाईचें कारण उरूं नये.

मग ह्याप्रमाणें तयारी होतांच जिवबादादांनीं सर्व फौज सज्ज करून एकदम लढाईस सुरुवात केली (ता० जून स० १७८८). त्याबरोबर इस्मायल बेगानें आपल्या व गुलामानें मदतीस ठेविलेल्या लोकांसहवर्तमान मराठ्यांवर मोठ्या आवेशानें चाल केली. तेव्हां उभय दळांतून तोफा व बंदुका यांचा भयंकर धडाका सुरू झाला. मुसलमानांस हताश झाल्यामुळें आणि मराठ्यांस मागील श्रमांच्या आठवणीनें अतिशय चेव आला होता. त्यामुळें पहिल्यानें सुरू झालेली ही गोळागोळी मागें पडून दोन्हीं सैन्यें अगदीं जवळ येऊन तरवारींनीं लढूं लागलीं. हिंदु मुसलमान एकमेकांत मिसळून भयंकर काटाकाट चालली. परंतु जिवबादादांसारख्या युद्धकलानिष्णात व अत्यंत पराक्रमी सेनापतीच्या हाताखालील तरवारबहाद्दर सैन्यसमूहापुढें मुसलमानांस कांहीं वेळानें मुळींच दम पुरेनासा होऊन त्यांच्यांत पळापळ सुरू झाली. त्या भयंकर माऱ्यापुढें मुसलमान अगदीं नामोहोरम होऊन गेले! मराठ्यांनीं हजारोंहजार शत्रूंस ठार व जखमी करून त्यांचा पूर्ण पराभव केला. त्या संबंधाची हकीकत पत्रावरूनच देतों:—"अविंधाचें माणूस पांच हजारपर्यंत ठार जाहालें व जखमी शिवाय! व कित्येक यमुनेंत बुडोन मेले. इस्माल बेग याचें लष्कर झाडून लुटून घेतलें! घोडीं व उंटें वगैरे चीजबस्त व हत्ती ८ व तोफा ६० होत्या त्या ऐसा सर्व सरंजाम लुटला. पांच स्वारानशीं इस्माल बेग पळाला. एक तट्टू देखील त्याचा जाऊं दिला नाहीं! तेव्हां किल्लेचे मोरचे पळून गेले. किल्ला मोकळा जाहाला. मुलकांत त्यांजकडील ठाणीं होतीं तीं पळालीं. आपलेकडील प्रागणेंत ठाणीं बसलीं. ईश्वरें श्रीमंतांस मोठें यश दिलें. आगरेच्या शहराचा पैले (पहिले) प्रमाणें वडिलीं (लखबादादांनीं) बंदोबस्त केला. किल्ला वडिलीं लढविला. त्याची तारीफ कोठवर लिहावी! त्यामुळें श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांची कृपा वडिलांवर फार जाहाली आहे. वडिलीं किल्ला लढविला ह्मणोन हिंदुस्थान श्रीमंतांचे पदरीं राहिलें. नाहीं तर उज्जनीस यावें लागतें. आतां श्रीमंतांचा पराक्रम मुलकांत जाहाला. +++ लढाईत ईश्वरानें सर्वांस रक्षिलें. श्रीमंतांची कृपा (जिवबा) दादांवर फार आहे. लढाई (जिवबा) दादांनीं मारली व आग्रें वडिलानीं (लखबादादांनीं) राखिलें. आतां दिवाणगिरी (बाळोबा) तात्या करितात. आपल्या लोकांवर श्रीमंतांची पूर्ण कृपा जाहाली आहे. ती कोठवर लिहावी!"

याप्रमाणें आग्र्याच्या किल्ल्याच्या संरक्षणाचें अत्यंत बिकट झालेलें काम लखबादादांनीं 'मोठ्या

१. पहा पत्र नंबर ४१२.

२. या वेळीं महंमद बेग हमदानीचा मुलगा ठार झाला, असें एका पत्रांत आहे.

३. दुसऱ्या एका पत्रांत८हत्ती जास्त मिळाल्याचा मजकूर आहे.

४. पहा पत्र नंबर ४११.

जूर्यतीनें' किल्ला लढवून पार पाडिलें. आणि त्या अत्यंत संकटाच्या प्रसंगीं जिवबादादांनीं येऊन मोठ्या बहादुरीनें शत्रूचा पूर्ण पराजय केला. ह्या एका गोष्टीनें केवढीं महत्त्वाचीं कामें उलगडलीं ? ह्या जयानें पाटीलबावांचा सर्वत्र मोठा दरारा बसला, व त्यामुळेंच पहिल्याप्रमाणें दिल्लीपतीची वजीरी महादजींकडे कायम राहिली. ह्या लढाईच्या परिणामावरच पाटीलबावांच्या उत्तरेकडील सत्तेचें चिरस्थायित्व अवलंबून होतें ह्मटल्यास चालेल. मग अर्थात् ही लढाई फत्ते होतांच शत्रूंनीं तिकडे ठिकठिकाणीं बसविलेल्या ठाण्यांपैकीं कांहीं आपोआप उठून गेलीं. आणि बाकी मुलखांत फौजा पाठवून शत्रूच्या लोकांस हाकून दिलें, आणि तेथें शिंद्यांचा अंमल बसविला. महादजींवर हा जो आणीबाणीचा प्रसंग गुदरला होता, त्यापासून मुसलमान व रजपूत यांस आनंद होणें साहजिक होतें. परंतु पुण्यास नाना फडणवीस यांना त्यांनीं इतके आर्जवानें लिहिलें असतांही एवढ्या थोरल्या अवकाशांत त्यांना मदत पाठवितां आली नाहीं हें आश्चर्य नव्हे काय ? जे शिंदे पेशव्यांच्या हरएक जडजोखमाच्या कामगारीस हवे होते, त्यांजवरील महत्संकटाच्या प्रसंगाकडे कानाडोळा करणें गैर होतें. असो. नानांनीं अलीबहाद्दर व होळकर यांस महादजींच्या मदतीस पाठविलें होतें. पण 'वरातीमागून घोडें' या ह्मणीप्रमाणें ते सर्व कार्यभाग उरकल्यावर आले ! त्यांच्या येण्याचा मुख्य उद्देश महादजींस लाभ झाल्यास त्यांत आपला हिस्सा असावा हा होता. अर्थात् कामगारीसारखें बक्षीस पाटीलबावा देण्यास कोणत्याही प्रकारें कमी नव्हते.

खरोखर पाहिलें असतां पाटीलबावांना सन १७८५ पासून सन १७८७ पर्यंत तीन वर्षें जो अनिष्ट दिवसांचा अनुभव घ्यावा लागला, त्याचें कारण मुख्यत्वें जिवबादादांवरील त्यांची इतराजी हें होय. सदर्हू तीन वर्षांत त्यांना अनंत अडचणींनीं घेरलें व त्यापासून पुष्कळ नुकसान होऊन अपमानही सोसावा लागला. ती इतराजी निष्कारण होती व पुढें पूर्ववत् कृपा होतांच सर्व बाबतींची जिकडील तिकडे घडी बसली. हें सर्व मागें आलेंच आहे. सदरील मुदतींत झालेल्या नुकसानाचा गोषवारा असा आहे.

१ राज्यांतील व्यवस्थेची घडी बिघडली.
२ बंडें उद्भवलीं, व त्यांस प्रतीकार करणें जड जाऊं लागलें.
३ लढायांत अपेश आलें (लालसोट आग्रा एथील प्रसंग).
४ राज्य संपुष्टांत आलें (गेलेले अंमल जिवबादादांनीं नंतर बसविले).
५ रजपूत व मुसलमान शत्रु झाले व इंग्रज, शीख, अफगाण व नाना फडणवीस यांपासून पहिल्या दोघांस एक प्रकारें बळकटी आली.
६ लष्करची तरतरी जिवबादादांच्या आधिपत्याच्या वेळची राहिली नाहीं.
७ पाटीलबावांस लढाई सोडून कुशलगडाकडे पळून जावें लागलें.
८ वर लिहिलेल्या अडचणी उत्पन्न झाल्या व स्वतःचे मदतीस आलेलें सैन्यही बिघडून उलटून पडलें.
९ आग्र्याचा वेढा उठविण्यास फारच जड झालें. लखबादादांनीं मात्र दहा महिने किल्ला राखिला होता. ह्या प्रसंगीं हिंदुस्थानचें (उत्तरेकडील) सर्व राज्य सोडून मूळ राणोजीची जाहगीर राखण्यास उज्जनीस येण्याचीं चिन्हें दिसत होतीं.

इतकें झालें तरी जिवबादादा आपल्यावर संपविलेली कामगारी पूर्ववत् शौर्यानें बजावून ठिकठि-

कार्णी जय मिळवीत होतेच. शेवटीं जिवबादादांस बोलावून त्यांजवर सर्व भार टाकतांच जो आग्र्याचा वेढा उठत नव्हता, तो त्यांनीं लष्करची सुधारणा करितांच मोठ्या पराक्रमानें उठवून पाटीलबावांवरील सर्व प्रसंग दूर केले. यावरून जिवबादादांची वास्तविक योग्यता वाचकांस कळून येईल, व पाटीलबावांचें सर्व हिंदुस्थानांत गाजणारें सामर्थ्य व त्यांचा उत्कर्ष हीं मुख्यत्वें जिवबादादांवर कशीं अवलंबून होतीं हेंही समजेल.

महादजींच्या पडत्या काळांत जे त्यांचे शत्रु बनले किंवा ज्यांनीं प्रत्यक्ष किंवा पर्यायानें त्यांच्या शत्रूंस मदत दिली असे जे गुलाम कादर, रजपूत राजे, इस्मायल बेग, होळकर व नाना फडणवीस, त्या सर्वांचीं त्यांनीं कसकशीं पारिपत्यें केलीं, हें पुढील इतिहासावरून समजून येईल. पहिल्यानें त्यांनीं गुलाम कादराचें पारिपत्य केल्याची हकीकत पुढील भागीं देऊन त्याच्या संबंधापासून मोकळे होऊं.

भाग १० वा.

गुलाम कादराचीं अघोर कृत्यें व त्याचा नाश.

इ० सन १७८८।८९ तील.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें इस्मायल बेगाचा आग्रा एथें पूर्ण पराभव झाला. त्याला स्वतःला तरवारीचे वार लागले. त्याचे लोक त्याला सोडून पळाले. मग त्या निदानप्रसंगीं तो यमुनेंत घोडा घालून पार झाला. आणि मराठ्यांनीं पाठलाग सोडतांच त्यानें कांहीं दिवस विश्रांति घेऊन फिरून आपल्या लोकांची जमाजम करून तो फिरोझाबाद एथें गुलाम कादराच्या लष्करांत जाऊन सामील झाला. ह्यापूर्वींच गुलाम कादरानें आपल्या प्रांतावर आलेल्या शिखांचा बंदोबस्त करून व मराठ्यांविरुद्ध त्यांचे कान भरून त्यांना मार्गस्थ केलें होतें. मराठे आपल्या मागें नाहींत असें पाहून त्या दोघांनीं दिल्लीस जाण्याचा बेत केला. त्यांत त्यांचा उद्देश हाच होता कीं, मराठ्यांचें तेथें वर्चस्व स्थापन होईपर्यंत अनेक कावे लढवून आपल्यास मिळवितां येईल तेवढी लूट पदरांत पाडून घ्यावी. मग हाच विचार कायम करून ते दिल्लीस जाण्यास निघाले.

इकडे इस्मायल बेगाचा पराभव करून त्यास हांकून लाविल्यावर जिवबादादा आग्र्याच्या बंदोबस्तासाठीं माघारे वळले. तों हें जयाचें आनंदकारक वर्तमान समजून पाटीलबावाही तेथें येऊन पोहोंचले होते. मग पाटीलबावा व जिवबादादा इतर सरदार मंडळीसह आग्र्याच्या किल्ल्यांत गेले, आणि त्यांनीं मोठ्या सन्मानानें लखबादादांची भेट घेतली. लखबादादांनीं व किल्ल्यांतील लोकांनीं जीं अमर्याद दुःखें भोगिलीं, तीं ऐकून पाटीलबावांसुद्धां सर्वांच्या डोळ्यांतून खळकन् पाणी निघालें. मग पाटीलबावांनीं लखबादादांचा फार गौरव करून, 'तुह्मीं सरकारची फार मोठी कामगारी बजाविली, तुमच्या बहादुरीनेंच किल्ल्याचें रक्षण झालें, आणि जिवबादादांच्या अलोट पराक्रमामुळें आह्मी या बिकट प्रसंगांतून पार पडलों,' असें त्यांना बोलून दाखविलें. मग त्या सर्व लोकांचा ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें देणग्या देऊन सत्कार[1] केला आणि पाटीलबावांसह सर्व मंडळी

---

१. ह्या सत्काराबद्दल पत्रांत पुढील मजकूर आहे. "श्रीमंतांनीं वडिलांस (लखबादादांस) हत्ती दिला व शिरपेंच व मोत्यांची माळ व वस्त्रें शेलापागोटें व शालजोडी व किनखाप व ह्यामोदी येणेंप्रमाणें वस्त्रें दिलीं." पत्र नं. ४१४.

खालीं उतरून गोटांत मुक्कामास गेली. नंतर लखबादादांस आग्र्याचा सुभा कायम केला व किल्ल्यावर नवीन लोकांचा व सामानसुमानाचा मुबलक पुरवठा केला. आणि किल्ल्याच्या मोडतोडीच्या दुरुस्तीचें आणि शहरासाठीं ज्या विशेष सोई पाहिजे होत्या, त्या संबंधाचें काम लागेल तो पैसा पुरवून लखबादादांवर संपविलें. इतकें झाल्यावर पाटीलबावांनीं मथुरेस जाऊन छावणी दिली.

लालसोटची लढाई होऊन त्यांत शिंद्यांचा मोड झाल्यावर आणि त्यानंतर आग्र्यास वेढा पडून तो शिंद्यांकडून उठत नाहीं असें पाहिल्यावर शहाआलम बादशहाचा कल शिंद्यांविरुद्ध झाला. वस्तुतः शहाआलम स्वतः नेभळा असल्यामुळें ज्याची चलती होईल, त्याच्या धोरणानें वागणें त्याला भाग पडे. शिवाय दिल्लीच्या गादीचें पूर्व वैभव स्मरून त्याला मराठ्यांच्या तंत्रानें वागणें हें केवळ अपमानास्पद वाटत असे! परंतु आपल्या उमरावांत खरा दम किंवा गादीचें कल्याण करण्याची इच्छा नाहीं, हेंही तो जाणून होता. ह्मणून शिंद्यांस उघड दुखवावयाचें तर नाहीं, तरी केवळ त्याच्याच गळां पडून त्याच्याच ओंजळीनें पाणी प्यावयाचें नाहीं, अशा तऱ्हेनें त्यानें दुटप्पी वर्तन ठेविलेलें होतें. त्यानें आंतून रजपुतांशीं सख्य ठेविलें होतें. आणि इस्मायल बेग व गुलाम कादर या पुढें सरलेल्या उमरावांची शिंद्यांवर चढी होते कीं शिंद्यांची त्यांच्यावर होते, हें तो दम धरून पाहत होता. ह्या सर्व हकीकती पाटीलबावांस समजत असत. पाटीलबावा व त्यांचे सल्लागार हे बादशहाच्या ह्या दुटप्पी वर्तनानें मुळींच फसण्यासारखे नव्हते. महादजींचा आग्र्यास जय झाल्यानंतर बादशहानें त्यांशीं लाडीगोडीचें बोलणें लाविलें, आणि तुमच्या जयानें मी आनंदित झालों व माझें सर्व लक्ष तुह्मांवरच आहे, असें त्यांस कळविलें. महादजींनींही तसाच उलट निरोप पाठवून बादशहांचीच ही सर्व कृपा आहे, असें त्यास समजाविलें! बादशहास त्याच्या ह्या उमरावांकडून चांगली ठोकर लागणार, हें त्यांना चांगलें माहीत होतें.

बादशहा महादजींशीं विशेष स्नेह ठेवूं लागल्याचें पाहून गुलाम कादरास फार संताप उत्पन्न झाला. दिल्लींत अहमदशहा बादशहाची बेगम मलका झमानी ह्मणून एक महत्त्वाकांक्षी, कारस्थानी व मराठ्यांस पाण्यांत पाहणारी स्त्री होती. त्यानें तिच्याशीं संधान बांधून असें ठरविलें कीं, या नामर्द शहाआलमास पदच्युत करून तिचा मुलगा बेदरबख्त यास तक्ताधिपति करावें आणि हें काम झाल्यावर तिनें गुलामास दहा लाख रुपये द्यावे. मग इस्मालय बेग आपली फौज घेऊन पुढें दिल्लीस गेला. त्यांचा मतलब केवळ लुटीपुरताच होता. परंतु गुलामाचा कावा वेगळाच होता. शहाआलमास स्थानभ्रष्ट करून आपले तर्फें तक्तावर कोणतें तरी एक बाहुलें बसवावें आणि सर्व बादशाही सत्ता आपल्या हातीं घेऊन साधल्यास मराठ्यांस चांगला हात दाखवावा, असे तो मनांत मांडे खात होता. नंतर लौकरच गुलाम कादर दिल्लींत गेला. हे दोघे आपल्या फौजांनिशीं दिल्लीच्या राजवाड्यासमोर उतरल्यावर शिंद्यांकडून कांहीं फौज आली. त्या लोकांनींही राजवाड्यांत तळ दिला. तेव्हां गुलाम व इस्मायल हे आपली फौज घेऊन नदीपलीकडे शहादरा एथें गेले. परंतु तेथें अन्नाची टंचाई पडल्यामुळें त्या फौजेपैकीं बरेच लोक निघून गेले. पुढें गुलाम कादरानें तर आपलें सर्व जड सामान घोसगडास पाठवून दिलें. आणि कांहीं निवडक दांडग्या लोकांसह आपण सडा होऊन राहिला.

शिंद्यांचे लोक येण्यापूर्वीं त्या दोघांनीं बादशहाची भेट घेऊन त्याला सांगितलें कीं, आपला उद्देश मराठ्यांचा नाश करून बादशाहीचें वैभव वाढवावें असा आहे, आणि त्यासाठीं आपण खटपट

करणार आहों. परंतु बादशहास त्यांत कांहीं अर्थ आहे असें वाटलें नाहीं; तरी त्यानें बाह्यात्कारीं त्यांचा सत्कार करून त्यांचें मन खूष ठेविलें होतें. परंतु जेव्हां त्याला त्यांनीं शिंद्यांविरुद्ध खटपट करण्याचा निरोप पाठविला, तेव्हां त्यानें ती गोष्ट साफ नाकारली.

मग इस्मायल व गुलाम यांनीं राजवाड्यावर तोफा सुरू केल्या. हें पाहून बादशहानें भयभीत होऊन महादजींकडे त्वरित मदत पाठविण्याविषयीं आग्रहाचा निरोप पाठविला. तेव्हां त्यांनीं ताबड-तोब रायाजी पाटील व बेगम सुमरू यांजबरोबर फौज देऊन, त्यांची दिल्लीस रवानगी केली. इतक्या अवधींत त्या दोघांनीं राजवाड्यांतील व बादशाही तैनातींतील सर्व मुसलमान सरदारांस आपण केवळ बादशाहीच्या व मुसलमानी धर्माच्या संरक्षणाकरितां लढत आहोंत असा समज देऊन आपल्या पक्षाकडे वळवून घेतलें. अर्थात् हे सर्व मुसलमान एक होण्याबरोबर त्यांचा जोर फार वाढला. त्यांनीं नदीपलीकडील आपली छावणी उठवून शहरांत तळ दिला. तेव्हां बादशहाच्या संरक्षणार्थ महादजींनीं जी फौज पाठविली होती, ती आपला त्यांच्यापुढें इलाज चालत नाहीं असें पाहून निघून गेली. अर्थातच सर्व दिल्ली त्यांच्या हस्तगत झाली! फक्त राजवाड्यांत मात्र त्यांचा प्रवेश व्हावयाचा होता. परंतु बादशहाकडे मनसुरअली हा वाड्यांत मुख्य होता, त्याच्या मार्फत संधान बांधून त्यांनीं बादश-हाची भेट घेतली. आणि त्यास नम्रता दाखवून आपण गादीचें खरोखर कल्याण करूं, अशी त्यांनीं त्याजपुढें शपथ वाहिली! मग बादशहानें दरबार भरवून त्यांचा सत्कार करून गुलामाकडे वजीरीचें पद कायम केलें. आणि इस्मायलास फौजेचा अधिकार दिला! झालें. ह्या परावलंबी बादशहास जबरदस्त होईल त्यानें वळवावें असाच न्याय झाला! पण ह्या दुष्टांनीं त्याला कुराणावर शपथ देऊन पुढें किती दुःखांत लोटलें तें पहा.

ज्या महादजीनें बादशाही कारभार हवा तसा हांकून एथें केवळ मराठ्यांचें वैभव वाढविलें आणि सर्व मुसलमानांचा अपमान केला, त्याजवर स्वारी करून त्याची खोड मोडण्यासाठीं आणि आज दोन वर्षेंपर्यंत आपण बादशहाचे हिताकरितांच लढत आहों असें सांगून, ह्या लढायांत आलेल्या खर्चासाठीं ह्मणून त्यांनीं बादशहाकडे पुष्कळ पैशाची मागणी केली! तेव्हां बादशहानें सांगितलें कीं, 'मजपाशीं पैसा नाहीं. बाहेरून खंडण्यांचा वगैरे पैसा मिळवून आणावा आणि हा एकंदर खर्च चालवावा, हें तुमचें काम आहे. बाहेरील पैसा आल्याशिवाय मजजवळ पैसा यावा कसा?' हें ऐकतांच त्यांना राग आला. तरी इस्मायल बेगानें पुढें बादशहास पैशासाठीं भेट न ला-वितां तो आपल्या छावणींत गेला. पण त्या दुष्ट व निमकहराम गुलाम कादराचें अशानें समाधान कसचें होतें? तो इस्मायल बेगास न कळवतां आपल्या तालमींतले दांडगे व दुष्ट पठाण बरोबर घेऊन राजवाड्यांत तारीख २९ जुलै १७८८ रोजीं गेला. आणि त्याच्या नीच अंतःकरणांत जे अनेक भयंकर विचार खितपत पडले होते, तदनुरूप कृति करण्यास त्यानें प्रारंभ केला!

राजवाड्यांत गेल्यावर तो बादशहापुढें अमर्यादेनें उभा राहून ह्मणाला कीं, लढाईच्या खर्चासाठीं मला पैसा आतांच्या आतां मिळाला पाहिजे. तें ऐकतांच बादशहानें त्याला पूर्वीप्रमाणेंच पैसा मिळ-ण्यासारखा नाहीं ह्मणून समजावून सांगितलें. आणि तो ह्मणाला, 'शिंदा आमच्याविरुद्ध वागत नाहीं, तेव्हां त्याजबरोबर लढाई करण्याचें प्रयोजन नाहीं. त्याच्या मदतीची आह्मांस जरूर नाहीं असें तुझें ह्मणणें असेल, तर त्याला तसें सांगतां येईल. परंतु आज त्याजबरोबर लढाई करण्यास काय कारण आहे?' हें ऐकतांच तो गुलाम कादर चवताळलेल्या वाघाप्रमाणें संतापून ओरडून ह्मणाला, 'काफर मराठ्यांनीं

गादीवर बसविलेला, त्यांचा अभिमान बाळगणारा व त्यांचेंच कल्याण इच्छिणारा, अप्रयोजक व नामर्द बाहशहा या तक्तास मुळींच शोभत नाहीं.' असें ह्मणून त्याच्या आंगावर धावत जाऊन त्याला त्या सर्वमान्य तक्तावरून ओढून खालीं पाडिलें, आणि त्यावर जोरानें लत्ताप्रहार केला! त्या समयीं तेथें एकच गहजब उडाला. बादशहाचे इमानी नोकर समशेरी घेऊन त्याच्या आंगावर धावले. परंतु गुलामाचे काळस्वरूपी पठाण आंत घुसण्याबरोबर या गर्दींत बादशहाच्या जीवास धक्का बसेल ह्मणून ते मागें सरले. मग गुलामानें झनान्यांतून बेदरबख्तास आणून गादीवर बसविलें. पुढें त्या वृद्ध शहाआलमास त्याच्या मुलांसुद्धां फरफरां ओढून व त्याजकडील शस्त्रें आणि मोलवान् चिजा हिसकावून घेऊन मोतीमहालांतील एका मजबूद जागेंत कोंडून ठेविलें. त्यांना तेथें अन्नपाणीही मिळूं नये अशी सक्त ताकीद दिली! पुढें शहाआलमादेखत त्याचे मुलगे अकबर व शेखो, यांस प्रखर उन्हांत उभे करून यथास्थित झोडपलें. तसेंच, राजवाड्यांतील दासी आणून आपल्या लोकांकडून त्यांची अत्यंत अमर्यादा करवून त्यांसही पुष्कळ मार दिला. हा एवढा अनर्थ केवळ पैशासाठीं चालला होता! पण पैसा मिळणार कुठून? द्रव्य मिळत नाहींसें पाहून त्यानें झनानखाना व राजपुत्रांचे सर्व महाल लुटून त्यांतील सर्व चीजवस्त नेली. सर्व महाल शोधिले असतांही मुबलक द्रव्य सांपडेना; तेव्हां त्यास वाटलें कीं, आमच्या भीतीनें तें पूर्वींच पुरून टाकिलेलें असावें, व तें खुद्द बादशहाशिवाय दुसऱ्या कोणास माहीत असणार नाहीं. ह्मणून शहाआलमास दिवान–इ–खास महालांत ओढून आणून चाबकानें फोडलें!! तेव्हां त्या दीन वृद्ध बादशहानें काकुळतीस येऊन सांगितलें:—"बाबारे, मजपाशीं द्रव्य मुळींच नाहीं, व कोठें पुरलेलेंही नाहीं. आतां मला छळूं नको. एकदा माझीं आंतडीं तरी फाडून घे. पण या यातनेंतून सोडीव!" त्यानें एवढी गुलामाची विनवणी केली, तरी त्या पाषाणहृदय नराधमास द्रव ह्मणून आला नाहीं! त्या मारानें तो वृद्ध बादशहा केवळ बेहोष होऊन पडला. पुढें मार सोसण्यास त्याच्या शरीरांत त्राणच उरलें नाहीं. तेव्हां गुलामानें झनान्यांतल्या खाशा स्त्रियांस आणून त्यांचाही नानाप्रकारें छळ केला. सर्वांस अन्नपाण्यावांचून कोंडून ठेवलेलेंच होतें. तेव्हां त्यांपैकीं लहान लहान कोमल मुलें खाण्यास कांहीं न मिळाल्यामुळें व्याकुळ होऊन मरण पावलीं. तरीही त्या दुष्टास दयेचा पाझर फुटेना! तीं मुलें जेथें मेलीं, तेथेंच तीं गाडून टाकविलीं! शिव, शिव! कोण हें दुष्टत्व! केवढा निष्ठुरपणा! आणि काय हें मनाचें नीचत्व! या अघोरकर्म्याशीं साम्य पावणारा अधम जगांत विरळाच असेल!

अशा हालांत बादशहासुद्धां सर्व मनुष्यें केव्हांच मरावयाचीं. परंतु बेदरबख्तानें मनुष्यपणास कांहींसें स्मरून त्यांस थोडें अन्नपाणी पोहोंचविलें; ह्मणून त्यांचे प्राण कसेबसे वांचले. बेदरबख्त व त्याची आई मलका झमानी यांस आतां राज्य आपलें झालें, असें खात्रीलायक वाटत होतें. परंतु त्यांचा तो निवळ भ्रम होता! ह्या नीचानें त्या वृद्ध बाईस ओढून आणून तिचाही अपमान केला. द्रव्यासाठीं तिचा सर्व महाल खणून पाहविला. आणि बेदरबख्ताचाही तसाच अपमान करून सर्व राजवाडा द्रव्यासाठीं पोखरून पार केला! या एवढ्या धांदलींत त्यास सुमारें पांच लाख रुपये मिळाले. ते त्यानें इस्मायल बेगाकडे पाठवून त्यास जास्त द्रव्य मिळण्यासाठीं शहर लुटावें असें सांगून पाठविलें. परंतु त्याला आपण इकडे कोणते अनर्थ केले त्याचा मात्र सुगावा लागूं दिला नाहीं!

गुलामाच्या दुष्ट कृत्यांची परिसमाप्ति एथेंच झाली नाहीं. त्यानें सर्व राजपुत्रांस आणून आपल्यापुढें गाण्यास व नाचण्यास लाविलें. शेवटीं थकल्याचें मिष करून शहाजादा अकबर याचे मांडीवर

डोकें ठेवून व जवळच तरवार व सुरा ठेवून तो निजला. कारण जगांतील क्रूरपणाचा मक्ता त्यानेंच घेतल्यामुळें त्यास तेथील कोमळ हृदयाच्या दुर्बल व पीडित जनांकडून अपाय होण्याची भीतीच नव्हती !! नंतर कांहीं वेळानें जागा होऊन त्यानें त्या राजपुत्रांची खूब निर्भर्त्सना केली. तो ह्मणाला कीं, जवळ शस्त्रें ठेवून एथें मी तुमच्या स्वाधीन होऊन बेसावधपणें निजलों असतांही ज्याअर्थी तुह्मीं मला ठार केलें नाहीं, त्याअर्थी तुह्मी राज्य करण्यास सर्वथैव अपात्र आहां ! खरेंच आहे. बलवान् ठरवील तो न्याय आणि मानील तो अन्याय. तेथें शहाणपणाचें काय चालणार आहे !!

गुलामाचा हा जुलूम बरेच दिवस चालू होता. एक दिवस तो खुद्द बादशहाच्या तक्तावर हुक्का ओढीत बसला. आणि त्यानें शहाआलमास आपल्यापुढें उभा करून ह्मटलें, ठेवा कोठें आहे तो अगोदर दाखीव. त्या बिचाऱ्यानें मला माहीत नाहीं, असें उत्तर करितांच गुलामानें तक्ताखालीं उडी टाकून बादशहास खालीं पाडिलें आणि त्याच्या उरावर बसून ह्मटलें, ठेवा कोठें आहे तो दाखवितोस कीं डोळे काढूं ? त्या वेळीं बादशहानें डोळ्यांत पाणी आणून मोठ्या काकुळतीनें त्यास विनविलें कीं, " माझ्या डोळ्यांनीं आतां थोडेंच सुख पाहावयाचें आहे. परंतु मला कुराण वाचण्यास त्यांचा उपयोग होतो एवढ्याकरितां तरी ते कायम ठेव !!" परंतु अति दुष्टत्व, निस्सीम निर्दयत्व आणि गर्हणीय अमानुषपणा ह्यांचा कळस दाखविण्याकरितांच ज्या पापात्म्याचा अवतार, त्याच्या हृदयास ढिंम बसते आहे कशाला ? त्या दीन गोगलगाय झालेल्या बादशहानें ओरडून आकांत मांडिला असतांही त्या कसाबानें पेषकबजाच्या अणीनें त्याचे दोन्ही डोळे फोडून टाकिले !!! त्या दुःखांत बादशहा विव्हळत पडला असतांनाच त्या अघोरकर्म्यानें त्याला तेथून फरफटत ओढून कारागृहांत नेऊन टाकिलें ! त्या वेळीं बादशहाच्या बायकामुलांनीं जो हाहाकार केला, तेणेंकरून सगळा राजवाडा दणाणून गेला. परंतु त्या दुष्टाचें अंतःकरण एवढ्यानेंही निवालें नाहीं. आंगांत खून चढल्याप्रमाणें होऊन, तो आणखी सर्व शहाजाद्यांचे डोळे फोडण्यास सिद्ध झाला. परंतु लाला सीतलदास नामक एका हिंदु खजानविसाच्या मध्यस्थीनें तो अनर्थ टळला. इतकें केलें तरी त्या गुलाम कादरास हे झालेले अनर्थ जसे काय पुरेसेच वाटले नाहींत ! ह्मणून त्यानें एक दिवस जनानखान्यांतील सुंदर व तरुण स्त्रियांस पुनः आणून बेदम मारिलें. आणि ज्यांचें नखही परपुरुषांचे दृष्टीस पडलें नव्हतें, त्यांस विवस्त्र करून आपल्या लोकांकडून त्यांची अमर्याद विटंबना करविली !!!

हा अनर्थ इस्मायलास माहीत नव्हता. त्यानें गुलामाकडून द्रव्य येत गेलें तसतशी आपली फौज मात्र वाढविली; आणि लढाऊ सामानाची वगैरे भरपूर तयारी करून ठेविली. पुढें राजवाड्यांतील हें सर्व वर्तमान शहरवासी लोकांस समजल्यावर त्यांस दुःख व संताप उत्पन्न होऊन नादीरशहा व तैमूरलंग ह्यांच्या दुष्ट कृतींची आठवण झाली. हें सर्व वर्तमान मथुरेस महादजींस समजतांच त्यांस फार वाईट वाटलें. गुलाम कादर मनुष्यपणा विसरून अशीं भयंकर कृत्यें करील अशी त्यांची कल्पनाही नव्हती. ह्मणून एकदम मोठी फौज त्यांनीं पाठविली नव्हती. मागें रायाजी पाटील व बेगम सुमरू ह्यांस दिल्लीस पाठविल्यावर आणखी हिंमतबहादराचीही त्यांनीं मुसलमानांवर रवानगी केली होती. परंतु ह्या सर्वांकडून इस्मायल बेग व गुलाम कादर ह्यांचा कांहींच बंदोबस्त

१. हें गुलाम कादराच्या या अघोर कर्मांचें वर्णन रा. रा. वि. र. नातूकृत महादजी शिंद्यांचें चरित्र भाग ९ यांतल्या व रा. सा. गो. स. सरदेसाई यांच्या मुसलमानी रयासत या ग्रंथांतील शहाआलमाचे कारकीर्दींतल्या वर्णनाचे आधारें लिहिलें आहे.

झाला नाहीं. गुलाम कादरास सावकाशपणें एवढीं हीं अनर्थाचीं कृत्यें करितां आल्यामुळें त्यानें शेफारून जाऊन आपली सर्व फौज पुनः दिल्लींत आणिली. परंतु इस्मायल बेगास त्याच्या ह्या सर्व गोष्टी माहीत झाल्यावर त्याला गुलामाचा फार तिटकारा आला. पुढें पाटीलबावांनीं राणाखान व जगोबा बापू ह्यांजबरोबर सडी फौज (घोडेस्वार) देऊन, त्यांची दिल्लीस गुलाम कादराच्या पारिपत्यासाठीं रवानगी केली. ते ता० १४ आगष्ट सन १७८८ रोजीं दिल्लीस जाऊन पोंचले. ह्यांनीं मार्गांत गुलाम कादराच्या लष्करास घोसगडाकडून जी रसद येत होती, तिजवर छापा घालून, त्यांतील शेंकडो पठाणांस कापून काढिलें. त्यामुळें गुलाम कादराच्या लष्करांत अन्नाची महर्गता झाली. शिंद्यांची ही फौज दिल्लीस पोहोंचल्यावर रायाजी पाटील वगैरे पूर्वीं गेलेल्या सरदारांस मोठी उमेद येऊन, त्यांनीं शत्रूंवर चोहोंकडून हल्ले चालविले. इस्मायल बेग व गुलाम कादर ह्यांच्या फौजा पृथक् पृथक् होत्या, आणि जरी ते दोघेही मराठ्यांचे शत्रु होते, तरी त्यांचें आपसांत सूत नव्हतें. राणाखानभाई, जगोबा बापू व इतर सरदार, ह्यांच्या ह्या दोघां फौजबंद सरदारांबरोबर पुष्कळ चकमकी झडल्या. त्यांत उभयपक्षीं बरीच प्राणहानि झाली, तरी मुसलमानांचा मोड होईना. ह्या प्रसंगीं गुलाम कादराच्या फौजेचा जोर मोठा होता. सबब त्याच्या फौजेवरच मोठमोठ्या मराठे सरदारांचा मारा सुरू होता. पुढें गुलाम कादर मराठी फौज दोहोंकडे विभागावी म्हणून आपली सर्व फौज व "महालमत्ता घेऊन सिलीमगडाखालीं नावांतून उतरून पटपटगडास मुकाम करून राहिला." हें समजतांच मराठे सरदारांनीं तिकडे आपला मोर्चा फिरविला. परंतु त्या वेळीं यमुनेस पाणी फार आल्यामुळें उतार होत नव्हता. तेव्हां हे सरदार विचारांत पडले. शिवाय गुलाम सामान्य वीर नव्हता. "गुलामाकडेस जंगी सामान भारी. तेव्हां (हे अगोदरच त्याजबरोबर) लढाईस टरत नव्हते." आणि आतां पुरामुळें पलीकडेही जातां येईना. ही गोष्ट मथुरेस पाटीलबावांस समजतांच त्यांनीं ताबडतोब जिवबादादांस कळविलें कीं, गेलेल्या फौजेकडून गुलाम कादराचें पारपत्य अद्याप होत नाहीं, यासाठीं तुम्ही फौजेनिशीं गुलामावर जरूर निघून जावें. त्यावरून जिवबादादा ता० १८ सप्टेंबर सन १७८८च्या सुमारें दिल्लीकडे निघून गेले. दरम्यान पाणी कांहीं कमी होतांच जगोबा बापू वगैरे सरदार नदीपलीकडे जाऊन, त्यांनीं गुलामाबरोबर लढाया चालविल्या होत्या. इतक्यांत जिवबादादा दिल्लीस जाऊन पोहोंचले. जिवबादादा येतांच इस्मायल बेगानें जाणलें कीं, आतां मराठ्यांशीं द्वेष करून निभाव लागावयाचा नाहीं. यास्तव शेवटीं तो मराठ्यांस येऊन मिळाला. ही गोष्ट जिवबादादांच्या धाकामुळेंच घडली. असो. पुढें-ही यमुना सारखी दुथडी भरून चालली असतां हे जातांच त्यांना उतार मिळाला. त्याचप्रमाणें क्रमानें त्यांस यश येत गेलें, आणि त्यांनीं गुलामाचा पूर्ण पराभव केला. ह्या स्वारींत लखबादादाही त्यांजबरोबर होते. ह्या स्वारीची हकीकत त्यांच्या स्वतःच्या पत्रावरूनच देतों. "महाराजांचे पुण्यप्रतापें श्रीयमुनाबाईनें उतार दिला. तेव्हां किरावळीचा घांट चढे घोड्यानिशीं उतरून गुलामाशीं गांठ घातली. तेथून गुलामाशीं लढत लढत मेरटेच्या शहरांत येऊन राहिलों. सवा महिना आसरास जकडबंदी करून आंत रस्त न पोंचे असें एकसर आज जाहालें. रोज लढाईशीं गांठ. रात्रंदिवस जीन घोड्यावरून संधान लावून त्याजकडील रोहिले व पलटणें यांचा भरवसा सुटून बाहेर काढिले. मात्र त्याचे जीव-धारी लोक पांच सहा हजार शहरांत राहिले. अलीकडे लढाईचें तोंड लावून काल छ० १८ रबिलावल (ता० १७ डिसेंबर स० १७८८ रोजीं) तिनसांजचे गलबलींत सडा पंचवीस स्वारांनिशीं पळून

१. ह्या प्रसंगीं गुलाम कादराकडे दहा हजार फौज होती, शिवाय कांहीं पलटणेंही होतीं. पहा पत्र नंबर ३७.

गवसगडाचे (घोसगडाचे) आंगें गुजरनिकाकडून गेला. सलतन शहाजादे व मन्यारसिंग, हत्ती, तोफा सर्व सरंजाम लुटून सडा झरारां तीन टोळ्या करून तिकडे निघाला. त्यांतील एक टोळीची आमची गांठ पडली. ती कापून काढिली. परंतु गुलाम मात्र झरारां निघून गेला. त्याचे मागें पंचवीस हजार फौज घेऊन चि० जगोबा व धोंडोबा पागनीस गेले. त्यांची गांठ पडल्यास पारपत्य होईल. आह्मी फौजसुद्धां राजश्री राणेखानभाई (मिळून) येथें (मेरटेस) राहिलों. याचें कारण गुलाम जातीनिशीं गेला. परंतु सलतन व लढवाईक लोक होते. त्यांणीं दोन प्रहरपर्यंत दम धरून राहिले. मग चौंकडे घेरून धरून आणिले. गुलामाकडे कारभारी व शहाजादे व नाजर खोजा (या) सर्वांस धरून आणून पायांत बेड्या घालून ठेविले. मात्र शहाजादे मोकळे आहेत. वरकड गुलामास लुटून घेतला. मात्र जिवानिशीं गेला. त्याचे मागें फौजा गेल्याच आहेत. आह्मीहि फौजेसुद्धां कुच करून गुलामाच्या लागास गवसगडापर्यंत जाऊं. महाराजांकडे (महादजींकडे) हत्ती व तोफा सर्व आल्या. ईश्वरें यश मोठें दिलें ××× आज तीन वर्षें सरकारचे चाकरीमुळें शरीराची शुद्ध नाहीं. ×× रोज उठावें (तों) लढाईचा इरादा.'' इतकें लिहून पत्र पुरें होत आहे, तों भांडणीस्वारांची डांक येऊन थडकली. तो मजकूर ताजा कलमांत लिहितात. ''ता०क० गुलाम कादर चार स्वारांनिशीं पळून जाऊन एका गांवांत राहिला. तेथून गांववाले यांणीं येऊन अलीबहादर यांजकडील फौजेंत नाईक निंबाळकर यांसीं येऊन सांगितलें. त्यांनीं जाऊन गुलाम कादर यासीं धरून आणिलें. कैदेंत ठेविला आहे. पुढें महाराजांकडे पाठवून देऊं × महाराजांचे पुण्यप्रतापेंकरून मोठें यश आलें. सर्व बखेडा मिटला. आमचे मेहनतीस ईश्वरानें यश दिलें[3].'' ही गोष्ट ता० २० डिसेंबर सन १७८८ रोजीं घडली. याप्रमाणें ''गुलाम कादर याचें पारिपत्य होऊन गुलामास बेड्या घालून धन्याकडे (महादजींकडे मथुरेस) पाठविलें[4].'' आणि उत्तरेकडे शिखांचा वगैरे दंगा पुनः सुरू झाल्यामुळें त्यांच्या बंदोबस्तास ते कुंजपुऱ्याकडून पत्यालेकडे फौज घेऊन जाण्याचे तयारीस लागले.[5]

गुलाम कादरास जिवबादादांनीं पाटीलबावांकडे पाठविल्यानंतर त्याच्या कृतकर्मानुरूप प्रायश्चित्त पाटीलबावांनीं त्याला तारीख ३ मार्च सन १७८९ रोजीं भोगविलें. तें असें कीं, ''त्याजला धरून आणून त्याचें तोंड काळें करून नाक कापलें आणि सात पाट काढून उंटावर बांधून मथुरेस लष्करचे भोंवतीं फिरवून नंतर हातपाय काढिले. डोळे काढून मोठे विपष्टेनें माथ्यावर मेखसूं घालून लष्करचे पुढें मारून हलालखोराकडून ओढवून ढोरासारखा टांकविला.'' गुलाम कादराच्या पारिपत्यानें सर्वांस आनंद झाला.

गुलाम कादराचें पारिपत्य करून त्यास ठार केल्याबद्दलची वगैरे सविस्तर हकीकत पाटीलबावांनीं बादशहास दिल्लीस कळविली. ती ऐकून त्या दुःखानें गांजलेल्या वृद्ध व अंध बादशहास फार समाधान वाटलें. आणि त्यानें शिंद्यांस अत्यंत आभारदर्शक निरोप पाठविला. मग महादजींनीं दिल्लीच्या बंदोबस्तासाठीं रवळोजी शिंदे (पाटीलबावांचे पुतणे) यांस पांच हजार फौज व कांहीं

---

१. जिवबादादा शत्रुपक्षाकडील लोकांचें पारिपत्य करावयाचें झालें, तरी पात्रापात्रता पाहून करीत.

२. ''मोठे सरदार १६धरले. हत्ती २२, तोफा ८०, उंट घोडों यांची गणती नाहीं.'' पत्रें व यादी पृ. ३५४.

३. पद्दा पत्र नंबर ३७.

४. पद्दा पत्र नंबर ३८.

५. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८२.

पलटणें यांसहित ठेविलें. नंतर गुलाम कादरानें बादशहाचे वाडे लुटून त्यांतील अमोल चिजा, दागदागिने व रोख ऐवज नेऊन घोसगडच्या किल्ल्यांत भरिला होता. त्या ठिकाणीं त्याची सर्व संपत्ति असल्याकारणानें त्यानें पुष्कळ लोक ठेवून तें ठाणें मजबूद केलें होतें. सबब त्यावर जगोबा बापू, धोंडबा पागनीस व लखबादादा वगैरे सरदार जाऊन, त्यांनीं तो किल्ला घेतला. त्या वेळीं तेथील सर्व मालमत्ता ह्यांच्या हातीं आली. नंतर गुलामाच्या राज्यांत सर्वत्र ठाणीं बसवून, जगोबा बापू फौजेसुद्धां सारंगपुरास गेले, आणि तोही प्रांत त्यांनीं सन १७८९ च्या मार्च महिन्याचे शेवटीं घेतला. याप्रमाणें "गुलाम कादर रोहिला याच्या मुलखांत झाडून अमल बसला."

मग जगोबा बापू, लखबादादा व राणाखानभाई, या सरदारांसह जिवबादादा कुंजपुरा एथें गेले. तेथें अलीबहाद्दरही त्यांस येऊन मिळाला. नंतर शीख सरदार ज्या ज्या प्रांतीं उपद्रव देत होते, त्या त्या बाजूस निरनिराळे सरदार पाठवून त्यांस हटवीत हटवीत ते पंजाबप्रांतीं पत्यालेस जाऊन पोहोंचले. आणि शिखांच्या एकत्र झालेल्या मोठ्या फौजेबरोबर बरेच दिवसपर्यंत युद्ध करून त्यांनीं त्यांचा पराभव केला. परंतु ह्याच संधीस उत्तरेकडून अफगाण (गिलचे) लोक टोळ्याटोळ्यांनीं येऊन बादशाही मुलखांत स्वाऱ्या घालून लुटालूट करीत होते[२], तेव्हां त्यांचा बंदोबस्त करणें जरूर झालें. शिखांबरोबर लढाया चालल्या असतांनाच मुलखांत चोहोंकडे ह्यांचे दंगे सुरू झाल्यामुळें जिवबादादांस ह्या सर्वांचा बंदोबस्त करण्याचे कामीं पुष्कळ प्रयास पडले व दिवसगतही पुष्कळ झाली. ह्या लढायांत बाळोजी इंगळे व काशीराव होळकर, यांचीही फौज मदतीस आली होती. गिलचे लोक काटक, हाडापातानें मजबूत, मोठे धाडशी व अभिमानी असल्यामुळें त्यांच्या टोळ्यांचा पराभव झालला त्यांना खपला नाहीं. त्यामुळें अत्यंत संतप्त होऊन त्यांनीं अफगाणिस्थानचा बादशहा तिमूरशहा (अहमदशहा अबदालीचा पुत्र) याजकडून बरीच मोठी फौज मदतीस घेतली, व ते मराठ्यांवर चालून आले. तेव्हां जिवबादादाही, आपल्या सरदारांची व अलीबहादर व होळकर यांची फौज एकत्र करून, गिलच्यांच्या तोंडावर चालून गेले. त्या वेळीं "गिलच्यांची लढाई मोठी मातबर झाली. गिलच्यांचें पारिपत्य शिंदे यांणीं श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून यथास्थित केलें. पूर्वी भाऊसाहेब हे गिलच्यांशीं लढाई करून यश मिळवून शेवटले लढाईंत गिलचा यश घेऊन तीन लाख फौजेनिशीं भाऊसाहेब गर्द झाले. त्यांचा सूड शिंदे यांणीं यथास्थित घेतला. गिलच्यांचें पारिपत्य सरकारचे मनांत होतें तसें करून खंडणी घेऊन गिलचे व इराणी यांस अटकेपार घालविलें. असें पारिपत्य गिलच्यांचें चांगलें केलें, आणि फौजा माघाऱ्या हिंदुस्थानांत छावणीचे छावणीवर येऊन दाखल झाल्या. आणि सरकारांत डांक झाले वर्तमानाची लिहिली. तीं डांकेचीं पत्रें पुण्यास येतांच पत्रें पाहून सरकार फार खुष होऊन तोफेची सरबत्ती केली." ह्याप्रमाणें शीख व गिलचे यांचा पराभव करून, तिकडील बंदोबस्ताचें काम पुरें करण्यास जिवबादादांस एकंदर आठ नऊ महिने लागले.

ह्याप्रमाणें उत्तरेकडील कामगाऱ्या आटपून जिवबादादा इ० स० १७९० च्या मे महिन्यांत पाणिपतसोनपतवरून दिल्लीस येऊन, तेथें त्यांनीं बादशहाची भेट घेतली. आणि गुलाम कादराच्या

---

१. पहा पत्र नंबर ४१.

२. ग्रांट डफची बखर पृ. ३१०.

३. पेशव्यांची बखर पृ. १२१.

४. पहा पत्रें नंबर ४९।४१०.

वेळेपासूनच्या सर्व हकीकती त्यांस श्रुत केल्या. तेव्हां "बादशहांनीं प्रसन्न होऊन वजीरात पाटील-बावांस दिली. नालकी व खिलत भूषणादि वजीरातीचा मरातब तितका देऊन" गौरव केला. याप्रमाणें बादशहानें दिलेला मानमरातब व भूषणें लखबादादांबरोबर देऊन त्यांस पाटीलबावांकडेस पाठविलें, तेव्हां पाटीलबावांनीं ग्वाल्हेरीपासून तीन कोस सामोरें जाऊन मरातब ग्रहण केला. नंतर जिवबादादांनीं "मथुरेचे छावणीस येऊन महादजी शिंदे यांस घेऊन दिल्लीस हुजूर पातशहाचे भेटीस आणले." मनोरथ पूर्ण केल्यामुळें पाटीलबावांची जिवबादादांवर बहाल मर्जी झाली.

महादजी शिंदे दिल्लीस गेल्यावर बादशहानें मोठा दरबार भरविला आणि त्यांचा फार गौरव करून ह्मटलें कीं, पातशाहींतील हरामखोरांस पुरतें शासन करून गादी निर्भय केली आणि सर्वत्र लौकिक गाजविला. "यावरून पातशहा मेहरबान होऊन (त्यांनीं मनांत आणिलें कीं) शिंदे सरकार यांस काय द्यावें? जिवबादादांनीं मोठे पराक्रम करून तक्ताचा प्रताप कायम केला. जगोबा बापूंनेंही त्या प्रसंगीं लढाईत शूरत्वानें मोठमोठे बाहद्दरीनें कामें केलीं. असें जाणून अशीं अशीं कामें करून हुकूम जागविला. आतां यांस देऊं तितकें थोडें." मग त्यानें महादजींस ह्मटलें "बादशाही वजीरात मुख्य जो अधिकार सर्वांवर तो मरातब आणि फर्जंद आपले शहाजादे मूल पोटचे असतात, जे तक्ताचे अधिकारी त्यांसच पातशाहींत 'फर्जंद' असें ह्मणतात, तो किताब अलिजा बहादूर" हा आह्मी तुह्मांस देतों. तेव्हां महादजींनीं बादशहास अर्ज केला कीं, माझे धनी पेशवे. त्यांचा असा सन्मान झाल्यावांचून मला हा किताब शोभणार नाहीं. मग बादशहानें पेशव्यांसह ह्या सर्व उपकारकर्त्या शूर व योग्यतेच्या पुरुषांस किताब दिले; त्यांचा तपशील:—

१ पेशवे सवाई माधवराव नारायणपंत प्रधान यांस—'वकील मुतालीक."

२ माधवराव शिंदे यांस—"उलमुल उमदुल उमराव फर्जंद अलिजा महाराजाधिराज माधोराव शिंदे बहादूर."

३ जिवबादादा यांस—"बक्षी बहादर मुंजाफर दौल जिवाजी बल्लाळ बहादर फत्तेजंग."

४ जगोबा बापूंस—"राव महा जमन्मुलख मुंजाफर दौल राजे जगन्नाथ राम बहादर दिलावरजंग."

५ लखबादादा यांस—"समशेरजंग बहादर."

६ सदाशिव रामचंद्र यांस—"नायब बक्षी बहादर."

७ खेमसावंत भोंसले सरदेसाई वाडकर यांस—"राजे बहादर."

१. होळकरांची कैफीयत पृ. ५१.

२. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८२.

३. वि. ज्ञा. वि. यांत महादजींचा किताब दिला आहे तो असा:—"यार वफादार सीपेसाकर रुस्तमे हिंद महादजी शिंदे फर्जंद अर्जमद महादजी शिंदे अलिजा बहादूर मुजफर जंग."

४. जिवबादादांस या प्रसंगीं बादशहानें साहेब नौबत चौघडा दिला.

५. ही सनद जिवबादादांनीं सन १७८५ सालीं करून घेतली होती. ती लढाईत नष्ट झाल्यामुळें या वेळीं पुनः करून घेतली. पहा सनद नंबर ४२.

८ गोंव्याचे गव्हरनर फ्रान्सिस्क कुंज देमिजेनिस यांस—"फिदवी खास लाये कुल इजायत वल हे सार्न."

त्या दरबारांत बादशहाकडून याप्रमाणें पदव्या मिळाल्या. ह्या पदव्यांच्या वेगवेगळ्या सनदा दिलेल्या आहेत. त्यांबरोबर प्रत्येकाच्या अधिकाराप्रमाणें पालख्या, नालक्या, हत्ती, घोडे व अलंकार वगैरे निरनिराळे देऊन त्यांचा मोठा सत्कार केला, आणि आपण फार खूप झालों, असें बोलून दाखविलें. त्या वेळीं महादजींनीं विनंति केली कीं, बादशाही राज्यांत गोवध होतात, ही गोष्ट आमच्या धर्मास अत्यंत विरुद्ध असून, तीमुळें आह्मांस फार दुःख होतें; ह्यासाठीं ती बंद करण्याविषयीं खावंदांकडून कृपाळूपणें तजवीज झाली पाहिजे. तें ऐकून बादशहानें आपल्या राज्यांत सर्वत्र गोवध बंद केल्याबद्दलचीही सनद करून देऊन महादजीस खुष केलें. वकील–इ–मुतलक ह्मणजे मुख्य प्रतिनिधि असा पेशव्यांस दिलेल्या सनदेचा अर्थ. हें काम पेशव्यांतर्फे महादजीनें करावें असा त्यांस मिळालेल्या सनदेचा मतलब. त्याप्रमाणें दिल्लींतील बादशाही कारभाराचें सर्व काम महादजी करीत असत; आणि आपण दुसरीकडे गुंतले असले, तर तें काम पहाण्यासाठीं ते जिवबादादांची नेमणूक करीत असत. पुढें पाटीलबावांनीं खानगी खर्चासाठीं बादशहास दरसाल नऊ लाख रुपयांची नेमणूक करून देऊन, दिल्ली व आग्रा हे प्रांत त्यांनीं आपले राज्यास जोडले[3]. पाटीलबावांना इस्मायल बेग येऊन मिळालाच होता. त्याला त्यांनीं कनोद, रेवादी वगैरे महाल जाहगीर देऊन, त्याची तिकडे रवानगी केली. बादशाही मुलूख राज्यास जोडिल्यामुळें शिंद्यांचें वैभव फार वाढलें.

याप्रमाणें हकीकती घडून, पाटीलबावांची दौलत, राज्य व कीर्ति, हीं वाढून त्यांच्या वैभवाचा व पराक्रमाचा चोहोंकडे डंका झाला. त्यांना तसल्याच योग्यतेच्या पाणीदार पुरुषांचें साहाय्य मिळाल्यामुळें त्यांचा एकसारखा उत्कर्ष होत गेला. अलिजा बहादर माधवराव शिंद्यांनीं हें मिळविलेलें यश सामान्य नव्हतें. शिवाजी महाराजांनीं यवनांस अनेक प्रसंगीं हात दाखविला, तरी त्यांना दिल्लीस बंदीवान व्हावें लागलें. त्याचप्रमाणें महा पराक्रमी बाजीराव साहेबांसही जें यश मिळालें नाहीं, तें पाटीलबावांनीं जोडिलें. मोगल पातशहा सर्व हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें चालवून दिल्लीहून सर्वांस हुकूम सोडीत. पण त्याच दिल्लीशहरांत बसून पाटीलबावा ह्या वेळीं तोच अधिकार वहिवाटीत, ही गोष्ट विचारणीय व तशीच अभिमानास्पद नाहीं काय?

असो. हें सर्व ठीक झालें. परंतु पाटीलबावांच्या ह्या उत्कर्षानें सर्वांस सारखाच आनंद झाला नाहीं. पेशव्यांचे मुख्य कारभारी नाना फडणवीस यांना त्यामुळें आश्चर्य वाटून कांहीं असमाधानही झालें. रजपूतांस तर तें महद्दुःखास कारण होऊन त्यांनीं त्याची खोड मोडण्यासाठीं जंगी तयारी

१. हा किताब लखबादादांनां देवविला होता. पहा पत्र नंबर ४१९.

२. पेशव्यांची बखर पृ. १२३।१२७.

३. नातूकृत महादजी शिंद्यांचें चरित्र पृ. २२१।२२२.

४. शिवाजी महाराजांच्या पश्चात् जे पराक्रमी पुरुष होऊन गेले, त्यांत एवढें वैभव पाटीलबावांनींच संपादिलें. शिवाजी महाराजांच्या वेळचा प्रसंग वेगळा होता. त्यांनीं अगदीं नवीन राज्य संपादन करून औरंगझेबासारख्यास कासावीस केलें, ही गोष्ट असामान्य होय. पाटीलबावांच्या वेळीं उभयपक्षीं भिन्न स्थिति होती, तरी त्यांनीं मिळविलेलें यश इतरांस केवळ दुष्प्राप्य होतें, यांत संदेह नाहीं.

केली, आणि ते दंड ठोकून शिंद्यांची गांठ घेण्यासाठीं सज्ज होऊन राहिले. कारण त्यांना लालसोटच्या जयावरून मोठी उमेद आली होती. परंतु त्यांना आमचे चरित्रनायक

"वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव समज
देवांसि मागते ते झाले मरणीं करूनि नवस मज ॥ "

ह्या भीष्मोक्तीप्रमाणें दरडावून सांगण्यासाठीं येताहेत ह्याची कुठें बातमी होती ? या रजपुतांबरोबरील पाटणा व मेरट एथील युद्धांचें वर्णन पुढील भागीं देऊं.

भाग ११ वा.

पाटणा व मेरट एथील लढाया.

इ० सन १७९०।९१ तील.

इसवी सन १७८७।८८ पासून सन १७९२।९३ पर्यंतचीं पांच महा वर्षें पाटीलबावांच्या एकंदर कारकीर्दींत त्यांस व त्यांचे सेनापति जिवबादादा, लखबादादा, जगोबा बापू इत्यादि वीरश्रेष्ठांस मोठ्याच दगदगीचीं गेलीं. वर्षाकालच्या आरंभीं निरनिराळ्या दिशेनें जशा वावटळी उठतात व त्यांचें एकत्र संमेलन झालें ह्मणजे जसें मोठें प्रचंड वादळ सुटतें, तशाच मुसलमान, रजपूत, रोहिले, शीख, गिलचे ह्यांच्या जबरदस्त वावटळी एकाच काळीं शिंद्यांवर उठल्या. पण पाटीलबावांसारखा दृढ निश्चयाचा व हिंमतबहाद्दर नायक आणि जिवबादादांसारखा स्वामिकार्यदक्ष व महापराक्रमी पुरुष, ह्यांची जुगल जमल्यामुळें पाटीलबावांची शक्ति अप्रतिहत झाली. ज्याप्रमाणें कोलंबसानें अटलांटिक महासागरांतील आपल्या बिकट सफरींत भयंकर तुफानासही दाद न देतां व कित्येक वेळां त्याच्याच खलाशांनीं त्यास अचानक समुद्रांत फेंकून देऊन परत स्पेन देशास जाण्याच्या मसलती केल्या असतां, आपल्या दोन जिवलग मित्रांच्या सहाय्यानें त्यानें गलबतावरील व महासागरांतील अशा दोनही वादळांशीं मोठ्या शहाणपणानें टक्कर देऊन, आपला कार्यभाग शेवटास नेला व सगळ्या जगाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें, त्याचप्रमाणें पाटीलबावांनीं राजकार्यामध्यें आलेल्या अनेक भयंकर प्रसंगांना न जुमानतां आपल्या मुत्सद्यांच्या साहाय्यानें फंदफितूरी, दंगेफिसादी इत्यादिकांतून आपला नित्याचा दृढ निश्चय कायम ठेवून, हिंदुस्थानच्या इतिहासांत आपली व आपल्या मुत्सद्यांची कीर्ति अजरामर करून ठेविली. जिवबादादांसारख्या कुशल सुकर्णधारांनीं ह्या सबंध पांच वर्षांच्या अवधींत क्षणभरही विश्रांतीची अपेक्षा न करितां व मारवाड, रोहिलखंड, जयपूर, दिल्ली, मेवाड, पत्याला इत्यादि प्रदेशांतील क्षुब्ध वातावरणास न जुमानतां, आपल्या लोकोत्तर बुद्धिचातुर्याचें सुकाणूं व तलवारीचीं वल्हीं या दोहोंच्या साहाय्यानें त्या त्या प्रदेशांतील शिंद्यांच्या सत्तेचें जहाज कसें विशिष्ट गतीनें चालविलें, हें मागील व या भागांतील हकीकतीवरून वाचकांस कळून येईल. या प्रसंगीं जिवबादादांनीं घरीं आपल्या बंधूस वेळोवेळ जीं पत्रें लिहिलीं आहेत, त्यांत जागोजाग " आह्मांस येथील बखेड्यामुळें शरीराचीही शुद्धि नाहीं." "रात्रंदिवस जीन घोड्यावरें" "गुदस्तांपासून चहूंकडे दंगेमुळें रात्रंदिवस लढाईचा इरादा, नित्य चाकरी, यामुळें आपणास पत्र लिहावयासही फावलें नाहीं." " वडील लिहितात, आह्मी पत्र पाठवीत नाहीं. त्यास आह्मी आज दोन वर्षें लढाईचा इरादा, त्यामध्यें

१. पत्रें नंबर ३७।३८.

सडे स्वारी, बुनगें, खासा स्वारीमागें शंभर कोसांवर यामुळें अंतर पडतें. त्यांहीमध्यें खर्चास पाठविलें असतें तरी ठीक पडतें. तेंही नाहीं. मुलेंमाणसें सर्व इकडेस आहेत. त्यांची आमची भेट देखील नाहीं ! घरीं रवाना करावीं; ह्मणून ठेविलीं. फिरून भेटणार कधीं? ऋणानुबंध प्रमाण. सारांश आह्मी स्थितीवर राहिलों नाहीं !" असे उल्लेख केलेले आहेत. तीं पत्रें वाचलीं ह्मणजे या मोठ्या आणी-बाणीच्या प्रसंगीं जिवबादादा, लखबादादा, जगोबा बापू इत्यादि पुरुषांनीं जे अविश्रांत श्रम केले, जें अचाट शौर्य व युद्धकौशल्य प्रकट केलें व रजपूतमुसलमानादि शौर्यश्रीच्या प्रियभक्तांसही हतवीर्य करून स्वामिसेवा ज्या अजब तऱ्हेनें बजाविली, त्या सर्वांचा देखावा डोळ्यांसमोर उभा राहून आपल्यास सानंदाश्चर्य वाटतें.

जयापा शिंद्यांचे वेळेपासून असलेलें मराठ्यांचें जूं झुगारून देऊन स्वतंत्र होण्याची इच्छा रज-पुतांस कशी उत्पन्न झाली, झालेलें नुकसान भरून काढण्याचा योग त्यांस कसा आला, शेवटीं लालसोटच्या दारुण संग्रामांत मराठ्यांस केवढा धक्का बसला, वगैरे गोष्टी मागील भागांवरून वाच-कांच्या लक्षांत आल्याच आहेत. रजपुतांबरोबरील ह्या संग्रामाच्या वेळीं जिवबादादा हे कुंजपुरा, शेखावटी, पत्याला इत्यादि प्रदेशांत शीख लोकांनीं जी बंडाळी माजविली होती, तिच्या बंदोबस्ता-साठीं सैन्यासह गेले होते. तिकडे शिखांस शासन करून त्यांची खोडकी जिरविण्याचे संधीस आग्र्याकडे मुसलमानांनीं अनर्थ करून सोडिला. ह्मणून तिकडे जाऊन त्यांनीं ती कामगारी पार पाडली. परंतु तेथील बंदोबस्त होतांच त्यांनीं दिल्लींत घोर अनर्थ केले. यासाठीं दिल्लीस जाऊन त्यांस हुसकून लावून बादशहास व त्याच्या मनुष्यांस असह्य व कल्पनातीत क्लेश भोगविणाऱ्या गुलाम कादराचा नाश करून पुनः शीख व गिलचे यांची पुरती खोड मोडण्याचे कामीं त्यांस पुष्कळ महिने लोटले. त्यामुळें रजपुतांस आतां इतउत्तर शिंद्यांस खंडणी देण्याचें कारण राहिलें नाहीं, असें वाटून ते शिरजोर होऊन राहिले होते. त्यांचा बंदोबस्त करण्याचे कामीं पाटीलबावांस सदरील कारणामुळें बराच अवधि लागला.

या अवधींत डि बॉयनासही आपल्या कवायती लष्कराची चांगली तयारी करण्यास सवड सांप-डली. पाटीलबावांनीं युरोपियन तऱ्हेच्या कवायती शिक्षणांत तरबेज अशा फौजेची आपल्याकडे उणीव नसावी, ह्मणून डि. बॉयनाकडून तीन कंपू तयार करविले. प्रत्येक कंपूंत सुमारें दहा हजार लोक होते. अशा प्रकारें पाटीलबावांजवळ सुमारें तीस हजार कवायती फौज तयार झाली. ही गोष्ट मागेंच दाखल केली आहे. ह्या लोकांजवळ मुख्यतः बंदुका व संगीनी हीं हत्यारें असून कांहीं पलटणींतील शिपायांस ढाल, तरवारी व पिस्तुलें दिलीं होतीं. हीं सर्व हत्यारें व तोफा आग्र्याच्या किल्ल्यांत चालविलेल्या कारखान्यांत तयार होत असत. तें काम हुबेहुब इंग्लिश हत्यारांच्या कामाप्रमाणें तयार होत असे. डि बॉयनानें शिंद्यांशीं दोन करार केले होते, ते हेः—कीं, एक, आपल्या फौजेचा पगार वक्तशीर पोंचावा आणि दुसरा, आपल्यास इंग्लिशांविरुद्ध लढाई करण्यास पाठवूं नये. ह्या दोन गोष्टींचा बंदोबस्त अलीजाबहाद्दरांकडून झाला, ह्मणजे आपण कोणतीही कामगारी बजावण्यास कसूर करणार नाहीं. पाटीलबावांनीं त्या अटी मान्य करून डि बॉयनाच्या या फौजेच्या खर्चासाठीं दुआबांतील कांहीं प्रांत जैदाद अगर सरंजामा दाखल दिला.

---

१. पत्रें नंबर ३७।३८.

त्याचें उत्पन्न अदमास तीस लाख रुपये होतें. ही गोष्ट सन १७९१ ते ९३ या अवधींत झाली. "ही नवीन फौज जरी एका अर्थानें चांगली होती, तरी तिची बरोबरी इंग्लिशांच्या कवायती फौजेबरोबर कधींही झाली नाहीं. ज्या पद्धतीनें मराठ्यांनीं मोंगलांचा नाश करून हिंदुस्थान जिंकिलें, ती पद्धत कवायती फौजेशींसुद्धां टक्कर देण्यास फार उपयोगीं पडते. ही गोष्ट अलीकडे युरोपियन युद्धकलेंत अत्यंत सुधारणा झाली तरी सुद्धां अफगाणस्थान, इजिप्त वगैरे स्वाऱ्यांतील ताज्या उदाहरणांवरून अनुभवास आली आहे. कांहीं दूरदर्शी मराठे व इंग्रज सरदारांचा सुद्धां या मराठ्यांच्या कवायती फौजांबद्दल असाच अभिप्राय होता." यावरून शिंद्यांच्या जुन्या फौजेची शक्तिमत्ताच मोठी ठरते.

उत्तरेकडील सर्व धामधुमी मोडून काढण्यासाठीं पाटीलबावांनीं पुण्यास पेशव्यांस निकडीचीं पत्रें लिहून मदत मागितली होती. ह्मणून तुकोजीराव होळकर व अलीबहादर ह्यांस फौजेसह नानांनीं शिंद्यांच्या मदतीस पाठविलें होतें. पण आंतून नानांनीं त्यांस 'महादजीचा उत्कर्ष न वाढतां पेशव्यांची सत्ता उत्तर हिंदुस्थानांत स्थापन होईल असें राजकारण करावें,' असा जो कानमंत्र सांगितला होता, त्याच्या धोरणानें केव्हां अनुकूल, केव्हां उदासीनपणें व केव्हां प्रतिकूल असे ते वागूं लागले. लढाईच्या प्रसंगीं साक्षीभूत राहून मौज पहावी; कांहीं लूट सांपडली किंवा मुलूख जिंकला ह्मणजे त्यांत हिस्सा मागावा: याप्रमाणें 'जेवायास आधीं आणि कामास कधींमधीं' असा प्रकार त्यांनीं चालविला. पाटीलबावांवरील या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यांस जर ते मनःपूर्वक मदत करिते, तर या सर्व धामधुमी मोडून काढण्यास जिवबादादांस जो इतका आयास पडला, तो न पडतां थोड्याच अवकाशांत तें सर्व वातावरण त्यांस शांत करितां आलें असतें. पण मदत करण्याच्या मिषानें आलेल्या ह्या हितशत्रूंच्या सान्निध्यामुळें हरएक ममलतींत त्यांचा तादृश उपयोग न होतां उलट त्यांचा कावा जिवबादादांस आडवा येऊं लागला. ह्मणून त्यांनीं पाटीलबावांस लिहिल्यावरून पाटीलबावांनीं त्या दोघांसही कळविलें कीं, आपल्या मदतीची आतां जरूरी राहिली नाहीं; यासाठीं आपण स्वस्थानीं गेल्यास बरें! परंतु त्या दोघांनींही ह्या सूचनेची उडवाउडवच केली. तथापि एव्हांच त्यांच्याशीं हमरीतुमरीवर न येतां व त्यांच्या संबंधानें गाफीलही न राहतां, अगोदर हातीं घेतलेलें काम तडीस न्यावें व मागाहून त्या हितशत्रूंचा सावकाशपणें विचार करावा, असें ह्मणून जिवबादादा पूर्वी सांगितल्याप्रमाणें रजपुतांकडे वळले. ह्या वेळीं जिवबादादांबरोबर पंचवीस हजार फौज असून शिवाय तोफखाना, डि. बॉयनाच्या हाताखालील कवायती पलटणें आणि गोपाळराव भाऊ, जगोबा बापू, लखबादादा, राणाखान, शिवबा नाना, सदाशिव मल्हार, आपा खंडेराव वगैरे सरदार ससैन्य होते. याप्रमाणें सर्व तयारी करून व अवश्य ती सामग्री घेऊन जिवबादादांनीं शेखावटींतून कूच केलें. व पाटीलबावा नारायणराव बक्षी ह्यांस घेऊन मेवाडप्रांतीं राहिले.

या वेळीं या फौजेंतील शिपायांचा बरेच दिवसांचा मुशाहिरा थकला होता. लढाईची सतत चार वर्षांची दगदग व त्यांत आणखी या वर्षी दुष्काळानें आपलें उग्र स्वरूप प्रकट केलेलें. यामुळें बहुतेक शिपायांच्या कुटुंबांतील माणसांची उपासमार होऊं लागली. अशा स्थितींत रोजमुरा थकल्यामुळें ते

१. नातूकृत महादजी शिंद्यांचें चरित्र पृ. २२५. ही कंपूची विशेष सुधारणा वर दाखविल्याप्रमाणें दोन तीन वर्षे चालली होती. प्रस्तुत भागांतील लढाया तत्पूर्वीच झालेल्या होत्या.

२. नातूकृत महादजी शिंद्यांचें चरित्र पृ. २२६।२७.

३. होळकराची कैफीयत पृ. ५५.

वैतागून जाऊन शेवटीं बिथरणच्याही बेतास आले, ह्यांत फारसें नवल नाहीं. रोज ह्यासंबंधानें जिवबादादांकडे त्यांच्या विनवण्या चालत. पण बाहेरून खंडण्या वगैरेंचा पैसा वसूल आणून त्यांची तोड पाडण्याचा त्यांचाही इलाज नव्हता. कारण एकाच वेळीं सर्व बाजूंनीं काहूर उठल्यामुळें एका बाजूकडील बंदोबस्त करून मोकळे झाले नाहींत, तोंच दुसरीकडील मोहीम तयार! असें होऊन स्वस्थपणें पैशाच्या वसुलातीचें व फेडीचें काम चालवितां येईना. शिवाय सदरील कारणामुळेंच फौज वाढवावी लागली. व दुष्काळामुळें वसूलही थकत चालला. याप्रमाणें मुलकी व लष्करी या दोनही खात्यांकडून वसुलात यावयाच्या रकमांस छाट बसल्यामुळें, ह्या भयंकर खर्चानें शिंद्यांचा खजीना रिता पडल्यासारखा झाला होता. पण अशाही बिकट प्रसंगीं आपल्या लोकांस धीर देऊन, पुढील आशा दाखवून व आपल्या खासगत जाहागिरींतून कित्येक लाख रुपये आणवून, जिवबादादांनीं तात्पुरती गरज भागवून घेतली. धन्याच्या कामासाठीं स्वपरभाव त्यांच्या मनांत कधीं येत नसे. अशाप्रकारें तनमनधनेंकरून स्वामिकार्यास वाहिलेले पुरुष जगांत थोडेच आढळावयाचे.

इस्मायल बेगास जाहगीर दिली होती, आणि मराठ्यांनीं त्यास जर्जर करून पुनः वर डोकें करण्यांत हंशील नाहीं, अशीही त्याची खातरी करून दिली होती. परंतु त्यास स्वस्थ बसवेना. त्यानें मराठ्यांची खोड मोडण्यासाठीं पुनः रजपूत राजांस उत्तेजन दिलें. आणि तुह्मी मदतीस येत असाल, तर मराठ्यांशीं लढण्याची माझी तयारी आहे, असा त्यांस निरोप पाठविला. इकडे रजपूत राजे लालसोटच्या लढाईपासून गर्विष्ठ होऊन मराठ्यांचें वर्चस्व झुगारून देण्यास तयारच होते. शिंद्यांच्या फौजा व मुख्यत्वें जिवबादादा दुसरीकडे गुंतल्यामुळें जोधपूरच्या विजयसिंगानें अजमीर शहर व महाल हीं मराठ्यांच्या ताब्यांत असतां, तेथील बंदोबस्तास ठेविलेल्या थोड्याशा लोकांस हांकून लावून घेतलीं, आणि शिंद्यांस जी खंडणी देण्याचें ठरलें होतें, ती बंद केली. त्याचप्रमाणें जयपूरकरांनींही खंडणी बंद करून, ते शिंद्यांच्या नाशाच्या मसलती योजूं लागले. ही गोष्ट पाटीलबावांस जाचत होतीच. त्यांत अजमीर शहर रजपुतांनीं घेऊन, ते आपल्याविरुद्ध एक होऊन राहिले आहेत आणि आपण पूर्वीं केलेले सर्व उपकार विसरून जाऊन इस्मायल बेगही त्यांस मिळाला आहे, हें समजतांच त्यांनीं वर लिहिल्याप्रमाणें जिवबादादांची त्यांजवर रवानगी केली होती.

अजमीरप्रांत शिंद्यांकडे येण्याचें कारण असें होतें कीं, महादजी शिंद्यांनीं आपला भाऊ जयाप्पा शिंदे ह्यांस रजपुतांनीं मारिल्यामुळें, त्यांना शिक्षा करण्याच्या इराद्यानें 'मुंडकाटी' या नांवाचा कर त्यांजवर लादला होता. त्या कराबद्दल शिंद्यांस त्यांनीं अजमीरप्रांत लावून दिला होता. तेव्हां रजपुतांनीं आतां तो प्रांत जबरीनें पुनः घेतांच त्यांस अत्यंत वाईट वाटलें. शिवाय रजपुतांस इस्मायल बेग जाऊन मिळाला, ह्या गोष्टीचेंही त्यांना आश्चर्य वाटलें. सबब या सर्वांचा पुरता मोड केल्यावांचून राहूं नये, असा त्यांचा जिवबादादांस आग्रह होता.

---

१. राजांचीं दुःखें व विपत्ति राजांसच माहीत! थोरल्या बाजीरावसाहेबांस अशाप्रकारच्या पैशाच्या अडचणीमुळें व तेणेंकरून ओढवलेल्या प्रसंगामुळें जीवही नकोसा झाला होता. बहुतेक फौजबंद राजांस हीं दुःखें अनुभवावीं लागतात. पण ह्या संबंधाची ओढाताण जशी शिंद्यांच्या लष्करांत होती व ह्या बाबतींत तोड काढण्यासाठीं खुद्द महादजींस व जिवबादादांस जसे महत्प्रयास पडत, तशीं उदाहरणें अन्यत्र थोडींच सांपडतील. जिवबादादांस तर ह्या प्रकरणीं पुष्कळ घस सोसावी लागली आहे.

जयपूर संस्थानांतील शेखावती प्रांतांत पाटण ह्मणून एक मोठी बळकट जागा आहे, तेथें आपली फौज व तोफखाना घेऊन इस्मायल बेग मराठ्यांशीं लढण्यास तयार होऊन राहिला होता. त्या ठिकाणीं जयपूरच्या कच्छवाह लोकांची मोठी फौज लौकरच येऊन दाखल झाली. त्याचप्रमाणें जोधपूरच्या बिजेसिंगाच्या शूर राहाटोर लोकांची फौज येऊन मिळतांच, त्यांनीं आपापल्या भागाचें आधिपत्य घेऊन लढाईच्या जागा रोखून धरून व मोरचे तयार करून मराठे येण्याचे अगोदर सर्व प्रकारची सिद्धता करून ठेविली. खंडणी बंद केली, अजमीर घेतलें व इस्मायल बदलला, ह्या सर्व चीड येण्यासारख्या गोष्टी सहन न करितां, शिंद्यांची फौज लढाईस खास येणार, हें त्यांना पक्कें माहीत होतें. इतक्यांत जिवबादादा वर लिहिल्याप्रमाणें सैन्य व सरदार लोक, यांसहवर्तमान येऊन दाखल झाले. त्यांनीं पाहिलें कीं, शत्रु अजिंक्य अशी जागा व्यापून राहिले आहेत. तें स्थळ फार बिकट व दुर्गम असल्यामुळें हल्ला करून घेतां येण्यासारखें नव्हतें. ह्मणून प्रथमतः इतर उपायांनीं शत्रूंस जर्जर करावें असें मनांत आणून, जिवबादादांनीं त्या कामावर लखबादादांची योजना केली. लखबादादा हे एक दोन टोळया घेऊन त्यांच्या मुलखांत शिरले. पण या युक्तीचा ह्मणण्यासारखा उपयोग झाला नाहीं, तरी दुसरी एक महत्त्वाची गोष्ट घडून आल्यामुळें राहाटोरांच्या पक्षाकडे कांहीं कमकुवतपणा आला. लखबादादा व जयपूरचे कच्छवाह लोक यांजमध्यें बरेच दिवसांपासून मित्रभाव होता. पाटण एथें सर्व रजपूत एकत्र जमल्यावर कच्छवाह लोकांचा राहाटोरांनीं कांहीं कारणावरून अपमान केल्यामुळें, ते लोक राहाटोरांचा पक्ष सोडण्यास तयार झाले होते, व पूर्वींपासून लखबादादांशीं स्नेह असल्यामुळें त्यांच्या द्वारें मराठ्यांशीं स्नेहभाव जोडण्यास ही संधी बरी आहे, असा त्यांनीं आपमांतल्या कटकटींमुळें निश्चय केला. रजपूत लोक अपमान झाला असतां चिडीस जाऊन कसे बेफाम होतात आणि पुढील अनर्थाच्या प्रसंगांसुद्धां कसे जुमानीत नाहींत, हें इतिहासज्ञांस माहीतच आहे. मग लखबादादाच्या मध्यस्थीनें राहाटोरांपासून फारकत पावलेल्या जयपूरकर कच्छवाह लोकांनीं ठरविलें कीं, मराठ्यांनीं आपल्या मुलखास कोणताच उपद्रव देऊं नये व आपण राहाटोरांचा पक्ष सोडून चालतें व्हावें. मग त्याप्रमाणें उभय पक्षांस मान्य होऊन ही गोष्ट लागलीच अमलांत आली. इतकें झालें तरी शत्रूकडे सव्वीस हजार पायदळ व तीस हजार स्वार असून, तोफा सुमारें दोनशें होत्या.

दोन्ही दळें लढाईसाठीं समरांगणावर सिद्ध झाल्यावर ता० २० जून सन १७९० रोजीं प्रथमतः राहाटोरांनीं मराठ्यांवर हल्ला केला. त्या वेळीं जिवबादादांनीं डि. बॉयनाचा तोफखाना पुढें करून शत्रूंवर तोफा चालविल्या असतां रजपूत लोक आपल्या नित्याच्या पद्धतीप्रमाणें मराठ्यांचा तोफखाना काबीज

१. आ. मि. नातू यांनीं महादजी शिंदे यांच्या चरित्रांत "जयपूरच्या कच्छवाह लोकांस लखबादादानें फितूर केल्यामुळें लढाईत न मिळतां ते रण सोडून गेले" असें ह्मटलें आहे. पण टॉड साहेबांच्या 'राजस्थान'नामक ग्रंथावरून पाहतां राहाटोरांनीं ह्या प्रसंगीं त्यांचा जो अपमान केला होता, त्या रागानें त्यांनीं त्यांचा पक्ष सोडिला व आपला मित्र जो लखबादादा, त्याच्या मध्यस्थीनें मराठ्यांकडून आपला फायदा करून घेतला, असें दिसतें. हें कारण नसतें तर अभिमानी कच्छवाह लोक केवळ लखबादादाच्या फिसरतीवरून राहाटोरांस सोडून गेले असते, असें संभवत नाहीं. प्रस्तुतसारख्या महत्त्वाच्या प्रसंगीं त्यांनीं स्वकीयांचा पक्ष सोडून शत्रूस अनुकूळ व्हावें, हें त्यांस खरोखर दूषणास्पद होतें. ह्मणून टॉडसाहेबांनीं दिलेलें रास्त कारण, रजपुतांचा मानी स्वभाव आणि त्या वेळचा प्रसंग हीं लक्षांत आणिल्यास वर दिलेलें मतच खरें दिसतें. यासाठीं लखबादादावर फितुरीचा आरोप आणणें सयुक्तिक दिसत नाहीं.

करण्यासाठीं गर्दी करून एकदम तोफांच्या तोंडापर्यंत चालून आले. धन्य त्या राहाटोरांची! तोफांतून भयंकर आवाज होऊन प्राणघातक गोळ्यांची एकसारखी वृष्टि चालली असतां, मोठ्या त्वेषास चढून त्याच तोफा काबीज करण्यासाठीं त्यांतून पुढें घुसणें आणि समोरील शेंकडो लोक गतप्राण होऊन पडले तरी त्याची परवा न करितां, त्या तशा आगींतून तोफखाना गांठणें, ह्या गोष्टी रजपुतांच्या निसर्गभूत शौर्याची उत्तम साक्ष पटवितात. शत्रूंनीं सकृद्दर्शनींच जो हा निकराचा हल्ला केला, त्या वेळीं जिवबादादा नुसत्या तोफखान्यावर अवलंबून असते, तर त्यांजवर लौकरच मोठा बिकट प्रसंग ओढवता. पण त्या शूर व चतुर वीरानें राहाटोरांचा हल्ला निवारण करण्यासाठीं स्वतः पुढें सरसावून तरवार चालू केली. जिवबादादा लढाईंत घुसले कीं, त्यांच्या तालमींतील फौज संकेतपूर्वक मागून पुढें युद्धांत घुसावयाचीच. अशा रीतीनें तरवारींची भयंकर खणाखण चालू झाल्यावर उभय दळांतील रणमद चढलेल्या वीरांच्या आरोळ्यांनीं ती समरभूमी दणाणून गेली. लखबादादा, जगोबा बापू, राणाखान, डि. बॉईन वगैरे योद्ध्यांनीं निरनिराळ्या दिशेनें व निरनिराळ्या प्रकारें शत्रूंवर मारा सुरू केला. याप्रमाणें राहाटोरांनीं जरी मोठ्या शौर्यानें लढाई चालविली होती, तरी तरवारींच्या सपाट्यांत व तोफांच्या माऱ्यांत सांपडून कोंडमारा झाल्यामुळें, त्यांचा मराठ्यांपुढें इलाज चालेनासा झाला. आणि जरी शत्रूंस पाठ दाखवावयाची नाहीं असा त्यांचा बाणा होता, तरी संध्याकाळचे सुमारास त्यांचा पूर्ण पराभव होऊन, त्यांना मागें फिरावें लागलें. जिवबादादांनीं आपल्या सरदारांकडून चोहों बाजूंनीं शत्रूंस घेरून त्यांची कत्तल उडविली. या लढाईंत शत्रूंकडील सुमारें बारा हजार लोक मराठ्यांनीं कैद केले. त्यांचीं निशाणें, हत्ती, घोडे, उंटें, तोफा वगैरे पुष्कळ सामान मराठ्यांस मिळालें. ह्या लढाईंत रजपुतांची मराठ्यांच्या बायकापोरांनींही त्यांस यथेच्छ लुटण्यापर्यंत गाळण उडाली, असें टॉड साहेब लिहितात! या लढाईंत राहाटोरांच्या झालेल्या नुकसानीसंबंधानें जयपूरकरांनीं खालील पद्य रचिलें होतें.

" घोरा जूरा पग्री । मूच्छा कग मारवार "
" पांच रेक्मा मेल लिदा । पाटनमें राहटोर "

याचें भाषांतर कर्नल टॉड साहेबांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—

" Horse, shoes, turban, mustaches, sword of Marwar,
Five things surrendered were, at Patan by the Rahtores."

याप्रमाणें राहाटोरांचेंच सर्वस्वी नुकसान झालें असें नाहीं, तर कृतघ्न इस्मायल बेगाचीही बहुतेक फौज मारली गेली, व कैद झाली. आणि शेवटीं मराठे आतां आपल्या अपराधाचें प्रायश्चित्त भोगविल्याशिवाय राहणार नाहींत, ह्मणून तो त्या गर्दींतून थोड्या लोकांसह विजयसिंगाच्या आश्रयास जाण्याकरितां नागोर एथें पळून गेला! या लढाईनंतर तीन दिवसांनीं पाटण शहर मराठ्यांनीं काबीज व जमीनदोस्त करून तेथील, रजपूत संस्थानिकांस कैद केलें. या लढाईंत मराठ्यांचेही सात आठशें लोक पडले. परंतु शत्रुपक्षाचा फार नाश होऊन त्यांचा मराठ्यांनीं जयपूरपर्यंत पाठ-

---

१. " Even the women, it is averred, plundered them (Rahtores) of their horses on this disastrous day."

Todd's Rajasthan. Vol. I. p. 801.

२. " ३६१ खासे व स्वार ठार झाले. घोडीं १७३ जखमी व ठार." पत्रें व यादी पृ. ३५४।३५५.

लाग केला, आणि वाटेंत हजारो लोकांची कत्तल केली. ह्या जयाच्या डांका पाटीलबावांस पोहोंचतांच त्यांनीं खालील शब्दांनीं गौरव केला. "इस्माल बेग व दोनही राजांच्या फौजा व हरामखोरांचीं पलटणें इतके भारी जमावानिशीं–अडचणीची जागा व मारवाडी त्यांत आणखी येऊन सामील जाहले. त्यावरून–हवाभरित होऊन लढाईस आले. त्यास तुह्मीं सर्वांनीं सरकारनक्षावर दृष्टी देऊन आराबा व अडचण असतां घोडे घालून शत्रूंचें पारपत्य केलें. तोफा घेतल्या. तळ लुटून सरकारनक्षा केला. मोठी गोष्टी केली. तुह्मी हमेषा सरकारचाकरी करीत आलां व पुढेंहि कराल ही खातरजमा आहे."

अशा तऱ्हेनें जयपुरांत जय पावल्यावर जिवबादादांनीं मारवाडावर आपला मोर्चा फिरविला. व राणा बिजयसिंग यास प्रथमतः सामोपचारानें निरोप पाठविला कीं, "पूर्वीं आपासाहेबांच्या वेळीं शिंदेसरकार व आपण यांजमध्यें जो तह झाला आहे, त्याप्रमाणें प्रतिवर्षाची खंडणी बरींच वर्षेंपर्यंत आपल्याकडून मिळत गेली. पण अलीकडे आपण सर्व रजपुतांनीं एक जूट करून मराठ्यांची सत्ता आपल्या मुलखांतून काढून टाकण्याचें योजिलें. व पूर्वींचे तह व करारनामे सारे गुंडाळून ठेवून, आह्मांवर शस्त्र धरून उठलां आहां. सबब आह्मांसही आपल्यावर तरवार परजून एथवर यावें लागलें. आतां सलोख्याच्या रीतीनें आपल्यास एवढेंच कळवावयाचें आहे कीं, चालत आल्याप्रमाणें खंडणीचा ऐवज व वरील तहाअन्वयें मिळालेला व आजतागाईत शिंद्यांकडे चाललेला अजमीरचा किल्ला, हीं बिनहरकत मिळावीं, व हें कबूल असल्यास कळवावें. कबूल नसल्यास लढाईची तयारी करावी." हा खरमरीत निरोप बिजेसिंगास कळतांच संतापानें त्याच्या आंगाचा तिळपापड झाला. लागलेच त्यानें आपले सर्व सरदार, मानकरी व किशनगर, रूपनगर, बिकानीर वगैरे संस्थानचे संस्थानिक यांस बोलावून एक जंगी दरबार भरविला, व मराठ्यांस प्रत्युत्तर काय द्यावें, याबद्दल सर्वांचें मत घेतलें. त्यांत असें ठरलें कीं, पाटणच्या अपजयामुळें हतवीर्य न होतां सर्व राहाटोरांनीं पुनः मिळेल तेवढी फौज जमवून, मराठ्यांच्या नाशार्थ एकवार प्रयत्न करून पाहावा. खुद्द बिजेसिंगानें पाटणच्या रणभूमीवर रजपुतांची जी दुर्दशा झाली ह्मणून ऐकिली होती, तिजवरून मराठ्यांवर जय मिळविण्याच्या खटपटीस कितीसें यश येईल, याचें त्यास अनुमान होतें. तरी आपल्या सरदारांचा आवेश व रणोत्साह पाहून कदाचित् आपल्या पक्षास यश येण्याचा संभव आहे, व सर्व भोंवतालील संस्थानिकांच्या शूर फौजा एकत्र करून लढाई केल्यास आपलें शौर्य बहुधा फुकट जाणार नाहीं, अशी त्यास आशा उत्पन्न झाली. आणि त्यानें संशयानें माघार न घेतां जिवबादादांना लागलाच निरोप पाठविला कीं, 'खंडणी मिळणार नाहीं. आमच्याकडून लढाईची तयारी आहे.' असा निरोप पाठवून त्यानें राजस्थानांतील झाडून सारे राहाटोर, रांगडे, ठाकूर, पुरभय्ये, इत्यादि शूर शिपाई त्यांच्या शूरवर सेनापतींसह मीरत शहरीं एकत्र व्हावे, अशीं त्यांना आज्ञापत्रें रवाना केलीं. व ज्यांस मित्रत्वाच्या नात्यानें सन्मानपुरःसर लिहावयाचें, त्यांस तशा थैल्या पाठविल्या. पाटणच्या पूर्ण पराभवामुळें सर्व राजस्थानांत आधींच

१. नातूकृत महादजी शिंद्यांचें चरित्र पृ. २३२।२३३.

२. पहा पत्र नंबर ५१. हें पत्र पाटीलबावांनीं जिवबादादांच्या हाताखालील आपले सरदार विठ्ठल साबाजी रेंगे, यांस लिहिलें आहे. ह्यावरून खुद्द जिवबादादांचा पराक्रम व पाटीलबावांकडून त्यांचा होणारा गौरव, ह्यांचें अनुमान सहज होईल. पाटीलबावा व जिवबादादा यांजमधील महत्त्वाचा पत्रव्यवहार, कागदांचा नाश झाल्यामुळें, सांपडला नाहीं. त्यामुळें पुष्कळ खराखुरा इतिहास लुप्तप्राय झाला आहे.

खळबळ उडून गेली होती, आणि त्यांच्या चित्तांत मराठ्यांचें अत्यंत वैर बाणलें होतें. त्यांत बिजयसिंगाचें आग्रहाचें व हिंमतीचें बोलावणें गेल्यामुळें त्यांचा रणोत्साह दुणावला. तो इतका कीं, बाहेरील चौदा वर्षांपासून साठ वर्षांपर्यंतचे असे तीस हजार रणशूर लढाऊ लोक तयार होऊन पाटणच्या अपयशाचा कलंक धुऊन काढण्यासाठीं मेरटेच्या भव्य पटांगणावर बिजयसिंगाच्या ध्वजाखालीं गोळा झाले. हें मीरत शहर अजमीरच्या पूर्वेस पंधरा कोसांवर एका उंच प्रदेशावर असून, त्याच्या उत्तर प्रदेशीं राजस्थानच्या इतिहासांत लढायांविषयीं सुप्रसिद्ध असें पूर्वोक्त विस्तीर्ण पटांगण आहे. या प्रसंगीं बिजयसिंगाकडे त्याच्या सैन्यासुद्धां जिवावर उदार झालेले, असे निवडक साठ हजार लोक होते. यांच्या योग्यतेचें वर्णन जुन्या बखरींत खालीं लिहिल्याप्रमाणें आढळतें.

"ते केसरी रंग (पोषाख) करून लढाईस येतात. ते यश आल्यास घरीं जातात. न जाहल्यास तरवार करून मरतात. पाठीं फिरत नाहींत." कारण "ज्या मारवाडी यांस समोर जखमा (होतात), त्यांच्या स्त्रिया काया कुरवंडी करून जयजयकार करितात. (पण) ज्यांस पाठीवर जखमा (होतात), त्यांच्या स्त्रिया पतींचा त्याग करितात. मारवाड प्रांतीं दस्तुर हाच कीं, समोर घाव घेतला तरी उत्तम. नाहीं तरी पुरुषाचें स्त्रियांनीं मुखावलोकन करूं नये. (जेथें) रजपूत स्त्रियांची हिंमत या रीतीची, तेथें पुरुषांची शिफारस कोठवर लिहावी ?" सारांश, या प्रसंगीं आमच्या चरित्रनायकाचे प्रतिपक्षी युरोपांतील प्रसिद्ध स्पार्टन लोकांप्रमाणें शौर्य, धैर्य, दृढनिश्चय इत्यादि गुणांत अजिंक्य मानिलेले असून, या प्रसंगीं आपल्या संपूर्ण राष्ट्राच्या हितासाठीं ते एकदिल झाले होते. त्यांनीं आपल्या सैन्याची एक टोळी 'डांगीवास' एथें ठेविली. असें करण्यांत त्यांचा हेतु इतकाच होता कीं, दैववशात् मराठ्यांचा जोर जास्त दिसूं लागल्यास, ही नवीन दमाची फौज आणावी, व तोंपर्यंत त्यांनीं तेथें विश्रांति घ्यावी.

इकडे प्रतिपक्षाची ही कडेकोट तयारी पाहून, आमच्या दक्षिणी पठ्ठ्यांनींही आपल्या तरवारी, भाले, बर्च्या वगैरे शस्त्रें शाणनिशित केलीं. 'देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत्' असा निश्चय करून ते निघाले. सांबर, रूपनगर इत्यादि स्थलें प्रथमतः काबीज करून, मग संपूर्ण राजस्थानांत प्रसिद्ध जो 'तारागड' नांवाचा अजमीरचा किल्ला, त्याजवर चाल केली. हा जुनाट पहाडी किल्ला, मारवाड व जयपूर यांच्या सरहद्दीवरील एका उंच व दुर्गम टेंकडीवर बांधलेला असून, प्रसिद्ध आग्र्याच्या किल्ल्याप्रमाणें फार बळकट व शत्रूंस अजिंक्य असा आहे. किल्ल्याच्या सभोंवार निरनिराळे प्रचंड तट, त्यांच्यामध्यें एकेक भयंकर खंदक, तटांस बाहेरील शत्रूंवर तोफांचा मारा करण्यासाठीं तऱ्हेतऱ्हेच्या सोई असून, त्यास जागोजाग शोभायमान बुरूज होते. हा किल्ला सर करण्यासाठीं जिवबादादांनीं जगोबा बापूंची योजना केली, व आपण लखबादादा, गोपाळराव, डि. बॉईन वगैरे सरदारांसह लुनी नदी उतरून

---

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८३.

२. भाऊसाहेबांची बखर पृ. १४।१५.

३. गोपाळराव भाऊ चिटणीस हे प्रभू ज्ञातीचे गृहस्थ असून प्रसिद्ध शिवाजीमहाराजांचे वेळचे बाळाजी आवजी चिटणीस यांचे वंशज होत. हे तरवारीच्या कामांत फार वाकबगार होते. यांनीं बहुतेक लढायांत चांगली कामगारी बजाविली. यांचे वंशज हल्लीं ग्वाल्हेरींत आहेत. शेणवी व प्रभू यांस मराठे, रजपूत व मुसलमान हे जवळ बाळगितात, अशी पूर्वापार चाल आहे. कारण ते मुत्सद्दी, शूर व स्वामिभक्त असून, थोर मनाचे असतात, असा त्यांचा लौकिक आहे. पहा क्राफर्डकृत 'त्रबलस इन् पुना' पुस्तक, डा. ब्लेनीकृत पुस्तक वगैरे.

मेरटेच्या रणांत शत्रूंची खबर घेण्यासाठीं निघाले. जगोबा बापू किल्ल्याची मोर्चेबंदी करिताहेत, तों स्वतः पाटीलबावा कांहीं फौजेसह बापूंच्या मदतीसाठीं अजमीर एथें येऊन दाखल झाले. किल्ल्यावर राहाटोर लोकांचा बराच जमाव होता. व दारूगोळा वगैरे युद्धोपयोगी सामानही त्यांजपाशीं मुबलक शिल्लक होतें. जगोबा बापूंनीं सर्व दिशांनीं मोर्चेबंदी केली व तोफांच्या वृष्टीनें किल्ल्याचे बुरूज पाडावे किंवा तटास तरी कांहीं भगदाडें पाडून आंत प्रवेश करावा, ह्मणून पुष्कळ प्रयत्न केले. पण तो अजस्र तट कांहीं केल्या दाद देईना. शिवबा नाना यांनीं मोठमोठे सुरुंग घालून तट ढांसळून पाडण्याची खटपट करून पाहिली. पण ज्या तटाचा भक्कम पाया भूमातेनेंच आपल्या उदरांत घट्ट आंवळून धरिला होता, तो असल्या मानवी प्रयत्नांस कितीसा हार जाईल? घातलेले सुरुंग मेघगर्जनेप्रमाणें भयंकर गडगडाट करून उडून जाऊं लागले. बाहेरची रसद बंद केली होती. पण आंत दाणापाण्याचा सांठा किती असावा याचा बरोबर अंदाज होईना. पुढें मेरटेवर जिवबादादा गेले होते त्यांस लौकर जाऊन मिळण्याची तांतड होतीच. आणि आंतील लोक बाहेर येऊन लढाईस उभे राहण्याची आशा दिसेना. यास्तव जगोबा बापू व शिवबा नाना या उभयतां बंधूंनीं असा विचार केला कीं, 'एथें आणखी कांहीं दिवस राहिलों, तरी लढाईचा सोक्षमोक्ष त्वरित होण्याची आशा नाहीं. त्यापेक्षां तूर्त किल्ल्याभोंवतालचा वेढा असाच ठेवून, बाहेरची रसद आंत न पोहोंचे अशा खबरदारीनें शिवबा नानांनीं तेथें राहावें, व जगोबा बापूंनीं कांहीं सैन्य बरोबर घेऊन मीरत एथें जिवबादादांच्या मदतीस जावें. दरम्यान किल्लेदार वठणीस येऊन आपण होऊन किल्ला स्वाधीन करील तर ठीकच. नाहींपेक्षां राठोडांचा मोड करून आपण परतून येऊं त्या वेळीं एथील किल्लेदारांची खबर घेतां येईल.' हा विचार पाटीलबावांसही पसंत पडला, व लागलेच जगोबा बापू आपल्या फौजेसह मेडत्यास (मेरटेस) जाण्यासाठीं निघाले, व शिवबा नाना अजमीरचा वेढा सांभाळून राहिले.

तिकडे जिवबादादा वगैरे सरदार लुनी नदी उतरून मेडतें एथें जाऊन पोंचले. तरी डि. बॉयनाचीं पलटणें व तोफखाना अद्याप नदीपार झाला नव्हता. योग्य खबरदारी न घेतल्यामुळें बहुतेक तोफा नदीच्या तळीं रेतींत खोल पुरल्या. त्या कांहीं केल्या बाहेर निघेनात. त्यामुळें डि. बॉइनसाहेब कंपूतोफांसह तेथेंच अडकून राहिले. या संधीस रजपुतांनीं मराठ्यांवर हल्ला केला असता, तर त्यांचा कांहींसा नाश होण्याचा संभव होता. पण त्याप्रमाणें घडून आलें नाहीं. याचें कारण इस्मायल बेगाची भक्कम मदत राहाटोरांस येऊन मिळावयाची, ती अझून आली नव्हती. व ती येण्यापूर्वी अपुऱ्या तयारीनें मराठ्यांशीं कटकट करूं नये, असा रजपूत सेनापति भीमराज सिंगवी, याचा विचार पडला. राणा बिजयसिंग व त्याचे मुख्य दिवाण खुबचंद, हे या लढाईच्या वेळीं जोधपुरांतच राहिले असून, तेथून लढाईच्या वगैरे बाबतींत महत्त्वाचे हुकूम फरमावीत असत. अर्वा एथील ठाकूर शिवसिंग व असोप एथील महीदास, हे दोन रणशूर ठाकूर 'संपूर्ण राजस्थान मराठ्यांच्या जाचांतून मुक्त करूं किंवा मरूं' अशी दारुण प्रतिज्ञा करून आले होते. त्यांनीं डि. बॉइन साहेबांची ही अशी स्थिति पाहून मराठ्यांवर त्याच वेळीं हल्ला करण्याबद्दल सेनानायकांकडे परवानगी मागितली. पण वर सांगितल्याप्रमाणें इस्मायल बेग याची कुमक येईपर्यंत मराठ्यांचे वाटेस जाऊं नये, अशा अर्थाचा दिवाण खूबचंद सिंगवी याच्या सहीशिक्क्याचा हुकूम सेनानायकांनीं त्यांचे आंगावर टाकला. यामुळें त्या दोघां वीरांचा निरुपाय झाला. अर्थात् शिवसिंग व महीदास यांस इस्मायल बेगाची मदत येईपर्यंत कांहीं हालचाल न करितां स्वस्थ बसावें लागलें. तरी त्यांनीं मरा-

त्यांच्या लष्करच्या जनावरांसाठीं जीं वैरणीचीं हजारों ओझीं बैलांवरून त्यांच्या छावणीकडे जात होतीं, त्यांजवर एकदम छापे घालून जनावरांसुद्धां तीं घेऊन जाण्यास कमी केलें नाहीं. असा उपद्रव नेहमीं असल्यामुळें मराठ्यांकडे वैरणीचा अतिशयित तोटा पडूं लागला. इतक्यांत इस्मायल बेगही आपल्या फौजेसह रजपुतांस येऊन मिळाला.

मग जिवबादादांनीं आपला तोफखाना, कवायती पलटणें व रिसाला, हीं सज्ज करून ता० १० सप्टेंबर इ० स० १७९० रोजीं राहाटोरांवर हल्ला करण्याचा बेत केला. रजपूत लोक नित्य रात्रीं अफूचें कैफ करून झोंप घेत असत. तेव्हां ते पहांटेस उठण्यापूर्वींच हल्ला करून धूळधाण उडवावी, ह्मणून त्यांच्या छावणीसभोंवतीं वेढा देऊन लखबादादांनीं त्यांजवर तोफांचा मारा सुरू केला. त्या क्षणीं ते सर्व लोक जागे होऊन पाहतात, तों मराठे आपल्या गोटापर्यंत येऊन भिडले आहेत. व तोफाबंदुकांच्या गोळ्यांनीं आपलेकडील शेंकडो लोक गतप्राण व घायाळ होऊन पडले आहेत. मग साऱ्या छावणींत एकच हाहाकार उडून गेला. पण ते तसेच धडेल छातीचे रजपूत होते! त्यांनीं सळासळ आपल्या तलवारी म्यानांतून उपसल्या. आणि चार हजार राठोडांची एक टोळी एकदम गोटांतून बाहेर पडून, बेधडक मराठ्यांच्या तोफखान्यावर चालून आली. व लागलीच तोफखान्यावर लगट करून त्यांनीं मोठ्या जोगनें कापाकापी चालविली. त्यामुळें मराठ्यांचा तोफखाना बंद पडला. तोफा डागण्याचें काम बंद पडलेलें पाहतांच जिवबादादांनीं आपला घोडा वळवून पाहिलें, तों केशरी पोषाखावर लाल रक्ताचा छिडकाव झाल्यामुळें फुललेल्या पळसाप्रमाणें दिसत असलेले आणि आगंतुक छापा घातल्यामुळें वाघाप्रमाणें चवताळलेले ते कर्दनकाळ रजपूत त्यांच्या दृष्टीस पडले! वर सांगितल्याप्रमाणें राहाटोरांच्या टोळीनें मराठ्यांच्या फौजेंत बराच प्रळय केला. तोंच शस्त्रास्त्रांनीं सज्ज झालेले आणखी हजारो ठाकूर, पुरभय्ये, रांगडे वगैरे शूर रजपूत छावणींतून बाहेर पडूं लागले. 'दोन्हीही सैन्यें परस्परांत मिसळल्यामुळें त्या रणकंदनांत स्वपरभेदही नीट लक्षांत येईनासा झाला. या प्रसंगीं मराठ्यांच्या लष्करांत सेनानायक जिवबादादांशिवाय लखबादादा, जगोबा बापू, गोपाळराव भाऊ, यशवंतराव शिवाजी वागळे, डि. बॉइन, सदाशिव मल्हार, आपा खंडेराव, राणाखानभाई, यशवंतराव भाऊ, विठ्ठल साबाजी रेगे वगैरे प्रसिद्ध सरदार असून, शिवाय तुकोजीराव होळकर, बापूराव होळकर व अलीबहादर हे बाहेरील सरदार साह्यासाठीं आले होते.[1]

मराठ्यांनीं आरंभींच शत्रूंची त्रेधा उडविली खरी, पण पुढें शत्रूंची सरशी जास्त दिसूं लागली. दोहों पक्षांची खडाजंगी चालली असून रजपुतांकडील तिरंदाजी करणारी एक टोळी दुरून मराठ्यांवर शरसंधान करीत होती. त्यांतून अकस्मात् एक तीव्र बाण येऊन जिवबादादांच्या घोड्याच्या मर्मस्थानीं लागल्यामुळें तो घायाळ होऊन तत्काळ खालीं पडला. तें पाहतांच लढाईंत जिवबादादाच पडले, अशी वार्ता पसरून चोहोंकडे हाहाकार उडाला. आणि आपला सेनापति गेला ह्मणून अवसान सुटून लोक कांहींसे विसकटले, व कांहीं तुकड्या पळूनही जाऊं लागल्या. इतक्यांत जिवबादादा दुसऱ्या घोड्यावर स्वार होऊन आपल्या लोकांस प्रोत्साहन देत असलेले त्यांच्या नजरेस पडले. तेव्हां त्यांस धीर येऊन ते पूर्ववत् लढाईच्या जागीं आले. जिवबादादांनीं ही सारी

---

१. "कित्येक ठिकाणीं या लढाईंत होळकराच्या फौजेनें कांहींच काम केलें नाहीं असें लिहिलें आहे." परंतु ह्या लढाईचें यश निरनिराळे लोक घेत आहेत. पहा नातूकृत चरित्र पृ. २३३. होळकरांस नानांची शिकवण होती, त्यामुळें त्यांजकडून पराक्रम झाला नसावा हें खरें दिसतें.

अव्यवस्था एका क्षणांत मोडून टाकून आपल्या लोकांस इतका चेव आणिला कीं, ते द्विगुणित वीरश्रीनें घे, घे, ह्मणत एकदम शत्रूंवर तुटून पडले. त्या वेळचा तो अवर्णनीय युद्धचमत्कार "काय सांगावा? आधींच तरवारबहाद्दर सुप्रसिद्ध असे राहाटोर; आणि त्यांत त्या दिवशीं ते 'केशरया' करून 'मारूं किंवा मरूं' अशा निश्चयानें कुसुंबा घेऊन लढाईस आले होते. मग मरणाची परवा नसलेल्या त्या रणशूर राठोडांनीं त्या दिवशीं मोठा प्रलय मांडला हें काय सांगावें! शिंद्यांच्या लष्करांत एकट्या जिवबादादांनींच काय तो केशरिया केला होता. त्यांजकडील तोफखान्याच्या संरक्षणार्थ जी टोळी नेमिली होती, तिच्या योग्य कर्तबगारीनें आरंभींच शत्रूंचा भयंकर नाश झाला होता. व या प्रसंगीं गोलंदाजांनीं आपल्या कौशल्याची परमावधीच करून सोडिली होती. एकसारखे दोन कंपूंचे तोफखाने लागले होते. पण शाबास त्या राठोडांची कीं, समोरून येणाऱ्या तोफांच्या गोळ्यांस चेंडूप्रमाणें मानून मराठ्यांच्या तोफखान्यावर त्यांनीं एकसारखी लांडगेतोड केली. त्या कामीं व्यक्त झालेलें त्यांचें शौर्य फारच अद्वितीय व तारीफ करण्यासारखें होतें, यांत शंका नाहीं. या वेळीं डि. बॉयनाचा मोड होऊन तो मागें हटला. रजपुतांच्या जोराच्या हल्ल्यामुळें, मराठ्यांची फौज जरी एवढी हिंमतदार, तरी या प्रसंगीं कित्येक वेळां त्यांना जुन्या 'गनिमी' काव्याचा अवलंब करून रजपुतांस वाट द्यावी लागली. याप्रमाणें रजपुतांची तोफखान्याशीं लगट झाली. जिवबादादांनीं विसकळित झालेली आपली फौज पुनः सांवरून, बरोबर जगोबा बापू व लखबादादा वगैरे सर्व शूर सरदार घेऊन 'हरहर महादेव' असा जयघोष करून, आपल्या गोटांत आलेल्या त्या राठोडांची कत्तल चालविली. त्या वेळीं "बहुत भारती लढाईसारखे मुडद्यांवर मुडदे पडले." "रणांगणांत राजस्थानांतील निवडक शूर पुरुषांचे प्रेतांचे ढीग पडले." इतकी लढाई मातबर होऊन उभय सैन्यें एकमेकांत मिसळून मोठी हाणामार चालली.

ह्याप्रमाणें मराठे व रजपूत ह्यांची एका बाजूनें खंडाजंगी उडालेली असतां, डावे बाजूनें इस्मायल बेगानें आपले लढवय्ये पठाण आणून त्यांजकडून मराठ्यांच्या फौजेवर एकाएकीं हल्ला करविला. लालसोटच्या विजयाचें स्मरण देऊन रजपूत सेनानायक भीमराज सिंगवी हा आपल्या सैन्यास स्फुरण आणीत होता. त्याचप्रमाणें मराठ्यांचे सेनानायक जिवबादादा नुकत्याच झालेल्या पाटण एथील विजयाचें स्मरण देऊन आपल्या लोकांत युद्धोत्साह उत्पन्न करीत होते. असें होतां होतां युद्ध फारच तुंबळ माजलें. परंतु, पुढें मोठ्या निकरानें आलेल्या त्या हजारो शूर राठोडांपैकीं एकही शिपाई जिवंत राहिला नाहीं. ह्या वेळीं असोप, अर्वा, चांदोड, गोविंदगड, अलनिवास इत्यादि ठिकाणचे मांडलिक शूर ठाकूर समरांगणांत पडले. नंतर दुसरे दिवशीं ह्मणजे तारीख ११ आक्टोबर सन १७९० रोजीं "मेरटेवर अकराशें बाकी राहिले. ते समरंगणीं एकएकानें तरवार करून रणांत पडले. बाकी फौज हारून पळाली. जिवबादादानें मोठे प्रतापेंकरून ती लढाई मारून फत्ते केली."

१. घ. ना. कैफीयत परि. १, पृ. ४९, व पत्र नंबर ४००.

२. होळकरांची कैफीयत. ह्या प्रसंगीं डि. बॉयन फार घाबरून टोपी काढून मदतीसाठीं होळकरांकडे गेला, असें तींत लिहिलें आहे.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८३.

४. नातूकृत महादजी शिंद्यांचें च. पृ. २३५.

५. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८३.

या लढाईंत शेवटीं अशाप्रकारें रजपुतांचा अगदीं पराभव झाला खरा, तरी त्यांतील शेंकडो शूर पुरुषांनीं मोठ्या बहादुरीनें आपली तरवार गाजवून मराठ्यांचा बराच नाश केला. रजपुतांचें शौर्य, धैर्य व धाडस, हीं आश्चर्यकारक खरीं. त्या शूरवरांत शेवटीं शेवटीं मराठ्यांच्या सैन्यामध्यें आवेशानें घुसून ज्यानें त्यांत प्रलय करून सोडिला होता, संपूर्ण रजपूतांचा जो जीव कीं प्राण, तो "आहवा येथील रणशूर ठाकूर (शिवसिंग) सत्तावीस जखमा लागल्या तरी रणांगणांत कण्हत पडला होता. त्यास लखबादादानें आणून औषधोपचार करून बरें करविलें, व त्याचें शौर्य ऐकून राणा बिजयसिंग स्वतः त्याला भेटण्यास येत होता, इतक्यांतच त्या वृद्ध वीराचा अंत झाला!" याचप्रमाणें रणधुरंधर जिवबादादांनीं मेढतें (मिर्ता) शहरावर हल्ला करून तें काबीज केलें. तेथें त्यांस मुबलक लूट सांपडली. सेनापति भीमराज सिंगवी नागोर एथें पळून गेला. व हें अपेश घेऊन राणा प्रतापसिंग यास तोंड कसें दाखवावें, असें ह्मणून त्यानें विष खाऊन प्राणत्याग केला. दुय्यम सेनानायक गंगाराम बिनधारी व सरदार अलियार बेग खान यांस जिवबादादांनीं मेढतें एथें पकडून आपल्या छावणींत आणविलें. मग ही रजपुतांच्या पूर्ण पराभवाची वार्ता राणा प्रतापसिंग ह्यास कळतांच त्यानें तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां "त्यांच्याशीं सलूख ठरला, साठ लक्ष रुपये खंडणी ठरली. त्यांत आठ लक्ष रोकड घ्यावें. आठां लक्षांचा मुलूख सांबर, रूपनगर वगैरे घ्यावें. बाकी राहिले, ते पुढें वाइदा मुजतीप्रमाणें भरावे. असा जाबसाल ठरून श्रीमंतांच्या सर्व्या फौजा दादा वगैरे एक मजल माघारें अलीकडे आले."[1]

या युद्धांत रजपुतांची पूर्णपणें व मराठ्यांची बरीच खराबी झाली. जे लोक मरून पडले, त्यांच्या प्रेतांची व्यवस्था आणि जे जखमी होऊन कण्हत पडलेले होते, त्यांस औषधोपचार करवून त्यांची उत्तम शुश्रूषा जिवबादादांच्या सांगण्यावरून लखबादादांनीं यथास्थित ठेविली. मग तेथून मैराठ्यांचें लष्कर मागें फिरलें. ही गोष्ट इ० स० १७९० च्या आक्टोबरच्या अखेरीस घडली.

याप्रमाणें रजपुतांचा पूर्ण पराभव झाला. तरी अजमीरचा किल्ला जो अरवली पहाडांतील एका उंच भागावर फारच बळकट असा होता, तो अझून हातीं आला नव्हताच. यास्तव जगोबा बापूंनीं पूर्वीं संकेत केल्याप्रमाणें या निघालेल्या जिवबादादांचे स्वारीबरोबर येऊन अजमीर किल्ल्यावर चौल केली. तेथील किल्लेदार दमराज या नांवाचा असून, तो अजून आपल्या नांवाप्रमाणें दम धरून राहिला होता. शिवबा नानाच्या मजबूद वेढ्यामुळें बाहेरचें चिटपांखरूंही आंत फिरकूं शकत नव्हतें. जिवबादादा, जगोबा बापू व लखबादादा, हे अजमीर एथें येऊन पोहोंचल्यावर, त्यांनीं त्या किल्ल्याच्या तटावर-तोफा नेमक्या लागू पडतील अशी उंच जागा शोधून काढून तेथून तोफांची मारगिरी चालू केली. या कामावर जगोबा बापूंनीं "महमद जमादार व मानसिंग जमादार" असे दोन शूर व माहितगार मनुष्य नेमिले होते. हे किल्ल्यांच्या लढायांत मोठे वाकबगार असल्यामुळें यांस

---

१. आं. नातूकृत महादजींचें च. पृ. २३६.

२. पहा पत्र नंबर ५६. लखबादादाचे एथें मिळालेल्या पत्रांत मजकूर आहे तो असा:—"मारवाडवाल्या राजाचें पारपत्य यथास्थित जाहालें. तेव्हां हालीं सलूख ठरला. पांसष्ट लक्ष रुपये देणीं ठरलें. व अजमेर द्यावयाची केली. तसाच जैपूरवालेचा सलूख ठरण्यांत आला. सर्व्या फौजा तेथून माघारें महिनेंत येतील. × × (लखबा) दादा व जिवबादादा ×× ह्या उभयतांनीं चांगली तरवार मारून रांगडे फजीत केले. त्यामुळें श्रीमंत महाराजांची कृपा पूर्ण उभयतांवर आहे. ती कोठवर लिहावी!" पहा पत्र नंबर ४१७.

सन्मानार्थ राजे ह्मणत. हे जगोबा बापूंस लष्करच्या छावणींत वेळोवेळ घडलेली हकीकत लिहून कळवीत व लढाईची व्यवस्था ठेवणेचे कामीं जे अडचणीचे प्रसंग येत, त्यांचा निकाल ज्याप्रमाणें बापूंकडून लिहून येई, त्याप्रमाणें करीत. त्यांतील एका चिठीचा उताराः—

"तुह्मी चिठी पाठविली ती पावोन लिहिला मजकूर विदित जाहाला. पडल्या बुरुजाखालीं मोर्चे जाऊन पोहोंचले. किलयाची खिडकी तेथें आहे. त्यांतून मार भारी होतो. याकरितां गर्भछाट तोफ डावे बाजूस लावावयाचें लिहिलें, त्यास माणसें जायां होतील, तें ठीक नाहीं. टेंकडीचे डावे बाजूस जागा चांगली पाहून गर्भछाट तोफ चालू करून वरील मारगिरी बंद होय तें करणें. पलटणचे पहारे, ही स्वारी तेथें आल्यावरी नेमून दिल्हे जातील. तूर्त तोफ मात्र लागू करणें. गर्भछाटही लागू करणें. आणि दुसऱ्याही दोन तोफा डावे बाजूस जागा पाहून लागू करणें. मोर्चे पडल्या बुरुजाखालीं गेले आहेत. तेव्हां गर्भछाटेंतील दगडानें मोर्च्यांतील माणसें जायां न होत अशी जागा पाहून तोफा लागू करणें. ह्मणजे आडवी मार सहजच बंद होईल. मोर्चे वाढविण्याचें स्वारी आलियावरी सांगूं तसें करणें." ह्याप्रमाणें उभय पक्षांकडून तोफांचा मारा सुरू होऊन लढाई जोरांत आली. परंतु मराठ्यांकडील गोळ्यांच्या भयंकर वर्षावानें किल्याचे तटास खिंडारें पडून बुरूजही ढांसळून पडूं लागले, तेव्हां आतां 'मराठ्यांपुढें आपला निभाव लागणें शक्य नाहीं' असें पाहून, किल्लेदार दमराज यानें हिरकणी खाऊन प्राण दिला. त्यामुळें किल्ल्यांतील लोकांचा धीर सुटला. तेव्हां लागलेच मराठे किल्ल्यावर चढले. याप्रमाणें "जगोबा बापूनें अजमीरची लढाई करून किल्ला घेतला," आणि त्यावर शिंद्यांचें निशाण लाविलें. ही अजमीरची लढाई सुमारें दोन महिने सुरू होती. व सन १७९१ च्या फेब्रुआरींत किल्ला हातीं आला. हें काम आटपल्यावर शिवबा नाना जावद एथें आपल्या सुभ्याच्या कामावर गेले.

हें सर्व यश आपल्याला केवळ जिवबादादांच्याच प्रतापानें प्राप्त झालें, ह्मणून पाटीलबावा त्यांजवर फार संतुष्ट झाले. तेवढा इस्मायल बेग काय तो एक शत्रु—पळालेल्या फौजेंतून निघून गेल्यामुळें—उरला होता. "त्यास लवकरच पकडून आणून श्रीमंतांच्या चरणीं रुजू करितों." असें जिवबादादांनीं पाटीलबावांस आश्वासन दिलें होतें. मनोदयानुरूप ही सर्व कार्यसिद्धि झाल्यावर अजमीरची सुभेदारी पाटीलबावांनीं जिवबादादांचे बंधु शिवबा नाना यांस सांगितली. हें काम मोठ्याच जोखमाचें होतें. तरी पाटीलबावांच्या आग्रहास्तव शिवबा नानास तें पतकरावें लागलें. याबद्दलची जिवबादादांनीं एका पत्रांत हकीकत लिहिली आहे ती अशीः—"अजमीरच्या किल्ल्यावर आपला अंमल जाहाला. किल्ला व तेथील मामलत आपणाकडे घ्यावी ऐसी यजमान साहेबांची मर्जी. त्यावरून चिरंजीव जगन्नाथ अजमेरीस लोकसुद्धां ठेविले होते. आह्मी इकडे सडे फौजेंत होतों. महाराजांचा मुकाम अजमेरीचे नजीक आला. तेव्हां चिरंजीव राजश्री शिवबा यासी सरकारचें आज्ञापत्र गेलें कीं अजमीरच्या किल्याचा मामलतीचा जाबसाल किल्यासुद्धां आपल्याकडे ठरवून फाल्गुन शुद्ध २ (ता० ६ मार्च सन १७९१ रविवार) रोजीं चिरंजीव शिवबा यासीं वस्त्रें सरकारांतून दिलीं. हालीं शिवबा व चि० जगोबा उभयतां लष्करांतून अजमेरीस आले आहेत. ×× मामलत किल्यासुद्धां

१. ही चिठी जगोबा बापूंनीं जमादार यांस लिहिली होती.

२. ही पाटीलबावांची स्वारी.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८३.

श्रीमंतांचे मर्जीमुळें कबूल करावी लागली. परंतु मारवाड, जयपूर उभयतां संस्थानच्या हद्दीवर किल्ला आहे. तेव्हां फौज सरंजाम चांगला पाहिजे. लाखों रुपयांचा जाबसाल आहे. फौजा आल्या तेणेंकरून मुलूख अगदीं खराब जहाला आहे व यंदां पर्जन्य नाहीं त्यामुळें पीकही न झालें. इ० इ०." सारांश, कोणतेंही जडजोखमाचें काम असलें, ह्मणजे तें जिवबादादा यांजवर संपविल्यावांचून पाटीलबावांस धीर येत नसे. व हेही स्वामिकार्यावर दृष्टि देऊन, तें काम कितीही बिकट असलें तरी आंगावर घेऊन, प्रसंगीं आपले प्राणही खर्चीं घालावयास मागें घेत नसत.

या सालीं त्या प्रांतीं जिकडे तिकडे मोठा दुष्काळ पडला होता. शेंकडो गरीब अनाश्रित लोक अन्न अन्न करीत रानोमाळ भटकत होते. ही सर्व लोकांची हीनदीन स्थिति पाहून जिवबादादांस अत्यंत वाईट वाटलें. व त्यांनीं "पुष्कर तीर्थावर येऊन दोन लक्ष रुपया धर्म केला. ब्राह्मणांस, वैष्णव, अतीत, बैरागी, भिक्षुक लोकांस दिला; आणि त्या सालीं महर्गता झाली होतीच. अन्न न मिळे (ह्मणून) त्या प्रसंगीं अन्नदान आले मनुष्यांस देऊन संरक्षणा केली." आणि बरेच दिवसपर्यंत द्रव्यद्वारा व अन्नद्वारा त्या दुष्काळग्रस्त गरीब लोकांचा समाचार घेऊन दातृत्वजनित सुखाचा अनुभव घेतला. लोकांच्या विपत्तींच्या निवारणाकडे त्यांचें लक्ष फार असे. त्यांचा जेथें जेथें तळ पडत असे, तेथें तेथें त्यांचें फौजेचे व्यवस्थेंत किंवा राजकीय महत्त्वाच्या मसलतींत जरी चित्त गढलेलें असलें, तरी त्यांनीं आपल्या दयाशीलत्वास किंवा औदार्यास त्यामुळें व्यत्यय येऊं दिला नाहीं. मग ज्या वेळीं राजधानींत त्यांचा स्थायिक मुक्काम असे, त्या वेळीं हीं कामें मोठ्या समाधानकारक रीतीनें चालत होतीं, हें काय सांगावें!

इतक्यांत महादजी शिंदे यांची स्वारी पुष्कर मुक्कामीं आली. त्यांची व जिवबादादांची भेट ता० ३० मार्च सन १७९१ रोजीं झाली. त्या वेळीं जिवबादादांनीं फौज घेऊन पत्यालेस जावें व त्यापूर्वीं सांबर व मारोट एथें मुक्काम करून जयनगर व मारवाड यांच्या खंडण्या घ्याव्या, असें ठरलें होतें. इतक्यांत इस्मायल बेग जो मेरटच्या लढाईंतून पळून गेला होता, त्यानें कनोद व रेवाटी प्रांतांत बंड उभारल्याची खबर येऊन थडकली. तेव्हां तिकडे जाणें तहकूब करून जिवबादादांस त्या कृतघ्न इस्मायल बेगाच्या पारिपत्यास जावें लागलें. ही हकीकत पुढील भागांत देण्याचें अभिवचन देऊन, ह्या पाटणामेरटच्या प्रकरणाची रजा घेऊं.

१. होळकर मदतीस आल्यापासून हा काळपर्यंत त्यांचा शिंद्यांस उपयोग झाला नाहीं. 'यंदां अवघीं मुलेंमाणसें आह्मांसुद्धां रवाना करावीं हा विचार दादांचा होता. परंतु मार्गी होळकरांचा दंगा, त्यांची आपली चित्तशुद्धि नाहीं व देशीं काळ अनिवार, ह्मणून सध्या राहून घेतलें.' पहा ता. ६ मार्च १७९१ चें पत्र नंबर ५७.

२. पहा पत्र नंबर ५८.

३. पेशव्यांची बखर पृ. १२३।१२७ व सोबतचा पत्रव्यवहार.

४. या वेळीं त्यांचा मुक्काम पुष्करावर होता. पहा पत्र नंबर ५८।५९.

५. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८३.

६. पाटण व मेरट एथें झालेल्या ह्या प्रसिद्ध लढायांत आमच्या चरित्रनायकाच्याच पराक्रमामुळें पाटीलबावांस विजयप्राप्ति झाली असें असतां, कित्येक पुस्तकांतून या सुप्रसिद्ध यशाची निरनिराळ्या बाजूंस ओढाताण झालेली दृष्टीस पडते, हें आश्चर्य होय! ह्मणून या गोष्टीस उपलब्ध असलेल्या आधारांपैकीं कांहीं आधार एथें देणें जरूर दिसतें:—

१. पाटण व मेरट एथील लढाया जिवबादादांनींच मारल्या, याबद्दल 'शेणवी वीर व मुत्सद्दी' या बखरींत सुविस्तर माहिती आहे. पहा विविधज्ञानविस्तार पुस्तक ११, पृ. ८३।८४.

२. कर्नल टाड साहेब यांनीं आपल्या 'राजस्थान' नामक ग्रंथांत या लढायांत जिवबादादा, लखबादादा व यशवंतराव भाऊ, हेच प्रमुख सरदार होते, असें ह्मटलें आहे.

३. खुद्द जिवबादादांचें पत्र नंबर ८३. यांत "गुदस्तां मारवाडप्रांतीं फौजा घेऊन गेलों होतों. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून दोनही लढाया मातबर होऊन यश आलें. रांगड्यांचें पारिपत्य यथास्थित झालें". इत्यादि मजकूर लिहिला आहे.

४. रामजीपाटील जाधव हे शिंद्यांचे वकील पुण्यास होते. त्यांचें पत्र नंबर ५४ यांत जिवबादादांस ते लिहितातः—"आपण कस्त मेहनत करून लढाया मारून राठोड हारीस आणिले. त्यांचें बोलणें हांजिरीचें येऊन बोलतात. रांगड्यांनीं डोळे फिरविले होते. परंतु श्रीमंत यजमान साहेब दैववान. त्यांचा पुण्यप्रताप मोठा. आणि आपण यशस्वी ह्मणून राठोडांचा धूर निघून जाऊन मागनीं बोलावयाशी आले. तेव्हां ईश्वरें आपल्यास यश दिलें. मसलतीची समेट लवकरच होईल. दादा आपले कस्त मेहनतीची व करण्याची हातोटी दुसऱ्यास येणार नाहीं. ३० ३०".

५. वाडीसरकारच्या प्रधानमंडळानें जिवबादादा वारल्यावर नारायणराव बक्षी यांस संस्थानावर आलेल्या परचक्रापासून संस्थानचा बचाव करण्याविषयीं विनंतीपत्र लिहिलें त्यांतील मजकूरः—"संस्थानावरील पेंच निवारण होऊन निवेध होय तें करावें. (आपल्या) वडिलांनीं मारवाड आपले करून मोठमोठ्या लढाया मारून कैलासवासी महाराजांकडे या संस्थानचा बचाव करावा ही बक्षीसी मागून घेतली आहे हें आपणासहि ठाऊक आहे." पहा पत्र नंबर २२७ व पत्र नं. ४१७.

६. महादजी शिंदे यांचे प्रख्यात सेनापति जिवबादादाच होते, हें सर्वत्र प्रसिद्ध असून, ज्या ह्या लढाया रजपुतांसारख्या अजिंक्य मानलेल्या शत्रूंबरोबर करावयाच्या होत्या, त्यांत सैन्याचें आधिपत्य दुसऱ्याकडे असणें मुळींच संभवनीय नाहीं. शिवाय, या लढाया जिंकून जिवबादादांनीं जो विजय संपादन केला, त्यामुळें पाटीलबावा त्यांजवर इतके कांहीं संतुष्ट झाले कीं, त्यांनां सर्व राज्यभार त्यांजवर सपवून ते पुण्यास गेले, असें कर्नल म्यालेसन साहेब ह्मणतात. पृ. १६३.

७. होनाजीबाळा या कवीनें ह्मटलें आहे कीं "जिवबादादा ते रणफंदी। काबिज हिंदुस्थान शिंदी। करून आले दक्षिण संधी।" या प्रकारची ही तत्कालीन कवीची उक्ति, जिवबादादांचा त्या लढायांसंबंधानें सर्व हिंदुस्थानांत व मुख्यत्वें महाराष्ट्रांत डंका वाजल्यावांचून, निघालेली नाहीं हे उघड आहे. पो. पु. पृ. १६७.

८. रजपुतांबरोबर ज्या ह्या लढाया झाल्या, त्यांस 'भारती युद्ध' असें जुन्या बखरींत ह्मटलेलें आहे. पहा वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८३।८४. आणि त्या वेळीं या पुरुषांस "जिवबादादा एक वीर भारती" अशी पराक्रमसूचक पदवी तत्कालीन कवींनीं दिलेली आहे. 'भारती वीर' ही पदवी एकट्या जिवबादादांवांचून कोणास दिलेली नाहीं. पहा पोवाड्यांचें पुस्तक पृ. १५८.

९. पुरुषोत्तमराव जगन्नाथ ऊर्फ लालामोहन बक्षी हे ग्वाल्हेरीस होते. हे आपल्या वयाच्या नव्वदावे वर्षी आपल्या घरीं केरीस इ. स. १८८० त वारले. ते या लढायांबद्दल दादांच्या शौर्याच्या पुष्कळ गोष्टी सांगत. तसेच त्यांच्या दप्तरांतील घनश्याम नारायण बक्षी यांची कैफीयत व पत्र नं. ४०० पहा.

१०. पाटीलबावांनीं त्या वेळीं या लढायांत जिवबादादांच्या हाताखालीं काम केलेल्या सरदारांस या लढायांसंबंधानें पाठविलेलीं पत्रें पहा. यावरून सेनापतीच्या कर्तृत्वाबद्दल अनुमान होईल. सदर पत्रें नं. ५१।५२ पहा.

११. काव्य. स. पत्रें व यादी यांतील पत्र नंबर ३४५ पृ. ३१६.

भाग १२ वा.

इस्मायल बेग व होळकर यांजबरोबर लढाया, पाटीलबावांचा मृत्यु व दौलतरावांस गादीची प्राप्ति.

इ० सन १७९२ पासून स० ९४ पर्यंत.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें जिवबादादा इस्मायल बेगाच्या पारिपत्यास जाणार होते. परंतु इस्मायलानें किल्याचा आश्रय केल्यामुळें त्याजबरोबर होणारी लढाई बरेच दिवस लांबण्याचा रंग दिसून आला. सबब पाटीलबावा व जिवबादादा यांचा असा बेत ठरला कीं, पल्यालेकडील खंडणीच्या वसुलाचें काम मागें टाकल्यास पुढें विशेष त्रास पडेल, यासाठीं जिवबादादांनीं स्वतः पल्यालेस फौजा घेऊन जावें. आणि इस्मायल बेगावर पुढें जगोबा बापू व लखबादादा यांस फौजेसह पाठवून, पाटीलबावांनीं पुण्याकडील कामगाऱ्यांसाठीं तिकडे जावें. ह्याप्रमाणें बेत मुक्रर ठरून पाटीलबावांनीं त्या उभय सरदारांची रवानगी कनोंदकडे केली. आणि पाठीमागें सर्व राज्यकारभारांतील "आदिपश्चात् पाहणें याची माहिती जिवबादादांस त्यांजकडे तावेदारी" देऊन, स्वतः पुण्यास जाण्यासाठीं ते मेवाडप्रांतीं आले. आणि जिवबादादा खंडण्या घेत घेत पल्यालेकडे गेले.

मग पाटीलबावांनीं पोख्त सरंजामानिशीं चितोडास जाऊन, तेथील किल्यास आपल्या फौजेचा वेढा दिला. ह्या वेळीं त्यांजबरोबर मोठी फौज व कवायती कंपू असून, तोफखानाही तशाच थाटाचा होता. त्याचप्रमाणें मोठमोठे पुष्कळ हत्ती, घोडे, पालख्या, डेरे, तंबू वगैरे जंगी सरंजाम होता. बरोबर बाळोबा तात्या दिवाण, नारायणराव बक्षी, सदाशिवराव मल्हार आणि कांहीं कंपूवाले फिरंगी व मराठे सरदार होते. ह्या वेळीं उदेपूरचे गादीवरील राणा हरशी याचा मुलगा हमीर हा मरून, त्याचा भाऊ भीमसिंग हा तक्तनशीन झाला होता. त्या संस्थानाकडून शिंद्यांस जी खंडणी मिळावयाची, ती बरींच वर्षें मिळाली नसून, पुढेंही ती देण्याचा त्यांचा इरादा दिसेना. सबब लढाई करून ती वसूलांत आणावयाची होती. ह्मणून किल्ल्याभोंवतीं मोर्चेबंदी करून पाटीलबावांनीं लढाईस सुरुवात केली. त्या वेळीं देवजी मुकुंद लाड यांजकडेही एक तोफखाना होता. तेथून ते लिहितात "चितोडास मोर्चे लाविले आहेत. नेहमीं श्रीमंत (पाटीलबावा) प्रातःकाळपासून अस्तमानपर्यंत येऊन (व्यवस्था पाहत) असतात. व (आह्मी) तोफखान्यासुद्धां मोर्च्यांत आहों. आह्मांकडोन लष्कर दोन कोस मागां आहे. तसाच राजश्री नारायणराव आह्माकडून किल्ल्याचे उजवे बाजूचे मोर्च्यांत दोन अडीच कोश आहे." याचप्रमाणें सर्व ठिकाणच्या मोर्चेबंदींवरून तोफांचा भडिमार सुरू करून पाटीलबावांनीं शत्रूचें पुष्कळ नुकसान केलें. किल्ल्यांतही लढाईची तयारी चांगली होती. त्यामुळें उभय पक्षांकडून बरेच दिवस निकराचें युद्ध चाललें होतें. पण शेवटीं शिंद्यांपुढें आंतील लोकांचा निभाव लागेनासा झाला. शिंद्यांनीं किल्ला "मोर्चे लावून जेर केला. (तेव्हां) रावत भीमसिंगजी किल्यावर होते. ते उतरून येऊन (पाटीलबावांस) भेटले. किल्ला खालीं करून दिला. (परंतु पुढें) श्रीमंतांनीं किल्ला राणाजीचे (भीमसिंगाचे) हवालीं केला." त्या वेळीं उभयतांच्या

---

१. होळकरांची कैफीयत पृ. ५९।६०.

२. पत्र नंबर ४१८.

३. पत्र नंबर ८६.

विचारें "दीड लक्ष पट्ट्याचा मुलूख गांवगोट लावून घेणें," याप्रमाणें कबुलायत होऊन "खंडणी ठरली." ही गोष्ट सन १७९१ च्या डिसेंबर महिन्यांत घडली. मग मेवाडच्या सुभ्यावर अंबाजी इंगळे ह्यांस नेमून, पाटीलबावा उज्जनीस आले.

पुढें पाटीलबावा पुण्यास जाण्यापूर्वी बरेच दिवस उज्जनींत मुक्काम करून होते. आणि तेथूनच सर्व राज्यकारभाराचें काम पहात होते. ह्या वेळीं त्यांनीं राज्यव्यवस्थेसंबंधी सर्व कारभाराची घडी बसवून प्रांतवार हिशोब तपासले. आणि सर्व प्रकारची जमाबंदी व सरकारयेणें निश्चित केलें. नियमित खंडण्या देणारे मांडलिक राजे व स्वतःचे सरदारांकडील तोडून दिलेले तनखे, यांसंबंधीं कोणत्याही प्रकारचे गोज न ठेवितां, सर्व व्यवस्था पुढें सुरळित चालेल, अशी शिस्त बसवून दिली. रयतेस ज्या ज्या मामूल वहिवाटीपासून त्रास व गैरसोय वाटत होती, त्या त्या बद्दल अवश्य ती दुरुस्ती करून, सर्वांस सुख व्हावें व वक्तशीर त्यांची दाद लागावी, अशाबद्दल सक्त उपाय योजिले. त्यांची कदर मोठी होती. त्यामुळें अन्याय करण्यास कोणी सहसा धजत नसत. त्यांच्या मागें नेहमीं लढायांचे पेंच असल्यामुळें ते अशा फुरसदींत हीं कामें लक्षपूर्वक पाहून कोठें व्यंग आढळेल तें भरून काढीत. ह्या कामीं त्यांचे दिवाण बाळोबा तात्या ह्या शहाण्या मुत्सद्याची त्यांस उत्कृष्ट मदत होत असे.

पाटीलबावा दक्षिणेंत येण्यास निघाले तेव्हांच इस्मायल बेगानें बंड उभारलें होतें. जाते वेळीं त्यांनीं इस्मायल बेगास जिवंत धरण्यास सांगितलें होतें. कारण गुलाम कादराप्रमाणेंच त्याला केल्या कर्माबद्दल प्रायश्चित्त भोगवावयाचें होतें. तो जिवंत हातीं लागत नाहीं असें वाटल्यास त्यास एकदम ठार करावा, असें त्यांचें सांगणें होतें. बादशाहींतील हाच काय तो एक शिंद्यांचा जुना शत्रु राहिला होता. तो ज्या ज्या पक्षास मिळाला, त्या त्या पक्षाचा मोड झाल्यामुळें तो शिंद्यांपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, असें समजून हताश झाला होता. तरी शेवटचे आणखी एकदा हातपाय हालवून पाहावे, ह्मणून त्यानें एक कारस्थान योजलें. व तें इतकें रंगारूपास आलें कीं, शिंद्यांच्या फौजांस त्याचा मोड व्हावा ह्मणून बरेच दिवस सक्त प्रयत्न करावे लागले. तें कारस्थान असें. मेवाडप्रांतीं नजब कुलीखान ह्मणून एक मुसलमान सरदार होता. त्यास गुलाम कादराची बहीण दिली होती. नजब कुलीखान वारल्यावर नवऱ्याप्रमाणेंच ती मोठी फौज बाळगून आपला अधिकार वहिवाटून होती. ही बाई आपल्या भावाप्रमाणें क्रूर, धाडशी व शूर होती. ह्या बेगमेनें शिंद्यांचा हुकूम न मानितां इस्मायल बेगास मदत देऊन, कानोड एथें किल्ल्याच्या आश्रयानें राहून, बंडाचा झेंडा उभारला. इस्मायल बेगानें बेगमेचे मदतीस वीस हजार फौज व तीस तोफा एवढी सामग्री आणिली होती.

ही त्यांची तयारी होत असतांच जिवबादादांनीं जगोबा बापू, लखबादादा व पेरण हे सरदार त्यांजवर पाठवून आपण पत्यालेस गेले होते, हें मागें सांगितलेंच आहे. इकडे या सरदारांनीं इस्मायल बेगावर हल्ला करून एकाच हल्ल्यांत त्यांचे दोन हजार लोक ठार मारले. त्यामुळें इस्मायल बेग किल्ल्याखालीं राहून लढत होता, तो शिंद्यांपुढें अशा लढायांत आपल्यास यश यावयाचें नाहीं, असें समजून फौज घेऊन किल्ल्यावर गेला. किल्ला फार मजबूद असून आंत सैन्य पुष्कळ आणि सामग्री भरपूर असल्यामुळें, आतां शिंद्यांस दाद न देतां वरून हवे तितके दिवस लढाई चालवितां येईल, असा त्याचा समज होता. मग त्यांनीं किल्ल्यावरून नाक्यानाक्यांनीं तोफा लावून शिंद्यांच्या फौजेवर मोठी मारगिरी सुरू केली. इकडूनही जगोबा बापू, लखबादादा व पेरण ह्यांनीं

---

१ पत्र नंबर ८६.

ठिकठिकाणीं मोर्चेबंदी करून उलट मोठा मारा चालविला. अशा तऱ्हेनें पुष्कळ दिवस ही लढाई चालून दोहों बाजूंकडील वीरांनीं आपलें युद्धकौशल्य दाखविलें. शिंद्यांकडील चोहों बाजूंच्या तोफांच्या भडिमारानें आंतील कोंडलेल्या सैन्याचा मराठ्यांपेक्षां अधिक नाश झाला. तरी जगोबा बापू वगैरे सरदारांस इस्मायल बेगास केव्हां जिवंत धरून आणूं, अशी चिंता लागून राहिली होती. पाटीलबावांची आज्ञा अक्षरशः पाळावयाची, असा ह्या राजनिष्ठ शूर सरदारांचा बाणा होता. त्या प्रसंगीं लखबादादा लिहितात कीं, "आह्मी कानोडच्या किल्ल्यास मोर्चे लाविले आहेत. इस्मायल बेग आंत आहे. ईश्वर करील तर आठ दहा रोजीं तो धरूं. किल्लाही आठापंधरा रोजीं खालीं होईल. किल्लेचे कामामुळें आह्मांस कांहीं सुचत नाहीं. किल्ला सुटेल, पण इस्माल बेग हाताखालीं पडेल तेव्हांच चित्त स्वस्थ होईल." अशाप्रकारें लढाई मोठ्या निकरानें चालली होती. व उभय पक्षांची खराबी होत होती. तरी किल्ला लौकर खालीं होण्याचें किंवा इस्मायल बेग स्वाधीन होण्याचें चिन्ह कांहींच दिसेना. किल्ला मजबूद असून अन्नही आंत पुष्कळ फौज व सामग्री असल्यामुळें वरून लढाई जोरानें चालली होती. तो जोर कमी होण्याबद्दल पेरणनें एका बाजूकडून झपाट्यानें मारा चालवून आपल्या कसबाची शर्थ करून सोडिली होती. तरी त्यापासून कांहीं विशेष परिणाम झाला नाहीं. तेव्हां पेरणचे उपाय थकले. असा बाहेरील प्रकार होतांच इस्मायल बेग व बेगम यांस लढाई जोरानें चालविण्याची मोठी उमेद आली. बाहेरील लोकांची त्यांस धास्ती वाटेनाशी झाल्यामुळें तीं आंत बुद्धिबळें खेळत बसत ! यावरून त्यांचें शौर्य व धाडस हीं अचाट होतीं, असें ह्मणावें लागतें.

याप्रमाणें किल्ला हातीं येण्याचें लांबणीवर पडल्याची हकीकत जिवबादादांस समजतांच शिखांकडील खंडण्या वगैरे घेण्याचें काम त्यांनीं आटोपलें. आणि दरकूच दरमजल मेवाडप्रांतीं येऊन दाखल झाले. फार लांबच्या प्रवासानें लष्कर थकलें होतें. तरी इस्मायल बेगाची कामगारी त्यांच्या नैजरेसमोर होती. मग जिवबा "दादा सडेस्वारी इस्माल बेग याजवर फौजा घेऊन रेवडीस जाण्यास गेले[3]." जिवबादादा फौजेसहित लढाईच्या जागीं पोंचल्यावर त्यांनीं लढाई फार निकरानें चालविली. आणि किल्ल्यावर गोळ्यांचा असा मारा चालविला कीं, आंतील लोकांस ती आग असह्य होऊन ते पटापट मरून पडूं लागले. एके दिवशीं बेगम बुद्धिबळें खेळत बसली होती तिला तोफेचा गोळा लागून ती तत्काळ मरण पावली. तेव्हां मोठा हाहाकार झाला. इस्मायल बेगच मरण पावला अशी बातमी जिवबादादांच्या लष्करांत पसरली. शत्रूंची बरीच फौज किल्ल्याच्या आजूबाजूस होती. त्यांजवर जिवबादादा फौज घेऊन गेले. हें पाहून इस्मायल बेग किल्ला सोडून आपल्या ह्या फौजेस येऊन मिळाला. ह्याप्रमाणें शत्रूची तयारी झालेली पाहून "जिवबादादा व फौज इस्मायल बेगावर गेली. त्यास लढाई थोर जाहाली. × × इस्माल बेग याची फौज लुटून घेतली." जिवबादादांच्या ह्या लष्कराबरोबर डि. बॉइन, गोपाळराव भाऊ, राघोबा वैद्य, त्रिंबकजी शिंदे, देवजी गौळी वगैरे सरदार होते. या लढाईत "इस्माल बेग धरून आणून कैद केला." अशा रीतीनें जिवबादादांस

१. पहा पत्र नंबर ४१९.

२. नातूकृत महादजीचें चरित्र पृ. २५६.

३. पहा पत्र नंबर ७१.

४. पहा पत्र नंबर १०८.

५. पहा पत्र नंबर ४१९.

"ईश्वरें मोठें यश दिलें[1]." व पुढें त्यांनीं कनोदचा किल्लाही घेतला. इस्मायल बेग मिळाल्यावर त्यास ठार मारण्याविषयीं पाटीलबावांनीं सांगितलें होतें. परंतु त्यानें डि. बॉयनास शरण जाऊन त्याजकडून जिवबादादांमार्फत पाटीलबावांस विनंती केल्यावरून त्यास "धरून आणून आग्र्याचे किल्ल्यांत बंदिखान्यांत ठेविला." ह्याप्रमाणें इस्मायल बेग ता० १६ एप्रिल सन १७९२ रोजीं मराठ्यांचे हातीं लागला. पुढें त्यास दरमहा सहाशें रुपये खर्चास नेमणूक ठरवून दिली. याला एकवीस लक्षांची जाहागीर होती[3]. परंतु ईश्वरसत्ता वेगळीच होती! पुढें तो कैदेंत असतांच सन १७९९ सालीं आग्र्याचे किल्ल्यांत मरण पावला. याप्रमाणें मराठ्यांस त्रास देणाऱ्या इस्मायल बेगाचा शेवट झाला, व त्याबरोबरच मोंगल बादशाहींतील महादजींच्या सत्तेस प्रतिबंधक होणाऱ्या मोहऱ्यांचीही इतिश्री झाली. अलिजाबहादरांनीं सर्व उत्तर हिंदुस्थान अशा रीतीनें 'निर्वीर' केल्यामुळें त्यांची सत्ता अव्याहत चालूं लागली, व त्यांचें ऐश्वर्य फार वाढलें.

इस्मायल बेगाचें पारिपत्य करून तरवार म्यानांत घातली नाहीं, तोंच जिवबादादांस होळकरांच्या प्रकरणासंबंधानें निरुपायानें ती बाहेर काढावी लागली. होळकर व अलीबहादर यांची हकीकत प्रसंगोपात्त या मागें देण्यांत आली आहेच. जिवबादादांनीं रजपूत, शीख व मुसलमान या लोकांचा पराभव करून जें यश मिळविलें, त्यांत होळकर व अलीबहादर यांचा ह्मणण्यासारखा उपयोग न होतां, जिंकलेल्या मुलखाच्या वांटणीमध्यें मात्र त्यांनीं आपला हक्क मागावा, असा प्रकार चाललेला होता. तरी याबद्दल विशेष भानगड नव्हती. वांटणीचा हिशोब मोईसवडीप्रमाणें करितां येईल, असें ह्मणून जिवबादादा स्वस्थ होते. परंतु होळकरांनीं शिंद्यांचें वजन कमी करण्यासाठीं वेगळेंच कारस्थान रचिलें. त्यामुळें उभय पक्षांत कलहाग्नि पेटला[4]. "अलीबहादर आलियावर त्याचा बस न बसे तेव्हां (तुकोजीराव होळकर) सुभेदार यांणीं हिंमतबहादर याजला हामराई करून शिंदे शुद्ध सरदार ठेवून सुखत्यारी अलीबहादराकडे आणावी या राजकारणास आग्रसर केला." शिंद्यांच्या गोसावी फौजेचा मुख्य सरदार हिंमतबहादर या नांवाचा होता. त्यास त्यांनीं फितूर केलें. हें महादजींस समजलें, ह्मणून तो उघड रीतीनें शिंद्यांचें लष्कर मोडून अलीबहादरास मिळाला. पुढेंही अशाच फितुरीनें यशवंतराव निंबाळकर अकलजकर हा शिंद्यांकडे आठशें स्वारांचा सरदार होता, तोही आपण पेशव्यांच्या मुलखांतले राहणार, तेव्हां त्यांचाच पक्ष घेऊन आह्मांस चालावयाचें आहे, असें ह्मणून नगारा करून अलीबहादरास जाऊन मिळाला. आमचे सरदार आपल्याकडे गेले आहेत, त्यांस आमचे स्वाधीन करावें, असा महादजींनीं त्यांस सामोपचाराचा निरोप पाठविला. पण तो होळकर किंवा अलीबहादर, यांनीं मान्य केला नाहीं. यामुळें त्याच वेळीं शिंदे व होळकर आणि अलीबहादर यांजमध्यें लढाई जुंपण्याचा प्रसंग आला होता. "परंतु शिंद्याचे दौलतींत माणसें चांगलीं." हे आपसांतील कलह अशा भयंकर स्वरूपास न्यावे, हें जिवबादादा व बाळोबा तात्या ह्यांस

---

१. पद्य पत्र नंबर ४१९.

२. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९१.

३. ना. कृ. महा. च. पृ. २९९.

४. "शिंद्याच्या यशोवैभवाचा मत्सर करणारे होळकर हेही शिंद्याविरुद्ध कारस्थानें करूं लागले व त्यांनीं अलीबहादरास सामील करून घेऊन राष्ट्रीय कार्यास विघातक असें वर्तन केलें." केसरी व. प. ता. २० मार्च १९००.

५।६।७. होळकरांची कैफीयत पृ. ५२।५३।५४.

आवडेना. ह्मणून त्यांनीं ही गोष्ट चिडीस नेऊं नये अशाबद्दल पाटीलबावांची समजूत करून त्यांस पोक्त सल्ला दिला. ते ह्मणालेः—"आपण चाकर श्रीमंतांचे लाख फौज पन्नास हजार पायदळ व पांचशें तोफा घेऊन मुखत्यारीचें काम करितों. कोव्यावधि मुबादल्यांत. तथापि श्रीमंतांची चिठी आली असतां एक्या घोड्यानिशीं हजर व्हावें हा श्रीमंतांचा भरंवसा! व आपलेंहि शील असेंच. याजवर श्रीमंतांनीं कृपावंत होऊन प्याद्याचे फर्जी (लहानाचे थोर) केले. त्या भरंवशास अल्लीबहादर याचा असा व्यवहार होऊन, काढून दिल्यासारखें आणि सुभेदारांशीं (तुकोजी होळकरांशीं) ही किलाफांची बुद्धि करून (चालावें हें नीट दिसत नाहीं). तेही साहेब सुभे. केवळ तैनाती करून राहणार नाहींच. एवंच श्रीमंतांशीं हरामखोरीस पात्र होऊन कोण्या कलावर उंट बसेल (याचा नेम नाहीं) तेव्हां कृतपरिश्रम व्यर्थ जाऊन रबाब खामी पडून हरामखोर असे वानवूं. यास्तव होळकर आपले भाऊ. त्यांनीं आपले घरीं पाहिजे तसें केलें. तरी त्यांशीं आपल्याशीं कारण तें काय? त्यांशीं मेळ घालून एक विचारें धोरण चालवावें. यांत अल्लीबहादरप्रकरणीं जाहाला व्यवहार याजवर माती पडून सुभेदाराचे मिळण्यांत शिलास बट्टा येणार नाहीं. ही गोष्ट पाटीलबावांचे गळीं उतरून" त्या वेळीं लढाईचा प्रसंग टळला. परंतु पुण्याहून प्रथमतः कलहाचें जें बीज पेरिलें गेलें होतें, त्याचा पुढें मोठा वृक्ष व्हावयाचा होता. तें भवितव्य अशा थारवाथारवीनें रहावें कसें? यापुढें लढाईस जें कारण उत्पन्न झालें, तें असेः—

पाटीलबावा दक्षिणेंत जाण्याच्या पूर्वींपासून अजमीरचे सरसुभे शिवबा नाना हेच होते. ग्वाल्हेर व रजपुतस्थानचे सरसुभे गोपाळराव भाऊ यांस नेमिलें. माळवे प्रांताचे सरसुभे विश्राम नरहर केरकर हे होते, व मेवाडप्रांतांत अंबाजी इंगळे हे सरसुभे होते. या सर्वांवर मुख्य "जिवबादादा बक्षी. यांचे स्वाधीन आपलें सारें राज्य करून बादशहापासून पेशव्यांचे नांवें वजीरीचीं वस्त्रें, मानमरातब वगैरे पेशजी घेतलेले श्रीमंतांस प्रविष्ट करण्याकरितां ह्मणून स्वारी हिंदुस्थान सोडून दक्षिणदेशीं यावयास निघाली होती," हें मागें सांगितलें आहे. याशिवाय दिल्लीचा बादशाही कारभार व खंडण्यांचा वसूल व स्वाऱ्याशिकाऱ्यांचें काम प्रांतोप्रांतीं फिरून जिवबादादांस करावें लागे. ते नसल्या मुदतींत गोपाळराव भाऊ चिटणीस यांची व होळकरांची कटकट झाली. आधीं होळकर व अल्लीबहादर मदतीस ह्मणून आल्यापासून 'शिंदे होळकरांत मात्सर्यैकरून कलह होतेच असत.' आणि आतां तर ह्या कलहापासून दोघांत विशेष चुरस आली. "त्यामुळें

१. वांकडी, विपर्यासाची.

२. महत्त्व, वर्चस्व.

३. नुकसान.

४. होऊं.

५. ह्या हकीकतीवरून हें उघडच होतें कीं, शिंद्यांचे कारभारी जरी बळवान् होते, तरी ते होळकरांचा चांगला मान राखीत असत. व आपल्या यजमानास दूरदृष्टीचा उत्तम सल्ला देत असत. धनी व हाताखालील कामगार समंजस व कर्तव्यतत्पर असण्यांतच राज्याची बळकटी असते.

६. होळकरांची कैफीयत पृ. ५४.

७ म्यालेसनच्या इति. भाषांतर पृ. १६३.

८ पहा ग्रांट डफची बखर पृ. ३२०.

त्यांशीं घांसाघांसी करण्यापेक्षां आपण दूर जावें या हेतूनें होळकरानें जयपूर प्रांतांत स्वारी करून आपल्या खंडणीची मागणी केली[1]." आणि "जयपूरवाले व होळकर व अलवरवाला रावराजा एकत्र होऊन पातशाही मुलखांत बिघाड केलों." हें समजतांच जिवबादादा लष्कर-सहित तिकडे गेले. हे तिकडे जातांच अलवरवाला राव येऊन त्यांस मिळाला. जिवबादादा जाण्यापूर्वीं होळकरांनीं बादशाही मुलखांतील कांहीं ठाणीं घेतलीं होतीं, तीं ह्यांनीं परत घेतलीं. जयपूरवाले होळकरांशीं मिळून होते. त्यांजकडे खंडणी मागतांच त्यांनीं सांगितलें कीं, 'आह्मां-कडे होळकरही खंडणी मागतात व तुह्मीही मागतां. तेव्हां अगोदर खंडणी कोणास द्यावी, त्याचा आपसांत निर्णय ठरवा. ह्मणजे मग त्याप्रमाणें ऐवज पावता करूं.' होळकरांची ही खंडणी ह्मणजे पाटणा व मेरट एथील संग्रामांत शिंद्यानें जें मोठें यश मिळविलें, त्यापैकीं होती. वास्तविक खंडणीसंबंधानें शिंद्यांस अगोदर पैसा मिळावयाचा. आणि त्यांत लागोपाठ स्वाऱ्या कराव्या लागल्यामुळें फौजेचा पगार चुकता करण्याचे कामीं त्यांना पैशाची फारच निकड होती. तेव्हां होळ-करांनीं हा घातलेला घोटाळा पुढें चिडीस विशेष कारण झाला. होळकर त्या प्रांतीं गेल्यापासून शिंद्यांस कसा काय उपयोग झाला, तें पुढील पत्रावरून कळेल. "पेशजी रांगड्यांनीं बखेडा केला त्याचें पारिपत्य करून मोडले. पण होळकरांची फौज देशींहून आणविली. त्यांचे मुक्काम त्या मुलखांत जाहाले, त्यामुळें गांव उजाड जाहाले. गांवांत वस्ती फौजेचे धास्तीमुळें राहिली नाहीं. शिबंदी कर्ज काढून देणें पडती. हलीं मृगमालास रयतास दिलदिलासा देऊन वस्ती केली. त्यास श्रीमंत तुकोजी होळकर व अलीबहादर फौजेसुद्धां आले. त्यांणीं खराबी जाहाली. ह्मणोन चिरंजीवाचीं पत्रें आलीं. यामुळें जावद जिरण यांची उजाडी आहे[2]." याप्रमाणें होळकर आल्यापासून जरी शिंद्यांस उपद्रव होत होता, तरी या उपस्थित झालेल्या तंट्यासंबंधानें जिवबा-दादांनीं होळकरांची पुष्कळ विनवणी केली कीं, तुह्मी आह्मी एक असतां अशा तऱ्हेनें कलहास निमित्तें योजून आपसांत बिघाड करावा ही गोष्ट उभयपक्षीं बऱ्याची नव्हे. या दुहीमुळें पुढें परिणाम ठीक होणार नाहीं. यासाठीं आजपावेतों चालत आलेल्या स्नेहभावाप्रमाणें पुढें चाल-वावें, हीच गोष्ट श्रेयस्कर आहे. दुसऱ्याच्या सांगण्यानें पुरातनच्या भाऊबंदकींत कलह उत्पन्न झाल्यास उभयतांची खराबी होऊन, तशीच इच्छा करणारांचें चांगलें फावेल. ह्या गोष्टीचा जरूर विचार व्हावा. सुभेदार तुकोजीराव होळकर हे मोकळ्या मनाचे व विचारी होते. त्यांचा स्वभावतः शिंद्यांच्या विरुद्ध कल नव्हता. यास्तव, हा सर्व शिकवणीचा परिणाम असल्यामुळें, जिवबादादांच्या हितवादास त्यांचें अनुमत मिळण्यास फारसें कठीण पडलें नाहीं. आणि उभयपक्षांतील तंटा मिटलों.

इतकें झालें तरी नाना फडणविसांनीं जें कलहाचें बीज पेरून ठेविलें होतें, त्याच्या जोपासनेची त्यांना कमी काळजी होती अशांतला प्रकार मुळींच नव्हता! त्यांच्या होळकरांकडे नेहमीं डांका घोळत. त्यामुळें मूळ उद्देशांत कोठें कमजास्त झालेलें भरून निघे. तेव्हां ही 'दिल-

१. नातूकृत महा. चरित्र पृ. २५६.

२. पहा पत्र नंबर ६६.

३. पहा पत्र नंबर ६३.

४. पहा होळकरांची कैफीयत पृ. ६३.

सफाई' किती दिवस टिकणार? पुढें कांहीं दिवसांनीं होळकरांचा खुशाल कुंवर या नांवाचा सरदार शिंद्यांच्या मुलखांत उपद्रव करूं लागला. तेव्हां त्याजवर लखबादादांची रवानगी झाली. त्या उभयतांची लढाई होऊन, तींत खुशाल कुंवर गोळी लागून ठार झाला. तरी त्याचे लोक लढतच होते. परंतु लखबादादांच्या जबरदस्त मान्यापुढें त्यांचा नाइलाज होऊन, ते होळकरांच्या मोठ्या लष्करास जाऊन मिळाले. आपल्या सरदाराचा मोड झालेला पाहतांच आपलें सर्व सैन्य एकत्र करून तुकोजीराव होळकर शिंद्यांच्या फौजेबरोबर लढण्यासाठीं बनास नदीच्या तीरावर आले आणि तेथें त्यांनीं तळ दिला. त्यामुळें जिवबादादांसही अर्थात् होळकरांशीं सामना देण्यासाठीं त्यांच्या तोंडावर यावें लागलें. ह्या स्वारींत शिंद्यांकडील गोपाळराव, लखबादादा वगैरे सर्व सरदार होते. पुढें लढाईस सुरुवात झाली. तेव्हां खुद्द तुकोजी होळकरांवर जिवबादादांनीं छापा घालून, त्यांचा मोड केला. शिंद्यांच्या सामर्थ्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

या पराभवामुळें होळकरांस पराकाष्ठेचा त्वेष उत्पन्न होऊन, त्यांनीं मोठ्या तांतडीनें अहल्याबाईस मदत पाठविण्याविषयीं लिहिलें. त्या मानी व रागीट स्त्रीनें जुंजर नेक नामक फ्रेंच सरदारास बरोबर मोठी फौज देऊन त्यांच्या मदतीस पाठविलें. त्याजबरोबर खुद्द त्या सरदाराच्या ताब्यांतील चार कवायती पलटणें व एक जंगी तोफखाना होता. शिवाय इतर फौज होती. मिळून सर्व लोक सुमारें तीस हजार होते. होळकरांचा पराभव झाला तरी त्यांशीं लगट करून पाठलाग करावा आणि दीर्घद्वेष वाढवावा, असा जिवबादादांचा विचार नव्हता. त्यांच्या मनांत त्यांच्या थोड्या बहुत मागण्या कबूल करून कसे तरी हे भाऊबंदींतील कलह मिटवावे, असें होतें. म्हणून ते व गोपाळराव भाऊ ह्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले. पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. या प्रसंगीं मल्हारराव होळकरांस इतका कांहीं युद्धावेश आला होता कीं, लढाई करून जिवबादादा वगैरे सरदारांची पुरी खोड मोडीन तेव्हांच हा तंटा मिटेल, असें निर्वाणीचें उत्तर सांगून त्यांनीं जंगी तयारी चालविली. अर्थात् जिवबादादांसही तशाच बेतानें लढाई चालविणें भाग पडलें. या प्रसंगीं जिवबादादांकडे गोपाळराव, लखबादादा, जगोबा बापू, डि. बॉइन इत्यादि मुख्य मुख्य सरदारांच्या हाताखालील मिळून सुमारें वीस हजार स्वार, नऊ हजार कवायती शिपाई व ऐशीं तोफा इतकी सामुग्री होती. व प्रतिपक्षांकडेही वर लिहिल्याप्रमाणें अशीच कडेकोट तयारी होती. या दोनही दळांची गांठ अजमिरानजीक लाखेरीच्या बारींत पडली. ही लढाईची जागा फार बिकट असून सर्व फौज उभी राहाण्यास देखील पुरण्यासारखी नव्हती. होळकरांकडे मल्हारराव, काशीराव होळकर जुंजर नेक वगैरे सरदार होते. उभय दळें रणभूमीवर तयार असतां, अकस्मात् शिंद्यांच्या लष्करांतील दारूच्या कोठीस आग लागून ती पेटली. त्यामुळें अर्थातच लष्करांत गडबड उडून गेली. ही संधि मिळतांच होळकरांच्या सरदारांनीं त्यांजवर एकदम चाल केली. तेव्हां जिवबादादांनीं लागलेच सर्व लोक एकत्र करून त्यांस तोंड दिलें, आणि तो हल्ला मागें फिरविला. डि. बॉयनानें दुसऱ्या बाजूकडून तोफाबंदुकांचा मारा चालविला. त्यामुळें पुढें आलेले स्वार पळून

१. या बाबतींत आ. मि. नातू असें लिहितात कीं:—

"पुढें होळकराच्या स्वारांनीं दोन तीन महिने शिंद्याचे फौजेस कोट्याचे आसपास फिरवून जेरीस आणिल्यामुळें अंतर्वेदींतील वसुलाचा हिसा देण्याचें कबूल करून गोपाळराव वगैरे मंडळीनें तंटा मिटविला होता. परंतु मल्हाराव होळकर या तरुण सरदारानें अखेरीस लढाईचा प्रसंग आणिला." नातूकृत चरित्र पा. २५७.

गेले. पण जुंजर नेक यांजकडील कवायती फौजेस पळून जातां येईना. तेव्हां उभयतांकडील लष्कराची लगट होऊन मोठी लढाई सुरू झाली. ती सकाळपासून तिसरे प्रहरपर्यंत चालू होती. इतक्यांत मल्हारराव होळकर गोळी लागून जखमी होऊन पडला. त्यामुळें त्यास हत्तीवर घालून नेलें. इकडे शिंद्यांच्या लष्करांत डि. बॉयनासही मोठी जखम लागली. ही लढाई मोठ्या निकराची झाली. ह्या प्रसंगीं होळकराकडील जुंजर नेकाचीं तीस हजार लोकांचीं चार पलटणें प्राण जात तोंपर्यंत शौर्यानें लढलीं. परंतु शिंद्यांच्या पराक्रमी लोकांपुढें त्यांचें कांहीं न चालतां, ते सर्व लोक लढाईत पडले[2] ! अशाप्रकारें या लढाईत होळकरांचा फारच नाश होऊन, त्यास पळ काढावा लागला. ह्याबद्दलचा मजकूर पुढील पत्रांत आहे तो असा. "आपलेकडील सड्या फौजा घेऊन तीर्थरूप राजश्री (जिवबा) दादा तिकडे सुखरूप आहेत. वैशाख वद्य १२ स (ता. ५ जून सन १७९३ रोजीं) होळकराची व आपले फौजेची लढाई जाहाली. होळकर यांणीं शिकस्त खाऊन मोड होऊन माघारे आले. होळकराकडील कांहीं तोफा व घोडीं उंटें अशी लूट आपले फौजेंत आली. तूर्त होळकर कालीसिंध उतरून खेचीवाड्याच्या रोखें आहेत. आपल्या फौजा दादासुद्धां कोटेहून सहा कोशांवर आहेत[3]."

ही लढाई कशी उत्पन्न झाली, हें मागें सांगितलेंच आहे. होळकरांशीं पहिल्यानें गोपाळराव भाऊंनीं कटकट केली असें ह्मणणें आहे. परंतु जिवबादादांनीं हा कलह वाढूं न देण्याच्या कामीं दक्षता ठेविली होती. परंतु तें धोरण लक्षांत न घेतां "गोपाळराव चिटणीस यांचे मनांत धर्म होता कीं (तुकोजीराव होळकर) सुभेदारांस जिवंत धरून पाटीलबावांपाशीं न्यावें. आणि तो करताही. परंतु जिवबादादा जुना माणूस—दुरांदेशींचा[4]—त्यानें बनासचे छाप्यांत व लाखेरीचे लढाईत टाळा[5] दिला. लाखेरीची हार जाल्यावर त्यानें गोपाळराव व कंपू यांजला + + लाखेरीची बारी उतरूं न देतां आपण जातीनें व मुकुंदराव हे रामपूर परगण्यांत येऊन मेवाडाकडे निघून गेले. इकडे पिच्छा[6] केलाच नाहीं.[7]" "गोपाळराव चिटणीस यांचें अल्प वय दुरांदेशी पहात्रयाचा तोटा. त्यांत धन्याचे प्रतापेंकरून एकदोन कामें बनून आलीं. यावर तर बारीचे अजमासाचा स्पुंर्द.[8]" अशी त्यांची स्थिति असल्यामुळें होळकरांनीं उपस्थित केलेल्या कलहास वरील प्रकारचें रूप आलें होतें. पुढें ह्या पराभवामुळें होळकरांस मोठा त्वेष येऊन उज्जनी लुटण्यासाठीं त्यांनीं माळवे प्रांतीं कूच केलें. हें जिवबादादांस समजल्यावर होळकरांच्या पाठलागास ते निघाले.[1] आपल्या मागून जिवबादादांचें लष्कर आहे हें होळकरांस समजतांच ते मग जलदीनें कूच करावयाचें सोडून

१. नातूकृत महा. चरि. पृ. २५८.

२. म्यालेसन सा. इ. पृ. २०९ व ग्रांट डफची बखर पृ. ३२४.

३. पद्दा पत्र नंबर १०२.

४. दूरदृष्टीचा, पोक्त बुद्धीचा.

५. होळकरांस मुद्दाम होऊन भयंकर प्रसंगांत आणिलें नाहीं. लढाई टाळतां येईल तितकी टाळण्याचें धोरण राखिलें.

६. पाठलाग.

७. होळ. कैफी. पृ. ६४.

८. हो. कै. पृ. ६० (स्पुंद=गर्व).

लहान लहान टप्प्याचीं मुक्कामें करून जाऊं लागले. जिवबादादांसही होळकरांचा मान राखावयाचा होता. त्यांचा मुद्दाम होळकरांच्या वाटेस जाण्याचा इरादा नव्हता. परंतु उज्जनीचा इरादा मनांत ठेवून ते लौकर निघेनात. असें पाहून त्यांनीं मनांत आणिलें कीं, कांही दहशत बसविल्यावांचून एथून हे कूच करीत नाहींत. जिवबादादांचा हा निश्चय लक्षांत येतांच होळकर दिवसगतीच्या भरीस न पडतां, उज्जनी लुटून शिंद्यांचा सूड घेण्याचा आपला इरादा आतां सिद्धीस जात नाहीं असें जाणून, इंदुरास निघून गेले. त्यांच्यावर छापा घालून त्यांना लुटणें अगर युद्ध करून त्यांचा पुनः मोड करणें, ही गोष्ट जिवबादादांस कर्तव्य नव्हती. ह्मणून होळकरांस निर्विघ्नपणें जातां आलें. ह्यापुढें पाटीलबावांची आज्ञा आली कीं, " बिजेसिंग मृत्यु पावला. तेथील बंदोबस्तास मारवाडास जावें. व गोपाळराव भाऊंनीं इंदूर येथें होळकरास शह देऊन राहावें[१]. " त्याप्रमाणें गोपाळराव इंदुरास शह देऊन राहिले.

जिवबादादांस मारवाडास जावयाचें होतें, परंतु मारवाडची मसलत मोठी. तेथें बिजेसिंगाच्या गादीविषयीं त्याचे मुलगे व पुतणे यांत लढाया चालत होत्या. तिकडे जाण्यास फौजेच्या खर्चास पैशाची मोठी तूट होती. शिवाय पाटीलबावा पुण्यांत असून कारभारी बाळोबा तात्या त्यांजबरोबर होते. तेव्हां शिंद्यांचा राज्यकारभार, दिल्लीचा बादशाही कारभार आणि रजपूत वगैरे राजांसंबंधाचीं महत्त्वाचीं कारस्थानें त्यांना स्वतः पाहावीं लागत. महत्त्वाच्या बाबतींत पाटीलबावांचें लिहून येईल त्याप्रमाणें करावयाचें व बाकी सर्व व्यवस्था टाकटिकीनें जेव्हांचे तेव्हां सुयंत्र चालवावयाची, हें त्यांचें काम. अशा महत्त्वाच्या कामगिऱ्यांत हरएक प्रकारचे डावपेंच तर साधावयाचे, व व्यवस्थेंत ढिलेपणा ह्मणून काडीभर ठेवावयाचा नाहीं. आणि खर्चाच्या मोठ्या निकडींची प्रसंगविशेषीं पदरास खार लावून सुद्धां तोड पाडावयाची! ह्या गोष्टी किती दगदगीच्या, मेहनतीच्या व महत्त्वाच्या होत्या, हें सुज्ञ वाचकांच्या सहज लक्षांत येईल. यजमानसाहेबांच्या हितसंबंधाच्या कोणत्याही कामास ते अगदीं वाहिलेले असत[३]. पुढें आलेल्या कोणत्याही जडजोखमाच्या कामगारीची ते दगदग मानीत नसत आणि अत्यंत नाजूक व अत्यंत धाडसाच्या अशा दोनही कामांत डोकें व तरवार यांची करामत सारखी चालू ठेवीत असत! याप्रमाणें या बक्षीबहाद्दरांचा अव्याहत क्रम सुरू होता. या त्यांच्या श्रमांचें व कर्तबगारीचें सुंदर फल शिंदेशाहीस प्राप्त झालेलें आहे. या प्रसंगाबद्दल जिवबादादांनीं स्वतःच्या पत्रांत लिहिलें आहेः—" आह्मांस सरकारांतून इकडे मारवाडचे मसलतीस[२] पाठविलें. परंतु मोठी पंचाईत आहे! ईश्वर पार पाडील तें खरें. या समयीं चिरंजीव शिवबांनीं फारच सांभाळिलें. व चि. विश्राम यास लिहून पाठविलें. तो लहान मूल! त्यानें समयास अशी बाजू राखिली तें कोठवर लिहावें? आह्मांवर समयीं सरकारांतून आज्ञा मारवाडांत जावें. फौज तर मुळागिरीवरून होळकर यांचे पाठलागास उज्जनीजवळ आलों. तेव्हां त्रिनाचार अट्ट घेतल्याशिवाय (ते) कूच करीत नाहींत. चिरंजीवाचीं पत्रें 'मारवाडची मसलत कबूल

---

१. पहा पत्र नंबर ७०.

२. पहा पत्र नंबर १०३.

३. जिवबादादा हे शिंद्यांच्या कार्यास इतके वाहिलेले होते कीं, ते व शिंदे यांत कोणासही निराळेपणा बिलकूल भासत नसे. ह्मणून हिंदुस्थानांतील लोक त्यांस हे शिंद्यांच्या घराण्यांतीलच पुरुष आहेत असें समजत. पहा **'भाषासार' नामक हिंदुस्थानी पुस्तक.**

करीत नाहीं तर सरकारची मर्जी ठीक राहणार नाहीं. ' जसें कळेल तसें करून जावें हेंच वर्तमान चि० शिवबास लिहून पाठवावें. त्यानेंहि पुढें मारवाडची मदत बहूत करून येणें. आल्याविना परिणाम नाहीं. कूच करावें तर सावकार लोकांचीं धरणीं. खर्चाविना एक दिवस चालेना. मग चि० शिवबानें व विश्राम यानें अजमीर व जावद व उज्जन मिळोन तीन लक्ष रुपये कर्ज झालें. यांत धन्याचे व वडिलांचे आशीर्वादें बहुत राखिलें[1]. " याप्रमाणें पुष्कळ अडचणी असतांही हरएक प्रकारें जिकडील तिकडे व्यवस्था लावून, जिवबादादा पाटीलबावांच्या हुकुमाप्रमाणें मारवाडास गेले. तिकडील हकीकत थोडक्यांत अशी आहे.

मारवाडचा राजा विजयसिंग सन १७९३ च्या आरंभीं मरण पावला. त्यास सात मुलगे होते. त्यांत वडील मुलगा जालीमसिंग ह्यास गादी मिळावयाची. परंतु विजयसिंगानें आपल्या एका आवडत्या स्त्रीच्या मर्जीप्रमाणें आपला मुलगा शीरसिंग ह्याचा पुत्र मानसिंग ह्यास गादीवर बसविण्याचें ठरवून ठेविलें होतें. परंतु विजयसिंग मरतांच त्याचा चवथा पुत्र भीमसिंग ह्यानें गादी बळकावून जालीमसिंग ह्याचा लढाईत पराभव केला. आणि दुसऱ्या बंधूंची, कोणास विषप्रयोग करून, कोणास तरवारीनें तोडून, वाट लाविली! त्याच्या तडाख्यांतून वरतीं सांगितलेला मानसिंग— जो राखेच्या मांडीवर बसविलेला होता, तो—मात्र झालूर एथें पळून गेल्यामुळें बचावला. तें ठिकाण मजबूद होतें ह्मणून त्यास वेढा देऊन त्याची नाकेबंदी करून भीमसिंग बसला. नंतर जिवबादादा जाऊन पोहोंचले. हे तळ देऊन राहिल्यावर भीमसिंगाच्या पक्षाकडील एकेक ठाकूर ह्यांना येऊन मिळत गेल्यामुळें त्याचा पक्ष निर्बळ झाला. भीमसिंगानेंही जाणलें कीं, आतां आपला डाव साधत नाहीं, ह्मणून त्यानें जिवबादादांकडे सलोख्याचें बोलणें लाविलें. जिवबादादांनीं त्यांच्या आपसांतल्या भानगडींची व्यवस्था लावून विजेसिंगाच्या हेतूप्रमाणें मानसिंगास गादीवर बसविलें. जिवबादादांनीं ही व्यवस्था करून सर्व तंटे तोडिल्यामुळें ते रजपूत राजे प्रसन्न होऊन त्यांनीं त्यांच्या सत्कारार्थ एक मोठा दरबार भरविला, आणि त्यांस भरजरी पोषाख, कंठे वगैरे नजर देऊन त्यांचा गौरव केला. त्याचप्रमाणें सैन्याच्या खर्चाबद्दलची रक्कम त्यांच्या हवालीं केली. अशाप्रकारें मारवाडच्या राज्यांतील तंटे तोडून 'त्यांच्या राज्याचा बंदोबस्त करून जिवबादादांनीं दिला.' ह्या महत्त्वाच्या कामाबद्दल त्यांनीं खुद्द जिवबादादांस पाऊणलाख रुपयांची जाहागीर ताम्रपट करून दिली[2].

रजपूत राजांकडून अलिजा बहादर महादजी शिंदे खंडण्या घेत होते खरे, पण त्यांना शिंद्यांपासून वर लिहिल्याप्रमाणें मोबदलाही मिळे. ह्मणजे तोबऱ्याला पुढें आणि लगामाला मागें अशी त्यांची स्थिति नव्हती, हें वाचकांच्या लक्षांत येईल.

गोपाळराव भाऊंस होळकरांच्या शहावर इंदुरास ठेविलें होतें. आपल्यापासून होळकरास हा त्रास होत आहे असें जाणून, नाना फडणविसांनीं गोपाळराव भाऊंशीं संधान बांधिलें[3]. आणि शहांत ढिलाई करविली. ही बातमी पाटीलबावांस समजतांच त्यांनीं गोपाळरावाकडील लष्कर, कंपू तसेंच शिक्का मोर्तब व सर्व अधिकाराचीं चिन्हें काढून घेऊन हिंदुस्थानचे सुभ्यासुद्धां सर्व काम

१. पहा पत्र नंबर ७०.

२. परिशिष्टांतर्गत घनश्याम नारायण बक्षी यांची कैफीयत व पत्र नं. ४००, हीं पहा.

३. नातूकृत महा. च. टीप पृ. २५९.

सेनापति जिवबादादांकडेसच सुपूर्त केलें. आणि गोपाळराव भाऊंस उज्जनीस नेऊन ठेविलें[1]. याप्रमाणें "नाना फडणिसाचा मित्र जो तुकोजी होळकर त्याचा पराभव होऊन तो अगदीं जेरीस आला. हें वर्तमान व तेवढा इस्मायल बेग जो आपला एकटा मुसलमान शत्रु उरला होता तोहि कैद झाला हें वर्तमान, त्याला (महादजीला) येऊन पोहोंचलें. तेव्हां आतां साऱ्या उत्तर व पश्चिम हिंदुस्थानांत आपल्याला शत्रु उरला नाहीं ह्मणून त्याला आनंद झाला. " या वेळीं शिंद्यांचा राज्यविस्तार, वैभववृद्धि व सर्वत्र दरारा, हीं अतिशय वाढलीं होतीं.

उज्जनीहून महादजींची स्वारी दक्षिणेंत येण्यास निघाली असल्याचें मागें लिहिलेंच आहे. ते येत असतां रस्त्यांत त्यांस पुष्कळ राजेरजवाडे यांचे प्रांत लागले. त्यांचे वकील व ते त्यांस भेटण्यासाठीं येत व त्यांस लागतील ते पदार्थ देऊन त्यांची बोळवण करीत. अशी ही मोठ्या लवाजम्याची स्वारी बाळेघांटावर येऊन पोहोंचली. त्या ठिकाणीं व्यंकाजी या नांवाचा एक पुंड चोऱ्या करून फार माजला होता. त्याचें पारिपत्य केलें व तुळजापुरास आले. तेथें देवीचा नवस फेडिला व चंद्रभागेचें स्नान केलें. पुढें हलकीं हलकीं मुक्कामें करीत ही स्वारी ता० ११ जून १७९२ रोजी पुणें एथें संगमावर दाखल झाली. वकील मुतलखीची पदवी श्रीमंतांस थाटानें अर्पण करण्याचा त्यांचा मानस होता.

महादजी शिंदे मोठ्या लवाजम्यानिशीं दक्षिणेंत येत आहेत असें ऐकिल्यापासून नाना फडणविसांस एक मोठी काळजी उत्पन्न झाली होती. आजपर्यंतच्या डावपेचांची परम्परांस चांगली आठवण असल्यामुळें, महादजींचा हेतु केवळ श्रीमंतांस भेटून जाण्याचा किंवा बादशहानें दिलेली वकील मुतलख पदवी त्यांस अर्पण करण्याचाच नसावा, तर तो ते दाखवितात त्याहून फार भिन्न असावा, असा त्यांचा तर्क होता. ह्मणून त्यांनीं आपला पक्ष खंबीर करण्याकरितां हरिपंत फडके—हे तेव्हां कर्नाटकच्या स्वारीवर होते यांस पुण्यास बोलवून आणिलें व इंग्रजांकडे फौजेची मागणी केली. परंतु, ती त्यांनीं दिली नाहीं. ह्मणून नानांनीं परशुरामभाऊ पटवर्धनांस सैन्यासहवर्तमान बोलाविलें. तेव्हां ते दोन हजार स्वारांसह येऊन दाखल झाले. महादजी शिंदे पुण्यास येऊन पोहोंचले, त्याच्या तिसरे दिवशीं, ह्मणजे ता० १३ जून सन १७९२ रोजीं, श्रीमंत पंतप्रधान सवाई माधवराव पेशवे, नाना फडणवीस व हरिपंत फडके हे मोठ्या थाटानें त्यांस सामोरे गेले. श्रीमंत सामोरे गेले असतां सलामीसाठीं "महादजी शिंदे यांणीं आपली फौज दुरस्ता फऱ्यानें उभी सरकारचे मुजऱ्यास केली. एक तर्फेनें घोडेदळ उभें राहिलें. त्यांत पागे व शिलेदार व पठाण हुजुरात शिंदे यांची उभी राहिली. दुसऱ्या फऱ्यानें चार कंपू उभे केले. त्यांमध्यें तोफा उभ्या राहिल्या. बैल तोफेस जुंपलेले असा सरंजाम सरकारचे सलामीसाठीं उभा केला. त्या वेळेस शिंदे यांचे दौलतीची गणना काय करावी ! कीं रावणासारखी दौलत अशी उपमा ! ! घोडेस्वार घोड्यांवर स्वार झालेले. त्यांचे डोकीस मंदील, आंगांत झगा, आंगावर शालजोड्या, हातांत शालनाम्याचा रुमाल, पायांत किनखापी विजारा, असे साज बंदुका बांधून मुजऱ्यासाठीं उभे राहिले. हातांत सोन्याचीं कडीं. गळ्यांत कंठी, कानांत चौकडे. असे स्वार भालेकरी व आडहत्यारी करोल उभे राहिले. तसेच हत्ती उभे. वरती अंबाऱ्या ठेविल्या. याप्रमाणें कोतवाल घोड्यांचा सरकारचे मुजऱ्यासाठीं फरा उभा राहिला

१. पहा पत्र नंबर ४२३.

२. ग्यालेसनच्या इति. भा. पृ. १६४।१६५.

आहे. दुसरे तर्फेनें कंपू सहा, दोन कोशपर्यंत तोफांसुद्धां उभे केले आहेत. ×× याप्रमाणें दोन कोशपर्यंत स्वारी सरकारची मुजरे घेत आली. शेवट झाला तेथें उभी राहिली. आणि तोफा सोडावयाची व कवाईत करण्याची आज्ञा झाली. ×× बाराशें तोफेचा आवाज सुटला. त्यासमयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन स्वारी वाड्यांत जाण्यास फिरली."[1] नंतर बादशहाकडून वकील मुतलख पदवी व तत्संबंधी पोषाख वगैरे आणिलेलें श्रीमंत पेशव्यांस मोठ्या थाटानें अर्पण करण्यासाठीं एक बडा दरबार भरविण्याचा निश्चय केला. नंतर दुसरे दिवशीं महादजी पेशव्यांस भेटले, आणि त्यांनीं समारंभाचा दिवस मुकरर केला. महादजींनीं ज्या नजरा बादशहाकडून पेशव्यांस देण्यासाठीं आणिल्या होत्या, त्यांत मोर्चेलें नव्हतीं, तीं असावीं असा दरबारांत विचार निघाला. ह्मणून त्यांनीं ताबडतोब सांडणीस्वार पाठवून दिल्लीहून तीं आणविलीं.[2] पुढें नाना फडणविसांनीं वकील मुतलख पदवीची सनद पाहिली, व ती पेशव्यांनीं ग्रहण करणें बरोबर नाहीं असा त्यांचा विचार होता. परंतु ती गोष्ट रुचण्यासारखी नव्हती. तेव्हां तींत 'महाराजाधिराज' असें पेशव्यांस गौरवात्मक विशेषण होतें, तें केवळ छत्रपतिमहाराजांस योग्य. पेशव्यांस योग्य नव्हे. अशी त्यांनीं शक्कल काढिली! पण महादजींनीं साताऱ्याहून महाराजांची मान्यता आणवून तीही अडचण दूर करविली.[3] अशा रीतीनें पुण्यांत बसल्या बसल्या पाटीलबावांनीं या दोनही बाबतींचा निकाल लावून दरबाराकरितां एक दिवस ठरविला. पाटीलबावांनीं हिंदुस्थान जिंकून जें अलौकिक यश जोडिलें; बादशाहीचीं सूत्रें आपल्या मुठींत वागवून जो अश्रुतपूर्व अधिकार संपादिला; सर्वांनीं तोंडांत बोट घालण्यासारखें जें वैभव मिळविलें; तेणेंकरून वास्तविकपणें ह्मटलें तर सर्व मराठ्यांस सारखाच आनंद झाला पाहिजे होता. परंतु सर्वच चांगल्या अंतःकरणांचीं व गुणाचीं चहातीं माणसें कोठून आणावीं? "महादजीच्या उत्कर्षास सुरुवात झाली, त्याला मध्यंतरीं कांहीं विघ्न आलेंच नाहीं असें नाहीं. परोत्कर्षासहिष्णु, मत्सरी, निंदक अशांना कोणाची कीर्ति पसरत चाललेली ऐकूं येऊं लागली, ह्मणजे त्यांचें कपाळ दुखूं लागतें! त्याप्रमाणें महादजीच्या गुणांची जरी सर्वत्र प्रशंसा होऊं लागली, दरबारांत त्याचें माहात्म्य वाढत चाललें, तरी कांहीं असामींनीं त्याला आडकाठी घालण्याचें आपलें काम तेवढें केलें! परंतु महादजी तशाला जुमानणारा नव्हता. त्यांच्या दुष्ट कृत्यांमुळें त्याच्या बेतांना अडथळे येत. परंतु ते तो मोठ्या विघ्नांत गणीत नसे[4]." याप्रमाणें आलेल्या अडचणी दूर करून पाटीलबावांनीं पुढील समारंभ थाटदार करण्याची जारीनें तयारी चालविली.

हा समारंभ शिंदे यांचे लष्करांत वानवडीवर व्हावा, असें ठरलें होतें. मग शिंद्यांच्या तळापासून जवळच राजकीय थाटाच्या डेऱ्यांची रांग उभी केली. सर्वांच्या मागें एक मोठा बादशाही थाटाचा

१. पेशव्यांची बखर पृ. १२८।१२९.

२. पहा पत्र नंबर ११०.

३. नाना फडणवीसांचें खरेकृत च० पृ. १३६ व नातूकृत महा. च. पृ. २४७।४८. हा सातारकर छत्रपतींचा मान शिंद्यांच्या बेतास आडकाठी आणण्यापुरताच होता. वस्तुतः छत्रपतींस वाईट वाटेल तें न करण्याविषयीं पेशवे अगर नाना फडणीस यांनीं कधीं खबरदारी घेतलेली दिसत नाहीं. नवीन पेशव्यांस वस्त्रें द्या ह्मटलें ह्मणजे त्यांनीं द्यावयाचीं आणि पेशव्यांकडून जाहीराण्यासाठीं कांहीं हकीकतींचीं पत्रें येतील तीं वाचून ठेवावीं हें त्यांचें काम!

४. म्यालेसनचे इति. भाषां. पृ. १५२.

मौल्यवान् सुंदर डेरा उभा केला होता व त्यांत कचेरीकरितां सर्व आसनें वगैरे मांडून, मध्यभागीं बादशाही तक्त केलें होतें. आणि त्यावर सनद व आणिलेले सर्व अलंकार ठेविलेले होते. नंतर संकेताप्रमाणें श्री० सवाई माधवराव साहेब पेशवे मोठ्या समारंभाच्या स्वारीनिशीं येऊन त्यांनीं त्या बादशाही तक्तास तीन वेळ मुजरा करून एकशेंएक मोहरा नजर केल्या. आणि त्या तक्ताच्या डाव्या बाजूस त्यांच्या करितां तयार केलेल्या आसनावर ते विराजमान झाले. नंतर वकील मुतलख् पदवीची सनद व बादशाही राज्यांत कोठेंही गोवध होऊं नये अशाबद्दलची सनद, अशा दोन्ही सनदा शिंद्यांकडील मुनशीनें वाचून दाखविल्या. नंतर आणिलेले सर्व अलंकार--शिरपेंच २, तुरा १, बाहुभूषण जोड १, पोंहोंच्या जोड १, शिवाय कंठी, कुडक्या, भिकबाळी, कडींतोडे, कलमदान, मोर्तब १,–व मोर्चलें २, ढाल तरवार, एक घोडा, एक हत्ती, शिवाय बादशाही झेंड्याचे हत्ती ६, नालकी, पालखी, याप्रमाणें सरंजाम शिंद्यांनीं बादशहातर्फे पेशव्यांस अर्पण केला. नंतर तो नवीन पोषाख आंगावर घालून पेशवे आपल्या जागीं बसले. व त्यांनीं महादजींस आपल्या तर्फे बादशाही वजीरातीचीं वस्त्रें दिलीं. व तिकडून आलेला " राजे माहाराज माधवराव शिंदे सदार उलम हा " हा किताब वस्त्रभूषणांसह दिला. या समारंभास महादजींचें लष्कर वानवडीपासून पुण्यापर्यंत दोन तीन कोस उभें होतें. हा समारंभ अशा थाटाचा झाला कीं, " त्यापूर्वी पुण्यांतील लोक यांहीं कधींही तसा समारंभ पाहिलेला " नव्हता. ही गोष्ट ता० २४ जून सन १७९२ रोजीं घडली.

वकील मुतलख् सनद पेशव्यांस मिळाली त्यांतच असें होतें कीं, दिल्लीचा कारभार पेशव्यांतर्फे माधवराव शिंद्यांनीं पाहावा. त्याप्रमाणें पेशव्यांनीं दरबारांत प्रसिद्धपणें सांगितलें. आणि हें काम आटोपल्यावर पेशवे पुण्यास आले. या गोष्टींमुळें महादजी शिंद्यांची कीर्ति सर्वतोमुखीं होऊन ते श्रेष्ठत्व पावले.

नाना फडणवीस व महादजी शिंदे यांचें परस्परांविषयीं अंतर्याम शुद्ध नव्हतें. आणि त्यांत होळकरांबरोबर जी नुकतीच शिंद्यांची लढाई झाली होती, तीमुळें तर तें वैमनस्य बरेंच वाढलें होतें. शिवाय, शिंद्यानें बादशहाकडून पेशव्यांकरितां पदवी आणून जो हा दरबाराचा थाट केला, तेणेंकरून पेशव्यांचें अंतःकरण तो सहज आपल्याकडे ओढून घेईल, आणि अर्थातच आपलें वजन नाहींसें होईल, असा त्यांचा समज होता. ह्मणून नाना आपला पक्ष मजबूद करण्याविषयीं निरनिराळ्या मसलती योजूं लागले. नानांनीं फडक्यांकडील व पटवर्धनांकडील फौजा व तोफखाने आणून ठेविल्याचें मागें लिहिलेंच आहे. त्यांच्या आपल्या विरुद्ध मसलती चालू आहेत हें समजतांच पाटीलबावांनीं डि. बॉयनाच्या हाताखालील पलटणें पुण्यास आणविलीं. पुढें महादजींनीं दरबारांत मागणी केली कीं, मीं मोठी खटपट करून पेशव्यांचा मान वाढविला आणि मराठे मोठ्या योग्यतेस चढविले. त्यासंबंधीं मला झालेला खर्च मिळावा. त्यावर नाना ह्मणाले, तुह्मीं हिंदुस्थानांत जो मुलूख घेतला, त्यांतून खर्च भागून जें उरलें असेल, तें आह्मास द्यावें. याप्रमाणें नानांनीं महादजींकडे हिशोब मागितला. हें ऐकतांच आजपर्यंत तुह्मीं कारभार केला, त्याचा हिशोब आह्मांस द्यावा,

१. ग्रांट डफची बखर पृ. ३२३.

२. ग्रांट डफची बखर पृ. ३२३।३२४.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९४.

असें महादजींनीं सांगितलें[1]. याप्रमाणें परस्परांचा वाद वाढत चालला, व पाटीलबावा पेशव्यांच्या कारभारांत स्वतः मन घालूं लागले[2].

या प्रसंगीं रघुनाथ संकाजी सचीव हे अल्पवयस्क असल्यामुळें, त्यांच्या संस्थानचा कारभार पाहण्यास नानांनीं आपला एक बाजी मोरेश्वर या नांवाचा मनुष्य नेमिला होता. तो त्या कामास लायक नसून लोकप्रिय नव्हता. सबब त्यास पाटीलबावांनीं दूर करून तेथें दुसरा मनुष्य नेमिला.

फत्तेसिंग गायकवाड सन १७८९ त वारला. त्याच्या बंधूंमध्यें गादीविषयीं तंटे सुरू झाले. त्यांत गोविंदराव गायकवाड हा वडील असून गादीवर त्याचा विशेष हक्क होता. असें असतां मानाजी गायकवाड याजकडून पुष्कळ खंडणी व नजराणा घेऊन, नानांनीं सेनाखासखेलचीं वस्त्रें त्यास दिलीं होतीं, तीं पाटीलबावांनीं रद्द करून गोविंदराव गायकवाडास देवविलीं[3], आणि गायकवाडच्या गादीवर विशेष हक्कदारास बसविलें[4].

वाडी सरकार सावंत देसाई हे समुद्रांत चांचेपणा करीत. त्यांनीं इंग्रजांचीं गलबतें लुटलीं होतीं. त्यामुळें राग येऊन मुंबईकर इंग्लिशांनीं सावंतवाडीवर स्वारी करण्याचा निश्चय केला. हाही कलह ह्या प्रसंगीं पाटीलबावांनीं मिटविली. आणि वाडीकर सावंतांस निर्भय केलें[5].

कित्तूर संस्थानचे अधिकारी मल्लगौडा ह्या नांवाचे असून, ते अल्पवयस्क होते. त्यांच्याशीं संगनमत करून कांहीं दुष्ट लोकांनीं त्या संस्थानचे कारभारी राळप्पा खासनीस ह्यांस ठार मारल्यामुळें, त्या संस्थानांत अव्यवस्था माजली होती. ही गोष्ट नारायणराव बक्षी यांनीं पाटीलबावांच्या नजरेस आणिल्यावर, त्यांनीं राळप्पाचा बंधु भिकप्पा यास कारभार देऊन तेथील बंदोबस्त केला.

बावडेकर पंत अमात्य यांचे संस्थानास सातारकर पंत अमात्याचा त्रास पोहोंचूं लागला. त्यांत नाना फडणविसांचें अंग होतें. तेंही प्रकरण केरकरांमार्फत पाटीलबावांकडे आलें. तेव्हां त्यांनीं त्याही गोष्टीचा बंदोबस्त केला[6].

गोवेंकर फिरंगी यांजकडून केरकर वगैरे पाटीलबावांच्या मुत्सद्यांचीं इनामें निर्वेधपणें चालण्यास हरकत येऊं लागली. त्यासंबंधीं पूर्वीं पाटीलबावांनीं पेशव्यांमार्फत प्रकरण सुरू ठेविलें होतें. त्या गोष्टीचाही त्यांनीं ह्या प्रसंगीं बंदोबस्त केला[7].

बागणीकर मंत्री यांस कोल्हापूर सरकाराकडून दरसाल खंडणीसंबंधानें त्रास पोहोंचत होता. वस्तुतः कोल्हापूरकरांचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नव्हता. सबब जिवबादादांमार्फत आलेल्या या प्रकरणांत पाटीलबावांनीं मन घालून, मंत्र्यांकडून कोल्हापूरकरांनीं खंडणी घेऊं नये, असें ठरविलें[8].

बुधकर घाटगे यांस पेशव्यांकडून त्रास पोंचे, तो जिवबादादांमार्फत महादजींकडून बंद झाला[9].

१. नातूकृत महा. च. पृ. २६०.

२. नागपूरकर भोंसल्यांची बखर पृ. १४३.

३. ग्रांट डफची बखर.

४. पहा पत्रें नंबर २७१ व ग्रांट डफचा इतिहास व नातूकृत महा. चरित्र पृ. २६१.

५. पहा पत्र नंबर १९६.

६. पहा पत्र नंबर ५०.

७. पहा पत्रें नंबर ९५।९९।४१५.

८. मंत्री यांचे दप्तरीं असलेला याबद्दलचा पत्रव्यवहार पाहण्यासारखा आहे.

९. पहा सोबतचें पत्र.

सौंदे संस्थानांतील सदाशिवगड किल्ला फिरंग्यांचा असून, तो पेशव्यांनीं घेतला होता. तो त्यांजकडून लढून घेतां येणें दुरापास्त जाणून, फिरंग्यांनीं जिवबादादा व लखबादादा हे कार्यकर्ते ह्मणून त्यांजमार्फत पाटीलबावांकडे संधान चालविलें. पाटीलबावांनीं तो किल्ला पेशव्यांनीं बळकावणें नीट नाहीं असें समजावून फिरंग्यास तो किल्ला परत देण्यासंबंधानें छकड लाविली.

वाडी सरकारास जिवबादादांनीं दिल्लीच्या बादशहाकडून राजेबहादर किताब व मोर्चेलें सन १७८५ त देवविल्याची हकीकत पूर्वी आलीच आहे. हा मोठा मान जिवबादादांनीं त्यांस देवविला, ह्मणून नाना फडणवीस व हरिपंत फडके यांस फार वाईट वाटलें. याबद्दल वाडीकरांचें गाऱ्हाणें जिवबादादांकडेस आलें कीं, "आपण सर्व प्रकारें अभिमान धरीत गेलां. पुढां पाछाई मरातबही पाठविली. सर्वांमध्यें आनंद होऊन हर्ष जाहाला. परंतु राजश्री हरिपंत तात्या यांची चित्तशुद्धता श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांकडेस नाहीं. याकरितां करवीरास साहित्य देऊन फौज रवाना करून प्रांतांत उपद्रव केला! ठाणीं व कांहीं प्रांत घेतला." याबद्दल वाडकरांकडून लिहून आलेल्या प्रत्येक खेपेस जिवबादादांनीं पाटीलबावांस प्रांत सोडून देण्याचे तजविजीबद्दल सांगत असावें, व त्यांनीं नाना फडणविसांस पत्रें देऊन हें काम करण्याविषयीं लिहावें, असें पुष्कळ वर्षे चाललें होतें. कां कीं, पाटीलबावा व जिवबादादा यांस उत्तरेकडील महत्त्वाच्या कामांमुळें या बाबतींत विशेष लक्ष घालण्यास वेळ नव्हता. यास्तव, या गोष्टीचा उगम आपल्यापासूनच असल्यामुळें, नानांनीं आलेलें प्रकरण दाबून ठेवावें, असें चाललें होतें. हा इंगितार्थ शिंद्यांचे वकील रामजी पाटील यांजकडून बाळोबा तात्यांस सविस्तर समजल्यामुळें त्यांनीं 'स्वतः पुण्यास जाऊन हें काम केल्याशिवाय याचा निकाल लागत नाहीं,' असें पाटीलबावांस सांगितलें. हा पत्रव्यवहार सात आठ वर्षें सारखा चालला होता. पाटीलबावा पुण्यांत आल्यावर ह्या संबंधाच्या कोल्हापूरकरांच्या व पेशव्यांच्या हरकती तत्काल नाहींशा झाल्या! आणि त्यांनीं वाडी सरकाराकडे मोर्चेलें चालण्यास कोणतीच हरकत नाहीं, असें पेशव्यांकडून लिहून घेतलें. व वाडीकरांचे प्रांत कोल्हापूरकरांकडून सोडवून दिले.

ह्याप्रमाणें महादजी शिंदे पुण्यांत राहून कामकाज व कारभार पाहत असतां, त्यांच्या युक्तीपुढें थोडक्याच दिवसांत नानांचें कांहीं चालेनासें झालें. पाटीलबावांचा उत्साह, पाणीदारपणा, थोर कर्तबगारी व बुद्धिमत्ता, ह्या गुणांच्या योगानें ते सवाई माधवरावांस फार प्रिय झाले होते. तेव्हां नाना फडणविसांस ती एक मोठी काळजी लागून राहिली. महादजींशीं नानांचें वागणें शुद्ध अंतःकरणाचें नव्हतें, व हरएक कामांत नानांकडून त्यांस त्रास पोहोंचत होता. त्यामुळें पेशव्यांचा कारभार स्वतः पाहावा, अशी पाटीलबावांची इच्छा होती. होळकर शिवाय करून इतर दरबारांसही नानांचा कारभार फारसा इष्ट होता, असें ह्मणतां येत नाहीं.

१. पद्दा पत्र नंबर ४१६।८६.
२. पत्र नंबर ३०.
३. पद्दा पत्र नंबर ८४.
४. पत्र नंबर १११।११४.
५. ग्रांट डफची बखर पृ. ३२५.
६. *वस्तुतः सवाई माधवरावांनीं नानांची कोणतीही अमर्यादा केली नव्हती.*
७. ग्रांट डफच्या बखरीवरून व त्यासारख्याच त्या काळच्या इतर इतिहासावरून गायकवाड नानांच्या मता-

एके दिवशीं पाटीलबावांनीं पेशव्यांस 'तुमचा कारभार आह्मी करणार,' असें सांगितलें. ते ह्मणाले, 'तुह्मी व नाना माझे डावे उजवे हात आहां. यांतून कोणीही नसला तरी माझें चालणार नाहीं.' पुढें ह्या हकीकती नानांस समजल्यावर त्यांस दिसून आलें कीं, शिंदे कधीं तरी आपला उद्देश खचीत शेवटास नेल्यावांचून रहावयाचे नाहींत. तेव्हां नानांनीं श्रीमंतांची भेट घेऊन त्यांजकडे शिंद्यांची गोष्ट काढिली, आणि डोळ्यांत पाणी आणून काशीयात्रेस जाण्याचा निरोप मागितला. तेव्हां त्यांनीं नानांचें समाधान करून त्यांस परत पाठविलें.

नंतर नाना व हरिपंत यांनीं मसलत योजिली कीं, या कामीं प्रत्यक्ष महादजींचेंच मन वळविलें पाहिजे, त्यावांचून कार्य साधावयाचें नाहीं. मग त्या कामाचा पतकर हरिपंतांनीं स्वतः घेतला, व एके दिवशीं दोनप्रहरीं ते खिजमतगारास बरोबर घेऊन पालखींत बसून शिंद्यांच्या लष्करांत गेले. तेथें पाटीलबावांची व त्यांची भेट झाल्यावर "महादजी शिंदे तात्यांस ह्मणतात, असे उन्हाचे सडी स्वारी कोणी बरोबर नाहीं, असें यावयाचें कारण कोणतें? हें ऐकून तात्या ह्मणतात, अहो बोवा, यावयाचें कारण तुह्मी सरकारचा कारभार करणार. नानांनीं व मीं कारभारांत नसावें, आह्मी उभयतां सरकारचे अपराधी, ह्मणून तुह्माजवळ आलों. काय पारिपत्य करावयाचें असेल तें करावें. कोणीकडून श्रीमंतांचें राज्य निर्विघ्न चालावें, हा संकल्प आमचा आहे." हें ऐकतांच मोकळ्या मनाचे व थोर दिलाचे पाटीलबावा त्यांना लागलेच वळले, आणि ह्मणाले, 'कारभार करावा अशी इच्छा होती खरी, तरी तुमच्या संतोषार्थ ती गोष्ट आतां आह्मी मनांत आणीत नाहीं.' असें शपथपुरःसर सांगितलें. तेव्हां तात्यांनीं श्रीमंतांचे पाय स्मरून शपथ वाहिली कीं, यापुढें आपल्याविरुद्ध चालणार नाहीं. तेव्हां उभयतांच्या चित्तांतील संशय दूर झाला. मग हरिपंतांनीं पुण्यांत येऊन झालेली सर्व हकीकत नानांस कळविली. नंतर शिंदे, नाना व तात्या यांच्या भेटी होऊन सर्वांची खातरजमा झाली. पुढें त्रिवर्गांचा शुद्ध स्नेह चालला.[1]

आजपर्यंत नानांकडून पाटीलबावांविरुद्ध ज्या गोष्टी घडून आल्या, व होळकरांस आपल्या पक्षाचे करून घेऊन त्यांजकडून जो त्यांनीं त्यांस त्रास देवविला, त्यासंबंधीं नानांविषयीं पाटीलबावांच्या मनांत मोठी अढी गडून गेली होती, व त्यामुळेंच नानांचा कारभार काढून घ्यावा, असें त्यांच्या मनांत भरलें होतें. पाटीलबावा दीर्घद्वेषी असते तर सवाई माधवरावांस नानांकडील कारभार काढण्याचें कितीही कठीण वाटलें असतें, तरी त्यांनीं पाहिजे ती युक्ति लढवून आपला इरादा शेवटास नेला असता. परंतु ते उदारधी व मोकळ्या मनाचे असून प्राप्त वैभवास शोभण्यासारख्या सर्व चांगल्या गुणांनीं युक्त होते. ह्मणूनच हरिपंतांस त्यांना एका घटकेंत वळवितां आलें. नाहीं तर एवढे पराक्रम करून व मोठा लौकिक मिळवून चांगल्या तयारीनिशीं पुण्यांत आलेले पाटीलबावा पुण्याचा कारभार स्वतः हांकल्याशिवाय कधींही राहिले नसते. ह्यावरून पाटीलबावा व नाना यांमधील अंतर सुज्ञ वाचकांच्या तेव्हांच लक्षांत येईल. नानाचा अभिमान ब्राह्मणशाहीपुरताच होता. पण पाटीलबावांची गोष्ट त्याहून निराळी होती.

शिंदे पुण्यांत आल्यापासून त्यांनीं मनोरंजनाचे नवनवे प्रकार सुरू करून श्रीमंतांचें मन नानांच्या एक प्रकारच्या सामुरव्यामानें जें अप्रसन्न होतें, तें विकसित व उत्साहपूर्ण केलें. तेणेंकरून

विरुद्ध वागत, असें दिसून येतें. गोमल्यांसही नानांचें मन पसंत नव्हतें. सातारकर, कोल्हापूरकर वगैरे बहुतेकांस नानांचा कारभार इष्ट होता, असें दिसत नाहीं. ग्रांट डफची बखर पृ. ३३७।३३९.

१. पेशव्यांची बखर पृ. १३४.

श्रीमंतांस पाटीलबावा फार आवडूं लागले. मनुष्याचें मन स्वतंत्रताप्रिय असतें. त्याला लहानपणापासून सुशिक्षण व नियमितपणा ह्यांची जशी आवश्यकता आहे, तशीच त्याला योग्य स्वतंत्रतेचा उपभोग घेऊं देणें, हीही गोष्ट इष्ट व हितपरिणामी होय. ह्या संधीस श्रीमंत सवाई माधवरावांचें कुटुंब वारलें. तेव्हां पाटीलबावा व नाना फडणवीस यांनीं त्यांचें दुसरें लग्न मोठ्या थाटानें केलें. त्या वेळीं आतषबाजीचीं वगैरे चित्ताकर्षक कामें करून श्रीमंतांस त्यांनीं खुष केलें. पुढें पाटीलबावांनीं नानांच्या संमतीनें फारच मोठ्या थाटाचा रंगाच्या खेळाचा उत्सव चैत्र शु० १ स केला. त्या वेळीं पुण्यांत मौजेचा बहार उडाला.

याप्रमाणें पाटीलबावांनीं पुण्यांत चोहोंकडे आनंदीआनंद चालविला होता. त्यांच्या वैभवाच्या अवलोकनानें आणि त्यांनीं पेशव्यांकरितां चालविलेल्या अनेक मनोरंजक प्रकारांनीं लोकांच्या दृष्टि निवत होत्या. नानांच्या करारी, कडक व एक प्रकारच्या कैदबाज वागवणुकीमुळें निरुत्साह व विमनस्क होत चाललेल्या सवाई माधवरावांचें मन सुप्रसन्न व उत्साहपूर्ण होत होतें; व सर्व मराठी राज्यसमुद्रास भरती आलेली होती. परंतु भगवदिच्छा वेगळीच होती! मराठेशाहीच्या वैभवाचा मुख्याधारभूत स्तंभ -किंबहुना संपूर्ण हिंदुस्थानच्या खऱ्या आधिपत्याचा उपभोक्ता असा हा मोहरा— पानिपतादिक शेंकडो धक्क्यांनीं जर्जर झालेल्या मराठेशाहीच्या भवितव्यतेशीं झगडून तिला मिथ्यात्व आणीत आहे, तोंच जीवमात्राचा शत्रु जो काळ, त्यानें आपले पाश त्याच्या गोटाभोंवतीं आणून टाकिले! आणि ज्याच्या अस्तित्वावर सर्व हिंदुस्थानच्या शक्तिमत्तेची व वैभवाची मदार अवलंबून होती, तें महादजी शिंदे नामक प्रस्थ आपल्या स्वाधीन करून घेण्याकरितां त्यावर प्रयोग चालविला. पाटीलबावांस एकाएकीं ज्वर येऊं लागला, व दिवसेंदिवस तें दुखणें बळावून नवज्वरावर गेलें. पाटीलबावा फार आजारी असल्याचें ऐकून श्रीमंत सवाई माधवराव पेशवे, नाना फडणवीस व इतर सरदार वगैरे मोठमोठे लोक त्यांच्या समाचारास गेले. पाटीलबावांचें तें दुखणें अखेरचेंच होतें. ते आतां वांचण्याचा संभव नाहीं असें जाणून, त्या सर्वांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. पाटीलबावांचा पेशव्यांवर व पेशव्यांचा त्यांजवर अत्यंत लोभ होता. त्यामुळें व पुढील अनेक प्रकारच्या काळ-ज्यांमुळें श्रीमंतांस पाटीलबावांचा चटका लागून राहिला. जिवबादादा त्या वेळीं बाहेरगांवीं होते, त्यांस पाटीलबावांनीं ताबडतोब आणविलें. जिवबादादांस पाटीलबावांची ही स्थिति पाहून तर त्रैलोक्य आठवलें! पाटीलबावा हें केवळ त्यांचें दैवतच होतें ह्मटल्यास चालेल. शिवाय, ह्या जोडीनें, वरून धनीचाकर ह्या नात्यानें परंतु वास्तविकपणें खऱ्या जुगलीनें, संकल्पित महान् उद्योग सिद्धीच्या हद्दीपर्यंत जाण्यासाठीं मोठ्या बहादुरीनें व दीर्घ कारस्थानानें जे पल्ले गांठले होते, ते आतां तेवढ्यावरच राहातात कीं काय, अशी जबरदस्त काळजी त्यांना उत्पन्न झाली. आजपर्यंत योजिलेले अर्थ सिद्धीस गेले, व शिंदेशाहीचें वैभव कल्पनातीत वाढलें. ह्या सर्व गोष्टींस पाटीलबावांसारखा खंबीर राज्यकर्ता गादीवर होता, हेंच प्रधान कारण होतें. पण पुढें सर्व चिन्हें विपरीत दिसतात असें मनांत जाणून, ते फार दुःखी झाले. औषधोपाय मोठमोठे झाले. परंतु गुणाचें चिन्ह मुळींच दिसेना. तेव्हां सर्व मंडळी निराश झाली. कारण, या थोर पुरुषाच्या अभावीं मराठेशाहीस फार मोठा धक्का बसणार होता.

पाटीलबावांची आपण ह्यांतून पार पडत नाहीं अशी खातरी झाली. मग जिवबादादांस जवळ

बोलावून त्यांनीं आपल्या मनांतील घुटमळत असलेले उद्गार बाहेर काढिले. त्या प्रसंगीं बाळोबा तात्या, सदाशिव मल्हार (भाऊ दिवाण) वगैरे निवडक मंडळीच जवळ होती.

पाटीलबावा ह्मणाले, 'दादा, राज्यप्रकरणीं आमचे हेतु काय होते तें तुह्मांस माहीतच आहे. जरी कित्येक गोष्टी आमच्या मनाप्रमाणें घडून आल्या, तरी अझून योजिलेलीं कामें बरींच व्हावयाचीं आहेत. आतां मी तर चाललोंच, पण आमचें धोरण तुह्मी जाणतच आहां. मराठी राज्याचा सर्वत्र लौकिक व दरारा वाढेल व त्यांत आमच्या राशिदीचेंही खरें कल्याण होईल, असें अगत्याचें काम तुमच्याकडून होईल तितकें तुह्मी बजावा. आमचें धोरण सर्वांस समजावून देऊन एकजुटीनें उद्योग चालवा. माझ्या मागें गादीवर दौलतरावास आणून बसवावें. आणि पूर्ववत् गादीचा अभिमान बाळगून या राशिदींत कांहीं व्यंग आहे असें कोणास आढळूं नये, ह्यावर पूर्ण लक्ष द्यावें. आतां ह्याहून जास्त काय सांगावें! तुह्मी पूर्ण माहीतगार आहांच. दौलतरावास चांगला वाकबगार करा.' इतकें ह्मणून ते स्वस्थ राहिले. जिवबादादांनीं त्यांच्या हेतूप्रमाणें सर्व गोष्टी कबूल केल्या. पुढें ता० १२ फेब्रुआरी १७९४ रोजीं पांच घटिका रात्रीस वानवडी मुक्कामाहून निर्घृण काळानें त्यांस ओढून नेलें. त्या समयीं सर्वत्र हाहाकार झाला. मरणसमयीं त्यांचें वय ६७ वर्षांचें होतें.

महादजी शिंद्यांचें मरण हें मराठी राज्याच्या अवनतीस एक मोठें कारण झालें. त्यांच्या मरणानें पेशव्यांचा एक मोठा आधार गेला. किंबहुना मराठ्यांच्या शत्रूंचा एक कर्दनकाळ नाहींसा झाला. ते उदयास आल्यापासून त्यांचा एकसारखा उत्कर्षच होत गेला. त्यांच्यापुढें डोकें वर करणारा कोणी राहिला नव्हता. ही उणीव त्यांच्या पाठीमागें जिवबादादा असेपर्यंत मात्र दिसून आली नाहीं. त्यांच्या कारकीर्दींत मोठमोठीं पराक्रमाचीं कामें झालीं. तशीं रजपूत, मुसलमान, शीख, इंग्रज, टिपू इत्यादिकांशीं, मोठमोठीं राजकारस्थानाचींही कामें बनून आलीं. त्यांत त्यांचा लौकिक फार वाढला. त्यांना जिवबादादा, बाळोबा तात्या, सदाशिव मल्हार, यांसारखे उत्तम मुत्सद्दी व कार्यकर्ते शूर पुरुष आरंभापासून मदतगार मिळाल्यामुळें, ते ज्या ज्या गोष्टी मनांत आणीत असत, त्या त्या सहज सिद्धीस जात. यांची कारकीर्द इतकी उत्तम झाली कीं, शिवाजी महाराजांच्या मागें पाटीलबावांसारखा प्रतापी, धोरणी व शहाणा मराठी राजा झाला नाहीं, असें सर्वतोमुखीं झालें. त्यांचें चित्त धर्मरक्षणाकडे व कृष्णभक्तीकडे फार असे. श्रीमत्सोहिरोबानाथांच्या दर्शनापासून त्यांनीं प्रपंचावरील विशेष आसक्ति कमी करून श्रीकृष्णचरणीं चित्त जडविलें होतें. आपल्या शूर मुत्सद्यांवर सर्व कामें संपवून व महत्त्वाच्या बाबतींत त्यांना लागतील तसतसे हुकूम पाठवून, ते मथुरेसारख्या क्षेत्रांत हातांत सदैव स्मरणी बाळगून, आपल्या साहाय्यकर्त्यांच्या जिवावर स्वस्थपणें परमार्थसाधन करीत असत.[1]

पाटीलबावा वारले त्या दिवशींच दौलतरावांस बोलावणें गेलें. ते त्यांच्या मरणाच्या तिसऱ्या दिवशीं येऊन दाखल झाले. त्यांना गादीवर बसविण्याचे कामीं पाटीलबावांची बायको लक्ष्मीबाई हिनें आडकाठी घातली. त्या कामीं तिला नाना फडणविसांचें साहाय्य होतें[1]. परंतु जिवबादादांनीं बाईची समजूत केली आणि दौलतरावांकडून 'मी तुमचा मान पूर्वींप्रमाणेंच राखीन[2]' असें तिजपाशीं कबूल

१. मराठ्यांचा पत्रपद्धतिइतिहास पृ. १२० व पेशव्यांची बखर.

२. ग्रांट डफची बखर.

करविलें. तेव्हां तिची हरकत दूर होऊन दौलतरावांस गादीवर बसविण्याचें काम निर्विघ्नपणें पार पडलें. हें काम फार जलदीनें आटपून, महादजी शिंदे वारल्यामुळें हिंदुस्थानांत त्यांच्या राज्यासंबंधानें कोणी गडबड करील, ह्मणून जिवबादादा ताबडतोब तिकडे निघून गेले. पुढें दौलतरावांस पेशव्यांकडून शिंद्याचे अधिकाराचीं वहिवाटीप्रमाणें वस्त्रें मिळावयाचीं, तीं देण्यास नाना फडणविसांनीं हरकत घेतली. ते ह्मणाले, "दोन कोटी रुपये, एक एक मोतीं जांभळाएवढालें अशा शंभर मोत्यांची एक माळ व तशाच शंभर चांपेकळ्यांची एक माळ इतका ऐवज सरकारांत आल्यावर मग सरदारीप्रकरणीं काय बोलणें तें बोलूं." हें ऐकून शिंद्यांचे वकील रामजी पाटील यांनीं उत्तर केलें कीं, "पाटीलबावांचे मागें जिवबादादा बक्षी सर्व राज्यकारभाराचे मुखत्यार आहेत. तेव्हां त्यांस लिहून पाठवून त्यांचें उत्तर आलें ह्मणजे काय विनंती करणें ती करूं. असें बोलणें जिवबादादा यांस पत्रीं लिहून त्यांचा जाब नजर द्यावी असा आल्यास सरकारांत विनंती करूं." मग "दौलतराव शिंदे (यांस) दुखोटा करावयास कारभारी सरकारांतून गेले त्यांणीं दुखोटा मात्र केला. सरदारीचीं वस्त्रें दिलीं नाहींत." पुढें ही हकीकत पुण्याहून वकील यांनीं जिवबादादांस कळविल्यावर त्यांनीं विचार केला कीं, 'पेशव्यांकडून वस्त्रें मिळालीं नाहींत, ह्मणून शिंद्यांची सरदारी कोठें जात नाहीं. वेळ येईल त्या वेळीं याचा हवा तसा निकाल करून घेतां येईल.' अशी त्यांची खातरी होती, ह्मणून त्यांनीं तें प्रकरण तसेंच ठेविलें.

इकडे दौलतराव शिंदे, कारभारी बाळोबा तात्या, नारायणराव बक्षी वगैरे मंडळीचा मुक्काम वानवडीसच होता. पुढें पेशवे व निजाम यांजमध्यें खंडणीसंबंधाचा वाद विकोपास जाऊन लढाईपर्यंत मजल येऊन ठेपली. त्यासाठीं आमच्या चरित्रनायकास दक्षिणेंत खर्ड्यांच्या लढाईस यावें लागलें. त्याबद्दलची संपूर्ण हकीकत पुढील भागांत निवेदन करूं.

भाग १३ वा.

खर्ड्यांची लढाई.

इ० सन १७९५.

"जिवबादादा ते रणफंदी । काबिज हिंदुस्थान शिबंदी । करूनि आले दक्षिण संधी ।"

होनाजी बाळ.

विद्या, शौर्य, साहस, स्वराज्याभिमान, एकी, युद्धकौशल्य, स्वधर्मपरता, आदिकरून हिंदु लोकांच्या आंगच्या ज्या कित्येक पूर्वकालीन गुणांविषयीं महाराष्ट्रीय लोक मोठा अभिमान बाळगितात, त्यांतील कित्येक गुणांची निदर्शक ह्मणून शिरोलेखांतील लढाई मराठे लोकांस मोठी भूषणावह झाली आहे. या लढाईसंबंधानें इतर ग्रंथकारांचे अभिप्राय भिन्न भिन्न आहेत. तथापि, पाणिपतच्या अपयशापासून मराठ्यांची गेलेली कीर्ति पुनः मिळवून देवून, 'पाणीपत' ह्मणजे मराठ्यांच्या भावी ऱ्हासकाळाची ढळढळीत प्रस्तावना, असें निजाम आदिकरून शत्रूंनीं जें भविष्य केलें होतें, तें खोटें ठरविण्यास व पुढें

१. पेशव्यांची बखर पृ. १४२.

पेशव्यांच्या कुटुंबांतील कलहाग्नीस नारायणरावासारख्या तरुण राजबिंड्याची व त्या वाड्यांतल्या वाड्यांतच आहुती पडून सगळ्या पेशवाईचे इभ्रतीस व विशेषतः नाना फडणविसादि मंडळींच्या अटोकाट बंदोबस्तास लागलेला काळिमा स्वच्छ धुऊन काढण्यास जी लढाई कारणीभूत झाली होती; तसेंच पुढें बारभाईंच्या कारभारांत 'नानाऋषीणां मतयोपि भिन्नाः' असा प्रसंग येऊन ठेपला, शिंदेहोळकरप्रभृति पेशव्यांचे बलिष्ठ सरदार स्वतंत्र राजे बनून त्यांच्या सामर्थ्याचा खुद्द पेशव्यांस उपयोग होणें कठीण असें वाटूं लागलें, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, सखाराम बापू, नाना फडणवीस इत्यादि प्रमुख सरदार व मुत्सद्दी मंडळींत वैमनस्य उत्पन्न होऊन ते एकमेकांचें वजन कमी करण्याकडचे प्रयत्न करूं लागले, इत्यादि कारणांमुळें पेशव्यांचें सामर्थ्य खंगत चाललें आहे असा तर्क करून गभितीन तपें एकसारखें बकध्यान करीत होता, तो मराठ्यांचें राज्य बुडविण्यास ही संधि उत्तम आहे असें पाहून 'तरवार पुण्यावर धरून मोंगल (निजाम) चढाई करून आला' असतां, त्याशीं मराठ्यांनीं घनघोर युद्ध करून त्याचा खर्ड्याच्या किल्ल्यांत कोंडमारा केला व शेवटीं गोगलगाय होऊन शरण आला असतां त्याला "अजिंक्य शत्रूतें जिंकावें । जिंकिल्यातें प्रतिपाळावें । शरणागतातें रक्षावें" ह्या आर्य राजनीतीच्या श्रेष्ठ तत्त्वास अनुसरून उदार मनानें सोडून दिलें, असा ज्या लढाईत मराठ्यांनीं मोठा दिग्विजय केला, तिचा मराठ्यांस वाटणारा पराकाष्ठेचा अभिमान अगदीं यथार्थ आहे हें दाखविण्यासाठीं, तसेंच कविकुलगुरु कालिदासाचें अनेककाव्यगत कवित्वसर्वस्व जसें त्याच्या एका शाकुंतलांतच दृष्टीस पडतें, किंवा सगळ्या भारती युद्धांत धनुर्धर अर्जुनाचें युद्धकलाकौशल्य जसें कर्णाबरोबरच्या युद्धांत दिसून येतें, त्याचप्रमाणें आमच्या चरित्रनायकाचें सर्व आयुष्य जरी अनेकविध समरचमत्कार दाखविण्यांत खर्च झालें व त्या सर्वांत त्यास यशच येत गेलें, तरी प्रस्तुत लढाईत प्रकट झालेलें त्याचें अनुपम युद्धकौशल्य केवळ अवर्णनीय होतें, हेंही दाखविण्यासाठीं ह्या लढाईचा साद्यंत इतिहास क्रमशः या स्थळीं देतों.

इ० स० १७६० सालीं उदगीर मुक्कामीं निजामाचा मोड करून भाऊसाहेब विजयी झाले. त्या लढाईत निजामाची अपरिमित अर्थहानि व त्याहीपेक्षां दुःसह अशी मानहानि झाली होती. त्याबद्दल मराठ्यांचा पुरा सूड उगविण्याची संधि केव्हां सांपडते, ह्मणून तो वाट पाहत होता. इतक्यांत कुरुक्षेत्रावर मराठ्यांचा जो भयंकर संहार झाला, त्यामुळें मराठ्यांची शक्ति क्षीण होऊन त्यांचें राज्य अल्पावकाशांतच क्षयरोगाच्या भक्ष्यस्थानीं पडतें कीं काय, अशी सर्वांस भीति पडली होती. याच संधीस माधवराव हे पेशवेपदारूढ झाले होते. ते जात्या बुद्धिमान्, शूर, बाणेदार व नीतिमान् होते. पण आपणास अझून अनुभव नाहीं, सबब दादासाहेब वडील आहेत त्यांस हरएक बाबतींत मान देऊन सर्व कारभार त्यांच्या विद्यमानें करीत जावा, असा त्यांनीं क्रम ठेविला. पण तोच त्यांना बाधक झाला. कारण दादासाहेबांच्या हुकुमावांचून राज्यांतील एक पानही हालेनासें झालें. इतकें महत्त्व त्यांस मिळतांच ते गर्वानें अगदींच फुगून गेले. केवळ माझ्या एकट्याच्याच बळावर हें सारें राज्य चाललें आहे, असें त्यांस खरोखरच वाटूं लागलें. व तदनुसार कित्येक वेळां त्यांच्या मुखांतून दर्पोक्तिही निघूं लागल्या. व जेथें तेथें लहर लागेल तसा मनसोक्त कारभार होऊं लागला. हें त्या पाणीदार व मानी पेशव्यास आवडेनासें होऊन, एके दिवशीं सहज कांहीं कारणावरून चुलत्या पुतण्यामध्यें बोलाचाली झाली. तेव्हां काकासाहेब रुसून बसले. त्यांस असें वाटलें कीं, दरबारांत

१. मुक्तेश्वर.

आपली अक्कल आपण मागें घेतली कीं कारभार आटपलाच ! मग लौकरच माधवराव नाक घांसीत आपल्याकडे येईल. ह्मणून ते वाट पाहत बसले. पण ही त्यांची आशा विफल होण्यास जास्त दिवस लागले नाहींत. पेशव्यानें सर्व राज्यसूत्रें स्वतः हातीं घेतलीं व हुषार मनुष्य निवडून त्यांच्या सल्लयानें राज्यकारभार चालविला. तेव्हां आतां आपली अक्कल उसनी घेण्यासही कोणी कबूल नाहीं, असें पाहून राघोबादादा मनांत फार खजील झाले. अशानें हा कांहीं वठणीस येत नाहीं व कारभारांत आपली यथेच्छ ढवळाढवळ चालत नाहीं, असें पाहून दादासाहेबांनीं पुतण्यास चांगलाच हात दाखवावा ह्मणून कांहीं फौज जमा केली. त्यांच्या कृपेंतले कांहीं सरदारही त्यांस अनुकूल झाले. ही दरबारांतली दुफळी पाहून निजाम अल्लीनें उदगीरचें उट्टें काढावें, असें मनांत आणून मोठ्या फौजेनिशीं पुण्यावर चाल केली. आणि मोठमोठे शेट सावकार, घरंदाज, श्रीमंत अशा लोकांपासून मारहाण करून बरेंच द्रव्य काढिलें. सांपडला तेवढा सरकारी खजीना लुटला. प्रत्येक घरावर खंडणी बसवून ती सक्तीनें वसूल केली. पुण्याच्या आसपासचा मुलूख जाळून उद्ध्वस्त केला. त्याच्या सैन्यापैकीं कांहीं टोळ्या जिकडे तिकडे फिरत असत. त्यांतील एका टोळीनें पेशव्यांच्या कुटुंबांतील माणसें सिंहगडाकडे पळून जात असतां त्यांस गांठून त्यांची सगळी चीजवस्त लुटून फस्त केली. आणि अशा प्रकारें कृतकार्य होऊन निजाम आपल्या राजधानीकडे निघून गेला. दुही माजून परस्पर मनें अस्वस्थ झालीं, ह्मणजे शत्रूंस सहजच फावतें.

निजामाच्या ह्या धामधुमीपासून पेशव्यांची जी मानहानि व खराबी झाली, तशीच रयतेला जी अतोनात पीडा झाली, त्याबद्दल निजामाचा एकदा यथास्थित सूड केव्हां घेईन, असें माधवरावांस झालें होतें. ह्मणून काकासाहेबांचें हें घरगुती बंड क्षणभर एकीकडे ठेवून आधीं ते निजामाचा पिच्छा पुरविण्याच्या खटपटीस लागले. त्या वेळीं मराठ्यांकडील प्रबळ सरदार जानोजी भोंसला हा निजामास अनुकूळ होता. त्यास पेशव्यानें मोठ्या युक्तीनें आपल्याकडे वळवून घेतलें. व निजामाची कांहीं फौज गोदावरीच्या कांठीं छावणी करून राहिली आहे, असें पाहून तिजवर एकदम चालून जाऊन हल्ला केला. त्यामुळें प्रथमतः त्या फौजेशीं बरीच दाणादाण झाली, पण लागलेंच तें सर्व लष्कर पुनः एकवटून त्यानें पेशव्याच्या फौजेशीं बरीच टक्कर दिली. पण पेशव्यांच्या कडेकोट तयारीपुढें निजामाचे फौजेस टिकाव धरितां आला नाहीं. यामुळें तो हतवीर्य होऊन त्यानें पेशव्याशीं तहाचें बोलणें लाविलें. सालिना पंधरा लक्ष रुपयेप्रमाणें खंडणीचा करार व स्वारीचा खर्च याप्रमाणें निजामाकडून घेऊन पेशव्यांनीं त्यास मोकळें केलें.

ह्याच संधीस मशीर उल्मुलुख नांवाचा एक पोक्त, शहाणा व मसलती पुरुष निजामाचा वजीर झाला. महाराष्ट्रांत त्याच्या शहाणपणाची इतकी प्रसिद्धि आहे कीं, त्या काळीं कोणी कोणी महाराष्ट्रांतील सगळ्या शहाणपणाच्या साडेतीन हिश्शांत तो सवंध एका भागाचा वांटेकरी होता, असें मानीत. पेशव्यांच्या दरबारची सर्व हालचाल तो डोळ्यांत तेल घालून पाहत असे. त्यांत दुफळीचें जें एकदा बीजारोपण झालें आहे, तेंच त्यांच्या नाशास आणि आपल्या किंवा कोणाही प्रबळ अशा प्रतिपक्षाच्या हितास कारण झाल्याशिवाय राहणार नाहीं, असें त्यानें तेव्हांच भविष्य केलें होतें. व तशा प्रसंगाची तो वाट पाहत होता. पण माधवराव पेशव्यांच्या शहाणपणामुळें व कर्तबगारीमुळें त्यांच्या हयातीपर्यंत मशीर उल्मुलुखाचा हा हेतु सफळ झाला नाहीं. उलट त्यांच्याच प्रतापसूर्यापुढें हैदरनिजामप्रभृति अनेक शत्रूंचे डोळे दिपून जाऊन कोणासच वर मान करण्याचें

धैर्य झालें नाहीं. पण महाराष्ट्राच्या दुर्दैवामुळें त्या तेजस्वी पुरुषास मृत्यूनें अकालीं गांठलें. माधवराव पेशवे सन १७७२ त मरण पावले. त्याबरोबर पेशव्यांच्या वाड्यांत बरेच दिवस धुमसत राहिलेल्या कलहाग्नीनें एकदम भयंकर रीतीनें पेट घेतला. आणि नारायणराव गादीवर बसून आठ नऊ महिने झाले नाहींत, तोंच त्याचा वध झाला. पुढें एवढ्या कलहाग्नीचें मूळ जें पेशवेपद, त्याच्या स्वामित्वाबद्दलच्या रघुनाथरावाच्या इच्छेस दरबारच्या प्रमुख मुत्सद्यांकडून प्रतिबंध झाल्यामुळें त्यानें काहीं सरदार व फौज फितूर करून इंग्लिशांची मदत मागितली. एवढी जी ही दुही माजली, तिचा फायदा घेण्याचा मशीर उल्मुलुखानें बेत केला होता. पण त्याच्या फौजेची त्या वेळीं असावी तशी तयारी नव्हती. तथापि त्यानें बाह्यात्कारीं मराठ्यांवर हल्ला करण्याचा आव घालून त्यांस भिवविण्यास कमी केलें नाहीं. त्या वेळीं पेशव्यांच्या दरबारांतील मुत्सद्यांनीं त्याच्या आंगावर एक भाकरीचा तुकडा टाकून त्यास स्वस्थ बसविलें. आणि अगोदर हें राघोबादादाचें बंड मोडून त्या दुष्ट दांपत्याच्या संसर्गातून मुक्त होण्याच्या तजविजीस ते लागले. त्या वेळीं सखाराम बापू, नाना फडणवीस, हरिपंत फडके आदिकरून मुत्सद्दी व सरदार यांच्या अनुमताप्रमाणें राज्यशकट चालविला जात होता. पण त्यांत नाना आपणास प्रमुख ह्मणवीत होते. ह्या सर्वांनीं राघोबाचें बंड मोडलें. पण पुढें नानांनींच सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. व राज्यांत दुसऱ्या कोणाचें वर्चस्व होऊं नये ह्या खटपटीस ते लागले. त्यामुळें पुष्कळ सरदारांचें व त्यांचें वांकडें आलें. महादजी शिंदे व जिवबादादा, बाळोबा तात्या वगैरे त्यांचे सरदारमंडळ ह्यांशींही नानांचें बरें नव्हतें. अशी उत्तम संधि सांपडतांच मराठ्यांशीं जंगी सामना देण्याची निजामानें तयारी चालविली.

निजामाकडील स्थिति मराठ्यांच्या स्थितीहून पुष्कळ भिन्न होती. तो स्वतः चांगला अनुभवी, शूर व पोक्त असून, त्याचा दिवाण मशीर उल्मुलुख हा धोरणी, चांगला मुत्सद्दी, राज्यकारभारांत पुरा वाकबगार व वेळवखत पाहून वागणारा असा होता. तो नाना फडणविसाला 'कुटिल, घातकी व मत्सरी' ह्मणून सदासर्वकाळ तुच्छ लेखीत असे. त्याची फौज मोठी व शूर असून तींत युद्धकलेंत निष्णात असे पुष्कळ मोठमोठे सरदार होते. पुष्कळ दिवस चांगलेंसें खाद्य न मिळाल्यामुळें, क्षुधापीडित असा एखादा लांडग्यांचा कळप जसा सांपडेल त्यावर तुटून पडण्यास तयार असतो, तशी त्याची फौज एखाद्या बड्या खडाजंगीची मार्गप्रतीक्षा करीत होती. आपल्याकडील व पेशव्यांच्या दरबारची ही अंतःस्थिति त्या चाणाक्ष वजीराच्या लक्षांत येऊन, अशा संधीस कांहीं कुरापत निघून मराठ्यांशीं युद्धप्रसंग घडल्यास त्यांची चांगलीच खोड मोडतां येईल, अशी त्याची खातरी झाली होती. निजामाकडून दरसाल जी खंडणी पेशव्यांस मिळावी असें पूर्वीं ठरलें होतें, त्यापैकीं माधवरावाच्या मागून तर एक कवडीही त्यानें पेशव्यांस लागू दिली नाहीं. ती बाकी वाढतां वाढतां सन १७९४ अखेर तीन कोटी रुपये झाली. दरम्यान पुष्कळ वेळां नाना फडणविसांनीं मागण्या केल्या होत्या. पण निजामास लढाईच पाहिजे होती, यामुळें तो कांहीं तरी सबबी काढून नानांच्या मागणीची वासलात लावी. नानाही मशीर उल्मुलुखास पुरा ओळखून होते. त्या फार धोरणी व कारस्थानी दिवाणाचा एकच्छत्री कारभार आणि इकडे आपले शेंकडो प्रतिस्पर्धी, तसाच तिकडे अनेक पेशवे पाहिलेला नबाब व इकडे सवाई माधवरासारखा अल्पवयस्क व अनुभवशून्य पेशवा, ही परस्पर विसदृश स्थिति पाहून होतां होईल तों लढाईचा प्रसंग न आणितां हें प्रकरण सामोपचारानेंच मिटवावें, अशी

१. भारतवर्ष मा. पु. वर्ष १, अंक ३, पत्र नंबर १०.

नानांची इच्छा होती. ह्मणून त्यांनीं निजामाच्या दरबारीं असलेल्या आपल्या वकीलामार्फत त्यांस असें कळविलें कीं, "परस्परें खलब असेल तो दूर करावा. सरकारचे जाबसाल होणें असतील ते फडशांत यावे. लढाईचा प्रसंग करूं नये. हे गोष्ट चांगली आहे." पण, मशीर उल्मुलुखास हें प्रकरण सामोपचारानें मिटवावयाचें नव्हतें. नाना फडणविसांस चीड यावी ह्मणून त्यानें शेंकडो खोट्यानाट्या सबबी लावून 'आपण पेशव्यांचें कांहीं लागत नाहीं,' असा सणसणीत जबाब दिला. तो त्यांनीं नानांस श्रुत केल्यावर पुनः त्याच्या सर्व सबबींची मोठ्या शहाणपणानें वासलात लावून, नानांनीं एक सत्तावीस कलमी याद तयार केली, व तींत नबाबाकडे आपलें येणें कसकसें होत आहे त्याचा तपशीलवार खुलासा करून, ती यादी वकीलाकडे पाठवून दिली.

ही यादी निजामाच्या दरबारांत प्रविष्ट झाल्यावर त्या बाबतींत उभयपक्षीं मोठा कडाक्याचा वादविवाद सुरू झाला. त्यांत मशीर उल्मुलुखानें भर कचेरींत उद्दामपणानें नानांची निर्भर्त्सना केली. तो ह्मणाला, 'या यादीचा अर्थ समजावून देण्यास तुमचा महाकुटिल जो नाना, तोच स्वतः आला पाहिजे.' त्यावर गोविंदराव काळ्यानें उत्तर केलें कीं, 'आमच्या नानांस दरबारी कामकाजें फार. तेव्हां त्यांचें येणें कसें घडतें ?' त्यावर मशीर ह्मणाला, 'कसें येणें घडतें तें आतां लौकरच समजेल. आज पंचवीस तीस वर्षें पेशव्यांच्या दरबारांत नानास मनसोक्त कारभार करावयास सांपडला, त्यामुळें त्यास आकाशही ठेंगणें झालें आहे. कोणी विचारता ना पुसता. पेशव्यांस नामधारी करून व सर्व राज्यशकटाची अनीन आपल्या हातीं घेऊन सर्वांवर छाप ठेवावी, ही त्याची महत्त्वाकांक्षा दिवसें-दिवस अनावर होत चालली आहे. पेशव्यांचा व ह्या दरबारचा आजतागायत स्नेहभाव असून त्याला अनुरूप असेंच उभयपक्षीं वर्तन होत आलें. कित्येक प्रसंगीं पेशव्यांकडून अन्यायाची आगळीक झाली, तथापि स्नेहांत अंतर येऊं नये, ह्मणून आह्मी तिकडे दुर्लक्ष करीत आलों. पण ह्या आमच्या सौजन्याचा तुमच्या दुष्टबुद्धि नानास विपरीत अर्थ दिसूं लागला. त्याला आह्मी अंकित किंवा ताबेदार असें वाटत असेल ! ह्मणूनच त्यानें जुनी पद्धति सोडून दिली आणि धनी आपल्या कुळांकडे जशी मागणी करितात, तशा रीतीनें तो आह्मांस तगादा लावूं पाहतो ! त्यास तुह्मी स्पष्ट असें कळवा कीं, इतःपर नबाबसाहेबांच्या दरबारांतून एक छदामही तुमच्या कपाळीं लागण्याची आशा सोडा. आणि आजपर्यंत या दरबारास तुमच्याकडून जो निष्कारण त्रास पोहोंचला आहे, त्याचें प्रायश्चित्त भोगण्यास तयार रहा. नाहीं तर आह्मांस शरण येऊन खंडणीचा करार लिहून पाठवा. तसें न झाल्यास चढेल पेशव्यांचें सर्वस्व घेऊन त्यांस लंगोटी नेसवून पाणी प्यावयास एक भोंपळा त्यांच्या हातीं देऊन नानासहवर्तमान त्यांस काशीयात्रेस लावून दिल्याशिवाय आह्मी कधीं सोडणार नाहीं* !'

ही नानांची व पेशव्यांची निर्भर्त्सना ऐकून वकील गोविंदराव काळे यांस संताप आला. त्यांनीं मशीर उल्मुलुखास यासंबंधानें खरमरीत उत्तर देऊन, ते रागानें दरबार सोडून पुण्यांत निघून आले. आणि त्यांनीं इत्थंभूत वर्तमान नानांस कळविलें. तें ऐकून नानाचे तळव्याची आग मस्तकास

---

१. भारतवर्ष मा. पु. वर्ष १, अं. ३, पत्र नंबर ११.

* नाना फडणविसास मुद्दाम चिडवून कसा तरी एकदा युद्धप्रसंग आणावा, या हेतूनें मशीर उल्मुलुखानें कचेरीच्या जागीं रात्रौ तमाशा करवून तमासगिरांकडून श्री.सवाई माधवराव व नाना फडणवीस, यांचीं सोंगें आणविलीं. तेव्हां पेशव्यांकडील दोन वकील दरबारांत होते, ते रागानें उठून चालते झाले. या सर्व प्रकारावरून या प्रसंगीं निजामाचें लष्करी सामर्थ्य सामान्य नव्हतें, हें उघड होतें. पेश. बख. आवृ. ३, पृ. १४३.

गेली. मग नानांनीं काळ्यांकडून नबाबाकडील सर्व कच्चें वर्तमान काढिलें, तों त्यांस नबाबाच्या सामर्थ्याची दहशतही उत्पन्न झाली. नबाबाच्या फौजेंत धिप्पाड शरीराचे व काटक असे पुष्कळ लोक आहेत; सादतखान, लालखान, रावरंभा निंबाळकर वगैरे प्रतापी व अनुभवी सरदारही बरेच आहेत; त्याच्या तोफखान्याची व्यवस्था उत्तम असून, नवीन बाण तयार करण्याचा कारखाना सुरू आहे; त्याचप्रमाणें कवायती पलटणें बरींच असून दारूगोळा शस्त्रास्त्रें वगैरे युद्धोपयोगी सामानही भरपूर आहे; असें वर्तमान ऐकतांच नानांस लढाईच्या परिणामाबद्दल मोठा विचार पडला ! परंतु, काळे यांनीं सांगितलें कीं, 'नबाबसाहेब जात्या उद्योगी, शूर व धाडशी आहेत. पण आलीकडे नाच, रंग, तमाशे यांतच दंग असतात. सारा वेळ खुषमस्कऱ्यांचा बाजार नबाबाच्या सभोंवतीं जमलेला असतो. मराठ्यांची बिशाद काय ? त्यांचा एका क्षणांत विध्वंस करूं ! अशा अर्थाचीं गाणीं गाऊन कलावंतिणी नबाबसाहेबांस व सरदार लोकांस खूष करीत असतात. व सर्व लोकांस स्वसामर्थ्याची फाजील घमेंड असल्यामुळें लष्कर स्वैर व निष्काळजी बनलेलें आहे.' हें ऐकतांच नानांस कांहींसें समाधान वाटलें, व दुसरे दिवशीं दरबार भरवून या गोष्टीचा काय तो विचार करावा, असें त्यांनीं ठरविलें.

मग दुसरे दिवशीं दरबार भरल्यावर श्रीमंतांस निजामाच्या दरबारांतील हकीकतीची नानांनीं सुनावणी केली. तेव्हां बरेंच बोलणें चालणें होऊन सर्वानुमतें मोंगलांवर स्वारी करावयाचा बेत कायम झाला. व " शिंदेहोळकरादि सर्व सरदारांनीं आपापल्या फौजांनिशीं देखत पत्र निघून येऊन श्रीमंतांच्या स्वारींत हजर व्हावें " अशीं सर्वांस आज्ञापत्रें लिहिण्याविषयीं नानांस श्रीमंतांची आज्ञा झाली. त्याप्रमाणें नानांनीं सर्व सरदार लोकांस पत्रें लिहिलीं. हिंदुस्थान प्रांतीं जिवबादादा होते त्यांस लौकर येण्यास लिहिण्याविषयीं श्रीमंतांनीं व नानांनीं शिंद्यांस आग्रहानें सांगितलें. पण त्यावरच न थांबतां त्यांनीं स्वतः जिवबादादांस लिहिलें कीं, " नबाब निजाम उलमुलुख यांजकडे खंडण्याबाबद तीन कोट बाकी सरकारची निघत असलेली मागायास पाठविली असतां नबाबाचा उन्मत्त दिवाण भरदरबारांत निर्भर्त्सनापूर्वक बोलला. आणि दंडांत सामर्थ्य असल्यास खंडणीचा ऐवज लढून घ्यावा एरवीं एक छदामही मिळत नाहीं असा त्यानें बेपर्वाईचा जाबसाल केला ! यासाठीं मराठ्यांचें सामर्थ्य त्यास दाखविणें जरूर झालें आहे. पण ही गोष्ट सरकारच्या गादीच्या अभिमान वाहणाऱ्या तुह्मां शूर सरदारांवांचून कशी शेवटास जावी ? तुमचें सामर्थ्य मोठें व तुमची विजयी फौज शत्रूचा धुडगूस उडवून देण्यास शक्तिमान् आहे. यासाठीं तिकडे कामें कितीही असलीं, तरी सर्व फौजेसहित दरकूच दरमजल येऊन एवढी लढाई फत्ते करावी. आणि श्रीमंतांचा लौकिक वाढवून शत्रूस पक्की दहशत बसवावी. विलंब लावूं नये. वाट पाहत आहों. " अशा अर्थाचें नानांकडील पत्र घेऊन सांडणीस्वार जिवबादादांकडे दाखल झाला. तत्पूर्वीच नारायणराव बक्षी यांनीं आपल्या पित्यास लिहिलें होतें कीं, 'या वेळीं श्रीमंत, नाना व बाबासाहेब आपल्या त्वरित येण्याची

---

१. जिवबादादांच्या सरफराईसाठीं पुढें पेशव्यांकडून राजाराम या नांवाचा कारकून गेला होता, त्यानें पेशव्यांस लिहिलेलें पत्र. " छ २५ जमादिलाखरीं मळेगांवच्या मुकामीं सायंकाळीं पोहोंचून शिवाजी बल्लाळ यांची भेट घेतली. सरकारचें पत्र त्यांस देऊन बोलणें जाहालें. ×× तीन जोड्या जासुदांच्या शिवाजी बल्लाळ यांजकडून व पिरू फिरंग्याकडून दोन निजाम अलीखां याची बातमी आणावयासाठीं रवाना झाल्या. ×× पिरू फिरंग्याचे भेटीसाठीं शिवाजी बल्लाळ यांसीं बोललों." वगैरे. भारतवर्ष मा. पु. वर्ष २, अंक ३, पृ. ३१।३२.

मार्गप्रतीक्षा करीत आहेत. नबाबाचा जोर भारी तेव्हां त्याचा उन्मत्तपणा जिरविण्यास आपली हिंदुस्थानी लढती फौजच आली पाहिजे, असें सर्वांचें ह्मणणें आहे. दक्षिणेंत आपला लौकिक पसरण्यास ही योग्य संधि आहे, यास्तव वडीलांनीं फौज घेऊन लौकर निघून येण्याचें करावें." तसेंच नानांनीं दौलतरावांकडूनही जिवबादादांस असें लिहविलें होतें कीं, नबाब दाराशीं येऊन भिडल्यासारखा आहे. तुह्मी आल्यावांचून लढाईस आरंभ होणें नाहीं, याकरितां "तेथें जेवीत असलां तर पाणी प्यावयास येथें यों." हीं सर्व निकडीचीं पत्रें पोहोंचतांच जिवबादादांनीं लखबादादा व जगोबा बापू यांस हिंदुस्थानांत राज्यसंरक्षणाचे कामावर ठेवून, ते आक्टोबर सन १७९४ त बरोबर चाळीस हजार फौज, कंपू, तोफखाना व बुणगें, यांसुद्धां निजामाच्या पारपत्यासाठीं निघून आले. बरोबर बाळोबा तात्या, बाळाभाऊ बक्षी, धोंडोबा पागनीस वगैरे सरदार असून सर्व फौज निरनिराळ्या जातींच्या शूर व काटक लोकांनीं भरलेली होती.

या संधीस फौजेचा पगारही बराच देणें राहिला होता. शिपाई लोकांत जे विलक्षण मर्दुमी किंवा चीज करण्यासारखे चांगले गुण दाखवीत, त्यांस जिवबादादांकडून बक्षिसें मिळत, व त्यांचा त्यांजकडून इतर रीतीनेंही सन्मान होई. अशा गुणग्राहकतेमुळें व सर्वांचें ते पोटच्या पोराप्रमाणें पालन करीत त्यावरून ते सर्व लोक त्यांचे एकनिष्ठ चाकर बनून पित्याप्रमाणें त्यांना मान देत. परंतु पगाराची बाकी पुष्कळ तुंबली, ह्मणजे प्रापंचिक अडचणींमुळें ते निरुपायानें कधीं तरी धरणें देऊन बसत. त्याप्रमाणें उज्जनीनजीक त्यांच्या फौजेचा तळ पडला असतां, हजारो शिपाई त्यांच्या तंबूपाशीं येऊन "दादासाहेब आमचीं बायकापोरें उपासांनीं मरताहेत. त्यांची काय ती वाट लावा," असें सांगून दारांशीं धरणें देऊन बसले. त्या वेळींही जिवबादादांनीं आपल्या खासगी जहागिरींतून पैसा आणवून व सावकारांकडून कर्ज काढून शिपाई लोकांची बरीच बाकी चुकती केली. असे प्रसंग त्यांना पुष्कळ वेळां येत असत. त्या दिवसांतल्या त्यांच्या कोंकणच्या पत्रांत " रोज लढाईच्या मसलतींत एक जागां आज एक वर्ष राहणें होत नाहीं, रोज शिलेदार यांचा तगादा. सरकारांत रुपयेंची ओढ. आण चाकरीची निकट. धणी कामा अर्थीं कांहींच सुचत नाहीं. मागील रुपये लोकांचे, त्यांचा निर्गम नाहीं. आण तोही तगादा यांतच. अशा महत्संकटांत आहें." अशाप्रकारचे मजकूर नेहमीं येत असत. त्यांचें सेनानायकत्व खचीतच मोठ्या जबाबदारीचें होतें. आणि पाटीलबावांच्या मागें तर सर्व राज्याचीं सूत्रें त्यांच्याच हातांत असल्यामुळें त्यांच्या मागें महत्त्वाच्या कामांची गर्दी असे. तरी त्यांनीं आपल्या बुद्धिप्रभावानें व समशेरीच्या जोरावर कोठेंच कांहीं उणीव पडूं दिली नव्हती. पुण्यास येतांना मार्गांत फौजेची निकड भागविण्यास त्यांना एक चांगलें साधन मिळालें. 'औरंगाबादेवरून नबाबाचे मुलखांतून नव्वद लाख रुपये खंडणी घेऊन ते पुण्यास' निघाले. पराक्रमानें अशा तोडी निभतात !

१. पोवाड्यांचें पुस्तक पृ. १७२.

२. सुबाजी बापूकृत " सिद्धांतशिरोमणिप्रकाश " या नांवाचें पुस्तक १८३६ सालीं छापलें आहे. त्यांतील १२३ व्या पृष्ठावर पुढें लिहिलेला मजकूर आढळतो. " शिंदे साहेबांचे दरबारांत मागें महादजी शिंदे पाटीलबावा यांचे वेळेस त्यांचा सरदार जिवबादादा सेनवाही ब्राह्मण होता, त्याला लढाईस जाण्याची सरकारांतून आज्ञा झाली, ह्मणजे त्याच वेळेस बाहेर निघावें. मुहूर्त पाहातच नव्हते. त्याला केव्हांही जयच होत असे."

३. १६५ पृष्ठावरील ३ री टीप पहा.

४. पहा पत्र नंबर ४००. या वेळीं औरंगाबादेवरून येतांना तेथील निजामाचे सुभे बहिलोलखां यांनीं जिवबादादांस फुलें, शाकभाजी व फळाहाराचे वगैरे जिनसांच्या चार बंग्या पाठविल्या होत्या. पहा भारतवर्ष मा. पु. व. २, अं. ३, पृ. ३.

जिवबादादा हे अत्यंत निरभिमानी पुरुष होते. याचा प्रत्यय पुढील हकीकतीवरून येईल. खर्ड्यांच्या लढाईची मदार त्यांच्या शौर्यावरच बहुतेक अवलंबून होती. कारण, सर्व सरदार ह्मणजे भोंसले, होळकर, गायकवाड व शिवाय बाकी सर्व लहानथोर फौजबंद पागे, पथके, शिलेदार वगैरे तमाम मराठे येऊन पोंचले असतां व कांहीं फौजेसह दौलतराव शिंदे जवळ असतांही जिवबादादांच्या येण्याकडे श्रीमंत व त्यांचे चतुर मुत्सद्दी यांचे एकसारखे डोळे लागून राहिले होते. इतक्यांत जिवबादादा निरोपा-प्रमाणें घाईनें मोठमोठ्या मजला करीत येत आहेत ही बातमी लागतांच त्यांस श्रीमंत सवाई माधव-रावसाहेब पेशवे बाबूराव फडके, नाना फडणवीस व इतर मानकरी यांसहवर्तमान सन्मानानें सामोरे गेले[1]. पण ही बातमी जिवबादादांस लागतांच, ते आपली फौज तशीच मागें टाकून केवळ शंभर मानकऱ्यांसहवर्तमान श्रीमंत पुढें एक कोस गेले नाहींत, तोंच भरधांव घोडे टाकीत त्यांस येऊन भेटले. व श्रीमंतांनीं एवढी तसदी घेतल्याबद्दल श्रमी झाले. त्यांच्या योग्यतेप्रमाणें श्रीमंतांनीं केलेला बहुमान त्यांस जड वाटूं लागला ! मग आगतस्वागत व कुशलप्रश्न झाल्यावर जिवबादादा लष्करासहवर्तमान श्रीमंतांबरोबर पुण्यास आले. आणि वानवडीजवळ शिंद्याच्या छावणीभोंवतीं लष्करचा तळ दिला.

नंतर त्यांची व त्यांचे अल्पवयस्क धनी दौलतराव बाबासाहेब यांची भेट झाली. शिंद्यांच्या वंशांत तेवढाच अवशिष्ट राहिलेला मुलगा असून, त्यास यांनींच गादीवर बसविलें होतें, व राज्यकार-भाराच्या ठळक माहितीसंबंधानें त्यांस मिळालेल्या सवडींत अगत्यानें ज्ञान करून दिलें होतें. त्यांजवर त्यांचा अतिशयित लोभ होता. व दौलतरावही त्यांना वडिलांप्रमाणें समजून त्यांजवर प्रेम ठेवीत. पुष्कळ दिवसांच्या वियोगानंतर हा भेटीचा योग जुळून आल्यामुळें दोघांसही आनंदातिरेक होऊन गहिंवर आला. नंतर सर्व व्यवस्था लावून त्यांनीं दौलतरावांस पाटीलबावांच्या मागून केलेल्या राज्य-कारभाराचें यथावत् ज्ञान करून दिलें. शिंद्यांचें मूळ राज्य, त्याचे निरनिराळे भाग, त्यांचा केलेला बंदोबस्त, त्यांवरील अधिकारी, राज्यांतील निरनिराळ्या बाबींचा वसूल, तसाच निरनिराळ्या बाब-तींचा खर्च, परराजांशीं असलेला संबंध, खंडण्या, सैन्याची स्थिति, लोकस्थिति, निरनिराळ्या काम-गारांची योग्यता, विशेष लक्ष पुरवावयाच्या बाजू, शत्रुमित्रांची चांगली ओळख वगैरे हरएक बाबतींची माहिती, त्यांनीं व बाळोबा तात्यांनीं दौलतरावांस सुलभपणें समजेसारखी सांगून, त्यांचा राज्यकारभारांतील ज्ञानांत अधिक प्रवेश केला. जिवबादादांनीं त्यांना दत्तकाचा अधिकार दिल्या-पासून ते हिंदुस्थानांत जात तोंपर्यंत राज्यकारभारविषयक माहिती बरीच सांगितली होती. शिवाय, आपले चिरंजीव नारायणराव ह्यांना सर्व व्यवस्था समजावून देऊन, त्यांस दौलतरावांसन्निध ठेविलें होतें. त्याचप्रमाणें बाळोबा तात्यांची देखरेख त्यांजवर येऊन जाऊन असेच. आणि हरएक महत्त्वाचें काम त्यांना तेच समजावून देत. शिवाय लष्करी, कवायती, हिशोबी, व हरएक लि-हिण्याप्रकरणीं शिक्षण देण्याची चांगली व्यवस्था ठेविली होती. परंतु, एवढी काळजी वाहिल्याचें स्वरूप चांगलें दिसून येण्यास, त्यांच्यामध्यें असावा तसा पाणीदारपणा नव्हता, इतकेंच नव्हे, तर

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८४ व खर्ड्यांच्या स्वारीची बखर पृ. ८.

२. जिवबादादा दरबारांत येऊं लागले, ह्मणजे शिंदेसरकारानें त्यांस सामोरें जाऊन आणावें व आपल्या उजव्या हातास बसवावें, असा त्यांचा मान होता.

त्यांच्या बुद्धीचा दर्जा मध्यम प्रतीचाही नव्हता, ही गोष्ट विघ्नभूत झाली. राज्याचा कारभार पाहणारे वेगळे होते, ह्मणून ह्यांचे गुणदोष त्या वेळीं कळण्याम मार्ग नव्हता. तरी, बुद्धीच्या आटोपाची परीक्षा कळण्यास हरकत नव्हती. जिवबादादांनीं घालून दिलेल्या नियमांचीं व दिनचर्येचीं बंधनें त्यांच्या भोंवतीं असल्यामुळें, बाहेरून सर्व देखावा संतोषकारक दिसे. परंतु, त्या सुंदर व्यवस्थेचा दौलतरावांच्या मनावर जसा उत्तम परिणाम व्हावयाचा, तसा तो झाला नाहीं. उत्तम शिक्षण व चांगली परिस्थिति यांचा मनुष्याच्या मनावर सुपरिणाम होण्यास त्याच्यामध्यें स्वाभाविक गुणग्राहकता असावी लागते. तशी दौलतरावामध्यें नव्हती. ह्मणून, जरी लावून दिलेल्या पद्धतीप्रमाणें सर्व दिनचर्या नीट चाललेली दिसे, तरी तिचा उपयोग कांहीं दिसून आला नाहीं. ही गोष्ट जिवबादादांच्या लक्षांत येऊन चुकली होती. परंतु ती अपरिहार्य असल्यामुळें आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावण्यावांचून त्यांच्या हातून विशेष कांहीं होण्याजोगें नव्हतें. त्यांची मोठी उमेद होती कीं, पाटीलबावांच्या मागें आपली दोघांची जोडी वयानें नाहीं तरी दर्जानें व मगदुरानें कायमच आहे, असे उद्गार लोकांकडून ऐकावयाचे. परंतु, यजमानामध्यें तसें सुलक्षण त्यांना आढळून आलें नाहीं, ह्मणून ते मनांत बरेच खिन्न झाले. तरी, इष्ट हेतूच्या सिद्धीसाठीं त्यांचा उद्योग, धोरण व योजना हीं विलक्षण असल्यामुळें, यजमानसाहेबांची योग्यता प्रस्तुतपेक्षां खातरीनें जास्त वाढवूं, अशी त्यांना आशा होती.

पाटीलबावांच्या मागें जिवबादादांच्या हातांत स्वतंत्र रीतीनें सर्व राज्यकारभार आल्यानंतर त्यांनीं तो इतक्या उत्तम तऱ्हेनें हांकला कीं, त्या काळांत संपूर्ण रयत, सरदार लोक व इतर राजेरजवाडे, यांस फार सुख झालें. कोणाचा कोणत्याच बाबतींत गिल्ला आला नाहीं. ह्या गोष्टीला त्या काळचा इतिहासच साक्ष देत आहे. राज्याच्या सर्व भागांतील व बाहेरील व्यवस्था समाधानकारक ठेवून, विद्या, कलाकौशल्य, व्यापार, धर्मादाय यांस उत्तेजन देण्यांत व प्रजा राजनिष्ठ ठेवून सर्वत्र शांतता राखण्यांत ज्या महात्म्यांचे प्रयत्न खर्ची पडतात, त्यांची सर्वत्र व सर्वकाळीं प्रशंसा होत असते. पण, जिवबादादांस हीं कामें यथास्थित बजावून सदोदित तरवार परजून लढाईस सज्ज रहावें लागत असे. तेव्हां त्यांची योग्यता कशी होती, हें सुज्ञ वाचकांस सहज कळेल.

जिवबादादा आल्याच्या चवथे दिवशीं, ह्मणजे ता० १२ फेब्रुआरी १७९५ रोजीं, त्यांनीं श्रीमंत पेशव्यांची भेट घेतली. त्या वेळीं इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर दौलतरावांस वस्त्रें देण्याचें प्रकरण निघालें. नानांच्या मनांत असें होतें कीं, शिंद्यांच्या ताब्यांत माळव्यासारखा सोन्याचा तुकडा व पदरीं एवढी दौलत असतां, त्यांच्याकडून कांहींच ऐवज श्रीमंतांच्या तिजोरींत पडत नाहीं. तर आतां दौलतरावास दत्तक मानून त्यांस वस्त्रें दिलीं पाहिजेत, ह्या निमित्तानें तरी त्यांजकडून दोन कोट रुपये, दोन बहुमोल मोत्यांचे कंठे व एक चांफेकळीची माळा, इतका ऐवज नजराणा ह्मणून मिळवावा. पण, श्रीमंतांच्या मनांतून त्यांस दुखवावयाचें नव्हतें. कारण, निजामावरच्या बड्या मोहिमेंत खरी मदत काय ती शिंद्यांकडची. तेव्हां विशेष ओढाताण करणें बरोबर नाहीं, असा त्यांचा समज होता. तेव्हां, हें प्रकरण तुह्मीच कसें तें निकालास लावा, असें त्यांनीं जिवबादादांस सांगितलें. दादांनीं त्या प्रकरणाचा उभय पक्षीं समाधानकारक निकाल लाविला, तो असा. ते ह्मणाले “ सरकारांनीं आह्मांस मोठ्या वैभवास आणिलें. सगळ्या मुलखांत लौकिक वाढला.

१. पद्म पत्र नंबर १३९.

आतां सरकारची मर्जी नजर घ्यावयाची झाली. याविषयीं मी विनंती करितों ही ध्यानांत आणावी. हल्लीं सरकार मोगलांवर स्वारी करून जाणार. मोठा कट्टा सरंजाम करण्याची तयारी चालली आहे. त्यापेक्षां हीच मोहिम सेवकास सांगावी ह्मणजे मसलत बिनपैशावांचून पार नेतों व सरकारची चाकरी बजावून मोंगलांचा मोड कडून सरकारची फत्ते करून येतों[१].'' जिवबादादांनीं एवढी खातरजमा करून, फत्ते करून येण्याचें जोखीम स्वतः पतकरलें, एणेंकरून श्रीमंतांस परम संतोष झाला. त्यांचें सामर्थ्य सर्व दरबारास ठाऊक होतें. आणि निजामावरच्या मोहिमेची सर्वांस मोठी काळजी लागून राहिली होती. तेव्हां अर्थातच नजराण्याची गोष्ट रहित झाली. व लागलीच दौलतरावाच्या नांवचा शिक्का, कट्यार व वस्त्रें आणवून जिवबादादांच्या स्वाधीन केलीं. तीं ता० १५ फेब्रुआरी सन १७९५ रोजीं मोठा दरबार भरवून दादांनीं दौलतरावांस समर्पण केलीं[२].

जिवबादादांनीं लढाईची हमी घेतली त्यामुळें नानांची एक काळजी दूर झाली खरी. तरी सर्व सैन्याचें आधिपत्य त्यांस देणें हा विचार नानांस पसंत पडेना. ह्मणून त्यांनीं मनांत आणिलें कीं, प्रसिद्ध रीतीनें दरबार भरवून त्यांत लढाईची हमी घेण्याबद्दल विडे मांडावे, ह्मणजे आमच्या फडकेपटवर्धनादि पराक्रमी सरदारांतून कोणी तरी ते उचलतील आणि त्यांना सैनापत्य मिळाल्यानें सरकारची अब्रू राहील. मग, दरबार भरवून त्यांत प्रसिद्धपणें विडे उचलणारावर लढाईचें जोखीम राहून त्याजवर सर्व फौजेचें आधिपत्य संपविणें ठीक पडेल, असें श्रीमंतांशीं बोलून एके दिवशीं सर्व सरदारांस आमंत्रणें देऊन दरबार भरविला[३]. या दरबारांत निजामाच्या पारिपत्याबद्दल पौराणिक पद्धतीप्रमाणें पैजेचे विडे मांडून ते विडे जो उचलील, त्यास सर्वानुमतें सेनानायकत्व द्यावें, असा नानांनीं बेत केला होता. सर्व सरदार, मानकरी व उमराव जमल्यावर, श्रीमंतांची स्वारी येऊन मुख्यासनीं विराजमान झाली. आपल्या बालराजास घेऊन जिवबादादा श्रीमंतांच्या बाजूस बसले होते. होळकर, भोंसले, गायकवाड, पटवर्धन, पवार, फडके इत्यादि सरदार आपापल्या जागीं बसल्यावर एका सोन्याच्या ताटांत कांहीं विडे घालून तें ताट आणून सेवकांनीं श्रीमंतांच्या पुढें ठेविलें. त्यानंतर नाना फडणविसांनीं उठून दरबार भरविण्याचें कारण कळविलें. ते ह्मणालेः—

" श्रीमंतांची अशी इच्छा आहे कीं, नबाब निजाम अलीखान यास पादाक्रांत करून, त्याचा

१. पेशव्यांची बखर पृ. १४६.

२. जिवबादादांनीं या प्रकरणाचा जो हा निकाल केला, त्या एकाच गोष्टीवरून त्यांच्या आंगचें चातुर्य, राजनिष्ठा, शौर्य व समयसूचकता हे चार गुण ढळढळीत दिसून येतात. नाना फडणविसांनीं लोभाविष्ट होऊन शिंद्यांकडे नजराणा ह्मणून जी अद्वातद्वा मागणी केली होती, तिचा यत्किंचितही बोजा आपले यजमान शिंदे यांजवर न पाडितां, पेशव्यांस व नानांसही संतुष्ट करून जींत आपला कार्यभाग साधेल, अशी समयोचित तोड काढून, नानांसारख्यास निरुत्तर करणें व निजामासारख्या बलिष्ठ शत्रूचा मोड करून पेशव्यांचे मनोरथ सफल करण्याची हमी एकट्यानें घेणें, ह्या गोष्टी शूर व समयज्ञ पुरुषांवाचून इतरांस साधणें केवळ अशक्य होय.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८५ व पोवाड्यांचें पु. पृ. १७२—

" बोलाविलें जिवबादादांशी । तिथें जेवत असलां तर इथें या तुह्मी पाणी पियाशी । घेऊनि देवजी गवळयाशी ॥ (चाल) ॥ येडनी लवकर पोंचले । श्रीमंत पुण्याबाहेर निघाले । मुळामुठावर डेरे दिले । बावन्न उमराव मिळाले । एकंदर बसुनि मनसुबे केले । ×× शिंदे अघाडीस घातले ॥

रामचंद्र कविकृत पोवाडा.

वाचाल व दुष्ट वजीर मशीर उल्मुलुख यास जिवंत धरून आणावें. अशा तऱ्हेनें हें कार्य फत्ते करण्याचें सामर्थ्य ज्या प्रतापी वीराच्या अंगीं असेल, त्यानें उठून प्रतिज्ञापूर्वक विडा उचलावा."

परंतु बराच वेळ झाला, तरी कोणी उठले नाहींत. जिवबादादांशिवाय कोणी तरी विडा उचलावा, अशी नानांची फार इच्छा होती. परंतु ती विफल झाली. नंतर नाना जिवबादादांस ह्मणाले कीं, "हे कोणी बोलत नाहींत. तुह्मी हिंदुस्थान काबीज करून मोठमोठ्या लढाया बहुत मारिल्या. तेव्हां तुह्मी काय सांगतां तें कळावें. सर्वत्रांचे पराक्रम हीन झाले असें समजल्यास आजपर्यंत पुरातनपासून श्रीमंत घेत गेले ते आज मोंगलांस यांणीं खंडणी उलटी आपले मुलखापैकीं द्यावी असा प्रकार आला." हें नानांचें निरुत्साहाचें भाषण ऐकून दादांनीं उत्तर केलें कीं, "आजवर जिवादारभ्य सरकारसेवा स्वयें परिश्रमें केली. सिद्ध जाहली. हा सरकारचा प्रताप. आतां शेवटची वेळा, आणि सरकारांनीं हिंदुस्थानांतून या लढाईस्तव बोलाविल्यानें आलों. आणि सरकार सन्निध आणि आजवर केल्याचें समक्ष मालकांनीं पाहिल्यानें सार्थक. त्याकरितां आज्ञेप्रमाणें लढाईस आह्मी जाणारच. परंतु सर्वत्र सरदारमंडळी आपापल्या सैन्याचे अधिकारी आहेत, त्यांत आह्मींच बोलावें असें नाहीं. सर्वांनीं एकदिल असून संस्थानचा लौकिक राखावा यांतच सर्वांचें भूषण. याजकरितां आह्मी प्रथम बोललों नाहीं. आह्मांस आज्ञा होतांच सिद्ध आहों." त्यावर नाना सर्वांस उद्देशून ह्मणाले कीं, "शिंदे यांजकडील बेत जाहला. आतां सर्वत्र काय सांगतात?" यावरही कोणीं उत्तर दिलें नाहीं. सर्व एकमेकांच्या तोंडाकडे पाहात बसले होते. अशा चार घटिका गेल्या तरी कोणाच्याही मुखांतून चकार शब्द निघेना किंवा विडे उचलण्याची कोणाची हिंमत होईना. हें पाहून नानांचा धीर खचल्यासारखा झाला व ते उदास होऊन ह्मणाले कीं, "दोन प्रहर होत आला. श्रीमंतांची स्वारी भोजनास जाण्यास विलंब करून अद्यापि बसले आहेत, आणि (कोणीच) जाब बोलत नाहींत, त्यापेक्षां लढाई करण्याचें सामर्थ्य कोणांतच नाहीं असें दिसून आलें." नंतर जिवबादादांस उद्देशून ते ह्मणाले कीं, "सर्वत्रांचे प्रकार दिसून (आले) आहेत. आतां श्रीमंतांचें लक्ष तुह्मांकडे आहे. त्यापेक्षां आतां यांतील तुह्मांकडील निश्चय समजावा ह्मणजे श्रीमंत भोजनास जातील." नानांचें हें बोलणें ऐकून जिवबादादांनीं उत्तर केलें कीं, "'ह्या (सरदारांच्या) फौजा घेऊन त्यांचे मदतगारीनें लढाई करण्याची अपेक्षा करून (मी) आलों नाहीं. ह्या फौजा श्रीमंतांच्या स्वारीबरोबर शोभेस असूं द्याव्या. समरांगणास मोंगलांवर आह्मीच पुढें जातों.' हाच निश्चय. बाबासाहेब विडा तबकांतून उचलून घ्यावा." असें बोलून आपले हातानें पांच विडे घेऊन ते दौलतराव अलिजांचे हातीं दिले. आणि तबक उचलून विडे शालजोडींत घेऊन तें कारकुनाचे हातीं दिलें. आणि आतां निरोप घेतों, आज्ञा द्यावी, असें बोलले. त्या वेळीं श्रीमंत सवाई माधवराव, नाना फडणवीस व सर्व सरदार, हें जिवबादादांचें उत्साहपूर्ण भाषण ऐकून व त्यांच्या आंगची हिंमत पाहून आश्चर्यानें थक्क होऊन गेले. श्रीमंतांस तर मोठेंच स्फुरण येऊन, ते ह्मणाले, 'शाबास! दादा शाबास! तुमच्या बहाद्दरीचा लौकिक आह्मीं ऐकिला होता, ह्मणूनच या प्रसंगीं हिंदुस्थानांतून तुह्मांस मुद्दाम बोलावणें केलें. तुमच्यासारखे प्रतापशाली पुरुष आमच्या पदरीं आहेत, ही गोष्ट आह्मांस अत्यंत भूषणास्पद वाटते. तुह्मी सत्यप्रतिज्ञ आणि सदा विजयी, अशी तुमची ख्यातिच आहे! तुह्मांस लागेल ती मदत घ्या. आणि लढाई फत्ते करून

१. वि. ज्ञा. वि. पुस्तक ११, पृ. ८५.
२।३।४।५. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८५.
६. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८६.

आह्मांस यशस्वी करा. इतकेंच तुह्मांस सांगणें आहे.' याप्रमाणें बोलणें झाल्यावर जिवबादादांस "शेला पागोटें, शिरपेंच, कंठी याप्रमाणें पोषाख दिले[1]."

इतकें झालें तरी सेनाधिपत्य जिवबादादांकडे जातें तें न जाण्याविषयीं नाना फडणविसांनीं आणखी एकदा प्रयत्न केला. व आपली समाधानी करून घेतली. हा प्रकार कसा घडला, तें पुढील उताऱ्यावरून समजेल.

"या प्रसंगीं पेशवे अल्पवयस्क असल्याकारणानें एकंदर सैन्याचा मुख्य सेनापति कोणास करावें, याचा विचार करण्यास्तव नाना फडनवीस यांनीं मुत्सद्दी लोक जमा केले. त्या कचेरींत बोलणें चालले असतां त्यांत दौलतराव शिंदे यांस मुख्य सेनापति करण्याचा उपक्रम निघाला. परंतु शिंद्यांचे लष्करांत जी शेणवी मंडळी प्रमुख होती, त्यांविषयीं नानांचें अंतःकरण शुद्ध नव्हतें[3]. ह्मणून दौलतराव हे अल्पवयस्क असून अनुभवलेले नाहींत, याकरितां त्यांस तो अधिकार देणें रास्त नाहीं; असें त्यांचें ह्मणणें पडलें. तेव्हां हा अधिकार चालविण्यास तुकोजी होळकर नेमावे, अशी कित्येक मुत्सद्यांची सल्ला पडली. परंतु होळकर यांस तो अधिकार दिला तर शिंद्यांचे पदरची शेणवई मंडळी ही मोठी मानी असून तिजकडे शिंद्यांचे लष्करी अधिकार आहेत, यामुळें चांगला परिणाम न होतां उलटी स्पर्धा मात्र वाढेल असें नानांनीं सांगितलें. त्याजवर रघूजी भोंसले हे चांगले अनुभवलेले व शूर असल्यामुळें त्यांस तो अधिकार द्यावा असें कित्येकांचें ह्मणणें पडलें. परंतु असें केल्यानें शिंदे व होळकर हे नाखुष होतील असें पुष्कळांनीं बोलून दाखविलें. सबब तो अधिकार प्रतिनिधीस द्यावा, अशी हरिपंत फडके[4] यांनीं सूचना केली. परंतु त्या वेळचे प्रतिनिधि युद्धकर्मांत अनुभवलेले नव्हते. सबब पेशव्यांचे हुजुर वागणाऱ्या सरदारांपैकींच कोणास तरी तो अधिकार द्यावा, असा विचार निघाला. त्या वेळेस कांहीं जणांनीं विंचूरकर यांचें नांव घेतलें. परंतु तेही नुकतेच सरदारीवर कायम झालेले असून आजारी होते. सबब आणखी कोणास तरी तो अधिकार दिला पाहिजे असें नाना फडणवीस यांस वाटून शेवटीं परशुरामभाऊ पटवर्धन हे मोठे जवांमर्द असून त्यांनीं बहुत रणसंग्राम पाहिले आहेत, याकरितां त्यांसच तो अधिकार द्यावा, असा त्यांनीं ठराव केला. त्यावरून सदर्हू जमलेल्या सरदारांपैकीं कित्येक सरदार कुरकुर करूं लागले. हें वर्तमान नाना फडणवीस यांस कळल्यावर त्यांनीं सर्वांच्या छावण्यांत जाऊन त्यांच्या समक्ष भेटी घेतल्या. आणि त्यांस योग्य कारणें दाखवून सर्वांचें समाधान केलें[5]."

अशा रीतीनें "जिवबादादा, तुकोजी होळकर, रघोजी भोंसले वगैरे रथी, महारथी यांची नानांनीं समजूत पाडून सेनापतित्व परशुरामपंत भाऊ यांच्याकडे दिलें[6]." तरी तें जिवबादादांच्या तेजस्वीपणानें आपोआप त्यांजकडे कसें चालत आलें, तें पुढें योग्य प्रसंगीं कळून येईल.

---

१. खर्ड्यांचे स्वारीची बखर पृ. १०.

२. "सेनापति कोणास नेमावें याची पंचाईत पडली. शिंद्यास द्यावें तर नव्या दमाचे, पदरीं शेणवी मंडळीचें प्राबल्य विशेष." पहा केसरी वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेल्या 'मराठ्यांच्या मर्दुमकी' भाग १, पृ० २२. शेणवी मंडळीचें प्राबल्य असल्यास सेनापतित्व देण्यास कां हरकत येत होती? याच मत्सरानें पुढें मोठमोठे अनर्थ घडून आले. नानासारख्या मुत्सद्यास हा द्वेष आपल्याला कालिमा आणणारा आहे हें समजूं नये, याचें आश्चर्य वाटतें! पण आश्चर्य कसलें? जातिमत्सर, असूया व परोत्कर्षासहिष्णुता हे नानांचे दुर्गुण होते, व हेच पुष्कळ अंशीं मराठी साम्राज्यास विघातक झाले!!

३. "नानांचा स्वभाव दीर्घद्वेषी असून त्यांस जात्याभिमानही विशेष होता." विंचूरकर घरा० इ० पृ० १२१.

४. या वेळीं हरिपंत फडके वारले होते. हे फडके त्यांचे चिरंजीव बाबूराव असावे.

५. विं. घ. इ. पृ. १२२.

६. भानूकृत 'नाना आणि महादजी' पु० पृ० ८१.

सर्व फौजा लढाईच्या तयारीनें बाहेर निघाल्याच होत्या. गारपिरावर सर्व सैन्याचे डेरे, तंबू, राहुट्या यांची गर्दी झाली होती. परशुरामभाऊंकडे सेनाधिपत्य दिलें होतें, परंतु जिवबादादां-पुढें त्यांचें तेज पडत नव्हतें. कारण, त्यांचा प्रताप सर्वांहून विशेष. त्यांची फौज मोठी असून केवळ 'मारती तरवार' असें पराक्रमसूचक नांव पावलेली ! आणि तिची व्यवस्थाही सर्वोत्कृष्ट होती. त्यांनीं आपल्या कवायती फौजेचें आधिपत्य मॉसे पेरा (पेरोन), या फ्रेंच सरदाराकडे दिलें होतें. तोफखान्यावर आपले चिरंजीव नारायणराव यांस व पायदळ आणि बुणगें यांवर सदाशिव मल्हार ज्यांस भाऊ दिवाण असें ह्मणत, त्यांस नेमिलें होतें. स्वारीच्या व्यवस्थेचें काम बाळोबा तात्या यांनीं पतकरिलें होतें. तोफखान्यांत चांगले अनुभवी व हुषार गोलंदाज नेमिले होते. व सर्व घोडेस्वारांची फौज जिवबादादांनीं खुद्द आपल्या ताब्यांत ठेविली होती. सर्व सरदार लोकांनींही आपापल्या फौजांची नीट व्यवस्था लाविली. इतकें होत आहे तों निजाम आपल्या फौजेनिशीं बेदराहून निघून मराठ्यांवर रोंख धरून येत असल्याची खबर आली. तेव्हां सर्व सरदारांनीं आपापल्या सोई-प्रमाणें लौकर निघावें असें ठरलें. जिवबादादांनीं दौलतरावांस कांहीं फौजेनिशीं मागें श्रीमंतांच्या स्वारींत पुण्यास ठेवून, ते फौज घेऊन कोरेगांवास गेले. लागलेच परशुरामभाऊ पटवर्धन, तुकोजी-राव होळकर, नागपूरकर भोंसले वगैरे सरदार पुण्याहून एकदम न निघतां आगेमागें व कित्येक निरनिराळ्या वाटांनीं गेले. सर्व कोरेगावांस पोहोंचले, त्या वेळीं एकंदर सैन्याची संख्या खालीं लिहिल्याप्रमाणें होती.

सरदार.	स्वार.	पायदळ.	तोफा.	पेंढारी.
जिवबादादा	३००००	१२०००	९८	१००००
पेशव्यांची पागा व खासपागा	९०००	१५०००	४४	
,, नवीन फौज	८०००	०	०	
तुकोजीराव होळकर	५०००	३०००	३५	
नागपूरकर भोंसले	१२०००	६०००	१५	
पटवर्धन वगैरे	३०००	२०००	०	
बाबा फडके	१०००	०	०	
हुजुरतीची फौज	५०००	०	०	
नाना फडणवीस	२०००	०	०	
गोविंदराव गायकवाड, पाटणकर, घाटगे, निंबाळकर, थोरात, डफळे, पवार, जाधवराव, दरेकर इ०.	८०००			
	८५०००	३८०००	१९२	१००००

१. या स्वारींत जिवबादादांच्या हाताखालील फौजेचा तपशील निरनिराळ्या पुस्तकांत निरनिराळा आढळतो. पेशव्यांच्या बखरींत 'लाख फौजेनिशीं तोफखाना पसरून उतरले' असें ह्मटलें आहे. भारतवर्ष मा. पु. वर्ष १, अंक ३, यांत निजामाच्या दरबारांतील त्या वेळचे रेसिडेंट यांनीं या लढाईतील सैन्यसंख्या दिलेली प्रसिद्ध झाली

या सर्व सैन्यांत जिवबादादांची फौज संख्येनें, सामर्थ्यानें व अर्थातच योग्यतेनें मोठी होती. त्यांच्या तोफखान्यांत पुष्कळ मोठमोठ्या तोफा असून, त्यांवरील गोलंदाज आपल्या कामांत अगदीं पटाईत होते. घोडेस्वारांत मराठे, रजपूत अशा शूर पठ्ठ्यांचाच विशेष भरणा असून, त्यांवर जिवबादादांनीं योग्य विश्वासू असे अधिकारी नेमिले होते. व ज्याची जशी मर्दुमकी दृष्टीस पडेल, तदनुसार त्यांस बक्षीस देण्याचा जो परिपाठ ठेविला होता, त्यामुळें त्यांच्या फौजेंत चांगली कर्तबगारी करून दाखविण्याचा लोकांस हुरूप असे. व गुणांचें योग्य चीज होत असल्यामुळें ते सदैव खूष व अत्यंत आज्ञाधारक राहत. त्या वेळीं पेशवे व इतर कोणत्याही सरदारांच्या फौजा इतक्या नियमित व व्यवस्थित नसत. पण जिवबादादांच्या फौजेंतील व्यवस्था, टापटीप व हुकुमाची अंमलबजावणी, हीं उत्तम असल्यामुळें त्यांना जातील तेथें हटकून यश मिळतें, हें लक्षांत येऊन इतर सरदारही ते गुण आपापल्या लष्करांत आणण्याविषयीं झटूं लागले. जिवबादादांचे रजपुतांसारख्या तलवारबहाद्दरांशीं नेहमीं संग्राम होत असल्यामुळें युद्धाच्या गर्दीत मिसळून तरवार, भाला, बर्ची चालवून शत्रूस विलक्षण जोरानें नामोहोरम करण्याचे कामीं त्यांचें सैन्य इतर सैन्यांपेक्षां बरेंच पुढें गेलें होतें. त्याचप्रमाणें हातांत धनुष्यबाण घेऊन अचूक शरसंधान करण्याच्या व बंदुकांचे नेम मारण्याच्या कलेंतही ते लोक फार निष्णात होते. व याच कारणानें त्या काळीं शिंद्यांचें लष्कर हिंदुस्थानांत अग्रगण्य मानलें जात असे. कवायती फौजेचा उपयोग कधीं कधीं जास्त होतो, हें उत्तरोत्तर लोकांच्या अधिक प्रत्ययास येऊं लागल्यामुळें, शिंद्यांचें पाहून होळकरांनींही बरीच कवायती फौज तयार केली होती. तथापि होळकरांच्या फौजेची या लढाईंत मोठीशी मदत नव्हती. भोंसल्यांची मात्र मदत बरीच होती. भोंसल्यांची फौज शूर असून त्यांना शत्रुपक्ष वचकत असे. बाणांच्या अखंड वर्षावानें शत्रूस जर्जर करण्याबद्दल त्यांची फार ख्याति होती. बाकी हुजुरात व परशुरामभाऊंच्या ताब्यांतील फौज हीं सैन्यें शिंद्यांच्या फौजेच्या मानानें बरींच कमकुवत होतीं. ह्या व इतर सरदारांच्या फौजा मिळून मराठ्यांचा सैन्यसमुदाय भला जंगी व शत्रुपक्षास दहशत बसण्यासारखा होता.

निजामाकडील तयारीही कांहीं कमी नव्हती. त्याच्या फौजेंत रावरंभा निंबाळकरांसारखे युद्धकलेंत निष्णात मराठे वीर व सादतखान, लालखान, सुभानखान इत्यादि तरवारबहाद्दर मुसलमान सरदार पुष्कळ होते. त्याचा तोफखानाही चांगल्या प्रतीचा असून, मॉसे रेमांड नांवाच्या फ्रेंच सरदाराकडून त्यानें बरीच कवायती फौज तयार करविली होती. मुसलमान लोक निसर्गतःच का-

आहे. त्यांत जिवबादादांकडे रिसाला, पेंढारी, पायदळ मिळून बेचाळीस हजार फौज होती, असें लिहिलें आहे. मे. आकर्थ साहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या पोवाड्यांच्या पुस्तकांत (पृ. १५८ एथें) 'जिवबादादा एक वीर भारती पंनास हजार फौज फिरंगी तीन कंपू संगें जाती ।' असें ह्मटलें आहे. ग्रांट डफ साहेबांनीं पंचवीस हजार फौज होती व ती इतर सर्व सरदारांपेक्षां जास्त होती, असें ह्मटलें आहे. 'शेणवी वीर व मुत्सद्दी' या बखरींत दादांबरोबर चाळीस हजार फौज असल्याचें लिहिलें आहे. व खर्ड्याच्या स्वारीच्या बखरींत (पृ. ८ एथें) फौज पंचवीस हजार व कंपू दोन, नळी बावीस हजार व तोफा तिनशें, असें वर्णन आहे. यावरून सर्वांपेक्षां जिवबादादांचें लष्कर जास्त होतें, असें ठरतें.

१. नारायणराव बक्षी, या शरसंधानविद्येंत किंवा बंदुकीनें नेम मारण्याच्या कामांत, फार प्रवीण होते. प्रभाकर कवि पोवाड्यांत ह्मणतात:" **निसंग नारायणराव बक्षी । हटकून मारी उडता पक्षी । बंदुकिला कटपक्यास नक्षी । फत्ते होइ तों गोड न भक्षी ॥ इ.** आक. सा. कृ. पो. पु. पृ. १४३

टक, धाडशी व शूर असून, त्या लोकांचाच जमाव त्याचे फौजेंत जास्त होता. निजामानें या प्रसंगीं आपले दोस्त जे इंग्रज, त्यांजकडेही मदत मागितली होती. पण, मराठे व निजाम हे दोन्ही पक्ष आपले स्नेही, सबब कोणालाच मदत द्यावयाची नाहीं, असा त्यांनीं संकल्प केला होता. तथापि निजामा-बरोबर त्यांचा जो तह झाला होता, त्याप्रमाणें त्यांस कांहीं मदत देणें भाग आहे, असें वाटल्याव-रून निजामास मुलुखाच्या बंदोबस्तास कांहीं गोरें लष्कर द्यावें, म्हणजे त्यास आपली सर्व फौज म-राठ्यांवर नेतां येईल, अशी त्या वेळचे गव्हरनर जनरल लॉर्ड टेनमाऊथ यांनीं तोड काढिली. या वेळीं निजामाची एकंदर सैन्यसंख्या जवळ जवळ मराठ्यांइतकी असून, पूर्वोक्त गुणांमुळें ती मरा-ठ्यांस भारी होती, असें म्हटलें असतां अयोग्य होणार नाहीं.

शिंदेहोळकरादि सरदारांच्या फौजा निघाल्यावर मुलखाच्या बंदोबस्ताकरितां माधवराव रामचंद्र कानडे यांस दहा हजार फौजेनिशीं पुण्यास ठेवून, माघमासीं सुमुहूर्तानें श्री. सवाई माधवराव पेशवे यांची स्वारी पुण्याहून दौलतराव शिंदे, नाना फडणवीस इत्यादि सरदारांसहवर्तमान निघाली. त्या वेळच्या स्वारीचा थाट मोठा प्रेक्षणीय होता. अग्रभागीं सुंदर शृंगारलेले जरीपटक्याचे दोन हत्ती; त्यांच्या मागून सर्व फौजेंतील चित्रविचित्र निशाणें, पागा, खास पागा, व बिनीरक्षणाचे सेनाधुरंधरपदाचे अधिकारी; त्यांच्या मागून क्रमाक्रमानें हत्तीघोड्यांवर बसलेले शूर सरदार; त्यांच्या मागें पायदळ, पटेकरी, विटेकरी, बाणेकरी, खास बारदार; त्यांच्या मागें रणवाद्यें, तासे, मर्फे, हलग्या, वाजंत्री, शिंगाडे, कर्णे; त्यांच्या मागें कोतवाल हत्ती व कोतवाल घोडे; त्यांच्या मागून मंगल वाद्यें, शाहाजणें, कालू सनया व घोड्यांवरील नगारखाना; त्यांच्या मागें भाट व बंदीजन; त्यांच्या मागें लग्या, निशा-णदार, बाणदार, भाले, बोंथाट्या, चोपदार, भालदार; त्यांच्या मागें जेठी व मल्ल व पायदळाचे शूर लोक; व सर्वांच्या मागें अंबारींत खासा स्वारी. दोहों बाजूंस व मागें योग्यतेचे अधिकारी. अशा था-टानें श्रीमंतांची स्वारी पुण्याहून निघाली. त्या वेळीं हुजुरात व खास पागा व नवीन रिसाला मिळून सुमारें वीस हजार घोडेस्वार व वीस पंचवीस हजार पायदळ, इतका सरंजाम बरोबर होता. निय-मित मजलांचें[१] आक्रमण केल्यावर खर नदीवर जिवबादादा वगैरे सरदारांच्या फौजांचा तळ पडला होता. तेथून सहा कोसांवर सीना नदीच्या कांठीं एका सुरक्षित व विस्तीर्ण जागीं त्यांनीं छावणी केली.

आघाडीस फौजेची एक लहानशी टोळी गेली होती. तिनें पेशव्यांच्या आज्ञेवरून निजामाच्या औरंगाबाद व वऱ्हाड प्रांतांतील कित्येक महालांत शिरून तो मुलूख लुटून उद्ध्वस्त करण्यास प्रारंभ केला. आणि तेथील निजामाचीं ठाणीं उठवून मराठ्यांचा अंमल बसविला. त्या वेळीं तेथील बंदोबस्तास असलेली निजामाची थोडीशी फौज प्रतिबंधार्थ आडवी येऊन उभयपक्षीं लहानमोठ्या चकमकी झडल्या. जरूर लागेल त्या समयीं सरंजाम नवा ठेवून अंमल बसवावा, अशी श्रीमंतांची परवानगी होतीच. त्याप्रमाणें निजामाचा मुलूख लुटावा, तेथील लोकांस शिपाई बनवून पूर्वीच्या दाढीवाल्या अंमलदारांस हुसकून लावावें व दांडगाईनें राजशासनास अनुकूल होत नसतील त्यांस छाटून काढावें, असा क्रम त्यांनीं चालविला. याप्रमाणें खानदेश, बागलाण, गंगथडी, भिंवरथडी, इत्यादि प्रदेशांत मराठ्यांचा अंमल बसत चालला.

पुण्याहून निघण्यापूर्वींच निजामाच्या मुलुखांत लुटालूट करण्यासाठीं जिवबादादांनीं पेंढाऱ्यांस

१. या स्वारींत भोजनभाऊ मंडळीचाही बराच सुळसुळाट होता असें दिसतें. खर्ड्याच्या स्वारीच्या बखरींत लिहिलें आहे कीं, "मुत्सद्दी यांच्या धोत्रें वाळत घालावयाच्या दांड्या सुमारें पंधरा हजार आहेत."

पुढें पाठविलें होतें. त्यांचा पाषाणहृदयी अंमलदार करीमखान ह्यानें शत्रूच्या मुलखांत विलक्षण प्रळय मांडिला. त्या अधाशी पेंढाऱ्यांनीं हजार पांचशें लोकांची एकेक अशा निरनिराळ्या टोळ्या करून, विपुल द्रव्य मिळेल अशा कित्येक प्रदेशांवर दृष्टि वळविली. तसेंच अनेक रक्तपात करून मोठमोठ्या धनिक लोकांचीं घरें, बाजारच्या पेठा, सरकारी खजीना, अशा शहाजोग स्थळीं यथेच्छ ताव मारिला! याप्रमाणें एका बाजूनें पेंढारी व दुसऱ्या बाजूनें हुजुरातीची फौज, यांनीं पहिल्या सलामीलाच निजाम साहेबांस बरेंच चकित करून सोडिलें.

इतकें होईपर्यंत इकडे निजाम साहेबही उगीच बसले नव्हते. त्यांच्या सैन्याच्या कांहीं टोळ्या पेशव्यांच्या फौजेच्या पाळतीवर होत्याच. त्यांस मराठ्यांनीं आपल्या मुलखांत जो धांगडधिंगा मांडला होता, त्याची खबर कळतांच आतां अवकाश न लावितां एकाद्या अडचणीच्या जागीं त्यांस गांठून त्यांची दाणादाण उडवून द्यावी, असा विचार करून वारुळांतून जशा मुंग्या बाहेर पडतात, त्याप्रमाणें मोहरीच्या घाटांतून निजामाचें लष्कर खालीं उतरूं लागलें. या वेळीं पेशव्यांची हुजुरात व खास पागा यांवरील अंमलदारांनीं महत्त्वाकांक्षेच्या भरीं भरून मोठा अविचार केला, तो प्रकार असा.

जिवबादादांनीं स्वतःच निजामाचा मोड करण्याबद्दल पैजेचे विडे उचलले, त्यांच्या पराक्रमाची कीर्ति ऐकून आलीकडे श्रीमंत त्यांजवर फार प्रसन्न असतात व या मोहिमेंत तर त्यांची सर्व भिस्त जिवबादादांवरच आहे, ह्या गोष्टी पेशव्यांच्या फौजेंतील कित्येक सरदारांस असह्य झाल्या होत्या. त्यांना दादांविषयीं असूया उत्पन्न झाली होती. या असूयापिशाचिकेचा झपाटा इतका कांहीं भयंकर असतो कीं, तो ज्यास झाला त्याच्या सारासारविचार, दूरदर्शित्व, स्वपरबलाबलज्ञान, समयज्ञता, इत्यादि गुणांस लागलीच फांटा मिळतो. हरिपंत तात्यांचे चिरंजीव बाबूराव फडके यांस या प्रसंगीं इतका अनावर हुरूप आला कीं, "शिंदे जिवबादादा हेच लढाई करणार? आपला पुरुषार्थ काय? स्वतैव आपण लढाई यांस सोडून करावी." हरिपंत तात्या पेशव्यांच्या फौजेचे मुख्याधिकारी होते व त्यांच्या आंगच्या गुणांमुळें त्यांचा लौकिकही तसाच होता. त्यांच्याप्रमाणें आपणही तरवार गाजवून कीर्ति संपादावी, अशी चिरंजीवांस महत्त्वाकांक्षा असणें कांहीं वावगें नव्हतें. पण त्याबरोबरच आणखी जे गुण पाहिजे होते, त्यांचा बाबांकडे अभाव असतांही निजामास पराभूत करून आपणच 'सवतें' यश जोडावें, अशी त्यांस प्रबळ इच्छा उत्पन्न झाली. त्यामुळें त्यांजवर व त्यांच्या मदतीस गेलेल्या इतर सरदारांवर मोठा बिकट प्रसंग येऊन गुदरला.

मोगलांकडील व मराठ्यांकडील कहीवाल्यांचा—दाणावैरण आणणाऱ्या टोळ्यांचा—एके दिवशीं मोठा कज्जा झाला. त्यांत मोगलांकडील कहीवाल्यांनीं श्रीमंतांकडील कहीवाल्यांस हटविलें. व त्यांची लूट केली. त्यामुळें उभयतांकडील रखवालीस जे स्वार होते, त्यांचीही कटकट झाली. मोगलांकडील सरंजाम मोठा असल्यामुळें त्या लोकांनीं श्रीमंतांकडील स्वारांचा मोड केला. असे तंटे वारंवार होत होते. अशा संधीस निजामाच्या आघाडीच्या सैन्याचा पराभव करून नांव मिळवावें अशा विचारानें बाबूराव ऊर्फ बाबा फडक्यांनीं सरकारची फौज बरोबर घेऊन मोगलांवर चढाई करून जाण्याचा बेत केला. तेव्हां परशुरामभाऊ पटवर्धन मिरजकर, होळकर व भोंसले हेही

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८६.

त्यांच्या मदतीस निघाले. ह्या सर्वांस निजामाच्या फौजेची दाणादाण उडवून त्यांस नामोहोरम करून खातरीनें यश मिळवूं, अशी उमेद होती. ह्मणून त्यांनीं जिवबादादांस ह्या गोष्टीचा मुळींच सुगावा लागूं दिला नाहीं. त्या वेळीं निजामाची फौज वर लिहिल्याप्रमाणें मोहरीचा घांट उतरत होती. त्या फौजेवरील सरदारांनीं पेशव्यांची फौज आपलेवर चालून येत आहे, असें पाहतांच घाटांतील ती बिकट जागा टाकून मैदानांत चार हात करितां येतील अशी खुली जागा गांठावी, ह्मणून भराभर घांट उतरून ते फौजेसह आलीकडे दाखल झाले. पहिल्यानें रावरंभा निंबाळकर हे निजामाकडील सरदार वीस हजार पठाणांसहवर्तमान फडके वगैरे पेशव्यांचे फौजेस आडवे आले. व लगेच लढाईस आरंभ झाला. पहिल्या सलामीसच प्रतिपक्ष्यांच्या सेनानायकांचें पाणी ओळखून निंबाळकरांनीं एकदम गोळीबार सुरू केला. तोफांस बत्ती दिली. असें कांहीं वेळ चालल्यावर स्वतः आपण पुढें होऊन जवांमर्द पठाणांकडून मराठ्यांचा गोट फोडून त्यांची काटाकाटी सुरू केली. ह्या भयंकर मारापुढें मराठ्यांकडील गोळीबार व तरवार, हीं रद्द पडलीं. शत्रूंकडील पठाण भारी काटक व दांडगे असून रावरंभा निंबाळकर युद्धांत मोठा निष्णात होता. त्यानें व इतर सरदारांनीं वारंवार जोरानें हल्ले केल्यामुळें त्यांजपुढें मराठ्यांचा टिकाव निघेना. परशुरामभाऊ व भोंसले, तसेच होळकर, यांनीं पुनः पुनः आपल्या फौजेच्या टोळ्या घेऊन शत्रूंवर चालून जाण्याचा यत्न केला. परंतु, शत्रूच्या भयंकर माऱ्यापुढें त्यांचा उपाय थकला. बाबा फडक्याची तर ह्या प्रसंगीं गाळण होऊन गेली. आपल्या सैन्याच्या पृष्ठभागीं हत्तीवरील सुरक्षित किल्ल्याच्या गवाक्षांतून हा भीतिप्रद देखावा ते पाहत होते. तोफांच्या व बंदुकीच्या धुरानें दशदिशा धुंद झाल्या आहेत, शत्रूंकडील धिप्पाड शरीराचे करोल पठाण तरवारींनीं आपल्या लोकांस चराचर कापून काढीत आहेत, सरदार लोकच घाबरल्यामुळें सर्व सैन्य वाट फुटेल तिकडे पळत सुटत आहे, व त्यांतल्या त्यांत कित्येक सेनानायक मोठा धीर करून आपल्या लोकांस उत्तेजनपर शब्दांनीं परत हल्ल्याचे जागीं आणण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा तो भयानक प्रकार पाहतांच फडक्यांचें तोंड सुकून गेलें. निजामाकडील इतर सरदारही आघाडीच्या सैन्याच्या मदतीस भराभर येऊं लागले. तो शत्रुसमुदाय त्या वेळीं फडक्यांस केवळ कल्पांतसिंधूसारखा भासला. ह्मणून त्यानें पळणारांचा पुढारीपणा पतकरला.

मराठ्यांचें सैन्य पळत असतां निजामाकडील पठाणांनीं भारी लगट करून त्यांस गांठलें. त्यामुळें त्यांची दाणादाण झाली. परशुरामभाऊंचा पुतण्या विठ्ठलराव धोंडदेव यानें तरवार करून दोन पठाण मारिले. इतक्यांत गोळी लागून तो ठार झाला. त्याचा मुडदा शत्रुपक्षाच्या हातीं लागूं नये ह्मणून पालखींतून पाठविला. इतक्यांत खुद्द परशुरामभाऊंवर दहा पांच पठाणांनीं लगट केली. आणि त्यांवर वार केला. त्या वारानें भाऊंस तोंडावर व डोळ्यास जखम झाली. तेणेंकरून ते खालीं पडले. त्याबरोबर परशुरामभाऊंचे पुत्र अण्णा व बाबा, यांनीं त्या वार करणारास ठार केला, परंतु चोहोंकडून पठाणांनीं गर्दी करून त्यांच्या बहुतेक स्वारांस कंठस्नान घातलें. फारच थोडे शिल्लक राहिले. हुजुरात फौजेची तर दुर्दशा वर वर्णन केलीच आहे. होळकर व भोंसले ह्यांसही रणांगणावर दम

१. पहा ग्रांट डफची बखर व पत्रें नंबर १४९।१५१, व वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८६.

२. "परशुरामभाऊवर पठाणांनीं मोठी गर्दी करून भाऊंस घोड्यावरून खालीं आणिलें. त्या वेळीं मराठे व पठाण यांची जी चकमक झाली, तींत सिदनाक (महार) यानें अप्रतिम शौर्य दाखविलें. त्याची पटवर्धन मंडळीनें मोठी तारीफ केली." पहा भारतवर्ष मा. पु. वर्ष २, अंक ७, पृ. ३९.

पुरेना. भोंसल्याच्या बाणांच्या वृष्टीनें शत्रूंकडीलही कांहीं मनुष्यें पडलीं. तरी, शूर पठाणांच्या झुंडींच्या झुंडी त्या मारास कशाला दाद देत आहेत ? मग काय ! हुजुरातीच्या लोकांप्रमाणेंच सर्वांनीं रस्ता सुधारला !

ह्या आगंतुक चाडून गेलेल्या फौजेची अशी वाताहत झाल्याचें वर्तमान सांडणीस्वारानें लगबगीनें येऊन खर नदीवर जिवबादादांच्या फौजेचा तळ पडला होता, तेथें त्यांस जाहीर केलें. फडके वगैरे सरदार निजामाचा पराभव करण्यासाठीं गेल्याचें त्यांस पूर्वींच कळलें होतें. ते निजामाच्या फौजेचें सामर्थ्य पुरें ओळखून होते. यामुळें अशा कच्या तयारीनें त्यांशीं सामना न करितां, अगोदर त्यांस आपल्या आटोक्यांत घेऊन, मग सर्वांनीं मिळून चोहों बाजूंनीं त्यांची लांडगेतोड करावी, असा त्यांचा विचार होता. व हीच मसलत श्रीमंत पेशवे यांसही पसंत पडली होती.[१] व त्याप्रमाणें त्यांनीं पटवर्धन, फडके वगैरे आपल्या सरदारांस जिवबादादांची योग्यता व त्यांचें युद्धकलानैपुण्य ह्यांची ओळख करून देऊन, त्यांच्याच मसलतीप्रमाणें तुह्मीं वागावें, अशी ताकीद दिली होती.[२] परंतु श्रीमंत पडले अल्पवयी, आणि त्यांत लढाईच्या कामांत अनभ्यस्त; व नाना फडणविसांचा वरील मंडळीकडे कल ! तेव्हां त्यांची आज्ञा अमलांत न येतां फडके, पटवर्धन वगैरे सरदारांनीं स्वपरबलाबल नेणून भलतेंच साहस केलें. त्याचा असा भयंकर परिणाम व्हावयाचा, हें जिवबादादा जाणून होतेच. मग ही पराभवाची खबर लागतांच क्षणभरही विलंब न लावितां आपल्या रणबंधूंच्या साहाय्यार्थ ते मोठ्या त्वरेनें धांवले. त्यांच्या जागीं जर कोणी विकारवश पुरुष असता, तर आपलें महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ह्या सरदारांची त्यानें उपेक्षाच केली असती. पण तो पडला मराठ्यांचा कट्टा अभिमानी. "फडके, पटवर्धनांचा मोड झाला काय आणि शिंद्यांचा मोड झाला काय ? आपण दोघेही एकाच प्रभूचे नोकर. त्यांनीं दूरवर नजर दिली नाहीं. ह्मणून आपणही त्यांच्याचसारखा अविचार केला, तर शत्रु त्याचा फायदा घेऊन विजयी होईल व तेणेंकरून संपूर्ण मराठ्यांच्या नांवास कळंक लागेल." असा शहाणपणाचा विचार करून लागलीच कुचाची नौबत करवून पंचवीस हजार घोडेस्वारांची मांड एकदम उठविली. व तोफखान्यासह शत्रुसैन्यावर ते जलदीनें जाऊं लागले. तोंच हुजुरातीची वगैरे पराभव पावलेली फौज सैरावैरा पळते आहे व त्यांच्या मागें मोगलांचे पठाण लागलेले आहेत, अशी ससेहोलपट त्यांच्या दृष्टीस पडली. मग त्यांनीं लागल्याच आपल्या तोफा आडव्या रांगेनें लावून त्या पाठलाग करणाऱ्या मोगलांवर चालू केल्या.[३] तो मार मोगलांस असह्य झाला.

मराठ्यांचा पराभव केला या मिथ्यानंदांत निमग्न होऊन हुजुरातीच्या मागें लागलेले ते पठाण हा

---

१. खरेकृत नाना फडणविसाचें चरित्र पृ. १४८.

२ "**तो जिवबादादा अलबेला बेला । ते वेळे काय बोलला राव साहेबाला । तो कसला कसा मोंगल आहे पांहुं द्या मजला । —फौजेंत केली ताकीद सडे स्वारीला । त्या गणेशपंत भेऱ्याला । त्या बाबा फडक्याला । त्या परशुराम भाऊला । जिवबादादांला तुह्मी मिळुन शनि जावें झुजायाला**" ॥ आ० साहेबकृत पो० पु. पृ. १७७.

३. त्या वेळीं "जिवबादादांनीं तिनशें तोफांचा खटारा पुढें लाविला आणि बेवीस हजार नळी पलटणीची उभी राहिली. × × आणि हरहर महादेव करून एकदांच उड्या घातल्या. मोठी लढाई मातबर जाहाली. असें रात्र प्रहर होई तों मोठी ख्याते लढाईची जाहाली. जिवबादादा यांनीं मोठी मर्दुमी केली." खर्ड्याच्या स्वारीची बखर पृ. १३ व काव्येतिहासांतील पत्रें व यादी पृ. ४४।४५.

अकल्पित प्रकार पाहून भयचकित झाले. छावणी तर दूर राहिली. आणि मराठ्यांचा पूर्ण पराभव करून लूट मिळविण्याच्या आशेनें आह्मी जे यांच्या मागें लागलों, ते अचूक त्यांच्याच तोंडांत येऊन पडलों, असें त्यांस झालें! लागलेच आपले घोडे फिरवून त्यांनीं आपल्या छावणीकडील मार्ग धरिला. पण जिवबादादांच्या तोफांच्या भडिमारांतून सुटतील तेव्हां पुढची आशा! आणि कदाचित् त्यांतूनही प्राण वांचविला, तरी पिसाळलेल्या वाघांसारख्या तुटून पडणाऱ्या मराठे स्वारांच्या भाल्यांच्या तडाख्यांतून सुटण्याची तर मुळींच आशा नव्हती. पराभव पावलेल्या हुजुरातीच्या वगैरे लोकांस जिवबादादा हे प्राणरक्षक भेटल्यामुळें ते सर्व सुरक्षित जागीं जाऊन पोहोंचले. पण मोंगलसैन्य भयंकर माऱ्यांत सांपडून त्याची दुर्दशा उडाली. याप्रमाणें थोड्या वेळापूर्वीं आनंदपर्वताच्या अत्युच्च शिखरावर ज्यांनीं आरोहण केलें होतें, ते एका क्षणार्धांतच त्या शिखरावरून ढांसळून दुःखसमुद्रांत गटंगळ्या खात खात जागच्याजागीं विराम पावले! उरलेलें मोंगलसैन्य जीव घेऊन पळालें.

या वेळीं पेशव्यांचा मुक्काम मराठ्यांच्या छावणीपासून सहा कोस मागें सीना नदीवर होता. पूर्वीं सांगितलेली फडकेपटवर्धनांच्या अपजयाची खबर तेथें नाना फडणविसांस कळतांच त्यांस मोठी चिंता उत्पन्न झाली. "श्रीमंतांच्या राज्यांत मोठी इभ्रत हुजुरातीची. ती फौज त्यांनीं ठरूं न दिली. त्यांचे पाय उठले. त्यापेक्षां बाकी फौजांकडून लढाई कशी पलयास लागेल?" असें त्यांस वाटून ते घाबरे झाले. व आतां आपला बचाव होणें कठीण. यास्तव, कसें तरी करून एकदा पुणें गांठावें, ह्मणून पेशव्यांचे छावणीचा तळ मागें हटविण्याबद्दल आपल्या फौजेंत त्यांनीं हुकूम दिला. त्या वेळीं तेथें हजर असलेल्या कित्येक सरदारांनीं नानांस पुष्कळ धीर देऊन सांगितलें कीं, "अझून लढाईचें तोंड पुरतें लागलें नाहीं, तोंच आपण हवालदील होऊन अशी मसलत करूं नये. इतके आपण घाबरलां हें नीट नाहीं." याप्रमाणें सरदारांनीं निक्षून सांगितल्यावर नानांस कांहींसा धीर येऊन त्यांनीं फौजेचा तळ उठविण्याचा बेत रहित केला, व लागलीच जिवबादादांस एक चिठी लिहिली कीं, "हुजुरात श्रीमंतांच्या राज्यांत मारती तरवार भरंवशाची. तिचा प्रकार असा झाला. पुढें मोंगल नदी उतरून खर्ड्याचे आलीकडे आल्यास मग पुण्यास पोंहोंचतां कठीण पडेल त्यास कसें करावें?" ही चिठी सांडणीस्वाराकडे देऊन दादांकडे पोंहोंचती केली.

तिकडे निजामाच्या लष्करांत पाण्याचें फारच दुर्भिक्ष्य झालें. रखरखीत उन्हाळ्यामुळें खर नदींतील मोठमोठे डोह आटत चालले. त्यांचा परस्परसंबंध दाखविणारे जलप्रवाह क्षीण होऊन मंदमंद वाहूं लागले. हा पाण्याचा तोटा प्रथमतः लष्करांतील जनावरांस भोंवला. ज्यांच्या जिवावर लढाईची सर्व मदार, असे चांगले उमदे घोडे पाण्याच्या टंचाईमुळें अगदीं मढ्यास आले. व असेच आणखी कांहीं दिवस गेले, तर शिपाई, सरदार इत्यादिकांवर क्रमाक्रमानें तोच प्रसंग येणार, असें ते क्षीण झालेले उदकप्रवाहच सांगत होते. इतकेंही असून ती नदी ताब्यांत राहती, तर त्यांनीं

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८७. शिवाय पेशव्यांची ब. पृ. १५२. "मोंगलांची फौज सरकारचे जरीपटक्यावर धांवली असतां अजून तुह्मी सारे स्वस्थ पाहतां यास काय ह्मणावें? आतां लढाईची तयारी करून नबाब आपले कबजांत आणावा."

२. मराठ्यांचे प्रसिद्ध इतिहासकार ग्रांट डफ साहेब 'या लढाईसंबंधानें निरनिराळ्या सरदारांचीं मतें नाना फडणविसांनीं अगोदर घेऊन तीं एका कागदावर लिहून ठेविलीं होतीं. तो कागद आपल्यास सांपडला असून त्यावरून जिवबादादांचेंच मत नानांस पसंत पडलें होतें,' असें लिहितात. पहा खरेकृत नानाफडणविसांचें च. पृ. १४८.

कसाबसा गुजारा केला असता. परंतु, जिवबादादांनीं ती नदीही कबजांत घेतली. यामुळें निजामाच्या लष्करांत पाण्याचा हाहाकार उठला. तो असा कीं, 'एक रुपयानें एक कटोरा पाणी न मिळे. (तें) नदी घेतल्यावर मोहोरेनें कटोराभर पाणी झालें.' यास्तव, ती जागा सोडून मराठ्यांस कळूं न देतां एकदा भीमा नदी गांठावी, असा निजामाचा संकेत ठरला. जिवबादादांचे गुप्त हेर निजामाच्या लष्करच्या आसपास वेषांतरानें हिंडत असत. त्यांनीं ही गुप्त बातमी दादांस कळवितांच त्यांनीं असें मनांत आणिलें कीं, निजामास पुढील पल्ला गांठूं दिल्यानें आपण आपल्या हातची शिकार घालविल्यासारखें होईल. कारण, त्यांचा ज्या जागीं तळ होता, तेथें त्यांस पराभूत करण्यास फार सोईचें होतें. यासाठीं त्यांचें तेथून कूच होण्याचे अगोदरच आपण त्यांजवर चालून जावें. असा बेत करून ता० ११ मार्च १७९५ रोजीं मध्यरात्रीनंतर शत्रूस कळूं न देतां, त्यांनीं आपल्या लष्करची व्यवस्था करण्यास आरंभ केला. इतक्यांत नानांचा सांडणीस्वार येऊन त्यानें पूर्वी सांगितलेली त्यांची चिठी दादांकडे दिली. त्या वेळीं लढाईच्या तयारीच्या गडबडींत जिवबादादा होते. ते सांडणीस्वारास ह्मणाले, "नाना राज्यकर्ते. परंतु त्यांस लढाईच्या प्रकारांचे नेम माहीत नाहींत. आणि हुजुरातीचा भरंवसा तो काय? भरंवसा ईश्वराचा. नानांस सांगावें, 'आपण बेफिकीर असावें. मोंगल नदी उतरेल, ते वेळीं एक तर आह्मी नाहीं किंवा मोंगल नाहीं, दोहोंतून एक होईल. आतां जास्त कांहीं सांगत नाहीं.' हींच अक्षरें सांगावीं." असें ह्मणून चिठीचें उत्तर लिहिलें कीं, "थोडेसें लढाईचें तोंड लागलें इतक्यामुळें सरकार घाबरून सांडणीस्वार रवाना केला त्यास हल्लीं विनंती लिहिली आहे, लढाईची सरमी करून नबाब निजाम अलीखां यास जिवंत धरून आणूं किंवा डोकें कापून आणूं याची काय ती आज्ञा यावी." असें लिहून स्वाराची रवानगी केली आणि पुढील व्यवस्थेस लागले. त्यांनीं मनांत आणिलें कीं, सर्व फौजेवर स्वतः नजर ठेवून शत्रूच्या हालचालीच्या धोरणानें आपल्या पक्षाच्या एकंदर सैन्याची रचना करावी व प्रसंग पडेल तसा तींत जरूर तो फेरफारही करावा. केवळ स्वसेनेपुरतीच नजर पुरवून चालावयाचें नाहीं. मग त्यांनीं सर्व सरदारांच्या छावण्यांत ताबडतोब स्वार पाठवून त्यांस लढाईच्या बेतानें तयार राहण्यास सांगितलें. त्याप्रमाणें लागलेंच सर्व सैन्य संकेतस्थळीं गोळा झालें. मग स्वतः सर्वत्र फिरून ते आपल्यास सोईवार होईल अशी व्यवस्था लावूं लागले.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळें निजामानें आपली सर्व फौज भीमा नदीकडे चालविली होती. परंतु, जिवबादादांनीं सर्व लष्कर लढाईच्या रोखानें पुढें नेल्याबरोबर, त्यांचा पुढें जाण्याचा उपाय थकला. तेव्हां त्यानें आपली सर्व फौज लढाईच्या बेतानें मराठी लष्करासमोर उभी केली. निजामाच्या लष्करांत रावरंभा निंबाळकर हा मोठा फौजबंद व शूर सरदार असून, समरांगणांत त्याचा मान उजवे बाजूस राहण्याचा होता. त्याप्रमाणें कडेकोट तयारी करून त्याची फौज उभी राहतांच झपरजंग घोंसा, सादतखान, लालखान, सुभानखां, भारमल माने, डफळे, मशीर उल्मुलुक, मॉंसे रेमांड वगैरे वगैरे सरदार आपापल्या फौजांसह मोठ्या व्यवस्थेनें सैन्याची रचना करून उभे राहिले.

ह्या सैन्याशीं सामना देण्यासाठीं जिवबादादांनींही आपलेकडील फौजेची शिस्तवार रचना केली. 'सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण, धोंडबा पागनीस, देवजी गौळी, बाळाभाऊ बक्षी, मॉंसे पेरा,

---

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८७.

२. पेशव्यांची बखर व खड्यांचे स्वारीची बखर.

डि बॉयन, नारायणराव बक्षी आणि बाळोबा तात्या हे शिंद्यांकडील सरदार, त्यांनीं डावे बाजूस उभे केले.[1] रघूजी भोंसले यांजकडील विठ्ठलपंत सुभेदार व पठाण, तसेच तुकोजीराव होळकर व गायकवाड वगैरे सरदार मध्यभागीं आणि परशुरामभाऊ पटवर्धन, बाबूराव फडके, निळकंठराव रामचंद्र प्रभू व विंचूरकर वगैरे सरदार उजवे बाजूस उभे केले. हुजुरातीच्या पश्चाद्भागीं बहुमोल वस्त्रालंकारांनीं भूषित अशा हत्तीवर जरीपटका फडकत होता. याप्रमाणें उभय दळें सिद्ध होत आहेत तों उजाडलें.

मागें लिहिल्याप्रमाणें निजामाचा मोड करून पेशव्यांकडे "जिवबादादा यांचा सांडणीस्वार खुशालीचें वर्तमान घेऊन आला. जिवबादादांनीं चिठी लिहिली कीं, निजाम अली दोन कोश मागें हटले. आणि त्यांचा तोफखाना आम्हीं लुटून आणिला आहे. स्वारी फत्ते आहे. हें ऐकून सांडणीस्वारास पेशव्यांनीं शेराचें कडें सोन्याचें बक्षीस दिलें व पोषाख दिले[3]." श्रीमंतांकडील स्वार गेल्यावर दादांनीं हा स्वार पाठविला होता.

या वेळेपर्यंत घडलेल्या गोष्टींचा गोषवारा नारायणराव बक्षी लढाईतून पाठविलेल्या पत्रांत असा देतातः—

"यानंतर इकडील वर्तमान तर इकडील व नबाबाकडील फौजेचा मुकाबला जाहला. उभय दळांचे मुकाम आठा कोशांच्या छटीनें आहेत. इकडील सड्या फौजा सज्ज होऊन त्याच्या मुकामा आलीकडे दिडा कोशावर कंपू तोफखाना सुद्धां आहेत. रोज उभयतांची गोळागोळी होती. नबाब केवळ तयार होऊन बाहेर लढावयास उभा राहत नाहीं. वद्य ४ स मागील दीड प्रहर दिवसास बाहेर बुणगें सुद्धां तयार होऊन तेथून कूच पुढां दक्षिणेच्या आंगें करून जात होता. त्याच्या तोंडावर श्रीमंतांकडील बाबा फडके व परशुरामभाऊ व भोंसले ऐसी फौज वाढून गेली. त्यांजवर त्यांनीं तोफांची मारगिरी केली. तेव्हां यांनीं जागा सोडिला. हें आपलेकडील फौजा कंपू घेऊन तीर्थरूप रा० दादा आलीकडे उभे होते त्यांनीं पाहून बिडी तोफांची मारगिरी नबाबाचे फौजेवर लाविली. तेव्हां अविंधांची फौज मागां हटून दीडदोन कोशांवर मुकामास गेले. आपलेकडील फौज जागच्या जागेसच कायम राहिली. नबाबानें परांडेकडील रोंख धरिला आहे. पुढें कसकसें होतें पहावें. आतां येथें नित्य लढाईचा प्रसंग आहे. वडील रात्रंदिवस कंबरा बांधून उभे राहतात. ईश्वर यश देईल तें खरें[4]."

तिकडे श्रीमंतांच्या छावणींत जिवबादादांची चिठी व वीरश्रीपूरित निरोप पोहोंचल्यावर नानांचा जीव जरा खालीं पडला. श्रीमंतांस व नानांस प्रतापशाली जिवबादादांच्या ह्या बाणेदार उत्तरानें फार फार समाधान वाटलें. श्रीमंतांनीं तर म्हटलें कीं, बिकट प्रसंगांतून धीरोदात्त पुरुषच स्वतः पार पडून सोबत्यांस पार पाडितात. परंतु, सामान्य जन स्वतः फसून दुसऱ्यासही फशीं पाडितात. पेशवाईचा डोलारा शिंद्यांच्या जोरावरच बहुतेक उभा आहे, व जिवबादादा हे एक त्याचे आधारस्तंभ आहेत. आपली प्रतिज्ञा शेवटास नेऊन नबाबाची खोडकी जिरविणारा हाच बहाद्दर शेवटीं लढाई फत्ते करून येईल. अशा रीतीनें जिवबादादांच्या हक्काचा सेनापतित्वाचा अधिकार त्यांजकडे आपोआप चालत आला! ह्या अधिकारासंबंधानें मागें आम्हीं ज्या प्रसंगाचा उल्लेख केला होता, तो हाच प्रसंग होय.

---

१. पत्र नं. १४९ व पोवा. पु. पृ. १४२.

२. खर्ड्यांची स्वा. बखर व पत्र यांत मेळ आहे.

३. खर्ड्यांचे स्वारीची बखर पृ. १६.

४. पत्र नंबर १५१.

ही सज्ज केलेली फौज घेऊन जिवबादादांनीं निजामाच्या फौजेवर हल्ला केला. त्यांत श्रीमंत पेशव्यांकडील फौजा जिवबादादांकडील सैन्याच्या तळापुढें कोसाच्या अंतरानें उभ्या होत्या. ह्या फौजा पुढें वाढून जातांच निजामाकडील आघाडीस जो कंपू होता, त्यानेंही जोरानें ह्यांजवर चाल केली. तेव्हां शिंद्यांकडील कंपूनें लैन बांधून तेथून शत्रूकडील कंपूवर तोफांचा भडिमार चालविला. त्यापुढें निजामाच्या कंपूचा निभाव लागेना. म्हणून निजामाकडील पठाणांच्या टोळ्या त्यांच्या मदतीस येऊन, ते सर्व जोरानें मराठ्यांत घुसूं लागले. परंतु, शिंद्यांचा तोफखाना त्यांना पुढें फिरकूं देईना. हें नबाब निजाम अलीखां पिछाडीस चंडोलमध्यें आपल्या खासगत फौजेसह उभे होते त्यांच्या लक्षांत येतांच, त्यांच्या सूचनेवरून त्या सरदारांनीं शिंद्यांच्या फौजेचा रोख सोडून बाबूराव फडके व परशुरामभाऊ वगैरे पेशव्यांकडील सरदारांवर चाल केली. तेव्हां, उभय पक्षीं लढाई होऊन पेशव्यांकडील फौज मागें हटली. हें पाहतांच जिवबादादांनीं लगट करून आपली फौज त्यांजवर घातली. मग नबाबाकडील सरदारांना यांजबरोबरच युद्ध करणें भाग झालें. पुढें, त्या ठिकाणींच स्थिर राहून त्यांनीं लढाई चालविली.

इकडे नारायणराव बक्षी यांनीं मोठ्या कुशलतेनें तोफांचा किल्ला बांधून व त्यांत ठिकठिकाणीं जरबेवर तोफा ठेवून, आपला मारा चोहोंकडून लागू करणारी व शत्रूंस अभेद्य अशी आपल्या तोफखान्याची रचना केली. आणि जेजाला, सूत्रनाळी तोफा, बिडी तोफा इत्यादि अजस्र अग्नियंत्रांतून अग्निगोलकांची अखंड वृष्टि सुरू केली. तेव्हां, निजामाकडीलही तोफखाना सुरू होऊन दोहोंकडील तोफांच्या भयंकर आवाजांच्या दणक्यानें कानटाळ्या बसल्या, व धुरानें दशदिशा धुंद गेल्या. उभय दळांत रणवाद्यांचा कर्णकठोर घोष सुरू झाला. जिवबादादा डोक्यास शिरस्त्राण व त्यावर चंदेरी बत्ती, आंगांत चिलखत व त्यावर तमामी आंगरखा, पायांत पायजमा, एका हातांत भाला, कंबरेस तलवार, त्याचप्रमाणें बर्ची व लहान बंदूक अशा लष्करी पोषाखानिशीं आपल्या आवडत्या अबलग घोड्यावर आरूढ होऊन विद्युल्लतेप्रमाणें मराठी सैन्यसमूहांत चमकत होते. त्यांनीं आपल्या तोफखान्यांतून तोफांचा व कंपूकडून बंदुकांचा 'नीटच त्यांजवर मार केला, तो अतिशय करून दिला.' त्यामुळें लढत असलेल्या रेमांड याच्या कंपूस नाइलाजानें मागें हटावें लागलें. यामुळें मोंगलांची बरीच दाणादाण झाली. नंतर त्यांनीं मराठी फौजेवर एकदम चालून जाऊन काटाकाटीखालीं तोफखाना हस्तगत करावा, असा धाडसाचा निश्चय केला. निजामाच्या लष्करांतील शूर काबुली पठाण आधींच तरवारीचे कामांत वस्ताद, त्यांत मराठ्यांनीं पसरलेल्या आगीमुळें त्वेषास चढल्यामुळें, ते प्राणाची परवाच सोडून एकदम पुढें घुसले. बाणांच्या व तोफांच्या भयंकर आगींत पुष्कळ पुढें सरलेले पठाण गतप्राण झाले असतांही हजारो शूर पठाणांनीं तोफखाना गांठून तेथें मोठी गर्दी केली. आणि कांहीं तोफा हस्तगत करून बऱ्याच गोलंदाजांस भाल्यांनीं भोसकून व तरवारींनीं छाटून धारातीर्थ दाखविलें ! तेव्हां मराठ्यांच्या त्या व दुसऱ्या बाजूंकडील कांहीं टोळ्या कच खाऊन मागें सरकल्या. खऱ्या सेनानायकाची आवश्यकता असते ती अशाच बिकट प्रसंगीं ! लागलाच जिवबादादांनीं आपला घोडा पुढें घातला. मागें सरलेल्या लोकांस उत्तेजन देऊन व चेव आणून

---

१. लोकहितवादिकृत ऐ. गोष्टी भाग २, पृ. २६, पो. पु. पृ. १४३ व जिवबादादांचें या भागाचे अखेरीस दिलेलं पत्र, पृ. १९९।२००.

२. पहा पृ. १९९।२००.

एकदम पुढें केलें आणि ते चाल करून आलेल्या मुसलमानांवर अशा वेगानें तुटून पडले कीं, तो त्यांना केवळ असह्य होऊन गेला. तोफखान्याभोंवतालीं शौर्यानें तरवार चालविणाऱ्या मुसलमानांस चोहोंकडून घेरून त्यांनीं त्यांची भयंकर कत्तल चालविली. अशा रीतीनें त्या वेळीं "जिवबादादा यांणीं मोठी मर्दुमकी केली कीं माणूस किती पडलें त्याची संख्या त्या वेळेस लागली नाहीं[२]."

याप्रमाणें जिवबादादा मराठे वीरांकडून व स्वतः समशेर गाजवून मुसलमानांस पादाक्रांत करीत चालले आहेत, इतक्यांत एका ठेंगण्या हत्तीवर बसून लालखान नामक मोठा शूर पठाण मराठ्यांवर तिरंदाजी करीत होता. तें पाहून विंचूरकर यांचे पतकांतील एका शूर बारगिरानें आपला घोडा दामटला व लालखान पठाणाच्या हत्तीजवळ जाऊन तरवारीच्या एका झटक्यासरशीं त्यास ठार केलें. हें पाहतांच वजीरखान नामक दुसऱ्या पठाण सरदारानें ती जागा घेऊन मराठ्यांवर तरवार चालविली. त्याबरोबर निळकंठराव रामचंद्र प्रभू हे त्याजवर धावून गेले आणि लागलेंच त्यांनीं वजीरखानास ठार केलें[३]. त्याबरोबर निजामाच्या सैन्यसमुद्रांतून एक प्रचंड लाट—एक मोठी टोळी—मराठ्यांच्या फौजेवर फार जोरानें येऊन आदळली. त्यासरसें हुजुरात खास पागेची फळी फुटून तिच्या तुकड्या चोहोंकडे विसकळित झाल्या. मोंगलांच्या मोठ्या मारानें आतांपर्यंत दम धरून व बरेंच शौर्य दाखवून बाजू संभाळून राहिलेल्या हुजुरातीच्या फौजेचा धीर सुटला व जो तो आपापलें पाऊल मागें घेऊं लागला. बाकीच्यांची गोष्ट राहूं द्या. पण, जरीपटका घेऊन बाबूराव फडके हुजुरातीचे मुख्य होते, ते मोंगलांच्या ह्या मोठ्या हल्ल्यानें घाबरून तो तेथेंच टाकून जीव घेऊन पळत सुटले ! या वीरबहादुरानें स्वजीवसंरक्षणाची ही खाशी युक्ति काढिली ! त्याला काय माहीत कीं, स्थैर्यानें जरीपटका फडकत ठेवण्यावर स्वपक्षाच्या यशाची मदार मुख्यत्वें अवलंबून आहे ! तो ध्वज शत्रु जर बलात्कारानें नेऊं लागले, तर सर्वांनीं प्राणही खर्ची घालावयाचे, परंतु तो शत्रूंच्या हातीं

---

१. या प्रसंगीं उभय दळांत जो भयंकर देखावा दृष्टीस पडला, त्याचें वर्णन प्रभाकर कवीनें खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे.

काय पलटणच्या फैरा झडती । पर्जन्यापरि गोळ्या पडती । शिरकमळें कंदुकवत् उडती ।
छिन्न भिन्न किति होऊन रडती । कितीक पाण्याविण तडफडती । कितीक प्रेतांमधेंच दडती ।
वीर विरांशीं निःसंग भिडती । सतीसारखे विडे उचलती । पाउल पाउल पुढें सरकती ।
घाव चुकावुन शूर थडकती । सपुत वाघापरी गुरकती । हत्यार लावुन मागें मुरकती ।
खुणेनें शत्रुवर्मे तरकती । मोंगल बचे मागे खरकती । जिवबादादा मनीं चरकती ॥ चाल ॥
अररररर शाबास बापांनो । सुटती तोफा धुंद दणादण । गुंगत गोळे येति छणाछण ।
सूं सूं करिती बाण सणासण । खालिल घोडे उडती टणाटण । टप्पा हाणिति दुरुनि टणाटण ।
बाजति पट्टे खांडे खणाखण । नौबत झांजा झडती झणाझण ॥ चाल ॥ एकच गर्दी झालि धुराची ।
थोर मांडली रणधूमाळी । अगदिंच बसली मग कांठाळी । फौज पसरली रानोमाळीं ।
लाखों लाख तरवार झळाळी । होळकरांची फिरती पाळी । जिवबाची मर्दुमकी निराळी ।
मोंगलांची केली टवाळी । इ०" पोवाड्यांचें पुस्तक पृ. १४७।१४८.

२. खर्ड्याचे लढाईच्या बखरीची हिंदुस्थानांतून आलेली हस्तलिखित प्रत.

३. ख. ल. ब. हस्तलिखित प्रत.

लागू द्यावयाचा नाहीं. अशा योग्यतेच्या जरीपटक्यास समरांगणीं टाकून जातांना ज्याच्या अंतःकरणांत स्वप्राणरक्षणाचाच विचार आला, त्यास त्याचें मोल कसें कळावें ?

हें अत्यंत अनिष्टसूचक वर्तमान रणधीर वीर जिवबादादांस कळतांच ते तत्काळ आपला घोडा दामटून, पळत असलेल्या बाबूरावें फडक्याजवळ येऊन ह्मणाले "आज मराठे घोर पराक्रम करून शत्रूच्या गर्दना छाटीत असतां शत्रूंची टोळी जरा पुढें सरकण्याबरोबर नेभळ्या, समरांगणांत जरीपटका टाकून आपला जीव वांचवण्यासाठीं पळतो आहेस ? या भागूबाईपणानें केवळ फडक्यांच्याच नव्हे, तर संपूर्ण मराठ्यांच्या यशाचा लोप करून त्याला काळोखी आणलीस ! तात्याच्या पोटीं कशाला जन्म घेतलास ? शत्रूंच्या पुढें उभें राहवत नसेल व तुला निर्भय स्थान पाहिजे असेल, तर आमच्या लष्कराच्या मागें जाऊन लपून रहा, जा." दादांनीं आपल्या ह्या शौर्योत्तेजक व उत्साहजनक भाषणानें बाबा फडक्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्याबरोबर ते कांहींसे शुद्धीवर येऊन दम धरून तेथेंच उभे राहिले. मग फडक्यांबरोबर पळणाऱ्या सैनिकांस जिवबादादांनीं दरडावून ह्मटलें " हा मूर्खांनो ! अरे असे बायकांसारखे शत्रूस पाठ दाखवून समरांगणांतून पळतांना तुह्मास शरम नाहीं वाटत ? तुह्मी कोण आहां, ह्याची तुह्मांस खबर आहे काय ? तुमच्या शूर पूर्वजांनीं तरवार गाजवून अटकेपर्यंत झेंडे लाविले, ते अशा पळपुटेपणानें काय रे ? फिरा मागें. आणि आपल्या पराक्रमी व कीर्तिमान् पूर्वजांप्रमाणें शत्रूंवर तरवार चालवा. हे पहा, चोहोंकडे तुमचे भाईबंद यवनांस भाजीसारखे चिरीत चालले आहेत." ह्याप्रमाणें त्या भारती वीराच्या युद्धावेश उत्पन्न करणाऱ्या भाषणानें आपल्या नामर्दपणाला लाजून ते सर्व लोक मागें फिरून पूर्ववत् युद्धाच्या गर्दींत मिसळले, व जिवबादादा आपल्या शूर हिंदुस्थानी फौजेंतील एक मोठी टोळी घेऊन फडक्यांस पळविणाऱ्या त्या मुसलमानांच्या टोळीवर घसरले. शत्रूचा जोर केवढाही असला तरी जिवबादादा तरवार घेऊन एकदा त्यांत घुसले, ह्मणजे त्यांच्या तालमींतली फौज तरवारीनें वाट काढीत पुढेंच जावयाचीच. कच खाऊन मागें फिरणें जसें त्यांना माहीतच नव्हतें ! जिवबादादांनीं स्वतः तरवार गाजवून पुष्कळ पठाण लंबे केले. आणि त्याचप्रमाणें त्यांच्या फौजेंतील पराक्रमी वीरांनीं एकदम 'हर हर महादेव' करून मुसलमानांच्या काटाकाटीस सुरुवात केली. तेव्हां, त्या पठाणांच्या टोळीचा निरुपाय होऊन तींतील सर्व लोक तोबा, तोबा करीत मागें हटले. रणांगणाच्या मध्यभागीं अशा तऱ्हेनें तरवारीची खणाखणी चालली होती, तरी बाहेर चोहों बाजूंस उभय पक्षांकडून बंदुकांच्या गोळ्यांच्या फेरीवर फेरी झडत होत्या. भोंसल्यांचा, शत्रुपक्षाकडील टोळ्यांवर बाणांचा वर्षाव सुरूच होता. त्याचप्रमाणें होळकर, गायकवाड, थोरात, विंचूरकर, पाटणकर, भोइटे, निंबाळकर इत्यादि मराठे सरदार मोठ्या नेटानें युद्ध चालवीत होते. त्यामुळें हजारो वीर मृत्यु पावले व त्याचप्रमाणें जखमी झाले. जिवबादादा ठिकठिकाणीं आपल्या सैन्याच्या टोळ्या शूर सरदारांकडे संपवून त्यांस कटून लढण्यास उत्तेजन देत फिरत होते.

मोंगल सरदारांस अशा रीतीनें पूर्वी कधींच न अनुभविलेला कचका मिळून, ते भराभर वाट फुटेल तिकडे पळूं लागले. समरभूमि प्रेतराशींनीं सारखी भरून गेली. ती इतकी कीं, तेणेंकरून पळणारीं

१. पेशव्यांची बखरकार लिहितात 'बाबा फडके मोठे शूर ! जन्मांत कधीं लढाई पाहिली नाहीं व आंगावर कधीं जखम नाहीं. त्यामुळें लढाईमध्यें कच खाऊन पळ काढिला !' पे. ब. पृ १५२.

२. ग्रांट डफची बखर, मोडककृत कोल्हापूर व कर्नाटकचा इ. पृ. ८६ व हिंदुस्थानकथारस पृ. २५५.

मनुष्यें अडखळून पडत. व पाठलाग करणाऱ्या मराठी स्वारांच्या तावडींत सांपडत. मराठ्यांच्या जबर मारापुढें चोहोंकडे लढत असलेल्या मोंगली सरदारांच्या हाताखालील सैन्याची हीच दशा झाली. याच संधीस नारायणराव बक्षी यांनीं कांहीं तोफा नजीकच्या एका टेंकडीवर चढवून, शत्रूंकडील विसकटलेल्या टोळ्यांवर त्यांचा मारा चालविला. तेणेंकरून नबाबाच्या सैन्यावर आगीची नुसती चादर पसरल्यासारखी होऊन मोठा कहर उसळला. तेव्हां चोहों बाजूंनीं मराठ्यांची सरशी होऊं लागली. ही लढाई एकसारखी तीन प्रहर चालली होती. जावें तिकडे मुसलमान पुढें पळताहेत आणि मागून मराठे स्वार लागले आहेत, असा देखावा दृष्टीस पडूं लागला. जिवबादादांनीं जिकडून तिकडून मुसलमानांशीं अशी लगट करून सोडिली कीं, आतां आपले प्राण खचीत वांचत नाहींत असें शत्रूकडील सैनिकांसच नव्हे, तर मोठमोठ्या सरदारांसही वाटून ते पळून जाण्यास थोडी तरी संधी कशी सांपडते ह्या चिंतार्णवांत बुडून गेले.

नबाब साहेबांची प्रियपत्नी तर ह्या तोफांच्या दणक्यांनीं व सैन्याच्या पळण्यानें अगदीं भिऊन गेली. आणि आपल्यास सुरक्षित स्थळीं लौकर नेण्याविषयीं तिनें आग्रह केला. नबाबानेंही आतां एथें राहाणें धोक्याचें आहे, असें जाणून आपला हत्ती मागें फिरविला. नबाबाची बहुतेक फौज फुटलेलीच होती. तरी अझून जे सरदार समरांगणांत होते, त्यांनीं नबाब साहेबांचा हत्ती मागें वळलेला पाहतांच सर्व चीजवस्त तेथेंच टाकून रणांगणांतून पळ काढिला. त्या वेळीं मराठ्यांच्या घोडेस्वारांनीं पराभूत झालेल्या मोंगली फौजेचा पाठलाग करून त्यांचा पुष्कळ दारूगोळा, तोफा, बंदुका, हत्ती, घोडे व पुष्कळ मोलवान् पदार्थ हस्तगत केले. पेंढाऱ्यांनीं तर मोंगलांच्या छावणीवर छापा घालून ती सर्व लुटून फस्त केली. त्यांत एकट्या करीमखानानें पुष्कळ संपत्ति मिळविली, असें ग्रांट डफ साहेब ह्मणतात.

ह्या लढाईच्या एथपर्यंतच्या हकीकतीचें पत्र जिवबादादांनीं घरीं बंधूस लिहिलेलें जशास तसें उतरून घेतों:—

"पैवस्त छ० ५ रमजान ता० १४ मार्च सन १७९५ शनिवार.

(ता० २७ मार्च स० १७९५ शुक्रवार) श्री

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं

अपत्य जिवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार येथील कुशळ ता॥ छ २२ शाभान मु॥ खर्डें येथें लष्कर सडे स्वारींत. वडीलांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे विशेष. इकडील सविस्तर लिहून वरचेवर चिरंजिवाचीं पत्रें जात आहेत, त्यावरून विदित होतच असेल. नबाब निजाम अल्लीखान ( ) राजश्री बाबा फडके व होळकर व मिरजकर (परशुराम भाऊ पटवर्धन) व भोंसुले असे नबाबावर आगांतुक वाढून गेले होते, त्यांजवर नबाबाचे फौजेनें नीट चालून घेतलें. आण श्रीमंतांकडील फौजा माघारें हटून दिल्या. हें वर्तमान कळतांच आपणाकडील फौज व कंपूसुद्धां पुढें येऊन त्याच्या फौजेवर तोफांची मारगिरी चांगली केली. तेव्हां अविंधांची फौज श्रीमं-

---

१. नागपूरकर भोंसल्याची बखरकार लिहितात "याप्रमाणें जिवबादादा यांणीं तोफेचा मार नबाबाचे खासे स्वारीवर सुरू करून नबाबास जेर केलें." पृ. १४७.

२. पोवाड्यांचें पु. पृ. १४८ व पत्र नंबर १५७ अ, व.

३. बाबू हें नांव सारस्वत ब्राह्मणांत बंगाल्यांत हल्लीं चालत आहे. तिकडूनच हे बंगाली बाबू लोक पूर्वकाळीं दक्षिणेंत आले. तिकडील नांवापैकीं बाबू या नांवाचा प्रचार गोमांतकांत हल्लींही चालत आहे. त्यांस गोंवेबाबू ह्मणतात.

तांच्या फौजेवर चढून जात होती. ती माघारें हटून दिली. त्या दिवशीं संध्याकाळ जाहाला. त्याचेंहि मुकाम जाहालें. व आपल्याहि फौजा दिडा दों कोशांचे आंत्र्यानें राहिल्या. दुसऱ्या दिवशीं छ १९ शाभान बुधवारीं नबाबाचें कूच होऊन येथें पाण्याचा तोटा, भीमा नदीच्या पाण्यावर जावें, हा त्यांनीं निश्चय करून चालला. ही बातमी आणोन प्रातःकाळीं आपली फौज कंपूसुद्धां व श्रीमंतांकडील फौजा त्याजवर पुढें वाढून गेल्या. आपले उजवे बाजूस झाडून कोशाचे आंत्र्यानें श्रीमंतांकडील फौजा उभ्या होत्या. ह्या फौजा अवघ्या वाढून पुढें जातांच त्यांणीं कूच केलें होतें, तसाच सिद्ध होऊन उभा राहिला. त्याजकडील एक कंपू त्याचे आघाडीस होता. व पिछाडीस चंदोलमध्यें त्याची फौज व नबाब याप्रमाणें उभा राहिला. तेव्हां आपल्याकडील कंपूची लैन बांधून त्याजवर तोफा सुरू केल्या. त्यानें इकडील मोहरा टाकून अगोदर श्रीमंतांकडील फौजेवर चालून घेतलें. तेव्हां श्रीमंतांकडील फौज हटविली. नंतर इकडे चाल केली. तेव्हां आपल्या कंपूनें किल्ला बांधून जरिबेवर तोफा ठेवून नीटच त्याजवर मार केला. तो अतिशय करून दिला. तीन प्रहर लढाई जाहाली. फौजेंतहि आपणाकडून व श्रीमंतांकडून तरवार चांगलीच चालली. नबाबाकडील मोठमोठे सरदार छऱ्या आसनाचे (   ) कांहीं जखमी जाहाले. याशिवाय त्याजकडील लोक ठार व जखमी जाहाले. आपलेकडील पेंढारी व लोकांनीं बहुत लूट केली. घोडीं, उंटें, तट्टें वगैरे लोकांनीं आणिलीं. मोंगलांची शिकस्त होण्यास कमती जाहाली नाहीं. तोफा, दारूगोळे, तळावर टाकून मोहरीच्या घाटानें जिकडे मार्ग मिळेल तिकडे त्याजकडील लोक उठून गेले. जातात. त्यांजकडील वकील आपल्या सरकारांत व श्रीमंतांपाशीं आले आहेत. याप्रमाणें आतां सरकारांतून बोलतील त्याप्रमाणें त्यांस आतां कबूल करणें प्राप्त. श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें तूर्त त्यास घेरा देऊन आपली फौज आहे. लवकरच मसलत आटोपण्यांत येईल. श्रीमंत लढाईविषयीं फारच संतोष जाहाले. व सर्वांची खातरजमा पटली. श्रीमंत महाराज कैलासवासीचे पुण्यें व श्रीमंत बाबासाहेबाचे प्रतापें आजवर चाकरी केली ती सिद्धीस गेली. इकडील सर्व सुखरूप आहेत. श्रीमंत राजश्री सरदेसाई (   ) करवीरकर खलश करितात. फिरंगी याजकडील मसलतीमुळें खर्चांत आले. एविसीं पेशजी बोलण्यांत आलेंच आहे. चार रुपये दरबारखर्च दिल्याविना कागद घेतले तरी जाबसाल उलगडत नाहीं. येविसींचें तेथें पुसोन सकल चौकशी करावी. त्याची पैरवी व्हावी. या संस्थानाविसीं आमची एकनिष्ठा. आजवर मागणें सरकारांत (   ) सावंतांकडील प्रकरण तें एकीकडे ठेवून मसलत करूं (   ) त्यास काय करावें हे विज्ञप्ति."

१. जिवबादादांच्या कोणत्याही पत्रांत स्वपराक्रमाचें किंवा स्वयशाचें वर्णन सांपडणें मुष्कील. तशासंबंधानें ते अत्यंत परिमित व संकोचवृत्तीचे असत. त्यांनीं मोंगलांची—लाखो सैन्य घेऊन आलेल्या बलाढ्य शत्रूची—शिकस्त झाली ह्मणून लिहिलें. यावरून ही लढाई कोणत्या प्रतीची झाली आणि यांत मोंगलांचा किती फडशा उडाला, ह्याचें अनुमान सहज होण्यासारखें आहे.

२. या लढाईत मुख्यत्वें जिवबादादांनींच मोठा पराक्रम केला होता व त्यासंबंधानेंच सर्वांची खातरजमा पटली, असें ते लिहितात. असें होतें ह्मणूनच श्री. पेशव्यांनीं त्यांचा फार फार गौरव केला. त्याबद्दल पुढें उल्लेख येईलच.

३. जिवबादादांची आपल्या उभय यजमानांच्या ठायीं कशा प्रकारची निष्ठा होती, हें हे शब्द फार उत्तम रीतीनें व्यक्त करितात. हें कामं ह्याहून सोप्या रीतीनें करतां येणें कठीण आहे. जिवबादादांस सदैव यशच येत गेलें, ह्याचा बोध शेवटच्या वाक्यावरून उत्तम तऱ्हेनें होतो.

शेवटीं, निजामानें पळ काढून व मुठींत जीव धरून एकदा परांड्या किल्ल्याचा आश्रय केला. मराठ्यांच्या दौडीच्या पाठलागांत जितक्या फौजेस वर जातां आलें, तितकी वर गेली. ही बातमी जिवबादादांस समजतांच त्यांनीं किल्ल्याच्या सभोंवार आपल्या फौजेचा गराडा देऊन मोठ्या बंदोबस्तानें चोहोंकडे नाकेबंदी केली. ही गोष्ट ता० १४ मार्च सन १७९५ रोजीं घडली. सर्व राजरस्ते व चोरवाटा बंद झाल्यानें आंतील मनुष्य बाहेर व बाहेरचें आंत फिरकेनासें झालें. बाहेरून येणारें दाणापाणी बंद पडलें. किल्ल्याच्या तटावर धडाधड तोफांचे गोळे येऊन पडूं लागले. त्याचप्रमाणें विलायती कुलपी गोळ्यांच्या वर्षावामुळें किल्ल्यांत माणसांस इकडून तिकडे फिरतां येईनासें झालें. दारूगोळा वगैरे बहुतेक लढाईचें सामान अगोदरच मराठ्यांच्या हातीं गेल्यामुळें आपल्या बचावाचें कांहींच साधन जवळ नाहींसें झालें. त्यामुळें मुसलमान लोक हवालदील होऊन गेले.

" त्यांत उन्हाची काहाली । रुपयाचें दीडशेर पाणी । अशी कठीण वेळा वाहाली । ती सर्व जनांनीं पाहिली । जिवबादादा परशुरामपंतांची दिसंदीस बेहाली ॥"

याप्रमाणें वेढ्यांत सांपडलेल्या त्या दुर्दैवी प्राण्यांवर मोठा दुर्धर प्रसंग येऊन ठेपला. मोठ्या कष्टानें दोन दिवस टिकाव धरून, शेवटीं नाइलाजानें तिसरे दिवशीं प्रातःकाळीं निजाम अल्लीनें आपल्या वकीलाकडे शिक्के कटार देऊन ती जिवबादादांकडे पाठवून सांगितलें कीं:—

" जसा तुमचे बाहादरीचा लौकिक ऐकत होतों, त्यापेक्षां सहस्र विश्वे जास्त डोळ्यांनीं पाहिला. (तुमच्या) शूरत्वाची हद्द जाहाली. आह्मी हरलों. आतां आह्मांस जीवदान द्यावें."

याप्रमाणें सल्ल्याचें बोलणें येतांच दादांनीं लढाई बंद करून, मोगलांच्या दाणापाण्याची व्यवस्था करण्याबद्दल फौजेंत ताकीद दिली. व वेढा तसाच ठेवून नबाब साहेबांची विनंती नाना फडणविसांस कळविली. ती ऐकतांच ते अत्यानंदित होऊन त्यांनीं दादांस असें लिहिलें कीं, " मागील खंडणीबद्दल तीन कोट रुपये रोख, पांसष्ट लक्षांचा मुलूख, दौलताबाद किल्ला व लढाईमुळें आलेला सर्व खर्च, याप्रमाणें नबाबानें मराठ्यांस द्यावें. आणि त्यानें आपला उन्मत्त वजीर मशीर उलमुलुक यास पेशव्यांचे हवालीं करावें. याप्रमाणें कबूल असल्यास तह पुरा करून वेढा उठवावा." तहाचीं हीं मुख्य कलमें जिवबादादांकडून वकिलामार्फत निजामास समजलीं, तेव्हां बाकीचीं कलमें त्यानें खुषीनें कबूल केलीं. पण वजीरास पेशव्यांचे हवालीं करण्याबद्दलचें शेवटचें कलम गाळण्यासाठीं त्यानें पुष्कळ आग्रह धरिला. तें कबूल करण्यास त्यानें पुष्कळ आढेवेढे घेतले. त्याऐवजीं आणखी कांहीं मुलूख व रोकडही देण्यास तो कबूल झाला. व शेवटीं हें अपमानास्पद कलम गाळण्यासाठीं त्यानें मोठ्या नम्रतेनें विनंतीही करून पाहिली. पण मराठे कांहीं केल्या आपला आग्रह सोडीनात.

१. " खरड्यांत कोंडल्यावर सरकारच्या फौजा त्या सभोंवत्या राहिल्या. जिवबादादा शिंद्यांकडील यांनीं तोफांचे कडे घालून वेढा घातला." पंतप्रधानाची शकावली पृ. ३७.

२. पोवाड्यांचें पुस्तक पृ. १४९.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८७.

४. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८७. परंतु, मुलुख ३२ लक्षांचा असें इतर ठिकाणीं आढळतें. पहा पत्र नंबर १५६ व पोवाड्यांचें पु. पृ. १५०.

असें पाहून अत्यंत चिंताक्रांत होऊन नबाब आपल्याशींच ह्मणतात, 'खुदानें ऐसा वक्त हमारेपर लाया. क्या करना ! ये बात इन्की हम न सुने तो तह होता नहीं. क्या करना !' असें ह्मणून फार दुःखित होऊन मशीर उल्मुलुकास बोलावून आणविलें. आणि त्यास सर्व हकीकत कळवून विचारिलें कीं, "अब अघाडी कैसी बात करना ? मरट्ठोंका तो बडा जोर हुवा है. उन्नें जो कहा है, ओ किये बिगर पीछे फिरने नहीं !"

मशीर उ०:—"बहोत अच्छा है. आपके जीमे इस बातकी खतरा नहि करना ! सरकार हुकूम हुवा तो उन्के साथ मैं जाता हूं."

हें त्या निस्सीम राजनिष्ठ वजिराचें भाषण ऐकून नबाब साहेबांच्या डोळ्यांत पाणी आलें. ज्या परमप्रिय विश्वासू अभीष्टचिंतक प्रधानाच्या साहाय्यानें इतका काळ आपण मोठ्या बाणेदारपणानें राज्यशकट चालविण्याला समर्थ झालों व जो राज्याच्या हितासाठीं आपल्या जिवाचीही परवा न करितां शत्रूच्या स्वाधीन होण्यास तयार झाला, त्या जिवलग वजीरास मराठ्यांच्या हवालीं करणें त्या मानी नबाबास मोठें दुःसह वाटलें. पण करतो काय ? निमकहराम सेवकाच्या दुष्ट कृतींनीं मनास जें दुःख होत नाहीं, तें दुःख स्वामिसेवातत्पर विश्वासू सेवकाच्या अशा प्रकारच्या अपरिहार्य वियोगानें गुणज्ञ धन्यास होतें, व त्याबद्दल मनास चटका लागून राहतो. अशा अपमानास्पद अटीनें हृदयास झालेला व्रण लौकर बुजून येऊं नये, ही गोष्ट किती स्वाभाविक आहे ! शेवटीं, वजीराच्या आग्रहास्तव नबाबानें मराठ्यांच्या सर्व अटी कबूल केल्या. आणि तहनाम्यावर शिक्कामोर्तब करून तो वकिलांच्या हातीं दिला. पांसष्ट लक्षांचा जो मुलुख द्यावयाचा, त्याबद्दल दौलताबादच्या व दुसऱ्या किल्लेदारांस रीतीप्रमाणें रोखे व आज्ञापत्रें देण्यांत आलीं. मग वजीर मशीर उल्मुलुक हे आपले खासगी पांचशें स्वार व दोन हत्ती अशा सरंजामानिशीं मराठ्यांच्या स्वाधीन झाले. त्या वेळीं श्रीमंत सवाई माधवराव पेशवे हे त्यांस सामोरें जाऊन त्यांनीं त्यांचा सत्कार केला. मशीर उल्मुलुक ह्यांस वाटत होतें कीं, आपण पेशव्यांचा व नाना फडणविसांचा उपहास करून कडक वाक्प्रहार केला होता, त्या रागानें पेशवे किंवा निदान नाना तरी आपले नानातऱ्हेनें धिंडवडे काढण्यास कमी करणार नाहींत. पण जिवबादादा, परशुरामभाऊ वगैरे सरदारांच्या मध्यस्थीमुळें नानांनीं तसें केलें नाहीं. ह्मणूनच त्या थोर पुरुषांच्या मनाचा मोठेपणा वर्णन करण्याचा सुयोग आज आह्मांस आला. मराठ्यांचें हें भलेपणाचें वर्तन पाहून मशीर उल्मुलुकास आपल्या पूर्वींच्या उन्मत्तपणाची सहजीं मोठी शरम वाटली. कारण, अपराधाची क्षमा केल्यानें अपराधी जितका लज्जित होतो, तितका कडक पारिपत्यानेंही होत नाहीं. ह्मणूनच एका इंग्लिश कवीनें ह्मटलें आहे कीं, Revenge is sweet, but forgiveness sweeter. आणि थोरांची रीतिही अशीच असते. अपराधांची क्षमा केल्यानें क्षमाशीलाची तेजस्विता विशेष शोभायमान होते.

ही लढाई स० १७९५ च्या ता० १० मार्चपासून ता० १६ मार्चपर्यंत सात दिवस चालली होती.

---

१. पेशव्यांची बखर ति. आ. पृ. १५५.

२. या लढाईसंबंधानें काव्येतिहाससंग्रहांतील 'पत्रें व यादी' यांत साररूपानें असा उल्लेख आहे. "(पेशव्यांची) खासा स्वारी मोगलांवर झाली. भोंसले व परशुरामभाऊ व होळकर स्वारीबरोबर होते. मुख्यत्वें दौलतराव शिंदे यांजकडील जिवबादादा बक्षी मोंगलांचा पराभव करून मशीरास घेऊन पुण्यास आले. मोठी फत्ते झाली." पत्रें व यादी पृ. ३०५.

ह्यासंबंधानें एक गृहस्थ पत्रांत पुढील मजकूर लिहितात. "फा० व० ५ पा० सातरोज लढाई जाहाली. मोंगलींचा पराजय होऊन श्रीमंतांची फत्ते झाली. यश ती० स्व० रा० दादांस आलें. मोंगलांचा गळांठा फारच केला. फौज बुणगे लुटून आणलें. हत्ती तोफा वगैरे सरंजाम लूट फार आली. एक सरदार मातबर धरून अंबारी हत्तीसहित आणला. पांच दहा नामी सरदार ठार व जखमी जाले." शेवटीं, निजामाचा पूर्ण पराभव करून पेशव्यांनीं पाणिपत एथें मलिन झालेलें यश खर्डे एथें जाहीर रीतीनें उज्ज्वल करून घेतलें. जे मुसलमान लोक पाणिपत एथील मराठ्यांच्या पराभवानें शेफारून जाऊन ते नामशेष होण्याचा दिवस आतां लांब नाहीं, अशा आशेनें व मोठ्या उत्कंठेनें त्या दिवसाची वाट पाहत होते, त्यांची या लढाईनें साफ निराशा झाली; एवढेंच नव्हे, तर मराठ्यांविरुद्ध भलत्याच वल्गना करणें हें फार धोक्याचें काम आहे, अशी त्यांना या लढाईमुळें सक्त ताकीद मिळाली. मराठ्यांमधील हें ओज ज्या विशेष व्यक्तींत जागृत होतें, त्या निजधामास जाण्याबरोबर सारें पौरुष व राजकारण लयास गेलें; सर्व कुयोग एकत्र जमले; भलतींच पात्रें पुढें झालीं; आणि मराठ्यांच्या वैभवाचें गाडें उलटलें.

पुढें निजामाकडून सर्व करारमदार मोई सवडीनें पुरे करून घेतले. मशीर उल्मुलुकास सुस्थळीं राजकीय कैदी करून ठेविलें. 'त्यांच्या मुजरातीस (तैनातीस) दोन कारकून त्यांचेजवळ ठेविले. जो पदार्थ मश्रुन्मुलुक यांचे तोंडांतून निघेल, तो तेथें त्यांनीं पुरवीत असावें.' अशी त्याची उत्कृष्ट बरदास्त राखिली होती. तेवढी स्वतंत्रता मात्र नव्हती!

याप्रमाणें पेशव्यांच्या मनोदयानुरूप कार्यसिद्धि करून आल्यावर श्रीमंत जिवबादादांविषयीं फार खुष झाले. व त्यांनीं त्यांचा मोठा सन्मान केला. त्यांस अनेक बहुमोल वस्त्राभरणें देऊन त्यांनीं आपले आभार प्रदर्शित केले. ह्या जयाविषयीं नाना फडणविसांनीं खुष होऊन श्रीमंतांस ह्मटलें कीं, "जिवबादादांस भारती वीराची उपमा साधती. ज्याणें मुखांतून वचन काढलें, त्याच्या सहस्रगुणी जास्त करून दाखविलें. आणि हिंदुधर्म राखिला." अशाप्रकारें सर्वांकडून त्यांचा योग्य गौरव झाला. परंतु, जिवबादादांनीं श्रीमंतांकडील हा बहुमान त्या वेळेसच स्वीकारिला नाहीं. याचें कारण, त्यांची दूरदृष्टि व धोरण, हीं वेगळींच होतीं. यासंबंधानें फाल्गुन वद्य ११ (ता० १७ मार्च १७९५) च्या पत्रांत नारायणराव बक्षी लिहितातः—"काल (फा० व० १०) श्रीमंत पंतप्रधान यांणीं तीर्थरूपांस बोलावून नेऊन बहुत तारीफ व खातरजमा केली. बहुमान देत होते, तो यांनीं घेतला नाहीं. मग घेऊं, तूर्त घेत नाहीं, असें बोलून माघारें आले. चौंकडे लौकिक चांगला जाहालों." जिवबादादा स्वतः निरभिमान पुरुष होते, त्यांना बहुमान घेण्याचा संकोच होता. शिवाय, आपण पेशव्यांच्या बजाविलेल्या मोठ्या कामगारीबद्दल आपल्या यजमानास कांहीं कायमच

१. पहा पत्र नं. १५३.

२. श्री० सवाई माधवरावांनीं छत्रपतीस पाठविलेलें पत्र नं. १५९.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८७.

४. पहा पत्र नंबर १५५. या खर्ड्याच्या लढाईसंबंधीं जीं पत्रें आलीं, त्यांत ही लढाई जिवबादादांनींच मारिली, असें लिहिलें आहे. ता. १३ एप्रिल १७९५ च्या पत्रांत नारायणराव लिहितात—"नबाबाची लढाई मारली याजमुळें तीर्थरूपांस मोठें यश आलें. श्रीमंत पंतप्रधान व श्री० नाना व यजमानसाहेबे यांची बहुतच आस्था आहे." प. नं. १५६. तसेंच पत्र नंबर १५३ यावरूनही तोच बोध होतो.

लाभ करून घ्यावा, असें त्यांच्या मनांत होतें, व त्याप्रमाणें पुढें घडूनही आलें. ती हकीकत आतां लौकरच वाचकांस कळून येईल. पुढें, श्रीमंत पेशव्यांकडून परशुरामभाऊ पटवर्धन, रघोजी भोंसले, तुकोजीराव होळकर, विठ्ठलपंत पटवर्धन, सदाशिव मल्हार, नारायणराव बक्षी इत्यादि सरदारांनीं या लढाईत चांगली कामगिरी बजाविल्याबद्दल त्यांचाही यथायोग्य गौरव करण्यांत आला. नंतर, स्वतः पेशवे व नाना फडणवीस हे जिवबादादा व इतर सरदारांच्या छावण्यांत गेले. आणि ज्यांनीं ज्यांनीं चांगली मर्दुमकी केली होती, त्या सर्वांस कोणास शिरपेंच, कोणास कंठी, कोणास मोत्यांची जोडी, कोणास शेलापागोटें, अशीं बक्षिसें देऊन त्यांचा सन्मान केला. तसेंच लढाईत कामास आलेल्यांच्या निराश्रित बायकामुलांस वेतनें देण्यांत आलीं. घायाळ झालेल्या लोकांच्या शुश्रूषेची योग्य तजवीज त्यांच्या त्यांच्या सरदारांच्या पसंतीप्रमाणें करण्यांत आली. अशा रीतीनें सर्वत्र नीट व्यवस्था ठेवून कांहीं दिवस विश्रांति घेतल्यावर हें सर्व लष्कर पुण्यास जाण्यासाठीं निघालें. ते वसंतऋतूच्या ऐन बहारीचे दिवस होते. यास्तव, मार्गांत वनोपवनांतील नानाविध सृष्टिसौंदर्य पाहत पाहत विजयानंदांत गर्क झालेला तो सैन्यसमूह वैशाखाच्या आरंभीं पुण्यानजीक येऊन दाखल झाला. मग सुमुहूर्तानें विजयोत्सव करून शहरांत प्रवेश करण्याची तयारी केली.

शुद्ध पंचमीच्या दिवशीं सर्व पुणें शहर शृंगारून उत्तम प्रकारची रोषनाई केली होती. जागोजाग गुढ्या तोरणें, पताका लावून विविधाकृतींच्या दीपमालिका प्रज्वलित केल्या होत्या. निरनिराळ्या प्रकारांनीं त्या शहरच्या पूर्वसौंदर्यास ह्या नवीन कृत्रिम सौंदर्यानें विशेष भर पडल्यामुळें, तो देखावा अत्यंत चित्ताकर्षक झाला होता. अंवशीच्या पांच घटिका रात्रीस श्रीमंतांनीं मोठ्या थाटानें विजय-प्रवेश केला. त्या वेळीं श्रीमंतांच्या आग्रहावरून जिवबादादा अंबारींत बसून येत असतां त्यांस पाह-ण्यासाठीं शहरांत लोकांची फार दाटी झाली होती. त्या वेळीं ह्याच पुण्यप्रतापी पुरुषाच्या पराक्रमानें आजचा हा सुखसोहळा झाला, असें ह्मणून नागरिक जनांनीं श्रीमंतांप्रमाणेंच जिवबादादांवरही सोन्यारुप्याचीं फुलें उधळलीं व त्यांस प्रेमानें प्रणाम केले. वृद्ध स्त्रीपुरुषांनीं ‘ बाबा ईश्वर तुला उदंड

१. या लढाईवर कोणी कवीनें खालीं लिहिलेला श्लोक केला आहे.

“ केला हल्ला सवाईप्रभुनिजकटकें, या तऱ्हें मार दिल्हा
तेव्हां किल्ला परांडा जवळहि असतां जाहला दूर पल्ला; ।
नाहीं गल्ला न पाणी यवन तळमळी, ‘या नबी ! यार अल्ला !’
बोले, ‘सल्ला करो जी ! अबहि गनिमको चाहिसो देव जिल्हा’ ॥ १ ॥

पण, असा मूळ श्लोक असतां त्याच्या पहिल्या चरणांतील ‘ या तऱ्हें मार दिल्हा ’ याऐवजीं ‘भाउनें मार दिल्हा ’ असा परशुरामभाऊंच्या चरित्रांत पृ. १४० एथें वस्तुविपर्यास केलेला आढळतो ! यावरून इतिहासाच्या शुद्ध स्वरूपांत कसकशी भेसळ झाली आहे, याचें अनुमान होईल. चरित्रनायकाच्या पदरांत त्याच्या पराक्रमाबद्दल स्तुतिस्तोत्राचा मोबदला टाकतांना ऐतिहासिक सत्यास मुळींच झुगारतां नये. या लढाईत परशुरामभाऊंनींच सर्व कामगिरी उठविली, असें त्या चरित्रावरून कोणाचेंही अनुमान होईल. पण खरी हकीकत किती निराळी आहे ! ‘ शेवटीं परशुरामभाऊंनीं अद्वितीय पराक्रमानें निजामाच्या सर्व सैन्यांत काटाकाटी चालवून त्यास पिटून लाविलें. तेव्हां आनंदातिरेकानें पेशवे ह्मणतात, शाबास, भाऊ शाबास ! ’ असें त्या चरित्रांत दाखविलें आहे. पण हें किती खोटें ? परशुरामभाऊंचा ‘सफाईचा हात सहा कोसांवरून पाहून त्यांना प्रोत्साहन देण्याला पेशव्यांनीं दुर्बीण ला-विली होती कीं काय ? परशुरामभाऊंचा या लढाईतील पराक्रम सामान्य प्रतीचा होता, हें आतां उघड झालें आहे.

आयुष्य देवो ' असे आशीर्वाद दिले. नंतर, पुण्यांत आल्यावर आनंदप्रदर्शनार्थ " शिंद्यांकडील तोफखाना सुरू झाला. पहांटेच्या सहा घटका रात्रीपासून प्रातःकाळच्या चार घटका दिवसपावेतों सुटत होता. पांच सातशें तोफा शिंदे यांणीं सोडल्यां."

खर्ड्यांची लढाई झाल्यावर त्या लढाईसाठीं आलेल्या सर्व सरदारांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें पोषाख सरंजाम वगैरे देऊन त्यांची पाठवणी केली. भोंसल्यांस मेजवानी वगैरे करून व त्यांच्या योग्यतेप्रमाणें देणें देऊन त्यांचा चांगला सन्मान केला. अशा रीतीनें सर्व सरदार गेल्यावर शिंदे एकटे राहिले होते. महादजी शिंदे वारल्यावर त्यांच्या जागीं दौलतरावांस शिंदेशाहीचा अधिकार द्यावयाचा, त्या कामीं नजराणा दोन कोट रुपये मिळाल्याशिवाय सरकारची मंजुरी मिळेना. ह्मणून, जिवबादादांनीं पुढें लढाई होणार आहे, त्या कामीं भरपूर मदत देऊन लढाई फत्ते करूं, असें सांगितल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें जिवबादादांनीं फारच मर्दुमकीनें शिंद्यांच्या मोठ्या फौजेच्या जोरावरच बहुतेक लढाई फत्ते करून आपलें वचन पुरें केलें. त्यांनीं केवळ साधारण प्रतीची मदत न करितां नजराण्याच्या मोबदला हा मोठा कार्यभार शिरीं घेऊन चांगल्या तऱ्हेनें पार पाडिला. तेव्हां, त्यांना पेशव्यांनीं आणखी कांहीं विशेष देणगी देण्याचें कारण उरलें नाहीं, ही गोष्ट हिशोबी न्यायानें बरोबर होती. परंतु, त्यांच्या तर्फे कांहीं गोष्टी विचारांत घेण्यासारख्या होत्या. त्यांकडे सरकारांतून दुर्लक्ष होत आहे, हें जाणून जिवबादादा आपल्या कर्तबगारीची योग्य पारख सरकारांत व्हावी, या विचारांत होते. त्यांचा मनसबा असा होता कीं, या लढाईंत आपली फौज सर्वांहून जास्ती–चाळीस हजारांवर–आहे. सरकारच्या भरंवशाची ' मारती तरवार ' हुजुरात, तसेच पटवर्धन वगैरे सरदार यांची मोगलांनीं दोनदां दाणादाण उडवून देऊन त्यांस नामोहोरम केलें. परशुरामभाऊ तर जखमी झाले. आणि मोगलांचा जोर फार वाढला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं ज्यांनीं खरें शौर्य प्रकट केलें, मोगलांच्या मोडाची शिकस्त करून सोडिली व त्यांजकडून पाहिजेत ते करार पुरे करून घेतले, त्यांची ही सर्वांस जड झालेली कामगिरी केवळ नजराण्याच्या माफीपुरतीच नव्हती, हें श्रीमंतांस सहज कळण्यासारखें आहे. परंतु, नाना आपला बहुमान करूनच या महत्त्वाच्या गोष्टीचा निकाल लावताहेत, हें लक्षांत येतांच त्यांनीं ती गोष्ट दिरंगाईवर टाकिली. कारण, श्रीमंतांकडून आपला यथायोग्य गौरव झाला, ही गोष्ट रीतीचीच होती. व त्या गोष्टीची त्यांना विशेष अपेक्षा होती अशांतला प्रकार नाहीं. आपला पराक्रम सर्वश्रुत व सहज सर्वांच्या नजरेंत भरणारा असल्यामुळें त्याबद्दलचे धन्यवाद व तत्प्रदर्शक मानपान हीं विशेष रीतीनेंच घेतलीं पाहिजेत, असा त्यांचा समज नव्हता. कारण, त्यासंबंधाचा डंका सर्वत्र वाजलेलाच होता. जिवबादादांचे मतें शिंद्यांची मोठी मदत पेशव्यांस मिळाल्यामुळें जर त्यांचा एवढा मोठा फायदा झाला, तर शिंद्यांस त्यांतील योग्य अंश पोहोंचवून आपली कृतज्ञता व गुणज्ञता प्रकट करण्याचें पेशव्यांचें काम आहे. व हें ह्मणणें विचारदृष्टीनें चुकीचें नव्हतें. हें धोरण मनांत ठेवून त्यांनीं आपले उद्योग शांतपणानें चालविले होते. नंतर त्यासंबंधानें वगैरे " जिवबादादा बक्षी यांचीं सरकारशीं राज्यप्रकरणीं बोलणीं बहुत झालीं. या गोष्टीस निरोपास आठ पंधरा दिवस अवकाश पडला. नंतर शिंदे यांस निरोपाचीं वस्त्रें हिंदुस्थानांत जाण्याविषयीं सरकारचीं झालीं." पुढें थोडेच दिव-

१. पेश. ब. पृ. १६०.

२. पेशव्यांची बखर पृ. १६१ व पत्र नंबर १९०.

सांनीं शिंदे हिंदुस्थानांत जाण्यासाठीं निघणार, इतक्यांत नाना फडणवीस यांस एक काळजी उत्पन्न झाली. ती अशी कीं, श्रीमंत सवाई माधवराव साहेब व कैदेंत असलेले राघोबादादांचे चिरंजीव बाजीराव साहेब, यांमध्यें थोडथोडा स्नेहसंबंध जडत चालला होता. ह्या गोष्टीचा परिणाम भलत्या थरावर जाईल, ह्या भीतीनें नानांचें चित्त अस्वस्थ झालें. कारण, बाजीराव साहेब शेंकडो युक्ति योजून श्रीमंत सवाई माधवरावांस आपल्या जाळ्यांत आणील. आणि राज्याधिकार पटकावण्याचा स्वतःचा कावा सिद्धीस नेण्याची व त्यांत आपलाही द्वेष उगविण्याची खटपट करील, ह्याबद्दल त्यांना संशय नव्हता. ह्यास्तव, नानांनीं जिवबादादांस तूर्त तुह्मीं जाण्याची घाई करूं नये, सरकारचीं कांहीं महत्त्वाचीं कामें आहेत, ह्मणून सर्व सरंजामासहित पावसाळ्याचे चार महिने राहाण्याविषयीं आग्रह केला. जिवबादादांनीं ती गोष्ट अर्थातच मान्य केली. तेव्हां पुष्कळ दिवस बैठा मुक्काम केल्यामुळें फौजेस खर्च फार आला, व आपण पेशवेसरकारास आजवर केलेल्या मदतीमुळें भारी पेंचांत पडलों, हें श्रीमंतांच्या व नानांच्या प्रत्ययास आणून देण्यास जिवबादादांस ही उत्कृष्ट संधी मिळाली. पुढें त्यांचा रुसावा नसावा व खर्ड्याच्या लढाईतील मर्दुमकीस व सरकारास मिळवून दिलेल्या विजयास शोभेसें "यांस इनाम काय द्यावें ह्मणून (तीन लाख रुपयांचा) मुलूख जाहगिरा करून देण्यास सनदा तयार केल्या. तेव्हां जिवबादादा बोलले, जें देणें तें दौलतराव शिंदे यांचे नांवें करून द्यावें. मग आह्मांस पावेल. सरकारचे कृपेनें आह्मांस सर्व आहेचे." असें ह्मणतांच सरकारांत विचार पडला कीं, शिंद्यांस जाहगिरा द्यावयाच्या, तर त्या त्यांच्या इतमामास, नांवास व मदतीस शोभतील अशा दिल्या पाहिजेत. शेवटीं "पंधरा लक्षांचे महाल अशीरचा किला, बऱ्हाणपूर व अमदानगर वगैरे जाहगिरा (शिंद्यांच्या नांवें करून) दिल्या." यावरून आपल्या यजमानाच्या हिताविषयींची कळकळ, राजकीय धोरण व स्वहितत्याग, हे गुण जिवबादादांच्या ठिकाणीं किती उत्कृष्ट तऱ्हेनें वागत होते, हें कळून येण्यासारखें आहे. एणेंप्रमाणें या महत्त्वाच्या लढाईचा शेवट मराठ्यांचे उत्कर्षास कारण झाला.

१. पहा पत्र नंबर १९०।१९२.

२. पहा पत्र नंबर ४००.

३।४. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८९.

५. ही लढाई एवढी घनघोर झाली असतां, व शेंकडो लढाया पाहिलेले व स्वतः रणशूर सरदार व शिपाई लढाईत मोठ्या निकरानें लढले असतां, मराठ्यांचे प्रसिद्ध इतिहासकार ग्रांट डफ साहेब व त्यांच्या इतिहासाच्या आधारावरून रा. सा. वि. कों. ओक आपल्या हिंदुस्थानकथारसांत लिहितात कीं, मशीर उल्मुल्कास जेव्हां पेशव्यांसमोर आणिलें, तेव्हां त्यास पाहून सवाई माधवराव पेशव्यांचें तोंड सुकलें. तेव्हां, त्याचें कारण नाना फडणविसांनीं त्यास विचारिलें असतां त्यांनीं सांगितलें कीं, "मोंगलांनीं भित्रेपणानें आपली एवढी अमर्यादा करून घेतली. आणि आमचे लोक यत्न न करितां जय पावले, असें असतां ते आपणास विजयी असें मानितात. त्यापक्षीं दोहोंकडचेही पुरुष अप्रयोजक आहेत, असें पाहून माझें मन फार खिन्न झालें." 'हें माधवराव साहेबांचें उत्तर अगदीं बरोबर होतें. कारण दोहोंकडे सुमारें सवसव्वा लाख फौज होती. तरी लढाई ह्मणण्यासारखी एक देखील झाली नाहीं, व दोहोंकडचे मिळून दोनशांहून अधिक लोक पडले नाहींत. असें असून, आपले विजयाचा झेंडा मराठे लोक उगाच मिरवितात, तो बरोबर नाहीं.' (हिंदुस्थानकथारस पान २५६.) डफ साहेब एथपर्यंत असेंच ह्मणत असून आणखी लिहितात. ' याशिवाय 'रात्रीस अव्यवस्था होऊन व त्या किल्ल्यास त्यांहीं घेरा घालून मोरचे बांधून तोफा चालविल्या. त्या योगेंकरून मोंगल फार मेले गेले. तरी युद्ध करून पडले, असें ह्मणतां येत नाहीं.'

खर्ड्यांची लढाई कशा प्रकारची झाली, हें ह्या भागांतील सविस्तर वर्णनावरून वाचकांस आतां कळून चुकलेंच आहे. एकही मोठी लढाई झाली नाहीं हें उभय इतिहासकारांचें ह्मणणें किती खोटें आहे, हें वरील हकीकतीवरून आतां स्पष्ट झालें आहे. पण सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, मशीराम् आणिल्यावर सवाई माधवरावांचें तोंड सुकलें, आणि तें दोहों पक्षांकडील लोक अप्रयोजक पाहून! आतां एथें असा प्रश्न उद्भवतो कीं, दोहोंकडील लोक युद्धकर्मांत अप्रयोजक असे मानणारे सवाई माधवराव जर युद्धशास्त्रशौंड होते, तर निजामाची खोड मोडण्यासाठीं त्यांनीं पूर्वी आपल्या सैन्याची आपल्या ह्मणण्याप्रमाणें व्यवस्था कां ठेविली नाहीं ? घरांत बसून आपल्या भोंवतीं तरवार फिरवून इंग्रज हरला असें ह्मटल्यानें लढाईंत शत्रूचा पराभव होत नाहीं ! खर्ड्याच्या लढाईचें काम मुत्सद्दी नाना फडणवीस व पेशवे सवाई माधवराव यांस सामान्य वाटत नव्हतें. व ह्मणूनच त्यांनीं निजामाची चांगली लढती फौज सव्वा लाख आहे आणि तींतील सरदारही चांगले युद्धनिष्णात आहेत, असें जाणून मोठ्या प्रयासानें सर्व सरदारांची फौज एकत्र मिळवून युद्धाची कडेकोट तयारी चालविली होती. सर्व सरदार आले, तरी जिवबादादा शिंद्यांच्या पराक्रमी फौजेसह येऊन पोहोंचले नाहींत, ह्मणून ते येईपर्यंत त्यांना वाट पाहिली. पुढें, निजामास पराभूत केल्याचें यश स्वतः पदरांत पाडून घ्यावें, ह्मणून हुजूरात घेऊन फडके, तसे आपापल्या फौजांसहित पटवर्धन, भोंसले, होळकर हे कोणास न कळवितां निजामावर आगंतुक चाटून गेले. तेव्हां उभय पक्षांची मोठी लढाई होऊन मोगलांनीं मराठ्यांचा मोड केला. आणि त्यांनीं त्यांना जबर मार देत पिटून लावलें. हें कळतांच नाना फडणवीस आणि सवाई माधवराव ह्यांचे तोंड सुकलें. (वास्तविक पाहिल्यास डफ साहेब व रा. सा. ओक ह्मणतात तो प्रसंग ह्या वेळचा !) आणि त्यांनीं आतां कसें करावें ? मोगल असाच पुढे आल्यास पुणें गांठतां कठीण पडेल. असा निरोप सांगून मोठमोठ्या सरदारांकडे सांडणीस्वार रवाना केले. आणि जिवबादादांनीं खरा धीर दिला, तेव्हां त्यांचा जीव जरा खालीं पडला. तरी, शेवटपर्यंत त्यांना लढाईच्या परिणामाची धास्ती होतीच. उभय पक्षांचें सकाळपासून सायंकाळपर्यंत दारुण युद्ध चाललें होतें. आणि शेवटीं मराठ्यांनीं मोगलांच्या पराभवाची 'शिकस्त' करून सोडिली. त्यांत उभयपक्षीं दोनशेंच मनुष्यें पडलीं काय ? प्रत्यक्ष जिवबादादांच्या मागें घेतलेल्या पत्रावरून तर या लढाईच्या घनघोरपणासंबंधानें अनुमान होतेंच. परंतु, खर्ड्याच्या बखरींतील खालील मजकुरावरून अनुमान करायाला विशेष सोपें जाईल. ' त्या तोफा बहुत मोठ्या होत्या. तोफा सुरू जाहाल्या तों अस्तमान जाहला. मग तोफा सुरू झाल्यावर मोठी हाणाहाण केली. मग मशाला लाविल्यावर उजेड बहुत पडला. मग विठ्ठलपंत भोंसले यांणीं बाणाची वृष्टि बहुत केली. कीं, जैशी पर्जन्यवृष्टि होती. याप्रमाणें बाणामागें बाण सोडून एकच मार केला. आणि सर्वांनीं हर हर महादेव करून एकदांच उड्या घातल्या. लढाई मोठी मातबर जाहली. आणि जिवबादादा यांणीं मोठी मर्दुमकी केली. कीं, माणूस किती पडले याची संख्या त्या वेळेस लागली *नाहीं." यावरून या मोठ्या लढाईंत दोनशेंच मनुष्यें पडलीं ही गोष्ट अगदीं खोटी †आहे. शिवाय ग्रांट डफ साहेब मोगलांच्या पराभवाचें एक चमत्कारिक कारण देतात. कीं, लढाई आटपून दोहोंकडील लोक रात्रीचे स्वस्थ पडले असतां, मराठ्यांकडील दहा बारा घोडेस्वार घोड्यांस पाणी पाजण्यासाठीं गेलेले चुकून निजामाच्या लष्करांत शिरले. तेव्हां मराठ्यांचा हल्ला आला, असें समजून सर्व लष्कर पळत सुटलें. व शेवटीं निरुपायानें निजामानें खर्ड्याच्या किल्ल्याचा आश्रय केला. पण ह्या ह्मणण्यास पत्रांत किंवा बखरींत वगैरे कोठेंच आधार नसून, दहाबारा घोडेस्वारांच्या रात्रीच्या आगंतुक येण्यानें निजामाच्या लाख सवा लाख फौजेची (कारण, पडलेल्या दोनशांपैकीं निजामाच्या वांट्यास फार तर शेंदीडशेंच येतील !) धांवपळ झाली, व शेवटीं अपजयास तेंच कारण झालें,

* खर्ड्याच्या लढाईची हस्तलिखित प्रत.

†. या लढाईंत पूर्वी प्राणनाश झाला, तो शिवाय करून, ह्या दिवशीं जी ही मोठी लढाई झाली " त्या वेळेस पेशव्यांकडील व नबाबाकडील मिळून १०।१५ हजार माणूस युद्धांत ठार झाले. व मोठमोठे नामांकित सरदार नबाबाकडील बहुत जखमी झाले." पेश. ब. पृ. १५४. ह्या आधारावरून वरील ग्रंथकारांच्या मतास थारा मिळत नाहीं.

या संधीस जिवबादादांचा मुक्काम पुण्यास पुष्कळ दिवस होता. हिंदुस्थानांतील सर्व कामकाजें आटपून ते आले होते, तेव्हां तिकडे लौकर जाण्याचें कारण नव्हतें. परंतु, ह्या लढाईचें व वरतीं सांगितल्याप्रमाणें नाना फडणविसांचें काम आटपल्यावर, त्यांना फौजेच्या देण्याचा निकाल लावण्याचें व पुढें सुरळीत तिला पगार पोहोंचवितां यावा अशी व्यवस्था करण्याचें महत्त्वाचें काम उलगडावयाचें होतें. शिवाय, आजवर निरनिराळ्या कारणांनीं अनेक लढाया मारून उत्पन्न झालेल्या शत्रूंच्या निर्दलनाचें, स्वराज्यरक्षणाचें व योग्य प्रकारें राज्योत्कर्ष करण्याचें काम अविश्रांत श्रम करून केलें. ठिकठिकाणीं उत्कृष्ट बंदोबस्त करून ठेविला. सर्व शत्रूंस चांगला वचक बसवून ते पुनः वर डोकें करणार नाहींत किंवा शिंद्यांस अपाय करण्याच्या मसलती योजणार नाहींत, अशी त्यांना पक्की दहशत बसविली. तरी सर्व राज्यकारभार सुयंत्र चालविण्याला, जमाखर्चासंबंधानें योग्य व्यवस्था करण्याला, ठिकठिकाणच्या सुभ्यांकडून व वकीलांकडून योग्य तऱ्हेनें काम घेण्याला, आणि रयतेस अधिक सुख मिळून तिच्या सर्व प्रकारच्या कुरकुरी तोडायाला पाहिजे तितका स्वस्थपणा अद्याप मिळाला नव्हता, असें ह्मणावयास बाध नाहीं. बाळोबा तात्या हे चतुर मुत्सद्दी व पोक्त मनुष्य दिवाणगिरीच्या कामावर होते. ते आपलें काम चांगल्या प्रकारें बजावीत असत. त्यामुळें वरील कामाचा निकाल बऱ्याच समाधानकारक रीतीनें लागे, हें खरें. परंतु, नित्य उठून लढाया व धोक्यांचीं राजकारस्थानें सरकारच्या पाठीमागें लागल्यामुळें, वरील कामाकडे पूर्ण लक्ष पोंहोंचविण्याला, किंवा तें अगदीं व्यवस्थित रीतीनें चाललें आहे असें समाधान मानून घेण्याला भरपूर सवड नव्हती. व तेथें कोणाचा इलाज नव्हता. हें मागील इतिहासावरून सहज कळण्यासारखें आहे. तरी पण, शिंदेशाहींत जिवबादादांनीं सर्व कामांवर योग्य माणसांची योजना केल्यामुळें एकंदरींत राज्यांत सर्वत्र आबादानी होती. शिवाय, ते स्वाऱ्यांच्या कामावर निघाले, ह्मणजे ज्या ज्या प्रदेशांतून जात असत, तेथील व्यवस्था लक्षपूर्वक पाहत असत. जेथें जेथें जो जो बंदोबस्त आवश्यक, तो तो ते काळजीपूर्वक करीत असत. हें मागें त्या त्या प्रसंगीं सांगितलेंच आहे. पाटीलबावा असतांना ते स्वतंत्र रीतीनें राज्यांतील बंदोबस्ताचीं कामें पाहत होतेच. पण राज्याचा बंदोबस्त उत्तम तऱ्हेनें चालविणें, आणि तेणेंकरून रयतेस विशेष सुख होईल असे उपाय योजणें, या कामाला शांतता पाहिजे

असें समजणें ह्मणजे त्याकाळच्या शौर्यासंबंधानें व आकस्मिक येणाऱ्या विघ्नाच्या वेळीं ते कसे वागत, ह्यासंबंधानें अज्ञान प्रकट करणें होय. ह्या हुलीनें सारें लष्कर जीव घेऊन खर्ड्याच्या किल्ल्यांत शिरेपर्यंत त्यांनीं मागें गनीमाची चाहूल पाहिलीच नाहीं काय? पत्रांत तर साफ लिहिलें आहे कीं, मोंगलांची शिकस्त होण्यास कमती झाली नाहीं. त्यांस लुटून घेतलें. व ते मिळत मागें उठून गेले. तेव्हां एकंदरींत असें ह्मणावें लागतें कीं, ग्रांट डफ ह्यांनीं प्रकट केलेलें वरील मत निराधार आहे. तेव्हां, अर्थातच मराठे या लढाईंत आपण तरवार गाजविल्याचा जो अभिमान अद्याप वाहतात, तो सर्व प्रकारें यथार्थ होय. सवाई माधवरावांस तर—त्यांचें तोंड न सुकतां—आपल्या लोकांनीं पराक्रमानें जय मिळविला ह्मणून मोठा आनंद वाटला *आहे. किल्ल्याच्या तोफा लावून त्यांच्या योगानें जे शत्रूचे लोक मरतात, ते युद्ध करून पडले असें जर ह्मणतां येत नाहीं, तर ते कशानें पडले ह्मणावें? प्रस्तुत, किल्ल्यांत एक पक्षाचे लोक अडकून पडल्यावर विरुद्ध पक्ष त्यावर तोफा चालवून जे लोक मारितात, ते कशानें पडले असें समजतात? शत्रूस किल्ल्याच्या आश्रयास जाण्याचें भाग पाडणें, ह्यांतच मर्दुमकी असते. तेव्हां एकंदरींत ग्रांट डफच्या ह्या ह्मणण्यांत कांहीं जीव दिसत नाहीं. असो.

---

* पत्र नं. १५५ व पेश. व. पृ. १५५.

होती. तिची मागील काळांत बरीच वाण होती. ह्या संधीस सुदैवानें सर्वत्र शांतता असल्यामुळें सर्व व्यवस्था मनाप्रमाणें घडवून आणण्याचे कामीं त्यांनीं अधिक लक्ष पुरविलें. दौलतराव बाबांनीं राज्यकारभार पाहण्यांत चांगलें प्रवीण व्हावें, कै० बा० पाटीलबावांच्या आंगचे अनुकरणीय सद्गुण त्यांच्यांत यावे, आणि त्यांनीं पाटीलबावांप्रमाणें सुकीर्ति संपादावी, एतदर्थ जिवबादादांनीं मोठ्या शहाणपणानें आपले प्रयत्न चालविले होते. त्यांचें सर्व लक्ष तिकडे गुंतून गेलें होतें. आणि हें कार्य सिद्धीस गेलें, ह्मणजे आपली या लोकची व्यावहारिक इतिकर्तव्यता संपली, असें त्यांच्या मनानें घेतलें होतें. परंतु, आपल्या श्रमास यश येईल असें त्यांस दिसेना. हें मागेंच सांगितलें आहे. पण त्याबद्दल एथें अंमळ विशेष खुलाशानें लिहिलें पाहिजे. राज्यकारभारासंबंधीं सर्व कामें ते बाबासाहेबांच्याच विद्यमानें चालवीत. परंतु, तीं धोरणें, त्या मसलती, व कामकाज तपासण्याचे ते भिन्न भिन्न प्रकार, ह्यांत चांगलें मन घातल्यावांचून तीं कळावीं कशीं? तरुण वयाप्रमाणें सोबतीस उल्लू माणसांची आवड. स्वतःच्या व त्यांच्या अपक्क विचारांत ठरतील ते मोठमोठ्या प्रकरणाचे निकाल! हरएक बाबतींत सकृद्दर्शनीं जो मनांत येईल, तोच कायमचा ग्रह! चालत आलेल्या वहिवाटीकडे व धोरणाकडे अधिक लक्ष पुरवावें लागतें. आपल्या व कारभाऱ्यांच्या विचारांत तफावत पडत असल्यास यांत खरा प्रकार काय व कां? हें आस्थेनें व शोधकबुद्धीनें ताडून पाहिलें पाहिजे. परंतु, इतका समंजसपणा, इतकी दूरदृष्टि व इतका पोक्त स्वभाव अंकुररूपानें मूळचा असल्यावांचून त्या वयांत यावा कसा? तारुण्याच्या पहिल्या बहरीचा रसास्वाद घेण्याकडे दौलतरावांच्या मनाची जोरानें प्रवृत्ति होत होती; पदरीं अमर्याद ऐश्वर्य होतें; अर्थात् हरएक सुखोपभोगाची वस्तु हवी तेव्हां मिळण्यासारखी होती; सत्तारूप कलिका जरी वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व कर्तृत्वशाली अशा कारभाऱ्यांकडे नियोजित असल्यामुळें आकुंचित होती, तरी ती विकास पावण्यास आतां फार कालावधि नको, अशा आशा मनांत वरचेवर डोकावून पाहत होत्या; अशाप्रकारची त्या वेळची बाबासाहेबांची स्थिति होती[1]. परंतु जिवबादादांवर त्यांची प्रीति होती. आणि त्यांच्या मर्जीबाहेर कांहीं करावयाचें नाहीं, कांहीं अधिक उणें वाटलें तरी बोलायाचें नाहीं, अशी त्यांची वहिवाट होती. शिवाय, जिवबादादा महान् पराक्रमी व मोठ्या योग्यतेचे मनुष्य, पेशवेसुद्धां त्यांचें मोठें वजन बाळगितात, आणि ते आपल्या राज्याचे हितकर्ते व आपले सर्वस्वीं उपकारकर्ते आहेत, ह्या गोष्टींचें दडपण त्यांजवर होतें. त्याचप्रमाणें बाळोबातात्या दिवाण व इतर मुत्सद्दी मंडळी यांच्या संबंधाचें त्यांचें वर्तन पूर्वक्रमाप्रमाणेंच त्यांची चांगली योग्यता राखून चाललेलें होतें. या लढाईनंतर जिवबादादांची नात—नारायणराव बक्षी यांची मुलगी—निराबाई ही बागणीकर मंत्री यांचे एथें दिली. हें लग्न मोठ्याच थाटाचें—लाखो रुपये खर्च करून—झालें. या वेळीं दक्षिणा घोड्यांवरून पशांनीं वांटली होती. हा लग्नाचा थाट इकडील लोकांस अपूर्व वाटला. ह्याबद्दल अजून पुष्कळ गोष्टी सांगण्यांत येतात. व या संबंधाच्या खर्चवेचाचीं व इतर पुष्कळ पत्रें जिवबादादांच्या दप्तरीं आढळतात.

१. पत्रें नंबर १२१।१३९.
२. पत्रें नंबर १६० ते १७४ पहा.

भाग १४ वा.

पेशवाईच्या अधिकाराची वाटाघाट, जिवबादादांचा मृत्यु, व बाजीरावांची गादीवर स्थापना.

इ० सन १७९५।९६ तील.

नाना फडणवीस यांनीं ब्राह्मण बादशाहीचीं सूत्रें हातांत घेऊन धुराकर्माची उठावणी कोणत्या रीतीनें केली होती, त्यांचें सामान्य धोरण कोणत्या प्रकारचें होतें व एकंदरींत सर्वांवर आपली छाप ठेवावी ह्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेची मर्यादा किती विस्तृत होती, व त्या मानानें त्यांची दूरदृष्टि किती संकुचित होती, याची अटकळ मागील कथानकावरून वाचकांस झालीच असेल. एथवरचा हा भाग त्यांच्या कारकीर्दीचा पूर्वभाग झाला. एकीकडून हरिपंततात्यांसारख्या शहाण्या व शूर सरदारांचें पाठबळ व दुसरीकडून पाटीलबावांसारख्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्यांचा धाक, या दोन गोष्टी त्यांच्या शहाणपणाचा डंका गाजण्यास कारणीभूत झाल्या होत्या. पण, ती जुगल अंतरतांच जेव्हां त्यांच्या स्वतःच्या शहाणपणाचा निःशंकपणें व निर्भयपणें उपयोग होऊं लागला, तेव्हां त्याचा परिणाम पुढें त्यांला स्वतःला व त्यांच्या मागून लौकरच पेशवाईला कसा भोंवला तें वाचकांस क्रमाक्रमानें कळून येईल.

सवाई माधवराव यांच्या सद्दीचा प्रभाव इतका कांहीं अपूर्व होता कीं, सर्व सरदार व संस्थानिक कायावाचामनानें पेशवाईच्या अभ्युदयार्थ झटत होते. चोहोंकडे लढायांत जय, कारस्थानांत इष्ट हेतूची सिद्धि, अशा उत्कर्षाच्या स्थितीचा अनुभव पेशवाईस घडत गेला. प्रत्यक्ष पेशव्यांचें आपल्या यजमानाशीं वर्तन कोणत्या प्रकारचें होतें याचा कित्ता नजरेपुढें असतां, व नानांसारखे सूत्रचालक वाटेल त्यास बगलेंत मारून त्याजकडून दुसऱ्यांचा तेजोभंग करण्याचा प्रयत्न सारखा चालवीत असतां, आपल्या यजमानांचें अनुकरण करण्याची पापबुद्धि कोणालाही झाली नाहीं, हीच वरील मताच्या समर्थनार्थ उत्कृष्ट साक्ष होय. पाटीलबावांसारखे त्या काळीं 'कर्तुमकर्तुं' मानलेले बलिष्ठ सरदार आपल्या यजमानांच्या चरणकमलीं मिलिंदायमान असत, हेंच वरील उत्कर्षाचें खरें बीज होतें. आतां नानांनींही शहाणपणानें व मुत्सद्देगिरीनें कारभार हांकून पेशवाईचें हित केलेलें आहे. परंतु, त्यांच्या लेखणीस वरील सरदारांच्या विजयी तरवारींचें भरपूर साह्य मिळालें, ह्मणूनच तिचा प्रभाव दिसून आला. शिंदे वगैरे सरदारांच्या स्वामिनिष्ठेमुळेंच पेशवाईला व अर्थात् नानांच्या लेखणीला केंद्रस्थान प्राप्त झालें होतें[१]. पुढें नानांच्या कुटिल कारस्थानांचा अतिरेक होऊं लागला, तेव्हां पेशवाईची ही मध्यवर्ती शक्ति केवळ त्यांच्याच गुणानें लय पावली.[२] ह्या हकीकतीस आतां आरंभ करूं.

---

१. "नानांनीं पाटीलबावा **दौलतीचे आज्ञाधारक सरदार** ही कल्पना मनांत वागवून त्यांच्या सर्व पराक्रमाचें यश श्रीमंतांस यावें व त्यांचा वरचष्मा हिंदुस्थानांत होऊं नये, ह्मणून अशी बहादरास पाठवून जो महादजीस शह दिला, तो त्यांच्या वैमनस्यास व पर्यायेंकरून **राज्यनाशास** कारण झाला". ता० २० माहे मार्च सन १९०० च्या केसरींतील लेख.

२. "इतके दिवस नानानें जें जें कार्य केलें, तें तें सिद्धीस गेलें आणि तो आपल्या पराक्रमाची परम सीमा पावला. कां कीं, त्यास दौलत शिंदा (ह्म. ह्या वेळीं जिवबादादा) आदि करून सर्व सरदार लोक वश होते. × × परंतु त्या नानास आपली सर्वत्र आज्ञा कुंठित न झाली पाहिजे, अशी फार आवड होती. × × त्यामुळें शेवटीं त्याचा सर्व पराक्रम नष्ट होऊन त्याच दुःखानें पुढें तो मरण पावला." ग्रांट डफची बखर पृ. ३३७. ह्याचा खुलासा पुढें होईल.

या वेळीं सवाई माधवराव यांचें बालवय संपून तारुण्यदशेस आरंभ होऊन तीन चार वर्षें लोटलीं होतीं. त्यांच्या आंगीं तेजस्विता व गुणग्राहकता, हे गुण बऱ्याच प्रमाणानें वसत होते. व जसजसा त्या गुणांचा विकास होत चालला, तसतसें नानांच्या मनांत संशयरूपी पिशाच्च अधिकाधिक संचरूं लागलें. पाटीलबावांच्या आंगचे लोकोत्तर गुण श्रीमंत फार चाहातात, असें दिसतां क्षणींच नानांनीं काय त्रागा केला होता, तो प्रकार वाचकांस आठवत असेलच. ते अज्ञान स्थितींत होते तोंपर्यंत नाना सांगतील तसें वागणें योग्य होतें. पण, यापुढें राज्यकारभारांतल्या गोष्टी स्वतः पाहाण्याची त्यांच्या मनानें उचल घेतली असतां, ती गोष्ट सिद्धीस जाण्यास मध्यें नानांची आडकाठी येऊं लागली.[1] शिवाय, सवाई माधवराव व बाजीराव यांचा आंतून प्रेमसूचक पत्रव्यवहार चालतो, अशी गुणगुण नानांचे कानावर आली होती. यामुळें तर पुढें पुढें नानांनीं माधवरावांवर विशेष करडी नजर ठेविली. तेजस्वी पुरुषांस दुसऱ्यांचा ताबा असह्य असतो. नानांची दिवसेंदिवस वाढती कैद त्यांस सोसवेनाशी झाली. या वेळीं बाजीरावांनींही त्यांस त्यांची खरी स्थिति कळावी या हेतूनें असें लिहून कळविलें होतें कीं, "तुह्मीं नांवाचे मात्र पेशवे आहां. वस्तुतः तुह्मी व मी समदुःखी आहों. अंतर इतकेंच कीं, मी जुन्नरच्या किल्ल्यांत कैद आहें व तुह्मी शनवारवाड्यांत कैद आहां." या बाजीरावानें लिहिलेल्या स्थितीचा अनुभव उत्तरोत्तर त्यांस जास्तच येऊं लागला. त्यामुळें त्यांचें मन अधिकाधिक दुःखी व उदास होऊं लागलें. नाना आणि महादजी यांमधील भेद या वेळीं त्यांच्या लक्षांत पूर्णपणें आला. त्यांच्या मनोदधीवर अनेक तऱ्हेच्या उद्विग्नतेचे विचारतरंग उद्भवून तो अत्यंत क्षुब्ध होऊन गेला. त्या वेळीं त्यांचें चित्त इतकें भडकून गेलें कीं, शेवटीं त्यांस आपल्या जिवाचाही कंटाळा आला. व कोणत्या तरी उपायानें प्राणत्याग करावा, असें त्यांस वाटूं लागलें. व त्याप्रमाणें त्या लोकप्रिय, तरुण व सुखाभिलाषी, परंतु दुर्दैवी पेशव्यानें शनवार वाड्याच्या तिसऱ्या मजल्यावरून खालीं उडी टाकिली[2].

" श्रीमंतांनीं मरणसमयीं जिवबादादांस सांगितलें कीं इतकें वचन द्यावें कीं, आमचे वंशांतील या गादीवर बसवावा. दुसऱ्या मुलाचा दत्तक करून नाना बसवितील तर बसवूं न द्यावें. याप्रमाणें हातावर हात मारावा. त्यावरून जिवबादादांनीं सांगितलें कीं, ही गोष्ट आह्मांस लागली.

---

१. मागच्या पानावरील २ री टीप पहा.

२. "**नले नानाचे मनास जाहलें विपरित इतरांस ॥ झिडकारुनि एकांतीं वदती नित्य सरकारास। स्वस्थ बसावें आपण जेवुन पंचामृत सुग्रास ॥ बहुत हट्ट जरि कराल तरि तुह्मी मुकाल प्राणांस । त्यांची अवस्था तीच तुमची पुढें येइल आकारास ॥ चाल ॥ शब्दशरें ताडितां लोचनीं जळबिंदु वाहाती । दसऱ्याचे दिशिं अंबारींतुन उडी घालूं पाहती ॥**" प्रभाकर कविकृत सवाई मा. मृत्यूवर पोवाडा, ऑक्वर्थ साहे. पो. पु. पृ. ८१. शिवाय, नानांचे चरित्रकार खरे, महादजींचे चरित्रकार नातू इत्यादि ग्रंथकार नानांच्या काचामुळेंच ही गोष्ट घडून आली, असें स्वच्छ ह्मणत आहेत. परंतु, पेशव्यांचे बखरींत व अनंतफंदीकृत 'माधव' ग्रंथांत नानांवरचा हा दोष उडवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तथापि, देवनाथकृत "**अनंतफंदिनें नानाफडनीसकी अक्कलकी तारिफ किई । क्या है उसकी अक्कल दौलत पेशवेकी डुबा दिई ॥ नमकहरामी करे खावंदसो किने बजाया है डंका । देवनाथ कहे मुजे गरज नहि राज डुबाया बह्मनका ॥ १ ॥**" या दोहऱ्यावरून तो प्रयत्न व्यर्थ होतो. पहा देवनाथकृत पदसंग्रह, पृ. ११९, नि. सा. प्रे. बखरकार व फंदी यांचें मत खरें असतें, तर 'दुसऱ्या मुलाचा दत्तक करून नाना बसवितील तर बसवूं न द्यावें' हें नानाविरुद्ध त्यांनीं कां सांगितलें असतें? यावरून माधवरावांच्या मनःसंतापास नानाच कारण असून, तो दुसऱ्या कोणत्याही कारणानें उत्पन्न झालेला नव्हता, हें उघड होतें.

आज्ञेप्रमाणेंच करूं." याप्रमाणें आपल्या मनांतील हेतु कोणाच्या हातून सिद्धीस जाईल तें लक्षांत आणून, ही महत्त्वाची कामगिरी त्यांनीं जिवबादादांस सांगितली, व त्यांनीं ही श्रीमंतांची इच्छा पूर्ण करण्याचा संकल्प केला. नंतर, श्रीमंत सवाई माधवरावसाहेब आश्विन शुद्ध १५ शके १७१७ सायंकाळीं ह्मणजे ता० २८ आक्टोबर सन १७९५ रोजीं वारले. हें श्रीमंतांचें मरण पुढें अनेक घोटाळे उत्पन्न होण्यास कारण झालें, व या गोष्टीच्या पायीं शेवटीं पेशवाई बुडाली.

ही सर्व हकीकत बाजीराव साहेब जुन्नरच्या किल्ल्यांत कैद असतां तेथें त्यांस समजली. तेणें-करून त्यांस अत्यानंद झाला. आणि आतां आपला इष्ट हेतु साधण्याचा योग जवळ आला, असें समजून त्यांनीं त्याबद्दलच्या खटपटीस जारीनें सुरुवात केली.

इकडे नाना फडणविसांना पेशवेपद बाजीरावास देणें इष्ट वाटत नव्हतें. एक तर नारायणरावास मारविणाऱ्या राघोबादादाचा तो पुत्र, शिवाय त्यास कैदेंत टाकून शेवटीं शेवटीं आपण त्यास पुष्कळ पीडा दिलेली आहे, तेव्हां तो गादीवर आल्यास आपले तसेच हाल करील, ही त्यांस जबरदस्त भीति होती. ह्मणून, बाजीरावास गादीवर बसवावयाचें नाहीं, असा त्यांचा कृतनिश्चय होता. तेव्हां, यशोदाबाईस दत्तक देऊन गादी चालवावी या मसलतीसाठीं सर्व सरदारलोकांस पुण्यास बोलाविलें.

नाना आपणास गादीवर न बसवितां यशोदाबाईस कोणी तरी दत्तक देऊन पूर्ववत् संपूर्ण सूत्रें आपल्या हातांत वागवून गादी चालविणार आहेत, हें वर्तमान बाजीरावांस लागतांच त्यांनीं ताबड-तोब दौलतराव शिंद्यांस आपल्यास भेटण्यासाठीं बोलाविलें. त्या संबंधानें नारायणराव बक्षी लिहि-तातः—"श्रीमंत पंतप्रधान यांणीं श्रीमंत राजश्री दौलतराव बाबांस बोलावून नेऊन बहुत खातर-जमा केली. + +तीर्थरूपांस पत्रें लिहिलीं आहेत. त्यांचीं उत्तरें याच पक्षांत येतील. तीं आलेवर सविस्तर उलगडून लिहून पाठवीन". मग त्याप्रमाणें जिवबादादांस जलदीचीं बोलावणीं गेल्यावर ते येऊन बाजीरावसाहेबांस भेटले. परस्पर बोलणीं चालणीं होऊन तुमच्या संबंधानें आपण होईल ती खटपट करितों ह्मणून सांगून त्यांनीं त्यांचा निरोप घेतला.

पुढें नानांनीं निमंत्रण पाठविल्याप्रमाणें शिंदे, होळकर, भोंसले इत्यादि सरदार व महादाजी-पंत गुरुजी व इतर थोर थोर आश्रित मंडळी यांच्या व नानांच्या भेटी झाल्या. नानांनीं दरबार भरवून सर्वांस निमंत्रण पाठविण्याचें कारण विदित केलें. ते ह्मणाले "श्रीमंत रावसाहेब कैलासवासी झाले. पुढें गादी चालली पाहिजे. त्याबद्दलची आतां तुमच्या विचारानें काय ती व्यवस्था ठरवाव-याची आहे. श्रीमंत कै० वा० नारायणराव साहेब यांचा वध रघुनाथराव दादासाहेबांनीं करविला. या महा दुष्कृत्यानें त्यांनीं आपला व आपल्या वंशजांचा गादीवरील हक्क नाहींसा करून घेतला आहे. सध्या बाजीराव साहेब व चिमाजीआप्पा हे त्यांचे पुत्र जुन्नरास असून त्यांनीं श्रीमंत रावसाहेबांशीं कसें वर्तन ठेविलें होतें, तें तुह्मांस ठाऊक आहेच. तेव्हां अशांस गादीवर बसवून पुनः राज्यांत बखेडे माजवावे, हें मला सुरक्षितपणाचें व विचाराचें दिसत नाहीं. या प्रसंगीं यशोदाबाई साहेबांस दत्तक देऊन गादी चालवावी, हा विचार मला अधिक प्रशस्त दिसतो. आतां यावर तुमचें मत काय आहे, तें समजलें पाहिजे." कांहीं वेळ कोणी बोलेनात. तेव्हां नानांनीं "महादाजीपंत गुरुजी प्रौढ त्यांस विचारिलें. त्यांनीं दुसरी गोष्ट करितां सिद्धीस जाणार नाहीं. बाजीराव आहेत ते बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ ह्यांचाच वंश, ते स्थापावे (असें)

---

१. वि. वि. पु. ११, पृ. ८९, व ग्रांट डफची बखर पृ. ३४१. २. पत्र नंबर १३६.

सांगितलें. परंतु फडणीस यांचा (दत्तकाविषयीं) आग्रह फार[1]," हें सर्व जाणून होते. होळकर अगोदरपासून पुण्यांत होतेच. त्यांचें मन नानांनीं पूर्वी वळविलें होतें. भोंसल्यांनींही नानांच्या आग्रहावरून दत्तकास संमति दिली. मग दौलतरावांस विचारिलें. त्यांनीं तो प्रसंग जाणून त्याप्रमाणेंच रुकार दिला. मग, नानांनीं त्याप्रमाणें अनुकूलपत्र लिहून घेतलें. परंतु, बाळोबातात्या मात्र दत्तक घेण्यासंबंधानें प्रतिकूल बोलले[2]. अशाप्रकारें कांहीं अनुकूल व कांहीं प्रतिकूल मतें पडल्यामुळें, ही गोष्ट तशीच अनिर्णीत राहिली. जिवबादादा त्या प्रसंगीं तेथें नव्हते. पण पुढें ते आल्यावर नानांच्या विचारण्यावरून त्यांनीं सांगितलें कीं, "आपला धनी शिंदा तो तरुण आहे. यास्तव त्याचें सांगणें उपयोगी नाहीं. वरकड जे भोंसले वगैरे पुरातन मोठमोठे सरदार आहेत, ते सांगतील तें योग्य[3]." तरी शेवटीं "बाळोबा पागनीस व जिवबादादा यांचें बोलणें पडलें कीं दत्तक न करितां दादासाहेबांचे पुत्र जुन्नरीं आहेत त्यांतील एक आणावा. नंतर बाळोबा व जिवबादादा निघोन जांबगांवास गेले[4]." हें ह्या दोघां मुत्सद्यांचें मत दौलतरावांसही पसंत पडून 'प्रत्यक्ष वंशज असतां गोत्रजाचा मूल बसविला तरी त्यास आह्मी मुजरा करणार नाहीं,' असें निश्चयानें ठरवून तेही हिंदुस्थानांत जाण्यासाठीं जामगांवास गेले. दत्तक देऊन गादी चालवावी असा जरी नानांचा आग्रह होता, तरी बाकी लोकांचीं मतें भिन्न होतीं. हें पुढील पत्रावरून दिसून येईल. "पुणेकडील वर्तमान आपणास पेशजीं लिहिलें गेलेंच आहे. अद्याप एकही निश्चय झाला नाहीं. नकार[5] यांची मर्जी फार करून दत्तक घेऊन चालवावें असें आहे. वरकड सर्वांची मर्जी त्या सलेंत नाहीं. याउपर कसें काय होतें तें पहावें. त्याणीं आपलेकडील कारभारी मानीत नाहीं, ह्मणोन ऑकारास[6] उभा करावा येविशीं त्यांची सल्ला आहे. मित्रें[7] व वडील[8] व धनी[9] एकचित्तें आहेत. तेव्हां कांहीं घडणार नाहीं[10]." याप्रमाणें बहुतेकांची संमति नसली, तरी पूर्वींचेंच संमतिपत्र खरें धरून नाना दत्तकाचा शोध करूं लागले.

यानंतर थोड्याच दिवसांनीं जिवबादादांस एकाएकीं मोठा ज्वर येऊं लागला आणि त्यांत वायूचाही प्रकोप झाला. ह्मणून मोठमोठे वैद्य आणून उपचार करविले. परंतु, गुण दिसेना. जिवबादादांस फार बरें नाहीं, हें कळतांच हजारो लोक त्यांच्या समाचारास येऊं लागले. सर्व प्रकारचे उपाय झाले. शेवटीं वायूचा विकार हटून ते शुद्धीनें बोलूं लागले. परंतु ताप हटेना, व ते अगदीं थकत चालले. त्यामुळें दौलतरावमहाराजांपासून तो साधारण शिपायापर्यंत सर्वांस त्यांची फार

१. श्री. छत्रपति धाकटे रामराजे व शाहू यांचीं चरित्रें पृ. ६४.

२।३. ग्रांट डफची बखर पृ. ३४२.

४. पंतप्रधानाची शकावली पृ. ३८.

५. नाना फडणीस.

६. अमृतराव तर नसेल ना ?

७. नागपुरकर भोंसले.

८. जिवबादादा.

९. दौलतराव शिंदे.

१०. पत्र नंबर १९१, व दुसरें ' पेशव्यांचे दरबारीं शिंद्यांचें विलक्षण वजन असून दौलतराव शिंद्यांचे सेनापति जिवबादादा बक्षी आणि त्यांचे दिवाणबाळोबा तात्या ह्यांस मुत्सद्दीमंडळ वरेंच वचकत असे.' पहा परशु. भा. पटवर्धन यांचें चरित्र पृ. १५८.

काळजी लागून राहिली. त्यांजवर सर्वांची अत्यंत प्रीति असल्यामुळें, ते आतां जगत नाहींत असें पाहून, त्यांना फार दुःख झालें. मग नारायणरावांसारख्यांस तें होईल ह्यांत कांहीं विशेष नाहीं. शेवटीं, आतां आपण ह्यांतून पार पडत नाहीं, असें जाणून त्यांनीं दौलतरावांस आपलेजवळ पलंगावर बसवून घेऊन ह्मटलें[1] "दत्तक देऊन पेशवाई चालवावी ह्मणून नांवास उगाच जें संमतिपत्र नानांनीं करून घेतलें, तेंच खरें धरून आह्मी दत्तकास अनुकूल आहों असें समजून ते दत्तकाच्या खटपटींत आहेत. परंतु, मनापासून या गोष्टीस बहुमत अनुकूल नाहीं. व माझा शब्द सवाई माधवरावांकडे गुंतला आहे हें लक्षांत ठेवून, तुह्मी बाजीरावास गादीवर बसविण्याची तजवीज ठेवा." दौलतरावांनीं ती गोष्ट मान्य केली. परंतु, जिवबादादांची ती आसन्नमरणस्थिति पाहून त्यांच्या डोळ्यांतून पाणी आलें. त्यांनीं आपणाविषयीं जी काळजी घेतली होती, व आपल्यावर जी अत्यंत प्रीति ठेविली होती, त्याचप्रमाणें शिंदेशाहीच्या उत्कर्षासाठीं त्यांनीं निस्सीम भक्तीनें जे आमरण कष्ट सोशिले होते, ते सर्व आठवून यांचा आतां लौकरच वियोग होणार, असें मनांत येऊन त्यांस फार वाईट वाटलें. शिवाय, पाटीलबावांसारखे खंबीरपणानें राज्य हाकणारे पुरुष गेल्यावर जिचा विस्तार मोठा व जिचा सर्वांशीं संबंध, ती शिंदेशाही ज्याच्या जिवावर निर्धास्त चालली होती, त्या थोर पुरुषाच्या पश्चात् 'नसतां धुरंधर वृषभ बालवृष भरेंकरूनि आ वांके' अशा स्थितीला पोंचणार व आपलीही स्थिति तशीच होणार, असें मनांत येऊन ते अगदीं सचिंत झाले. तें जाणून जिवबादादांनीं त्यांस ह्मटलें, 'बाबासाहेब ! मृत्युलोकची वस्ती अशाश्वत आहे. तेथें कोणाचा इलाज नाहीं. आजवर मीं तुह्मांस जें सांगायाचें, तें सर्व सांगितलें आहे. त्याहून विशेष काय सांगावयाचें ? परंतु, तुह्मी पाटीलबावांप्रमाणें वागून जगांत कीर्ति मिळवा. सत्कीर्तीकरितांच आपल्यास वांचावयाचें आहे, ही गोष्ट चांगली मनांत बाळगा. तात्या आहेत; नारायण आहे; हे तुमची सेवा एकनिष्ठेनें बजावितील. तुमचें वय अद्याप लहान असून तुह्मास या रयाशतींतील बिकट प्रकरणांचा चांगलासा अनुभव नाहीं. तेव्हां, हे व अशाच प्रतीचे गादीचें खरें कल्याण इच्छिणारे, यांच्या सल्यानें वागत जा. आतां विशेष काय सांगूं?' याप्रमाणें बोलणें झाल्यावर दौलतराव कष्टी होऊन आपले गोटांत गेले. नंतर, दादांनीं बाळोबातात्या व नारायणराव यांस जवळ बोलावून सांगितलें, 'आजवर शिंदेसरकारची चाकरी एकनिष्ठपणें व जिवाची परवा न करितां बजाविली. सरकारचे दौलतीचे कल्याणाखेरीज दुसरा विचार चित्तांत वागविला नाहीं. आणि शेवटीं सरकारचाकरींतच देह ठेवीत आहें. राज्यकारभारांतील गोष्टी फार बिकट व मसलतीच्या असतात. त्या तात्यांस माहीतच आहेत. दिवसेंदिवस हा कार्यभाग आणखी बिकट होत जाणार, अशीं चिन्हें दिसताहेत. अशा प्रसंगीं धैर्य खचूं देऊं नका. यजमानसाहेब, एथील सरदार लोक व इतर राजेरजवाडे, या सर्वांशीं मोठ्या शहाणपणानें वागलें पाहिजे. कोणास उगाच दुखवायाचें तर नाहीं आणि कोणाच्या कपटाच्या जाळ्यांत सांपडायाचेंही नाहीं. हें काम मोठ्या अकलेचें आहे. तेव्हां तुह्मी जेणेंकरून आजपर्यंतचा लौकिक पुढें चालेल, अशाप्रकारें धन्याठायीं एकनिष्ठा ठेवून व हरएक बाबतींत नेहमीं सावधगिरी बाळगून वागा. जें धन्यास हितकारक, भल्यांस पसंत व देवास रुजू, तें केलें पाहिजे. अशाप्रकारें वागून तुह्मी कीर्ति मिळवाल, अशी माझी खातरी आहे. आणखी काय सांगावें ? सर्वांनीं एकविचारें व भलेपणानें वागावें, ह्मणजे देव भलें करील. आतां माझ्यानें विशेष बोलवत नाहीं आणि मला आतां बोलण्याचा आग्रह करूं नका.' असें ह्मणून त्यांनीं श्रीमत्सोहिरोबानाथांच्या उपदेशा-

१. ग्रांट डफची व. पृ. ३४२।४३.

प्रमाणें सर्व लक्ष इहलोकच्या पसाऱ्यावरून काढून केवळ एकाग्रतेनें परमेशचिंतनांत घातलें. शक्तिपात मात्र झाला होता. शुद्धि चांगली होती आणि सोशिकपणा विलक्षण होता. त्यामुळें कण्हत न पडतां त्यांतल्यात्यांत निश्चल राहून शांतचित्तानें पारमार्थिक नामस्मरणादि व्यवसाय त्यांनीं अखंड चालविले. दुखणें इतकें होतें तरी ते स्नान करून शुचिर्भूत झाले होते. विधियुक्त भस्म चर्चून गळ्यांत रम्य रुद्राक्षमाला व हातांत स्मरणी, हीं त्यांनीं धारण केलीं होतीं. व नेत्र मिटून ते ध्याननिमग्न झालेले दिसत.

नारायणरावांस तर पित्याच्या या मरणोन्मुख स्थितीमुळें पराकाष्ठेचें दुःख झालें होतें. तरी त्यांचा अखेर परिणाम चांगल्या रीतीचा व्हावा, ह्मणून आपली शोकविव्हलता दूर लोटून त्यांनीं त्या वेळची तयारी उत्तम राखिली होती. चोहोंकडे सुवासिक पुष्पांच्या माळा टांगिल्या. उदबत्या, अगरबत्या, अबीर, बुका, कापूर, चंदन यांचा घमघमाट चाललेला होता. सभोंवार ब्राह्मण बसवून गीता, विष्णुसहस्रनाम, शिवकवच, इत्यादिकांचे पाठ चालविले होते. कांहीं मंडळीचें मंजुळ रवानें भजन चाललें होतें. दादा मधून मधून रा-म रा-म असें निद्रेंतून जागे झाल्याप्रमाणें होऊन ह्मणत होते. त्यांच्या समाचारासाठीं हजारो लोकांची दाटी झालेली असून, त्यांना पराकाष्ठेचें दुःख झाल्याचें त्यांच्या चेहेऱ्यांवरून दिसत होतें. परंतु, त्या ठिकाणीं समाधानाची गोष्ट एवढीच होती कीं, दुखणेकऱ्याचें कण्हणें किंवा वळवळ व औषधें देण्याची धांवपळ, हें कांहीं नसून चोहोंकडे शांत चित्तानें धार्मिक कृत्यें चाललेलीं असल्यानें तो देखावा तितका दुःखद वाटला नाहीं. अशा स्थितींत एक प्रहर गेला. ती शके १७१८ ची मार्गशीर्ष वद्य द्वादशी असून वार बुधवार होता. दिवस दोन प्रहर आला होता. त्या वेळीं अत्यंत ग्लानि येऊन हालचाल बंद पडली. महाराज दौलतराव शिंदे जवळच होते. इतक्यांत रा-म असा अस्पष्ट उच्चार होऊन जिवबादादांचें प्राणोत्क्रमण झालें. ही गोष्ट तारीख ६ जान्युआरी सन १७९६ रोजीं जांबगांवीं घडली.

पितृनिधनापासून नारायणरावांस दुःख झालें, ही गोष्ट तर साहजिकच होती. परंतु, तेथील जनसमूहास तसेंच अनिवार दुःख झालें. ह्या गोष्टीस तशींच ठळक कारणें होतीं. त्या कालीं शिंद्यांचे रयाशतींत त्यांजसारखा थोर, कर्ता व धड्याचा मनुष्य दुसरा कोणी नव्हता. सर्व राज्यशकट त्यांच्याच शहाणपणावर व जोरावर बिनबोभाट व समाधानकारक चालला होता. तेणेंकरून सर्व प्रतींचे लोक त्यांजवर अंतःकरणपूर्वक लोभ ठेवीत. शिपाई लोकांस तर ते पोटच्या पोरांप्रमाणें वागवीत. त्यामुळें सर्वस्व नागवल्याप्रमाणें ते दुःखी झाले.

मग बाळोबातात्यांनीं व दौलतरावमहाराजांनीं सर्व तयारी करवून त्यांच्या उत्तरविधीचें काम मोठ्या सन्मानानें पार पाडिलें. त्यांच्या स्मशानयात्रेस बरेंच लष्कर व सर्व लहानमोठे सरदार व मानकरी गेले. मग नारायणरावांकडून सर्व कामें शास्त्रोक्त रीतीनें उरकल्यावर मंडळी मोठ्या कष्टानें माघारें परतली.

जिवबादादा जिवंत होते तेथपर्यंत केवळ शिंद्यांच्या राशिदीचेंच कल्याण झालें होतें असें नाहीं. तर पेशवेसरकार, दिल्लीपति व रजपूत राजे इत्यादिकांचेंही त्यांजपासून पुष्कळ हित झालें होतें. त्यांच्या पराक्रमाचा व वजनाचा उपयोग त्या सर्वांस निरनिराळ्या प्रकारें झालेला होता. रजपूत राजां-

---

१. काव्ये. सं. तील पंतप्रधानाची शकावलि पृ. ३८ व भारतवर्षांतील द. शकावलि.

बरोबर जरी त्यांच्या अनेक लढाया झालेल्या होत्या, तरी ते दादांची योग्यता पुरती ओळखून होते. ते त्यांच्याशीं चांगला स्नेह ठेवीत असत. " शिंद्यांच्या दौलतींतील अत्युत्कृष्ट मनुष्य जिउबा (दादा) बक्षी मरण पावले," ही गोष्ट या सर्वांस निरनिराळ्या कारणांनीं चटका लावून सोडणारी होती.

निर्मळ अंतःकरण, पवित्र वर्तन, साधी रहाणी, गोड स्वभाव, विलक्षण श्रमशीलता, लोकोत्तर शौर्य, गंभीर व आटोकाट राजकीय धोरण, स्पृहणीय स्वराजनिष्ठा आणि समाधानकारक धर्मशीलता, या उत्कृष्ट गुणांचा जिवबादादा हे एक पुतळा होते, असें एथवर वर्णिलेल्या त्यांच्या आयुःक्रमावरून कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. अगदीं विपत्कालापासून तों शिंदेशाहींतील शिंदे शिवाय करून मुख्याधिकाराच्या सर्व पायऱ्या ते क्रमानें चढत गेले. पण, कोणत्याही स्थितींत त्यांजकडून अन्यथा वर्तन घडलें नाहीं. आपण कोणी मोठे मनुष्य आहों व बाकी सारे क्षुद्र आहेत, अशी दिमाखाची बुद्धि त्यांच्या अंतःकरणास कधींच शिवली नाहीं. यःकश्चित् शिपायापासून तों अलिजाबहादरांपर्यंत सर्वांस ते प्रिय होते. विश्रांति किंवा तन्मूलक प्रापंचिक सुख त्यांना ह्मणण्यासारखें आमरण मिळालें नाहीं. तरी ते सदा संतुष्ट होते. स्वामिकार्यापुढें त्यांना स्वसुखाची परवा नव्हती. त्यांची कारकीर्द अनेक लढायांनीं व लढ्यांनीं व्यापिलेली होती. त्यापुढें त्यांना सबंध तीस चाळीस वर्षांच्या कारकीर्दींत वेळांत वेळ काढून घरीं येण्यास अवकाश मिळाला नाहीं ! ते जसे मोठे पराक्रमी होते, तसेच उत्कृष्ट मुत्सद्दीही होते. त्यांचें आचरण अत्यंत नेमस्त व शुद्ध होतें. त्यांच्या शालाशुद्ध शिक्षणानें जी मंडळी लौकिकास चढली, तींत कोणी गैर मनुष्य निपजला नाहीं. दुर्गुण, दुराचरण व अप्रशस्त मार्ग यांसंबंधानें त्यांची करडी नजर असे. त्यामुळें तशा प्रकारची आवड बाळगणाऱ्या मंडळीस त्यांजकडून कधीं थारा मिळाला नाहीं. त्यांच्या कारकीर्दींत त्यांच्या आश्रयानें वाढलेल्या शेंकडो लोकांस सर्वांत मोठा लाभ झाला तो हाच होय. महादजींसारख्या कुशल राज्यकर्त्यांस व मोठमोठ्या रजपूत राजेरजवाड्यांस व दिल्लीपतीस त्यांची सल्ला व कोटिक्रम, हीं फार पसंत पडत. गोड, सरळ, मित व भारदस्त अशा भाषणानें त्यांची सर्वांवर छाप पडत असे. त्यांच्या ह्या उत्तम गुणांमुळें त्यांची कीर्ति सर्वत्र पसरलेली होतीच. शिवाय, थोर लोकांविषयीं सन्मानबुद्धि, अनाथांविषयीं दया, धार्मिक कामांत मोठी हौस व परमेश्वरीं प्रेमळ भाव या गुणांनींही ते मंडित होते. ह्यावरून पंडितांनीं,

"विपत्कालीं धैर्य प्रभुपणिं सहिष्णुत्व बरवें
सभे पांडित्याचा प्रसर समरीं शौर्य मिरवे ।
स्वकीर्तीच्या ठायीं प्रचुर रति विद्याव्यसन जे
तयांचे हे स्वाभाविक गुण सदा सत्पुरुष जे ॥"

ह्या श्लोकांत वर्णिलेल्या थोर पुरुषांचे स्वाभाविक सद्गुण बऱ्याच मानानें त्यांच्या आंगीं वसत होते, हें उघड होतें. अशाप्रकारचे पुरुष खरोखर देशाला भूषणभूत होत.

जिवबादादांचें चरित्र एथें समाप्त झालें.

१. पहा सोबतचा पत्रव्यवहार.
२. खरेकृत नाना फडणीसांचें च. पृ. १८७.

ज़िवबादादांच्या पश्चात् त्यांचे बंधु जगोबा बापू, शिवबा नाना, बाळाजी-राम व मुलगे नारायणराव व यशवंतराव भाऊ, तसेच शूरवीर लखबादादा लाड इत्यादि त्यांच्या तर्फेच्या मंडळीनें मोठमोठीं कामें बजाविलीं आहेत, ह्मणून ती सविस्तर हकीकत पुढें दिली आहे.

जिवबादादा वारल्याची हकीकत हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं जगोबा बापू, यशवंतराव भाऊ वगैरे होते, त्यांस ताबडतोब कळविली. तशीच कोकणांत घरीं नरोबा दादांसही ही दुःखद बातमी कळविली. तेणेंकरून सर्व मंडळी अत्यंत दुःखित झाली. केरकरांच्या घराण्यांतील मोठा लौकिकवान् कर्ता पुरुष व सर्वांचा आधारस्तंभ गेल्यामुळें ते सर्व निस्तेज झाले. ज्याच्या जिवावर आज-पर्यंत सुखानें व मोठ्या लौकिकानें दिवस घालविले, तो गेल्यावर ती मंडळी खचली. शिवाय, भावी स्थितीची अटकळही विशेष समाधानकारक न वाटल्यामुळें, त्यांच्या दुःखांत भर पडली. पुढें, जिवबादादांच्या मरणासंबंधानें दौलतरावांनीं नरोबा दादांस (जिवबादादांच्या वडील बंधूस) पुढील पत्र लिहिलें.

श्री.　　　　ता० २२ जानेवारी सन १७९६.

राजश्री नरहर गणेश गोसांवी यांस

छ० अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित दौलतराव शिंदे राम राम सु॥ सित तिसेन मया आलफ. जिवाजी बल्लाळ यांचे शरीरीं ज्वरांश जाहला. यांत वायूचा प्रकोप होऊन बहुतच बा अदाम एकाएकीं जाहल्यामुळें देविक मानवी उपाय व्हावयाचे ते बहुत जाहले. परंतु एकहि गुणावह न होतां मार्गशीर्ष वद्य द्वादशी बुधवारीं दोन प्रहरां काळ जाहला. ईश्वरें गोष्ट मोठी अनुचित केली. होणारास उपाय काय आहे ? ईश्वर इच्छा प्रमाण. तुह्मी कोणेविसीं खेद न करितां चित्तास विवेक करून शांतवन करावें. येथें राजश्री नारायणराव जिवाजी आहेत. कामकाज पूर्ववत्-प्रमाणें चालेल. चिंता नाहीं जाणिजे. छ. ११ माहे रज्जब

(ज्योतिस्वरूपचरणीं तत्पर महादजीसुत दौलत-राव शिंदे निरंतर.)　　बहुत काय लिहिणें हे विनंति.　　(मोर्तब.)

याप्रमाणें, महाराज दौलतराव शिंदे यांनीं दुखवट्याचें पत्र पाठवून पुढें पूर्ववत् चालविण्याचें वचन देऊन जिवबादादांच्या कुटुंबांतील मनुष्यांचें शांतवन केलें, व त्याप्रमाणें सर्व यथास्थित चालविण्याचा क्रमही सुरू केला. ह्या सर्व गोष्टी व्हावयाच्या तशा होऊन शिंद्यांकडील कामकाजें

१. या पुण्यवान् पुरुषाच्या पश्चात् लौकरच त्यांचे दोघे बंधु, पुढें वडील पुत्र व आणखी घरांतील मंडळी मिळून सहा मनुष्यें त्या वर्षांत मरण पावलीं, व ज्यांचा पुढें वृत्तांत दिला आहे, अशा बऱ्याच आपदा भोगाव्या लागल्या. ह्यावरून थोर पुरुषांचें मरण अनेक विपत्तींस कारण होतें, असें ह्मणावें लागतें.

२. ता. ६ जानेवारी सन १७९६.

चालत आल्या वहिवाटीप्रमाणें व्यवस्थितपणें चालूं लागली. ही त्या गतप्रसंगाच्या दुःखांत संतोषाची गोष्ट होय.

जिवबादादांनीं प्राणोत्क्रमणापूर्वी आपल्यास पेशवाईच्या गादीवर बसविण्याविषयीं दौलतरावांस सांगितल्याचें बाजीरावास समजतांच त्यास अत्यानंद झाला. बाळोबा तात्यांचा कल पूर्वींपासून आपल्याकडे आहे व शिंदा आतां आपल्यास पूर्णपणें अनुकूल होईल व त्यामुळें आतां आपला कार्यभाग सहज सिद्धीस जाईल, अशी त्यास खातरी वाटूं लागली. मग त्यानें शिंद्यांस बाळोबा तात्यांसह लौकर येऊन भेटण्यासाठीं आग्रहाचा निरोप पाठविला. त्याप्रमाणें ते तिकडे निघून गेले. तेथें त्यांचीं बोलणींचालणीं होऊन शेवटीं ठरलें कीं, शिंद्यानें बाजीरावास गादीवर बसविल्यास बाजीरावानें शिंद्यास चार लक्षांचा मुलूख व सैन्यास येईल तो खर्च द्यावा.

ही बातमी लागलीच नानांस समजली. तेव्हां ते फार गडबडून गेले. आणि परशुरामभाऊ पटवर्धन तासगांवीं होते त्यांस तेथून त्यांनीं ताबडतोब आपलेपाशीं बोलाविलें. निरोपाप्रमाणें परशुरामभाऊ आपल्या जवळील स्वार घेऊन तासगांवाहून दोन दिवसांत पुण्यांत दाखल झाले. त्यांच्या विचारें नानांनीं ठरविलें कीं, शिंद्यानें ज्या अर्थी बाजीरावास गादीवर बसविण्याचा ठराव केला आहे, त्या अर्थी आपला दत्तकाचा मतलब आतां सिद्धीस जात नाहीं. आणि शेवटीं शिंद्याचे मदतीनें जर बाजीरावच गादीवर बसणार, तर तें यश शिंद्यास किंवा बाळोबास काय म्हणून द्यावें? आपणच शिंद्याचे मदतीवांचून बाजीरावास गादीवर बसविल्यास तो आपला उपकारी राहून आपल्याविरुद्ध कधीं जाणार नाहीं. मग अर्थातच शिंदे व त्यांचे दिवाण बाळोबा तात्या हताश होऊन राहतील. अशी मसलत योजून त्यांनीं बाजीरावास आणण्यासाठीं परशुरामभाऊंस जुन्नरीं पाठविलें. त्यांनीं तेथें जाऊन बाजीरावास नानांचा अभिप्राय कळविला. परंतु बाजीराव, नानांचीं कारस्थानें ओळखणारा होता. त्यास विश्वास पटेना. म्हणून, परशुरामभाऊंनीं त्यांस नानासंबंधानें पुष्कळ खातरी सांगितली. तेव्हां, पेशवाई मिळविण्याविषयीं हपापलेला बाजीराव परशुरामभाऊंच्या हमीस वळला. परंतु, त्यास अमृतरावानें एकांतीं मसलत दिली कीं, शिंद्यानें एवढ्या पल्ल्यापर्यंत मजल आणिली, म्हणूनच नानांनीं निरुपायास्तव आतां हें बोलावणें पाठविलें. तेव्हां, शिंद्यास बाजूस ठेवून ही गोष्ट नानांच्या हातून करविण्यापेक्षां शिंद्याकडूनच करविणें बरें. उगाच ह्या बाबतींत अशी घाई करूं नका. तेव्हां, बाजीरावाचें मन द्विधा होऊं लागलें. हें जाणून परशुरामभाऊंनीं बाजीरावान्ना नानांविषयींचा संशय साफ जावा, म्हणून हातांत गाईचें शेंपूट घेऊन शपथ वाहिली. तेव्हां, बाजीरावाचा सर्व संशय दूर झाला. आणि तो चिमाजी आपांसह परशुरामभाऊंच्या स्वाधीन झाला. मग, परशुरामभाऊ त्यांसहवर्तमान पुण्यास येण्यास निघाले. तरी थोडा संशय होताच, म्हणून पुढें थेऊर मुक्कामीं गणपतीवरच्या दूर्वा काढून परशुरामभाऊंनीं बाजीरावाच्या हातीं दिल्या, आणि त्यांची पुनः खातरी केली. नंतर, कळशी एथें नाना फडणीस हे त्यास भेटायास गेले. "या भेटींत असें ठरलें कीं दोघांनींही पूर्वींचे द्वेष विसरून जाऊन यापुढें एकमतानें वागत असावें. याप्रमाणें परस्परांनीं लेखी लिहून दिलें." अशा तऱ्हेनें आणभाक करारमदार होऊन नानांनीं बाजीरावास गादीवर बसविण्याचें ठरविलें.

१. ग्रांट डफची बखर पृ. ३४३.
२. नाना फ. च. पृ. १८९.

इकडे बाळोबा तात्यांस नानांच्या ह्या कारस्थानाची बातमी समजली. तेव्हां, त्यांस त्याबद्दल राग आला. कारण, पेशव्यांच्या औरस संततीच्या नात्यानें व सवाई माधवरावांच्या शेवटच्या सांगण्यानें बाजीरावाचाच गादीवर हक्क पोहोंचतो, ह्मणून बाजीरावास गादीवर बसविणेंच इष्ट आहे, असा आह्मीं अभिप्राय दिला, व या गोष्टीस अनुकूल अशीं बऱ्याच लोकांचीं मतें पडलीं, असें असतां नाना दत्तकाचा विचार करूं लागले, ह्मणून आह्मीं बाजीरावासच गादीवर बसविण्याचें ठरविलें. तो विचार नानांस पसंत असल्यास मग सर्वांच्याच मतानें बाजीरावास गादीवर बसवावा, ही रीतीची व शोभेची गोष्ट होती. पण, नानांस सर्व गोष्टी आपल्याच तंत्रानें घडवून आणावयाच्या आहेत. ह्मणून, आह्मांस न कळवितां ही महत्त्वाची गोष्ट ते मुद्दाम स्वतः शेवटास नेत आहेत. तेव्हां, अशा कामीं दुसऱ्यांच्या सह्याची किंवा मदतीची जरूर आहे, ही गोष्ट नानांस अलबत समजावली पाहिजे, असें मनांत आणून गोदातीरीं शिंद्याचे लष्कराचा तळ पडला होता तिकडे जाऊन ते दौलतरावांस भेटले. आणि त्यांस ही सर्व हकीकत सांगितली. तेव्हां, त्यांच्याही मनांत भरलें कीं, नाना आमच्या द्वेषबुद्धीमुळें जी गोष्ट स्वतः करीत आहेत, ती सिद्धीस जाऊं देऊं नये. मग, हिंदुस्थानांत जाण्याचें रहित केलें आणि "लष्कर गंगेपावेतों गेलें होतें, तेथून माघारें आलें. कारण श्रीमंत राजश्री सवाई बाजीराव व बंधु असे राजश्री नाना फडणीस यांणीं पुणेस आणले याकरितां माघारें आले. × × × लष्कर बाकी सर्डे होऊन कंपू व तोफखाना बऱ्हाणपुरास होता तोही बरोबर आणला. लष्कर येथें मुकाममजकुरीं (पुण्यांत) येतांच राजश्री नाना फडणीस व आबा चिटणीस लष्करची धास्त घेऊन पुण्याहून पळून गेले. श्रीमंत राजश्री बाजीराव यांणीं फार नानांची खातरजमा केली कीं, तूं कोणे गोष्टीविशीं काळजी न करावी. असें कितीएक सांगितलें. परंतु त्यास विश्वास पुरला नाहीं. आण लष्करची धास्ती घेऊन पळून गेला. श्रीमंत पुण्यास आहेत व श्रीमंतांच्या (बाजीराव-साहेबांच्या) व श्रीमंत राजश्री बाबासाहेबांच्या (दौलतरावांच्या) भेटी फाल्गुन वद्य २ स जाहाल्या. येथून श्रीमंत सुद्धां उद्यां अगर परवां सतारेस (साताऱ्यास) जाणार असें आहेत. आण चैत्र शुद्ध ५ स वस्त्रें होणार. आणि मग गादीवर बसणार असें आहे."[1] ह्याप्रमाणें नाना शिंद्यांच्या भीतीनें पुण्यांतून निघून मोठ्या जलदीनें वांईवरून साताऱ्यास गेले. तसें न करण्याविषयीं त्यांना बाजीरावानें व परशुरामभाऊंनीं पुष्कळ सांगितलें. परंतु, धैर्य न झाल्यामुळें त्यांनीं पुढील रस्ता सुधारलाच.

नंतर, बाळोबा तात्यांनीं मसलत योजिली कीं, आपण बाळाजी विश्वनाथाच्या वंशाचा अभिमान धरून बाजीरावास गादीवर बसविण्याची एवढी कळकळीची तजवीज केली असून, ज्या पक्षीं बाजीराव तें सर्व विसरून आमचा मुद्दाम द्वेष करणाऱ्या नानांच्या गुप्त मसलतीस साह्य झाला व आह्मांस नुसतें कळविलेंही नाहीं, त्या पक्षीं अशा निष्कारण कृतघ्नपणा करणाऱ्यास गादीवर बसविण्यापेक्षां चिमाजी आपासच गादीवर बसवून, कारभारी दुसरा करावा. पेशव्यांच्या औरस संततीचा अभिमान धरावयाचा जो आमचा निश्चय, तो चिमाजी आप्पास गादीवर बसविल्यानें-ही सुटत नाहींच. असा विचार करून चिमाजी आपा पेशवा व परशुरामभाऊ कारभारी करण्याचें योजिलें. परशुरामभाऊंस पेशव्यांच्या दरबारची व कारभारासंबधीं कामाची बरीच माहिती होती.[2]

---

१. पत्र नंबर २२०.

२. पत्र नंबर २२१.

शिवाय, ते शूर असून त्यांस तेथें राहून कारभार पाहण्यास सवडही होती. मग, बाळोबा तात्यांनीं परशुरामभाऊंशीं संधान बांधून ठरविलें कीं, यशोदाबाईचे मांडीवर चिमाजी आप्पास दत्तक देऊन त्यास पेशवा करावा. परशुरामभाऊंनीं नानाचा पक्ष साफ सोडावा आणि बाळोबा तात्यांनीं त्यांजकडे पेशवाईचा कारभार चालेल अशी तजवीज करावी. दरम्यान नाना वगैरेंकडून विरुद्ध खटपटी झाल्या, तर त्या उभयतांनीं मोडून काढाव्या. असा ठराव झाला खरा. परंतु, हें सिद्धीस जाण्यास अगोदर बाजीरावास कैद करणें जरूर होतें; व बाळोबा तात्यांचें तेंच ह्मणणें होतें. परंतु, परशुरामभाऊंची बाजीरावांकडे शपथक्रिया गुंतल्यामुळें त्याला कैद करणें परशुरामभाऊंस पसंत पडेना. तेव्हां, त्यांनीं या गूढाचा उलगडा नाना फडणविसांस पत्र पाठवून करून घेतला. नानांनीं त्यांस कळविलें कीं, "बाळोबांच्या साहाय्यानें तुह्मी कारभारांत शिरत आहां यांतही मला आनंदच आहे. पण, तुह्मी बाळोबांवर आंधळेपणानें विश्वास ठेवून बसूं नका. आधीं बाजीरावांस आपल्या ताब्यांत घेऊन पक्का बंदोबस्त ठेवावा. आणि मग चिमाजी आपास गादीवर बसवावें." याप्रमाणें परशुरामभाऊंस नानांचा गुप्त निरोप आला. त्यांत बाजीरावास कैद करण्याची त्यांनीं पर्यायानें दिलेली सल्ला त्यांस बरी वाटली नाहीं. परंतु, बाजीरावास कैद केल्यावांचून योजलेला कार्यभाग बिनधोक सिद्धीस जाणें कठीण, ह्मणून तें काम त्यांनीं बाळोबा तात्यांकडे संपविलें. त्याप्रमाणें बाळोबा तात्यांनीं बाजीरावास कैद करून शिंद्यांच्या लष्करांत ठेविलें. आणि इकडे "परशुरामभाऊंनीं चिमाजी आपास बाजीरावांच्या छावणींतून पळवून पुण्यास नेलें. तेथें त्यांचें दत्तविधान केलें आणि सातान्याहून पेशवेपदाचीं वस्त्रें आणवून त्यांचें नांव चिमाजी माधवराव असें ठेविलें[२]." ही गोष्ट ता० २६ मे सन १७९६ त घडली.

शिंद्यांच्या भीतीनें "नाना फडणवीस सातान्यास गेले तेव्हां (ते) इतके गांगरले होते कीं कोणचीच मसलत सिद्धीस नेण्याचा त्यांच्या हातून निश्चय होईना. निरुपायानें जरी ते बाजीरावास अनुकूल झाले होते, तरी अजूनही यशोदाबाईस दत्तक देऊन त्यास गादीवर बसविण्याचा बेत त्यांच्या मनांत घोळतच होता. ते महाराजांचें दर्शन घेऊन आपण किल्ल्याखालीं उतरावें, फौजबंदी करावी, कोट रुपये आधीं आपणापाशीं ठेवितों आणि माधवराव यांचे स्त्रीस पुत्र दत्तक देऊन त्यांचा वंश स्थापावा. प्रधानपद त्यांस द्यावें (असें महाराजांस नाना) बोलले. ते समयीं महाराजांनीं असे प्रसंगांत तुह्मी मसलत करणार, हे सिद्धीस न जातां विशोभा मात्र होणार. यास्तव आह्मास उतरोन मसलत करणें. प्रत्यक्ष वंश असून गोत्रजांस प्रधानपद देणें हें करावयाचें पडणार नाहीं (असें) सांगितलें[३]."

नानांचा पहिल्यानें बाजीरावास गादीवर बसविण्याचा बेत नव्हता. परंतु, बाळोबा तात्या किंवा शिंदे विरुद्ध झाल्यामुळें बाजीरावासच गादीवर बसवावें, असा त्यांचा विचार ठरला. व त्याप्रमाणें परशुरामभाऊंस पाठवून त्यांजकडून आणाभाका देववून बाजीरावास त्यांनीं पुण्यांत आणिलें. पुढें,

१. नाना फ. च. पृ. १९२.

२. *परशुरामभाऊंचें चरित्र* पृ. १६५।६६.

३. छत्रपति धाकटे शाहू म. च. पृ. ६५ व नाना फ. च. पृ १९१. यावरून त्या वेळीं बहुमत नानांस अनुकूल नव्हतें, ही गोष्ट उघड होते.

बाजीरावाकडून कांहींएक गैरवर्तन घडलें नसतां त्यांनीं दत्तकाची पुनः खटपट चालविली ! त्यापेक्षां पहिल्यानेंच बाळोबा तात्यांस आपल्या मसलतींत घेऊन, शेवटीं जी बाजीरावाचीच गादीवर स्थापना झाली, ती यातायातीशिवाय अगोदरच झाली असती, तर काय वाईट होतें ? बाळोबा तात्यांची ह्मणजे अर्थात् शिंद्याच्या लष्करची जर भीति होती, तर त्याच्या विचारेंच सर्व कामें उलगडलीं पाहिजे होतीं. ह्मणजे, नानांकडेसच कारभार राहून पुढची धांवपळ चुकली असती. पण, सरळ प्रयत्नांपेक्षां कुटिल प्रयत्नाकडे स्वाभाविक ओढा. आपल्या कारभारांत दुसऱ्याचें तंत्र मुळींच नसावें, हा अभिमान. परंतु, भितरेपणा पराकाष्ठेचा, आणि सैन्यबळाचा पाठिंबा कमी. तेव्हां, त्यांनीं अवलंबिलेल्या मार्गांत राजकारणपटुत्व दिसत नाहीं. पुढें, अशा महत्त्वाच्या कामांत सातारच्या राजाकडे जाऊन (या संकटाच्या प्रसंगीं तरी पेशव्यांचे धनी जे छत्रपति शिवाजीचे वंशज, त्यांची नानांस आठवण झाली, हें नामधारी सातारच्या राजाचें सुदैवच समजावयाचें !) त्यांच्या द्वारें दत्तकाच्या मसलतीस ते दुजोरा आणीत होते. यांतही राजकारणपटुत्वाचा भाग दिसत नाहीं. एकंदरींत असें ह्मणावें लागतें कीं, त्यांच्या उतारवयांतील–हरिपंतं फडक्यांच्या पश्चात् झालेलीं–कारस्थानें त्यांच्या पूर्वीच्या शहाणपणास साजेशीं नव्हतीं.

बाळोबा तात्यांच्या अनुमतानें परशुरामभाऊ पुण्यांतील कारभार हांकीत होते. पुढें, त्या उभयतांसही असें वाटूं लागलें कीं, नानांचा कारभार नानांकडेसच संपवावा हें चांगलें. शिवाय, परशुरामभाऊंस बाळोबा तात्या व नाना यांजमध्यें चुरस राहावी, ही गोष्ट प्रशस्त वाटेना. ह्मणून, त्यांनीं नानांस कळविलें कीं, "तुह्मी पुण्यांत येऊन बाळोबा तात्यांच्या स्नेहांत अंतर पडलें आहे तें नीट करून मुलखाचे कामावर राहावें. आह्मी लष्कराचें काम संभाळितों." त्यावर नानांनीं परशुरामभाऊंस उत्तर लिहिलें कीं, कांहीं बोलणें व्हावयाचें आहे त्यास तुमचा पुत्र हरिपंत यास आधीं पाठवून द्यावा. त्याप्रमाणें हरिपंतही आला. परंतु केवळ वकीलासारखा न आला. त्याजबरोबर चार पांच हजार निवडक स्वार होते. आणि ते समयीं बाबूराव फडके यांचें नानांस गुप्त पत्र आलें कीं, "आपण क्षणमात्र विलंब न करितां आपल्या रक्षणाचा उपाय करावा." मग नाना ही दग्याची मसलत आहे, असें समजून तेथून तत्काळ वांईप्रतापगडावरून कोकणांत महाडास गेले.

नानांच्या संबंधाची जी परशुरामभाऊंस वगैरे बातमी लागत होती, तीवरून ते विरुद्ध खटपटींच्या इलाजांत आहेत, अशीं वर्तमानें पुण्यांत येऊं लागलीं. तेव्हां सलोख्याचा प्रकार राहिला नाहीं, असें जाणून परशुरामभाऊंनीं त्यांची जाहगीर जप्त करून तो मुलुख शिंद्यास दिला. आणि

१. पहा पत्र नंबर २३९.

२. सातारच्या राजाविषयीं नानांची स्वामिभक्ति कोणत्या प्रकारची होती पहा. "सातारचा राजा **बंदींत होता.** त्याच्या खर्चास नेमणूक केलेली होती ती कमी केली. आणि त्याचे भाऊबंद सोयरेधायरे यांस त्यांची भेट न होईसें केलें." ग्रांट डफची ब. पृ. ३३९.

३. "हरिपंत मरण पावल्यावर नानांच्या हातून किती चुका होत गेल्या व त्यांच्या मनाचा **धरबंद सुटून** *शेवटीं त्यांची कशी दैना झाली"* हें पुढील इतिहासावरून कळेल. पहा खरेकृत *नाना फडणीसांचें चरित्र* पृ. १५५.

४. ग्रांट डफची बखर. पृ. ३४५. या दिवसांत बाबूराव फडक्यांची सर्व कारभारांत 'इकडे वपु तिकडे मन' अशी स्थिति झालेली दृष्टीस पडते.

नानांचा वाडा पुण्यांत होता त्यांत जें द्रव्य सांपडलें, त्याचा चालू खर्चाचे कामीं व्यय केला. त्या वाड्यांत नुसतें कापडच चाळीस लक्षांचें होतें. तें पुढें दसऱ्याचे दिवशीं सर्वांस वांटलें.

परशुरामभाऊ पेशव्यांचा कारभार करूं लागले. त्यांस बाळोबा तात्यांशिवाय धोंडोबा दादा पागनीस, सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण, नारायणराव बक्षी, बाजीबा मोदी वगैरे शिंद्यांकडील मुत्सद्दी मंडळी हरएक प्रकारचें साहाय्य करीत होती.[1] नानांच्या पक्षाची मंडळी त्रिंबकराव परचुरे, गोविंदराव काळे, गणपतराव करमरकर वगैरे निघून गेली, तरी वरील मंडळीच्या योग्य मदतीमुळें राज्यकारभारांत कोठेंही उणीव राहिली नव्हती, असें त्या वेळच्या इतिहासावरून दिसतें.

पुण्यांतील ह्या सर्व घालमेली शिंद्यांच्या जिवावर चालल्या होत्या, व त्याकरितां त्यांना लष्कर-सहित पुष्कळ दिवस पदरचा खर्च खात बसावें लागलें होतें. ह्मणून, त्यांनीं परशुरामभाऊंस कळविलें कीं, एथें राहिल्यामुळें आह्मांस खर्चाचा मोठा तोटा पडला आहे, तेव्हां या तोट्याची भरती पेशव्यांच्या दौलतींतून करून द्या. अर्थात् ती गोष्ट परशुरामभाऊंस मान्य करावी लागली. परशुरामभाऊंनीं शिंद्यांस द्यावयाच्या पैशाची तोड अशी योजिली कीं, निजामाचा दिवाण मशीर उलमुलुक पेशव्यांच्या कैदेंत होता त्यास त्यांनीं सांगितलें कीं, निजामाकडे आमचें तीन कोट रुपये येणें आहे तें देशील तर आह्मी तुला कैदेंतून मुक्त करूं. त्यानें उत्तर केलें कीं, 'मी कैद असतां पैशाच्या उलगड्याची खटपट होणार नाहीं.' तेव्हां, त्यास कडक प्रतिबंधांतून मुक्त करून पुण्यांत कांहीं लोकांनिशीं स्वतंत्र राहण्याची परवानगी दिली. मग, तेथून त्यानें ह्या पैशाच्या बाबतींत निजामाकडे बोलणीं चालविलीं. तिकडून दिवाणाच्या तैनातीस ह्मणून कांहीं लोक येत जात राहिले. अशा रीतीनें त्याजपाशीं बऱ्याच सैन्याचा जमाव जमला.

नाना महाडास पळून गेले होते तिकडे त्यांनीं एक बंड कारस्थान चालविलें होतें. आपल्याविरुद्ध पुण्यांत ज्या खटपटी झाल्या, त्या सर्व हाणून पाडून, पुनः पुण्यांतील सर्व सत्ता आपल्या हातीं आणावी, याबद्दल त्यांनीं लांब लांब संधानें बांधून एक जंगी व्यूह तयार केला. तो असाः– बाजीरावास गादी मिळाली नाहीं आणि नानांचा कारभार गेला. तेव्हां, दोघांचें जरी विळीएवढें सख्य नव्हतें, तरी ते दोघे समदुःखी एकचित्त झाले. बाळोजी कुंजर या नांवाचा कोणी एक शूद्र बारगीर होता, त्याच्या द्वारें त्या उभयतांचा पत्रव्यवहार चालला होता. त्यांत असें ठरलें कीं, नानांनीं पुनः खटपट करून बाजीरावास गादीवर बसवावें व बाजीरावानें नानांस मुख्य कारभारी करावें.[2] पेशव्यांचे सेनापति बाबूराव फडके असून, नानांच्या पश्चात् सुद्धां ते आपल्या कामावर होतेच. त्यांजकडे संधान

१. पहा सोबतचीं पत्रें व पेशव्यांची बखर पृ. १६७. या बखरींत "बाळोबा तात्या, धोंडोबा दादा, नारायणराव बक्षी, सदाशिव मल्हार, बाजीबा मोदी असे शेणवी मस्त झाले" असें बखरकार मोडनी ह्मणतात! परंतु, या पुरुषांनीं मराठेशाहीस कसकशी मदत केली होती, हें पत्रव्यवहारावरून सहज दिसून येईल. असें असतां ते 'मस्त झाले' असें केवळ द्वेषबुद्धीनें लिहिलेलें दिसतें!

२. बाळोबा तात्या पागे हे शिंदेशाहींतील प्रसिद्ध मुत्सद्दी व दिवाण, व हा बाळोजी कुंजर एक बारगीर. दुसरा पहिल्याहून जसा योग्यतेनें हलका, तशी त्याची कृतिही नीच! ह्या दोन व्यक्ति पृथक् असून त्या नांवाचा परस्परांशीं कांहींच संबंध नाहीं. असें असतां बाळोबा तात्यांस 'कुंजर' ह्मणून त्याच्या नीच कृतीबद्दल बाळोबा तात्यांचा तिटकारा येईल, असा घोटाळा कित्येक चालू ऐतिहासिक पुस्तकांत केलेला आहे. पण हें केवढें ऐतिहासिक अज्ञान!! पहा सहस्रबुद्धेकृत परशुरामभाऊ पट० चरित्र व चालू महाराष्ट्राचा संक्षिप्त इतिहास आवृत्ति ९ वी, पृ. ७६।७७.

बांधून पेशव्यांची फौज पाहिजे तेव्हां नानांच्या कामामाठीं मिळेल, असें नानांनीं त्याचें वचन घेतलें. त्याचप्रमाणें नानांनीं आपला जुना मित्र तुकोजीराव होळकर याजपासूनही कबूल करून घेतलें होतें कीं, मी फौज तयार ठेवून तुमच्या सूचनेची वाट पाहत राहतों. मशीर उलमुलुकास बंधमुक्त करून त्यास पुण्यांत राहण्याची परवानगी दिली होती व पैशाचें आमिष दाखवून त्यानें निजामाशीं पत्रव्यवहार व लोक आणणें नेणें वगैरे बऱ्याच स्वतंत्रपणाचे व्यवहार चालविले होते, तें नानांच्या पथ्यावरच पडलें. नानांनीं मशीराचे द्वारें निजामाशीं करार ठरविला कीं, बाजीरावास गादीवर बसविण्याचे कामीं त्यानें मदत करावी व त्याबद्दल त्यास कांहीं प्रांत द्यावे. त्याचप्रमाणें रघूजी भोसल्याशीं बोलणें चालवून त्यासही त्यांनीं स्ववश करून ठेविलें. इतकी सिद्धता केली, तरी शिंद्याच्या प्रचंड सामर्थ्यापुढें ती टिकेल, असें नानांस वाटेना. तेव्हां, शिंद्यास परभारें वश केल्यावांचून रचलेल्या व्यूहापासून कार्यभाग शेवटास तर जात नाहीं आणि शिंदा तर बाळोबाच्या आकर्षणांतून सुटत नाहीं, त्या पक्षीं यास युक्ति कोणती योजावी, असा नानांस विचार पडला! शेवटीं, शत्रूस स्ववश करण्यास सामादि उपायचतुष्टय सांगितलें आहे, त्यापैकीं चरमोपाय जो भेद, त्याचा त्यांनीं शिंद्यावर प्रयोग चालविला! रायाजी पाटील नामें शिंद्याचा एक सरदार असून, त्यास आपल्या यजमानाच्या दरबारांत प्रमुखत्व मिळविण्याची मोठी हौस होती. त्यास नानांनीं वश करून घेऊन त्याच्या द्वारें शिंद्याशीं बोलणें लाविलें कीं, बाळोबास बंदींत घालून बाजीरावास गादीवर बसवाल, तर तुह्मांस परशुरामभाऊंची सर्व जाहगीर व अहमदनगरचा किल्ला व दहा लाखांचा मुलूख, इतकें देऊं. त्याप्रमाणें रायाजी पाटलानें शिंद्याकडे खटपट चालविली. तरी दौलतराव सर्वांशीं अनुकूल होण्याचा रंग दिसेना. कारण, बाळोबा तात्या व तत्पक्षीय लोक, यांपासून शिंद्याच्या रयाशतीस जे मोठमोठे फायदे झाले, ते त्यांच्या नजरेसमोर असून बाळोबा तात्यांनीं शिंद्यास प्रतिकूल अशी गोष्ट कधींच केली नव्हती. तेव्हां, शिंदा वश व्हावा कसा? पण नानांनीं एथेंही कसब लढविलें. तरुणपणाच्या अमदानींत कोणत्या मोहक वस्तूचा मनावर विशेष परिणाम होतो, हें नानासारख्या चतुर पुरुषास दुसऱ्यांनीं थोडेंच सुचवायाला हवें होतें! दौलतरावांसारखे तरुण राजबिंडे पुरुष शांततेच्या काळांत सुखविलासांस आसक्त असतील, ही कल्पना सहज होण्यासारखी होतीच. शिवाय, कागलकरांच्या वंशांतील सखाराम घाटगे नामक एका उमेदवार पुरुषाची एक रूपवती कन्या होती, ती शिंद्याच्या मनांत भरल्यामुळें बायको करावी, अशी त्यांची इच्छा होती. पण, कांहीं कारणामुळें तो योग घडून येत नव्हता. तेव्हां, नानांनीं ही बातमी मिळवून घाटग्यास वश केलें आणि आपल्या कार्यभागासाठीं शिंद्यास ती मुलगी द्यावी, असें ठरवून ठेविलें. मग, शिंद्याकडे सूत्र चालवून या प्रयोगानें त्यांस पूर्णपणें वश करून ठेविलें.

अशाप्रकारें नानांनीं बार भरून ठेविला होता. त्यांचीं हीं कारस्थानें अगदीं गुप्तरूपानें चाललीं होतीं, तरी बाळोबा तात्यांस हळुहळू तीं सर्व समजलीं. त्यांना बाकी त्यांच्या कारस्थानांची बिलकूल भीति वाटली नाहीं. परंतु, आपले यजमानच तिकडे वळले ह्या गोष्टीचें त्यांना पराकाष्ठेचें आश्चर्य वाटलें. यजमान बदलल्यावर त्यांचा इलाजच राहिला. जिवबादादा गेल्यापासून ज्या अनिष्ट गोष्टींचें दुष्ट स्वप्न पडत होतें, त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाची वेळ आली. शिंदेसरकारच्या वृत्तींत त्यांना आपले संबंधाचा लोभ जाऊन उदासीनता दिसूं लागली, व हीही केवळ पुढील शासनबुद्धीची आगामी सूचना आहे, असें त्यांनीं ताडिलें. परंतु, धन्याचे ठायीं बाणलेला हा अपायकारक वृत्तिविपर्यास ज्या

१. पत्र नंबर २३९.

अर्थी आपल्या कृतीचें फळ नव्हे, त्या पक्षीं तें किल्बिष घालवून त्यांजवर पूर्ववत् छाप बसविण्याचें काम अर्थातच आपल्या हातचें नव्हे, असें समजून ते व नारायणरावादि सर्व स्वस्थ होते.

हीं नानांचीं सर्व कारस्थानें बेमालूम जुळण्याचें कारण, परशुरामभाऊंनीं जमविलेलें नवें कारभारी-मंडळ नानांस आंतून पूर्णपणें साहाय्य होतें, हेंच होय. परशुरामभाऊंचा नानांविषयीं विशेष कटाक्ष नव्हता. त्यांत नानांच्या विरुद्ध ठरलेली मसलत बाबूराव फडके, गोविंदराव काळे वगैरे मदत-गार मंडळी बेधडक बजावून दाखवून अविश्वासास जागा ठेवीत नसे. तेव्हां, बाळोबा तात्यांनीं त्यांज-वर भरंवसा टाकून आपलीं कामकाजें पाहण्यास शंका घेतली नाहीं. ह्या संधीस त्रिंबकराव परचु-ऱ्यांनीं नानांच्या सांगण्यावरून दौलतराव शिंद्यास मेजवानी देवविली होती, व त्या ठिकाणीं त्या उभयतांची भेट व्हावी असेंही ठरलेलें होतें. ह्या सर्व नानांच्या पक्षाच्या मंडळीकडून त्यांस बाळोबा तात्यांकडील सर्व कच्चें वर्तमान कळत होतें. इतकेंच नव्हे, तर नानांनीं योजिलेले सर्व बेत सिद्धीस नेण्याचे कामीं लागेल ती मदत ही मंडळी जिवेंभावें करीत होती. शेवटीं, ह्या आंतल्या उलटापालटी बाळोबा तात्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं ह्या मंडळांतील अग्रगण्य बाबूराव फडके ह्यांस कैद करून प्रतिबंधांत ठेविलें. तसेंच मानाजी फांकडे जो विरुद्ध खटपटींत होता, त्याचेंही पारिपत्य करून त्यास मोगलांच्या ताब्यांत दिलें. निळकंठराव प्रभू व मालोजी घोरपडे ह्यांस पकडण्यासाठीं लोक पाठविले. परंतु, त्या धरणारांची व त्यांची झटापट होऊन ते तेथून निसटून वांईकडे गेले. माल्प्याच्या घांटांत नानाचा इष्ट बजाबा शिरवलकर नानाकरितां फौज जमवीत होता, त्यास हे जाऊन मिळाले. त्या फौजेस वरचेवर नानांकडून पैशाचा पुरवठा होत होता. तेथें ही फौज दहा हजारपर्यंत जमली, तेव्हां त्या सरदारांनीं आपण बाजीरावाचे पक्षपाती आहों, असें प्रसिद्ध केलें.

अशाप्रकारें बाळोबा तात्यांच्या विरुद्ध ह्या खटपटी चालत होत्या व त्यांत बाजीरावाचें आणि दौलतराव शिंद्यांचेंही अंग होतें. तरी "बाळोबाचें शिंद्याच्या दौलतींत असें वजन होतें कीं, प्रत्यक्ष दौलतरावावरही त्यांचा दरारा असे. यामुळें नानांचें कारस्थान पूर्णदशेस येई तों बाळोबाच्या वाटेस शिंदे गेले नाहींत. बाजीराव व बाबा फडके व मानाजी फांकडे यांनीं उतावीळ होऊन जेव्हां फौज चाकरीस ठेवण्याची सुरुवात केली, तेव्हां ती गोष्ट सहजच बाळोबांच्या व परशुरामभाऊंच्या ल-क्षांत आली. चौकशी करितां करितां सगळी हुजुरात फौज या फंदांत आहे असा त्यांस (मागें सांगितल्याप्रमाणें) तपास लागला. तेव्हां त्यांनीं तर्क केला कीं (इकडची ही) बाजीरावसाहेबांचीच सारी खटपट आहे." व त्यांस प्रोत्साहक नाना फडणवीस आहेत. मग, त्यांनीं बाजीरावास तेथून काढून हिंदुस्थानांत पाठविण्याची मसलत केली. *आणि लागलीच सखाराम घाटगे याजबरोबर कांहीं फौज देऊन बाजीरावाची त्यासमागमें हिंदुस्थानांत रवानगी केली. ते प्रवरानदीपर्यंत* पोंचताहेत, तों कावेबाज व गोडबोल्या बाजीरावानें घाटग्यास वश केलें. मग, त्या दोघांचा करार ठरला कीं, सखाराम घाटग्यानें आपली मुलगी दौलतरावास देण्याचें ठरविल्याप्रमाणें देऊन त्यांस आपल्या आटोक्यांत आणावें आणि त्यांजकडून बाजीरावास गादीवर बसवावें. त्याबद्दल शिंद्यांस बाजीरावानें दोन कोट रुपये द्यावे. कागलगांव घाटग्यास इनाम करून द्यावें. आणि शिंद्याचा मुख्य कारभार

१. ग्रांट डफची ब. पृ. ३४५।३४६.
२. नाना फ. च. पृ. १९८.

घाटग्याकडे चालेल, असें करावें. उभयपक्षीं ह्या अटी मान्य झाल्यावर बाजीरावानें आपण आजारी पडल्याचें मिष केलें व सखाराम घाटगे यानें त्यासहित प्रवरेचे कांठीं मुक्काम केला.

साल्प्याच्या घांटांत नानांच्या तर्फे सैन्य जमत चाललेलें पाहून, त्याचा अगोदर पराभव करण्याची भाऊंनीं व तात्यांनीं तयारी चालविली. त्या वेळीं मशीर उल्मुलुकानें पुढें होऊन सांगितलें कीं, माझ्या हवालीं फौज कराल, तर मी त्या सैन्याचा पराभव करून येईन. मशीराविषयीं यांना संशय नव्हता, ह्मणून तें यांनीं मान्य केलें. मग मशीरानें आपल्या दिमतींतली फौज आणि कांहीं पेशव्यांची फौज घेऊन युद्धाचा घाट घालून तो त्या नानांच्या पक्षपाती लोकांस जाऊन मिळाला.

नानांनीं इंग्रजांकडेही बाजीरावास गादीवर बसविण्याविषयीं मदत मागितली. त्यांसही अशा प्रसंगीं नानांस मदत करून पेशव्यांकडील आपला संबंध विशेष दृढ करावयाचा होता. ह्मणून, त्यांनीं तें मागणें तत्काळ कबूल केलें.

मग, त्यांनीं आपल्याशीं विरुद्ध झालेल्या परशुरामभाऊंचा मुलुख लुटण्याची मसलत कोल्हापूरकरांस दिली. त्यांचें परशुरामभाऊंशीं हाडवैर होतेंच, ह्मणून त्यांनीं एकाएकीं जाऊन परशुरामभाऊंची जाहगीर जप्त केली.

नानांचें सर्व कारस्थान रंगारूपास येऊन त्यांचे पक्षपाती झालेले सर्व लोक त्यांच्या सूचनेची वाट पाहत राहिले होते. त्याप्रमाणें दौलतरावांस सूचना होतांच त्यांनीं रायाजी पाटलास सांगून आपले कारभारी बाळोबा तात्यांस व तत्पक्षीय कांहीं लोकांस अकस्मात् रात्रीचें कैद केलें. त्याबद्दलचा पत्रांतील मजकूरः–"रात्रौ राजश्री बाळोबा तात्यांस व धोंडीबा व बाजीबा महाजन व सदाशिव मल्हार (व) पांडबा लाड तोफखानेवाला, यांजवर सरकारची गैरमर्जी होऊन चौक्या बसविल्या. कारभारसंबंधीं काजकाम राजश्री रायाजी पाटील मनास आणीत आहेत."[1] अशाप्रकारें पाटीलबावांच्या पूर्णपणें कसास उतरलेल्या व आपल्या राजनिष्ठपणांत काडीइतकेंही अंतर न पाडिलेल्या बाळोबा तात्यादि मुत्सद्दी मंडळीस कैद करवून दौलतरावांनीं नानांची कामगारी अगत्यानें बजाविली ! आणि दिगंतकीर्ति पाटीलबावांस जें नानांचें प्रेम–त्यांची तऱ्हेतऱ्हेनें धडपड चालली असतां–आमरण संपादितां आलें नाहीं, तें त्यांच्या स्थानभ्रष्ट स्थितींतील एका निरोपाबरोबर सवंग सौदा संपादिलें ! बाकी, शेणवी सरदार नारायणराव तेथें होतेच; जगोबा बापू, विश्राम नरहर, लखबादादा व यशवंतराव भाऊ, हे उत्तर हिंदुस्थानांत मुलखांच्या बंदोबस्तास होते. त्या सर्वांस विश्वास येण्याकरितां दौलतरावांनीं कळविलें कीं, तुह्मीं आपापलीं कामें पूर्ववत् पहावीं; इकडून तुमच्या संबंधानें कांहीं वांकडें होणार नाहीं. मग, सदाशिव मल्हार यांसही कारभाराच्या कामासाठीं मोकळें केलें आणि त्यांस आश्वासन देऊन बाकी कैद केलेल्यांस नगरास पाठविलें. ही गोष्ट सन १७९६ चे आक्टोबरांतील २७ व्या तारखेस घडली.

बाळोबा तात्यांची ही स्थिति पाहून परशुरामभाऊंस नानांच्या सर्व कारस्थानांचा व त्यापासून घडून येणाऱ्या परिणामाचा अंदाज झाला. या वेळेसच परशुरामभाऊ कैद व्हावयाचे. परंतु, त्यांस कैद करण्यास मशीर उल्मुलुकाचे फौजेबरोबर नारोपंत चक्रदेव यांस देऊन नानांनीं पाठविलें होतें. नारोपंतांनीं भाऊंस कैद करण्यासंबंधीं कांहीं माहिती मिळविण्याकरितां आपा बळवंत व परशुरामभाऊ वैद्य यांस दोन चिठ्या लिहून त्या गुप्त रीतीनें पाठविल्या. आपा बळवंतानें आपली चिठी घेऊन ही

१. पत्र नंबर २२६.

परशुरामभाऊंस नेऊन दे, ह्मणून आलेल्या मनुष्यास सांगितलें. त्याला परशुरामभाऊ वेच काय माहीत! त्यानें ती चिठी नजीकच्या परशुरामभाऊ पटवर्धनांच्या गोटांत शिरून त्यांस जागें करून दिली. ती पाहतांच त्यांस दग्याची मसलत पूर्णपणें कळून आली. मग, त्यांनीं तत्काळ पुढील बेत योजला. ते "रात्रींच श्रीमंतांस घेऊन निघून पुणेंहून गेले. त्यांजमागें फौजा मोंगलांकडील वगैरे लागल्या आहेत." पुढील पत्रीं लिहिलें आहे कीं, "परशुरामभाऊ श्रीमंत चिमापास घेऊन गेले, ते जुन्नरास आहेत. फौजाही मागां आहेत. श्रीमंत बाजीरावसाहेब पुणेस येतील व श्रीमंत नानाही यावे असें आहे." पुण्यांतून परशुरामभाऊ निघून गेल्यावर ह्या आलेल्या फौजेनें बहिरोपंत मेहेंदळे, अन्याबा मेहेंदळे, राघोपंत थत्ते, गणपतराव करमरकर, चिंतोपंत आठवले, बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे, विसाजीपंत वाडदेकर, ह्या सर्वांस कैद करून किल्ल्यावर ठेविलें. ह्या वेळेस एकंदर पंचेचाळीस असामींस कैद केलें[२]. याप्रमाणें, त्या नानांच्या तर्फेच्या लोकांनीं विरुद्ध पक्षाचा बंदोबस्त करून पुण्यांत आपला अंमल स्थापिला. एवढें कार्य झाल्यावर नाना सालप्याच्या लष्करास घेऊन पुण्यास येऊं लागले, तों वाटेंत बाजीरावांचें पुढील कार्यक्रमासंबंधाचें पत्र त्यांना आलें. त्या पत्रावरूनच त्यांना संशय उत्पन्न झाला. आणि ते तेथेंच राहिले व बाजीरावांस तेथूनच पत्र पाठविलें कीं, "जर तुमचें मला अभय असेल तर मी एथून पुढें पुण्यास येईन. नाहीं तर असाच जाईन. त्यावरून बाजीरावानें त्या नानांला अभय देऊन आज्ञा दिली कीं, तुमच्या मर्जीस आलें तर चाकरी करावी, नाहीं तर न करावी. ते समयीं शिंदा व निजाम अली यांमध्येंही बाजीरावास आसनावर बसवावयाचा बेत होऊन मुख्य कारभारी नाना असावा असें ठरलें."

मग परशुरामभाऊ चिमाजी आपास घेऊन वाड्यांतून निसटून गेले असें समजतांच, नारोपंत चक्रदेव, आप्पा बळवंत वगैरे मंडळी पंचवीस हजार फौजेनिशीं भाऊंचा पाठलाग करीत निघाली. परशुरामभाऊ तर आपल्या घोड्यावर आपल्यापुढें चिमाजी आपास घेऊन शेल्यानें कंबर कसून आपल्या मागें लागलेल्या फौजेच्या भीतीनें एकसारखे भरधांव घोडा फेंकीत पळत होते. वाटेंत अन्न ना पाणी. असें पळतां पळतां शिवनेरी किल्ल्याजवळ येऊन पोहोंचले. तेथें किल्लेदारास हाक मारून भाऊंनीं चिमाजी आप्पास किल्लेदाराच्या स्वाधीन केलें. अशा रीतीनें धन्यास सुरक्षित ठेवून मागें वळताहेत, तों त्यांस पाठलाग करीत आलेल्या मोगली फौजेनें घेरलें. त्यांजबरोबर भाऊ तेथें लढत राहिले. पण, एकट्याचा त्यांजबरोबर निभाव कसा लागावा? ते आधींच अगदीं थकून गेलेले होते. तेव्हां, त्यांना त्या लोकांच्या स्वाधीन होण्याशिवाय दुसरा इलाज राहिला नाहीं. मग, नारोपंतांनीं त्यांना आनंदराव रास्त्याच्या ताब्यांत देऊन मांडवगण एथें कैदेंत ठेविलें. आणि इतक्या—योजिलेल्या सर्व—गोष्टी पार पडल्याचें कानीं पडल्यावर नानांचें एकदा समाधान झालें.

नानांनीं हीं सर्व कारस्थानें महाडास बसल्या बसल्या करून मसलतीनें जो एकदम बार उडविला, तो नेमका लागून त्यांना इष्टसिद्धि प्राप्त झाली व ह्या कामीं त्यांच्या पूर्वींच्या कुशाग्रबुद्धीचा आणि राजकारणपटुत्वाचा पुनः चांगला प्रत्यय आला. परंतु, ह्या प्रसंगीं एवढी गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, हें सर्व कारस्थान एका बाळोबांकरितां होतें! परशुरामभाऊंस बाळोबांनींच आपल्या

---

१. पत्र नंबर २२६.

२. परशुरामभाऊंचें च. पृ. १७८.

३. ग्रांट डफची बखर पृ. ३४८.

मदतीस घेतलें होतें. तरी, त्यांचा ओढा नानांकडेच होता—निदान नानांप्रमाणें त्यांनीं त्यांशीं द्वेषबुद्धि धरिली नव्हती—आणि बाकी सर्व पुण्यांतील अधिकारी नानांस आंतून वश होते. हे सर्व बाळोबांशीं किंवा ह्या दुक्कलीशीं हितशत्रुत्वानें वागत असत. तेव्हां, एकट्या बाळोबांशिवाय नानांस प्रतिस्पर्धी कोणी नव्हता. बाळोबांची सारी शक्ति शिंद्यांच्या फौजेच्या बळावर होती व शिंदे तर वरतीं सांगितल्याप्रमाणें नानांच्या मुठींत होते. तरीही बाळोबांच्या पारपत्याकरितां नानांस एवढा जगड्व्याळ व्यूह रचावा लागला ! यावरून तात्यांची बुद्धिमत्ता व वजन हीं तशींच विलक्षण होतीं, असें ह्मणावें लागतें. शिवाय, सर्व सरदार ह्मणजे मराठी राज्यांतील एकवटलेली सर्व फौज दंड ठोकून नानांचा हुकूम झेलण्यास तयार असतांही बाळोबा तात्या व परशुरामभाऊ यांस पकडण्यास फितूर, गुप्तपणा व रात्र या मर्दास व बुद्धिमानास न शोभणाऱ्या त्रयीचा आश्रय करावा लागतो आणि सर्वत्र सामसूम झाल्यावांचून नानांस पुण्यांत पाय ठेववत नाहीं ! यावरून दीर्घसूत्रीपणाबद्दल व कारस्थानांतील महानेपुण्याबद्दल जशी नानांची, तशीच बाळोबा तात्यांच्याही एकंदर योग्यतेबद्दल धन्यता वाटते. या योग्यतेचा प्रत्यय वाचकांस आतां लौकरच येईल.

मग, पुण्यांत आपणाला प्रतिस्पर्धी कोणी राहिला नाहीं व तेथें आतां निर्बाधपणानें कारभार करितां येईल असें पाहून, नाना मानाजी फांकडे शिंदे यांच्या हाताखालीं साल्प्याकडे जी फौज ठेविली होती, ती घेऊन पुण्यांत आले. आणि बाजीरावसाहेबांस तावडतोब निघून येण्याविषयीं लिहिलें. तेव्हां तेही येऊन दाखल झाले. नंतर, साताऱ्याहून छत्रपतींकडून वस्त्रें आणवून बाजीरावांस सन १७९६ च्या डिसेंबरच्या २७ वे तारखेस नानांनीं प्रसिद्ध रीतीनें गादीवर बसविलें. कारभार हातीं घेण्यापूर्वी बाजीरावांचा विश्वास पटेना, ह्मणून नानांनीं बाजीरावांकडून करार करून घेतला कीं, आपल्या जिवास व जिनगीस तिळमात्र धक्का लावणार नाहीं. कारभार न करावा असें मनांत असेल, तर स्वस्थ घरीं बसावें. याप्रमाणें ठरून तसा बाजीरावानें नानांस लेखही करून दिला. शिवाय, शिंदे व निजाम यांजकडून लेखी करारनामा करविला कीं, बाजीरावसाहेबांस गादीवर बसविण्यांत येईल, आणि नाना फडणवीस यांच्या हातीं राज्याचा सर्व कारभार राहील. याबद्दल आपण दोघे हमीदार आहों ! बाळोबांस आक्टोबरांत कैद केलें, तरी पुढें दोन महिनेपर्यंत बाजीरावांस गादीवर बसविण्याचें नानांस साधलें नाहीं.

याप्रमाणें शिंदे व निजाम यांनीं नानांस हमी दिली. नानांनीं ह्या दोघांस जें देऊं केलें होतें, तें मिळण्यासाठीं त्यांना कारभारावर नाना फणडवीसच असणें इष्ट होतें. ह्मणूनच त्यांनीं ही हमी दिली होती. याप्रमाणें सर्व मजबुती करून घेऊन नानांनीं कारभार हातीं घेतला. तरी, बाळोबा (कैद असले तरी सूत्रें चालवून) किंवा तत्पक्षीय लोक न जाणों एकादे वेळीं कोणता प्रसंग आणितील कोण जाणे, अशा संशयपिशाचिकेनें त्यांला घेरलें होतें, ह्मणून त्यांची भीति जाण्यासाठीं शिंद्यांनीं त्यांस 'देवजी गौळी याचे स्वाधीन' करून बेलबागेंत ठेविलें. मग, शिंदे व नाना यांच्या वारंवार भेटी होऊं लागल्या. पुढें, नानांनीं शिंद्यांस आग्रह केला कीं, बाळोबांस कैद केलें असलें, तरी तत्पक्षीय मंडळी तुमचेपाशीं बरीच असून ती बाळोबांच्या हितार्थ तुमच्याविरुद्ध खटपटी चालविल्याशिवाय राहावयाची नाहीं. यासाठीं, या सर्व मंडळीस कैद करून किल्ल्यांत टाकल्याशिवाय तुह्मांला खरी स्वस्थता मिळावयाची नाहीं. ह्या मंडळीपासून केव्हांना केव्हां तुमच्या राज्यास अपाय आहे. इत्यादि कानमंत्र

---

११२. नाना फ. च. पृ. २०२ व ग्रांट डफची बखर इत्यादि.

सांगून शेणवी मंडळाविरुद्ध शिंद्यांचें मन वळविण्याचा नाना प्रयत्न करूं लागले. बाळोबांस कैद केलें तरी बाकी तत्पक्षीय राहिलेल्या शेणवी सरदारांस दौलतरावांनीं आश्वासन दिल्यामुळें त्यांजकडून कोणत्याच प्रकारची हालचाल होत नव्हती. असें असतांही त्यांजवर घोरपड आणण्यांत नानांस विलक्षण समाधान वाटत होतें व त्या कामीं त्यांनीं बऱ्या खटपटी चालविल्या होत्या. हें पुढील उताऱ्यावरून कळून येईल. " सर्व मुत्सद्दी कारभारी एकत्र होऊन शिलेदार यांस बक्षीनें (नारायणरावानें) मनस्वी लहानास बोल्या (नोकऱ्या) लावून दिल्या ह्मणून चौकशी मांडली आहे. आणि धन्यास समजावून पेंच आणावा या कारस्थानांत आहेत. परंतु धन्याची कृपा आजच्या दिवस पावेतों यथास्थित आहे. तशांत नाना फडणीस यानें बोलणें लाविलें आहे (कीं) दिवाण सदाशिव मल्हार व बक्षी या उभयतांस कैद करावें आणि आपण पन्नास लाख रुपये देतों.[1] त्यास धन्यांनीं कबूल केलें नाहीं. ×××× पन्नास लाखांवर नजर दिली तर हा दिस (दिवस) पर्यंत धन्याचें बोलणें आज हा रुपये देईल आण आमचे घरीं चार चांगलीं माणसें आहेत हीं पदरचीं जातील. ह्मणून नारायणरावजींची खातरजमा केली. तूर्त कृपा आहे."[2]

कोणत्याही थोर पुरुषाची योग्यता त्याच्या हयातीच्या पश्चात् मोठी वाटूं लागते, असा बहुधा सर्वत्र अनुभव आहे. कारण, खरे थोर पुरुष जगांत थोडेच असतात. ते आपल्या अस्तित्वांत आपल्या कर्तबगारीनें मोठमोठीं कामें बजावूं लागले, ह्मणजे लोकांना तीं नित्याच्या परिपाठांतलीं होतात. आणि त्या कारणानेंच त्यांची योग्यता एकपक्षीं विशेषशी नाहीं, असें वाटूं लागतें. किंवा ती योग्यता फारशी कोणाच्या लक्षांत येत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. परंतु, त्यांच्या पश्चात् तशा दर्जाचा पुरुष लौकरच उभा होणें कठीण असल्यामुळें, तीं महत्त्वाचीं कामें घडवून आणण्याच्या कामीं लागणाऱ्या योग्यतेंत ज्या उणीवा असतात, त्या लौकर प्रत्ययास येतात व त्यामुळें अर्थातच त्या थोर पुरुषांची आठवण होते. प्रस्तुत तरी असाच प्रसंग होता. जिवबादादा होते तोंपर्यंत त्यांच्या व बाळोबा तात्यांच्या जुगलीमुळें नानांचा व त्यांच्याच संगतीनें हरिपंत तात्यांचा मोठा हेतु होता तरी शिंद्यांच्या कारभारांत अगर कोणत्याही मसलतींत त्यांचा बिलकूल हात शिरला नाहीं. यास कारण, जिवबादादांची तरवार व बाळोबा तात्यांची लेखणी, हीं होत. ह्यांच्या प्रतापापुढें कोणाचेंच विरुद्ध कारस्थान वर डोकें करून पाहत नसे. परंतु, दादा मरण पावल्याबरोबर त्यांच्या दराऱ्यावर व शहाणपणावर दबून राहिलेलीं कारस्थानें पुनः वर डोकें करूं लागलीं. पूर्वीं " बाळोबा तात्या × ज्या मसलती योजीत गेले त्या जिवबादादा यांचे पराक्रमेंकरून सिद्धीस गेल्या. योजिलेले प्रकार सिद्धीस नेतात तेच प्रतापी पुरुष पुनीत. त्यांवर ईश्वरी कृपेची सिद्धता होती. ते निरभिमानी पुरुष ज्यांस अहंतेची वार्ताही मनीं नाहींचे."[3] तेव्हां, बाळोबा तात्यांचा जो मोठा आधार 'जिवबादादा,' तो तुटण्याबरोबर

१. 'नाना आणि महादजी' या पुस्तकांत प्रो. भानु यांनीं नानांच्या स्वार्थत्यागांची मालिका गुंफिली आहे. पण त्या स्वार्थत्यागाची मजल पथवर पोहोंचलेली होती ! या व पुढील कांहीं पत्रांवरून नानांच्या इच्छा काय काय होत्या व अर्थात् त्यांची योग्यता कोणत्या प्रकारची ठरते, याचा वाचकच निकाल करितील, व या नवीन चश्म्यानें सर्व मराठमंडळाचें अभेद्य जूट करणारे व 'स्नेहं दयां च' इ० रामचंद्रोक्तीवर सरशी करणारे नाना तसेच दिसतात कीं काय, हेंही ते तिऱ्हाईतपणें सांगतील ! पुराव्यानें सिद्ध होणाऱ्या गोष्टी कोणासही नाकबूल करितां यावयाच्या नाहींत.

२. पत्र नंबर २३८।२३०.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७७.

नानांचीं कारस्थानें थोडा वेळ तरी रंगारूपास आलीं. आणि बाळोबांस त्यामुळेंच कैद भोगावी लागली. ही गोष्टही लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

बाळोबा तात्यांसारख्या चतुर, अनुभवी व दौलतीचें खरें कल्याण करणाऱ्या जुन्या कारभाऱ्यांस कैद केल्यावर नवीन मंडळी जी नानांनीं पुढें केली किंवा दौलतरावांच्या अदूरदर्शित्वामुळें पुढें सरली, ती कोण तर सरजेराव घाटगे (सखाराम घाटगे यास दौलतरावांनीं हल्लीं हें पद दिलें होतें), बाणाजी हुजरे, फकीरजी गाढवे वगैरे ! ही अनुभवशून्य मंडळी कारभारांत शिरून शिंद्यांच्या रयाशतींतील बिकट बिकट प्रकरणांचा निकाल लावीत होती ! तरी, आबा चिटणीस, रायाजी पाटील, यांचाही त्या कारभारांत हात असल्यामुळें उगाच कांहींशी सांवरासांवर होत होती. पेशवेदरबारचा कारभारही त्या काळीं पूर्वींसारखा चालत नव्हता. पेशवे व शिंदे यांच्या कारभाराचें सुरेख चित्र पुढील उताऱ्यांत रेखाटलेलें आहे. "नंतर वैशाखमासीं मोरोबा दादा फडणीस हे नगरच्या किल्ल्यांत कैद होते. त्यांस सोडवून आणिलें. असा कारभार होत असतां पुढें श्रीमंत यांणीं आपले मंडळचे कारभारी गोपाळराव मुनशी व वैजनाथभट भागवत, बाळाजीपंत पटवर्धन असे कारभारांत घातले. त्रिंबकराव परचुरे यांणीं काशीस जाण्याचा सरकारचा निरोप मागितला. ते काशीस जाण्याची तयारी करून काशीस निघाले. पुढें कारभारांत फडावर चिंतोपंत देशमुख नानांनीं नेमिले. असे त्रिवर्ग वाड्यांत राहून कारभार पाहूं लागले. मनस्वी कामें होऊं लागलीं. फौजेस खर्चास नाहीं, रोज धरणीं होऊं लागलीं, पागेस चंदी मिळेनाशी झाली. इकडे शिंद्याच्या लष्करांत सरजेराव कारभार करूं लागले. तो कारभार मनस्वी अनन्वित होऊं लागला. त्याचें वर्णन काय करावें ? जुने मुत्सद्दी यांस धरून पैका घेऊं लागले. मामलती मुलखांतल्या घालमेली करून भलत्याला भलतेंच काम सांगावें ! पुढें नारोपंत चक्रदेव नानांकडून कारभार करूं लागले. अशा गोष्टी होत असतां खर्चाची अडचण मोठी (झाली)".[1]

बाजीरावसाहेब पेशवेपदाधिकारी व नाना कारभारी झाल्यावर मग पूर्वींच्या कारकीर्दींत घडलेल्या अप्रिय गोष्टींची दुरुस्ती होऊं लागली. श्रीमंत चिमाजी आपांस यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन त्यांचें नांव चिमाजी माधवराव असें ठेवून पेशवाई चालविली होती, व पुढें चिमाजी आपांस गादीवरून काढून बाजीरावांस गादी दिली होती. परंतु, पूर्वीं केलेलें दत्तविधान अशास्त्र असें ठरलें. कारण, सवाई माधवरावांचे चिमाजी आपा चुलते होतात, तेव्हां पुतण्याच्या स्त्रीस चुलता दत्तक होणें हें गैरशिस्त, असें ह्मणून त्याबद्दल त्यास प्रायश्चित्त दिलें. आणि ज्या ब्राह्मणांनीं या गोष्टीस शास्त्रार्थ सांगितला, त्यांस हद्दपार केलें.

नानांनीं बाजीराव, शिंदे वगैरे वश करून घेऊन आपल्यास कारभार मिळेल असा योग जुळवून आणिला. तरी, नाना या सर्वांविषयीं फार साशंक होते. त्यांचीं पुढील कारस्थानें तशाच स्वरूपाचीं दिसतात. त्या वेळच्या पत्रांतील त्यासंबंधाचा मजकूर असा आहे. "मोरोबा दादा फडणीस + + + त्यास नगरच्या किल्ल्यावरून खालीं बाग आहे तेथें ठेविला आहे. (त्याचा बंदोबस्त) उभयतांकडेस आहे. अद्याप नानांचे स्वाधीन करून दिला नाहीं. + + + नाना कांहीं शिंदे यांचे वाड्यांत येत नाहींत. त्यांस संशय दिसतो. पुणेंत श्रीमंत राजश्री दौलतराव बाबांस मेजवानी त्रिंबकराव परचुरे यांचे घरीं केली. तेथें यांनीं (दौलतरावांनीं) व नानांनीं यावें असा बेत ठरविला होता.

१. पेशव्यांची बखर पृ. १७२.

त्यांत बाणाजी हुजरे कारभारी (!) त्यास मेजवानीस गेले. तेथें श्रीमंत उभयतां आले व शिंदेही आले. परंतु नाना आले नाहींत."[1]

याप्रमाणें त्रिंबकराव परचुरे इत्यादिकांकडून शिंद्यांचें मन दिवसेंदिवस विशेष वळवून व आपण कोणाच्या हातास न लागण्यासारख्या रीतीनें सावध राहून नानांस जो अर्थ साधावयाचा होता, तो त्यांनीं त्यांतल्यात्यांत मोठ्या युक्तीनें साधून घेतला. तो अर्थ हाच कीं, नारायणरावादिकांस कैद करवून शिंद्यांच्या रयाशतींत सर्व घोंटाळा माजविणें व शेणवी मंडळाच्या नाशाविषयींचा फारा दिवसांचा आपला मतलब साधून घेणें ! पाटीलबावा व दौलतराव यांच्या योग्यतेंत किती अंतर होतें तें आतां लौकरच दिसून येणार आहे. नानांनीं शिंद्यांचे वारंवार कान भरून नारायणराव वगैरे विश्वस्त मुत्सद्यांस कैद करण्यास त्यांस प्रवृत्त केलें[2]. पण, ह्या महत्त्वाच्या गोष्टीस त्यांना नांवाला सुद्धां कारण दाखवितां आलें नाहीं. यावरून, हें करणें किती अन्यायाचें होतें, हें उघड होतें. त्या वेळचे पत्रांत पुढील उद्वेगजनक मजकूर लिहिला आहे. "हा प्रकार (नारायणरावांस वगैरे कैद करण्याचा प्रकार) घडावयाचें कारण कांहींच नसतां (अक) स्मातच जहालें. द्वेषी यांनीं (? पूर्वी सांगितलेल्या सद्गृहस्थांनीं-पन्नास लाख रुपयांचा—) लाभ दाखवून केलें असें ह्मणतात. रदबदल कांहींएक होत नाहीं. स्वकीय खेरीज करून सर्व एकमतच जाहाले आहेत. तेव्हां रदबदल कोण करितो ? आबाजी भोंवार याजकडील खटल्यासुद्धां हुजऱ्या येऊन घेऊन गेला. तूर्त कोणताही अर्थ यथास्थित घडेल असें दिसत नाहीं. पुढें श्रीइच्छा. वरकड आपली मंडळी आहे त्या स्थळींच आहे. सर्व चीजवस्तीची मोजदाद करून याद (यादी) घेतल्या. चीजवस्ती अद्याप नेली नाहीं. पाहऱ्यामुळें आंत प्रवेश होत नाहीं. (सदाशिवराव) भाऊ व रावजी (नारायणराव बक्षी) व (देवजी) गवळी, मोदी पितापुत्र जामगांवांतील उभयतां असे नगरास नेऊन ठेविले. भाऊंस ज्व (र) येत होता, मार्गीही श्रम जाहालेमुळें शरीरीं स्वस्थ (ता) नाहीं. असें लिहिणें आलें. रावजी भाऊ (कारभार आजवर) मनास आणीत होते. ते नूतन मंडळींतील एक दोघांस.. सांगावयाचा बेत एके समयांत येतो. राजश्री (जगोबा) बापू व (लखबादादा) लाड यांजविशीं इंगळे यांस पत्रें गेलीं. काय होतें पहावें. आपल्या मंडळींतील कोणी राहिला नाहीं. सर्व एकत्र ठेवून भवता पहारा आहे. मुलेंमाणसें वाड्यांतच (ठेवून तेथेंच) पहारा. याप्रमाणें (बंदोबस्त केला) आहे. आपल्या मंडळीखेरीज स्वज्ञातीयांसही निकट लाविली (आहे ?). सारांश ज्ञातीवर संकट प्राप्त जाहालें आहे. विस्तार कोठवर लिहावा ?"[3] नानांच्या या कारस्थानांत शिंद्यांचें हितशत्रुत्व आणि सारस्वतांचा दीर्घद्वेष हीं ओतप्रोत भरलेलीं होतीं, असें कोण बरें ह्मणणार नाहीं ? तिकडील शेणवी मंडळीचें नुकसान करूनच नाना थांबले नाहींत, तर आपल्या दूरदर्शित्वगुणाचा प्रकाश पाडण्याकरितां त्यांनीं वाडीसरकारास जिवबादादांच्या घरच्या मंडळीस कैद करून त्यांस लुटून टाकण्याविषयीं आग्र-

१. पत्र नंबर २३२.

२. "येथील प्रकार ह्मणावा तर नाना फडणीस याणीं दरबारी फितूर माजिवला आहे." पत्र नंबर २३१.

३. पत्र नंबर २३०.

४. नाना फडणविसांमध्यें लोकोत्तर राष्ट्रीय भक्ति असून राष्ट्रीय तत्त्वें जास्त जोरदार करावीं असा त्यांचा हेतु होता, असें प्रो० भानु त्यांचें वर्णन करितात. पहा 'नाना आणि महादजी' (पृ० २७।२८). परंतु, नानांनीं या गुणांस आपल्या खोल हृदयांत ठाव दिला होता, असें वरील पत्रव्यवहारावरून दिसत नाहीं.

ह्यानें लिहिलें[1] ! व त्याचप्रमाणें एकंदर सारस्वत ज्ञातीवर डोळा ठेवण्याविषयींची आपली सदिच्छा प्रकट केली. पेशव्यांकडे वाडीसरकारचीं अनेक कामें. तेव्हां, तेथील सूत्रचालक नानांच्या शब्दास सर्वांशीं नाहीं तरी कांहीं अंशीं मान देणें वाडीसरकारास भाग झालें. मग, त्यांनीं कऱ्हाड्यांचा पक्षपात धरून सारस्वतांचा उपमर्द चालविला आणि तेणेंकरून नानांस समाधान वाटेसें केलें. या अपमानास व छळास त्रासून वाडीसंस्थानांतील हक्कदार व अधिकारी प्रमुख सारस्वत मंडळीस एथें राहणें नको, असें वाटूं लागलें होतें[3]. याप्रमाणें नानांनीं सारस्वतांचा द्वेष उगविण्याचा व शिंद्यांच्या रयाशतींत मनसोक्त ढवळाढवळ करण्याचा आपला अत्यंत आवडता हेतु सिद्धीस नेण्याचे कामीं साधेल तिकडून व साधेल तसतशी जारीनें तयारी करण्यांत बिलकूल कसूर केली नाहीं. पण, या एकंदर कृत्यांचा परिणाम इतका शोचनीय झाला कीं, शिंद्यांचें राज्यवैभव संपुष्टांत आलें; अप्रयोजक लोकांच्या हातीं कारभार जाऊं लागलें; मराठी राज्यांत 'चंचुप्रवेश' करण्यास परकीयांस आयती वाट सांपडली; स्वतः नानांस कैद भोगावी लागली; आणि ज्या पेशवाईच्या हिताकरितां नानांचें काळीज तिळतिळ तुटत होतें, त्या पेशवाईस जबरदस्त धक्का बसून, शेवटीं रावबाजीच्या अप्रयोजकपणामुळें तिचा समूळ लय झाला.

नानांच्या नादास लागून दौलतरावांनीं केलेलीं हीं कृत्यें त्या राशिदींतील बहुतेकांस खपलीं नाहींत. त्यांत नारायणरावांवर तर सर्वांची फारच भिस्त होती. सैन्यांतील सर्व लोक त्यांच्या करितां पाहिजे तें करण्यास तयार होते. जिवबादादांची योग्यता, त्यांचें वजन व सर्वांवरील त्यांची प्रीति, ह्यांचा उत्कृष्ट ठसा त्यांच्या हृत्पटलावर उठला होता. नारायणरावांस निष्कारण कैद केलें होतें, तेव्हां नेट धरून धन्याचे डोळे उघडल्यावांचून आपण राहणार नाहीं, असा साहजिक आवेश त्यांना उत्पन्न झाला. बक्षींपासून सर्व फौजेस जें सुख मिळत असे, त्यामुळें ते सर्व लोक त्यांचे ऋणी असत. तेव्हां, त्यांस सोडविण्यासाठीं सारी फौज व त्यांवरील अधिकारी उद्युक्त झाले, ह्यांत नवल नाहीं. नारायणरावांस सोडविण्यासाठीं सर्व फौज आग्रह धरून बसली, तेव्हां दौलतरावांस फौजेचें ऐकणें भागच झालें. त्याबद्दलचा पत्रांतील मजकूरः—"राजश्री देवजी गवळी यास नगरास आणावयास पत्रें सरकारांतून गेलीं होतीं. लौकर त्यास आणतील. राजश्री रावजी (नारायणराव बक्षी) यांसही आणवणेविसीं सर्व फौजेचा व वरकडांचा आग्रह पडला आहे. त्यास देवजी गौळी आल्यावर मागून आठां चौं रोजांत मशारनिल्हेसही आणवितील. ज्या गृहस्थांनीं ही गोष्ट केली, त्यांचें पारपत्य जाहालें पाहिजे. याजकरितां मतलब साधून यांचें येणें होईल." आणि नुसता आग्रह धरूनच हें लष्कर राहिलें नाहीं, तर अशानें त्यांना सोडण्यास दिरंगाई होईल, ह्मणून ते धरणें देऊन बसले. तेणेंकरून त्यांची मोकळीक लौकर झाली. कंपूवाले फिरंगीसुद्धां इतर फौजेबरोबर धरणें देऊन बसले होते. पुढें मोकळीक झाल्यावर ही हकीकत वाडीसरकारांतून कमळजाबाई भोंसले यांजकडील आनंदप्रदर्शक पत्रांत अशी दिली आहे. "राजश्री नारायणराव जिवाजी यांजवर पेंच आला हें वर्तमान ऐकून चित्त असंतोषित होतें. हल्लीं इकडील माणसें पुणेंहून

१. या संबंधाचीं पत्रें केरकर बक्षींच्या दप्तरीं आणखी आहेत.

२. पत्रें नंबर २२२।२२८।२६४।२६७.

३. पहा पत्र नंबर २२८।२६४.

४. पत्र नंबर २३५.

आलीं त्यांस मशारनिल्हेस अटकाव केले ह्मणून कंपूसुद्धां फौजेनें रुसावा करून राजश्री दौलतराव शिंदे यांस निकट करून बसले होते. जे त्यास अटकाव करावयास कारण काय? आपणास निरोप द्यावा. याप्रमाणें तीन चार रोज दंगा केला. त्याजवर फौजेची समजूत करून नारायणराव यांस समजाविशी करून आणिले." नारायणरावांस आणण्यास पाटणकर व पाराजीपंत या सरदारांस पाठविलें होतें. मग, ते जवळ आल्यावर लष्करसहित खुद्द दौलतराव सामोरे गेले. नारायणराव थोडेंच दिवस प्रतिबंधांत होते. व मग अशा रीतीनें समजाविशी करून व स्वतः सामोरें जाऊन दौलतरावांनीं सन्मानानें त्यांस आणिलें. ही गोष्ट खटपटीशिवाय केवळ त्यांच्या खऱ्या योग्यतेनेंच घडून आली. नगरच्या किल्ल्यांत त्यांची व बाळोबा तात्यांची भेट झाली, तेव्हां त्यांनीं ठरविलें कीं, बाजीरावास वश करून घेऊन त्यांच्या द्वारें शिंद्यास वश करून घेऊन नानांच्या अंतस्थ हेतूची त्यांस जाणवी द्यावी. व इतक्यांतच कसकशी अव्यवस्था झाली व पुढें कसकसे घोटाळे माजण्याचा संभव आहे, याची त्यांस नीट कल्पना होईल असें करावें. शिंदे स्वभावतः वाईट अंतःकरणाचे नसल्यामुळें त्यांच्या मनांत नानांनीं उत्पन्न केलेलें किल्बिश फार वेळ टिकावयाचें नाहीं. लष्करच्या धरण्यापासून नारायणरावांची सुटका लौकर होईल, हें त्यांनीं भविष्य करूनच ठेविलें होतें. पुढें, त्याप्रमाणें घडून आल्यावर बाळोबा तात्यांशीं पुढील मसलती निश्चित करून नारायणराव किल्ल्यांतून निघाले होते. याच संधीस सदाशिव मल्हार व देवजी गौळी यांसही कैदेंतून मुक्त करून त्यांना त्यांच्या कामावर आणिलें. ही मंडळी आपल्या कामावर रुजू झाल्यावर थोड्याच दिवसांत ह्यांनीं बाजीरावसाहेबांस वश करून घेतलें, आणि दौलतरावांचीही चांगली प्रीति संपादिली. सरजेराव घाटग्यास बाजीरावांकडून लगामीं घेतला. याप्रमाणें बस बसवून नाना फडणविसांचें पडत चाललेलें तेज थोड्याच दिवसांत फिक्कें पाडिलें. रायाजी पाटील व मुकेल साहेब, कर्नल फिलोज वगैरे युरोपियन सरदार नानांचे पक्षपाती झाले होते. पण नारायणरावांनीं त्यांस सहजच स्ववश केलें. त्यांच्या प्रत्ययास त्यांनीं असें आणून दिलें कीं, नानांनीं आह्मां मुत्सद्यांस कैद करविलें ही गोष्ट वस्तुतः वाईट व घातक असली, तरी राजकारणाकरितां तिची त्यांना जरूरी होती असें गृहीत धरूं. परंतु, आमच्या साऱ्या ज्ञातीनें कोणतें पाप केलें होतें? कीं सर्वांमागून पाहरा! जेथें जेथें आमचा संबंध, तेथें तेथें आमच्या नाशाविषयीं नानांच्या खटपटी! असा दुष्टपणा करून नाना शिंद्यांचें किंवा तुह्मां सर्वांचें कोणतें हित साधणार आहेत? नाना जर शिंद्याच्या हितार्थ असे जपताहेत, तर कै० वा० पाटीलबावांस मुळीं धोरणच नव्हतें कीं काय? ह्या सर्व घडलेल्या व पुढें घडणाऱ्या गोष्टींचें चित्र सर्व सरदारांच्या व दौलतरावांच्या मनावर जेव्हां ह्या मंडळीनें कोरिलें, तेव्हां नानांचे सर्व लपंडाव स्वहितसाधनाचे व मुख्यत्वें शिंद्यांची रयाशत संपुष्टांत आणण्याचे आहेत, ह्याबद्दलची त्यांची खातरी होऊन गेली. परंतु, सरजेरावासारखी नानांनीं तयार केलेली मंडळी नानांचाच पक्ष धरून होती व अशी मंडळी व नाना आपल्या उद्योगांत तत्पर असत, ह्मणून बाळोबा तात्यांस वगैरे सोडविण्याचे कामीं कांहीं दिरंग लागला. शिंद्यासारखा बड्या शक्तिमत्तेचा फौजबंद सरदार—नव्हे स्वतंत्र राजाच—ज्याच्या तावडींत सांपडेल, त्यानें त्यावर आपल्या मतलबाचे हवे तसे प्रयोग करून आपला कार्यभाग साधावा, असें झालें होतें! अशाप्रकारची कारकीर्द एकंदरींत कोणासच हितप्रद होणारी नव्हे. आणि वस्तुस्थिति तर अगदीं अशीच होती. या गोष्टीचा अत्यंत अनिष्ट परिणाम पुढें घडून आला. ती साग्र हकीकत यथाप्रसंगीं कथन करूं.

---

१. पत्र नंबर २३४.

मग नानांनीं हितशत्रुत्वानें आजवर दुष्ट मसलती सांगून आपल्या नाशाच्या तजविजी चालविल्याबद्दल दौलतरावांची खातरी झाली. तेव्हां, दौलतराव, नारायणराव व बाजीराव, या तिघांचा संकेत ठरला कीं, नाना नेहमींप्रमाणें दुर्मंत्रकथनास शिंद्याकडे आले, म्हणजे त्यांस कैद करून त्यांस त्यांच्या कृतीप्रमाणें फळ भोगवावें ! नानांस या दिवसांत कैदेंतून सोडविलेल्या नारायणराव, भाऊ दिवाणादि मंडळीस पुनः त्याच घरांत घालविण्याविषयीं शिंद्यांचें मन वळविण्याचा नाद लागला होता. ही मंडळी सदैव कैदेंत किंवा दुःखांत असलेली पाहण्याविषयींची नानांस मोठी आवड होती ! त्या क्रमाप्रमाणें नाना शिंद्यांच्या लष्करांत येऊन दौलतरावांशीं खलबत करीत बसले आहेत, तोंच संकेत ठरल्याप्रमाणें त्यांस पकडलें. ह्या प्रकरणीं खुद्द नारायणरावच लिहितात. "आज नाना फडणीस यांची स्वारी आपल्या यजमानसाहेबांपाशीं आली होती. आजपर्यंत नानांच्या सांगितल्या (सांगण्या) प्रमाणें यजमानसाहेबांनीं वर्तणूक करून आपल्या मतलबाप्रमाणें चालले. परंतु सर्व गोष्टी ध्यानीं होत्या. त्याचा काबू आज साधावयाचें योजून नाना येतांच (पलट) णचा बंदोबस्त करून जेथें खलबतास बसले होते तेथेंच त्यांजकडील दहा पांच असामी मुत्सद्यांसुद्धां नानास धरिले. समागमें लोक होते ते पळून गेले व लुटून घेतले. + + + आजपर्यंत नाना यानें आपले ज्ञातीविशीं[1] द्वेष करून नानाप्रकारें उत्पात केले. हल्लीं राजश्री सदोबा भाऊवर चौकी बसवावयाचा आग्रह ! त्यावरून जसें त्यांनीं ह्मटलें तसे त्यांच्या समाधानार्थ चार प्यादेही काल भाऊच्या येथें (बसविले तेव्हां त्यांस) आनंद जाहाला. + + + + + नानाचे संनिध फौज पडल्यापासून आपल्या जातीस नित्य धुगधुग होती. निःकाळजी आज जाहाली. सर्वांस दहशत लागली. आतां श्रीमंतांच्या राज्याचा बंदोबस्त यथास्थित होईल[2] ! राजश्री तात्या पागनीस यांस आतांच पत्रें देऊन सांडणी स्वार पाठविला व राजश्री परशुरामभाऊकडेही पाठविलों." याप्रमाणें, नानांस व त्यांनीं शिंद्यांकडे बरोबर नेलेल्या मुत्सद्यांसच कैद केलें असें नाहीं, तर त्यांच्या तर्फेच्या सर्व मंडळीस कैद करून असत्सहवासाच्या परिणामाची त्यांना यथास्थित कल्पना होईल असें केलें. पुढील पत्रांत[3] असें लिहिलें आहे. "राजश्री नाना फडणीस यांजला व त्यांचे कारभारी यांजला श्रीमंत महाराजांनीं कैद केलें. (   ) वगैरे सरंजाम सरकारांत आणविला. मामलतीवर जप्ती गेली. पुणेचा बंदोबस्त येथूनच होतो. नंतर आणखी नानाचे तर्फेची पांच पंनास मंडळी होती त्यांसही धरून कैदेंत ठेविली होती. मिरजवाले (परशुरामभाऊ) यांजला सांगावयासी बोलणें लागलें. त्यांजलाही आणतील. राजश्री मोरोबा फडणीस यांसही आणतील. पांच चार रोज पुणेंत फारच बेदा पडला होता. × × × नाना फार खबरदार ह्मणे. परंतु श्रीमंत महाराजांच्या प्रतापापुढें नानाचें कारस्थान राहिलें. कैदेंत ठेविला तेथें पलटणा व स्वार व पागा (असा ठिक) ठिकाणीं बंदोबस्त करून ठेविला. वरकड नानाचे कारभारी यांजलाही कैदेंत ठेविले. आणखी धरून आणिले. शेंदोनशें असामी धरून ठेविले. एक नानाचे तर्फेचा चुकला नाहीं. सर्व प्रांतांत मोंगल टिपू सुलतान (यांसी कळावयाकरितां पत्रें पाठविलीं) श्रीमंतांची (बाजीराव साहेबांची) स्वारी येथें आली होती. आणखीही येईल. येथून महाराज जसा बंदोबस्त करून देतील त्याप्रमाणें होईल. × × × ×

---

१. परज्ञातीविषयींचा व त्यांतही शेणवी ज्ञातीविषयींचा नानांचा बेसुमार दुष्टपणा ह्यावरून दिसून येतो. विंचूरकर घराण्याचा इति० यांत पृ० १२१ एथें हेंच मत प्रतिपादिलें आहे. तसेंच प्रभु लोकांच्या इतिहासाचीं साधनेंही पहावीं.

२. पूर्वीं अव्यवस्था माजलेली होती या संबंधानें हें लिहिलें आहे. ३. पत्र नंबर २६६.

पुर्णेत नानांनीं आरब दहा हजार आणिले ते अवघे नानाचे आवडते होते. त्यांनीं कांहींकांच्या पेंठा लुटल्या. आरब यांस निघून जाण्याविसीं सांगितलेवरून थोडे निघून गेले. बाकी आहेत तेही निघून जातील. वरकड सर्व बंदोबस्त उत्तमच आहे[1]." पुढील पत्रांत हाच मजकूर कांहीं तपशिलवार साभिप्राय दिला आहे. "नाना फडणीस आबा शेलूकर व दादा गद्रे व बजाबा शिरवलकर वगैरे आणखी पांच चार असामी काल आदितवारीं पौष शुा १३ (म) आपले यजमान श्रीमंत शिंदे यांसीं बोलावयासी आले होते. तेथेंच धरून कैद केले. आण शहरच्या बंदोबस्तास फौज घेऊन चिरंजीव राजश्री बाळोबा गेले व नानाकडील आणखी शहरांतील असामी कैद करवायास पलटण देऊन (   ) रायाजी पाटील याचा यासी पाठविला. बहुत रोज नानास धरला असता. परंतु शहर लुटलें जाईल अगर लढाई पडल्यास लोक पडतील किंवा नाना हिरकणी खाऊन जिवंत हातास लागणार नाहीं यास्तव युक्तीचे वाटेनें लोक जायां न होतां कैद केला. त्याच घटकेस राजश्री बाळोबा तात्या पागनीस यास आणावयास हुजूर गेले. नाना ×××××× आपले जातीवर किंतु होता ईश्वरें निवारण केला."[2] पण बाळोबा तात्या या प्रसंगीं आले नाहींत. ते केव्हां आले हें बायांच्या प्रकरणांत कळेल.

राजकारस्थानांतील मुत्सद्यांचे डावपेंच व पकडापकडी किती नमुनेदार असतात पहा! नाना कैद नसतां दूर एकीकडे महाडास बसून त्यांनीं सर्वांस निरनिराळीं आमिषें लावून आपल्या जाळ्यांत आणिलें. अपुरत्या विचारानें केवळ स्वलाभावरच नजर देणाऱ्या मंडळीस हीं कारस्थानें फायदेशीर वाटलीं. त्यांत ह्या धामधुमीच्या स्थितीचा फायदा घेणाऱ्यांसही सहजच फावलें! अशा रीतीनें चोहोंकडून रान बांधून नानांनीं बाळोबा तात्या, नारायणरावादिकांवर मोठें काहूर आणिलें. व त्यांसुद्धां सर्व मुत्सद्यांस कैद केलें, इतकेंच नव्हे, तर दीर्घद्वेषानें त्यांच्या ज्ञातीच्या लोकांस सुद्धां पकडून त्यांजवर सक्त पाहरे ठेविले. हें पुरतें लक्षांत ठेवून जशास तसा हात दाखविण्यासाठीं इकडे बाळोबांनीं तोच नमुना उठवून दिला. अशा कारस्थानांत आपण तुह्मांपेक्षां कमी नसून कांकणभर जास्त आहों हें नानांस दाखविण्याकरितां, तात्यांनीं कैदेंतल्या कैदेंतच सर्व बेत योजून, ते आकाशास गवसणी घालण्यासारख्या विशेष खटपटींशिवाय इतक्या बेमालूम रीतीनें तडीस नेले कीं, सर्व लोकांस बाळोबा तात्यांच्या बुद्धिमत्तेचें व राजकारस्थानांतील निपुणतेचें फार आश्चर्य वाटलें. त्यांच्या व नारायणरावांच्या सर्व मसलती नगरच्या किल्ल्यांतच ठरल्या होत्या व पुढेंही लागेल ती सल्लामसलत ते तिकडून देत असत. तेणेंकरून त्यांच्या व नारायणरावांच्या मसलतीनें सर्व कार्यभाग यथास्थित जुळून आले. नानांनीं ज्याप्रमाणें सर्वांच्या जाहागिरांची जप्ती करविली होती, त्याप्रमाणेंच यांनींही त्यांची जाहगीर जप्त केली. मिळून नानांस आपल्या कारस्थानाचा दिमाख मिरविण्यास कोणतीच सवड ठेविली नाहीं. अशा रीतीनें "त्यांणीं (नानांनीं) शिंद्यांचे दौलतींत आपला बंदोबस्त करावा एतदर्थ जे यत्न केले, ते एकही चालूं न देतां बाळोबा तात्या पागनीस यांणीं त्यांचे यत्न निर्फळ करून आपली शहाणपणाची छाप त्यांवर ठेविली आणि आपला काबू त्यांजवर केला. व त्यांस कैद करून (ज्या ठिकाणीं आपणास ठेविलें होतें त्याच) नगरास ठेविलें[3]!"

---

१. पत्र नंबर २४६.

२. पत्र नंबर २४४.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७७.

या भागाच्या आरंभीं आह्मीं नानांविषयीं काढिलेले उद्गार कितपत यथार्थ आहेत, हें आतां वाचकांस बऱ्याच अंशानें कळून येण्यासारखें आहे. सारस्वत मुत्सद्यांनीं त्यांचें आपण होऊन कधींही वांकडें केलें नसतां त्यांच्या नाशाकरितां ते विनाकारण धडपडत होते. त्यांचा उत्कर्ष त्यांना दुःसह वाटे. शिंद्यांच्या रयाशतीचा उत्कर्षही त्यांस नको होता. सर्व सरदारांनीं पेशवाईच्या हितार्थ अहर्निश झटून ते ठेवतील त्या स्थितींत राहावें व आपला अधिकार सर्वत्र अबाधित चालावा असें त्यांस वाटे. हें त्यांचें वर्तन व धोरण परोत्कर्षासहिष्णुत्व व स्वार्थपरायणता या दोषांनीं युक्त होतें. सरजेरावासारख्या मंडळीस त्यांनीं पढवून तयार केलें, ह्या गोष्टीचा परिणाम फार वाईट झाला. बाकी, त्यांचा पेशवाईस घडलेला उपयोग, त्यांची सुव्यवस्था, त्यांचा मुत्सद्दीपणा व लेखणीचा खंबीरपणा, हे गुण आह्मांस माहीत आहेत व त्यांविषयीं आह्मी योग्य अभिमानही वाहतों. परंतु, त्यांच्या निःसीम भक्तांप्रमाणें आमची अंधभक्ति नाहीं, व त्यांच्या दोषांवर अजीबात पांघरूण घालून केवळ गुणांचेच पोवाडे गावे, ही गोष्ट आह्मांस संमत नाहीं.

भाग १५ वा.

महादजींच्या बायका व दौलतराव यांजमध्यें बिघाड.

इ० सन १७९८ पासून स० १८०० पर्यंत.

अलिजाबहाद्दर महादजी शिंदे इ. स. १७९४ त वारले, हें मागें १२ व्या भागांत सांगितलेंच आहे. त्यानंतर लौकरच ह्मणजे इ० स० १७९६ त त्यांना सुयशाधारभूत झालेले व ते गेल्याचें दुःख न वाटू देणारे त्यांचे सेनापति जिवबादादाही वारले. त्या वेळेपासून शिंदेशाहीवर व पर्यायें-करून सर्व मराठेशाहीवर बराच अपकर्षमूलक परिणाम गुदरला, असें त्या काळच्या इतिहासाकडे सूक्ष्म नजर दिली असतां कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

महादजींचें नांव निघण्याबरोबर ज्यांचें नांव निघालेंच पाहिजे असे महादजींचे राज्यकारस्थानां-तील जोडीदार सामनेवाले, एकप्रकारें वरिष्ठ व एक प्रकारें तव्येत सांभाळणारे, मराठी राज्याचे प्रधान व चतुर मुत्सद्दी नाना फडणवीस हे होत. हे दोनही प्रसिद्ध पुरुष मराठी राज्यांतील त्या काळच्या पुरुषांत अग्रगण्य होते, व मराठी राज्याभिवृद्धीला ह्या दोघांकडूनही पुष्कळ उपयोग घडला आहे. परंतु, ह्या दोघांच्या वर्तनांत अनेक दृष्टींनीं फार अंतर होतें. मराठी राज्यहितदृष्टीनें दोघांत श्रेष्ठ कोण ही गोष्ट कितीही वादास्पद असली, तरी पेशव्यांच्या त्या काळच्या यशाची मुख्य मदार पाटीलबावांच्या पराक्रमावर, शहाणपणावर व कर्तबगारीवर बऱ्याच अंशीं अवलंबून होती, हें कोणासही नाकबूल करितां यावयाजोगें नाहीं. सौजन्यामुळें पाटीलबावा नानांहून अधिक लोक-प्रिय झाले होते. शिवाय, महादजींच्या मरणोत्तर नानांनीं शिंद्यांच्या घराण्याशीं व रयाशतीशीं ठेवि-लेलें वर्तन बरेंच दूषणीय होतें. हें पुढील सविस्तर इतिहासावरून सुज्ञ वाचकांच्या लक्षांत येई-लच. तेव्हां, त्या दृष्टीनेंही महादजींची योग्यता अर्थातच श्रेष्ठ ठरते. पाटीलबावांच्या कारकीर्दींत सर्व गोष्टी बहुधा त्यांच्या मनोदयानुरूप होऊन गेल्या. त्यांच्या दराऱ्याखालीं कोणी वर डोकें करील व त्यांच्या इच्छेस प्रतिबंध करील, असा नव्हता. त्यांच्या मागून जिवबादादा होते तेथपर्यंत महा-दजी शिंदे गेले, असें कोणासही वाटलें नाहीं. सर्व कामकाजें पूर्वीप्रमाणें यथास्थित होत गेलीं.

परंतु, जिवबादादांचे पश्चात् मात्र पाटीलबावा वारल्यामुळें होणाऱ्या नुकसानीची जाणवी चोहोंकडे भासूं लागली. तावत्कालपर्यंत, ह्मणजे सन १७६१ पासून सन १७९६ पर्यंत, शिंदेशाहीचा एकसारखा उत्कर्षच होत गेला. आणि नानांच्या उत्तरावस्थेंतील दिवस त्यांना फार अपकर्षाचे गेले. तेव्हां, परिणामदृष्टीनेंही महादजींची योग्यता श्रेष्ठ ठरते. असो. इतका प्रस्ताव करून पाटीलबावांच्या पश्चात् जिवबादादांच्या मरणानंतर घडलेल्या एका अनर्थकारक प्रकरणाची वाचकांस आतां ओळख करून द्यावयाची आहे. यांत महादजींविषयीं नानांच्या मनांत वागत असलेला दीर्घद्वेष त्यांच्या हयातींत त्यांना साधतां येईना, ह्मणून त्यांनीं तो त्यांच्या मागून कसकसा साधला, तसाच शेणवी मंडळाविषयीं त्यांच्या मनांत धुमसत असलेला द्वेषाग्नि जिवबादादा जिवंत होते तोंपर्यंत तसाच अकृतकार्य राहून मागून कसकसा प्रदीप्त झाला, आणि त्यापासून पुढें किती अनर्थ कोसळले, हें वाचकांस सुसंगत समजेल. ह्या गोष्टींपैकीं कांहींचें वर्णन मागें १४ व्या भागांत आलेंच आहे.

महादजी शिंदे वारले, तेव्हां त्यांच्या मागें त्यांच्या तीन बायका होत्या. ते अकस्मात् वारल्यामुळें अंतकाळीं त्यांना स्वत: दत्तक घेतां आला नाहीं. ह्मणून तें काम त्यांच्या बायकांकडे आलें. महादजी शिंदे असतांना त्यांनीं स्वतःच दौलतरावांस दत्तक घेण्याचें ठरविलें होतें. परंतु, दुखण्यानें ते बेजार होऊन लौकरच वारल्यामुळें तो योग घडून आला नाहीं. पुढें, त्या संकेताप्रमाणें दौलतरावांस जिवबादादांनीं ताबडतोब आणून महादजींची वडील बायको लक्ष्मीबाई इजला त्यांस दत्तक देण्याची तयारी चालविली होती. परंतु, ती बाई दौलतरावास दत्तक कबूल करीना. कारण, आपलें महत्त्व दौलतराव ठेवील, असें त्या बायांस वाटेना. त्या वेळीं जिवबादादांनीं बायांची समाधानी करून त्यांचा इतमाम, मानमरातब वगैरे सर्व यथास्थित राखण्याची आह्मी हमी घेतों, असें सांगून त्यांची अनुमति घेतली. आणि मग यथास्थितपणें दत्तविधान होऊन दौलतराव हे शिंद्याच्या राज्याचे मालक झाले. ही हकीकत मागें येऊन गेलीच आहे. जिवबादादा असेपर्यंत त्यांनीं सांगितल्याप्रमाणें त्या बायांच्या मानमरातबाची व्यवस्था त्यांच्या पसंतीप्रमाणें उत्तम तऱ्हेनें ठेविली होती. महादजींचे पश्चात् दौलतरावांचे बालवयांत जिवबादादा हे मुखत्यारीनेंच सर्व राज्यकारभार पाहत असल्यामुळें त्यांनीं बायांचा कोणत्याही तऱ्हेनें असंतोष होऊं दिला नाहीं. तेव्हां, आपल्या खर्चासाठीं स्वतंत्र जाहगीर असावी असें त्यांस कधींही वाटलें नव्हतें. परंतु, जिवबादादा सन १७९६ सालीं वारल्यावर त्या बायांचा मानमरातब, इतमाम, खर्च वगैरे पूर्ववत् चालविण्याचे कामीं दौलतरावांकडून कुचराई होऊं लागली. ज्या दौलतरावांस दत्तक घेऊन साधारण स्थितींतून सोडवून त्यांनीं राज्याचा मालक केलें, त्यांस आतां त्याच बायांचा इतमाम चालविण्याचें कठीण वाटूं लागलें ! या संधीस बायांचा मुक्काम वानवडीस असून, मागील भागांत सांगितल्याप्रमाणें नाना फडणवीस कैद होऊन ते शिंद्याच्या लष्करांत होते. दौलतरावांकडे सरजेराव घाटग्याचें विलक्षण वजन पडत चाललें होतें. बायजाबाईस त्या बायांचें वर्चस्व नको होतें. त्यामुळें अर्थातच सरजेराव बायांचा द्वेष करूं लागला. शिवाय, शेणवी मंडळी 'पूर्व' स्मरून बायांचा चांगला मान ठेवीत असे. त्या मंडळीचें वर्चस्व सरजेरावास नको होतें. एवढी सोईची स्थिति मिळतांच फडणीस नानांनीं तसेच शिल्लक राहिलेले आपले हेतु साधण्याचा काबा लढविला. "नानांनीं शिंदे यांचे लष्करांत प्रवेश केल्यामुळें तेथें फाटाफाट होऊन महादजी शिंदे यांच्या बायका बाहेर निघाल्या. तें एक बंड झालें. पुढें पठाण निघाले. कंपूही निघाले. अशी लष्करची दाणादाण आपसां-

मध्यें झाली[1]." अशा रीतीनें नानांनीं शिंद्याच्या लष्करांतही फूट पाडून कलहाचें बीज पेरून ठेविलें. हें समजतांच शिंद्यानें नानांस तेथून काढून नगरच्या किल्ल्यांत नेऊन ठेविलें[2]. पूर्वी बायजाबाईचें दौलतरावांशीं लग्न होण्यास बायांची कबूली नव्हती. ही गोष्ट सरजेरावानें लक्षांत ठेवून शिंद्याचे कान भरून बायांस कांहीं देऊं नये, असा त्यांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न केला. त्या बायांत भागीरथीबाई म्हणून महादजी शिंद्यांची एक रूपवती तरुण स्त्री होती. तिजवर दौलतराव वाईट नजर ठेवितो असें महादजीच्या बाकी बायका म्हणत, असें ग्रांट डफ साहेब आपल्या इतिहासांत म्हणतात. त्यांत इतका मजकूर मात्र खरा दिसतो कीं, बायांची समजूत काढण्यासाठीं त्यांस दौलतराव आपले संनिध बोलावीत असत. परंतु, त्यांनीं हें दौलतरावांचें म्हणणें कधींच कबूल केलें नाहीं. यावरून दौलतरावांचे तावडींत सांपडणें सुरक्षित नाहीं, असें कोणत्या तरी दृष्टीनें त्यांच्या मनानें घेतलें होतें, असें दिसतें. पुढें, खर्चाची तोड मनाप्रमाणें लागेना व त्यांनीं कांहीं मागणी केली असतां त्यांस हव्या त्या वस्तु मिळेनात. सरजेरावानें तर त्यांचा अपमान करून त्यांस दुःख देण्यासही कमी केलें नाहीं. ह्या संबंधाच्या त्यांच्या कागाळ्या दौलतरावांकडे फार येऊं लागल्या. हें पाहून तुमचें काय म्हणणें आहे तें सांगा, म्हणून सरजेराव घाटगा "बळेंच बायांच्या राहुटींत शिरून त्या बायांस बाहेर ओढून कोरड्यांचा मार देता झाला." व पुढेंही "मारेकरी घालून जखमा केल्या." दैवगति विचित्र आहे ! ह्या बाया कोणाच्या ? ज्यांच्या नांवाचा डंका सर्व हिंदुस्थानांत गाजत होता, त्या परमप्रतापी अलिजाबहाद्दर माधवराव शिंद्यांच्या ! ! ज्यांचें नखही कोणाच्या दृष्टीस पडूं नये, त्या पडदानशीन राजस्त्रियांना यःकश्चित् पाटलानें असें बेदम मारावें, ही गोष्ट किती उद्वेगजनक आहे बरें ? ज्या दुष्ट घाटग्यानें हें अघोरकर्म केलें, त्याजवर दौलतरावांची इतराजी झाली नाहीं, हें तर काय, पण पुढें बाया दौलतरावांच्या दृष्टीस पडून आपल्या खर्चासाठीं नेमणूक करून मागण्यास न जातां त्या परभारेंच नेमणूक करून मागूं लागल्या, म्हणून शिंद्यानें जबरदस्तीनें त्यांची रवानगी अहमदनगरास बाबाजीराव पाटणकर यांजबरोबर करण्याचा बेत योजिला ! आणि बाह्यात्कारें, 'तुम्हांस बऱ्हाणपुरास नेऊन ठेवितों. व तेथें तुमच्या खर्चाची यथास्थित तरतूद करितों' असें बोलणें सरजेरावानें नारायणराव बक्षी यांजमार्फत बायांशीं लाविलें. तेव्हां, त्यासंबंधीं वाटाघाट चालून 'बऱ्हाणपुरीं सर्व व्यवस्था यथास्थित चालविल्यास, आपण तेथें जाण्यास कबूल आहों' असें बायांनीं

१. पेशव्यांची बखर पृष्ठ १७६ व पत्र नंबर २३१.

२. नानांनीं पेशवाईतील अत्यंत शहाणे व प्रसिद्ध मुत्सद्दी सखाराम बापू बोकील यांस कैद करवून त्यांचे पराकाष्ठेचे हाल केले. त्यांची खाण्यापिण्याची सुद्धां अत्यंत आबाळ केली ! त्या वेळीं त्या चतुर मुत्सद्यानें नगर येथील किल्लेदाराजवळ तेथून थारेपालट होऊन जातांना नानांस एक चिठी देऊन ठेविली होती. तींत "ज्या लोकांस पुढें करून तुम्हीं मला कैदेंत टाकिलें, त्याच लोकांकडून तुम्ही एकादे दिवशीं कैदेंत पडाल" अशा अर्थाचा मजकूर होता. शेवटीं, नाना कैद होऊन नगरच्या किल्ल्यांत आल्यावर त्या किल्लेदारानें सवड मिळतांच ती सखाराम बापूंची चिठी त्यांच्या हातीं दिली. त्या वेळीं त्या चतुर मुत्सद्याच्या दूरदृष्टीचें व शहाणपणाचें त्यांना आश्चर्य वाटून त्यानें केलेलें भविष्य खरें ठरलेलें पाहून ती चिठी आपल्या आंसवांनीं भिजविली ! भारतवर्ष.

३. या भागिरथीबाईस नगरास ठेविली होती. पत्र नंबर २९१.

४. पत्र नंबर २९१.

५. ग्रांट डफची बखर पृ. ३५८.

६. छत्रपति धाकटे रामराजे व शाहूमहाराज यांचें च. पृ. ७१.

नारायणराव बक्षी यांजकडून सरजेरावास कळविलें. मग, त्याप्रमाणें ठरून बायांची रवानगी वर लिहिल्याप्रमाणें पाटणकर यांजबरोबर त्यांच्या इतमामाप्रमाणें लोक देऊन केली. परंतु, यांत कपट होतें. आपल्यास बऱ्हाणपुरास न पाठवितां परभारें नगरच्या किल्ल्यांत पक्क्या बंदोबस्तांत ठेवण्याचा घाटग्याचा बेत आहे, हें बायांस समजलें. व ही गुप्त बातमी नारायणराव बक्षी यांनाही समजली. आणि त्यांनीं ती खरी आहे अशी आपली खातरी करून घेतली. तेव्हां, त्यांस फार वाईट वाटलें, व ह्मणूनच शिंद्याकडील शेणवी वगैरे मंडळीनें त्याबद्दल खलबत करून असें ठरविलें कीं, पाटीलबावांच्या बायकांचा पूर्वी अपमान झाला तो झाला. पण, पुढें सरजेरावासारखा दुष्ट मनुष्य त्या बायांस कैद करून त्यांचा छळ करणार आहे, सबब हरयुक्ति योजून आपल्या धनिनींचें रक्षण करणें, हें आपलें अवश्य कर्तव्य आहे, असे त्यांचे विचार चालले आहेत, तों नारायणराव बक्षी यांस बायांनीं आग्रहपूर्वक बोलावून नेलें. आणि त्यांस सांगितलें कीं, कै० वा० जिवबादादांनीं दौलतरावांकडून आमचा मान यथास्थित चालविण्याबद्दल हमी घेतली होती. व ते होते तोंपर्यंत नीट चाललेंही होतें. पण, आतां आमचा अशा प्रकारचा अपमान व विटंबना चालल्याचें तुह्मी जाणत असून स्वस्थ कसे राहिलां? दादांच्या मागें आमचे असे हाल झालेले तुह्मीं पाहावे, हेंच तुमचें कर्तव्य काय? असें ह्मणतांच बायांची ती दुःस्थिति पाहून नारायणरावांस फार वाईट वाटलें. परंतु, त्यांना बायांचा पक्ष घेऊन आपल्या धन्याविरुद्ध जाणें ही गोष्ट कठीण वाटूं लागली. त्यांचा असा अनमान पाहून बायांनीं त्यांना जेवायास जाऊं न देतां कोंडून ठेविलें. तेव्हां, त्यांना निरुपायानें तुमच्या पक्षानें आपण लागेल ती खटपट करितों व संकटांत तुह्मांला सोडणार नाहीं, असा शब्द देणें भाग पडलें. मग, बायांनीं नारायणरावांकडून तशी शपथ घेवविली, व नंतर नारायणराव आपल्या लष्करांत आले. नारायणराव बायांच्या पक्षाचे अभिमानी आहेत हें समजल्यावर बहुतेक सरदारांचें लक्ष तिकडेसच लागलें. पुढें, बायांची रवानगी नगराच्या रोखें होऊं लागतांच मुजफरखान नामें पठाणानें आपले लोक नेऊन त्यानें पाटणकरास कैद केलें[2], व तो बायांस घेऊन येऊं लागला. ही खबर शिंद्यांस लागतांच त्यांनीं आपल्या सरदारांत प्रसिद्ध केलें कीं, आह्मी बायांस बऱ्हाणपुरींच पाठवीत असतां मुझफरखानानें त्यांस परतवून आणिल्या. वास्तव, त्याचें पारिपत्य अवश्य केलें पाहिजे. मग, नारायणराव बक्षी, सरजेराव घाटगे व फकीरजी गाढवे यांजबराबर फौज देऊन त्यांची रवानगी मुझफरखानावर केली. हे सरदार लढाईस आल्याचें समजतांच त्या बाया "हत्तीवर बसून लढावयास आल्या. हें पाहून फौज उठोन बाईसाहेबाकडेस, मानकरी दरोबस्त गेले. तेव्हां यजमानांनीं मसलत केली जे, फौज गेली ती बक्षींचे मतें गेली. तेव्हां त्याचें डोकें मारावें अशी मसलत केली. तेव्हां जीव जगवावयास कोठें ठिकाणा नाहीं असें जाणोन रात्रीस मुलांमाणसांस पालखींत घालून चिरंजीव रावजी (नारायणराव बक्षी) सुद्धां श्रीमंत मातोश्रीबाईसाहेबांकडे रवाना केली." असें त्या वेळच्या पत्रांत लिहिलें आहे.

नारायणरावांस आतां तर बायांचा पक्ष स्वीकारण्याशिवाय दुसरी तोडच नाहींशी झाली. याप्रमाणें, शिंद्याच्या फौजेचे मुख्य सरदार नारायणराव बक्षी बायांच्या पक्षास मिळाले. तेव्हां वान-

---

१. पत्र नंबर २४५.

२. ग्रांट डफची बखर पृ. ३५८, व पत्र नंबर २५४।२५५. ३. पत्र नंबर २५४.

४. ग्रांट डफची बखर पृ. ३५८, पत्र नंबर २५५, छत्रपति थाकटे रामराजे व शाहूमहा. चरित्र पृ. ७१ व भारतवर्ष पु. २, अं. ६, पृ. १०.

वडीहून शिंद्याच्या लष्करांतील आणखीही कित्येक सरदार फौजेसह येऊन बायांस मिळाले. हें पाहून तर सरजेरावानें नारायणरावांचा नाश करण्याचा सक्त इलाज चालविला. शिंद्याच्या दरबारांत नारायणरावापुढें आपलें तेज पडत नाहीं, व नारायणरावांवर दौलतरावांचा लोभही तसाच विशेष होता, हें सरजेरावास अगोदरच सहन होत नसे. आणि त्यांत ही सोन्यासारखी संधि आलेली ! मग सरजेराव, शिंद्यांचा नारायणरावाच्या अगदीं विरुद्ध ग्रह करण्यास कशाला कमी करताहेत ! अशा प्रकारें दौलतरावांच्या मनांत त्यानें नारायणरावांविषयीं वैषम्य उत्पन्न केलें. दौलतराव बायजाबाईच्या संबंधानें सरजेरावाच्या केवळ मुठींत सांपडले होते. तेव्हां, खरा हितवाद सांगून धन्याचें मत बदलण्याचा नारायणरावांचा इलाज चालेना. शिवाय, आबा चिटणीस, यादवराव भास्कर व त्यांचे बंधु आणि नाना फडणविसांच्या तर्फेची कांहीं मंडळी हेही नारायणराव बक्षी इत्यादि शेणवी सरदारांच्या विरुद्ध दौलतरावांचा ग्रह करण्याविषयीं झटत होते[२]. दौलतराव केवळ अपोक्त असून त्यांना अनुभव अगदीं नव्हता. अर्थात् त्यांच्या ठिकाणीं दूरदृष्टीचा केवळ अभाव होता. तेव्हां, ह्या मंडळीचे सक्त प्रयत्न चांगले फलद्रूप झाले. नारायणरावांनीं दौलतरावांची दिलसफाई व्हावी व त्यांनीं पूर्ववत् आपल्यावर लोभ ठेवावा, ह्मणून शहाणपणाच्या युक्ति योजून पुष्कळ प्रयत्न केले. परंतु, ते सफल होण्याची आशा राहिली नाहीं. असें पाहतांच निराश होऊन ते आपला पक्ष मजबूद करण्याच्या प्रयत्नास लागले. श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांचे बंधु अमृतराव यांजकडे संधान बांधून त्यांस त्यांनीं आपल्या गोटांत आणिलें. “श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब यांजकडे येऊन भेटून त्यांच्या आपल्या एक विचारें कोरेगांवाहून कूच करून मुकाम मजकुरीं (थेऊर एथें) आलों. आपली फौज १५००० आहे व श्रीमंतांची आठ हजार, असे एकत्र आहों.” असें त्या वेळच्या पत्रांत लिहिलें आहे. हें वर्तमान हिंदुस्थानांत जगोबा बापू व लखबा दादा यांस समजतांच त्यांनीं नारायणरावांचे कनिष्ठ बंधु यशवंतराव भाऊ यांजबरोबर १५००० फौज देऊन बायांच्या मदतीसाठीं दक्षिणेंत त्यांची रवानगी केली. त्या वेळीं वानवडीस सरजेरावाच्या ताब्यांत दोन कंपू आणि तीन हजार फौज, इतकें लष्कर होतें. पुढें, खंडू कुंवर ह्मणून शिंद्यांचा सरदार वानवडीहून आपल्या लोकांसहित नारायणरावांकडे बायांच्या फौजेंत मिळण्यासाठीं येत होता, त्यास सरजेरावानें पकडून मेकसूं मारून ठार केलों. त्याचप्रमाणें यशवंतराव शिवाजी वागळे हे प्रसिद्ध सरदार, नारायणरावांच्या तर्फेचे आहेत अशी दौलतरावांची समज करून देऊन त्यांस अपघातानें धरलें आणि कपाळावर मेकसूं मारून ठार केलें. आणि झाडास टांगिलें[५].

“यशवंतराव शिवाजी वागळे हे शूर मर्दानी बहादर शिपायगिरीचे प्रकरणांत जाहाले.[६]” यांचें

१. पत्र नंबर २२६।२३०।२३१।२३२।२३६।२३८।२३९।२४२।२५८।२५९।२६३।२७३।२७९.

२. ह्या सर्व मंडळीचीं नांवें:—नाना फडणीस, आबा शेलूकर, सर्जेराव घाटगे, यादवराव भास्कर, मोरो हरी, अन्या भास्कर, फकीरजी गाढवे, बाणाजी हुजरे, रायाजी पाटील, बजाबा शिरवलकर, रामचंद्रपंत अंबाजी इंगळे, बाळोजी इंगळे, खंडोजी इंगळे, पेरण, डि. बॉयन, गणेशपंत नाना व बाळोजी कुंजर, ही मंडळी मुख्य होती.

३. पत्र नंबर २५५.

४. पत्र नंबर २५७ व ग्रांट डफची ब. पृ. ३६०.

५. छत्रपति धाकटे राम राजे व शाहू महाराज यांचे चरित्र पृ. ७२.

६. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७८।९२.

मूळ राहण्याचें ठिकाण कोकण प्रांतीं बंदर वेंगुर्लें हें होय. जिवबादादा उदयास आल्यावर हे त्यांच्या आश्रयास गेले. यांनीं माळवा, मेवाड, दिल्ली, रजपुतस्थान वगैरे ठिकाणीं लढाया मारून इतर शूर सरदारांप्रमाणें शिंद्यांच्या गादीची एकनिष्ठेनें सेवा केली. या गुणांमुळें जिवबादादांचें यांजवर फार प्रेम असे. त्यांनीं यांस आपल्या सत्वास जाहगिरीपैकीं कांहीं जाहगीर दिली होती.[1] वागळे यांचें घराणें पूर्वीपासून फार प्रतिष्ठित म्हणून गणलें जात आहे. हे हरदा वगैरे ठिकाणीं शिंद्यांतर्फे सुभे होते. त्या वेळीं नागपूरकर भोंसले यांच्या मुलखांत इतर शत्रु स्वाऱ्या घालून प्रांत लुटीत असत. तो त्यांजकडून उपद्रव होऊं नये म्हणून त्यांचे शत्रूचा यांनीं बंदोबस्त केला, तेव्हां भोंसल्यांनीं त्यांस इनाम गांव दिलेला चालत आहे. माळवेप्रांतीं नर्मदेचे कांठीं जळोदा एथें यांनीं एका बाजूस नर्मदा व बाकी तीन बाजूंस खणून खंदक करून त्यांत पाणी नर्मदेच्या पात्रासारखें घेऊन मध्यें आपला वाडा बांधिला होता व तेथें इतरांचे लहान मोठे असे पुष्कळ वाडे होते.[2] या यशवंतरावांनीं बनविलेल्या मजबूद व शोभिवंत ठिकाणास कृष्णाची द्वारका असें लोक मौजेनें ह्मणत. हे स्नानास जाऊं लागले ह्मणजे शिंग वाजे, व त्या वेळीं आजूबाजूचे सर्व लोक स्नानें करीत. यांच्या संबंधानें अशा पुष्कळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. अशा पराक्रमी व थोर पुरुषाचा असा दुःखद शेवट झाला[3] ! ही गोष्ट अत्यंत उद्वेगजनक होय.

हें भयंकर वर्तमान ऐकून बायांच्या तर्फेच्या नारायणरावादि सर्व सरदारांस अत्यंत वाईट वाटलें. पुढें, सरजेरावानें एकाएकीं बायांच्या लष्करावर छापा घातला. त्या वेळीं दोन्ही पक्षांची मातबर लढाई होऊन तींत सरजेरावाचा पूर्ण पराभव झाला. ह्मणून त्यानें वानवडीस पळ काढिला.

बायांच्या मदतीस गेलेल्या अमृतरावावर सरजेरावानें छापा घातला, ही खबर बाजीरावसाहेब पेशव्यास समजतांच त्यांस मोठा राग आला व त्यामुळें दौलतराव व बाजीराव यांजमध्यें वैमनस्य उत्पन्न झालें व त्या दोघांत लढाई होण्याचा रंग दिसूं लागला. बाजीरावानें आपला पक्ष खंबीर करण्याकरितां निजाम व टिपू यांजकडे संधान बांधून त्यांस आपलेसें केलें. पेशवे व शिंदे आणि शिंदे व त्यांचे सरदार यांत दुफळ्या माजून युद्धें होण्यापर्यंत मजल येऊन ठेपलेली पाहून वरील दोघे परकी राजे यांनीं बाजीरावास मदत देण्याचें मोठ्या खुषीनें कबूल केलें. हें चालत असतांच बाया व दौलतराव यांजमध्यें समेट व्हावा अशा घाटानें सरजेरावाकडून बायांकडे लोक जात येत असत. पण, सरजेरावाचा कावा केवल फौज फितविण्यापुरताच होता. त्या वेळच्या पत्रांत "समेट करावयास राजश्री पाटील (रायाजी पाटील) व लक्ष्मण जाधव ऐसे बोलावयास आले होते. महिना दोन महिने लष्करांत होते. त्यांनीं फितूर करून मानाजी मोरे व विठोजी शिंदे व तुळसाजी शिंदे व खंडेराव माने व हिंमत बाहादरखान बापूखान पागे व महंमदखान असे वानवडीस घेऊन गेले. हल्लीं काल परवां राजश्री आबा चिटणीस यांचा भाचा रामचंद्रपंत बोलावयास आले होते. त्यास बायांनीं सांगितलें कीं जुने कारभारी

---

१. पत्र नं. २५०.

२. ह्या वाड्यांपैकीं सन १८१७ । १८ सालीं पेंढाऱ्यांनीं कित्येक जाळले व कुणेकरकर वगैरे यांचे कांहीं वाडे होते, ते सन १८५७ चे बंडाचे वेळीं इंग्रज सरकारानें पाडिले. हल्लीं या जागीं फक्त हरिहरेश्वराचें मंदिर आहे. या बेटाचा असा नाश झाल्यामुळें हें आतां उदास दिसतें.

३. यांचे वंशज माळवे प्रांतीं सत्वास एथें राहतात. प्रस्तुत बळवंतराव पांडुरंग वागळे हे इंदूर एथें होळकर सरकारचे दिवाण व कौंसलर आहेत. यांजकडे शिंद्यांनीं दिलेली जाहगीरही चालत आहे. यशवंतरावादि चार बंधूंपैकीं पांडुरंग शिवाजी वागळे हेही शिंदे सरकारला बहुत उपयोगीं पडले होते.

एकत्र होऊन जें बोलणें असेल तें बोलोन ज्याप्रमाणें ठरावांत आणाल त्याप्रमाणें होईल. असा जाबंसाल जाहाला. तेव्हां ते आज माघारे जाणार आहेत[१]." "येथोन विठोजी शिंदे व मोरे वगैरे हजार बाराशें फौज वानवडीकरांकडे उठोन गेली. आणखीही फितूर चालला आहे[२]." असें पाहून नारायणरावांनीं मनांत आणिलें कीं, आतां एथेंच राहिल्यास फौज फुटेल. ह्मणून त्यांनीं आपल्या लष्करचा तळ हालविला. आणि कोल्हापुरचे महाराज आणि परशुरामभाऊ पटवर्धन यांची मदत घेण्यासाठीं ते निघून गेले. त्या वेळीं त्यांच्या लष्करांतून आलेल्या पत्रांत असें लिहिलें आहे. "महाराज करवीरवासी यांसीं आपली चौं कोसांची छटी आहे. त्यांच्या व इकडील आज उद्यां भेटी व्हावयाचें ठरण्यांत आलें आहे. राजश्री परशरामभाऊ येथून पन्नास साठ कोशांवर आहेत. त्यांचेही छावणींत कारकून, त्यांचें येणें लवकर व्हावें ह्मणून गेलेच आहेत. येणें जाहाल्यावर त्रिवर्गांचा एकोपा ठरून पुढील मसलतीची पैरवी केली जाईल. तोंपर्यंत एकत्र व्हावयास आठचार रोज लागतील, तों याच प्रांतांत मुकाम आहे[४]." नंतर, नारायणराव बक्षी, पटवर्धन व कोल्हापूरचे महाराज हे एकत्र होऊन सरजेराव घाटग्याशीं सामना देण्याकरितां वानवडीकडे वळले. "नंतर तो नारायणराव कृष्णेच्या उत्तरेस गोदावरीपर्यंत शिंद्याचे गांव लुटीत गेला. मग पुण्यासही येऊन कित्येक वाटा बंद करून तेथें शिंद्याच्या तळास उपद्रव देऊं लागला. ते वेळेस शिंद्याचे स्वार त्यांशीं लढावयास अशक्त होते[६]." ह्या सर्व जमलेल्या फौजेस खर्च भारी लागूं लागला. तेव्हां, नारायणरावांस खर्चाच्या तोडी ठिकठिकाणाहून पैसा आणवून कराव्या लागल्या. या वेळीं कोल्हापूर प्रांतांतील प्रसिद्ध गृहस्थ जनवाडकर यांनीं त्यांस पन्नास हजार रुपयांची मदत केली व शिंदे व त्यांचे हे सरदार यांत सलोखा व्हावा, ह्मणून वानवडीस जाऊन बोलणें लाविलें. शिंद्यांनींही बायांचा पक्ष प्रबल होत चालल्याचें पाहून सलोखा करण्याचा निश्चय केला आणि नारायणरावांकडे निरोप पाठविला कीं, 'आह्मी बायांची तोड काढितों. तोंपर्यंत चार दिवस तुह्मी लढाईचा प्रसंग आणू नका.' खुद्द यजमानाकडून हा निरोप आल्यावर नारायणरावांनीं युद्धाची तहकुबी केली. ह्यापुढें तह होऊन हा कलह मिटला. परंतु, बायांच्याच संबंधानें हिंदुस्थान प्रांतीं दरम्यान ज्या महत्त्वाच्या हकीकती घडल्या, त्या सांगून मग तहाबद्दलची हकीकत देऊं.

दक्षिणेंत बायांचें प्रकरण सुरू झाल्यानंतर हिंदुस्थानांतील आपले सरदार जगोबा बापू व लखबादादा लाड हे नारायणरावांस येऊन मिळतील आणि तेणेंकरून त्यांचा पक्ष सबळ होईल, तर तसें होऊं नये ह्मणून त्यांना तिकडेसच लढाईस गुंतवावें, असें दौलतरावांनीं मनांत आणून अंबाजी इंगळे, पेरू (पेरोन) आणि डि बॉयन यांस हिंदुस्थानची मुखत्यारी सांगितली. असें करण्यांत हेतु

१।२. पत्र नंबर २७५.

३. परशुरामभाऊंच्या पूर्वजांस पूर्वी आपत्काळीं विठ्ठलराव जनवाडकर या नांवाचे सारस्वत ब्राह्मण गृहस्थ होते त्यांनीं मदत केली होती. त्यामुळें, त्यांचा यांचा घरोबा होता, ह्मणून त्यांनीं परशुरामभाऊंकडून मदत देवविली, असें प्रसिद्ध आहे.

४. पत्र नंबर २८४.

५. पत्र नंबर २५७.

६. ग्रांट डफची बखर पृ. ३६४.

७. पत्र नंबर २९३ इ०

इतकाच कीं, सेनापति जगोबा बापू व नायब लखबादादा यांचा अधिकार कमी झाल्यानें ते तिकडेसच लढाईस गुंततील. ही हकीकत नारायणरावांकडून जगोबा बापूंस तत्काळ समजल्यामुळें ते मोठ्या सावधगिरीनें वागूं लागले. आपला अपराध नसतां श्रीमंत विनाकारण आपल्यावर फिरले. हा परिणाम सरजेरावादि मंडळींच्या शिकवणीचा आहे, व यापुढें आपली धडगत नाहीं, [illegible] त्यांच्या लक्षांत आलें. आणि त्यांनीं आपला पक्ष खंबीर करण्याचा प्रयत्न चालविला. त्यांनीं [illegible] रजप[illegible] राजांच्या फौजा आपल्या मदतीस येतील, अशी तयारी करून ठेविली. त्याचप्रमाणें [illegible]जकडून उप[illegible] रजपुतांकडून मदत मिळविली. इंगळ्यांच्या पक्षाकडे अंबाजी इंगळे, [illegible]ांत दिलेला चा[illegible] इंगळे, त्यांचा दिवाण गणेशपंत ह्मणून होता तो व वर लिहिलेले फिरंगी [illegible] तीन बाजं[illegible]

[illegible]घेला[illegible] प्रांतीं शिंद्यांचीं मुख्य ठाणीं सहा होतीं. तीं हीं:—मारवाड प्रांतीं अजमीर, माळवा [illegible] जावद, मेवाड प्रांतीं मंडोसर, शिवाय मथुरा, आग्रा व दिल्ली, एकूण सहा. या सर्व ठाण्यांनीं जगोबा बापू व लखबादादा यांची मुखत्यारी होती. तीं त्यांच्या कबजांतून आपल्या ताब्यांत घेण्याचा इंगळे वगैरे सरदारांनीं प्रयत्न चालविला. तो असाः—"मेवाड प्रांतीं राजश्री गणपत नाना, अंबाजी इंगळे तों जावद घ्यावयास आला. मग अजमीरचे सुभेदार (यशवंतराव भाऊ) व यशवंत बाबूराव (त्यांजवर) चढून गेले. मग सुभेदारांची व गणेशपंत यांची लढाई जाहली. तेव्हां तो पळाला. तेव्हां त्याच्या तोफा दोन (व) वीसएक माणसें ठार जाहालीं व जखमी पन्नास पाऊणशें जाहलीं. आपलेकडेस त्याच्या लष्कराचा सरंजाम घोडीं, उंट (वगैरे) बहुत लुटलें गेलें. दुसरें, बापू गुजराथेहून जावदेस आले. मागतीं गणेशपंत लढावयासी तयार जहाला. मग हेही स्वारी करून गेले. मागतीं लढाई घेतली. तो मागतीं पळून गेला. दुसरें, नंतर बहुतच खटलें लुटलें गेलें. आतां तो चितोडवाल्याचे पाठीस जाहला आहे[1]." याप्रमाणें आपल्या दिवाणाचा मोड जाहल्यानंतर अंबाजी इंगळे याचा धाकटा बंधु बाळोजी इंगळे लढाईस आला त्याविषयींचा मजकूर. "राजश्री लखबादादा सुरज भेलशास आले. तेणेंकरून अंबाजीचा लेजा भाऊ इंगळा आला. दहा हजार स्वार वगैरे फौजेनिशीं आला होता. तों दादांस हें वर्तमान कळतांच दादांचे फौजेनें जाऊन लुटून घेतला. लढाई दोन घटका झाली. मग तो पळून गेला[2]." याप्रमाणें इंगळ्यांचा पराभव झाल्यानंतर त्यांनीं कोटेवाले व चितोडवाले वगैरे यांची मदत मिळविली. त्या मदतीच्या लोकांसुद्धां इंगळे यांची फौज सुमारें सतरा हजार होती. लखबादादांकडेस दुर्जनसाल गिराशा याची सहा हजार व भोपाळवाले, तसेच देवगडवाले, खेचीवाले व खासगी, मिळोन तीस हजार फौज होती. याप्रमाणें तयारी झाल्यावर लखबादादांनीं, जगोबा बापू जावदेच्या बाजूस होते त्यांस ताबडतोब सारंगपुरीं येण्याविषयीं लिहिलें. त्याप्रमाणें जगोबा बापू आपल्या लष्करसहित थोड्याच अवकाशांत सारंगपुरीं येऊन दाखल झाले.

इंगळ्यांकडे वरतीं सांगितल्याप्रमाणें सतरा हजार फौज होती. त्याशिवाय, डि बॉयन व पेरोन ह्यांच्या हाताखालीं दोन कंपू ह्मणजे कवायतींत तयार असलेलें वीस हजार सैन्य जय्यत होतें. ह्या उभयपक्षांची मोठी लढाई होऊन, तींत जगोबा बापूंकडील लोकांपेक्षां इंगळ्यांच्या सैन्यांतील

१. पत्र नंबर २६९.

२. पत्र नंबर २६९.

बरेच लोक पडून त्याची खराबी झाली. तरी हें लढाईचें काम दोन महिने सुरू होतें. शेवटीं, इंगळे यांचा पराभव झाला. सलोख्याचें आमिष दाखवून वानवडीहून लोक जाऊन बायांचे लष्करांत फितूर करीत होते. तोच प्रकार ह्या लढाईंत हिंदुस्थानांत सुरू होता. हें फितवाफितवीचें काम अगदीं आरंभापासून चाललेलें होतें. या संबंधाची सविस्तर हकीकत तिकडील पत्रावरूनच देतों. "बापू व लखबादादा उज्जनीस होते तेथून दादा हिंदुस्थानांत जाण्यास गेले. राघोगडचें ठाणें दादानें घेतलें. तेथेंच मुकाम आहे. पिरू (पेरोन) व अंबाजी इंगळे एक होऊन ठाणें बसवीत आहेत. तेथून दिवाणे (पिरू व इंगळे) उभयतांवर लढाईस येणार असें होतें. त्याजवरून दादा पुढें जावयास गेले. बापू उज्जनीस होते. बापूंकडील फौज फुटली. व बाळोजी इंगळे व बापू शिंदे व सटवाजी फाळके हे फुटोन उलटे बापूंवर लढाईशीं आले. लढाई जाहली. त्यांणींच शिकस्त खाल्ली. आणी माघारे गेलें[1]." अशा रीतीनें "त्यांचा मोड होऊन मेवाडचे लगत्यास प्रतापगड देवल्याकडेस पळून गेले[2]." त्याचप्रमाणें दक्षिणेंत बायांकडे सलोख्याचीं बोलणीं होऊं लागलीं, ह्मणजे हिंदुस्थानांतही इंगळ्यांनीं सलोख्याच्या बोलण्यास आरंभ करावा. हा सलोखा मोठा ध्यानांत ठेवण्यासारखा होता. तो बापूंचे पत्रावरून समजून येईल. "अंबाजी इंगळे याचें पत्र आजच आलें आहे कीं, आतां आपसांत लढावें हें ठीक नाहीं. मी एका स्वारानिशीं आपले भेटीस येतों आणी गणेशपंत व डि बायन यांस लिहिलें कीं, 'लढाल तर ठीक नाहीं तुह्मीं जाऊन मिळावें.' येणेंप्रमाणें त्यांचें लिहिणें आलें. आण तुमचें आपच (स्वतःचे) चित्तांत अंदेशा कांहीं मागले गोष्टीचा असेल तर दरम्यान गंगाच आहे. परंतु त्याचा विश्वास येत नाहीं. मागां पांच चार वेळां गंगा देऊन दगा केला आहे परंतु त्याचे परिमाणीं गंगाच आली! गणेशपंताचें व फिरंगी याचें लष्कर, बाजार लढाईचे रोजीं पर्जन्य पडून वाहून गेलें आण शाहापूरवाला रसद त्यास देत नाहीं ह्मणून गंगा उचलून दिली. आण रसद देत गेला. त्याचा शाहापुरा वाहून गेला! बाराशें घर बुडालें. लाखों रुपयांचा खराबा जहाला. ईश्वरसत्तेकरून इंगळे यास गंगा प्रसन्नच आहे[3] !" अशाप्रकारें आपसांत हे कलह सुरू झाल्यामुळें इतर लोकांस शिंद्याच्या मुलखांत दंगा करण्यास सहजच सवड मिळाली. "मेवाडांत रांगड्यांनीं फौजेचा मेळ करून, राजश्री भास्कर अनंत राजश्री लखबादादाकडोन मेवाडच्या कामावर होते, त्यांसीं लढाई घेऊन (भास्कर अनंत) यांजला रांगड्यांनीं लुटून घेतलें. आतां जावदेकडेस बखेडा करणार आहेर्त." असा चोहोंकडे दंगा माजला. त्याचप्रमाणें यशवंतराव होळकरांनींही शिंद्याच्या मुलखावर स्वाऱ्या घालण्याची सुरुवात केली. त्याचें कारण वेगळें होतें. तें पुढील हकीकतीवरून कळून येईल.

तुकोजीराव होळकर मरण पावले, तेव्हां त्यांच्या गादीविषयीं त्यांच्या मुलांत तंटा लागला. तुकोजीरावांना काशीराव, मल्हारराव, यशवंतराव व विठोजी असे चार पुत्र होते. त्यांत काशीराव वडील. त्याला गादी मिळण्याचे कामीं मल्हारराव आड येऊं लागला, व बाकीचे दोघे भाऊ त्यास मदत करूं लागले. काशीरावानें आपल्यास गादी मिळावी, ह्मणून दौलतराव शिंद्याकडे मदत मागितली. ती त्यांनीं तत्काळ कबूल केली. व होळकरांच्या राज्यकारभारांत हात घालण्यास ही संधि बरी आहे, असें मनांत आणिलें. तेव्हां, "बाळोबा तात्यांनीं दौलतराव शिंद्यास बुद्धिवाद फार केला कीं होळकर कोण? आपण कोण? अडचणीचे प्रसंगीं त्यांजकडून आपला उपयोग कोणे समयीं कसा जाला, व गोपाळराव

१।२. पत्र नंबर २७४. ३. पत्र नंबर २९३. ४. पत्र नंबर २२६.

चिटणीस यांणीं आगळीक करून शिंदे होळकर यांचा दुजागी राजे रजवाड्यांत दाखवून होळकराची कमती पाडली. यांत नुकसान किती जालें? त्या राजागानें पाटीलबोवांचें अवसानच जालें. तुकोजी-बोवांस व अहल्याबाईस तोंड दाखविलें नाहीं[1]. या गोष्टीचें पाहणें, राखणें, जोखणें, त्यांचे त्यांचे बरोबर जाऊन आपण पुढें गौण राजकारणांत सामल होऊन होळकराची दौलत शिंद्यांनीं बरबाद केली हें ठिकरें आपल्या माथ्यावर घेऊन पुढें आपण होळकर बुडाल्यावर आपणही राहूं असें होणार नाहीं[2]." याप्रमाणें उपदेश केल्यावर होळकरांच्या कारभारांत विशेष मन न घालतां वडीलहक्काप्रमाणें काशीरावास गादी देवविली. काशीरावास मल्हाररावाचा त्रास असून त्यास चिथविण्याचे कामीं नानाफडणविसांचें आंतून अंग होतें[3]. ह्मणून दौलतरावानें मल्हारराव होळकरास जिवंत धरून आणण्यासाठीं आपलें लष्कर पाठविलें[4]. त्यांची यांची लढाई होऊन तींत मल्हारराव जिवंत न सांपडतां गोळी लागून ठार झाला, व त्याचे बंधु यशवंतराव व विठोजी हे पळून गेले. यशवंतराव नागपुरास जाऊन राहिला होता. तेथें दौलतरावांच्या सांगण्यावरून त्यास नागपूरकर भोंसल्यांनीं कैद करून ठेविलें[5]. परंतु, त्यानें सवड साधून तेथून पोबारा केला, आणि माळव्यांत जाऊन मोठी फौज जमा करून शिंद्याच्या मुलखांत धुमाळी मांडली. शिंद्याच्या सरदारांत आपसांत लढाया चालूच होत्या. त्यांत हा आणखी बाहेरील शत्रु उत्पन्न झाला. तेव्हां, त्याजपासूनही राज्याचा बचाव करण्याचें काम ह्या सरदारांस झटून करावें लागलें. होळकरांच्या व ह्या सरदारांच्या लहान लहान टोळ्यांच्या लढायाही होऊं लागल्या. तेव्हां, यशवंतराव होळकरानें मनांत आणिलें कीं, आपला लाग साधण्याच्या कामीं हरकत आणणाऱ्या जगोबा बापू, लखबादादा व यशवंतराव भाऊ ह्या पराक्रमी सरदारांशीं तूर्त दौलतरावांचें वांकडें आहे, तेव्हां त्यांना युक्तीनें आपल्या पक्षाकडे वळवून घेतल्यास आपलें प्राबल्य वाढेल, व शिंद्याचे प्रांतही आपल्यास जिंकून घेतां येतील. असें ह्मणून त्यानें ह्या सरदारांस आपल्या पक्षाकडे येण्याविषयीं वकील पाठविले. त्या बाबतींत यशवंतराव भाऊनें लिहिलेलें पत्र. "(यशवंतराव) होळकर व मेवाडवाले श्रीराणाजी यांणीं आह्मांस बोलावणे करितां वकील पाठविले. ते येऊन बसले आहेत. खर्चाची सरबरा उभयतांकडूनही होत आहे[6]." परंतु, ह्या बिकट प्रसंगींही हे खरे बाणेदार पुरुष

१. होळकरांचे कैफीयतकार असें ह्मणतात खरें. परंतु, शिंदहोळकरांत झालेल्या ह्या लढाया केवळ सरदारांनींच केल्या, पाटीलबावांची ह्या कामीं संमति नव्हती, असें जें ह्यांत भासविलें आहे, तें खोटें आहे. खुद्द पाटीलबावांच्याच हुकुमानें ह्या लढाया चालल्या होत्या व परस्पर शुद्धांतःकरण नसल्यामुळें त्या उद्भवल्या होत्या, हें पुढील पत्रव्यवहारावरून कळून येईल. पहा पत्रें नंबर १००।१०२।१०३.

२. होळकरांची कैफीयत पृ० ७३.

३. ग्रांट डफची बखर पृ. ३५०. मल्हाररावास "गुप्तरूपें नाना अनुकूल होता."

४. "मल्हारराव होळकरास जिवंत धरून आणावें ह्मणून दौलतराव शिंद्यानें आपले कारभारी जिवबादादा यांस सांगितलें. जिवबादादा होळकरावर स्वारी करून निघाले. ही बातमी मल्हारराव होळकरांस कळली मात्र तोंच ते देवपूजा टाकून लाख्या बारगिरास बरोबर घेऊन लढाईस निघाले.XX जिवबादादास मागें पंचाईत पडली कीं यांस जिवंत धरावें कसें! यांचा तर अपराध नाहीं मग शस्त्र तरी कसें टाकावें? इतक्यांतXXमल्हारराव होळकरही घोड्यावर बसून मोठ्या शौर्यानें लढत असतां छातींत गोळी लागून पडले." पहा आक्वर्थसाहेबकृत पोवाड्यांचें पु. पृ० २१४. पण, ह्या लढाईंत जिवबादादा असल्याबद्दल इतरत्र कोठें आधार नाहीं.

५. ग्रांट डफची बखर.

६. पत्र नबरं ३३०.

शिंद्यांस सोडून दुसऱ्या कोणाकडे गेले नाहींत. ह्यांचा बाणेदारपणा व ह्या वेळची आणीबाणीची स्थिति ह्यांचें अनुमान पुढील पत्रावरून करितां येईल. "आज पांच सहा महिने इंगळेकडील फौज व आह्मांशीं लढाई होत आहे. या मागें दोन चार लढाई जाहाल्या त्यांत कैलासवासी महाराजे (महादजी शिंदे) व वडील (जिवबादादा) यांचे आशीर्वादें आपलीच फत्ते जाहली[1]. आतां सर्व मराठे एकत्र होऊन आह्मांशीं लढतात. बेवीस रोज नित्य तोफांची लढाई होते आहे. शंभर तोफ आहे. आपले जवळ पन्नास साठ तोफा आहेत. तोफा सोडून बाहेर निघत नाहींत. जेव्हां बाहेर येतील ते वक्तीं घोडे चालवून लुटून घेऊं. चिंता नाहीं. त्यांजकडे पलटणचें माणूस फार आहे. आण घोडेवरील स्वार थोडके. आह्मांकडे पलटणें थोडीं आणि घोडेवरील स्वार फार आहेत. आमची जरब त्यांजवर आहे.××उदेपूरचा राणा याजकडील फौज व पायदळ आपलेकडे आहे[2]." याप्रमाणें शिंदेशाहींत घोटाळे चालले होते. व हे प्रकार पाटीलबावा व जिवबादादा हयात नाहींत या गोष्टीची स्वच्छ रीतीनें साक्ष पटवीत होते! असो.

या प्रसंगीं दौलतराव शिंद्यांवर मोठाच पेंच येऊन पडला होता. कारण, बाजीराव पेशवे त्यांना वांकडे झाले होते, बाजीरावांचीं निजाम व टिपू यांजकडे सूत्रें लागलीं होतीं, हिंदुस्थानांत रांगडे व यशवंतराव होळकरांच्या स्वाऱ्या सुरू होत्या आणि वरतीं दाखविल्याप्रमाणें मोठा गृहकलह माजलेला होता. यामुळें दौलतरावांच्या राज्यांत अगदीं अव्यवस्था झाली. तेव्हां, ह्या सर्व गोष्टी सरजेरावामुळें घडून आल्या, अशी त्यांची खातरी झाली. ह्मणून, सरजेराव व त्याचे साह्यकर्ते यांस कैद करून बाजीरावांस दहशत बसविण्यासाठीं व त्याचप्रमाणें हें बायांचें प्रकरण सोईनें मिटविण्यासाठीं नाना फडणविसांस कैदेंतून सोडवावें, अशी त्यांनीं फिरंगी सरदारांच्या मसलतीनें तोड काढिली. आणि लगेच ती अमलांत आणिली. त्यासंबंधानें तिकडील पत्रांत पुढील मजकूर आहे. "फकीरजी गाढवे व सर्जेराव घाटगे व यादव भास्कर व त्याचा बंधु यांसही मुकेल फिरंगी याच्या मुलानें धरून कैद केले आहेत. सर्जेराव घाटगे व फकीरजी गाढवे यांच्या मुसक्या बांधून बाजारांतून बंदुकीच्या कुंपणानें मारीत पलटणांत घेऊन गेले. आणि तेथें शेतखान्यांत कोंडून एक रोज ठेविले होते. दुसऱ्या दिवशीं बाहेर काढून पाऱ्यांत ठेविले. यादवराव भास्कर व त्याचा बंधु यासीं पलटणींतून आणून सरकारवाड्यापाशीं आणून भास्कर यांस पाऱ्यांत ठेविलें[3]." आणि "नाना फडणवीस यांसी नगराहून आणून छावणींत फिरंगी याच्या ठेविला होता. त्यास ह्या उभयतांस कैद केल्यावर त्यास मोकळा केला."

ह्याप्रमाणें नाना फडणविसांची कैदेंतून सुटका झाल्यावर त्यांनीं हें प्रकरण मिटविण्याचे बाबतींत ह्मणून जे प्रयत्न केले, त्यांपासून उपयोग न होतां तें तसेंच भिजत पडलें व नानांची इच्छाही हा कलह निकालास लावण्याची नव्हती, असें दिसून आलें. पुढील पत्रांतील हकीकतीवरून ह्या बाबतींतील नानांच्या दुटप्पी वर्तनाबद्दलची खातरी होईल. 'आबा चिटणीस सलूखासाठीं आले होते परंतु ते

१. हे शेणवी सरदार स्वलाभासाठीं दौलतरावांच्या विरुद्ध झाले नव्हते. कै० पाटीलबावांच्या ठिकाणीं जर त्यांच्या पश्चात् अशी (घराकडील खासगी पत्रांतही) स्वामिनिष्ठा दृश्यमान होत होती, तर दौलतराव खऱ्या बाण्यानें चालल्यास हे त्यांजविरुद्ध जाते, असें क्षणभर सुद्धां मानतां येणार नाहीं. २. पत्र नंबर २८८.

३।४. पहा पत्र नंबर २५८.

नानाचे तर्फेचें* बोलतात तेव्हां सलूख होईलसा दिसत नाहीं!' परंतु, नारायणरावांस ते 'तुमच्याच ह्मणण्याप्रमाणें तहाचें काम पुरें करूं या' असें भासवीत असत. मात्र, नारायणरावांचा त्यांजवर विश्वास नव्हता, असें तिकडील पत्रावरून दिसतें. 'नानाचें मत आमचेकडे आहे! परंतु परिणामीं कोणत्या थरास गोष्ट जाते पहावी.' अशाप्रकारच्या नानांच्या खटपटींमुळें हा तंटा मिटविण्याचें काम त्यांजकडून शेवटास जाण्याचें चिन्ह दिसेना. अशा अडचणींत दौलतरावांनीं ह्या संधीस नवे नेमलेले कारभारी रायाजी पाटील व आबा चिटणीस यांस आतां पुढें हा तंटा मिटविण्यास काय युक्ति करावी, असा सल्ला विचारला. तेव्हां, त्यांनीं स्वस्वार्थाकडे नजर न देतां शहाणपणाची अशी मसलत सांगितली कीं, 'कारभारी बाळोबा तात्या यांस कैदेंतून मुक्त करून त्यांजला कारभार सांगावा, ह्मणजे ह्या गोष्टीची तोड निघेल.' ही गोष्ट दौलतरावांस पसंत पडून त्यांनीं बाळोबा तात्यांस पलटणें, फौज वगैरे सामोरें पाठवून मोठ्या समारंभानें नगराहून आणविलें. बाळोबा तात्या येऊन आपलें काम पाहूं लागतांच शिंद्याच्या राज्यांत ज्या अव्यवस्था माजून राहिल्या होत्या, त्यांस आपेंआप हळू हळू आळा पडत चालला. बाळोबा तात्या हे उत्कृष्ट मुत्सद्दी असून पाटीलबावांचे सर्व कारकीर्दींत त्यांनीं चांगल्या प्रकारें कारभार हांकिला होता. अशा शहाण्या कारभाऱ्यास हलकट व अनुभवशून्य लोकांच्या सांगीवरून कैद केल्यापासून आपल्या राज्यांत हे घोटाळे माजून राहिले, व ते येतांच जिकडे तिकडे पूर्ववत् 'बस' बसण्यास आरंभ झाला, हें पाहून दौलतरावांस समाधान वाटलें. आणि तात्यांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें जेव्हां बायांचा कलह मिटविला, तेव्हां तर त्यांच्या डोक्यांत चांगलाच प्रकाश पडला. तो मजकूर पत्रांतूनच देतों. "समेटाविशीं वानवडीहून राजश्री तात्या पागनीस व आबा चिटणीस व बाबूराव आंग्रे व कंपूवाले फिरंगी असे पुसासावलीचे मुकामीं आले होते. बोलणें जाहालें. ×× ठराव ह्मणाल तर श्रीमंत बायांस आशेरचा किल्ला द्यावा. आण अकरा लाखांची जाहागीर बऱ्हाणपूर व सरकारहुंडा व जाहानाबाद असे व आणखी मिळोन अकरा लक्षांचे महाल द्यावे. आणि बायांची खासगी वस्तभाव जवाहीर वगैरे जें आहे तें द्यावें. रावजींनीं (नारायणराव बक्षी यांनीं) वानवडीस पहिलेप्रमाणें कामकाज करावें. आणि भाऊंनीं (बाळाभाऊ बक्षी यांनीं) बरोबर असावें. अगर वानवडीस पहिल्याप्रमाणें काम करावें. ×× रावजींस वीस हजारांची जाहागीरी व भाऊंस दहा हजारांची द्यावी असें ठरविलें." याप्रमाणें ठराव झाल्यावर बाया व त्यांचे कारभारी बाळाभाऊ हिंदुस्थानांत जाहागिरीचे ठिकाणीं जाण्यास निघाले. रस्त्यांत उज्जनीचे सुमारें जाऊन पोहोंचतात, तों "मातोश्रींचा (बायांचा) मुकाम आणि (यशवंतराव) होळकराचा मुकाम जवळ होता. लष्करास लष्कर लागूनच होतें. दगा करील हें कोणास ठाऊक? पहांटेस छापा घालून चीजवस्त झाडून (सारी लुटली.) यशवंत बाबूराव व घनबा दादा व आनंदराव मळगांवकर व सखोबा दादा व साबाजी नारायण यांची बहुत खराबी झाली. परंतु जिवानिशीं आले. चिंता नाहीं. पुढेंही ईश्वरें कृपा केली तर सर्वच मिळेल. त्या गडबडींत एक लखबा वागळा

*" आंतून बजाबाचें बोलणें नाना फडणीस याचे तर्फेचें करोन हा हेतकार उभयतांचा समेटास आले. ×× दोन तर्फा हितशत्रुपणा आहे तेव्हां समेट होईल तेव्हां खरें!" पत्र नं. २६३.

१।२. पहा पत्रें नंबर २६२।२६५. ३. ग्रांट डफची बखर पृ. ३६५.

४. बाळोबा तात्यांस किल्ल्यांतून आणवून त्यांजकडे पूर्ववत् कामकाज सांगावें, असा विचार ठरून बोलावणेंही गेल्याचें मागील चौवदाव्या भागांत लिहिलें आहे. परंतु, त्या वेळीं ते कां सुटले नाहींत, ह्याचा खुलासा समजला नाहीं.

५. पत्र नंबर २९१. ६. हो. कै. पृ. ८२.

यास तोफेचा गोळा लागून ×× (त्याचा) काळ जाला." याप्रमाणें रस्त्यांत हरकत झाल्यामुळें बऱ्हाणपुराकडे न जातां शाहाजापूर, प्रांत माळवा, एथें जगोबा बापू होते, तिकडे जाण्यासाठीं हें बायांचें लष्कर निघालें. इतक्यांत मेवाडाहून लखबादादा येऊन त्यांनीं होळकरांचा व यांचा समेट केला. मग बाया निर्विघ्नपणें मुकामास गेल्या.

याप्रमाणें बाळोबा तात्यांनीं सर्व लढे व अव्यवस्था मोडून शिंद्याच्या राज्यांत सर्वत्र शांतता केली. उत्तरहिंदुस्थानांत या बायांच्या प्रकरणासंबंधानेंच ज्या लढाया चालल्या होत्या, त्या एकदम बंद करून पूर्ववत् जगोबा बापू व लखबादादा यांच्या हाताखालीं काम करावें, असा अंबाजी इंगळे वगैरे सरदारांस दौलतराव शिंद्यांचा हुकूम गेला. व नारायणराव बक्षी वानवडीस येऊन दौलतरावांकडे दाखल झाले. ही गोष्ट सन १८०० च्या फेब्रुआरींत घडली.

बाळोबा तात्यांनीं हे आपसांतील लढे मोडल्यानंतर त्यांचा व नाना फडणवीस यांचा–एकोपा होऊन–यापुढें मराठी राज्य कोणत्या धोरणानें व व्यवस्थेनें चालवावें, ह्या संबंधानें विचार चालला. आणि उभयतांनीं इंग्रज, निजाम, कोल्हापूरकर वगैरे सरकारांकडे कशाप्रकारें वागावें, ह्याबद्दल नियम ठरविले. व त्याप्रमाणें व्यवस्था केली. त्या वेळीं हे दोनच मुत्सद्दी संपूर्ण मराठी राज्यांत कर्ते राहिले होते. हा सलोखा उभयतांसही भूषणभूत होता.

शिंद्यांच्या राज्यांत आपसांत लढाया सुरू झाल्यामुळें रजपुतांकडून खंडणीचा पैसा आला नाहीं. पण, आतां त्या पैशाच्या वसुलासाठीं ह्या प्रतापी सरदारांनीं कंबर बांधिली. पहिल्यानें "लखबादादानें मेवाडावर चोवीस लाख रुपये खंडणी आकारून त्याप्रमाणें ती त्यानें शस्त्राचे जोरानें वसूल केली. आणि नंतर तो मेवाडांतून जयपुराकडे गेला. जातांना त्यानें आपला मुखत्यार ह्मणून यशवंतराव भाऊ यास मेवाडांत ठेविलें."

बायांचें प्रकरण मिटून पुरे दोन महिने झाले नाहींत, तोंच नाना फडणवीस हे ता० १३ मार्च सन १८०० रोजीं मृत्यु पावले. नाना फडणवीस हे मराठी राज्यांतील त्या काळच्या मुत्सद्यांत अग्रगण्य होते. त्यांच्या आंगीं निःसंशय पुष्कळ चांगले गुण होते. त्यांची कारकीर्द अनेक प्रकारच्या महत्त्वाच्या राजकीय भानगडींत खर्च झालेली आहे. त्यांचें अटोकाट शहाणपण, विलक्षण धोरण, अपूर्व स्मरणशक्ति, स्वराष्ट्र व परराष्ट्र यासंबंधीं कारस्थानाची व लेखांची शैली, हीं वर्णनीय होतीं. पेशव्यांच्या राजवृद्धीविषयीं त्यांचे प्रयत्न अगदीं कळकळीचे असत. ब्राह्मणबादशाहीचा

१. पत्रें नंबर ३१२।२९९.

२. होळ. कै. पृ. ८२।८३.

३. पत्रें नंबर २९०।२९६.

४. ग्रांट डफची बखर पृ. ३६६.

५. लोकहितवादिकृत उदेपूरचा इतिहास पृ. २८३.

६. नाना फडणीसांनीं पेशवाईचा कारभार चालवीत असतां सर्वत्र चांगली व्यवस्था ठेविलेली होती. त्यामुळें राज्य भरभराटींत होतें. सर्वत्र गुप्त हेर ठेऊन मोठ्या धोरणानें राज्यकारभार चालविल्यामुळें त्यांचें शहाणपण बरेंच व्यक्त होतें. शिवाय, ते विद्यमान होते तोंपर्यंत इंग्रजांचा किंवा दुसऱ्या कोणाचाही मराठी राज्यांत ह्मणण्यासारखा पगडा बसला नाहीं, असा जो लोकप्रवाद आहे, त्यांत बरेंच तथ्य आहे. त्यांजमधील दोषांच्या दुष्परिणामाचा विचार न केल्यास त्यांचे गुण विशेष तेजायमान दिसतात.

त्यांस मोठा अभिमान होता. त्यांनीं आपला दरारा बहुतेक सर्वत्र कायम ठेविला होता. त्यांच्या ठिकाणीं तेजस्विताही तशीच होती. "नाना फडणवीस पुण्याचे दरबारांत नामांकित एकछत्र हुकमाखालीं श्रीमंत सवाई माधवराव साहेब यांचे कारकीर्दीत पुण्याचे संस्थानांत कार्यकर्ते मुखत्यार कुळी नाना फडणीस दक्षिणेंत आजवर ज्याचे शहाणपणाचा मोठा लौकिक, ज्यांणीं सवाई माधवरावसाहेब पेशवे गर्भांत असतां जन्मास येण्यापूर्वीं श्रीमंत गर्भवासी ह्मणून मुलखांवर रोखे चालवून एकछत्र राज्य हुकुमाखालीं चालविलें असा ज्यांचा प्रताप[1]." त्यांना राजकीय कामांत वहिवाट पाहण्याचा आनुवंशिक संस्कार असून, शिवाय "रामचंद्र बाबा या धुरंधर मुत्सद्याचीं उदाहरणें त्याच्या नजरेसमोर होतीं[2]." तेणेंकरून त्यांना एवढा लौकिक कमावितां आला. पण, अशा पुरुषाच्या ठिकाणीं जे कित्येक दुर्गुण वास करीत होते, ते नसते व यांनीं सर्वत्र समभाव ठेविला असता, तर त्यांची कारकीर्द अत्यंत वर्णनीय झाली असती. परंतु, महाराष्ट्राचें दैव तशा प्रकारचें नव्हतें, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. यांच्या कारकीर्दीच्या उत्तरावस्थेंत महाराष्ट्रास-बऱ्याच अंशीं यांच्या दोषांपासून-अवनतीचा अनुभव घ्यावा लागला. " या फार धूर्त, खोल व अभिमानी परंतु मैत्सरी[3] आणि भित्र्या मुत्सद्यानें × पुढें (सन १७९६–१८००) पेशव्यांशीं जें वर्तन सुरू केलें त्या योगानें लोकांच्या प्रीतीस पात्र झालेल्या तरुण व तेजस्वी राजपुत्राला आत्महत्या करावी लागली! तरी सुद्धां नानाचे डोळे उघडले नाहींत व ब्राह्मणशाहीच्या खोट्या अभिमानानें काळवेळ न पाहतां त्यानें जीं कारस्थानें पुढें (उतारवयांत) केलीं त्यांच्या योगानें पेशवाई रसातळास गेली[4]." असो. नाना वारल्यावर त्यांस पुत्रसंतान नव्हतें, यासाठीं त्यांस दत्तक देऊन त्यांचें घराणें चालवावें ह्मणून श्रीमंत दौलतराव शिंदे यांनीं खटपट चालविली[5]. नानांच्या पश्चात् त्यांच्या कुटुंबाशीं कोणीं द्वेष ठेविला नाहीं.

याप्रमाणें दक्षिणेंतील वर्तमान असतां उत्तरेस अंबाजी इंगळे यांस बायांचा सलूख झाला, वगैरे बाबतींत जो दौलतरावांचा हुकूम झाला होता, त्याप्रमाणें ते न वागतां जगोबा बापू व लखबादादा यांपासून अलग राहूं लागले[6]. आणि ह्याच संधीस बायजाबाईच्या सांगण्यावरून दौलतरावांची तब्यत पुनः फिरून त्यांनीं पूर्वीं कैद केलेले सर्जेराव घाटगे व गाढवे वगैरे ह्यांस सोडिलें[7]. त्यामुळें बायांच्या प्रकरणीं पुनः कलहास सुरुवात झाली! दौलतरावांच्या बुद्धीची अस्थिरता इंगळे वगैरे सरदारांनीं ओळखलीच होती. ह्मणून त्यांनीं पूर्वीच्या हुकुमाचा अनादर केलेला आज त्यांच्या केवळ्या पथ्यावर पडली[8]! इंगळे वगैरे सरदारांनीं राघोगड व आग्र्याचा किल्ला हल्ला करून आपल्या ताब्यांत

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७७.

२. खरेकृत नाना फडणविसांचें चरित्र पृ. २३.

३. १४ व्या भागांतील या संबंधाचीं पत्रें नं. २७३।२३०।२३८।२४४।२४६।२६६।२७९।३०१।४२०।२२६ २३१।२३२।२३६।२३९।२४२।२५८।२५९।२६२। २६५।३६३.

४. नातूकृत महादजीचें चरित्र पृ. २५३.

५. पद्दा पत्र नंबर ४२२.

६. पत्र नंबर १९०.

७. पद्दा पत्रें नंबर २८१।२८३.

८. दौलतरावांच्या कारकीर्दीचा जो एथवर इतिहास दिला आहे, तेवढ्यावरूनही त्यांच्या योग्यतेविषयीं व अस्थिर बुद्धीविषयीं आह्मीं ठिकठिकाणीं केलेलीं अनुमानें किती यथार्थ आहेत, हें वाचकांस सहज कळून येईल.

घेतला, हें वर्तमान समजतांच जगोबा बापूंनीं फौज देऊन लखबादादांची तिकडे रवानगी केली. त्याप्रमाणें त्यांनीं जाऊन आग्र्याचा किल्ला व राघोगड हीं ठाणीं घेतलीं, व आग्र्यावर पेरणचीं माणसें होतीं तीं धरून कैद केलीं. हें हिंदुस्थानांतील वर्तमान समजतांच दौलतराव तिकडे जाण्याची तयारी करूं लागले. ही सर्व धरसोड व बाचाबाची पाहून शिंद्याच्या कंपूवरील पोर्च्युगीज सरदार डि बॉयन, हा शिंद्याची चाकरी सोडून युरोपास गेला.

शिंद्याच सरदार आज चार पांच वर्षें आपसांत लढून बलहीन झालेले आहेत. तेव्हां, खंडणीच्या वसुलासाठीं जें शिंद्याचें लष्कर येत आहे, त्यास नामोहोरम करून पाठवून, ही कटकट कायमची काढून टाकावी, असें मनांत आणून "जयपूरवाले सर्व रजवाडे घेऊन लढाईस एकत्र होऊन आले कीं, खंडणी देऊं नये; दक्षिणी अमल उठवून आपला पराक्रम करावा." अशाप्रकारें बेत करून जयपूरवाले व मारवाडवाले यांनीं मोठा सरंजाम सिद्ध केला. आणि ते जयपूर संस्थानांत मालपुरा ह्मणून महाल आहे, तेथें येऊन ठेपले. तों इकडून जगोबा बापू व लखबादादा यांनीं आपल्याही सैन्याची मोठी सिद्धता केली. व ते जय्यत सरंजामानिशीं त्यांजवर चाल करून गेले. उभय पक्षांकडे सैन्यसमुदाय व लढाईची तयारी उत्कृष्ट होती. जगोबा बापूंनीं आपल्या सैन्याचे तीन भाग करून, एका भागाचें आधिपत्य स्वतः घेतलें; दुसऱ्याचें लखबादादांस दिलें; आणि तिसऱ्या भागावर यशवंतराव होळकरांकडील मदतीस आलेला जुंजर नेर्क, यशवंतराव भाऊ, आनंदराव मळगांवकर वगैरे सरदार मुख्य नेमिले. पहिल्यानें उभयतांकडील तोफखाना सुरू झाला. शिंद्याकडील जिनशी तोफांचा मोठा भडिमार चालला असतां, रजपूत लोक तोफांवर चालून आले! आणि जिवाची परवा न धरितां, त्यांनीं मराठ्यांची कत्तल चालविली. रजपुतांचें शौर्य तसेंच विलक्षण होतें. त्यांचा तो मारा असह्य होऊन लखबादादा लढाईत जर्जर झाले. उभय दळें समरांगणीं एकवटून मोठी हाणामार चालली असतां, लखबादादांकडील मोडाचें वर्तमान जगोबा बापूंस लागलें. तों "जगोबा बापू घोड्यावर बसले आणि सांगितलें कीं आतां दुसरा प्रकार कोणताच नाहीं. त्यापेक्षां शूरत्वाचे धर्म असे कीं, समरांगणीं तरवार करून मरावें ह्मणजे या लोकीं नांव राहील आणि परलोकींही नीट. यश अथवा हानि ईश्वराधीन! असें बोलून हल्ला करून त्यांवर जाऊन मिसळले. तेथें तरवार चालली. दोनशें मोठमोठे मानकरी तरवार करून रणांत पडले, त्यांकडील बहुत मनुष्यांवर मनुष्य एकसारखे पडले. इतक्यांत समोर वारा चालला होता, तो पाठीवर जाहाला. लढाई जगोबा बापूंनीं फत्ते केली. (शत्रूंस) मारून पळविलें." लखबादादांवर रजपुतांची मुख्य मांड घसरून लढाई मोठ्या आवेशानें चालल्या वेळीं जरी ते जर्जर झाले होते, तरी जगोबा बापूंनीं विलक्षण पराक्रमानें त्यांचा हल्ला परतवितांच सर्व सरदार एकवटून त्यांनीं एवढा जोर केला कीं, रजपुतांस मार देत त्यांनीं तीन कोसपर्यंत त्यांचा पाठलाग केला. तेव्हां, जयपूरचा प्रतापसिंग राणा सांडणीवर बसून चार सांडणीनिशीं जयपुरास रातोरात

१. पत्र नंबर ४२१.

२. डि बॉयन हा पोर्च्युगीज होता. पहा लोकहितवादिकृत उदेपूर सं. इतिहास.

३. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८९.

४. 'लखबादादा व जगन्नाथ राम जयपूरच्या शहावर होते त्यांचे मदतीस (ढुंदर नेक) रवाना केला.' होळकरांची कैफीयत पृ. ८१.

५. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९०.

पळून गेला. आणि राजाचें पागोटें डेऱ्यांत ठेविलें होतें, तेथेंच राहिलें. हें सर्व सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. मग जगोबा बापूंनीं सर्व सैन्यासह दोषच्या किल्ल्याजवळ जाऊन मुक्काम केला. आणि जयपूरवाल्यांकडून "तीन कोट रुपया मामला घेतला. बाकी तोफा तीनशें साडेतीनशें व हत्ती शें दिडशें असा सरंजाम घेतला." आणि पूर्ववत् रजपुतांवर शिंद्यांचा अमल बसविला. "राजाचें पागोटें शिरपेंच तुरे लागलेलें मिळालें तें पुण्यास डांकेंतून श्रीमंतांस कळण्याकरितां × × पाठविलें." याप्रमाणें "लखबादादा व बापू यांणीं जयपूरवाला यासी शिकस्त करून खंडणी घेतली." ह्या प्रसंगीं जयपूरवाल्याचा पूर्ण पराभव झाला असतांही त्यास जगोबा बापू व लखबादादा यांनीं इतकें वश करून घेतलें कीं, तो आपला सर्व फौजफांटा घेऊन दौलतरावांस साह्य करण्यास कबूल झाला!

बायांचें प्रकरण कोणच्या कारणानें उत्पन्न झालें, दौलतराव व बाया यांच्यांत पक्कें वितुष्ट पाडून त्यांस बाहेर काढण्याचें यश कोणीं घेतलें, नारायणराव बक्षी वगैरे सरदारांस बायांच्या पक्षास कां मिळावें लागलें, त्यांचा समेट होण्याकरितां दौलतरावांनीं ज्यांच्या द्वारें खटपट चालविली, त्यांनींच त्यांत कसा 'खो' घातला, आणि शेवटीं रायाजी पाटील वगैरे सरदारांनीं योग्य मसलत देऊन बाळोबा तात्यांची सुटका करितांच, त्यांनीं आपल्या गैरहजिरींत झालेल्या ह्या घोटाळ्याची कशी व्यवस्था लाविली, आपलें शील कसें राखिलें, वगैरे गोष्टी आतां वाचकांस चांगल्या रीतीनें कळून आल्या असतीलच. ह्या बायांच्या कामांत सारस्वत सरदारांस विनाकारण अतिशयित त्रास पडला. ह्याचें कारण आह्मीं पूर्वीं एक प्रसंगीं विधान केल्याप्रमाणें दौलतरावांच्या स्वभावांतील वैगुण्य तर खरेंच, परंतु त्यांनीं जवळ केलेल्या नवीन सल्लागारांनीं त्यांस वेळोवेळीं भलतीच सल्ला दिली, हें होय. ह्या कामीं ह्या सारस्वत ब्राह्मण सरदारांस किती घस व संकटें सोसावीं लागलीं, याजविषयीं विस्तारभयास्तव आह्मास साग्र वर्णन देतां आलें नाहीं, तरी दिलेल्या इतिहासावरूनही वाचकांस बरीच कल्पना करितां येईल. इतकें झालें, तरी धन्याच्या दौलतीचें रक्षण व्हावें व त्याच्या रयाशतीचा अभिमान बाळगावा, याविषयीं त्यांचा केवढा कट्टा निश्चय! परकी राजे आग्रहानें बोलावीत असतां, स्वसुखाकडे नजर न देतां केवळ धन्याच्या दौलतीची कळकळ बाळगून, हे त्यांजकडे गेले नाहींत आणि आपसांतील सर्व कटकटींस तोंड देऊन व रजपुतांशीं वगैरे मोठीं युद्धें करून, त्यांनीं आपलें नांव गाजविलें, व जिवबादादांनीं आंखून दिलेल्या मर्यादेबाहेर पाय टाकिला नाहीं, हें त्यांस अत्यंत भूषणप्रद होय. परंतु, या स्वामिनिष्ठ सेवकांच्या गुणांची ह्या नवीन अमदानींत किंमत न होतां, त्यांचे ते गुण कसे मातीमोल झाले व शेवटीं त्यांचा कसा भयंकर शेवट झाला, हें, इतिहासलेखकास महत्त्वाच्या गोष्टी टाकतां येत नाहींत ह्मणून, आतां पुढील भागीं कथन करूं.

---

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९०।९१.
२. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९१.
३. पत्र नंबर ३१३.
४. पत्र नंबर ३१४.

भाग १६ वा.

शिंद्यांच्या मुत्सद्यांचा भयंकर शेवट व कित्येक लढाया.

इ० सन १८०० पासून इ० १८११ पर्यंत.

बायांचें प्रकरण एकदा निकालास लागलें असतां, तें इंगळे, घाटगे, गाढवे वगैरे सरदारांनीं पुनः उपस्थित केल्याबद्दल मागील भागीं कथन केलेंच आहे. ह्या प्रसंगीं जगोबा बापू, लखबादादा वगैरे सरदारांस रजपूत, होळकर, रांगडे इत्यादिकांशीं शिंदेशाहीकरितां युद्धप्रसंग करावे लागले असतांही त्यांनीं ह्या घरच्या शत्रूंचा बंदोबस्त कसकसा ठेविला होता हें पाहिलें, तर ह्या चतुर सरदारांच्या तरवारीबरोबर त्यांची मुत्सद्देगिरीची अक्कलही समाधानकारक काम बजावीत होती, असें दिसून येतें. हे सरदार फौजा घेऊन परशत्रूंशीं लढाया करण्यास गेले, ह्मणजे ह्या घरच्या शत्रूंस आपला अधिकार विस्तृत करायाला हीच संधि आहे असें वाटून, ते बापू वगैरे यांचा अंमल उठवून तेथें आपला अंमल बसवीत असत. ह्मणून, बाहेरून मदत आणून त्यांच्या पाठीवर ठेवणें भाग पडे. ह्यासंबंधानें त्यांच्या पत्रांत पुढील मजकूर आढळतो:—(अंबाजी इंगळे ह्यास सहाय असलेल्या पेरण ऊर्फ) "पिरूचा अंमल झाडून इमाम बक्ष यांच्या दिवाणानें व बेगमीचे पलटणांनीं उठविला तेव्हां पिरू दिल्लीकडे गेला."[1] अशाप्रकारें वेळोवेळीं येणाऱ्या अडचणींचा ते निकाल लावीत असत. आग्र्याच्या किल्ल्यांत मिळालेल्या पेरणच्या माणसांनीं लखबादादाकडे असें कबूल केलें होतें कीं, दौलतराव शिंद्यांस आह्मी आणून देतों[2]. असा करार करून घेण्यांत लखबादादांचा मतलब असा होता कीं, दौलतरावांकडून बायांच्या प्रकरणाचा एकदा कायमचा निकाल करून घ्यावा. परंतु, पेरणला ही गोष्ट अमान्य होऊन त्यानें आग्र्याच्या किल्ल्यांतून आपलीं माणसें सोडविण्यासाठीं लढाई चालविली. किल्ला हातीं येईना, तेव्हां दौलतरावांस लिहून त्यानें फौजेची आणखी मदत मागितली. परंतु ती मिळेना. इकडे लखबादादा व जगोबा बापू यांनीं पेरणचा पराभव करून त्याचा पाठलाग चालविला. आणि त्यास हांकून देऊन तमाम मुलखांत बायांचा अंमल बसविला. पुढें, आपल्या सर्व राज्यांत बायांचा अंमल बसला आणि यशवंतराव होळकर हा एक नवा शत्रु आपल्या राज्यांत चोहोंकडे धुडगुस घालीत आहे, असें पाहून अशा विकट प्रसंगीं दक्षिणेंत राहून निभाव लागणार नाहीं, अशी दौलतरावांच्या नव्या सल्लागारांनीं त्यांची कानउघाडणी केली. तेव्हां, सन १७९४ सालापासून सात आठ वर्षें वानवडीस पडलेला तळ उठवून दौलतरावांनीं जांबगांवीं जाऊन मुक्काम केला. ह्या नवीन सरदारांनीं राज्यरक्षणाकरितां ह्मणून अशी भर दिली होती खरी, तरी जगोबा बापू वगैरे सरदारांनीं उत्तरेकडील शिंद्यांचे सर्व हितसंबंध अगदीं सुरक्षित ठेविले होते. रजपुतांशीं लढून त्यांजकडील खंडण्या पूर्ववत् सुरू केल्याबद्दल मागें हकीकत दिलीच आहे. त्याचप्रमाणें, बादशाही कारभारांतही त्यांनीं ढिलेपणा पडूं दिला नव्हता. बादशाही मुलखांत अंतर्वेदींत मोठें बंड झालें होतें, तें लखबादादा, जगोबा बापू व यशवंतराव भाऊ यांनीं जाऊन मोडिलें होतें[4]. त्यामुळें, त्या कारभारासंबंधानेंही

---

१. पत्र नंबर ३१३.

२. पत्र नंबर ४२१.

३. ग्रांट डफची बखर पृ. ३६४.

४. कीनसाहेबांचा इतिहास व वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८९.

शिंद्यावर शब्द येऊं नये, ह्मणून हे सरदार किती जपत असत, हें उघड दिसून येतें. परंतु, बायांचें प्रकरण उत्पन्न करून हा लटका पश्चात्ताप दौलतरावांच्या मागें लावणारे, आपले कावे साधण्यास अनेक प्रकारें धडपड करीत. दौलतराव हे किती अस्थिर मनाचे असत, हें आतां वाचकांस नव्यानें सांगण्याची गरज उरली नाहीं. ह्या नव्या सल्लागारांवर तरी त्यांची कायम मेहेरबानी होती, असें नाहीं. मागें सरजेराव वगैरे सरदारांस कैद केल्यावेळीं अंबाजी इंगळे यांस कैद करण्याबद्दलही त्यांचा हुकूम सुटला होता! यावरून दौलतरावांचा पूर्ण विश्वास त्या मंडळीवर होता, असें म्हणवत नाहीं.

ह्या दौलतरावांच्या स्वारीबराबर बाळोबा तात्या व नारायणराव बक्षी, हे होते. उत्तरेकडील अधिकार गेल्यामुळें दौलतराव फिकिरींत पडलेले पाहून, ह्यांनीं त्यांस सांगितलें कीं, श्रीमंतांची स्वारी हिंदुस्थानांत गेल्यावर हे सर्व बखेडे मिटवून देऊं. त्याबद्दल आपण तिळमात्र काळजी वाहूं नये. दौलतरावांसही ह्याबद्दलची खातरी वाटून, त्यांजवर ते पूर्ववत् लोभ करूं लागले. ही दौलतरावांची व बाळोबा तात्यांची वगैरे एकी जडत चाललेली पाहून, सरजेराव वगैरे मंडळीनें मनांत आणिलें कीं, हिंदुस्थानांत गेल्यावर बायांचें प्रकरण सहजच मिटेल, आणि मग शिंद्यांकडे आपलें तेज पडणार नाहीं. तेव्हां, ह्या मंडळीच्या नाशार्थ कंबर बांधल्याशिवाय यापुढें आपला बोज राहील, असें दिसत नाहीं. असें म्हणून त्यांनीं आपलीं कुटिल कारस्थानें सुरू केलीं. दौलतरावांचा स्वभाव त्यांस ठाऊक असल्यामुळें त्यांना ह्यांत काहीं कठीण पडलें नाहीं.

दौलतराव जरी ह्या पक्षाकडे वळले होते, तरी त्यांचा सर्व कारभार सखाराम घाटगे सर्जेराव ह्यांच्या हातीं होता. त्यामुळें त्यानें नारायणराव बक्षी यांजकडे जिवबादादांच्या वेळेपासून जे जावद, जिरण, अजमीर वगैरे महाल चालत आले होते, त्यांचा हिशोब द्यावा म्हणून फार तगादा लाविला. ह्यासंबंधानें त्यांनीं नुसता छळ चालविला होता. तो कशा प्रकारचा होता, हें पुढें दिलेल्या त्यांच्याच पत्रावरून कळेलः—"सरजेराव घाटगे सुटल्यापासून पागनिसांची मर्जी निखालस एकचित्त नाहीं. प्रांत जावद, अजमीर वगैरे महालांची साडेतीन सालां बाकी आठ लाख मांडून मागतात. बक्षीगिरीचीही घालमेल करावी. हा आज चार पांच रोज विचार करितात. राजश्री भाऊ दिवाण यास व यादवराव भाऊ यास बक्षीगिरी करावी येविशीं सांगत होते. त्यांनीं मान्य न केलें. तेव्हां बाजीबा मोदी याजकडून कामकाज घ्यावें असें मान त्यांचें दिसतें. धन्याची मर्जी अह्मांठायीं प्रसन्न आहे! परंतु मुखत्यारी कारभार यांचे स्वाधीन! यांच्या चित्तांत घालमेल करणेंचें असल्यास कसें होईल? पहावें. कागद पत्र बक्षीगिरीकडील समजावून द्यावा व आठ लाख रुपये जावद जिरण अजमीर पैकीं द्यावे. हीं बोलणीं त्यांचीं पडलीं आहेत." याप्रमाणें छकट लाविल्यावरून ह्या पैशाची तोड आपण लौकर लावितों, असें नारायणरावांनीं कबूल केलें[3] असतांही त्यांजकडील महाल काढून घेऊन, त्यांच्या सनदा बाळाजीपंत मिरजा यांच्या नांवें करून दिल्या. त्यासंबंधानें खुद्द नारायणराव लिहितातः—"चाळीस वर्षांच्या आह्मांकडील मामलती दूर करावयास कांहींच अंदेशा त्यांस न पडला! पुढेंही कित्येक किसें (खुसपटें) काढून आम्हास गिरिफदारींत आणावें

१. पत्र नंबर. ४२०.

२. पत्र नंबर २८१.

३. पत्र नंबर ३०६.

आमचा टिकाव येथें न व्हावा हें मनापासून त्यांच्या आहे ! आह्मीं कित्येक निखालसपणीं चाललों तरी त्यांच्या मनांत काय आहे समजत नाहीं. त्यांत शिकवणार एक दोघे गृहस्थ आहेत. (?) ते मेळ पडूं देत नाहींत. अशी अवस्था येथील आहे. खर्चास एक पैसा मिळणें कठीण. आजपर्यंत श्रम करून जे जे जाबसाल जाहाले, ते आपणास माहीतच आहेत. त्यांची फळश्रुत आली! अब्रू राखणें कठीण ! नगरच्या किल्ल्यांत होतों परंतु असें दुःख पाहिलें नव्हतें ! ! ! पुढें ईश्वर कसा परिणाम लावितो पहावा. ति० भाऊ (बाळाजी राम) मातोश्री बायांकडे उगीच आहेत! तेथें त्याचें वजन ठेविलें नाहीं. चौंकडील दशा करावयाची योजिली आहे ! ईश्वरें शर्त करून घडेल तें खरें[2]." या पत्रावरून सरजेरावादि मंडळीकडून ह्यांना कशा प्रकारचा त्रास पोहोंचत होता, त्याचें अनुमान करितां येतें. या दुःखापुढें नगरच्या किल्ल्यांतील दुःख कांहींच नव्हतें ! त्यांच्या उद्गारांवरून नारायणरावांच्या सहनशीलतेची व सरजेरावादिकांच्या छलकबुद्धीची कमाल होती, असें ह्मणावें लागतें. ह्या जुलमास त्रासून कांहीं मंडळी लष्कर सोडून चालती झाली.[3] सरजेरावादिकांपासून जरी अशाप्रकारें त्यांना असह्य ताप होत होता, तरी 'धन्याची मर्जी आह्मां ठायीं प्रसन्न आहे,' हें मोकळ्या मनाच्या नारायणरावांचें मत बदललें नाहींच ! व या समजुतीमुळेंच ते लष्करांत राहिले होते. इकडील हीं वर्तमानें जगोबा बापू व लखबादादा यांस समजल्यावर त्यांनीं मनांत आणिलें कीं, ह्या गृहकलहास पुढें आणखीही ऊत येण्याचें चिन्ह दिसतें. ह्मणून, त्यांनीं बायांस महेश्वराहून काढून दतिया संस्थानच्या राजाच्या आश्रयास नेऊन ठेविलें आणि आपण मुलुखगिऱ्यांवर निघाले. बायांकडे कारभारी बाळाजी राम ऊर्फ बाळाभाऊ बक्षी हे होते. परंतु, सरजेरावाची पुनः चलती सुरू होतांच अंबाजी इंगळे वगैरे पळून गेलेली मंडळी पुनः येऊन आपलीं कारस्थानें चालवीत होती. त्यांनीं बायांना आपल्या पक्षांत आणण्याची खटपट चालवून बाळाभाऊचें तेथील वजन कमी केलें होतें. जगोबा बापू व लखबादादा यांच्यापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं व त्यांनींच आपलें आजवर नीट चालविलें, ह्मणून जरी बाया ते ठेवीत तेथें जाऊन राहत असत, तरी इंगळे यांनीं हल्लीं बायांचाही अभिप्राय त्यांनीं आपल्या पक्षाच्या आश्रयास यावें अशाप्रकारें वळविला होता. या मंडळीचीं नेहमीं गुप्त कारस्थानें चालत असत. त्यांत इत्यर्थ हाच कीं, नारायणरावादि जुने मुत्सद्दी या राशदींत असेपर्यंत आपलें तेज पडावयाचें नाहीं आणि ते इतका त्रास दिला असतांही ज्या पक्षीं एथून निघून जात नाहींत, त्या पक्षीं जनांतून त्यांचें अस्तित्व नाहींसे केल्यावांचून आपला मतलब साधण्यास दुसरा मार्ग नाहीं. असा भयंकर विचार त्यांनीं ठरविला ! या गुप्त कटांत सरजेराव घाटगे, फकीरजी गाढवे, बाणाजी हुजेरे, आबा चिटणीस, यादवराव भास्कर, अन्याबापू, रामचंद्रराव, माधवराव, ही मंडळी प्रमुख असून, तीच शिंद्यांची नवी

१. प्रसिद्ध मुत्सद्दी फडणीस नानांनीं आपल्या हयातींत हें पुण्यकर्म अविश्रांत श्रम करून मोठ्या कुशलतेनें बजाविलेंच. पण, पुढील काळजी त्यांस कमी होती असें नाहीं. सरजेरावादि मंडळीच्या हृद्भूमिकेंत त्यांनीं जें मंत्रश्रीजारोपण केलें होतें, तें भूमीचा मगदूर पाहिल्यावांचून केलें होतें, असें कोण ह्मणेल ? ही मंडळीही थोडीथोडकी नव्हती. पण, नानांच्या गुप्त ठेव्याप्रमाणें त्यांजबद्दलचाही नीट शोध लागणें कठीण झालें आहे !

२. पत्र नंबर ३००.

३. पत्र नंबर ३१९.

४. पत्र नंबर ३३०.

मुत्सद्दी मंडळी होती. ह्या मंडळीनें हा 'नरमेध' अहमदनगरास गेल्यावर तेथें करण्याचें योजिलें होतें. असो. याप्रमाणें शिंद्यांचें हें लष्कर अहमदनगरास चाललें असतां त्याच्या अलीकडे एक मुक्काम छावणीस उतरलें. दिवसेंदिवस नारायणरावांस सरजेरावादि मंडळी अतिशयित त्रास देऊं लागली. तरी दौलतराव त्यांजवर पूर्ववत् लोभ ठेवीतच होते. नारायणरावादि जुन्या मुत्सद्यांस ठार मारण्याच्या बेताचा सुगावा नारायणरावांस तर नव्हताच, परंतु दौलतरावांस सुद्धां यांतलें अणुमात्र काळेंबेरें ठाऊक नव्हतें. ह्या दुष्ट योजनेंत खुद्द बाजीराव पेशव्यांचेंही अंग होतें.[१] नारायणरावांस जरी कांहीं नक्की वर्तमान ठाऊक नव्हतें, तरी त्यांस किती असह्य ताप होत होता व त्यांचें पर्यवसान शेवटीं कशांत होण्याचा सुमार आहे, हें त्यांस बहुतेक बरोबर रीतीनें कळलें होतें, असें त्यांच्या ह्या प्रसंगींच्या पत्रांतील पुढील उद्गारांवरून व्यक्त होतें. "आमच्या प्राणावर आलें आहे ! सर्व फिरले ! ! ईश्वर पार पाडील तें खरें[३]." ह्या एवढ्याशा एका ओळींत त्यांनीं आपले संपूर्ण उद्गार किती उत्कृष्ट रीतीनें सांठविले आहेत ! त्याप्रमाणें ह्या दुष्ट लोकांनीं आपले कावे साधण्याची सर्व योजना जुळवून व आपल्या कटांतील सर्व मंडळीची एकवाक्यता करून मोठ्या धाडसानें पुढील पत्रांतील आशयाप्रमाणें अगोदर व्यवस्था केली. "तात्या पागनीस यांस कैद करून नगरास पाठविलें. व नारायणरावासही कैद केला. तोफेच्या तोंडीं मराठे तिघे दिले. एक शिंदा व एक फाळकी." मग, ह्याप्रमाणें व्यवस्था केल्यावर दौलतरावांचें हें लष्कर नागरास जाऊन पोहोंचलें.

जिवबादादा होते तोंपर्यंत तर शिंद्यांच्या राज्याची व्यवस्था उत्तम होतीच. परंतु, ते वारल्यावरही बाळोबा तात्या व नारायणराव, यांनीं राज्यकारभार त्याच धोरणावर चालविला होता. तिकडे जगोबा बापू व लखबादादा यांनीं हिंदुस्थानांतील मुलुखगिऱ्यांचें काम शाहामतीनें चालविलें होतें. परंतु,शेणवी सरदारांच्याच हातीं शिंदेशाहीचीं सर्व सूत्रें आहेत, ही गोष्ट इतरांस बिलकूल खपत नव्हती. ह्मणून, त्यांनीं आजवर हरप्रयत्न करून ह्या सारस्वत ब्राह्मण सरदारांस पदभ्रष्ट करण्याचे सक्त इलाज चालविले होते. या कामीं त्यांना जरी बरेच अडथळे आले, तरी त्यामुळें नाउमेद न होतां त्यांनीं आपला क्रम अव्याहत सुरू ठेविला. तेणेंकरून त्यांना अशाप्रकारें आपला लाग साधितां आला. इकडे हें काम मनाप्रमाणें घडवून आणिल्यावर हिंदुस्थानांत इंगळे वगैरे सरदार पुनः बळावून राहिले. आपला मतलब साधण्यास हवे त्या प्रकारचे हुकूम दौलतरावांकडून घेण्याचें त्यांचें हातखंडें काम होतें. अशा घोटाळ्यांनीं दौलतीचें कितीसें कल्याण होणार, याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. राज्यांतील अंतर्बाह्य व्यवस्था, परराज्यसंबंधीं कारस्थानें, बाहेरील खंडण्यांचा व राज्यांतील निरनिराळ्या बाबींच्या उत्पन्नाचा वसूल, ह्याबद्दलची सुयंत्र बसविलेली घडी अशा तऱ्हेच्या मनस्वी कारभारानें पुनः उसकटली. आणि सर्वत्र बजबजपुरी माजली. सरजेरावाच्या हातांत कारभार आल्यापासून रयतेच्या सुखाकडे व सरकारच्या हिताकडे त्यानें ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं. क्रूरता व मनस्वीपणा, हींच त्याच्या कारभाराचीं मुख्य लक्षणें ! राज्यकारभारास आवश्यक अशा कोणत्याही

१. ह्या बाजीरावाचे मोठे सुंदर गुण त्याच्या एका रजपूत शिपायानें एका दोह्यांत वर्णन केले आहेत. तो दोहा असा:—

"गांडू भडवा हौदा चढे, मर्दोंके बेहाल। पतिव्रता भूकी मरी, पेडे खात छिनाल ॥ १ ॥"

२. पत्रें नंबर ३२२।३२३ व ग्रांट डफची ब. पृ. ३६९.

३. पत्र नंबर २८१.

४. पत्र नंबर ४२२.

चांगल्या गुणाची त्याला ओळख नसल्यामुळें सरजेशाही ह्मणजे केवळ झोटिंगपातशाही होऊन राहिली ! अशाच्या हातीं सर्व राज्याचीं सूत्रें देऊन तीं त्याच्या मर्जीवर हेलकावत ठेवावयाचीं आणि त्याच्या पायीं अशा मोठमोठ्या ठोकरा बसल्या, ह्मणजे दौलतरावासारख्या धन्यांनीं असें कां होतें, ह्मणून विचारांत पडून पुनः पूर्वींच्याच चुका करीत बसावयाचें, हें त्यांजवर अवलंबून असलेल्या लोकांचें केवढें दुर्दैव बरें ?

दौलतराव शिंद्यांचें सर्व लष्कर नगरास पोहोंचून तेथें स्थिरस्थावर झाल्यावर त्यांनीं आपला बेत सिद्धीस नेण्याची सर्व तयारी केली. इकडे नगरच्या किल्ल्यांत कैदेंत टाकलेले नारायणराव, बाळोबा तात्या वगैरे सरदार आतां आपल्या आयुष्याचे दिवस थोडेच राहिले आहेत असें भविष्य वर्तवून, ते एकेक दिवस मोजीत राहिले होते. त्यांस ठार मारण्याचा जो दिवस नेमिला होता, त्या दिवशीं सरजेरावानें दौलतरावांस खूब निशा चारून अगदीं बेफाम करून तशा स्थितींत त्यांजकडून ह्या शेणवी वीरांस मारण्याचा लेखी हुकूम घेतला होता. दौलतराव सरजेरावाच्या किती मुठींत आले होते, हें पुढील उताऱ्यावरून चांगलें कळून येईल. "अलीकडे दौलतराव शिंदे सरजेराव घाटग्याच्या अगदीं स्वाधीन झाले होते. त्यानेंच शिंद्याच्या हातून वर सांगितलेलीं (तुकोजीराव होळकरांचा पुत्र विठोजी यास मारणें वगैरे) व याहूनही दुष्ट कर्में (जीं आतां लौकरच सांगण्याचा प्रसंग येणार आहे, तीं) करविलीं. एक दोन ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, या घाटग्यानें शिंद्यास दारू किंवा अफू यांतून कोणचें तरी एक व्यसन लाविलें होतें. ते गुंगींत येऊन बेहोष झाले, ह्मणजे त्यांपासून यांस कसलेंही दुष्ट काम करण्याची परवानगी मिळे. व तें तो तत्काळ पार पाडून टाकी ! घाटगे हा नीच, कृतघ्न व क्रूर मनुष्य होता. व असल्या मनुष्याच्या हातीं शिंद्यांची सबंध दौलत लागली होती[1] !" अशा-प्रकारच्या नराधमानें ह्या बाळोबा तात्या, नारायणरावादि जुन्या मुत्सद्यांस ठार मारण्याचा हुकूम मिळविला ह्मणजे मग त्याला आपला नीच मतलब साधण्यास उशीर कशाला लागतो आहे ? शिंद्यांच्या दौलतीची काळजी वाहून तदर्थच ज्यांनीं आपली कारकीर्द खऱ्या कळकळीनें व निर्दोष रीतीनें घालविली, पाटीलबावा व जिवबादादा यांच्या धोरणाबाहेर ज्यांनीं पाऊल टाकिलें नाहीं, त्यांना—सरजेरावासारखे दुष्ट मनुष्य परोपरीनें छळीत होते, तेव्हां आतां यापुढें आपला एथें निभाव लागणें नाहीं, हें जाणून त्यां राशतीमधून न निघाल्याबद्दल—देहांतशिक्षेचें बक्षीस मिळावें काय ? घाटगे व त्यांचे साथीदार ह्यांनीं आपली मनीषा पुरविण्याची कडेकोट तयारी करून ठेविली होतीच. त्या वधस्थानीं ह्या कैदी केलेल्या तीस शेणवी सरदारांस रात्रीं सर्वत्र सामसूम झाल्यावर खेंचून आणिलें. त्या कालपाशबद्ध लोकांना परलोकचा मार्ग दाखविण्यासाठीं बार भरून ठेविलेल्या तोफा ओळीनेंच मांडून ठेविलेल्या होत्या. हातांत नागव्या तरवारी दिलेल्या जिव्हाळ्याच्या शिपायांचा मजबूद पाहरा भोंवतीं ठेविला होता. त्याचप्रमाणें हुकूम होण्याबरोबर तें तें काम तत्काळ करणारे बरेच दांडगे लोक आजूबाजूस उभे केले होते. तेथें कसलाच प्रकाश पडूं नये, अशी खबरदारी घेतली होती. आणि पुढील काम एकदम उरकण्याच्या संकेताची तेथें बारीक कुजबूज सुरू होती. हा भयंकर देखावा एकदम दृष्टीस पडण्याबरोबर ते अगदीं चकित होऊन गेले. अशा रीतीनें त्या ठिकाणीं ही कैदी मंडळी आश्चर्यस्तब्ध होऊन राहिली असतां, तेथें लहानसा दिवा पेटवून आणून सरजेरावानें दौलतरावांचा इतक्याही कैदी मंडळीस तोफेच्या तोंडीं देण्याबद्दलचा हुकूम काढून नारायणरावांच्या हातीं

१. खरेकृत नाना फडणीसांचें चरित्र.

दिला. त्या वेळीं दौलतरावांच्या ह्या दुटप्पी व घातकी वर्तनाबद्दल त्यांना किती विस्मय वाटला असेल! आणि एकंदरींत सन्मार्गप्रवृत्ति, स्वराजनिष्ठा, कर्तव्यतत्परता इत्यादि प्रकृतिजन्य गुणसंघामुळें सरजेरावाच्या अमदानींतल्या शिंदेशाहीस कवटाळून राहिल्याबद्दल त्यांस केवढा पश्चात्ताप झाला असेल! हुकूम वाचून पाहतांच त्यांची व बाळोबा तात्यांची खातरी झाली कीं, शिंद्यांच्या मनांत दगा करून आपल्यास मारवावयाचें होतें, ह्मणून त्यांनीं या थरास गोष्टी आणिल्या. मग ते ह्मणाले, ठीक आहे. ज्यांचें आजपर्यंत अन्न खाल्लें, त्यांचा हुकूम शिरसा मान्य आहे. आह्मांस मारविल्यानें जर बाबासाहेबांना संतोष आहे, तर मरणाची आमची तयारी आहे. मरण हें कधीं तरी हक्कानें येणारच आहे. त्यांत धन्याच्या व तुमच्या सर्वांच्या समाधानार्थ आज मरण्यांत भूषण आहे. असें ह्मणून त्यांनीं सरजेरावांस ह्मटलें, हं, तुह्मी आपलें काम बेषक चालवा. याप्रमाणें बोलून ते सर्व प्रभुनामस्मरणांत निमग्न झाले. नारायणरावांनीं तर इहलोकची सर्व तळमळ टाकून शांत व आनंदी चित्तानें नित्यक्रमाच्या गीतापाठास आरंभ केला. सरजेराव व त्याच्या परिचारक यमदूतांनीं नारायणरावाशिवाय त्या सर्वांस क्रमानें एकेका तोफेच्या तोंडाशीं बांधिलें. आणि तोफांस एकदम बत्ती देण्यास आरंभ केला. तेणेंकरून धाड,धाड,धाड, आवाज होऊन त्या दुर्दैवी प्राण्यांनीं प्राप्त झालेलें मरण भोगिलें आणि ते ह्या दुष्टांच्या संसर्गापासून कायमचे मोकळे झाले! पण, सरजेरावाचे मनांत नारायणरावांस एवढ्याही सुखाचें मरण द्यावयाचें नव्हतें; तर त्यांचे अधिक हाल करून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून घ्यावयाचें होतें. ह्मणून, त्यानें बाण आणवून नारायणरावाच्या सर्वांगास बांधविले. मग, त्या सर्व बाणांस चोहोंकडून एकदम बत्ती दिल्यावर, नारायणराव भूभागचा हा खलसंसर्ग सोडून मोठ्या वेगानें आकाशमार्गें गेले. अशाप्रकारें हा कार्यभाग मनाप्रमाणें उरकून ते राक्षस निश्चिंत होऊन तेथील सर्व मागमूस मोडल्यानंतर स्वस्थपणें आपापले ठिकाणीं झोंपीं गेले[1]! या थोर मुत्सद्यांचा हा घात शिंदेशाहीच्या अपकर्षास कसकसा कारणीभूत झाला, हें पुढील इतिहासावरून सुज्ञ वाचकांचे ध्यानांत येईल. ही भयंकर गोष्ट सन १८०० सालच्या मे महिन्यांत घडली.

इकडे नारायणराव त्या बाणांच्या सोसाट्यासरसे आकाशांत उडून गेले, असें वर लिहिलें. पण, पुढें त्यांचेसंबंधानें एक आश्चर्याची गोष्ट घडून आली. ती एथें दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं, ह्मणून देतों:—नारायणराव खालीं पडले, त्या वेळीं त्यांचा देह भाजून छिन्न भिन्न होऊन गेला होता. खालीं

१. "सरजेराव याणें बाळोबा व धोंडोबा दादा व नारायणराव बक्षी तोफेचे तोंडीं देऊन व बाणांनीं मारिले." भारतवर्ष पु. २, अं. ६, पृ. ९२.

२ "शिंदे याचे बाजारांत सरजेशाहीचा प्रसार होऊन दौलतरावास घुटीचा प्रारंभ करून त्या झपाट्यांत दौलतप्रकर्णी अनेक तरेचे भर सरजेरावांनीं करून एकूण असामी कैद केले. त्यांत बाळोबा तात्या व धोंडबा व नारायणराव बक्षी व रामचंद्र शिवाजी व रायाजी पाटील बाबळे असे नांवाचीं कामाचीं माणसें एकुणीस कैद केलीं. श्रीमंत बाजीरावांस सामील करून × × सरदारांचे परतंत्रतेंत परवानगी घेऊन × × मारून टाकिले. दौलत माणसांवांचून खालीं केली.' होळकरांची कै. पृ. ७४. या वेळीं एकंदर तीस असामींस ठार केले व असेंच सर्वत्र प्रसिद्ध आहे. पहा भ्रमनिरास पु. पृ. १८०. व यास प्रमाण:—तीस असामींस कैद करण्याबद्दल पूर्वीं नाना फडणवीस यांनीं पन्नास लाख रुपये देऊं करून दौलतरावाकडे बोलणें लाविलें होतें. यावरून विरुद्ध पक्षाच्या डोळ्यांत सलणारी प्रमुख तीसच मंडळी होती, असें दिसून येईल. यांपैकीं बाळोबा तात्यांस ठार मारलें नाहीं, केवळ कैदच केले, असें फक्त ग्रांटडफ ह्मणतात.

पडल्यावर ते अगदीं मूर्च्छित अशा स्थितींत बराच वेळ होते. परंतु, नंतर त्यांस किंचित् शुद्धि आली. त्या स्थितींत ते विव्हळत पडले असतां, कर्मधर्मसंयोगानें त्याच मार्गानें नारायणरावांच्या लष्करांतील कोणी पुरभय्या घोडेस्वार, घरीं गेलेला लष्करांत आपल्या कामावर जाण्यासाठीं आला. तों काळोखांत कोणी कण्हत पडल्याचा त्यास भास झाला. तेथें जाऊन शोध घेतांच कोणी घायाळ मनुष्य विव्हळत आहे, असें त्याच्या लक्षांत आलें. मग, त्यानें चकमकीनें विस्तव पाडून जवळचा पातेरा पेटवून प्रकाश केला. आणि त्या दुर्दैवी मनुष्याकडे पाहिलें. तों त्याचें सर्वांग भाजून जाऊन केवळ जीव मात्र आहे, असें त्यास दिसून आलें. अशा त्या आसन्नमरण विद्रूप मनुष्यास पाहून त्या रजपूत शिपायाचें अंतःकरण विरघळलें! त्यानें त्याला प्रश्न केला, बाबारे, तूं कोण? आणि तुझी ही अशी दशा कोणीं केली, हें सांगण्यास तुला शक्ति आहे काय? माझ्या हातून होईल तितकें तुझा जीव असेपर्यंत तुझ्या दुःखाचें निवारण करीन. मी काय बोलतों हें तुला समजलें काय? असें म्हणतांच त्या विगलितवपु नारायणरावांनीं डोळे उघडून त्याजकडे पाहिलें. तों तो ओळखीचा रजपूत शिपाई! त्याला त्याच्या नांवांनें हाक मारतांच त्या शिपायानें आपल्या धन्याचा तो खोल गेलेला स्वर होता, तरी चांगला ओळखला. आणि म्हणतो, हाय हाय! धनीसाहेब, काय ही तुमची अवस्था! असें म्हणून त्यानें आपल्या आंगावरील वस्त्रें फाडून नारायणरावांच्या आंगावरील जखमांतून थबथब रक्त गळत होतें, तें पुनः पुनः पुसून त्यांवर त्यानें ओल्या फडक्यांच्या पट्ट्या बांधिल्या. आणि त्यांस सांगितलें कीं, आपल्यास विशेष इजा न होईल अशा तजविजीनें मी बिऱ्हाडीं नेतों, आणि औषधोपचार करवून आपल्यास आराम वाटेल असें करितों. त्यानें असें म्हटलें खरें, तरी दग्ध झालेला तो नारायणरावांचा लोळागोळा तेथून त्याला नेतां येणें शक्यच नव्हतें. आणखी पुढें ही आपदा भोगावयाची म्हणून त्यांचा जीव मात्र कसा तो राहिला होता! शेवटीं, नारायणरावांनीं चार शब्दांत आपली हकीकत सांगून त्यास म्हटलें, गड्या, आतां मजवर दया करून माझी एक कामगिरी बजाव, म्हणजे सर्व मला पोहोंचलें. असें म्हणतांच तो मोठ्या उत्सुकतेनें विचारूं लागला, धनीसाहेब, कोणती कामगिरी ती सांगा. मी ती बजाविण्यास पळभर देखील विलंब लावणार नाहीं. असें म्हणतांच नारायणरावांनीं त्या शिपाईबावाकडून भाक घेऊन त्यास सांगितलें, 'गड्या, आतां माझ्या देहाची दुर्दशा होऊन गेली असून, मला अत्यंत असह्य वेदना होताहेत. यांतून मी वांचणार नाहीं, आणि माझी वांचण्याची मुळींच इच्छा नाहीं. मला या यातनांतून सोडविण्याकरितांच त्या दीनदयाळ प्रभूनें तुला एथें आणिलें. आतां एवढेंच कर कीं, तुझ्याजवळच्या समशेरीच्या एका झटक्यासरशीं मी दुःखविमुक्त होईन. एवढेंच तुजजवळ पदर पसरून माझें शेवटचें मागणें आहे!'

हें आपल्या धन्याचें हृदयद्रावक भाषण श्रवण करून त्या स्वामिनिष्ठ सेवकास रडें कोसळलें. आणि त्यानें दीनवाणीनें म्हटलें, धनीसाहेब! बापही लेंकरावर ममता करीत नाहीं अशा प्रकारची ममता सेवकावर आपण केली. त्याची फेड, तरवारीनें आपली मान छाटून मीं करावी, म्हणून आपण अगोदरच माझी भाक घेऊन ठेविलीत काय? एवढा मी अघोरपातकी निमकहराम आहें काय? धनीसाहेब, काय म्हणून आपण हें भाषण केलेंत? तुमच्या प्राणरक्षणाकरितां मी माझा देह खर्चीं घालीन कीं नाहीं, याबद्दल तुम्हांस संशय आला वाटतें? तर मग बघा माझा चमत्कार! असें म्हणून तरवार ओढून धन्यास त्यानें सप्रेम वंदन केलें, आणि आतां आपल्याच मानेवर ती

ठेवणार, तोंच नारायणरावांनीं होती तेवढी सर्व शक्ति एकवटून त्याची विनवणी करून म्हटलें, गड्या, हें भलतेंच साहस करूं नकोस. मला या यातना आतां अगदीं सोसवत नाहींत. मला देहच राहिला नाहीं, तर तूं त्याचें रक्षण काय करणार ? आतां यांतून एकदाचा मुक्त करशील, तर मी तुझे उपकार जन्मोजन्मीं आठवीन. आतां विलंब लावूं नकोस. मी तुझे पाय धरितों. एक वेळ या शरीराची आणि माझी वेगळीक कर, आणि आपल्या कामास चालता हो. शिपाईबोवास ही करुणावाणी व त्यांचे विपळाप पाहून आलेला हुंदका आंवरेना. तो अगदीं गोंधळून गेला. काय करावें, हें त्यास सुचेना. शेवटीं, निर्धार करून त्यानें मनांत आणिलें कीं, मी जेवढा वेळ काढीन, तेवढ्या असह्य यातना माझ्या धन्यास भोगाव्या लागणार आहेत. यासाठीं, हें कर्म अघोर असलें, तरी प्रसंग जाणून तें केलें पाहिजे. मग, त्यानें तरवारीच्या एका झटक्याबरोबर नारायणरावांचें शिर धडापासून वेगळें केलें. पुढें, त्यानें रानचीं लांकडें जमा करून त्या प्रेतास अग्नि दिला, आणि त्यानें निश्चय केला कीं, केवळ एका पोटासाठीं एथें राहून सर्जेरावासारख्या पापात्म्याचें नित्य मुखावलोकन करावें लागणार, तर तें मी मुळींच करणार नाहीं. पोट कुठें तरी भरीन. असें ह्मणून तो मारवाडांत मेडतें एथें आपल्या गांवीं निघून गेला.

नारायणराव बक्षी हे चांगल्या योग्यतेचे पुरुष होते. त्यांस लोक सवाई जिवबादादा ह्मणत असत. ते मोठे शूर व फार गोड स्वभावाचे असत. "ते दातृत्वशक्तींत उदार. ज्यांचे देणगीस सर्वत्र हा वेळपर्यंत वर्णितात. (परंतु) ते अल्पायुषी होऊन गेले,[१]" या कारणानें त्यांच्या ह्या गुणांचा विकास व्हावयास अवकाश मिळाला नाहीं. त्यांच्या वरील चरित्रावरून स्वराजनिष्ठा, सत्यप्रीति, भूतदया आणि स्वधर्मतत्परता हे अमोलिक गुण त्यांनीं आपलेसे केले होते, असें दिसून येईल. ह्या गुणांमुळें त्यांचें सर्वांवर चांगलें वजन पडत असे. त्यांच्या चेहऱ्यावरूनच हा कोणी थोर मनुष्य आहे, असा त्यांच्याविषयीं लोकांचा अनुकूल ग्रह होत असे. त्यांच्या हातीं जीं जीं राजकीय कामें आलीं, तीं तीं त्यांनीं फार दक्षतेनें चालविलीं होतीं. परंतु, जिवबादादांच्या पश्चात् शिंदेशाही उतरत्या कळेस जाण्याचा चमत्कारिक योग जुळून आला होता, त्यामुळें त्यांच्या गुणांचें चीज होईना. त्यास त्यांचा इलाज नव्हता. अशा उत्तम मोहऱ्याचा असा शेवट व्हावा, ही केवढ्या दुःखाची गोष्ट !

त्याचप्रमाणें बाळोबा तात्या पिंगे हे पुरुष राज्यकारभारांत अत्यंत निपुण असून, फार शहाणे व मसलती होते. पाटीलबावांच्या कारकीर्दीच्या आरंभापासून, तों आपल्या कारकीर्दीच्या बहुतेक शेवटपर्यंत त्यांनीं शिंद्यांच्या दिवाणगिरीचें काम फार चतुराईनें हांकलें होतें. हे उत्कृष्ट मुत्सद्दी, असा यांचा लौकिक आहे. प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस यांच्याशीं हे जे मोठ्या कडीबाजपणानें डावपेंच खेळले, त्या संबंधाची खुलासेवार हकीकत गतप्रकरणीं दिलीच आहे. पाटीलबावा होते तेथपर्यंत यांच्या गुणांचें उत्कृष्ट चीज झालें. पुढें, सर्वच मान बदललें. पाटीलबावांच्या मागून त्यांच्या जागीं तसाच पाणीदार पुरुष पाहिजे होता. तो नव्हता. ह्मणून, शिंदेशाहीची अवनति पाहण्याचे ज्यांचे नवस, त्यांस व निवळ ती स्वतःच्या लहरीवर झुलती ठेवावी, अशी इच्छा बाळगणाऱ्या सर्जे-

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७८.

२. "बाळोबा पागे व त्यांचे भाचे धोंडबा शेणवी हे नगरांत कैद होते ते तोफेच्या तोंडीं देऊन उडविले. नारायणराव बक्षी आणून सर्व अंगास बाण बांधून उडविले. × × सदाशिव मल्हार दिवाण होते ते वारले. सन मजकुरीं मारामाऱ्या बहुत झाल्या." छत्रपति धाकटे रामराजे व शाहू यांचीं चरित्रें पृ. ७२.

राघादिकांस, अर्थातच चांगलें फावलें. धन्यापुढें बाळोबा तात्यांचा नाइलाज होता. त्यामुळें, एवढा मोहरा शिंदेशाहीस लाभून फुकट गेला. ही केवढी दुःखाची गोष्ट !

इकडे सूर्योदय होतांच रात्रीं घडलेली भयंकर हकीकत सर्वत्र पसरून, शिंद्याच्या लष्करांतील लोकांत मोठा हाहाकार उडाला. अघोरकर्मी सरजेरावाची भेसूर मूर्ति लोकांस प्रतिक्षणीं नजरेसमोर दिसूं लागली. त्याचा सर्व लोकांस मनस्वी द्वेष व वीट आला. जिकडे तिकडे सरजेरावाचा तिरस्कारयुक्त निषेध सुरू झाला. आणि सर्वत्र उदासीनता भासूं लागली. शेवटीं, हें सर्व वर्तमान दौलतरावांस समजलें. तेव्हां, त्यांच्या आंगाची लाही लाही होऊन गेली. त्या कोमलांतःकरणी पुरुषास ही अनर्थकारक बातमी ऐकून फार वाईट वाटलें. त्यांत नारायणरावांचे मरणाची हकीकत ऐकून तर त्यांचा दिल फाटून गेला ! परंतु, ही गोष्ट मनांत ठेवून सरजेरावास त्यांनीं सहज ह्मणून बोलावूं पाठविलें. तो येतांच त्यांनीं त्याला सांगितलें कीं, नारायणराव बक्षी यांजकडे कांहीं मजकूर विचारावयाचा आहे, यासाठीं त्यांना लौकर आणवा. तें ऐकतांच सरजेरावानें ह्मटलें, आतां त्याला काय आणायाचें ? 'बक्षीचा पक्षी केला.' तें ऐकून दौलतराव रागाचें चिन्ह न दाखवितां सौम्यपणानेंच ह्मणाले, काय ? बक्षीचा पक्षी तें काय ? असें ह्मणतांच दौलतरावांच्या शांत मुद्रेवर फसून सरजेरावानें त्यांस रात्रीं आपण केलेले सर्व पराक्रम सविस्तर कथन केले. तें सर्व ऐकून घेऊन दौलतराव अगदीं लाल होऊन जवळच्या हुजऱ्यांस ओरडून ह्मणाले. 'बघतां काय ? ह्या अघोरकर्मी राक्षसास आधीं पकडा आणि एकदम तोफेच्या तोंडीं द्या.' असें ह्मणून ते त्याच्या आंगावर धांवले. शिंद्यांचा तो नारसिंहावतार पाहून सरजेराव जीव घेऊन तेथून पळाला, तो थेट बायजाबाईच्या महालांत गेला. आणि घाबरेपणानें तिला ह्मणाला, नारायणराव वगैरे कैद केलेल्या सरदारांस मीं रात्रीं मारविलें. त्यामुळें महाराज सरकार संतापून जाऊन त्यांनीं मला तोफेच्या तोंडीं देण्याचा हुकूम केला आहे. ते मला आतां जिवंत ठेवीत नाहींत. आतां काय करूं ? माझा प्राण कसा वांचतो ? असें ह्मणून रडूं लागला. बायजाबाईस माहीतच होतें कीं, नारायणरावांवर दौलतरावांची प्रीति आहे. तेव्हां, अशा प्रसंगीं त्यांच्याकडे रदबदली करण्यास जाण्याची सोई नाहीं. आणि विलंब लागल्यास आपला बाप कांहीं जिवंत राहत नाहीं. ह्मणून, तिनें त्यांतल्यात्यांत एक युक्ति योजून नारायणरावांचे बंधु यशवंतराव भाऊ यांच्या नांवें पत्र दिलें कीं, 'घात झाला ! माझ्या बापानें दुष्ट व घातकी लोकांच्या नादास लागून तुमचे प्रियबंधु नारायणराव व दुसरे कित्येक शेणवी सरदार व इतर कांहीं लोक, ह्यांस ठार मारिलें. ह्या घोर कर्माबद्दल अत्यंत वाईट वाटतें. कांहीं केल्यानें झाली गोष्ट येत नाहीं. ह्या भयंकर अपराधाबद्दल ' माझ्या बापास क्षमा करा ' असें ह्मणण्यास तोंड उरलें नाहीं. परंतु, ह्याहूनही थोर मागणी तुह्मांपुढें पदर पसरून मागत आहें. आमच्या महाराजांनीं ह्यांना ठार मारण्याचा हुकूम करून ह्यांच्या मागून धरणें लाविलें आहे. ह्यांतून पार करणारा तुह्मांवांचून दुसरा कोणी समर्थ नाहीं. असें जाणून निर्वाणसमयीं हे तुमच्या हवालीं होताहेत. आतां तुमच्या इच्छेस येईल तर तारा किंवा मारा, काय हवें तें करा. शिर, सुरी तुमच्या हातीं आहे.' अशा अर्थाचें पत्र देऊन तिनें एक सांडणी आणविली व तिजवर कांहीं वाटखर्ची व फराळाचें साहित्य लादलें आणि पित्यास सांगितलें कीं, ह्या सांडणीवर बसून आतांच नारायणरावाचे बंधु यशवंतराव भाऊ हिंदुस्थानांत आहेत त्यांजकडे चालते व्हा. तेथें जातांच अगोदर त्यांचे घट्ट पाय धरून अभय घ्या, आणि मग युक्तीनें हें पत्र त्यांस द्या. ते थोर दिलाचे पुरुष आहेत. कदाचित् तुमचा जीव बचावतील ? यावांचून दुसरी तोड दिसत नाहीं. आत

असेच निघा. चालते व्हा. असें ह्मणतांच सरजेरावानें सांडणीवर बसून तडक उत्तरप्रांतीं जाण्याची वाट धरिली. तो कोणत्याच प्रतीची निरवानिरव करण्यास पळभर देखील थांबला नाहीं.

इकडे नारसिंहावतार झालेले दौलतराव हुजऱ्यांकडून एकांड्यांस बोलावून आणून त्यांस सरजेरावास पकडून आणण्याविषयीं हुकूम फर्मावताहेत आणि लष्करांत तर एकच कल्होळ उडून गेला आहे! इतक्यांत, सरजेरावानें गोटांतून पोबारा केल्याची बातमी हुजऱ्यांनीं आणिली. तेव्हां, सरजेरावास शोधून त्यास पकडून आणण्याचे कामीं विश्वासू व हुषार लोकांची एक तुकडी नेमून मग दौलतराव आपल्या नित्यक्रमास लागले. नारायणरावादि मुत्सद्यांस दुष्ट सरजेरावानें दग्यानें एकाएकीं रात्रीं मारविल्यामुळें सर्व लष्करी लोक तुफान होऊन गेले. नारायणरावांवर त्यांची फार प्रीति होती. ह्या दुष्ट कृत्यांत सामील असलेल्या मंडळीचीं नांवें वर दिलींच आहेत. त्यांशिवाय आणखी कांहीं मंडळी ह्यांवर प्रीति ठेवणारांपैकीं नव्हती. तरी, त्यांना असल्या अघोरकृत्याचा अत्यंत तिटकारा होता. व अशी मंडळीही फार थोडी होती. बाकी सर्व मंडळी ह्या घातानें गजबजून गेली. दौलतरावांस हल्लीं ह्या मंडळीनें व बायजाबाई व तत्पक्षीय लोक ह्यांनीं अगदीं स्ववश करून घेतलें होतें. ह्मणून, त्यांच्या मूळच्या सौजन्यावर जरी थोडेंसे अभ्रपटल आलें होतें, तरी ह्या भयंकर वार्ताजन्य क्रोधप्रभंजनानें आतां तें कोणीकडच्या कोणीकडेच निघून गेलें होतें! इतकें झालें, तरी लष्करी लोक जे एकदा बेदिल झाले, ते झालेच! आलीकडे सरजेशाही झाल्यापासून सर्व लोक ह्या नव्या अमलाला विटून गेले होते. त्यांत ह्या भयंकर कृत्यापासून तर आतां एथें राहणें धोक्याचें आहे, असें त्यांस वाटूं लागलें. त्यांनीं मनांत आणिलें कीं, शिंदेशाहीसाठीं ज्यांनीं आपले देह झिजविले, त्यांचे जर अशा रीतीनें खून झाले, तर तेथें आमचा तो पाड काय? ह्या घोरतर प्रसंगाचे वेळीं आलेल्या एका पत्रांत त्यांनीं लिहिलें आहे कीं, "घात झाला! आपल्या गृहस्थांचें क्षेत्र बुडविलें! होणारास उपाय नाहीं. ही[1] गोष्ट जाहलेवर फौजेंत बैदा (होऊन) राहिलों." मग, तेथून सर्व सारस्वत ब्राह्मण सरदार शिंदेशाहीस रामराम ठोकून निरनिराळ्या ठिकाणीं निघून गेले[2].

इकडे सरजेराव आपल्या जिव्हाळ्याचे कांहीं लोक बरोबर घेऊन मोठमोठ्या मजला मारून माळवेप्रांतीं जावद एथें यशवंतराव भाऊ होते, तिकडे जात होता. त्याला वाटेंत जिवाजी यशवंताच्या लोकांनीं लुटला. ब्रह्महत्यांचे पातकाचें फल पुढेंच भोगावयाचें होतें! तथापि, तेणेंकरून मार्गांतही त्याला विशेष हाल भोगावे लागले. शेवटीं, सरजेराव एकदाचा जावदेस यशवंतराव भाऊंच्या लष्करांत जाऊन पोहोंचला. सरजेराव मोठ्या घाईनें व अगदीं साधारण प्रवासी वेषानें आपणास भेटण्यासाठीं आल्याची वर्दी लागतांच यशवंतराव भाऊ त्यास भेटण्यास बाहेर आले. आणि पाहतात, तों तो अगदीं थकून गेलेला, भीतीमुळें तोंड अगदीं उतरलेला व कावराबावरा झालेला, असा त्यांच्या दृष्टीस पडला. तो त्याचा कल्पनातीत व विलक्षण देखावा पाहून यशवंतराव भाऊंस फार आश्चर्य वाटलें. कारण, सरजेराव ह्मणजे त्या वेळीं केवढें बडें प्रस्थ! शिंदेशाहीचीं संपूर्ण सूत्रें त्याच्या हातांत वागत होतीं. आणि तो शेणवी मंडळीचा पक्का द्वेष्टा होता. असें असून तो आपल्या भेटीस आला, हें काय गूढ असावें, या विचारांत ते पडले. मग, त्यांनीं त्यांस विचारिलें कीं, आज अशा स्थितींत स्वारी कां आली कळत

१. नारायणरावादि वीरांच्या खुनाची.
२।३. पत्र नंबर ३३०.

नाहीं. मी फार विचारांत पडलों आहें! असें ह्मणताहेत, तोंच सरजेरावानें एकदम सपशेल पायीं पडून त्यांचे पाय घट्ट धरिले. आणि डोळ्यांत पाणी आणून ह्मटलें, आतां तारणार किंवा मारणार आपण आहां. हें पाहून यशवंतरावांनीं त्यास तसें न करण्याविषयीं फार आग्रह केला. आणि असें करण्याइतकें झालें आहे तरी काय, तें अगोदर सांगा, ह्मणून त्यास सांगितलें. पण, सरजेरावानें एकच सांगितलें कीं, अभयवचन मिळाल्यावांचून मी हे पाय अगदीं सोडणार नाहीं. त्या थोर व उदार मनाच्या पुरुषानें ह्मटलें, घाटगेसाहेब! चिंता करूं नका. तुह्मांस अभय आहे. काय तें सांगा. यशवंतराव भाऊंचें अभयवचन मिळतांच सरजेरावाचा जीव जरासा खालीं पडला. आणि त्यानें भीत भीतच खिशांतील पत्र भाऊंच्या हातीं दिलें. तें पत्र वाचून पाहतांच यशवंतराव भाऊ उभे होते तेथूनच बेशुद्ध होऊन धाडकन् भूमीवर पडले! हें पाहतांच जिकडून तिकडून लोक धांवले. आणि त्यांस सावध केलें. पुढें पत्र वाचून पाहतात तों काय? साराच भयंकर प्रकार! त्याबरोबर त्या वाड्यांत एकच कल्होळ उडून गेला. यशवंतराव भाऊ व ती सारी मंडळी शोकाक्रांत होऊन दीनवाणीनें आक्रोश करूं लागली. त्या सर्वांनीं त्या जवळ असलेल्या सरजेरावास शतशः शाप दिले. त्यांच्या त्या शोकाला पारावार नाहींसा झाला. आणि अशा रीतीनें सर्वस्व नाश करून सरजेराव आपलें काळें तोंड दाखविण्यास कसा धजला, ह्याचें त्यांस आश्चर्य वाटलें! ह्या सर्व अनर्थास कारण मी आहें, असें ह्मणून सरजेराव सुकून ताठ व प्रेतवत् निस्तेज होऊन खालीं मान करून तेथेंच राहिला होता! त्या सर्वांनीं नारायणरावांचे गुण व त्यांचें रूप आठवून जो विलाप केला, तेणेंकरून तो वाडा दणाणून गेला. सरजेरावास तर असें झालें कीं, एथून आतां निघतांही येत नाहीं आणि एथें राहून तोंड दाखवितांही येत नाहीं! त्या विलापरवानें तो निर्दय होता, तरी अगदीं थिजून गेला! शेवटीं, कांहींही होवो, एथून निघून जावें, असा विचार करून सरजेराव आपल्या लोकांसह मुकाट्यानें जाऊं लागला. तेव्हां, यशवंतराव भाऊंनीं त्यास हाक मारून ह्मटलें, सिंहाच्या छातीवर लाथ मारून त्याच्या गुहेंतून सुरक्षित निघून जाण्याची हत्तीस कधीं तरी छाती झाली आहे काय? आमच्या सर्वस्वाच्या नाशास तूं जो कारण झालास, त्या तुझा एथून जिवंत जाण्याचा काय मगदूर होता? तूं आपल्या वैभवांत इतमामानें नांदत असतास, तरी तुझ्या नरडीचा घोट घेण्यासाठीं जिवाची आशा सोडून मी तुजवर चालून गेलों असतों. समरांगणांत जिवाची परवा करण्याचें काम जिवबादादांच्या बच्चांचें नव्हे! पण काय करूं? वचनबद्ध झालों! आतां तुला पाठीशीं घालण्यावांचून मला दुसरी तोंड राहिली नाहीं. असें ह्मणून पुनः शोकाची उसळी येऊन ते बेहोष झाले! पण, त्यांतल्या त्यांत सावध होऊन त्यांनीं ह्मटलें, आतां फिरा मागें. तुमची सर्व कांहीं तजवीज एथें होईल. मीं वचन दिलें, तें कधींही मागें घेणार नाहीं. शिवाय, राणीसाहेबांचा हुकूम आह्मांस पाळलाच पाहिजे. त्याबाहेर आह्मांस दुसरी गोष्ट कर्तव्य नाहीं. असें ह्मणून सरजेरावाची सर्व कांहीं सोई करून दिली. नारायणरावांचें प्रेत सांपडलें नाहीं, असें सरजेरावाच्या लोकांकडून समजलें होतें. त्यासंबंधाची आणखी धुगधुग राहिलीच!

पुढें, थोड्याच दिवसांत सरजेरावास पकडून आणण्यासाठीं पाठविलेले लोक शोध काढीत जावदेस यशवंतराव भाऊंकडे येऊन दाखल झाले. तेथें सरजेरावास त्यांनीं पाहिलें आणि श्रीमंत दौलतरावसाहेबांचा हुकूम काढून यशवंतराव भाऊंच्या हातीं दिला. त्या वेळीं आलेल्या मंडळीची सरबराई करून त्यांनीं शेवटीं त्यांस सांगितलें कीं, श्रीमंतांचा हुकूम मला मान्य आहे. सरजेराव

आमच्या बंधूचा नाशकर्ता. त्यास मजकडून आश्रय मुळींच मिळणारा नव्हे. परंतु, अगोदरच फौजेनें आमच्या विचारपुशीशिवाय त्यास पाठीशीं घातला आहे. हल्लींच्या धामधुमीमुळें फौजही पूर्ववत् पूर्णपणें कह्यांत नाहीं. तेव्हां, त्यांच्या कलानेंच घेतलें पाहिजे. श्रीमंतांस सांगा कीं, सरजेराव आमच्या हातीं आहे. त्यास तुह्मांकडे पाठविण्याची मागाहून सोईसोईनें तजवीज करितों. तोंपर्यंत तो आमच्या ताब्यांत आहे. त्याला आह्मी चांगल्या बंदोबस्तांत राखतों. असें सांगून त्या आलेल्या लोकांची त्यांनीं रवानगी केली.

या हकीकतीकडे सूक्ष्म नजर दिल्यास बक्षींच्या राजनिष्ठेचा मोठा चमत्कार वाटतो! आधीं तरुण शिंद्यांची अस्थिर बुद्धि; दिवसाचे दिवसास बदलून येणारे नवे कारभारी; आणि ते यांच्या नाशाविषयीं टपून बसलेले, यामुळें घटकेंत काय होईल ह्याचा नियम नाहीं, अशा प्रकारची धोक्याची कारकीर्द; तेव्हां, इतर ठिकाणीं मोठमोठे आश्रय मिळत असतां केवळ राजनिष्ठपणामुळें एका राष्ट्रास चिकटून राहून, तेथेंच आपल्या आयुष्याचे दिवस कसे तरी घालविण्याचा दृढ निश्चय करून तसें अखेरपर्यंत वागणें, ही गोष्ट मोठ्या आश्चर्याची नाहीं काय? नारायणरावांनीं तसाच नेट धरून युक्तीनें कावा साधिला असता, तर त्यांस बहुतेक फौज अनुकूल होऊन सरजेरावादिकांचें व शिंद्यांच्या लहरी स्वभावाचें विशेषसें चालूं न देतां त्यांना आपल्या हातांत मूळच्याप्रमाणें सर्व सत्ता पुष्कळ अंशीं राखतां आली असती. परंतु, केवळ स्वहितासाठीं सरकारच्या मर्जीबाहेर जावयाचें नाहीं व दौलतराव मनापासून प्रीति करितात तर आपल्या जीवास तरी अपाय होणार नाहीं, ह्मणून अखेरपर्यंत ते विश्वस्त राहतात! ह्यावरून, त्यांच्या निस्सीम राजनिष्ठेची, स्पृहणीय निष्कपटपणाची व सर्वोत्तम सरल स्वभावाची उत्तम साक्ष पटत नाहीं काय? परंतु, यशवंतराव भाऊंनीं तर कमालच केली! नारायणरावासारख्या प्राणाधिक प्रियबंधूसह 'त्रिंशद्ब्रह्महत्या' करणारा नराधम येऊन पाय धरितो काय, आणि न समजतां त्यास दिलेलें अभयवचन—वचनबद्ध झालों असें मानून तीव्र मनःसंताप जोरानें दबवून—खरें करून दाखवितात काय! आणि आपलें वचन कायम करण्यास विचारांत गोष्ट घेतात. कोणती? तर धनिनीची (बायजाबाईची) आज्ञा! याप्रमाणेंच बहुतेक तत्कालीन सारस्वत ब्राह्मण वीरांची राजनिष्ठा कडकडीत होती. ते कधींही स्वार्थास बळी पडले नाहींत. ही गोष्ट त्यांस जशी भूषणप्रद आहे, तशीच ती इतरांस अनुकरणीय आहे.

जावदेहून गेलेल्या स्वारांच्या टोळीनें दौलतरावांस सरजेरावासंबंधीं सर्व हकीकत सांगितली. तेणेंकरून त्यांचें समाधान न होतां त्यांना अधिकच चेव आला. पुढें त्यांनीं सरजेरावास पकडून आणण्याचें, किंवा तसें न साधल्यास ठार मारण्याचें, काम करण्यास एक शूर पुरुष निवडला. तो मानाजी फांकडे शिंदे, हा होय. त्यानें हें काम आपणास लागलें, अशी हमी घेतली. मग, त्याच्या मदतीस त्याच्या पसंतीच्या कांहीं लोकांचा सरंजाम देऊन त्याला त्या कामावर नेमिलें.

नारायणराव, बाळोबा तात्यादि मंडळीचा वध झाल्यावर बाकी सारस्वत मंडळी व इतरजातीय कित्येक सरदार शिंद्यांचें लष्कर सोडून निघून गेले होते. त्यांपैकीं वैद्य, पोतनीस, नावर वगैरे मंडळी

१. 'स्वामिसेवा होय तो अर्थ व्हावा' ही ज्यांची पूर्णपणें इच्छा, 'सरकारचाकर ह्मणवून घेतलें आतां दुसरेची चाकरी करणें नाहीं. सांभाळ करणार धनी आहेत' हा ज्यांचा निर्धार, त्यांसच 'एकनिष्ठेनें सेवा करावी ह्मणोन इच्छितां (इच्छित असतां) हें फळ प्राप्त व्हावें,' हें न्याय्य काय? परंतु, सर्व कांहीं अनिष्ट गोष्टी हा वेळपर्यंत व ह्यापुढें एकामागून एक घडून येत गेल्या. 'तस्मात् ती वेळ तशीच होती,' असें ह्मणून स्वस्थ बसावें. दुसरें काय? पत्रें नंबर ३२०।३२३।३२४.

बडोद्यांत गायकवाडसरकारच्या आश्रयास गेली. कोठारी, लाड, वागळे, दळवी वगैरे होळकरसरकारच्या आश्रयास गेले. बाकी मंडळीला रतलाम, जोधपूर, भरतपूर, कोटा, नागपूर इत्यादि ठिकाणच्या राजांकडे आश्रय मिळाला. कांहीं मंडळी कोंकणप्रांतीं आपापल्या घरीं आली. फक्त जिवबादादा बक्षी यांची मंडळी मात्र कोठेंही आश्रयास न जातां आपल्या लष्करासहित अलग राहिली. याप्रमाणें, शेंकडो पराक्रमी पुरुष आपापल्या कुटुंबासह त्रासून शिंदेशाही सोडून चालते झाले. त्याबरोबरच कांहीं फिरंगी, रजपूत व कित्येक मराठे सरदारही निघून गेले. राज्याचे केवळ आधारस्तंभ अशी शूर व मुत्सद्दी मंडळी जी पाटीलबावा व जिवबादादा यांनीं मोठ्या चातुर्यानें निवड करून मिळविली होती, आणि जिजकडून मोठमोठीं देशकार्यें करून घेऊन सर्वत्र उत्तम व्यवस्था राखिली होती, तिचा दौलतरावांच्या कारकीर्दींत अपात्र लोकांच्या हातीं कारभार गेल्यानें अल्पावकाशांत बोजवारा होऊन शिंदेशाहीस उतरती कळा लागली. सगळ्या हिंदुस्थानांत संपन्नता, सामर्थ्य, नीतिमत्ता वगैरेसाठीं नांवाजलें जाणारें राष्ट्र अशा तऱ्हेच्या बेबंदशाहीनें अवनतीस पोहोंचलें. राजस्थानचे प्रसिद्ध इतिहासकार कर्नल टॉडसाहेब ह्मणतात कीं:—महादजी शिंदे याचा मृत्यु, त्याचा पुतण्या दौलतराव ह्याचें राज्यारोहण, त्याजकडून झालेला शेणवी ब्राह्मणांचा नाश व महादजीच्या बायकांशीं त्याचा कलह, ह्या गोष्टी याच सुमारास घडून आल्या व त्यांचा मेवाडांतील बिनांवर बराचसा परिणाम झाला[१].

याप्रमाणें, शिंद्याची शक्ति कमी होऊन त्याच्या राज्यांत चोहोंकडे घोटाळे माजल्यावर रजपूत, शीख, मुसलमान, इंग्लिश वगैरे राजांस शिंद्याविरुद्ध आपले बेत जोरानें सिद्धीस नेण्यास मोठें उत्तेजन आलें.

पुढें, ही नारायणरावादिकांच्या वधाची बातमी, हिंदुस्थानप्रांतीं जोधपूर वगैरे ठिकाणीं जगोबा बापू, बाळाजी राम, विश्राम नरहर व लखबादादा यांस समजतांच तेथें मोठा हाहाकार उडाला. त्यांनीं ह्या अनर्थाबद्दल अत्यंत शोक केला. त्यांनीं नारायणरावादिकांचे गुण आठविले, आणि ह्मटलें, शिंदेसरकारच्या दौलतीकरितां प्रत्येक बिकट प्रसंगीं आह्मीं सर्वांनीं अतोनात श्रम सोसले, व रक्ताचें सिंचन केलें. त्या आह्मांस दौलतरावांनीं सरजेरावासारख्या दुष्ट मनुष्याच्या नादीं लागून असे दिवस दाखवावे काय ? आतां कसचें आमचें जिणें ! आणि कसच्या आमच्या आशा !

पूर्वीं नारायणराव, बाळोबा तात्या वगैरे यांस कैद करून नगरास पाठविलें होतें. व पुढें त्यांस ठार मारण्याचा बेत सरजेरावादि मंडळीनें केला होता. त्याच वेळीं त्यांनीं जगोबा बापू, लखबादादा वगैरे उत्तरेकडील सरदारांस दगा करून ठार मारावे, असें अंबाजी इंगळे वगैरे सरदारांस लिहिलें होतें ! आणि ही गोष्ट एकाच दिवशीं घडवून आणावी, असा त्यांचा मनोदय असून, त्याप्रमाणें गुप्त कारस्थानें घोळत होतीं ! परंतु, जगोबा बापू, लखबादादा वगैरे सरदार फौजबंद असून स्वतंत्र व सदा सावध असत. त्यामुळें त्यांचा हा कावा शेवटास गेला नाहीं. ह्या दग्याच्या मसलती

१. "The death of Mahadaji Sindia and the accession of his nephew Dawlatrao, his murder of Shenwi Brahmins and his quarrels with Baes (princess wives of the deceased Sindia) all occurred at this time and materially influenced the events in Mewar." Tod's Rajasthan, Vol. I, page 477.

जगोबा बापू वगैरेच्या नित्य परिचयांतल्याच झालेल्या होत्या. तरी, नित्य कटकटी करीत न बसतां दूर असलेलें बरें, असें मनांत आणून ह्या वेळीं ते दतिया संस्थानांतच जाऊन राहिले होते. अंबाजी इंगळे, पेरण वगैरे सरदार आपला त्यांच्या नाशाचा कावा साधेना, तेव्हां दतियासच जाऊन बायांकडे फितूर चालवून एकदा शेवटचा इलाज पाहावा, ह्मणून ते फौजेसह मोठ्या तयारीनिशीं दतिया संस्थानीं गेले. तेथें गेल्यावर बायांस आपल्या पक्षाकडे ओढण्याविषयीं त्यांनीं सूत्रें चालविलीं. परंतु, त्यांत त्यांना यश येईना. ह्मणून ते लढाईस सिद्ध झाले. तेव्हां, जगोबा बापू व लखबादादा यांनीं आपली फौज समरांगणावर आणिली. ही फौज बहुतेक रजपूत राजांकडीलच होती. ते सर्व रजपूत राजे लखबादादा व जगोबा बापू ह्यांच्या सांगण्यांत असत. खुद्द दतियाचा राजा आपली लढाऊ फौज घेऊन ह्यांच्या मदतीस आला. तेव्हां लढाईस सुरुवात झाली. तिजसंबंधाची हकीकत पत्रावरूनच देतोंः—" लढाई होऊन राजश्री (लखबा) दादास यश आलें. पिरू ठार जाहाले. दादांकडील दतयावाला पडलो. दादास छऱ्याची जखम हलकी लागली. शिपाई लोक दोहोंकडील बहुत कामीं आले." अशाप्रकारें ही खडाजंगीची लढाई होऊन अंबाजी इंगळ्यांचा पराभव झाला.

लढाईत यश आलें नाहीं, एवढ्यानेंच अंबाजी इंगळे निराश झाला नाहीं. त्यांस बायांकडे फितुराची खटपट चालविल्यास यश येईल, अशी अद्याप उमेद होती. ह्मणून, त्यांनीं बायांच्या विश्वासाच्या मंडळीस द्रव्यानें अनुकूल करून घेऊन, त्यांच्या द्वारें संधान बांधिलें. त्यांत त्यांना शेवटीं यश आलें ! दतियाचा राजा पडल्यानंतर त्याच्या मुलास गादी प्राप्त झाली होती. त्याला ह्या तंट्यांत पडण्याची इच्छा नव्हती. ह्मणून, तोही त्या गोष्टीस अनुकूल झाला. त्यासंबंधानें ते पत्रांत लिहितातः—" कनिष्ठ बाईचा फितूर या इंगळे यांजकडेस जाहाला कीं, आह्मी तुह्मांकडे येतों. आणि दतियाचे राजाचीही मर्जी कीं या उभयतांस इंगळेच्या हवालीं करावें." या संधीस जगोबा बापू खासगी कामासाठीं जावदेस गेले होते. आणि दतियास लखबादादा व बाळाजी राम होते. लखबादादांस बायांच्या फितुराची गोष्ट समजतांच त्यांस मोठा पश्चात्ताप झाला. बायांनीं पहिल्यानें अति आग्रहानें आह्मांस आपल्या पक्षाचा अभिमान धरविला. त्यासंबंधानें आजवर अनेक संकटें भोगिलीं. आणि शेवटीं त्याच बाया शत्रुपक्षास सामील होतात ! तेव्हां, आतां कोणत्याच पक्षांत कांहीं राहिलें नाहीं. आतां ह्यापुढेंही हेंच करीत राहून दुःख वाढविणें बरें नव्हे, असें मनांत आणून त्रासानें ते तेथून आपलें लष्कर घेऊन मथुरेस गेले. तेथेंही मसलत विसकळीत दिसली. तेव्हां तेथून विश्राम नरहर मेढतेस होते, त्या ठिकाणीं येऊन राहिले. त्या ठिकाणीं त्यांचा दहा दिवस मुक्काम होता. तेथें त्यांना मेवाडच्या राजानें आपल्या आश्रयास येण्याविषयीं वकील पाठवून बोलावणें केलें. मग त्या वकीलांसमागमेंच प्रतापगडावरून ते मेवाडास गेले. त्या ठिकाणीं यशवंतराव भाऊ होते. त्यांजकडे आपलें सारें लष्कर देऊन आणि आपली थोडी मंडळी बरोबर घेऊन ते साळुंब्रा

१. पेरण याच संधीस यूरोपास गेला, असें ग्रांट डफ ह्मणतात.

२. टॉडसाहेबांचा राजस्थानचा इतिहास व उदेपूरचा इतिहास पृ. २७३.

३. पत्र नंबर ४२१.

४. पत्र नंबर ३३०.

५. पत्र नंबर ३२६.

(सालेंबर) एथें गेले[१]. त्या राजानें त्यांचा मोठा सन्मान केला. मग ते तेथेंच राहिले. ह्या वेळेस ते अगदीं उदास झाले होते.

जगोबा बापू जावदेहून निघून दतियास जातांच त्या बाया सर्व फौजेसह इंगळ्यांच्या स्वाधीन झाल्या. जगोबा बापूंनीं बायांच्या पुढील वर्तणुकीचें व आपल्या परिणामाचें भविष्य पूर्वींच वर्तवून ठेविलें होतें. शेवटीं, ते व त्यांचे बंधु बाळाजी राम, आपले खासगी राहिलेले दोनशें स्वार बरोबर घेऊन, तेथून कालिंजरास गेले. तेथें अलीबहादराचा मुक्काम होता. त्यास हें समजतांच त्यानें सन्मानानें त्यांस आपल्या गोटांत नेलें[२].

इकडे कोकणांत नारायणरावांस वगैरे मारिल्याची हकीकत पूर्वींच समजली असून, तिकडील सर्व मंडळी दुःखनिमग्न झाली होती. त्यानंतर कित्येक दिवसांनीं नारायणराव तो मी, असें सांगणारा कोणी, सरासरी त्याच आकारमानाचा व चेहऱ्याचा, तोतया केरीस आला. नारायणरावाचें प्रेत सांपडलेलें नव्हतें. ह्या बातमीच्या आधारावर ह्या लबाड मनुष्यानें नारायणरावासंबंधीं सर्व माहिती मिळवून मोठा व्यूह रचला होता. तो जुन्या व 'बाण बांधून उडविला' त्यासंबंधाच्या सर्व गोष्टी सांगून दुःखविव्हल होत असे!! आपण अमुक अमुक हाल होऊन, त्या भयंकर प्रसंगांतून बचावलों आणि नाइलाजानें आतां इकडे आलों, इंग्रज सरकारानेंही आपली खातरी करून घेऊन मीच नारायणराव असें ठरविलें आहे, वगैरे हकीकती तो सांगे. त्याचे देहावर कांहीं वण होते. त्यावरून कांहीं खरेपणा असेल, असें कोकणच्या मंडळीस वाटे. परंतु, त्यास त्यांनीं अक्षर काढण्यास सांगितलें, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, मीं लेखणी गुरूच्या पायांवर ठेविली. सबब, आतां लिहून दाखविणें कठीण आहे. त्यावरून संशय येई. यास्तव, त्यास घरांत न घेतां निराळेंच ठेविलें होतें. केरीस आपली दाद कोणी घेईनात, सबब नारायणरावांची एक मुलगी जायूबाई ह्मणून कुमारजुव्यांस नाईक यांजकडे दिली होती, तिकडे तरी आपलें बस्तान जमतें कीं काय, हें पहावें ह्मणून तो कुमारजुव्यांस गेला[३]. तेथेंही संशय आल्यामुळें त्यास अलग ठेविलें होतें. इतक्यांत ज्या रजपूत शिपायानें नारायणरावांचा शेवट लाविला होता, तो फिरत फिरत, जगोबा बापू वगैरे मंडळी होती त्या ठिकाणीं गेला आणि त्यानें त्यांना झालेली संपूर्ण हकीकत सांगितली. नारायणराव जंगलांत निश्चेष्टित पडले होते; त्यांची अत्यंत वळवळ चालली होती; आणि त्यांनीं आपली विनवणी वगैरे करून माझ्या हातून अशा अशा प्रकारें आपला शेवट लावून घेतला; याबद्दलची त्यानें सांगितलेली सविस्तर हकीकत ऐकून आधींच अनेक प्रकारच्या आधींनीं ज्यांचें हृदय ठिकाणावर नव्हतें, त्यांस डोंगरच कोसळून पडला कीं काय, असें झालें. नंतर, ज्या रजपूत शिपायानें आपल्या धन्याची ही अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावून त्यास अंतकाळीं यातनामुक्त केलें, त्यास त्यांनीं राहावून घे-

१. टॉडचा राजस्थानचा इतिहास—उदेपूरचा इतिहास—व पत्रें नंबर ३२९।३३०.

२. पत्र नंबर ३२९.

३. पत्र नंबर ३१६.

४. कुमारजुवें गांव गोमांतकप्रांतीं पणजीपासून जवळ आहे. ह्या गांवानजीक माशाल (महाशाळा) एथें वेदशाळा होती. त्या शाळेंत अध्ययनार्थ कांहीं कुमार (मुलगे) त्या जुव्यांवर (नदीच्या आंतील बेटासारख्या क्षेत्रावर) राहत असत, ह्मणून या गांवास कुमारजुंवा हें नांव चालत आहे. माशाल एथें अमरकोशाच्या अमरटीकेचे कर्ते सुप्रसिद्ध महेश्वरभट्ट होऊन गेले.

५. पत्र नंबर ३१७.

ऊन, पुढें त्याची आपल्या स्नेही राजाकडे सोईही करविली. कोकणांत नारायणराव तो आपणच असें भासविणारा, तोतयाच आहे, ह्या गोष्टीबद्दल आतां शंका राहिली नाहीं. या तोतयासंबंधानें केरीहून हिंदुस्थानांत यांजकडे पत्रव्यवहार नेहमीं घोळत होतेच व 'तोतयाचें काय झालें,' असें तिकडे पत्रद्वारें ते विचारीत असत. परंतु, आतां त्यांतील खरा प्रकार समजल्याबरोबर त्यांनीं कोकणांत ही हकीकत लिहून पाठविली. ती येतांच आतां आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, असें जाणून तो तोतया रातोरात पळून गेला. तरी, पुनः एकदा संधि साधून त्यानें खटपट केली होती. पण साधली नाहीं.

शिंदे लष्करसहित हिंदुस्थानांत जाण्याकरितां निघालेले, नगराहून बऱ्हाणपुरीं तळ देऊन होते. पूर्वीं, दौलतराव शिंदे पुण्यांत असतांना, यशवंतराव होळकराचे बंधु विठोजी होळकर, यांस त्यांनीं बाजीरावाकडून हत्तीचे पायीं बांधून मारविलें होतें. यामुळें यशवंतराव होळकर चिडून जाऊन, तो शिंद्याच्या मुलखांत स्वाऱ्या घालून जिकडे तिकडे उपद्रव देत सुटला होता. तेव्हां, हेशिंग नामक सरदाराबरोबर फौज व पलटणें देऊन त्यास दौलतरावांनीं होळकरावर रवाना केलें. परंतु, होळकरानें त्याचा दोन वेळ पुरता पराभव केला. त्यांत शिंद्याचे सरदारसाहेब सात ठार झाले. आणि तीन शत्रूच्या हातीं सांपडले. एक हेशिंग मात्र खबर सांगण्यास राहिला.

याच संधीस शिंद्याच्या आश्रयानें असणारे पेंढारी, जे लुटण्याच्या कामांत कोणासही हार न जाणारे, त्यांस यशवंतराव होळकरानें लुटलें. यशवंतराव होळकर हा मोठा धाडशी व शूर पुरुष होता. त्याला कोणतेंही अवघड काम हातीं घेण्यास शंका वाटत नसे. शिंद्यास त्यानें चोहोंकडून इतका कांहीं उपद्रव दिला कीं, त्याचा बंदोबस्त करणें दिवसेंदिवस फार जड जाऊं लागलें. ह्याप्रमाणें शिंद्याचा पराभव होण्यास सुरुवात झाली. तेव्हां, दौलतरावांस आपली चूक स्पष्ट कळून आली कीं, जुने सरदार आह्मीं ठेविले नाहींत, आणि शत्रूचा पराभव करण्यासारखा पदरीं कोणी सरदार राहिला नाहीं. आतां पुढें काय करावें ? याचा त्यांस मोठा विचार पडला. तेव्हां, बायजाबाईस ही संधि सांपडून तिनें आपल्या बापास आणल्यावांचून हें संकट टळत नाहीं, असें शिंद्याच्या मनांत भरवून दिलें. दुसरा इलाज न राहिल्यामुळें दौलतरावांसही ही सल्ला मानवली. मग सरजेरावास लागलेंच बोलावणें पाठवून लष्करांत आणिलें. सरजेराव येऊन पोंचतांच त्यानें लष्करची तयारी चालविली. हें समजतांच यशवंतरावानेंही आपले लष्करची तयारी केली. परंतु, कांहीं कारणानें त्याच्या लष्करचा बेत विसकटला. त्यामुळें उभय पक्षांची लढाई झाली, तींत यशवंतरावाचा ता० १४ आक्टोबर सन १८०१ रोजीं पराभव झाला. "त्याची राजधानी इंदूर तेंही त्या घाटग्यानें अगदीं लुटलें. ते समयीं त्या दुष्टानें आपल्या क्रूरपणाची परम सीमा केली[४]."

याप्रमाणें पराभव पावल्यामुळें यशवंतरावास त्वेष येऊन त्यानें शिंद्याचे दक्षिणेकडील प्रांत, व बाजीरावाच्या पारिपत्यासाठीं पुणें, अशीं ठिकाणें लुटावीं, असा बेत केला. व तो लष्करसहित दक्षिणेंत आला. तेव्हां, दौलतरावांनीं बाजीरावाचे मदतीसाठीं सदाशिव भास्कर नांवाचा सरदार कांहीं फौजफांटा

१. पत्र नंबर ३५७.

२. ग्रांट डफची बखर व पत्र नंबर ४२१.

३. पत्र नंबर ४२१.

४–६. ग्रांट डफची बखर पृ. ३७३ ते ३७७.

देऊन पाठविला. यशवंतराव होळकर शिंद्याचे व पेशव्यांचे प्रांत लुटीत पुण्यास आला. व त्यानें शिंद्याकडील सरदार सदाशिव भास्कर व पेशव्यांकडील सरदार पानशे, यांचा पराभव केला. तेव्हां, ह्या भीतीनें बाजीराव पेशवे पुण्याहून पळाले. आणि त्यांनीं होळकराचा पराभव करून पुण्याची गादी आपणास पुनः प्राप्त करून देण्यासाठीं इंग्रजांची मदत मागितली. ती त्यांनीं कबूल केल्यावरून ता० ३१ डिसेंबर सन १८०२ रोजीं वसई मुक्कामीं उभय पक्षांचा तह ठरला. तो असा कीं:—"बाजीरावानें इंग्लिशांचीं सहा पलटणें आपल्या चाकरीस ठेवावीं. त्यांच्या खर्चाबद्दल त्यानें त्यांस गुजराथेंत अथवा कर्नाटकांत पंचवीस लक्षांचा मुलुख द्यावा. त्यानें त्यांच्या सह्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही राजाशीं लढाई किंवा तह करूं नये. आणि इतर कोणत्याही युरोपियन लोकांस चाकरीस ठेवूं नये." याप्रमाणें, पेशव्यानें इंग्रजांचे पाठीशीं रिघून, गादीच्या प्राप्तीसाठीं त्यांशीं करारानें बद्ध होऊन, मराठी राज्याच्या स्वातंत्र्यवृक्षावर कुऱ्हाड घातली ! हें दौलतराव शिंदे व भोंसले यांस बिलकूल खपलें नाहीं. त्यांनीं इंग्लिशांचें वर्चस्व मराठी राज्यांत चालूं द्यावयाचें नाहीं, ह्मणून त्यांच्याशीं लढण्याकरितां मोठें सैन्य जमा केलें.

इतकें होत आहे, तों "लखबादादा सालेंबरास राहिले (होते). तेथेंच कांहीं ज्वरांश होऊन माघ शुद्ध पंचमीस (ता० २७ जानेवारी सन १८०३ रोजीं) त्यांस देवाज्ञा झाली." याप्रमाणें शिंदेशाहींत ज्यांनीं अनेक मोठमोठ्या पराक्रमाचीं कामें करून लौकिक संपादिला होता, ज्यांच्यावर पाटीलबावांची फार मेहेरबानी होती, व ज्यांच्या अभावीं शिंदेशाहीवर मोठा अनर्थ गुदरण्याचा संभव, ते भावी अनर्थ पाहण्यास न राहातां अगोदरच आपलें ऐहिक कर्तव्य आटपून चालते झाले. दौलतरावांस हें वर्तमान समजलें, तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें. त्यांनीं कोकणांत त्यांच्या घरीं दुखवट्याचीं पत्रें पाठविलीं व अशा रीतीनें थोडीशी आपली कृतज्ञता व्यक्त केली. लखबादादांच्या मृत्यूमुळें, तें कदाचित् आपल्या धन्याच्या मदतीसाठीं येतील, ही भीति इंग्रजांसारख्यांस आतां राहिली नाहीं.

इंग्रजांबरोबर शिंदे व भोंसले यांनीं लढाई करण्याची तयारी केलीच होती. तेव्हां, त्यांजबराबर इंग्रजांच्या आसई, आरगांव, लासवरी आणि दिल्ली, या ठिकाणीं मोठमोठ्या लढाया होऊन त्यांत शिंद्याचा पराभव झाला. या लढायांत शिंद्याकडे सरजेरावच प्रमुख होता. या पराभवामुळें शिंद्याचें फारच नुकसान झालें. पुढें तह ठरला तो असा. "भागीरथी व यमुना ह्यांचे मधला मुलूख, जयपूर, जोधपूर व गोहद ह्या संस्थानांच्या उत्तरेकडचा मुलूख, व मडोचचा किल्ला व तो प्रांत, इतका मुलूख शिंद्यानें इंग्लिशांस द्यावा. अहमदनगरचा किल्ला व तो प्रांत त्यानें पेशव्यांस द्यावा. अजिंठ्यापासून गोदावरीपावेतों मुलूख निजामास द्यावा. शहा आलम, पेशवा, निजाम व गायकवाड यांजविषयींचा वैरभाव टाकावा. आणि इंग्लिशांचे शत्रु युरोपियन व अमेरिकन लोक, ह्यांस चाकरीस ठेवूं नये." ह्या ठरावावरून शिंद्याचे पुष्कळ प्रांत गेले. त्याचें स्वातंत्र्य नष्ट होऊन दिल्लींतील त्याची हालचाल बंद पडली व रजपुतांवरील त्याचें वर्चस्व गेलें[६]. हा तह तारीख ३० डिसेंबर सन १८०३ रोजीं शिरजी अंजनगांवीं झाला.

१।२. ग्रांट डफची बखर पृ. ३७३ ते ३७७.

३. ओककृत हिंदु. इ. आवृ. ९, पृ. २२९.

४. पत्रें नंबर ३२९।३३०।३३१.

५।७. ओककृत हिं. इ. आवृ. ९, पृ. ४७.

६. पत्र नंबर ४२२ अ.

इंग्रजांबरोबर लढाया सुरू झाल्या, तेव्हां दौलतराव शिंद्यांस लखबादादा, जगोबा बापू वगैरे जुन्या सरदारांची किंमत कळूं लागली. इंग्रजांशीं लढण्यास यांच्यासारखे प्रतापी सरदारच पाहिजे होते. तें काम सरजेरावासारख्या मनुष्याकडून मुळींच रेंटण्यासारखें नव्हतें. परंतु, आपल्या गुणामुळेंच त्या शूर सरदारांस आपण अंतरलों ! तेव्हां, आतां त्यांना कोणच्या तोंडानें बोलवावें ? असें दौलतरावांस होऊन गेलें होतें. तरी, लढायांत पराभव होऊं लागले, तेव्हां त्यांना बोलावण्याकरितां वकील पाठविणें भाग झालें. ह्याच संधीस ह्यांना बोलावण्यास होळकर व मेवाडचे राणे वगैरे राजांचे वकील आले होते. मग ह्यांनीं विचार केला कीं, ज्यांनीं पूर्वीं "घात केला. आपल्या गृहस्थांचें क्षेत्र बुडविलें × × (त्या) शिंद्यांकडे जावें तर प्राणांशीं गांठी पडतात."[1] तेव्हां, तिकडे जाणें सुरक्षित नाहीं. लखबादादा पूर्वींच वारले होते. मग त्यांनीं शिंद्याकडे येण्याची आपली नाखुषी दर्शवून वकीलांस परत पाठविलें. पुढें, इंग्रजांचा तर जबरदस्त शह ! तेव्हां, या जुन्या अनुभवी सरदारांस आणल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें मनांत आणून दौलतरावांनीं त्यांच्या खासगत खर्चासाठीं सनदा करून दिल्या. त्याबद्दल ते लिहितातः—"आमचा बंदोबस्त श्रीमंतांनीं करून दिला. चार पांच लक्षांची जाहागिरी दिली. व आणखी द्यावयाची मर्जी आहे."[2] ह्याप्रमाणें व्यवस्था करून जगोबा बापूंस नागपुरास बोलावणें पाठविलें. ह्या वेळीं शिंद्याचें सर्व वैभव जाऊन तो यःकश्चित् सरदार बनला ! कालगति किती विचित्र आहे ! ज्या शिंद्याचा अवाढव्य राज्यविस्तार, ज्याची सर्व हिंदुस्थानभर बहुतेक अप्रतिहत सत्ता, सर्वांवर ज्याचा विलक्षण दरारा व विशाल वैभव, त्याची अशी शोचनीय स्थिति व्हावी काय ? यावरून लायक मनुष्यांचे अभावीं मोठा डोलारा सांवरेनासा होऊन कसा खालीं पडतो, हें विचारी पुरुषांस उघड कळण्यासारखें आहे. असो. आपली अशा प्रकारची स्थिति झाली आहे, तरी अशा प्रसंगीं तुह्मी न याल तर मुळींच धडगत दिसत नाहीं; असा निरोप सांगून जगोबा बापू, बाळाजी राम, यशवंतराव भाऊ, रामराव ऊर्फ आपासाहेब, येसाजी रामकृष्ण, लखबा दादा मळगांवकर दंडी, बाळाजी साबाजी जाखी, माधवराव नीलकंठ आरस, जिवाजी यशवंत, विठ्ठल साबाजी रेगे, साबाजी नारायण, लाडकोबा मोदी, लखबा नाडकर्णी पेडणेकर, विठ्ठल नारायण पन्हाळकर, बळवंतराव दिवाण, वगैरे लहान मोठे सरदार जे पूर्वीं त्रासून निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन राहिले होते, त्यांना वकीलांबरोबर सन्मानानें बोलावणें पाठवून नेलें. शिवाय, नारायणरावांचा घात केल्यापासून दौलतरावांच्या मनास चटका लागून राहिला होता. यास्तव, नारायणरावांचे दोघे चिरंजीव, कृष्णराव बाबा व घनश्यामराव ह्यांस कोकणांत बोलावणें पाठविलें कीं, "तुमचें प्रयोजन हुजूर जाणून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे. तरी तुह्मी कोणेविशींचा संशय मनांत न आणितां खातरजमेनें हुजूर येणें."[3] तरी, नारायणरावांस मारिल्यामुळें त्यांना तिकडे पाठविण्यास घराकडील मंडळी कबूल झाली नाहीं. पण, पुनः शिंद्यानें आपले सरदार भास्कर महादेव यांस ता० २८ जानेवारी १८०४ रोजीं सरंजाम देऊन बोलावणें पाठविल्यावरून[4] तिकडील सर्व प्रकार त्यांच्याकडून समजून घेऊन त्यांची त्यांजसमागमें तिकडे रवानगी केली. हे तिकडे पोंचल्यावर

१. पत्र नंबर ३३०.
२. पत्र नंबर ३३९.
३. पत्र नंबर ३४८.
४. पत्र नंबर ३४९.

ह्यांस बक्षीगिरीचीं वस्त्रें देऊन ज्या जिवबादादांपासून शिंदेशाहीचें कोटकल्याण झालें, त्यांच्या कुटुंबांतील बायकामुलांच्या खासगत खर्चासाठीं खालीं तपशील दाखविल्याप्रमाणें रकमा मंजूर केल्या.

३००० रुपये जिवाजी बल्लाळ यांच्या कुटुंबाच्या खर्चाच्या बेगमीसाठीं सालीना.
१००० जगन्नाथ राम यांच्या कुटुंबास.
२००० नारायणराव जिवाजी यांच्या कुटुंबास.

६०००

याप्रमाणें, रकमा दरसाल पोहोंचण्यासाठीं कडेगांव व रायतळें, हे दोन गांव जहागीर दिले[1]. ह्यांच्या तैनाती खर्चाबद्दलच्या जहागिरी निराळ्या होत्या. त्यांचा तपशील पुढें येईल. शिवाय, बाजीराव पेशवे यांनींही यांची योग्यता लक्षांत आणून—पूर्वीं आपण विनाकारण यांच्या नाशाची खटपट केली त्याबद्दलचा कलंक जावा ह्मणून—त्यांस मामलत देऊन त्यांचा गौरव केला. त्यासंबंधाच्या सनदेंतील मजकूरः–"तालुके कलानिधी देखील ठाणें, चंदगड येथील मामलत, सालमजकुरीं राजश्री बाळाजी राम यांजकडे सांगितली असे. तरी मशारनिल्हेचे रजा तलबेंत वर्तोन किल्ले मजकूर येथील अलंघ नौबत चौकीपाहारे यांचा बंदोबस्त यथास्थित करीत जाणें[2]." याप्रमाणें, चोहोंकडून सत्कार होऊन हे जुने मुत्सद्दी व सरदार शिंद्यांकडे येऊन राहिले. पण, इंग्रजांबराबरील लढायांपासून शिंद्यांची ह्या वेळीं अत्यंत निकृष्ट स्थिति झाली. ती इतकी कीं, त्यांजकडे मूळ राज्यापैकीं बहुतेक सत्ता राहिली नव्हती, असें ह्मणण्यास अडचण नाहीं. इंग्रजांच्या लढाईपूर्वीं शिंद्यास आलीकडे जे सरदार प्रिय झाले होते, त्यांनीं आजपर्यंत स्वतंत्र रीतीनें त्यांचा कधीं फायदा तर केला नव्हता,–कारण, ह्यांच्या सरदारीमुळें पूर्वीं जे लढायादिकांत कांहीं उपयोग घडले, ते जिवबादादासारख्यांच्या प्रमुखतेखालीं होते–पण, उलट त्या लोकांनीं शिंदेशाहीस अशा रीतीचा पडता काळ मात्र आणिला. त्यांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें केवळ आपस्वार्थावर नजर देऊन शिंद्याच्या सत्तेचा लोप केला! "अंबाजी (इंगळे) तर आपल्याला स्वतंत्र शिंदाच ह्मणवीत असे! व त्यानें ग्वाल्हेर शहरांत व त्याचे आसपास आपल्या स्वातंत्र्याचें बरेंच प्रस्थ माजविलें होतें. ×× वस्तुतः अंबाजी हा शिंद्याचा अंकित व नोकर असें असतां तो आपलाच वर्चष्मा मिरवूं लागून शिंद्याच्या अधिकारयोग्यतेस हीनत्व आणण्याचा प्रयत्न करीत होता[3]." पण, एवढें करूनच तो थांबला असें नाहीं, तर त्याची मजल ह्याहून फार पुढें गेली. "इंग्रजांच्या मनांत असें आलें कीं ग्वाल्हेरचा किल्ला शिंद्याच्या हातून निघेल तर बरें. हा त्यांचा हेतु अंबाजी इंगळा × जो (ह्या वेळीं) गोहद प्रांतावर शिंद्याचा सुभेदार होता त्यास कळला. तेव्हां निमकहरामपणा करून तो इंग्रजांस फितूर झाला[4]!" ह्याप्रमाणें इंग्रजांशीं तह केल्या वेळीं जो मुलूख शिंद्याकडे राहावा असें ठरलें होतें, तोही ह्या वेळीं त्यांजकडे राहिला नाहीं. सरजेरावाच्या कर्तबगारीचा प्रत्यय यापूर्वीं अनेक प्रसंगीं आलेलाच होता. दुसरे प्रीतींतले सरदार हे इंगळे. त्यांचा विश्वासघात या प्रकारचा! तेव्हां, अशांच्या पायीं संपूर्ण राज्याची वरीलप्रमाणें वासलात लागली, ह्यांत नवल कोणतें! परंतु, उत्कृष्ट मुत्सद्दी, अत्यंत राजनिष्ठ व शूर अशा आपल्या जुन्या सरदारांचा अनेक वेळां अनादर व तिर-

१. सनद नंबर ३५१.
२. सनद नंबर ३४०.
३. लोकहितवादिकृत उदेपूरचा इति. पृ. ३०८.
४. ग्याले. इ. भा. पृ. १०१.

स्कार करून, हितकर्त्या मानिलेल्या ह्या नमुनेदार नव्या कारभारी व सरदार लोकांचा आदर करणाऱ्या दौलतरावांनीं 'हें प्रथम विचारावें, कीं लाभ अशांस काय जोडून.' हा सत्परिणाम सुज्ञजनप्रघाताकडे अगदींच दुर्लक्ष केलें, दूरदृष्टि खऱ्या दिलाच्या थोर मनुष्यांनीं वेळोवेळ केलेला हितवाद ऐकिला नाहीं, आणि आपल्या हातीं आपल्या पायांवर धोंडा पाडून घेण्यांत फारच भयंकर चुकी केली, याचा होय! शेवटीं, अशी स्थिति आली, तेव्हां जगोबा बापू वगैरे सरदारांस केवळ नवी रचना करण्यासाठीं बोलाविलें होतें! परंतु, अशा स्थितींतही त्यांनीं तारूं बरेंच कडेस लाविलें.

पुढें दौलतरावांनीं जगोबा बापूस आपल्या संनिध ग्वाल्हेरीस ठेविलें. कारण जाट, इंग्रज व विरुद्ध झालेले इंगळे सरदार, ह्यांच्या छाप्याची त्यांस भीति होती. आणि इंग्रजांबरोबर लढाई करून मुलूख सोडविण्यासाठीं जगोबा बापूंनीं रामराव आपा, लखबादादा[1] व "आणखी झाडून कोंकणची मंडळी" जय्यत सरंजामानिशीं पाठविली. ह्या मंडळीनें कसकशा लढाया करून शिंद्याचे गेलेले प्रांत सोडविले[3], तें पुढील पत्रावरून समजून येईल.—"ग्वाल्हेर प्रांताचा सुभा, वडिलांस (जगोबा बापूंस) सरकारांतून सांगितला. तेव्हां वडिलांस दरबारीं राहणें. त्यापेक्षां आह्मांस रवाना केलें. आह्मी आल्यास आज चार महिने झाले. हा प्रांत झाडून इंग्रजांचे दंगेमुळें फिरून राहिला आहे. आह्मांस रोज लढाईशीं माळा. रांगडे जमीदार तमाम माजले आहेत. गडीबंदी एक गडी खालीं करणेस एक महिना लागतो. असें असोन आह्मीं आल्यातागायत दहा पांच जागीं ठाणीं बसविलीं. आणखीही बहुतच आहेत. हालीं लढाई रुबकर आहे. जोर तलबी मुलूख. त्यांत मारूनकुटून रुपया वसूल करावा लागतो. सरकारांत रसद बारा लक्ष रुपये देणें लागले. येथें फौज वीस हजार पाठविली आहे. या प्रांतीं वडिलांचेंही आगमन होण्याची तजवीज आहे." याप्रमाणें, या विजयी सरदारांनीं एकेक प्रांत काबीज करण्याचा सपाटा लाविला. पुढील पत्रांत ते लिहितात, "ग्वाल्हेरीस व गोहदेस ठाणें इंग्रजांचें होतें तें त्यांनीं खालीं करून दिलें. तमाम मुलखांत अंमल जाहाले! मात्र आटेर सुटली नाहीं. हलीं इं(ग)ळे[5] यांस कैद केलें. आणि नरवर, सबळगड प्रांत आ(म)चे नांवें जहाले. आपाही लष्करांतून सुभेच्या बंदोबस्ताकरितां आले आहेत. दिल्ली, आग्रें, महिने दोन महिनेंत खालीं होतील. लढाई दोन जाहाल्या. याजकरितां शिंदे होळकर यांशीं सलूख राखून इंग्रज जावयास गेलें." याप्रमाणें लढाया होऊन शिंद्याकडील जो साराच मुलूख गेला होता, त्यापैकीं बराच मुलूख जगोबा बापूस पुनः अधिकार दिल्यामुळें प्राप्त झाला. पूर्वींचें सर्व वैभव व शक्ति घालवून शिंदे बसले होते. त्यामुळें, ह्याहून ह्या सरदारांकडून विशेष कार्यभाग होण्यास अवकाश नव्हता. तरी, अशा दुःस्थितींतूनही त्यांनीं केवढी कमाई केली पहा! शेवटीं, इंग्रजांबरोबर तह ठरला,

१. हे लखबादादा मळगांवकर होत.

२. पत्र नं. ३५९.

३. ह्या प्रांतीं ह्या पुरुषांचे वंशज आपल्या पूर्वजांनीं शिंदेशाहींत बजाविलेल्या कामगाऱ्यांबद्दल त्या राज्याचा मोठा अभिमान बाळगितात. अशा प्रकारें आनुवंशिक संस्कारानें निरनिराळ्या राष्ट्रांबद्दल त्या त्या संबंधाच्या पुरुषांत स्वत्व उत्पन्न होतें, ही गोष्ट किती उत्तम आहे?

४. पत्र नंबर ३६२.

५. अंबाजी इंगळे.

६. पत्र नंबर ३६१.

तो असाः—" ग्वाल्हेर व गोहद हे किल्ले शिंद्यास परत मिळावे. व चंबळा नदी ही त्याच्या राज्याची उत्तरसीमा समजावी. इंग्रजांनीं जोधपूर, उदेपूर व कोटा येथील राजांबराबर किंवा ग्वाल्हेर, माळवा व मारवाड यांतील मांडलिक राजांबराबर तहनामे करूं नयेत! व शिंद्यानें त्यांची पाहिजे ती व्यवस्था केली, तरी त्यांत बोलूं नये. दौलतराव, त्याची बायको व मुलगी, या त्रिवर्गास नेमणुकी व जहागिरी द्याव्या. त्याच्या कांहीं कामदारांस पंधरा लाख रुपयांची नेमणूक दिलेली होती, ती व धोलपूर, बरी व राजखेडा, हे मुख्य मुलूख जे पूर्वींच्या तहनाम्यानें त्याच्याकडेस राहण्याचे ठरले होते, ते त्यानें सोडून द्यावे. व सखाराम घाटगे माजी दिवाण, यास पुनः आपले पदरीं ठेवूं नये."[1] ह्याप्रमाणें तह होऊन व तो अमलांत येऊन इंग्रजांकडील बंदोबस्त झाल्यावर[2] जगोबा बापूंस माळव्याच्या बंदोबस्तास जावें लागलें. त्यासंबंधाचा पत्रांतील मजकूरः—"बापूस सरकारांतून माळवे प्रांतींच्या बंदोबस्तास पाठविले आहेत. दोन महिने होत आले. माळव्यांत राजश्री सर्जेराव घाटगे यास सरकारांतून निरोप, घरीं जाण्याविषयीं जाहाला. ते माळव्यांत येऊन दोन तीन हजार फौज जमवून धूम करूं लागले! याशिवाय किरकोळ होळकराकडील वगैरे सरदार यांणीं बेदा केला. त्यांस काढून देऊन माळव्याचा बंदोबस्त राखण्याविशीं फौजसुद्धां रवाना केले. ×× (तेथें) किरकोळ बंडें आहेत. त्यांच्या बंदोबस्तास गेले आहेत."[3] पुढील कामगारी कोणत्या प्रकारें बजाविली याबद्दल जगोबा बापूंचें स्वतःचेंच पत्र आहे. त्यांतील मजकूर असा कीं:—"आह्मी सरकारांतून माळवे प्रांतींचे बंदोबस्ताकरितां फौज व कंपू घेऊन आलों. तीन महिने जाहले. इकडील बंदोबस्त जाहाला. आतां हुजूर जाण्याचा बेत लवकरच आहे. चि० बाळोबा भाऊ व यशवंतराव भाऊ हुजूर मेवाडप्रांतीं आहेत."[4]

अंबाजी इंगळे यांस जरी कैद केलें होतें, तरी त्यासंबंधाचा विशेष बंदोबस्त केला नव्हता. ह्मणून तिकडील वसूल येत नसे. आणि अनेक प्रकारें त्याचा उपद्रव सुरू होता. शिवाय, खंडोजी इंगळे वगैरे तत्पक्षीय लोक उपद्रव देत होतेच. तेव्हां, दौलतराव शिंद्यांनीं यशवंतराव होळकरास सांगितलें कीं, " अंबाजी इंगळ्यापासून आह्मां(स) पैसा निघत नाहीं. कारण रदबदल करणार फार! यास्तव तुह्मीं याजला आपले येथें नेऊन पैक्याचा ठराव करून (त्यास) हस्तगतही करावें."[5] परंतु, " अंबाजी इंगळ्यास (एका विशेष मसलतीनें) लुटून टाकण्याविषयीं यशवंतरावानें दौलतरावाचे कान फुंकले. फारां दिवसांपासून शिंद्याच्या उत्तम प्रांताची वहिवाट इंगळ्याकडे असे. लोकांवर अन्याय व. जुलूम करून त्यानें संपत्ति संपादिली होती. आतां लोकांनीं त्यावर अन्याय व जुलूम केल्यानें ती संपत्ति त्यास सोडून देणें भाग पडलें."[6] त्याचप्रमाणें विरुद्ध वागणाऱ्या जान बत्तीसासही पकडून आणण्याविषयीं होळकरास सांगितलें.[7] या वेळीं जगोबा बापूंनीं जयपुरावर स्वारी करून पुनः मुलूख सोडविला.[8]

---

१. ग्याले. इ. भा. पृ. १७७।७८. हा तह ता. २३ नवंबर सन १८०५ रोजीं झाला.

२. ह्यास दरबारांतून काढण्याविषयीं इंग्रजांचीही छकट होती.

३. पत्र नंबर ३५७.

४. पत्र नंबर ३५८.

५. हो. कै. पृ. १०५.

६. मालकम साहेबांचा मध्यप्रांताचा इतिहास.

७. होळकराची कैफीयत पृ. १०४.

८. ह्या वेळीं मोठी लढाई होऊन जयपूरवाले पराभव पावले. पहा पत्रें नंबर ३३६।३६७।३६८.

सरजेराव घाटग्यानें माळवे प्रांतांत जी धामधूम माजविली होती, तिचा जगोबा बापूंनीं बंदोबस्त करून त्यास हांकून लाविल्यामुळें, तो होळकर पटाल्याकडे होते तिकडे गेला. परंतु, ह्या उपद्यापी मनुष्यास तेथेंही स्वस्थ बसून चैन पडेना. तो येऊन जाऊन पुनः शिंद्यांच्या उत्तरेकडील प्रांतांत धामधूम करीत असेच ! शेवटीं, दौलतरावाच्या हुकुमानें मानाजी फांकड्याचा मुलगा आनंदराव यानें सरजेरावास गांठून त्याच्या पोटांत जंबिया मारून त्यास ठार केलें.[1]

याप्रमाणें या विपथगामी सर्व सरदारांचा त्यांच्या त्यांच्या दुष्कृत्यानुरूप शेवट झाला. आणि सर्व सारस्वत ब्राह्मण सरदारांची राजनिष्ठा व योग्यता दौलतरावांस चांगली कळून आली. यापुढें जगोबा बापूंस 'आडकाठी' करणारे शिंद्यांच्या राज्यांत कोणीच राहिले नाहींत. मग त्यांनीं त्या रयाशतींत सर्वत्र सुव्यवस्था ठेवण्याच्या कामीं लक्ष पुरविलें. ह्या संधीस अंबाजी इंगळे आपण केलेल्या गोष्टींबद्दल पश्चात्ताप पावून चांगल्या रीतीनें वागूं लागला. मधल्या कारकीर्दींत त्यानें चालविलेले कुटिल प्रयत्न वजा केले, तर तो शूर असून शहाणाही होता. त्यामुळें त्यास दिवाणगिरीवर नेमण्याचा ठराव होऊन, तो लागलाच अमलांत आला.

ह्या मधील धामधुमीच्या कारकीर्दींत पेंढारीही शिंद्याच्या मुलखांत उपद्रव करीत होते. तेव्हां, जगोबा बापूंस त्यांचा बंदोबस्त करणें भाग झालें. तिकडे जाऊन त्यांनीं ती कामगारी कशी बजाविली, त्याबद्दलची हकीकत त्या वेळच्या पत्रावरूनच देतों[2]:—"श्रीमंत राजश्री बापूसाहेब, करीमखान पेंढारी साठ हजार जमेतीशीं होता. त्याचें पारिपत्य केलें. लुटोन घेतला. तो पळोन पंचवीस स्वारांनिशीं कोट्यास गेला. तेथें फौजसुद्धां बापूसाहेब जाऊन कोटेवाल्याचा मुलूख लुटला. तेव्हां सरकारांतून पत्र आलें कीं, त्याच्या मुलखास उपद्रव न करावा. त्यावरून दीड लक्ष खंडणी तेथें घेऊन भोपाळचा सुभा (जगोबा बापूंस) सरकारांतून सांगितला. तेथें आले आहेत. समागमें शिंतू (छट्टू) पेंढारीसुद्धां फौज तीस हजार आहे. व भाऊकडील कंपू आहे." याप्रमाणें कामगारी बजावून राज्याची नीट व्यवस्था केल्यावर दौलतराव महाराज खूष होऊन त्यांनीं जगोबा बापूंस पुढें लिहिल्याप्रमाणें जहागिरी दिल्या. "कंपूच्या खर्चास जावद, आंबझरें हे दोन्ही महाल; खासगी बापूसाहेबांचे खर्चास, व हल्लीं पेंढारी यांचें पारिपत्य केल्यावर फौजेचे खर्चास आरुणशहा, डवरा वगैरे महाल तिसां लक्षांचे दिल्हे आहेत. सरकारची मर्जी बापूसाहेबांवर तूर्तकाळीं बहुतच प्रसन्न आहे." ह्याप्रमाणें पेंढाऱ्यांचें पारिपत्य करून करीमखान यास पकडून ग्वाल्हेरीच्या किल्ल्यांत कैदेंत टाकिलें. तेथें तो सन १८१६ पर्यंत कैद होता.[3]

ह्या संधीस भोपाळच्या मुसलमानी संस्थानिकाकडून हिंदु लोकांचा व त्यांतही मुख्यत्वें गोब्राह्मणांचा फार नाश व छळ होतो, अशाविषयीं जगोबा बापूंकडे कागाळ्या आल्या. याजसाठींच पूर्वीं लखबादादा असतांना भोपाळवाल्याचा बंदोबस्त करावा, अशाबद्दल खटपट चालली होती. परंतु, दुसऱ्या अडचणींमुळें त्या वेळीं तें काम शेवटास गेलें नव्हतें. त्या वेळीं लखबादादांनीं भोपाळास एक बुरूजही बांधिला होता.[4] जगोबा बापूंनीं भोपाळवालयास ह्या कामीं चार बोधाच्या गोष्टी सांगून

---

१. सरंजामेकृत शिंदे घ. इ. पृ. ८६.

२. पत्रें नंबर ३६४।३६५.

३. ग्रांट डफची बखर पृ. ४०३.

४. या बुरुजास हल्लीं 'लखबाका बुरूज' ह्मणतात.

पाठविल्या. परंतु, तिकडून सरळ जबाब न येतां त्यांनीं उडवाउडवच केली. ह्यामुळें बापूंस चीड येऊन ते भोपाळवाल्याचा सक्त बंदोबस्त करण्याच्या तजविजीस लागले. तो प्रकार असा. "शिंदे-साहेबांकडून जगन्नाथराव यांनीं फौजेचे जमावानिशीं माळवे प्रांतीं येऊन सेनासाहेबांस (नागपूरकर भोंसल्यांस) पत्रें पाठविलीं कीं, भोपाळ घेऊन वांटणीप्रमाणें अंमल आपलाले बैसवावे."[1] त्यावरून नागपूरकर भोंसल्यांनीं भोपाळास वकील पाठवून सामोपचारानें हा तंटा मिटविण्याची खटपट केली. व त्यांस कळविलें कीं, आमचें ह्मणणें काय आहे, तें तुह्मांस जगोबा बापू कळवितील. परंतु, तोही प्रयत्न व्यर्थ गेला. शेवटीं, जगोबा बापू, भोंसल्यांकडून आलेली मदत बरोबर घेऊन, भोपाळावर गेले. आणि त्यांनीं लढाई सुरू केली. तो प्रकार असा:—"नबाब सिंदक अलीखान (मेना) साहेबांक-डील आणि जगन्नाथ राम शिंदेवाले हे उभयतां सरदार फौजेसह दौलतपुरावरून कूच करून भोपाळास जाऊन मोर्चे बसविले. आणि एकदोन हल्ले करून पक्का पू टांकेचा (?) घेतला. ते वेळेस नबाब व मशारनिल्हे यांनीं जहांमर्दी चांगली केली."[2] जगोबा बापूंनीं शहराभोंवतीं वेढा घालून आंतील लोकांस इतक्या जेरीस आणिलें कीं, त्यांस आंगचीं आंतडीं भाजून खाण्याचा प्रसंग आला होता, असें तिकडे अद्याप प्रसिद्ध आहे. शेवटीं, भोपाळचा दिवाण वजीर महंमद यानें पंधरा दिवसांची मुदत घेतली. आणि यशवंतराव होळकरांस मध्यें घालून दौलतरावांकडे भीड घातली कीं, जगोबा बापूंनीं ह्यापुढें लढाई चालवूं नये. मग, दौलतराव शिंद्यांनीं जगोबा बापूंकडे लढाई बंद करण्याविषयीं ताबडतोब निरोप पाठविला. जगोबा बापूंनीं पूर्वीं लढाई दौलतरावांच्याच परवानगी-वरून चालविली होती.[3] शिवाय, भोपाळवाल्याची खोड मोडण्याचें काम पुष्कळ दिवसांपासून शिंद्यांच्या व त्यांच्या सरदारांच्या मनांत होतें. असें असतां दिवाण वजीर महमद चढेलपणानें उपमर्द करितो काय, पुढें शौर्यानें टिकाव लागेनासा झाल्यावर तहाकरितां ह्मणून पंधरा दिवसांची मुदत मागतो काय, आणि शेवटीं पाताळयंत्रीपणा करून बिनशर्त लढाई बंद करून तेथून निघण्याचा दौलतरावांचा हुकूम आणितो काय ? सारेंच विलक्षण ! हा विचार त्या मानी पुरुषाच्या चित्तास फार झोंबला. कारण भोपाळवाल्यांनीं यांच्याशीं तसेंच उद्धटपणाचें वर्तन केलें होतें. आणि शेवटपर्यंत यांच्या आर्जवास न जातां परभारें संधान बांधून लढाई बंद करण्याचा हुकूम आणून लाविला. अशा रीतीनें त्यांना नाकावर खाजविल्यानें व दौलतरावांच्या क्षणिक स्वभावामुळें त्यांस फार वाईट वाटलें. व आतां पुढें एथेंच राहून सतत अशाच तऱ्हेनें निर्माल्यवत् दिवस घालविण्याचा त्यांस तिटकारा आला होता. ह्या संधीस त्यांनीं पत्रांत पुढील उदासीनतेचा मजकूर लिहिला आहे. "आतां पहिले दिवस राहिले नाहींत. रोजगारावर आह्मी इकडे आहों हा तुह्मां सर्वांस भ्रम. तर पहिला काळ राहिला नाहीं. क्षणभंगुर विचार ! राज्यस्थित बिघडली. यांत ईश्वर अब्रू राखील ती खरी ! घटकेचा विश्वास कोणेही कामाचा पडत नाहीं." याप्रमाणें हे त्रासून गेलेले होते. शेवटीं, यांना आपल्या देहाचाही कंटाळा आला. यांना पूर्वीं पोटशूळाची जबर व्यथा होती. ती अजमीरच्या एका फकिरानें

---

१. नागपूरकर भो. बख. गुप्तेकृत पृ. १८४.

२. नागपूरकर भोंसल्यांची बखर पृ. १८६.

३. "पहिली लढाई जग बापू यांनीं भोपाळ हस्तगत करून घेण्याकरितां कंबर बांधून शहराच्या उत्तर बाजूनें तोफा चालविल्या." "या वेळ्यांत भोपाळवाल्यांचा फार नाश झाला. शहरांतील लोक शहर सोडून चालते झाले." पहा भोपाळ संस्थानचा इ. पृ. ३३।३५.

दोरा मंत्रून देऊन बरी केली होती. तो दोरा तुटेल, तर हा विकार पुनः वाढेल व त्यांतच मरण येईल, असें त्या फकिरानें सांगितलें होतें. फकिराच्या प्रसादानें त्यांस गुण आला. त्यामुळें त्यांची श्रद्धा बसून त्यांनीं अजमीरच्या ख्वाजापिरास सोन्याचा घुमट घातला होता, व त्यास शिंद्यांनींही जहागीर दिलेली होती; ती अद्याप चालू आहे. पुढें, होणार भविष्यासारखा तो दोरा ह्याच संधीस तुटला, असें ह्मणतात! शेवटीं, वेढा तसाच असतां वायुगोळ्याचा विकार वाढून त्यांचा अंत झाला. बापू मरण पावल्यावर लष्करास कोणी चांगला नियंता राहिला नाहीं. तेव्हां, त्यांतील सरदार आपसांत कटकट करून तेथून निघून गेले. पुढें, ही गोष्ट सविस्तर समजल्यावर "शिंदे यांजकडील सरदार यशवंतराव शिवाजी यांनीं फौजेचा जमाव करून माळवे प्रांताहून भोपाळ सुमारें आले. सबब चंदाजी भोंसले यांची रवानगी (नागपूरकर भोंसल्यांनीं) केली." "परंतु त्या वेळीं इंग्रज सरकारानें मध्यें पडून ती स्वारी होऊं दिली नाहीं." याप्रमाणें भोपाळचें राज्य टिकलें. हीं वर्तमानें सन १८१०।११ सालीं घडलीं.

जगोबा बापू केवढे असामान्य वीर होते! लढाईतील कोणत्याही बिकट प्रसंगाची त्यांस खातरीच वाटत नव्हती. ते अत्यंत निर्लोभ असून, त्यांस डामडौल मुळींच नको होता. त्यांची स्वामिनिष्ठा व तशीच भ्रातृनिष्ठा, हीं जबर होतीं. आमरणांत त्यांस कोणकोणत्या भयंकर व कष्टप्रद प्रसंगांशीं टक्कर द्यावी लागली व तितक्यांतूनही आपलें मत्त्व घालवूं न देतां मोठ्या बहादुरीनें आपला व आपल्या धन्याचा त्यांनीं किती उत्तम तऱ्हेनें लौकिक राखिला, ह्या संबंधाचा विचार मनांत आला, ह्मणजे त्या कीर्तिमान् पुरुषाची मोठी शाबास वाटते! यांनीं धर्मादाय, परोपकार व पुण्यकृत्यें करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. सभ्यता व स्वामिकार्यतत्परता, या गुणांविषयीं या घराण्याचा मोठा लौकिक आहेच.

जगोबा बापू वारल्यावर ह्या घराण्यांतील प्रसिद्ध पुरुषांपैकीं यशवंतराव भाऊ व बाळाजी राम, हेच काय ते राहिले. बाकी सर्व नामांकित पुरुष या लोकच्या क्षणिक वस्तीस अनुसरून कालप्रभावास वश झाले. महाराज माधवराव शिंदे यांचे कारकीर्दीपासून हा वेळपर्यंत, शिंदेशाहींतील एकंदर वैभवाचा उत्कर्ष कसकसा झाला, त्याला कारणीभूत झालेली थोर थोर मंडळी एकामागें एक जाऊन त्या वैभवास क्षीणता कसकशी आली, हें अथेति ज्यानें सूक्ष्म नजरेनें पाहिलें असेल, तो मनांत ह्मणेल कीं, ज्या पाटीलबावांनीं समकालीन राजेलोकांत, राजकारणकौशल्य व राज्यवैभवसंपन्नता या गुणांनीं अग्रस्थान पटकावलें, ज्या जिवबादादांनीं समशेर गाजवून व अनेक बिकट व मसलतीनें निभावून नेण्याच्या प्रसंगांस खांदा देऊन शिंद्यांच्या रयाशतीस नांवारूपास आणिलें, ज्या बाळोबा तात्यांनीं उत्कृष्ट रीतीनें कारभार हांकून पेशवे सरकारास व चतुर मुत्सद्दी नानांस बराच वेळ आपल्या लहरीवर लीलेनें झुलविलें, ज्या सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाणांनीं आपल्या कारकुनीचा व मुत्सद्देगिरीचा प्रभाव सर्वत्र गाजवून इंग्रज बहादुरांकडूनही शाबास ह्मणवून घेतलें, ज्या शौर्यसागर लखबादादानें मोठमोठ्या वीरांस हाय हाय व तोबा तोबा करायास लाविलें, ते व ह्या सर्वांमागून गेलेले जगोबा बापू, या सर्वांचा काळाच्या दाढेखालीं सारखाच चूर झाला? तें अफाट वैभव, ती सर्वत्र गाजणारी सत्ता व

---

१. कैफीयत नंबर ४०१.

२. नाग. भो. बखर पृ. १८६.

३. ग्याले. इ. भा. पृ. २३२.

तीं थोर माणसें आज कोठें आहेत? अशा मनुष्यास त्या वेळीं पुढील उक्तीची आठवण झाल्याखेरीज राहणार नाहीं.

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामंतचक्रं च तत्
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चंद्रबिंबाननाः ।
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बन्दिनस्ता कथाः
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः[1] ॥

शेवटीं, कालाच्या विलक्षण प्रभावानें छाती दडपून जाऊन तो त्याचे पदीं लीन होईल!

दुसराही तशाच योग्यतेचा एक विचार त्याच्या लक्षांत येईल कीं, जें राष्ट्र किंवा नामांकित घराणें, तेजस्वीपणाच्या पायावर प्रस्थापित होऊन, पुढें लोकमान्य व्यवहारपद्धतीनें उत्कर्ष पावत गेलें, त्याला वृद्धिक्षयन्यायानें—अनेककारणसमुच्चयामुळें—जरी कांहीं काळ निकृष्टदशा आली, तरी ती तशीच न टिकतां पुनः वर डोकें करून पूर्वपुण्याईच्या जोरावर व त्याच प्रकारें चालविलेल्या बळणाच्या बळावर तें दीर्घकालावधि जगांत टिकून अनेक लोकांस आश्रयस्थान होईल.

केरकरांच्या घराण्यांतील नामांकित पुरुषांची हकीकत एथपर्यंत दिली. आतां वरती सांगितल्या-प्रमाणें शिल्लक राहिलेले दोघे पुरुष यांच्या संबंधाची थोडक्यांत माहिती देण्याचें काम पुढील भागीं करूं.

भाग १७ वा.

जिवबादादांच्या घराण्यांतील पुरुषांची हकीकत.

जिवबादादांचे वडील बंधु नगेबा दादा—नरहर गणेश केरकर—हे कोकणांत केरी गांवीं घरीं असत. जिवबादादा शिंदेशाहींत उदयास आल्यानंतर ह्या घराण्यास फार महत्त्व येऊन, प्रापंचिक व राजकीय कामांतसुद्धां यांचा व्याप फार वाढला. जिवबा दादा, जगोबा बापू, शिवबा नाना, बाळाजी राम, नारायणराव, यशवंतराव भाऊ वगैरे पुरुषांकडून निरनिराळ्या ठिकाणांहून यांजकडे पत्रव्यवहार चालत असे..शिवाय, अनेक ठिकाणचे मोठमोठे लोक जिवबादादांकडून वगैरे महत्त्वाचीं कामें करून घ्यावयाचीं तीं त्यांच्या द्वारें तिकडे पत्रव्यवहार सुरू ठेवून करून घेत असत.[2] हें घराणें उदयास आल्यावर वाडकर राजांचीं अनेक कामें शिंदे व जिवबादादा यांजकडून होण्यासारखीं होतीं, त्यांसंबंधानें व त्यांच्या फिरंग्याकडील कामासंबंधानें ह्यांना फार खटपट करावी लागली. हे अशा कामीं चांगले दक्ष व वजनदार ह्मणून त्या वेळीं गणले जात असत. कोल्हापूरकर, इंग्रज व फिरंगी यांचे

१. या श्लोकाचें भाषांतर कोणीं खालीं दिल्याप्रमाणें केलें आहे.

गेला तो नृपती प्रधान अवघे ती पंडितांची सभा
गेली ती नगरी तशा शशिमुखी ज्या तप्तहेमप्रभा ।
गेला तो नृपपुत्र त्या शुभकथा ज्यां देखिलें सर्व जें
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें काळास त्या वंदिजे ॥

२. पत्रें नंबर १२।९१।९४।९८।१११।१३२।४१५.

वाडकरांशीं, कटकटीचे किंवा सलोख्याचे जे अनेक प्रसंग आले, त्यांपैकीं बहुतेकांत यांस लहान मोठी कामगारी असेच. व त्या कामगारींत त्यांनीं वाडकरांचा आपले धनी या नात्यानें पुष्कळ श्रम व घस सोसून बराच फायदा केलेला आहे. वाडकर सरदेसायांस मोठा मान मिळून त्यांचा चांगला लौकिक व्हावा, अशी यांची फार फार इच्छा होती. व त्याप्रमाणें जिवबादादांकडे यांचा पत्रव्यवहार चालत असे. जिवबादादांनीं दिल्लीचे बादशहाकडून वाडकरांस राजेबहाद्दर किताब व मोर्चेलें, पालखी वगैरे सरंजाम देवविलीं. त्यामुळें त्यांना परम संतोष झाला. पुढें तो अनेक कारणांमुळें वाडकरांस पोहोंचण्याचा राहिला. शेवटीं, सर्व हरकती दूर करवून मोठ्या समारंभानें राजेबहाद्दर किताबाची सनद व खिलत यांनीं वाडीचे राजे खेमसावंत ऊर्फ ' राजश्री ' यांस अर्पण केली. वाडी सरकारच्या कामगारीस हे विकलेले असत. त्यासंबंधानें ह्यांना फिरंग्यांकडून फार त्रास सोसावा लागला. शेवटीं, केरी गांव गोमांतकांतील असल्यामुळें या त्रासामुळें तो सोडून त्यांस वाडी संस्थानांतील आरंवदें गांवीं (केरीपासून अगदीं नजीकच्या हद्दींत) यावें लागलें. सौंदेकर देसाई यांस फिरंग्यांचा नेहमीं उपद्रव असे. त्यांस त्यांच्या कैदेंतून यांनींच सोडविलें. शेवटीं, यांची योग्यता जाणून फिरंग्यांनीं यांजकडे बहुगुण कामर्ते नामक वकील पाठवून त्यांच्या द्वारें स्नेह संपादिला. व आपलीं बरींच कामें त्यांजकडून करून घेतलीं. त्यांपैकींच सदाशिवगड किल्ला पेशव्यांनीं घेतला होता, तो फिरंग्यांस मिळण्याची तजवीज यांनीं केली, हें एक काम होय. पेशव्यांकडे वाडकरांकडील वकील कृष्णाजी महादेव फळणीकर होते. पण, पुढें नरोबा दादांनीं लाडकोबा भाऊ शिवेश्वरकर नामक वकील आपल्या मार्फत चालणाऱ्या कामासाठीं पाठवून, या उभय वकीलांमार्फत बरींच कामें तिकडून करून घेतलीं. केरी हा गांव पहिल्यानें अगदीं लहान असतां नदीकांठची वगैरे जमीन बांदबंदस्तीनें घेऊन यांनीं चांगला वाढवून नांवारूपास आणिला. यांना वाडी सरकारांतून पालखीसाठीं केरी व हरमल हे गांव इनाम मिळालेले अद्याप चाललेले आहेत. सावंतवाडीचे राजेबहादर व फिरंगी यांशीं प्रत्यक्ष आणि कोल्हापूरकर छत्रपति, इंग्रज, पेशवे, बुधचे, घाटगे, वगैरे यांशीं पर्यायानें बरेच महत्त्वाचे राजकीय व्यवहार यांच्या मार्फत घडलेले आहेत. परंतु, विस्तरभयास्तव त्या हकीकती एथें देतां येत नाहींत. नरोबा दादा हे जिवबादादांच्या मागून लौकरच चार महिन्यांत, ह्मणजे ता० १९ मे सन १७९६ रोजीं, वारले.

---

१. पत्रें नंबर १०५।१०६।१८७।१९२।२१९।२७१.

२. " जिवबा केरकर यांच्या योगानें दिल्लीच्या बादशहाकडून त्यांस दोन मोर्चेले व राजेबहादूर असा किताब मिळाला. " गोमांतक प्रा. इ. पृ. ९१.

३. पत्र नंबर ११६.

४. हे फिरंगी सरकाराकडे महत्त्वाच्या कामगारीसाठीं प्रधानादाखल असत. त्या सरकारांत यांचें चांगलें वजन होतें. विद्वत्ता, शहाणपणा व राजकारणपटुत्व, या गुणांविषयीं यांचा चांगला लौकिक होता. यांस त्या सरकारांतून ' लिंगिस्ताद ' हा किताब होता. ह्यांनीं श्रीमद्भगवद्गीतेचें पोर्तुगीज भाषेंत सुंदर भाषांतर केलें होतें. ह्यांचें घराणें गोमांतकांत पानवेल एथें आहे.

५. पत्र नंबर ४१५.

६. यामुळेंच याला नरोबाची केरी असें ह्मणतात.

७. पत्रें नं० ९५।९९।१३२।२१९.

८. पत्रें नंबर १९२।१९३।२७१.

वर दिलेल्या त्रोटक हकीकतीवरून नरोबा दादांच्या योग्यतेची अटकळ साधारणपणें वाचकांच्या लक्षांत येईल. जिवबादादा, शिवबा नाना, जगन्नाथ राम व बाळाजी राम ह्या त्यांच्या बंधूंनीं हिंदुस्थानांत एवढा लौकिक संपादिला होता, तरी ते ह्यांच्या अर्ध्या वचनांत वागत असत. त्या सर्वांची यांच्या ठिकाणीं फार भक्ति होती.

शिवबा नाना हे जिवबादादांचे धाकटे बंधु. हे मेवाड व अजमीर प्रांताचे सुभेदार होते. हे शिंदेशाहींत 'लौकिकवान् पुरुष जाहले.' यांजविषयींची माहिती या चरित्रांत प्रसंगोपात्त आलेलीच आहे. हे मेवाड प्रांतीं असतांना ह्यांच्या पागेचे घोडे नेऊन लग्नांत वधूवरांस बसवून शिवबा नानाचा घोडा अशाबद्दल गायन करीत. त्या गायनाची चाल बराच काळ तिकडे सुरू होती. हे ता० २६ मे सन १७९६ सालीं वारले.

बाळाजी राम ऊर्फ बाळाभाऊ बक्षी यांचीही माहिती पूर्वी आलेली आहे. हे कार्यकर्ते लौकिकवान् पुरुष सन १८१८ सालीं वारले.

यांशिवाय साबाजी राम व विश्राम नरहर, हेही या घराण्यांत वरील पुरुषांचे खालोखाल इतिहासप्रसिद्ध होते. हे अनुक्रमें सन १८०३ व सन १८०४ सालीं वारले.

यशवंतराव शिवाजी ऊर्फ यशवंतराव भाऊ हे जिवबादादांचे धाकटे चिरंजीव. यांस शिवबा नानांस दत्तक दिलें होतें. शिवबा नाना वारल्यावर यांना अजमीरचे सुभेदार नेमिलें. जिवबादादा असतांना त्यांच्या स्वारीबरोबर जाऊन यांनीं लढायांत बरीच कामगारी बजाविली होती. हे सन १८०२ त स्वतंत्र सरदार झाले. हे शूर असून घोड्यावर बसणारे मोठे पटाईत व तसेच उत्तम अश्वपरीक्षक होते. "यांजपाशीं २५०००फौज एक कंपू आणि त्याशिवाय पांच हजार पागेचे स्वार धरून त्या बाहेर २५००० पेंढारी" असत. यांनीं रांगड्यांचा पराभव करून कुमळमेर वगैरे मुलुख शिंद्यांचे राज्यास जोडिला. यांना पुढें मेवाडचीही सुभेदारी मिळाली. पेंढाऱ्यांचा उपद्रव माफ मोडून टाकावा, ह्मणून इंग्रज सरकारानें बंगाल, मद्रास व मुंबई या तीनही इलाख्यांतील शूर पलटणें नेऊन, पेंढाऱ्यांचे मुख्य सरदार अमीरखान, करीमखान, छट्टू व रांजण, यांचा पुष्कळ ठिकाणीं पराभव केला. त्या वेळीं शिंदेशाहींतील आपणास ओळखणारे जुने सरदार यशवंतराव भाऊच काय ते एक आहेत, ते आपल्यास मदत करितील अशा आशेनें त्यांनीं यांजकडे बोलणें लाविलें. पेंढारी पूर्वीपासून शिंद्यांच्या आश्रयानें होते, हें एक; व शिवाय दौलतराव शिंद्यांचेंही त्यांजकडे अंग असे, ह्मणून त्यांचे तसे निरोप येण्याबरोबर यशवंतराव भाऊंस त्यांस मदत करावी लागली, हें दुसरें; अशा कारणांनीं त्यांनी ह्या पेंढाऱ्यांच्या सरदारांस आश्रय दिला. तेव्हां, इंग्रज सरकाराशीं पेंढाऱ्यांच्या पुष्कळ लढाया होऊन त्यांनीं कुंभेरी, राजनगर, दयाळगड वगैरे कित्येक किल्ले घेतले. अशा रीतीनें या " यशवंतराव शिवाजीशीं अनुसंधान शिट्टू व रांजण यांनीं लावून त्याचे बगलेंत शिरून पुनः आपली जमियत केली. व माळवे प्रांतीं राहून लूटलुबा करून खावें, असें एक वर्ष झालें." तेव्हां, इंग्रज सरकारानें यशवंतराव भाऊंकडे कर्नल

१. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९१.

२. पत्र नंबर ४००.

३. सिंक्लेअरकृत हिं. इ. भा. पृ. २२८.

४. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९१.

५. नागपूरकर भों. ब. पृ. १८७.

जांभील यांस वकिलीस पाठवून बोलणें लाविलें कीं, पेंढाऱ्यांस मदत न करितां तुह्मी स्वस्थ बसाल, तर आह्मी तुह्मांस जहागीर देऊं. परंतु, कांहीं विशेष कारणांवरून ती गोष्ट त्यांस कबूल करवली नाहीं. पुढें, इंग्लिशांच्या व पेंढाऱ्यांच्या बऱ्याच चकमकी झडल्या. शेवटीं, इंग्रज सरकारास खचित वाटलें कीं, शिंद्याचा पेंढाऱ्यांस आश्रय आहे. त्यावांचून यशवंतराव भाऊ त्यांस साह्य करीत नाहीं. "शिंद्यानें तर गुप्तपणें इंग्रजांचे विरुद्ध मसलती सुरू केल्याच होत्या. पण, इतक्यांत त्याचीं पत्रें वगैरे मध्येंच पकडून त्याला तह करणें अगदीं भागच पाडिलें. त्या तहांत 'मी तुह्मांस पेंढारी लोकांशीं लढाई करण्याचे कामीं मदत करीन ' अशी त्यानें शपथ घेतली." तरी पेंढाऱ्यांचे दंगे चाललेच होते. तेव्हां, यशवंतराव भाऊ, जावद वगैरे प्रांतांतील ठाण्यांवर व त्या उत्पन्नावर आपले ठिकाणीं बळावून असल्यामुळें त्यांजकडून पेंढाऱ्यांस लागेल ती मदत वेळच्या वेळीं होत असते, असें जाणून इंग्लिश सेनेचा मुख्य मालकम, यानें यशवंतराव भाऊंस जावदेहून काढून त्यांस दुसरीकडे जहागीर देण्याविषयीं दौलतराव शिंद्यांस नेट लाविला. त्यामुळें "यशवंतराव भाऊ यांस परत बोलावून त्यांस जाहागीर अथवा पेनशन नेमून देऊन त्यांस जावदचे ठाण्यापासून दूर ठेवितों आणि त्यांचे वर्तणुकीबाबद मी जिम्मा घेतों असें अलिजाबहादर कबूल करीत आहेत," असा इंग्लिश सरकारार्शी त्यांनीं करार केला. व त्याप्रमाणें त्यांनीं यशवंतराव भाऊंस हुकूम पाठविला. परंतु, जावदेहून निघून जाण्यास त्यांजकडून दिरिंग लागल्यावरून दौलतरावांनीं जान बत्तीसच्या कंपूंतील हरदुल्ला साहेब यशवंतराव भाऊंवर पाठविलें. त्यामुळें जावदेचें ठाणें उठवून यशवंतराव भाऊ त्यांजकडे ग्वाल्हेरीस गेले. मग मालकमसाहेबांनीं त्यांच्या सर्व जहागिरा जप्त करून खर्चासाठीं रोज दीडशें रुपये प्रमाणें सालीना ५४००० रुपये देण्याचें ठरविलें. ही गोष्ट सन १८१८ त घडली.

आपल्यामुळें यशवंतराव भाऊ बक्षी यांचें नुकसान झालें, असें जाणून दौलतरावांनीं सत्वास, नेमावर, पंचमहाल, हे महाल, शिवाय कोलारी, बिजळगांव, खारद्या, व बांवच्या हे चार गांव त्यांस नवीन जहागीर करून दिले[६]. मग यशवंतराव भाऊ मथुरेस जाऊन राहिले. व ग्वाल्हेरीस सरकाराजवळ जगन्नाथ राम यांचा पुत्र पुरुषोत्तमराव हे राहिले. पुढें दौलतराव महाराज आपल्या वयाच्या ४७ वे वर्षी ता० २१ मार्च सन १८२७ रोजीं मरण पावले. नंतर, ते निपुत्रिक ह्मणून कण्हेरखेडाहून पाटलोजी शिंदे यांचा मुलगा आणून गादीवर बसविला. त्याचें नांव जनकोजीराव असें ठेविलें. यांचे कारकीर्दीत फौज बिघडली. तेव्हां, यशवंतराव भाऊंस आणल्यावांचून फौजेंतील बेदा मोडणार नाहीं, असें ठरवून त्यांस हुजूर आणिलें. तेव्हां, त्यांनीं फौजेची समजूत करून दंगा मोडला. आणि हे सेनापति असल्याशिवाय फौजेची व्यवस्था चालावयाची नाहीं, असें जाणून त्यांस राहावून घेऊन फौज व तोफखाना ह्मणजे जिनसीचें काम दिलें[७]. त्यावरून यांस जिनसीवाले ह्मणत. तसाच बायजा-

१. पत्र नंबर ४०२.

२. सिंद्धे. हिं. इति. भाग. पृ. २२८.

३. सरंजामेकृत शि. घ. इ. पृ. १३९.

४. नागपुरकर भों. बखर.

५. पत्र नंबर ४०० व अहेवाल.

६. पत्रें नंबर ३६९।३७०।३७६।३७७।३७८।३९४।३९८.

७. पत्रें नंबर ३८८।३९०।३९१ व ग्वाल्हे. इ. भा. पृ. १८५.

बाई व जनकोजीराव यांचा राज्यकारभारासंबंधीं वाद होऊन तिनें जनकोजीरावांस कैद केलें होतें. या बाबतींतही यशवंतराव भाऊंनीं सलोख्याची तजवीज चालविली होती. परंतु, जनकोजीरावांची बायको ताराबाई इचा व इतर कांहीं मंडळीचा आग्रह पडल्यावरून याबद्दलचा इंग्लिश सरकारामार्फत निकाल करून घेण्यासाठीं आनंदराव भोंसले वगैरे कित्येक लोक कलकत्त्यास लाटसाहेबांकडे रवाना केले[२]. यशवंतराव भाऊंचा मनसोबा, कोणीकडून तरी महाराजांचें काम झालें ह्मणजे झालें, एवढाच होता. ह्मणून ते स्वस्थ राहिले. परंतु, कलकत्त्यास गेलेल्या मंडळीचें बस्तान तेथें जुळेना. शेवटीं, लाटसाहेबांच्या प्रधानमंडळाकडून त्यांना स्पष्ट सांगण्यांत आलें कीं, शिंद्यांच्या दरबारांतील जुने मुत्सद्दी यशवंतराव भाऊ आहेत. त्यांची संमति, तुह्मी ह्मणतां या गोष्टीस, मिळाल्याशिवाय तुमचा कार्यभाग होणार नाहीं. तेव्हां, त्यांनीं निरुपाय होऊन यशवंतराव भाऊंस लिहिलें कीं, " हें पत्र लिहिण्याचें कारण आह्मी व मि० पेनटीसाहेब मिळोन लाटसाहेबांचे चिरंजीव शेहेर बर्डिणसाहेब परविंट शिकतर व ऊट (ऊद) साहेब लाटसाहेब यांचा भाचा या उभयतांस सह्यांत घेऊन आपल्या मार्फतीनें पुनरपि ग्वाल्हेरचा बंदोबस्त करावा. याप्रमाणें जाब ठरून ×××× मी ताराबाई सौभाग्यवती यांचें बोलणें बोलून ठेविलें. परंतु आपण त्यांच्या राज्यांतील मालक आहां. व सरकार कंपनीच्या बुकांत मोठे मनुष्य ह्मणून आपले तीर्थरूपांचें[३] व आपलें नांव लिहिलें आहे. ह्या दरबारांत आपण मान्य आहां. याजकरितां आपलें एक पत्र लाटसाहेब यांचे नांवचें पाठवावें. ह्मणजे तुमचे नांवानें हुकूम घेऊन ग्वाल्हेरचे बंदोबस्ताविषयीं हुकूम व वस्त्रें पाठवून देतों. आपणाजवळ येतील. ×××× तीं पत्रें येथें एकांतांत लाटसाहेब[४] यांस दाखवून मजकूर लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त करून आह्मी ×××× येतों. याजविषयीं एक घडीचा विलंब न करावा. येथें कार्य सिद्ध आहे. याउपर मर्जी आपली. अशी वेळ पुनः येणार नाहीं. व पेनटीसाहेब यांनीं पार्शी पत्र आपणास सलामीचें लिहिलें आहे त्याचें उत्तर पाठवून द्यावें. ह्मणजे तेही मेहनत करितील[५]." मग यशवंतराव भाऊंनीं त्याप्रमाणें पत्र पाठवून तिकडील काम होईसें केलें. पुढें, हे जनकोजी महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत व जयाजीराव महाराजांच्या कारकीर्दीच्या आरंभीं कांहीं काळपर्यंत होते. तितक्या मुदतींत ते शिंद्यांच्या रयाशतींत घडलेल्या महत्त्वाच्या बऱ्याच कामांत सरकारास योग्य सल्लामसलत देत असत. अडचणीच्या प्रसंगीं यांस बोलावून नेत असत. जिवबादादांच्या वेळचें शौर्य, शिंदेशाहींत सन १८४३ सालपर्यंत जागृत होतें. महाराजपूर व पन्यार एथें शिंद्याच्या इंग्लिशांबरोबर झालेल्या लढायांत यशवंतराव भाऊच सेनापति होते. त्यांत " शिंद्याची फौज शूरत्वानें उत्तम लढली. ××× इंग्रजी सैन्यांतील शिपाई पुष्कळच मेले[६]." शेवटीं, इंग्लिशांना जय मिळाला ही गोष्ट ठरलेलीच !

१. पत्र नंबर ३८८ व ग्याले. इति. पृ. १८३.

२. या वेळीं बायजाबाईतर्फे राज्यकारभार तिचे बंधु हिंदुराव घाटगे कागलकर हे पहात असत. यांचे कारभारापासून रयतेस बरेंच सुख होतें. हल्लीं घाटगे यांचें कागल संस्थान कोल्हापूरप्रांतीं आहे. तेथें यांचे वंशज राहतात.

३. जिवबादादांचें.

४. ह्या वेळीं गव्हरनर जनरल लॉर्ड विलियम बेंटिंकसाहेब होते.

५. पत्र नंबर ३८८.

६. ग्याले. इ. भा. पृ. १९२।९३.

जनरल मालकम, जांभील सर ह्यू गफ्, हे इंग्लिश सरदार यशवंतराव भाऊंस फार मानीत. हे सन १८४४ त वारले.

हे शूर होतेच. परंतु, औदार्यांत यांची प्रसिद्धि विशेष. यांस भाऊराजा असें लोक ह्मणत. जुन्या बखरींत यांचें वर्णन असें आहेः—"शूर आणि धैर्यवान् दाता, उदार असे. 'नाहीं' असें जन्मपर्यंत कोणास ह्मटलेंच नाहीं. अहंता तिळप्राय नाहीं. असा लौकिकवान् सरदार! आबालवृद्धांशीं प्रिय भाषण. हत्ती, घोडे, पालख्या कितीएकांस दिल्या. ×× मुलखांत ज्याचा लौकिक जाहीर आहे."

पुरुषोत्तमराव जगन्नाथ ऊर्फ लालासाहेब हे बाळाभाऊ बक्षी यांचे नातू. जगोबा बापू यांचा मुलगा रामराव (जे सन १८०४।५ च्या इंग्रजांबरोबरच्या लढायांत प्रसिद्धीस आले, ते) पूर्ववयांत वारल्यामुळें पुरुषोत्तमरावांस जगोबा बापूंनीं दत्तक केलें. बायजाबाई व जनकोजीराव शिंदे यांजमध्यें जीं अनेक प्रकरणें उपस्थित झालीं होतीं, त्यांजबाबद जनकोजी महाराजांच्या पत्नी ताराबाई यांनीं त्यांना लाटसाहेबांजवळ कलकत्त्यास पाठविलें होतें. नंतर, तिकडून मनोदयाप्रमाणें लौकर कामगारी आटपून येण्यासंबंधानें त्यांनीं लिहिलें कीं, "तुह्मी वडिलोपार्जित सरकारचाकरी करीत आलां त्याप्रमाणें करून यावें. त्याची परीक्षा आतांच आहे." पुढें ही कामगारी ते बजावून आले. यांजकडे फौजेचा अधिकार असे.

जनकोजी महाराजांचे मामा कृष्णराव कदम यांचा व जनकोजींचा औरस बाप पाटलोजी शिंदे यांचा वाद पडला. परंतु, जनकोजी महाराज कृष्णराव कदमांच्या आधीन असल्यामुळें पाटलोजीस ग्वाल्हेरींत आधार मिळेना. तेव्हां, सरकारचे हे वडील जाणून पुरुषोत्तमरावांच्या फौजेनें त्यास पाठीशीं घालून मामासाहेबांचा शह निवारण केला. ती फौज मामास ग्वाल्हेरींतून घालविण्यास सिद्ध झाली. तेव्हां, मामासाहेब सरकारवाड्यांत लपून राहिले. ह्मणून फौजेनें तोफा व शस्त्रें घेऊन सरकारवाड्याभोंवतीं गराडा दिला. त्या वेळीं फौजेची एकंदर स्थिति पूर्ववत् राहिलेली नसल्यामुळें पुरुषोत्तमरावांसही ती आटोपण्यासारखी नव्हती. मग मामासाहेब चोरवाटेनें निघून गेले. आणि माळवे प्रांतीं जाऊन तेथील रेसिडेन्टास साह्य करून घेऊन त्यांनीं इंग्रज सरकारची मदत मिळविली. शेवटीं, जनकोजीरावांनीं ह्या फौजेस काढून लावलें. नंतर, पुरुषोत्तमराव मथुरेस जाऊन राहिले. परंतु,त्यांस पुनः बोलावून आणून वस्त्रें व जहागिरी दिल्यां. आणि मामासाहेबांवर सरकारची इतराजी झाली. परंतु, मामासाहेबांचा यांना नेहमीं त्रास होता. त्यामुळें शिंदे सरकार जरी आग्रहानें राहवीत होते, तरी ते त्रासून नाइलाजानें सन १८६१ च्या जानेवारी महिन्यांत कोकणांत केरी एथें आले. यांना शिंद्यांकडून "दौलतराव बहादर दिलावर जंग" असा किताब होता. पुढें हे सन १८८१ साली वारले.

१. यशवंतराव भाऊंसंबंधीं पुष्कळ महत्त्वाची माहिती आहे. ती विस्तारभयास्तव देतां आली नाहीं.

२. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९१।९२.

३. पत्र नंबर ३८९.

४।५. परिशिष्टांतर्गत अहवाल

६. पत्र नंबर ३९२.

७. पत्र नंबर ४०५.

यांचे मागें शिंदेशाहींत यशवंतराव भाऊंचे चिरंजीव जिवाजीराव यशवंत ऊर्फ भय्यासाहेब हे ग्वाल्हेरीस होते. यांस सालीना १२०० रुपयांची नेमणूक लहानपणीं दुधाकरितां म्हणून केली होती, ती त्यांना मिळत असे. हे ता० १२ जून १८९८ रोजीं वारले. आतां यांच्यामागें शिंदेशाहींत जिवबादादांचा कोणी राहिला नाहीं.

सांप्रत, या घराण्यांत केरी एथें गणपतराव नरहर केरकर ऊर्फ बाबासाहेब हे घरचे मालक असून, भय्यासाहेबांचे नातू यशवंतराव ऊर्फ भाऊराजा हे पूर्ववयी, असे दोघेच पुरुष आहेत. यांचें इनामांसुद्धां उत्पन्न दहा हजार रुपये आहे.

कृष्णराव बाबा व घनश्यामराव दादा असे नारायणराव बक्षी यांस दोन मुलगे होते. त्यांस दौलतराव महाराजांनीं ग्वाल्हेरीस नेमणुका करून दिल्याचा मजकूर मागें दिलाच आहे. त्यांपैकीं कृष्णराव ता० १९ नवंबर सन १८५० रोजीं वारले. यांस पुत्रसंतान नव्हतें. पुढें, घनश्यामराव हे दरबारीं होते. त्यांच्या हक्कांकडे राजे दिनकरराव राजवाडे यांनीं दुर्लक्ष केलें[1]. नंतर, हे सन १८६३ सालच्या अखेरीस वारले. पुढें, यांच्या बायकोनें एक तिकडचाच मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव नारायणराव ऊर्फ बापूसाहेब असें ठेविलें. हेही सन १८९८ सालीं वारले. यांस जिवाजीराव या नांवाचा एक लहान मुलगा असून, त्याला दरमहा साठ रुपये नेमणूक असल्याचें समजतें. ह्या हल्लींच्या दत्तकाबद्दल इकडे कोकणांत त्यांच्या घरीं माहिती नाहीं.

भाग १८ वा.

किरकोळ माहिती.

शिंद्यांचे सेनापति जिवबादादा यांच्या हाताखालीं सैन्य होतें तें.

१००००० स्वार एक लक्ष. (घोडेस्वार=घोडा, स्वार, मोतद्दार).
५०००० पायदळ. कंपू ५. (प्रत्येक कंपूंत दहा हजारप्रमाणें लोक).
५०० तोफा. (प्रत्येक तोफेस गोलंदाज ३ प्रमाणें).
२०० जिनशी (मोठ्या) तोफा.
१००५० जिवबादादांचें खासगी सैन्य. (फक्त स्वार).
६०००० पेंढारी. (हें लष्कर गरजेप्रमाणें कमजास्ती होत असे).
१५००० शिंदे सरकारची खासगी हुजुरात.
३००० जनानखान्याकडील खासगी सैन्य. (यांत बायकाही स्वार असत).
४०० हत्ती. (कधीं कधीं ही संख्या पांचशेंपर्यंत असे).
४०० रथ. (बैल जुंपावयाचे).
३०० सांडणीस्वार.
११००० ओझ्याचे उंट.
१३००० बैल. (तोफा ओढावयाचे).

१. परिशिष्टांतर्गत कैफीयत.

२. " लाख फौज, पन्नास हजार पायदळ व पांचशें तोफा " याप्रमाणें शिंद्याची रणसामग्री होती. होळ. कैफी.

याशिवाय प्रांतोप्रांतीं किल्ले वगैरे ठाण्यांत तोफा व सैन्य होतें, तें निराळें. शिवाय, बादशहाकडील फौज निराळीच होती.

जिवबादादांचे वेळीं मुत्सद्दी व सरदार होते ते.

मुत्सद्दीमंडळ.

१ बाळाजी अनंत पिंगे ऊर्फ बाळोबा तात्या पागनीस.
२ राघो राम राजाध्यक्ष रांगणेकर ऊर्फ राघो राम पागे.
३ सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण.
४ लक्ष्मण अनंत ऊर्फ लखबादादा.
५ शिवाजी दुल्लभराव केरकर ऊर्फ शिवबा नाना.
६ जगन्नाथ राम केरकर उर्फ जगोबा बापू.
७ यशवंतराव शिवाजी वागळे.
८ धोंडबा दादा पागनीस.
९ भिंवराव मोदी.
१० गोपाळराव भाऊ चिटणीस ऊर्फ गोपाळराव रघुनाथ प्रभू.
११ साबाजीराव मोदी.
१२ बाळाजी राम केरकर ऊर्फ बाळाभाऊ बक्षी.
१३ नारायणराव जिवाजी केरकर ऊर्फ नारायणराव बक्षी.
१४ भाऊ फडणीस. (महाराष्ट्र ब्राह्मण—देशस्थ.)
१५ बाजीबा महाजन मोदी.
१६ रामजी पाटील जाधव.

सरदारमंडळ.

१ रामचंद्र नारायण पन्हाळकर पागे.
२ विठ्ठल नारायण ,,
३ विश्राम नरहर केरकर.
४ यशवंतराव शिवाजी केरकर ऊर्फ यशवंतराव भाऊ.
५ गोपाळराव पिंगे.
६ कृष्णोबा केरकर.
७ शामराव पिंगे.
८ रामराव केरकर ऊर्फ आपासाहेब.
९ नारबा दळवी.
१० रामबा रेगे कोचरेकर.
११ निळकंठराव काशी आरस.
१२ बाळाजी आत्माजी भालावलकर.
१३ राघो विठ्ठल.
१४ गोविंद जगन्नाथ पेडणेकर.
१५ हरिपंत.
१६ रंगोबा सांखवळकर.
१७ रवळोजी शिंदे.

पृ. ५४, पत्रें नंबर १८।१२, उदेपूरचा लोकहितवादिकृत इति. पृ. २५४, नातूकृत महा. च. पृ. २७० व पोवाड्यांचें पु. पृ. १५४।१५८.

१. गायकवाडी दौलतींत प्रभू, शिंद्याचे दौलतींत शेणवी, पेशव्यांचे दौलतींत चित्पावन, नागपूरकर भोंसल्यांचे दौलतींत देशस्थ फार असत. ऐतिहासिक गोष्टी भा. २, गो. ३४, पृ. ५१.

१८ आनंदराव शिंदे.
१९ केदारजी शिंदे.
२० भगीरथराव शिंदे.
२१ अण्याबा जाधव.
२२ रायाजी पाटील शिंदे.
२३ अंबाजी इंगळे.
२४ देवजी गवळी.
२५ बापू शिंदे.
२६ शिघोजी गवळी.
२७ त्रिंबकजी इंगळे.
२८ हैबतराव फाळके.
२९ खंडोजी इंगळे.
३० हिंमतबहादर गोसावी.
३१ बाळोजी इंगळे.
३२ सठवाजी फाळके.
३३ नाना वरटीकर.
३४ बाळकृष्ण विठ्ठल.
३५ येसाजी रामकृष्ण रेगे आरंवदेकर.
३६ गोविंद भिमाजी नाबर.
३७ शामराव पांडुरंग आजगांवकर.
३८ विश्राम गंगाधर पालयेकर.
३९ अंताजी रघुनाथ कवठणकर.
४० सखो रंभाजी.
४१ येसो भिमाजी नाबर.
४२ बचाबा कोटणीस.
४३ बाबूराव दाभोळकर.
४४ बाळकृष्ण गंगाधर.
४५ बाळकृष्णराव उसपकर.
४६ अंतोबा दादा नेर्लीकर.
४७ लक्ष्मण रघुनाथ पेडणेकर.
४८ लखबा वागळे.
४९ बळवंतराव रघुनाथ दळवी आरवलीकर.
५० साबाजी नारायण राजाध्यक्ष शिरोडकर.
५१ अंताजी रामचंद्र रेगे न्हैचे आडकर.
५२ व्यंकाजी रामचंद्र रेगे ,,
५३ रामबा मांजरेकर.
५४ नारायण अनंत परुळकर.
५५ साबाजी नाना मळगांवकर.
५६ विठोबा दादा दळवी.
५७ येसाजी वासुदेव रेगे आरवलीकर.
५८ मर्तोबा शेणवी साखरदांडे.
५९ राघोबा आमोणकर.
६० रामचंद्र गंगाधर रेगे आरवलीकर.
६१ खंडेराव हरि.
६२ विठोजी शिंदे.
६३ आपाजी खंडेराव.
६४ बाबाजी पाटणकर.
६५ राणे खानभाई.
६६ डि बॉयनसाहेब फिरंगी.
६७ मौना डौला.
६८ पिरू ऊर्फ पेरण फिरंगी.
६९ शेकरू ऊर्फ शिकंदर फिरंगी.
७० सदरलंड फिरंगी.
७१ जेकबसाहेब फिरंगी.
७२ जॉर्ज थामस फिरंगी.
७३ जान बत्तीस फिरंगी.
७४ मुसा उस्तोन फिरंगी.
७५ दुर्जनसाहेब फिरंगी.

---

१. या लोकांचे वंशज हे शिंदा आपला यजमान असें समजतात, आणि आपले पूर्वजांनीं शिंदेशाहींत मोठ्या मर्दुमकीचीं व मुत्सद्दीपणाचीं कामें मोठ्या नेकीनें केल्याचा अभिमान बाळगतात. केरी गांवीं जिवबादादांचे वंशजांचे येथें दसऱ्यादिपवाळीस त्यांच्या जुन्या रीतीप्रमाणें दरबारी थाटाची कचेरी करण्याची चाल आहे. त्या वेळीं मध्यभागीं शिंदे सरकारची गादी स्थापून आपण मानाप्रमाणें बाजूस बसतात. अशी वहिवाट अद्याप चालत आहे. मध्यभागची शिंदे सरकाराकरितां ह्मणून जी बैठक मांडिलेली असते, ती अर्थात् मोकळी राहते. ही वहिवाट ह्मणजे 'पूर्व' स्मरणाचें व राजनिष्ठपणाचें आनुवंशिक वळणच होय. या निस्सीम स्वामिभक्तीनें कोणा देशाभिमानी पुरुषाचें अंतःकरण आनंदभरित होणार नाहीं ?

७६ लेस्तानो फिरंगी.
७७ जीनसाहेब फिरंगी.
७८ मुकीरसाहेब फिरंगी.
७९ मेरूसाहेब फिरंगी.
८० सांगस्तरसाहेब फ्रेंच.
८१ मानाजी मोरे.
८२ द्वारकोजी वाबळे.
८३ तुळसाजी शिंदे.
८४ खंडेराव माने.
८५ धारराव शिंदे.
८६ यशवंतराव शिंदे.
८७ राणोजी कदम.
८८ हरबा बापू.
८९ व्यंकाजी माबाजी राजाध्यक्ष ऊर्फ बचोबा हवालदार.
९० बाबूराव पांडुरंग मळगांवकर दंडी.
९१ बाबा पेडणेकर.
९२ भाऊ पोतनीस.
९३ गणेशपंत नाना.
९४ लक्ष्मणराव बापूराव राजाध्यक्ष वेंगुर्लेकर.
९५ बळवंतराव बाबूराव ,,
९६ राघोबा वैद्य.
९७ व्यंकटराव देसाई मांजरेकर.
९८ पांडुरंग नारायण.
९९ साबाजी गोविंद मळगांवकर.
१०० भास्करराव महादेव बांदेकर.
१०१ साबाजी वासुदेव रेगे आरवलीकर.
१०२ पांडुरंग शामराव लाड वागाळकर.
१०३ जनार्दन मुकुंद राजाध्यक्ष आजगांवकर.
१०४ विश्वासराव सबनीस.
१०५ चिटको रघुनाथ पत्की मडगांवकर.
१०६ गणेश नारायण चिटणीस.
१०७ यशवंत नारायण शेरलेकर.
१०८ सदाशिव नारायण राजाध्यक्ष.
१०९ गणेश विठ्ठल नाबर.
११० गोपाळराव जोगदेव भट्ट.
१११ विठोबा धामापुरकर.
११२ विठ्ठल साबाजी रेगे आरवलीकर.
११३ पांडुरंग शिवाजी वागळे.
११४ रावजी रांगणेकर.
११५ दिपाजी नाबर.
११६ भास्कर पांडुरंग दळवी रेडकर.
११७ वामनराव आपाजी.
११८ खंडू कुंवर.
११९ बाहादानशिंग.
१२० महिपतराव निंबाळकर.
१२१ रामलाल.
१२२ यशवंतराव निंबाळकर अकलूजकर.
१२३ गंगाजी राम.
१२४ कृष्णा भाड.
१२५ जोतीबा माने.
१२६ मानसिंगराव पाटणकर.
१२७ त्रिंबकजी शिंदे.
१२८ आबुल ह्यादखान.
१२९ हासनभाई.
१३० शहामतखान.
१३१ मुझफरखान पटाण.
१३२ बापूखान.
१३३ बहादरखान.
१३४ दौलामियां.
१३५ आवड खर बेग.
१३६ महंमदखान.
१३७ लक्ष्मणराव जाधव.
१३८ गुलाबराव कदम.
१३९ हेशिंग.
१४० आपाजीराव कदम.
१४१ जानराव निंबाळकर.
१४२ भोजराज मेता.
१४३ जाकी जुजे फिरंगी.
१४४ दिनकर सदाशिव भेंडे.

१४५ नारायण गणेश रेगे.
१४६[1] व्यंकाजी सदाशिव.
१४७ आत्माराम गडणीस.
१४८ जिवाजी यशवंत वर्दे.
१४९ रामराव वासुदेव वागळे.
१५० रावजी मद्.
१५१ गोखबा.
१५२ जनार्दन बाळकृष्ण आरंवंदेकर.
१५३ लक्ष्मण विश्राम.
१५४ अंबाजी राम करंडे.
१५५ सदाशिव रामचंद्र कोठारी.
१५६ रामचंद्र बाबा वेंगुर्लेकर.
१५७ गणेश पुंडलिक.
१५८ वासुदेव गोपाळ केरकर.
१५९ नारबा पोतनीस.
१६० लाडकोबा दाभोळकर.
१६१ बाळोबा बांदेकर.
१६२ बाजी भिकाजी नाबर आरोसकर.
१६३ शिवरामपंत पागे.
१६४ गणबा सांखवळकर.
१६५ बाळाप्पा अण्णा.
१६६ सुब्राव.
१६७ लखबादादा मळगांवकर.
१६८ माधवराव गंगाधर.
१६९ गोपाळराव पंडित.
१७० घनश्याम व्यंकाजी.
१७१ साबाजी दुलाजी.
१७२ रामजी तापीकर.
१७३ कृष्णाजीराव.
१७४ चैनराम.
१७५ बापू महाडीक.
१७६ येंडाजी.
१७७ पदाजी राहाकले.
१७८ गोदाजी शिंदे.
१७९ पागजीपंत.
१८० आबाजी भोंवार.
१८१ हरदुला फिरंगी.
१८२ अचल भारती गोसावी.
१८३ ममुफिकेत फिरंगी.
१८४ बळवंतराव रायजादे.
१८५ नरसिंगराव देशमुख शितोळे.
१८६ बापू रायाजी.
१८७ तात्या फोंडेकर.
१८८ बळवंतराव मकबा सबनीस.
१८९ नारायणराव मकबा सबनीस.
१९० गोविंद बाळाजी नाबर.
१९१ राघो मल्हार.
१९२ गोविंद दादाजी.
१९३ बाजी नरसिंह.
१९४ मदबा रांगणेकर.
१९५ रामचंद्र अनंत.
१९६ भाऊ कोटणीस.
१९७ रामचंद्र जगन्नाथ.
१९८ आनंदराव मळगांवकर.
१९९ बळवंतराव दिवाण.
२०० पुंडलिक नारायण वागळे.
२०१ पांडुरंग आरंवंदेकर.
२०२ भास्कर अनंत.
२०३ तुको शंकर रेगे आरवलीकर.
२०४ बाळोबा खांडाळेकर.
२०५ नारबा केरकर.
२०६ शामराव भैरव रेगे आरवलीकर.

---

१. हे जिवबादादांच्या भाऊबंदांपैकीं होते. हे पहिल्यानें शिंदशाहींत असून, नंतर काशीवास करून कोंकणांत आले. हे मोठे विद्वान् पंडित असल्यामुळें यांच्या योग्यतेनुरूप काशींतील पंडितांनीं यांना 'आचार्य' 'दुपाटी 'ह्या पदव्या दिल्या होत्या. ह्यांनीं केलेले संस्कृत प्राकृत ग्रंथ घरीं केरीस आहेत. श्रीमच्छंकराचार्य मठ संकेश्वर यांजकडे यांचा मोठा मान होता. टीकच आहे. 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते.'

२०७ बळवंतराव महादेव शिरोडकर (गोवें).
२०८ नागयणराव दत्तू.
२०९ गुंडो सिद्धेश्वर तोफखानेवाले.
२१० गणेश त्रिंबक नाबर.
२११ पांडोबा वामन नाईक.
२१२ बळवंतराव मांगजी दळवी.
२१३ पुंडबा रेडकर काबाडी.
२१४ लक्ष्मण नारायण वागळे.
२१५ मांगबा रेडकर.
२१६ लाडकोबा भाऊ कुडाळकर.
२१७ कृष्णाजी चिमणाजी.
२१८ आपाजी व्यंकाजी जाम्वी.
२१९ भास्करराव गुळगुळे.
२२० फोंडबा नाबर.
२२१ वासुदेवराव कालेलकर.
२२२ बळवंतराव मणेरकर.
२२३ व्यंकाजी सदाशिव लाड.
२२४ वासुदेवराव वागळे.
२२५ रामाजी जनार्दन.
२२६ रघुनाथ परशुराम रेडकर.
२२७ वासुदेव बाबा चिंदरकर.
२२८ बापू जनार्दन.
२२९ राघोबा सावकार.
२३० भिकाजी कृष्ण आरंवदेकर.
२३१ यशवंत बाबूराव.
२३२ गणोबा चिटणीस.
२३३ गणोबा बोरकर.
२३४ गोपाळराव शामजी झांटये.
२३५ गोपाळ बाबा राजेबहादर.
२३६ पांडुरंग शिवाजी रेंगे आरवलीकर.
२३७ दत्ताजी नारायण.
२३८ विसाजी महादेव.
२३९ राघोबा नाबर.
२४० भिकाजी पांडुरंग आरंवदेकर.
२४१ भगवंतराव नाईक.
२४२ सदाशिव वासुदेव.
२४३ कृष्णोबा भाऊ कालेलकर.
२४४ तातोबा आरंवदेकर.
२४५ देवजी मुकुंद लाड.
२४६ रामजी महादेव कामत.
२४७ राघो पुंडलिक आकेरकर.
२४८ बळवंतराव गाबाजी जाम्वी.
२४९ बापूजी कृष्ण.
२५० भिकाजी व्यंकटेश.
२५१ सखाराम चिमणाजी चिटणीस (कायस्थ प्रभू).
२५२ साबाजी बाबूराव वऱ्हाडकर.
२५३ भिकाजी बल्लाळ.
२५४ विसाजी जिजदेव.
२५५ राघोबा रांगणेकर.
२५६ पांडोबा धामापुरकर.
२५७ शिवराम नारायण सावकर.
२५८ निळकंठ महादेव.
२५९ शिवरामपंत साखरदांडे[1].

जिवबादादांच्या जहागिरी.[2]

१ निमच महाल.
२ जावद महाल.
३ जिरण महाल.
४ सिंहोर पंचमहाल.
५ सिंगोली महाल.
६ गंगापूर महाल.
७ अष्टा.
८ चिताखेडा.
९ सुजालपुर.

१. या सर्व पुरुषांसंबंधाची माहिती या चरित्रांत व आमचेकडील जुन्या पत्रांत पुष्कळ आलेली आहे.

२. सनदा व पत्रें नंबर ३३९।३६४।३६९ ते ३८० व ३९३।३९४ ते ३९८ व ४०० ते ४०२ व परिशिष्ट १.

१० आमझरा.
११ कुंबलमेर.
१२ राजनगर.
१३ केलवाडा.
१४ खेमणोर.
१५ सिंघनपुर.
१६ देहरी.
१७ विराई.
१८ आरुणशा.
१९ डौरा.
२० मुरसान महाल (अंतर्वेदींतील).
२१ जामगांव.
२२ रायतळें.
२३ तळगांव कोंकणांत.
२४ केरी ,,
२५ हरमल ,,
२६ कडेगांव.
२७ कोलारी.
२८ बांवच्या.
२९ खारद्या.
३० बिजळगांव.

शिवाय शेतजमिनी.

१ आरंवदें गांवांतील.
२ सांतडें ,,
३ तोरसें ,,
४ चाफला गावातील

वाडे.

१ उज्जन एथील.
२ ग्वाल्हेरींतील.
३ कंपूकोठीजवळ.
४ लष्करांत बावन पागेजवळ.
५ जनकगंजांत.
६ नरवर.
७ मंडोसर.
८ जावद.
९ जिरण.
१० निमच.
११ प्रयाग.
१२ पुष्कर.
१३ मथुरा.
१४ आग्रा.
१५ काशी.
१६ गया.
१७ जामगांव.
१८ तळगांव.
१९ वानवडी.
२० हरमल.
२१ आरंवदें.
२२ केरी (सांप्रत या वाड्यांत राहतात).
२३ सावंतवाडी.

[illegible]

ज्या लढाया केल्या, त्यांपैकीं मोठमोठ्या लढायांची माहिती या चरित्रांत आली आहे. परंतु, पत्रव्यवहारावरून एकंदर लढाया १७५ झाल्याची माहिती सांपडते. शिवाय, बराच पत्रव्यवहार वाळवीनें वगैरे खराब झाला असल्यामुळें त्यांतील माहिती समजण्यास मार्ग नाहीं.

जिवबादादांच्या नंतर एकंदर मोठ्या लढाया सुमारें सत्तावीस झालेल्या आहेत. शिवाय, बऱ्याच किरकोळ झाल्या आहेत. पैकीं कित्येकांचें वर्णन चरित्रांत आलें आहे.

जिवबादादांनीं केलेलीं धर्मकृत्यें.

१ मथुरेस देवालय बांधून खर्चासाठीं गांव इनाम दिले आहेत.

२ श्रीगंगेचे कांठीं रामघांटास मंदिर बांधून खर्चासाठीं गांव लावून दिले आहेत.

३ पुष्करास सारस्वत ब्रह्मवृंदाचे स्वामी श्रीगौडपादाचार्य यांचे मठास दोन गांव इनाम दिले आहेत.

४ हरिद्वारास ब्राह्मणांस जमिनी दान दिल्या आहेत.

५ पुष्करास ब्राह्मणांस जमिनी दान दिल्या आहेत.

६ पुष्करतीर्थावर सन १७९० सालीं दुष्काळाच्या वर्षी भिक्षुक, बैरागी वगैरे लोकांस दोन लक्ष रुपये धर्म केला व अन्न पुरविलें.

७ ग्वाल्हेर एथें अग्निहोत्र चालविलें होतें.

८ पंढरपूर एथील श्रीविठोबास द्रव्याची देणगी.

९ हिंदुस्थानांत बऱ्याच ठिकाणीं रस्त्यावर पाण्याच्या विहिरी व तीर्थावर धर्मशाळा बांधिल्या आहेत.

१० जावद एथें गंगाकुंड बांधिलें आहे.

११ ब्रह्मावर्तास श्रीरामकृष्णाची स्थापना व नैवेद्यास देणगी दिली आहे.

१२ अजमीरच्या खाजेपिरास सोन्याचा घुमट घातला होता.

१३ जिरण एथें सतीचें मंदिर यशवंतराव भाऊनें बांधलेलें किल्लयाचे खालीं तलावाचे कांठावर आहे.

१४ जावद एथें जुना वाडा सराफ्यांत आहे, त्याचे शेजारीं यशवंतराव भाऊंनीं श्रीविष्णूचें देवालय बांधिलें आहे. त्यास रांगडे लोक हरमंदिर ह्मणतात. यास सरकारांतून नेमणूक चालू आहे.

१५ जावद एथें रामपूर दरवाज्याचे बाहेर पावमैलाच्या अंतरावर नदीतीरीं मोठा घाट बांधून तेथें श्रीलक्ष्मीनारायणाचें मंदिर व जवळ एक विहीर बांधिली. या देवस्थानचे खर्चास जमीन जहागीर दिली आहे.

१६ जावद एथें आठाणे दरवाजानजीक वायव्य बाजूचे कोंपऱ्यास शहरकोटास आठाणेवाले रजपूत येऊन वरचेवर जावदेवर हल्ला करितात, ह्मणून मोटी तोफ ठेवण्यासारखा बुरूज (यशवंतराव भाऊंच्या काकांनीं ह्मणजे) जगोबा बापूंनीं बांधिला आहे. त्यास हल्लीं तिकडे 'काका का बुरूज' ह्मणतात.

१७ जावदेपासून दीड कोसाचे अंतरावर मोहोरका नांवाचा गांव आहे. त्या ठिकाणीं ह्मणजे जावदेहून निमचकडे जो रस्ता गेला आहे, त्या रस्त्यांत मुशाफर लोकांचे पाण्यामुळें फार हाल होत असत. यासाठीं पांच हजार रुपये खर्च करून शिवबा नानांनीं बावडी बांधिली आहे.

१८ यशवंतराव भाऊंनीं जावदेस एक कुंवा बांधिला आहे. त्यास रांगडे लोक रावळाकुडा ह्मणतात, व कित्येक लोक हत्तीचा कुंवा ह्मणतात. (रावळा=राजा. कुवा=कुडा. यशवंतराव भाऊंस राजा ह्मणत; यावरून रावळाकुडा हें नांव पडलें.)

१९ कोकणांत सावंतवाडी प्रांतीं, श्रीपरशुराम भारती मठ तळवणें, एथें पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

२० केरी गांवीं श्रीदेव रवळनाथाचें देवालय बांधिलें आहे.

२१ आकेरीच्या श्रीरामेश्वराचे देवळास काळ्या दगडाचे खांब बांधून, त्यावर कोरींव काम केलें आहे.

२३ हरमल एथें श्रीरवळनाथाचें देवालय बांधिलें आहे.

२४ तळगांवचे देवास नंदादीप सुरू होता.

२५ आरंवदें गांवीं वासुदेव सिद्धपुरुषाचे मठास नेमणूक सुरू आहे.

२६ सावंतवाडीहून शिरवड्यास जाण्याचे रस्त्यावर मातोंड गांवीं गोडेकोंड एथें सिद्धपुरुषाचे मठाजवळ पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

२७ आरंवद्यास पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

२८ केरी गांवीं रस्त्यावर पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

२९ गोमांतकांत मठ सांखळी एथें धर्मशाळा बांधिली होती.

३० हरमल गांवीं पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

३१ रेडी एथें माउलीच्या देवालयाच्या मागें मोठी विहीर बांधिली आहे.

३२ मळगांवीं पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

३३ देशांतून कोकणांत येतांना रामघांट रस्त्यावर आजूबाजूस वऱ्याच अंतरावर पाणी नसल्यामुळें घाटमाथ्यावर पाण्याच्या तळ्या बांधिल्या आहेत.

३४ ग्वाल्हेर एथें जिवबादादांच्या एथें दर वर्षास श्रावणीच्या दिवशीं सर्व ब्राह्मणांनीं जमावें असा संप्रदाय असे. त्या आलेल्या प्रत्येक ब्राह्मणास जानव्यांचे पांच जोड आणि रुपये, खुर्दा व पवन (सोन्याचें नाणें) हीं एकत्र केलेलें द्रव्य पसाभर देण्याची चाल होती.

मिळालेल्या कागदपत्रांत एवढाच दाखला सांपडतो.

शिवाय, सदर पत्रव्यवहारावरून खालील निरनिराळ्या लोकांचे पत्रव्यवहार ह्या घराण्याशीं घोळत होते, असें समजतें.

१ दिलीचे बादशहा व त्यांच्या राण्यांकडून आलेलीं पत्रें.

२ पेशवे व नाना फडणवीस यांजकडून.

३ जयपूरच्या महाराजांकडून.

४ जोधपूरच्या महाराजांकडून.

५ उदेपूरच्या महाराजांकडून.

६ कोटेवाले व जालीमसिंग व नाना मल्हाजी यांजकडून.

७ सावंतवाडीच्या राजेबहादरांकडून.

८ अनंत आनंदराव धुळप सुभेदार विजयदुर्ग यांजकडून.

९ मुंबईवाले व कलकत्तेकर इंग्रज यांजकडून.

१० कित्तूरकर देसाई यांजकडून.

११ गोंव्याचे फिरंगी व बहुगुण कामत लिंगिस्ताद यांजकडून.

१२ अहल्याबाई होळकरीण व यशवंतराव होळकर यांजकडून.

१३ नारो शंकर राजेबहादर यांजकडून.

१४ परशुरामभाऊ पटवर्धन यांजकडून.

१५ छत्रपति कोल्हापुरचे महाराजांकडून.

१६ दाजी श्रीपतराव सांगेलकर गायकवाड सरकारचे सरदार.

१७ व्यंकटराव दादा घोरपडे.
१८ प्रतापराव सरदेसाई प्रांत गोवें.
१९ सिद्धोजी राजे घोरपडे.
२० सौंदेकर देसाई.
२१ बावडेकर पंत अमात्य.
२२ रामजी पाटील जाधव.
२३ बापोजीराव देसाई कडवाडकर.
२४ रामसावंत तिरवडेकर सरदार भोंसुले.
२५ जिवाजीराव खानवलकर.
२६ सरदार बुधकर घाटगे.
२७ संभाजी शिंदे प्रांत मिरज.
२८ तुळजोजीराव सरदेसाई प्रांत आजरें.
२९ बळवंतराव भोंसुले सुभेदार किल्ले भरतगड.
३० त्रिंबकराव चिटणीस.
३१ जिवाजीराव विश्राम वर्दे सबनीस.
३२ मांगजी भिकाजी देसाई मांजेरेकर.
३३ नागेश प्रभु देसाई, देशप्रभु, प्रांत पेडणें.
३४ लक्ष्मणजी जशवंतराव देसाई आरोबेकर.

याशिवायही बऱ्याच लोकांचा पत्रव्यवहार सांपडतो; परंतु विस्तारभयास्तव दिला नाहीं.

शिंद्यांचे राज्याचा वसूल पहिल्यानें किती होता व जिवबादादा त्यांजकडे आल्यापासून किती झाला तो तपशील.

१ राणोजी शिंद्याचे राज्याचा पहिला वसूल २७५०००० होता, पहा हिंदुस्थानकथारस पृ० १०५. व कोणी ह्मणतात २२॥ लक्ष होता, पहा नातूकृत महा० च० पृ० १५.
२ नंतर महादजींच्या वेळीं जिवबादादांनीं मेवाडचे राजाकडून तेहतीस लक्ष रुपये रोख व २७००००० चा मुलुख जावडा निमच वगैरे घेतला, पहा महादजींचें चरित्र पृ० ९९ व वि० ज्ञा० वि० पु० ११, पृ० ८०. त्यावर याच राज्यांतून १॥ लक्ष पट्टयाचा मुलुख घेतला. पत्र नंबर ८६.
३ नंतर ग्वाल्हेर प्रांत घेतला, त्याचा वसूल ६५००००० चा होता. वि० ज्ञा० वि० पु० ११, पृ० ८१.
४ मारवाडवाले राजे यांजकडील अजमीर, पुष्कर, सांबर, रूपनगर हा ८००००० लक्षांचा मुलूख घेतला. व खंडणी साठ लक्ष रुपये घेतली. महादजींचें चरित्र पृ० २३६. शिवाय, याच राज्यांतून नंतर पाऊण लाख रुपयांचा मुलूख घेतला. पत्रें नंबर ४१७।५६.
५ जयपूरकरांकडील भुसावळ वगैरे प्रांत घेतले. पत्रें नंबर २२।३६.
६ खानदेश प्रांत मिळविला. पहा सरंजामेकृत शिंद्याचे घराण्याचा इतिहास व पत्र नंबर ३३०.
७ बेग एथील रावळास मदत केल्याबद्दल मुलूख मेवाडांत मिळविला. महादजींचें चरित्र पृ० २३७.

८ गुजराथेंत गायकवाडाकडून त्यांचें कार्य केल्याबद्दल २०००० चा मुलूख व ३००००० रुपये रोख मिळाले. पहा महादजींचें च० पृ० २६१।२९१.
९ नगराजवळ जामगांव वगैरे मुलूख घेतला. पत्र नंबर ३७०.
१० अंतर्वेदींतील मुलुख घेतला. महादजीचें चरित्र पृ० २२५ व पत्र नंबर २९.
११ भडोच प्रांत इंग्रजांकडून घेतला व पन्नास लाख रुपये घेतले. पहा पत्रें व यादी पृ० १९१.
१२ टिपूकडील प्रांत पेशव्यांस सोडवून दिला. त्या वेळीं कांहीं भाग (टिपूच्या राज्यापैकीं शिंद्यास) मिळाला. ग्रांट डफचा इतिहास पृ० ३०३.
१३ रजपुतांकडील वगैरे खंडण्या दर वर्षास मिळत. त्यांची संख्या सुमारें दोन कोट रुपये होती. फक्त माचेरीवाला संस्थानिक दहा लाख रुपये देई. पहा म्यालेसनचा इतिहास व सोबतचीं पत्रें व महादजींचें चरित्र पृ० २५७.
१४ शाहाआलम बादशहास गादीवर बसविल्यावर पुष्कळ द्रव्य महादजींस मिळालें. ग्रांट डफची बखर पृ० २४९।२५५.
१५ नंतर रोहिलखंडची खंडणी व लूट फार मिळविली. गुलाम कादराचे वेळीं पुष्कळ द्रव्य व सरंजाम मिळाला. बादशहास महादजींकडून नऊ लक्ष रुपये नेमणूक मिळत होती. बाकी त्याचा सर्व मुलूख महादजींचाच होता.
१६ पंजाब प्रांतीं शिखांचे मुलखांत पत्याला, कुंजपुरा एथें व हरिद्वार, जगन्नाथपर्यंत दरवर्षीं जाऊन खंडणी घेत होते. पत्रें नं० ३९।४१।४९।५९, व वि० ज्ञा० वि० पु० ११, पृ०. ८२.
१७ तळेगांव एथील इंग्रजांचे लढाईचे वेळीं पेशव्यांनीं शिंद्यास तीन लक्ष रुपये रोख दिले. पहा महा० च० पृ० १३२ व इंग्रजांकडून मुत्सद्यांच्या खर्चास ४१००० रुपये नजर मिळाले. शिवाय पेशव्यांचीं पुष्कळ कामें झालीं.
१८ इस्मायल बेगाचा पराभव केल्यावर त्याची २१००००० ची जहागीर शिंद्यांचे राज्यास जोडिली. महाद० च० पृ० २९९.
१९ जिवबादादा खर्ड्याचे लढाईस येतांना नबाब (निजाम) यांचे मुलखांतून नव्वद लाख रुपये खंडणी घेतली. पत्र नंबर ४०० व लढाई झाल्यानंतर पंधरा लक्षांचा मुलूख पेशव्यांनीं शिंद्यास दिला. वि० ज्ञा० वि० पु० ११, पृ० ८९ व पत्र नंबर ४००.
२० माळवे प्रांतीं रांगड्यांचा मुलूख कुमळमेर वगैरे नवीन पंधरा लक्षांचा मिळविला. पत्र नंबर ४००.
२१ भरतपुरावर स्वारी करून पांसष्ट लक्ष रुपये खंडणी घेतली. पहा पत्रें व यादी पृ० ५१०, व नंतर याच राजाकडून बराच मुलूख घेतला. म्या० इ० भा० पृ० १०६.
२२ मेवाडचे राजाकडून चोवीस लाख रुपये खंडणी व जयपूर मारवाडचे राजाकडून खंडणी व खर्चाबद्दल तीन कोट रुपये रोख घेतले. वि० ज्ञा० वि० पु० ११, पृ० ९१।९२.

एणेंप्रमाणें मुलूख व खंडण्या मिळविल्याची माहिती मागील चरित्रांत प्रसंगोपात्त दिलीच आहे. महादजींच्या वेळेस व पुढें जिवबादादा असेपर्यंत मिळविलेले मुलूख शिंद्यांकडून गेले नाहींत.

जिवबादादा सेनापति होते. त्यांच्या हाताखालीं कुल फौज असे. असें असतां इंग्लिश ग्रंथकार ग्रांट डफ, टॉड, कीन वगैरे यांनीं शिंद्यांकडील डि बॉयन, पेरण इत्यादि सरदारांनीं मोठमोठे जय

स्वतंत्र रीतीनें मिळविले होते व महादजी शिंद्यांकडे ही कंपूची विजयी फौज होती, अशा अर्थाचे उद्गार काढिले आहेत. परंतु हे कंपूवाले युरोपियन सरदार जिवबादादांच्या हाताखालीं असून त्यांचे अंकित होते. त्यांनीं स्वतंत्र रीतीनें एकही जय मिळविला नाहीं, अशाबद्दलचे मिळालेले आधार खालीं दाखल केले आहेत.

१ खर्ड्याचे लढाईत डि बॉयन होता. पहा कोल्हापूर व कर्नाटकचा मोडककृत इतिहास पृ० ८४ व पोवाड्यांचें पुस्तक पृ० १७७. परंतु त्याचें जिवबादादांप्रमाणें स्वतंत्र वर्णन नाहीं. "रातोरात आणून तोफखाना जोडिला जिवबादादांनीं." पोवा० पु० पृ० १७४. यावरून तोफखान्यावर जिवबादादांचाच हुकूम होता, हें उघड आहे.

२ "शिंद्याचे सरदार जिवबादादा एक वीर भारती । पन्नास हजार फौज फिरंगी तीन कंपू संगें जाती." पो० पु० पृ० १५८. यावरून सेनापतीच्या बरोबर जाणारे हे फिरंगी होते, स्वतंत्र नव्हते, असें दिसेल.

३ "झाला हुकूम तोफखान्याला किल्ली जिवबादादांचे हातीं." पो० पु० पृ० १५५. यावरून जिवबादादांच्या हुकुमावांचून कांहीं होत नसे व लढाईसंबंधी तोफखान्यासुद्धां सर्व सूत्र त्यांच्या हातीं असे, असें दिसेल.

४ खर्ड्याचे लढाईत जिवबादादांच्या हाताखालीं पेरण 'फ्रेंच' याचें सैन्य होतें, असें क्याप्टन फ्रेजर निजामाचे रेसिडेन्ट यांणीं लिहिलें आहे. भारतवर्ष मा० पु० अंक ३, पृ० २६ व पत्र नंबर १२५.

५ लालसोटच्या लढाईत जिवबादादा नव्हते. डि बॉयन होते त्यांचा पराभव झाला. व 'डि बाइग्नीच्या (डि बॉयनच्या) पराक्रमाला कलंक लागला.' म्यालेसनच्या इ० मा० पृ० ५३. या लढाईत डि बॉयन असतां महादजींस कुशळगडाकडेस पळ काढावा लागला. अर्थात् जिवबादादा लढाईत असतां जो जय येत असे, तो या डि बॉयनाच्याच पराक्रमाचें फल नव्हे.

६ आग्र्याचे किल्ल्याचा वेढा अकरा महिने होता, तो उठविण्यास इस्मायल बेगावर डि बॉयन स्वतः शह देऊन होता. परंतु, जिवबादादा व जगोबा बापू येईपर्यंत तो वेढा डि बॉयनाकडून उठला नाहीं!

७ डि बॉयन चाकरीस राहिला तेव्हां त्यानें महादजींकडून दोन शर्ती कबूल करून घेतल्या होत्या. एक आपल्या लोकांस वेळचेवेळीं पगार मिळावा व दुसरी इंग्रजांवर आपण लढाईस जाणार नाहीं. महादजींचें चरित्र पृ० २२५. पुढें, इंग्रज व महादजी यांच्या तळेगांव, गुजराथ, मध्यहिंदुस्थान, ग्वाल्हेर प्रांत व सालबाई, एथें ज्या लढाया झाल्या, त्यांत डि बॉयन नव्हतेच. व या सर्व लढायांत शिंद्यांस यश आलें. तेव्हां, एतद्देशीयांशीं किंवा युरोपियनांशीं लढाया करण्याचे कामीं शिंद्यांस या युरोपियन कंपूवाल्याचीच आवश्यकता होती, असें नाहीं.

८ गुलाम कादरावर पहिल्यानें राणेखान, आपाजी खंडेराव व पलटणांसहित डि बॉयन या सरदारांस पाठविलें होतें. परंतु, ते 'गुलामापुढें लढाईस ठरत नव्हते.' पण मागाहून जिवबादादा गेल्यावर त्यांस पाहूनच गुलाम किल्ला सोडून यमुनापार झाला! पत्रें नंबर

३४।३६।३७. या मोहिमेंत डि बॉयन स्वतः होता, परंतु जिवबादादा येईपर्यंत गुलाम कादर तेथून हालला नाहीं.

९ ज्या वेळीं जिवबादादा मारवाडावर गेले, त्या वेळीं डि बॉयनाचीं कंपू पलटणें त्याच्या ताब्यांत होतीं. होळकरांची कै० पृ० ५५.

१० पाटणा, मेरटच्या लढाईंत डि बॉयनाच्या तोफा सुटत असतां त्यांजवर रजपुतांनीं घोडे घातले, तेव्हां डि बॉयनास पळ काढावा लागला. पहा होळकरांची कैफीयत. पुढें, त्यांचा पराभव जिवबादादांनीं केला. पत्र नंबर ५४.

११ महादजी शिंदे दक्षिणेंत येऊं लागले, ह्मणजे आपलें सारें राज्य बादशाही मुलखासुद्धां जिवबादादांच्या स्वाधीन करीत. हो० कै०, म्या० इ०, पेश० बख०, व पत्रें नं० ८३।४२३. यावरून त्या वेळीं कर्ता, पराक्रमी व मुत्सद्दी असा पुरुष जिवबादादाच होते, हें निश्चित होतें.

१२ फ्रेंच लोकच कंपू तोफखान्यावर होते असें नाहीं. पांडबा लाड तोफखानेवाला होता. पत्र नंबर २२६. व नारायणराव बक्षी तोफखाना व पलटण यांवर मुख्य होते. पहा लोकहितवादिकृत ऐति. गोष्टी भाग २.

१३ पाटीलबावांच्या बायका व सरजेराव घाटग्याच्या शिकावणीनें दौलतराव यांजमध्यें बिघाड होऊन आपसांत लढाया चालू झाल्या. त्या वेळीं सरजेराव घाटग्याच्या पक्षास अंबाजी इंगळे व डि बायन, हे होते. त्यांचा जगोबा बापूनीं अनेक वेळां पराभव केला. नंतर नाइलाजानें अंबाजी इंगळे यानें डि बॉयनास लिहिलें कीं, 'लढाल तर ठीक नाहीं. तुह्मीं जाऊन जगोबा बापूंस मिळावें.' यावरून त्या प्रसंगीं कंपूवाल्या डि बॉयनाचा कसा नाइलाज झाला होता, हें उघड दिसून येईल. पत्र नं० २९३.

१४ तुकोजी होळकराबरोबरील लाखेरीच्या लढाईंत होळकराचा सरदार दुंदरनेक ह्याचा पराभव जिवबादादांनीं केला. ह्या लढाईंत डि बॉयनास जखम झाल्यामुळें त्याजकडून शेवटपर्यंत काम झालें नाहीं. 'जखम लागली होती.' महा० च० पृ० २५८.

१५ जिवबादादांचा वडील मुलगा नारायणराव बक्षी यांस अटकाव केला, ह्मणून कंपूसुद्धां फौज दौलतरावास निकट करून बसली होती. पत्रें नंबर २३४।२३५. यावरून कंपूवाले त्यांचे ताबेदार असून त्यांची त्यांजवर प्रीतीही असे, हें उघड होतें.

१६ जान बत्तीस व सेकरू फिरंगी यांचे कंपू व पलटणें जगोबा बापूंच्या हुकूमतींत होतीं. पत्र नंबर २९८.

१७ 'कवायती फौजेवरील सरदार जिवबादादा' होते. विंचूरकर घराण्याचा इतिहास पृ० १२४. फिरंगी तर जिवबादादांची धास्ती बाळगीत. पहा पत्र नं० १२९.

१८ "जिवबादादाकडून जलद बाराची कवाईत (पेशव्यांनीं) करविली. तीनशें तोफांचा व बेवीस हजार कंपू नळीचा पांच आंख मोजी, तों एकदांच आवाज होई." खर्ड्या० स्वा० ब० पृ० ८.

१९ यशवंतराव भाऊंचा कंपू होता. पहा परिशिष्टांतर्गत पत्र व वि० ज्ञा० वि० पु० ११.

२० पेरण फिरंगी बदलला, तेव्हां लखबादादा यांनीं त्याचा पराभव करून ठार केला. पहा पत्र नंबर ४२१.

२१ जगोबा बापू व लखबादादा यांनीं खासगी कंपू तयार केले होते. वि०ज्ञा०वि०पु० ११,पृ०७९.

२२ जगोबा बापू, यशवंतराव भाऊ वगैरे सरदार शिंद्याकडे नसल्या मुदतींत शिंद्यानें यशवंतराव होळकरावर फ्रेंच सरदार पाठविले होते. त्या सर्वांस होळकरानें ठार मारून कित्येकांस कैदही केलें. व शेवटीं ही हकीकत सांगण्यास एकटा हेसिंग मात्र आला. ग्रांट डफची बखर पृ. ३७१।३७२.

२३ जगोबा बापू, यशवंतराव भाऊ, रामराव आपा व लखबादादा मळगांवकर वगैरे सरदार शिंद्याकडे नसल्या मुदतींत इंग्लिशांनीं सन १८०३ त शिंद्याचें बहुतेक राज्य घेतलें. त्या वेळींही कंपूवाले शिंद्याकडे होते. परंतु, जगोबा बापू येईपर्यंत इंग्रज पराभव पावले नाहींत. पत्रें नंबर ३५७।३६१।३६२.

२४ ज्या वेळीं यशवंतराव होळकरानें पुण्यावर चाल केली, त्या वेळीं शिंद्यानें आपलें लष्कर बाजीरावाच्या मदतीस पाठविलें. व इंग्रजांनीं आपलीं घोडनदी एथील पलटणें होळकरावर पाठविलीं. (हें पत्र केरकरांच्या दप्तरीं आहे.) परंतु, या लष्करांचा होळकरांनीं पराभव केला व पुण्यांत जय मिळविला. ग्रांट डफची बखर पृ० ३७६।३७७.

इंग्लिश ग्रंथकार ग्रांट डफ, टॉड, म्यालेसन वगैरे ग्रंथकारांनीं जिवबादादांच्या पराक्रमांबद्दल वर्णन केलें आहेच. वर दिलेल्या आधारांवरून आह्मी ह्या सदराच्या आरंभीं केलेलें विधान बरोबर आहे, असें दिसून येईल.

ह्याशिवाय ह्या भागांत देण्यासाठीं बरीच उपयुक्त माहिती निवडून तयार केली होती; परंतु ग्रंथविस्तार फार झाल्यामुळें ती देतां आली नाहीं.

भाग १९ वा.

जिवबादादांसंबंधानें ऐतिहासिक गोष्टी.

(१) जिवबादादांचा एक लहानपणचा मित्र कुणबी जातीचा होता. त्यास ते 'गांवकर' या नांवानें हांक मारीत. तो गांवकर व बाळपणीं त्यांस दूध देणारी दाई, अशीं दोघें जिवबादादांच्या वैभवभरांत ग्वाल्हेरीस गेलीं होतीं. गांवकर व ती दाई जिवबादादांस ते घरीं असतां अनुक्रमें 'जिवलो' व 'जिवा' ह्या नांवानें हाक मारीत. व ग्वाल्हेरीस गेल्यावर तीं आपल्या कोकणी भाषेनें त्याच नांवानें त्यांचा शोध करूं लागलीं. पण तेथें 'दर्यामें खसखस' ह्या ह्मणीप्रमाणें ह्या गरीब मनुष्यांस कोण विचारतो ? शिवाय, ही भाषाही तिकडील नोकरचाकरांस कळण्यासारखी नव्हती. परंतु, ह्यांच्या जिकिरीवरून कोणी ही खबर जिवबादादांस दिली. तीं ओळखीचीं नांवें जिवबादादांच्या कानांत पडतांच त्यांनीं तत्काळ बाहेर येऊन त्यांस पाहिलें. तेव्हां काय ! उभयपक्षीं आनंदाचें भरतें आलें. गांवकर तर तें वैभव पाहून 'जिवलो' 'जिवलो' ह्मणून नाचूंच लागला. पुढें जिवबादादांच्या हुकुमानें त्यांची उत्तम बरदास्त राहूं लागली. त्यांची सारखी चमन चालली होती. ज्या गांवकरास वक्तीं रेडा मिळण्याची मारामार त्याला हत्तीवर बसवून सर्व शहराची मौज दाख-

विली! व शेवटीं त्यांचें दारिद्र्य दूर होण्यासारखें त्यांना द्रव्य देऊन चांगल्या सोबतीनें कोकणांत पोहोंचविलें.

(२) एके प्रसंगीं महादजी शिंदे पुण्यांत असतां श्रीमंत सवाई माधवरावांची स्वारी पर्वतीस निघाली. तेव्हां महादजींची थट्टा करावी, ह्मणून नाना फडणविसांनीं ठरविलें कीं, श्रीमंतांवांचून बाकी सर्वांनीं पायींच बरोबर जावें. महादजी एका पायानें अधू होते. तेव्हां त्यांना इतरांबरोबर कसें जातां येतें! पण जिवबादादांनीं त्यांना सुचविलें कीं, आपण श्रीमंतांचे जोडे घेऊन त्यांच्याबरोबर अंबारींत चढावें ह्मणजे झालें. मग स्वारी सिद्ध होऊन श्रीमंत हत्तीवरील अंबारींत चढतांच पाटीलबावांनीं श्रीमंतांचे जोडे उचलून ते लगेच त्यांजबरोबर अंबारींत चढले. ही युक्ति पाहून नाना व इतर मंडळी चकित झाली. व नानांची मसलत व्यर्थ झाली.

(३) जिवबादादांची एक बहीण त्यांच्या भेटीस, बारा वर्षें होत आलीं ह्मणून, लष्करांत गेली होती. त्या वेळीं एकदा असा प्रसंग आला कीं, लष्करी लोकांनीं आपला पगाराचा पैसा मिळवावा ह्मणून जिवबादादांभोंवतीं धरणें धरलें. त्या हत्यारबंद लोकांनीं आपल्या बंधूस वेढिलें व त्यांस ते जेवायासही जाऊं देईनात, हें पाहून ती भयभीत झाली. आणि त्या धरण्यांतून ते मोकळे झाले, तेव्हां तिणें त्यांस स्पष्ट सांगितलें कीं, हा रोजगार नको, तूं आपला घरीं ये. तें ऐकून दादा ह्मणाले, बरें आहे, लौकरच निघण्याची तजवीज करितों. मग एके दिवशीं जिवबादादांनीं सर्व लष्करी लोक जमण्याच्या इशाऱ्याचें वाद्य वाजविण्यास हुकूम केला. त्याबरोबर तमाम लष्करी लोक पोषाक करून भराभर जमूं लागले. मोठमोठे लष्करी अंमलदार येऊन जिवबादादांसमोर राहून त्यांनीं त्यांस मुजरा करून आपापल्या मिसलीप्रमाणें कामावर जावें, असें चाललें होतें. सरदार लोक कोणी हत्तीवर, कोणी घोड्यावर बसून आपापल्या हाताखालील फौजा व्यवस्थेनें उभ्या करून त्यांवर हुकुमत चालवीत आहेत आणि त्या सर्वांची जिवबाकडील हुकुमावर सारखी नजर आहे, असें जिवबादादांच्या बहिणीच्या दृष्टीस पडलें. तें सर्व ऐश्वर्य पाहून तिचे डोळे चकित झाले. तें दादांनीं जाणून तिला ह्मटलें, आतां आमची निघण्याची तयारी आहे. केव्हां निघावें तें सांग. तेव्हां ती हांसून ह्मणाली, तुझें वैभव अशा प्रकारचें आहे? तर मी तुला हें सोडून कोकणांत येण्याविषयीं आग्रह करीत नाहीं बाबा! त्या दिवशीं मला, तुझ्या जिवावर आलें असें वाटलें, ह्मणून तसें ह्मटलें होतें. मग जिवबादादांनीं विनोदानें ह्मटलें, तुझा आग्रह नाहीं, तर मग मी आतां जाण्याचा बेत तहकूब करितों!

(४) जिवबादादा आपलें दारिद्र्य दूर करितील, ह्मणून कोकणचा एक सारस्वत ब्राह्मण गृहस्थ कांहीं रोजगाराकरितां तिकडे गेला. एके दिवशीं जिवबादादा स्नानास गेले आहेत आणि शागीर्दानें धूत वस्त्राच्या निऱ्या चुणून तें पाटावर ठेविलें आहे, असें पाहून याच्या मनांत आलें कीं, दादांपाशीं दाद लागण्यास ही संधी बरी आहे. मग दादा स्नान करून येतांच या गृहस्थानें तें धोतर उचलून त्यांच्या हातीं दिलें. तें पाहून त्यांना फार वाईट वाटलें. केवळ मर्जी संपादण्यासाठीं जो अशा तऱ्हेचें हलकें काम करणारा, त्याच्या हातून कोणताही प्रतिष्ठितपणाचा रोजगार निभायाचा नाहीं असें मनांत आणून, आठचार दिवस सोबत लावून देण्यासाठीं त्यांस ठेवून घेतलें व दोन हजार रुपये देऊन त्यांची रवानगी केली. गैरशिस्त व हांजीहांजीपणानें वागणाऱ्यांसंबंधानें त्यांची कदर मोठी

होती. त्यांच्या पथें राहून मनुष्य तेजस्वीच निपजले. केवळ लेचापेचास किंवा भोजनभाऊस वाढवावें, अशी त्यांची इच्छा नव्हती.

(५) जिवबादादा लष्करसहित येत असतां एका मुक्कामीं एक बाई हातांत तवा घेऊन उभी होती. ती लष्करी लोकांस जिवबादादा कोठें आहेत, ह्मणून विचारी. ते 'मागून येताहेत' ह्मणून उत्तर देत. मग जिवबादादा येतांच गैरमाहीतपणामुळें त्यांनाही तिनें 'जिवबादादा कोठें आहेत' ह्मणून विचारिलें. त्यांनीं 'ते कशाला पाहिजेत' ह्मणून विचारितांच ती ह्मणाली, "ते पुण्यवान् पुरुष परीस आहेत. त्यांच्या पायांस हा तवा लाविला ह्मणजे हा सोन्याचा होईल. व त्या द्रव्यानें, माझीं मुलें घासभर अन्नास मोताद झालीं आहेत, तीं जगतील!" जिवबादादांनीं तिच्या बोलण्याचा मतलब जाणून तिला ह्मटलें, बाई, तव्यास पाय न लावतां सोनें झालें तर चालेल कीं नाहीं? सर्व लष्कर हासूं लागलें. शेवटीं, तिचें नांव गांव लिहून घेऊन जिवबादादांनीं बाईस निर्वाहासाठीं बेंच द्रव्य दिलें व तिच्या मुलांस कांहीं जहागीर दिली[1].

(६) रजपुतांबरोबरच्या एका लढाईत एक पांच वर्षांचा अनाथ मुलगा फारच घाबरलेला जिवबादादांस आढळला. त्याला त्यांनीं घोड्यावर घेतलें व कांहीं दिवस बरोबर बाळगून मग कोकणांत नरोबा दादांकडे पाठवून दिलें. तेथें नरोबा दादांनीं त्याचा प्रतिपाळ करून त्याला लिहावाचायाला वगैरे शिकविण्याची तजवीज करून चांगला हुषार केला. पुढें मोठा झाल्यावर जिवबादादांनीं लष्करांत नेऊन त्याला बक्षिगिरीसंबंधीं लिहिण्याचे व हिशोब ठेवण्याचे कामीं नारायणरावांचे हाताखालीं ठेविलें. पुढें तो हरएक कामांत हुषार झाला. पहा, यःकश्चित् अनाथ मुलगा खरा, पण त्याला जिवबादादांनीं हातीं धरण्याबरोबर तो योग्यता पावला. त्याचें नारबा असें नांव त्यांनीं ठेविलें होतें. पत्रव्यवहारांत त्या नारबासंबंधाची माहिती पुष्कळ आहे.

(७) एकदा जिवबादादांनीं रजपुतांशीं घोर रणकंदन मांडून त्यांचा साफ मोड केला. त्या वेळीं रजपुतांतील एक नामांकित शूर सरदार अभिमानास पेटून आपल्या शूर लोकांच्या टोळीनिशीं मराठ्यांत घुसून तोडातोडी चालवूं लागला. मराठ्यांनीं त्याचे बहुतेक शिपाई लंबे केले. शेवटीं, तो सरदार चवताळून तरवारीनें वार काढीत जिवबादादांजवळ आला आणि आतां त्यांजवर वार करणार, इतक्यांत जिवबादादांनीं आपल्या समशेरीनें त्याची गर्दन व उगारलेला उजवा हात, हीं डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तोंच कलम करून टाकिलीं. आणि त्या शूर पुरुषाचे हातांतील ती तरवार घेतली. ती तरवार फारच उत्तम व पाणीदार असून लववून तिचें टोंक मुठीजवळ आणतां येई, अशी होती. ती तरवार अद्याप त्यांच्या घराण्यांत आहे. हिंदुस्थानांतून ती मळगांवकरांनीं येतांना आणिली होती. बैद्यामुळें ती शेतांत पुरली होती, तेथेंच पुष्कळ वर्षें असल्यामुळें तिजवर इतका जंग चढला होता कीं, आंत तरवारीचें पातें शाबूद आहे, असें कोणास वाटत नव्हतें. परंतु, झाडून जगाची पापडी घालवितांच ती पहिल्यासारखी लख्ख झाली!

(८) इंग्रजांचा वकील शिंद्यांकडे असून त्याच्या मार्फतच पेशव्यांचें इंग्लिशांकडे बोलणें चालणें होत असे. शिंदे आपले सरदार; तेव्हां आपल्या दरबारीं स्वतंत्र वकील न ठेवतां त्यांच्या मार्फतच इंग्लिशांशीं

१. "श्रीमंत (जिवबा) दादांस योग्यता कीं सर्वांनें पालन करावें आणि जहागिरी दुसऱ्यास द्यावी ही योग्यता श्रीदेवानें दिली आहे." पहा पत्र नंबर २१३.

व्यवहार ठेवावा लागतो, ही गोष्ट नाना फडणविसांस सहन होत नसे. सबब, त्यांनीं अनेक खटपटी करून इंग्लिशांचा आपणाकडे स्वतंत्र वकील असावा, असा बेत जुळवून आणिला. तेव्हां, इंग्रज वकीलानें महादजी शिंद्यांस असें करण्यास तुमची कोणती हरकत आहे, ह्मणून विचारिलें. त्या प्रसंगीं याचें उत्तर मागाहून देऊं असें सांगून, त्यांनीं या बाबतींत बाळोबा तात्यांची सल्ला विचारिली. त्यांनीं सांगितलें कीं, जिवबा इतक्यांत यावयाचे आहेत; ते आल्यावर समक्षच विचार करून काय तें ठरवावें, हें बरें. मग, जिवबादादा आल्यावर त्यांनीं सल्ला दिली कीं, नानांस स्वतंत्र वकील हवा असल्यास त्यांत आमचें काय वेंचतें आहे? वकीलानेंच सगळ्या गोष्टी भागतात असें नाहीं. पेशवाईतील आमचें वजन तरी वकीलामुळें पडलें, असें थोडेंच आहे. ज्या कर्तबगारीनें आमच्या दरबारीं एकंदर मराठी राज्यातर्फे इंग्रजांचा वकील राहिला, ती कर्तबगारी असेपर्यंत नानांकडे सतरा वकील असले, तरी त्यांना आह्मांसच शोधीत यावें लागणार आहे. हें मीं सरकारास फोडून सांगितलें पाहिजे असें नाहीं. त्यावर पाटीलबावा ह्मणाले, आमचाही विचार तोच होता. नंतर, पेशव्यांकडे वकील ठेवण्यास आमची ना नाहीं, असें त्यांनीं इंग्रजांचे वकीलास समजाविलें.

(९) गोमांतकांतील कोणी देसाई उपनांवाचा पिढीजाद थोर गृहस्थ, काळ विपरीत आल्यामुळें, लष्करांत जिवबादादांकडे गेला. त्यांनीं त्याचा चांगला सत्कार करून त्याला बरेच दिवस ठेवून घेतलें. पुढें, तो जाण्यास निघाला, तेव्हां ते त्याला पोहोंचवायाला पुढेंपर्यंत आले. परंतु, देण्याघेण्याचें नांव नाहीं व येतांना कांहीं द्रव्य वगैरेही त्यांनीं आणिलेलें नाहीं, हें पाहतांच तो गृहस्थ अत्यंत विन्मुख होऊन मनांत ह्मणाला, 'आपलें दुर्दैव जबरदस्त. तें यांना तरी वासना काय ह्मणून देईल?' मग, निरोप घेऊन परतण्याच्या वेळेस जिवबादादांनीं सांगितलें कीं, ही दहा हजारांची हुंडी पुण्याच्या सावकारावर दिलेली आहे. ही घेऊन जा, ह्मणजे तेथें ऐवज मिळेल. आतां पूर्वींचे दिवस राहिले नाहींत, करितां याहून विशेष सवड होण्यासारखी नाहीं. हुंडी हातीं मिळतांच त्याला केवढा आनंद झाला असेल बरें? ऐश्वर्य प्राप्त झालें असतां जे उन्मत्त होत नाहींत व यथाशक्ति लोकांस सुख देण्यास झटतात, तेच पुरुष या भूतलास ललामभूत होत.

(१०) बाहेर स्वाऱ्यांवर जातांना कुलस्वामीचें स्मरण करावें व पाटीलबावांचा निरोप घेऊन त्यांस सप्रेम वंदन करावें, असा जिवबादादांचा परिपाठ असे. एकदा अशी बातमी आली कीं, जाठ वगैरे लोकांच्या टोळ्या येऊन जवळील मुलूख लुटीत आहेत. तेव्हां, जिवबादादांनीं कांहीं लष्करी लोकांस तिकडे जाण्यासाठीं निघण्याचा हुकूम देऊन, ते पाटीलबावांचा निरोप घेण्यासाठीं त्यांच्या डेऱ्यांत गेले. तों पाटीलबावा निजले होते. तेव्हां, त्यांस उठविण्यास हुजरे जाऊं लागले. परंतु, जिवबादादांनीं सांगितलें कीं, सरकारची निद्रा मोडूं नका. उठल्यावर निरोप घेऊं. शेवटीं, बऱ्याच वेळानें ते उठल्यावर त्यांनीं त्यांचा निरोप घेतला. अंगीं बेताचीच योग्यता असून धन्यास न जुमानणारे कोणीकडे आणि निकडीच्या प्रसंगींही धन्याच्या निरोपाशिवाय पाऊल बाहेर न टाकणारे एवढे प्रतापी पुरुष जिवबादादा कोणीकडे!

(११) पाटीलबावांसंबंधानें नाना फडणविसांचा ग्रह कित्येक कारणांनीं फारसा अनुकूल नव्हता. ते ह्मणत, शिंद्यांच्या तरवारीस आह्मांस भ्यालें पाहिजे. पण त्यांच्या लेखणीची कडी आह्मांवर कधींही चालावयाची नाहीं. ह्या गोष्टी पाटीलबावांच्या दरबारांत कळत असत. परंतु, योग्य प्रसंगाशिवाय कोणत्याही गोष्टीचा खुलासा होत नसतो. पुढें, पाटीलबावा पुण्यांत असतां एकदा नाना फडणीसांनीं

त्यांस दरबारांत ह्मटलें, पाटीलबावा, तुह्मी श्रीमंतांच्या दौलतीचे आधारस्तंभ असतां आणि हिंदुस्थान-भर प्रताप गाजवून पुष्कळ मुलूख आणि मुबलक पैसा मिळवीत असतां सरकारखजीन्यास मदत कां करीत नाहीं? सरकारच्या दौलतीची मदार तुह्मां सरदारांच्या मदतीवरच अवलंबून असावयाची. सध्या तुह्मीं पन्नास लाख रुपये द्यावे, असें श्रीमंतांच्या मनांत आहे. तेव्हां याची तजवीज कशी करितां? हें ऐकतांच महादजी शिंद्यांनीं उत्तर केलें कीं, आह्मी श्रीमंतांच्याच पुण्यप्रतापेंकरून कांहीं लौकिक मिळविला. स्वाऱ्या शिकाऱ्या बहुत केल्या व कांहीं मुलूख मिळविले. पण, ह्या कामीं अतोनात खर्च आला. श्रम साहस केवढे पडले ह्याचा विचार सरकारास आह्मीं कळविला पाहिजे असें नाहीं. ह्मशीच्या एका आंचळाचें दूध काढून दुसऱ्या आंचळास लावावें, अशांतलीच आमच्या स्वाऱ्यांची गत. तेव्हां, अशा स्थितींत पैशाची तोड कशी निघते? आतां आमच्यापाशीं पैसा नाहीं, तरी पदरास चार रत्नें आहेत, त्यामुळें आह्मांस कांहीं कमी पडत नाहीं. तें ऐकून नाना ह्मणतात, तीं चार रत्नें हल्लीं स्वाऱ्यांत पैदा झालीं असतील? पाटीलबावा ह्मणाले, नाहीं, नाहीं. तीं सुदैवानें घरीं बसल्या ठिकाणींच प्राप्त झालीं आहेत. आणि श्रीमंतांच्या पाहण्यांत आलेल्या रत्नांपेक्षां त्यांची किंमत फार निराळ्या प्रकारची आहे. नाना ह्मणाले, तीं आह्मांस दाखवाल काय? पाटीलबावा ह्मणाले, तीं आपल्या पाहण्यांतलींच आहेत. श्रीमंतांस संशयांत कशास ठेवूं? जिवबादादा, लखबादादा, बाळोबा तात्या आणि सदाशिव मल्हार, हीं तीं चार रत्नें होत. आणि ह्या चार रत्नांमुळेंच आह्मांस कांहीं कमी नाहीं. मग नाना हांसून ह्मणाले, असें काय? तर मग हीं रत्नें तुह्मांपाशीं असल्यावर तुह्मांस पन्नास लाख रुपये देण्यास मुळींच पंचाईत नाहीं? नानांच्या या कोटिक्रमापुढें पाटीलबावांस निरुत्तर व्हावें लागलें. व पुढें कांहीं भवति न भवति होऊन पाटीलबावांस पन्नास लाख रुपये देणें कबूल करावे लागले. पुढें, पाटीलबावा दरबारांतून गोटांत आल्यावर झालेलें सर्व वर्तमान त्यांनीं जिवबादादांस सांगितलें. जिवबादादांनीं सांगितलें कीं, आधीं पन्नास लाख रुपये कबूल करावयाचे नव्हते. बरें, आतां कबूल केले; तर त्यांच्या फेडीची कांहीं युक्ति काढिली पाहिजे. त्यांनीं असा कोटिक्रम लढविला आहे, त्या पक्षीं आपणही देण्याची तोड तशीच कांहीं मसलत योजून लाविली पाहिजे. मग बराच वेळ विचार करून ते पाटीलबावांस ह्मणाले, पुढें तुह्मी दरबारास जाल, तेव्हां नानांनीं रुपयांची गोष्ट पुनः काढूं नये, असें करितों. पाटीलबावा ह्मणाले, तें काय? जिवबादादा ह्मणाले, तें कांहीं असलें, तरी नानांनीं पुनः गोष्ट काढिली नाहीं. ह्मणजे झालेंना? इतक्या गोष्टी होऊन ते आपापल्या व्यवहारास लागले. पुढें, चार आठ दिवसांनीं दरबार भरला, त्या वेळीं महादजी शिंदे वगैरे जाऊन आपआपल्या स्थानीं बसल्यानंतर कांहीं वेळानें हैदराकडील एक जासूद सांडणीस्वार आला व त्यानें श्रीमंतांस व पाटीलबावांस मुजरा करून खिशांतील लखोटा काढून शिंद्यांच्या हातीं दिला. त्यांत मलियाळी भाषेंत पत्र असून त्याचें भाषांतर मराठींत केलेलें होतें. तें पत्र त्यांनीं वाचून पाहून श्रीमंत सवाई माधवरावांचे हातीं दिलें. त्यांनीं तें वाचून नानांचे हातीं दिलें. त्या पत्रांत हैदरानें शिंद्यांस लिहिलें होतें कीं, "तुमच्या पराक्रमाची कीर्ति फार ऐकतों. इंग्रजांशीं लढाई चालविण्याचे कामीं आह्मांस तुमच्या मदतीची फार जरूर आहे. यासाठीं स्नेहाच्या नात्यानें आह्मांस मदत कराल, तर तुमच्या खर्चाची वगैरे सरबराई तुमच्या मर्जीप्रमाणें करून देऊं. तरी मेहेरबानीनें पत्र पोंचताच फौजेसहित ताबडतोब यावें."

हें पत्र वाचून तिघेही ह्या नवीन प्रकरणाच्या विचारानें चकित झाले. पुढें पाटीलबावांनीं त्या

स्वारास आपल्या गोटांत पाठविलें. पुढें, ह्या त्रिवर्गीच्या हैदर व इंग्रज ह्यांसंबंधाच्या गोष्टी चालल्या आहेत, इतक्यांत हैदराकडील दुसरा जासूद आला. त्यानेंही तसेच मुजरे करून पाटीलबावांपुढें एक लखोटा टाकला, तो त्यांनीं वाचून पाहिला. त्यांत लिहिलें होतें कीं, "मसलत मोठ्या निकडीची आहे. तुह्मीं स्वतः येण्याचें कारण नाहीं. तुमचे पराक्रमी सरदार जिवाजी बल्लाळ बक्षी यांस मोठ्या फौजेसहित फार जलद पाठवा. वाट पाहत आहों." तेंही पत्र पूर्वीप्रमाणें पाटीलबावांनीं पुढें केलें. तें पाहून नाना अधिकच घोटाळ्यांत पडले. पुढें, त्याही स्वारास पाटीलबावांनीं गोटांत दवडलें. ह्या गोष्टीस चार सहा घटिका जातात न जातात, तों कचेरी बरखास्त होण्याचे वेळीं हैदराकडील तिसरा स्वार येऊन थडकला. त्यानेंही तसाच लखोटा महादजी शिंद्यांकडे दिला. तो जासूद मोठ्या दवडीनें थकलासा दिसत होता. त्या पत्रांत लिहिलें होतें कीं, "जरूर जरूर येणें. नाना फडणीसांस कळवूं नये. येण्यास क्षणाचा विलंब लावूं नये. मसलत तशीच आहे. मुलूख व पैसा मागाल तो देतों." हें पत्र महत्त्वाचें, सबब नानांच्या हातीं न देतां पाटीलबावांनीं आपणापाशींच ठेविलें. तेव्हां, नानांस फार संशय आला आणि त्यांनीं तें आग्रहानें त्यांजवळून मागून घेतलें आणि वाचून पाहिलें. तेव्हां, ते फारच बुचकळ्यांत पडले. शिंद्यांच्या उत्कर्षाबद्दल त्यांना अगोदर मत्सर होताच, त्यांत हैदरानें ही मदत केवळ महादजींकडेसच मागितली. आणि ही गोष्ट नानांस कळवूं नका, असें मुद्दाम लिहिलें आहे. तेव्हां, यांत कारस्थान कांहीं मोठें असावें, असा त्यांचा तर्क होऊन ते विचारांत अगदीं गर्क झाले. शेवटीं त्यांनीं शिंद्यांस ह्मटलें, पाटीलबावा, पुढें कसें करणार ? तेव्हां ते ह्मणाले, जिवबादादांचा विचार घेऊन काय तें करावयाचें. असें ह्मणून त्यांनीं निरोप घेतला, आणि दरबार बरखास्त झाला. पाटीलबावा आपल्या गोटांत पोंचले, तों नानांचे गुप्त हेर त्यांच्या तंबूच्या आसपास तयार ! पाटीलबावा येतांच त्यांनीं अगोदर जिवबादादांस बोलावून आणविलें आणि त्यांच्या हातीं तीं हैदराकडील पत्रें दिलीं. जिवबादादा ह्मणाले, 'ती गोष्ट निघाली होती काय ?' पाटीलबावा ह्मणाले, छे. आज राजकारण निराळेंच आलें आहे. हीं पत्रें वाचून बघा. जिवबादादांनीं पत्रें वाचून आश्चर्य व आनंद झाल्याचा बहाणा केला (कारण तीं त्यांनींच बनविलेलीं होतीं !), आणि ह्मणाले, तर मग आतांच कूच करून निघूं या. नाहीं तर नानांस दरबारांतच घडलेली ही हकीकत समजली आहे. इंग्रजांकडे त्यांचीं खलबतें चालतात. तेव्हां मसलत बिघडेल. पाटीलबावांनींही तें मान्य केलें व सर्व लष्करास कुचाचा हुकूम दिला. मग लागलेंच त्याप्रमाणें अमलांत येऊन, त्यांनीं तेथून दोन कोसांवर जाऊन तळ दिला.

इकडे नानांस सारखी तळमळ लागून राहिली. त्यांनीं शिंद्यांचें कूच होण्याबरोबर लागलेंच इंग्रज वकीलास बोलावून आणिलें आणि त्यास हें सर्व वर्तमान कळविलें. नाना ह्मणाले, तुमचा आमचा स्नेह पूर्ववत् कायम आहे. परंतु, हैदरास शिंद्यांची मदत मिळून तुह्मांबरोबर खास मोठी लढाई होणार. शिंद्यांची फौज एथून निघून हैदराकडे जाण्यासाठीं एथून दोन कोसांवर तळ देऊन राहिल्याची आतांच गुप्त डांक आली. शिंद्यांनीं या कामीं आमची सल्लाही घेतली नाहीं. मसलत तर मोठी आहे, तेव्हां यांतलें इंगित काय तें समजा ! नानांच्या तोंडून ही महत्त्वाची बातमी ऐकून इंग्रज वकीलासही मोठी चिंता उत्पन्न झाली. आणि तो ताबडतोब घोड्यावर स्वार होऊन शिंद्यांच्या छावणींत गेला.

इकडे शिंद्यांच्या फौजेनें तेथें मुक्काम केल्यावर जिवबादादांनीं पाटीलबावांस या बनावट मसलतीची सर्व हकीकत सांगितली. ते ह्मणाले, हैदराच्या राज्यांतील लोक या बाजूला असलेले शोधून

आणून हे खलिते मुद्दाम तयार केले आहेत. नानांस ही गोष्ट कळूं देऊं नये, ह्मणून नानांच्या नजरेंत आल्यावर ते स्वस्थ बसणार नाहींतच. तेथें ते इंग्रज वकीलास कळविणार. त्यांचीं गुप्त खलबतें चाललेलीं असतात, हें श्रीमंतांस माहीतच आहे. हें ऐकून पाटीलबावांस आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. ते हांसून ह्मणाले, दादा, तुह्मीं आह्मांससुद्धां कींहो चकविलें! आह्मी तर ही मसलत खरीच समजलों. तेव्हां जिवबादादा ह्मणाले, इंग्रज वकीलास ही बातमी लागण्याबरोबर तो इकडे येतो कीं नाहीं पहा. इतकें होऊन ते पुढील व्यवस्थेस लागले.

दुसरे दिवशीं इंग्रजांचा वकील शिंद्यांच्या छावणीकडे येत आहे असें पाहून पाटीलबावा ह्मणाले, दादा, तुमची युक्ति मोळा आणे लागू पडली! पुढें वकील आल्यावर अलिजाबहादरांस सलाम करून आपल्या ठिकाणीं बसला. मग त्यानें पाटीलबावांस ह्मटलें, इंग्रजांचा शत्रु हैदर. तुमचा आणि इंग्रजांचा उत्तम स्नेह. असें असतां तुह्मी हैदराच्या मदतीस चाललां, हें तुमच्या आमच्या आजपर्यंतच्या स्नेहाच्या व ठरावाच्या विरुद्ध आहे. शिवाय, तुमचा आमचा स्नेह बिघडण्यास कांहीं कारणही झालेलें नाहीं. तेव्हां हा विपरीत अर्थ कां मनांत आणिला? तेव्हां जिवबादादांनीं लागलेंच सांगितलें, "तुमच्याशीं जसा आमचा स्नेह, तसाच हैदराशींही आहे. हैदरानें ठराव केला आहे कीं, जर आह्मांस मदत द्याल, तर तुह्मांस चार कोट रुपये देतों. सध्यां स्वाऱ्यांच्या खर्चामुळें खजिन्यास ओट आहे. तेव्हां हा अर्थ आह्मांस टाकतां येईना. निरुपाय आहे." हें ऐकतांच वकीलानें उत्तर केलें, कांहीं झालें तरी तुमची दोस्ती आह्मी हातची गमावणार नाहीं. खर्चाची तोड थोडीबहुत काढितां येईल. मग परस्पर बहुत बोलणीं होऊन तडजोड निघाली कीं, इंग्रजांनीं शिंद्यांस दोन कोट रुपये द्यावे आणि तेवढें झाल्यावर शिंद्यांचा व इंग्रजांचा स्नेह कायम राहावा व शिंद्यानें हैदराच्या मदतीस जाऊं नये. इतकें ठरलें तरी वकील ह्मणाला, लाटसाहेबांच्या मंजुरीवांचून ऐवजाची भरपाई कशी व्हावी? दुसरें, इतक्या ऐवजाची आज तोडही लागण्यासारखी नाहीं. मग शिंदे ह्मणाले, तुमच्या मंजुरीपर्यंत वाट पाहण्यास आह्मांस अवकाश नाहीं. शिवाय, मसलत मोठी. तेव्हां घाईनें आह्मांस कुच दरकुच जाऊन पोंचलेंच पाहिजे. हें ऐकतांच इंग्रज वकीलाचा निरुपाय झाला. मग त्यानें त्यांना राहावून घेतलें आणि एकदोन दिवसांत सावकारांपासून वगैरे पैशाची जमाजम करून शिंद्यांस एक कोट रुपये पटविले. पन्नास लक्षांच्या कलकत्त्याच्या सरकारी पेढीवर हुंड्या दिल्या आणि पन्नास लक्ष राहिले त्याबद्दल जिवबादादांनीं तोड सांगितली कीं, आह्मांस आमचे यजमान पेशवे यांस एवढाच ऐवज पाठवावयाचा आहे, तेव्हां श्रीमंत नाना फडणीसांकडून तेवढ्या रकमेचा तुह्मी हवाला घेववा, ह्मणजे तोड निघेल. इंग्रज वकीलास ही गोष्ट मान्य होऊन त्यानें लागलेंच नानांस तेथें बोलावून आणवून पन्नास लक्षांचा हवाला घेवविला. मग शिंद्यांनीं नानांस सांगितलें कीं, तुह्मांस पन्नास लक्ष रुपये आह्मीं द्यावयाचे हल्लीं कबूल केले होते, त्यांची आह्मांकडून फेड झाली. याप्रमाणें दोन कोटींची व्यवस्था लागतांच कांहीं दिवसांनीं कलकत्त्याकडून येणारी रकमही शिंद्यांस मिळाली. मग शिंद्यांनीं बाहेर बातमी पसार केली कीं, हैदरानें मदत मागितली, ही गोष्टच मुळीं खोटी! नानांकडून परभारें शोधही चालले होते. त्यांना तसेंच वर्तमान लागलें; त्यामुळें त्यांना फार आश्चर्य वाटलें. इंग्लिशांसही ही बातमी मुळीं शिंद्यांनीं आपण होऊन दिली नव्हतीच. राजकारणाकरितां त्यांना इंग्रज वकीलाकडे तसा बहाणा करावा लागला. शिवाय, हैदराकडून शिंद्यांकडे मदतीकरितां मागणें गेलेलें नसलें,

१. पत्रें व यादी पृ. १९१ व ना. कृ. महादजींचें च. पृ. १४९.

तरी इंग्रज वकीलानें देऊं केलेला पैसा हैदराच्या मदतीस जाऊं नका एवढ्याकरितां होता. त्या कामीं त्यांजकडून ठरावाप्रमाणें वर्तन झालें. तेव्हां, शिंद्यांनीं आपल्यास फसविलें, असें त्यांना बोलतां येईना. आतां, नानांकडून मात्र इंग्लिश वकीलास समजलेली हकीकत–त्यांना समजली तशी–शोध केल्याशिवाय होती, ह्मणून तशा अपुऱ्या शोधानें कळविलेल्या बातमीमुळें त्यांजकडे गुदरलेल्या पन्नास लक्षांच्या हवाल्याबद्दलची रकम त्यांना इंग्लिशांकडे मागतां येईना ! अशाप्रकारें शिंद्यांकडून यावयाच्या पन्नास लक्षांच्या रकमेस वाटाण्याच्या अक्षता लागल्यामुळें नानांस मूग गिळावे लागले ! नानांनीं पुढें बित्तम बातमी मिळविली त्यावरून त्यांना समजून आलें कीं, ही युक्ति जिवबादादांनीं पूर्वोक्त चार रत्नांपैकीं एका रत्नाची–स्वतःच्या मुत्सद्देगिरीची–पारख दाखविण्याकरितां लढविली ! मग त्यांना कळून चुकलें कीं, शिंद्यांचें केवळ तरवारीचेंच सामर्थ्य नाहीं. त्यांच्या राशिदींत राजकारणपटु मुत्सद्दी मंडळी असून, ते ह्मणतात त्याप्रमाणें त्यांजकडे चार रत्नें आहेत, यांत संशय नाहीं.

(१२) नारायणराव पेशव्यांचा वध सुमेरसिंग वगैरे गारद्यांनीं केल्यावर पुढें आपणास देहान्त शिक्षा होईल या भीतीनें ते पुण्याहून सिंध प्रांतांत पळून गेले होते. त्यांस तिकडून धरून आणण्याचा हिय्या कोणास होईना. ह्मणून तें काम नानांनीं महादजी शिंद्यांस सांगितलें. मग, पाटीलबावांनीं हें महत्त्वाचें काम जिवबादादांकडे संपविलें. जिवबादादांनींही ती गोष्ट मनावर घेतली आणि दिल्लीकडील वगैरे महत्त्वाचीं कामें मागें ठेवून ते गारद्यांच्या शोधार्थ निघाले. कांहीं दिवसांनीं त्यांस पत्ता लागला कीं, गारदी सिंध प्रांतांत गेले आहेत. ते तेथें खुद्द अमीराच्या आश्रयास छपून आहेत. मग ते तिकडे जाण्यासाठीं निवडक सरंजाम घेऊन निघाले. तिकडे पोंचल्यावर त्यांस खबर लागली कीं, गारदी खैरपूरच्या अमीराच्या आश्रयास आहेत. ह्मणून ते खैरपुरास गेले. आणि नबाबाच्या हद्दीवर मुक्काम करून त्यास सांगून पाठविलें कीं, गारदी लोकांनीं नारायणरावसाहेब पेशवे–त्यांचे धनी –यांचा वध करून ते तुह्मांकडे येऊन राहिले आहेत. आमची नेमणूक त्यांस आणण्याच्या कामावर झाली आहे. त्यास जे आमचे अपराधी, तेच तुमचे अपराधी असें समजून, त्यांना आह्मांकडे पाठवून द्यावे. नबाबानें शिंद्यांची कीर्ति ऐकिली होतीच. त्यांनीं रागरंग पाहून गारद्यांस जिवबादादांकडे पाठविण्याचें कबूल केलें. परंतु, गारदी नबाबाचे बगलेंत शिरलेले; ते लौकर ताब्यांत मिळेनात. मग, वकीलामार्फत एकमेकांकडे बरेच वेळां परस्पर निरोप घोळल्यावर जिवबादादांचा विचार ठरला कीं, ही गोष्ट अशा सोईनें निभावयाची नाहीं. ही लांबणीवर पडत चालली असून आपल्यास एथें राहण्यास अवकाश नाहीं. तेव्हां, लढाईशिवाय गारदी हातीं लागत नाहींत, असें त्यांनीं जाणलें.

ह्या वेळेपर्यंत जिवबादादांस तेथील माहिती जी मिळाली, ती ही कीं, पानिपतच्या लढाईत जो मराठ्यांचा भयंकर मोड झाला, त्यांतील पळालेलीं मनुष्यें तिकडे मुसलमानांनीं धरून नेलीं होतीं. त्यांपैकीं महाराष्ट्रांतील व पुण्याकडील कांहीं मनुष्यें तेथें हयात होतीं. ही माहिती महत्त्वाची होय. त्या मनुष्यांत ज्या कित्येक लोकांचा पत्ता लागत नव्हता, असेही कांहीं लोक होते. ही सर्व माहिती त्यांनीं पाटीलबावांस लिहून पाठविली होती. शिवाय, ह्या प्रवासांत आपल्या फौजेचे जे हाल झाले, त्यांबद्दल व सिंधू नदीच्या विस्तीर्ण पात्राबद्दलही माहिती त्यांनीं लिहिली होती. त्या नदीच्या पात्रांत जेथें नुसती रेतीच आहे असें समजून त्या जागीं पाय ठेविल्यास चटकन् पाय खालीं जाऊन पाण्यांत बुडायाला होतें. पण, दुसऱ्या तशाच ठिकाणीं तशी सावधगिरी ठेविली, तर तेथें खरोखर रेतीच असते. पाण्याचा लेशही नसतो. तसेंच पात्र एवढें विस्तीर्ण व खोल आहे कीं, त्यांतून हत्ती, घोडे, उंटें वगैरे मोठ्या यु-

त्तीनें पलीकडे न्यावीं लागतात. शिवाय, जलप्रवाहाचा निरनिराळ्या वेळीं अनुभवास येणारा चमत्कार इत्यादिकांविषयीं त्या पत्रांत पुष्कळ मनोरंजक माहिती दिलेली होती. तीं पत्रें पाटीलबावांनीं पेशव्यांकडे पाठवून दिलीं, असें ह्मणतात.

पुढें, जिवबादादांनीं फौज सिद्ध करून मोरचे लावून शहरांवर तोफांच्या गोळ्यांचा भडिमार चालविला. तेव्हां, नबाबाचीही तयारी होती, त्यामुळें त्यानेंही उलट मारगिरी चालविली. अशा प्रकारें बराच वेळ लढाई चालून नबाबाच्या वाड्याचा नाश झाला आणि त्याचे बरेच लोक मृत्युमुखीं पडले. शहरच्या लोकांत आकांत वर्तला. ह्मणून त्यानें तहाचें बोलणें लाविलें. परंतु, गारदी आपल्या ताब्यांत[1] दिल्याशिवाय तहाची कोणचीही गोष्ट आपण कबूल करणार नाहीं, असें जिवबादादांनीं निक्षून सांगितलें. नबाब व त्याचे सरदार मोठे अभिमानी होते. ज्यास पाठीशीं घातलें, त्याला सोडून देणें बरोबर नाहीं, असें ठरवून त्यांनीं ती गोष्ट अमान्य केली, आणि पुनः लढाईसाठीं तयारी चालविली. हें पाहून जिवबादादांनीं पुनः तोफ सुरू केली. शिंद्याच्या तोफखान्याच्या जबरदस्त मारापुढें नबाबाचें कांहीं चालेना. आणि मनुष्यांचा आणि इमारतीचा अतिशयित नाश होऊं लागला. सबब, त्यानें तहाचें निशाण लावून सांगून पाठविलें कीं, तुमचे अपराधी तुमच्या हवालीं करितों. आतां तोफा बंद करवा. मग, जिवबादादांनीं लढाई तहकूब करून अगोदर गारदी मागविले. तेव्हां, सुमेरसिंग, खरकसिंग, तुळाजी पवार व महंमद यूसफ, असे मुख्य व इतर जितके नबाबाच्या आश्रयास होते, तितक्या लोकांना त्यांनीं जिवबादादांकडे पाठवून दिलें. पुढें, नबाबाकडून लढाईचा खर्च घेऊन लागलीच लढाई बंद केली. मग, त्या अपराध्यांस मोठ्या बंदोबस्तानें बरोबर घेऊन ते पाटीलबावांकडे दाखल झाले. त्यांनीं त्या राजकीय गुन्हेगारांस श्रीमंत पेशव्यांकडे रवाना केलें.

(१३) दिल्लीचे बादशहाकडून वाडीसरकार राजे खेमसावंत यांस जिवबादादांनीं मोरचलें व राजेबहाद्दर ही पदवी देवविली. ही गोष्ट कोल्हापूरकरांस अगदीं आवडली नाहीं, ह्मणून वाडकरांवर स्वारी करण्याचा त्यांचा विचार होता. त्यांत आणखी नाना फडणीस व हरिपंत फडके यांचीही वाडकरांचें पारिपत्य करण्याविषयींची त्यांस फूस मिळाली. त्या प्रोत्साहनानें त्यांनीं वाडकरांवर स्वारी करण्यासाठीं फौज तयार करून तिचें आधिपत्य डुगल नामक सरदाराकडे दिलें. त्या सरदारानें मोठ्या मजला मारून कोणास कळूं न देतां एकदम वाडी शहरांत प्रवेश केला. आणि सरकारवाड्याभोंवतीं आपल्या फौजेचा गराडा दिला. वाडीकरांस ह्या स्वारीची आगामी सूचना मुळींच नसल्यामुळें ते अगदीं गैरसावध होते; ह्मणून तितक्यांत सैन्य तयार करून त्यांना कोल्हापूरकरांचा प्रतिकार करितां आला नाहीं. कांहीं अवकाशानें जमवितां येण्याजोगी वाडकरांची फौज प्रांतभर पसरलेली होती. परंतु, खुद्द शहरांत त्यांची फौज फार थोडी होती. तेथें त्या प्रसंगीं हजर असलेल्या फौजेकडून वेढा दिलेल्या लोकांशीं सामना देण्याचें काम कसचें होतें? ते सारे हालचाल न करितां आपल्या जिवाच्या रक्षणार्थ दडून राहिले. वेढा दिलेल्या लोकांपैकीं दक्षिणेच्या अंगास इचलकरंजीकरांचे लोक होते. आंतून गोळीबार मुळींच न झाल्यामुळें बाहेरूनही करण्याचें कारण पडलें नाहीं. बरीच रात्र गुदरल्यावर दक्षिण आंगची जी बाजू इचलकरंजीकरांच्या वेढ्यांत होती, तेथून आंतल्या मंडळीस निसटून जाण्यास सवड मिळाली. इचलकरंजीकरांनीं ही सवड बुद्ध्या कानाडोळा करून दिली,[2] असा लोक-

---

१. 'परराज्यांतून धरून आणविले होते.' पेश. ब. पृ. १०४.

२. सोबतचीं पत्रें पहा.

प्रवाद आहे. पुढें, त्यांस वाडी संस्थानांतील झापण गांव इनाम मिळाला, यावरून लोकांस असा तर्क करण्यास जागा झाली आहे. असो. पुढें, राजे खेमसावंत, लक्ष्मीबाई, तिची आई सखूबाई (ही आपले मुलीजवळ राहत असे), व राजवाड्यांतील इतर मंडळी व कांहीं नोकर लोक, इतके त्या बाजूनें रात्रीचे नकळत निघून गेले. आणि त्वरेनें जाऊन ही मंडळी पेडणें एथें नागेशराव देसाई देशप्रभु यांचे एथें जाऊन राहिली. हे देशप्रभु अशा प्रसंगास उपयोगी पडणारे असून मोठे वजनदार होते. त्यांना आपल्या एथें राजे येऊन राहिल्याचा मोठा संतोष झाला. त्यांनीं राजेसाहेबांची बरदास्त उत्तम प्रकारची ठेविली होती. कोणत्याही गोष्टीची उणीव पडूं दिली नाहीं. अशा रीतीनें कोल्हापूरकर जाईपर्यंत एक वर्षपावेतों हे राजेसाहेब पेडणें एथें या देशप्रभूंच्या एथें आपल्या लवाजम्यासह राहिले. व तितक्या मुदतींत त्यांना देशप्रभूंनीं व जिवबादादांचे बंधु नरोबा दादा यांनीं कांहींएक कमी पडूं दिलें नाहीं. राजवाड्यांतील थाटाप्रमाणें त्यांची सर्व प्रकारें बरदास्त त्यांनीं राखिली होती. त्यामुळें राजेसाहेबांस तशा स्थितींतही पुष्कळ सुख झालें.

नंतर, ही सर्व हकीकत राजेसाहेबांकडून व नगोबा दादांकडून शिंद्यांच्या दरबारांत समजली. आणि पुढें नेहमीं डांका घोळवून आपली राज्यावर पुनः स्थापना करण्यासंबंधानें राजेसाहेबांकडून व लक्ष्मीबाईसाहेबांकडून पाटीलबावा व जिवबादादा यांस निकड लावण्याची पराकाष्ठा झाली. तिकडील महत्त्वाच्या कामांमुळें त्यांनाही कोल्हापूरकरांचा बंदोबस्त करण्यास अवकाश मिळेना. पाटीलबावांनीं जिवबादादांस थट्टेनें ह्मटलें कीं, आतां तुह्मीं पाठविलेलीं मोर्चलें तुह्मांकडेसच रहावयास आलीं! शेवटीं, कोल्हापूरकरांचा बंदोबस्त करण्याचें ठरून जिवबादादांनीं त्यांना तुमच्या पारिपत्यासाठीं निघालों असा सक्तीचा व खरमरीत निरोप पाठविल्यावर ते समजले कीं, आतां आपलें कांहीं चालावयाचें नाहीं. मग त्यांनीं वाडी संस्थानांतील आपलीं ठाणीं उठवून व खेमसावंत राजेसाहेब यांस आदरानें बोलावून त्यांच्या हवालीं त्यांचें राज्य करून, तशी हकीगत जिवबादादांस कळविली.

राजेसाहेबांनीं पेडण्यांतून निघतांना देशप्रभूंचे फार फार आभार मानिले. शेवट गोड झाल्याचें पाहून उभय पक्षांस फार आनंद झाला. मग जातांना लक्ष्मीबाईसाहेबांनीं आपलें कांहीं जडजवाहीर व इतर कांहीं बहुमोल चिजा देशप्रभूंस दिल्या. व मोठ्या सन्मानानें त्यांचा निरोप घेतला.

१. हे नागेश प्रभु देसाई, गोवें प्रांतीं विजापूरकरांच्या वेळेपासूनच नव्हे, तर त्याहीपूर्वी तेथील नारसिंह राजाचे जुने सरदार होत. नंतर त्यांना विजापूरचे बादशहापासूनही देशप्रभु हाच किताब मिळाला. यांचें घराणें वाडकरांच्या अमलांत व हल्लीं गोवें सरकारच्या अमलांत मोठ्या प्रतिष्ठेचें व खानदानीचें मानिलें जात आहे. दिवसेंदिवस या घराण्याचा उत्कर्ष होत आहे. वाडीकरांकडून घेतलेले महाल पेडणें, सांखळी, डिचोली वगैरे हे फिरंगी सरकाराकडेसच चालावे, अशा बाबतींत यांनीं आपलें वजन खर्चून कारस्थानें चालविलीं. (पत्र नं. ३३६). त्यामुळें ते तिकडेसच राहून फिरंगी सरकारांत यांचें वजन वाढत गेलें. हें घराणें दानशूर असल्याची प्रसिद्धि आहे. यांचे मागें यांचे चिरंजीव आत्माराम प्रभु यांनीं फोंडें, उसप, मणेरी, तेरेखोल व रेडी, एथें फिरंगी सरकारच्या वतीनें लढाया मारून गोवें सरकारास मोठी मदत केली, व त्या लढायांत जय मिळविला. यांस सन १८२५ सालीं 'आलफेर' हा किताब मिळाला. व सन १८२७ सालीं 'कप्तान' हा गोवें सरकारांतून किताब मिळाला. पुढें यांचे नातू वासुदेव प्रभु हे मोठे कर्तबगार निघाले. यांचें औदार्य वर्णनीय होतें. यांस बरांव (बारोनेट) व मोसे फिदालग हे किताब मिळाले. यांनीं हजारों रुपये खर्चून 'गायत्रीपुरश्चरण' व 'संहितास्वाहाकार' हे या प्रांतीं प्रसिद्ध रीतीचे यज्ञ केले. फिरंगी सरकारांत यांचा मोठा मान असे. पुढें यांचे चिरंजीव आत्माराम प्रभु ऊर्फ बापूसाहेब हे सांप्रत

(१४) लखबादादा हिंदुस्थानांत गेल्यावर जिवबादादांनीं त्यांची हुशारी पाहून त्यांना सांगितलें कीं, दरबारांत आपण होऊन हुषारी दाखविली पाहिजे. एकाद्या लढाईच्या प्रसंगीं विडे मांडतील, तेव्हां तुह्मीं पुढें होऊन विडा उचलावा. आह्मी सर्व पाठीराखे आहोंच. पुढें आग्र्याच्या किल्ल्यावर जेव्हां आणीबाणीचा प्रसंग गुदरावयाचा समय आला, तेव्हां जिवबादादा जवळ नव्हते आणि लखबादादांनीं मोठ्या बहादुरीनें विडा उचलला. नंतर आग्र्याच्या किल्याभोंवतीं बादशाही सरदार इस्माइल बेग व गुलाम कादर यांच्या फौजांचा मोठा वेढा पडून तो अकरा महिनेपर्यंत राहिला. त्या मुदतींत लखबादादांनीं जें परम शौर्य व धाडस दाखविलें, त्यामुळें त्यांची ख्याति सर्वत्र झाली होती. पुढें, जिवबादादा येऊन त्या उभय सरदारांचें पारिपत्य करून लखबादादांची सुटका केली. त्या वेळीं पाटीलबावांनीं लखबादादांचें फारच गौरव केलें. नंतर एके प्रसंगीं लॉर्ड कार्नवालिस साहेब–हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल–महादजी शिंद्यांस भेटण्यास आले. त्या वेळीं मोठा दरबार भरला. साहेब बहादुरांनीं त्या दरबारांत लखबादादांस स्वहस्तें पाटीलबावांचे मांडीवर नेऊन बसविलें. आणि ह्मटलें, तुमचें राज्य राखणारा हा शूरवीर मुलाप्रमाणें तुमच्या मांडीवर बसण्यास योग्य आहे. लॉर्ड साहेबांच्या या कृतीनें व गौरवानें पाटीलबावांसहित सर्व दरबारास अत्यानंद झाला. व पुढें पाटीलबावांनीं साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणेंच लखबादादांवर अत्यंत प्रीति ठेवून त्यांस चिरंजीव ह्मणण्याचा व त्याप्रमाणेंच पत्रांत लिहिण्याचा क्रम ठेविला. आपण लखबादादांसंबंधानें योजिलेल्या घाटाचें इतकें सुरेख चीज झालेलें पाहून जिवबादादांस फार समाधान वाटलें.

(१५) नाना फडणवीस आपले आंगावर पुष्कळ दागिने घालीत. हातांत पोहोंची, कानांत लांब पाचूचे लोलक, गळ्यांत कंठा आणि बोटांत आंगठ्या, असे अलंकार घालण्याची त्यांची वहिवाट् होती. एक दिवस जिवबादादांस नाना ह्मणाले, काय हो, तुह्मी अगदीं साधा पोषाख करितां हें काय? दादांनीं लागलेंच नानांच्या दागिन्यांकडे हात करून उत्तर दिलें, “ बोवा, हें असलें नंदीबैलासारखें आह्मांस आवडत नाहीं. ” तेव्हां तेथें असलेल्या मंडळींत हंशा पिकला.

(१६) महादजींचा वर्ण काळा होता. त्यांस एकवेळ शाहाआलम बादशाहानें मौजेनें ह्मटलें, बेटा, अल्लानें वर्ण वाटते वेळीं तूं कोठें होतास? त्या वेळीं जिवबादादा जवळ होते त्यांनीं उत्तर दिलें, “ त्या वेळीं ज्या दुकानांत शाहाणपण विकत मिळत होतें, तीं दुकानें खरेदी करण्यास गेले होते. ” यांत त्यांनीं सुचविलें कीं, वर्णाकडे काय आहे? शहाणपणामुळेंच काय ती योग्यता प्राप्त होत असते. (या वेळीं अर्थात् गुलाम कादरानें बादशहाचे डोळे काढून त्यास आंधळें केलें नव्हतें).

(१७) जिवबादादांचा मेहुणा कोकणांतून ग्वाल्हेरीस गेला. दादा लढाईस निघाले, तेव्हां तोही बरोबर येऊं लागला. त्यास न येण्याविषयीं त्यांनीं पुष्कळ सांगितलें; पण तो ऐकेना. तिकडे गेल्यावर लढाई सुरू झाली. तेव्हां एक तोफेचा गोळा जिवबादादा व तो (मेहुणा) उभे होते त्यांच्या मध्यें मोठ्या जोरानें येऊन पडला; त्या वेळीं तो भिऊन पळूं लागला. तेव्हां, जिवबादादांनीं त्यास धरून ज्या ठि-

या घराण्याचे मालक आहेत. हे फार सुज्ञ, मुत्सद्दी व गुणज्ञ असून गोवें सरकारांत मोठे मान्य आहेत. वडिलोपार्जित औदार्यरूप झरा अखंड वाहत आहेच. यांस पोर्तुगाल सरकाराकडून बरांव व वैकौंत या दोन पदव्या—युरोपियन लोकांत अत्यंत मान्य अशा—मिळाल्या आहेत. मोठ्या उत्पन्नाच्या मानानें हे एक संस्थानिकच आहेत, अशी प्रसिद्धि आहे. या घराण्याचा व बक्षींच्या घराण्याचा स्नेह पूर्वींपासून चालत आहे. (पत्र नंबर ३४२). धनाढ्य लोकांत अत्यंत भूषणीय असे एकपत्नी व एकवचनी ह्मणून हे या प्रांतीं प्रसिद्ध आहेत.

काणाहून तोफा सुटत होत्या, त्याच ठिकाणीं जमिनींत मेख गाडून तिला त्यास बांधून टाकिलें. असें करण्यांत त्यांचा हेतु, हा पळूं लागल्यावर त्याचा कित्ता लष्करचे कोणी भित्रे लोक गिरवितील त्याचा बंदोबस्त व्हावा, हाच होता.

(१८) लढाईंत सदोदित पुढें असून स्वतः कामें करीत असल्यामुळें जिवबादादांच्या उजव्या अंगास कांहीं जखमा लागल्या होत्या. शूर रजपूत राजे व सरदार अशा जखमांस फार मान देतात. कारण, जो मोठा मर्द लढाईंत स्वतः लढत असतो, त्याचेच उजवे बाजूस जखम असते. डावे बाजूची जखम बहुधा पळणारे मनुष्यास व्हावयाची, असें लढवय्ये लोक समजतात. जिवबादादांच्या उजव्या अंगास जखमा असल्यामुळें हें शूरांचें भूषण पाहण्यास पुष्कळ रजपूत, मराठे वगैरे शूर सरदार त्यांजकडे येत. खरेंच आहे. "विच्छिन्न गात्र शूरा शोभे अह्मस्व तें उदारास."

(१९) शिंद्यांकडील दोन फिरंगी सरदारांत कुत्र्यांच्या कुरापतीवरून आपसांत कांहीं तंटा सुरू होऊन, तो इतक्या विकोपास गेला कीं, त्यांनीं एकमेकांच्या वाड्यांवर तोफा सुरू केल्या! तेव्हां ग्वाल्हेर शहरांत मोठा आकांत ओढवला. त्यांस पाटीलबावांनीं असें करूं नका ह्मणून सांगून पाठविलें, तरी ते ऐकेनात. तेव्हां, जिवबादादा स्वारीवर जाण्यासाठीं निघाले असून त्यांचा मुक्काम जवळच होता, त्यांस ताबडतोब बोलावून आणिलें. ते आल्यावर घोड्यावर स्वार होते तसेच तोफा सुटत होत्या त्यांच्यामध्यें उभे राहण्यास जाऊं लागले. आणि त्यांनीं दोघांकडे तोफा सोडूं नयेत, अशा इशाऱ्याबद्दल संकेताचे हात केले. तेव्हां त्यांनीं लागल्याच तोफा बंद करून आपआपल्या हकीकती दादांस येऊन कळविल्या. पुढें, त्यांनीं त्यांची समजी करून हा तंटा मिटविला. इतकें जिवबादादांवर लष्करांतील लोकांचें प्रेम होतें.

(२०) महादजी शिंदे यांजकडे सविता नांवाचा कवि होता. त्यानें महादजी व जिवबादादा यांजवर हिंदुस्थानींत काव्य केलें आहे. व पद्माकर ह्मणून एक कवि होता त्यानेंही ह्या दोघांवर हिंदुस्थानींत दोहोरे केलेले तिकडे प्रसिद्ध आहेत. हे खऱ्या हकीकतींचीं कवनें करून शूर लोकांत युद्धोत्साह वगैरे उत्पन्न करीत. राजे लोकांत त्या काळीं शौर्यादि गुण जागृत ठेवण्यास ह्याही गोष्टी उपयोगीं पडत.

(२१) खरड्याचे लढाईंत जिवबादादांनीं एके प्रसंगीं स्वतः तोफेस बत्ती देण्याचें काम चालविलें होतें: त्या वेळीं त्यांनीं आपला पोषाख युरोपियन थाटाचा केला होता. लढाई आटोपल्यावर मशीर उल्मुल्क तो पुरुष जिवबादादाच होता, हें जाणून ह्मणाले, आपल्या लष्करांत युरोपियन थाटाचा पोषाख केलेला स्वतः तोफेस बत्ती देणारा हिंदु सरदार कोण होता? त्यास दादा ह्मणाले, अहो, शिंद्यांच्या लष्करांत असे शेंकडो सरदार आहेत. तुह्मांस कोण ह्मणून सांगावा? असें ह्मणतांच दोघेही हसूं लागले.

(२२) जिवबादादा दररोज सप्तशती–मध्यम चरित्र–वाचीत असत, व त्या वेळीं त्यांचा मध्यें न बोलण्याचा किंवा उठण्याचा नियम असे. अशा संधीस लष्करांतील एक मस्त झालेला हत्ती सर्वांचे गोट तुडवीत दादा बसले होते त्या डेऱ्यासमोर येऊन उभा राहिला. दादा दाराशींच बसले होते, व त्या वेळीं त्यांचा पाठ चाललेला होता. हत्तीची स्थिति त्यांच्या लक्षांत आली. परंतु, त्यांनीं धीर न सोडतां स्वस्थपणें आपला पाठ सुरू ठेविला, व हत्तीही पाठ संपेपर्यंत सूं सूं करीत तेथेंच राहिला.

पुढें, आपला पाठ संपल्यावर जिवबादादांनीं हत्तीस युक्तीनें पीलखान्यांत नेवविला. सारांश, दृढनिश्चयी पुरुषांस ईश्वर साह्य होतो.

(२३) खरड्याची लढाई आटोपल्यावर जिवबादादांस नाना फडणीस ह्मणाले, काय हो दादा, तुह्मीं लढाईंत सर्वांपुढें असतां, त्या वेळीं तुह्मांस शत्रूंकडील तोफाबंदुकांची भीति कशी वाटत नाहीं? त्यावर जिवबादादा ह्मणाले, नाना तें असें आहेः—

हिंदी छंद.

पानिके जंत कहां पहछानत ग्रीखमकी तपकी गरदीकी ॥
कायरको कल नाहिं परे रनखेतनकी कैसी हैं गति मरदोंकी ॥
केसर कीमत पारख नाहिं जहां हरदीकी ॥
बेदर्दी न प्रवीन लहे कछु जानतही दरदी दरदीकी ॥ १ ॥

अर्थ.

ग्रीष्म ऋतूंतल्या प्रचंड सूर्यकिरणांच्या दुःसह तापाचा प्रभाव नेहमीं पाण्यांत वास करणाऱ्या प्राण्यांस कसा कळावा ? रणांगणांत शूर पुरुषांची गति कशी असते, हें भितऱ्याला कसें समजावें ? ज्याला हळदीची पारख नाहीं, त्यास केशराची किंमत काय समजणार ? अशा गोष्टी त्या त्या विषयांतील दर्दी मनुष्याशिवाय इतरांस कळण्यासारख्या नाहींत!

(२४) महादजी व जिवबादादा लष्करासह वानवडीस असतां जिवबादादांच्या एथील कांहीं मंडळी घरीं कोकणांत लग्नाकरितां जाऊं लागली. तेव्हां महादजीबावा ह्मणाले, दादा, एथें आमचे लष्करांत लग्न होण्यासारखें नाहीं काय? लग्न आह्मीं पाहूं नये कीं काय ? असें यजमानांनीं ह्मटल्यावरून लग्नाचा बेत वानवडीसच ठरविला. पुढें, पेशवे, नाना फडणीस व सर्व सरदार मंडळी येऊन मोठ्या थाटानें लग्न पार पडलें. लग्नांत अधिक मान नवऱ्याचे आईचा ह्मणजे विहिणीचा. तेव्हां तिला मिरवत आणण्याकरितां रस्त्यावर पायघड्यांसाठीं शाली आंथरून हत्तीघोड्यांच्या टापांनीं त्या सरकूं नयेत ह्मणून बाजूस खिळे मारून त्या पक्क्या करून टाकिल्या होत्या. नंतर विहिणीस हत्तीच्या अंबारींत बसवून बरोबर घोडेस्वार, हत्ती, सांडणीस्वार, पालख्या, पायदळ व पलटणीचें लष्कर देऊन थाटानें लवाजम्यासह पुण्याहून वानवडीस आणिलें. दुसरे दिवशीं त्या शाली गोरगरीबांस वांटल्या. ही बातमी नानांला लागल्यावर त्यांजकडून पत्र घेऊन एक जासूद महादजींकडे आला. त्यांत 'अंगावर घेण्याच्या शाली जर पायांनीं तुडविल्या गेल्या, तर अंगावर काय घ्यावें?' असा मजकूर होता. पत्र वाचून महादजी हंसले आणि दिवाण बाळोबा तात्यांकडे वळून उत्तर लिहा, असें ह्मणाले. त्यांनीं तें पत्र मोठ्यानें वाचलें; त्यावर जिवबादादा ह्मणाले 'शालीची योग्यता आह्मांस काय?' हें बाळोबा तात्यांनीं ऐकून त्यांनीं त्याच धोरणावर उत्तर लिहिलें कीं, 'जे शूर आहेत, जे आपलें शिर हातावर घेऊन लढतात, त्यांस शालींची योग्यता जास्त वाटत नाहीं. शालींची योग्यता भिक्षुकांस फार. त्यांनीं त्या आपणास पुनः मिळणार नाहींत ह्मणून जपून ठेवाव्या.' इतकें लिहून तें पत्र महादजींस दाखविलें, व त्यांनीं तें वाचून जासूदाकरवीं नानांकडे पोहोंचविलें. पत्र वाचून नाना गप्प बसले.

(२५) रघुनाथराव दादा पेशवे एक वेळ निजामावर गेले होते, तेव्हां ते पराभव पावून आले. त्या वेळीं जिवबादादा बक्षी सैन्यासह वानवडीस उतरले होते, त्यांस निजामावर जाण्याविषयीं पेशव्यांचा हुकूम झाला. तेव्हां बक्षी सैन्याची तयारी करून निघाले; बरोबर रघुनाथरावही सैन्यासह गेले. चालतांचालतां जिवबादादांचें लष्कर उजवे हातीं व पेशव्यांचें डावे हातीं आलें. हें रघुनाथरावांनीं पाहून बक्षींस ते ह्मणाले, आमचें लष्कर उजवे बाजूसच राहिलें पाहिजे. त्यावर बक्षी ह्मणाले, आह्मी बुद्ध्या उजवे बाजूस आलों नाहीं. आतां पाहिजे तर आपलें लष्कर उजव्या बाजूनें घ्यावें. मग त्याप्रमाणें पेशव्यांचें लष्कर उजव्या बाजूनें चाललें. निजामाशीं गांठ पडण्यापूर्वी जिवबादादांचें लष्कर दोन कोस मागें राहिलें. निजाम लष्करसह लढाईस तयार होताच. त्यानें लढाई चालविल्यावर जिवबादादांस रघुनाथरावांनीं लष्कर घेऊन जलदीनें बोलाविलें. त्यांनीं सांगून पाठविलें कीं, 'तुमचा मान पहिला आहे, लढाई चालूं द्या. प्रथम उजवा हात होऊं द्या. आह्मी मागाहून काय तें पाहूं.' पण निजामाचे लष्कराशीं सामना देण्यास जिवबादादांची जरूरच जाणून ते स्वतः येऊन त्यांस आग्रहानें तळ उठवून घेऊन गेले आणि त्यांचें लष्कर पुढें केलें. शेवटीं निजामाचा मोड जिवबादादांनीं केला, आणि तेणेंकरून त्यांस उजवा मान मिळाला.

भाग २० वा.

उपसंहार.

श्रीछत्रपति शिवाजी महाराजांचे मागून मराठेशाहींत महाराज माधवराव शिंदे हे एकच[२] नामांकित राजे होऊन गेले. यांचे एकंदर उत्कर्षास बक्षीबहाद्दर जिवबादादाच मुख्य कारण होते व त्यांनींच त्यांचीं राज्यव्यवस्थेचीं सर्व कामें पार पाडिलीं. पानपतचे लढाईमुळें मराठेशाहीचा ह्रास होऊं लागला होता, असें ह्मटलें तरी चालेल. मराठ्यांचे मोठमोठे सरदार व अमीरउमराव नग्न, निःशस्त्र, लंगडे, पांगळे होऊन त्या लढाईतून पळून आले. दोनतीन लक्ष लोक मारले गेले. उत्तर हिंदुस्थानांत व दक्षिण देशांत मराठ्यांच्या सत्तेचा लोप होऊं लागला. पेशव्यांकडे पुण्याचे आसपास मात्र कांहीं प्रांत निर्वेध चालत होता. त्यांतही कित्येक सरदार वगैरे लोकांचे तंटे सुरू होतेच! जिवबादादा हे अलिजाबहाद्दरांचे सेनापति होतांच सर्व बखेडे दूर होऊन त्यांनीं रजपूत, जाट, मुसलमान, रोहिले, इंग्रज, शीख वगैरे मराठी साम्राज्याचे शत्रु पादाक्रांत केले आणि बादशहाला दिल्ली तख्तावर बसविलें. अशा प्रकारचीं महत्त्वाचीं कामें करून त्यांनीं मराठी राज्यास इतकी शक्ति आणिली कीं, तिजमुळें त्याला बहुतेक हिंदुस्थानचें सार्वभौमत्व प्राप्त झालें. "शिंद्याची रावणासारखी दौलत,"

---

१. निजामानें पुणें जाळिल्यावर रघुनाथराव त्यांची राजधानी जाळण्यासाठीं लष्कर घेऊन गेले होते, तो हा प्रसंग असावा.

२. "अंध बादशाही, लंगडा प्रधान." दिल्लीचे आंधळे बादशहा शहाआलम व लंगडा प्रधान महादजी शिंदे, या दोन्ही परस्वाधीन धन्यांचीं परस्वाधीन राज्यें जिवबादादांनींच राखिलीं आहेत, असें लोक त्या वेळीं मौजेनें ह्मणत.

३. आमच्या एका जुन्या अनुभवी वृद्ध मित्रानें या वेळच्या शिंदेशाहीची स्थिति दाखविणारी ह्मण आह्मांस सांगितली, ती अशी:—"घोडा नाहीं बसायाला, नोकर नाहीं कसायाला, वस्त्र नाहीं नेसायाला, जागा नाहीं चरायाला."

होईपर्यंत त्यांची योग्यता वाढविली. जिवबादादांनीं आपले कारकीर्दींत दोनतीनशें तरी लहान मोठ्या लढाया मारल्या, असें पत्रव्यवहारावरून स्पष्ट होतें. त्या सर्वांत जय मिळवून त्यांनीं मराठ्यांचें राज्य राखिलें. या संधीस जिवबादादांच्या कारकीर्दीमुळें मराठी राज्याचा उत्कर्ष झाला. आणि जिवबादादा नसते, तर पूर्वींच ह्मणजे सन १७६१ च्या सुमारास त्याचा लय झाला असता. कारण, सन १७६१ पासून १७९६ पर्यंत मराठी राज्यांत जिवबादादांचीच विजयी तरवार वावरत होती ! ! पेशव्यांचें प्रत्येक काम जिवबादादा आल्याशिवाय झालें नाहीं ! ! परंतु, ते वारल्यावर मात्र राज्यसंरक्षण करण्याचे कामीं शत्रूशीं टक्कर देण्यास कोणी बहाद्दर गडी राहिला नाहीं ! ! कांहीं जण असलेल्या जहागिरी राखण्यासाठीं व कांहीं जण नवीन मिळविण्यासाठीं, अशा प्रकारें जो तो शत्रूस मिळाला ! ! जिवबादादांच्याच शौर्याचा कित्ता व तरतरी शिंदेशाहींत सन १८४३।४४ सालापर्यंत कायम राहिली व अद्यापही दिसत आहे. महाराणी विक्टोरिया यांनीं चक्रवर्तिनीपद धारण करण्याकरितां सन १८७७ सालीं दिल्लीस बादशाही दरबार भरविला, त्या वेळीं महाराज अलिजाबहाद्दर जयाजीराव शिंदे सरकार यांस महादजी शिंद्यांचा जुन्या दिल्ली बादशहाच्या प्रधानकीचा मोठा मान मिळाला. त्या प्रसंगीं हा मान महादजींस जिवबादादांच्याच पराक्रमामुळें प्राप्त झाला, असें जयाजीराव शिंद्यांनीं ह्मणून दाखविलें ! असो. या पुरुषापासून इतर राजे, रजवाडे, व लोक यांस राज्य, द्रव्य, वगैरेसंबंधीं जे अनेक प्रकारचे फायदे झाले, ते इतिहासांत ठिकठिकाणीं नमूद आहेतच. मराठ्यांचे राज्यांत आपल्या धन्यावर प्रीति करून, स्वामिकार्यास सतत तत्पर राहून, स्वहित न पाहतां नीतीनें वागून, शत्रूस हार न जातां सदा विजयी होऊन, ज्यांनीं मराठी साम्राज्याचा उत्कर्ष केला, असे प्रौढप्रतापी प्रसिद्ध वीर जिवबादादा बक्षी हे एकच होऊन गेले ! ! यांचे हयातींत यांचे उपदेशानें व अनुकरणानें जे पुष्कळ मुत्सद्दी व शूर पुरुष तयार झाले, ते व्यवहार व राजकार्य यांत कधींही फसले नाहींत, अशी प्रसिद्धि आहे !

समाप्त.

परिशिष्टें.

परिशिष्ट १ लें.

बखर.

*शेणवी वीर व मुत्सद्दी.

हिंदुस्थान तहद दक्षिण यांत प्रतापी असे पुरुष नामांकित आद्यगौड शेणवई ज्ञातींत लौकिकवान्, ज्यांणीं स्वपराक्रमें मोठीं मोठीं राज्यें सर करून ताब्यांत आणून मुलूख काबीज करून राजेरजवाड्यांवर दस्त बसवून हुकमाप्रमाणें वागविले, व दक्षणपासून हिंदुस्थान लाहोरची हद्दपर्यंत एकसर अम्मल केला, असे पुरुष होऊन गेले, त्यांचे लौकिक आणि कीर्ति आजपर्यंत सर्वत्रीं चालत आहेत. असल्यांचें किंचित् थोडकेंसें यथामति जाणवतोंः—

प्रथम शेणवई ज्ञातींत पुरुष कोण कोण ते.

पहिले **रामचंद्र मल्हार**, ज्यांस रामचंद्र बाबा असें ह्मणतात.

दुसरे प्रतापी सर्वोत्कृष्ट होऊन गेले **जिवाजी बल्लाळ**, ज्यांस जिवबा दादा असें ह्मणतात.

तिसरे त्यांचे चुलत बंधु **जगन्नाथ राम**, ज्यांस जगोबा बापु असें ह्मणतात.

चौथे **सदाशिव मल्हार**, ज्यांस शिंदे सरकारचे रयाशतींत भाऊ दिवाण असें ह्मणतात. बुद्धिवान् आणि मसलती, ज्यांणीं पुढें होणार त्याचें धोरण बांधून, इंग्रज बहाद्दर यांचे वकिलीस आले त्या वेळीं शिंदे सरकारचे तर्फेनें वकिलीस गेले. ठरावाच्या यादनाम्यांत चवदा कलमांचे कागद शिक्का मोहोर मालकाचे सही केलेले, जो जाब ठरावांत आला त्याचा मालकाचा दस्ताऐवज जाब ठरला ह्मणून पाहिजे ह्मणतांच कागद दिला, असा ज्यांणीं बंदोबस्त करण्याचा इरादा करून लॉटसाहेब गवरनर[२]विलायतेहून आले त्यांच्या परिमार्जनाचे जाब ठरवून चवदा कागद पुढार मसलत,

* ही बखर आह्मांस एका शेणवी मित्रानें दिली. त्यानें ती खुद्द जिवबादादा बक्षी यांच्या घराण्यांतून मिळविली. हिची मूळप्रत सदरील केरकर बक्षी यांचे गोमांतकांतील केरी येथील घरांत आहे. तेव्हां ह्या बखरीच्या खरेपणाविषयीं कांहीं संशय मनांत आणण्यासच नको. आह्मांस मिळालेली प्रत कित्येक ठिकाणीं वाक्यरचनेच्या संबंधानें अशुद्ध होती ह्मणून आह्मीं कित्येक ठिकाणीं अर्थ स्पष्ट लक्षांत भरण्याकरितां वाक्यांतले शब्द, मूळ अर्थ न बदलतां, इकडचे तिकडे घातले आहेत. शिवाय शब्दशुद्धीकरितां मुळांतील 'बाहीर' बद्दल 'बाहेर,' 'पुढां' बद्दल 'पुढें', 'परंत' बद्दल 'परंतु', 'बोलणेस' बद्दल 'बोलण्यास','रजवाडेवर' बद्दल 'रजवाड्यांवर,' 'करणेचा' बद्दल 'करण्याचा' असे कोठें क्षुल्लक फेर केले आहेत, व विरामचिन्हें घातलीं आहेत. याशिवाय कोठें ह्मणण्यासारखा फेरफार केला नाहीं.

(वि० ज्ञा० विस्तारकर्ते यांची सूचना.)

१. ही बखर पूर्वीं विविधज्ञानविस्तार पु० ११ यांतून १८७९ सालीं प्रसिद्ध झालेली आहे. तिचें नांव "शेणवी वीर व मुत्सद्दी" असें असतां रा. विष्णु रघुनाथ नातू यांस तें नांव "शेणवी व वीरमुत्सद्दी" असें दिसलें! पहा 'महादजी शिंदे यांचें चरित्र.' तसेंच प्रो० चिंतामण गंगाधर भानू यांस तेंच नांव "वीर व शेणवी" असें दिसलें ! ! पहा 'नाना आणि महादजी' पुस्तक पृ० २. खरें नांव दोघांसही दिसलें नाहीं, याचें कारण काय? त्यांनीं लिहिलेले हे व इतर इतिहासग्रंथ अशाच पद्धतीचे आहेत कीं काय ? २. कलकत्त्याचे गवरनर जनरल साहेब यांस लाटसाहेब असा किताब आहे. या वेळीं लाटसाहेब हेस्टिंग्स् साहेब हे होते.

अमुक प्रकार घडल्यास असे तऱ्हेनें जाब दिला पाहिजे, तें पूर्वी अजमास करून मालकाच्या दस्तुराचे कागद पाहिजेत ह्मणून सांगितल्यावर येथून जाईपर्यंत बहुत दिवस लागतील याकरितां पुढील धोरण बांधून शिक्का मोहोर मालकाची सही असे करून नेले ते एक बैठकीस दिले पाहून लाटसाहेबांनीं त्यांची फार तारीफ केली कीं, "आह्मी विलायतेहून मसलत योजून आलों. असे तऱ्हेनें जाब बोलणार हें तुह्मांस आमचे मनांतील कसें समजलें? जें आह्मीं विचारलें त्याचें समाधान करून आपली कारवाई बहाल ठेऊन समाधानी केलीत. यावर बोलण्यास जाब राहिला नाहीं." श्रीमंत पेशवे व नागपुरवाले व गायकवाड, दक्षिणेंतील सर्व तह भाऊ दिवाण यांचे हातून जाहले, तेव्हां श्रीमंतांचे वकील व नागपुरवाले वगैरे लोकांचे वकील यांस वस्त्रें बहुमान करून लाटसाहेब यांणी सर्वांस बिदा केले आणि सांगितलें जे, "जो तहनामा भाऊसाहेब दिवाण यांणीं केला, त्या-बाहेर हिंदुस्थानांत दक्षिणसंस्थानांविषयीं होणें नाहीं." त्यावरून भाऊ दिवाण यांस चार लक्षांची जागा गुजराथेंत बडोदें अमदाबादेजवळ भडोच माहाल इनाम दिला. तो माहाल भाऊ दिवाणांनीं शिंदे सरकारास दिला. भाऊ दिवाण यांणीं आपण शिंद्यांचे पदरचे जाणून आपले मालकास दिला, आणि त्यापैकीं नर्मदेचे तीरीं शुक्ल तीर्थ प्रसिद्ध क्षेत्र आहे, ती जागा आपण ठेविली. त्या ठिकाणीं बारा वर्षांनीं नर्मदेंत महादेवाचीं लिंगें उत्पन्न होतात. तेथील आमदानी दहाबारा हजार रुपयांची आहे, ती देवस्थानास व ब्राह्मणांस सालोधार धर्मार्थ करून दिली. तेथें आजपर्यंत अचल धर्म त्या पुरुषाचा चालत आहे.

पांचवे शिंद्यांचे पदरचे **बाळोबा तात्या पागनीस**, शहाणे आणि मसलती, कीं ज्याणें नाना फडणीस, पुण्याचे दरबारांत नामांकित, एकछत्र हुकमाखालीं राज्य श्रीमंत सवाई माधवराव साहेब यांचे कारकीर्दीत, पुण्याचे संस्थानांत कार्यकर्ते मुखत्यार कुळी नाना फडणीस, दक्षणेंत आजवर ज्याचे शहाणपणाचा मोठा लौकिक, ज्यांणीं सवाई माधवराव पेशवे गर्भांत असतां जन्मास येण्यापूर्वी श्रीमंत गर्भवासी ह्मणून मुलखांवर रोखे चालवून एकछत्र राज्य हुकुमाखालीं चालविलें असा ज्यांचा प्रताप, त्यांणीं शिंद्यांचे दौलतींत आपला बंदोबस्त करावा एतदर्थ जे यत्न केले, ते एकही न चालूं देतां बाळोबा तात्या पागनीस यांणीं त्यांचे यत्न निर्फळ करून आपली शहाणपणाची छाप त्यावर ठेविली आणि आपला काबू त्यांजवर केला, व त्यांस कैद करून नगरास ठेविले, असे बाळोबा तात्या जहाले. परंतु तात्या ज्या मसलती योजित गेले त्या जिवबा दादा यांचे पराक्रमेंकरून सिद्धीस गेल्या. योजिलेले प्रकार सिद्धीस नेतात तेच प्रतापी पुरुष, पुनीत, त्यांवर ईश्वरी कृपेची सिद्धता होती. ते निरभिमानी पुरुष, ज्यांस अहंतेची वार्ताही मनीं नाहींच, असे जिवबा दादा यांचे प्रकार होते.

आतां बाळोबा तात्या पागनीस यांचे पदरीं सहावे **लक्षुमण अनंत**, ज्यांस लखबा दादा लाड असें

---

१. इंग्लिश आणि मराठे यांच्या मध्यें जो तह झाला, तो महादजी शिंदे यांचे मार्फत झाला होता. शिंद्यांचे तर्फे सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण ज्यांस भाऊ बक्षी असेंही ह्मणत, हेच कर्ते पुरुष तह करण्यास पुढारी होते. महादजींचें चरित्र पृ. १६९।१७० व अंडरसनसाहेब यांची तारीख १५ जून १७८३ ची डायरी वगैरे इतर इंग्लिश ग्रंथकारांचे ऐतिहासिक ग्रंथ पहा. २. बाळोबा तात्यांच्या संबंधानें पुष्कळ इतिहासकारांनीं माहिती लिहिली आहे. पहा टॉडकृत 'राजस्थानचा इतिहास' व ग्रांट डफ, म्यालेसन, क्राफर्ड वगैरेंचे ग्रंथ. शिवाय, नाना फडणिसांचें चरित्र व मल्हार रामरावकृत बखर वगैरे मराठी ग्रंथ आहेत. त्यांत सुद्धां अशीच माहिती सांपडते. ३. पहा पत्रें नंबर १५५।३७।३८. यांवरून जिवबादादांचे अंगीं नम्रता फार होती असें दिसेल.

ह्मणतप्त. तात्यांकडून सर्व पागांवर मुखत्यार लखबा दादा; त्यांणीं तात्यांपेक्षां लौकिक विशेष मिळविला. शहाणे, मसलती आणि लढाईंत धैर्यवान् असे होऊन गेले. प्रथम त्यांकडे आग्र्याचा किल्ला दिला. त्यावरती जागा, त्याजला नांव 'अकबराबाद' ह्मणतात. अकबरशहा पातशहा दिल्लीचे तख्तावरून येऊन आग्र्यास तख्तावर बसले, याकरितां आग्र्यास 'अकबराबाद' असें नांव आहे. त्या जागेच्या बंदोबस्तास शिंदे सरकारचे अंमलदार हिंदुस्थानांत जिवबा दादा, यांणीं पातशाई हरामखोर यांचीं पारपत्यें करून वजारत शिंदे सरकार माधव महाराज यांस माही मरातब किताब मरामत अलिजा बहादर मुजफरजंग अशी घेतल्याची वर्णना पुढें तपशिलांत लिहिली जाईल. हिंदुस्थानांत अंमल बसविले त्या वेळीं लखबा दादास आग्र्याचे बंदोबस्तास ठेविलें. मागून पुढें फौजा गेल्या अशा पाहून इस्माईल बेग नबाब व हमदानी नबाब हे पळून गेले होते ते एकत्र होऊन आग्र्याचा किल्ला घेरला. चहूंकडून किल्ल्यास वेढा घातला. त्या वेळीं तीन महिने लखबा दादानें मोठे जूर्यतीनें किल्ला लढविला. त्या दिवसापासून लखबा दादा लौकिकास दिवसेंदिवस वाढत गेले.

सातवे **नारायणराव जिवाजी**, जिवबा दादांचे वडील चिरंजीव. ते दातृत्वशक्तींत उदार, ज्याचे देणगीस सर्वत्र हा वेळपर्यंत वर्णितात. ते अल्पायुषी होऊन गेले.

आठवे जिवबा दादांचे चिरंजीव **यशवंतराव भाऊ**. हे सरदार नामांकित लौकिकवान्, ज्यांबरोबर पंचवीस हजार फौज व दोन कंपू घरगुती, ज्यांनीं मोठे प्रसंग साधून लौकिक मिळविला. ते औदार्य आणि शूरत्व यांत रणधीर असे होऊन गेले.

त्याशिवाय जिवबा दादांचे बंधु **शिवबा नाना** ते लौकिकवान् पुरुष जाहले.

व **बाळाजी राम**, त्यांस बाळोबा भाऊ बक्षी असें नामाभिधान, कार्यकर्ते, लौकिकवान्, मिळून दहा पुरुष.

त्याशिवाय **यशवंतराव शिवाजी वागळे**, हे शूर मर्दानी जाहले. अगोदर जिवबा दादा जाहले, त्या समयीं **राघो राम** पेशव्यांचे दौलतींत पराक्रमी, शूरत्वांत बहुतच ज्यांचा लौकिक असे होऊन गेले.

१. आग्र्यास अकबराबाद असें नांव आहे. पहा मल्हार रामरावकृत शिवछत्रपतीची बखर; शिवाय, लखबा दादांचे दफतरीं याबद्दलचीं पत्रेंही आहेत. २. ही आग्र्याचे वेढ्याची लढाई दहा महिने चालली होती. पहा पत्रें नंबर ४१३।४१४. या दहा महिन्यांपैकीं तीन महिने लखबा दादा मोठ्याच शर्तीनें लढले. यांचेबद्दल टॉड, ग्रांट डफ, कीन, वगैरे ग्रंथकारांनीं पुष्कळ माहिती लिहिली आहे. शिवाय, होळकरांच्या कैफियतींत व लोकहितवादिकृत उदेपूरचा इतिहास, वगैरे मराठी ग्रंथांत यांचा लौकिक वर्णिला आहे. ३. नारायणराव बक्षी यांजविषयींची माहिती टॉड व ग्रांट डफ साहेबांनीं लिहिली आहे. शिवाय, आक्वर्थ साहेबांनीं तयार करविलेलें पोवाड्यांचें पुस्तक पृ० १४३, ऐतिहासिक गोष्टी भाग २, पृ० २६ ते ३२ व पत्रें नंबर ७८।८२।१५१।१९२।४१८ पहा. ४. यशवंतराव भाऊ यांजबद्दलची माहिती टॉड व मालकमसाहेब यांचे ग्रंथांत, भोंसल्यांचे बखरींत, सरंजामेकृत शिंदे घराण्याच्या इतिहासांत व पत्रें नंबर ३८२।३८८ यांत दिलेली आहे, ती पाहावी. ५. शिवाजी नाना यांजविषयीं माहिती टॉडसाहेब यांनीं लिहिली आहे. लोकहितवादिकृत उदेपूरचा इतिहास यांत व पत्रें नंबर १।५८।६० यांतही पाहावी. ६. बाळाजी राम यांचे संबंधाची माहिती होळकरांची कैफियत पृ० ८२ यांत व या पुस्तकांतील पत्रें नंबर २२।१४९ यांत दिलेली आहे. ७. यशवंतराव शिवाजी वागळे यांबद्दलची माहिती होळकरांची कैफियत, छत्रपति धाकटे रामराजे यांचें चरित्र व पत्रें नंबर १।२५० यांत पाहावी. ८. राघो राम पागे यांसंबंधाची माहिती टॉडसाहेबकृत राजस्थानचा इतिहास, भाऊसाहेबांची बखर, पानपतची बखर, वगैरे ठिकाणीं आलेली आहे. याशिवाय यांच्याविषयीं पुढें दिलेली जास्त माहिती मिळते:—राघो राम पागे हे स्वतंत्र सरदार माळवे प्रांतीं फौज

शेणवई ज्ञातींत त्यापुढें जाह्ले त्यांचें वर्णन करणें नलगे. ज्या पुरुषांचे दिगंतरीं लौकिक तेवढेच जाणविले आहेत. त्यांचे पराक्रमाच्या कृती आतां येथून किंचित् जाणवितोंः—

रामचंद्र बाबा, पुणें संस्थानांत त्या वेळीं राज्यकर्ते श्रीमंत नानासाहेब पेशवे, त्या मन्वंतरांत कामदारांत कार्यकर्ते मुखत्यार हे. मान्यता मोठीच. त्यांनीं जागजागां देवस्थानांस गांव देऊन उत्साहाचे खर्च व सदावर्तें चालविण्याबद्दल बंदोबस्त करून सालोधार चालणेविसीं कितिएक जागे बंधानें करोन देवविले, आणि कितिएक जागा देवालयांचे जीर्णोद्धार करवून जागा जमिनी देऊन उपार्जना करविल्या. त्याशिवाय देवालयें बांधवून निर्वाहकृत्यास बंधानें करून दिलीं. मार्गांत विहिरी आणि क्षेत्राचे ठिकाणीं घांट आणि तलाव बांधविले. पादारख धर्मकृत्य, ज्या स्थानास जशी तजवीज असावी त्या त्याप्रमाणें करून देवविल्या. अद्यापि श्रीगंगोत्रीची कावड श्रीरामेश्वरास पावत असते. असे रामचंद्र बाबा लौकिकवान् पुण्यांत महापुरुष होऊन गेले. त्यांणींच शिंदे सरकारची मुळीं रयाशत उभी केली. त्याचा पर्याय असा कीं, राणोजी शिंदे यांचें वय लहान होतें. बारावें वर्ष. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे संनिध सेवेंत जवळ राहत होते. एके दिवशीं कांहीं मसलतीचें काम पडलें. श्रीमंत नानासाहेब आणि रामचंद्र बाबा खलबतखान्यांत खलबतास बसले. कारण मोठें, सबब विलंब लागला. खलबतखान्याचे दरवाज्यावर हुजरे माणसें बसलीं होतीं. त्यांत राणोजी बसले होते. दोनप्रहरचा वेळ, निद्रा लागली; जेवण झालें होतें. शीतल जागा. निद्रा लागली. इतक्यांत श्रीमंत खलबतांतून उठले आणि रामचंद्र बाबा घरीं जाण्यास बाहेर आले तंव राणोजी निजला आहे. इतक्यांत पाहातात तर पायावर हातावर स्वच्छ राजचिन्हें, ऊर्ध्व रेषा झगझगीत व कमल हातापायांवर, अशीं लक्षणें उत्कृष्ट पाहून जाणलें कीं, हा भाग्यशाली, प्रालब्धवान्, प्रतापी पुरुष होईल. असें जाणून रामचंद्र बाबा जात होते तसेच मागें फिरून आले आणि श्रीमंत नानासाहेब यांकडे हें सांगण्यास जात होते, इतक्यांत नानासाहेब बाहेर येत होते त्यांनीं रामचंद्र बाबास पाहिलें. रामचंद्र बाबास पेशवे साहेब 'बोवा' असें ह्मणत होते. यांस पाहून श्रीमंत बोलले, "जलदीसें येणें झालें? कांहीं बोलणें आहे?" त्यावरून रामचंद्र बाबा बोलिले कीं, "एक चमत्कार पाहिला. आपले नजरेनेंही पाहावा." तेव्हां राणोजीचीं सर्व सामुद्रिक लक्षणें शुभ दाखवून सांगितलें, "हा अंशधारी भाग्यशाली प्रालब्धवान् आहे. यास सरदारीचीं वस्त्रें देऊन लौकिकास आणला पाहिजे. त्याचे प्रालब्धानें अकस्मात् प्रकार दाखविला, त्यापेक्षां ईश्वरास

बाळगून राहात असत. ज्यांस लढाईचे कामीं मदत लागे, त्यांस ते हे करीत असत. जयापा, दत्ताजी व जनकोजी शिंदे, यांना आपल्यासारखे शूर जाणून हे त्यांना आपण होऊन मदत करीत. हे शिंद्यांचे नोकर नव्हते. यांनीं उज्जनी एथें भैरवगडाखालचा क्षिप्रा नदीचा घांट बांधला आहे. हे आरवंदें गांवचे गांवकर हक्कदार पाटील मानकरी होते. यांनीं या गांवीं भद्रकालीच्या देवालयासमोरचें देवालय बांधलें आहे.

१. रामचंद्र मल्हार ऊर्फ रामचंद्र बाबा यांजविषयींची माहिती छत्रपति धाकटे रामराजे व शाहू यांचीं चरित्रें, होळकरांची कैफियत, ग्रांट डफकृत मराठ्यांची बखर, महादजीचें चरित्र, पेशव्यांची बखर, पंतप्रधानाची शकावली, वगैरे पुस्तकांत आलेली आहे, ती पाहावी. २. ही कावड हमेशा जात येत असते. शिवाय, शिवरात्रीचे दिवशीं दरवर्षास गोकर्णास जाते. ३. रामचंद्र बाबांचा पुण्यांत सातमजली वाडा होता. पहा पंतप्रधानाची शकावली पृ० २४. ४. ही गोष्ट पहिले बाजीराव पेशवे यांचे कारकीर्दींत घडली. राणोजीची हुशारी जाणून त्यास वैभवास चढवावें असें मनांत आणून पुढें बाजीरावास सांगून रामचंद्र बाबांनीं राणोजीस सरदारी देवविली.

ह्याचा उदय कर्तव्य आहे असें दिसोन येतें." पेशवे साहेब यांच्या ध्यानास ती गोष्ट आली आणि बोलले, "वरकड सर्व नीट आहे, परंतु वय लहान आहे. तुह्मी याविशीं तजवीज ठेवाल तर नीट होईल." त्यावरून रामचंद्र बाबा यांणीं जिमा घेतली कीं, "आपण याविषयींचा बंदोबस्त ठेवूं.[1]" त्याच वेळीं सुमुहूर्त पाहून राणोजीस सुभ्याचीं वस्त्रें देवविलीं आणि श्रीमंतांचे जसे कारखाने पुण्यास होते, त्याचप्रमाणें अठराही कारखाने देवविले, आणि त्या कामावर आपले गृहस्थ कारकून शेणवई नेमून दिले. हिंदुस्थानांत माळव्यांत उज्जैनी, इंदूर, त्यापुढें साठसत्तर कोश पुढें, पेशवे साहेब यांची अम्मलदारी होती, त्या सुभ्यांचीं वस्त्रें शिंदे यांस देऊन कामावर बहाल केलें.

त्यानंतर दुसरे प्रतापी आणि लौकिकवान् सर्वोत्कृष्ट मोठमोठे पराक्रम ज्यांणीं केल्याची कीर्ति हिंदुस्थानांत सर्वत्र हा वेळपर्यंत वर्णना चालली आहे असे पुरुष नामांकित अंशधारी जिवबा दादा होऊन गेले[3]. त्यांणीं कोणकोणतीं कार्यें स्वपराक्रमें सिद्धीस नेलीं:– जिवबा दादा हे चवदा पंधरा वर्षांच्या वयांत रोजगारार्थ गेले. प्रथम श्रीमंत पेशवाईंत राहिले. बर्वे यांचे निसबत कर्नाटक प्रांतीं सुभ्याचे कामदारीवर होते. नंतर हुजूर पेशवाईंत बर्वे याकडील पतक व सुभ्यांतील तैनाती फौज याकडे होती ती घेऊन पुढें श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचे चुलत बंधु भाऊसाहेब पेशवे व नानासाहेबांचे चिरंजीव विश्वासराव साहेब हे हिंदुस्थानांत आपल्या मुलखाचे बंदोबस्ताकरितां फौजा सरदार समागमें घेऊन गेले, त्यांत जिवबा दादाही आपलेकडील सरंजाम घेऊन फौजेंत बरोबर होते. पाणिपत सोनपत ह्मणून दिल्लीचे पुढें साठ पांसष्ट कोश तो महाल आहे, तेथें पाणिपतावर विलायती गिल्ची अहमदशहा पातशहा दस्ते घेऊन सतलज उतरून आला आणि पाणिपतावर मोठी लढाई जाहली. पेशव्यांचे फौजेनें त्यास युद्धांत मागें फिरविलें. इतक्यांत विश्वासरावसाहेब हत्तीच्या अंबारींत बसले होते तेथें जंबूरचा गोळा लागून मरण पावले. हें पाहून हत्तीचा फौजदार महात हत्तीवर होता त्याणें वर पाहतो तर मालक परलोकवासी झाले पाहून हत्ती लढाईचे प्रसंगीं बसवूं नये, परंतु घाबरेपणीं मालकच निधन पावले जाणून हत्ती बसविला. तों त्याचे बातमीदारानें खबर दिली कीं, फौजेचे मालक लढाईंत पडले. त्यावरून गेले होते ते फिरून हमम करून फौज फिरल्यानें संगरांत घोडे माणसें भरून वरून रस्ता पडून मिळते मागें मनुष्यें गेलीं. त्या गर्दींत भाऊसाहेब पेशवे व जनकोजी शिंदे सर्व गर्दींत मरण पावले. त्यांतून राणोजी शिंदे यांचे वंशांत महादजीराव शिंदे यांचे पायास तबल लागला आणि जखमी वांचून आले. त्या वेळीं त्या लढाईंतून जिवबा दादा एक घोड्यानिशीं संग्रामांतून पार पडून आले. श्रीमंत नानासाहेब पेशवे आणखी माघोन फौजा घेऊन हिंदुस्थानांत जाण्यास माळव्यांत सुरोज भलश महाल आहे तेथवर पोंहचले होते.[6] ते भाऊसाहेब व विश्वासरावसाहेब यांचे मदती-

१. ग्रांट डफकृत बखर, पंतप्रधानाची शकावली, होळकरांची कैफियत, वगैरे ग्रंथ पहा. बाजीरावानें रामचंद्र बाबांस राणोजी शिंदे यांचे दिवाण नेमिलें होतें. २. शिंद्यांची रामचंद्र बाबांचे वेळची पहिली राजधानी उज्जनी होती. तेथें रामचंद्र बाबांनीं देवळें वगैरे बांधिलीं आहेत. व तेथेंच त्यांचा वाडा होता. सन १७६७ त रघुनाथराव दादा पेशवे तिकडे गेले होते, तेव्हां ते त्यांचे (मुलगा सदाशिव रामचंद्र यांचे) वाड्यांत राहिले होते. ऐतिहासिक लेखसंग्रह मा० पुस्तक, जानेवारी सन १९००, अंक ३२, पृ० १२२९. ३. या पुरुषाच्या संबंधानें या बखरीस जुळते असे प्रस्तुत पुस्तकांत ठिकठिकाणीं पुष्कळ आधार आलेले आहेतच. त्यापेक्षां एथें आणखी अधिक लिहिण्याची जरूर आहे, असें नाहीं. ४।५. भाऊसाहेबांची बखर पृ० ११९. ६. भाऊसाहेबांची बखर पृ० १३०.

करितां जात होते. तेथें खबर सांडणीस्वारानें दिली कीं, "गर्दी जाहली, सर्व गर्द जाहले." हें समजतांच माघारें पुण्यास राज्याचा बंदोबस्त राहिला पाहिजे याजकरितां दरकुच पुण्यास स्वारी आली. नंतर शिंद्यांचे वंशांत एक महादजी शिंदे, राणोजी शिंदे याचे वंशांत वांचून आले आणि जिवबा दादा त्या संग्रामांतून वांचून आले. पुढें हिंदुस्थानांत बंदोबस्तास नेमण्याचे विचारांत श्रीमंत होते, तेव्हां नारो शंकर यांजला सुभ्यास नेमावें अशी योजना जाहली. नंतर राघो राम पागे श्रीमंतांचे पदरचे शूर आणि लौकिकवान् यांणीं हा प्रकार ऐकून दरबारास येत होते, मार्गांत जिवबा दादांची व यांची भेट जाहली. तेव्हां राघो राम पागे यांणीं सांगितलें, "शिंदे यांचे सुभ्यावर त्याचें काम करण्याजोगा कोणी राहिला नाहीं जाणून दुसरा नेमण्याची योजना श्रीमंत करीत आहेत. शिंद्यांची सरदारी मुळीं रामचंद्र बाबानें उभी करून अठराही कारखान्यांवर शेणवई गृहस्थ ठेवून शेणवी लोकांची रयाशत असें सर्वत्रीं लौकिकांत आहे, आणि आतां असा प्रकार होणार, याची तजवीज कशी करितां?" त्यावरून जिवबा दादा बोलले कीं, "याविसीं आतांच श्रीमंतांशीं बोलून याची बनेल त्याप्रमाणें तजवीज करून शिंद्यांची गादी कायम करूं." असें यांचें बोलणें होऊन श्रीमंत नानासाहेबांपाशीं विनंती केली, "आज शिंद्यांच्या सरदारीचीं वस्त्रें प्रत्यक्ष शिंद्याचा वंश आहे त्यापेक्षां वस्त्रें महादजी शिंदे, राणोजी शिंदे याचा पुत्र, यास द्यावीं." त्यावरून पेशवे साहेब ह्मणूं लागले, "त्याजकडून एवढें काम कसें होईल ? त्याणीं हे प्रकार अद्यापि पाहिले नसून हा एवढा मोठा प्रकार कसा निभेल? त्यापेक्षां तुह्मी जिमा घेतां तर तुह्मांस सुभा सांगतों." त्यावरून जिवबा दादा व राघो राम बोलले जे, "वस्त्रें हिंदुस्थान सुभ्याचीं महादजी शिंदे याचे नांवें द्यावीं. बाकी सर्व बंदोबस्त आह्मी करूं. सरकारांनीं याविषयीं काळजी करूं नये. येविशीं जिमा आमचा, ही शिंद्यांची रयाशतही आमची शेणवई लोकांची, निमित्त शिंदे, असे मुळींचपासून सरदारीच्या प्रथमपासून आहेत, नांव चालवावें एतदर्थ आह्मी हा जिमा घेत आहोंत." त्यावरून महादजी शिंदे यांस वस्त्रें देववून उभयतां बराबर फौजा घेऊन हिंदुस्थानांत आले. त्या वेळीं माळवे प्रांतीं उज्जनीस येऊन मुक्काम केला. त्यापुढें साठ कोशपर्यंत अम्मल होते ते गर्दीमुळें गैरशिस्त जाहले, ते उज्जनीसीं शिंदे सरकारचें रहाणें करून उभय फौजा घेऊन मेवाडचा मुलूख वगैरे रजवाड्यांत खंडणी घेऊन थोडेबहुत अम्मल प्रथम केले व मुळचे महाल होते तेथें आपला अम्मल केला. इतक्यांत लढाईंत राघो राम पडले. नंतर जिवबा दादानें फौजा घेऊन ग्वाल्हेरपर्यंत मध्यें जे रजवाडे बलवान् होते त्यांजवर स्वपराक्रमें आपला हुकूम बसवून ग्वाल्हेरीस अम्मल केला, किल्ला लढून घेतला. तेव्हां गोहदवाला राणा संस्थानिक याकडे

१. या वेळीं नानासाहेब हे पेशवे होते. २. ही योजना रघुनाथराव पेशव्यांची होती. परंतु, शेवटीं ती सर्व फसली. पहा पुस्तक यादी कारकीर्द विठ्ठल शिवदेव विंचूरकर पृ० १० व ऐतिहासिक लेखसंग्रह मा० पुस्तक, अकटोबर सन १८९९, अंक २९, पृ० ११७. ३. ही बाळोबा तात्या वगैरे मंडळी पूर्वींची जुनीच होती. ४. या वेळीं महादजी शिंदे यांस अशा कामाचा अनुभव नव्हता. ५. यापूर्वीं जिवबा दादा यांजकडून नानासाहेब पेशव्यांची खात्री होण्याजोगीं कांहीं शूरपणाचीं व मुत्सद्दीपणाचीं कामें झालीं होतीं असें दिसतें, व राघो राम तर पूर्वींच प्रसिद्ध होते. ६. म्यालेसन साहेबाच्या इतिहासांत सन १७६७ चे सुमारास शिंद्यानें ग्वाल्हेरीचा किल्ला घेतला, असें लिहिलें आहे. सन १७६७ सालीं ग्वाल्हेर घेतल्याचें दिसतें. पहा ऐतिहासिक लेखसंग्रह मा० पुस्तक, सन १८९९, अंक २८।२९।३२, अनुक्रमें पृ० १०८७।१११६।१७ व ११२९ यांवरील पत्रें.

ग्वाल्हेर होती. तो त्या प्रसंगीं किल्लयावर होता. तेव्हां किल्ल्यांत फौज सर करून पोंहचली. निघून जाण्यास मार्ग नाहीं असें जाणून त्याचे जातवाले व कुटुंबी एक जातीचे पांचशें मनुष्य व दहा हजार लोक किल्लयावर होता. राण्यानें महालाचे दरवाजे उघडून बाहेर निघून लढाई करून तितकेही तरवार करून मेले. तीन हजार मनुष्य कटा होऊन मेले, असे तऱ्हेनें कटा केला. ग्वाल्हेरीखालीं चाळीस महाल पांसष्ट लक्षांची जमा इतका मुलूख प्रथम घेतला. तेथें जिवबा दादांचे पराक्रमाचा लौकिक, यश आणि कीर्ति देशोदेशांतरीं लोकांनीं ऐकिली. शिंदे सरकार महादजी बावानें सर्व फौजेचे सैनापत्यास 'बक्षीगीर' असें नामाभिधान आहे ते बक्षिगिरी त्या वेळीं जिवबा दादास दिली आणि बहुत गौरव केला. गोहदचा किल्ला, नरवरचा किल्ला व शहाबादचा किल्ला असे असे अजिंक्य किल्ले ग्वाल्हेरचे चाळीस महालांत गांवोगांवीं लढाऊ गड त्याशिवाय चाळीस मोठे किल्ले ते जंग करून खालीं करून आपले शिंदे सरकारचे अम्मल कायम बसविले.

इतक्यांत दिल्लीस पातशाई अम्मल, अलमशहा पातशहा होते. बावन्न राजे पातशाई ताबेदारींत चाकरीस हजर राहात होते. त्याशिवाय बावीस उमराव फौजबंद नामांकित असे कीं, एकाकडे पंचवीस हजार फौज, घोडेस्वार व तीन तीनशें तोफा, पंचवीस हजार पायदळ. त्या उमरावांचीं नांवें—नबाब जनफरवान, दुसरे आगाशफी, तिसरे अबदुल हयातखान नबाब, व हमदानी नबाब व इस्माईल बेग नबाब व गुलाम कादर असे असे व अफशाब नबाब व नजब कुलीखान नबाब व खानदौराखा नबाब सरनाम असा उमरावांचा समुदाय दिल्लीचे पातशाईंत होता. तसेंच त्यांकडे फौजखर्चास ज्यारे ज्यारे आपआपले सलतनाचे मुलूख लागले होते. ते पातशाई हुकुमांत वागावें ती मर्यादा सांडून पातशहाचा हुकूम न वागविला आणि आपले जागीं आपण हुकुमाची मर्यादा सांडून वांगूं लागल्यावरून पातशहा यानें शिंदे सरकार कामकर्ते असें जाणून शिंद्यांस सांगून गुप्तरूपें फर्मान पाठविलें कीं, "हे लोक बेहुकुमी करूं लागले. तख्तासीं फिरले आहेत. हे हरामखोरीवर आले. त्यापेक्षां तुह्मीं येऊन सलतनांतील जे लोक अमर्याद जाहले आहेत, त्यांचें पारिपत्य करून तहद उमराव लोक यांकडे मुलुख सरकारी आहे त्यासुद्धां अम्मल करावा." याप्रमाणें पातशहाचा हुकूम दक्षणी लोकांस गेल्याचें त्या लोकांस वर्तमान समजल्यावरून बाकी सर्व उमराव आपआपले जागीं होते, परंतु गुलाम कादर व नबाब इस्माईल बेग व हमदानी हे होते, यांणीं पातशहास कैद करून आपण राज्य करावें अशी मसलत केली. परंतु पातशहासमोर कोणी जाईनात. त्यांतून गुलाम कादरखान नबाब रोहिले पस्तून आणि रोहिल्याच्या फौजा त्यापाशीं, त्याणें किल्ल्याभितर जाऊन तख्तावर पातशहा बसले होते तेथें जाऊन बेअदमी केली, ती असंभव्य केली. किल्ल्यांत लूट केली आणि तख्तावरून खालीं काढून तख्तावर पाय लावला. आणि पातशहाचे डोळे पशकबाजाचे टोंकानें कोंढिले. हा दिल्लींत सर्व लोकांस अनर्थ जाहला आणि दिल्लींतील सर्व पातशाही लोक होते ते हें ऐकतांच चहूंकडून जमा झाले. शहरचे लोक आपणाशीं लढाईस येतात असें ऐकतांच गुलाम कादर फौजेसुद्धां दिल्लीचे किल्ल्याखालीं यमुना वाहत आहे, ती उतरून पलीकडे गेला. हें ऐकतांच त्याच वेळीं फौजा घेऊन जिवबा दादा व जगोबा बापू, आणखी सरदार व शिलेदार वगैरे फौज दरोबस्त घेऊन

१. या उमरावांचीं पारपत्यें सन १७८४।८५ सालीं पहिल्यानें केलीं होतीं. पहा पत्रें नंबर २२।४०६ व ग्रांट डफची बखर पृ. २९९. २. पेशव्यांची बखर व होळकरांची कैफियत वगैरे ग्रंथ पहा.

जिवबा दादा ग्वाल्हेरीहून निघून हिंदुस्थानांत जाऊन आग्र्याचे किल्ल्यांत अम्मल करून मथुरेवर जाऊन मुक्काम केला. पुढें हिंदुस्थानांत मोहीम करून तीन वर्षे एकसारखीं त्या उमराव लोकांसीं लढाई करून त्यांजला जर्जर केलें. कितीक पातशाई हरामखोर यांस धरून आणून कैद करून आग्र्याचे किल्ल्यांत बंदींत घातलें. गुलाम कादर याबराबर तीन महिने लढाई जाहली. मेरटी ह्मणून माहाल मोठा आहे. सध्या त्या जागीं इंग्रज लोकांची छावणी आहे. त्या मेरटीवर घेरा घालून फौजेचा पराभव करून मेरटेवर गुलाम कादर यास धरून मथुरेचे छावणीस जिवबा दादानें आणिला. असे प्रतापी जिवबा दादा ? त्यांची वर्णना कोठवर जाणवावी? पुढें आणखी मोठमोठें यश केल्याचें पुढें किंचित् जाणवितों. गुलाम कादर, पातशाई हरामखोर, यास धरून आणला, ज्याणें पातशहाची अमर्यादा करून जबरीनें डोळे काढले, त्याजला धरून आणून त्याचें तोंड काळें करून नाक कापलें, आणि सात पाट काढून उंटावर बांधून मथुरेस लष्कराचे भोंवतीं फिरवून नंतर हातपाय काढले. डोळे काढून मोठे विपत्तेनें माथ्यावर मेकसूं घालून लष्करचे पुढें मारून हलालखोराकडून ओढवून ढोरासारखा टाकविला.

त्या वेळीं जिवबा दादा यांचे कनिष्ठ बंधु, त्यांचें नांव जगन्नाथ राम, त्याजला जगोबा बापू असें नांव; शूर पराक्रमी असे कीं, बहादरीचें वर्णन काय जाणवूं? जगज्ज्ञात लौकिक, अद्यापि लोक वर्णन करितात; त्याणें त्या प्रसंगीं युद्धांत मोठेच बहादरीनें लढाई फत्ते केल्या. एक जागीं असें नाहीं; अनेक संग्राम बहादरीनें केले.

त्याबराबर लक्षुमण अनंत नायब, त्यांस लखबा दादा असें नांव, ते बुद्धिवान् आणि धैर्यवान् असून लौकिकांत जाहिर. पुढें मथुरेवर छावणींत महादजी शिंदे होते. जिवबा दादांनीं पत्यालेपर्यंत सीकांच्या मुलखांत अम्मल करून खंडणी सालदरमाल घेऊन आपआपले सरंजामानिशीं स्वार आणि पायदळ घेऊन चाकरींत तैनातीस स्वारीबराबर हजर करून घेतले, व हरिद्वारपर्यंत अम्मल दाखल केला, आणि मथुरेचे छावणीस येऊन महादजी शिंदे यांस घेऊन दिल्लीस हुजूर पातशहाचे भेटीस आणलें. तेव्हां हिंदुस्थानांतील अमीर उमराव नबाब जे पातशहाचे चाकरी पुस्तैनी असून ज्यांगीं हरामखोरी केली त्यांचें पारिपत्य करून पातशाही हुकूम सर्वत्रीं हिंदुस्थानांत बहाल करून सलतनेंत कायम केला. यावरून पातशहा मेहरबान होऊन शिंदे सरकार यांस काय द्यावें; जिवबा दादांनीं मोठे पराक्रम करून, हरामखोरास शासन करून तक्ताचा प्रताप कायम केला. जगोबा बापूनेंही त्या प्रसंगीं लढाईत शूरत्वानें मोठमोठे बहादरीनें कामें केलीं, असें जाणून अशीं अशीं कामें करून हुकूम जागविला. आतां यांस देऊं तितकें थोडें. असे रीतीनें एकनिष्ठपणें चाकरी केली, याकरितां वजारत आणि फरजंदगी माहिमरातब किताब दिली. त्यांत कारण पातशाई अम्मल लाहोर, कलकत्ता, रामेश्वर, जगन्नाथजीपर्यंत मुळचे हिंदुस्थानचे पातशाहाचे अम्मल हैदराबाद, गुजराथ, कर्नाटक एथवर साडेबावीस सुभे, त्यांत साडेसहा सुभे दक्षण व सोळा सुभे हिंदुस्थानांत; त्यांत पातशाई वजिरात मुख्य जो अधिकार सर्वांवर तो मरातब आणि फर्जंद आपले शहाजादे मूल पोटचे असतात, जे तक्ताचे अधिकारी त्यांसच पातशाईत 'फर्जंद' असें ह्मणतात, तो किताब अलिजा बहादूर असे प्रकारें एथून जहाला. मरामत यारबफादार सीपेसाकर रुस्तमे हिंद महादजी शिंदे फर्जंद अर्जमद महादजी शिंदे अलिजा

---

१. पद्दा पत्रें नंबर ४१।३८. २. पद्दा पत्र नंबर ४१. ३. जगन्नाथ राम ऊर्फ जगोबा बापू यांजविषयींची माहिती भोंसल्यांची बखर, महादजीचें चरित्र, सरंजामेकृत शिंद्यांचे घराण्याचा इतिहास, वगैरे ग्रंथांत व पत्रें नंबर ३४।३९।४९।२६९।२७५।२८८।३६४।३६८ यांत आहे, ती पाहावी. ४. पद्दा हरिद्वार मुक्कामचें पत्र नंबर ४९.

बहादूर मुजफरजंग असे प्रकारें मरातबीची मरामत किताब शहाअलम बादशहा गाजीनें दिली. आतां पातशहाचे दरबारांत वजीर तक्ताजवळ उभे राहतात, बाकी राजे रजवाड्यांत बावन्न राजांत राजाधिराज असा जोधपूरचा राजा मारवाड देश, त्याची उभे राहण्याची मिसल उजवी आणि जयपूरवाले राजाची मिसल डावी बाजू. आपआपले जागेवर खांबास लागून हात जोडून दरबारास उभे राहतात. त्याखालीं वरकड आपआपले जागेवर खांबास लागून हात जोडून उभे राहतात. शहाजादे कदेलावर तख्ताचे बाजूस बसतात, अशी रीत. महादजी शिंदे अलिजाबहादर हे पायानें लंगडे, पायास जखम लागली त्यामुळें, त्यांस फर्जंदगी देऊन पायांजवळ उभें राहवेना ह्मणाल्यामुळें उभें राहावेना जाणोन तक्तावरून पाय खालीं सोडून फर्जंदगीचे योगानें पायांजवळ बैठक दिली. ही पातशाईंत कोणासच मागें पातशहा पूर्वीपासून जहाले परंतु बैठक असी कोणासच नाहीं, ती अलिजाबहादर यांस मिळाली. हैदराबादेवाले नबाब व लखनौवाले नबाब वजीर जे जाहाले त्यांस व जोतपूर, जयपूर, वगैरे राजे यांस कोणासच बैठक नाहीं. सर्वत्रांनीं उभें हात जोडून असावें असा प्रकार. परंतु जिवबा दादांचे पराक्रमानें पातशहा मेहरबान होऊन साडेबावीस सुभ्यांत सर्वांवर ज्यास्त मरातब वजिरातीचा दिला आणि एक हुकूम हिंदुस्थानापासून दक्षणपर्यंत केला.

दक्षणेंत हैदराबादवाले निजाम अल्लीखान नबाब मोगलाईतील, यांणीं नाना फडणीस, श्रीमंत सवाई माधवराव साहेब पेशवे याचे कारकीर्दीत मुकत्यार, पेशवाईत राज्यकारभार करीत होते, तेव्हां मोगल चवथाईचा ऐवज श्रीमंताकड देत असावा तो तीन सालां ऐवज पांसष्ट लाख रुपयेप्रमाणें दिला नाहीं; आणि फौजबंदी करून लढाईस चाढून आला. तेव्हां हिंदुस्थानांत जिवबा दादा होते तेथें जरूरीनें सांडणी स्वार श्रीमंतांचीं जरूर येणेबद्दल पत्रें घेऊन आला कीं, "मागले रुपयेच्या हरमचा ऐवज मोगलानें न दिला आणि जबरीनें बोलला जे, 'लढाई करून घ्यावा,' ह्मणोन गर्वेंकरून सर्व एकंदर फौज घेऊन चढाई करून आला."

हिंदुस्थानांत मारवाडवाले राठोड मिळवून सर्व मारवाड जोतपूरवाले वगैरे साठ सत्तर हजार स्वार मरणावर उदार होऊन समरंगणास मेरटेवर आले. त्यांत पांच हजार केसरी पोषाख करून नामी नामी ठाकूर सरदार लोक मरणास उभे रहातात, ते केसरी रंग करून लढाईस येतात; ते यश आल्यास घरीं जातात, न जाहल्यास तरवार करून मरतात; पाठीं फिरत नाहीं; अशी त्या रजपुतांची रीत. तेव्हां लढाईत जिवबा दादा बरावर जगोबा बापू व लखबा दादा सर्वत्र होते, दोन कंपूंचे तोफखाने लागले होते. तेथें लढाइ सुरू होतांच मेले ते मेले, बाकी तोफांवर येऊन तरवार केली. बहुत भारती लढाईसारिखे मुडद्यांवर मुडदे पडले. नंतर मेरटेवर अकराशें बाकी राहिले, ते दुसरे दिवशीं समरंगणीं एकएकानें तरवार करून रणांत पडले, बाकी फौज हारून पळाली. जिवबा दादानें मोठे प्रतापेंकरून ती लढाई मारून फत्ते केली.

जगोबा बापूनें अजमीरची लढाई करून किल्ला घेतला आणि त्या लढाईत सामील होऊन जिवबा दादाजवळ लढाईत मदतीस जाऊन संग्रामाचे प्रसंगीं काम केलें. आणि लढाई मारून

---

१. पहा पत्रें नंबर ४३।९५।९९. २. निजाम. ३. या हुकमाचे मालक महादजी शिंदेच झाल्यामुळें हिंदुस्थानापासून दक्षणपर्यंत एक हुकूम त्यांचाच झाला होता. पेशव्यांचे दरबारीं सुद्धां त्यांचे विचाराशिवाय कांहीं होत नसे. यास कारण जिवबा दादाच होते. ४. खर्ड्यांचे स्वारीची बखर, पोवाड्यांचें पुस्तक पृ० १७२ व पत्र नंबर १३९. ५. परिशिष्टांतर्गत कैफियत पहा. ६. पत्रें नंबर ५२।५४।८३ पहा. ७. पत्रें नंबर ५६।५८ पहा.

मारवाडचा मामला घेऊन जिवबा दादा पुष्कर तीर्थावर येऊन दोन लक्ष रुपया धर्म केला.[1] ब्राह्मणांस वैष्णव अतीत बैरागी भिक्षुक लोकांस दिला. आणि त्या सालीं महर्गतां झाली होती,[2] अन्न न मिळे, त्या प्रसंगीं अन्नदान आले मनुष्यास देऊन संरक्षणा केली. इतक्यांत श्रीमंत पेशवे यांचीं पत्रें जरूरीनें आलीं कीं, 'मोगल लढाईस वाढून येत आहे.' नागपूरवाले भोंसले, व गाईकवाड व शिंदे यांची फौज होती व होळकर आपली फौज घेऊन येत होते. त्याशिवाय श्रीमंतांची खास हुजरात फौज साठ हजार, त्या बाहेर सरदार शिलेदार ऐशा फौजा एकत्र जाहल्या होत्या. परंतु श्रीमंत जिवबा दादा येतील तेव्हां लढाई करूं ह्मणून वाट पहात होते. तंव हिंदुस्थानांत सर्व सुभेवरशी सरकारांतून पातशहानें साहेब नौबत चौघडा व किताब मरामत राव महाजमन्मुलख मुंजाफर दौल राजे जगन्नाथ राम बहादर दिलावरजंग असी मरामत देऊन साहेब सुभ्याचा मरातब दिला होता. तेव्हां जिवबा दादासही मरामत मोठीच, बक्षीबहादर मुंजाफर दौल जिवाजी बल्लाळ बहादर फतेजंग असी होती. तेव्हां हिंदुस्थानाच्या सर्व सुभ्यांवर मालक जगोबा बापू व नायब सुभे लक्षुमण अनंत, लखबा दादा, त्याजलाही समशेरजंग बहादर असा किताब मरामत पातशाई होती. जिवबा दादा उभयतांस हिंदुस्थानांत ठेवून एक कंपू आणि चाळीस हजार फौज सडी घेऊन पुण्यास दरकूच येऊन पोंहचले, तेव्हां श्रीमंतांस आनंद जाहला. तेव्हां पांच कोश श्रीमंतांचे स्वारीबराबर अमीर, उमराव, सरदार, नाना फडणीस, हरीपंत फडके, विंचूरकर, पुरंधरे वगैरे स्वारीबराबर घेऊन सरंजामाची तयारी करून कंपूंचीं पलटणें दरेस करून दोहीं बाजूनें सलामीस लैना बांधून तोफखाने दोहींकडून सलामीस उभे करून स्वारसरंजामाचे पर बांधून तीन कोशपर्यंत दोहींकडून फौजांच्या लैना उभ्या करून स्वारी पेशरवाईस सामोरी येती[3] असें ऐकून जिवबा दादा आपण शंभर मानकरी बराबर स्वार घेऊन पुण्याहून श्रीमंतांची स्वारी निघाली इतक्यांत येऊन भेटले. असे ते निरभिमानी पुरुष ! त्यांस पाहतांच श्रीमंत सवाई माधवराव साहेब पेशवे भेटले. नाना फडणीस त्या वेळीं जिवबा दादासीं काय बोलतात? "श्रीमंतांची स्वारी सामोरा पेशरवाई करून तुह्मांस आणावयाकरितां सन्मान करून यामुळें स्वारी निघाली आणि तुह्मीच आलां हें काय?" त्यावरून जिवबा दादा बोलतात कीं, "आपले ताबेदारास सन्मान मालकानें दिला तो सन्मान मालकाचाच आहे, परंतु मी याकरितां आलों कीं आह्मांबरोबर सरदार मानकरी लोक आहेत, त्यांणीं हिंदुस्थानांत राज्य सर केलें त्या प्रसंगीं मोठ्या मोठ्या भारती लढाया झाल्या; त्यांत त्या लोकांनीं तरवारा मारून कितीएक मेले, कितीएक जखमी होऊन वांचले. असीं बहादरी कामें केलीं. आणि पुढें मोगलांचे लढाईकरितां सरकारांनीं बोलविलें. त्यापेक्षां श्रीमंतांची स्वारी नेऊन ते लोक सरकारास दाखवावे. जंगी ह्मणजे त्या लोकांचा सरकारांनीं सन्मान केला आणि त्यांणीं श्रीमंतास पाहिलें, हाच गौरव मालकाचा. याकरितां मी स्वारीबराबर असून फौजांची रचना दाखवावी, हा गौरव आह्मांसच आहे." मग स्वारी नेऊन सर्व फौज पाहिली. सलामी जाहल्या पाहून सर्वांस आनंद वाटला. श्रीमंतांची मर्जी प्रसन्न जाहली. शिंदे यांची छावणी वानवडीवर फौज पडली होती; तेथेंच जिवबा दादांनीं फौजेचा मुकाम केला.

दुसरे दिवशीं नागपूरवाले भोंसले व गायकवाड, होळकर, पोवार, रास्ते, पुरंधरे, विंचूरकर, पटव-

१. पहा महादजीचें चरित्र पृ० २३७. २. या वर्षी महागाई होती. पहा पत्र नंबर ५६. ३. जिवबा दादा येत असतां पेशवे त्यांस आणावयास पुढें गेले होते. खर्ड्यांचे स्वारीची बखर पृ० ८.

र्धन वगैरे[१] सर्व साहेबींस नाना फडणीस यानें सांगून पाठविलें. "उद्यां श्रीमंत दरबार करणार. त्यास सर्वत्रांनीं सकाळच्या सहा घटकांपूर्वीं दरबारास यावें. शिंदे यास, जिवबा दादास दरबारास बोलविलें आहे. तेव्हां सर्वत्राचे सल्लयानें मोहीम करून मोगलावर जाण्याचा ठराव करणार. मोहिमेची ढाल उभी करून बाहेर डेरे लागले आहेत. श्रीमंतांचें त्यांत दरबार होणार. तेथें सर्व सरदार मानकरी यांणीं यावें." त्याप्रमाणें दुसरे दिवशीं हाली मोहाली नामांकित सर्वत्र आले. दौलतराव शिंदे अलिजा बहादर यास घेऊन जिवबा दादा दरबारास आले. सर्व दरबारास आले असें कळतांच नाना फडणीस श्रीमंत सवाई माधवराव साहेबांस स्वारी घेऊन आले. अनुक्रमें सर्वत्रांचे मुजरे जाहले, इतक्यांत विड्याचीं तबकें भरून पुढें आणून ठेविलीं आणि नाना फडणीस यांणीं सर्वत्रांस सांगितलें कीं, "श्रीमंत ह्मणतात कीं मोगल निजाम अलिखा नबाबाच्या हरमचा पैसा तीन वर्षांचा त्याकडे येणें तो न दिला, आणि सांगून पाठविलें कीं, 'लढाई करून घ्यावा. तुमच्यांत सामर्थ्य असल्यास लढून घ्यावे; नसल्यास आह्मी देत होतों त्याप्रमाणें आह्मांस खंडणी द्यावी,' असे तऱ्हेनें आपली कुली फौज व सरदार लोकांच्या मुलखांत होत्या त्या सर्वत्र एकत्र करून सर्व सरंजामानिसी दरकूच जबरीनें वाढून येत आहे. त्यापेक्षां कसें करावें ? जर तुह्मांस येविशीं आपण त्यासीं लढाई करून त्याकडून घेत आलों त्याप्रमाणें घेण्यास सिद्ध आहांत, असें असल्यास विडे[२] घेऊन तयारी करून निघावें, आणि तें सामर्थ्य नसल्यास तसें बोलावें. तुह्मी फौजबंद सरदार सर्वत्र आहांत." त्यावरून कोणींच जबाब दिला नाहीं. तेव्हां जिवबा दादास विचारिलें कीं, "हे कोणी बोलत नाहींत. तुह्मीं हिंदुस्थान कैबीज करून मोठमोठ्या लढाया बहुत मारल्या. तेव्हां तुह्मी काय सांगतां तें कळावें. सर्वत्राचे पराक्रम हीन झाले असें समजल्यास आजपर्यंत पुरातनपासून श्रीमंत घेत गेले ते आज मोगलास याणीं खंडणी उलटी आपले मुलखापैकीं द्यावी असा प्रकार आला."[३] त्यावर जिवबा दादा बोलले कीं, "आजवर जिवादारभ्य सरकारसेवा स्वयें परिश्रमें केली.[४] सिद्ध जाहली. हा सरकारचा प्रताप. आतां शेवटची वेळा, आणि सरकारांनीं हिंदुस्थानांतून या लढाईस्तव बोलाविल्यानें आलों. आणि सरकार संनिध आणि आजवर केल्याचें समक्ष मालकांनीं पाहिल्यानें सार्थक. त्याकरितां आज्ञेप्रमाणें लढाईस आह्मी जाणारच. परंतु सर्वत्र सरदारमंडळी आपआपले सैन्याचे अधिकारी आहेत, त्यांत आह्मींच बोलावें असें नाहीं. सर्वांनीं एकदिल असून संस्थानाचा लौकिक राखावा यांतच सर्वांचें भूषण. याजकरितां आह्मी प्रथम बोललों नाहीं. आह्मांस आज्ञा होतांच सिद्ध आहोंत," असें बोलले. पुन्हा नाना फडणीसांनीं इतरांस विचारिलें, "शिंदे यांजकडील बेत जाहला. आतां सर्वत्र काय सांगतात ?" त्यावरही कोणीं जाब न दिला. एकमेकांकडे पाहत राहिले. चार घटका जाहल्या, परंतु कोणीच जाब बोलेनात. तेव्हां नाना फडणीस बोलले, "दोन प्रहर होत आला. श्रीमंतांची स्वारी भोजनास जा-

१. या लढाईत कोण कोण सरदार होते, याबद्दलचें सर्व वर्णन पोवाड्यांचें पुस्तक पृष्ठ १४२ ते १४९ यांत आहे. २. हिंमतीचें काम असलें, ह्मणजे हिंदुराजे पूर्वीं विडे मांडित असत. आणि ते विडे जो उचलून लढाईस पुढें सरेल, तोच त्या सैन्याचा पुढारी असें समजत. ३. हा दरबार भरला होता, हें आक्वर्थकृत पोवाड्यांचें पुस्तक पृष्ठ १७२ व खर्ड्यांचे स्वारीची बखर पृष्ठ ९, यांजवरून दिसून येईल. ४. हिंदुस्थानांतील लढायांत आणि दक्षिणेंतील लढायांत पुष्कळ फरक होता. हिंदुस्थानांतील लोक फार हुशार, शूर व मुत्सद्दी होते. त्यांपुढें साधारण मनुष्य टिकत नसे. हिंदुस्थानांत जिवबा दादांमच यश मिळालें होतें.

ण्यास विलंब करून अद्यापि बसले आहेत, आणि जाब बोलत नाहींत, त्यापेक्षां लढाई करण्याचें सामर्थ्य कोणांतच नाहीं असें दिसून आलें." असें नाना बोलले. तत्रापि जाब न दिला. तेव्हां श्रीमंतांनीं जिवबा दादांकडे पाहून नानास खुणावल्यावरून जिवबा दादांस ह्मणूं लागले, "सर्वत्रांचे प्रकार दिसून आहेत. आतां श्रीमंतांचें लक्ष तुह्मांकडे आहे. त्यापेक्षां आतां यांतील तुह्मांकडील निश्चय समजावा ह्मणजे श्रीमंत भोजनास जातील." त्यावरून जिवबा दादा बोलिले, "फार उत्तम. आह्मी प्रथमच बोललों आहोंत. ह्या फौजा घेऊन यांचे मदतगारीनें लढाई करण्याची अपेक्षा करून आलों नाहीं, ह्या फौजा श्रीमंतांचे स्वारीबराबर शोभेस असूं द्याव्या. समरांगणास मोगलावर पुढें आह्मीच जातों," ह्मणून बोलले. आणि दौलतराव शिंदे अलिजा बहादर यांजला जिवबा दादा बोलले, "बाबासाहेब, विडा तबकांतून उचलून घ्यावा," असें बोलून आपले हातानें पांच विडे घेऊन दौलतराव अलिजाचे हातीं दिले. आणि तबक उचलून विडे शालजोडींत घेऊन कारकुनाचे हातीं दिले, आणि "आतां निरोप घेतों. आज्ञा द्यावी," असें ह्मणून त्या वेळीं निरोप घेऊन उठले. तेव्हां ताजीमेस श्रीमंत उभे राहिले. तेव्हां सर्व सरदार उठून निरोप घेऊन आपआपले मिसलीवर गेले. जिवबा दादा हे आपले फौजेंत गेले. जाऊन बराबर आली ती फौज, कंपू, पलटणें, जिनसी तोफखाना व खानवडीस छावणींत तोफखाना, कंपू, पलटणें, स्वारांच्या फौजा होत्या त्यांपैकीं दहा हजार स्वार व पलटणें दौलतराव शिंदे अलिजाबहादर यांचें चवदा वर्षांचें लहान वय होतें ह्मणून त्यांस श्रीमंतांचे स्वारीबराबर मागें ठेवून बाकी आपली छावणींतील कुली सडी फौज करून कूच करून मोगल चालून येत होता, तेथें जाऊन लढाई खरड्यावर केली. मागें साठ कोश श्रीमंत व दौलतराव शिंदे वगैरे सरदार फौजा मुकाम करून होते.

प्रथम रोजीं जिवबा दादांस न कळवितां हुजरात घेऊन परशराम भाऊ मिरजकर व हुजरातीचे सरदार मिळून गेले कीं, "शिंदे, जिवबा दादा, हेच लढाई करणार! आपला पुरुषार्थ कार्य? स्वतैव आपण लढाई यास सोडून करावी." ह्मणून जिवबा दादा आपले फौजेंत लढाईच्या तोंडावर होते. सकाळीं संग्राम करण्याचा बेत करून होते. हे परभारें हुजरात लढाईस गेले, हें जिवबा दादांस माहीत नाहीं. इतक्यांत मोगलाकडील सरदार राव रंभा निंबाळकर, सरदार थोर, सत्तर हजार फौज त्याची घेऊन पुढें तो उभा असतां हुजरात गेली. त्यांची व राव रंभा निंबाळकर याची लढाई जाहाली. त्याणीं हुजरात मारून पळविली. तीन कोशपर्यंत पाठून मारीत त्याची फौज आली. तें वर्तमान सांडणीस्वारानें जिवबा दादांस दाखल केलें. तेव्हां हे बसले तेथून फौज पळती आणि ते मागें मारीत चालले आहेत हें पाहून तेच वेळां आडव्या तोफा लावून एकसारखी तोफांचे गोळे पडूं लागले त्या योगानें मागली अडचण मिटून राहिले ते वांचून आले. परशराम भाऊ

१. शिंदेशाहीचे आरंभापासून पेशवाईचे अखेरीपर्यंतचा इतिहास पाहिला, तर शिंदे घराण्याकडून मराठी राज्याचें ह्मणजे पेशवाईचें वगैरे काम जसें झालें, तसें इतर कोणाकडूनही झालें नाहीं, असें दिसून येईल. २. जिवबा दादांचा मान मोठा होता. जसे ते दिल्ली दरबारांत व रजपुतांचे वगैरे दरबारींही मान्य होते, तसाच शिंदे व पेशवे यांजकडून त्यांस मान मिळत असे. हा केवळ त्यांचे गुणाचाच प्रभाव होय. ३. विडे उचलण्याचे वेळीं हें बोलणें कोठें गेलें होतें? ४. हे न सांगतां गेले होते. पहा पत्र नं. ४२५ व पोवाड्यांचें पुस्तक पृष्ठ१७३. हे न सांगतां जिवबा दादांचे पूर्वीं गेल्यामुळें त्यांस वाईट वाटलें. "चुरस लागली शिंद्याला" असें पोवाड्यांत वर्णन केलें आहे. ५. पहा पोवाड्यांचें पुस्तक पृष्ठ १७४. याच प्रसंगीं बाबा फडके जरीपटका निशाण टाकून पळाला होता. ग्रांट डफची बखर, पेशव्यांची बखर, वगैरे ग्रंथ पहा.

मिरजकर जखमी जाहले. त्यांचा पुतण्या लढाईंत पडला. आणखी सरदार पडले. कितीक जखमी, बहूत नासाडी जाहली. मोगलांचे फौजेंत हत्तीवरून शहाजाद्यानें फत्ते केल्याचीं वाद्यें वाजूं लागलीं आणि हत्तीवरून साखरा नबाबाचे फौजेंत वांटल्या. "श्रीमंतांचे फौजेंत मुख्य काय ती हुजुरात, ती मारून पळविली. बाकी फौजांचा लेखा तो काय?" हें त्यांनीं मानलें.

दुसरे दिवशीं त्या रात्रीं मागील सकाळचे सहा घटका रात्र राहतां तोफा पलटणें जागजागीं नदीच्या अलीकडे नाके बांधून लाविल्या आणि त्यामागें स्वारांच्या फौजा उभ्या केल्या. आणि आपण लंबरवार खासे मानकरी शिलेदार पागा असी चाळीस हजार फौज घेऊन समोर उभे लढाईस राहिले. इतक्यांत हुजरात मारून पळविली आणि कितीक लोक मारले गेले. श्रीमंतांच्या राज्यांत मोठी इज्नत हुजुरातची, ती फौज त्यांणीं टरूं न दिली. त्यांचे उपाय उठले, त्यापेक्षां बाकी फौजांकडून लढाई कशी पल्लयास लागेल? जिवबा दादांस पुसावयाकरितां गोविंदराव काळे याजला पाटविलें. त्या वेळीं प्रहर रात्र राहिली होती. जिवबा दादा लढाइच्या फौजा उभ्या करीत होते. इतक्यांत काळे आले आणि नानानें निरोप असे तऱ्हेनें सांगितला आहे कीं, "हुजुरात श्रीमंतांच्या राज्यांत मारती तरवार भरंवशाची. त्याचा असा प्रकार झाला. पुढें मोगल नदी उतरून खर्ड्याचे अलीकडे आल्यास मग पुण्यास पोंहचतां कठीण पडेल. त्यास कसें करावें तें विचारून यावें." तेव्हां जिवबा दादा बोलले, "नाना राज्यकर्ते; परंतु त्यांस लढाइच्या प्रकाराचे नेम माहीत नाहींत आणि हुजरातीचा भरंवसा तो काय? भरंवसा ईश्वराचा. नानास सांगावें, आपण बेफिकीर असावें. मोगल नदी उतरेल ते वेळीं एक तर आह्मी नाहीं किंवा मोगल नाहीं. दोहोंतून एक होईल. आतां जास्त कांहीं सांगत नाहीं. हींच अक्षरें सांगावीं," ह्याप्रमाणें सांगून विदा केलें. आणि मागील तीन घटका रात्र राहतां अरुणोदयापूर्वीं तोफखाने सुरु झाले ते दोन प्रहरचे पूर्वीं नदी जाऊन घेतली. नबाबाचे फौजेंत पाणी नाहीं. एक रुपयानें एक कटोरा पाणी न मिळे[3]. नदी घेतल्यावर मोहरेनें कटोराभर पाणी झालें. तेंही न मिळे. इतक्यांत पंचवीस हजार फौज व पेंढारी यांणीं फौजेंत पाठीमागून हल्ला केला. इकडून जिवबा दादानें फौज धाढवून लढाईंत पळविलें. आणि चहूंकडून नाइलाज झाला आणि तोफखान्याचे गोळ्यानें जर्जर फौज केली. तेव्हां नबाब निजाम अलीखा सर्व जनानखाना बरोबर होता त्यासुद्धां पळून खर्ड्याचे किल्ल्यांत जाऊन दरवाजे लावून राहिले. जिवबा दादानें प्रतापेंकरून युद्धसंग्राम करून मोगलाची लढाई मारली, आणि नदी उतरून खर्ड्यांत गेले ते नबाबास किल्ल्यांत घेरून चहूंकडून तोफा लाविल्या. किल्ल्यांत पाणी नाहीं. माणसें पाण्यावांचून मरूं लागलीं. तेव्हां नबाबांनीं जिवबा दादास सांगून

१. या दिवशीं मोगलांच्या फौजेनें मोठा आनंद केला; व नबाबानें नजरा घेतल्या. ग्रांट डफची बखर पृ० ३३२ पहा. २. नाना फडणिसांनीं हें जें सांगून पाठविलें होतें, तें हुजुरातीचा त्यांस दम होता ह्मणून. परंतु 'श्रीमंतांच्या राज्यांत हुजुरात मारती तरवार,' तर विडे उचलण्याचे वेळीं ती कोठें गेली होती? व त्या वेळीं नुसती हिंमत दाखविणें सुद्धां कोणास झालें नाहीं, हें काय? इतकेंच नव्हे, तर न सांगतां गेलेली हुजरातीची फौज शत्रूंनीं मारून पळविली, तरीही नानांचा संशय गेला नाहीं. यावरून नानांचें वागणें शिंदे दरबाराशीं कसें होतें, याचा विचार वाचकांनींच करावा. याविषयींचा थोडासा खुलासा विंचूरकर घराण्याचा इतिहास पृ० १२२।१२३ यांत पहावयास मिळेल. ३. "शेरभर पाणी रुपयाचें जाहलें." खर्ड्याचे स्वारीची बखर पृ. ३७. ४. "जिवबादादा शिंद्यांकडील त्यांनीं तोफांचे कडे घालून वेढा घातला." खर्ड्याचे स्वारीची बखर पृ. ३७, विंचूरकर घराण्याचा इतिहास पृ. १२३, इ. इ. इ.

पाठविलें, "जसा तुमचे बहादरीचा लौकिक ऐकत होतों, त्यापेक्षां सहस्र विस्वे जास्त डोळ्यानें पाहिला. शूरत्वाची हद्द झाली. आह्मी हरलों. आतां आह्मांस जिवदान द्यावें." देण्याकरितां शिका कटार पाठवून दिली कीं, "पांसष्ट लक्ष रुपयांचा मुलूख घ्यावा आणि दौलताबादचा किल्ला आणि तीन सालांचा पांसष्ट लाख प्रमाणें रुपया व लढाईबद्दल फौजखर्च झाला तो घ्यावा आणि आह्मांस हैदराबादेस जाऊं द्यावें." त्यावरून त्या वेळीं नबाबावर बहुत जिवबा दादानें उपकार केले. पाणी वगैरे सर्व पाठवून रसद आधीं करून दिली. आणि तोफ बंद करविली. काबूंत करून किल्ल्याचा घेरा ठेविला, आणि श्रीमंतांस खबर पाठविली. तें ऐकून श्रीमंतांस आनंद जाहला. नाना फडणीस याणीं बहुत खुषी मानून सांगितलें कीं, "जिवबा दादास भारती वीराची उपमा साधती. ज्याणें मुखांतून वचन काढिलें त्याच्या सहस्रगुणी ज्यास्त करून दाखविलें आणि हिंदुधर्म राखला." श्रीमंतांचा लेख आला आणि नानांनीं लिहिलें कीं, "नबाब मषरूल मुलुख त्याचा कामदार आहे, त्यास वोलींत आणून घ्यावा आणि नबाबास सर्व सलतनानिसीं किल्ल्यांतून मोकळा करून रवाना करावा," त्यावरून पांसष्ट लक्षांचा मुलूख आणि दौलताबादचा किल्ला आणि सर्व रुपये वगैरे कलमाचे भरपाय करण्यास मषरूल मुलूख नबाब यास वोलींत आणून घेतला. आणि नबाब निजाम अलीखा यास मोकळें करून रवाना केलें. त्यास पाठीं भय होतें, "जर हातीं सांपडलों तर अपाय न जाणो" हा संदेह होता. "श्रीमंतांचें लिहिणें येतांच सांगोन पाठवावें नलगे. परंतु फिरून कशी मसलत होऊन दुसरें लिहिणें येईल नकळे, त्यापेक्षां आपण जलदी करून जावें. कोणतेविसीं काळजी न करावी. सर्व कारखाना राहील तो थेट पोंहचेल. त्याविसीं काळजी करूं नये." नबाबाची फार सरबरा ठेविली आणि जरा भरंवसा सुद्धां गैरवाजवी न जाऊं दिला. आणि नबाबास रवाना करून दोन रोज मुकाम केला. त्यावर नबाब वीस पंचवीस कोश गेले पाहून मग मश्रुन्मुलूख यास वोलींत घेतला. त्यास बराबर घेऊन आले, तेव्हां श्रीमंतानीं लढाई जिवबा दादांनीं मारून फत्ते झाली आणि नबाब अंकीत करून वांचवून त्याजवर कृतोपकार करून सन्मान करून त्याचे लौकिकाप्रमाणें आदर करून आले, त्याचप्रमाणें लूट वगैरे तीळभर काबूंत केले उपरांत बिघडूं न देतां गौरव करून पाठविलें, हें ऐकून बहुत खुषी केली. लक्षावधि रुपये धर्म केला. इनामें खबर घेऊन आलेल्यांस दिलीं.

इतकें जाहल्यावर जिवबा दादा मोगलाची लढाई मारून फत्ते करून आले, तेव्हां बराबरच्या फौजांचे भार थाटानिसीं आले. फौजा पलटणें जंगी बराबर होतींच. श्रीमंत सवाई माधवराव साहेब, नाना फडणीस व सर्व सरदार आपआपले सरंजामानिसीं स्वारी बराबर घेऊन पुण्याहून पांच कोश पेशरवाईस सामोरा जिवबा दादास मोठ्या सन्मानानें घेऊन आले, व त्यांच्या सरंजामाची शोभा पाहून आनंद पावले. अति उल्हास होऊन गळ्यास मिठी मारून जिवबा दादास भेटले, आणि बोलले कीं,

---

१. पहा पोवाड्यांचें पुस्तक पृ. १५८. त्या ठिकाणीं "जिवबादादा एक वीर भारती," असें ह्मटलेलें आहे. २. पांसष्ट लक्षांचा मुलूख दिला आणि बाकी सर्व करार अमलांत आणिले. पोवाड्यांचें पुस्तक पृ. १६१ व पत्र नंबर १५६ पहा. ३. या वेळीं मशीर उल्मुलुकाचे जिवास धक्का लागणार नाहीं, ह्मणून जिवबा दादांनीं नबाबास सांगितलें, व त्याविषयींचा जिमा घेतला. पुढें या उपकारासाठीं नबाब साहेब दादांचा मुलगा नारायणराव बक्षी यांजवर प्रीति करीत असत. पहा पत्र नं. ३२१. ४. याविषयींचें वर्णन पेशव्यांचे बखरींतून केलेलें आहे, तें पाहावें.

"तुह्मीं आपले स्वपराक्रमें बहादरी करून मोगलाचा पराभव करून अंकित करून सोडलेंत, स्वधर्म राखून पेशवाईचा लौकिक राखलात आणि यशाची ध्वजा उभी केली. सर्वत्रीं जाहिरी होऊन आहे." असें बोलून बरोबर पुण्यांत वाड्यांत येते समयीं जिवबा दादा स्वारीबराबर येत असतां नाना फडणीस बोलले कीं, "सर्वत्र पुण्याचे लोकांचा हेतु आहे कीं, जिवबा दादास पाहावें, ही सर्वत्रांची आर्ता आहे. याकरितां श्रीमंतांची स्वारी पुढें जाती, तुह्मीं हत्तीवर अंबारींत बसून आपले स्वारीनें यावें." त्यावरून जिवबा दादा ह्मणतात, "वरकड मनुष्यें तसेच आह्मी. मालकाची स्वारी पाहिल्यांत सर्वपरी आमची शोभा, आणि सर्व मालकाचे प्रतापानें ईश्वरानें कृपा केली, यांत आमचें वर्णन नको." त्यावरून बोलले कीं, "श्रीमंतांची मर्जी असीच आहे, त्यापेक्षां केलेंच पाहिजे." त्यावरून जिवबा दादा आग्रहामुळें हत्तीवरून आले त्या वेळीं पुण्याचे बाहेरून शहरांत सरकारवाड्यापर्यंत दुरस्ता दोहीं-कडून माणसांची दाटी हवेल्यांवरून खालीं वर माणसांची गर्दी बाजारांतून येते वेळीं सावकार सराफ दुकानदार यांणीं सोन्याचीं[1] फुलें करून हत्तीवर जिवबा दादा येत होते त्यांवर टाकीत श्रीमंतांचे वाड्याचे दरवाजापर्यंत वर्षाव केला. त्याचे पोवाडे[2] अद्याप लोक गातात. जगजाहीर सर्वत्रीं आहे. असे प्रतापी पुण्यात्मा धर्मशील दाता आणि दयावान् उदार बहादर शूरत्वांत असून निरभिमानी, परोपकारी असे जिवबा दादा ज्ञातींत होऊन गेले. असे पुरुष मागें झाले, परंतु यांची उपमा सर्वपर असी कीं, हिंदुस्थानांत क्षेत्रांचे जागेवर मथुरेस देवालय बांधून तीन गांव जहागीर मंदिराचे खर्चास लाऊन दिले. श्रीगंगेचे जागीं रामघाटास मंदिर बांधून गांव लावून दिले आहेत. हरिद्वारास, पुष्करास, काशीस जागा घेऊन ब्राह्मणांस दानपत्रें करून दिलीं आहेत. त्याशिवाय ब्राह्मणांस गांव, कोणास जमिनी, असे कितीएक जागे दिले आहेत[3]. तीं अद्यापवर इंग्रजींतही लोक चालवीत आहेत.

श्रीमंतांनीं मोगलाची लढाई मारून जिवबा दादा आले त्या वेळीं यास इनाम काय द्यावें ह्मणून मुलूख जहागिरी करून देण्यास सनदा तयार केल्या. तेव्हां जिवबा दादा बोलले जे "देणें तें दौलतराव शिंदे यांचे नांवें करून द्यावें, मग आह्मांस पोंचेल. सरकारचे कृपेनें आह्मांस सर्व आहेच." त्यावरून पंधरा लक्षांचे महाल, असिरचा किल्ला, बऱ्हाणपूर व अमदानगर वगैरे जहागिरा दिल्या.

पुढें श्रीमंत सवाई माधवराव साहेब निर्वाण पावले, त्या वेळीं नाना फडणीस आदिकरून दत्तक करणें योजूं लागले. श्रीमंतांनीं मरणसमयीं जिवबा दादांस सांगितलें कीं, "इतकें वचन द्यावें कीं, आमचे वंशांतील या गादीवर बसवावा. दुसऱ्या मुलाचा दत्तक करून नाना बसवील तर बसवूं न द्यावें. याप्रमाणें हातावर हात मारावा." त्यावरून जिवबा दादांनीं सांगितलें कीं, "ही गोष्ट आह्मांस लागली. आज्ञेप्रमाणेंच करूं." असें बोलून आले आणि श्रीमंत सवाई माधवराव साहेब देवलोकवासी झाले. तेव्हां शिंदे सरकारच्या फौजांचे अधिकारी जिवबा दादा त्यांणीं पुण्याचा बंदोबस्त करून

१. सोन्याचीं फुलें टाकिलीं होतीं, असें पेशव्यांची बखर पृ० १५९ यांत लिहिलें आहे. २. आक्वर्थकृत पोवाड्यांचें पुस्तक पृ० १३५ ते १७८ पहा. याशिवाय आणखीही कांहीं पोवाडे प्रसिद्ध आहेत. ३. हीं धर्मकृत्यें उत्तर हिंदुस्थानांत आजवर प्रसिद्ध आहेत. आह्मांस मिळालेलें लेख नंबर ३८२ चें पत्र पहा. ४. पेशवे इनाम देत असतां जिवबा दादांनीं तें घेतलें नाहीं, अशी त्यांची निस्पृहता होती. पत्र नंबर ४०० पहा. ५. ही माहिती ग्रांट डफकृत बखर पृ० ३४१ यांतही आहे.

नाक्यानाक्यावर पलटण स्वार ठेवून मनुष्य इकडील तिकडे जाऊं न दिले[1]. तेरावा दिवस करून जिवबा दादांनीं श्रीमंत बाजीराव साहेब व चिमापा साहेब दोघे वंशांतील होते, त्यांतून बाजीराव साहेब यास आणून गादीवर बसविलें. श्रीमंत पेशव्यांची गादी कायम केली. नानानें बहुत प्रयत्न केले, परंतु त्याची यापुढें मात्रा चालली नाहीं. नंतर वर्षभरानें परलोकनिवासी जाहले. त्यांचे पवाडे सर्वत्रीं हा वेळपर्यंत गर्जून राहिले आहेत. असे प्रतापी पुरुष जिवबा दादा जाहले, ज्याचे दिगंतरीं लौकिक असे पुण्यवान् अंशधारी जाहले.

जगोबा बापू व लखबा दादा यांचे लौकिक असे कीं, जगोबा बापू हे जिवबा दादांचे बंधु, ते विद्यमान असतां दादांचे कारकीर्दींत मोठ्या मोठ्या लढाया बहाद्दरीनें जिंकिल्या; मोठे अतुट किल्ले लढून खालीं केले; नरवर, संबलगडचा किल्ला, अजमीरचा किल्ला, शहाबादचा किल्ला, गोहदचा किल्ला, असे असे बहुत किल्ले सर करून राज्य कबज्यांत करून हिंदुस्थानच्या मुलखांत अंतरवेदच्या मुलखांत अम्मल केला. दादांचे मागून राहिले तंवपर्यंत आमरणांत साठ हजार स्वारांची फौज व दोन कंपू खासंगत असून त्याबाहेर शिंदे सरकारची हुजूर फौज तैनाती वेगळी. हिंदुस्थानांत सर्व सुभे त्यांचे ताबीन. सर्व सुभ्यांवर जे सरदार त्यांवर हुकूम. त्या सरदार लोकांनीं जगोबा बापूच्या हुकुमांखालीं असावें. तेव्हां आग्रा दिल्ली ही तखताची जागा. तो सुभा 'साहेब सुभा' ह्मणवितो. तो पाच्छाई मरामतीनें जगोबा बापूच्या आणि लखबा दादा, जगोबा बापूचे नायब सुभे कामदार, यांच्या अमलांत आला. मागून जयपूरवाले सर्व रजवाडे घेऊन लढाईस सर्वत्र एकत्र होऊन आले कीं, "खंडणी देऊं नये. दक्षणी अम्मल उठवून आपला पराक्रम करावा" जाणोन जयपूर मारवाडवाले दोन लक्ष फौज व लढाईचे सरंजाम वर्षोगणतीचे दारूगोळा वगैरे करून, जसा जिवबा दादांचे वेळीं मोगल निजाम अलिखा नबाब हैदराबादवाले खर्च्यावर फौज घेऊन वाढून आले, तसे रजवाडे एकत्र होऊन आले. तेव्हां मालपुरा ह्मणून महाल जयपूरच्या अमलांत आहे, तेथवर वाढून आले. तेव्हां लढाई मोठीच जहाली. त्या वेळीं तीन जागे लढाई जहाली. त्या वेळीं एक जागे खुद्द जगोबा बापू, दुसरे जागीं लखबा दादा, तिसरे जागीं आणखी सरदार. असे तऱ्हेनें लढाई होत असतां जागजागे तोफखाने पलटणें लागलीं होतीं. त्यांशिवाय जिनसी ह्मणजे मोठ्या वेगळ्या तोफा लागल्या असून तोफांवर ते चालून आले आणि लखबा दादा लढाईत जर्जर जहाले, आणि मोहरा फिरला. एक तोंडावर जगोबा बापू बसले होते. दोहींकडील फौजेनें दोहींकडून याजवर चाल केली आणि यासमोर जयपूरवाला उभा होता त्यांणीं हिकडील एकजागा होऊन याजवर चाल केली. तोफेचा मार, स्वारामागें गोळा असे

१. पेशव्यांची बखर पृ० १६४ पहा. २. पूर्वीचा राजा वारल्यावर त्याचें प्रेत उठविण्यापूर्वीं गादीस दुसरा मालक ठरवून त्याचे नांवें द्वाही शहरांत पुकारली पाहिजे, अशी हिंदूंचे राज्याच्या मालकीसंबंधीची वहिवाट होती. त्याप्रमाणें जिवबा दादांनीं केलें. हेंच बाजीरावास गादीवर बसविणें होय. ३. दुसरे बाजीरावास गादीवर बसविण्याचें कारण नाना फडणीस शिंद्याचे दरबाराशीं द्वेष करीत होता, हें होय. तसें केल्यानें त्यांची खोड परभारें बाजीरावाकडून मोडेल ह्मणून त्यासच गादीवर बसविला होता, असें कित्येक ह्मणतात. आणि तसेंच झालें. शेवटीं शेवटीं दोघांचें बनत नव्हतेंच. ग्रांट डफकृत मराठ्यांची बखर पहा. ४. जगोबा बापूंची खासगी फौज होती. पहा पत्र नंबर ३७. ५. जिवबा दादांच्या मागून जगोबा बापू सेनापति होते. पहा पत्र नंबर ३५३.

तऱ्हेनें मार केला. परंतु मरत जात होते त्यांकडे न पहातां चाल करून आले. तेव्हां फौजा लांब लांब गोळ्यांच्या बचावानें उभ्या केल्या होत्या, त्यांनीं लढाईची हार दोहोंकडील पाहून आड जाहाले. इतक्यांत पाहातात तर सर्व फौज निघून गेली आणि तोफांवर चालून आले, त्या वेळीं जवळ पांचशें खासे मानकरी नांवलौकिकवाले आपआपले जागे घोड्यांवर बसून उभे होते. जगोबा बापू घोड्यावर बसले आणि सांगितलें कीं, "आतां दुसरा प्रकार कोणताच नाहीं. त्यापेक्षां शूरत्वाचे धर्म असे कीं, समरांगणीं तरवार करून मरावें ह्मणजे या लोकीं नांव राहील आणि परलोकींही नीट. यश अथवा हानि हे ईश्वराधीन." असें बोलून हल्ला करून त्यांवर जाऊन मिसळले. तेथें तरवार चालली. दोनशें मोठे मोठे मानकरी तरवार करून रणांत पडले. त्याकडील बहूत मनुष्यावर मनुष्य एकसारखे पडले. इतक्यांत समोर वाग चालला होता तो पाठीवर जाहला. लढाई जगोबा बापूंनीं फत्ते केली. मारून पळविले. इतक्यांत लखबा दादा आणि बाकी फौजा फरारी जाहल्या होत्या त्या ते वेळीं यश आलें हें ऐकतांच सर्व फौजा सामील येऊन लढाईत मिळाल्या आणि मागीत तीन कोश त्यांचें लष्कर जयपूरवाले राजाचें सर्व रजवाड्यांचें लष्कर होतें तेथवर मारले. पुढें ते व मागें ह्या फौजा. ते आपल्या लष्करांत शिरतांच फौज त्याचे पाठोपाठ त्याचे लष्करांत शिरली. जयपूरचा राजा प्रतापसिंगजी तिसरे प्रहरीं निजून उठोन तोंड धूत बसला होता, इतक्यांत सांडणीस्वारांनीं येऊन खबर दिली कीं, "जगोबा बापूंनीं आपली लढाई मारली. आपली फौज कटा करीत लष्करांत आले." इतक्यांत जवळ येऊन पोंहचले. तेव्हां जयपूरचा राजा त्याच वेळीं सांडणीवर बसून चार सांडणीनिसीं जयपुरास रातोरात पळून गेला. आपल्यास धरून नेतील ह्मणून पागोटें राजाचे डेऱ्यांत ठेविलें होतें तेथेंच राहिलें. इतक्यांत त्या डेऱ्यावर फौजसुद्धां जगोबा बापू जाऊन पोंहचले. आणि फौजेस हुकूम दिला, "जंगी सरंजाम हत्ती तोफा वगैरे दरोबस्त राज्यकारखान्याचा बंदोबस्त ठेवावा." बाकी कोठ्यावधीची लूट फौजेच्या लोकांस मिळाली. असे प्रकारें जगोबा बापूनें जयपूरची लढाई मारली आणि पुढें वाढून दोपचे किल्ल्याजवळ मुकाम केला. तीन कोट रुपया मामला घेतला. बाकी तोफा तीनशें साडेतीनशें व हत्ती शेंदीडशें असा सरंजाम घेतला. आणि आपला पूर्ववत् प्रमाणें रुजू करून घेतला आणि जयपूरच्या राजाचें पागोटें शिरपेंच तुरे लागलेलें मिळालें तें पुण्यास डाकेंतून श्रीमंतांस कळण्याकरितां आणि सर्वत्रांस जाहीर जाहलें पाहिजे याकरितां पाठविलें. असे तऱ्हेचे प्रतापी आणि शूरत्वांत बहादर असे जगोबा बापू सरदार लौकिकवान जाहले. पुढें कितीएक लढाया वगैरे मोठीं मोठीं मोहिमेचीं कारणें केलीं. निधान लढाईतच देह ठेविला. देणग्याही बहुत हिंदुस्थानांत दिल्याचें नांव चालत आहे.

आतां लखबा दादाचा प्रकार. प्रथम आग्र्याची कामदारी हिंदुस्थानांत जिवबा दादानें अम्मल बसवून शिंदे सरकारास वजिरात फर्जंदगी जाहली, त्या वेळीं आग्र्याचा किल्ला व महाल लखबा दादास सांगून त्याजला तेथें ठेविलें. नंतर लष्करची फिरती स्वारी जयपुराकडे गेली पाहून एक दोनें उमराव त्या प्रसंगीं पळून गेले होते, ते जमा होऊन त्यांणीं फौजबंदी करून आग्र्यास लखबा

१. या लढाईची ही माहिती होळकरांचे कैफि० पृ. ८१ यांत आहे. तसेंच पत्र नंबर ३१३ पहा. २. भोसल्यांची बखर पृ० १८६ पहा. जगोबा बापू भोपाळचे लढाईचे कामावर असतां तेथें पोटीं शूल वाढून वारले. पहा पत्र नं. ४०१. ३. पहा पत्र नंबर २६. ४. हे दोन उमराव इस्माईल बेग व हमदानी नबाब होत. गुलाम कादर हा नंतर त्यांच्या मदतीस आला होता.

दादा बराबर लढाई करून आग्र्याचे किल्ल्यास घेरा दिला. लखबा दादानें मोठे इम्रतीनें किल्ल्यांतून लढाई करून किल्ला राखला. हें वर्तमान समजतांच कूच दरकूच खुद्द शिंदे सरकार अलिजा बहादूर महादजी शिंद्यांची स्वारी धवलपुरास येऊन चंबळेचे किनाऱ्यावर मुक्काम केला आणि जगोबा बापूस सांगितलें कीं, "तुह्मीं सडी फौजें घेऊन जाऊन मदत करून किल्ल्याचा घेरा उठवावा." त्यावरून त्याच वेळीं फौज घेऊन पार उतरले. दुसरे दिवशीं जाऊन लढाई केली आणि घेरा उठविला. इस्माईल बेग अमदानी नबाब यांची लढाई मारून शिकंदराबाग बाछाई जागा बांधल्या आहेत, आसपास किल्ल्यासारखा कोट बांधिला आहे, त्यांत जाऊन त्यांतून लढाई केली. तेव्हां हल्ला करून बाग घेऊन फौजेभितर शिरून तरवार चालली. हजार पांचशें माणसें पडलीं. लढाई मारली. आणि त्यास धरावा इतक्यांत बागाचे खालीं यमुना आहे, तेथें यमुनेंत घोडे घालून दोन घोडेनिसीं दोनी असामी यमुना पार होऊन पळाले. मग दुसरे दिवशीं फौजा पार उतरून पुढें ज्या ज्या ठिकाणीं पळत होता तेथें फौजा जाऊन धरून आणून आग्र्याचे किल्ल्यांत बंदिखान्यांत ठेविला. त्यापासून लखबा दादा लौकिकास आले. पुढें त्यांणीं चांगलीं मोठीं कामें केलीं. बुद्धिवान्, शहाणे, मसलती आणि धैर्यवान्, लखबा दादा लौकिकवान् पुरुष जाहला.

नंतर जिवबा दादांचे चिरंजीव यशवंतराव भाऊ हे नामांकित, लौकिकवान् सरदार जाहले, ज्यापासीं पंचवीस हजार फौज, एक कंपू आणि त्याशिवाय पांच हजार पागेचे स्वार धरून त्याबाहेर पंचवीस हजार पेंढारी. यशवंतराव भाऊनें पराक्रम करून कुंभेरचा किल्ला व राजनगरचा किल्ला व दयाळगड असे किल्ले लढून घेतले. शूर आणि धैर्यवान्, दाता, उदार, असे. नाहीं असें आजन्मपर्यंत कोणास ज्यांणीं ह्मटलेंच नाहीं. अहंता तिलप्राय नाहीं. असा लौकिकवान् सरदार. आबालवृद्धांसीं प्रियभाषण. हत्ती, घोडे, पालख्या कितीएकांस दिले. असा उदार पुरुष जिवबा दादांचे पुत्र यशवंतराव भाऊ लौकिकवान्, नामांकित. मुलखांत ज्याचा लौकिक जाहीर आहे.

भाऊ दिवाण ह्मणजे सदाशिव मल्हार ज्याचें नांव, ते बुद्धिवान्, शहाणे, लौकिकवान् त्याची वर्णना सदरीं जाणविलीच आहे. शेणवई ज्ञातींत असे असे जाहले.

बाळोबा तात्या पागनीस, शिंदे सरकारचे पदरीं, त्यांची वर्णना सदरीं जाणविली आहे. बुद्धिवान्, मसलती, इरादेवाले, ज्यांणीं नाना फडणीस दक्षण प्रांतीं शहाणे, लौकिकवान्, त्याचे काट चालूं न दिल्हे. असे अकलवान् जाहले.

राघो राम शेणवी लोकांत शिपाई, शूर, प्रतापी जाहले. त्यांचें वर्णन सदरीं आलें आहे.

यशवंतराव शिवाजी वागळे शूर मर्दानें बहादर शिपाईगिरीचे प्रकारांत जाहले.

वर जी बखर प्रसिद्ध केली तींतील कित्येक प्रसिद्ध व्यक्तींविषयीं गोमांतकाकडील लोक कित्येक आख्यायिका सांगतात. त्यांपैकीं आह्मांस कांहीं माहीत आहेत, त्या एथें दिल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें जाणून तसें करितोः—

---

१. नवी तैनाती फौज देऊन जगोबा बापूंस पाठविलें होतें. २२।३४ नंबरचीं पत्रें पहा. २. ग्रांट डफची बखर व पत्रें नंबर ३५।३६ पहा. ३. पत्रें नंबर ३८२।३८३।३८५ पहा. ४. जनकोजीराव शिंदे यांचे कारकीर्दींत यशवंतराव भाऊ जिनसीचे कामावर होते. त्यांस जिनसीवाले ह्मणत. पहा पत्र नंबर ३८८. यांनीं पुष्कळ लोकांस इनाम गांव, जमिनी, वर्षासनें व द्रव्य दिल्याच्या सनदा ग्वाल्हेर प्रांतीं बहुतेकांच्या घरीं व कोंकणांत केरीस त्यांचे घरीं आहेत. त्यांप्रमाणें हीं इनामें अद्याप चालत आहे. ह्या सनदा आह्मीं पाहिल्या आहेत.

रामचंद्र बाबा–(१) हे रोजगाराच्या निमित्तानें प्रथमतांच आपला गांव सोडून निघाले ते गोमांतकीं कवळे क्षेत्रीं शांतादुर्गेच्या दर्शनास गेले. दरिद्र दशा, जीर्ण वस्त्रें, यामुळें मनुष्य कलाहीन दिसतो. देवतादर्शन केल्यावर अभिषेक नैवेद्य करावा अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. परंतु देवळांतील पुजारी यांणीं अडवून धरिलें कीं, पांच रुपयांवांचून अभिषेक नैवेद्य होणार नाहीं. यांपाशीं सर्व मिळून सुमारें चार आणे होते, तितक्यावर कसें तरी कार्य उरकून घेण्याविषयीं त्यांनीं प्रार्थना केली. परंतु त्या उद्धट पुजाऱ्यांनीं त्यांची निर्भर्त्सना करून त्यांस तेथून निघून जाण्यास सांगितलें. तथापि रामचंद्र बाबा सायंकाळपर्यंत देवळांतच बसून राहिले आणि मग अंधार पडत आहे असें पाहून देवळाच्या समोरील दीपमाळेखालीं खाडा खणून त्यांत ते चार आणे कोणास नकळत पुरून ठेविले[1] आणि देवीस नमन करून तेथून चालते झाले. पुढें सुखाचे दिवस आल्यावर पुनः देवीदर्शनाकरितां जेव्हां गोमांतकीं गेले आणि पुजेस जाऊन बसले त्या वेळेस कराविषयीं वगैरे कोणींच शब्दही काढला नाहीं आणि पुजाऱ्यांनीं संकल्पादिकांची तयारी चालविली. रामचंद्र बाबांनीं त्यांस सांगितलें कीं, "हें काम आरंभण्याच्या पूर्वीं दुसरें कांहीं काम व्हावयाचें आहे, याकरितां तुह्मीं उठून मजबरोबर बाहेर यावें." तेव्हां ते आश्चर्यानें उठून यांबरोबर बाहेर आले. रामचंद्र बाबांनीं दिपमाळेजवळ खणण्यास सांगितलें. तेव्हां ते विस्मित होऊन खणून पाहातात तों चार आण्यांचा खुर्दा मिळाला. तो घेऊन देवळांत येऊन ह्मणाले कीं, "हे चार आणे आज कितीक वर्षें अभिषेक नैवेद्य होण्याच्या हेतूनें येथें पडून राहिले आहेत. यांचा आधीं मनोरथ सफळ जाहला पाहिजे. मग जें कांहीं करणें तें करूं." पुजारी गोंधळून ह्मणाले कीं, "हें काय आहे हें आह्मांस माहीत नाहीं. तें कृपा करून सांगावें." तेव्हां बाबांनीं मागील सर्व हकीगत सांगतांच ते स्तब्ध राहिले. आणि त्यांना मोठी अडचण उत्पन्न झाली. हें पाहतांच तेथील सर्व कारभारी लोकांना बोलावून त्यांच्याकडून देवीच्या पूजेचे एकंदर सर्व नियम बांधून घेतले. सामान्य रुद्राभिषेक नैवेद्याला चार आणे कर घ्यावा, अधिक देणाराची खुषी, परंतु जबरी नसावी. याप्रमाणेंच एकादशनी, लघुरुद्र, महारुद्र, इत्यादिकांचे बेवडे (नियम) ठरविले. ते अद्यापि निर्वेध चालत आहेत[2]. आणि त्या बेवड्यांप्रमाणें चार आण्यांची पूजा प्रथमतः रामचंद्र बाबांनींच केली. नंतर मग त्यांनीं पुष्कळ अलंकारादिक अर्पण केले ते वेगळे. देवीच्या व्यवस्थेकरितां फिरंगी सरकारामध्यें एकदम द्रव्य भरून तें सर्व क्षेत्र सोडवून घेतलें[3].

(२) त्या वेळेस हिंदु राजांच्या कारभाऱ्यांना फिरंगी लोक कसे भीत होते किंवा कसे मान देत होते हें पुढील गोष्टीवरून लक्षांत येईल. रामचंद्र बाबा गोमांतकीं असतां, एका ब्राह्मणाला, तेथील "इन्किझिसांव" नामक फिरंगी धर्माच्या सभेनें पकडून त्यावर कांहीं मोठा गुन्हा शाबित करून देहान्त शिक्षा ठरविली होती. तो निरपराध आहे, त्यास सोडावा अशाविषयीं पुष्कळ मोठमोठ्या लोकांनीं मध्यस्त्या चालविल्या. परंतु त्यांचे ते जुईज (न्यायाधीश) आणि भीस्म (धर्माधिकारी) यांच्या तडाक्यांत एकदां सांपडलेले लोकांची सुटका कशाची होते? परंतु त्याचा प्रारब्धयोग बळकट, यामुळें त्याच्या स्त्रीला कोणीं सुचविलें कीं, "तूं जाऊन रामचंद्र मल्हार यांचे पाय धर ह्मणजे सर्व काम

१. ही जागा अद्याप दाखवितात. २. कोणीं पुजाऱ्यानें जास्त पैसा मागितल्यास रामचंद्र बाबांचे ठरावाप्रमाणें आह्मी देत आहों, असें ह्मटल्याबरोबर ते गप्प राहतात. हें आजवर चाललें आहे. ३. कवळें एथें श्रीशांतादुर्गा देवीस बाराशें रुपयांचें उत्पन्न चालत आहे, व श्रीमंगेशीं शंभर रुपयांचें चालत आहे.

होईल." त्याप्रमाणें तिनें केलें आणि मोठ्या काकुळतीनें रडून सांगितलें कीं, "उद्यां सकाळीं त्यांला फांशीं देण्याचा ठराव जाहला आहे. त्यांला राखून मला चुडेदान दिलें पाहिजे. आणि तुह्मी मोठे पेशव्यांचे दरबारी मनुष्य आणि तुमच्या हातून जर येवढें काम होत नाहीं तर तुमचें इतकें वैभव घेऊन काय करावें?" तें भाषण ऐकून रामचंद्र बाबांनीं लागलीच चौकशी केली तों खात्री झाली कीं ब्राह्मण फुकट मरतो. तेव्हां त्यांहीं तत्क्षणींच गोमांतकाच्या मुख्य अधिकाऱ्याला चिठी लिहिली कीं, "अमुक अमुक मनुष्य तुमच्या ताब्यांत आहे तो आतांच्या आतां आह्मांकडेस जरूर पाठवून द्यावा. त्याची फार गरज आहे." तेव्हां अधिकारीही शहाणा होता. त्याणें पाहिलें कीं, "रामचंद्र बाबाचा शब्द मोडून ब्राह्मण फाशीं दिल्यानें नफा तर कांहीं नाहीं. पण कदाचित् गाशा मात्र गुंडाळावा लागेल. त्यापक्षीं त्याचें ह्मणणें मान्य केल्यानें त्यालाही संतोष होईल. आपलाही मोठा तोटा होईल असें नाहीं." याकरितां थोरपणाच्या रीतीनें त्यानें तो मनुष्य लागलाच तुरंगांतून बाहेर काढला. धर्माधिकाऱ्यांनीं वगैरे पुष्कळ अडचणी आणल्या; परंतु जबरदस्तापुढें त्यांचें काय चालतें? ब्राह्मण रामचंद्र बाबांच्या स्वाधीन केला. रामचंद्र बाबांनीं त्यास आपल्या घरीं ठेवून अन्नवस्त्रांची सोई करून लागलाच त्याला घाटावर पाठवून दिला.

जिवबा बक्षी–(१) सुबाजी बापूकृत सिद्धांतशिरोमणिप्रकाश या नांवाचें एक पुस्तक सन १८३६ या वर्षीं छापलें आहे. त्यांतील १२३ व्या पृष्ठावर असें लिहिलें आहेः–"सिंदे साहेबांचे दरबारांत मागें महादजी सिंदे पाटीलबावा यांचे वेळेस त्यांचा सरदार जिवबा दादा सेनवाही ब्राह्मण होता. त्याला लढाईस जाण्याची आज्ञा सरकारांतून जाली ह्मणजे त्याच वेळेस बाहेर निघावें. मुहूर्त पाहातच नव्हते. त्यांला केव्हांही जयेंच होत असे."

(२) जिवबा दादांनीं पाचूचें एक मोठें लिंग—कोणी ह्मणतात, देवीची मूर्ती–नाना फडणिसांस दिली होती. ती अद्यापि त्यांच्या देव्हाऱ्यावर मेणवलीस आहे.

(३) जिवबा दादा हे शिंद्यांबरोबर पुण्यास असतां नाना फडणविसांनीं त्यांस युक्तीनें कैद करण्याची मसलत करून बोलावणें पाठविलें. जिवबा दादा निर्भयपणें नानांच्या वाड्यांत गेले. नानांनीं आपल्या लोकांस सांगून ठेविलें होतें कीं, "कांहीं निमित्तानें आह्मी उठून आंत जातांच तुह्मीं त्यांस कैद करावें व हातीं न लागल्यास खूनही माफ." त्याप्रमाणें थोडासा वेळ इकडे तिकडे संभाषण झाल्यावर शौचाला जाण्याचें निमित्त करून नाना आंत जाऊं लागले. तेव्हां त्यांच्या आणि इतरांच्या मुद्रेवरून दगा आहे असें जाणून जिवबा दादांनीं समशेरीला हात घातला आणि ह्मणाले, "नाना, तुह्मांला शौचास लागलें असेल खरें पण अशा निमित्तानें हा जिवबा हातीं लागायाचा नव्हे बरें का? खबरदार येथून हाललां तर! आधीं नाना आणि नानाचे शिपाई फस्त होतील, आणि इतकेंही करून जिवबा हातीं लागेल कीं नाहीं याचा संशयच!" असें ऐकतांच नानांच्या तोंडचें पाणी पळालें आणि ह्मणाले, "छे हो, असें कोठें झालें आहे? जर तुह्मांला संशय येतो तर–व्हारे तुह्मी सगळे दूर, चालते

१. या धर्मवेडेपणाची हकीकत गोव्याचे इतिहासांत सांद्यत दिलेली आहे. लाखों लोकांस जिवंत भाजून मारलें व लाखों लोकांस बाटविलें. याप्रमाणें सांत फ्रांसीस वगैरे पाद्यांनीं पूर्वीं उपद्रव मांडिला होता. तो सन १८१२ पर्यंत चालून शेवटीं इंग्रज सरकारचे सांगण्यावरून ही अन्यायाची व जुलमी "इन्किझिसांव" नांवाची सभा पोर्तुगीज सरकारानें बंद केली. गोमंतक प्रांताचा इतिहास पृ० ७१. २. यांचे कारकीर्दींत यांस कधींच अपेश आलें नाहीं. जयच प्राप्त होत होता. परिशिष्ट १, पृ. ३२१ पहा. याजबद्दल त्यांनींच (जिवबा दादांनीं) आपल्या शेवटच्या कारकीर्दींत पत्र लिहिलें होतें. पहा भाग १३, पृ.१९९।२००.आणि यांचा किताबही "फत्तेजंग" असाच होता. पहा परि. १, पृ. ३२०.

व्हा"–असें ह्मणून शिपाई लोकांना तेथून दूर पाठविलें आणि जिवबा दादांला निरोप दिला. आणि "एकदां ही व्याध आपल्या ठिकाणीं सुरळीतपणें जाऊन पोंहचूं द्या. वाटेमध्यें ह्यांच्याशीं कोणी ब्र देखील काढूं नका." असा हुकूम फर्मावून मग खरोखरीच शौचास गेले.

(४) नाना फडणवीस तोफेच्या आवाजाला फार भीत असत. याविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, शिंदे जेव्हां पुण्यास आले तेव्हां नानांनीं त्यांपाशीं हिशेब मागितला. त्यांणीं जिवबा दादांकडे तें काम सोंपलें. त्यांनीं दिवस नेमल्याप्रमाणें नाना त्यांच्या लष्करांत गेले. आगतस्वागत झाल्यावर नाना ह्मणाले, "हिशेब येऊं द्या." दादा ह्मणाले, "ठीक आहे. सर्व हिशेब आमच्या तोंडीं आहे. सांगतों त्याप्रमाणें आपण लिहून घ्यावा." "बरें आहे" ह्मणून नानांनीं कागद मोडून घेतला. आणि लेखणी शाईंत बुडवून वर श्रीकार वगैरे काढून "बोला" ह्मणाले. इतक्यांत जिवबा दादाच्या सूचनेप्रमाणें लष्करांत एकदम सरबत्ती सुरू झाली. त्याबरोबर नानांचें कांहीं चित्त हिशेबाकडे लागेना. दादा ह्मणतात, "नाना, हिशेब लिहा." नाना ह्मणाले, "अंमळ गडबड कमी होऊं द्याहो, ह्मणजे लिहिण्याला बरें पडेल." तिकडे गडबड कांहीं कमी होईना. इकडे नाना कांहीं हिशेब लिहिण्यास स्थिर होईनात. शेवटीं अगदींच चैन पडेना तेव्हां नाना ह्मणाले, "आज तुमचे लष्करांत गडबड आहे. याकरितां पुनः केव्हांही येऊं." दादा ह्मणाले, "ठीक आहे, आह्मीही तेंच ह्मणणार होतों." इकडून नाना निघाले आणि तिकडे तोफांची सरबत्ती बंद झाली.

परिशिष्ट २ रें.

श्री.

अहेवाल (हिंदुस्थानी).

अहेवाल खासगत पुरुषोत्तमराव जगन्नाथ मुर्ख्तशीर करके निगेबानी होने सरकारके खिजमतके वास्ते लिखते है. हाल जरासा, इस सरकारके कदीमसे वैकुंठवासी श्रीमंत माधो महाराज अलिजा बाहादरके वक्तमें नमूदें हुई. उस राजसे हामारे बुजुर्रुग अवल कैलासवासी जिवाजी बल्लाळ और जगन्नाथ राम इन दोनो भाइयोंकी सरदारी जुदी जुदी इसदैंासे रियासदमे बराबर चली आई और बडे बडे काम सरकारी खेरखवाईके ताबे जिंदगीके कर्ते रहै. सरकारसे कुल फौजका काम और मुल्कका बंदोबस्त सुभातोंका अखत्यार इन्को रहा. आगे उस वक्तमे हिंदुस्थानमें बादशाही उमरॅाव फौजबंद बाईस थे. शिवाय इस्के रजवाडे जुदे जुदे बडे बडे सरकेश आपने आपने राजकीय मालक उन्से मुकाबले करके जेरे किये. उदेपूर, जैपूर, जोधपूर वगैरा इन्होसे आगाशफी, गुलाम कादर, इस्माईल बेग, आबदूल ह्मादखां, हमदानी, अफराशा, नजब कुलीखा, और मन्यारसिंग वगैरे इनोने आपसमें खरकैशा करके, सब सल्ला होके आगाशफीकों दंगासे मारा और वे अदंब हुवे. उससे

---

१. या पुरुषाच्या संबंधानें नाना फडणिसांनीं बऱ्याच वाईट गोष्टी केलेल्या होत्या. परंतु, या थोर पुरुषानें तिकडे लक्षच दिलें नाहीं, असें यांचे पत्रव्यवहारावरून दिसून येतें. २. ही गोष्ट मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेली आहे. याशिवाय आणखी पुष्कळ ऐतिहासिक गोष्टी आहेत. भाग १९, पृ० २४९ ते ३०७ पहा. ३. हकीगत, बयान. ४. थोडा. ५. जाहीर. ६. बुढावे. ७. शुरू. ८. भला चहाना. ९. आमीर. १०. शिरजोर. ११. सामना. १२. ताबेमे लाये. १३. बखेडा. १४. फरेब. १५. लिहाज.

गुलाम कादरनें तख्तका अदब तोडके बादशाहाकी आखे निकाली. ऐसा जुलूम किया. उस वख्त बादशाह सलामतने सबको फिरे[1] देखे काबु रहा नहीं. तब दखणसे फौज बुलायके बंदोबस्त करना ये तजवीज किई. जद श्रीमंत माधो महाराजकू याद किये और लिखा आया तख्तके मोरूसी[2] बे अदब[3] हुए. अब तुमने आनके इस्का बंदोबस्त करना. उस अमरमें ग्वालियर सर[4] किई और ग्वालियर ये सरकारका मुकाम था. तब महाराजने हामारे बुजुरुगोंकू मोहीम[5] देके उन्होके उपर भेजे. तब इन्होनें जाइके उनसे मुकाबले किये. कई दिन तक उन लोगोसे बराबर लढाई भारी भारी होती रही. उनकू जेर किये. शिकस्त करके गुलाम कादर व इस्माइल बेग आबदुल हयादखान इन्को जुदे जुदे पकडके कइद करके मथुराके छावणीकू लाये. और मुलकमें सरकारी कबजा किया. गुलाम कादरकू सजा हुई और कैद रहे. इसमें बादशाह निहायत[6] मेहरबान हुए. श्रीमंत कैलासवासी महाराजकू बुलाये और वजारत[7] हुई. माहिमरातब खिताब[8] अलिजाबाहादरीके व फर्जंदगे[9] होके खिलत[10] हुवे. और कुल अखत्यार सरकारकू हुवा. तख्तके नीचे वजीर व राजे कुल दस्तें[11] बस्ते[12] खडे रहते है. किसीके वास्ते विस जगे बैठक न थी. तख्तके नीचे मेहरबान होके फरजंदगी दियेके सबब महाराजकू बैठक हुई. पातशाहातमे[13] ये रुतबा किसीके वास्ते नहीं हुवा. उस वख्त हमारे बुजुर्गोंकी खेरखवाहीकी[14] चाकरी बडे बडे कस्ते[15] दिलावरीके[16] देखके उन्होके वास्ते मेहरबान होके कदर[17] हुई. मनसब[18] साहेब सुभेका रुतबा[19] खिताब हुवा. आपने सरकारसे बहुत इजत और खातर हुई. आगे उस्के के एक दिन बाद महाराज दखनकू गये. उस वख्त कैलासवासी जिवबा दादा, जगो बापू दोनो भायोंकू हिंदुस्थानमें बंदोबस्तके वास्ते कायम किये. जिवबा दादाकू सरकारसे कुल अखत्यार और जगो बापूकों सुभातोका अखत्यार रहा. आपने मोतमीद[20] जानके सुपुरदी कियी. ऐसा एतमाद[21] सरकारका रहा. आनेके बाद बडे महाराजके श्रीमंत वैकुंठ निशीन दौलतराव महाराज आलिजाबाहादरके वख्तमे श्रीमंत पेशवा साहेबकी और हैदराबादवाले नबाब निजाम अलिखासे च्याहीरमके[22] फैसलेमें नाचाकी[23] हुई. दोनो तरफ मुकाबलेकी तयारी हुई. उस अमरमे[24] श्रीमंत पेशवा साहेबके सरकारसे तजबीज हुई. और हमारे सरकारकू कहा हिंदुस्थानमें जिवबा दादाकू मुकाबलेके वास्ते बुलाये चाहिये. बुलायेके ब मुजब फौजसे दखणकू गये. जगो बापू हिंदुस्थानमे रहे. लखबा दादाकू नायबत हुई. दखणमें मुकाबलेके वास्ते सब सरदार फौज लेके आपने नागपूरवाले और गाइकवाड, हुलकर, हुजूर फौज और आपनी सरकार सब सामील हुए. उस वख्त आपने सरकारसे जिवबा दादाने मुकाबला करके लढाई फत्ते करी. चहारामेका[25] फैसला कर लिया. उस ऐवजका मुलूख हमेशाकू काट लिया. और दौलताबादका किल्ला लिया. नबाबका मुख्त्यार मशीर उलमुलूखकू ओलमें[26] लाये दखणसे हिंदुस्थानमें आज तक जाहीर है. आगे जैपुर ये बडे महाराजके वख्तमें लढाईका बदला लेणा राहा था. वे सरसीके[27] बायसे[28] जोरमे थे. फौजसे राजा आप खुद्द मुकाबलेमे आया. जगोबा बापुने मुकाबला लेकर सरकारके इकबालसे लढाई फत्ते किई. सरकारी दस्त मिलाया. फौजखर्च और

---

१. बदले. २. कदीमके. ३. बेकायदे. ४. ताबे किया. ५. फौज. ६. बहोत. ७. प्रधान, कारभारी. ८. पदवी. ९. लडकपन. १०. कपडे. ११. हात. १२. बांधलेले. १३. बादशाहीमें. १४. बेहत्तरी. १५. इरादे. १६. बाहादरी. १७. अम्र. १८. हुदा, अहोदा. १९. हुदा, अहोदा. २० भरोसेके. २१. भरोसा. २२. चौथाई. २३. बेबनाव. २४. काम. २५. चवथाई. २६. ओल-शत्रू इत्यादिकने आपनेसे जो कुछ करार किया होवेगा वो उस माफक उसके बतावका विश्वास नही होता वास्ते वो पुरा होनेवास्ते ऐवजमें आदमी लेते है वो. २७. जय. २८. कारणसे.

मामले रहे सो किये आगेकु रुजु किये. एसी एसी चाकरी खेरखवाहीकी सरकारमें होती आई. आखी-रमें सरकार चाकरीमें भुपालके मोहिममें जगो बापूकी आखेर हुई. इस तऱ्हा हमारा हक्क रियास-दसे चला आया है. रजवाडामे और रियासदसे रहिसोमे हुजूरके पिछे विसी कदरसे हमारी खातरी होती आई. मालवे, मेवाडमें हमारी फौज रही. सुभातका बंदोबस्त साबेक माफक रहा. वैकुंठवासी यशवंतराव भाऊका बंदोबस्त मेवाडमें रहा. कैलासवासी जिवबा दादाके यशवंतराव भाऊ, जगो बापुके हम. जायदाती खर्चमे जगे आष्टा, सिंहोर, पंचमहाल, सुजालपुर, व आमझरा. मेवाडमें कुमळमेर, राजनगर, केलवाडा, खिमणोर, शिवाय जहागीर खास जावद, जिरण व निमच यहाके. जिस वख्त पेंढारोके उपर साहेबने सरकारसे फौजकशी हुई, तब उस निमतमें खरकशा होके ये भी फौज बिघडी. मकाणात जप्त हुये. इस वख्त देडसे रुपये रोज खाणेके खर्चकु मालकम साहेब जरनेलने मुकरर किये. हमारी जहागिर जिरण साहेबने कायम रखी. उस ऐवजमे सत्वास नेमावर पंचमहाल और चार गांव कोलारी वगैरा साहेबने सरकारके तजवीजसे हमारे सर-कारसे जाहागीरमे हुए. आगे कैलासवासी श्रीमंत जनकोजीराव अलिजाबाहादर मसनद नशीन हुवे उस वक्त सिलसिले मुजब उन्होने खातर कियी. बाद फौजमे बखेडा हुवा. हरम बाहादर पलटणोंसे गोला चला. जिनसी पलटणे शामील थी. लष्करका बिगाड होने लगा. तब सरकारमे यशवंतराव भाऊकू और हामको कहा के तुह्मारे जाणेसे रहामे आवेंगे. इसकी तजवीज कर देखी. पर किसीके काबुके नही. तुम तजवीज कर आवगे साहेबको मंजूर है. इसमे हाम गये. सरका-रके इकबालसे फिसाद मिटा. जद सरकारकी मर्जी हुई. तुम दोनोमेसे एक जणा जिनसीमें रहो. तुह्मारे रहणेसे हमारे दिल जमई है. फौजमे फिसाद न उठेगा. उस्मे हामने इनकार किया. आब दुरुस्ती हुई. चाहे जिसके हवाली करे. चार दिन तक इस बातकी रदबदली रही. निर्हायित सरकारकी मर्जी देखी तब यशवंतराव भाऊकू मंजूर करणा पडा. आगे कृष्णराव मामा कदमने फिसाद उठाया. बाडेमे अपसर लोगोंको कैद करणा और आपने तालुक कर लेना. इन लोगोंकु सरकारमें हमारे हातसे बर्हा वचन दिलवाया था. इनके तजवीज करनेसे ये लोग गैरकाबु हुवे. इसमें कैलासवासी पाटलोजी शिंदे आजगेबे आनके बाडेमे दाखल हुवे. उनका कदम मामाका बिघाड हमकु दोनो एकसे. मामा कदमने इनके पकडनेके वास्ते चढाई किई. जास्ती देखे तब पैदल सब एक दिल होके मामा कदमकू निकाला. हमारे तरफ इस बातका कुछ भी नही. फाळके वगैरे अर्कसके बाईस महाराजके दिलमे वख्त पायके झगडा किया. कदम मामाकू रखते तो रह सकते. इसमे लोगोंके तरफसे सरकार नाराज हुवे. और कह भेजा इन लोगोंकू अब हमे रखना नही. जद हमने कहा इन लोगोसे हमे कुछ काम नही है. जो सरकारकी मर्जी सोही हमे मंजूर. लेकिन सरकारने हमसे उन्होकू बचन दिलवाया सबब इनकू पार किया चाहिये. बचन सरकारका उन लोगोकू बाडेसे निकालके हम ले गये. उनकी तनका देके धोलपूर पार कर दिये. बचनसे उन लोगोकू अदा हुये. उसी रस्ते मर्जी देखके हम मथुरा गये. हमे सरकारके मर्जीसे काम. उस वख्त हमारी जहागिर कायम थी. दो महिनेके बाद हमारे पिछे इन लोगोने अदावतसे सरकारमें कइक जगे जप्त करवाईके एक दिन तख्त मथुरा वृंदाबनमे मिया साहेबके खिजमतमे

---

१. पहिले. २. फौजचढाई. ३. झगडा. ४. प्रताप. ५. तसली, खातरी. ६. बहोत. ७. झगडा. ८. कौल, करार. ९. आचानक. १०. दुस्मनी. ११. सबब.

पहोचे. अर्ज हमने मुकदमेकी किई. एक बरस तलग अर्ज करते रहे. अर्ज हमारे मंजूर, हुई. और हुकूम हुवा के हम भेजते है वहां जाव. हमने कहा जा नही सकते. आपने हमकू पुछा तुम कोन हो. हामने कहा हाम पंडत है. काम क्या रखते हैं. आपने कहा के शिपाईका काम शिर देनेका होना है. आपके हुकमके ब मुजब तरफ ग्वालियरके रवाना हुये. इसमे मामा कदम व दादा खासगीवाले इनकी सल्लाह होकर सरकारसे हमारे बुलाणाके वास्ते बोले. सरकारके समजमें आया मंजूर किया. दोनोने कह भेजा तुम आजको धोरपुरमें ठेरना. पिछेसे सरकारके खत बुलाणेके आवेंगे. इसमें सरकारकी बिमारी दिन ब दिन जादा हुई. इसीमे सरकार कैलासवासी श्रीमंत जनकोजीराव महाराज देवलोक हुये. उसके बाद सरकार महाराज मसनद नशीन हुवे. श्रीमंत मातोश्री ताराबाई साहेबकू उन दिनोमे अखत्यार रहा. जद सरकारसे हुकुम बुलाणेका हुवा आके हजर हुवे. ब मुजब कैरिणेके मुलाकात होके खिलत हुवे. सरकारने खातर किई. जागिरातके मकान थे सो कुलासा कर दिये. अमल दखल हुवा. आगे सरकारसे जो बंदोबस्त हुवा उसकी तजवीज थी. इतेमे आपसका फिसाद हुवा. वो काम वैसा रहा. उस वक्त वकालत फाळकेकू थी. इने कैलासवासी महाराजकी मांदगी निर्हायत देखके फौजमे आपना गठावे किया था. शितोळे व आंग्रेकू आपने सल्लामें लिये. जयकमकू मिलायके साहेब लोगोंसे कहा, जिस तऱ्हे आपकी मनिशा होगी उस तऱ्हे बंदोबस्त होयगा. निमतकू अंग्रेजोसे कैहीके मामा कदमकू काम लिया. और मामाकू सेह देके दादाकू निकालनेकी तजवीज किई. उसके आपसकी फिसाद खडा हुवा. इनमे मिले थे उनोने मामाकू निकाला. मामा इस तऱ्हे गये. अब दादाको तजवीज हुई. साहेबकू समजाया, की मामाकू दादाने निकाला और आपके कियेकू हरकत किई. एशी बरामत करके साहेबकू नाराज किये इनके निकालसे बंदोबस्त होगा. ऐसे कहके पेस्तर जेकम वगैरे गाठी रखते. इनकु सेह देके पेदलोके पाससे दंगा करवाया. इस्में गरदी हुई. आप जाके खास कंपुमे बैठे. वहांसे तर्रतूद करी. बांडेका अदब तोडके पडदे तलक पहुचे. गद्दीका अदब न रखा. सरकारके पाससे दादाकू तिलंगोके हात कंपुमे मंगवा लिये. और आप करके अंग्रेकू साहेबके पास पहुचवा दिये. ये काम हुवा. फेर आगे फिसादका काम किया चाहिये. जिसके उपर जिनसी शिकंदरके पलटणोसे और खास कंपुसे गोला चलवाया. बाडेमें गोले गये. इहांतक जो बात हुई आज तक ऐसी बेअदबी किसीसे नही हुई. बाद बाडेमे आनके बंदोबस्त किया. सर्रफेराजीके खिलत लिये. खेर अखत्यार उनीका था. फिर साहेबने सरकारसे बिगाडका काम न रहा. इसमे लाट साहेबकी आमद हुई. रामराव लाट साहेबके पास गये. पिछेसे शितोळे व आंग्रेकू बुलाये. दोनो गये. मुलाकातमें नजर आया. रामराव मिला और साहेब बिगाडेपे हे. फाळके उनोकी तसली करते थे. ये बात वहां न देखी. साहेबके फौजमें रामराव जाके बैठाये. दोनो छोडणे आनके ठेहरे. और सरकारकू कह भेजा, रामराव मिला और मिलके ये काम किया. अब इसकी तजवीज सरकारकू ध्यानमे आवे वेसी करे. फेर तजवीज कायकी थी? तजवीज होती तो साहेबोंके सरकारके दोस्तीमें फरक कायकु आता? मिलापकू फौज गयी थी. उनोसे गोला चला. रियासदकू किस्त लगी. रियासद बिघड कर आपना कबजा करना और उस रस्ते

---

१. कायदा. २. झगडा. ३. बिमारी. ४. बहोत. ५. एकदिली, एकोपा. ६. वजा. ७. कहके. ८. उत्तेजन. ९. निकालके. १०. फिकर, व्यवस्था. ११. राजवाडेका. १२. लिहाज. १३. नेकनामी. १४. दर्खे, कपडे. १५. बुलाना.

खेरखवाई मिलाया. ये तजवीज करी रखी थी. वख्त मिलनेके साथ कर गुजरे. आज तक सरकारी काममें लोगोंकू दखल न मिला था. दखलके पायेमे ये काम कर गुजरे. जिसका पोस न किया रियासद तेब हुई. लाखों रुपयेका असबाबका सरकारी भारी भारी नुकसान हुवा. सरकारके और साहेबान सरकारकी दोस्ती निहायत उसके फरक लाये. इनके रहा जो थे उनकू रखा, न थे उनकू निकाला. हमारे तरफ कोई कसूर न था. फक्त अदावत असामीया उनोने निकाली. इनके हमारे दोनोके नाम लिखे. सरकारने हमकू लष्करके बंदोबस्तके वास्ते रखा था. साथ होते तो ये जगा नाराजी हमारे उपर न होती. हमारा बोलना हो जाता. उसका काबू था उस वख्त हमकू जाना पडता तो हमारी जहागिरात तोही खानेके वास्ते रहती. हमारे नाव सरकारकी चिठी भेजी. लष्करसे तुमने जाना. हम निकल आये. जिनोने ऐसे काम किये और बहाल हुये आगे क्या था. शिवाय जगे और दरमाहसे सरकारी नुकसानसे आपनी अबरू कियी. सब कसूर कहा. जमा हुवे तहां जाके बे कसूर रहे. हकदार इनका खाणेका हक तो मिला चाहिये. इसकू सरकार गौर कर समजे.

श्री.

तरजुमा.

हकीगत पुरुषोत्तमराव जगन्नाथ यांची खासगत कैफीयत थोडक्यांत करून सरकारचे नजरेस येण्याकरितां लिहीत आहोंत. ह्या सरकारचे कदीमपासून वैकुंठवासी श्रीमंत माधो महाराज आलीजा-बाहादर यांचे वेळीं थोडीशी हकीगत कायम जाहाली.

त्या राज्यापासून आमचे वडील प्रथम कैलासवासी जिवाजी बल्लाळ व कैलासवासी जगंनाथ राम ह्या दोघां भावांची सरदारी आलग आलग शुरूपासून रियाषितींत बराबर चालत आली. आणि सरकारचें खेरखवाईचें मोठमोठें काम हायात परीयंत करीत राहिले. सरकारांतून कुल फौजेचें काम आणि मुलखाचा बंदोबस्त, सुभायतीचा आधिकार यांना राहिला. पुढें त्या वेळीं हिंदुस्थानमध्यें बाद-शाही उमराव फौजबंद बावीस होते. ह्याचे शिवाय मोठमोठे शिरजोर रजवाडे आलग आलग आप-आपले राज्याचे मालक आसे होते. त्यांच्याशीं सामना करून ताब्यांत आणिले. उदेपूर, जैपूर, वगैरे ह्यांवर सरकारी हाक्क बसवून मामले करीत राहिले. आणि बादशाही फौज उमराव आवल्ल आगाशफी, गुलाम कादर, इस्माइल बेग, आबदुल ह्यांतखा, हमदानी आफराशा, नजब कुलीखा आणि मण्यारसिंग, वगैरे यांणीं आपसांत बखेडा करून सर्व एकमत करून आगाशफीस दग्यानें मारलें. आणि बेबंद झाले. ह्या योगें गुलाम कादरानें तक्ताचा अनादर करून बादशाहाचे डोळे काढिले. आसा जुलूम केला. त्या वेळीं बादशहानें सर्वांस बदलेले पाहून आतां काबू राहिला नाहीं, तेव्हां दक्षणेहून फौज मागवून बंदोबस्त करावा, आशी तजवीज योजून त्या वेळीं श्रीमंत माधो महाराजांस बोलाविले. आणि लिहून आलें कीं कदीमच्या तक्तास बे आदब जाहाले. आतां तुह्मीं येऊन ह्यांचा बंदोबस्त करावा. त्या वेळीं ग्वालियर सर केली होती. आणि ग्वालियर येथें सरकारचा मुकाम होता, तेव्हां महाराजानें आमचे वडिलांस फौज देऊन त्यांच्यावर पाठविलें. ह्यांनीं जाऊन त्यांच्याशीं मुकाबला केला. आणि कित्येक दिवस त्या लोकांबराबर मोठमोठ्या लढाया लढून त्यांस

---

१. ख्याल. २. बेचिराख.

जेरीस आणिलें; आणि त्यांचा मोड करून गुलाम कादर, इस्माईल बेग, आणि अबदुल हायातखां, ह्यांना आगल आगल पकडून कैद करून मथुरेच्या छावणीस आणिलें. आणि मुलकांत सरकारी कबजा केला.

गुलाम कादरास सिक्षा जाहाली, आणि कैद राहिला. यांत बादशाहा बहूत मेहरबान झाले; श्रीमंत कैलासवासी महाराजांस बोलाविलें. आणि त्यांस वजिरात जाहाली. माहीमरातब, किताब आलिज्याबाहाद्दरीची व फर्जंदगी होऊन वस्त्रें जाहालीं. आणि कुल अखत्यार सरकारास जाहाला. तक्ताचे खालीं वजीर व राजे कुछ हात बांधून राहात होते. कोणाही करितां त्या जागीं बैठक न्होती. मेहरबान होऊन फरजंदगी दिल्या कारणानें महाराजांस तक्ताखालीं बैठक जाहाली. बादशाहींत हा अधिकार कोणाकरितांही जाला नव्हता. ह्या वेळीं आमच्या वडिलांची चाकरी मोठे मोठे कस्त धैर्याचे पाहून त्यांच्याकरितां मेहरबान होऊन मान राखिला, सुभे साहेब ह्या हुद्याचा किताब मिळाला. आपले सरकारांतून बहूत इजत व खात्री जाली.

ह्यापुढें कांहीं एक दिवसांनंतर महाराज दक्षिणेंत गेले. त्या वेळीं कैलासवासी जिवबा दादा, जगो बापू ह्या दोघां बंधूंस हिंदुस्थानच्या बंदोबस्ताकरितां नेमिलें. जिवबा दादांस सरकारांतून कुल अधिकार आणि जगो बापूंस सुभ्याचा अधिकार झाला. हे आपले भरवशाचे जाणून अखत्यार सोपला गेला. असा भरवसा सरकारचा राहिला. दक्षिणेंतून आल्यानंतर मोठे महाराज यांचे वेळीं श्रीमंत पेशवे साहेबांचा आणि हैदराबादवाले नबाबाचा चौथाईबद्दल बेबनाव झाला. दोहींकडे लढाईची तयारी झाली. ह्या कामांत श्रीमंत पेशवे साहेबांकडून सरकारची तजवीज झाली. आणि आमच्या सरकारास सांगितलें कीं, हिंदुस्थानांतून जिवबा दादांस लढाईकरितां बोलाविलें पाहिजे. बोलाविल्याप्रमाणें ते फौजेसुद्धां दक्षिणेंत गेले. जगो बापू हिंदुस्थानांत राहिले. लखबा दादांस नायबी झाली. दक्षिणेंत मुकाबल्याकरितां सर्व सरदार आपआपली फौज घेऊन नागपूरवाले, गायकवाड, होळकर, हुजूर फौज आणि आपले सरकार असे सर्व सामील झाले. त्या वेळीं आपल्या सरकारांतून जिवबा दादांनीं मुकाबला करून लढाई सर केली. चौथाईचा फैसला करून घेतला. ह्या ऐवजाचा मुलूख हमेशाकरितां कापून घेतला. आणि ह्याशिवाय दौलताबादचा किल्ला घेतला. नबाबाचा मुखत्यार मशरूउनमुलूख ह्यास ओलीसमध्यें आणिलें. हें दक्षिणेंत व हिंदुस्थानांत जाहीर आहे. पुढें मोठ्या महाराजांच्या वेळच्या जयपूरच्या लढाईचा बदला घेणें राहिला होता. ते सैरसीच्या सबबीनें घमंडींत होते. फौजेसहित राजा आपण खुद्द मुकाबल्यास आला. जगो बापूनें मुकाबला करून सरकारच्या प्रतापानें लढाई फत्ते केली. सरकारी दस्त मिळविला. फौजखर्च आणि मामले राहिले होते ते तसेच पुढेंही कायम राहिले. याप्रमाणें चाकरी खेरखवाईची सरकारांत झाली. हे शेवटीं सरकारचाकरींत भोपाळच्या मोहिमेमध्यें जगोबा बापूची अखेर झाली. ह्याप्रमाणें हक्क आमचा न्हाषतपासून चालला आहे.

रजवाड्यांत आणि न्हाषतच्या रहिसामध्यें हुजूरचे मागें त्याचप्रमाणें आमची खातरी होत आली.

माळवा, मेवाडमध्यें आमची फौज राहिली. सुभातीचा बंदोबस्त पहिल्याप्रमाणें राहिला. वैकुंठवासी यशवंतराव भाऊचा बंदोबस्त मेवाडांत राहिला. कैलासवासी जिवबा दादांचे यशवंतराव

---

१. जय.

भाऊ, जगो बापूचे आह्मी. जायदाती खर्चांत आष्टा, सिंहोर, पंचमहाल, सुजालपूर, आणि आमझरा. मेवाडांत कुमळमेर, राजनगर, केलवाडा, खिमणोर शिवाय जाहागीर खास जावद, जिरण, निमच येथील. ज्या वेळीं पेंढाऱ्यांवर साहेबानें सरकारांतून फौजेची चढाई झाली, तेव्हां त्या वेळीं त्या निमित्यानें बखेडा होऊन हीही फौज बदलली. घरें जप्त झालीं. ह्या वेळीं दीडशें रुपये रोज खाण्याखर्चास मालकम साहेब जनरल ह्यांणीं मुकर करून दिले. आमची जहागिर जनरल साहेबानें कायम ठेविली. त्या ऐवजीं सत्वास, नेमावर, पंचमहाल आणि चार गांव कोल्हारी वगैरे साहेबानें सरकारचे तजविजीनें आमच्या सरकारांतून जाहागिरीमध्यें झाले.

पुढें कैलासवासी श्रीमंत जनकोजीराव आलिजाबाहादर गादीनिशीन झाले त्या वेळीं चालत आल्याप्रमाणें त्यांणीं खातरदारी केली. पुढें फौजेंत बखेडा झाला. हरम बाहादुर पलटणींतून गोळा चालू झाला. जिनशी पलटणें शामील होतीं. लष्करचा बिघाड होऊं लागला तेव्हां सरकारांतून यशवंतराव भाऊंस आणि आह्मांस सांगितलें कीं, तुमच्या जाण्यानें रहावर येतील. ह्या प्रमाणें तजवीज करून पाहिली. परंतु कोणाच्या काबूचे राहिले नाहीं. तुह्मी तजवीज करून याल हें साहेबांस मंजूर आहे. नंतर आह्मी गेलों. सरकारच्या कृपेंकरून फिशाद मिटला तेव्हां सरकारची मर्जी झाली कीं, दोघांतून एक जण जिनशींत रहा. तुमच्या राहाण्यानें आमची तमली राहील. फौजेंत बखेडा होणार नाहीं. त्यावर आह्मीं इनकार केला. आतां बंदोबस्त झाला. पाहिजे त्याचे हवालीं करावे. चार दिवस पावेतों ह्याची रदबदली राहिली. सरकारचा फारच आग्रह पाहिला. तेव्हां यशवंतराव भाऊस मंजूर करणें पडलें. कृष्णराव मामा कदमानें फिशाद उठविला. वाड्यांत आपसर लोकांस कैद करावे आणि आपल्या ताब्यांत करून घ्यावे. ह्या लोकांस सरकारांत आमच्या कडून वचन देवविलें होतें. ह्याची तजवीज करण्यांत लोक बिथरून गेले. यांत कैलासवासी पाटलोजी शिंदे एकाएकीं येऊन दाखल जाहाले.[1] त्यांचा आणि कदम मामाचा बिघाड, आह्मांस दोन्ही सारखे. मामा कदमानें ह्यांना पकडण्याकरितां चढाई केली. जास्ती पाहिले तेव्हां पैदल एकदिल होऊन मामा कदमास काढून दिले. याबद्दल आमच्याकडे कांहीं नाहीं. फाळके वगैरे बेबनावाच्या योगानें वेळ पाहून महाराजाचे मनांत वितुष्ट आणिलें. मामा कदमास ठेवते तर ते राहते. ह्या लोकांची तरफदारी घेण्यास सरकार नाराज झाले. आणि सांगून पाठविलें कीं, ह्या लोकांस आतां आह्मांस ठेवणें नाहीं. तेव्हां आह्मीं सांगितलें कीं, ह्या लोकांशीं आह्मांस काम नाहीं. जी सरकारची मर्जी ती आह्मांस मंजूर आहे. परंतु सरकारानें ह्यांत त्यांना वचन देवविलेलें आहे, ह्मणून तें पार पाडिलें पाहिजे. सरकारचे वचनाप्रमाणें त्या लोकांस आह्मी वाड्यांतून काढून घेऊन गेलों. त्यांची तनखा देऊन धोलपूर पार करून देऊन त्या लोकांच्या वचनांतून मोकळे झालों. त्या योगें मर्जी पाहून मथुरेस गेलों. आह्मांस सरकारच्या मर्जीनें काम. त्या वेळीं आमची जाहागिर कायम होती. दोन महिन्यांनंतर आमच्या मागें ह्या लोकांनीं अदावतीनें सरकारांत जागा जप्त करून एक दिवस तखत मथुरावृंदावनमध्यें मियां साहेबचे खदमतींत पहुचले. आह्मीं आपल्या मोकदम्याचा अर्ज केला. कित्येक वर्षें पावेतों अर्ज करीत राहिलों. आमचा अर्ज मंजूर झाला. आणि हुकूम झाला कीं, आह्मी पाठवित आहोंत तेथें जावें. आह्मी जाऊं शकत नाहीं, ह्मणून सांगितलें. आपण आह्मांस विचारिलें, तुह्मी कोण

१. जनकोजी शिंदे हे पाटलोजी शिंद्याचे औरस पुत्र होत.

आहांत ? आह्मी पंडत आहोंत, ह्मणून सांगितलें. काय पेशा ठेवतां ? शिपाईगिरीचा करित आहोंत. आपण सांगितलें कीं, शिपायाचें काम डोकें देण्याचें आहे. आपल्या हुकुमाप्रमाणें ग्वालियरकडे आह्मीं रवाना झालों. इतक्यांत मामा कदम व दादा खासगीवाले यांची सला होऊन सरकारांतून आह्मांस बोलावण्याकरितां बोलले. सरकारचे समजुतींत येऊन मंजूर केलें. दोघांनीं सांगून पाठविलें कीं, तुह्मीं जाऊन धोलपुरास थांबावें. मागाहून सरकारचें पत्र बोलावण्याकरितां येईल. त्या वेळीं सरकारची बिमारी दिवसेंदिवस जास्त वाढली. यांतच श्रीमंत कैलासवासी जनकोजीराव महाराज देवलोक झाले. त्यानंतर सरकार महाराज गादीनिशीन झाले. श्रीमंत मातोश्री ताराबाई साहेब त्या दिवसापासून अखत्यार होऊन सरकारांतून आह्मांस बोलावणें झाल्याप्रमाणें येऊन दाखल झालों. वहिवाटीप्रमाणें भेट होऊन वस्त्रें झालीं. सरकारांनीं खात्री केली. जागीगीचीं घरें होतीं तीं मोकळीं करून दिलीं. आमची वहिवाट चालू झाली. पुढें सरकारांतून जो बंदोबस्त व्हावयाचा त्याची व्यवस्था होणार तोंच आपसांत झगडा झाला. आणि काम तसेंच राहिलें. त्या वेळीं वकीली फाळके यांना होती. ह्यांनीं कैलासवासी महाराजांचें दुखणें फार पाहून फौजेंत आपला बंदोबस्त केला. शितोळे व आंग्रे ह्यांस आपल्या मसलतींत घेतलें. जेकमला मिळवून साहेब लोकांस सांगविलें कीं, ज्या वजेनें आपली मनिशा असेल त्या वजेनें बंदोबस्त होईल. निमित्तापुरतें अंग्रेजांस सांगून मामा कदमास काम दिलें. आणि मामास इशारा देऊन दादाला काढण्याची तजवीज केली. त्या योगें आपसांतील फिशाद उभा होऊन त्यांत जे मिळाले नवते त्यांनीं मामास काढून टाकिलें. मामा ह्या वजेनें गेले, आतां दादास कायम केलें. साहेबास समजाविलें कीं, मामास दादानें काढिलें. आणि आपल्या केलेल्या कामास हरकत केली. अशी हिकमत करून साहेबास नाराज केलें, कीं ह्यांना काढण्यानें बंदोबस्त होईल असें सांगून पाहिलें. जेकम् वगैरे आट ठेवित होते. त्यांना शह देऊन पायदळ लोकांपासून दंगा करविला. त्या योगानें गरदी होऊन आपण कंपनींत जाऊन बसले. तेथून व्यवस्था केली. वाड्याचा आदब तोडून पडद्या पावेतों पोंचले. गादीचा आदब न ठेवितां सरकारचे जवळून दादास तिलंग्याच्या मारफत कंपूमध्यें मागविलें. आणि आपण होऊन आंग्रे साहेबांस पोहोंचवून दिलें. हें काम झाल्यावर मग पुढें फि( )दिचें काम केलें पाहिजे. ज्याचेवर जिनसी सिकंदरच्या पलटणाशीं आणि खास कंपूंतून गोळा चालवावा. वाड्यांत गोळे गेले; येथ परयंत जी गोष्ट झाली ती आजपरयंत बे आदबी कोणाहीपासून जाहाली नाहीं. नंतर वाड्यामध्यें येऊन बंदोबस्त केला. नेकनामीचीं वस्त्रें घेतलीं. आखेर परयंत अधिकार त्यांचा होता. नंतर साहेबानें सरकाराशीं बिघडण्याचें काम राहिलें नाहीं. यांत लाट साहेबांचें बोलावणें जाहालें. रामराव लाट साहेबांकडेस गेले. मागाहून शितोळे व आंग्रे ह्यांस बोलावणें होऊन ते दोघेही गेले. भेटींत लक्षांत आलें कीं, रामराव मिळून साहेब वाईटावर आहे. फाळके यांची तसली करीत होते. ती गोष्ट तेथें नजरेस आली नाहीं.

साहेबांचे फौजेंत रामरावास जाऊन बसविलें. दोघे सोडण्यास येऊन, थांबून सरकारास सांगून पाठविलें कीं, रामराव मिळाला आहे. आणि मिळून काम केलें. आतां त्याची तजवीज सरकारचे ध्यानीं येईल तसी करतील. मग तजवीज कशाची होती ? तजवीज होती तर साहेबानें सरकारचे दोस्तींत फरक कशाला येता ? मलुखी करितां फौज गेली होती. त्यांच्याकडून गोळा चालला. न्याय-

ती कीस्त आली. त्याघत बिघडून आपला कबज्या करावा; आणि तिकडून खेरखवाई मिळवावी आशी तजवीज केली होती. वेळ मिळाल्या बरोबर तें तसें केलें. आजपरयंत सरकारी कामदार लोकांस दखल मिळाला नव्हता, दखल मिळतांच काम करून टाकलें. त्याचा विचार केला नाहीं. रियाघत बेचिराख जाहाली. लाखों रुपयांचें आजवावा सरकारी मोठ मोठें नुकसान जाहालें. सरकारची आणि इंग्रेज सरकारची फार दोस्ती होती. त्यांत फरक आणिला. त्यांचे मर्जीचे जे होते त्यांना ठेविलें. जे नव्हते त्यांसी काढून दिलें. आमच्या कडेस कोणत्याही प्रकारें कसूर नव्हता. फक्त आदावत दोघां इसमानें काढली. त्याचें व आमचें नांव लिहिलें. सरकारानें आह्मांस लष्करचे बंदोबस्तास ठेविलें होतें. बरोबर आसतों तर ह्या जागीं आमच्यावर नाराजी न होती. आमचें बोलणें होऊन जातें. त्याचा काबु होता. त्या वेळीं, आह्मांस जावें लागतें तर आमची जाहागिरी, तीहीं खाण्याकरितां राहाती. आमचे नांवानें सरकारांतून चिठी पाठविली कीं, लष्करांतून तुह्मीं जावें. आह्मी निघून आलों. ज्यांनीं ज्यांनीं अशीं कामें केलीं, बहाल जाहाले. पुढें काय होतें. शिवाय जागा आणि दरमहानीं सरकारी नुकसानीनें आपली आबरू केली. सर्व कसूर सांगितला, तेव्हां जेथें राहिलों तेथें बेकसूर राहिलों. हाक्कदार यांच्या खाण्याचा हाक्क मिळाला पाहिजे, यावर सरकार गौर होऊन लक्षांत आणितील.

परिशिष्ट ३ रें.

श्री.

कैफीयत.

केफियत घनश्याम नारायण बक्षी हे जिवबादादांचे नातू यांचे जाबाचा मजकूर. कैलासवासी जिवबादादा हे[१] सरकारचे चाकर खेरखा श्रीमंत माधव महाराजांपासून जिवबा दादांनीं चाकऱ्या माहाराज साहेबांचे चरणीं लक्ष ठेवून मोठमोठ्या सिरसाटीच्या करून मुलूख मिळविला. गुलाम कादर व इस्माईल बेग लाखों फौजेचे सरदार यांच्याशीं लढाई दिली (दिल्ली) वगैरे ठिकाणीं मारल्या. बादशाई वजिरात अलिजा बाहादूर किताब व माहीमरातब नालखी सह मिळविलेवर मारवाडवाले राजे भीमसिंग यांचे फौजेंत पांचशें असामींनीं केशरिया करून लढाईस आले. ते समईं सरकारच्या फौजेंत एकटे जिवबादादांनीं केशरिया करून मारवाडवाले यांची लढाई मारली. जेपुरवाले यांची लढाई मारली. व होळकर साहेबांची लढाई लाहोरीच्या बारीवर मारली. अशा हिंदुस्थानांत लाखो फौजेचे सरदारांशीं लढाया मारून राज्य घेऊन बंदोबस्त केला. व दक्षिणेंत श्रीमंत दवलतराव महाराजांचे समक्ष हैदराबादवाले नबाब यांची लढाई खर्ड्यांच्या मुक्कामीं मारून मुलूख घेऊन नबाबाचे राज्याचा बंदोबस्त केला. अशा आमरणांत बहुतेक स्वामीचाकरीच केली. ज्या ज्या सरदाराच्या लढाया मारून सरकारी खंडणी व मुलूख सरकारांत त्यांच्या राज्य दौलतींतून घेऊन बाकी त्यांच्या राज्याचा बंदोबस्त करून जिवबादादांनीं दिला. सबब राजे लोक प्रसन्न होऊन जिवबादादा यांस लक्षावधीचे गांव लाऊन इनामी सनदा व ताम्रपट मारवाड-

१. पाऊण लाख रुपयांचे बसुलाचे गांव जिवबादादा यांस मारवाडवाले भीमसिंग यांणीं दिले होते. पत्र नंबर ४०० पहा.

वाले राजे भीमसिंग यांणीं असे जिवाजी बल्लाळ यांचे वंशपरंपरेस करून दिला. ते ताम्रपट वगैरे मिळाले, ते सर्व जिवबादादांनीं आणून सरकारपायांपाशीं ठेवले. सरकार बोलले तुह्मीं आपल्या पाशीं ठेवावे. तुमचे वंशास चालतील. तेव्हां जिवबादादांनीं विनंती केली कीं, माझे वंशास सरकारचे पाय आहेत. हें सरकारांनीं ऐकून सरकार स्वमुखें बोलले कीं, तुमची निष्ठाच खरी आहे. तुह्मीं सरकारच्या चाकऱ्या मोठ्या केल्या. त्यांस सरकार दौलतींत तुमचा हक्क आहे. गादीवर आमचे शिंद्यांचे वंशांतील जो कोणी अधिकारी होईल तो तुमचे वंशपरंपरेस तीन चार लक्षांची जाहागीर देऊन चालवील; अंतर देणार नाहीं. हें आमचें वचन त्रिवाच आहे. त्याच प्रमाणें आज पावेतों सरकार गादीचे मालक जाहाले ते चालवीत आले. पुढेंही सरकार चालवितील. हा भरंवसा आहे. सरकारचरणांवांचून दुसरी जागा जिवबादादा यांणीं आपल्या माणसांस करून ठेवली नाहीं. हें पुर्ते सरकारांनीं मनांत आणून पाहावें. तीन( )पर्यंत कैलासवासी महाराज सरकार गादीचे मालक यांस कोणी कामदार यांणीं गैरवाकब आह्मांविसीं तकरारीचा भलताच जाब समजाविले असतां त्याजला खुद्द मालक सरकारांनीं सांगावें कीं, याची माहिती तुह्मांस नाहीं. यांचें चालविणें सरकारास जरूर आहे. या घराण्याबरोबर सरकार चाकरी दौलतींत हर कोणीं केली नाहीं असें परभारें सरकारांनीं कामदारास ताकीद करून आमचे घराण्याचें चालविलें असें असतां हल्लीं सरकारचे लक्षांत येतें कीं, यांचे मुलालेंकरांस पुढें न चालावें. असा याचा जाब असे कोणी नवीन गैरवाकब कामदार यांणीं भासविलें. आणि आमचा कोणी सरकाराशीं अर्ज करणार नाहीं. सरकारांनीं कृपा करून जाब वास्तवीक मनास आणले असतां आमची( ) सरकारांनींच करावी असाच जाब आहे. सरकारांनीं मुनसीचे दफ्तरीं पाहून घ्यावें. सर्वत्र लहान मोठे सरकारचे ह्मणविले. त्यांचें सरकारांतून चालत असतां आह्मी तर सरकारचे लेंकराप्रमाणें असें सर्व जगतांत माहीत असून सरकारांतून अनास्था होऊन अन्नवस्त्रावांचून आह्मीं दिक्क राहावें; हा मोठाच जुलूम आहे. त्यास महाराज सरकारची कीर्ती सर्व भूमंडळांत सर्व प्रकारें ,आहे. आणि खुद्द सरकार धर्माधर्म सूक्ष्म विचार बहुत जाणतात. सत्समागम ईश्वरी भावना मोठी. अशाच प्रकारानें सर्वत्रांचा प्रतिपाल सरकारांतून होतो. आणि आमचा जाब वास्तविक जाबानें सरकारांनीं सत्वास, नेमावर माहालीं नेमून दिल्हे त्याप्रमाणें घेऊन गुजारा नारायणराव बक्षीचे चिरंजीव करितात. हीं माणसें कांहीं तक्रारी नाहींत. हें कैलासवासी श्रीमंत महाराज जनकोजीराव बाबासाहेब यांणीं व साहेब बाहादूर यांणीं पक्के मनांत आणून महाल सरकारांत जप्त जाहाले, सबब महालाचे कमाविसदार यांचे नांवें वराता करून माहाली पावत आले. ते सालदरसाल आठहजार रुपये आह्मांस देववित आले. पुढें आमचे घरचे पुरुषाकडून सरकारचरणाशिवाय कोणी कारभारी वगैरे यांचे खुषामतीनें राहावें ही चालच नाहीं. ह्मणोन कारभारी यांणीं दिक्कदारीची तजवीज करावी. परंतु सरकारचे चरणाचे प्रतापें आज पावेतों सरकारचरणाकडे कामदारांची खुषामत न करतां चालत आले. राजश्री संताजी आंग्रे व खाजगीवाले यांणीं एक साल तकरार केली. तें महाराज सरकारचे कानावर गेलें. तेव्हां महाराज साहेब यांणीं आंग्रे यांस ताकीद करून नेमणूक देवविली. ते समई रामराव फाळके शेंदोनशें आह्मांकडे मागूं लागले. ते फाळके यांस आह्मीं न

१. नेकीनें सरकारची नोकरी करण्याशिवाय इतर कामदार लोकांची खुषामत करीत नसल्यामुळेंच यांचें नुकसान झालें. पण या गोष्टीकडे खुद्द सरकारचें लक्ष पाहिजे आहे!! २. सन १८४३ सांत इंग्रजांच्या व शिंद्यांच्या

दिले., त्या द्वेषानें महाल कंटीजंटीकडेस दिला. आणि न देण्याचा इरादा करून हैराण केलें. सरकार काम पाहत नव्हते जाणून साहेबाचे कानावर मजकूर घालणें प्राप्त. तेव्हां साहेबांनीं ताकीद करून फाळके यांजकडून रुपया देवविला. नंतर श्रीमंत कैलासवासी भाऊमामासाहेब यांणीं कित्येक भले मनुष्यांवर जुलूम ज्यास्ती आपटे व माहूरकर वगैरे असाम्यांवर केली. त्या संधीस आमचे अठरा हजारांपैकीं चार हजार बंद केले. येविर्सी सरकारांत घनश्यामराव यांणीं अर्ज करावा तर त्यांचे बंधु कृष्णराव वारले. त्यांचें तृतीय संबंधाचें कुटुंब, वय लहान. तिचे माहेरचे बाप मेहुणे वगैरे परभारें सरकारांतून कृष्णराव यांचे चार हजार सालिना घेऊन खाण्याचा इरादा करून कृष्णराव यांचे कुटुंबाचे नांवें दरबारांत अर्ज करीत फिरूं लागले. सबब घनश्याम-राव ह्यांनीं विचार केला कीं, आपण अर्ज करावा. आणि बंधूच्या कुटुंबाशीं पंचाईत करूं लागले. असें लौकिकांत आपले वडिलोपार्जित मोठेपणास दूषण आज पावेतों सरकारांतून लाखों रुपयांच्या जाहागिरी होत्या. समयानुसार जे तूर्त सरकारांतून मिळतात यांतच गुजारा करावा. पुढें मालकाचे वचनाप्रमाणें आज पावेतों चालविले तसेंच मालक जिवबादादांचे मुलांमाणसांस अंतर देणार नाहींत. ही खात्री पक्की जाणून सरकारचे पायांकडेस लक्ष रात्रंदिवस ठेवून गुजारा केला. पुढें पोटीं संतान पाहिजे. वडिलांस पाणी देण्याकरितां व सरकारचरणाकडेस जिवबादादांचे नांवचा अधिकारी असावा. ह्मणोन सरकार आज्ञा सर्वत्रांस जाहाली कीं, अवलाद नाहीं, त्यांनीं वारस आधीं करावे. त्यावरून कोंकणांतून भाऊबंदाचा मुलगा आणविला. येथेंही कारभारी आप्सरास सांगितलें कीं, मुलगा आह्मीं घेऊन ठेविला येविषयीं सरकारास विनंती करून मुलास बहुमानाचा हुकूम आह्मांस देवावा. तेव्हां लिहिलेली अर्जी न घेतां आपसराचें ह्मणणें पडलें कीं, सरकारी नजराणा किती द्याल? त्यावरून घनश्यामराव ह्यांनीं सांगितलें जो कांहीं सरकारी सिरस्ता सर्वत्रीं निघाला असेल त्याप्रमाणें आह्मांकडून घ्यावा. नंतर अपसरानीं नजराण्याचा शिरस्ता सांगितला नाहीं. रुबरु खुद्द सरकारची भेट घेऊन विनंती करावी. असा घनश्यामराव ह्यांचा हेतु जालाही होता. परंतु सरकारस्वारी आगरेस होती. इतक्यांत घनश्यामराव देवलोक जाहले. नंतर अर्जी अपसराकडेस दिली. तेव्हां सरकार आज्ञा होत गेली कीं, पटाचे समयीं तजवीज करूं. त्याप्रमाणें सरकारांनीं आमचे वडलोपार्जित सरकारचरणीं निष्ठा व पुस्त दरपुस्त सरकार खुद्द आज पावेतों चालवीत आले. पुढें जिवबादादांचें मुलामाणसांचें सरकारांनीं चालविलें पाहिजे. असा निश्चय सरकारचे स्वमुखीं

सैन्याच्या महाराजपुर व पन्या एथें मोठ्या लढाया झाल्या. "शिंद्यांची फौज शूरत्वानें उत्तम लढली." "इंग्रजी सैन्यांत शिपाई पुष्कळ मेले." म्यालेसनचा इति० पृ. १९२।१९३. त्या वेळीं शिंद्यांकडे बडे सरदार यशवंतराव भाऊ व पुरुषोत्तमराव जगन्नाथ हे होते. व रामराव फाळके हे इंग्रजांकडे वकील होते. त्यांनीं या वेळीं बाजू चांगली सांभाळून गवरनर जनरल लाटसाहेब लार्ड एलिंबरो यांची समजूत केली. हे साहेब थोर मनाचे होते. सबब यांनीं शिंद्यांचें राज्य राखलें. यांची कीर्ति शिंदेशाहींतच नव्हे, तर साऱ्या हिंदुस्थानांत आजवर गाजत आहे. महाराज जयाजीराव शिंदे यांणीं इंग्रजांचे या उपकाराबद्दल सन १८५७ सालच्या बंडाचे वेळीं इंग्रजांवर भयंकर प्रसंग गुदरला असतां त्यांजवर मोठेच उपकार केले.

१. रामराव फाळके यांचें वजन वर सांगितल्याकारणानें शिंदे दरबारांत होतें. त्यांनीं केरकरांचे जाहागिरीचे गांव कंठीजंटीकडेस इंग्रजांस दिले. २. रावराजे सर दिनकरराव राजवाडे त्या वेळीं शिंद्यांचे कारभारी होते. ३. नजराणा मागितल्यावर मुलगा घेणें बंद होईल, असें कारभारी यांस वाटलें होतें. परंतु, नजराणाही देण्यास जेव्हां ते कबूल झाले, तेव्हां कारभाऱ्यांचा नाइलाज झाला. मग त्यांनीं आपलें बोलणेंच बंद केलें ! !

आहे. सरकारांनीं लक्षांत आणून मेहरबानगी करून चालत आलेप्रमाणें दरवर्षीचा हुकूम झाला पाहिजे. सरकार पायांवांचून आह्मांस दुनयांत ठिकाण नाहीं. आमचे विनंतीची टाळाटाळी न व्हावी. हें सरकारास उचित आहे. सरकारांनीं लक्षांत आणून पाहावें. कारण सरकार ईश्वर अवतार सर्वज्ञ आमचे तर मालकच, वडिलोपार्जित अन्नदाता समजून यथामति विनंती लिहिली.

परिशिष्ट ४ थें.

जिवबादादांच्या दप्तरचीं पत्रें, सनदा, ताम्रपट वगैरे मिळालेले लेख.

लें० नं. १ श्रीगजानन २. सन १७६७

पुरवणी चिरंजीव राजश्री शिऊबास आशिरवाद.

शरीरसंबंध मातबरासीं केला. फिरोन परकी स्थळीं गेलां, तेव्हां आपल्या स्वरूपासारखें व त्याच्या स्वरूपासारखें तुह्मांस करणें प्राप्त झालें. परंतु किती रुपये लागले, वरास काय रुपये याचें सविस्तर आजरेस आलेवर लिहून पाठवितों ह्मणून तुह्मांस लिहिलें यावरून आह्मांस येथें चैन पडत नाहीं. यंदां चौंकडील खर्चाची जाच. कर्ज काढून पेंचांत यावें लागलें. चिरंजीव राजश्री जगंनाथ यास तुह्मीं पत्रें पाठविलीं त्यांमध्येंही सविस्तर वर्तमान नाहीं याजवरून तुह्मीं कोणती अंदेशा धरून लिहिलें नाहीं हें नकळे. इकडील वर्तमान तरी मेवाडचे मामलतीचा तुह्मीं असतां बंदोबस्त करून गेलां त्याप्रमाणें बाकी चार रुपयेच्या वराता केल्या त्यास कांहीं पटले व कांहीं पटावयाचे आहेत. साल मजकुराचे रसदेच्या वराता झाल्या त्या येथें ओर साहूकर याच्याकडे ज्येष्ठ मासीं द्यावे त्यास श्रावण मासीं रुपये पटवितों ह्मणोन लिहिलें, पुढील पेस्तर सालच्या वराता जाहल्या. त्या माघ मासीं रुपये द्यावा, ऐसा करार आजच ओर करावा लागतो (फाटलें) दुसरें मेवाडांत धान्याची स्वस्ताई जाहली. सोईकर चालत नाहीं, तेव्हां तोटा येईल. असें लिहिलें होतें. चिमण चौधुरी यास कैद केला. पहिलें काय समजून केलें आतां परभारेंचीं पत्रें मेवाडचीं येतात. व येथेंही राजकर्ण होऊन आलें होतें असें प्रकरण तेथील आहे. येथें दरबारीं रुपयेची ओड मात्र कोटें अंतर पडेल तरी नानाप्रकारचा उपद्रव आहे त्यास यंदां तुह्मीं घरीं जाऊन फार दिवस गुंतलां आपला गल्ला चौंकडे गुंतला यांत ईश्वर पार पाडील तें खरें. चिमण चौधुरी यास चौंवकडील पत्रें आलीं होतीं. सोडावा ऐसा चौंवकडील आग्रह परंतु तुह्मी आल्याशिवाई न सोडावा, असें चित्तांत आलें त्याजवरून सोडला नाहीं. तुह्मीं आल्यावर जें होणें तें होईल. पाटील यांनीं सरकार हांडे येथील मामलत चिरंजीव राजश्री बाळास सांगितली. त्याचे येथील (फाटलें) दार व राजश्री यशवंतराव याचे हिशोबाचे तंटे घेऊन येथें आले त्यावरून आमचेच राहुटीस यशवंतराव व जमेदार यांचा फडशा पंचाचे मतें जाहाला. जमेदार माघारे लाविले. अखेरीस जमेदार यांणीं कांहीं यशवंतराव यास येकंदर प ॥ त्यांतील द्यावा असें सांगितलें. परंतु न ऐकिलें. (फाटलें) गोहदवाले यांच्या मुलकांत आहे. याजवर मसलत घडतां घडेल ती प्रमाण. तुह्मांस घरीं जाऊन बहुत दिवस लागले. मुहूर्त करून निघून आलां

१. हें जिवबादादांचें पत्र शिवबा नाना घरीं आले त्या वेळीं लिहिलें होतें. २. जगंनाथ राम ऊर्फ जगोबा बापू केरकर हे जिवबादादांचे चुलत बंधु होत. ३. ह्या वेळपर्यंत ग्वाल्हेर घेतली नव्हती.

असतां तरी उत्तम. नाहीं तरी पत्र पावतांच जलदीनें यावें. दुसरे मार्गी काशिदास भेटी जाहली तरी उजनीवरून मेवाडांत जावें. आह्मीं येथून काशीद पाठविला हा तुह्मांस वाटेस भेटेल. अगर तुह्मी घरीं असाल तरी घरीं भेटेल. याकरितां वाटेस भेटला तरी तुह्मीं व तीर्थस्वरूपाचे नांवचे लखोटे अवघे फोडून वाचून पत्राचे ऐन व जेथील तेथें तुह्मीं आपणाकडून पत्र लेहून पाठवणें. आण त्याचें उत्तर आह्मांस लेहून पाठवावें. सर्व तुमचे व घरचे लखोटे वाचून पाहाणें. ह्मणजे सर्व समजेल. बहुत काय लिहिणें हे आशिरवाद.

सेवेशीं साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना लिखितार्थ परिसोन सांभाळ करिजे. घरीं फार दिवस लागले. मेवाडची सर्व आपलेकडे भिस्त याकरितां सत्वर यावयाचें करावें. उमेदा काशीद आपणाबरोबर सहा महिने येथून जाऊन जाहली. त्यास बदलाकडील काशीद तेथें आपण काजकामास ठेविला तरी उत्तम परंतु यास किती महिन्यांचें कबज द्यावें. राजश्री दादा ह्मणतात आपण सत्वर प्रभारें मेवाडांत जावें. येविसीं पत्रें गेलींच आहेत. परंतु उजनीस आल्यावर तजवीज होईल ती खरी. सेवक पदरचे जाणोन वरचेवर सांभाळ करीत असिलें पाहिजे. हे विज्ञापी.

(मधला बंद मिळत नाहीं) वतन राजश्री यशवंतराव[1] येथें लष्करांत आहेत. चिरंजीव राजश्री पांडोबा घरीं जाण्यास गेले. याचे घरचीं घोडीं आहेत त्यास चाकरीस ठेवणेविसीं चिरंजीव बाळा यास पत्र दिल्हें. वरकड त्याची फडफर यास चालवावी असें तहत सांगितलें आहे. मामलत चिरंजीव राजश्री बाळा याचे मार्फतीनें वहिवाट होतां परंतु अद्याप रसदेचा व बाकीचा फडशा जाहला नाहीं. याजवर घडतां घडेल तें खरें. पतकांतील वर्तमान शेरीच्या[2] किल्यावर श्रीमंत यजमान साहेबांचें निशाण चडलें, किल्ला हस्तगत जाहाला. किलेदार राजश्री देवजी गणु तूर्त ठेविले, किल्यावर आपल्या पतकांतील जाधव बारगीर आहे. तूर्त काळीं किल्ला आपले स्वाधीन आहे. पुढें येथून बंदोबस्त करून आणखी कोणी पाठवितील तंवपरयंत राजश्री देवजी गौवळी व पागासुद्धां शंभर लोकांनसीं राहावें असे ठराव येऊन ठेविले. पतक शिलेदारी व शिंदोजी गौवळी व बळवंतराहू यांसी हुजूर बोलाविले आहेत. तेथून येथें निघोन यावयास सरकारांतून मागितल्या पैशास ठिकाण पेस्तर सालच्या वरा (फाटलें) देतात हें न ऐकावें तरी धन्याची मर्जी ठीक राहत नाहीं. दुसरें सोडावें तर मागील रुपयांस ठिकाण नाहीं. साहुकारी पेंच, आज दोन वर्षें चाकरी करून पैसाही मागावयास ठिकाण नाहीं. याजकरितां येथून कर्ज काढून खर्चास पाठविलें आहे. तेथून येतील दरबारीं तरी रात्रदिवस यजमानाची मर्जी रक्षून राहिलें पाहिजे. आपलेकडे येथें[3] बक्षीगिरी दुसऱ्याकडे परंतु यजमानांनीं सांगितलें कीं, लोकांची बोलणेची तडजोड तुमचे मार्फतीनें करीत जावी. त्याजवरून पहिलेपासोन यजमानांच्या मर्जीप्रमाणें करून आजवर चाललें. पुढें दिवसें येथें धरणी पारणी होतात. ज्या अर्थी सरदारीच दैवास आली, तेथें पैशाला तीन लोकांस मिळे.

१. यशवंतराव शिवाजी वागळे हे मूळचे बंदर वेंगुर्लें एथील राहणारे होत. हे हलीं माळवे प्रांतीं सत्वास एथें जहागिरदार आहेत. इंदूर एथें यांचे वंशज हलीं मोठाल्या हुद्यांवर आहेत. २. सेरगड. ३. आपण एथें आणि बक्षीगिरी दुसरीकडे असा ह्मणण्याचा अर्थ आहे. जिवबादादा स्वारीचे कामावर असल्यामुळें महादजींचे जवळ राहून बक्षिगिरीचे हिशोबाचें काम करण्यास मुख्यत्वें मिळत नसे. तेव्हां ज्या ठिकाणीं असतील त्या ठिकाणाहूनच सर्व बोलणें चालणें, दे घे, खर्चवेंच, करण्याबदल महादजीनें सांगितलें होतें.

आपण बोलणें चालणें सोडावें तरी यजमानांची मर्जी ठीक राहणार नाहीं. याकरितां लटका खार येऊन पदरीं पडला आहे. यांत ईश्वर अब्रू रक्षील तें प्रमाण. तूर्त यजमानाची स्वारी नरवरवालेचें पारिपत्य करून खंडणी घेऊन गोहदवाल्या राण्याच्या गड्या घेऊन राण्याचें पारिपत्य करून ग्वाल्हेर घ्यावी, हें मानस आहे. मसलत (फाटलें) ता होईल ती पाहावी. तूर्त छावणी (यापुढील बंद मिळत नाहीं.)

ले. नं. २ श्री. सन १७६९

श्रीमंत महाराज राजाधी गोब्राह्मणप्रतिपालक निराधार यास आधार सदां राजमान्य राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसीं.

आज्ञाधारक देवराव बालक नामनाथ कारकून सुरसन सबेन मया आलफ माहे फाल्गुन शुद्ध ५ पावेतों सुखरूप असों विशेष. महाराजांनीं आज्ञा केलिजे. हिंदुस्थानी लढाई कैसी जाहाली, आण गलिमानें कावे कसे केले ते हुजूर लिहून पाठवणें त्यास साहेबांचे शेवेसीं किताबत लिहून पाठविली आहे. तें ऐकोन मसलत केली पाहिजे. लढाईस (फाटलें) लोक भले (फाटलें)

ले. नं. ३ छ १४ सवाल मंदवार श्री. सन १७७८

तीर्थस्वरूप (फाटलें) आराम नाहीं (फाटलें) सर्व यथास्थित आहे. मातुश्री भिकु (फाटलें) मातोश्री सकुबाई तीर्थस्वरूप राजश्री बापूस भेटावयास नरवरचे मुक्कामीं गेली होती. त्यास नरव-रचा किल्ला वडिलांनीं हस्तगत केला आण (फाटलें)

ले. नं. ४ श्री. सन १७७८

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

अपत्यें बाळोंनें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ताा छ० ५ रबि-लावल पावेतों मुक्काम ग्वाल्हेर येथें वडिलांचे आशीरवादेंकरून सुखरूप आहों. विशेष वडिलांकडील बहूत दिवस वर्तमान कळत नाहीं; तेणेंकरून चिंता वाटती तर असें न करितां आशीरवाद पत्र पाठवून बाळकाचा सांभाळ करीत असावें. यानंतर आह्मांकडील वर्तमान. तर आह्मांबरोबर फौज देऊन राघोगडीं रवाना करून दिले आहेत. अगोदर राजश्री रामजी पाटील व देवबा गौळी व खंडोजी इंगळे असे मिळोन आज साहा महिने अगोदर गेले आहेत. त्यास हल्लीं आह्मांस तिकडे रवाना करून दिले आहेत. आह्मांबरोबर सात हजार गोसावी, व तीन हजार पलटण, व चार हजार स्वार व तोफखाना अशीं समागमें आहेत. ईश्वरें यश दिलें ह्मणजे चांगलें आहे. जानुजा दरगा यास कापड देऊन रवाना करून वडिलांनीं दिला आहे. त्याजबरोबर चिरंजीव सौभाग्यवती सुंदराबाईस आणावयास सांगितली. त्यास रवाना करून द्यावी. वडिलांचे व तीर्थस्वरूप राजश्री दादाचे भेटीस फार वर्षे जाहालीं. याकरितां वडिलांनीं एकवेळ येऊन भेटून जावें. ह्मणजे चांगलें आहे. सरकारचा निरोप चार रोजचा घेऊन यावा. (याचे पुढील बंद मिळत नाहीं.)

ले. नं. ५ श्री. सन १७७९

आशिरवाद उपर आज शनवार संध्याकाळ जाणोन क्षेम असों विशेष. पत्र पाठविलें पावलें. लि-हिला मजकूर विदीत जाहला. तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातुश्री काकीस बोलावयास पाठविलेवरून

---

१. हे जगोबा बापूंचे सख्खे बंधु ह्मणजे जिवबादादांचे चुलत बंधु होत.

जावयास गेली. चिरंजीव सौभाग्यवती गंगाबाईचे पोटांत अमाष ह्मणोन लिहिलेवरून चिंता ( ) जाहले परंतु त्यांसि तैसाच सरंजाम देऊन रवाना पुणेस केला. त्याकडील वर्तमान इंग्रज यांस ज्यार केला, आण वेढा देऊन आहेत. फौज सहा हजार मारली. व मुख्य इंग्रजही पडला[2]; ऐसें वर्तमान आहे. तशांत आमोणकर[3] आलेवर लिहितों. पुणेस माणूस पाठविला होता; तो आला ह्मणजे तर त्यांकडील वर्तमान सविस्तर लिहितों. तीा भाऊ[4] पुणेसच आहेत; किंवा कसें तें तपशिलवार लिहावें. बहुत काय लिहिणें हे आशिरवाद.

ले. नं. ६ श्री. तारीख ३ जानेवारी १७८०

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरकर यांप्रती.

राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाई प्रा कुडाळ व माहालांनीहाय सुरू सन समानेन मया अलफ. तुह्मीं हुजूर विनंती केलीजे. मौजे केरी ताा पेडणें येथें कुंबळें खेरीज जमीन खाजन काजरकोंड भरवड व नदीचा आतोड पडंग आहे. त्याचें कुंबळें तुह्मांस मक्ता करार करून दिलें, या खाजन मजकूरचे कमाविशीस व बांधास खर्च लागेल तो आपला आंगट लावून खाजनाची कीर्द महामुरी करून सर्व कमाविशी व कवाथ्यांची लावणी करून कुंबळेचे बेरजेप्रमाणें वसूल देऊं ह्मणून त्यावरून मनास आणून खाजनाचे बांधास व कमाविसीस मेहनत भारी व खर्च मोबलक लागेल ऐसी चौकशी मनास आणून त्याचें कुंबळें तुह्मांस मक्ता करार करून दिलें असे. त्याच्या चतुःसीमांबद्दल बखर. १ पूर्व दिशा तुमचें ठिकाण वाईगणी याचे मेरेनमेर. २ पश्चिम दिशा बाबराचे मेरेनमेर. ३ उत्तर दिशा नदीचे मेरेनमेर. ४ दक्षिण दिशा गांवीक ठिकाण व जुने खाजनाचे मेरेनमेर.

येणेंप्रमाणें चतुःसीमेमधील पडंग जमीन आहे त्यांत मर्द कमाविशी व माडांची लावणी देखील बांधास कराल त्याचे मक्ता सर्द व नारळ कुंबळें होन ७८१. सात हे लिहिल्याप्रमाणें करार करून दिले असत. पेस्तर सालपासून साल दरसाल सात हे लिहिल्याप्रमाणें गांवाकडे वसूल देत जाणें. आण खाजन मजकूर तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेस भोगवटा करीत जाणें. सदहू कुंबळें करार करून दिलें आहे. याजवर जाजती होणार नाहीं. कराराप्रमाणें वसूल गांवाकडेस देऊन खाजन सुखी भोगीत जाणें. येविशीं गांवास आलाहिदा सनद सादर केली आहे. खाजन मजकूरचा भोगवटा करीत जाणें. जाणिजे छ० २५ माहे जिल्हेज.

ले. नं. ७ श्री. तारीख १६ सपटंबर १७८०

तीर्थस्वरूप राजश्री नरोबामामा वडिलांचे सेवेसीं.

बाळकें बाळानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती ऐसीजे. वडिलांचे आशीरवादें बाळकाचें वर्तमान छ० २४ रमजान पावेतों पाा बुडाडोंगर नजीक नरवर जाणोन वडिलीं स्वक्षेम लेखनीं आज्ञापून बाळकाचा परामर्ष घ्यावा. यानंतर अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान न कळतां चिंता वाटती तरी सदैव पत्रीं सांभाळ करावा. इकडील वृत्तांत. तीर्थस्वरूप राजश्री जगोबा बापू परभारें मेवाडांतून तुह्मांकडे गेले. ह्मणोन आजुरदा कासीद पाठविला होता. त्यास

---

१. जिवबादादा यांस. २. सन १७७९ सालीं कार्ली व तळेगांव एथें जी मराठ्यांची इंग्रजांबरोबर लढाई झाली, तींत इंग्रजांचे लष्करचा मुख्य स्टुअर्ट (इस्टुर फाकडा) पडला, असें पेशव्यांचे बखरींत लिहिलें आहे. ही लढाई तारीख ४ व ६ माहे जानेवारी सन १७७९ रोजीं झाली. ३. हे राघोबा आमोणकर शिंद्यांचे एक सरदार होते. लष्कराबरोबर ग्वाल्हेरीहून आले होते. ४. हे सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण होत.

जगोबा उज्जनीस आले होते तेथें नादूसकर याची वधू होती ती निश्चय करावा या अर्थें आले होते. तेथील शोध मनास आणून राजश्री येसोबा आपास व राजश्री रामचंद्र बापलास पत्रें लिहिलीं तीं पत्रें राजश्री बाळोबा तात्यास दाखल जाहलेवरून तीर्थस्वरूप राजश्री मामास राग आला तो कोठवर लिहावा ? त्यावरून त्रिवर्गांचें बोलणें तात्याचे विद्यमानें जाहलें. आण बोलले जे येथें लग्न करावयाचें नाहीं. इंग्रजांचा षाहा निवारण जाहलेवर आज्ञा घेऊन घरीं जाईन. गेलेवर श्रीदेवाची व वडिलांची आज्ञा होईल तेव्हां करणार तर करीन. याप्रकारें बोलण्यांत आलें. जगोबास माघारें मेवाडींत जाणेविसीं लिहिलें आहे. तुह्माकडे यावयाचें राहिलें. सध्यां तीर्थस्वरूप राजश्री शिवबा मामा व सौभाग्यवतीस पत्र मातोश्री मामी तुमचे भेटीस येणार आहेत. दसरा जाहालेवर येतील. शिवबा मामा आपणाकडून येथें आल्यावर हे निरोप घेऊन येणार, पुढें घडेल तें पाहावें. इंग्रजाचा प्रकार सध्यां सलुचाची बोली लाविली आहे. बहुत प्रकारें सला होईल. काशींत, प्रयागेंत इंग्रजाचें ठाणें होतें; त्यास तेथील बंदोबस्तास्तव कलकत्तेचा सुभा आला होता. त्यास काशीचे राजेनें जीवीं मारून दोन पलटणी बुडविलीं.[2] त्याजवरून त्याचा मागील आधार तुटला आहे. तेव्हां हरप्रकारें सला होईल. वरकड वर्तमान मागां वडिलांस विनंती लिहिली आहे. त्याचें प्रत्यांतर यथास्थित लिहावी. बेळगांवीं आमचीं मुलेंमाणसें आहेत. त्यांजकडून पत्रें आणून आह्मांकडे पाठवावीं. तिकडील वर्तमान कळत नाहीं. इतकेस्तव विनंती केली असे. मुख्य गोष्ट पुढील पैरवीची तजवीज कशी ती आज्ञा केली पाहिजे. वरकड सर्व वडिलांचे पत्रावरून विदित होईल हे विनंती.

ले. नं. ८ सन १७८०

(वरील बंद मिळत नाहीं)

दाबरोबर पत्र पाठविलें तें पोचलें. त्या आलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सविस्तर लिहून चिंता निरसन केली पाहिजे. इकडील वर्तमान तर; वरचेवर काशीद गेलेच आहेत. त्या समागमें लिहून पाठविलेवरून विदित होईल. यानंतर श्रीमंत राजश्री सरदेसाई,[3] व मातोश्री सकूबाई[4] व सौभाग्यवती लक्ष्मीबाई[5] यांणीं वाडीहून मुजरत पत्रें आह्मांस व श्रीमंत राजश्री पाटीलबावांस लिहून पाठविलीं. करवीरकर व फिरंगी यांचा कलह जाहला. त्यामुळें नवीन सिबंदी ठेवणें प्राप्त जाहाली. त्याजमुळें कर्ज दोन लाख रुपये जाहालें. त्यास तुह्मीं पाटीलबोवा यांसीं आहां तर अशा समयास आपल्याकडून तुह्मीं आपल्या यजमानास सांगोन व तुह्माकडून व आपल्या राज्यांतील मंडळी तेथें आहेत, त्यांस सांगोन त्यांचे हातें ऐसें करून खर्चास पाठवून द्यावें. ह्मणून दोघे स्वा (पुढील बंद मिळत नाहीं)

ले. नं. ९ गुजारत संताजी मीठ ८१० श्री. सन १७८१

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री नरोबाबावा केरकर स्वामी

गोसावी यांस.

सेवक साबाजी कृष्ण लाड नमस्कार विनंती उपर येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत

---

१. पोफम व मूर साहेबांनीं शिंद्याच्या मुलखांवर सन १७८० सालीं जी स्वारी केली होती, ती ही होय. २. वारन् हेस्टिंग्स् याजवर काशीस मोठें बंड होऊन जें संकट गुजरलें, तें हें होय. यांतून शेवटीं तो मोठ्या युक्तीनें सुटला. ३. खेमसावंत वाडीसरकार. ४. जयाप्पा शिंदे यांची बायको. ५. ही जयाप्पा शिंदे यांची मुलगी होय. हजला खेमसावंत यांस दिलें होतें. ६. जिवबादादांस. ७. माहादजी शिंदे यांस.

असलें. पाहिजे. विशेष वरघाटींहून कासीद त्या प्रांतीं आला ह्मणोन बातमी ऐकिली. त्यास कासीद आला असेल तर आण चिरंजीवाकडील कांहीं वर्तमान कळलें असेल व कागद आला असेल तर शोध घेऊन पाठविला पाहिजे. चिंता वाटती. राजश्री सीताराम नाईक पुणेहून आला. तो लष्करचें वर्तमान मागें जें इंग्रज याचा जमाऊ बावीस हजार आला. व होळकर यांकडील व सिंदे याणें परभारें येऊन ऐशी चाळीस हजार फौज न्हेली. यानंतर आगरेचा वेढा उठला. ऐसें मागें आण पुढें जाणार आहेत ह्मणे. सदरहू काशीद आला तर तहकीक लागेल. व राजेश्री खेमसावंत सरदेसाई राजे वाडकर यांचे घरीं मीठ अर्जी नाहीं. ऐसें याम खालीं माणूस गेला याकडे मीठ ८१० दाहा कुडव देवविलें पाहिजे. बहुत काय लिहावें लोभ असों द्यावा हे विनंती.

ले. नं. १० श्री. तारीख १९ जुलई सन १७८२

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री नारायणरावजी स्वामीचें सेवेसीं.

सेवक श्रीधर लक्षुमण चांडगडेकर मुक्काम वाडी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। आषाढ शुद्ध १० मी सिकुरवार, जाणून स्वकीयें कुशल लेखनाज्ञा आसावी. विशेष आह्मीं श्रीमंत राजश्री संवेदेकर राजे हे फिरगणांत आहेत. यांची मोकळीक होऊन संवदे संस्थान सोडविणेविशीं यत्न करितों. त्यास गल्लीम भारी; टिपु सुलतान असें ह्मणतांच लोक भितात. त्यास ते प्रांतांतील पुंडपाळेकर व सरदार वगैरे दाहा हजार फौजपावेतों आज चार वर्षें ता। आरण्यवासी जाहली आहे. त्यास आह्मीं चार वर्षें पावेतों हे प्रांतीं राहून हरतऱ्हेनें यत्न केला. परंतु सफल जाहला नाहीं. पंधराशें रुपये पावेतों कर्ज होऊन तूर्त आज वस्त्रास महाग जाहलों. घरीं जावें तर जावयास नको. देणेकरी यांचा पेंच आहे. त्यास आपण कृपा करून अभयपत्र पाठविलेस आपले भेटीस येतों. भेटी अंतीं सर्व मजकूर विदित होईल. बहूत काय लिहावें हे विनंती.

ले. नं. ११ ऽ श्रीगजानन. तारीख २२ जुलई सन १७८२

श्रिया सहस्रायुश चिरंजीव राजश्री शिऊबा याप्रती.

जिवाजी बल्लाळ अनेक आशीरवाद उपरी येथील (फाटलें) आषाढ शु १३ मुक्काम नजीक हिंमतगड प्रांत ग्वाल्हेर. जाणोन तुह्मीं आपणाकडील क्षेम कुशळ लिहून चित्त संतोषित करीत असावें. विशेष. आपण एक प्रांतींहून घरीं गेलां. त्या दिवसापासून सविस्तर वर्तमान लेहून कळविलें नाहीं. यावरून चिंता प्राप्त होती. त्यास राजश्री रामचंद्र बापला याजकडे कासीद येथून गेला. तो व आह्मीं तुह्मांकडे पाठविला तो; ऐसे दोघे काशीद पत्रें घेऊन आले. त्यांपैकीं आह्मांकडील कासिदाबरोबर ज्येष्ठ शुद्ध पत्र पाठविलें तें, येथें आषाढ शुद्ध एक महिना चार दिवसांनीं पोहोंचलें. लिहिलें वर्तमान कळलें. तेणेंकरून चित्त संतोष झालें. इकडील वर्तमान तरी वरचेवर लिहिलें आहे, त्याजवरून कळेल. यंदा स्वराज्यांत करवीरकर व फिरंगी यांचा कलह होऊन बखेडा जाहाला त्यामुळें राजश्री सरदेसाई यांसी खर्च पडला. त्यांची वोड जाहाली. याजकरितां वरघांटच्या रोजगाऱ्या यांसी पटी धरून पहिलें हिरशेट याच्या कारकीर्दीस चौघांबरोबर रुपये घेतले. पुढें तुह्मी बहुतां दिवशीं घरीं गेलां; तेव्हां

१. ही मोहीम सन १७८० सालीं पोफम साहेबांनीं स्वारी केली त्या वेळची असावी असें वाटतें. २. हे सादीचे राजे. रजपुत मराठे हे जसे क्षत्रिय, तसेच हेही मूळचे क्षत्रिय होत. हे कट्टे शैवपंथी झाले यावरून यांस लिंगाईत ह्मणतात.

राजाची भेट घेणें प्राप्त जाहाली. त्यावरून वस्त्रचिरगुट, घोडी मिळोन पांच रुपये दरबारखर्च जाहला. पुढें खास बारदार याजकडे पत्र देऊन आह्मांकडे पाठविला कीं या समयास आमचे ह्मणवितां तरी तुमचे हातें साहित्य होईल त्यास न चुकावें. पुढें तुह्मी घरीं गेलां त्यास तुह्मास हुजूर बोलावून दीडपरयंत घेतले त्याच्या (फाटलें) आवरावयास तीर्थस्वरूप व आपण वाडीस आलां याप्रमाणें तेथील स्थित जाहाली. पुढें आपण बहुतां दिवशीं घरीं गेलां तेव्हां आप्तवर्ग, इष्टमित्र हरखर्च मिळोन जाहाला. उपरांतीक चिरंजीव गणबाचा व्रतबंध जाहाला. गांवीं राजश्री लखबा पेडणेकर (फाटलें) चिरसंबंध घेऊन आले ते सर्वांच्या चित्तांत वर करणें प्राप्त जाहालें. त्यांचा खर्च तेथें जो पहिलें लिहिलेंच आहे. दुसरी कोकणची स्वारी तिकडून इकडे आले, इकडून तिकडे गेले त्याचा वाटखर्च वगैरे तुमचा तुह्मांस ठाऊकच आहे. मातुश्री मावशीबाई वगैरे यांसी रवाना केली व यात्रेहून आली इकडून याजबरोबर आटकें (कटक सैन्य) पालख्या, तट्टें, उंटें, स्वार जातात तेव्हां त्या राज्यांत लौकिक जाहालाच आहे. आज नूतन करावें असें जाहालें नाहीं. तेव्हां मनमानेल तसें दरबारची मर्जी रक्षण कबूल करावें लागेल. पुढें कोणा समयास काय मर्जी होईल याचा अंदेशा वागवावा लागला. मागां हलीं चार रुपये घेतले. त्याचें कांहीं स्मरण नाहीं. तेव्हां कुटुंबवत्सल ह्याच्या राज्यांतील वतनदार कोठें शुभचिंतन करीत असावें. त्याचे मुखीं श्रीराज्याचा देव उभा राहून जें करतील तें खरें. कोठपर्यंत काळजी काढावी व लिहावी. यंदां तुह्मी बहुतां दिवशीं घरीं गेलां त्यास चार दिवस राहून संवत्सर प्रतिपदेस निघून येतों ह्मणून लिहिलें होतें. त्यास आजवर दिवसगत लागली. त्याचें कारण काय ह्मणोन चिंता जाहाली होती. त्यास पेशजी तुह्मीं लिहिलें होतें कीं येदां लग्नें उरकत नाहीं. चिरंजीवाचा व्रतबंध करून आण जलद येऊन पोंचतों त्याचे मागां फिरोन तजवीज जाहाली. चिरंजीव सौभाग्यवती बायू व चिरंजीव बाळाची मूल व चिरंजीव गणबाचे लग्नें यांचा शरीरसंबंध गोमांतकीं राजश्री नारायण मुतर यांचे विद्यमानें करून तुह्मीं व कुटुंबसहवर्तमान व गृहस्थमंडळी ऐसे मांशालास जाऊन लग्नें जाहालीं. उभयपक्षीं सोहळा चांगला जाहला. दीड महिनापर्यंत जावयास व यावयास पैसा लागला. चिरंजीव सौभाग्यवती बायूस राजश्री रामचंद्र नाईक यांचे पुत्र साजर नाईक त्याच्या मुलास दिली. गृहस्थ मातबर सासू सासरा चांगले नांव लौकिकाचे मनुष्य. दुसरें चिरंजीव बाळाची (फाटलें) फोंडेकर देसाई नाइकोजी नाईक वेंक नाईक देसाई यांचे घरचे कीं काय याचें ठीकसें लागलें नाहीं. चिरंजीव गणबाची नेरलेकर यांचे घरींची मूल आणली. ऐशा तीनही शरीरसंबंध केल. आण प्रयोजनें उरकून घेतलीं. ऐसें पत्र लिहिलें. राजश्री देवजी गौळी यास तुह्मीं लिहिलें तें त्याणीं आह्मांकडे पाठविलें. त्या उपर हींही पत्रें आलीं. त्यावरून तुमच्या व तीर्थस्वरूपांच्या व सौभाग्यवती मातुश्री मथुराबाई यांच्या चित्तीं येऊन जाहालें तें फार उत्तम केलें. परंतु खर्च जाहला किती रुपये, कोठून तरतूद केली, कसें काय झालें याचें कांहीं विस्तार करून लिहिलें नाहीं. (पुढील बंद मिळत नाहीं.)

---

१. एथें देवशर्म्याची 'महाशाल' नामें वेदशाळा होती, ह्मणून या गांवास हें नांव पडलें. गोव्यांत श्रीमंगेश स्थलीं देवापुढें ज्या पुरुषास प्रसाद लावतात, तो हा देवशर्मा पुरुष होय. या देवालयाची रोजच्या माटवी पूजेची वगैरे व्यवस्था मोंगलाईंतील प्रसिद्ध कारभारी पांडोबा दुभाषी यांनीं विपुल द्रव्य खर्च करून या देवस्थानचे शिस्तीबद्दल जो बेडा बांधून दिला आहे त्याप्रमाणें आजवर चालत आहे. २. हे देसाई विजापूरकरांचे वेळचे आहेत. यांस "प्रतापराव मुख्य सरदेसाई" असा किताब चालतो.

ले. नं. १२ श्री. तारीख २९ एप्रील सन १७८२ सोमवार.

श्रीमंत राजेश्री सरदेसाई साहेबांचे सेवेसीं.

आज्ञाधारक जिवाजी बल्लाळ विज्ञापना येथील वर्तमान ता। छ० १५ जमादिलावल मुक्काम सालबाईची गडी प्रांत ग्वाल्हेर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. बहुतां दिवशीं साहेबीं कृपा करून खास बारदार याजबरोबर पत्रें पाठविलीं (फाटलें.) वाचून पाहून आनंद झाला. साहेबीं श्रीमंत राजेश्री पाटीलबोवांस पत्रें पाठविलीं तीं नेवून प्रविष्ट केलीं. करवीरकर व फिरंगी यांचा मजकूर सविस्तर विदित केला. या उभयतांचे मसलतीमुळें नवीन फौज ठेवणें प्राप्त जाहली. याजकरितां फौजेचे देणेची ओड जाली. हा प्रकार सर्व यजमान साहेबांस सांगितला. त्याजवरून आज्ञा जाहाली कीं देसींहून तिगस्तां गुजराथ प्रांतीं मोहीम इंग्रजांवर जहाली. तेथें महागाई व मसलतीमुळें लाखों रुपयांची ओड सरदारीस जाहाली. याउपरी उज्जनीस आलों तों इंग्रज यांणीं ग्वाल्हेर घेऊन सरोजपर्यंत प्रांत सर केला. त्यामुळें फौजसुद्धां इकडे येणें प्राप्त जहालें. गुदस्तां छावणी करून इंग्रजांचा पराभव जाहला. ग्वाल्हेर किला इंग्रजांनीं गोहदकर जाटास दिला. तेव्हां किला घेणें एतदर्थीं थोरली मसलत पडली आहे. यास्तव फौज दक्षणी व गोसावी नागे व बैरागी व दळ येणें व इकडील हिंदुस्थानिक राजेरजवाडे मिळून एक लक्ष फौज गुदस्तांपासून आजपर्यंत आहे. याची ओड क्रोडी रुपयांची सरदारीस जहाली. व येथें येऊन शहाग गुंतलों. याअर्थीं संस्थानिकांकडील खंडणीचा रुपया आला नाहीं. असा प्रकार आहे. देशीं असतों तर सर्व गोष्टी घडून येत्या. इकडील मसलत होऊन देशीं खासा स्वारी आली. यावर करवीरकर व फिरंगी यांचें पारिपत्य करणें अगाध नाहीं. सध्या करवीरकर व फिरंगी यांसीं पूर्ववत्प्रमाणें स्नेह राखून बंदोबस्त करून घ्यावा. सिबंदी खालीं ठेवूं नये. परस्पर विरुद्ध आपसांत करून खर्चाखालीं यावें हें ठीक नाहीं. सावंतांचा आमचा आप्तपणा; आह्मांकडून साहित्य व्हावें. परंतु येथील मसलतीमुळें तूर्तकाळीं सोय घडून येत नाहीं. याजप्रमाणें यजमानाचें उत्तर जाहालें. हल्लीं श्रीमंत राजश्री नाना फडणीस यास यजमान साहेबाचें पत्र घेऊन पाठविलें आहे. हें ध्यानांत आणून मर्जीस आलियावर त्याजकडे पाठवून साहेब बंदोबस्त करून घेतील. साहेबीं आह्मांस व तिकडील मंडळी येथें आहे त्यांस या समईं साहित्यास चुकूं नये ह्मणून आज्ञा जाहाली ऐशीयास साहेबांचे समयोचित कामास यावें हेंच योग्य, परंतु सांप्रत येथें सरकारांत ओड. नित्य गोसावी, बैरागी व दळ येणें यांचीं धरणीं होतात. त्याचे पैक्यास ठिकाणा नाहीं. तेव्हां मराठे फौजेस आज वर्षभर रुपयांस दर्शन नाहीं. साहुकार यांचीं कर्जें खाऊन आजवर चाकरी जहाली. सरकारांतून पैसा येऊन साहुकार फिटला नाहीं यास्तव आतां वीस रुपये शेंकडा कबूल करून साहुकार पैसा देत नाहीं. अशा समयांत साहेबांची आज्ञा आली त्यावरून चित्तांत परम संकोच वाटला. कीं साहेबांचे असून या समयीं उपयोगी न आलों. साहेबांस शिबंदेची ओड ह्मणून आपले पदरचे मंडळीचे हातें उपयोग होऊन यावा. एतदर्थीं आज्ञा झाली. हेंच सर्वांचें लक्ष. परंतु इकडील संकटामुळें कांहींच सुचत नाहीं.

---

१. सन १७८१ सालीं गोव्यांचे फिरंग्यांनीं वाडी सरकाराकडून डिचोली व मणेरी हे दोन प्रांत घेतले होते. पहा गोमांतकाचा इतिहास पृ० ९०. या वेळीं गोव्यास "फ्रेद्रीग उलयांव दे सौद" हे गवरनर जनरल होते. २. देशींहून तिगस्तां ह्मणजे पुण्यांतून सन् १७७९ सालीं इंग्रजांबरोबर लढाई केल्यावर गुजराथेंत गोडर्ड साहेबांवर सन १७८० सालीं मोहीम केली होती. ३. पोफम साहेबानें सन १७८० सालीं ग्वाल्हेरीवर स्वारी केली ती.

याजकरितां राजश्री त्रिंबकराव चिटणीस यांचे पत्रीं लिहिलें आहे. ते साहेबांस विनंती करितील त्याजवरून सेवेशीं श्रुत होईल हे विज्ञप्ती.

ले. नं. १३ श्रीगजानन २ सन १७८२

(यापूर्वीचा बंद मिळत नाहीं.) पुरवणी तीर्थस्वरूप राजश्री बाबूस वडिलांचे सेवेशीं विज्ञापना. सरदारीस आलां त्यामध्यें राजश्रीचें अगत्य कोणास वाजवी शिबंदीचा रुपया देणें निघाला तो येथें मिळत नाहीं. तेव्हां वरकड साहित्य कळतच आहे. आह्मांकडील पतकांस[1] आज पावणे दोन वर्षें रुपयांस ठिकाणा सरकारांतून नाहीं. आंगट कर्ज साहुकाराकडील काहाडून दिल्हें. चाकरी तर रात्रदिवस; आतेर किल्ला घेऊन आहेत. नित्य जिन उतरत नाहीं. मामलतसंबंधीं ह्मणावें तरी गुदस्तांपासून पेस्तर सालची रसद घेऊन आणखी इंग्रजपटी ह्मणोन आपणास पाहून घेतल्या. यंदा तरी पेस्तर सालचीच रसद माघ मासीं घेतली. आण तिसरे सालच्या वराता साहूकार यांच्या जाहाल्या. त्यास साहुकार ओरड करून मागतात. ज्याअर्थी दरबारीं रुपयेची ओड तेव्हां सहजच रुपयांस ठिकाणा नाहीं. ऐसा प्रकार जाहला असें असोन तुह्मी रोजगार कां करितां ह्मणोन वडील शब्द ठेवतील त्यास आपण पहिलें कर्ज घेऊन साहूकार याचे गळेफास दिले. पतकास घेऊन दिल्हे. आगाहू रुपये मामलतीचा देणें आला, तेव्हां सहजच गुतागृत जाहाली. याकरितां सोडितां नये. परंतु कोंकणांत सर्वांस रोजगाराचा श्रम, उलट लिहून समजाविलें तरी निता पडत नाहीं. त्यास काय करावें ? अशा समयास राजश्रीनें पत्रें देऊन खर्चास पाठविणें ह्मणोन लिहिलें त्यास काय काय करावें? तुह्मांकडे येथें तेथें राजश्री हिरशेट याच्या कारभारांत सर्वांबरोबर एक हजार रुपये घेतले ह्मणोन लिहिलेलें होतें. व याशिवाई मागां आणखी घेतले ह्मणोन ऐकिलें त्याजवर चिरंजीव राजश्री शिवबा घरीं गेले. हे भेटीस गेल्यावर त्याणीं घोडीं दोन नजर केलीं. याशिवाई वस्त्रें मिळोन दोन हजार रुपयांच्या घरास जाईल असें असतां आणखी पत्र लेहून मुजरत तेथें पाठविली. त्यामध्यें लिहिलें जे तुह्मीं व वरकड मंडळी आपल्या राज्यांतील याणीं खर्चाचें साहित्य करून पाठवून द्यावें. त्याजवरून गृहस्त मंडळी याणें बोललें जे पइली पटी येथें घेतली ह्मणोन श्रमी. आतां आह्मीं आणखी पाठविले तरी आमचीं घरें त्यांच्या राज्यांत आहेत. त्यांच्या विचारास येईल तेव्हां नाना प्रकारचा शब्द ठेऊन रुपये घेणार त्यास येथून पाठविल्यास संतोष होतो; ऐसा अर्थ नाहीं. तेथें कुटुंबाच्या दैवानें ज्या समयास जें होणें तें होईल. ह्मणून माघारें न टळे. मग आह्मांस येऊन अंदेशा पडला. आह्मीं त्याच्या राज्यांतील वतनदार नित्य त्यांशीं संबंध आण चिटी फिरविली तरी राजश्रींच्या चित्तास विपर्यास वाटेल. आण जे एकच शब्द ठेवून पिडापिड जाहाली ह्मणजे तुह्मांस भारी पडेल. असें कित्येक चित्तास कल्पना आणोन मग राजश्री यसोबा आपा व विठोबा दादा असे मिळोन भवती न भवती करून ठराऊन राजश्री यसोबानीं पाठविले ५०० व विठोबा दादानीं पाठविले रुपये ५०० व आह्मीं आपलेकडे रुपये १००० एक हजार एकूण दोन हजार. याच्या हुंड्या परभारें खास बारदार याजकडे द्याव्या, तर हेंही ठीक नाहीं. मग राजश्री त्रिंबकराव चिटणीस यांचे नांवें पत्र लेहून दिल्हें कीं, आपले घरीं वस्तभाव विकून रुपये राजश्री चिटणीसाचे मार्फतीनें रुपये न्हेऊन राजश्रीस द्यावे. त्याजवरून आपले नांवें पत्र येथून आह्मीं लिहिलें कीं तुह्मीं घरांतील वस्तभाव दागिने हरजागां गहाण ठेवून राजश्री सरदेसाई यांस रुपये १००० एक हजार

१. फौजेच्या तुकडीस पतक असें ह्मणत.

चिटणीस याचे विद्यमानें द्यावे. ह्मणोन आपले नांवें पत्र लेहून चिटणीस यांचे लखोट्यांमध्यें घातलें आहे. तें पत्र आपणाकडे पाठवितील. आण पत्राप्रमाणें ऐवज मागतील त्याजवरून आह्मांस येथें काळजी प्राप्त जाहाली. याजकरितां जलदी करून आजुरदार कासीद करून आपणाकडे पाठविला त्याजबरोबर हुंडी पुणेची खुशालचंद किसनदास याचे दुकानची रुपये १००० एकूण पुजे दर ५०० प्रमाणें २ पाठविले घेऊन आपणाकडे ठेवावे. आण आह्मीं लिहिलें याजवर न जावें. तेथें पत्रें गेल्यावर राजश्री काय ह्मणतात. दुसरें चिरंजीव राजश्री शिऊबा घरीं गेले तेव्हां निरोपास जातील अगर घरीं असतील आण राजश्रीनें ह्मटलें आह्मांस गरज आहे. तरी तुह्मांकडून कर्जातून ह्मणोन मागतील ऐसें कित्येक चित्तांत कल्पना येतात. त्याजवरून मुजरत हुंडी आह्मांकडे पाठविली असे. त्यास त्या राज्यांतील स्थितरीत ईश्वरच जाणे. ज्या समयास जें घडेल त्यास आपण माहित आहां तर पहिले तुह्मांकडून एक हजार घेतले. सिवाई आणखी कांहीं नसलें तरी हालीं आह्मीं आपले नांवें रुपये एक हजार याची चिटी लिहून दिल्ही त्याप्रमाणें रुपये राजश्री त्रिंबकराव चिटणीस यांचे मार्फतीनें बाजारांत वस्ता घाण ठेवून रुपये दिल्हे असें देसाई परयंत लौकिक जाऊन चिटणीस कळेसें करून एक हजार रुपये द्यावे. हुंडी पाठविली ही देऊन वस्ता सोडवून न्याव्या. येविशीं आपणास लिहून कळवावें असें नाहीं. आह्मीं परभारें केलें तर उत्तम नाहीं. याजकरितां निरउपाय गोष्ट जाणोन तुह्मांवर चिटी दिली, हरली चिंता प्राप्त जाहाली. सर्व रवाळनाथ निवारण करील. आह्मांस राजश्रीनें तेथून पत्र पाठविलें त्याची नकल व आह्मीं येथून राजश्री सरदेसाई यांस व त्रिंबकराव चिटणीस यांस पत्र लिहिलें त्याची नक्कल अशी पाठविली आहे. ही मनन करून पाहावी. सारांश गोष्ट चिरंजीव राजश्री शिऊबा गेले त्याजबरोबर पालख्या व कटक घेऊन गेल्या मागोन ती॥ मातुश्री मावशीबाई व चिरंजीव राजश्री बाळा वगैरे यासी चैत्र शुद्ध ११ रवाना केली होती. सरकार हांडेस पोंचली. तेथून चिरंजीव बाळाचें पत्र आलें. पुढें दरकूच घरीं जावयास गेलीं. याजबरोबर आणखी पालख्या व कटाक जाईल तेव्हां कोकणांत लौकिक होईल. त्यास आमचा उपाय काय सर्व गोष्ट आहेत. श्रीरवाळनाथ याणें रक्षिलें ह्मणजे झालें. चिरंजीव राजश्री जगंनाथ व पांडोबा आरवंदेकर व वेंकू मेवाडांत सुखरूप आहेत. त्यांकडील पत्रें हंमेशा आह्मास येतात. त्याजविशीं चिंता न करावी. चिरंजीव राजश्री शिवबा संवछर प्रतिपदेस घरींहून निघून वरघांटीं येणार हें वर्तमान देशीं लिहिलें होतें. त्यास आगांमागां चार दिवस लागले तर अगर निघाले तर उत्तम. नाहीं तरी राहूं नये. जलदी यावें. साहुकर याचे गळे फसवून दरबारीं रुपये दिल्हा. तेव्हां कर्जाचा पेंच तें मामलतीस माहीत. चिरंजीव जगंनाथ वहिवाट काय जाणतो ? तशाहीमध्यें करितच आहे. चिरंजीवानें सत्वर यावें हें उत्तम आहे. चिरंजीव बाळास जाऊन येथून एक मास जाहाला. त्यास घरीं सुखरूप पोंचले याचें वर्तमान लिहावें. यंदां घरास पैसा नाहीं. मुली लग्नाच्या जाहाल्या असोन लटका खर्च जाहाला तो कोठवर लिहावें ? कर्जाचे डोंगर जाहाले. ईश्वराच्या चित्तास आलें तें खरें. वडिलांकडील वर्तमान लिहावें. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मी गरोदर होती ती कोणी निघाली याचें वर्तमान लिहावें. याचेविशीं चिंता उत्पन्न जाहाली आहे. तरी सविस्तर लिहावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

चिरंजीव राजश्री विठोबा व साबाजी व नाना व विश्राम व गणबा यांसी आशीरवाद. तुह्मांकडील वर्तमान लिहावें हे आशीरवाद.

सेवेशीं साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विनंती लिहिली परिसोन लोभ कीजे हे विनंती.
राजश्री विठलराव दाजी स्वामीस साबाजी वासुदेव याचा साष्टांग नमस्कार प्रविष्ट व्हावा.

ले. नं. १४ $\frac{1}{3}$ श्रीगजानन. सन १७८२

तीर्थस्वरूप राजेश्री बाबू वडिलांचे शेवेशीं.

बाळकें जिवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। श्रावण शुद्ध १ मुक्काम नजीक धुवा प्रांत ग्वाल्हेर जाणोन स्वकीयें कुशळ लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष सांप्रत आपणाकडील काशीद येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून चिंता प्राप्त जाहाली आहे. इकडील वर्तमान तरी हमेशा काशीद जातात त्याजबरोबर लिहिलेंच आहे. त्याजवरून विदित होईल. आपणाकडील दोघे काशीद आले व राजश्री बाजीबा महाजन याचा काशीद यांजकडे चिरंजीव राजश्री बाळाचे हातचें पत्र उभयतां आपण घरीं नव्हतां वाडीस होतां ऐसे काशीद तिघे आले परंतु आपले व चिरंजीव राजश्री शिऊबाचे पत्रें दुटपी आलीं त्यांत तुह्मी यंदां तेथें लग्नं केलीं. त्याशिवाई राजेश्री सरदेसाई याणीं बोलावून न्हेऊन चार रुपये घेतले. पुढें दिवसैंदिवस मर्जी काय घेऊन परिणाम शुद्ध नाहीं. ऐसें चौवकडील अंदेशा ध्यानीं आणून श्रमांत आहां येतदर्थी सविस्तर पत्र न ल्याहावयास कारण काय? चिरंजीव राजेश्री शिऊबा बारा वर्षें होतात ह्मणोन भेटीस गेले. चार रोज राहून माघारें जलदीच येतों ह्मणोन लिहिलें त्यास पहातां दिवसेदिवस गुंतून राहिले याचें कारण काय, दरपत्र येतात, त्यांत मुहूर्त काहाडला आहे. जलदीच निघून येतों. परंतु अद्यापी आले नाहींत. याजकरितां तुह्मांकडील रात्रदिवस चिंता जाहली आहे ती कोठवर ल्याहावी? आह्मांकडील वर्तमान तरी मामलती दोन चार याची रसद साल मजकूरची साहुकारी निशा होऊन पेस्तर सालचे रसदेची साहुकारांची हालीं निशा करून यावी लागती. त्याची निकट. दुसरे किल्ले आतेर याचे चाकरीस पतक होतें; त्यास किला आमचे स्वाधीन करून किल्लेवर राजश्री देवजी गौळी यास किल्लेदार ठेविला. परंतु येथून पतकांत कर्ज काहाडून खर्चास पाठविलें पाहिजे. सरकारांतून दोन वर्षें पतकास रुपये नाहीं. ऐसें येथें चौंवकडून गुतागूत होऊन साहुकर याचे गळे फसविले आहेत. यांत ईश्वर आहेत रक्षील ती प्रमाण. मामलतीच्या बखेड्यांत न यावें तरी आपले चार शरीरसंबंध गृहस्त वगैरे याचें अन्नोदक आहे. त्यास जागा नाहीं. मागील देवघेव यामुळें दरबारी व साहुकार यांजकडे गुता जाहला. पतकसंबंधीं रुपये येथें मागावयास दरबारी मसलतीमुळें ओड तेव्हां आजच निकट करावी तरी पैशास ठिकाण नाहीं. लटकें धन्याची मर्जी आज दहा वर्षें कृपा करितो ती तोडावी यांत साध्य नाहीं. पुढें मागील चाकरीचें ठिकाण मागावयास राहणार नाहीं. येतदर्थी पेंच आला. ऐसें यंदांचे सालीं चौंवकडील जेथ जावें तेथें खर्च ऐकावा. यांत श्रीखाळनाथ परिणाम लावील तो खरा. परंतु सर्व सोडून यजमान स्वामीची कृपा संभाळून आजवर येकनिष्ठ आहों तेव्हां कृपा करितच आहे. वडिलांस कचें वर्तमान ल्याहावें लागलें ह्मणोन चिंता न करावी. सर्व आपले आशीर्वादें निवारण होईल. मेवाडची मामलतीवर चिरंजीव राजश्री जगन्नाथ ठेवून चिरंजीव शिवबा घरीं गेले. त्यांनीं जातेसमई साहुकर याच्या वराता आह्मीं येथून केल्या होत्या त्या अद्यापि रुपये पोहोंचलाच नाहीं. पुढें सालमजकूरचे रसद करणेचें अद्यापि ठिकाण नाहीं. आह्मीं तरी साहुकार याची खातरजमा केली. पुढें चिरंजीव राजश्री शिवबास यावयास चार दिवस विलंब लागल्यास मेवाडच्या रुपयांविशीं साहुकरींत पत राहणार नाहीं. ऐसें दिसोन येतें. चिरंजीव

राजेश्री जगन्नाथ व पांडोबा व वेंकोबा ऐसे मेवाडांत सुखरूप आहेत. तीर्थस्वरूप गंगाभागीर्थी मातोश्री मथुबाया माहायात्रेस जावयास आली. बरोबर पालखी व लक्षुमण खिजमतगार चिरंजीव राजश्री शिवबांनीं दिल्हा त्यांणीं घेऊन आणून पाठविलें. सरकार हांडे येथें चिरंजीव राजेश्री बाळापा यांजकडे येऊन पोहोंचली. त्यांणीं पुढें पालखी व लक्षुमण यांस पाठवून देतों ह्मणून लिहिलें आहे. आठ पंधरा दिवशीं आह्मांकडे येऊन पोहोंचेल. आह्मीं येथून मातोश्री मथुबाईस लिहिलें कीं, आश्विन मासीं यात्रेकरू जातील त्यांचे सोभतीनें जावें. राजश्री भास्कर पांडुरंग दळवी रेडकर सातबाईचे गडीवर हल्ला जाहली तेव्हां गडी घेतले बुरजावरून मोठा दगड टाकला त्याचे खालीं चीत दोघेजण जाहले. त्यांपैकीं भास्करजीस मात्र स्वास उसवास होता. सुधन्हवती आलीकडे उचलून आणिल्यावर चार घडी मात्र होते. मग आषाढ वद्य ५ चार घडी रात्रीस काल जाहला. ईश्वरें खोटें केलें. निरउपाव गोष्ट इलाज नाहीं. कळावें. चिरंजीव शिऊबा येतो ह्मणोन लिहितात. येणें घडत नाहीं. त्यास त्याचे चित्तीं येणें नसल्यास मेवाडची मामलतर दुसरे याकडे सांगु. चिरंजीव जगन्नाथ याचे हातां निभाव पडत नाहीं. ऐसें नाहीं. चिरंजीव शिऊबा गुंतून येणें घडत नाहीं यांतील अर्थ काय ? सर्व गोष्टी मातबरी व बरा रोजगारावर आहे. यंदां चौवकडून खर्चाखालीं आलों तें ईश्वर जाणतो. असो बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

चिरंजीव विठोबास व बाळास आशीरवाद उपर. बाळा तूं पत्र पाठवितोस त्यांत कांहीं वर्तमान लिहावें यास कळत नाहीं हे आशीरवाद.

शेवेशीं साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विनंती. लिहिला मजकूर परिसोन लोभ कीजे. हरघडी पत्रीं सांभाळ करीत असिलें पाहिजे हे विनंती.

लें० नं० १५ श्रीशांताप्रसन्न. तारीख १९ जून १७८४

दस्तक स्वारी राजश्री जिवाजी बल्लाळ सुभेदार[1] सरकार हांडे राजश्री कमाविसदारान व मोकासदारान व राहांदारी जकाददारान व ठाणेंदारान व चौकीदारान व मोकादमान.

देहाय सरकार मजकूर सुरूसन खमस समानेन मयां आलफ. लष्करांतून सरंजाम देशीं सावंताचे वाडीस रवाना केला असेविशीं तपशील.

७५ कुणबिणी कस सुंदर.
५ उंटें नफर सुमार.
२५ तटें सुमार.
४० बैल रास.

१४५
सदरहू बैला ये सरंजामासुद्धां पाठविले आहेत. तर मार्गीं हरयेकविसीं मुनाईम न होतां नदीनाला पार करूं देणें. जेथें रात्रीस मुक्काम करतील तेथें चौकी पाहारा देऊन आपआपली हद्द पार करूं देणें. जाणिजे छ० ३० माहे रजब म॥ सुद्र. मोर्तब.

---

१. सुभेदार महादजी शिंदे दक्षणेंत आले ह्मणजे त्यांच्या पश्चात् जिवबादादांस त्यांचें सर्व राज्य सांभाळावें लागत असे. पहा म्यालेसन साहेबांचा इतिहास व पेशव्यांची बखर पृ. १२३।१२७. आणि त्या वेळीं जिवबादादांस सुभेदार असा किताब चालत असे.

लें० नं० १६ पै० छ० ३० जिल्हेज श्री. तारीख १४ जुलई सन १७८३
सन आर्बा समानेन मयां व ऑलफ.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आषाढ शु० १५ मुक्काम वानवडी नजीक पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. श्रीमंत राजेश्री राजेबहाद्दर यांचे किल्ले व प्रांतांच्या (फाटलें) त्यास पुणेंतील वगैरे दरबारखर्च द्यावा. त्यास एखादा सावकार वळणी उभा करून देऊन सोडचिट्या पाठवून देऊन यश घ्यावें, ह्मणून वडिलीं आशीर्वादपत्रीं आज्ञा केली त्याप्रमाणें येथील प्रसंग संपादून सोडचिठ्या देऊन राजेश्री कृष्णाजीपंत वकील यास श्रीमंतांचीं व आपले सरकारचीं पत्रें देऊन राजेश्री परशरामपंत भाऊ यांजकडे रवाना केले आहेत. तेथील भाऊकडील जरब करवीरकरें यांजवर होऊन ठाणीं जलदीच हस्तगत होतील. तेथील दरबारखर्चाचा निर्वाह होऊन आला पाहिजे. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

लें० नं० १७ श्रीशंकर. तारीख ६ सपटंबर १७८४.

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री नरोबा बाबा स्वामीचे शेवेसीं.

सेवक नारो शंकरें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत भाद्रपद वद्य ७ रविवार-पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपणाकडून बहूत दिवस पत्र न येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें नसावें. हरघडी येणारासमवेत पत्र पाठवून संतोषवीत असावें. यानंतर आपली कुळबीण जकातीविसीं सामर्न गडकरी यांनीं ठेवून घेतली होती. त्यास राजश्री दत्तसेट यांनीं येथील अधिकारी याचा व आमचा कागद न्हेऊन आणिली. ती आमचे घरीं महिनाभर होती. ती हल्लीं दत्तसेट कोंकणांत जातो याजबरोबर रवाना केली आहे. पावलीयाचें उत्तर पाठवावें. तीर्थरूप राजश्री तात्या भाद्रपद शुद्ध १० पुणेंस कांहीं खासगत गेले आहेत. आपणास कळावयाकरितां लिहिलें आहे. बहूत काय लिहिणें कृपालोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

लें० नं० १८ श्रीगजानन. [१] तारीख ४ मे १७८३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें जिवबान चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ तागायत वैशाख वद्य ७ मुकाम सालबाईची गडी प्रांत ग्वाल्हेर. जाणोन स्वकीय कुशळ लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष. राजश्री यसोबा आपा याच्या काशि (फाटलें) स बारदार यासी (फाटलें) पंधरा दिवस राहिले मग श्रीमंतांस विनंती करून पत्रें वाचून दाखविलीं. व जबानी वर्तमान सांगितलें. त्यास तिघस्तांपासून गुजराथची मुलूखगिरी इंग्रजावर त्याचा पराभव केला. आतां गोहदवाल्या जाटानें ग्वालेर किल्ला इंग्रजानें देऊन गेला. तो घेणें प्राप्त. यास्तव जाटाच्या मुलखाचें पारिपत्य करून

---

१. पेशव्यांचीं. २. शिंदे सरकार. ३. पटवर्धन. ४. कोल्हापूरचे राजे. ५. पेशवाईतील प्रसिद्ध नारो शंकर राजेबहाद्दर ते हे होत. ६. कोल्हापूरकरांचे ताब्यांतील किल्ला. ७. सालबाई, प्रांत ग्वाल्हेर, एथें इंग्रजांची व शिंद्यांची जी लढाई झाली, तींत जिवबादादांनीं इंग्रजांचा पराभव करून ७०० गोरे धरिले. (पेशव्यांची बखर पृष्ठ १०३ पहा.) त्यानंतर सालबाईचा तह झाला. त्यामुळें साऱ्या मराठी राज्याचें हित झालें.

गढीच गढी घेतली. बरोबर फौज लाख आहे. नित्यखर्च भारी लाखों रुपयांचा पेंच (या पत्राचे पांच बंदांपैकीं अर्धा बंद मिळतो बाकी साडेचार मिळत नाहींत).

लें० नं० १९ श्री. तारीख ३१ डिसेंबर सन १७८३.

रोखा गांवकरान मौजे केरी ता० पेडणें. सु० आर्बा समानेन मयां आलफ. हमालिमा दिवटे व अब्दाहगिरे नि० राजश्री साबाजी रामकृष्ण व विठ्ठल नरहर केरकर ती० राजश्री दादासाहेब यांस साल मजकुरीं नव्या सनदा जमा हालीं.

५॥ नि० राजश्री साबाजी रामकृष्ण.
 ३ आब्दाहगिरा.
 २॥ दिवटे.
 ५॥

५॥ नि० राजश्री विठ्ठल नरहर.
 ३ आब्दाहगिरा.
 २॥ दिवटे.
 ५॥

११

एकूण अकरा हालीं सर्द खान मजकूर पैकीं सालमजकूरपासून तकूब आसों देणें. पेस्तर हमालिमा सनद सादर होईल. जाणिजे रा० छ० ६ माहे सफर.

ले. नं० २० (फाटलें.) सन १७८४.

बाळाजी बा (फाटलें) दि (   ) या आल (   ) तुह्मीं धणीकामाठायीं निष्ठेनें वर्तत आहां. याजकरितां तुह्मांवर कृपाळू होऊन तुह्मांस पालखी दिली आसे. तुह्मीं व तुमचे पुत्र-पौत्रादि वंशपरंपरे (   ) लवीत जाणें. पालखीचा सरंजामही आलाइदा देविला आसे. जाणिजे छ० २४ माहे रजब.

लें० नं० २१ छ० १२ जमादिलाखर. श्री. तारीख २० एप्रील १७८५.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री बाबू स्वामीचे शेवेसीं.

सांतो राम साष्टांग नमस्कार विनंती उपरी आज बुधवार प्रातःकाळ. वर्तमान यथास्थित असे विशेष. चिरंजीव यसबाचे स्त्रीस फारच दुखणें चढलें आहे. पेज घेत नाहीं. व निद्रा अर्जी नाहीं. भ्रम चढला आहे. त्यामुळें बडबडती. काल देव काढले होते. बरें करितों ह्मणोन सांगितलें आहे. सर्व भरवसा श्रीचा. काय करील तें खरें. सोहिरोजी व नारिंग्रेकर वगैरे वैद्य मिळालेले आहेत. दैवीक व औषधी उपाय मनास आणितों. आजचा रोज घराकडे राहून उपाई करावा असा मानस त्यास श्रीमंत यांचें पत्र वाडीस जलद येणेंविशीं आलें होतें त्याकरितां यावें लागतें. तशांत मोर्चेलाचा अंगिकार आज किंवा उद्यां करणार तें कळलें नाहीं. राजश्री चिटणीस यांस आहे. उत्तर आलेवर निश्चय कळेल. आज मुहूर्त असला तर सर्व काम टाकून यावें

१. जिवबादादांचे बंधु नरोबा दादा यांस वाडी सरकारांतून ही पालखी मिळाली होती. पहा पत्रें नंबर ९५।९९.

प्राप्त आहे. नाहीं तर उद्वेक येतों. श्रीस्वामी आज भोजनोत्तर निघोन पुढां जातील. कवळेस जाणार आहेत. राजश्री देवबा आना ह्माजन येणार होते. आले असतील तर कळवणें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

राजश्री देवबा आना ह्माजन स्वामीस साष्टांग नमस्कार विनंती. सविस्तर राजश्री बाबू यांस लिहिल्यावरून कळेल. लोभ करावा हे विनंती.

ले० नं. २२ ( ) तारीख २१ आगष्ट १७८५.

बाळकें जगन्नाथानें त्रिकाळ चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता० श्रावण वद्य १ रविवार मु० लष्कर नजीक श्रीक्षेत्र मथुरा जाणोन वडिलांचे आशिर्वादें बाळकाचें वर्तमान यथास्थित आसे. पत्रें ( ) वर्तमान लहान बालकाचा सांभाळ जाहला पाहिजे. यानंतर आह्मांकडील वर्तमान तर इस्मान बेग, व गुलाम कादर उभयतां आगरेच्या किल्याबाहेर तीन कोशांवर फौज घेऊन किल्ले यास मोरचे लाविले होते. त्यास तीर्थस्वरूप राजश्री दादा दरोबस्त फौज घेऊन आगोदर एक महिना उभयतांच्या पारपत्याकरितां आले होते. मागोन नवी फौज देशाहून आली दहा हजार. तेव्हां श्रीमंत यजमानानें कृपा करून मजलाही बरोबर पाठविलें. आणि मी यावयाचे अगोदर वडिलांनीं आमित्रासीं तीन वेळ लढाई घेतली तेव्हां येकवेळ वडिलांच्या आंगावरून तोफेचा गोळा गेला. तेव्हां दोन दिवस वडिलांस श्रम जाहली. तेव्हां बसायाची घोडीस गोळी कपाळावर चा ( ) डी दुसरीवर पडली. ऐसें मोठें काम खोटेंच जाहलें होतें परंतु श्रीचे कृपेकडून सर्व कुटुंबाचे आशीर्वादें वडिलांवरील अरिष्ट गेलें. चवथी लढाई घेऊन ( ) उभयतां आगरेवर मोडले ते ( ) आहे. त्यास आपली फौज वीस हजार त्याचे पारपत्यास गेली आहे. बाकी कांहीं मु॥ मजकुरीं फौज आहे ती घेऊन जाणें आणि दुष्टाचें पारपत्य करणें त्याजवरून आह्मीं उदे दिल्लीस जातों. वडिलांकडे कोणी जाईल कासीद तर आह्मी दिल्लीस जातों ( ) कागद वडिलांकडे कैसा जातो. सुखरूप आहेत ह्मणोन लिहितील यास्तव हें लिहिलें आहे. वडील ह्मणतील जे इतके दिवस पत्र पाठविलें नाहीं आतां पत्र पा॥ त्यास वडिलांस पत्र न लेहावें यास कारण काय ? त्यास कारण हेंच कीं, वडिलांवर यजमानाची इतराजी जाहाली. त्या दिवसापासून दिवस श्रीनें वाईट आणिले होते. परंतु कांहीं कुटुंबाचे दैवयोगेंकरून श्रीनें कृपादृष्टीनें सुभ दिवस आणले आहेत. येजमान कृपा चांगली करितात. परंतु रुपये नाहीं. सांप्रत पलटणें जैनगरास बदलोन गेल्यामुळें सरकारांत पैसा नाहीं. येसी आज वीस महिने होत आले. त्याजमुळें कांहीं खर्चाची आनकूळता घडोन आली नाहीं. आतां वडिलांच्या चित्तांत चिरंजीव राजश्री आंतोबा भाऊ दसरा होतांच कोंकणांत पाठवोन द्यावे, ही योजना आहे. त्या समयीं खर्चाची आनकूळता घडोन येईल ती वडिलांस कळेल. सरकारांत पैसा नाहीं त्याजमुळें वडिलांकडे शिपाई यांचा तकादा भारी आहे. रोज उठोन धरणीं होतात. कारण रुपया नाहीं. श्रीकृपेकडोन दिल्लीचा बंदोबस्त जाहालेवर तकादाही होणार नाही. श्रीमंतांची कृपा पूर्वींपेक्षां आतां वडिलांवर येथास्थित आहे. परंतु मागील हिशेबाचे फडशा नाहींत. आतां करून घ्यावे, तर मोहिमेचे दिवस आडवून घेतात. येसें यजमानही चित्तांत ह्मणतील. वरकडही मुत्सदी ह्मणतील. आण आपल्यालाही योग्य नाहीं. ह्मणोन तकूब ठेवले आहेत. मोहीम फत्ते होतांच हिशेबाचा फडशा

१. श्रीमत्पूज्यपाद स्वामी गौडपादाचार्य सारस्वत ब्रह्मवृंदाचे गुरु, वास्तव्य श्रीमठ कैवल्यपूर, श्रीमठ खानापूर, इ० इ०.

होईल. जावदेकडील वर्तमान तर सर्व सुखरूप आहेत. तीर्थस्वरूप मातोश्री ताईस गुदस्तां पुत्र जाहला तो येंदां देवी येऊन मृत्य पावला. इतकें ईश्वरें वोखटें केलें. ईश्वरसूत्रास इलाज नाहीं. जावदेकडील मालांत पंनास हजार रुपये रसद देऊन केली होती. इतकियांत तिकडे रांगडे होते त्याणीं हमामा करून जावद घेतली होती. रुपये बुडायेस जाहले होते; परंतु ईश्वर फिरोन रांगड्याकडून ठाणें जावदेचें घेतलें. त्या रुपयांपैकीं एक रुपया आला नाहीं. सांप्रत रांगडेची फौज व आपली फौज त्या राज्यांत दोन महिने राहिलेमुळें तमाम गांव ओसाड जाहाले. वसूल पैसाही देत नाहीं. परंतु जागा आपली आपलेकडे मात्र आली. आमची व चिरंजीव राजश्री बाळोबाची यजमानांनीं बंदोबस्ती चौघे मुतसदी आहेत. त्याप्रमाणें आबरू. योग्य खर्चाचा बंदोबस्त करून दिल्हा आहे. वडिलांस कळावें. वरकड वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री दादा लिहितील त्याजवरून कळेल. लष्करांतील इष्टमित्र सगेसोयरे सर्व सुखरूप आहेत. चिरंजीव राजश्री बाळापा यास हांडेची मामलत पहिली होती जाहली. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

चिरंजीव राजश्री विठोबा व चिरंजीव साहबाजीस आशिर्वाद उपर. सर्व वडिलांच्या पत्रावरून कळेल.

ले० नं. २३ श्रीगजानन. सन १७८५.

राजश्री नारोबा बाबू स्वामीस.

बळवंतराव रघुनाथ व साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी तागायत ( ) जमादिलाखर लिहिलें कुशळ जाणोन येथास्थित असों विशेष. श्रीमंत राजेश्री सरदेसाई यांसी पातशाही किताबत घेऊन आलों हें वर्तमान पेशजी श्रीगोंदेहून लिहून पाठविलेंच आहे त्याजवरून कळेल. आतां आह्मी आकेरीस आलों. पुढें जी आपण राजश्रीस पुसून आज्ञा करणें ती करावी. सिरिस्ता तीन कोश आलें पाहिजे. याजकरितां आपण राजेश्रीस पुसोन पुढें आह्मांकडे जलद पत्रदर्शनीं यावें ह्मणजे आह्मांस सर्व समजेल. व आह्माकडील सविस्तर आपणास विदित करूं. तरी पत्र पावतांच आधीं आह्मापाशीं यावें. तुह्मी वाडीस आलां नसेल तरी पत्रदर्शनीं वाडीस येऊन आह्माकडे जलद यावें. नाहीं तरी तुह्माकरितां खोळंबा पडेल. याजकरितां हें पत्र लिहिलें आहे. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

ले० नं. २४ श्री. तारीख २९ सपटंबर स० १७८५.

राजश्री बळवंतराव रघुनाथ दळवी आरवलीकर यास.

राजे खेमसावंत भोंसुले बहादर सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय. सुरुसन शितसमानीन मयां अलफ. हजरत पादशाई यांजकडून दिलीहून मरामत व मोरचलें पाठविलीं. तीं तुह्मी घेऊन हुजूर आलां याजकरितां तुह्मावर कृपाळू होऊन तुह्मास मौजे रेडी व आरवली व बागायत आरवली तर्फ

१. हे दळवी सारस्वत ब्राह्मण ज्ञातीचे होते. यांजबरोबर जिवबादादांनीं वाडी सरकारास मोरचलें वगैरे सरंजाम पाठविला होता. पहा पत्रें नं.२८।३०.हे जिवबादादांकडील मानकरी फार अभिमानी असल्याची ख्याति आहे. हे एकदा वृद्धापकाळीं आरवलीस आपले घरीं आले होते. त्या वेळीं यांचा मुलगा राघोबा दळवी वाडी प्रांतीं प्रसिद्ध वजनदार असल्यामुळें त्यांचे घरीं आलेले लोक राघोबा दादांशीं गोष्टी करीत बसत. बळवंतराव हे लहानपणापासून या प्रांतीं नसत, हिंदुस्थानांत असत. यामुळें त्यांजकडे आलेले लोक बळवंतरावजीस "राघोबा दळवी यांचे वडील (बाप)" अशा नांवानें संबोधीत. हें त्या मानी पुरुषास न खपून व मुलाचे नांवावर आपण प्रसिद्ध होण्यासाठीं राहणार नाहीं ह्मणून ते ह्या वयांत सुद्धां हिंदुस्थान प्रांतीं राहण्यासाठीं खुषीनें निघून गेले.

आजगांवपैकीं सालमजकूरपासून इनाम करून दिल्ही असे. त्याचे कुंबळे बरहुकूम बखेर ठिकाणें.

ठिकाण आंबेची भाटी मौजे रेडी. आज सर्द ८८।१ नारळ ४२२ फणस होन ८—।.

मौजे आरवली. आज सर्द. नारळ. फणस होन.

८४ १९९ ०

३३ दारवळ बाबाजी चिपकर.

३३ नारळ. ८४ सर्द.

५ तळेवरील ठिकाण

१५० ठिकण आंबेचा दळा

१९९ ८४

ठिकाण तळी सोनसुरें बागायत आरवली

१।५ १५ ०

१।१७।१ ६२५ ८—।.

एकूण सर्द कुंबळें पांच खंडी सवासतरा कुडव एक शेर व नारळ कुंबळें सुमारें सवासाहासीं. व फणस जमा होन तीन येणें प्रमाणें जाबतेस जमेस आहेत. दस्तिबाद देऊन सदरहू ठिकाणें कुलबाब व कुलकानु जळ, स्थळ, काष्ठ, पाषाण, तृणादिकरून दिली असे. तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें साल दरसाल भोगवटा करीत जाणें. याविसीं गांवास व बागायतास आलाहिदा सनद सादर केली असे. सुखी भोगवटा करीत जाणें जाणिजे छ० २४ माहे जिल्कांद.

(बार सुद) (शिका आहे)

लें० नं. २५ श्री. तारीख २९ सपटंबर १७८५.

राजश्री साबाजी वासदेव आरवलीकर यास.

राजे खेमसावंत भौंसुले बाहादर सरदेसाई प्रागणें कुडाळ व माहालानीहाय. सुरुसन सितसमाने मयां आलफ. हजरत पादशाही यांजकडून दिल्लीहून मरामत व मोरचलें पाठविलीं तुह्मीं घेऊन हुजूर आलां याजकरितां तुह्मांवर कृपाळू होऊन तुह्मास तुमचे मिरासेचीं ठिकाणें मौजे आरवली तर्फ आजगांवपैकीं सालमजकुरापासून इनाम करून दिल्हीं असत. त्याचें कुंबळें .बरहुकूम बखर. नारळ कुंबळें. फणस ठिकाण गाडेकर पैकीं ज( )६३३ ठिकाण गाडेकर निमे. ८७० ठिकाण गडदे निमें. मा होन ८।—. एकूण नारळ कुंबळें पनरासीं तीन व फणस होन कुंबळें गांवीं जाबतेस जमेस आहे. तें दस्तिबाद देऊन सदरहू ठिकाण कुलबाब कुलकानु जळ, स्थळ, काष्ठ, पाषाण, तृण आदि करून इनाम करून दिल्हें असे. तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें साल दरसाल भोगवटा करीत जाणें. याविसीं गांवासही आलाहिदा सनद सादर केली असेत. सदरहू भोगवटा करीत जाणें. जाणिजे. रवाना छ० २४ जिल्कांद. (शिका, मोर्तब.)

लें० नं. २६ श्रीशंकर. तारीख २५ फेब्रुवारी १७८६.

तीर्थस्वरूप बाबू वडिलांचे शेवेसीं.

अपत्यें जिवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २५ रबिलाखर मुकाम दरकूच प्रांत जैनगर[3] जाणोन वडिलांकडील क्षेम लिहाण्या आज्ञा करावी. विशेष

१. ही सनद तारीख २ माहे अकटंबर सन १८३४ रोजीं मालवण सुभ्यांत नोंदली असून त्याप्रमाणें हल्लीं इंग्रजींतही हीं इनामें चालत आहेत. याचप्रमाणें अंताजी रामचंद्र रेगे आरवलीकर यांसही इनाम चालत आहे. २. याप्रमाणें इंग्रजींत इनाम अद्याप चालत आहे. ३. "फिरती स्वारी जैपुराकडे गेली." पहा वि० ज्ञा० वि० पु० ११, पृ० ९१, व सनद नंबर ४३. ही ती स्वारी होती.

येथील वर्तमान आलाहिदा पत्रीं लिहिली आहेत. त्यावरून विदीत होईल. दुसरा मजकूर भिकाजी पांडुरंग आरवदेकर यास नवज्वर येऊन गोवर्धनाचे नजीक पौष्य व॥ ४ मंगळवारीं ज्वर आला तो पोष व॥ १० मंगळवारीं देव आज्ञा जाहाला. उपाय बहूत केले. ईश्वरसूत्रास इलाज नाहीं. गरिबांचें घर बुडालें. इलाज काय? त्याचें उत्तरकर्म धर्मपुत्र करून दाहा दिवसांचें कर्म केलें. सपिंडी मात्र राहिली. त्यास सांगून त्याचे मुलाकरवें करावी. त्याचे घरीं आपण जाऊन त्याचें समाधान करावें. उपाय आयुष्यापुढें कांहीं नाहीं. हालीं त्यास खर्चास हुंडी रुपये पांचशेंची केली आहे. ती त्याचे घरीं प्रविष्ट करावी. त्याचे हजार रुपये आजपर्यंत रोजगारसंबंधी होते. त्यापैकीं पांचशें रुपये पाठविले बाकी पांचशें राहिले ते मागाहून पाठवून देऊं. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विज्ञापी.

ले० नं. २७ पौ छ० ३ शाबान. श्रीगजानन. १/२

तीर्थस्वरूप राजेश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें जिवबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ५ रजब मुक्काम गुडें प्रा० जैपुर लष्करांत जाणोन सर्व सुखरूप असों विशेष. वडिलांकडून पत्र छ० २३ जमादिलावरचें पुणेंस चिरंजीवापाशीं आलें त्याणीं डाकेंतून चिरंजीव राजश्री शिउबापाशीं आजमेरीस पाठविलें. त्याणीं आह्माकडे पाठविलें, तें प्रविष्ट जाहलें. लिहिलें वर्तमान कळलें. पत्रीं वडिलांचे शरीरीं त्रुशा लागती व लघुशंखा होती. ताप येतो. शरीर आशक्त जाहलें बाहेर फिरवत नाहीं. ह्मणून पत्रीं लिहिलें तें ऐकून परम चिंतेंत पडलों. रात्रंदिवस चैन पडत नाहीं. ऐसें यास इकडून मुलें माणसें अवघीं रवाना करावीं. त्यास चिरंजीव राजश्री शिऊबाचें पत्र आलें जे चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाईस रवाना करणार. त्याजवरून चिरंजीवास अजमेरीस पत्र पाठविलें आहे. परंतु चिरंजीव बाळाचें ह्मणणें देसीं महर्गतामुळें कुटुंबाचा निर्वाह होत नाहीं. याजकरितां चिरंजीव बाळास येथून सडें रवाना करूं. मुहूर्त छ० ७ रोजीं निघावें हा निश्चय करून निघणार. येथून आजमेरीवरून जावदेस जाऊन चिरंजीव विश्रामास घेऊन हांडेचे घाटीं दरकूच येऊन वडिलांपाशीं पोचतील. आपण वडिलांचे मागां संसार चालवून पुढें उपजीविका मुलांबाळांस करून ठेविली. कोणाएकास वडिलांनीं संकष्ट पडूं दिलें नाहीं. त्यास आमचे सर्वांचे दैवेंकरून आपणास लवकर आराम होवें. ही त्रिकाळ ईश्वराकडे मागित आहों. सर्वांचें दैव चांगलें असतें तरी गुदस्तां घात न होता. त्याच दुःखेंकरून शरीरास वडिलांचे रोग प्राप्त जाहला. श्रीदेव रवाळनाथ एक वेळ आपणास उतार देईल तो दिवस सुदिन. ब्राह्मणास अनुष्ठानास अर्घ्यप्रदानास लावावा. आणखी ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणें दानधर्म करावा. येथें आह्मींही अनुष्ठानास ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणें लाविलों. एक वेळ आपणास आराम जाहल्याचें वर्तमान वडिलांचे हस्ताक्षरचें पत्र येईल तो सुदीन. मागां हें वर्तमान वडिलांस लिहिलें तें आपण अगधींच उडवून दिल्हें. असो. दैव आमचें. राजश्री वेंकबा रांगणेकर व रामेश्वर आकेरी याचे देवळाविसीं लिहिलें. त्यास येथून चिरंजीवापासीं पत्रें पाठविलीं. त्यास खर्चास देऊन त्यास आपले मर्जी येईल त्याप्रमाणें त्यास देवावे. वडिलांची भेट एक वेळ घ्यावी हा हेत. परंतु आमचे दैवींकरून आजपर्यंत घडलें नाहीं. आशा शरीरास समाधान नाहीं. हें पत्र पाहतांच खबर लिहा. ईश्वर उत्तम करील तो दिवस उत्तम. हे विज्ञापी.

लें० नं. २८ श्री. सन १७८६.

(याचे पूर्वील बंद मिळत नाहीं.) पुरवणी—तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं. ज्यास मागां किंचित तिनशें रुपये लागत होते; त्यास या दिवसांमध्यें सेंपंनासांत यात्रा घडली. त्यास आपण आलां असतां आण दाहा हजार रुपये खर्च करावे असें चित्तीं असतें तरी साहित्य होतें. तुह्मी ह्मणाल कीं कर्ज वारावयासीं रुपये मिळत नाहीं तेव्हां यात्रेसच कोठून रुपये मिळणार तर कर्जाची गोष्ट आणखी परंतु (फाटलें) व याची सर्के ( ) नारानी खोटी दिल्ही त्यास आपला उपाय काय ? दुसरें आरवदेस बाग श्रीमंत राजेश्री सरदेसाई यांणीं इनाम करून दिल्हें तेथें घर बांधावयास व तळीं बांधावयासी हजार बारासें रुपये लागतील, ह्मणोन लिहिलें. त्यास खर्च करून चांगलें घर बांधावें. तळीं तर बांधलींच ( ) तीर्थस्वरूप राजेश्री दादांचें पत्र लष्करांतून आलें. त्यांत लिहिलें आहे कीं, राजश्री सरदेसाई यांसीं पादशाहाकडून खेमसावंत राजा बाहादूर व मोरचलें व खलत ऐसें करून घेतलें आहे. सनदा पत्रें करून आणून रावटीस ठेवि[illegible] आहेत. मागून बळवंतराव दळवी यासीं घरीं रवाना करणार. त्याजबरोबरच पाठवितों ह[illegible] लिहिलें आहे. लष्करचीं पत्रें आलीं. तींच बजिनस आपणाकडे पाठविणार होते ( ) तू ( ) संबंधींचा मजकूर होता. याजकरितां पाठविलीं नाहीं. केरीचें खाजन व्हाळसुद्धां कटबाण करून घ्यावा. आणि बाबऱ्याकडून बंदरपावेतों बांध बांधावा. चिरेबंदीबाहेरून दोन हात बांधावा लागेल. या कामास अजमास सात आठ हजार रुपये तरी लागतील. यांत नफा ( ) देखील ( ) हें खरेंच परंतु आपला गांव लहान तेव्हां खाजनाचा बांध आह्मीं लिहिल्याप्रमाणें घेतल्यावर गांवही थोर दिसेल. बांध बांधावा तो पंधरा हात रुंद धरावा लागेल. मानसा दोन बांधाव्या लागतील. बांधावर कवाथे लावावयासीं होईल. आंतील बांध आहेत त्यावरही कवाथे लावावयासी होईसारखी तरतूद असावी. खाजनासंबंधीं जेथें खारें पाणी खाजनावरतां पोहोचता व तेथें दुसऱ्याचा अमल न राही असें होईल तर करून घ्यावें. तुह्मी ह्मणाल कीं, कर्जदारास रुपये द्या (यापुढील बंद मिळत नाहीं).

लें० नं. २९ श्रीशंकर.

तीर्थस्वरूप राजेश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० रबिलाखर मुक्काम लष्कर प्रांत जैनगर. वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. येथील वर्तमान सविस्तर तीर्थरूपांचीं आलाहिदा पत्रें लिहिलीं आहेत त्यावरून विदीत होईल. येथें वडिलांस खर्चाचा व शिलेदार यांचा तकादे फुडां घरादाराचें कांहींएक सुचत नाहीं. नित्य उठून धरणेंपारणेंसीं गांठ पडली आहे. त्याहीमधें वडिलांनीं लिहिलें होतें जे आपण कोणीकडे उठून जातों तेव्हां हे श्रमामध्यें हा श्रम आधीक जाहला. याकरितां हालीं खुशालचंद आबादास याचे दुकानच्या पुणेच्या दुकानास चिठ्या बीतपशील.

५००० १६०० ७५० १००० १७५० ८०० ९०० १५००
१७०० ०

१५००० एकूण हुंड्या पुरज नऊ. येकूण पंदरा हजारांच्या पाठविल्या आहेत. हे घेऊन

१. केरीनजीक नदीच्या आलीकडे असलेल्या आरवंदें गांवीं हें घर होतें. हल्लीं त्याचें बांधकाम व तळ्या वगैरे पाहाण्यांत येतात. व त्यासभोंवतीं दुर्ग आहे.

एकवेळ झाडेनसीं कर्ज न ठेवतां गुत्ता वारून देविला पाहिजे. दिवसेंदिवस दरबारची मर्जी कठीण. याकरितां विनंती लिहिली आहे. तशाहीमधें हालीं आंतरवेदचे पौो आह्मांस सांगितले आहेत. पांच लाख रसद दिली पाहिजे. पैसा तर कोठें मेळेना. ऐसा प्रकार घडोन आला आहे. वडिलांचे आशिर्वादें घडेल तें खरें. पो पैकीं पिरोजाबाद व शाहाजाबाद येथें तीर्थस्वरूप राजेश्री बापूस पाठविले आहेत. व आतुरली वगैरे तीन माहाल येथें तीर्थस्वरूप राजश्री कृष्णोबा भाऊ कालेलकर यांस पाठविले आहेत. मामलती नको ह्मणून फारच आग्रह केला परंतु गळेसच बांदावयास लागले. मर्जीकरितां कराव्या लागल्या. बहूत काय लिहिणें बाळकावर कृपालोभ कीजे हे विज्ञापना.

याप्रमाणें पत्रें पाठविलीं.

लें० नं. ३० श्री. आजम सन १७८६.

राजश्री जिवबादादा यांस पत्र विशेष. आपणाकडून बहुत रोज पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तर ऐसें नसावें. हरघडीं पत्रीं भेटीचा लाभ देत असिलें पाहिजे. विशेष. नंतर आमचे ज्ञातीमध्यें एक एका मनूंत एक एक तपस्वी पुरुष निर्माण होऊन संस्थानाचें साहित्य करीत आले. पैले मंत्री यांणीं बहुतच काम केलें. पुढां रामचंद्र बाबा द्रव्यानसीं व फौज पाठवून आंग्रेकडून संस्थान घेऊन दिल्हें. पुढां विठ्ठल विश्राम नारो त्रिंबेकाकडून किल्ला घेतला. व सिद्धगड घेतला ही गोष्ट संभाळून द्रव्याचेंही साहित्य करून उपकार केला हें तुह्मांस दखल. या मनूमधें आपण जाहलां. सर्व प्रकारें अभिमान धरित गेलां पुढां पादशाही मरातबही पाठविली सर्वामध्यें आनंद होऊन हर्ष जाहला. परंतु राजश्री हरीपंत तात्या यांची चित्तशुद्धता श्रीमंत राजश्री पाटिलबावा यांकडेस नाहीं. याकरितां करवीरकरांस साहित्य देऊन फौज रवाना करून प्रांतांत उपद्रव केला. टाणीं व कांहीं प्रांत घेतला तेव्हां सर्वत्रांत बोलणें जे. राजधानीचा खर्च चालेना. केरकर यांणीं मोरचलें आणून येवढा अनर्थ केला. हें वर्तमान ऐकून राजश्री नरोबा बापू यांस क्लेश प्राप्त जाहला. ते समई आह्मी त्यांचे ह्मणून दरबारीं घेतले. तेव्हां समई चुकूं नये ऐशी गोष्ट ध्यानीं आणून आपलें व त्यांचें स्मरण करून या कामांत पडलेपासून आहे त्या प्रांतांत दोन सालें खर्च चालला आण त्रास भोगला नाहीं. किंनिमित्य ? तुह्मी पुण्य पुरुष बापू यांचा वरदहस्त आह्माठायीं या सुकृतें दिवस गेले. आतां तुह्मी मसलत पुणेकराकडे आर्जवदशा करून काम होईल ह्मणून पाहातां ही गोष्ट घडणार नाहीं. फडके कांहीं घडूं देणार नाहींत तेव्हां किल्ले भरतगड व सिदगड नरसीगड आह्मी घेऊं. युद्ध होणार नाहीं. एकदम फौज घेऊन कोलापुराहून येतील त्यांस जतिजा देऊन घालऊस फौज पाठगांवास पाहिजे. याविसीं द्रव्यबळ पाहिजे. तर श्रीमंत पाटीलबावासीं विनंती करून अगर सावकाराकडून सर्व मंडळी मिळोन कार्य केलें तर टाणीं प्रांत घेऊन कोलापूरपर्यंत मुलूख मारून तह करूं. याजउत्तर आमचा अंत पाहावा ऐसें नाहीं. आपले पुण्येंकरून द्रव्यसामर्थ्य जाहलें. हा मनसबा सिद्धीस जाईल. भगवंतें द्वारका रचिली तद्वत बापूंनीं केलें. हें आपण एकवेळ पाहिलें ह्मणजे सार्थक श्रमाचें जाहलें. आण लिहिले अन्वयें साहित्य जाहलें. या संस्थानाचा बचाव होऊन यश जोडलें. दोन गोष्टी आहेत. सिद्धीस नेणार स्वामी समर्थ आहेत. विशेष लिहिणें तरी सुरू आसावें.

१. परगणें. २. तुळाजी आंग्रे चढून आले होते. ग्रंथमाला अं. ७० पृ. १४८ व भारतवर्ष भा. पु. पृष्ठ ५६. ३. हा एक पेशव्यांचा सरदार होता. पत्रें व यादी पृ. १४८.

ले० नं. ३१ श्री. ता. ८ अकटंबर १७८७.

रोखा गांवकरान मौजे केरी तर्फ पेडणें सुरुसन समान समानेन मया अलफ. राजश्री नरहर गणेश केरकर यांणीं हुजूर विनंती केलीजे. मौजे मजकुरीं कुंबळें खेरीज जमीन खाजन काजर-कोंड व भरवड नदीचा आंतोड पडंग आहे. त्यास मक्ता कुंबळें करार करून दिलेया आपला खर्च लागेल तो लाऊन खाजन कीर्द महामुरी करून सर्द कमाविसी व कवाथेची लावणी करून कुंबळें करार केलेचें बेरजेप्रमाणें वसूल देऊं ह्मणून. त्यावरून मनास आणून खाजनाचे बांधास व कमाविसीस मेहनत भारी व खर्च मोबलग लागतो. ऐशी चौकसी मनास आणून त्याचे मक्ता तुह्मीं मशारनिल्हेस करार करून दिलें असे. त्याच्या चतुःसीमा बद्दल बखर. १ पूर्व दिशा मशार-निल्हे यांचे ठिकाण बाईगणीं याचे मेरेनमेर. १ पश्चिम दिशा बांबराचे मेरेनमेर. १ उत्तर दिशा नदीचे मेरेनमेर. १ दक्षिण दिशा गांवीं ठिकाणें व जुने खाजनाचे मेरेनमेर.

येणेंप्रमाणें चतुःसीमेमधील पडंग जमीन आहे. त्यांत सर्दकमाविसी व माडांची लावणी देखील बांधास करील त्याचा मक्ता सर्द व नारळ कुंबळें जमा होन ७८। हे लिहिले करार करून दिलें असे पेस्तर सालपासून गांवांकडेस जमा धरून साल दरसाल वसूल घेत जाणें, आण खाजन मजकूर याकडे सर्व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस चालू देणें. सदरहू कुंबळें करार करून दिलें याजवर जाजती होणार नाहीं. सनदीची तालीक घेऊन असल सनद मशारनिल्हे याजकडे भोगवटीस असों देणें. जाणिजे छ० २५ जिल्हेज.

ले० नं. ३२ श्रीशंभु. तारीख २ फेब्रुवारी सोमवार १७८८.

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरीकर यांस हुजुरची आज्ञा सुरुसन समान समानीन मयां आलफ. करवीरकरांकडील जमाव पेंडार व स्वार ऐसे येऊन आजगांव व तळवडें यां तर्फेत कूल रयतेचा दाणा अगर गुरें वगैरे लुटून नेतात. अशास तुह्मांकडील लोक चांगले निवड असे पन्नास काढून ते येतात त्याची पाळद राखून लोकांस दहशद अडचणचे असे जागे धरवून त्याचें पारपत्य करवणें एविसीं घडेचा अवकाश करून न राहणें, रवाना छ० २५ माहे रबिलाखरचें पत्र.

ले० नं. ३३ माहे सपटंबर सन १७८८.

(याचे पूर्वीचे बंद मिळत नाहींत.) पत्र लिहिलें होतें कीं आह्मी येतों. हिशोबाकरितां त्यास त्याचें पत्र आलें कीं दसरा जाहलेवर लेहून पाठवूं तेव्हां यावें. तुह्माकडेस कांहीं खर्चास पाठवावें तर परगणेंहून पैसा एक येत नाहीं. साहुकार आमचे पहिले होते. त्यांचेंही दिवाळें या दंगेमुळें व जप्तीमुळें जाहालीं. आह्माहून ते बुडाले. तेव्हां अनुकूळता घडून आली नाहीं. दिपवाळी जाहलेवर पाठवूं. तुह्मांकडे दंगा कोकणांत जाहाला. त्याजमुळें तेथीलही खराबी जाहाली असेल. हालीं केरीसच आहां किंवा कोठें आहां हें लिहावें. चिरंजीव राजश्री बाळकृष्ण याचे डोळे येऊन डोळेस अपाय जाहला. औषध उपाय केला; परंतु गुणास आला नाहीं. अद्यापी औषध चालत आहे. पुढें पाहावें. मुलें माणसें घरीं पाठवावें तरी खर्चाची अनकूलता नाहीं. दिपवाळी जाहलेवर पाहावें. तीर्थरूप राजश्री दादांकडील वर्तमान बजिनस पत्रच पाठविलें आहे. त्याजवरून कळेल. बहूत काय लिहिणें लोभ असों दिला पाहिजे हे

विज्ञापना. दादांचें पत्र छ० १३ जिल्हेजचें मथुरेचे मुक्कामींचें आलें. त्यांत लिहिलें आहे कीं, पुढें सडी फौज दिल्लीस राणेखानभाईबरोबर पाठविली आहे. त्याजबरोबर जगोबास पाठविला आहे. व आह्मी चिरंजीव बाळास श्रीमंतांकडेस ठेवून दोचवरोजीं आणखी फौजेंतच आह्मी जातों ह्मणून लिहिलें आहे हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री विठोबास आशिरवाद आह्मांकडील वर्तमान सर्व तीर्थस्वरूपांस लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. तिकडील सविस्तर वर्तमान कचें लिहावें हे आशिरवाद.

ले० नं. ३४ श्री. ता० २६ दिसेंबर सन १७८८ शुक्रवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

आपल्य बाळानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० २७ रबिलावल मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा येथें वडिलांचे आशीरवादें करून सद्दमंडळी सुखरूप (फाटलें) आशीरवादपत्र येऊन सांभाळ जाहला नाहीं. तेणेंकरून चित्त उदास आहे. तर असें न करितां हरघडी येणाराबरोबर आशिरवादपत्र पाठऊन सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर आषाढ मासीं इस्माल बेग व गुलाम कादर यांस लढाईत आगरेवर मोडून श्रीमंत राजश्री पाटील साहेब मथुरेस आलेउपर इस्माल बेग व गुलाम कादर अंतरवेदींतून दिल्लीस गेले. तेथें जाऊन मशारनिल्हे गुलाम कादर याणें हजरत पादशाहासीं बेअदबी करून हजरतीचे डोळे काहाडले. आण पाछाई मत्ता हस्तगत करून किल्लेंत राहिला. तेव्हां येथून श्रीमंतांनीं राजश्री राणेखानभाई व तीर्थस्वरूप राजश्री दादांबरोबर फौज देऊन दिल्लीस रवाना केलें. तेव्हां हे दिल्लीस जातांच इस्माल बेग तों येऊन भेटला. (फाटलें) याचा इरादा केला. तेव्हां बाहेरून आपले फौजेंचे मोरचे लागले. चार रोज गोळागोळी जाहली. उपरांतिक अगोदरच गुलाम कादर नावेंतून यमुनापार जाहाला. त्यावर हल्ला करून किल्ला घेतला. गुलाम कादर पार दाहा हजार फौज पलटणसुद्धां होता. त्या अगोदर आपली नवी फौज बरोबर घेऊन तीर्थस्वरूप राजेश्री बापू पलिकडे होतेच. मागाहून वडिलही फौजसुद्धां पार उतरले. तेव्हां गुलामानें आठ दाहा रोज कावे खेळून शेवटीं मेरटेस जाऊन किल्लेंत राहिला. पिछास आपली फौज होती. तेव्हां मेरटेस मोरचे लाविले. रस्त बंद केली. दोन महिनेपरयंत आंत होता. एक दिवसीं यांची त्यांची लढाइ जाहाली. तेव्हां त्यास मोडला. लूट बहूत जाहाली. तोफखाना वगैरे हत्ती सरकारांत आले. गुलाम मात्र पन्नास पावण ( ) तेव्हां मागां आपली फौज लागली. तो पळून जाऊन एका खेड्या-मध्यें राहिला. ही बातमी मागून गुलामास धरून आणिला. हें ईश्वरें मोठें येश वडिलांसं दिलें. श्रीमंतांचीही मर्जी बहूत खूश आहे. तूर्त वडील व बापू मेरटेस सुखरूप आहेत. गोसगडास टाणें गुलामाचें होतें. तेथें फौज पाठवून किल्ला खालीं करून घेतला. एक मात्र सारंगपूर राहिलें. त्यासही खालीं करावयास फौजा गेल्या आहेत. खाली होऊन येतील. तीर्थस्वरूपही जलदीच

१. तारीख १४ सप्टेंबर सन १७८८. २. जिवबादादा जाण्याच्या पूर्वी राणेखान, जगोबा बापू वगैरे बरोबर दिल्लींत गुलाम कादरावर स्वारी करण्याकरितां फौज पाठविली होती. आणि मागाहून जिवबादादा गेले. याविषयीं आणखीही पत्रें आहेत. ३ जिवबादादा. ४. तारीख १ व तारीख ४ अनुक्रमें माहे जुलई व आगष्ट सन १७८८. ५. जिवबादादांच्या फक्त नांवाचा एवढा प्रताप असे. याचे पूर्वी डि बाइन, राणेखान वगैरे सरदार गेले होते. त्यांजबरोबर इस्माईल बेग लढत होता. परंतु हे गेल्यावर तो त्यांस येऊन मिळाला. ६. या वेळेस शिंद्यांस पुष्कळ द्रव्य मिळालें. ७. जिवबादादांस दिलें.

यावयास येतील. आपण वडिलांचे पत्रीं लिहिलें होतें कीं, बाबले[1] कामतीचें खाजन बांदावयासीं टाक मारिला ह्मणोन लिहिलेंत त्यास बांदावयास दाहा हजार रुपये लागतील. आण तीर्थस्वरूप नानाचेही[2] चित्तीं होतें. असें लिहिलेंत त्यास तुह्मी खाजन बांधलें तर रुपये दाहा हजार कर्ज काढून बांधावें लागेल. आण कर्ज तिजावयास किती दिवस लागतील हें कळेना. ज्याचें कर्ज घेतलें त्याचें (फाटलें) न दिलें तरी कर्ज वारणार नाहीं. असें समजून जें वडिलांचे मर्जीस येईल तें करावें. अगोदरचेंच कर्ज जाहलें तें अद्यापि तिजत नाहीं. आण हें कर्ज काढून करावें हें ठीक नाहीं. जावदेकडील वर्तमान तर तीर्थस्वरूप नाना व मुलेंमाणसें सर्व सुखरूप आहेत. सध्या खर्चा-करितां जिवनदास गोवरणदास यांचे दुकानच्या हुंड्या रुपये ५००० पांच हजार एकूण पुरजे दोन पाठविले आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. लखबा वागळे यांचीं माणसें तेथें आहेत. त्यांची खबर घेत असावी. शंभर रुपये त्यांस देणें. हे विज्ञापना.

लें० नं. ३५ माहे सपटंबर १७८८.

(मागील बंद मिळत नाहीं.) आले ते बजिनस वडिलांकडे पाठविले आहे त्याजवरून तिक-डील वर्तमान विदीत होईल. तीस खर्चास पन्नास रुपये पाठवून देतों. कळावें. वतनाचा मजकूर कसा काय जाहला तो व संसारीक वर्तमान ल्याहावें. ( ) आज्ञा केली पाहिजे. वरकड येथील दादास पत्रें लिहिलीं. त्यांस तूर्त गुलाम कादर, बेक याजवर सडी स्वारी दिल्लीकडे गेली त्याजसमागमें मुख्य दादा गेले आहेत. पुढें ते इकडे आल्यावर पत्र त्यांस देऊं. वडिलांस कांहीं आंदेशा मागील विचारांतील मजकूर तुजेकडे आसेल तर दुरोन डोंगर साजरे. आह्मी तूर्त ती० राजश्री साबाजी दादा यांचे घरीं आसतों. ते आमची ममता फार करित आसतात. आण अग-त्यही आहे. कोरडी ममता नाहीं. यास्तव चित्ताची स्थिरता करून त्यांचे मर्जीनुरूप वर्तणूक होत आसती. आमच्या लाभलाभानें जे काळीं रोजगाराची ( ) काय ऐसा चित्तास बहुत प्रकारें बोध करून आहों. त्यास वडिलीं मागील चित्तांत न आणतां आपला पाहारा जागवावा. यांत युक्त आहे. चिरंजीव सौभाग्यवती लाडूबाईस आह्मीं येथून पत्र पाठविलें त्याचें उत्तर.

लें० नं. ३६ श्री. तारीख ३ नवंबर १७८८ सोमवार.

तीर्थरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

आपल्य बाळानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत कार्तिक शुद्ध ५ मुक्काम लष्कर नजीक श्रीमथुरा जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष वडिलाकडून ( ) नाहीं. तेणेंकरून परम चिंतेंत आहों. तर सविस्तर येणाराबरोबर लिहावयास आज्ञा करावी. यानंतर इकडील वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री दादा व बापू सडे फौ-( ) चे मुक्कामींहून श्रावणे[3] मासीं इस्माल बेग याचें पारपत्य होऊन यमुनापार जाहाला. आण गुलाम कादर रोहिला. उभयतां मिळोन अंतरवेदींतून दिल्लीस जाऊन हजरत पादशाहा यासीं बदमाली करून अत्र घेतली. आण डोळे काढले. त्याजमुळें श्रीमंतांनीं फौजा नेमणूक गुलाम याच्या पारपत्यास केल्या. मार्गून[4] तीर्थस्वरूपांस दिल्लीस रवाना केलें. तेथें नंतर त्यांणीं फौजेचा

१. या बाबले कामतीचे वंशज हल्लीं वाडी संस्थानांत तळवडें गांवीं आहेत. २. जिवबादादांचे धाकटे बंधु शिवबा नाना यांजविषयींची माहिती टॉड साहेबांच्या 'राजस्थानचा इतिहास' या पुस्तकांत आलेली आहे. ३. तारीख २ व ३१ आगष्ट सन १७८८ रोजीं. ४. गुलाम कादर याजवर पूर्वी फौज पाठविली होती. तिजकडून त्याचें पारपत्य होईना ह्मणून मागून जिवबादादांस रवाना केलें होतें.

बंदोबस्त पाहून किल्ला टाकून यमुनापार जाहाला. तूर्त दिल्लीमध्यें किल्लेसुद्धां अंमल आपला आहे. आपलेकडील फौजाही राजश्री देवबा गौवळी वगैरे पतकें पलीकडे यमुनापार आहेत. त्यांची यांची लढाई होतच आहे. इस्माल बेग येऊन आपणाकडेस सामल जाहला. गुलाम कादर याचेंही पारपत्य जलदीच होईल. त्याचे फौजेस आपले फौजेचा घेरा आहे. रस्त चालूं देत नाहींत. तीर्थस्वरूपही एका चौरोजीं यमुनापार उतरणार आहेत. हंमेशा कागदपत्र येतात. आपण चिंता न करावी. दुसरें. राजश्री अलिबाहादर पुणेहून श्रीमंतांकडून फौजेसुद्धां आले आहेत. त्याचा मुक्काम डिगेस गोवर्धननजीक आहे. श्रीमंतांच्या व त्यांच्या भेटी एका दोरोजीं होणार आहेत. ती० राजश्री नानाकडून मेवाडांतून हंमेशा पत्रें येतात. सर्व सुखरूप आहेत. सौभाग्यवती मातोश्री ताईस आणावी. त्यास तीर्थस्वरूप रोज चाकरीच्या मसलतींत एक जागां आज एक वर्ष राहणें होत नाहीं. रोज शिलेदार यांचा तकादा. सरकारांत रुपयेची ओढ आण चाकरीची निकट. धणी-कामा अर्थी कांहींच सुचत नाहीं. मागील चार रुपये लोकांचें कर्ज द्यावयाचा निर्गम नाहीं. आण तोही तकादा यांतच. परंतु सर्व धण्याचे (फाटलें) रोप घेऊन येऊं. येथून आज चार वर्षें पर्यंत कांहीं वडिलांस खर्चास पाठविलें नाहीं. आण आपण तेथें खर्चाचे ओढींत त्यास येथील विचार ह्मणावा तर रुपयांस ठिकाणा नाहीं. मात्र चाकरी करितों. ऐसा विचार आहे. राजेश्री सरदेसाई यांजकडील पत्रें सरकारांत व आह्मांस येतात. त्यांचीं उत्तरेंही माघारें गेलींच आहेत. कागदीं पत्रीं साहित्य सरकारांतून यथास्थित लिहितात. व अगत्यही आहे. परंतु दूरचा विचार यामुळें उपयोगी पडतात, किंवा नाहीं हें कळत नाहीं. किल्ले सुटले किंवा कसें काय वर्तमान तें लिहावें. जवारगीर गोसावी पत्रें घेऊन आला तो आह्मांस भेटून महायात्रेस गेला आहे. आपण केरीच्या व हरमलविसीं गोवेंच्या गोवर्णदोरास पत्रें पाठविणेंविसीं लिहिलें होतें. त्याप्रमाणें पत्रें पाठविलींच असतील. पोहोचलींच असतील. तीर्थस्वरूप राजश्री अंतोबाभाऊ कवठणकर पागा-सुद्धां दिल्लीस वडिलांबरोबर सुखरूप आहेत व चिरंजीव राजश्री बाबुराव दाभोलकर व रामबा कोच-रेकर व विश्राम पालयेकर व आपली समस्त मंडळी सुखरूप आहेत. राजश्री बाळापा आणा यासी सरकारांतून सरकार हांडेची मामलत सांगितली. येथून जाऊन आज दोन महिने होत आले. तेथून हमेशा पत्रें येतात. चिरंजीव बाळकृष्ण उसपकर तीर्थस्वरूप बापूबरोबर दिल्लीस आहे. व राजश्री साबाजी मळगांवकरही बापूबरावर सुखरूप आहेत. राजश्री अंतोबा नेलकर घरींहून आला तो जावदेस सुखरूप पोहोंचला. त्याचें उजनचे मुक्कामचें पत्र छ० १८ मोहोर्रमचें आलें होतें. वडिलांस कळावें. आह्मी तीर्थस्वरूप राजश्री दादा आले ह्मणजे निरोप घेऊन यावयास येऊं. परंतु यंदां लष्करही उज्जनीस यावयास येणार आहे. गुलामाचें पारपत्य जाहालें ह्मणजे जलदीच देसीं लष्कर जाईल असें आहे. बहूत काय लिहिणें कृपा कीजे हे विज्ञापना.

लें० नं. ३७ श्रीशंकर. तारीख २० दिसेंबर १७८८.

श्रीसहसायु चिरंजीव राजेश्री शिवबा यासी प्रती जिवाजी बल्लाळ आशिरवाद उपरी ताा छ०

---

१. जिवबादादा गेल्यावर गुलाम कादर त्यांना पाहूनच पळाला. २. गुलाम कादराचे वेळीं महादजी दिल्लींत गेले नव्हते, असें या पत्रावरून दिसून येतें. शिवाय होळकरांची कैफियत पृष्ठ ५१ पहा. ३. राजेबाहादर सरदेसाई खेमसावंत. ४. गवरनरास. ५. हे वेंगुर्ल्याचे राहणारे होते. प्रसिद्ध ऑनरेबल नारायणराव वासुदेवजी दाभोलकर हे यांच्याच भाऊबंदांपैकीं होत. ६. तारीख १९ अकटोबर सन १७८८ रविवार.

२१ रबिलावल शनवार मुकाम शनवार सडी फौज नजीक मेरट जाणोन वर्तमान यथास्थित' असे विशेष. सांप्रत तुह्मांकडील पत्रें येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास शिवाजी काशिदाबरोबर पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळला. पावेतों जावद व जिरण वगैरे महाल येथील गुदस्तां रांगड्यांनीं बंडावा केला. यंदा श्रीमंत राजेश्री होळकर व अलिबाहादर यांचे फौजेचा रस्ता पडून मुकाम जाले. यामुळें रयत परागंदा जाहाली. ती माघारें आणून वसणूक केली ती फौजेचे पायमाली होऊन खराब जाले. झोंपे देखील नाहीं. फिरून उजाड जाहाले. इतुकें असून रांगड्यांचा बंदोबस्त होऊन बेदा मिटत नाहीं. मसलत आहे तशीच आहे. त्यास होळकर त्या प्रांतींच आहेत. आलीबहादर त्याजकडून येऊन श्रीमंत ( ) मगा आहों. पुढें परगणेविसीं सविस्तर वर्तमान सरकारांत यजमान साहेबांचे कानावर चिरंजीव राजेश्री बाळों घालितच आहे. प्रस्तुत राजेश्री भाऊ फडणीस व बाळाजीपंत आपा महाराजांकडे मथुरेस आले. त्यांजला आपणही पत्र लिहिलेंच होतें. व त्यास सांप्रत आमचें अगत्य धरितात. त्याजवरून पेशजीचे कागदपत्र होते त्यास बक्षिगिरीसंबंधीं झाडे होते. त्याजवर मकलासी करून सरकारचाकर जाहला. आतां परगणेसंबंधीं हिशेब राहिले. त्यास जावद जीर्ण वगैरे महालें प्रांत मेवाड येथील हिशेब पांच सात सालें निवडलीं बाकी दोन सालें फडणीस याचे हातचीं आलीं नाहींत. येविसीं राजश्री शामराव पांडुरंग यासी निल्या भाऊ फडणीस याचे घरीं यसाजीपंत व चिरंजीव बाळास आह्मी येथें येतांना सांगून आलों. येविसीं भाऊ चिटणीस व बाळाजीपंत आपांस अगत्य आहे. लवकरच हिशेबाचा फडशा होईल. अंतरवेदींतील हिशेब येथें आहेत. ते सरकारची मकलासी जलदीच होईल. मात्र चिरंजीव कृष्णोबाचा हिशेब आला नाहीं. यामुळें राहिला. वरकड खासगी पतकाचे कबज मागां राहिले. तेही सरकारांतून करून घेतील. आह्मांस सरकारांतून गुलाम कादर व इस्माल बेग याणें दिल्लींत पादशहाचे डोळे काढून हरामखोरी करून सर्व महालमत्ता घेऊन सिलीम गडाखालीं नावांतून उतरून पटपट गडास मुकाम करून राहिला. श्रीयमुनेस पाणी फार. उतार नाहीं. पलीकडे अंतरवेदींत नवी फौज व जुनी तैनात रायाजी पाटील व देवबा होते. त्यांची यांची लढाई जाहाली. तेव्हां गुलामाकडेस जंग सामान भारी तेव्हां लढाईस टरत नव्हतें. मग महाराजांचे पुण्यप्रतापें श्रीयमुनाबाईनें उतार दिला. तेव्हां किरावलीचा घांट चढे घोड्यांनिशीं उतरून गुलामासीं गांठ घातली. तेथून गुलामासीं लढत लढत मेरटीस येऊन राहिले. सवा महिना आसरास जकडबंदी करून आंत रसद न पोहोंचेसें एकसर आज जाहाले. रोज लढाईशीं गांठ. रात्रंदिवस जीन घोड्यावरून संधान लावून त्याजकडील रोहिले व पलटणें याचा भरंवसा सुटून बाहेर काढिले मात्र. त्याचे जीववारी लोक पांच सहा हजार शहरांत राहिला. अलीकडे लढाईचे तोंड लावून काल छं० १८ रबिलावल तिनसानचे गलबलींत सडा पंचवीस स्वारांनिशीं पळून गवसगडाचे

१. तुकोजीराव होळकर. २. झोंपड्या, घरें. ३. बाळाजी राम ऊर्फ बाळाभाऊ बक्षी. ४. हे देशस्थ ब्राह्मण होते. ५. या वेळीं बक्षिगिरीचे हिशेबाचे कामावर बाळाभाऊ बक्षी हे होते. ६. हे महाल जिवबादादांकडे असत. ७. अंतरवेदींतील महाल जिवबादादांकडेस असत. ८. जिवबादादांची खासगी फौज होती; तिचा हिशेब, स्वतः दुसऱ्या कामावर गेल्यामुळें सरकारांतूनच ते करून घेतील एवढी काळजी महादजी घेत. ९. श्रीयमुनाबाईनें उतार दिला ही गोष्ट जिवबादादा तेथें पोंचल्यावर घडली. १०. एकदम लगट करून जिवाची परवा न धरितां घोड्यावरून जो पाठलाग करितात, त्यास चढे घोड्यानिशीं ह्मणतात. ११. तारीख १७ दिसेंबर सन १७८८.

अंगें गुजरानिकाकडून नेला. सलतन शहाजादे व मन्यारसिंग हत्ती तोफा सर्व सरंजाम लुटून सडा जरारां तीन टोळ्या करून तिकडे निघाला. त्यांतील एक टोळीची आमची गांठ पडली ती कापून काढिली. परंतु गुलाम मात्र जरारां निघून गेले. त्याचे मागें पंचवीस हजार फौज घेऊन चिरंजीव जगोबा व धोंडोबा पागनीस गेले. त्यांची गांठ पडल्यास पारपत्य होईल. आह्मी फौजसुद्धां राजश्री राणेखानभाई, येथें राहिलों. याचें कारण गुलाम जातीनीशीं गेला. परंतु सलतन व लढवाईक लोक होते. त्याणीं दोन प्रहरापर्यंत दम धरून राहिले मग चौंकडून घेरून धरून आणिले. गुलामाकडे कारभारी व शहाजादे व नाझर खोजा मर्वास धरून आणून पायांत बेड्या घालून ठेविले. मात्र शहाजादे मोकळे आहेत. वरकड गुलामास लुटून घेतला. मात्र जिवानशीं गेला. त्याचे मागें फौजा गेल्याच आहेत. आह्मींही फौजेसुद्धां कूच करून गुलामाच्या लागास गवसगडापर्यंत जाऊं. महाराजांकडे हत्ती व तोफा सर्व आल्या. ईश्वरें यश मोठें दिलें. पुढें मसलत सरकारांतून ठरेल ती पाहावी. तीर्थस्वरूप राजेश्री बाबूचीं पत्रें कोंकणचीं आलीं. त्यास आज तीन वर्षे सरकारचे चाकरीमुळें शरीराचें शुद्ध नाहीं. याचें कारण पहिले सरकारची गैरमर्जीमुळें दिवस गेले. आतां रोज उठोन लढाईचा इरादा सरकारांत खर्च असावा तरी शिबंदीस धीर पांचतो. आतां रात्रंदिवस गवगवा पडतो यामुळें कांहींच सुचत नाहीं. यामुळें सरकारांत गैरमर्जी होऊन चौंकडील बखेडा एकच वेळ ( ) कोंकणांत संसार पडला. येथून खर्चास पाठवणें तेंही झालें नाहीं. तुह्मांस लिहावें तर तुह्मांवरही बखेडा ऐसीयासी येथें राजश्री रामाजी नाईक येथें आले त्यांस वस्त्रें चिरगुटें देऊन बाकी पांच हजार रोकड दिली. ती त्याणें घरीं द्यावी असें बोलणें होतें. ते घरीं पोहोंचल्यावर तीर्थस्वरूपांनीं त्याजकडे माणूस पाठविला. येथून चिरंजीव बाळांनीं त्यास लिहिलें. परंतु त्याचे हातें कांहीं झालें नाहीं. आह्मीं काय जाणतों. लवकिकाचे थोर गृहस्त ह्मणून केलें. त्याची रीत या प्रकारची आहे. राजेश्री सरदेसाई यांणीं हरमल गांव पालखीच्या सरंजामास दिला. पेडणें परगणें फिरंगी याजकडेस आहे. तेव्हां दाखला जमीनदार याजकडे पुसले त्याम शिवराम व तुकोबा दळा यांणीं गुण उधळले. बरें त्याच्या स्वरूपास आलें तें त्यानें केलें. त्यास येथें बादशा नवा झाला. ह्मणजे सरदेसाई याचीं मोरचलें वगैरे बंदोबस्त करून घ्यावयाचा तो घेतला पाहिजे. तीर्थस्वरूप यांणीं लिहिलें बाबले कामत यांणीं खाजन बांधिलें. त्यासारखें खाजन बांधिलें पाहिजे त्यास दहा हजार रुपये पाहिजेत. असें लिहिलें. तींच पत्रें तुह्माकडे पाठविलीं आहेत. त्याजवरून कळेल. वरकड सर्व मंडळी सुखरूप आहेत. ताजा कलम. गुलाम कादर चार स्वारांनिशीं पळून जाऊन एका गांवांत राहिला. तेथून गांववाले

---

१. बादशहाचा मुलगा. २. "माहादजीला दिल्लींत अधिकार मिळाला. परंतु तेव्हांपासून पाच वर्षेपर्यंत तो कायम राहण्याकरितां त्यांना एकसारखी दगदग करावी लागली." ग्यालेसनचा इं० गो० भाषांतर पृ० १६१. ही दगदग फक्त जिवबादादांस करावी लागली. "शरीराचे शुद्ध नाहीं" असा प्रकार होता. ३. या पुस्तकाचा भाग ९ पहा. ४. हे कुमारजुवें, प्रांत गोवा येथील राहणारे एक आप्त होते. ५. नरोबा दादांनीं. ६. बाळाजी राम यांणीं. ७. सनदा नंबर २०१९५ पहा. ८. बादशहाचे डोळे काढले होते. तेव्हां नवीन बादशहा होईल असा अजमास होता. ९. वाडीसरकारास मोर्चलें सन १७८५ सालीं मिळालीं होतीं. परंतु त्याची सनद जैपूरच्या दंग्यांत नाहींशी झाली. तेव्हां गुलाम कादराचें पारपत्य केल्यावर जिवबादादांनीं नवीन सनद करून घेतली. पहा सनद नंबर ४३.

यांणीं येऊन अलिबाहादर याजकडील फौजेंत नाईक निंबाळकर यासीं येऊन सांगितलें. त्यांनीं जाऊन गुलाम कादर यासी धरून आणिलें. कैदेंत ठेविला आहे. पुढें महाराजांकडे पाठवून देऊं. पुढें कसकसें होतें पाहावें. माहाराजांचे पुण्यप्रतापेंकरून मोठें यश आलें. सर्व बखेडा मिटला. आमचे मेहनतीस ईश्वरानें यश दिलें. पुढें धन्याचे प्रतापेंकरून यथास्थित होईल. मातोश्री जायुबाईचें मानस माहायात्रेस जाणार त्यास बखेड्यामुळें राहणें झालें. हल्लीं तिची इच्छा महायात्रेस जावयाची झाली आहे. त्यास महायात्रेस जाणार. तेथील खर्चाची बेगमी करून राजश्री वेंकोबा लाड याजकडेस करून दिल्ही. त्याजकडे पत्र लिहून जायूबाईचे नांवें पाठविलें आहे. त्याप्रमाणें घेऊन माहायात्रेस जावें ह्मणून आपण त्यासी सांगावें. आणि त्याची रवानगी उज्जनीस ( ) बहुत काय लिहिणें हे आशिरवाद. चिरंजीव राजश्री मुलांस व विश्रामास आशिर्वाद उपरी. तुह्मांकडील वर्तमान लिहून पाठवीत जाणें हे आशीर्वाद.

ले० नं. ३८ श्रीगजानन. तारीख २० जानेवारी १७८९

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें जिऊबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत पोष्य व॥ १० मुक्काम सडी फौज नजीक कुंजपुरा जाणोन वडिलांचे आशिर्वादें वर्तमान यथास्थित असे विशेष. सांप्रत वडिलांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्याजवरून चिंता वाटत होती. त्यास पहिलें व चिरंजीव राजश्री शिऊबाकडील वर्तमान वरचेवर लिहिलेंच आहे. त्याजवरून कळेल. ( ) गुदस्तापासून इकडे चौंकडे दंगेमुळें रात्रदिवस लढाईचा इरादा नित्य चाकरी यामुळें आपणास पत्र लिहावयास फावलें नाहीं. त्यांतही लिहिलें आहे. परंतु संसारतापत्रयामुळें खर्चाची सरबरा जाहाली नाहीं. त्या मुलखांत करवीरकरांनीं उपद्रव करून ठाणीं किल्ले घेतले. यामुळें राज्यांत बखेडा जाहला. त्याकरितां रयत पेडणें प्रांत फिरंगी याच्या आश्रयास गेली. तेथें आहे. अन्नाची मोठी महर्गता कुटुंबवछळ याची फजितस जोडा नाहीं. आह्मांकडून खर्चाचें साहित्य व्हावें. तरी आह्मीं येथील बखेड्यामुळें शरीराची शुद्ध नाहीं. यास वडिलांचे आशीरवादें व धण्याचे पुण्येंकरून इस्माल व गुलाम कादर यांचें पारपत्य होऊन गुलामास बेड्या घालून धण्याकडे पाठविलें. इस्माल तर सोडून दिला. जिकडे तिकडे बंदोबस्त होत चालला. बादशहाचे गुलामानें डोळे काढिले त्यामुळें आणखी पादशाहा तखतीं बसवितील. तेव्हां श्रीमंत राजश्री सरदेसाई बाहादर साहेबांचे पादशाई फरमान करून घेऊं. दुसरें राजश्री रामजी पाटील पुणेस आहेत. त्यांसही पत्र लिहून पाठविलें. त्यांचे हातें करवीरकरांस पुणेकरांकडून ताकीद होईल असें लिहून पाठविलें. रामजी पाटील यांची व आपली ममता आहे. त्यास निक्षून लिहिलेंच आहे. हें वर्तमान सरदेसाई साहेबांस सांगावें. इकडील वर्तमान तरी चिरंजीव राजश्री शिवबा व मुलेंमाणसें सर्व मेवाडांत सुखरूप आहेत. हांडेस चिरंजीव बाळा व मातुश्री मनुबाई व सर्व मंडळी सुखरूप आहेत. वरचेवर पत्रें येतात जातात. चिरंजीव बाळा दरबारीं राहतात.

१. जिवबादादांकडून पराभव होऊन चार स्वारांनिशीं पळून गेलेल्या गुलाम कादरास शेवटीं एकानें पकडून आणिलें. यांत त्यास विशेष यश मिळालें असें नाहीं. २. जिवबादादांनीं घालून दिलेला हा लीनतेचा कित्ता शिंदेशाहींत सरदार वगैरे लोकांत आजवर दृष्टीस पडतो. ३. हिंदूंचें पुण्यक्षेत्र काशी एथें. ४. नारायणराव बक्षी व विश्राम नरहर. ५. गोवें प्रांत. ६. जाधव.

चिरंजीव जगोबा आह्माबरोबर आहेत. राजश्री अंतोबा कवठणकरही येथेंच आहेत. वरकड आप्तवर्ग गृहस्थमंडळी सुखरूप आहेत. वडील लिहितात आह्मी पत्र पाठवीत नाहीं. त्यास आह्मी आज दोन वर्षे लढाईचा इरादा त्यामध्यें सडे स्वारी बुनगे खासा स्वारी मागां शंभर कोशांवर. त्यामुळें अंतर पडतें. तेंही नाहीं. दुसरें मुलेंमाणसें सर्व इकडेस आहेत. त्यांची आमची भेट देखील नाहीं. घरीं रवाना करावीं ह्मणोन ठेविलीं. मुलें फिरोन भेटणार कधीं? ऋणानबंध प्रमाण. सारांश आह्मीं स्थितीवर राहिलों नाहीं. मुख्य वडिलांशिवाय व घराशिवाय दुसरा प्रकार नाहीं. जे दिवशीं दुसरा प्रकार येईल. त्या श्रीखळनाथ अर्ध घटका उशीर शिक्षा करावयास चुकणार नाहीं हे विज्ञाप्ती.

ले० नं. ३९ श्री. तारीख ९ मार्च सन १७८९ गुरुवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबा वडिलांचे शेवेशीं.

आपत्य बाळानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत चैत्र शुद्ध १४ मुकाम श्रीमथुरा जाणोन वडिलांचे आशीरवादें सर्व सुखरूप असों विशेष. वडिलांकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास खेता कासीद व शालिग्राम कासीद यांजबरोबर आशीरवादपत्रें पाठविलीं. वरून संतोष जाहला. अशींच निरंतर आशीरवादपत्रें पाठवून सांभाळ करीत असावें. इकडील वर्तमान तर. तीर्थस्वरूप राजश्री दादा फौज घेऊन गुलाम कादराच्या पारपत्यास गेले होते. त्याचें पारपत्य करून मोहेवर खंडणी करावयाकरितां पटालेपर्यंत जाऊन पोहोंचले आहेत. तेथील खंडणी चुकवून आठांपंधरा रोजीं माघारे येणार अशीं पत्रें आजच आलीं आहेत. त्याचे हातचीं पत्रें नाहीं ह्मणोन चिंता कराल तर ते येथून पंधरा रोजांचे वाटेस आहेत. तेव्हां त्यांचीं पत्रें कशीं येतात? तशांत आणविलीं असतीं. परंतु कासीद जावयाचे हे ठाऊक नव्हते. याजकरितां पत्रें आणावयास फावलें नाहीं. वडिलीं शालिग्राम कासीद याजबरोबर पत्रें पाठविलीं. तीं बजिन्नस वडिलांपाशीं पत्रें देऊन संभूराम यास पाठविला आहे. तीर्थस्वरूप राजश्री जगोबा बापू सारंगपुरीं फौज घेऊन गेले होते ते तेथेंच आहेत. आठांचौं रोजीं येऊन पोहोंचतील. वरकड सर्व मंडळी सुखरूप आहे. तीर्थस्वरूप राजश्री नानाचीं पत्रें हमेशा येत आहेत. सर्व मुलेंमाणसें जावदेस सुखरूप आहेत. सौभाग्यवती मातोश्री रमाबाई यांस जावदेहून येथें आणलीं आहेत. ती येऊन आज दहा रोज जाहाले. सुखरूप येऊन पोंचली. वडिलांस कळण्याकरितां लिहिलें आहे. राजश्री राजेबहादर यांनीं मौजे हरमल गांव केरी येथील खेतें इनाम दिलीं होतीं तीं फिरंगी याणीं आटकाविलीं. याजकरितां येथून श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांचीं पत्रें फिरंगी यास पाठविलीं. त्याचीं उत्तरें आलीं कीं राजेबाहादर यांणीं गांव व खेतें दिलें होतें तें सोडून दिलें आहे. असे जाबसाल आले आहेत. त्यास सदरहू प्रमाणें सुटलें किंवा नाहीं, तें सविस्तर लिहिण्यास आज्ञा करावी. मागाहून राजेश्री राजेबहादर यांचे कासीद जोडी आली आहे. त्याजबरोबर फिरंगी यांस गांवांविसीं कागद घेऊन पाठवून देतों. फार करून गांव सुटलाच असेल. न सुटला तर त्यास दुसरेंही पत्र येऊन पोहोंचतच आहे. खर्चा-

१. लष्करच्या सोईसाठीं ज्या अनेक धंद्यांच्या लोकांचा समुदाय असतो, ते लोक. त्यांजकडे प्रसंगीं लढण्याचीं साधनें असत. २. महादजी शिंदे. ३. आपल्याशिवाय असा अर्थ. ४. केरी गांवचा देव. ५. श्रीमंती आल्यावर कित्येक लोक अगदीं बेफाम होतात. परंतु जिवबादादांची तशी स्थिति नव्हती. ६. पत्याला.

विशीं लिहिलें होतें. त्यास तीर्थस्वरूप आले ह्मणजे सोई करून पाठवून देवितों. यंदां घरीं मुलांचीं लग्नें करावयाचीं आहेत ह्मणोन लिहिलें होतें. मग पुढां दोन वर्षें लग्नें करावयास नाहीं. यास्तव वडिलांनीं केलींच असतील. वडिलीं लिहिलें होतें कीं, सौभाग्यवती मातोश्री लक्ष्मी होनी व चिरंजीव सौभाग्यवती उभयतां सुना यांस देशीं रवाना करून द्यावीं. याविशीं तीर्थस्वरूप राजश्री नानास व इकडे वडिलांस पत्रें आलीं होतीं त्यास चिरंजीव सौभाग्यवती उभयतां सुना गरोदर आहेत. तेव्हां त्यांस कशीं रवाना करून द्यावीं. याजकरितां वडिलांस जावेदेस लिहिलें नाहीं. आण सर्वांची भेटही तीर्थस्वरूप दादांस जाहली नाहीं. याजकरितां ठेऊन घेतलीं आहेत. चिरंजीव सौभाग्यवती बायू व यशवंतराव यांचे भेटीस बहुत दिवस जाहले. आण मुलास तों पाहिलाच नाहीं. याजकरितां त्यांस ठेऊन घेतलीं आहेत. वडील स्वारीहून आले ह्मणजे त्यांस सर्वांस आणून भेटून रवाना करून देतील. आण खासा स्वारी देवांस व श्रीमंतांस भेटावयास जाणार. अशी तजवीज आहे. पुढां होईल तसें लिहून पाठवितों. राजश्री अंताजी रामचंद्र याच्या कासिदाबरोबर हुंडी घरीं खर्चास पाठविली होती ती पोंचली किंवा नाहीं तें लिहावें. राजश्री मुंगें नाईक याजबरोबर खर्चास पाठविलें होतें. त्यास त्या गृहस्थानें नाहीं ह्मणोन सांगितलें. तेव्हां त्याजवरून तीर्थस्वरूपांनीं पत्र पाठविलें होतें. त्याचेंही उत्तर बजिनस पाठविलें तें पावलें. त्यास हल्लीं आपण एकंदर त्यांजकडेस मागावयास न पाठवावें. आपलें असतें तर देते. तेव्हां त्या रुपयांचा ऋणानुबंधच नाहीं. यास्तव त्या गृहस्थाजवळ परिछिन्न मागूं नयेत. आपली मूल त्यांचे घरीं दिली आहे. तेव्हां तीस मागां माहेर ठीक नाहीं. याजकरितां लिहिलें आहे. मागाहून तीर्थस्वरूप राजश्री दादांचेंही पत्र एविसीं घेऊन पाठवितों. आपण मुलीवर पाहावें. वडिलांनीं पांच हजार रुपये लाऊन चिरेबंदी बांध खाजनास बांधितों ह्मणोन लिहिलें. त्यास त्यामध्यें उत्पन्न काय होईल. हकनाक रुपये ज्याचें कर्ज काढाल त्याची निकट मात्र लागेल. असें आहे. वडिलांचे मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें. आह्मीं लिहावें असें नाहीं. अगोदरचेंच कर्ज वारत नाहीं. तशांत हें कर्ज जाजती होतें. आपण लिहितां कीं रुपया खर्चास मिळत नाहीं. आण कर्ज काढून खाजन बांधावें हें ठीक नाहीं. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

लें० नं. ४० रन्ही श्रीरामजी. ता. २२ मार्च सन १७९९. तांब्रपट.

जलत्रणकाष्टपासान मालसाईर संमेत दीनो हे काहु बातको उजर नहीं. महाराजश्री राजश्री राजा जयसिंघजी राजश्री लक्ष्मण अनंत बहादूरजी श्रीदादासाहिबको गांव दिये मोः वडो. त्रप्रः कुह्मा राजको मोः पारकनो प्रःवाला त्रेटको गांव दोय गांव वरीर माफ नानकार दिये साहेमे सांपाये जावोगे हमार वंसको होईगो सो तुमारे वंसको होईगो ताहे पाले जायेगे हमेसा परंपरा आपदत्त परदत्त जे मेटंत बासंदरां ते नरा नरकंत जायंती जवल चंद्रदिवाकराः मिती फागून वद्य १ संवत १८५५. पटा.

१. शिवबा नानांची बायको. २. नारायणराव व यशवंतराव भाऊ यांच्या बायका. ३ तुळजापुरास देवीचा नवस फेडावयाचा होता. ४. अंताजी रामचंद्र रेगे आरवलीकर. हल्लीं नईंचे आडीस यांचे वंशज राहतात. ५. ऊर्फ रामाजी नाईक. ६. कुंभारजुवें एथें या नाईकाचे घरीं नारायणराव बक्षी यांची मुलगी बायूबाई ही दिली होती. ७. हे राघोगडचे राजे.

लें० नं. ४१ श्री. ता. २९ मार्च सन १७८९.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेशीं.

अपत्य शिवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १ रजेब जाणोन वडिलांचे आशीरवादें सुखरूप असों विशेष. शालिग्राम याजबराबर आशीरवादपत्र पाठविलें तें पावलें त्या आलिकडे आशीरवादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून चिंता लागली आहे. तर सदैव आशीरवादपत्रीं सांभाळिलें पाहिजे. यानंतर आह्मांकडील वर्तमान. चिरंजीव राजश्री बाळाचें पत्र लष्करांतून आलें होतें. त्यांत लिहिलें कीं सौभाग्यवती रमाबाईस श्रीमंत सौभाग्यवती बाया उज्जनीहून लष्करीं येणार त्याचबराबर याचीही रवानगी करावी. असें लिहिलें त्यावरून माघ वद्य ५ मीस सौभाग्यवतीची रवानगी करून दिली. इतिरोज पोंहोंचलीं असतील. तीर्थस्वरूप राजश्री दादा व राजश्री भाई[१] फौजसुद्धां कुंजपुरेवर आहेत. तिकडे शिकांचा[२] बेदा आहे. यामुळें राहिले आहेत. पुढें मसलत कैशी होती पाहावी. हमेशा पत्रें येतात. आलीकडे दाहाबारा दिवस जाहले. पत्रें आलीं नाहींत. काशीद गेले आहेत. आपले-कडे खर्चास पाठविणार होतों. त्यास सौभाग्यवती सगुणाबाई गरोदर. साडेआठ महिने झाले. आठंपधरा दिवशीं प्रसूत जाहलेवर कासीद पाठविणार त्याजबरोबर पाठवून देऊं. या अर्थीं तूर्त कांहीं पाठविलें नाहीं. येथें ओढ बहूत आणि तेथेंही खर्चाची अनुपत्ती. तेव्हां ओढींत ओढ करून पाठवावयास पाहिजे. मुलेंमाणसें कोंकणांत रवाना करावीं येविशीं तजवीज होती. त्यास तीर्थस्वरूप राजश्री दादांचें मानस असें आहे कीं सर्वांची भेट जाहलेवर मग रवाना करावीं. इति-रोज तों गर्दीच जाहाली. आतां भेटीस जावें तर चिरंजीव सौभाग्यवती गरोदर. आण तीर्थस्व-रूपही कुंजपुरेवर. तेव्हां जातां नये. वडील मथुरेवर आलेवर भेट होईल. चैत्र मास जालेवर आह्मी लष्करीं जाणार आहों. तीर्थस्वरूप राजश्री दादांचें पत्र आपले नांवें आलें तें बजिनस पाठविलें आहे. पावेल. गुलाम कादर यास पेशजी धरिला होता. इतिरोज कैदेंत होता. हल्लीं त्याचे नेत्रें काढून विपत्य करून मग डोकें मारलें[३]. कळावें. श्रीमंत श्रीमथुरेवर आहेत. चिरंजीव राजश्री बाळा श्रीमंतांबरोबर आहेत. चिरंजीव राजश्री जगोबा वडिलांबरोबर कुंजपुरेवर आहेत. येंदां हे प्रांतीं बेदा फार. परगणेंत जागजागीं शिबंदी ठेवून बंदोबस्त करावा लागला. त्याजमुळें खर्च भारी व मुलेंमाणसें येथें आहेत. यामुळेंही खर्च भारी लागतो. वडिलांस कळावें. श्रीमंत राजश्री अलिबहादरही फौजसुद्धां कुंजपुरेवर आहेत. श्रीमंत राजश्री तुकोजीबावा होळकर इतिरोज मेवाड प्रांतीं होते. हल्लीं पंधरा रोज जाहले. कुच करून मथुरेस गेले. अद्यापी पोंचलेयाचें वर्तमान आलें नाहीं. हे गेलेवर काय मसलत होती कळेना. दिल्लीस पादशाही बसवावें याची मसलत आहे. पुढें छावणी मथुरेवर होईल किंवा कोठें कळेना. गुलाम कादर रोहीला याच्या मुलखांत झाडून[४] अंमल बसला. दिल्लीस राजश्री रवळोजी[५] सिंदे फौज पांच हजार व कांहीं पलटणें येथें आहेत. प्रांतीं शिकाशिवाय कोणी गलीम सध्यां नाहीं. सौभाग्यवती सुंदराबाई गरोदर

१. राणखानभाई. २. शीख लोक स्वाऱ्या करीत. ३. गुलाम कादर यानें बादशहाचे डोळे काढिल्यामुळें महादजीनींही त्याचे डोळे काढिले. महादजी बादशहाची बेपरवा करीत, असें कित्येक आक्षेप घेतात. परंतु तें यावरून खरें दिसत नाहीं. ४. रोहिलखंड मराठ्यांनीं घेतलें. ५. महादजींचा पुतण्या.

आहे. साहा महिने झाले आहेत. तेव्हां यंदां मुलेंमाणसें हेच प्रांतीं राहतील. आषाढ मास जाहलेवर रवानगी करून देऊं. तंव पावेतंव तीर्थस्वरूप राजश्री दादांचींही पत्रें येतील. बहूत काय लिहिणें लोभ असों दिला पाहिजे हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री विठोबा व साबाजी यांसीं आशिरवाद उपर. तुह्मांकडील सविस्तर वर्तमान लिहावें. खाजन[1] बांधावयास लाविलें आहे ह्मणोन पूर्वीं पत्रीं लिहिलें तें कोठपर्यंत बांधिलें हें सविस्तर लिहावें. शालिग्राम लष्करीं पाठविला आहे. आठचौं रोजांनीं येईल. आलेवर कोंकणांत पाठवून देऊं. वरकड तिकडील राजकी वगैरे सविस्तर लिहावें. बहूत काय लिहिणें हे आशिरवाद.

बाळकें नारायणानें चरणांवर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. इकडील सर्व सविस्तर वर्तमान तीर्थस्वरूपाच्या पत्रावरून विदीत होईल. बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ती.

लें० नं. ४२ श्री. माहे मार्च सन १७८९.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री बाबू स्वामीचे शेवेसीं.

सेवक सदाशिव रामचंद्र कोठारी[2] कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० माहे रजेब मुकाम लष्कर श्रीमथुरा क्षेत्र जाणोन आपले कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. आपणाकडून बहूत दिवस पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी असें नसावें. वरचेवर पत्र पाठवून सांभाळ करीत असावें. यानंतर इकडील वर्तमान सौभाग्यवती मातुश्री रमाबाई मेवाडांतून श्रीमंत सौभाग्यवती बायांबराबर उज्जनीहून संवत्सरप्रतिपदेचे रोजीं लष्करांत दाखल झाली. राजश्री दादा सध्या फौजा घेऊन कुरुक्षेत्रापलीकडे[3] चार मजल आहेत. दिडशें पाऊणें दोनशें कोशांवर आहेत. राजश्री बापू रायाजी, साबाजी, दुलाजी पा। याचे लष्करांत आहेत. येथून शंभर कोशांवर आहे. राजश्री बाळोबा भाऊ मुकाम मजकुरीं हुजुर आहेत. आपणास कळावें याकरितां लिहिलें आहे. आपण शंभर रुपयांची हुंडी पाठविली. आण शिवभट्ट द्वारकावासी यांस देणें ह्मणून आज्ञापत्र आलें. त्याजवरून हुंडीचे रुपये सदरहू शंभर रुपये देऊन शिवभट्ट कोंकणांत गेला. तो विदीत करील. आह्मी आज तीन वर्षेपर्यंत बेकार आहों. लोकांचे फसावेंत गुंतलों आहें. घरींहून येऊन फार वर्षे जाहलीं. येथून उलगडा होऊन घरीं जाणें होईल तो सुदीन. दादांचा निरोप घेऊन जावें तरी मसलतीखालीं दिवस गेले. पुढें दादा आलेवर निरोप घेऊन घरीं जावें असें मानस आहे. ईश्वर इछा प्रमाण. मुख्य गोष्ट मी आपला असा ह्मणवितों विस्तारें उपरोधीक लिहावें असें नाहीं. बहूत काय लिहिणें कृपालोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

१. हें खाजन बांधतां बांधतां सारा केरी गांवच बांधला गेला आहे. हें बांधकाम इतकें उत्तम झालें आहे कीं, बांधाच्या आंतल्या बाजूस पावसाळ्यांत व उन्हाळ्यांत भाताचें पीक सारखें येतें. परंतु नदीचें पाणी बांधांतून झरमसुद्धां आंत येत नाहीं. हा केरी गांव नरोबा दादांनीं बांधल्यावर यास 'नरोबाची केरी' असें नांव पडलें आहे. २. हे सारस्वत ब्राह्मण गृहस्थ आरवली एथील राहणारे होते. यांचें मूळ उपनांव रेगे असें होतें. हे नंतर होळकर सरकारचे फडणीस झाले. हल्लीं यांचे भाऊबंद व वंशज इंदुर, उज्जनी, बेटमें, एथें राहतात. सदाशिव रामचंद्र कोठारी यांनीं सन १८२७ च्या सुमारें पुष्कर तीर्थावर जलसमाधी घेतली. ३. पानपत.

लें० नं. ४३ श्रीगजाननप्रसन्न. तारीख एप्रील सन १७८९.

वकील मुतालक मुखत्यार सदाशीव रामचंद्र नायेब बक्षी बाहादर मसूदा ऐमाजे. आर्जी हजरत ज्यांहांपन्हां यास केली. वकीलमुतलीक मुखत्यार उलमुल्क उमदतुल उमराव फर्जंद आलीजा माहाराजाधिराज माधोराव शिंदे बाहादर श्रीनाथ मंजूरीया नायेब मवदतुल सल्तनत आसादुनखेलाफ सवाई माधोराव नारायण बहादर फिदवी. पन्हां गुलाम बादशाहा गाजी यांणीं डिगेच्या मुक्कामीं अर्ज केलाजे. खेमसावंत भोंसुले सरदेसाई यांसी राजेबाहादर भोंसुले यांच्या वेशींहीं मरामत व मोर्चलें आहेत. यांजकडेस चालत नाहींत. आण खेमसावंत यांची मर्दुमीही बहुतच आहे. मोर्चलें व मरामत देणें योग्य आहेत. अशा कित्येक शिफारशीच्या वगैरे आर्ज जिवाजी बल्लाळ बक्षी बाहादर यांणीं स्वमुखें हजरते जहांपन्हांशीं अर्ज केला. तो ध्यानीं आणून मरातब दिलीजे. राजे खेमसावंत भोंसुलेबहादर व मोर्चलें व खिलत सातपारची व निमआस्तनी भरजरी दासची व झगा व शिरपेंच व मोत्यांची माळा व झालरदार पालखी व समशेर हस्त हजारींही मरामत दिली. आण सरंजाम मुलूख मशारनिल्हेकडेस पूर्वीपासून चालत आला आहे. ऐसा भोगवटा मनास आणिला. आण तेणेंप्रमाणें फरमानांत लिहून दिलाजे. प्रांत कुडाळ व तर्फ बांदें व तर्फ माणगांव व तर्फ सांतडें व महाल तर्फ पेडणें व डिचोली व सांखळी पंचमहाल व फोंडें पंचमहाल व हेवळें व उमप व मणेरी व सडा जांबोटी व तर्फ मनोहर व साळशी पंचमहाल निमेपंचडी व कर्या नारूर व कर्या पाटगांव, आटाणें घोल मापणें घोल व हेरें व तर्फ चंदगड तर्फ वगैरे पुरातन चालत आलें आहे. याप्रमाणें फर्मान हुजुरून दिलें. सुभा विजापूर मरातब वगैरे फर्मानें मेहरबान होऊन सन सीतेचे साली डिगेचे मुक्कामीं करून दिलीं. अशास फर्मानें जयपूरच्या वेळ्यांत गैरविल्हेस पडलीं. त्याजवर हल्लीं जिवाजी बल्लाळ बक्षी बाहादर यांणीं पुनरूपी अर्ज केलाजे. नवीन फरमानें तयार करणेस जहांपन्हांचा हुकूम व्हावा. तो अर्ज ध्यानीं आणून मेहरबानें होऊन फर्मानें तयार करून देविलीं. आण एविशीं मांडलीक राजे व पंतप्रधान यांसही साहित्यपत्रें दिलींजे. हुजुरून मरातबत व मोर्चलें वगैरे सरंजाम करून दिला त्याप्रमाणें चालत जावा. आण कोणे गोष्टीची दिकत न करावी. हुजुरून करून दिलें तें प्रमाण जाणून वर्तणूक करावी. कोणे गोष्टीचा अंदेशा न धरावा. ह्मणून मुख येणेंप्रमाणें.

१ शाहू छत्रपती हर्षनिधान यांस.
१ करवीरवासी राजे यांस.
१ सवाई माधवराव नारायण पंतप्रधान यांस.
१ फिरंगी गोमांतकवाले यांस.
१ निजामनमुल्ख यांस.
१ टिपू सुलतान मियां यांस.

१. हे प्रसिद्ध रामचंद्रबाबा यांचे चिरंजीव होत. २. नायब ह्मणजे असिस्टंट बक्षीबहादर. हा किताब त्यांस दिल्लीपति बादशहाकडून मिळाला होता. ३. जिवबादादा. ४. बादशहाशीं. ५. हा पोषाख सावंतवाडी येथील वेस्ट्रॉप साहेबांनीं स्थापिलेल्या म्युझियममधील कपाटांत असलेला पाहण्यांत येतो. ६. ही पालखी वाडी सरकारानें आपलें पूज्य दैवत आरवली येथील श्रीदेव 'वेतोबा' यास दिली. ती अद्याप त्या ठिकाणीं पाहण्यांत येते. तिचें सामान जीर्ण झालें आहे. ७. याप्रमाणें सावंतांच्या राज्याची सीमा होती. ८. विजापूरचे बादशहा आपल्यास स्वतंत्र मानीत, पण दिल्लीपति त्यांस आपले सुभे समजत. ९. ३० सन १७८५. १०. या वेळीं ह्मणजे सन १७६६ त जिवबादादा जैपूरावर गेले होते. पत्रें नंबर २६।२७ पहा. तेथें दंग्यांत सनदा हरवल्या ह्मणून ही नवीन सनद करून घेतली.

१ सरंजाम नेमणूक बक्षी मिरजा अकबरशहा यास हुकूम करा. येणेंप्रमाणें नेमणुकीची सनद हत्फ हजारी वगैरे नेमणूक सनद रुकार.

ले० नं. ४४ श्रीशंभु. तारीख ९ जुलई १७९९.

राजमान्य राजश्री साबाजी राम केरकर यांस हुजूरची आज्ञा सुरुसन मयातेन व आलफ. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर हुजूर दाखल जाहला. त्याणीं कुणबीण ठेऊन घ्यावी ह्मणून तुमचें लिहिणें आलें. त्यावरून ठेऊन घेतली आहे. ज्या कार्याविशीं कुणबीण तुह्मास लिहिली होती त्यास दाखवून पाहूं. त्याचे उपयोगीं पडत असलेस ठेवूं. न पडलेस माघारें तुह्मांकडेस रवाना करून देविलें जाईल. आत्री व तिचे मुलास पाठवून दिली आहे. ती पळाली ह्मणोन छडाछडी करूं नये. सदरहू तुमचीं माणसें आलीं त्यांबरोबर पाठवून दिली आहे. जाणिजे. रवाना छ० ५ माहे सफर चंद्र मजकूर.

ले० नं. ४५ श्रीशंभु. ता० १२ दिसेंबर १७८९.

रा० राजश्री नरहर गणेश केरकर यांस. हुजुरची आज्ञा. सुरुसन तिसेन मयां व आलफ. स्वामी स्वारी श्रीच्या दर्शनास ओटवणेस जाणार याकरितां तुमची पालखी आणविली होती. त्यास काल रोजीं पुन्हा स्वारी वाडीस दाखल जाहली. तुमची पालखी भोई रवाना केले आहेत. तुह्मी जाऊन आरवेंदस राहिलां आहां. ती गोष्ट कांहीं चांगली नाहीं. याजकरितां तुह्मीं तेथें राहूं नये. वाडीस येऊन रहावें. हेंच उत्तम जाणून तुह्मास सूचनार्थ लिहिलें आहे. सरकारचे विचारास आलें ती गोष्ट लिहिली आहे. यावर तुमच्या विचारास येईल तदनुसार करावें. छ०२४ रबिलावल छ० मजकूर.

ले० नं. ४६ पौ छ० १ शाबान सन मयातेन श्री. ता० १९ डिसेंबर १७९९.
व अलफ रविवार.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे शेवेसीं.

आपत्य नारायणराव चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० २१ रजब मुक्काम नजीक वानवडी. वर्तमान यथास्थित असे विशेष. अलिकडे आपलेकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. ऐसें नसावें. वरचेवर आशिरवादपत्रें पाठवून सांभाळ केला पाहिजे. इकडील वर्तमान वानवडीस आल्याचें वगैरे सविस्तर पेशजी लिहून पाठविलेंच आहे. यजमानसाहेबांची मर्जी पहिल्यापेक्षां चांगली. दिवसेंदिवस कमती नाहीं. सरकारांत ओढ. लोकांस चार रुपये द्यावयाच्या कराराप्रमाणें पावत नाहीं. यामुळें वेढा आहे. राजश्री तात्या तोड-जोडींत आहेत. त्यापक्षीं धीरेंधीरें सर्व जाबसाल होत जाईल. दुसरें चिरंजीव मुलांचीं व मुलींचीं यंदां मुंजी लग्नें करणें जरूर. येथील दिवस तर नित्यानीं ओढीखालीं जातच आहेत. परंतु त्यांतच कळेल तसें करून यंदां उरकोन घ्यावींच लागतात. तीर्थस्वरूप भाऊचीही मूल थोर जाहाली. व चिरंजीवासही हें सातवें वर्ष. यंदां ठेविल्यानें पुढें तरी दिवस कसे येतात हें कोण जाणें. याजकरितां वडिलांचे मतेंही ठरून आपणास पत्रें गेलींच आहेत. मुलीच्या वराचाही विचार आपण योजिला असेल. याचें सविस्तर लिहावें. चिरंजीव बाबाचा व्रतबंध व लग्न उरकून घेतलें

१. या संधीस नेरी गांवीं गोव्यांचे फिरंग्यांचा दंगा होता. २. हा नारायणरावांचा मुलगा कृष्णराव बाबा होय.

पाहिजे. त्यास आमचें येणें तिकडे येऊन घडतें असें नाहीं. कार्ये ( ) श्री ताईची व आपली वडिलांची व आमची इच्छा तेव्हां येथून पालख्या, उंटें, तट्टें, वगैरे मार्गाचा सरंजाम पाठवून मातोश्रीस व चिरंजीव सौभाग्यवती मुलीस व वरकडांस आणून येथेंच व्रतबंध व लग्न उरकोन घ्यावें. ऐशी योजना करून हें पत्र वडिलांस लिहिलें आहे. सोग्गतीचा जाबसाल तर पेशजीच तीर्थस्वरूप राजश्री मामानीं चिरंजीव राजश्री येसोबाची कन्या द्यावयाचें बोलणें बोलतच आहेत. आण आपणासही तेंच करणें जरूर. पहिलेपासून सोई (फाटलें.)

ले० नं. ४७ श्री. सन १७८९.

वडिलांचे शेवेसीं चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना आज बुधवार सकाळ. सुखरूप असों विशेष. लक्ष्मणाकडे पत्र पाठविलें पावलें. मध्या इकडील वर्तमान. इंग्रजाचें तारूं रेडीच्या[1] ( ) वर आहे. व आणखी पांचचार फतेमाऱ्या व दोन तारवें असें ( ) आज दोनतीन रोज आहे. ( ) नित्य यास विलंब असला ( ) पत्राची तालीक घेतल्यास ( ) असें ती॥ भावानें सांगितलें आहे. हे विज्ञापी.

ले० नं. ४८ श्री. सन १७८९.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

आपत्य शिवबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १७ माहे रबिलावल मुक्काम जावद येथें वडिलांचे आशीरवादेंकरून सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. तेणेंकरून चिंता जाहली होती. त्यास हालीं चिरंजीव व्यंकोबाबरोबर छ० १५ मोहरमचें पत्र पाठविलें तें छ० १३ रबिलावल पावोन परम आनंद झाला. पत्रीं लिहिला तो मजकूर सर्व कळला. आह्मांकडील वर्तमान तर सर्व मंडळी सुखरूप आहों. यानंतर कर्जाचा मजकूर लिहिला. त्यास पांचचार हजार रुपये घेऊन पाठविले ह्मणून कर्ज वारतें असें काय नाहीं. एकच वेळ कर्जाचा ऐवज पाठवावा. तेव्हां कर्जांतून मुक्तता होणार. दादास नित्य कागद पाठवितों. पेशजी तुह्मांकडे कागद पाठविला होता. त्याजबरोबर आपण पत्र पाठविलें होतें. तें पत्र बजिनस आह्मीं लष्करांत पाठविलें व चिरंजीव नारबा येथोन लष्करांत गेला. त्याजबरोबरही सांगून पाठविलें होतें. त्यास दादांनीं लिहिलें कीं, खामाखाय कर्जाचे ऐवजाच्या हुंड्या चैत्रवैशाख मासीं पाठवून देतों. त्यास ते पाठवितीलच. जर त्याणीं न पाठविले आण रुपयेस विलंब लागला तर आह्मी येथून खामाखाय विसां हजारांच्या हुंड्या ज्येष्ठ मासीं पाठवितों. आह्मी येथें लोकांचें कर्ज करूं परंतु तुह्मांस कर्जांतून मुक्त करून आह्मी मामलतीचे रुपयेपैकीं दादाकडून मजरा घेऊं. परंतु खामाखाय कर्जाचा ऐवज त्याणीं न पाठविला तर ज्येष्ठ मासीं मी पाठवितों. यांत अंतर होणार नाहीं. आह्मास आपले पायांची शफत असे. आपण ( ) कर्जाविसीं याउपरी किमपी चिंता न राखावी. कर्जाचा जाबसाल मजकडे लागला. चिरंजीव दत्यास पाठविला. त्याची रोजगाराची सोई करून देणें ह्मणून लिहिलें. त्यास तो कोणता रोजगार करणार? त्याचें चालवावें हें खरें. त्यास घरीं खर्चास पाठऊं. वरकड खाजनाचा मजकूर

१. "रेडीच्या किल्यानजीक नस्तावर आहे."

आपण लिहिला. त्यास राज्यांत दंगा. तेव्हां खाजनास काम लावावें आण चार रुपये खर्चावे तर जेव्हां राज्यांत दंगा तेव्हां काम सिद्धीस जातें कसें? काम काय लहान नव्हे. काम तयार होण्यास दोन वर्षें पाहिजेत. तेव्हां तयार होणार. त्यांत जर मधीं दंगा जाहाला तर रुपया लागला तो व्यर्थ जाणार. यास्तव सध्या अनमान केला. एकवेळ कर्जांतून आदीं सुटावें. तेव्हां खाजनाचें काम चालीस लावावयाचें चित्तापासून आहे. चिरंजीव व्यंकोबाकडून सेले पागोटें वगैरे घेतलें तें त्यास द्यावें. ह्मणून लिहिलें. त्याजप्रमाणें त्यास येथें देतों. चिरंजीव राजश्री विश्रामास पाठविणेविशीं पेशजी लिहिलें होतें. व त्यास श्रीदेवाचा प्रसादही चांगला दिला. त्यास व्यंकोबा आला त्याजबरोबर पाठवावयाचा होता. तो न पाठविला. मागून पाठवितों ह्मणून लिहिलें. त्यास पाठविलाच असेल. जर न पाठविला असला तर आतां पाठवावा. राजश्री बाळाजी अत्माजी भालवणी देशीं आहे. त्याजकडे पाठविला ह्मणजे तो बरोबर घेऊन येईल. व मातोश्री मनुबाया ही कोंकणांत गेलींच आहेत. आपण कर्जाविशीं काळजी न करावी. आह्मीं लिहिलेप्रमाणें त्या दिवसांत पाठवावा. यास अनमान करूं तरी श्रीदेवाची व तुमची शपथ आह्मांस आहे. हे विज्ञापना. ( ) न चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. चिरंजीव राजश्री साबाजी व विश्राम व गणबा व यशवंतराव यांसी. आशीर्वाद उपरी तुह्मांकडील सविस्तर वर्तमान लिहीत जाणें हे आशिरवाद. तीर्थस्वरूप मातोश्री मावशी वडिलांचे सेवेशीं. चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार.

ले० नं. ४९ श्री. ता० ८ मे १७९०.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेशीं.

आपलें जगंनाथानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत वैशाख वद्य १० दशमी पावेतों वडिलांचे आशीरवादेंकरून मुकाम श्रीमथुराक्षेत्र येथें सुखरूप असों विशेष. वडिलांकडून बहूत दिवस आशीरवादपत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास छ० २० जमादिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. ती॥ राजश्री दादा सडे स्वारींत फौजसुद्धां पटाल्याचे नजीक होते. तेथील सरकारचे आज्ञेप्रमाणें शिकांचा वगैरे मुलखाचा बंदोबस्त करून दरकूच येतात. तूर्त त्यांचें मुकाम पाणीपतसोनपत येथील होतां. आठांदाहां रोजीं लष्करांत येतील. आमच्या त्यांच्या भेटी जलदीच होतील. आल्यानंतर वडिलांस सविस्तर लिहून काशीद पाठवितों. आह्मी श्रीहरिद्वाराजवळ फौज घेऊन होतों. तेथील कामगारी जाहाली. त्यानंतर सरकारचीं पत्रें लष्करांत येणेविशीं गेलीं. तेव्हां लष्करांत दरकूच आलों. येऊन आज पंधरा दिवस जाहाले. आपणाकडून काशीद शालिग्राम जावदेस आला. तेथून आपलीं पत्रें व ती॥ राजश्री नानाचीं पत्रें घेऊन येथें चिरंजीव बाळोबापाशीं आला. ते कागद सडे स्वारींत त्याच काशिदाबरोबर देऊन तीर्थस्वरूपांकडे रवाना केला. तो तेथेंच आहे. वडील रागास येतात जे कागद ल्याहावयास अनकूळ पडत नाहीं त्यास आह्मी तो आजपावेतों सरकारचाकरीवर. रोज स्वारीचें काम. त्यामुळें कागद लिहावयाचे कामांत अंतर जाहालें. पेशजी चिरंजीव राजश्री अंताजी रामचंद्र[१] यांच्या माणसांबरोबर पत्रें लिहिलीं तीं वडिलांस पोंचल्याचें सविस्तर लिहावें. सौभाग्यवती मातोश्री ताई यांस जावदेहून लष्करांत आणिवली. याविसीं सरकारचा

१. अंताजी रामचंद्र रेगे नद्दीचे आडकर हे आरवली गांवचे राहणारे. यांचे वंशज आरवली, नेमावर व सोयत येथें जाहागीरदार आहेत.

फारच आग्रह त्यामुळें तीर्थस्वरूपांस लिहून मग श्रीमंत सौभाग्यवती बायासमागमें लष्करांत आलीं. येऊन दोन महिने जाहाले. वडिलांस कळावें. पेशजी एकदोन पत्रांत मौजे हरमल व केरींतील खतें इनामी सरकारांतून करून दिल्हीं. त्यास गांवांतील द्वेषी फिरंग्यांस मनस्वी समजाऊन इनामी चालवायास दिकत करितात. ह्मणोन लिहिलें. याविषयीं येथून श्रीमंतांचीं पत्रें घेऊन चक्कि खंतो काशीद नि॥ सरकार याजबरोबर पा॥ आहे. त्या पत्रांची नकलही आलाहिदा या पत्रांत लिहून पाठविली आहे. ती घेऊन त्यांतील अन्वर्थ चक्की फिरंग्यांस द्यावी. दुसरें. श्रीमंत राजेबाहादर यांचीं पत्रें दरहमेशा येतात. व वडिलांचीही आज्ञा येत्ये कीं सरकारचें त्यांचे तर्फेचें कामकाज पडेल त्याचा जाबसाल करून त्याच्या मुलखाचा बंदोबस्त होईल तें करावें. त्याजवरून सरकारांत हमेशा विनंती करितच आहों. येथून श्रीमंतांस व नाना यांसही पत्रें परभारें जातच आहेत. याचा बंदोबस्त होऊन यावा असें आहे. जाहलाच असेल. व हल्लींही पत्रें राजश्री रामजी जाधव वकील यास लिहिलीं आहेत. व खातरजमेचीं पत्रें वाडीसही लिहिलीं आहेत. बंदोबस्त होऊन येईल असें आहे. जावदेकडील सर्व सुखरूप आहेत. तिकडून हमेशा पत्रें येतात. चिरंजीव बाळोबास व राजश्री अंतोबा भाऊ व मावाजी दुलाजी व लखबा वागळा यांस घरीं रवाना करून द्यावें असें होतें. त्यास सडी स्वारी जाहाली. तिकडे तीर्थस्वरूपांस व आह्मांस आठनऊ महिने लागले. आतां वडील आठां चवरोजीं येतील. आलेवर यांची जलदच रवानगी करून देवितों. घरीं लग्नें मुंजी करावयाची होती. त्यास आह्मांमध्यें कोणासच यावयास घडलें नाहीं. पराधीन चाकरीचा पेशा. याउपर वडिलांचे आशीरवादें घडेल तें प्रमाण. बहूत काय लिहिणें शेवेशीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

चिरंजीव विठोबा व मावाजी यांस आशिरवाद. इकडील वर्तमान वडिलांस लिहिलें आहे. त्यावरून कळों येईल. आपणाकडील सविस्तर वर्तमान लिहिणें हे आशिरवाद. शेवेसीं रामजी कृष्ण नावर साष्टांग नमस्कार विज्ञापना. येणाराबरोबर पत्रीं सांभाळ करावा. हें विदीत. सर्वप्रकारें आपणाशिवाय कृपा करणार कोण आहे. हे विज्ञाप्ती.

मातुश्रीबाई वडिलांचे सेवेसीं. चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. आह्मी सर्व सुखरूप आहों. वडिलांचे भेटीस चिरंजीवास लवकरच रवाना करून देतों. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. बाबुराव दाभोलकर सुखरूप आहेत. हे विज्ञापना.

आपत्यें विश्राम गंगाधर पालयेकर चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना.

लें० नं. ५० श्रीरामचंद्र. तारीख १२ मे १७९०.

श्रीमंत राजश्री सुबाराव कृष्ण आमात्य पंत संस्थान किल्ले नजीक बावडा नजीक करवीर यांचे संस्थानांतील सेवक याचे हातें बदमामली घडली असतां धन्याचा बंदोबस्त करून बळजोरीनें दत्त पुत्र देऊन मुख्यास कैद करून ठेवावा. अशी मसलत करून राजश्री नीळकंठराव आमात्य पंत निसबत सातारा यांचे बंधू रघुनाथराव आणून बावडेवर चढविला. दुराई फिरविली. आण श्रीमंतांस कैद करावें. याबद्दल स्वारी घातली. श्रीमंत हातास न लागतां राजमंडळीं पोंचले. राजानीं अंगिकार करून बावडेवर स्वारी केली. त्यांनीं आंबारीवर गोळा मारिला. संस्थान साध्य जाहलें नाहीं. व राजमंडळचीं वस्त्रें त्या'मुलास दिलीं नाहीं. आण पुढांही होत नाहीं. असें राजमंडळचे

---

१. वाडी सरकार राजे खेमसावंत यांचीं. २. जिवबादादांस.

बोलणेचा निश्चय आहे. किल्लेकरास बळ राजश्री नाना फडणीस यांचें आहे. जाबसाल कर्ते समयीं उभयपक्षीं सारखा करितात. त्याजमुळें संस्थानाचा बखेडा पडला आहे. व प्रांत निमेनिम सध्यां चालतो आहे. रोज अधिक सुभराव यांच्या प्रांतावर आहे. किल्यावर उपाय चालत नाहीं. व श्रीमंताचे पदरीं नामांकित मोहरा कर्तृत्वी नाहीं. व पैसा पदरीं नाहीं. सावकारी सोय करावी ह्मणोन सरकार निसबत राजश्री गोविंदपंत आह्मांकडे सनद पत्रें घेऊन आले आहेत. श्रीमंतांचा मानस संस्थान साध्य करून हरएकविशीं सरकार काजकामें करीत. त्यांचें संस्थानानुरूप ऊर्जित करतील. तूर्त उद्योग करून संस्थानाचा बंदोबस्त करून सरकारसेवेस पाहील त्याचें ऊर्जित करतील. याप्रमाणें सरकार निसबत कारकून बोलत आहेत. सनदा पत्रें दिलीं आहेत. ज्याचे नांवें पाहिजेत त्याचे नांवें करून द्यावयास येतील. याप्रमाणें राजश्री नरहर गणेश केरीकर यांचेकडे बोली लाविली असे. छ० १६ माहे शाबान सु॥ इहिंदे तिसेन मयां व आलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मुद्रा: श्री. ज्योतिस्वरूप चरणीं तत्पर राणोर्जासुत महादजी शिंदे निरंतर.)

ले० नं. ५१ श्री. तारीख २४ जून १७९०.

राजश्री विठल साबाजी गोसावी यांस.

--- आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहिणें विशेष. इस्माल बेग व दोनही राजांच्या फौजा व हरामखोरांचीं पलटणें इतके भारी जमावानिशीं आडचणीची जागा व मारवाडी त्यांत आणखी येऊन सामील जाहले त्यावरून हवाभरित होऊन लढाईस आले. त्यास तुह्मीं सर्वांनीं सरकारनक्षावर दृष्टी देऊन आराब व अडचण असतां घोडे घालून शत्रूचें पारपत्य केलें. तोफा घेतल्या तळ लुटून सरकारनक्षा केला. मोठी गोष्ट केली. तुह्मी हमेषा सरकारचाकरी करीत आलां. व पुढेंही कराल. हे खातरजमा आहे. जाणिजे. छ० १० सवाल सुरुसन इहिंदे तिसेन मयां व आलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

मोर्तब

सुद

ले०नं. ५२ श्री. ता० ११ अकटेबर १७९०.

(मुद्रा: श्री. ज्योतिस्वरूप च. त. राणोर्जासु. माहादजी शिंदे निरंतर.)

राजश्री विठल साबाजी गोसावी यांस.

--- आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ माहादजी शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहिणें विशेष. मेर्डत्यास मारवाडी तीस पस्तीस हजार जमून केशरिया करून रूबकार लढाईस जाहले. त्यावर तुह्मी घोडे चालून

---

१. या प्रकरणाचा निकाल जिवबादादांच्या मार्फतच झाला. २. हे विठ्ठलराव साबाजी रेगे आरवलीकर होत. यांस नहीचे आडकर असें ह्मणतात. हे शिंद्यांचे लष्करांत १६००० स्वारांचे सरदार होते असें त्यांजकडून आलेल्या पत्रांवरून समजतें. तसेंच गवरनर जनरल लार्ड साहेबांकडेस त्यांनीं हजर केलेले जाहागिरीचे प्रकरणांतही याविषयींची माहिती आहे. यांचे वंशज हल्लीं नेमावर एथें राहतात. ३. ही रजपुतांशीं झालेली पाटणाची लढाई होय. ४. प्रसिद्ध पाटणा व मेरटच्या लढाया रजपुतांशीं झाल्या. त्यांपैकीं ही मेरटेची लढाई होय.

दोन कोस मारीत गेलां. सरकारची फत्ते करून नक्षा केला. मोठी गोष्ट केली. तुमची तारीफ राजश्री गोपाळराव रघुनाथ व जिवाजी बल्लाळ यांणीं लिहिल्यावरून सविस्तर विदीत जालें. ह-मेशा तुह्मी सरकारनक्षा करीत आलां व पुढेंही कराल ही खातरजमा आहे. रवाना छ० २ सफर सुरुसन इहिदे तिसेन मयां व आलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. ५३ श्री. ता० ३ जानेवारी १७९१. (मोर्तब सुद)

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

आपलें बाळानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत पौष शु॥ १० पावेतों वडिलांचे आशिरवादेंकरून मुकाम श्रीमथुराक्षेत्र येथें सुखरूप असों विशेष. वडिलांकडून बहूत दिवस कागदपत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास पेशजी राजश्री वराडकर यांचें पत्र आलें. त्यांत लिहिलें होतें कीं चिरंजीव विठोबास समाधान फार नाहीं. याजकरितां राजश्री दुल्बा मळगांवकर केरीस गेले आहेत. त्याजवरून चिंता लागली आहे. ती कोठवर लिहावी? तव्हांच अजूरदार कासीद करून पत्रें पाठविलीं. तोही कासीद अद्यापि आलाच नाहीं. अलीकडे वडिलांचें पत्र आश्वीन शुद्ध चतुर्थीचें चिरंजीव राजश्री नारबाचे नांवें व विश्रामाचे नांवें आलें. त्यांत लिहिलें कीं विठोबाचा काळ भाद्रपद वद्य ८ सीम जाहला. हें वर्तमान ऐकोन परमदुःख प्राप्त जाहालें. तें काय लिहावें? ईश्वरें काय केलें!!! जे जे काळीं जें घडणार तें चुकत नाहीं. परंतु वृद्धापकाळीं वडिलांस दुःखाचा डोंगर जाहला. सर्वांस दुःखार्णवीं घातलें. आह्मी इतकेजण अ-सोन समयास वडिलांजवळ कोणीच नाहीं. आह्मी यावयाची बहूत दिवस तजवीज करितों. परंतु दिवसेंदिवस संकटाचाच प्राप्त. त्यास काय उपाय? येथें मातुश्रीस वगैरे दुखण्यानें हैराण केलें. आतां या गोष्टीचा विवेक करून चित्ताचें शांतवन करावें. ह्मणजे सर्वांचें दुःख कमी होईल. आह्मीं वडिलांस काय लिहावें. तीर्थस्वरूप राजश्री दादा मुहूर्तानें डेरेदाखल जाहले. एका कोशावर मुकाम आहे. तेथून पुढें जलदीच जाणार. श्रीमंतांचीं पत्रें वरचेवर निकडीचीं येतात. यास्तव जलदीच पुढें जातील. ती॥ राजश्री बापू इस्माल बेग याजवर कोनोंडाकडे फौज घेऊन गेले. त्यास एक महिना जाऊन जाहला. आह्मी सर्व मुलेंमाणसें घेऊन श्रीमथुरेस राहिलों. ती॥ नानाचीं पत्रें अ-जमेरीहून व चिरंजीव विश्राम याचीं पत्रें जावदेहून वरचेवर येतात. सर्व सुखरूप आहेत. चिरंजीव राजश्री नारबा श्रीमंतांकडे आहे. बहूत काय लिहिणें हे विज्ञाप्ती.

पेशजी अजूरदार कासीद पाठविला होता तो आज येऊन पोंचला. त्यास राजश्री अंतोबा आर-वंदेकर याचें पत्र आलें. त्यांत लिहिलें कीं वडिलांस दोन तीन महिने ताप लागत होती. आणि लघुशंकेस पांच दाहा वेळ दिवसामध्यें जात होते. असें जाहालें. हें वर्तमान ऐकोन चिंता प्राप्त जाहाली. तरी वडिलीं औषधउपाय करावा. हेगईवर न टाकावें. आराम जाहल्याचें वर्तमान ज-लदी लिहून पाठवावें. पत्राचे उत्तराची वाट पाहातों हे विज्ञापना.

लें० नं. ५४ श्री. तारीख ५ जानेवारी १७९१.

राजश्री जिवबादादा गोसावी यांसी.

— आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित रामजी पाटील जाधव दंडवत विनंती

१. कनोज प्रांत मेवाड.

उपरी येथील कुशळ तागायत छ० २९ रबिलाखर पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय (") यास कस्त मेहनत करून राठोड हारीस आणिले. त्यांचें बोलणें हांजीदीचें येऊन बोलतात. त्या मार्गेंच तह होऊन आपले श्रमाचा परिहार व्हावा. परंतु ( ) व त्या ( ) नी करून समयास घालविले. यामुळें रांगड्यांनीं डोळे फिरविले होते. परंतु श्रीमंत यजमानसाहेब दैववान. त्यांचा पुण्यप्रताप मोठा. आणि आपण यशस्वी ह्मणोन राठोडांचा धूर निघोन जाऊन मागती बोलावयासी आले. बोलतात. तेव्हां ईश्वर आपल्यास यश देऊन मसलतीची समेट लौकरच होईल. चिंता नाहीं. आपल्याकडील सर्व ( ) मान आपण बहूत ममता करितात. पालखीचीं वस्त्रें दिलीं ह्मणोन चिरंजीव राजश्री आण्याबानें लिहिलें होतें. आणि वरचेवर आपली कस्त मेहनत होती त्याचें लिहितात. त्यावरून बहूत संतोष होतो. दादा आपले कस्त मेहनतीची व करण्याची हातवटी दुसऱ्यास येणार नाहीं. आपण चिरंजिवावर कृपा करून पालखीचीं वस्त्रें देवविलीं. तेपक्षीं पालखीचा बंदोबस्त चांगला यथास्थित आपण करून देतीलच. आह्मीं लिहावें असें नाहीं. चिरंजिवाचे परामृसाविसीं लिहावें. तरी आपण परामर्ष करितच आहेत. आपला आमचा अर्थ पहिल्यापासोन दुसरा नाहीं. तेव्हां लिहिणें उपरोधिक दिसतें. वाडीकर सावंतांविसींचा मजकूर विस्तारेंकरून आपण लिहिलें त्यास आह्मीं आलों ( ) विसीचे जाबसालाचे आपल्यासीं बोलून आलों त्याप्रमाणें घडवावें ह्मणोन येथें आल्यावर त्याचे जाबसालाविसीं श्रीमंत नानाशीं किती वेळां किती बोलणी ( ) प्रकारें काय पडली. व यामुळें हरिपंत तात्याचे चिरंजीव राजश्री दाजीबा फडके यांच्या आमच्या टपी नानाचे समक्ष कितिएक वेळां पडल्या तितकेही मोडून सावंतांकडील मुलूख किलेकोट सोडून देवावे. असें खचित ठरवून सरकारचा कारकून ( ) न करविरास पाठविले. तेथें करवीरकर महाराज आग्रहास पडून दाहा वेळ दाहा तरेचीं बोलणीं पडून कारकुनाचीं पत्रें आलीं त्यावरून सरकारचीं पत्रें निक्षून उग ( ) उलगडावे असे तऱ्हेची ( ) वताचा प्रांत, किल्ले सुटले. ह्मणजे जाहालें. तो योग घडत नाहीं. हालीं परशरामभाऊ धारवाड प्रांतीं आहेत. त्यांजला वगैरे जवळपासचे मामलेदारास सावंताचा मुलूख किल्ले सोडून देण्याविसीं पत्रें घेऊन पाठविण्याचा विचार नानासीं बोलून ठरविला आहे. लवकरच पत्रें रवाना करूं. याजवर पुढें काय होतें पाहावें. होईल तसें आपल्यास लिहून पाठवूं. सावंतांकडील जाबसालास आह्मांकडून आळस केला. तो मागें सोडविण्याविसींच हा प्रयत्न पडत आहे. आह्मी आपले तर्फेनें कारस्थान चुकत नाहीं. ईश्वर सत्य करून चार दिवस अधिकउणें लागून उलगडेल. चिंता नाहीं. आपण तिकडील बारीकमोठें वरचेवर वर्तमान लिहून संतोषवित असावें. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

लें० नं. ५५ श्रीगजानन. जानेवारी १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें जिऊबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत पोष्य वद्य मुकाम सडी फौज खवासपुरा नजीक जोतपूर प्रांत मारवाड जाणोन वर्तमान यथास्थित असे विशेष. वडिलांकडील पत्रें राजश्री लखबा लाड याच्या कासिद्राबरोबर चिरंजीव राजश्री शिवबा यासीं जावदेस

१. मारवाडवाल्यांनीं. २. जिवबादादांचा पराभव कधीं झालाच झाला नाहीं असें प्रसिद्ध आहे. पहा वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ८५।९३.

पत्रें आलीं होतीं. त्यांजवरून कळेल. इकडील वर्तमान तर वरचेवर लिहून पाठविलेंच आहे. पोष्य शु॥ १ पावेत रोग दुधदई हिकडे आज चार महिने होऊन त्रंबक देवआज्ञा जाहला. चिरंजीव राजश्री शिवबास व सौभाग्यवती लक्ष्मीस दुःख जाहलें आहे. तें पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. तेथील गृहस्तांचीं पत्रें आलीं. त्यांत उभयतां तीन रोज बिछान्यावरून उठलीं नाहीं ( ) तोंडांत गेलें नाहीं. तेव्हां आज कळत आहे. अशीं पत्रें आलीं. त्या आलीकडे त्याजकडील पत्र आलें नाहीं. तिकडील त्यांची काय अवस्था कळेना. त्यास शब्द ठेवावा तर चार ( ) जावें असें आहे. त्यास त्याजकडे जन्म जाहला. त्या दिवसापासून तीन वर्षां त्याजवळ होता. एक एक गुण त्याचा यत्रजून छाती तडकून जात असेल. त्यांनाही तेथें सांगावयास कोण मायेचा नाहीं. तिघी मुली त्याजबरोबर ओरडत बसतील. दोघी तर सुना भिडेच्या कळतच आहे. वरकड मातोश्री अगोदर सात रोज लष्करास आली. आज साडेतीन महिने सुलास दुखणें. तेथून उभयतांनीं अन्न सोडलेंच होतें. अलीकडे तर कळतच आहे. कोंकणांत रवाना करणार. उभयतां मुली व उभयतां सुना त्यांस मुलाच्या दुखण्यामुळें अटकाव जाला. मुलास उतार पडला ह्मणजे चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीसुद्धां सर्व रवाना करावी, असें होतें. तें श्रीच्या चित्तास न आलें. अशी गोष्ट जाहाली. त्यास मुलीं उभयतां दुसरचीं माणसें व उभयतां सुना ऐशा आणखी कोणासही देऊन रवानगी करावी. त्यास तूर्त त्याजवळ कोणी नाहीं. आणि चिरंजीव इंदुरास आहे. त्यास मारवाडी यांची मामलत जाहली आहे. आठां चवरोजीं माघारें श्रीमंतांपाशीं जाऊं. तेथें गेल्यावर श्रीमंतांचा निरोप घेऊन जावदेस चिरंजीवापाशीं तेथें गेल्याऊ (यापुढील बंद मिळत नाहीं.)

ले० नं. ५६ श्रीशंकर. तारीख ११ फेब्रुवारी १७९१ शुक्रवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बाळकें विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ७ माहे जमादिलाखर मुकाम जावद येथें वडिलांचे आशिर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. वडिलांकडून ( ) ईस मागती मूल जाहला होता तो ( ) देशीं गेल्यावर सध्या येणें कसें घडतें. याअर्थी साहा महिने लष्करांत राहून ( ) जाहली ह्मणजे आह्मी बरोबर घरीं येऊन जाऊं असें ह्मणों लागली. तेव्हां तीर्थस्वरूप राजश्री नानांनीं रवाना केलीं. तीं दादाकडेस सडे फौजेंत आहेत. वरकड मातोश्री मावशी वगैरे अजमेरीस नजीक श्रीमंतांचें लष्कर पडलें आहे. तेथें ती॥ राजश्री बापू व भाऊ व रावजी आहेत. त्यांजपाशीं आहेत. हलीं नाना ती॥ सौभाग्यवती मातोश्री लक्ष्मीहोनीस कोकणांत पाठविणार होते. परंतु ती॥ राजश्री दादांनीं पत्रीं लिहिलें कीं, तिजला बरोबरच आणावी. पुष्करस्नानही होईल. आण चौ महिनेनंतर अवध्यांसच रवाना करून देऊं. सध्या कोंकणांत न पाठवावी असें लिहून आलें त्याजवरून बरोबर न्हेली. वरकड जावदेस होतीं. सौभाग्यवती सुंदराबाई व चिरंजीव सौभाग्यवती लाडूबाई व सौभाग्यवती वायु वरकड यांस घरीं रवाना केलीं. बरोबर राजश्री रामबा मांद्रेकर व राजश्री रंगाबा साखवळकर यांस पाठविले आहेत. यांजबरोबर वस्त्री व कापड पाठविलें आहे. त्याच्या यादी आलाहिदा राजश्री रंगाबा साखकळकर याजकडेस लिहून दिल्या आहेत. त्याप्रमाणें समजून घ्यावें. वस्त्री पाठविल्या त्या ती॥ राजश्री दादांनीं वस्त्री करून पाठविण्याविसीं वडिलांस सांगितलें होतें. त्याजवरून येथें तरतूद जाहाली तेवढ्या वस्त्री करून पाठविल्या आहेत. आणि बाकी पाहिजे त्यास तेथें पहिल्या जुन्या वस्त्रा

आहेत. त्या मोडून नव्या कराव्या. त्याची याद येथून आलाहिदा लिहून पाठविली आहे. त्याजप्रमाणें जुन्या वस्ती मोडून ज्याच्या त्यांस लिहिल्याप्रमाणें करून द्याव्या. अनमान कराल. आण त्या जुन्या वस्ता तशा ( ) येथून सध्या कांहीं पाठवावयास मिळणार नाहींत. आणि त्याही वस्ता तेथें उपयोगी पडावयाच्या नाहींत. याजकरितां यादीप्रमाणें अगत्य वस्ती करून घ्याव्या. येविसीं ती॥ राजश्री नानानीं जातेसमयीं फार सांगितलें आहे. आणि त्यांनींच यादी लिहिल्या आहेत. त्याजवरून आपणांस लिहिलें आहे. वस्ता आपणास बसून करवावयास न बनलें तर ती॥ राजश्री बसवून करून घ्याव्या. तेंही न झालें तर येथून राजश्री रंगोबा गेले आहेत. त्यांस सांगावें ह्मणजे हे बसून करून घेतील. यास अनमान न करावा. ती॥ राजश्री नाना आजच कूच करून लष्करीं जाण्यास गेले. लष्कर येथून पंनास कोसांवर आहे. चौं पांचां दिवशीं जाऊन पोंचतील. श्रीमंतांच्या भेटी जाहल्यावर काय जाबसाल होईल तो कळेल. त्यासारखें मागाहून आपणास लिहून पाठवितों. मारवाडाकडील मजकूर. सलूक राठोडांसीं ठरला. साठ लक्ष रुपये खंडणी ठरली. त्यांत आठ लक्ष रोखड घ्यावे. आठां लक्षांचा मुलूख सांभर रूपनगर वगैरे घ्यावे. बाकी राहिले ते पुढां वाइदा मुजर्तीप्रमाणें भरावे. असा जाबसाल ठरून श्रीमंतांच्या सऱ्या फौजा ती॥ राजश्री दादा वगैरे एक मजल माघारे अलिकडे आले. अजमेरचा किल्ला राठोडांकडेस आहे. त्याच्याही उटंच्या आल्या आहेत. आटां चौ रोजीं किला सुटेल. ती॥ राजश्री दादाही लवकरच श्रीमंतांच्या लष्करीं येतील. ऐसीं लष्करचीं पत्रें आलीं होतीं. ती॥ राजश्री दादाकडून व ती॥ बापू व भाऊ व रावजी यांजकडील पत्रें वरचेवर येत असतात. सर्व मंडळी सुखरूप आहेत. यंदां हे प्रांतीं पर्जन्य पडला नाहीं. त्याजमुळें पीक कमती जाहलें. याजमुळें मामलतींत तोटा आहे. व माहागाई फार आहे. त्याजमुळें खर्च बहूत लागतो. पुढें ईश्वर कसें पार पाडील कळेना. खर्चास घरीं यंदां पाठविणार होतों. परंतु मामलतीची ही अवस्था. तशांत लष्करांत जाणेचें जाहलें. त्याजमुळें कांहींच तरतूद जाहली नाहीं. मागून कांहीं तरतूद होईल तर पाहावें. वर्तमान सर्व राजश्री रंगोबा सांगतील. त्याजवरून विदीत होईल. बहूत काय लिहिणें. राजश्री शामराव आजगांवकर यांचें कुटुंब कुंभारजुवेस आहे. त्यास शामराव याजला येथें वडिलांनीं आपणाबरोबर घेऊन गेले आहेत. आण त्याचें कुटुंब हल्लीं डोळ्या व पालखी येथून गेलीं आहेत. त्या माघारे येणार आहेत. त्याजबराबर त्यांचे स्त्रीस व मुलांस इकडे रवाना करून द्यावीं. त्याच्या मुलांचीं लग्नें होणें आहेत. त्याजमुळें पंधरावीस रोज जाजती लागले तर पालखी अगर डोळी एक व घ्या ( ) स्वार असे ठेवून घ्यावे. आण त्याचे घरचीं लग्नें जाहलीं ह्मणजे इकडेस रवाना करून द्यावीं. सुखरूप येऊन पोंहोंचे तसें करावें. वरकड डोळ्या वगैरे सरंजाम एथून पोंहोंचतांच आटां चवदिवशीं माघारे (पुढील बंद मिळत नाहीं.)

ले० नं. ५७ पे॥ छ० ७ शाबान. श्रीशंकर. ता० ६ मार्च १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

अपत्य विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन शुद्ध २ मुकाम जावद येथें वडिलांचे आशिर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास हालीं पत्रें शामल्याबरोबर व राजश्री रामबा मांद्रेकर व तीर्थस्वरूप राजश्री मदबा आपा याचे माणसाबरोबर पाठविलीं तीं अवघीं काल येथें पावलीं. लिहिला मजकूर

सर्व कळों आला. ती॥ राजश्री दादाचे व नानाचे नांवचीं पत्रें पाठविलीं तीं अजमेर व लष्करीं रवाना केलीं. त्याचें उत्तर आलेवर मागून कासीद पाठवून देतों. व खर्चाविसीं लिहिलें. तेंही अजमेरीस लिहिलें आहे. अजमेरहून आज्ञा आलेविना आह्मीं परभारेंच कांहीं पाठवावें तर योग्य नाहीं. अजमेरचे आज्ञेविना येथें कांहीं होत नाहीं. त्यांचे मर्जीनरूप केलें पाहिजे. ऐसें आहे. याअर्थी हालीं आपण खर्चाचें लिहिल्याप्रमाणें आजमेरीस व लष्करांत लिहिलें आहे. तेथून दाहा बारा रोजांत उत्तर येईल. आलेवर पाठऊन देतों. विलंब न जाणावा. तेरेखोलचे फिरंगी यांचें पत्र पाठविलें तेंही लष्करांत पाठविलें आहे. पेशजी हुंड्या एकेचाळीसमें रुपयांच्या पाठविल्या त्यांपैकीं पांचशेंची पेट राहिली ती पाठवावी ह्मणोन रागें भरून लिहिलें. त्यास ती हुंडी येथील नवती. ती॥ राजश्री दादांनीं लष्करांतून दिली होती. आह्मांकडील असती तर इतिरोज पेट पाठवावयास विलंब न होता. येविसीं दादांकडे दोनचार वेळां लिहिलें. परंतु ते हुंडीचें ठिकाण लागून पेट येत नाहीं. त्यास माझा उपाव काय? हालीं दादांकडे निकटीनें लिहिलें आहे. कीं ते रुपये माघारे द्यावे लागतात, पेट जलदी पाठवावी ह्मणोन लिहिलें आहे. आतां पेट आली तर पाठऊन देतों. मागून आमचें उत्तर येईपर्यंत साहूकारास रुपये सध्यां न द्यावे. याचा जाब लागून लष्करांतून उत्तर आलेवर वडिलांस लिहून पाठवितों. आपले शरीरीं समाधान नाहीं ह्मणोन सामलया वगैरे माणसें आलीं त्यांणीं सांगितलें. आण पत्रीं तंव कांहींच लिहिलें नाहीं. तृषा बहूत लागती व लघवीस वारंवार जावें लागतें. आलीकडे चार ताप एकांत्रे आले. ऐसें सांगितलेवरून आनिवार चिंता प्राप्त जाहली आहे. ती कोठवर लिहावी. यास्तव शालिग्राम कासीद यासी गुजरद पाठविला आहे. तर आरोग्यपणाचें वर्तमान सविस्तर लिहून पाठवावें. तेव्हां चित्त स्थीर होईल. चित्त अवघें तिकडे लागलें आहे. मजला येणेंविशीं रागें भरून लिहिलें. त्यास खरेंच आहे. परंतु माझें येणें जर माझे हातीं असतें; तर इतिरोज आलों असतों. परंतु दादाची व नानाची आज्ञा होईल तेथें मामलत बखेड्याची आहे. तेथें कोणी शाहाणा राहून बंदोबस्त जाहला पाहिजे. तेव्हां निघणें होतें. हें अवघें सोडून त्यांचे आज्ञेशिवाई निघून यावें तर ठीक दिसत नाहीं. यंदां अवघीं मुलेंमाणसें आह्मांसुध्दां रवाना करावीं. हा विचार दादांचा होता. परंतु मार्गीं होळकरांचा दंगा. त्याची आपली चित्तशुध्दी नाहीं. व देशी काल अनिवार ह्मणून सध्या राहून घेतली. आह्मीं तंव जाणार ह्मणोन वारंवार लिहितों. हालींही लिहिलें आहे. उत्तर त्याचें येईल त्यासारखें येणें होईल. माझा मनोदय तर वडिलांचे पायांजवळ लागला आहे. परंतु भेट घडून येईल तेव्हां खरें. शामलयाबरोबर मिरें आमसोलें वगैरे जिन्नस पाठविल्याप्रमाणें पावला. व तटें माणसें सुखरूप पोंचलीं. अजमेरची मंडळी व लष्करचीं अवघीं मुलेंमाणसें लहानथोर सर्व सुखरूप आहेत. येथें पत्रें वरचेवर येत असतात. येथील मंडळी जावदची अवघी खुशाल आहे. आपण काळजी न करावी. घर बांधविलें त्याचा मजकूर लिहिला तो अवघा कळला. घरेंजमीचे खर्चास पाहिजे ह्मणोन लिहिलें. त्याजवरून मागून उत्तर लष्करचें येतांच कासीद रवाना करितों. वडिलांचे शरीरप्रकृतीचें वर्तमान ऐकोन चिंता फार लागली आहे. तर आराम जाहल्याचें वर्तमान लिहिलें पाहिजे. पत्र येईल तेव्हां चैन पडेल. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री गणोबास आशीर्वाद उपरी तुह्मांकडील वर्तमान स्वदस्तुरानें लिहून पाठवावें हे आशीर्वाद.

लें० नं. ५८ श्रीगजानन. तारीख १४ मार्च १७९१ सोमवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें जिवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन शु ॥ ९ मुकाम आरणवस नजीक श्रीपुष्कर सडी फौज येथें वडिलांचे आशीर्वादें सर्व सुखरूप असों विशेष. अलिकडे वडिलांकडून दोन तीन महिने पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. यावरून चिंता वाटती. त्यास सविस्तर बरवेपणाचें वर्तमान लिहावें. इकडील वर्तमान तर मारवाड व जयनगर येथील दोहिं संस्थानचा सलूख होऊन मामलत जहाली. अजमीरच्या किलयावर आपला अंमल जहाला. किल्ला व तेथील मामलत आपणाकडे घ्यावी. ऐसी यजमानसाहेबांची मर्जी त्यावरून चिरंजीव जगंनाथे[1] अजमेरीस लोकसुद्धां ठेविले होते. आह्मी इकडे सडे फौजेंत होतों. माहाराजांचा मुक्काम अजमेरचे नजीक आला. तेव्हां चिरंजीव राजश्री शिऊबा यासी सरकारचें आज्ञापत्र गेलें कीं, अजमीरच्या किलयाचा मामलतीचा जाबसाल किल्यासुध्धां आपल्याचकडे ठरवून फाल्गून शुं ॥ २[2] चिरंजीव शिऊबा यासीं वस्त्रें सरकारांतून दिलीं. हल्लीं शिवबा व चिरंजीव जगोबा उभयतां लष्करांतून अजमेरीस आले आहेत. सौभाग्यवती लक्ष्मी व सौभाग्यवती उमा व चिरंजीव भाऊ व रामबा ऐशीं समागमें अजमेरीस आलीं. मामलत किल्यासुद्धां श्रीमंतांच्या[3] मर्जीमुळें कबूल करावी लागली. परंतु मारवाड जयपूर उभयतां संस्थानच्या हद्दीवर किल्ला आहे. तेव्हां फौज सरंजाम चांगला पाहिजे. लाखों रुपयांचा जाबसाल आहे. फौजा आल्या तेणेंकरून मुलूख अगदीं खराब झाला आहे. व यंदा पर्जन्य नाहीं. यामुळें पीकही न झालें. असा प्रकार आहे. तशांत धन्याचे मर्जीस येऊन नेमणुकीचा वगैरे बंदोबस्त करून देतील तो पाहावा. खासा स्वारी आठ चार रोजीं अजमेरीस व पुष्करास येणार. तेथें आल्यावर सर्व बंदोबस्त करून देऊं. ह्मणून श्रीमंतांनीं आज्ञा केली आहे. तीर्थरूप मातोश्रीबाई व सौभाग्यवती उमाबाई व सौभाग्यवती रखमाबाई व चिरंजीव काशिबा व रामबा ऐशीं जावदेस होतीं. त्यांस माहाराजांचा मुक्काम अजमेरीचे नजीक आला तेव्हां शिवबा यावयाचे पूर्वीं त्यांस लष्करांत चिरंजीव जगोबा व बाळा व मूल होते, तेथें आणलीं. सर्वांची भेट झाली. तेथें एकत्रच होत. त्यावरी मातोश्री मावशीबाई श्रीपुष्कराच्या स्नानास आली होती. तेथून हल्लीं आह्मांकडे बोलाऊन घेतली. त्यांची आमची भेट झाली. ती येथेंच आहे. उमा व चिरंजीव रामबा अजमेरीस आलीं. सौभाग्यवती रुखमीण व चिरंजीव काशिबा लष्करांत चिरंजीव बाळा आहे, तेथें आहेत. चिरंजीव राजश्री विश्राम याचे स्वाधीन जावदेची मामलत करून शिवबा आले. कारकून वगैरे बंदोबस्त तेथें आहेच. सौभाग्यवती उभयतां मुना व चिरंजीव सौभाग्यवतीकडे व सौभाग्यवती बायू अशीं कोंकणांत रवाना करून दिलीं. बरोबर रंगोबा सांखोळकर व चिरंजीव रामबा मांजरेकर व डोळ्या व घोडीं, माणसें वगैरे सरंजाम देऊन रवाना केलीं. त्याच ठिकाणीं सुरक्षित पोहोंचलीं याचें वर्तमान लिहून पाठवावें. उत्तर येईपर्यंत काळजी आहे. आपलीं पत्रें छ० २ जमादिलावलचीं आलीं तीं पाहून लिहिला मजकूर कळला. राजश्री सरदेसाई यांनीं सांगून पाठविलें त्यावरून साबाजीस वाडीस पाठविला होता. त्याजकडेस पांच हजार रुपये खर्चास मागत होते. चिरंजीवानें नाहीं ह्मणून जाबसाल केला. तूर्त आह्मांकडे काय आहे? कर्जाच्या पेचांत आहों. त्याजवरून चिरंजीवास निरोप

१. जगंनाथ ऊर्फ जगोबा बापू. २. तारीख ६ मार्च सन १७९१ रविवार. ३. महादजी शिंदे यांच्या.

देऊन मागील गोष्टी राज्यांत अपाय जाहला. ह्मणून कित्येक विस्तारें बोलले. परंतु सरदेसाई यांचें समाधान करून कांहीं तरी दिलें पाहिजे. ह्मणून लिहिलें त्यास आपण त्याची तरतूज काय करून दिली तें लिहून पाठवावें. आह्मांकडे सरदेसाई यांजकडील जवाहीर गोसावी व रामभट कनोजा व जासूद तिघे असे साहा महिने येऊन बसले आहेत. सरदेसाई यांचें हस्ताक्षर पत्र फौजेवर पटी घालून पंधरावडा लाख पंनास हजार रुपये पाठवून द्यावे. त्यास येथील यजमान यांची मर्जी दिवसेंदिवस बारीक. यांत ईश्वर अब्रू राखील तें खरें. परंतु त्याचे जासुदास सरकारांतून एकशें विसांची वरात दिली होती. ते रुपये व येथून खासगीबद्दल रुपये ८५ पंचाऐंशी शिवाय शेले पागोटें दिलें. जवाहिरगिरीस सेंपंनास रुपये दिले. वर्षास पांचशें रुपयेचा आजुरा त्याचे काशिदास लागतो असा येथील प्रकार आहे. तुह्माकडून तेथें खर्च उत्पन्न होत असेल तो आपणास टाऊकच आहे. हे विज्ञाप्ती.

चिरंजीव राजश्री विठोबा व साबाजी वरकड मुलांस आशीर्वाद. तुह्माकडील वर्तमान लिहीत असावें.

ले० नं. ५९, पैवस्त छ० २४ मवाल इसने. श्री. तारीख ८ एप्रील १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बापू वडिलांचे शेवेसीं.

आपत्यें जिवबानें व शिवबानें व जगोबानें व बाळानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत चैत्र शु ॥ ५ पंचमी मुकाम श्रीपुष्कर प्रांत अजमेर. वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. खल्या काशिदाबरोबर श्रीमंत राजश्री राजेबाहादर यांणीं पत्रें व वडिलांची आशीरवादपत्रें आलीं तीं पावोन सविस्तर वर्तमान कळलें. इकडील वर्तमान तरी वरचेवर लिहून पाठविलेंच आहे. फाल्गून वद्य ११ श्रीपुष्करचे मुकामीं श्रीमंत यजमान साहेबांच्या भेटी जाहल्या. पुढें मसलत फौजा घेऊन पटाल्याकडे जावें अशी यजमान साहेबांची इच्छा आहे. त्यास येथून कूच होऊन साम्बर व मारोट येथें मुकाम होऊन जयनगर व मारवाडी उभयतांचे खंडणीचे एवजाचा निर्गम होऊन पुढें जी मसलत ठरल ती पाहावी. सरकारांतून अजमेरचा किला व मामलत चिरंजीव शिवबाचे नांवें करून दिली. सर्व मुलें माणसें एकत्रच आहों. पुढील मसलत घरचीं मुलें माणसें अजमेरीस ठेवणें अगर समागमें नेणें हें ठरल्यांत आल्यावर मागाहून विनंती लिहून पाठवूं. चिरंजीव सौभाग्यवती उभयतां सुना व सौभाग्यवती लाडू व बायू यांची रवानगी करून तीन महिने जाहाले. आज काल वडिलांकडे पोंचलींच असतील. त्यांजकडील सविस्तर लिहून पाठवावें. श्रीमंत राजश्री सरदेसाई बाहादर यांणीं वडिलांस हुजूर येण्याविसीं आज्ञा केली त्यावरून चिरंजीव राजश्री साबाजीस पाठविला. त्याजपासीं खर्चास मागूं लागले. त्याणें उत्तर केलें आह्मांकडे काय आहे, रुपये कोठून द्यावे. त्यावरून मर्जी खटी होऊन बोलूं लागले जे. तुह्मांमुळें आमचे राज्यास अपाय जाहाला. त्यास त्यासीं आह्मी तों त्याचे राज्याचें कल्याण इच्छीत आहों. ह्मणून आजवर आपल्या हातें चाकरी घडोन आली. त्यास व तुह्मांकडून तेथून त्याचे मर्जीनरूप चालला असें असतां सांप्रतकाळीं मर्जी कडवी होऊन भाषण केलें. राज्याची मसलत पुढील अंदेशा हा ज्याचा त्याणीं ध्यानास आणून जें करणें तें करावयाचें होतें. तो जाबसाल पहिलाच आपला

१. कंजूषपणा जिवबादादांस आवडत नव्हता असें यावरून उघड होतें. २. तारीख ३० मार्च १७९१. ३. जैपूर.

बंदोबस्त पक्केपणें न राखतां जाबसाल बिघडला त्यास आह्मीं काय करावें. आमचें तों कायावाचामनें चाकरींत अंतर न केलें. असें असतां उलट शब्द. तेव्हां आपली ग्रहदशा. धण्याकडे काय शब्द. हालीं सरकारांत यजमान साहेबांस विनंती करून श्रीमंत राजश्री नाना[1] व रामजी[2] पाटील जाधव यांसी पत्रें पाठविलींच आहेत. व त्यांचीं उत्तरें पुण्याहून आमचे नांवें आलीं तींही बजिन्नस सरकारांत पाठविलीं आहेत. त्याजवरून सर्व विदित होईल. सारांश. येथून उपकार करावयास व पत्रें पाठविण्यास आळस केला नाहीं. परंतु यजमान दूर हिंदुस्थान प्रांतीं मोहीमशीर. तेव्हां तेथील काय दैवयोग न कळे. जाबसाल लांबणीवर पडतो. आमचा तरी याविसीं उपाय कोणता. आतां एक आस्था आहे कीं, यजमान साहेबांची स्वारी देशीं आली ह्मणजे करवीरकरांनीं जितके उपकार केले आहेत, तितके उसणे फेडून बंदोबस्त मनोदयानुरूप करून चाकरी करून दाखवावी. असा बेत आहे. श्रीदेव घडवील तें खरें. हेंच पत्र तेथील मुत्सदी राजश्री त्रिंबकराव चिटणीस व मांतैबा[3] आपा यास दाखवावें. विशेष काय लिहिणें. ईश्वर घडवील तें खरें. यंदा त्या प्रांतांतील माहागाई यामुळें कुटुंबवत्सल यांची खराबी मोठी. आह्मांकडून साहित्य खर्चाचें व्हावें तर रात्र दिवस सरकारचे चाकरीमुळें परस्वाधीन, कांहीं सुचत नाहीं. आपण फार खर्चाची ओढ ह्मणून लिहून वरचेवर येतें. आमचा उपाय चालेल तेथवर अंतर होणार नाहीं. हे विज्ञाप्ती.

चिरंजीव राजश्री विठोबा व साबाजी व गणबा व वरकड मुलांस आशिरवाद. तुह्मांकडील वरचेवर वर्तमान लिहित जावें हे आशीरवाद.

शेवेशीं साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान तरी गंगाराम पुवर्या याजबरोबर शेवेसीं लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. इकडील वर्तमान. यजमानांनीं लिहिलेलें सरकारांत व आपणास त्याजवरून कळेल. लोभ कीजे हे विज्ञापना.

लें० नं. ६० पै॥ ता॥ छ० १५ सवाल दिनं. श्री. तारीख १० एप्रील सन १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

आपलें जिवबानें व शिवबानें व जगोबानें व बाळानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत चैत्र वद्य ७ सप्तमी पावेतों मुकाम श्रीपुष्कर येथें वडिलांचे आशीरवादें सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. याचमुळें रात्रंदिवस चिंता आहे. तरी सदैव येणाराबरोबर आशीर्वादपत्रें सांभाळिलें पाहिजे. यानंतर येथील वर्तमान तरी जयपूर व मारवाड दोनही संस्थानच्या खंडण्या ठरवून सलूख जाहला. येथें सर्व मंडळी मुलें लेंकरें सुद्धां सुखरूप खुशाल आहों. श्रीमंतांनीं कृपा करून अजमीर सुभ्याची मामलत किल्यासुद्धां चिरंजीव राजश्री शिवबाचे नांवें सांगितली आहे. तूर्त सडी फौज व श्रीमंत सर्व एक जागेंच आहों. पुढें मसलत काय ठरेल ती पाहावी. छावणी बहुतकरून श्रीमथुरेसच होईल, असें दिसतें. जावदेस चिरंजीव विश्राम आहे. बाळाजी आत्माजी व हरिपंत[4] वगैरे कारकून तेथें आहेत. कामकाज चालतच आहे. चिरंजीव सौभाग्यवती उभयतां सुना व लाडू व बायू यांची रवानगी चिरंजीव राजश्री शिवबा इकडे येतांना केली. त्यास तिजला महिने होत आले. बहुतकरून वडिलांपाशीं पोंचलीं असतील. सुखरूप पावल्याचें वर्तमान लिहिलें पाहिजे. दोन तीन वर्षें कोंक-

१. नाना फडणीस. २. हे शिंद्यांकडून पुण्यास वकील होते. ३. सांतो राम सबनीस माकेरकर. ४. हे जिवबादादांचे हिंदुस्थानांतील कारभारी होत.

णांत महर्गता त्यांत यंदां बहुतच जाहाली आहे. तेथें खर्च व्यर्च भारी. येथून कांहीं मदत व्हावी तर रात्रंदिवस सरकारकामामुळें कांहींच सुचत नाहीं. लोकांचे गवगवा धरणीं पारणीं तरतऱ्हेचे झगडे ते पत्रीं कोठवर लिहावे. श्रीमंत राजश्री राजे सरदेसाई बाहादर यांचे पदरीं आपण त्यांचें साहित्य येथून घडावें ह्मणून प्रयत्न करून किताबत व मोर्चेलें पाठविलीं. त्याणीं पक्केपणीं बंदोबस्त पुण्याहून वगैरे करून घ्यावा. तो न घेतां उतावळी केली त्यामुळें करवीरकरांची फौज कोकणांत जाऊन किले ठाणीं मुलूख घेतला. नांवाचे माणूस. लढाई करून शत्रूचा पराभव करावा तेंही न झालें. आणी उलटें विषम वाटून चिरंजीव राजश्री साबाजीस वाडीस[1] नेऊन मनस्वी भाषणें केलीं, ह्मणोन कळलें. असो. आपण तों आजपर्यंत त्यांची चाकरीस कमी केली नाहीं. आणि पुढेंही पुणेंकरास कागदपत्र यजमान साहेबांचे साहित्याविसीं वारंवार जातच आहेत. परंतु केवळ कागदपत्रांनेंच निर्वाह नसतो. कांहीं पराक्रमाचा विचार असावा. थोर धनी आहेत. वरकड आह्मांकडून त्यांचे अन्याचा जाबसाल आहे. तोच घडेल, यांत संशय नाहीं. हे विज्ञापना.

ले० नं. ६१ छ०१५ सवाल शालिग्राम इसन्ने. श्री. तारीख ४ माहे मे सन १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

अपत्य शिऊबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २९ रोज मंगळवार माहे साबान प्रातःकाळ पावेतों मुकाम अजमेरीस सुखरूप असों विशेष. वडिलांकडून आशीर्वादपत्रें येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता वाटती. त्यास येगाराबरोबर आशीर्वादपत्र पाठवून चिंता निरसन करावी. आह्माकडील वर्तमान तरी चिरंजीव रामबा व रंगोबा याणीं सांगितलेंच असेल. चिरंजीव सौभाग्यवती सुंदराबाई व मुली रवाना केल्या. त्या पोंचल्याच असतील. त्यांजबरोबर वस्ता पाठविल्या होत्या. त्या पावल्याच असतील. तेथें जुन्या वस्ता आहेत त्या मोडून नव्या कराव्या ह्मणोन याद पाठविली होती. त्याप्रमाणें केल्याच असतील. नसल्या केल्यास मोडून नव्या कराव्या. त्याचे भरतीस कांहीं सोनें पाठविलें होतें. हातसरांस व पोंवळ्याच्या पाटल्यांस पोंवळीं पाठविलीं होतीं. तीं येथें मिळालीं नाहींत. त्यास तेथें विकत घेऊन द्यावीं. त्याचे ऐवजाची हुंडी आलाहिदा करून पाठविली आहे. ती घेऊन त्याचे भरतीस पोंवळीं व सोनें जुने वस्ता मोडाल त्यांस लागल्यास पंचेविसेक[3] तोळे पाठविलें होतें. चिरंजीव सौभाग्यवती लाडू व बायूबाईचे हातसरास पोवळीं नाहींत तरी पोंवळीं घेऊन द्यावीं. त्याचे रुपये आह्मीं येथून कोंकणांत मंडळी गेली होती. त्याचे रुपये आह्मीं कर्ज घेतले होते. त्यांस ते जाते समयीं आमचीही लष्करांत यावयाची जलदी होती. व ऐवजही हाताखालीं न होता. यास्तव हुंड्या करून दिल्या न होत्या. त्या हल्लीं हुंडियाची आलाइदा याद करून पाठविली आहे. ते ज्याचे त्यास द्यावे. आह्मांकडील वर्तमान सर्व तीर्थस्वरूप राजश्री दादांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. आह्मांस अजमेरचा सुभा श्रीमंतांनीं सांगून दोन महिने झाले. चिरंजीव विश्राम यास जावदेचे मामलतीवर ठेवून आह्मी इकडे आलों. तो तेथें खुशाल आहे. आह्मी येथें एकटे आहों. चिरंजीव विठोबास आणावयाची योजना होती. परंतु आपले जवळ दुसरें कोणी नाहीं. याजकरितां अनमान केला. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

चिरंजीव विठोबास व साबाजीस[2] व गणोबास आशीर्वाद. आह्माकडील वर्तमान सविस्तर

---

१. वाडी सरकार. २. साबाजी राम ऊर्फ काका. ३. पंचवीसेक ह्मणजे सुमारें पंचवीस.

तीर्थस्वरूप राजश्री बाबूंस लिहिलें आहे. त्याजवरून सर्व कळेल. तुह्माकडील सविस्तर वर्तमान लिहावें हे आशीरवाद.

लें० नं. ६२ छ० १५ सव्वाल. श्रीशंकर. ता० १३ मे १७९१.

तीर्थरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

आपत्य विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ९ माहे रमजान मुक्काम जावद येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. बहूत दिवस जाहाले. वडिलांकडून आशीरवादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून बहुत चिंता लागली आहे. तर येणागमनेवेत आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर पेशजी राजश्री रामबा व रंगोबा वगैरे मुलें माणसें गेलीं. तीं पोंचलींच असतील. त्यांनीं सर्वांनीं वंदन केलें असेल. तीर्थस्वरूप राजश्री नाना व तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातोश्री होनी अशीं अजमेरीस आहेत. वरकड तीर्थस्वरूप राजश्री दादा व भाऊ व बापू व रावजी व मुलें माणसें ऐशीं लष्करांत श्रीमंतांनजीक आहेत. सांबरचे मुकामीं पुष्कर आहे. मथुरेकडे छावणीस जाणार ह्मणून वदंता आहे. पुढें पाहावें. तीर्थस्वरूप राजश्री दादाबरोबर फौज देऊन दिल्लीपतीकडे पटालेस रवाना करणार ह्मणून ऐकिलें आहे. वरकड मजकूर सर्व अजमीरचीं पत्रें आलाहिदा आपल्या नांवें आहेत. त्यांवरून सर्व विदीत होईल. तेथून कांहीं हुंडी पाठविली आहे. परभारें ज्यास देविले आहेत त्याची यादी त्याच पत्रांत आहे. त्याबरहुकूम देऊन टाकावे. पांचशें रुपयांची चिट्टी तुह्मीं जावदेहून पाठविणेविसीं नानानीं आह्मांस लिहिलें होतें. त्यावरून हल्लीं पांचशें रुपयांची हुंडी पुणेंची पाठविली आहे. पावलियाचें लिहावें. गंगाराम काशीद तिकडून आला त्याजला व आह्मी येथून शालिग्राम ब्राह्मण बरोबर देऊन दोघांस पाठविले आहेत. जुन्या वस्ता मोडून नव्या कराव्याविसीं पेशजी राजश्री रंगोबाकडे याद लिहून दिली होती. त्याचप्रमाणें वस्ती नव्या कराव्या. यासी आळस न करावा. येथील मामलतीचा मजकूर जाजप्रमाणें तीर्थरूप राजश्री नाना बंदोबस्त करून गेले[१] होते, त्याप्रमाणें बंदोबस्त आहे. यंदां तोटा फार आहे. पर्जन्य पहिला कमती पडला. त्याजमुळें पुढें कसें पार पडेल पाहावें. पेस्तर सालच (पुढील बंद मिळत नाहीं)

लें० नं. ६३ श्रीगजानन. $\frac{१}{२}$ ता० १० आगष्ट सन १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें जिऊबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण शु॥ ११ मुकाम लष्कर नजीक श्रीक्षेत्रमथुरा येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असों विशेष. सांप्रत वडिलांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास शिवभट व कासीद याजबरोबर व चिरंजीव राजश्री शिवबाकडे पत्र आलें. त्यावरून कळलें. त्याआलीकडे कांहीं वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहून पाठविलें पाहिजे. इकडील वर्तमान लिहिलेंच आहे. त्याजवरून कळेल. करवीरकर यांणीं संस्थानास उपद्रव करून किल्ले, ठाणीं घेऊन बेचिराम

१. अजमीरच्या सुभ्यावर जाण्याचे पूर्वी शिवबा नाना जावदेस सुभ्याचे कामावर होते. अजमेरीस जातेवेळीं त्यांनीं आपला पुतण्या विश्राम नरहर केरकर यांस जावदेस ठेविलें होतें.

जाहला. गृहस्थमंडळी पेडणें प्रांतीं येऊन राहिली. राज्यांत बखेडा जाहला. यामुळें माहागाई भारी. कुटुंबवत्सलें यांची हैराणगत. यामुळें मोठी चिंता प्राप्त झाली. आज दोन तीन वर्षें प्रथम यजमानाची गैरमर्जी. पुढें कृपा करून काजकाम सांगितलें. त्यास नित्य चाकरी. लढाईस गांठ पडली. यामुळें पत्र देखील लिहिलें नाहीं. तेव्हां खर्चास कोठून पोंचणार. चिरंजीव राजश्री शिऊबाकडून पोंचवावें. त्यास त्याकडे पेशजी रांगड्यांनीं बखेडा केला. त्याचें पारपत्य करून मोडले. परंतु होळकराची फौज व आपणाकडील फौज देशींहून आणली. त्याचें मुकाम त्या मुलखांत जाहले. यामुळें गांव उजाड जाहाले. गांवांत वस्ती फौजेचे धास्तीमुळें राहिली नाहीं. सिबंदी कर्ज काढून द्यावी पडती. हल्लीं मृगमालास रयतांस दिलदिलासा देऊन वस्ती केली. त्यास श्रीमंत तुकोजी होळकर व आलीबाहादर फौजसुद्धां आले. त्यांणीं खराबी जाहाली. ह्मणोन चिरंजीवाचीं पत्रें आलीं. त्यामुळें जावद जीर्ण याची उजाडी आहे. मुलें माणसें मंदोसेरीं[1] होतीं. हल्लीं जीर्णेस न्हेलीं. सर्व सुखरूप आहेत. त्यांचीं पत्रें हमेशा येतात जातात. त्याजविषयीं चिंता न करावी. कोंकणांत रवाना करून द्यावीं. त्यास कोंकणांत बेदा मोठा. याजकरितां चवकडे एकच वेळ साहित्य आहे. यांत ईश्वर काय करतो पाहावें. चिरंजीव बाळकृष्णाचे डोळेस दिसत नाहीं. त्यास औषध उपाय करितां गुण ये ऐसें लिहिलें आहे. वरकड चिरंजीव सर्व मंडळी जावंदस सुखरूप आहेत. चिरंजीव बाळापा खाडोळकर येथें लष्करांत होते. वरकड मुलें माणसें बडेस मातुश्री मनुबाई आहेत. हमेशा पत्रें येतात. सर्व सुखरूप आहेत. यंदां श्रीमंतांनीं कृपा करून पहिल्याप्रमाणें मामलती सांगितल्या. त्यास सरकार हांडेची मामलत चिरंजीव राजश्री बाळापाचे नांवें करून दिल्ही. दिद्मची व मुदीभामगड चिरंजीव राजश्री पांडुरंग शिवाजी यासीं सांगितल्या. खाडवेची मामलत फटु दतु वारी याचे लेकास सांगितल्या. मुसकुटेकडील अवध्या सरकारांतून दूर करून आमचे मार्फतीनें सांगितल्या. आपणास कळावें. चिरंजीव जगन्नाथ यासी नवी फौज देशींहून आली. त्याचे बक्षिगिरीचें काम सांगोन त्याची सरकारांतून नेमणूक करून दिली. तूर्त चाकरीस दिल्लीकडे फौजा पाठविल्या त्यांजबरोबर रवाना केलें. चिरंजीव बाळा हुजूर आह्मांबरोबर आहेत. आह्मी सडे स्वारी चाकरीस गेलों तरी ते दरबारीं असतात. चिरंजीव रामा कोचरेकर व विश्राम पालयेकर व लखबा वागळे व साबाजी मळगांवकर, राजश्री अंतोबा कवठणकर व बाबुराव दाभोलकर वरकड मंडळी गृहस्त नित्य पंनास पात्र होतें. सर्व सुखरूप आहेत. त्यांचींही पत्रें वरचेवर घरीं जातच आहेत. त्याजविसीं काळजी न करावी. बहूत काय लिहिणें हे विज्ञापि.

लें० नं. ६४ श्री. [2] सन १७९१.

(या पूर्वीचे बंद मिळत नाहींत.)

पुरवणी तीर्थरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं—लावणी जोपणीचें काम चालविलें आहे. पुढें पर्जन्य यथास्थित पडून पीक येईल तेव्हां खरें. हाल्लीं हुंड्या येथील पांचशेंची पाठविली आहे. पुणेवर खुशालचंद किसनदास याजवर मिती वैशाख शु॥ ९ पा॥ रोज ६१ चे वाइद्याची.

२०० आमालेख काशीदास यांची. २०० गुलजीबेग कलखची. १०० पोखरदास जिवराज.

५००

१. मंडोसर येथें जिवबादादांचा वाडा होता. २. हें पत्र विश्राम नरहर केरकर यांचें आहे.

एकूण पांचशेंच्या घेऊन उत्तर पाठवावें. आपणाकडील सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा करावी. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

तीर्थ॥ राजश्री ताल्या व ती॥ राजश्री बाजी वडिलांचे सेवेसीं. चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. सांप्रत वडिलांकडून आशीरवादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून चिंता वाटती. तर सविस्तर लिहावें. यानंतर इकडील वर्तमान तर ती॥ राजश्री नाना व सौभाग्यवती मातोश्री होनी अजमेरीस सुखरूप आहेत. व ती॥ राजश्री दादा व बापू व भाऊ व रावजी वगैरे लष्करांत माहाराजांबरोबर सांबरचे मुकामीं सुखरूप आहेत. अजमेरीहून पत्रें वर-चेवर येत असतात. फौजा मथुरेस छावणीस जाणार असें आहे. पुढां कशी मसलत होती पाहावी. ती॥ नानांनीं आह्मांस येथें मामलतीच्या कामावर ठेवून अजमेरीस गेले. मामलतीचा बंदोबस्त वडिलांनीं केला आहे; त्याप्रमाणेंच आहे. आपणाकडून पत्र येत नाहीं. त्यावरून चिंता लागती. तर येणाराबरोबर आशीर्वादपत्र पाठवावयास आज्ञा करावी. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री गणबा व बापू व लक्ष्मण व आंतोबा यांसीं आशीरवाद. तुह्मांकडील वर्तमान कळत नाहीं. त्यास सविस्तर लिहावें. हे आशीर्वाद.

ले० नं. ६५ श्रीगजानन. २ सन १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू.

विज्ञापना परी. कोंकणांत रवाना करून द्यावयाचीं. तिकडे राजश्री लखबा पेडणेकर याची सून इकडे बहूत वर्षें राहिली ह्मणोन खटे आहेत. त्यास आमचे भेटीकरितां इति रोज लागले. त्यास आह्मीं पत्र लिहिलें आहे. तें त्यास पावतें करावें. वरकड जावदेस गेल्या उपरांत होईल तें वर्तमान लिहून पाठवूं. मुलानें दुःख फार दाखविलें. रत्न होता. आपला लाभत्काळ नव्हता. परंतु उपाय काय आहे. बहूत काय लिहावें, हे विज्ञप्ती.

चिरंजीव विठोबा व साबाजीस आशीरवाद. तुह्मांकडील वर्तमान लिहीत असावें हे आशीरवाद.

शेवेसीं साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान यजमान साहेबांचे पत्रीं लिहिलें आहे. त्र्यंबकराव देवआज्ञा जाहला. यामुळें यजमान व नाना व सौभाग्यवती लक्ष्मी होनी तीन रोज बिछान्यावरून उठलीं नाहीं. मूल रत्न होतें. अवघें लष्करानें पाहिलें. त्यास हळहळ लागली. त्याचे गुण कोठवर लिहावे. रत्न होतें. असाध्य लागतां कठीण (फाटलें) इच्छेस इलाज नाहीं. वरकड वर्तमान आह्मीं चिरंजीव राजश्री यसोबाचे पत्रीं लिहिलें. ते येऊन विदित करितील. श्रीमंतांनीं लष्करांतून राजश्री नानास पत्र लिहिलें आहे. हुकूम आणवला. मुलाचीही विश्रांती होईल. पुढें अजमेरचे किला सांगणार. ऐसी धन्याची मर्जी आहे. त्यास राजश्री विश्राम काकास जावदेस ठेऊन राजश्री नाना इकडे येतील. अगर यजमान साहेब जावदेस जातील. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

१. विठोबा ताल्या बाबूचा मुलगा. २. जिवबादादा. ३. जगोबा बापू. ४. यशवंतराव भाऊ. ५. नारायणराव बक्षी. ६. शिवबा नाना. ७. महादजी शिंदे यांणीं.

लें० नं. ६६ श्री. ३ सन १७९२.

वडिलांचे शेवेसीं साष्टांग नमस्कार.

गेले असते तर श्रीदेवाची व वडिलांची भेट होती. इकडे येऊन नव दाहा वर्षे जाहालीं. देशीं नवा गेलों. तेव्हां घरीं जाण्याचें घडतें तर चांगलें होतें. मुली लग्नाच्या एक तिकडे एक येथें आह्मांबरोबर. हिला कोंकणांत पाठवावी. ऐसी सल्ला होती. परंतु चिरंजीव सौभाग्यवती सून देशीं आली. तेव्हां याची चौकशी करावी. तें लिहावें. कलम.

१ चिरंजीव राजश्री बाळोबा व ( ) सीबा व रामबा व सौभाग्यवती रुखमीण व उमा व वरकड व चिरंजीव निराबाई व ( ) यास मथुरेस ठेविलीं आहेत. कोंकणांत रवाना करून द्यावयाची तजवीज होती. परंतु सौभाग्यवती रुखमीण पोटशी साहा महिन्यांची आहे. याजकरितां तूर्त पाठवावयाची राहिली. सर्व सुखरूप आहेत. चिरंजीव राजश्री जगोबा आह्मांजवळ आहे. व चिरंजीव राजश्री शिऊबा व सौभाग्यवती लक्ष्मी व भाऊ अजमेरीस सुखरूप आहेत. वरचेवर पत्रें येत असतात. चिरंजीव राजश्री विश्राम जावदेस सुखरूप आहे. व्यंकोबा व सर्व मंडळी खुशाल आहेत. हमेशा पत्रें येतात. कलम.

१ श्रीरामेश्वरांचे चार खांब बांधावयाचे. त्यास एक हजार रुपये लागतील. ह्मणोन लिहिलें. त्यास कोठील रामेश्वर हें उमज न पडे. याबद्दल लिहावें. कलम.

वरकड इकडील वर्तमान तरी जैपूरवाले व होळकर व अलवारवाला रावराजा एकत्र होऊन पातशाई मुलखांत बिघाड केला. याजकरितां आह्मी या प्रांतीं आलों आहों. अलवारवाला आह्मांकडे मिळालाच आहे. मात्र उभयतां एकत्र होऊन आहेत. आह्मी मुलें माणसें मथुरेस ठेऊन सडे दरकूच आलों आहों. लढाईस उभे राहिले तर लढाई होईल. नसल्यास खंडणी चुकवून दिल्ही तर सलूख होईल. नाहीं तर लढाईचा इरादा आहे. पुढें मसलत घडेल ती खरी. होळकरांनीं ठाणीं घेतलीं होतीं. तीं माघारे फिरोन घेतलीं. बहूत काय लिहावें शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

देवबा लाड. लें० नं. ६७ श्री. इ० सन १७९३.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. लष्करचें वर्तमान कांहीं कळत नाहीं. होळकर यांची व आपले लष्करची लढाई जाहली. ऐसें वर्तमान ऐकिलें. परंतु तहकीक वर्तमान कळत नाहीं. आपणाकडेस पत्रें पुणेंहून आलींच असतील. तर सविस्तर वर्तमान तपशीलवार व सर्वांचे सुखरूपतेचें वर्तमान लिहिलें पाहिजे. चिंता फार जाहाली आहे. बहूत काय लिहिणें लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

लें० नं. ६८ श्री. तारीख १० आगष्ट १७९३.

चिरंजीव राजश्री जगोबा याप्रती. नरहर गणेश केरकर. आशीर्वाद उपर येथील तागायत छ० ९ जिल्हेज पावेतों सर्व सुखरूप असों विशेष. तुजकडील बहूत दिवस कागद येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास सविस्तर लिहून पाठविणें. होळकर याची व आपले फौजेची लढाई भारीच मातबर जाहाली. आणि होळकर यांचा मोड होऊन कालिसींध उतरून खेचेवाडीचे रोके आहेत. आण आ( ) कोठेहून साहा कोसांवर आहेत. ऐसें वर्तमान ( ) चिरंजीव नारायण याणें पुणेंहून

१. सावंतवाडी नजीक आकेरी एथील.

वरून लोक आले. त्याउपर लढाईचा मजकूर कैसा जाहला. तो सविस्तर जलदी लिहून पाठविणें. चिरंजीव सगूण आरवदकर व विश्राम पालयेकर व लकबा वागळे यांजबरोबर चिरंजीव सौभाग्यवती सुंदराबाई व मुली येऊन घरीं सुखरूप पोंचलीं. चिरंजीव आनंदीबाई व चिरंजीव चिमाबाईचें लग्न एकादशी दिवशीं करून घेतलें. मथुरेकडील व जावदेकडील व अजमेरीकडील व आपणाकडील ( )चें वर्तमान सविस्तर लिहून पाठविणें. ( ) जाप येईपर्यंत मार्ग लक्षीत आहों.

लें० नं. ६९ छ० २२ रबिलाखर. श्रीगजानन प्रा. ता० २ नवंबर १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू मामा वडिलांचे शेवेसीं.

आपत्य विश्राम गंगाधर पालयेकर. चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० ५ रबिलाखर मुकाम लष्कर पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें. त्यांत आज्ञा कीं धोत्रजोड दोन पाठविणेंविसीं व जाहानबादी पोषाख पाठविणेंविसीं. ते पेशजी पाठविले आहेत. ते पोंचतील. सणंग फार माहाग आहे. पेटीचा मजकूर लिहिला त्यास त्याची चौकशी करीत आहों. तीर्थस्वरूप राजश्री दादा फौजेसुद्धां उज्जनीचे मैदानीं आले आहेत. वरकड वर्तमान रावसाहेबांचे पत्रावरून कळों येईल. केरीस श्रीचे दर्शनास जाणार ह्मणोन वडिलांनीं लिहिलें. त्याजवरून फार आनंद जाहला. शरीरीं आराम जाहालेंच असेल. गांवीं गेलेवर सर्वच बंदोबस्त होईल. बहूत काय लिहिणें शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

तीर्थस्वरूप राजश्री साबाजी मामा वडिलांचे सेवेसीं. वडिलांचे पत्रीं सविस्तर लिहिलें आहे. त्यावरून कळों येईल. आपण कवळेस असतों ह्मणून लिहिलें. तर सविस्तर आपणाकडील वर्तमान लिहिणेंविसीं आज्ञा असावी. बहूत काय लिहिणें शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

लें० नं. ७० श्री. तारीख २ नवंबर सन १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेशीं.

बाळकें जिवबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० ५ रबिलावर कार्तिक शु०॥ ७ मुकाम नजीक घनेडा प्रांत मेवाड. जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. वडिलांकडून चिरंजीव मुलाचे नांवचें यासी पत्र आलें. तेंच बजिन्नस आह्मांकडे पाठविलें. त्यावरून वर्तमान कळलें. इकडील वर्तमान वरचेवर लिहून पाठविलेंच आहे. होळकराच्या पाठलागास उज्जनीपर्यंत आलों तेथें श्रीमंताची आज्ञा आली. बिजेसिंग मृत्यू पावला. तथील बंदोबस्तास मारवाडास जावें. चिरंजीव बाळा व मुलेंमाणसें मथुरेस होतीं तीं येथें आलीं. सौभाग्यवती रखमाबाई व चिरंजीव बाया यांस केरीस पाठविलीं आहेत. सौभाग्यवती गरोदर आहे. सहा महिने झाले आहेत. याजकरितां पाठविलीं. वरकड चिरंजीव जगोबा व बाळा व रामा व काशिबा, सौभाग्यवती उमा व निराबाई वरकड येथें आहेत. चिरंजीव निराबाईचें लग्न करावयाचें. याजकरितां सर्वांस कोंकणांत पाठवावीं. ही योजना करून चिरंजीव शिवबास अजमेरीस लिहून पाठविलें. त्याणीं लिहिलें. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाईसही देवाच्या दर्शनास पाठविणार. याजकरितां तुह्मी सर्वांस घेऊन अजमेरीस याल तेव्हां सौभाग्यवती रुक्मिण व उमा यांस येथें ठेवून बाकी चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाईस कोंकणांत पाठवावीं. अशी योजना आहे. चिरंजीव निराबा-

१. तुकोजी होळकराचे पाठलागास आले होते. पुढील ह्मणजे पत्र नंबर ७० पहा.

ईस नवरा पाहून ठेवावा. मूल चांगला आठ नऊ वर्षांचा पाहून लिहून पाठवावा. यांसही लवकरच रवाना करून देऊं. वरकड सर्व मंडळी सुखरूप आहे. चिरंजीव विश्राम प्रतापगडचे मुकामीं भेटीस आला. त्यासही घरीं पाठविण्याची योजना आहे. परंतु याजला बरोबर घेऊन येईल. चिरंजीव बाळकृष्ण आरवंदेकर व त्याचा बंधू साबाजी व मूल व त्याची मातोश्री अशीं सर्व भेटीस आलीं. आठ रोजपर्यंत होतीं. मग रवाना केलीं. आह्मांस सरकारांतून इकडे मारवाडचे वसतीस पाठविलें. परंतु मोठी पंचाईत आहे. ईश्वर पाडील तें खरें. या समयीं चिरंजीव शिऊबांनीं फारच सांभाळिलें. व चिरंजीव विश्राम यास लिहून पाठविलें. तो लहान मूल. त्यानें समयास अशी बाजू राखिली. तें कोठवर लिहावें. आह्मांवर समयीं सरकारांतून आज्ञा. मारवाडांत जावें. फौज तर मुळागिरीवरून होळकर याचे पाठलागास उज्जनीजवळ आलों. तेव्हां विना चार अट्ट घेतल्याशिवाय कूच करीत नाहींत. चिरंजिवाचीं पत्रें. मारवाडची मसलत कबूल करीत नाहीं. तर सरकारची मर्जी ठीक राहणार नाहीं. जसें कळेल तसें करून जावें. हेंच वर्तमान चिरंजीव शिवबास लिहून पाठवावें. तर त्यानेंही पुढें मारवाडची मदत बहुत करून येणें आल्याविना परिणाम नाहीं. कूच करावें तर सावकार लोकांचीं धरणीं. खर्चाविना एक दिवस चालेना. मग चिरंजीव शिवबानें व विश्राम यानें अजमीर व जावद उज्जन मिळोन तीन लक्ष रुपये कर्ज झालें. यांत धन्याचे व वडिलांचे आशीर्वादें बहुत राखिलें. हें ईश्वरें तें खरें. बहुत झट लिहावें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. चिरंजीव साबाजीस व गणोबास आशीर्वाद. तुह्मांकडून वर्तमान लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. ७१　　　　श्री.　　　　सन १७९१.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी बावा स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाबुराव गुणाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान तागायत आज मंगळवार रात्रौ जाणोन स्वकीय, कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण चिलोजीबरोबर पत्र पाठविलें पावलें. पत्रीं मजकूर कीं आमचे बरोबर लष्करांतून राजश्री जगोबा बापूचे कागद राजश्री बाळोबा भाऊचे वगैरे आणखी कोणाचे कागद आले असले तर पाठवून द्यावे. ह्मणोन लिहिलें. त्यास तुमचे कागद. एक लाखोटा होता. तो आपणाकडे बजिन्नस पाठविला आहे. राजश्री बाबूचे नांवचे लाखोटे दोन होते. ते आज दुपारीं केरीहून माणसें आलीं होतीं त्यांजकडे दिले. आह्मांस लष्कर सोडून आज साडेतीन महिने झाले. वाटेनें पंधरा सोळा मुकामें जाहालीं. वरकड लष्कराकडील वर्तमान ह्मणाल तर यथास्थित आहे. राजश्री दादा सडे स्वारी इस्माल बेग याजवर फौजा घेऊन रेवाडीस जावयास गेले. आपणास कळावें. वरकड नवल विशेष वर्तमान नाहीं. बजिन्नस गंगाराम कासीद तुमचा आला आहे. हा उदयीक केरीस जाणार. तेव्हां सविस्तर वर्तमान सांगेल. त्याजवरून कळेल. मातुश्री मामी व सौभाग्यवती उमाबाई व सौभाग्यवती रुखमीणबाई, लष्करांत जावयास गेलीं. हीं आह्मांस गोदावरीपलीकडे दोन मजला पिपरीचे मुकामीं भेटलीं. सर्व सुखरूप गेलीं. आपण चिंता न करावी. हांडेचे मार्गें जाणार ह्मणोन सांगत होतीं. इतके रोज हांडेपुढें जावयास गेलीं असतील. आपण चिंता न करावी. बहुत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. ७२　　　　श्री.　　　　सन १७९३.

चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. चिरंजीव बळवंतराव यांचा कागद आह्मांस

आला होता. त्यांत लिहिलें कीं, होळकर इंदुरास आले. ती॥ दादा उज्जनीस आले, मुलें माणसें उज्जनीस आणविलीं. पुढें सरकारआज्ञेप्रमाणें विचार होईल असें लिहिलें. शिलेदार यांणीं लढाई मारली. तेव्हां मागील रुपयांकरितां ती॥ दादापाशीं रुपये मागतात. सरकारांतून रुपये घ्यावे ही सल्ला नाहीं. आणि आबा चिटणीस यांचे मत्तें रुपये न द्यावे. असा पेंच आहे. याजकरितां श्रीपाशीं प्रसाद सर्व गोष्टीविसीं घेतला पाहिजे. वडिलांनीं दाहा हजार रुपयांची चिठी मिवाई जिनारक याजकडेस चिरंजीव रावजीपाशीं दिली. प्र॥ सिका दाहा हजार पटवून दिले. असें लिहिलें. आतां वरकड एवज त्याकडून घ्यावा. वडिलांविषयीं व चिरंजीव रावजीविसीं धन्याची कृपा होई, काज काम होई याविसीं प्रसाद घेतला पाहिजे. पत्र बळवंतरावजीचे बरोबर आरवलीस काकाला पाठविलें आहे. हे विज्ञापना.

ले० नं. ७३ तारीख १४ फेब्रुवारी १७९२.

एकबाल वई जलालपन्हाँ फांसिस्क दे कुंञ्ज दे मेनेजी गोवर्णदोर व कपीतान जराल साहेबी इजत माहा गणेशराव विठ्ठल केरकर यास खुद्द निशाणें जशी सनद सादर केलेची ही दुवी नकल.

विठ्ठलराव नरहर केरकर यांस पेडणें माहालपैकीं २५ लोकांची सनद चालत होती. त्यास ते निधान पावले याकरितां त्याचे जागां त्याचा मूल गणेशराव विठ्ठल केरकर यास सदरहू सनदेचा भोगवटा चालला पाहिजे. बद्दल त्यावर कृपाळू होऊन ही सादर केली असे. अशास विठ्ठलराव केरकर यास जी तैनात चालत होती. त्याजप्रमाणें गणेशराव विठ्ठल यास देत जाणें. याबद्दल याचा दरबार जागा सरकारांत लिहिणें करणेंचें तें करणें दर जागा राजवाडा पणजी हा तारीख १४ माहे फेब्रेर सन १७९२ छ० २० माहे जमादिलावर सुरु सन इसन तिसेन मयां आल्लफ विरोधीकृत माघ वद्य ७ मी.

ले० नं. ७४ तारीख[1] २३ माहे जून सन १७९२.

(मागील बंद मिळत नाहीं.) साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत शु०॥ ३[2] भृगुवासरे मुकाम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असों विशेष. वडिलीं थोरानें खिजमतगारासमागमें व येथून कासीद पाठविला त्याजसमागमें पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळों आला. इकडील वर्तमान तर ज्येष्ठ वद्य ९ श्रीमंत पंत प्रधान यांच्या व श्रीमंत माहाराज यांच्या भेटी जाहल्या. पातशाहाकडून नालक्या, मोर्चलें, व खिलतें[3] आलीं आहेत. त्याजकरितां उदयीक फुरमान होऊन उभयतां श्रीमंतें परस्परें घेणार. यानंतर सरकारांत व मुत्सद्दी यांसी द्यावयाकरितां गोमांतकी आंबे वगैरे जिन्नस आणविला होता. तो पर्जन्यकाळचे दिवस आहेत. वाटेनें खराब न होतां येऊन पोहोंचे असे तरतुदेनें पाठविला पाहिजे. दोन दिवस अधिक लागल्यास चिंता नाहीं. तीर्थरूप राजश्री दादा कसबा रोहोतक दिलीचे आसपास सुखरूप आहेत. पत्रें येत असतात. तीर्थस्वरूप राजश्री नाना अजमेरीस मंडळीसुद्धां सुखरूप आहेतच. त्याकडील पत्रें हमेशा येत असतात. वडिलांचे भेटीची इच्छा बहूत आहे. परंतु येथील कामाकाजाचे अनुमत्तें पाहतां मजला सरकारचा निरोप होणार नाहीं. भेटी तों जरूर घेतली पाहिजे. येविसींचा मजकूर राजश्री लक्ष्मण नारायण याजसमागमें प (या पुढील बंद मिळत नाहीं.)

---

१. तारीख १३ जून सन १७९२. २. तारीख २४ माहे जानेवारी सन १७९२. ३. सवाई माधवराव पेशवे व महादजी शिंदे यांणीं बादशहाकडून मिळालेले पुण्यांत घेतलेले किताब.

लें० नं. ७५ श्री. तारीख १५ जुलई सन १७९२.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

आपत्य नरबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार येथील कुशल तागायत छ० २४ माहे जिल्काद मुकाम अंबाली प्रांत मेवाड यथास्थित असों विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता लागली आहे. तर येणाऱ्यासमागमें निरंतर अशीं आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ करीत असावें. यानंतर श्रीमंतांनीं हिंदुस्थानचा सुभा ती॥ राजश्री दादों[१] व राजश्री गोपाळराव भाऊ चिटणीस यांसी सांगून समागमें पंचवीस हजार फौज व दळ येणें कंपू एक देऊन सेखावटींतून रवाना केली. ते खंडण्या घेत जातात. श्रावण अखेर छावणीस श्रीमथुरेस जातील. समागमें ती॥ मावशीबाई व ती॥ बापू व भाऊ व सौभाग्यवती मातोश्री ताई व सौभाग्यवती उमा वहिनी व सौभाग्यवती रुखमीणबाई वहिनी व मुलें लेंकरें सर्व समागमें नेलीं. तेथें श्रीमथुरायात्रा व गंगास्नानें करून तेथें ठेवण्याचें त्यांस ठेऊन बाकी वडिलांकडे कोंकणांत पाठवितील. ती॥ तिकडे गेल्यावर श्रीमंतांचें कूच होऊन मजल दरमजल मेवाडांत आले. श्रीमंतांनीं समागमें आह्मांस ठेविलें आहे. बक्षिगिरीचें काम आह्मांकडे आहे. श्रीमंतांची कृपा चांगली आहे. ती॥ नाना अजमेरीस सुखरूप आहेत. त्यांचीं पत्रें हमेशा येत असतात. व तीर्थरुपांचीं पत्रें सेखावटींतून येतात. तेथील सर्व मंडळी सुखरूप आहे. जावद येथून तीस कोश आहे. चिरंजीव विश्राम तेथें आहे. त्याचींही पत्रें येतात. खुशाल आहेत. सौभाग्यवती साळूबाईचें वर्तनान वडिलीं लिहिलें होतें. त्यावरून फार खेद जाहला. तो पत्रीं कोठवर लिहावा. ईश्वरगतीस उपाय नाहीं. मातोश्री मावशीस वृद्धापकाळीं खेद झाला. ईश्वरइच्छा प्रमाण. सौभाग्यवती मातोश्री उमा वहिनी पोटशी आहे. साहा मास झाले. कळावें. श्रीदेवाचा बरवेपणास प्रसाद घेऊन पाठविला पाहिजे. वरकड तिकडील सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली पाहिजे. श्रीमंतांची स्वारी तूर्त मेवाड प्रांतीं आहे. इकडील खंडणी जाहाली ह्मणजे अवंतिकेवरून देशीं जाणार. कळावें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. आपत्य विश्राम गंगाधर पालयेकर. चरणीं साष्टांग नमस्कार लिहिला परिसोन लोभ करावा हे विज्ञापना.

लें० नं. ७६ श्रीगजानन. तारीख २४ जुलई १७९२.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

बाळकें जिऊबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण शुद्ध ५ मी मुकाम लष्कर श्रीमथुरा जाणोन वडिलांचे आशीर्वादें सर्व मंडळी सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहून चिंता निरसन केली पाहिजे. इकडील वर्तमान तर वरचेवर लिहिलेंच आहे. त्यावरून विदीत होईल. इकडील वर्तमान तपशीलवार लिहून शालिग्राम कासीद आपण पाठविला होता. त्यास रवाना छ० २ जिल्कादीं केला आहे. त्याजवरून सविस्तर विदीत होईल. सांप्रतकाळीं छावणी मुकाम मजकुरीं आहे. दुसरे उपरांतीक श्रीमंत यजमान देशीं येणार अशी मसलत आहे. घडतां घडेल ती पाहावी. आपले

१. जिवबादादा.

भेटीस बारा वर्षें झालीं. भेटीचा हेतू फार आहे. घडतां घडेल तो सुदीन. चिरंजीव राजश्री शिवबा व मुलें माणसें जावदेस[1] आहेत. त्यांजला येथें आणावीं अशीं चिरंजीवाचीं पत्रें येतात. भेट घ्यावी असा मानस. त्यास पर्जन्याचे दिवस. दसऱ्याचे आलिकडे पलीकडे येतील तरी भेट घेऊन पाठवावीं. असें चित्तीं आहे. घडेल तो सुदीन. ते प्रांतीं करवीरकर महाराजांनीं राज्यांत कलह करून उजाड होऊन कुटुंबी गृहस्थांस घर मुटून खराबीस आले. अन्नाची महर्गता मोठी. यामुळें आपले घरचा खर्च वाढला. आह्मांकडून खर्चाची बेजमी झाली नाहीं. यामुळें कित्येक विस्तारें लिहिलें असे. यासी इकडील जाबसाल ह्मणावा तरी दिवसेंदिवस माहा बारीक जाहला. तो कोठवर लिहावा. त्यामध्यें आह्मीं पेंटाल्याचेकडे स्वारींत होतों; तेथून चिरंजीव राजश्री बाळास सांगोन हुंडी पांच हजार रुपयांची पाठविली. त्याचें उत्तर अद्यापि आलें नाहीं. हल्लीं सालिग्राम काशीद याजबरोबर रुपये पांच हजार शिवाय एक हजार याचा तपशील आलाहिदा आहे. त्याप्रमाणें ज्याचे त्यास द्यावे. वरकड सर्व मंडळी मेवाडांत[2] सुखरूप आहेत. चिरंजीव राजश्री जगंनाथ व बाळा व अंतोबा कवठणकर व राळ्या व विश्राम व कृष्णोबा वगैरे मंडळी सुखरूप आहेत. सेवेसीं श्रुत होय हे शालिग्राम काशिदाबरोबर लिहिलें आहे. त्यावरून कळेल हे विज्ञापी.

चिरंजीव राजश्री विठोबा व साबाजी यांस आशीर्वाद. शेवेसीं साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. लिहितार्थ परिसोन लोभ करावा हे विज्ञापना.

तारीख २५ जुलई सन १७९२. सही इंग्रजींत दिपुटी कमिशनर हुशंगाबाद.

लें० नं. ७७ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री

त्र्यंकाजी रामचंद्र गोसावी यांस—

स्ने॥ माहादजी सिंदे रामराम सुरुसन सलास तिसेन मयां व आल्फ. तुह्मीं सरकारांत पुण्याचे मुकामीं येऊन विनंती केली कीं प्रा॥ नेमावर पंचमहाल येथें मवासाच्या दंग्याकरितां उजाडी पडली होती. त्यास पदरचा खर्च लाऊन मवासाचें पारपत्य करून सत्वास येथील किल्ला आहे. तेथील गांवगन्नाची झाडी तोडून टाणें बसवून वस्ती गांवगन्नाची केली. होळकर याणीं आपले हिशाचे सरमंडळचें वतन पंचमाहाल येथील करून दिलें. सरकारचाकरी केली आहे त्यास सरकारांतून सरमंडळचें वतन पंचमाहालचें करून द्यावें ह्मणोन त्यास सत्वासचे मुकामीं स्वारी सन इसन्नेचे सालीं आली होती तेव्हां सत्वासचा किल्ला तुह्मांकडून दूर करून सरकारांत ठेविला. तुह्मीं आपले पदरचा खर्च लावून सरकारचाकरी केली. तें समक्ष पाहिलें. व द्वारकोजी वाबळे जाहागीरदार व जमीदार प्रा॥ म॥ याणींही सांगितलें. त्याजवरून तुह्मांस पंचमाहाल येथील सरमंडळचें वतन द्यावयाचें करार करून देऊन ही सनद सादर केल्याबद्दल तपशील.

६ सरकारहिशांपैा.	६ होळकराचे हिशांपैा.
१ मौजे तिवड्या प्रा॥ नेमावर.	१ मौजे नवलगांव प्रा॥ नेमावर.
१ मौजे आजनासी प्रा॥ राजोर.	१ मौजे वामणी प्रा॥ राजोर.
१ मौजे आमला प्रा॥ हरणगांव.	१ मौजे मोहाई प्रा॥ हरणगांव.

१. पाटणामेरटच्या लढाया झाल्यावर जिवबादादा पुन्हा पत्याला एथें शिखांचे पारपत्यास गेले होते, असें दिसतें.
२. मेवाडांत मंडोसर एथें जिवबादादांचा वाडा होता. तेथें त्यांची मंडळी राहात असे.

२ मौजे आत्वास व पांगरी प्रा सत्वास. २ मौजे जुनवण्या व हिरापूर प्रा काटाफोड.
१ मौजे पोखर तर्पे खारया. १ मौजे नटावां प्रा चांदगड.

६ ६

एकूण देह बारा १२

१ माहालचें दफतर व आजमाल व जकातीची दामी व भेट वगैरे भुसकुटे याची वहिवाट सरकार हांडे येथें चालत आहे. याप्रमाणें तपशील—

१ सरकार हांडे येथें वस्ती होती. त्याचा दस्तूर चालत आहे. त्याप्रा नेमावर व प्रा राजोर व ता हरणगांव या तीजमाहलीं.

१ प्रा सत्वास व प्रा काटाफोड व प्रा चांदगड व तपे खारया येथील उजाडीची वस्ती केली. त्याचा दस्तूर प्रा चारवा येथें उजाडी होती ती वस्ती केली. तेथील धार याप्रों.

२

१ इनाम जमीन

१ कसबे नेमावर येथें बाग व जिरायत पंधरा इळाची. कलम.

१ प्रा काटाफोड येथें बाग व जिरायत पंधरा इळाची. कलम.

१ कसबे सत्वास येथें झाडी तोडून बाग केला आहे. त्याची पंधरा इळाची जमीन जिरायतसु॥ कलम.

१ किल्ले चांदगड तपे खारया का॥ हरणगांव यांतील माहली दर पंधरा इळाप्रमाणें पंचेचाळीस इळाची जमीन इनामी बाग जिरायतकरितां.

४

२

एकूण इनामी देह बारा १२ कलम १ एक हाक दस्तूर व दफतर वगैरे बद्दल दोन जिरायती व बाग व इनामी जमीन बद्दल कलमें चार सदहू आजवर चालविण्याची आज्ञा होऊन ही सनद तुह्मांस सादर केली आहे. तर सरमंडळचे वतनाचा अनुभव सरकारहिशाचे सनदेप्रमाणें तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरा घेत जाणें. होळकर यांचे हिशाचें सरमंडळवतन त्यांचे सनदेप्रमाणें अनुभवीत जाणें. जाणिजे छ० ५ माहे जिल्हेज बहूत काय लिहिणें हे विनंती. मोर्तब सुद्र. बार.

ले० नं. ७८ पे॥ छ० २६ मोहरम श्री. तारीख ३० जुलई १७९१.

रवाना कागद छ० २ स.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

अपत्य नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० १० माहे जिल्हेज मुकाम लौखोळा प्रांत मेवाड नजीक श्रीनाथद्वारा यथास्थित असों विशेष. अलीकडे बहूत दिवस जाहाले. वडिलांकडून आशीरवादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणें-

करून चिंता लागली आहे. तर येणारासमागमें पत्र पाठवून सांभाळ करीत असिलें पाहिजे. येथील वर्तमान तर तीर्थरूप राजश्री दादाकडे हिंदुस्थान प्रांतींचा सुभा सांगून पंचवीस हजार फौज व तोफा पलटणें समागमें देऊन ज्येष्ठ वद्य ५ स शेखावटींतून रवाना करून श्रीमंतांची खासा स्वारी मेवाड प्रांतीं मजल दरमजल आली. या प्रांतींची खंडणी जाहली. उदेपुरींहून श्रीराणाजी अलीकडे नारपा मगऱ्यावर येऊन येथून श्रीमंत दरमजल जाऊन परस्परें भेटी होतील. यानंतर आश्विन मासचे सुमारें उज्जनीस स्वारी जाईल. तेथून देशीं श्रीमंतांची स्वारी येणार. येथील बक्षिगिरीचें कामकाज मजकडे सांगितलें आहे. याप्रमाणें चालत आहे. श्रीमंतांची मर्जी प्रसन्न आहे. तीर्थरूपाचीं पत्रें वरचेवर येतात. सेखावटीची खंडणी होऊन नारनोल रेवडीचे सुमारें गेले. पुढें दरमजल श्रीमथुरेस जाऊन छावणी करणार. तीर्थस्वरूप राजश्री बापू व भाऊ व मातोश्री मावशीबाई व सौभाग्यवती मातोश्री ताई व सौभाग्यवती मातुश्री उमाबाई व सौभाग्यवती मातोश्री रुक्मिणबाई व मुलें लेंकरें समस्त समागमें गेलीं. तेथें श्रीमथुरायात्रा व श्रीभागीरथीस्नान करून विजया दशमी जाहल्यानंतर तेथें राहावयाचीं तीं राहून वरकड कोकणांत येतील. तीर्थस्वरूप राजश्री नाना अजमेरीस येथून पन्नास साठ कोशांवर आहेत. पत्रें येत असतात. खुशाल आहेत. चिरंजीव विश्राम जावदेस खुशाल आहे. त्याचींही पत्रें येत असतात. येथून पंचवीस कोशांवर जावद आहे. फौज त्याच मार्गें जाणार. ते समयीं भेटी होईल. ती॥ सौभाग्यवती मातोश्री वहिनी व चिरंजीव यशवंतराव सांप्रत जावदेस आहेत. आठां चौं रोजांत येथें येऊन अजमेरीस जाणार. सौभाग्यवती येसूबाईस भेटावयास सौभाग्यवती मातोश्री होनी गेली आहे. कळावें. वरकड वडिलांकडील सविस्तर वर्तमान लिहावयास आज्ञा केली पाहिजे. श्रीमंतांची कृपा चांगली आहे. हरघडी येणारासमवेत आशीर्वादपत्रीं सांभाळ केला पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. (पुढें ताजाकलमानें दोनचार ठिकाणीं घरगुती मजकूर आहे. त्याचा इतिहासाशीं संबंध नाहीं ह्मणून तो एथें दिला नाहीं.)

ले० नं. ७९. पैवस्त छ० २६ मोहरम. श्रीशंकर. तारीख १ आगष्ट १७९२.

तीर्थरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बालकें विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १२ जिल्हेज मुकाम जावद येथें वडिलांचे आशिर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सविस्तर लिहावयास आज्ञा केली पाहिजे. यानंतर येथील पोचा मजकूर यथास्थित आहे. यंदां पर्जन्य फार पडत आहे. याजमुळें मकी ज्वार गलित होईलसें दिसतें. पुढें ईश्वर काय करितो तें पाहावें. ती॥ राजश्री नाना अजमेरीस खुशाल आहेत. ती॥ सौभाग्यवती मातुश्री लक्ष्मी वहिनी अजमेरीहून सौभाग्यवती येसूबाई आरवदेकर इजला कांहीं समाधान नव्हतें ह्मणून भेटीस आली होती. ती पर्जन्यामुळें येथेंच सध्यां आहेत. पर्जन्य उघडलेवर आठ पंधरा रोजीं अजमेरीस जातील. तीर्थस्वरूप राजश्री दादा व बापू व भाऊ मुलेंमाणसें सुध्धां सर्व फौजेंत श्रीमथुरेजवळ खुशाल आहेत; फौज दादासमागमें देऊन हिंदुस्थानांत श्रीमंतांनीं रवाना केलें. ते मथुरेस छावणीस सध्यां जातील. श्रीमंतांची खासा स्वारी मेवाड प्रांतीं आहे. येथून

१. शिवबा नाना हे जिवबादादांचे बंधु. २. शिवबा नानांचें कुटुंब. ३. महादजी शिंदे.

पंचवीस तीस कोशांवर आहेत. बक्षिगिरीचे कामावर श्रीमंतांजवळ ती॥ राजश्री रावजी आहेत. त्याणींही आपल्या नांवें आलाइदा पत्र पाठविलें आहे. त्यावरून सविस्तर ध्यानास येईल. राजश्री रामबा माजेरकर व राजश्री रंगोबा सांकवळकर हे येथून गेले आहेत. त्यांजला दसरा जाहले-नंतर रवाना करून द्यावें. येविसीं ती॥ राजश्री नानानीं लिहिलें होतें. त्याजसमागमें राजश्री शामराव आजगांवकर याचें कुटुंब नानानीं बोलाविलें आहे. शामरावास येथें ठेवून घेतलें. त्याचें जाणें होत नाहीं. तेव्हां त्यांचें कुटुंब आणिलें पाहिजे. पहिलीं बोलाविलीं होतीं तीं लग्नाचे मुहूर्तामुळें न आलीं. त्यास कार्तिक मासीं मुलीचें लग्न त्यास सांगून करवावें. आणि रंगोबा-बरोबर रवाना करावी. त्याजला सांगून पाठवावें. येविसीं कळलें तसें करून त्याजला पाठवून द्यावें. तट्टें, माणसें व डोळीचे खर्चास रुपये. असें पाठवून देणेविसीं ती॥ राजश्री नानानीं लिहिलें होतें. त्यास मागाहून राजश्री अंबाजी राम कडे व अन्नपूर्णाबाई केरकर हीं कोंकणांत जावयास येथें आलीं आहेत. आठां पंधरा रोजीं येथून निघतील. त्यांजबरोबर तट्टें माणसें पाठवून देतों. व कांहीं वस्तवाणी घरीं नानांनीं लिहिलें आहे. त्याजप्रमाणें करवून पाठवून देतों. खर्चास कांहीं हुंडी पाठविणेविसीं ती॥ राजश्री नानानीं लिहिलें होतें. त्याजवरून चार हजारांच्या हुंड्या ३ तीन पाठविल्या आहेत. पुणेंच्या मिती श्रावण शु॥ १५ पासोन मुदत रोज ६१ दिवसांचे वाइद्याच्या. खुशालचंद किसनदास याजवर लिख्या जावदकर असाहूकर जुने रुपयांचा तपशील.

१६०० लिखी गुलजी बेतकल याची १.
१६०० लिखी आसालेख कासिदास याची १.
८०० लिखी पोखरदास जिवराज याची. १.
————
४०००

एकूण चार हजारांच्या पाठविल्या आहेत घेऊन पावलियाचें उत्तर पाठविलें पाहिजे. पदाजी रोहलाला व पालखी, डोळी वगैरे आटाक व राजश्री बाळकृष्णबावाची मातोश्री वगैरे तिकडून आलीं तीं सुखरूप येऊन पोंचलीं. त्या अलिकडे पत्रें आलीं नाहींत. तर सविस्तर लिहावयास आज्ञा केली पाहिजे. राजश्री शामरावजी आजगांवकर याचे स्त्रीस आणावयास मागाहून तट्टू माणसें पाठवून देतों. त्यास त्यांजला सांगून लग्न जलदी कार्तिक मासीं उरकोन घ्यावें. आणि रंगोबा वगैरे येतील त्याजबरोबर तिजला अगत्य पाठविली पाहिजे. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

लें० नं. ८० पैवस्त छ० ९ सफर. श्री. तारीख १६ आगष्ट १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

आपत्य शिऊबानें चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २७ माहे जिल्हेज मुकाम अजमेर येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलां-कडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता वाटती. तरी असें न करावें. आलिया मनुष्यासमागमें आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ करीत असिलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर तीर्थस्वरूप राजश्री दादा सडे[3] फौज हिंदुस्थानांत रवाना केली आहे. त्याजबरोबर

१. नारायणराव बक्षी. २. शिवबा नाना हे जिवबादादांचे कनिष्ठ बंधु होत. ३. सडी फौज ह्मणजे घोडेस्वार, रिसाला; व शिंद्यांकडे प्रमुखतः हीच फौज होती.

रवाना केले आहेत. व राजश्री गोपाळराव भाऊ चिटणीस असे उभयतां सरदारीसीं रवाना केले आहेत. बरोबर फौज वीस हजार व पलटणही बारा दिले आहेत. सध्यां छावणीस श्रीमथुरेस राहतील. बरोबर चिरंजीव राजश्री जगोबा व बाळोबा व मातुश्री मावसी व सर्व कुटुंब मुलें माणसें सुद्धां गेले आहेत. चिरंजीव बाळोबानें घरीं जावयास श्रीमंतांकडून निरोप घेतला आहे. मातुश्री मावसीची यात्रा श्रीमथुरेची करून दसरा जाहल्यावर घरीं येणार आहेत. पुढें पाहावें. चिरंजीव नारबा[१] बक्षिगिरीचे कामावर श्रीमंतांकडेस ठेविले आहेत. सध्यां श्रीमंतांचा मुकाम मेवाड प्रांतीं श्रीनाथद्वारवर जावदेकडून तीस कोशांवर आहेत. मेवाडचें काम जाहालेनंतर उज्जनीस छावणी करावयास जातील. पुढें देशीं जावयाचा मनसबा आहे. पुढें पाहावें. खर्चास घरीं पाठवावयाविसीं चिरंजीव विश्रामास जावदेस लिहिलें आहे. त्याणीं खर्चास पाठविलें आहे ह्मणोन लिहिलें आहे. त्यास तें पावलेंच असेल. हल्लीं जावदेस बायकांस वस्ता करविल्या आहेत. त्या राजश्री अंबाजीराव व अन्नपूर्णाबाई केरकर हे गणेशचतुर्थी करून निघणार. त्यांजबरोबर पाठवून देतील. खाजन बांधिलें होतें त्याच्या बांधा—(या पुढील बंद मिळत नाहीं.)

ले० नं. ८१ श्रीशंकर. तारीख ३१ आगष्ट १७९२.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

आपत्य विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १२ माहे मोहरम पावेतों वडिलांचे आशीर्वादें मुकाम जावद येथें सुखरूप असों विशेष. वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. तेणेंकरून चिंता वाटत होती. एवढ्यांत अकस्मात शालिग्राम व गंगाराम कासीद वडिलांकडून पत्र घेऊन आले तें पाहून संतोष होऊन चिंता निवारण जाहाली. असेंच आशीर्वादपत्रीं येणारा कासीदबरोबर संतोषवीत असावें. यानंतर इकडील वर्तमान. तीर्थस्वरूप राजश्री नानाचीं व रावजीचीं पत्रें वरचेवर आह्मांस येत असतात. वडील खुशाल आहेत. ति॥ राजश्री दादा सडे फौज घेऊन हिंदुस्थानांत गेले आहेत. बरोबर ती॥ राजश्री बापू व भाऊ आहेत. श्रीमंत माधवराज यांचे फौजेचा मुकाम मेवाडप्रांतीं आहे. आह्मांजवळून नजीक पंचवीस कोशांवर आहेत. उदेपूरहून श्रीराणाजी लष्करांत आले आहेत. भेटी होऊन सत्वरच दरकूच उज्जनीस जाणार असें आहे. फौजेंत श्रीमंतांजवळ ती॥ रावजी आहेत. ती॥ राजश्री नानानें घरीं खर्चास वस्ती पाठविणेंविसीं सांगितलें होतें. त्यास खर्चास तर राजश्री यसोबा आपाचे काशिदाबरोबर पाठविलें तें पावलेंच असेल. वस्ती येथें नव्या केल्या आहेत. ते एका चंव रोजीं राजश्री अंबाजी राम कर्डे व मातोश्री अनपूर्णा मामी जावयास निघणार यांजबरोबर पाठवून देतों. इकडील मामलतीचा मजकूर ज्याप्रमाणें ती॥ राजश्री नाना बंदोबस्त करून गेले त्याप्रमाणेंच चालत आहे. पुढें ज्वारी उनावून पार पडून हातास येईल तेव्हां खरें. वरकड वर्तमान मागाहून लिहून पाठवितों. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

१. हा मुलगा रानडे ब्राह्मण जातीचा जिवबादादांस लहानपणीं मिळाला होता. त्यांणीं त्याला आपल्या मुलाप्रमाणें पाळिलें होतें. लहानपणीं कांहीं दिवस हा घरीं कोंकणांत राहिला होता. तेथें लिहिण्यांत वगैरे माहितगार झाल्यावर त्याला ग्वाल्हेरीस नेण्यांत आलें. व तेथें कामकाजें पाहून हुशार झाल्यावर दादांनीं त्याजकडे आपल्यातर्फे बक्षिगिरीची वहिवाट दिली होती. बक्षिगिरीसंबंधीं हिशोब वगैरे लिहिण्याचें सर्व काम श्रीमंत पाटीलबोवांसंनिध राहून त्यानें करावें असें चाललें होतें.

लें० नं. ८२ श्रीशंकर. तारीख २८ सपटंबर सन १७९२.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ सफर मुकाम पुणें. वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. सांप्रत आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. यामुळें चिंता आहे. तरी असें न करितां सदैव आशिर्वादपत्रीं सांभाळिलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान पेशजीं सविस्तर लिहिलें आहे. त्यावरून विदीत जाहलें असेल. तीर्थरूपांस मारवाडांत जाणेविसीं सरकारचें आज्ञापत्र गेलें आहे. राजश्री गोपाळराव भाऊ राजगडचे सुमारें रहावे असें सरकारचें लिहून गेलें आहे. होळकर इंदुरास आहेत. सलूख व्हावा असें बोलणें त्याजकडून आलें आहे. अद्यापि सिद्धांत जाहला नाहीं. तीर्थरूप मारवाडांत जावयाकरितां जावदेनजीक मलबारगडचे सुमारें आहेत. लोकांचा गवगवा मोठा. सरकारांत ओढ. लोकांची समजूत करून अजमेरीवरून जातील. सरकारांत ओढ यामुळें रसदेशिवाई दुपट वराता केल्या. जावद व अजमेरीवर न पटवून घ्याव्या तर मर्जी ठीक राहत नाहीं. अशी चौकडून अडचण आहे. मारवाडप्रांतीं न जावें तर इतराजी होईल. याजकरितां तिकडे जावें. ऐसा वडिलांनीं विचार केला. परंतु लोकांचा खर्चामुळें तगादा फार आहे. कर्जवाम करून लोकांस कांहीं तरी दिलें पाहिजे. येथें सरकारांत विनंती करून लोकांचे समजाविसीकरितां कांहीं पाठविलें आहे. तूर्त येथून कूच होतां दिसत नाहीं. माहागाई मोठी. येथेंही लोकांचा गवगवा आहे. असा चौकडून पेंच आहे. वडिलांचे पुण्येंकरून पार पडेल तें खरें. तीर्थरूप राजश्री भाऊ वगैरे मुलेंमाणसें मथुरेस होतीं. तीं तीर्थरूपा ( ) येऊन रामपूरचे मुकामीं पोंचवून जावद अजमेरीहून हमेशा पत्रें येतात. सर्व सुखरूप आहेत. सांवताकडील कामाचें आटोपत आलें आहे. आतां आपले शरीरीं कसें आहे लिहावें. ब्राह्मण नेहमीं जपास लावावे. दसरा जाहलेवर सर्व मुलेंमाणसें रवाना करितों. (फाटलें.)

लें० नं. ८३ पे॥ छ० २१ रबिलावल श्री. तारीख ४ अकटंबर १७९२.
कार्तिक वद्य ९.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य जिऊबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आश्विन वद्य ४ चतुर्थी पावेतों मुकाम श्रीमथुराक्षेत्र येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. वडिलांकडून बहूत दिवस आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता वाटती. तरी असें न करितां येणारासमागमें आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ करावा. यानंतर इकडील वर्तमान तरी गुदस्तां मारवाडप्रांतीं फौजा घेऊन गेलों होतों. श्रीमंतांचे पुण्यप्रतापेंकरून दोनही लढाया मातबर होऊन यश आलें. रांगड्यांचें पारपत्य यथास्थित जाहालें. त्यावर श्रीमंत अजमेरीस आले. जैपूर व मारवाड दोन्ही संस्थानच्या खंडण्या जाहल्या. अजमीरचा सुभा व किल्ला चिरंजीव राजश्री शिवबाच्या स्वाधीन केला. आणि बंदोबस्त करून दिला. त्या प्रांतीं यंदां महर्गता फार आहे. पर्जन्य कमी पडला. पुढें कसें होईल पाहावें. यानंतर श्रीमंतांच्या भेटी श्रीपुष्करचे मुकामीं जाहल्या. नंतर जेष्ठ मासीं आम्हांस व राजश्री गोपाळराव भाऊ चिटणीस यांस शिरपाव[1] देऊन हिंदुस्थानचा सुभा सांगून

१. शिरपेंच.

इकडे रवाना करून दिल्हें. आणि श्रीमंत मेवाडांत जावयास गेले. तेथील मामला करून उज्जनीस जाण्यास जातील. आह्मी मुकाम मजकुरीं जन्माष्टमीस येऊन पोंचलों. येथील माहालमुलकाचा बंदोबस्त करून पुढें पटाल्याकडे जाणार आहों. श्रीमंतांकडे चिरंजीव मुलास ठेविला आहे. आह्मी इकडे जातेवेळीं चिरंजीव जगोबास बरोबर घेऊन जाऊं. चिरंजीव राजश्री बाळोबास व मुलेंमाणसें देऊन—( )

लें० नं. ८४ श्री. तारीख ८ अकटंबर सन १७९२.

राजश्री राजे खेमसावंत भोंसले बहादर सरदेसाइ प्रांत कुडाळ व माहालानीहाय गोसावी.

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य. स्नेहांकित माहादेव नारायण प्रधान. आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. पातशाहानीं आह्मांस राजेबहादर मरामतीबाब दोन मोर्चलें पाठविलीं आहेत. त्याप्रमाणें सरकारांतून चालविलीं पाहिजेत. ह्मणून तुह्मीं विनंती केली. त्याजवरून राजेबहादर मरामतीबाब मोर्चलें दोन सरकारांतून करार केलीं असत. तरी सदर्हूप्रमाणें चालवणें. जाणिजे छ० २१ सफर सुरुसन सलास तिसेन मयां आलफ. बहूत काय लिहिणें.

(मोर्तब. शिक्का.)

लें० नं. ८५ तारीख १० अकटंबर १७९२.

श्रियासह चिरंजीव राजश्री वासबाप्रती. चिमणाजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २३ माहे सफर मुकाम मोरज जाणोन–स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. तुह्मांकडून शाभान महिनेचें पत्र आलें त्या अलिकडे पत्र आलें नाहीं. त्यावरून चिंता जाहली होती. त्यास हालीं छ० ९ जिल्कादचें पत्र पाठविलें तें छ० २२ सहुरी पोंचून आनंद झाला. असाच सर्वदा पत्रीं भेटीचा लाभ देत असावा. यानंतर आह्मीं तुह्मांस माघ मासपर्यंत आज तागायत आह्मांकडील मजकूर लिहून पत्रें सात पाठविलीं. त्यांपैकीं तुह्मांस एकही पोंहोंचलें नाहीं. यावरून काय ह्मणावें. कोणीकडे कागद पडले कळेना. पर असो. तदनंतर माल गुदस्त पंढरीचे यात्रेस गेलों. तेथून बागणीस चिरंजीव राजश्री सदाशिव वरघाटीं जाणार त्यास भेटूं ( ) ते मार्गीं आलों. चिरंजीवाची भेट जाहली. ( ) एकादा मेळणीस आराम नाहीं. जाब ( ) कडेस ज्वर येऊं लागला. आठवे रोजीं घरीं आलों. दुखणें दिवसेंदिवस अधिक होत चाललें. उपाय केला परंतु आयुष्याची मर्यादा तुटली. तेव्हां उपाय साध्य जाहला नाहीं. पौष शु॥ १२ द्वादशीस काल जाहला. त्या—( ) श्रम करावे ईश्वरें घातला. त्यास उपाय कोणाचाच नाहीं. ईश्वरइच्छेनें घडेल त्यास इलाज काय आहे. कुटुंबाच्या सांभाळाविसीं लिहिलें तर सर्व भरिभार श्रीला लागला आहे. त्याणीं आह्मांस कल्याण करावें. मग सर्व घडोन येईल. उभयतां लष्कर स्वारीस आहेत. त्याबरोबर चिरंजीव राजश्री माधव जिवबा व भाचेवर्ग आहेत. त्याचा तपशील लिहिला कळला. चिरंजीव राजश्री ( ) बायको श्रीमथुरेस आहे. पुत्र जाहला ह्मणोन लिहिलें तें कळलें. व तुह्मीं शाभान मासीं पत्र पाठविलेंत त्यामध्यें चिरंजीव बाळकृष्ण जाहला ह्मणोन लिहिलेंच होतें. तेणेंकरून थोर आनंद झाला. तो कोठवर लिहावा. ईश्वरानें तुमचें कल्याण केलें ह्मणजे सर्वांस आनंद होईल. एक वेळ मुलास घेऊन सौभाग्यवती कृष्णाबाई येऊन श्रीची भेट घेऊन पांचसहा

मास राहून मग जाणार तर जावें. तेथें कोणी अटकाव करीत नाहींत. ईश्वरें कृपा करून मूल जाहला तो देवाचे पायांवर घालून मग जावें. हें आमचें मानस आहे. त्याचे चित्तीं कसें आहे तें जाणते. चिरंजीव सदासिव परभारें आगरेस आला. तेव्हां आपण राहून घेतला. वरकड मंडळी लष्करांत जाण्यास गेली. अद्याप चिरंजीव कोणास भेटला नाहीं. ह्मणून लिहिलें. त्यास चिरंजीव राजश्री लखबानें चिरंजीवास भेटीकरितां पाठविणेविसीं लिहिलें. परंतु अद्याप त्याची भेट जाहाली नाहीं. हें उत्तम नाहीं. भेट घेऊन पंधरा रोज राहून मागती तुह्मांकडेस येतों. खासा साहेबांस राजश्री भावोजी व गंगाधर व नीळकंठ बांदेस सर्व सुखरूप आहेत. ह्मणोन लिहिलेवरून संतोष जाहला. खर्चाकरितां चिरंजीव आगरेस आहेत. त्यास लिहिलें ह्मणोन लिहिलें. तें त्याची पांचशें रुपयांची चिठी करून राजश्री पांडुरंग गणेश वेंगुर्लेकर याचे माणसाबरोबर पाठविली. ती काल पावली. व राजश्री सदाशिव नारायण मांद्रेकर याणीं लखोटा करून एकाची चिठी पाठविली ती पावली. या प्रांतीं दुष्काळ तो लिहितां नये. पांच शेर तांदूळ मिळत नाहींत. असें जाहलें. हालीं पिकें जाहलीं. त्यास दर रुपयास भात ८३ तीन कुडव मिळत नाहीं. पर्जन्य नाहीं यामुळें अजीं पिकें बुडालीं. तो कहर काय लिहावा. मागां पांचचार वेळां लिहिलेंच होतें. हल्लीं पुढें दुष्काळ भारी घडेल. फसलवर तीन कुडव मिळत–(   ) त्यासी अवस्ता घडली ती ईश्वर जाणे. राजश्री (   ) मुरार साखवळकर याणें चिरंजीव राजश्री (   ) रुपये दाहा हजार देणेविशीं इसन्नेचे सालीं कोंकणांत उभयतां असतां खटपट होत होती. परंतु निभावणी केली नाहीं. त्यास हल्लीं त्याची स्त्री वडील यात्रेहून येत होतीं. तीं चिरंजीवास दखल होतांच स्वार व बाचे पाठवून आणून जबरदस्ती करून बारा हजार रुपये घेतले. ह्मणोन राजश्री नरहर मुरार याणीं कोटेंहून आपले घरीं लिहून पाठविलें आहे. येथें ह्मणतात जे सरकारी सांगून रुपये मारतां मारतां घेऊं ह्मणतात. त्यांतील तुह्मीं कांहींच लिहिलें नाहीं. चिरंजीवानें मागां आह्मांस लिहिलें जे. त्यास आणली. त्यास राजश्री गोपाळराव सरदार व राजश्री दादा फेरकर याणें लिहिलें जे. माणसें (   ) न देणें त्यावर आपण सारून नाहीं. रुपये (   ) निर्गम कोण करितो. ह्मणोन लिहिलें. व राजश्री लालाजी बल्लाळ कोटेस आहेत. त्यास उभयतांनीं शपथ घालून पत्रें पाठविलीं आहेत. आठ रोजांत जाबसाल होऊन येईल. असें लिहिलें होतें. मग कसें जाहलें तें कळलें नाहीं. दुसरें वर्तमान ऐकिलें. एकीनें श्रीमंत माहाराज शिंदे साहेबांकडे फिरयाद आली. तेव्हां चिरंजीवास हुजूर येणेविसीं आज्ञापत्र पाठविलें आहे. असें वर्तमान कळलें. परंतु खरें लटीक कळत नाहीं. येथें त्यांचे आप्तविषयी लोक दरबारीक आहेत. आण समर्थ दमेवज. तेव्हां लचांड करावयास वेळ लागणार नाहीं. असें यास रुपये तंव खरे आहेत. त्यास श्रीमंतांचें पत्र एक श्रीमंत महाराज राजश्री राजे बहादर यांस कागद असावा. मागेंपुढें कामावर पडेल. प्रयत्न करून एवढें काम केलेलें उत्तम आहे. राजश्री लखबाबावा लाड याकरवीं राजश्री तात्या पागनीस यांस पत्र लिहून पाठवून त्याकडून सरकारचें पत्र घेऊन पाठविलेवर होईल. हें

१. जिवबादादा. २. झालिमसिंग शहाणा याजमुळें शिंदेशाहींत कोटे संस्थानची मोठी मान्यता होती, असें म्यालेसन साहेब ह्मणतात. पण त्यास खरें कारण जिवबादादांचे आप्त हे लालाजी बल्लाळ सांखोळकर कोटे सरकारचे कारभारी होते हें होय. पहा टॉड साहेबांचा राजस्थानचा इतिहास. या सांखोळकरांमुळें कोटे सरकाराबरोबर शिंदे दरबारचा स्नेह होता. त्यास झालिमसिंग हा कारण नव्हे. त्यांतल्या त्यांत तो चांगला होता ही गोष्ट वेगळी. पत्रें व यादी पृ. २१६.

कार्य करविलें पाहिजे. लष्कर मथुरेस आलेवर आपण मथुरेस जाऊं. आण कासीद खर्चास कर्जदारी यांची बेजमी करून पाठवूं. ह्मणून लिहिलें. आपण कोंकणांत आमचे भेटीस येणार ह्मणून लिहिलें. परंतु ईश्वरइच्छेनें घडेल तें प्रमाण. चिरंजीव लखबाचे व आमचे भेटीस अकरा वर्षें जाहालीं. माघ मासापुढें बारावें वर्ष लागतें. चिंता करून काय होणें. वरकड इकडील सर्व सुखरूप आहेत. चिरंजीव सखू व लाडुबाई व गुणबा सुखरूप आहेत. चिरंजीव सौभाग्यवती साळूबाई आज दाहा मासपर्यंत येथें आहे. गरोदर होती. जेष्ठ वद्य १० दशमीस गुरुवारीं प्रसूत जाहली. पुत्र जाहला. सुखरूप आहेत. चिरंजीवाचे वेळेचे दोघे मूल लग्नाचे जाहले आहेत. ईश्वर कृपा करून माळ घालील तो सुदीन आहे. वरकड आप्तविषयीक सर्व सुखरूप आहेत. बहूत काय लिहिणें हे आशिर्वाद.

ले० नं. ८६ पे॥ छ० जमादिलाखर. श्री. तारीख १२ डिसेंबर १७९२.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत मार्गशीर्ष वद्य १३ मुकाम घोसुडे नजीक किल्ले चितोड प्रांत मेवाड. वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे विशेष. वडिलीं आश्विन शु॥ ५ मीचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन वर्तमान कळलें. तीर्थस्वरूप विठोबा तात्याचें वर्तमान लिहिलें तें ऐकून खेद प्राप्त जाहला. तो पत्रीं कोठवर लिहूं. ईश्वरें मोठा अनर्थ केला. दुःखाचे डोंगर दाखविले. ईश्वरइच्छेस इलाज नाहीं. विवेकेंकरून चित्ताचें शांतवन केलें पाहिजे. याखेरीज दुसरा उपाय नाहीं. अजमेरीस तीर्थस्वरूप राजश्री नानास वर्तमान कळलें. व तीर्थस्वरूप दादांसही मथुरेस वर्तमान कळलें. मथुरेहून तीर्थस्वरूप राजश्री भाऊचीं मुलेंमाणसें यांची रवानगी कोंकणांत जाहाली असेल. चिरंजीव राजश्री विश्राम जावदेस आहे. त्याची रवानगी वडिलांकडे करावयाकरितां तीर्थस्वरूपांनीं मथुरेस लिहिलें आहे. तेथून आज्ञा आलियावर मामलतीचा बंदोबस्त करून चिरंजीवास वडिलांकडे रवाना करून देतों. चितोडच्या किल्ल्यास श्रीमंतांनीं मोर्चे लावून जेर केला. रावत भीमसिंगजी किल्ल्यावर होते. ते उतरून येऊन भेटले. किल्ला खालीं करून दिला. श्रीमंतांनीं किल्ला श्रीराणाजीचे हवालीं केला. दिढा लक्ष पट्याचा मुलूख गांव गोट लावून घेणें. व खंडणी ठरली. त्याचे रुपयांचा फडशा होऊन येणें यामुळें आठ पंधरा दिवस येथें मुकाम आहे. नंतर या प्रांतीं कांहीं फौज व सुभा ठेवून खासा स्वारी उज्जनीस माघ मासीं येईल. उज्जनींत महिना दोन महिने मात्र राहून जलदीच देशीं जावयाची मसलत आहे. माघाहून घडेल तशी विनंती लिहून पाठवूं. वडिलीं गोवें फिरंगी याचीं पत्रें सदाशिवगडसंबंधीं येथें श्रीमंतांसीं

१. मेवाड ऊर्फ उदेपूरचे राजे "राणा भीमसिंग याचे कारकीर्दींत मेवाडामध्यें शेणवी ब्राह्मण मोठे श्रीमान् व वजनदार सरदार असत. वर लिहिलेले लखबादादा आणि बाळाभाऊ, तात्या, जिवबादादा, शिवाजी नाना, लालाजी पंडित, व यशवंतराव भाऊ ही सर्व शेणवी मंडळी मेवाडच्या राण्याची सावकार असून त्यांचेकडेस मेवाडचे माहाल गाहाण असत." टॉड साहेबकृत राजस्थानचा इतिहास व लोकहितवादीकृत उदेपूरचा इतिहास पृ० २७३ पहा. २. हें राजघराणें साऱ्या हिंदुस्थानांत मान्य असून त्याला श्रीरामचंद्राचा वंश असें मानितात. पहा म्यालेसन साहेबांचा इतिहास, भा० पृ० १. यामुळें हिंदु लोक लिहिते वेळीं या राजांचे नांवापूर्वीं श्रीचा उपयोग करितात. या वेळीं भीमसिंग नांवाचे राणाजी होते.

पाठविलीं. त्याचीं उत्तरें फिरंगी याचे नावें व सेक्रेटरी याचे नावें दोन खलिते पाठविले आहेत. त्यांत पुणेकर श्रीमंत राजश्री नाना फडणीस यासीं व येथील वकिलीचे कामास राजश्री रामजी पाटील जाधव आहेत. त्यास सरकारचीं पत्रें सदाशिवगडाविषयीं उगवून पाठविलीं आहेत. हे फिरंगी यांजकडील वकील असतील त्यांजकडे पाठवावीं. ह्मणजे रामजी पाटील व फिरंगी यांजकडील वकील श्रीमंत राजश्री नानासीं बोलून सदाशिवगडसंबंधीं जाबसाल फिरंगी याचे मनोदयानुरूप करून घेतील. येविसीं सरकारचीं वगैरे पत्रें रामजी पाटील यांचीं परस्पर येथून ममतेचीं पाठविलीं आहेत. व फिरंगी यांचीं व सेक्रेटरी याचीं पत्रें आपल्याकडील कामाचा जाबसाल व लखबा लाड यांचे वतनसंबंधीं व जगंनाथशेट घोटगे यांजकडील जकातीचा जाबसाल विस्तारेंकरून लिहिले आहेत. तेथें घडतील तें खरें. तात्याचें वर्तमान ऐकिल्यापासून चित्त फार उद्विग्न आहे. ईश्वर-इच्छेस उपाय नाहीं. ही गोष्ट जाहलेपासून दुःखाचे पर्वत जाहाले आहेत. कांहींच सुचत नाहीं. वरकड इकडील सविस्तर वर्तमान तर लिहित असतों. वडिलांचे भेटीची इच्छा फार आहे. खासा स्वारी देशीं येणार आहे. आज्ञा सरकारची जाहलेस भेटीस येईन. भेट घेऊं तो सुदीन. वरकड वडिलांकडील सविस्तर वर्तमान लिहावया आज्ञा केली पाहिजे. चिरंजीव राजश्री विश्राम याची रवानगी लवकरच होईल. कळावें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे शेवेसीं चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. सदैव आशिर्वादपत्रीं सांभाळावें. होणारास इलाज नाहीं. दैव कमी तेव्हां ही गोष्ट जाहाली. वडिलांच्या पत्रावर आपणास उभयतांस लिहीत होतों. हे वेळेस ईश्वरानें काय काय गत केली उपाय नाहीं. हे विज्ञाप्ती.

लें० नं. ८७ पे॥ छ० १ रजब. श्री. माहे डिसेंबर १७९२.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत पौष वद्य (   ) मुकाम नजीक पुणें वडिलांचे आशिर्वादेंकरून सर्व यथास्थित असों विशेष. राजश्री भगवंत (   ) विठल सुगठाणेकर याचें वतनाचें बाग (   ) येथें आहे. त्याचे वडील देशीं आल्या व (   ) सरकार बागायताखालीं पडेल. उपर कैलासवासी रामचंद्र बाबा हे कोंकणांत गेले. तेस (   ) सोडवून घेतले. नंतर फिरून बागायता (   ) कमाविसदारानें वहिवाट चालली त्याविसीं (   ) कडे अर्ज केला. त्यानीं राजश्री रामजी (   ) जाधव याजकडे (   ) परवानगी सांगितली. पाटके (   ) किल्ले प्रांत करवीरकर यांजकडून सुटलेवर बाग आपण सोडवून देईन. याप्रमाणें जावजी गाईकवाड याजकडे सांगोन पाठविलें. त्यासही मुलूख सुटलेवर देऊं असें राजश्रीनें वचन दिल्यावरून (   )कारची व मुत्सदी मंडळी पाटील आदीकरून पत्र

१. ही सदाशिवगड ऊर्फ कारवारची कामगारी गोवें सरकार पोर्च्युगीज फिरंगी यांची होती. त्यांनीं जिवबादादां-मार्फत पेशव्यांकडून हें काम करून घेण्यासाठीं जिवबादादांचे बंधु नरोबा दादा यांचेकडून पत्रव्यवहार सुरू केला होता. व याप्रमाणें तें काम करून घेण्याबद्दल त्यांनीं चालविलेलें हें कारस्थान आहे. पत्र नं. ४१५.

२. प्रसिद्ध मुत्सद्दी रामचंद्र मल्हार रेगे ऊर्फ रामचंद्र बाबा हे पूर्वीं कोंकणांत आले होते. पहा वि० वि० पु० ११ व पत्र नंबर ३०.

देऊन माणूस पाठविला त्यास दाख (   ) नाहीं. सबब निमे समुद्राकडील पालवाचें नूतन कटुबाण करून दिलें. ते सर्व जभ ठेवून देतात. असें त्यास तुह्मीं भिऊन पांच सा हजार नारळ कुंबळें अवघ्या ठिकाणाचें करार करून घ्यावें. यास खर्च पांचशें रुपये. शेंपन्नास अधिक उणे लागल्यास देऊन पालवबरहुकूम व बागायताकडेस मार्गाखालील असे वेळेपासून सेतवड यावें. तो ज्ञा(   )न ठिकाण बंदोबस्त यास दोनही समी(   ) पांच साहा हजार नारळ ठरावून गांवीं तिजणुकेस (   ) राजश्री भगवंतराव विठ्ठल याचे (   )ले ते करावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

पत्र पाठवून बाळकाचा सांभाळ केला पाहिजे. यानंतर आह्मांस घरींहून येऊन आज नव वर्षें होत आलीं. त्यास वडिलांचे भेटीस येणार. त्यास तीर्थस्वरूप राजश्री दादाची नेमणूक मारवाड प्रांतीं जाणेविसीं श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांची जाहाली. त्यास आह्मांस बरोबर जाणें जाहलें.

ले० नं. ८८ श्री. सन १७९३.

चिरंजीव साबाजीस आशिर्वाद उपरी. सदाशिव आला. त्या केरी हरमलचे जाबते पाठवून द्यावे ह्मणून लिहिलें तर (   ) याबरोबर पाठविले आहेत. व तांदूळ ०१ एक कुडव पाठविले आहेत. पुणेहून चिरंजीव नारबाचे कागद आले. व अंतोबा कावठणकर यांचे सुखरूप आहेत. चिरंजीव जिऊबाचे कागद नाहींत. परंतु सर्व खुखरूप आहेत. बिजेसिंग मारवाडी हा मेला. त्याच्या बंदोबस्तास मारवाडास चिरंजीवास फौज सुद्धां पाठविला. ऐसें लिहिलें. गोपाळराव यासी इंदुरास ठेविलें. शाहा देऊन ठेविलें ऐसें लिहिलें आहे. हे आशीर्वाद.

ले० नं. ८९ श्री. सन १७९२.

राजश्री गोविंदशेट घोटगे स्वामी गोसावी यांस.

सेवक नरहर गणेश केरकर. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष चिरंजीव शिवबाकडून काशीद आला. सर्व मंडळी व चिरंजीव जिउबा सुखरूप आहेत. त्याची फौज मोडली. यांस यश आलें. आपणास कळावें. देणेंकरास द्यावयास खर्चास पाठविलें. त्यापैकीं आपणाकडेस चिटी खरी रुपये चार हजारांची पाठविली आहे. ही जलदी पाठवून एका महिनेंत जाबसाल आणावा. फार दिवस न लावावे. कोणे समयीं कैसें होईल हें समजत नाहीं. याकरितां जलदी पुणेस पाठवावी. आण जाब आणावी. हयगई न करावी. चिटीयेविसीं राजश्री जगंनाथसेट यानें लिहिलें होतें. श्रावण पूर्णिमा. हे विनंती.

ले० नं. ९० पै॥ छ० १३ जमादिलाखर. श्री. सन १७९२.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री बाबू स्वामीचे सेवेसीं.

(   ) श्रीमंत[1] एकी सांगतील त्या अन्वयें चाला. ऐशीं पत्रें पाठविलीं[2]. त्यांच्या नकला करून पुणेंत जघन्य केलें. तरी आज्ञेव्यतिरिक्त तेथें[3] तोंडांतून शद्ब निघत नाहीं. ह्या गोष्टी राज्याच्या कशा होतील. हें ध्यानीं न आणितां परभारें लुच्चे लिहितात. तो मजकूर जमेस धरून दरबारीं शोध घेणें. (पुढील बंद मिळत नाहीं.)

१. महादजी शिंदे. २. श्रीमंत पेशवे. ३. महादजी शिंदे यांनीं. ४. पुण्यांतील कारभाऱ्याचा.

ले० नं. ९१ श्री.

राजश्री नरहर गणेश केरकर यांस.

खेमसावंत भोंसुले सरदेसाई प्रा कुडाळ व माहालानीहाय सुरुसन खमस समानैन मयां आलफ तुह्मी धणीकामाठायीं निष्ठेनें वर्ततां याकरितां तुह्मावर कृपाळु होऊन ठिकाण रोणें बागायत आरवंदें हें सालमजकुरापासून तुह्मांस इनाम करून दिलें असे. याच्या चतुःसीमाबरहुकूम बखर.

१ पूर्व दिशा. रुपेण केश नाईक व गोविंद बाबाजी व यमू लक्ष्मीण नाईक व भाऊ यांचे ठिकाणाचे मेरेनमेर.

१ पश्चिम दिशा. रामचंद्र नीळकंठ व यसाजी राम व वरकड भाऊ यांचे ठिकाणाचे व झरचा आंक थोरले खाजनाचे मेरेनमेर.

१ उत्तर दिशा. केशव फट नाईक व कृष्णो बाबाजी व फटो बाबाजी यांचें ठिकाण घोणेची डोंगरी व बागायतचे मेरेनमेर.

१ दक्षिण दिशा. राजेश्री रामसावंत भोंसुले तिरवडेकर यांचे ठिकाणाचे मेरेनमेर.

येणेंप्रमाणें चतुःसीमा याचें सर्दकुंबळें ८६ साहा कुडव व नारळ २४०० चोवीसशें बागायताकडे जमेस आहे तें. सालमजकूरपासून दस्तिबाद देऊन ठिकाण जळ, स्थळ, काष्ट, पाषाण, तृणाद्यकरून ठिकाण तुह्मांस व तुमचे वंशपरंपरेस सालदरसाल इनाम करून दिलें असे. भोगवटा करीत जाणें. याविसीं बागायताचे कमाविसदारास सनद दिली असे. छ० २९ जिल्हेज.

ले० नं. ९२ पे॥ छ० २४ जमादिलावल. श्रीशंकर. तारीख ९ जानेवारी १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

आपत्य शिवबानें चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २५ माहे जमादिलावल मुकाम अजमेर. जाणोन स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. बहुत दिवस जाहले. वडिलांकडून आशीरवादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. सदैव आलियासमागमें पत्र पाठवून वर्तमान कळवीत जावें. यानंतर चिरंजीव राजश्री रामबाच्या कासिदांबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें कीं, चिरंजीव अंतोबा व मुलींचीं लग्नें जेष्ठ मासीं उरकून घेतलीं. नवरीस कांहीं वस्ती केल्या नाहींत. व कापड आजरेच्या सावकाराकडून घेतलें. आण त्यास चिठी चिरंजीव नारबावर दिली ह्मणून लिहिलें तें कळलें. त्यास ते रुपये चिरंजीव राजश्री नारबास देण्यास मिळाले नाहींत. पुणेस तेव्हां त्याणें आह्मावर सावकारास बारा हजारांची चिठी दिली. त्याप्रमाणें आह्मीं येथें रुपये दिले. वस्ती चिरंजीव अंतोबाचे नवरीस करून पाठविणें ह्मणोन तुह्मीं लिहिलें त्यास तेथें तुह्मीं वस्ती काय केल्या आण कोणत्या करून पाठवाव्या. त्याची यादी लिहून पाठविणें. ह्मणजे त्यासारखें करून पाठवूं. दुसरें तीर्थस्वरूप राजश्री दादा फौजसुद्धां मारवाडांत जाणेस आले आहेत. येथून तिसां कोशांवर शापुरेस मुकाम आहे. आठांपंधरा रोजीं अजमेरीजवळ येतील. बरोबर मुलेंमाणसेंही आहेत. चिरंजीव राजश्री जगोबा व

१. केरकरांचें घराणें वाडीसरकारचे फार उपयोगीं पडलें होतें. २. या रोण ठिकाणींच जिवबादादांची मुलगी निराबाई इचें लग्न मोठ्या समारंभानें झालें होतें व त्याजबद्दलची माहिती जिवबादादा यांजवरील पोवाड्यांचें स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध झालेलें आहे, त्यांत पृष्ठें ३४।३५ यांत पाहावी.

बाळोबासुद्धां आहेत. अजमेरीस नजीक पांच साहा कोसांवर आले ह्मणजे आह्मीही भेटीस [1]जाऊं. भेटी झाल्यानंतर घरीं मुलें माणसें रवाना करावयाची तजवीज आहे नाहीं ती समजेल. चिरंजीव राजश्री बाळोबाची बायको गरवार आहे. पांच सहा महिनेची मु ( ) ऐकिलें आहे. ते परवानगी करावयास दिवसगत लागलेसारखें दिसतें. पुढें पाहावें. चिरंजीव राजश्री वेंकोबास नवरी दाहा वर्षांची करार केली आहे. लग्न करावयास रवाना करून देणेविषयीं लिहिलें त्यास मुलेंमाणसें रवाना केलीं तरी त्याजबरोबर रवाना करून देतों. कधीं तरी चिरंजीव राजश्री मदबा रांगणेकर व चिरंजीव राजश्री रामचंद्र यशवंत व चिरंजीव राजश्री रामबा कोचरेकर येणार आहेत. त्यांजबरोबर रवाना करून देतों. व चिरंजीव राजश्री विश्राम याचीही रवानगी करावयाची आहे. व चिरंजीव भाऊची त्यास तीर्थस्वरूप—(यापुढील बंद मिळत नाहीं.)

लें० नं. ९३ पे॥ छ० ७ रजब. श्री. तारीख १३ जानेवारी १७९३.

तीर्थरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २९ जमादिलावल. मुकाम जावद येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर ऐसें नसावें. सविस्तर लिहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर यंदां घरीं यावयाचें ठरलें आहे. ती॥ राजश्री दादा[1] फौजसुद्धां अजमेरीनजीक गेले आहेत. तीर्थस्वरूप राजश्री नानाही[2] लष्करांत भेटीस आले आहेत. वडिलांनीं आह्मांस लिहिलें आहे कीं, इकडून मुलेंमाणसें घरीं रवाना करणार त्यास तुह्मीं तयारींत असावें. त्याजवरून आह्मी तयारींत आहों. येथील कांहीं गुत्ता नाहीं. तिकडून येणार तीं माणसें आलीं ह्मणजे आह्मी येथून समागमें येऊं. एक महिन्यानें निघणें होईलसें आहे. येथील बंदोबस्त वडिलांचे आज्ञेप्रमाणें करून निघूं. ती॥ राजश्री बापू व भाऊ ऐसे लष्करांतच आहेत. लष्कर आठ दाहा रोजीं मारवाड प्रांतीं[3] जाणार आहे. ती॥ सौभाग्यवती रुखमीण वहिनी गरोदर आहे. नव मास जाहाले. कदाचित् त्याचें राहणें होईल तर नकळे. वरकड तर निघतील ऐसें आहे. वरकड मंडळी येथील जावद, निमच, जिरणचीं व अजमेरलष्करचीं झाडून सुखरूप आहेत. कळावें वडिलांकडील बरवेपणाचें लिहिलें पाहिजे. ती॥ राजश्री अंतोबा भाऊ कवठणकर लष्करांत दादापासीं सुखरूप आहेत. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

ती॥ राजश्री बाजी वडिलांचे सेवेसीं. साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान वडिलांच्या पत्रावरून विदित होईल हे विज्ञापना.

लें० नं. ९४ छ० १४ शा॥ श्री. तारीख १५ फेब्रुवारी १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यासमान शामराव पांडुरंग चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत फाल्गुन शुध्ध ५ मुकाम पुणें येथें आपले आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. अलीकडे आशीरवादपत्र येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास छ० १९ रजबचें पत्र पाठविलें तें पावोन

१. जिवबादादा. २. शिवबा नाना ऊर्फ शिवाजी नाना. ३. जोधपूर प्रांतीं.

परमानंद झाला. असेंच सर्वदा आशीर्वादपत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतर आपले पत्रीं मजकूर जे केरी सोडून आलीकडे येणें याविसींची मसलत लिहिली तेव्हां तुह्मी तरी जवळ होतां ( ) नाहीं. केवळ लेंकूरपण जाहालें. असें कितियेक विस्तारें लिहिलेलें. हें खरेंच आहे. परंतु आपण केरीस असतां फिरंगी यांजकडून बहूगुण कामत लंगीस्ताद आपले भेटीस आले होते. त्याचा मजकूर आपण येथें लिहिला. तेव्हां श्रीमंत राजश्री रावसाहेब याणीं येथें एक चौघां इष्टमित्रांस महाराजांनीं विचारिलें. तेव्हां माहाराजांनीं आग्रहपुरस्कर फिरंगी यांजकडील माहाल सोडवून देतों. मुलेंमाणसें अलीकडे आणावीं ह्मणोन आज्ञा जाहाली. तेव्हां पत्रें लिहितां वेळीं आह्मीं विनंती केली जे. येथील विचार आहे तो आपणास विदीत आहे. करवीरकरांकडील किल्ले सुटावयास कोणता प्रयाग होता. त्या अर्थीं हा फिरंगी आहे. कागदीं पत्रीं जरब पोंहोचून मुलूख सुटणार नाहीं. आणी फौजही जाऊन फिरंगीयाचें पारिपत्य होणार हेंही कळतच आहे. पर्यायेंकरून जें होईल तें होईल. परंतु तूर्त मुलें माणसें आलीकडे आणावयाची सल्ला न करावी. असें त्रिवाच्य विनंती केली. तेव्हां ती गोष्ट न ऐकतां आपणास पत्रें लिहिलीं. तेव्हां आपणही या गोष्टीचा कांहींच अंदेशा ध्यानीं न आणितां येथून लिहिलेप्रमाणें वर्तणूक जाहाली. पुढें या थरास आलें. पुढें आह्मांकडे शब्द तो काय. आह्मी आपले पदरीं आहों. आपलें कल्याण तेंच आह्मांस पाहिजे. हरएक गोष्ट आह्मां योजलेप्रमाणें विनंती करितों. ऐकून करणें न करणें सल्ला धन्याची. हालीं आपलें पत्र रावसाहेबांस आलें. त्यांत कोणी कारकुनाचें ऐकत न जाणें. ह्मणोन लिहिलें तें उत्तमच आहे. परंतु येथील रीतरिवाज सर्व गुदस्तां राजश्री साबाजी काका आले होते. चार महिने राहून सर्व पाहून गेलेच आहेत. त्या अर्थीं आह्मीं विशेष काय लिहावें. धन्याचे मर्जीनुरूप होईल तें खरें. फिरंगीयास कधींचा जाबसाल लाविला आहे. घडतां घडेल तें खरें. उपायास कमती नाहीं. वरकड सविस्तर यजमान स्वामीच्या पत्रावरून विदीत होईल. हे विज्ञापी.

ले० नं. ९५ श्री. तारीख १७ फेब्रुवारी १७९३.

अजम फ्रान्सीसक दे कुंञ दे मेनेजिस गोवर्णदोर कपितान जनरल बाहादर गोवा दा मोहबतहू— शाहामत आवाली मर्तबत व हाशमत मंजलत मवामत दस्त गाहायेत जाद दोस्ताआन. जयाजीबा माहादजी सिंदे. सलाम फरहत आजामआंकी येथील खेरखुशी जाणोन आपली शादमाजी हमेशा कलमी करीत जाऊं दिगर. राजश्री खेमसावंत भोंसुले बाहादर सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय. याणीं राजश्री नरहर गणेश यांस पालखीच्या सरंजामाबद्दल वगैरे मौजे हरमल तालुके पेडणें हा गांव इनामी करून दिला आहे. तो गांव तुह्मांकडून चालावयासी दिवसगत लागते. याकरितां पेशजी तुह्मांस एक दोन वेळां पत्रें पाठविलीं. परंतु अद्यापि गांव मशारनिल्हेकडे चालत नाहीं ह्मणून कळलें. त्यावरून हल्लीं पत्र लिहित आहें. तरी सावंताच्या इनामी सनदेप्रमाणें तुह्मांकडूनही सनदपत्र होऊन सदरहू गांव नरहर गणेश याजकडे चालता करावा. व हरएकविसीं याचें कामकाज पडल्यास करून देत जावें. मशारनिल्हे आमचे पदरीं याचें अगत्य आह्मांस. याकरितां लिहिल्याप्रमाणें चालवून गौरव करीत जावा. रवाना छ० ५ रज्जब. जादा काय लिहावें. लोभ कीजे हे किताबत. (शिक्का आहे.)

१. हे गोव्यांच्या फिरंग्याचे वकील होते. २. नारायणराव बक्षी. ३. महादजी शिंदे यांणीं. ४. गोवें येथील पोर्तुगीज यांचा गवर्नर जनरल. ५. दुसरे खेमसावंत राजेबाहादर वाडीसरकार.

लें० नं. ९६ श्री. फेब्रुवारी १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे शेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत फाल्गुन. मुकाम पुणें यथास्थीत असे विशेष. तीर्थरूप दादांचें पत्र मार्गशीर्ष वद्य ७ चें आलें तें व आपण पत्र पाठविलें तें पाहून लेखनार्थ कळों आला. फाल्गुन शुद्ध १० स गृहप्रवेश व चिरंजीवाचा व्रतबंध करून घेतों ह्मणून लिहिलें. तो मजकूर तीर्थरूपांकडे सडे स्वारींत लिहून पाठविला. आपले शरीरीं अलीकडे थोडाबहूत आराम आहे. ह्मणून लिहिलें होतें. त्यास सांप्रत निःशेष आरोग्य जाहल्याचें वर्तमान लिहावयाविसीं आज्ञा करावी. येविसींची रात्रंदिवस काळजी लागली आहे. तर शरीरप्रकृतीचें वर्तमान वडिलीं वरचेवर लिहून लेखन करीत असावें. मौजे हरमलविसीं सरकारचें पत्र गोवेंकर फिरंगी यासीं घेतलें आहे. त्याची नकल पाठविली आहे. त्याजवरून कळेल. फिरंगी याजकडील वकिलास बोलावून आणून त्यांचेंही पत्र या अन्वयें घेऊन मागाहून खलिता व वकिलाचें पत्र पाठवून देतों. सारांश. वडिलांच्या शरीराची मोठी काळजी लागली आहे. यास्तव मुजरत कासीद पाठविला आहे. तरी बरवेपणाचें वर्तमान लिहावया आज्ञा केली पाहिजे. मुंज व घरंप्रवेश जाहालाच असेल. पेशर्जी कासीद समाचारास पाठविला होता. तोही अद्यापि आला नाहीं. याकरितां मोठ्या चिंतेंत आहों. हें पत्र प्रविष्ट होतांच उत्तर बरवेपणाचें सत्वर पाठवावें. ह्मणजे चित्त स्वस्थ होईल. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

अपत्य विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. लिहिलें परिसोन सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

लें० नं. ९७ पे॥ छ० २५ शाबान. श्रीशंकर. तारीख ६ मार्च १७९३.

तीर्थरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २२ रजब मुकाम जावद येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. सांप्रत वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर असें नसावें. सर्वदां आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ करावा. यानंतर. आपले प्रांतीं श्रीमंत राजेबाहादर व फिरंगी यांची बेबनांव जाहला. याजमुळें आपण केरीहून कुटुंबासुद्धां निघून मळेंगांवीं आलां. मळगांवीं माणसें ठेवून आपण वाडीस आलां. असें पत्र आपलें लष्करीं आलें. बागबागायत गल्ला वगैरे सर्वस्वी गेलें. गांव सुटला. याजमुळें बहूत चिंता प्राप्त झाली. खर्चाची विपत्ती होत्ये असेल ह्मणोन आह्मीं अजमेरीस लिहिलें होतें. त्याजवरून तेथून आज्ञा आली कीं, पांच हजारच्या हुंड्या पाठवाव्या. त्याजवरून येथून सवड करून सद्हूच्या हुंड्या पाठविल्या आहेत. एक कासीद अजमेरचा आहे. त्याजकडे पत्रें ति॥ राजश्री दादांचीं व ती ॥ राजश्री नानांचीं आलीं आपले नांवें तीं पाठविलीं आहेत. त्यावरून सविस्तर कळों येईल. हुंड्या पाठविल्या या पुणेचे मिती माघ वद्य ८ पासोन मुकाम रोज ६१ खुशालचंद किसनचंद याजवर तपशील.

१. तारीख २० फेब्रुवारी १७९३. २. जिवबादादांकडे. ३. हल्लीं कोंकणांत केरी येथें ज्या घरांत राहतात तो वाडा. ४. हा गांव सावंतवाडीपासून एका कोसावर आहे. ५. जिवबादादांचीं. ६. शिवाजी नाना ऊर्फ शिवबा नाना यांचीं.

२००० लिखी आमा नेख पारख याची.
२००० लिखी गुलजी बेतलाल याची.
१००० लिखी जिवराज याची.
५०००

एकूण पांच हजारांच्या पाठविल्या आहेत. ह्या घेऊन पावलीयाचें उत्तर पाठवावें. कासीदास लवकर माघारें रवाना करावें. आपलेकडील चिंता लागली आहे. सविस्तर वर्तमान येईल तेव्हां चैन पडेल. आमचे घरीं येण्याचा मजकूर शिमगेनंतर आहे. मुलेंमाणसें राहिलीं तरी आह्मांस रवाना करितील असें अजमेरीहून लिहिलें आहे. आपलेही पत्रीं लिहिलें आहे. पुणेकडील वर्तमान (फाटलें.)

ले० नं. ९८ पुरवणी. श्री. ३ तारीख २१ मार्च १७९३.

वडिलांचे सेवेसीं साष्टांग नमस्कार.

खर्चावेर्चाचे तजविजीस्तौ सडे स्वारींत वडिलांस लिहिलें आहे. तेथून जाबसाल येतांच सेवेशीं लिहून पाठवितों. सौभाग्यवती मातोश्री ताई व सर्व सौभाग्यवती मातोश्री वहिनी व मुलें येणार त्यांजबरोबर चिरंजीव राजश्री विश्रामजीसही रवाना करीतों ह्मणून वडिलांनीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें चिरंजीवही त्याजबरोबर जलदीच घरीं वडिलांचे भेटीस येईल. ती॥ राजश्री साबाजी काकाकरितां घोडी व आपणास शालजोडी व चर्मी जोडे लिहिलेप्रमाणें मागाहून शेवेशीं पाठऊन देतों. पत्राचें उत्तर जलदी शेवेसीं विदीत व्हावें. याकरितां माणूस जलदीनें पाठविला आहे. तर पत्र पावतांच अगोदर अलीकडे यावयाची तजवीज करून आरवंदेस मुलेंमाणसें सुद्धां आल्याचें वर्तमान जलदी लिहावयास आज्ञा केली पाहिजे. सारांश. आपण सर्व मुलेंमाणसें सुद्धां आलीकडे यावें. याविसीं श्रीमंत माहाराजांची[1] आज्ञा आहे. आपण अलीकडे आलां ह्मणजे फिरंगी यास जरबीचें पत्र व वकिलास ताकीद करावयास येईल. परशराम भाऊ गोमांतकीं फौज घेऊन येणार असें असतां आह्मांस कसें लिहिलें नाहीं. ह्मणून वडिलीं लिहिलें. त्यास ही गोष्ट अद्यापि ठरली नाहीं. ठरल्यावर वडिलांस लिहिलें असतें. लग्नाचा प्रकार वडिलीं लिहिला आहे. तींच पत्रें सेवेसीं पाठविलीं आहेत. सोरगतीचा सिद्धांत ठरावून पत्रें लिहून पाठवावीं ह्मणजे येथून पत्रें सडे स्वारींत पाठवून देऊं. गुदस्तां कापड लग्नाकरितां पाठविलें तें पसंतीस आलें नाहीं. त्यास यंदां कापड पाठवावयाचें. त्यास तेथून वडिलीं कोणासही पाठवावा ह्मणजे त्याचे विचारें खरेदी करून घ्यावयास येईल. कदाचित् मर्जी नसली तर यादी करून पाठवावी. ह्मणजे त्याप्रमाणें घ्यावयास येईल. हें पत्र पोंचतांच वडिलीं अलीकडे यावें. केरीस कारकून दोघे ठेवावे. येविसीं श्रीमंतांची आज्ञा आहे. सहस्र पत्रांचे जागीं हें पत्र मानावें. फिरंगी यांचा जाबसाल आपल्या विचाराशिवाय होणार नाहीं. देवबाच्यानें काय होतें. सावंतांचा पक्ष आपणास आहे. हें फिरंगी यास माहीत आहे. येथून फौजेची वगैरे फिरंगीयास जरब पोंचेल. आण आपण कुटुंबासुद्धां केरींत राहाल. तेव्हां फजित पडावें लागेल. होडी आणून रात्रीचें मुलेंमाणसें व सरंजामसुद्धां आरवंदेस यावें. फिरंगीयास पुसून अलीकडे यावें. अशी तजवीज करून पुसावयास जाल तर अलीकडे उतरूं देणार नाहीं. या अर्थी बहूत सावधगिरीनें कोणास गोष्ट न दर्श होतां अलीकडे यावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी. आपण लिहिलेप्रमाणें महाराजांच्या कानावर घातलें. माहा

१. माधवराव महाराज ऊर्फ महादर्जी शिंदे.

राजांची आज्ञा जाहाली त्याप्रमाणें वडिलांस लिहिलें आहे. हे विज्ञापी. कृष्णा खिजमतगार यास आज शु १० गुरुवारीं दोनप्रहरीं मंगळवार सायंकाळ मयाख जावें. हा करार करून पाठविला आहे. त्यास जरकरितां हा वाइदेप्रमाणें मंगळवार सायंकाळ पावेतों जाऊन पोहोंचला तर यास इनाम रुपये २५ द्यावे. आण कोणत्या दिवसीं कसा पावला. हें लिहावयास आज्ञा करावी. हे विज्ञापी.

लें० नं. ९९ श्री. तारीख २८ मार्च १७९३.

अजम फ्रांसिस्क दे कुंञ्ज दे मेनेजीस गोवर्णदोर कपितान जनरल बाहादर गोवें दा मोहबतहू.

शाहामत अवाली मर्तबत व हशमत मजलत माहामत दस्त गाहायेत जात दोस्तान अजमानी माहादजी सिंदे सलाम फरहत अजमऐकी एथील खेरखुशी जाणोन आपली खेर अफियत हमेशा कलमी करीत जावी. दिगर राजश्री नरहर गणेश करकर यास राजश्री खेमसावंत भोसुले बाहादर सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय यांनीं तर्फ पेडणें येथील मौजे हरमल या बागायत सुद्धां व मौजे केरी येथील खेतबागायत इनाम करून दिल्हेप्रमाणें चालत असतां दरम्यान आपलेकडील अम्मल जाहलेवर दिकत लागली. ह्मणून ऐकण्यांत आलें. त्यावरून पेशजीं आपणांस लिहिलें होतें. त्यास येथील लिहिल्यावरून पूर्ववत चालतें केलेंच असेल. कदाचित् मशारनिल्हेचा गौरव द्वेषेंकरून कोणी समजाविल्यावरून अटकाव असल्यास ध्यानांत न आणितां सावंतानीं इनामें करून दिल्याप्रमाणें मौजे हरमल बागायतसुद्धां व मौजे केरी येथील खेत व बागायत आपणही याचेकडे चालतां करावें. याचा अगत्य करून वारंवार लिहिलें जातें. येविसीं फिरून लिहिणें नलगे तें करावें. रवाना चंद्र १५ साबान. ज्यादा काय लिहिणें हें किताबत. (शिक्का आहे)

लें० नं. १०० पे॥ छ० १७ सवाल मंगळवार श्रीगजानन. तारीख १ एप्रील १७९३.

ता० २८ मे १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बाळकें जिऊबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत चैत्र वद्य ५ मुकाम लष्कर नजीक भुसावर[1] प्रांत जेपूर जाणोन सुखरूप असों विशेष. आपणाकडील आशीर्वादपत्रें पुणेस चिरंजीवाकडेस येतात. तींच डांकेंतून आह्मांकडेस येतात. त्याजवरून वर्तमान कळत असतें. वडिलांचे शरीरीं आराम आहे. ह्मणून लिहिलें. त्यावरून बहूत संतोष जाहला. परंतु औषध घेऊन गुण येतो त्याच वैद्याकरवीं औषध घेऊन निर्दोष होई तें करावें. यंदां नवें घर बांधिलें व व्रतबंध व लग्नें केलीं पाहिजेत. त्याची खर्चाची तरतूद करून पाठवा. येविशीं लिहिलें. त्यावरून चिरंजीव राजश्री शिऊबास लिहिलें. त्याणीं चिरंजीव विश्रामाची रवानगी घरीं केली आहे. तेही जलदीच येऊन पोंचतील. व खर्चासही पाठविलें आहे. तें वडिलांकडेस पोंचेल. चिरंजीव बाळा व मुलेंमाणसें मथुरेहून लष्करांत आणलीं होतीं. तीं कोंकणांत रवाना करावीं ऐसी योजना. परंतु राज्यस्थितीचें सुद्धां मत नाहीं. देशीं महर्गता भारी. वाटेनें निभाव पडेना. याजमुळें दिवसगतीवर पडोन राहणें जाहलें. मग तीर्थस्वरूप मातोश्री मावशीबाईचें वर्षश्राद्ध चैत्र शुद्ध १३ श्रीमथुरेस क्षेत्रीं श्राद्ध करावयाकरितां येथून चिरंजीव जगंनाथ व बाळा व सौभाग्यवती

१. भुसावळ. हल्लीं जेथें आगगाडीचें स्टेशन आहे, तो प्रांत.

वरकडां व सौभाग्यवती उमा व रखमाबाई व चिरंजीव रामबा व काशीबा व निराबाई व बाया व कृष्णाई यांची रवानगी मथुरेस केली. तेथें राहातील. मात्र चिरंजीव जगोबा येथें येतील. वरकड मथुरेस राहातील. याचें कारण होळकरांसीं लढाईचा इरादा आहे. याजकरितां तेथें ठेविलीं. वडिलांनीं घरप्रवेश व चिरंजीव अंतोबाचा व्रतबंध माघ मासीं उरकोन घेणार. बाकीचीं प्रयोजनें पुढें करावयाची योजना. त्यास येथून खर्चाची सरबरा जाहाली. पे॥ व मुलें माणसें येथून तेथें येणार याजकरितां मार्गप्रतीक्षा करितां त्यास प्रयोजनें यंदां उरकोन घ्यावीं. खर्चास सत्वर पाठवून देऊं. येथील मुलेंमाणसें यंदां यावयाचीं नाहींत. पुढें दसरा करून येतील. परंतु यंदां लग्नें, व्रतबंध उरकोन घ्यावीं. दिवसगतीवर न ठेवावीं. चिरंजीव अंतोबास शरीरसंबंध मूळ राजश्री गोपाळ दळवी आरवलीकर याची नात घ्यावी. ह्मणोन त्याचें पत्र राजश्री बळवंतराव दळवी यासी आलें. येथून आह्मीं वडिलांस लिहावें ह्मणजे शरीरसंबंध होईल. त्यास पूर्वींच वडिलांनीं चिरंजीव राजश्री यसवा आरवंदेकर याची मूल नमस्त केली ह्मणोन चिरंजीव साबाजीनें व मुलांनें लिहिलें तेव्हां गोपाळ दळवी याच्या चित्तांत व आमच्याही चित्तांत होतें. परंतु त्यासी करार जाहला तेव्हां मग काय लिहावें. (   )

लें० नं. १०१ श्री. तारीख १३ एप्रील १७९३.

रोखा गांवकरान मौजे तळगांव तर्फ वराड. सुरुसन अर्बा तिसेन मयां अल्फ. राजश्री नारायण जिवाजी केरकर यानीं हुजूर विनंती केलीजे. आपण पुरातन पदरचे आपणास गांव इनाम करून द्यावा. ह्मणून त्यावरून मनास आणून ते संस्थानाविषयीं राजश्री सिंदे यांच्या तर्फेनें सरकारी काजकाम निष्ठेनें करून उपयोगी पडले. व पुढेंही पडतील. असें चित्तीं आणून त्यावर कृपाळू होऊन मौजे मजकूर हा गांव सालाबाद श्रीदेव व हक्कदार गडकरी व खतेली व दारानशी खेरीज करून वरकड कुलबाब कुलकानू देखील सरकारवंत तंबाकूची गादी पेस्तर सालापासून इनाम करून दिला असे. यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस साल दरसाल भोगूं देणें. ताजे सनदीचा उजूर न धरणें. सनदीची तालीक लिहून घेऊन असल सनद त्याजकडेस भोगवटेस असूं देणें. सदर्हू गांव जलस्थळ, काष्टपाषाण, निधीनिक्षेप आदीकरून दिला असे. सालदरसाल चालूं देणें. जाणिजे. रवाना छ० १ माहे रमजान.

लें० नं. १०२ पे॥ छ० २२ जिल्काद श्री. तारीख २५ जून १७९३.

जेष्ट शु॥ मंगळवार ता० २ जुलई १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत जेष्ठ वद्य १ पदा मुक्काम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. आलीकडे सांभाळ पत्रें येऊन होत नाहीं. तेणेंकरून चिंता वाटती. तसें न करितां येणाराबरोबर आशीर्वादपत्रें पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर तीर्थस्वरूप राजश्री मामाबरोबर सर्वांची रवानगी करून दिली. ते इतिरोज येऊन पोंचतीलच. लग्नाची योजना कसी काय केली हें

१. होळकरांबरोबर लढाई करण्याचा नेत महादजींचे मनोदयानुरूपच झाला होता व हें प्रकरण पूर्वीपासून चालत होतें, असें वरील मजकुरावरून दिसतें.

कळलें नाहीं. इकडून मुद्दाम कासीद पाठविला होता तो आला. त्याजबरोबर वडिलांचें पत्र नाहीं. यामुळें चिंता झाली आहे. सविस्तर लिहावयास आज्ञा केली पाहिजे. वरकड अधिकोत्तर लिहावें असें नाहीं. चिरंजीव राजश्री विश्राम यंदां घरीं येणार होता. त्यास यंदां जावदेचे मामलतीवर वराता सरकारांतून जाहाल्या आहेत. त्याची तोडजोड चिरंजिवाशिवाय लागणार नाहीं. याजकरितां पर्जन्याचे चार महिने राहाणें झालें. दसरा दिपवाळी जाहलेवर घरीं यावयास येईल. तीर्थस्वरूप राजश्री नाना अजमेरीस सर्व सुखरूप आहेत. आपलेकडील सड्या फौजा घेऊन तीर्थरूप राजश्री दादा तिकडेस सुखरूप आहेत. वैशाख वैद्य १२ शीस होळकराची व आपले फौजेची लढाई जाहाली. होळकर याणीं सिकस्त खाऊन मोड होऊन माघारे आले. होळकरांकडील कांहीं तोफा व घोडीं, उंटें अशी लूट आपले फौजेंत आली. तूर्त होळकर काळिसिंध उतरून खेचीवाडेच्या रोखे आहेत. आपल्या फौजा दादासुद्धां कोटेहून साहा कोसांवर आहेत. होळकरांचा पाठलाग करावा असें आहे. पुढें कसें होतें पाहावें. वडिलांबरोबर तीर्थस्वरूप राजश्री बापूही सुखरूप आहेत. तीर्थस्वरूप राजश्री भाऊ व मातोश्री सौभाग्यवती बाया सर्व मुलें अशीं मथुरेस सुखरूप आहेत. येथून घोडीं, तट्टें, माणसें, पालख्या वगैरे सरंजाम गेला आहे. तो तेथें पोंचतांच जलदी रवाना करून द्यावें. जरकरितां राजश्री लखबा चार रोज राहिला; तर एखादा तट्टू व एकदोन माणसें ठेवून बाकी खटक सर्वच माघारें रवाना करण्यास आज्ञा केली पाहिजे. अलीकडे पत्र येत नाहीं. हें काय? मोठें चिंतेंत .ाहों. तरी सविस्तर लिहावया आज्ञा केली पाहिजे. लग्नें कोणत्या मुहूर्तास ठरलीं, सोरगती कोणकोणत्या केल्या, हें सविस्तर लिहिलें पाहिजे. ह्मणजे सडे[2] स्वारींत लिहून पाठवूं. खर्चाची तजवीज करून मागून पाठवितां. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

लें० नं. १०३ पे॥ छ० २२ मोहरम सुरुसन श्री. तारीख १३ आगष्ट १७९३.
आर्बा तिसेन मयां व आलफ.
तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० ५ मोहरम मुकाम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास आबाजी वगैरे माणसें आलीं त्यांबरोबर छ० ( ) जिल्हेजचीं पत्रें आलीं तीं पावोन संतोष जाहला. ऐसेंच सर्वदां आशीर्वादपत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतर लग्नें उरकोन घेतलेयाचें लिहिलें कळलें. सणगांचा तोटा आला. त्यास आणखी शेलेपागोटीं जोड्या २५ व धोत्र जोडा २५ ऐसें पाठवून देणेविसीं लिहिलें. त्यास येथें सणगीं सोईवार मिळत नाहीं. त्यास सणगीं कोणकोणते किंमतीचीं ( ) तीं लिहावयास आज्ञा करावी. ( ) णपुराहून व धोत्रजोडे महेश्वराहून आणवून द्यावयास येतील. आपण दाहा हजारांची हुंडी केली. ती सही करून मुदतीप्रमाणें ऐवज साहुकारास पटवून हुंडी भरपाई करून घेतली. सडे स्वारींतील वर्तमान. तर आपलेकडील सडे फौजेंची व होळकरांची लढाई होऊन होळकरांनीं सिकस्त खाऊन इंदुरास गेले. तीर्थरूप राजश्री दादा व आपल्या फौजा उज्जनीनजीक आहेत. आपलेकडील मंडळी सर्व सुखरूप आहे. राजे बिजेसिंग

१. तारीख ५ जून सन १७९३. २. जिवबादादांस.

मारवाडी मृत्यू पावले. यास्तव तिकडील बंदोबस्तास तीर्थरूप राजश्री दादांस फौज पलटणें घेऊन मारवाडास जावयाविसीं सरकारचीं आज्ञापत्रें गेलीं आहेत. अद्यापी कूच होऊन गेले नाहींत. परंतु जाणें घडेलसें दिसतें. राजश्री गोपाळराव भाऊ आणि कांहीं फौज व पल्टणें घेऊन इंदुराचे रोखें होळकर यांजवर शह देऊन राहावें. आणि तीर्थरूपानीं मारवाडांत जावें. ऐसीं सरकाराचीं पत्रें गेलीं आहेतें. पुढें कसकसें होतें पाहावें. तीर्थस्वरूप राजश्री अंतोबा भाऊ कवठणकर वगैरे सर्व मंडळी सुखरूप आहेत. अंतोबा भाऊचीं पत्रें आलीं. तींच बजिनस सेवेसीं पाठविलीं आहेत. पावतील. अजमेरीस तीर्थस्वरूप राजश्री नाना व जावदेस चिरंजीव राजश्री विश्रामजी सर्व मंडळीसह सुखरूप आहेत. तीर्थस्वरूप राजश्री बापू दादांबरोबर सुखरूप आहेत. तीर्थस्वरूप राजश्री भाऊ वगैरे' सौभाग्यवती मातोश्री ताई वगैरे श्रीमथुरेस होतीं. त्यांस आणावयाकरितां सडे स्वारींतून पत्रें स्वार गेलीं होतीं. तीं कोटेस आलीं ह्मणून एकंदरींतून लिहून आलें होतें. इति रोज सडे स्वारींत दाखल जाहलेच असतील. श्रीमंत राजश्री राजेबाहादर यांच्या मुलखाच्या उटंत्र्याविसीं बहूत खातरजमेनें वडिलांनीं लिहिलेप्रमाणें येतील. प्रसंग संपादून उटंत्र्या राजश्री कृष्णाजीपंत यांजकडे देऊन मशारनिलेस रवाना केले आहेत. (   ) न तासगांवीं राजश्री परशरामपंत यांस भेटून वाडीस येतील. त्याप्रों ठाणीं-ही हस्तगत होतील. पुढें दरबारखर्चाच्या ऐवजाची तोडजोड काय करितात हें पाहावें. वडिलांचे आज्ञेवरून या जाबसालास सावकारास मध्यस्त उभा करून जाबसाल केला आहे. पेशजीं राजश्री लखबा व विश्राम पाल्येकर यांजबरोबर कापड पाठविलें होतें. त्याची आंकपटी हाल्लीं सेवेसीं पाठविली आहे. त्यावरून सर्व कळों येईल. विश्रामाबरोबर कापडाची आंकपटी त्याजबरोबर पाठ-विली होती. व विश्रामानें समक्ष आपले कापड घेतलें होतें. आणि तेथें जाऊन आपणास ठाऊक नाहीं. असें बोलणें बोलला. तो श्रीमंत आहे. लग्नें जहालीं उत्तम जहालें. आपले शरीरीं स्वस्थ नाहीं ऐसें ऐकिलेवरून बहुत चिंता आहे. निस्तुक आराम जहालें नाहीं ( ) सविस्तर लिहा-वयाची आज्ञा करावी. मुजरद बच्यास पाठविला आहे. दसरा होतांच चिरंजीव राजेश्री विश्राम घरीं येतील. महर्गतेमुळें सरकारांत ओढ. पुणेंतील महागाई रसदेशिवाय अजमेरीवर व जावदेवर वराता जहाल्या आहेत. चौंकडून ओढ बहूत आहे. ईश्वर अब्रू राखील तें खरें. रुपयेची ओढ लिहितां पुरवत नाहीं. कळावें हे विज्ञापी.

लें० नं. १०४ पे॥छ० २४ जमादिलावल सन आर्बा तिसे श्री. तारीख १२ नवंबर १७९३ मंगळवार. तारीख २८ दिजंबर सन १७९३ शनवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें जगंनाथानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० ७ रबिलाखर कार्तिक शुद्ध ९ मुकाम लष्कर नजीक शाहापुरा प्रांत मेवाड जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष. वडिलांकडून बहूत दिवस आशीर्वादपत्र येऊन कांहींच वर्तमान (   ) मित्य राजश्री बिजेसिंग राजा मारवाडचा कैलासवासी झाला. त्याचा

१. त्या वेळीं महादजी पुण्यास होते आणि तेथून त्यांचीं पत्रें गेलीं होतीं. २. होळकरांबरोबर लढाई करण्यास महादजींचें मत नव्हतें, असें जें कित्येक इंग्रजी ग्रंथकार ह्मणतात तें ह्यावरून खोटें ठरतें.

पुतण्या व नातू या उभयतांमध्यें कज्जा लागून आज तागायत दोनचार लढाया झाल्या. उभयतांकडील रजपूत दोनचार हजार ( ) मास आले. यास्तव वडिलांस आज्ञा जलदी तेथें जाऊन त्यांचा बंदोबस्त करून द्यावा. तूर्त शाहापूरवाला याजकडे मालक ( ) त आहे. यास्तव येथें आठपंधरा ( ) तिल वडिलांस कळावें. दुसरें तीर्थस्वरूप राजश्री नाना अजमेरीस मुलें माणसें सुद्धां सुखरूप आहेत. चिरंजीव राजश्री यशवंतराव यास येथें आणून चार रोज जाहाले. चिरंजीव राजश्री विश्राम जावदेस सुखरूप आहे. त्यासही आह्मी येतेवेळेस बरोबर घेऊन येतों. चिरंजीव सौभाग्यवती रुक्मीणबाई पोटशी आहे. तीस आठ महिने जाहले. तिला अजमेरीस कालच रवाना करून दिली. तिजला व चिरंजीव राजश्री विश्राम व सर्व मुलेंमाणसें घेऊन माघ मासीं येथून निघून यावयास येऊं. वरकड वडिलांनीं लिहिलें आहे. त्यावरून कळों येईल. वडिलांनीं आशीर्वादपत्र पाठवून वर्तमान कळवीत असावें. वरकड सर्व इष्टमित्र सुखरूप आहेत. राजश्री अंतोबा कवठणकर सुखरूप आहेत. काका येथून पुष्करास गेले आहेत. एकदोन रोजीं येतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

चिरंजीव राजश्री साबाजी यास आशीर्वाद उपरी. इकडील वर्तमान वडिलांस लिहिलें आहे. त्यावरून विदीत होईल. आह्मी सर्व सुखरूप आहों. तुह्मांकडील वरचेवर बरवेपणाचें वर्तमान लिहीत असावें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. १०५ पे॥छ० २२ रबिलाखर. श्री. तारीख १८ नवंबर १७९३.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत कार्तिक वद्य १ मुकाम नजीक पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. अलीकडे आशीरवादपत्र येऊन सांभाळ जाहला नाहीं. तर असें न करितां येणाराबरोबर आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर श्रीमंत राजश्री राजेबाहादरप्रकर्णीं मजकूर तर किल्ले-प्रांताच्या सोडचिठ्या करविराहून येथें आल्या. तेव्हां दरबारखर्चाचा गुत्ता पडला. त्यास वडिलीं एकदोन वेळां अगत्य वादें दरबारखर्चाच्या ऐवजाची तोडजोड करून सोडचिठ्या जलदीनें वाडीस रवाना कराव्या. ह्मणोन. लिहिलेवरून दरबारखर्चाच्या ऐवजास सावकार उभा करून सदरहू सोडचिठ्या राजश्री कृष्णाजीपंत वकील यांजकडे देऊन तासगांवीं राजश्री परशरामपंत भाऊ यांस पुणेचीं व आपले दरबारचीं पत्रें करवीरकरांस जरब पोहोंचवून सोडचिठ्याप्रमाणें किल्ले व प्रांत खालीं करून देवणें ह्मणोन घेऊन पाठविलीं. त्यावरून भाऊनीं फौज जमा करून करवीरकरांवर शह दिला. तेव्हां त्याजकडील जरब पाहून करवीरकरांकडील राजश्री आपाजी भगवंत वकील येथें आले. श्रीमंत माहाराजांसीं बोलणें लावलें. तेव्हां माहाराजांनीं गोष्ट अमान्य करून रागें भरले. तेव्हां मशारनिल्हे आपाजीपंत राजश्री नारायणराव घेरवाडे यांचे विद्यमानें आह्मांसी भेटले. आणि राजेबाहादरांकडील किल्ले प्रांत आह्मीच परभारें सोडून देतों; परशरामभाऊ याजकडील उपसर्ग करवीर संस्थानास नसावा असीं कितीएक प्रकारें बोलणीं जाहालीं. आणि वडिलांचींही पत्रें वेळोवेळ एतद्विषयीं येऊं लागलेवरून हा मजकूर सविस्तर श्रीमंत माहाराजांस समजाऊन करवीरकर परभारेंच किल्ले व प्रांत सोडून देत असल्यास घ्यावे. ह्मणोन परवानगी घेऊन आपाजी भगवंत याजबरोबर येथून पत्रें देऊन वाडीस रवाना केलें. त्याप्रमाणें नरसीगड किल्ला

कार्तिक शुद्ध २ येस हस्तगत जाहला ह्मणोन वाडीहून पत्रें आलीं. बाकीचेही किल्ले व प्रांत कराराप्रमाणें हस्तगत होतीलच. कांहीं चिंता नाहीं. तसेंच सिंदगडच्या जाबसाल तर. किल्लेच्या खर्चाचे बेवीस हजार रुपये सावकाराकडून नक्की राजश्री गंगाधर गोविंद यास देऊन सिंदगडीची सोडचिठी घेऊन गोविंद दादाजी यांस पाठविले आहेत. त्याप्रमाणें किल्ला त्याचे स्वाधीन करून येतील. त्यास किल्ले प्रांत हस्तगत होतील. तेव्हां दरबारखर्चाबाबदच्या ऐवजास नेट लागेल. व सिंदगडबाबदच्या बावीस हजारांचा एक महिनेचा करार केला आहे. तेव्हां याची सरबरा कसकसी करितात हें कळेना. वडिलांचे पुण्येंकरून संस्थानचा जाबसाल होऊन आला. वडिलांचे आज्ञेवरून दरबारखर्चाच्या ऐवजास व सिंदगडच्या जाबसालास साहूकाराकडे सगळा गुतवोन येथवर जाबसाल जाहला. त्याप्रमाणें येथें येविसीची निकट असोन येथील कराराप्रमाणें ऐवज साहुकाराचा साहुकारास पोहोंचता करवावा. पुढेंही आणखी कितीएक काजाकामाचे बंदोबस्त होऊन आले पाहिजेत. याकरितां मागील गुत्ता जलदीनें उरके तें केलें पाहिजे. तीर्थरूप राजश्री दादा[1] फौजसुद्धां मारवाडांत रवाना जाहले. ते अजमेरी आसपास ती॥ राजश्री बापू[3] व भाऊ[4] सर्व मुलें माणसें बरोबरच सर्व सुखरूप आहेत. हमेशा पत्रें येतात. चिरंजीव राजश्री विश्रामजीही जावेदस सुखरूप आहेत. ती॥ राजश्री नाना अजमेरीस सर्व सुखरूप आहेत. दादा व नाना एक जागां जाहलेवर मुलें माणसें देशीं घरीं रवाना करावीं; ही योजना आहे. ह्मणोन लिहिलें होतें. पुढें ठरेल तें पाहावें. चिरंजीव विश्रामही यंदां घरीं येईल. सावंतांचा विचार एवढें कामकाज जाहालें. याजमुळें कांहीं इनाम करून आह्मांस द्यावें असें परभारें ऐकितों. तरी इनाम काय करून घ्यावें याची आज्ञा करावी. त्यासारखें बोलणें आणून जाबसाल करून वडिलांपासीं देतील. येथें कित्येकांचें ह्मणणें जे. सातडें करून घ्यावें. वडिलांचे मर्जीनिरूप जी आज्ञा करणें ती करावी. त्यासारखा जाबसाल करावयास येईल. वरकड घरू कामें सावंतांकडे कांहीं असतील तीं या समयास उरकोन घ्यावीं. येथोन गोविंद दाजी सिंदगडची सोडचिठी देऊन रवाना केले आहेत. ते वाडीस गेलेवर वडिलांस लिहून पाठवितील. मग घरू कांहीं कामें असतील तीं यास लिहून पाठवून सरकारांत विनंती करून उरकोन घेतील. हें न जाहलें तर. राजश्री सांतबा आपास वडिलीं लिहून पाठवून काजकामें आपलीं सोंपवून घ्यावीं. सावकाराचे रुपये कर्ज काढून या जाबसालांत आलों. याजकरितां वडिलीं वाडीं लिहून सावकाराचे रुपये सावकारास पोहोंचवून गळा मुक्त होई तें केलें पाहिजे. पत्र बहूत दिवस आलें नाहीं. त्याजमुळें चिंतेंत आहों. तरी शरीरीं आतां कसें आहे, हें लिहिलें पाहिजे. ब्राह्मण नेहमीं अर्घ्यप्रदानास लावावे[5]. बहूत दिवस पत्र नाहीं यामुळें चिंता आहे. सावंत[6] आपले स्वाधीन किल्ले करतील तर न स्वाधीन करून घ्यावे. कदाचित् घ्यावयाची मर्जी असली तर येथें लिहून पाठवावें. किल्ले स्वाधीन करावे असें त्यांचें मानस आहे. त्यावरून वडिलांस लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी. कृष्णा खिजमतगार पत्रें देऊन सेवेसीं पाठविला आहे. तरी उत्तरें देऊन सत्वर रवाना करावयास आज्ञा करावी. हे विज्ञापी.

---

१. तारीख ५ नवंबर सन १७९३. २. जिवबादादा. ३. जगोबा बापू. ४. यशवंतराव भाऊ. ५. नारायणरावांची देवाधर्मावर फार श्रद्धा होती असें यावरून दिसतें. ६. सावंतवाडी सरकार राजे खेमसावंत.

लें० नं. १०६ श्री. तारीख ५ डिसेंबर १७९२.

श्रीमंत राजश्री बाबू स्वामीचे सेवेसीं.

सेवक गोविंद दादाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत मार्गशीर्ष शुद्ध २ गुरुवार मुकाम वाडी यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. सिंदगडची सोडचिठी घेऊन मी काल बुधवारीं संध्याकाळीं येथें आलों. रात्रीस श्रीमंत राजे बाहादूर यांची भेट जाहाली. आज भोजनोत्तर विजयदुर्गास जाऊन तेथील सुभ्याकडील एक दोघे भले माणूस बरोबर घेऊन येऊन किल्ला जंजिऱ्यासु॥ खालीं करून घेऊन श्रीमंतांचें निशाण चढवून द्यावें. आणि साल मजकूरचा वसूल त्याणीं घेतला असेल. त्याची रुजवात करून मागती येथें यावें. सिंदगडचे सोडचिठीस दरबार खर्च सु॥ बावीस हजार रुपये श्रीमंत राजश्री रावजीनीं[2] व बाजिबा दादानीं सावकारी कर्ज करून घरघराऊ दिले. येविसीं आपली आज्ञा त्यांस होती. त्याप्रमाणें केला कारभार सिद्धीस नेला. या ऐवजाची तोडजोड करून द्यावी. ह्मणोन मी कारभारी यांसी व येथील उभयतां श्रीमंतासी बोललों. त्याणीं उत्तर केलें कीं, किल्ल्यावर निशाण चढवून यावें. ह्मणजे ऐवजाची तोडजोड करून देऊं. मला येते समयीं रावजीनीं आज्ञा केली कीं, आपल्यास पत्र लिहून आपणास आज्ञा करतील त्याप्रमाणें वर्तणूक करावी. यास्तव विनंती लिहिली आहे. तर पेस्तर किल्ला खालीं करून आल्यावर ऐवजाकरितां निकट करावी. किंवा त्याचे मर्जीनुरूप होईल तसें पाहावें. येविसींची आज्ञा कशी ती करावी. त्याप्रमाणें वर्तणूक करूं. येथील कामकाज उरकल्यानंतर मी सेवेसीं येईन. वरकड मजकूर पेशजीं जासुदाबरोबर सविस्तर पुण्याहून लिहिलाच होता. अधिकोत्तर नाहीं. सडे स्वारीचीं पत्रें हमेशा येतात. जावद अजमेरचेही हालकारे येतात. समस्त मंडळी सुखरूप आहेत. बहुत काय लिहिणें लोभ करा वडील समर्थ आहेत हे विज्ञापना.

श्रीमंत राजश्री काकासाहेब स्वामीस साष्टांग नमस्कार व तथा राजश्री सगुणबा मामा स्वामीस साष्टांग नमस्कार विज्ञापना. लिहिलेलें परिसोन लोभ कीजे हे विनंती.

राजश्री विश्रामबावा स्वामीस साष्टांग नमस्कार भेटीनंतर परस्पर कळेल. हे विनंती.

लें० नं. १०७ श्री. सन १७९२.

राजश्री गोविंदशेट घोटगे गोसावी यांस.

सेवक नरहर गणेश केरकर. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. राम गोंदजी ह्याकडे आपण रुपये दिल्याचा तपशील. १०० छ० बांदेस. १५० सातर्डेस दिले. रघबाकडेस. २५० एकूण अडीचसें रुपये आह्मांस पावले. हाल्लीं राम गोंदजीजवळ रुपये १०० शंभर अगत्य दिले पाहिजेत. आमचा जासूद आला. चिरंजीव व सर्व मंडळी सुखरूप आहेत. चिरंजीव बाळा व सर्व माणसें गेलीं. तीं चिरंजीव शिवबा आहेत तेथें पावलीं. ह्मणोन राजश्री देवबा गवळी यानें कागद लिहून पाठविले. चिरंजीवानें

१. आनंदराव धुळप यांजकडील. हे धुळप शिवाजी महाराजांनीं मारविलेले चंद्रराव मोरे यांचे वंशज होत. २. जिवबादादांचे चिरंजीव नारायणराव बक्षी यांस रावजी ह्मणत. ३. जिवबादादांचीं.

लिहिलें कीं आठ चौं रोजीं लढाई होईल. तीन कोसांचे तफावतीनें दोन्ही फौजा आहेत. हे विनंती. राजश्री बाबा यास रुपये २० देणें. अगत्य दिले पाहिजेंत हे विनंती.

लें० नं. १०८ श्री. सन १७९२.

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपर येथील कुशल आज श्रावण शुद्ध ८ मी बुधवार जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. राजश्री बाजीबा ह्माजन याचा काशीद आला. त्याबरोबर चिरंजीव राजेश्री वासबा यार्णी आह्मास कागद छ० ९ सवालचा पाठविला. त्यांत लिहिलें जे. राजश्री जिवबादादा व फौज इस्माल बेगावर गेली होती. त्यास लढाई थोर जाहाली. त्यास डाकीचें वर्तमान आजच आलें होतें. इस्माल बेग याची फौज लुटून घेतली. इस्माल बेग भांडेचे गोळेनें ठार जाहला. आपली सर्व मंडळी सुखरूप आहेत. ह्मुजास आले माणूस ठार जाहले. त्याचें वर्तमान कळलें नाहीं. राजेश्री जिवबादादा वगैरे मंडळी सुखरूप आहेत. ऐसें लिहून आलें आहे. आपणास विदीत व्हावें. यास्तव लिहिलें आहे. मुखजबानी जासूद सांगेल. यास्तव रवाना केला आहे. तुमचे कागद नाहीं. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. १०९ सन १७९२.

( ) कुशळ लिहीत असिलें पाहिजे. विशेष. छ० १७ रबिलावलचें पत्र पाठविलें तें पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. असेंच निरंतर पत्र पाठवून संतो ( ) सि सत्य रदबदल्या करून घेऊन पाठविले. परंतु सावतांचा काय दैवयोग तो जाबसाल उलगडतच नाहीं वरकड दादा सावतांच्या कामासारिखी कस्त मेहनत कोणत्याही कामाची केली नाहीं. परंतु असें आ-( ) नाहीं. सावतांचा मुलूख व प्रांत गेलेला सोडवून द्यावा. पुढें मोर्चलाविसीं-( ) तकादा (फाटलें.)

लें० नं. ११० पुरवणी. सन १७९३.

राजश्री बाबू स्वामीचे सेवेसीं.

पाहिजेत. आपणास माहाल सुटणेविसीं काळजी त्यापेक्षां आह्मांस निजध्यास आहे. पैरवींत अंतर होत नाहीं. पेशजी मथुरेचे मुकामींहून राजश्री दादानीं सरकारांत विनंती करोन सवांस चाकरी केल्याचें यश जाणून महदभीड आपल्या लोकांनीं दरबारी खर्च करोन दोन मोरछलें व मरातब येणेंप्रमाणें पृथ्वीपतीकडोन घेऊन रवाना केलीं. त्याच्यापुढें येथें पुणेस घोर होऊन काय संकट पडलें. निदानी श्रीमंत पुणेचे मुकामीं आल्यावर मोठे भिडेमुळें सनदा पत्रा जाहल्या. हालीं खासे असामीस एकएक मोरछल लिहिलें त्यास ( ) याशिवाय येथें कोणाचे नांवें पाठवावी. श्रीमंतांस अर्ज केल्यावर ठीक असें दिसेल. या अर्थी तेथून भिडेचा मनुष्य आलेवर त्याचे नांवें

१. इस्मायल बेगाबरोबर. २. रामजी पाटील जाधव हे पुण्यास पेशव्यांकडे शिंद्यांचे वकील होते. त्यांचें हें जिवबादादांस गेलेलें पत्र आहे. वाडी सरकारचे या कामांत पुण्यांतील दरबारी लोक गोंधळ घालीत. त्यामुळें या कामास वेळ लागे. याबद्दलचीं निराळीं पत्रें आहेत तीं पाहावीं. ३. हिंदुस्थानाधिपति दिल्लीचा बादशहा. हिंदुस्थान हें सर्व पृथ्वी आहे, असें पूर्वी हिंदु लोक मानीत. ४. मोरचलाचा मोठा मान वाडीसरकारास मिळतो ह्मणून पुण्यास नाना फडणीस यांस वाईट वाटलें. तेव्हां त्यांचें समाधान व्हावें ह्मणून पेशव्यांसाठीं मोरचलें लिहून आणविलीं होतीं.

विनंती करून मग यांतील अर्थ समजेल. बहुमान व हत्ती व जव्हार व वस्त्रें हेंही वाडीहून भिडेचा मनुष्य आल्यावर अर्ज समक्ष करूं घडेल. तसें तो लिहील. करवीरचाही तह करणें तर जलदी त्यास पाठवून देणें. किल्ले सिंदगड प्रकर्णीं बावीस हजार रुपये राम नारायण शालिग्राम-( ) हुंडी घेतले मितीपासोन हिशेब करून जलदी पाठवावे. त्याची निकट आह्मांस बहूत आहे. त्याचेंही ह्मणणें किल्ला हस्तगत झाला. अजून ऐवज येत नाहीं. त्यास आज उद्यां येईल ह्या दमावर टाळाटाळ करितों. निदानी सराफजी कडीस आल्यास दुसरेकडून आणखी व्याजमजोती पडोन मोबदला करावे. त्यांत रुपये देऊन पतीस अंतर दिसतें. यास्तव जलदी व्याजमजोतीसुद्धां ऐवज पाठवून द्यावा. वरकड सविस्तर राजश्री रावजींनीं लिहिलें आहे. त्यावरून कळेल. बहूत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

लें० नं. १११ श्री. सन १७९३.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नरोबा बापू केरकर स्वामीचे सेवेसीं.

सेवक सांतो राम साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ आज गुरुवार संध्याकाळ चार प्रहर पावेतों जाणोन स्वकीय स्वानंद लेखनाज्ञा करीत असावें. यानंतर राजश्री नारायणराव यांचीं पत्रें आलीं तीं पाठविलीं. तीं पाहून परम संतोष जाहाला. सिंदगडची जाबसाल होऊन सोडचिठी आली ती पाठविली. ऐसें लिहिलें. उत्तम जाहलें. बाबू तुह्मीं बहूत दौलत मिळविली. परंतु या संस्थानाविषयीं श्रीराज्याच्या देवानें कृपाळु होऊन यश दिलें. ज्ञातीवर बहूत उपकार जाहला. रुपयेविसीं चिंता नाहीं. संस्थानांतील प्रयत्न करीत आहों. हरप्रकारें निभावणी होईल. सरकारांत पत्रें दाखल केलीं. आपले काजकामाचा आशय काय योजना ती कळावी. ओडद असल्यास भेटीस येऊं. उत्तर लिहावें. बहूत काय लिहिणें. पत्रेंही पाठविलीं आहेत. हे विनंती.

लें० नं. ११२ श्री. सन १७९३.

चिरंजीव साबाजीस आशीर्वाद उपर. कागद पाठविला पावला. पलीकडे बातमी कळती त्याविसीं तारीचा मजकूर लिहिला. त्यांत कारण काय बातमी लिहितोस ती खरी होत नाहीं. तुज येऊन काय कोण सांगतो ते सांगणेवरून लिहून हलका व्हावें यांत कारण काय ? एक तरी बातमी खरी अशी नाहीं. आह्मी अलीकडेस आहों. कोण जाणार असला तर त्यास न जाणें ह्मणून आमचा आग्रह नाहीं. आला तर तो जाईल. चिरंजीव नारबाचे कागद आले. मजकूर ह्मणाल तर फिरंगी याचे वकिलास हुजूर नेऊन जरब लाविली. त्याणें पत्रें लिहून गोव्यास पाठविलीं आहेत. एका महिन्यानें आणून द्यावयाचें कबूल केलें आहे जे. त्यास सरकारांतून खुद्द राजश्री शिंदे याणीं सागितलें. राजे बाहादर यांचा प्रांत सोडून देणें. आणी राजश्री नरहिर गणेश याचे काडीनकाडी कांहीं पलीकडेस राहिलें तें द्यावें. आणि आह्मांस लिहिले रखवालीस कारकून माणूस पाठवून दिलेवर चिंता नाहीं. अशीं पत्रें लिहिलीं आहेत. तीं उद्यां तुजकडे पाठवून देऊं. आणि निरोप राजश्री हवालदार याचा घेऊन तुज येणेविसींचीही पाठवूं. हे आशीर्वाद.

---

१. हे सांतो राम आकेरकर सबनीस होत. २. सारस्वत गौड ब्राह्मण हे सावंतवाडी संस्थान आपलें असें मानीत, असें दिसतें. या वेळीं हें संस्थान कोल्हापुरकरांकडून जिवबादादांनीं सोडवून दिलें होतें. ३. जिवबादादांचे वडील बंधु नरोबा दादा ऊर्फ बाबू यांचे.

लें० नं. ११३ श्रीगजानन. सन १७९३.

चिरंजीव मुलास आशीर्वाद उपरी. फौजेच्या ( ) र होळकरांचे लढाईंत थोक केले होते. त्याप्रमाणें चालत होते. त्यापैकीं निमे भाऊबरोबर व निमे आह्मांबरोबर. त्याची यादी लिहून पाठ ( ) ही सरकारांत ( ) त वगैरे दरकदार मागां राहिले. त्यांजकडे ( ) आहेत. ते आले नंतर पाठवावयास येईल. घरचें वर्तमान तरी सर्व मंडळी येथें सुखरूप आहे. चिरंजीव निराबाई वरकडांस कोंकणांत रवाना करावयाचीं आहेत. परंतु चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाई कोंकणांत येणार आहे. याजकरितां चिरंजीव शिऊबाचें पत्र आलें. तीं व हीं येक जागां बगून येणार. त्यास चिरंजीव भाऊ येथें भेटीस आला तो चिरंजीवास भेटल्याशिवाय परभारें कसा जाईल. याकरीतां आजमेरीस लिहून पाठविलें. त्याणीं तिकडे पाठवा ह्मटलें तर अवघींच तेथें पाठवूं. तीं व हीं एक ( ) चिरंजीव विश्रामास बरोबर ( ) जोतपुरीं सदाशीवपंत वकील आहे. त्याणीं पत्र पाठविलें तेंच बजिन्नस तुह्मांपासीं पाठविलें आहे. चिरंजीव बाळकृष्ण आरवदेकर व त्याचे मुलानें ( ) पत्र तुह्मांस लिहिलें तें पाठविलें आहे. डभईचा वकील परभारें जोतपुरास गेला आहे ह्मणून वकिलांचें पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे. हे आशीर्वाद.

लें० नं. ११४ श्री. तारीख १० जानेवारी १७९४.

चिरंजीव राजश्री जिवबा[1] याप्रती नरहर गणेश अनेक आशीर्वाद उपर. येथील कुशल तागायत छ० ७ जमादिलाखर मुकाम वाड सुखरूप जाणोन. तुह्मांकडील सविस्तर लिहीत असावें. यानंतर आह्मांकडील मजकूर तर श्रीमंत राजश्री राजे बहादर यांचा मुलूख व किल्ले तुमच्याच प्रयत्नेंकरून सुटेले. या कामास पुणेस चिरंजीव नारबा व बाजीबा महाजन याणीं सावकारी निशा रुपयेचा करून मुलूख व किल्ले सुटे[2] ऐसें करून यश घेतलें. तेव्हां पेडणें प्रांताची घालमेल पडणार तेव्हां फार करून करितों हें आह्मीं असा दिगांतीं लौकीक आण पेडणें प्रांतींचे देसक नाडकर्णी[3] आह्मांसी सुख नाहीं. प्रसंगीं एकाचें एक सांगून फिरंगी दरबार. तेव्हां माणसेंसुद्धां त्यांचे हातीं पडावें लागेल. अशी खत्रा मात्र चिरंजीव नारबास पुणेंत कळविली होती. त्याच बरोबर त्यास हुजूर धन्याकडेस सांगून निरोप घेतला. आण माणसें अलीकडेस काढा. अशीं पत्रें चिरंजीव सगुणबास व आह्मांस चिरंजीवाचीं व राजश्री महाजन याचीं आलीं जे. पलीकडेस राहणेंचें काम नाहीं. आलीकडेस यावें. असें निकटीनें लिहिलेवरून आह्मी माणसें घेऊन आलीकडेस आलों. त्याबरोबर आमचे आप्तवर्ग अवघे त्याचप्रमाणें चाकर व भागेली व रयत कुळी आलीकडेस आली. आलीकडेस आणावयास वाडीहून लोक गेले होते. एक रोज तेथें राहिले. दुसरे दिवस आज्ञेप्रमाणें आलीकडेस आले. त्यामुळें कांहीं आणावयास घडलें नाहीं. सर्व टाकून आलों. आह्मीं आलेउपर त्याचा जमाव येऊन सर्व विध्वंस केला. आण त्या ठिकाणीं गोहत्याही केल्या. तेथें सडे काशी, व्यंकाजी, व सदासिव पांडुरंग राहिले. त्याणीं आपला दाणागोटा सर्व राखिलें. आमचे खाजनाची देखील फैळी[4] काढून नवें खाजन आह्मीं केलें तेंही बुडविलें. आण अलीकडेस

---

१. जिवबादादा. २. कोल्हापुर सरकाराकडून. ३. हे विर्नोडें, प्रांत गोवें, एथील नाडकर्णी होत. ४. मानसीची फळी.

आले. त्यांस एकदोन पत्रें पाठविलीं. जे तुमची वतनदारी गेली. जे कोण येणार त्याणीं यावें. असें लिहिलें. असा मजकूर धडला. एवढें केलें कीं, पत्रें पुणेहून आलीं त्यामुळें आलीकडेस आलों. आणी पत्रें पुणेहून पाठविलेवर आज पंधरा रोज होत आले. अद्यापि जाबसाल कांहींच जाहला नाहीं. पुढें परिणाम आपणाविरहीत लागत नाहीं. असें पाहून हें पत्र लिहिलें आहे. आह्मीं आजपर्यंत वतनदारी जोडली. ती आह्मांस नाहीं अशी होती. असें यास चिरंजीव जगोबास पुणेस रवाना करून याचा बंदोबस्त करावा. नाहीं तर सर्व उपहास जाहला. ऐसें ध्यानीं आणून जें करणें तें करावें. मुख्य गोष्ट फिरंगी यास पुणेहून फौज येऊन जरब लागलेविना आमचा बंदोबस्त होणार नाहीं. त्यास पेशजीं श्रीमंतांचे दरबारांतून पुणें प्रांत जांबवली पंचमाहाल वगैरे माहाल अशी फिरंगी याकडेस पंचावन्न लक्ष रुपये[१] बाकी काढली होती. त्यास खंडणीचे रुपये पंचावन्न लक्षांचा फौज आलेवर निशा होणार. व सर्व मुलूखही सुटणार. ऐसें यास स्वारीखर्च वगैरे सर्व उगवून येईल. त्यास तेथून फौज आलेविना कांहींच होत नाहीं. तर हा मजकूर श्रीमंत राजश्री पटेलबावास लिहून जे अर्थीं फौज येऊन बंदोबस्त होईल, तो अर्थ करावा. मुख्य गोष्ट सिबंदीचा फडशा होऊन पैसा आंगावर येणार नाहीं. येविसीं फोंडे प्रांतांतील राणे व देसक सर्व आपणास मिळतील. परंतु तेथून फौज पांच हजारपर्यंत आलेस सर्व बंदोबस्त होऊन येईल. त्यास चिरंजीव जगोबास पुणेस रवाना करून फौजेच्या खर्चाचा व बोलणेचा जो अन्वय सरकारचा पतकरून फौज घेऊन येईल. तेथून चिरंजीव साबाजीस पुणेस रवाना करून देतों. ह्मणजे पारपत्य जाहलेविना आमचा गांवीं जाणेचा प्रकार नाहीं. आण पुणेहून चिरंजीव नारबाचीं व राजश्री बाजीबा महाजन यांचीं पत्रें आलीं कीं, सरकारांतून श्रीमंत राजश्री पाटील बावांकडून आज्ञा जाहाली कीं. कुटुंबसुद्धां अलीकडे उतरून देणेविसीं. त्याशिवाय त्यांस जरब लावणार. आण तुमचे कबिले ते उतरलेवर त्यास जरब लाऊन पारपत्य करूं असें लिहिलें आलें. त्यास सरकारचे आज्ञेप्रमाणें करावें लागलें. पुढें तेथून कसा बंदोबस्त होतो तो पाहावाः तेथून फौज आलेविना बंदोबस्त होणार नाहीं. आह्मीं पुणेस जावें तर शरीर स्वाधीन नाहीं. आण जागाही सुटला. आह्मी वाडीस. माणसें मळगांवांत. अशी चोहोंकडून फजिती जाहली. पत्रीं कोठवर लिहावी. तेथून फौज येऊन खंडणीचा व स्वारीखर्च व मुलूख फोंडे प्रांत व जांबवली पंचमाहाल वगैरे श्रीमंत राजश्री राजेबाहादर यांजकडील पेडणें माहाल व डिचोली माहाल व सांखळी माहाल असे सर्व सुटतील. आण आमचाही बंदोबस्त सहजच होऊन येईल. हे आशीर्वाद.

लें० नं. ११५ श्री. तारीख २१ एप्रील सन १७९४.

तीर्थस्वरूप राजश्री बाबा व तथा आमु रांगणेकर वडिलांचे सेवेसीं.

बाळकें साबाजीनें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ तागायत छ० २० रमजान मुक्काम लष्कर नजीक पाणीपत जाणोन वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन कांहींच वर्तमान कळत नाहीं. तर वडिलीं बाळकावर निष्ठुरता ऐसी न करावी. सदैव पत्र पाठवून बाळकाचा सांभाळ करावा. यानंतर इकडील मजकूर तर श्रीमंत माहाराजेंचें[२] वर्तमान आपणास कळलेंच असेल. त्यामुळें आह्मांस येण्यास दिरिंग दोन महिने लागला. आमच्या येण्याचा मजकूर तीर्थस्वरूप राजश्री दादांस लिहिलें आहे.

१. हे वाडी सरकारचे महाल होते. हल्लीं ते गोवें सरकाराकडे आहेत. २. महादजी शिंदे वारल्याचें वर्तमान.

तें आपल्या ध्यानास आला तर लिहून पाठवावा. त्यासारखें येथून बंदोबस्त करून सरंजाम देऊन चार माणसें व स्वार रवाना करून द्यावयास येतील. आपल्या विचारासारिखी आज्ञा करावी. येथील खटल्याची खराबी. यामुळें लिहिलें आहे. त्यास तुह्मीं व दादा एक विचार करून जशी आज्ञा कराल ती करावी. बारा वर्षे प्रवास काढून ईश्वरें हा खटला जमविला आहे. त्यास आह्मीं घरीं आल्यावर एक वर्ष लागल. मागें सर्व कारखान्याची खराबी आहे. यास्तव वडिलांचे मर्जीस येईल त्याप्रमाणें लिहावें. आह्मांस येऊन आज अकरा वर्षे झालीं. त्या अलीकडेस एकही पत्र येत नाहीं. त्यावरून बाळकावर निष्ठुरता ऐसी दिसोन येती. तर ऐसें न करावें. सर्व प्रकारें आमचा सांभाळ आपणास करावा लागतो. तेथील विस्तार लिहून कळवावें. ऐसें नाहीं. बहूत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे. हे विज्ञापना. घरामध्यें सर्वांस साष्टांग नमस्कार प्रविष्ट व्हावा हे विज्ञापना.

ले० नं. ११६ श्री. तारीख २४ एप्रील १७९४.

राजश्री नरोबा केरकरदादा मुकाम केरी वडिलांचे सेवेसीं.

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य.

सेवक विठोजी नाईक किनळेकर रामराम विनंती येथील आज तागायत चैत्र वद्य ९ मी मुकाम वेंगुर्लें तागायत आपले कृपेकरून आजवर सुखरूप असों विशेष. आपली स्वारी फोंडे माहालीं जाहली. ते समई श्रीमंत राजश्री सोंदेकर[१] यांची मोकळीक होऊन आपले लष्करांत आले. हें वर्तमान ऐकून परम हर्ष जाहला. त्याजवरून कर्नाटकास सरकारी आरमार विजयदुर्गाचें घेऊन जाणार होती. ती सर्व मसलत तहकूब करून साहेबांचे भेटीस येतों. असें विजयदुर्गाहून पत्र लिहिलें होतें. त्याप्रमाणें हल्लीं विजयदुर्गाहून वेंगुर्लेस काल दोन घटका रात्रीस येऊन पावलों. त्यास पुढें काय ती आज्ञा असावी. येतदर्थीं आपणास विनंती लिहिली आहे. त्यास आज्ञा येतांच येऊन पोंचतों. सेवकावर पूर्ण दया असावी. वरकड मजकूर. भेटीअंतीं निवेदन करूं. गुदस्तां आपल्याकडेस विनंती करून घ्यावयाची ती घेतली आहे. बहूत काय लिहूं लोभ करावा हे विनंती.

सदर्हू राजश्री रावजी निंबये तालुका सुभा विजयदुर्ग व राजश्री अनंत[३] आनंदराव धुळप सुभेदार आरमार उभयतांकडे कितीएक जाबसालाचा बंदोबस्त करून दारुगोळ्या वगैरे साहित्याविसीं अनकूलता होईल. त्या आह्मी इकडून पुरावा करूं. त्याप्रमाणें आलाइदा पत्रही आह्मांस दिलें आहे. त्यास आह्मीं आपल्याकडेस मखता बोलून चिरंजीव राजश्री गोंदजी नाईक यांस आपणाकडील मसलतविसींचा वगैरे मजकूर समजून आलेवर यास विजयदुर्गास रवाना करावा. ऐसीही सुभ्यांची आज्ञा आहे. त्यास आपली कायती आज्ञा असावी. बहूत काय लिहूं. लोभ करावा हे विनंती.

१. हे आनंदराव धुळप यांचे आरमारावरील सरदार होते. २. हें सोंदें कर्नाटक प्रांतांत लहानसें संस्थान होतें. तेथील हे देसाई. हल्लीं यांचा वाडा गोमंतकांत नागेश गांवीं आहे. तेथें हे येऊन जाऊन राहतात. यांस गोव्यांचे पोर्तुगीच सरकाराकडून मोठा मान असून नेमणूकही चालू आहे. ३. आनंदराव धुळप यांस 'अनंत' हा किताब होता.

लें० नं. ११७ श्री. तारीख ४ मे सन १७९४.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री बाबू स्वामी यांचे सेवेसीं.

सेवक बाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपर येथील क्षेम तागायत वैशाख शुद्ध ५ मुकाम पुणें स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण केरी सोडून वाडीस आलां. पुढें माहाल सुटून यावे ते दिरंगावर पडले. आपलें वतन वगैरे फिरंग्याकडेस जप्ती होऊन येथून उपराळा कांहींच जाहला नाहीं. याविसीं एकदोन पत्रें बहुतच श्रमी होऊन राजश्री नारायणरावजीस लिहिलीं कीं; आह्मी गांव सोडून आलों. फिरंग्याकडील माहाल सुटत नाहीं. वतनही त्याकडेस जप्ती होऊन घरांतील दाणागोटा वगैरे तसनस जाहला. असें तपसिलें लिहिलें. त्यास ह्या गोष्टी राज्याच्या मोठ्याच मोठ्यानीं सांगितलें. आण ते बोलल्याप्रमाणें करते. हें समजोन राजश्री रावजीनें आपल्यास लिहिलें. सावतांचें संस्थान विद्यमानकाळीं सर्व गोष्टीनें तुह्मांवर भरिभार असा कीं; कित्येक अंदेसे समजोनच रावजीनें लिहिलें होतें. त्यास ईश्वरानें सर्वच गोष्टी विलग करून श्रीमंत कैलासवासी जाहलेमुळें आपण शब्द लाविला. व आमच्याही हातें उपराळा न जाहाला. तेव्हां सर्वच भारी दिसों लागलें. येरवीं सहजांतील या गोष्टी होत्या. आतां रामजी पाटील याणीं पुणेंत श्रीमंत नानांसीं बोलून तूर्त मौजे हरमल व केरींतील वतन सोडून फिरंगी याणीं देऊन आपला बहुमान करून गांवीं न्यावें. असीं पत्रें पाठविलीं त्याचीं उत्तरेंही आलीं. ते नानाचे विद्यमानें याप्रमाणें करितों. असें बोलून त्या वकिलाकडेस पत्रें घेऊन जासूद गेला आहे. टरावून आल्यास आपले मर्जीनुरूप जावें व राजश्री देवबा लाड याणींही याचप्रमाणें करितों. असें त्यांचेंही पत्र आलें आहे. दोन्हींतून आपले सलेस येईल तें करावें. तूर्तच गांवीं जाणें तर दोहींतून आपल्या विचारास येईल तें लिहावें. त्याप्रमाणें कागदीं पत्रीं ठीक करून आपल्यास लिहूं. राजश्री विश्रामबावा पालयेकर आपलेकडून आले. त्याणीं जबानीं सांगितलें. हा मजकूर आपण केल्यास येथून साहित्य जें आपलेस कांहीं अनकूल पाहिजे, तें समयानुसार खर्चावेर्चास साहित्य कदाचित् पुरवून केल्यास ही गोष्ट उत्तम आहे. श्रीमंत देशीं वर्ष सहा महिने राहतील. (यापुढील बंद मिळत नाहीं.)

लें० नं. ११८ पे॥छ० २७ सवाल. श्री. तारीख १६ मे सन १७९४.

वैशाख बुधवारचे दिवसीं आलीं.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत वैशाख वद्य १ पदा मुकाम पुणें वडिलांचे आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. वडिलांकडोन विश्राम पालयेकर याचीं वरचेवर पत्रें आलीं. त्यावरून सांभाळ जाहला. पत्राचीं उत्तरें देऊन हरि खिजमतगार याजला पाठविला आहे. त्यावरून वडिलांचे सेवेसीं कळलें. यानंतर सरकारांत गोमंतक ( ) आहे. पाहिजेत याकरितां भोई दोघे पाठविले आहेत. वडील गांव सोडून आले. याकरितां आंबे पाठवावयाचे लिहावयास हात येत नाहींत. त्याजबरोबर चांगले आंबे पाठविण्यास आज्ञा करावी. वरकड इकडील चिंता करूं नये. सडे स्वारींतील हमेशा पत्रें येतात. सर्व यथास्थित

---

१. नरोबा दादा. २. बाजीबा महाजन मोदी. ३. नाना फडणीस. ४. हे लखबादादा यांचे पथील होते.

आहे.• राजश्री सदाशिव मल्हार उज्जनीहून येथें आले. आज आठ दिवस जाहाले. श्रीदेवदर्शनास जाण्याचा स्वारीचा सिद्धांत ठरला होता. पर्जन्य समीप आल्यामुळें चार मास येथेंच राहणें जाहालें. श्रीमंत राजश्री दौलतराव बाबास शिकेकटार व मुतालकीचीं वस्त्रें शिरपेंच व कंठी, कलगी, हत्ती, घोडा, असें वैशाख शुद्ध ११ चे दिवसीं श्रीमंत पंतप्रधान यांनीं दिलें.[2] श्रीमंत नाना फडणीस यास बादशाही फडणीसीचीं तेच दिवसीं वस्त्रें दिलीं. श्रीमंतांस आपल्या सरकारांतून वस्त्रें व जडजावाहीर देणार आहेत. दोचौं रोजीं तेही येथें येतील. वरकड मागाहून लिहून पाठवितों. गांवीं जाण्याचा प्रकार पेशजी लिहिला आहे. त्यास राजश्री धोंडीबा[3] दादा इति रोज तेथें आलेच असतील. त्यास त्यांचे आपले विचारें ठरवून पक्की गोष्ट करावी. राजश्री धोंडीबाकडे तीर्थस्वरूप राजश्री काकास पाठऊन त्यास सन्मानेंकरून आणवून मावंतांस भेटवावे. मेजवानीही करावी. येविसीं पेशजीं मत्रें लिहिलें आहे. सर्व ईश्वर चांगला करील. चिंता नाहीं. सदोबा भाऊंस दिवाणगिरीचीं वस्त्रें जाहालीं. पहिली श्रीमंत पंतप्रधान यानीं सर्व (यापुढील बंद मिळत नाहीं.)

ले० नं. ११९ श्री. तारीख २२ मे सन १७९५.

राजश्री नारायणराव जिवाजी गोसावी यांसीं.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहांकित दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावें. तुह्मीं गेलीया तागायत वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर लिहून पाठवणें. सांप्रत खासा स्वारी आज वैशाख वद्य ७ मी श्रीपंढरपुराकडे देवदर्शनाकरितां जाण्यास निघोन एक कोसावर मुकाम झाला आहे. देवदर्शन पंढरी व श्रीजोतलिंग करून लवकरच पुण्यास येणें घडेल. तुह्मीं तिकडे बहूत दिवस न लावितां निघोन सत्वर येऊन पोंचणें. येतेसमयीं चंदन बहूत चांगला तारीफलायक पाहून घेऊन येणें[4]. रवाना छ० २१ सवाल सुरुसन खमास तिसेन मयां व आलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोठा शिक्का आहे.) (मोर्तबसुद्र)

ले० नं. १२० पुरवणी. माहे जून सन १७९४.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू मामा वडिलांचे सेवेसीं.

वडिलांस ठाऊकच आहे. श्रीमंत राजश्री हरीपंत तात्या फडके यांचा काळ छ० २१ जिल्काद शुक्रवारीं जाहला.[5] मोठा थोर मुत्सद्दी श्रीमंतांचे दरबारीं होता. श्रीमंत राजश्री नाना फडणीस दुसरा तो दोघानीं चालविला होता. राजश्री हरीपंत तात्या देवाज्ञा जाहले. आतां एका श्रीमंत नानावर दरबारचा भार आहे. पुढें कैसें होईल पाहावें.[6] वरकड इकडील वर्तमान सविस्तर रावसाहेबांचे पत्रावरून कळों येईल. रावसाहेबांविसीं कांहीं चिंता न करावी. चांगला उतार पडला

१. यांस भाऊ दिवाण ह्मणत. २. तारीख १० मे सन १७९४ शनिवार. महादजी वारल्यावर दौलतरावांस जिवबादादांनीं खर्ड्यांचे स्वारीची हमी घेऊन पेशव्यांकडून जीं वस्त्रें देवविलीं तीं हीं होत. पेशव्यांची बखर पहा. ३. हे शिंद्यांचे एक सरदार होत. हे बाळोबा तात्यांचे मावस बंधु होत, असें एका पत्रांत लिहिलें आहे. ४. दौलतरावांचा व नारायणरावांचा फार स्नेह असे. ५. तारीख २० जून सन १७९४. ६. नाना फडणीसांची यापुढील कारकीर्द व कारस्थानें चांगलीं नव्हतीं, असें रा. खरे याणीं लिहिलें आहे. पहा नानाचें चरित्र पृ० १४१।१४२।१५५.

व आह्मांसही उतार पडला. आमचे घराकडील समाचार घेतच असाल. बहूत काय लिहिणें शेवेसीं श्रुत होय हे विज्ञासी.

लें० नं. १२१ छ० २७ मोहरम. श्री. माहे जुलई सन १७९४.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत आषाढ वद्य. मुकाम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों. विशेष. आलीकडे आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास छ० २४ जिलकादचें आशीर्वादपत्र आलें तें पाहोन लिहिलेला मजकूर कळला. श्रीचा आंगारा प्रसाद पाठविल्याप्रमाणें पोंचला. हल्लीं मजला कांहीं आराम आहे. ताप येत नाहीं. परंतु शरीरीं अशक्तता जाहाली आहे. रोज संध्याकाळीं घटका दोन घटका दाहा होत असतो. तोही मिटेल येविसीं वडिलीं चिंता न करावी. यंदां श्रीमंत राजश्री पंतप्रधान याणीं नवाब निजाम अली याजबरोबर मोहिमीचा निश्चय ठरावून फौजेची तयारी होत आहे. आपल्या यजमान साहेबांसही फौज सरंजाम बोलाऊन घ्यावी. ह्मणोन आज्ञा जाहाली आहे. त्यावरून सरकारचीं पत्रें तीर्थरूप राजश्री दादास फौज सरंजाम सुद्धां जलदी येणें ह्मणोन लागोपाठ दोन तीन पत्रें गेलीं आहेत. भाद्रपद आश्विनें[1] मासीं वडील फौज सरंजाम सुद्धां यावे असें आहे. येथील दरबारीक कारभारसंबंधीक कारभाराचा महिना दीड महिना घोळ पडला होता. राजश्री आबाजी[2] चिटणीस रुसवा करून महिना पावेतों घरीं बसले होते. उपरांतीक राजश्री रामजी पाटील जाधव मध्यस्थीत बोलून निमे कारभार त्याणीं करावा. निमे कारभार आपले मंडळींतून हर कोणीं करावा. याप्रमाणें ठरलें. त्याप्रमाणें निमे कारभार आबा करितात. निमे कारभार आपले तर्फेनें राजश्री ( ) हे सर्व गोष्टी आहेत. आपणही एक पत्र जलदी येणेविसीं पाठवावें. ह्मणजे सडे स्वारींत पाठवूं. श्रीदेवाचा प्रसाद आंगारा पाठवावा हे विज्ञासी.

लें० नं. १२२ पै॥ छ० ५ मोहरम. श्री. माहे जुलई सन १७९४.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत वद्य. मुकाम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वादपत्रें येऊन सांभाळ होत नव्हता. त्यास छ० ७ जिल्हेजचें आशीर्वादपत्र पाठविलें तें पाहोन लिहिला मजकूर कळला. अलीकडे माझे शरीरीं आराम आहे. ताप निस्तुक काढला. अशक्तता मात्र आहे. वाडेंत दरबारासही जात येत असतों. मजविसीं कांहीं चिंता न करावी. तीर्थरूप दादा सडे स्वारींत सुखरूप आहेत. हमेशा पत्रें येतात. ती॥ राजश्री नाना सर्व मुलें माणसें सुखरूप आहेत. चिरंजीव राजश्री विश्रामजी जावदेस सुखरूप आहे. पत्रें हमेशा येतात. कामकाजाचा वगैरे मजकूर लिहिला होता. त्याचा पर्याय कांहीं समजणेंत आला नाहीं. ऐसें लिहिलें त्यास मुख्य गोष्ट फिरंगी याजकडील मसलत. त्यास यंदां दसरा दिपवाळी जहाल्या-नंतर श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामी याणीं नबाव निजाम अली याजवर मोहिमीचा निश्चय ठर-

१. सपटेंबर सन १७९४. २. आबा चिटणीस हे गोपाळराव भाऊ चिटणीस कीं काय? हे प्रभु ज्ञातीचे होते.
३. हा कारभार दौलतरावांचे लष्करचे स्वारीचा आहे.

विला आहे. हे मसलतीकरितां सडे स्वारींतून तीर्थरूप राजश्री दादास फौज पलटणें सरंजाम सुद्धां जलदी येणें ह्मणून पत्रें गेलीं आहेत. त्यांचेंही येणें दिपवाळी आली कीं होईल. या समयीं सर्वच गोष्टीचा बंदोबस्त होईल. कांहीं चिंता नाहीं. वरकड अधिकोत्तर लिहावें असें नाहीं. वडिलीं धोत्रजोडे वगैरे जिन्नस पाठविणेविसीं लिहिलेप्रमाणें ग्रा सरंजाम आणून बहिरोजी याजबरोबर एक भोई देऊन पाठविले आहेत.

६ धोत्रजोडे.	००००१० जायफळ तोळे.
२ महेश्वरी.	००००५ पत्री तोळे.
१ नागपुरी.	००००१० लवंग तोळे.
३ येवलेचे वगैरे.	१ काजीची डबी.
६	००२ तपकीर वजन.

येणेप्रमाणें सेवेसीं पाठविलें आहे. पावलेयाचें उत्तर पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. तीर्थरूप राजश्री दादांस जलदी येणेविसीं—(यापुढील बंद मिळत नाहीं.)

ले० नं. १२३ श्री. तारीख २२ सपटंबर सन १७९४.

राजश्री हरी परब (समजत नाहीं.) तर्फ डिचोली गोसावी यांस—

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य. स्नेहपूर्वक राजे खेमसावंत भोंसुले बहादर सरदेसाई प्रागणें कुडाळ व माहालानीहाय. सुरूसन खमस तिसेन मयां आलफ. तुह्मांविसींचा कित्येक मजकूर राजश्री साबाजी राम केरकर[1] यांणीं हुजूर निवेदन केला. त्यास तुह्मीं कोणे गोष्टीविसीं चिंता संशय न घेतां स्वामिकार्य करावें. तुह्मांकडून कलमबंदीची याद आलेवर सनदा देविल्या जातील. तुह्मीं चित्तीं कांहीं न आणितां धणीका ( ) न दाखवावें. हे गोष्टीस दिगर न करणें. जाणिजे. रवाना छ० २६ माहे सफर. (शिक्का.)

ले० नं. १२४ श्री. तारीख ४ अकटंबर १७९४.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

बालकें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ९ माहे जमादिलावल. मुकाम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व यथास्थित असे विशेष. वडिलीं कृष्णा खिजमतगार याज हातीं मार्गशीर्ष शुद्ध ९ मीचें पत्र पाठविलें पावोन सांभाळ जाहला. यानंतर तीर्थस्वरूप राजश्री बाबूचीं पत्रें आलीं. त्यांचें उत्तर हालीं सविस्तर लिहिलें आहे. चिरंजीव निरांबाई व मथुराबाई[2] यांचें लग्न यंदां कर्तव्य. यास्तव सडे स्वारींतोन तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातोश्री ताई व सर्व येणार. सोरगतीचा निश्चय असावा. व सरंजामाचीही तरतूद असावी. ह्मणोन कोंकणांत लिहून पाठवावें. याप्रमाणें सडे स्वारींतोन वडिलांचें लिहून आलें होतें. तींच पत्रें बजिन्नस तीर्थस्वरूप राजश्री बाबूकडेस पाठविलीं आहेत. त्यास यंदां लग्नें कर्तव्य यास्तव चिरंजीव मथुराबाईस तोटका करावा. तसेंच सौभाग्यवती भीमाबाई मळगांवकर याचे मुलास तोटका केला न केल्याची चौकशी करोन त्याही मुलास तोटका करावा. चिरंजीव

१. वाडी सरकारचे दरबारीं केरकरांची मोठी भीड असे. हे साबाजी राम जिवबादादांचे चुलत व जगोबा बापू ऊर्फ जगंनाथ राम यांचे सख्खे बंधु होत. २. ही जिवबादादांची नात.

निराबाईचे सोरगतीचा मजकूर वडिलांचे मर्जीनुरूप ठरेल. फिरंगी यास इकडील जरब पोंचलेमुळें वडिलांकडे बोलणें लाविलें होतें. त्यास आपणास पक्ष सावंताचा करावा लागेल. त्या अर्थी मुलें-माणसें सुद्धां केरीस राहावें हें ठीक नाहीं. असें जाणोन वडिलांस लिहिलें आहे. कीं मुलें-माणसें सुद्धां अलीकडे यावें. केरीस वतनाच्या कामावर कारकून ठेवावा. आण आपण आली-कडे यावें. याविसीं श्रीमंतांची आज्ञा आहे. कदाचित् यावयास दिकत करतील. तर मुलां-माणसांस अटक करतील असें जाणोन आपण वडिलांस चार गोष्टी सांगोन आलिकडे येई तें केलें पाहिजे. (यापुढील बंद मिळत नाहीं.)

लें० नं. १२५ पे॥ छ० २४ जमादिलावल. श्री. तारीख १९ अकटोबर १७९४.
तारीख २० डिसेंबर १७९४ शनिवार. रविवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू मामा वडिलांचे सेवेसीं.

अपत्य बाळकें विश्राम गंगाधर चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २४ रबिलावल मुकाम लष्कर पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांस केसरी पोषाख मोंगलांवर हर मसलत करण्याविसीं श्रीमंतांनीं वस्त्रें देऊन आज सातें रोज जाहाले. तव्हां आज कूच होऊन पुणेहून तीन कोसांवर हडपसर येथें डेरे देऊन सोमवारीं पहांटेचे सात घटी रात्रीस मुहूर्तें डेरेंत दाखल जाहाली. आज उद्यांच्या रोजांत खटलाही तेथें जाऊन पोहोंचेल. श्रीमंतांच्याही फौजा मोंगलांवर जाणार. कळावें. तीर्थस्वरूप राजश्री दादा व तीर्थस्वरूप राजेश्री बाळोबा भाऊ सडी फौज घेऊन उज्जनीचे अलीकडेस नेवरी भोंवेरसेचे परगणेंत आहेत. तेथून तीर्थस्वरूप राजश्री जगोबा बापू व राजेश्री लखबा लाड यांस मथुरेचा सुभा सांगून उभयतांस रवाना केलें. त्यांजबरोबर सौभाग्यवती मातोश्री उमा मामीही गेली असें लिहिलें आहे. व देवजी गवळी तिकडेस गेले. तीर्थस्वरूप राजश्री दादांस फौजेनें खर्चाविसीं अडविलें आहे. एक दोन धरणीं होत आहेत. त्याची तोड पडेल. दरमजल येऊन पोंचतील. राजश्री विश्राम काकास सर्व मुलें माणसें सुद्धां देवसेंचे मुकामावरून पुढां इकडेस येणेविसीं स्वार पलटणें देऊन रवाना केले. आठां दाहा रोजीं लष्करांत पुणेस येऊन पोहोंचतील. येथूनही मजल दरमजल वडिलांकडे येऊन पोंहोंचतील. कळावें. येथील कार-भार श्रीमंत राजश्री तात्या फाडनीस व श्रीमंत राजश्री सदोबा भाऊ उभयतां करितात. तीर्थस्वरूप राजश्री दादांस सडे फौज घेऊन येणेविसीं पत्रें हमेशा येतात. तेही जलदीच येऊन पोहोंचतील. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. बहूत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

लें० नं. १२६ पे॥ छ० १५ रमजान शनिवार. श्री. तारीख २६ अकटंबर १७९४.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत कार्तिक शुद्ध तृतीया मुकाम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप आहों. विशेष. वडिलांकडून एक दोन आशीर्वादपत्रें आलीं तीं पाहून लिहिला मजकूर कळला. इकडील सवि-

---

१. दौलतराव शिंदे. २. तारीख १२ अकटंबर सन १७९४ रविवार. ३. जिवबादादांस लष्कराची किती काळजी वहावी लागे तें यावरून दिसून येतें. सरकारच्या मदतीशिवाय जिवबादादा लष्कराच्या खर्चाच्या तजविजा आपण परभारचें करीत. ४. खर्ड्यांची लढाई जिवबादादांवर किती अवलंबून होती, हें यावरून उघड होतें.

स्तर मजकूर पेशजी एकदोन पत्रीं लिहिला आहे. त्यावरून सेवेशीं विदीत होईल. वडिलीं येथें एवज घेऊन येथें चिठ्या केल्या त्या येथें पावल्या. वाइदेप्रमाणें ऐवज पटवून दिला. त्यास तेथें मसलतीसंबंधीं खर्च होणें तो सारासार विचार पाहून करणें तो करावा. तीर्थरूप राजश्री दादा फौज सरंजाम सुद्धां उज्जनीचे पलीकडे एक मजलीचें पत्र आलें. माणसें व चिरंजीव राजश्री विश्रामही बरोबर येत आहेत. कदाचित् फौज सुद्धां वडिलांस चार रोज आगांमागां जाहलेस मुलेंमाणसें व चिरंजीवास येथें पुढें रवाना करितों ह्मणून वडिलांनीं लिहिलें आहे. आपल्या समाधानाची मोटी चिंता आहे. आराम जाहल्याचें लिहावयास आज्ञा केली पाहिजे. वडिलीं चिठ्या केल्या त्याचा निशा केला. आतां चिठ्या न कराव्या. ऐवजाची तोडजोड येथें पडणार नाहीं. येथून नोबत श्रीदेवाकरितां तांबेची करून पाठविली आहे. श्रीदेवास देऊन प्रसाद घेऊन पाठविण्यास आज्ञा केली पाहिजे. तूर्त नवाबाचे मोहिमीकरितां शुद्ध ७ स कूच आहे. याजकरितां याउपर येथें चिटी न करावी. फौजेचें कूच आण सरा-( ) रुपयेची ओढ. कूच जाहल्याअंतीं ( ) ओढीमुळें रुपयेची तोडजोड लागणार नाहीं. चिटी माघारी गेल्यास तेंही ठीक नाहीं. याजकरितां तूर्त चिठी एकंदर न करावी. वडिलांचे शरीरीं आराम जाहल्याचें सत्वर लिहिलें पाहिजे. एक वेळ केरीस जाऊन श्रीची भेट घेऊन सर्वेच माघारें यावें. नोबत पाठविली आहे ती केरीस श्रीदेव रवळनाथ यास द्यावी केली होती ती पाठविली आहे. श्रीमंत राजश्री दौलतराव साहेबांचें कूच अगोदर होऊन पुढें गेल्यानंतर मागाहून श्रीमंत राजश्री पंतप्रधान हे कूच करून येणार. सेवेशीं श्रुत होणें. तीर्थरूप राजश्री दादांचें पत्र छ० ११ रबिलावलचें आलें त्यांत लिहिलें आहे जे. तीर्थस्वरूप राजश्री बापू व तीर्थस्वरूप सौभाग्यवती उमा वहिनी व चिरंजीव रामबा व धाकटी मूल अशीं दसऱ्याचे मुहूर्तीं बापूस व राजेश्री लखबा लाड यांस हिंदुस्थानच्या बंदोबस्तास रवाना केले हे विज्ञापना.

लें० नं. १२७[२] पुरवणी. श्री. २ माहे अकटंबर १७९४.

वडिलांचे शेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना जे हालीं दळत्याजवळ सणगें पाठविलीं आहेत. त्यांची यादी अलाहिदा पाठविली आहे. त्यावरून विदीत होईल. श्रीदेवाकरितां तांबेची नोबत मढवून पाठविली आहे. पावल्याचें उत्तर पाठविण्यास आज्ञा केली पाहिजे. वडिलीं दोनदोन हजारांच्या हुंड्या दोन व किरकोळ केल्या त्याप्रमाणें ज्यांच्या त्यांस पटवून दिल्या. वडिलीं बलीशिका देणें ह्मणोन चिठ्या केल्या त्यास ते रुपये पटवावयास रसदे सातसात रुपये चांदवड ज्याजती पडेल. वडिलीं तेथें ऐवज फिरखानीं कसकसा घेतला हें कळेना. असो. वडिलीं जें करणें तें पाहून केलेंच असेल. तूर्त नवाबाचे मोहिमीकरितां शुद्ध सप्तमीस कूच आहे. याकरितां याउपरी येथें चिठी न करावी. फौजेचें कूच सराफीमध्यें रुपयेची ओड कूच जाहल्या अंतीं लष्करचे ओढीमुळें रुपये तोडजोड लागणार नाहीं. तेव्हां चिठी माघारें गेल्यास तेंहीं ठीक नाहीं. याकरितां तूर्त चिठी एकंदर न करावी. वडिलांचे शरीरीं आराम जाहलें याचें सत्वर लिहिलें पाहिजे. एक वेळ केरीस जाऊन श्रीची भेट घेऊन सर्वेच माघारें यावें. नोबत पाठविली आहे ती केरीस श्रीदेव रवळनाथ यांस द्यावी. देऊं केली ती पाठविली आहे. श्रीमंत राजश्री दौलतराव बाबांचें

---

१. हें देवालय जिवबादादांचे केरी गांवीं आहे. २. हें नारायणराव बक्षी यांणीं आपले चुलते मरोबादादा ऊर्फ बाबू यांस लिहिलेलें पत्र आहे.

कूच अगोदर होऊन पुढें गेले. नंतर माघाहून श्रीमंत राजश्री पंतप्रधानही कूच करून येणार. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापी. 'तीर्थरूप राजश्री दादांचें पत्र छ० ११ रबिलावलचें आलें. त्यांत लिहिलें आहे जे. तीर्थस्वरूप राजश्री बाबू व ती॥ सौभाग्यवती मातुश्री उमा वहिनी व चिरंजीव रामबा व धाकटी मूल ऐशीं दसऱ्याचे मुहूर्तें राजश्री बापूस व राजश्री लखबा लाड हिंदुस्थानच्या बंदोबस्तास रवाना केले². हे विज्ञापी.

लें० नं. १२८ श्री. सन १७९४.

सकलसौभाग्यवतीसंपन्न वज्रचूडेमंडित सौभाग्यवती गोपिकाबाई[३] वडिलांचे सेवेसीं.

अपत्य सांतो राम साष्टांग नमस्कार येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. श्रीमंत राजश्री राजेबहादर सरदेसाई साहेब यांणीं तुह्मांवर मेहरबान होऊन बागायत केरीपैकीं ठिकाणें दोन लुगडें चोळखण व तेल चमेली व फुलांबद्दल दिलीं. त्याच्या सन ⁝ घेऊन पाठविल्या आहेत. घेऊन मेहरबानीची जलद पाठवावी. राजश्री बापू सुखरूप पावले यांचें वर्तमान सविस्तर लिहावें. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

लें० नं. १२९ श्री. तारीख ५ नवंबर १७९४.

चिरंजीव विश्राम याप्रती-नरहर गणेश केरकर आशीर्वाद उपरी येथील तागायत छ० ११ बि-लाखर मुकाम वाड सुखरूप जाणोन तुह्मांकडून सविस्तर लिहिणें. आह्मांस समाधान फारच नव्हतें. परंतु श्रीचे कृपेनें समाधान आहे चिंता नाहीं. चिरंजीव व जिवबा येतात. त्यांबरोबर अवघीं मुलें माणसें वाडीं येतात. असें चिरंजीव नारबानें लिहिलेवरून कळों आलें. कोणी जागां येणेचें मुकाम आहे. तें लिहून पाठविणें. वरकड इकडील मजकूर तर तूर्त फिरंगीयासी कज्या. यास त्यांस लागला आहे. तो एक वेळ जबरदस्ती करून यांजवर येणार अशी बातमी आहे. व सरकार रेडी वेंगुर्लेंपासून येऊन माघारें एक वेळ गेलें. मागती येणार असें वर्तमान. परंतु आजपर्यंत राजेबहादर यांजकडेस यश आहे. तूर्त-( ) पेडणें प्रांत कांहीं न-( ) लवर्दचे कोटास बसले आहेत. फिरंगी यांजकडून उपराळा न पोंचलेस हस्तगत करितील असें आहे. पुढें कैसा मजकूर पाहावा. ही मसलत फिरंगी मान्य जाहाली ती एक आमचा या दर-बारचा भरंवसा. त्यावर अवघी भिस्त आहे. ह्मणून श्रीमंत राजश्री आबासाहेब पेडणेस आहेत. तेथून कागद येतच आहेत. फिरंगी जबरदस्त. या प्रसंगीं चिरंजीव जिवबा फौज सुद्धां येतात हीच धास्त आहे. त्याखालीं चौंकडे भय धरितात. जलदी पुणेस आलेवर उत्तम होतें. ह्मणजे यास उपराळा पोंचून फिरंगीयास जरब लागेल. त्यावर बोलीस येईल. ह्मणजे केली गोष्ट सिद्धीस गेली. ऐसा मजकूर आहे. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. १३० श्रीशंभु. तारीख १४ नवंबर १७९४.

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरकर यांस हुजूरची आज्ञा. सुरुसन खमस तिसेन मयां आलफ.

१. तारीख ६ अकटंबर १७९४. २. जिवबादादा यांनीं खर्ड्याचे लढाईसाठीं दक्षिणेंत येतेवेळीं जगोबा बापू व लखबादादा यांस पाठीमागें राज्य सांभाळण्याकरितां ठेविलें होतें. ३. नरोबादादांचें कुटुंब. ४. हे नरोबादादा ऊर्फ बापू जिवबादादांचे वडील बंधु होत. ५. हा प्रांत गोवें प्रांतीं आहे. ६. हे खेमसावंत राजे यांचे चुलते होत. ७. जिवबादादांचे नांवाचा त्या काळीं एवढा प्रताप होता.

यशवंतगडाहून खबर आतांच आली. त्यांत वर्तमान जे फिरंगी याचें आरमार हांकारून मोरजेचे समोर दिसतें. त्यास प्रसंगीं नस्तावर येतें किंवा कसें. त्याप्रमाणें लिहून पाठवितों. त्यास स्वार रवाना करावे ह्मणोन लिहिलें होतें. अशास तुह्मांकडील स्वार घराजवळ आहेत. ते पत्र पावतेक्षणीं यशवंतगडास रवाना करून देवावे. येविसीं अवकाश करूं नये. आधीं स्वार पाठवून देणें आण मग आज्ञापत्र वाचावें. या स्वारांशिवाय तुमचे स्वार आजरेस आहेत ते आणवणेविसीं तुह्मांस एकदोन वेळां लिहिलेंच आहे. त्यास तुमचीं माणसें आजरेस गेलींच असतील. कदाचित् आणखी गडी दोन असामी चांगले चालक इनाम कबूल करून रवाना करून द्यावे आण उद्यांच्या रोजांत आजरेचे स्वार येई तें करावें. प्रसंग निकटीचा आहे. आंगाबाहेर टाकून लांबवूं नये. इत्रतीचें काम आहे. सत्वर आज्ञेप्रमाणें आणवावे. जलदी कराल ती उपयोगी पडेल. छ० २० जमादिलाखर चंद्र मजकूर.

ले० नं. १३१ तारीख १९ नवंबर १७९४.

राजश्री कमाविसदार बागायत तर्पे पेडणें यांस—राजे खेमसावंत भोंसुले बहादर सरदेसाई प्रागणें कुडाळ व माहालानीहाय सुरुसन खमस तिसेन मयां आलफ. राजश्री नरहर गणेश केरकर यांची स्त्री सौभाग्यवती गोपिकाबाई यांस लुगडें व चोळखण व तेल चमेली व फुलांबद्दल ठिकाण थोरलें बाग व गिडचें बागायत विठ्ठल आपाजी मौजे केरी तर्पे पेडणें हें साल मजकुरापासून त्यांस देविलें असे. त्याचें कुंबळें भरे ३।. नारळ कुंबळें ४६८३ एकूण सर्द कुंबळें सव्वातीन भरे व नारळ कुंबळें चार हजार सहासें त्र्याऐशीं साल मजकूरपासून दस्तिबाद दिलें असे. बाद देऊन सदर्हू ठिकाणें दोन त्यास साल दरसाल देविलें असे. त्यास व त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस भोगूं देणें. ताजे सनदीचा उजूर न धरणें. सनदीची तालीक लिहून घेऊन असल सनद त्याजकडेस भोगवटेस असों देणें जाणिजे छ० २५ रविलाखर. (मोर्तब.)

ले० नं. १३२ पो॥ छ० १३ जमादिलावल. श्री. तारीख २ दिशंबर १७९३.

तारीख ७ दिसेंबर सन १७९४ रविवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत मार्गशीर्ष शुद्ध १० मुकाम पुणें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. वडिलीं कृष्णा खिजमतगार याजबरोबर छ० ११ रविलाखरचें आशीर्वादपत्र पाठविलें तें काल दोनप्रहरीं पावोन लिहिला मजकूर कळला. श्रीमंत राजश्री राजेबहादर यांजकडील सिंदगडच्या कामाकरितां व रुपयेचे वसलादीकरितां राजश्री गोविंदराव आले. ते वाडीस पोंचले. आपणही राजेश्री सांतबा आपास येविसीं लिहिलें. सर्व जाबसाल होऊन येईल. ह्मणून लिहिलें उत्तम आहे. एक वेळ ऐवजाचा उगावा होऊन गळा मोकळा जाहला ह्मणजे सर्व जोड आहे. वडिलीं तिकडून वरचेवर तिकडे जाबसाल कळवून त्यांस निकट लागेल तें केलें पाहिजे. दुसरें किल्ले हस्तगत जाहाले. अलीकडे राजे बहादरांकडील कांहीं जमाव जमा होऊन पेडणें माहालाचे अलीकडे सरहद्दीस चौक्या बसल्या आहेत. यामुळें फिरंगी याणींही अलीकडील हद्दीस बंदोबस्त करून चौक्या ब-

१. तारीख १३ नवंबर सन १७९४ गुरुवार.

सविल्या आहेत. पेडणें माहालाचे गृहस्थांचे कबिले बारदेशीं काढावे असें फिरंगी यांचें ह्मणणें आहे. त्याबरोबर आपलेही कबिले काढणार. राजश्री परशुरामभाऊ कांहीं फौज घेऊन फिरंगी याच्या पारपत्यास येणार. हें पुणेहून वकिलानें लिहिलें. फिरंगी याजकडील राजश्री बहुगुण कामत माहालच्या जाबसालाकरितां आला होता. खर्चव्यर्च पडेल तो देऊन महाल कायम आमच्याकडे रहावे. एविसीं राजश्री देवबा लाड यांणीं राजश्री पागनीस[1] यास लिहून तुमच्या मनोदयानुरूप बंदोबस्त करून देऊं ह्मणून कबूल केलें आहे. त्याअर्थी फिरंगी याचा पक्ष धरिल्यानें पुढें सरदेसाई यांचा शब्द लागेल. आण इति दिवस मेहनत झालेली व्यर्थ जाईल. येविसींचा जाबसाल काय तो जलदीनें लिहावा. ह्मणून आज्ञा. त्यास राजेबहादर यांजकडील अभिमान आजवर धरून करवीरकरांकडील प्रांत खालीं करून देविले. पुढें तूर्त पेडणें माहालांत फिरंगी याचा अमल. याअर्थी त्याचा पक्ष धरून फिरंगी याच्या मनोदयानुरूप बंदोबस्त करावा. तर ही गोष्ट आह्मां लोकांस ठीक नाहीं. आह्मीं आजवर सावंतांच्या पदरचे जमेदार. या अर्थी ही गोष्ट सहसा कर्तव्य नाहीं. कबिले बारदेशीं काढणार अशी त्यांची मसलत आहे. त्यास त्यांचे योजनेअगोदर हर युक्तीनें आपलीं मुलें माणसें कुटुंब सुद्धां अलीकडे येऊन आरवदेस राहावें. एविसींही श्रीमंतांचे कानांवर घालून जाबसाल केला आहे. हें पत्र पोहोंचतांच आपण मुलें माणसें सुद्धां अलीकडे यावें. नाहीं तर मग संकटांत पडावें लागेल. याकरितां ही योजना अगोदर करून जलदीनें अलीकडे यावें. देवबा लाड याणें या जाबसालाची कबुलात केली. त्याविसींची कांहीं चिंता नाहीं. लाड मजकूर जाबसाल करणें तो राजश्री तात्या पागनीस याचे विद्यमानें करील. त्यास आह्मांपेक्षां देवबाची भीड तात्यास अधीक होईल. असें घडणार नाहीं. आण हा मजकूरही तात्यास विदीत केला आहे. त्यानींही देवबाची आपरबुद्ध करून आह्मांसीं अशा बुद्धि घडणार नाहींत. असा निश्चयात्मक जाबसाल मजशीं बोलले आहेत. त्या अर्थी देवबाच्या हातें जाबसाल होणें हें कळतच आहे. असो पुढें होईल तें पाहतां येईल. परंतु आपण अगोदर अलीकडे स्वराज्यांत यावें. ही त्वरा करावी. येविशीं फिरंगी यांजकडील वकील येथें आहे त्यास आतांच आणून दाबदबावा करावा तर तो तिकडे लिहून आपणास अलीकडे यावयास दिकत पडेल याकरितां आपण मुलें माणसांसुद्धां अलीकडे आलां. हें वर्तमान आह्मांस कळतांच मग त्या वकिलास अगर फिरंगीयास जी जरब द्यावयाची ती द्यावयास येईल. याजकरितां फिरंगीयास कांहीं दस्ताऐवजीं वचनांत न येतां अलीकडेस यावें. सावंतांकडून गांव इनाम करून घ्यावयाचा तो घेतों; ह्मणून लिहिलें. त्यास उत्तम आहे. वडिलांचे मर्जीस येईल त्याप्रमाणें करावें. यंदा चिरंजीव मुलींचीं लग्नें उरकून घ्यावीं. या उद्देशीं सर्वांची रवानगी करून देतों. सोरगतीचा निश्चय व सरंजामाची तरतूद करावयाकरितां आपणांस लिहावें ह्मणून तीर्थरूप राजश्री दादांनीं लिहिलें आहे. तेंच बजिन्नस पत्र सेवेसीं पाठविलें आहे. तें पाहून जें करणें तें वडिलांचे मर्जीनुरूप करावें. खर्चाव्यर्चाचे तजविजेस्तव सडे स्वारींत वडिलांस लिहिलें आहे. तेथून जाबसाल येतांच शेवेसीं लिहून पाठवितों. तीर्थरूप सौभाग्यवती मातोश्री ताई व सर्व सौभाग्यवती मातोश्री होनी वगैरे व मुलें येणार. त्यांबरोबर चिरंजीव राजश्री विश्रामजीसही रवाना करितों. ह्मणून वडिलांनीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें चिरंजीवही त्याजबरोबर जलदीच घरीं वडिलांचे भेटीस येईल. तीर्थस्वरूप

१. हे दिवाण बाळोबा तात्या पागनीस होत.

राजश्री साबाजी काकाकरितां घोडा व आपणाकरितां शालजोडी व चर्मी जोडे लिहिलेप्रमाणें मागाहून शेवेसीं पाठवून देतों. पत्राचें उत्तर जलदी सेवेसीं विदीत व्हावें. याजकरितां माणूस जलदीनें पाठविला आहे. तर पत्र पावतांच अगोदर अलीकडे यावयाची तजवीज करून आरवदेस मुलें माणसें सुद्धां आल्याचें वर्तमान जलदी लिहावयास आज्ञा केली पाहिजे. सारांश. आपण सर्व मुलें माणसें अलीकडे यावें. याविसीं श्रीमंत महाराजांची आज्ञा आहे. आपण अलीकडे आलां ह्मणजे फिरंगी यास जरबीचीं पत्रें व वकिलास ताकीद करावयास येईल. परशुरामभाऊ गोमांतकीं फौज घेऊन येणार असें असतां आह्मांस कसें लिहिलें नाहीं. ह्मणून वडिलीं लिहिलें. त्यास ही गोष्ट अद्यापि ठरली नाहीं. ठरल्यावर वडिलांस लिहिलें असतें. लग्नाचा प्रकार वडिलांस लिहिला आहे. तींच पत्रें शेवेशीं पाठविलीं आहेत. सोरगतीचा सिद्धांत ठरवून पत्रें लिहून पाठवावीं. ह्मणजे येथून पत्रें सडे स्वारींत पाठवून देऊं. गुदस्तां कापड लग्नाकरितां पाठविलें तें पसंतीस पडलें नाहीं. त्यास यंदा कापड पाठवावयाचें त्यास तेथून वडिलीं कोणासही पाठवावा. ह्मणजे त्याचे विचारें खरेदी करून द्यावयास येईल. कदाचित् मर्जी नसली तर यादी करून पाठवावी. ह्मणजे त्याप्रमाणें घ्यावयास येईल. हें पत्र पोहोंचतांच वडिलीं अलीकडे यावें. केरीस कारकून दोघे ठेवावे. येविसीं श्रीमंतांची आज्ञा आहे. सहस्र पत्रांचे जागीं हें पत्र मानावें. फिरंगी याचा जाबसाल आपल्या विचाराशिवाय होणार नाहीं. देवबाच्यानें काय होतें. सावंतांचा पक्ष आपणास आहे; हें फिरंगी यास माहीत आहे. येथून फौजेची वगैरे फिरंगी यास जरब पोहोंचेल. आण आपण कुटुंबसुद्धां केरींत रहाल. तेव्हां फजीत पडावें लागेल. होडी आणून रात्रीचीं मुलें माणसें व सरंजामसुद्धां आरवदेस यावें. फिरंगी यास पुसून अलीकडे यावें अशी तजवीज करून पुसावयास जाल तर अलीकडे उतरूं देणार नाहींत. या अर्थी बहुत सावधगिरीनें कोणास गोष्ट न दर्श होतां अलीकडे यावें. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

आपण लिहिलेप्रमाणें महाराजांचे कानावर घातलें. माहाराजांची आज्ञा जाहाली. त्याप्रमाणें लिहिलें आहे. हे विज्ञासी.

ले० नं. १३३ श्री. तारीख ३ डिसेंबर १७९४.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

सेवक बाळाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० ९ माहे जमादिलावल मुकाम पुणें जाणोन स्वकीय कुशललेखनाज्ञा करीत असिलें पाहिजे. विशेष. आपल्या-( )त्र राजश्री नारायणरावजी-( ) आलीं तीं पाहिलें. नंतर त्यांतील अभिप्राय ध्यानीं आला. अशी यास आतां-( ) राज्याची नड मिळोन आपण येथ-( ) राजश्री दादा हे समजोन विचार हाच एक पक्ष धरिला तो सेवटास नेऊन श्रीनें यश[1] तुह्मांस दिलें. त्याच अन्वयें हेंही आपलेच हातें होऊन येईल. तिकडील कबलात ज्याणीं केली. त्याचाही पराक्रम येथें आलेवर सर्व हेत कळोन आपले ध्यानीं जलदीच येईल. तस्मात् तेथें त्यांची मसलत समजल्यास आपण तजविजेनें आपला बचाव होईल तैसा करावा. त्याच आहारीं आपण नसावें. हे गोष्टीविसीं पहिलेपासोन आपण रीत जाणोनच आहां. तेव्हां विस्तारें काय लिहावें. वरकड राजश्री रावजीनें लिहिले-

१. वाडीकराचें राज्य सोडवून दिल्याचें यश.

वरून कळों येईल. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. कुटुंबिक आहों-(   ) बहूत काय लिहिणें कृपा लोभ करीत असावा हे विनंती.

ले० नं. १३४ पे॥ सोमवार दाहा घटिका रात्रीस. श्री. तारीख २२ डिसेंबर १७९४.

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरकर यांस हुजूरची[1] आज्ञा. सुरुसन खमस तिसेन मयां व आलफ. तुमचीं पत्रें राजश्री नारायणराव जिवाजी व तुमच्या मुलाचें[2] पत्र तुह्मी साबाजी रामकृष्ण केरकर यांजकडे पाठविलींत. तीं त्याणीं येथें पाठविलीं. तीं पाहोन लिहिला मजकूर कळला. त्याजबरोबर पागा व स्वार आहेत. त्यास लिहून पाठवून जलदी आणवणें. येविसीं विलंब न करावा. त्यास लिहून पाठवून जलदी स्वार व पागा येथें येईसें करावें. वरकड सविस्तर लिहून पाठविणें. छ० २८ जमादिलावल मा॥.

पे॥ मंगळवार सायंकाळीं. श्रीशंभु. तारीख २२ डिसेंबर १७९४.

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरकर यांस हुजूरची आज्ञा. सुरुसन खमस तिसेन मयां व आलफ. तुमचीं पत्रें वरघांटींहून राजश्री नारायणराव जिवाजी यांचीं आलीं. तीं पत्रें राजेश्री भांतो राम यांजकडे लष्करांत पावलीं. त्याची नक्कल मशारनिल्हे यांणीं हुजूर पाठविली. त्यांतील मजकूर समजणेंत आला. तुह्मांकडून कांहींच हुजूर समजणेंत न आलें. अमो तुमचे चिरंजीवासमागमें पागा व शिलेदार आले असतील ते काढून खालीं आणवावे. तूर्त प्रसंगीं उपयोगीं पडोन राजश्री सिंदे यांजकडून उपराळा आला असा दबाव आहे. तर येविशीं अवकाश न करितां पत्र पाठवून पागा व सिलेदार आले असतील ते आणवणें. तुह्मी श्रीचे दर्शनाकरितां केरीस गेलां ते तेथें जाऊन राहिलां. अशाम तेथें तुह्मीं जाऊन राहावें, हें ठीक नाहीं. व हुजूरही तुह्मीं समक्ष असलां ह्मणजे चांगलें. तर पत्र पावतेक्षणीं हुजूर यावें. जाणिजे. रवाना छ० २८ माहे जमादिलावल चंद्र मजकूर.

ले० नं. १३५ छ० १४ शाबान. श्री. माहे डिसेंबर १७९४ अजमासें.

वडिलांचे सेवेशीं चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. इकडील मजकूर आलाइदा पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून विदीत होईल. इकडील कोणे गोष्टीविसीं वडिलीं चिंता न करावी. राजश्री तात्या पागनीस व आह्मी एकच आहों. दुसरा अर्थ किमपि नाहीं. पुढां मसलतीचा डौल मोठाच आहे. येविसीं तीर्थरूपांसही सडे स्वारींत आमचीं उभयतांचीं पत्रें बहुतेक गेलीं आहेत. पुणेंकर श्रीमंत नाना आपल्या सुतांत आहेत. सर्व गोष्टी ईश्वर पार पाडील. पहिलेप्रमाणेंच नक्ष राहील. चिंता नाहीं. फिर्गी याजकडील आपले वतनाचा वगैरे जाबसाल चित्तानुरूप घडोन येईल. सडे स्वारींत पत्रें पाठविलीं. त्याचीं उत्तरें अद्यापि आलीं नाहींत.(   ) प्रार्थना करून सर्व सिद्धीस नेई ऐसें करावें. आपण किमपि चिंता न करावी. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. सर्व अर्थ श्रीमंत माहाराज वैकुंठवासी यांचे प्रतापें पार पडतील. पत्र वाचून फाडावें. दुसरेस न दाखवावें. चिंता एकरूप न करावी हे विज्ञाप्ती.

ले० नं. १३६ पो॥ छ० २२ (   ) श्रीशंकर. सन १७९४.

वडिलांचे सेवेसीं नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. वरकड वर्तमान आलाहिदा पत्र लिहिलें त्यावरून ध्यानीं येईल. इकडील पूर्ववताप्रमाणें बंदोबस्त

१. हुजूरची ह्मणजे वाडी सरकारची. २. विश्राम नरहर याचें.

आहे.[1] कोणेविसीं काळजी न करावी. तात्यांकडून दुसरा विचार नाहीं. एकच आहों. पुढां मसलतीचा डौल चांगला आहे. ईश्वर पार पाडील चिंता नाहीं. तीर्थरूपांसे तात्यांनीं व आह्मीं पत्रें लिहून वाइदेनें पाठविलीं आहेत. तीर्थरूपांचें उत्तर यावयाचा विलंब आहे. सर्व यथास्थित आहे. वतनाचा वगैरे माहालाचा बंदोबस्त ईश्वरकृपेनें यथास्थित घडेल. श्रीमंत पंतप्रधान याणीं श्रीमंत राजश्री दौलतराव बाबांस बोलावून नेऊन बहूत खातरजमा केली. वचनही दिलें कीं; पहिलेपेक्षां विशेष चालेंवीन. आमची मुत्सद्दी मंडळीची बहूत खातरजमा केली. तीर्थरूपांस पत्रें लिहिलीं आहेत. त्यांचीं उत्तरें याच पक्षांत येतील. तीं आलेवर सविस्तर उगवून लिहून पाठवीन. पहिलेपेक्षां दौलतीचा डौल विशेष चालेल. कळावें. तीर्थरूपांची व आपली भेट जाहाली ह्मणजे मोठा आनंद आहे. हें ईश्वर सत्य करील. आपण चिंता किमपी न करावी. येथील विचार यथास्थित आहे. श्रीदेवाकडे गार्‍हाणें घालून कौल उत्तम घ्यावा. पत्रांतील अर्थ दुसर्‍यास न समजे असें करावें. चित्तीं गोष्ट असावी. वडिलांचीं पत्रें सडे स्वारींतून आलेवर सविस्तर लिहून पाठवीन. हे विज्ञापी.

ले० नं. १३७ श्री. इ० सन १७९४.

याद पागा साबाजी नारायण मुरुसन खमस तिसैन मयां व आलफ. रोजमुरा रुपये.

२६ वेंकाजी साबाजी येकांडे.	७५ बारगीर आगा ७ एकूण.
२० खुद्द. ६ शागीर्द पेशा माणसें.	१३ बाळाजी.
	१२ धोंडजी सिंदा.
२६ पोर आगा १३ एकूण दर २ प्रमाणें.	१० दौलतराव चवाण.
२ दोन दांडेकरी आगा १ एकूण.	८ सिवाजी देशमूख.
	८ आनंदराव.
२ सारवान आगा १ एकूण.	८ चेतसिंग.
२ भिस्ती आगा १ एकूण.	८ लक्षुमण.
५८	७५ ७ बारगीर.

एकूण १३३.

यादी नेमले कारकून जमा पागनीस दाजीबा याजकडेस दिल्ही आहे.

ले० नं. १३८ पै॥ छ० २७ माहे रबिलावल. श्रीशंकर.

श्रियासह चिरंजीव राजश्री विश्रामजी यासी. प्रती शिवाजी दुर्लभ अनेक आशीर्वाद उपरी ये-

---

१. शिंद्यांचे दिवाण बाळोबा तात्या पिंगे. २. जिवबादादांस. ३. सवाई माधवराव पेशव्यांनीं. ४. महादजी शिंदे वारल्यावर दौलतरावांस वस्त्रें देण्यासंबंधाचें हें कारस्थान आहे. याबद्दलचें दुसरेंही एक पत्र आहे. सवाई माधवराव पेशव्यांचें मत दौलतरावांना वस्त्रें द्यावीं असें होतें, असें या पत्रावरून उघड दिसतें. पण दोन कोटी रुपये व शिंद्यांजवळ असलेली जांभळा एवढ्या मोठ्या मोत्यांची माळ पेशव्यांस नजर मिळेल तर तीं देऊं, असें फक्त नानांचें ह्मणणें होतें असें दिसतें. (पेशव्यांची बखर पृष्ठ १४२ पहा.) दुसरें पत्र नंबर १३५ वें पहा. ५. साबाजी नारायण राजाध्यक्ष हे शिरवडें एथील राहणार होते. त्यांची स्वतंत्र पागा असून पतक होतें. यांनीं शिंदेशाहींत मोठमोठीं कामें बजाविलीं होतीं. पत्रें नं० १९५।२०३।२७० पहा. ६. व्यंकाजी साबाजी राजाध्यक्ष ऊर्फ बचोबा हे वरील साबाजींचे चिरंजीव होत. ७. हे शिवाजी नाना जिवबादादांचे सख्खे बंधु होते. पण त्यांस हरमल गांवीं राहणार्‍या त्यांच्या भाऊबंदांपैकीं दुलभराव यांस दत्तक दिलें होतें.

थील कुशळ तागायत छ० १७ रबिलावल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें विशेष. तुह्मीं बद्री कासिदासमागमें पत्र छ० १० रोजचें पाठविलें तें काल पावलें. व हुंड्या तिसां हजारांच्या पाठविल्या त्या पावल्या. वरकड घरीं खर्चास जेवायाचा मजकूर लिहिला. तो कळला. आणखी तीर्थस्वरूप राजश्री दादांनीं भिमंचेहून व जावदेहून मिळून दाहा पंधरा हजार रुपये घेतले. ह्मणून लिहिलें. तें कळलें. येथून बद्री कासीद याजबरोबर पोंवळीं दाणे सरी ९८ आठ्याणव दुलडी च्यार ऐसे वजन तोळे २५।५ पंचवीस तोळे पांच मासे आहेत. हीं घेऊन जाब पाठवावा. पेशजीं घरीं हातसरांचे जोड पाठविले होते. त्यासी पोवळीं मिळालीं नव्हतीं. व कोंकणांत रुपये पोंवळ्यां-करितां पाठविले होते. तेथेंही मिळालीं नाहींत. ह्मणून वर्तमान ऐकिलें होतें. याजकरितां पाठविलीं आहेत. त्या हातसरांचे जोडांपैकीं सौभाग्यवती उमा व सौभाग्यवती रुक्मिणबाई यांस दोन जोड दिलेत. त्यांस पोंवळीं नसलीं तरी यापैकीं देऊन बाकीचीं घरीं न्यावीं. यांचे हातसरास आसलीं तरी न द्यावीं. सर्व घरीं न्यावीं. दुसरें राजश्री लखबादादा जोतपुरास गेले होते. त्यांजवर आह्मांस वरात तीर्थस्वरूपांनीं एक लाखां रुपयांची दिल्ही होती. लखबादादा जोतपुराहून आलेमुळें रुपये पटले नाहींत. हालीं लखबादादा व चिरंजीव जगोबा माघारी यावयास फिरले. आतां रुपये पटतील. यास्तव ताकीदपत्र उभयतांचे नांवें तीर्थस्वरूप राजश्री दादाकडून घेऊन बद्रीबरोबर पाठविणें. व पुणेकडील वर्तमान वरचेवर पाठवीत जाणें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं १३९ पुरवणी. श्री. सन १७९४.

वडिलांचे[2] सेवेसीं साष्टांग नमस्कार. सदाशीव मल्हार[3] कारभार करितात. तूर्त काळीं बाह्यात्कारें एक विचारेंच वर्ततात. पुढें कसें होतें पाहावें. फिरंगी याजकडील जाबसाल आह्मीं इकडून लाविलाच आहे. आपण तिकडूनही जाबसाल लावून योजना केली. हेंही उत्तम आहे. योजिल्याप्रमाणें साध्यंतत यावें. बहूत उत्तम आहे. गांवीं जावयाचें दोन महिने तकूब केलें बहूत उत्तम जाहालें. इतकेंत दसरा दिपवाळी जाहलेवर फौज सरंजामसुद्धां वडीलही येतात. ते आल्याअंतीं मसलतीच्या डौलानुरूप घडेल तें पाहावयास येईल. परंतु आपण योजना केली आहे. तेंही संधान साध्यंतत यावें. स्वंबीत नसावें. सडे स्वारींतून वडिलांस फौज सुद्धां येणें ह्मणून सरकारचीं व राजश्री तात्यांचीं व सर्व मंडळीचीं पत्रें गेलींच आहेत. त्याप्रमाणें येतीलच. परंतु कदाचित् तिकडील लोभावर दृष्टी देऊन इकडे यावयास अनमान करितील तर मग येथें आपले मंडळीच्या कारभारासंबंधीं कांहींच ठिकाण राहणार नाहीं. वडील फौज सरंजाम सुद्धां आलेवर आपलेकडील मजबुदी होऊन सर्वच बंदोबस्त होईल. याजकरितां आपण एकत्र सडे स्वारींत वडिलांस लिहून द्यावें जे. तुह्मांस येणेविसीं सरकारचीं वगैरे पत्रें गेलीं आहेत त्याप्रमाणें तुह्मीं जलदीनें यावें. भेटीचें प्रयोजन आहे. व वरकड कीतीएक गोष्टी आहेत. याजकरितां तिकडे न गुंततां पत्रें पावतांच जलद जलद दरमजल यावें. ह्मणून एक पत्र ती॥ दादांच्या नांवें पाठवावें. ह्मणजे डांकेंतून सडे स्वारींत वडिलांकडे पाठवून देऊं. सारांश. तीर्थरूपांचें येणें जाहलेवर आपली भेटी

---

१. निमच. २. हें नारायणराव बक्षी यांणीं आपले चुलते नरहर गणेश उर्फ बाबू यांस लिहिलेले पत्र आहे. ३. यांस भाऊ दिवाण ह्मणत. ४. जिवबादादा दक्षिणेंत येण्याचें कारण त्या वेळीं दौलतरावांस पेशव्यांकडून वस्त्रें मिळत नव्हतीं व खर्ड्यांची लढाई व्हावयाची होती हें होय. ५. दौलतराव शिंदे यांचीं. ६. बाळोबा तात्यांचीं.

होईल. आपली व वडिलांची भेट कोण मार्सीं व्हावी. बहुतां दिवसांची भेट. दान विधान जाहलें पाहिजे. येविसीं येथें ब्राह्मणाकडे पुणेंत शोध करितों. भेटीस किती वर्षें जाहालीं हें लिहिलें पाहिजे. तीर्थरूपांस येणेविसीं सरकारचीं पत्रें निकडीनें गेलीं आहेत. जलदी आलेस उत्तम आहे. (पुढील बंद मिळत नाहीं.)

लें० नं. १४० श्रीशंभु. तारीख ११ जानेवारी १७९५.

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरकर यांप्रती. राजे खेमसावंत भोंसुले बहादर सरदेसाई प्रागणें कुडाळ माहालानीहाय मुरुमन खमस तिसेन मया आलफ. तुह्मांकारणें मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त पाठविले आहेत. स्वीकारून उत्तर पाठवावें. जाणिजे छ० १९ जमादिलाखर.

(शिक्का आहे.)

लें० नं. १४१ श्री. तारीख २१ जानेवारी १७९५.

राजमान्य राजश्री नरबा गणेश केरकर यांस हुजूरची आज्ञा. सुरुसन खमस तिसेन मयां आलफ. फौज सुद्धां आदितवारीं स्वारी करून वाडा व दरवाजा हल्ला करून घेऊन घरास मोर्चबंदी केली आहे. पाणी बंद केलें आहे. आज चार दिवस घर नुसतें आजचा रोज घरांतील लोक दम धरून राहतील तर पाहावें. फिरंगी तिघे व बोंळ राणा व दोन अडीचशें आहेत. नित्य मारगिरी चालली आहे. दो रोजांत येथील बंदोबस्त होऊन पुढील पैरवी घडेल. राजश्री साबाजी रामकृष्ण यास रवाना करितों असें लिहिलें होतें. त्यास अद्यापि मशारनिल्हेचें येणें जाहलें नाहीं. तूर्त येथील खर्चाची अडचण लिहून जाणवावी अशी नाहीं. जागा अडचणीचा यांत खर्चाचा तंटा. या जागेचा बंदोबस्त होऊन पुढील रानांत फौज जाई तें करितां ह्मणजे सर्वच गोष्टीची सोई घडती. थोडक्यावर जाबसाल असतां; तुह्मीं अवसान धरून एवढा प्रसंग संपादिल्यास आजपर्यंत जाहल्या मेहनतीचें सार्थक होतें असें आहे. येथें अडणुक सर्वांची जाहली आहे. साबाजीस रवाना करावा. छ० २९ जमादिलाखर. मर्या.

लें० नं. १४२ श्री. तारीख २१ जानेवारी १७९५.

राजमान्य राजश्री साबाजी रामकृष्ण केरकर यांस हुजूरची आज्ञा. सुरुसन खमस तिसेन मयां आलफ. केरीवर स्वारी येऊन दरवाजा व आडा हस्तगत करून घरास मोर्चबंदी जाली आहे. पाणी बंद आहे. या उपर लवकरच घर हस्तगत होईल. तुह्मीं लवकरच येतों ह्मणून लिहिलें. त्यास अद्यापि आलां नाहीं. तर जलद जलद येऊन पोहोंचणें. आरंवदेंत माणसें राहिलेस गनीमानी सर्द जवळ. त्यास तूर्त माणसें वाडीस मळेगांवीं काढावीं. हें चांगलें. केरीस स्वारी आली. तूर्त खर्चाची अडचण बहूत. ती लिहितां पुरवत नाहीं. एक वेळ या मुकामास सर्वांची थाराणूक पडून ह्मोरले रानांत फौज सरकती ह्मणजे सर्व गोष्टीची सोई होती. येविसीं राजश्री नरहर गणेश केरकर यांस लिहिलें आहे. तुह्मींही बोलून हरप्रकारें सोई करून घेऊन यावें. ह्मणजे हें काम उरकून पुढील कार्यसिद्धि करितां येईल. माहालपैकींही तुह्मीं सोई करवून आणावी. सारांश आतां विलंबाचें काम नाहीं. तुमची येणेची प्रतिक्षा करीत आहों. जाणिजे छ० २९ जमादिलाखर. मर्या.

---

१. हे फोंडें महाल, प्रांत गोमांतक, येथील प्रसिद्ध शूर राण्यांपैकीं होत. हे लढाईंत पडल्याबद्दलचें दुसरें पत्र आहे. २. ही गोव्यांचे फिरंग्याची स्वारी होती. ३. हें मळगांव सावंतवाडीपासून एक कोसावर आहे.

ले० नं. १४३ श्रीशंभु. तारीख ६ फेब्रुवारी १७९५.

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरकर यांस. हुजूरची आज्ञा सुरुसन खमस तिसेन मया व आलफ. फिरंगी यांची आवाई किल्ले यशवंतगडीं यावयाची आहे. अशास तुह्मांकडेस घोडीं[1] आहेत. त्यास जे राऊत जमतील ते कागद पावतेक्षणीं यशवंतगडीं रवाना करावे. येथूनही राजश्री शिवराम जिवाजी सबनीस यांजबरोबर कांहीं लोक व पांचदाहा आगा राऊत व नगारा देऊन रवाना केले आहेत. तुह्मांकडील राऊत आधीं रवाना करून द्यावे. येविसीं अवकाश करूं नये जाणिजे रवाना० १५ माहे रज्जब चंद्र मजकूर.

ले० नं. १४४ श्री. तारीख ७ फेब्रुवारी १७९५ शनिवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें जिवबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १६ रजब मुकाम नजीक केरव गांव. वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री राजे बहाद्दर याणीं राजश्री लखबा लाड यांचीं मुलेंमाणसें कैद करून पंचवीस हजार रुपये मागतात. ह्मणून येथें येतांच श्रीमंत यजमानें साहेबांची भेट व्हावयाचे पूर्वीं हें वर्तमान ऐकिलें. त्यास लखबा आदीकरून आह्मां सर्वत्रांस तिकडील संस्थानचें अगत्य याजकरितां राजश्री तात्या पागनीस यामही अगत्य पडतें. लखबा तिकडे पारसेकर देसाई यांजकडील कारकून परंतु येथें सरकारचे चाकरीचे उपयोगी. श्रीमंतांस सर्व प्रकारें अभिमान. असें असतां दूर दर्शन पाहून तेथ अशा गोष्टी घडाव्या हें ठीक नाहीं. येविसीं वाडींत सरकारांत चार गोष्टी सांगून त्याचे मुलेंमाणसें चिजवस्त सुद्धां काडीमात्र धोका न पोंहचतां तीं जेथें राहतील तेथें पोंहचवून देवावीं. आण येविसीं आपली गोष्ट सरकारांत न ऐकून त्याजकडेस रुपये घ्यावे; अशीच मर्जी असल्यास लखबाचीं माणसें तेथून काढून आपलीं माणसें येथून रवाना केलीं आहेत. त्यांस त्यांचे ऐवजीं तेथें कैदेंत ठेवून यां मागां वडील सरकारांत दंड देत गेले. तसे हेही पंचवीस हजार रुपये चिजवस्त विकून देऊन मुलेंमाणसें सुद्धां वतनाची आस्था न धरितां घांट चढून यावें.[7] लखबांचीं मुलेंमाणसें चिजवस्त सोडून देतात असें असल्यास सोडून देववून तीं जेथें वस्तभाव सुद्धां पोहोंचल्याचें पाठवावें. हें सरकारांतून न होतां तशीच मर्जी असली तर वडिलांस माझें अगत्य असल्यास मुलेंमाणसें सुद्धां तेथून निघून घांट चढून यावें. लाड यांचीं मुलेंमाणसें सोडवून घ्यावीं. आण ते ऐकत नसल्यास आपलीं ओलीस देऊन सोडावीं. तेंही ऐकत नसल्यास रुपये देऊन तुह्मीं मुलेंमाणसें घेऊन देशांत येणें. आमचें अगत्य असल्यास. हे विज्ञापना.

१. केरीं गांवीं जिवबादादांचे येथें घोडेस्वार होते. २. रेडीचा किल्ला ही जैन राजाची राजधानी होती. ३. प्रसिद्ध जिवाजी विश्राम सबनीस वाडी सरकारचे प्रधान यांचे हे चिरंजीव. ४. खेमसावंत वाडी सरकार. ५. दौलतराव शिंदे. ६. पारसेकर देसाई हे मूळचे विजापूरचे बादशहाचे देसाई होते. पुढें यांचीं घराणीं पारसें, आरोबा, वागाळी, अशा तीन ठिकाणीं झालीं आहेत. वागाळीचे घराण्याचा नष्टांश आहे. हे सारस्वतब्रह्मवृंदांतर्गत पेडणेकर शाखेचे होत. ७. जिवबादादांच्या मनाचा केवढा हा मोठेपणा! मनाच्या थोरपणाची मीमांसा केवळ पराक्रम, अधिकार किंवा द्रव्य यांवरून करावयाची नाहीं. ती अशाच गुणांवरून करावयाची असते.

सेवक साबाजी वासदेव व यसाजी वासदेव साष्टांग नमस्कार.

लें० नं. १४५ पुरवणी. सन १७९५.

वडिलांचे सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे.

राजश्री लखबादादा लाड यांचीं मुलेंमाणसें कैद केलीं. त्यांजकडील वस्तभाव घेऊन बाजारांत घांटा सराफाकडेस ठेऊन सरकारांत रुपये घेतले. याशिवाय पहिलेच त्याजपासीं दोन हजार रुपये घेतले आहेत. व सरकारचे पागेचा घोडा येथून राजश्री देवबा लाड यांणीं नेला होता. तोही घेतला ह्मणोन आतांच वर्तमान कळलें. त्यास त्याजकडून मागां दोन हजार घेतले ते व वस्तभाव घेतली ती. त्यांतून एका रुपयाचा विषय न ठेवतां त्यांचा त्यांचे स्वाधीन करून देवावी. व सरकारचा पागेचा घोडा आहे तोही माघारें देवावा. एविसीं सरकारांत विनंती वडिलीं करावी. मान्य होऊन त्यांची चीजवस्तसुद्धां एक कपर्दीक न घेतां रवानगी केल्यास उत्तम आहे. नसल्यास पूर्व पत्रीं वडिलांस लिहिल्याप्रमाणें आमचें अगत्य असल्यास करावें हे विज्ञाप्ती.

लें० नं. १४६ श्री. तारीख १३ फेब्रुवारी १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य जिऊबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत माघ वद्य ९ गुरुवार प्रातःकाळ मुकाम वांकी नजीक मिरजगांव येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. अलीकडे आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं तर सर्वदा पत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतर आह्मी फौज पलटणें कंपूसुद्धां श्रीमंत यजमान साहेबांचे आज्ञेप्रमाणें वद्य १ पदेस मुकाम मजकुरीं दाखल जाहलों. नंतर वद्य ४ स दिनशुद्धी पाहून यजमान साहेबांची व सर्व मुत्सद्दी मंडळी यांची भेट-( ) कौल श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचीही भेट घेतली. पुढां कसकसें होतें पाहावें. अविंदांची मोहीम येथून एक चार कूच होऊन पुढां गेलेवर ईश्वरइच्छेनें घडोन येईल तें पाहावें. यंदां चिरंजीव निराबाई व मथुराबाईचीं लग्नें व चिरंजीव सगूण याचा व्रतबंध व लग्न यंदां केलें पाहिजे. त्यास मुलींस वर वडिलांचे विचारें कोणते ठरले याचा काय तो निश्चय लिहिला पाहिजे. चिरंजीव सगुणाचा व्रतबंध करून सवेंच यंदां लग्नही करून घ्यावें. नवरी चिरंजीव साबाजी आरवदेकर याची कन्याच निश्चय करून तीच सोरगत करार करावी. मुलींस वर पाहाल ते अगोदर मजला सुचना लिहावी. मग येथून लिहून पाठवूं. त्याप्रमाणें निश्चय करून लग्नें फाल्गुन मासीं अगर ( ) उरकून घ्यावीं. याची तरतूद जाहाली पाहिजे. त्यास याच्या सुचना अगोदर जलदी लिहिल्या पाहिजेत. त्याप्रमाणें एथून तजवीज करून पाठवावयास येईल. चिरंजीव सौभाग्यवती लक्ष्मीबाईसही माघारें अजमेरीस जलदी रवाना केली पाहिजे. व चिरंजीव विश्राम यासही जावदेस पाठविला पाहिजे. याजकरितां लग्नें जलदी उरकोन घेतलीं पाहिजेत. चिरंजीव शिऊबा अजमेरीस सुखरूप आहे. हमेशा त्याजकडील पत्रें येतात. चिरंजीव जगोबा सडे स्वारींत सुखरूप आहेत. वरकड इकडील अधिकोत्तर

---

१. हे आरवलीचे रेगे. हे उभयतां बंधु जिवबादादांकडेस कारभारी असत. यांनीं आरवली गांवीं श्रीदेवी सांतेरीचें देवालय बांधिलें आहे. यांचे वंशज हल्लीं सदरहू गांवीं आहेत. २. हें पत्र जिवबादादांनीं आपले वडील बंधु नरोबादादा ऊर्फ बाबू यांस लिहिलेलें आहे. ३. मागचें पत्र पहा. ४. तारीख ४ फेब्रुवारी १७९५. ५. तारीख ८ फेब्रुवारी १७९५. ६. तारीख १२ फेब्रुवारी १७९५.

लिहावें असें नाहीं. चिरंजीव निराबाईस नवरा पाहाल तो अगोदर मजला लिहिला पाहिजे. चिरंजीव मथुराबाईस तों चिरंजीव सौभाग्यवती भीमाबाई मळगांवकर इचा मूल पहिलाच करार केला आहे. ह्मणून कळतें तेंच उत्तम आहे. चिरंजीव निराबाईच्या वराची मात्र योजना करून जलदी लिहिलें पाहिजे. वरकड तिकडील सविस्तर लिहावयास आज्ञा करावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

ले० नं० १४७ श्री. तारीख १३ फेब्रुवारी १७९५.

श्रीमंत राजश्री काकासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती. सेवक भास्कर महादेव साष्टांग नमस्कार येथील तागायत छ० २२ रजब मुकाम वलकी नजीक मिरजगांव जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण छ० २५ जमादिलाखरचें पत्र पाठविलें. तें छ० १० दाहा रजबीं प्रविष्ट जाहालें. जावदेच्या हिशोबाविसीं वडिल्यांस विनंती करून विल्हेस लावावें. हिशोबाचा फडशा जाहालेविना ठीक नाहीं. हमीरगडचे मामलतीचे संधानांत असावें. मामलतीचा जाबसाल निघाल्यास वडिलांस अजमेरीस लिहून पाठवावें. ह्मणोन सविस्तर पत्रीं आज्ञा. त्यास जावदेच्या हिशोबाविसीं राजश्री शामरावजी[1] नित्य विनंती करीतच आहेत. आज दोन तीन दिवस अजमेरचे हिशोब घेऊन फडणीसांचे घरीं जात असतात. श्रीमंत राजश्री दादा[2] यांचा मुकाम येऊन पोहोंचले. श्रीमंत राजश्री बाबासाहेबांच्या[3] भेटी जाहल्या व श्रीमंत राजश्री पंतप्रधान[4] यांच्या भेटी जाहाल्याचें व मामलतीसंबंधीं व हिशोबाचा मजकूर सविस्तर मशारनिल्हेनीं लिहिला आहे. त्यावरून विदीत होईल. तूर्त मोंगलांसीं लढाईचा इरादा आहे. मोंगलांची फौज येथून पंचवीस कोशांवर आहे. श्रीमंत राजश्री भोंसले[5] आज लष्करानजीक आले. दहा पंधरा हजार फौज चांगली त्यांजबरोबर आहे. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विज्ञापना.

हे॥ पत्रीं राजश्री बाबा स्वामीस साष्टांग नमस्कार. लिहितार्थ परिसोन लोभ करावा ही विनंती.

ले० नं० १४८ श्रीशंभु. तारीख १४ फेब्रुवारी १७९५.

राजमान्य राजश्री नरहर गणेश केरकर यांस हुजूरची[6] आज्ञा. सुरुसन खमस तिसेन मयां व अलफ. तुह्मांकडील स्वार किल्ले यशवंतगडीं रवाना करून देणेविसीं पेशजीं एकदोन वेळां लिहिलें. त्यास प्रसंग पडेल ते वक्तीं पाठवूं ह्मणोन तुमचीं उत्तरें आलीं. अशास प्रसंग पडेल तो कांहीं अगोदर समजतो असें नाहीं. याजकरितां आरवंदेस तुमचे स्वार आहेत ते यशवंतगडीं खालीं असतील. सरकारचेही स्वार तेथ आहेत. यास्तव तुह्मांकडीलही रवाना करावे. राऊत रेडीस असले ह्मणजे इभ्रतीचें काम आहे. एविसीं तुह्मांस लिहावें असें नाहीं. सर्व तुमचे ध्यानीं आहे. त्यापेक्षां तिकडील बंदोबस्ताविसीं तुह्मांस लिहून जाणवावें; असें काय आहे. सर्व अगत्य तुह्मांस आहे. जाणिजे छ० २३ माहे रजब चंद्र मजकूर.

ले० नं० १४९ पे॥ छ० २९ शाबान. श्री. तारीख १० मार्च १७९५.

श्रीमंत राजश्री काकासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक शामराव पांडुरंग साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १८साबान मुकाम लष्कर नजीक पाटोद येथें आपले कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अ-

१. हे शिंदेशाहींतील फडणीस होते. २. जिवबादादा. ३. दौलतराव शिंदे. ४. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे. ५. नागपूरकर. ६. हें सावंतवाडी सरकार राजे खेमसावंत यांचे पत्र आहे.

लीकडे आपणाकडून पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तर असें न करितां सर्वदा पत्रीं सेवकास सनाथ केलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान अविंदांच्या फौजा व इकडील फौजांचा मोकाबला जाहला. खासा स्वाऱ्या आठां कोशांचे छटीनें आहेत. आपलेकडील व श्रीमंतांकडील सड्या फौजा अविंदांचे नजीक दिडाकोशां कंपू तोफखाने वगैरे असतात. मोंगल कांहीं तयार होऊन नेहमी लढावयास बाहेर येत नाहीं. काल सोमवारीं दोनप्रहरानंतर नबाबाचें कूच होऊन पुढां दीड कोश दक्षणेच्या आंगें बाहेर बुनगेसुद्धां चालले तेव्हां पुढां तोंडावर श्रीमंतांकडील फौज बाबा फडके व पर्शरामभाऊ व भोंसलेकडील फौज ऐसी होती. त्याची व नबाबाची तोफांची गोळागोळी जाहली. फडके कांहीं कमां गां-( ) इतकेंत आपलेकडील तोफखानेपैकीं दोन बिडी तोफा अविंदांचे फौजेवर सुरु केल्या. तेव्हां फडक्यांचे फौजेवर रोंख होता. तो मागां हटला. आण पुढां मुकाम करावयास गेले. आपलेकडील फौज, तोफा, कंपू पुढें चालून पहिलें नबाबाच्या मुकामाजवळ पाणी होतें. तें घेऊन कायम राहिले. पुढें कसकसें होतें पाहावें. नबाब परांडेच्या किल्याच्या रोखें कूच केलें आहे. आणखी अविंदांचें एक कूच जाहालेवर मग आपलेकडीलही कूच त्याच्या पाठीलागास होईल. अविंद आपले मागां साशंकितच आहे. जोराचा विचार दिसत नाहीं. पुढां होईल तें शेवेसीं लिहितों. आपलेकडील पुढां सडे फौजेंत श्रीमंत राजश्री दादा व भाऊ व धोंडिबा दादा व सदोबाभाऊ असे मुख्य आहेत. बाकी सरदार फौज आहे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान आपले मागां पांच कोशांवर आहेत. याप्रमाणचें वर्तमान आहे. जावदकडील राजश्री कृष्णा भाऊचीं पत्रें हमेशा येतात. तिकडे कांहींक गंगडे यांणीं गिरास मांडला आहे. याविसीं बंदोबस्तास गंगड्यास येथील सरकारचीं पत्रें पाठविणेविसीं लिहिलें होतें. त्याप्रमाणें पत्रें पाठविलीं आहेत. आजमेरीकडीलही सर्व यथास्थित आहे. हल्लीं अजमेरची डांक उज्जन पावेतों बसली आहे. एक कारकून राजश्री माहादाजी बल्लाळ ह्मणोन कामावर येऊन उज्जनीस राहिला आहे. इकडूनही हमेशा पत्रें इकडील वर्तमानचीं लिहून जात असतात. वरकड पीक पाण्याचा पैकींच मखीचा हमेशा लिहून येतच असतो. यंदां थंडीनें दाहा पडून अमळ, जव, चणे जळाले. ह्मणून भाऊनीं लिहिलें आहे. वरकड होईल तें मागाहून सेवेसीं लिहितों. आपली निळाची आंगठी बांधून तयार केली आहे. वाटेच्या बेदेमुळें पाठविली नाहीं. मागाहून कोणी तरी चांगली सोबत येईल त्याजबरोबर सेवेसीं पाठवितों. घडी घडी पत्रीं सेवकाचा सांभाळ केला पाहिजे. तिकडील फिरंगी सांवंत प्रकर्णी सविस्तर मजकूर लिहावयास आज्ञा केली पाहिजे. अजमेरीस लिहावें लागतें. राजश्री सदोबा धाई माडे याच्या मुलांमाणसांकरितां अजमेरीहून लिहून आलें. तेंच पत्र बजिन्नस पाठविलें आहे. त्याप्रमाणें त्यांच्या घरच्याही मजकुराचें लिहिलें पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

लें० नं० १५० श्री. तारीख १२ मार्च १७९५ गुरुवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू मामा वडिलांचे सेवेसीं.

अपत्य विश्राम गंगाधर पालयेकर चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल छ० २० शाबान मुकाम लष्कर येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. इकडील वर्तमान

१. मुसलमानांच्या. २. तारीख ९ मार्च १७९५ सोमवार. ३. जिवबादादा. ४. बाळाभाऊ बक्षी. ५. सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण. ६. श्रीमंत पेशवे जेथें खर्ड्यांची लढाई चालली होती त्या ठिकाणापासून मागें पांच कोशांवर होते.

पेशजीं रावसाहेबांचे पत्रावरून कळों येईल. इकडील वर्तमान तर काल बुधवारीं सायंकाळीं प्रहरा दिवसास मोंगल व यांची लढाई लागली. तेव्हां श्रीमंतांच्या[1] फौजा व होळकर[2] व परशरामभाऊ[3] यांची गोळागोळी फारच होऊन परिश्रामभाऊ यांस जखमा तीन लागल्या. व भाऊच्या पुतण्या-सही ज्यार केला. असें वर्तमान आपलेकडील[4] फौजे व दळ येणें पिछाडीस मारगिरी फारच केली. कंपूनें मारगिरी केली. तेव्हां मोठे सरदार दोन हत्तीचे अंबरेंत सहवर्तमान आणिलें. व घोडीं व उंटें वगैरे सरंजाम त्याजकडील आणिला. आतां तो जागेवर आहे. यांजकडील फौज वेढा देऊन सभोंवती आहे. तीर्थस्वरूप राजश्री दादांनीं त्वरा केली. ह्मणून श्रीमंतांची दया फार आहे. सुमारें मागाहून वर्तमान जसें होईल तें लिहून पाठवूं. आपलेकडील सेरबु आहे. वडिलांस कळावें. बहूत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

ले० नं० १५१ श्री. तारीख १२ मार्च सन १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत फालगून वद्य ६ मुकाम लष्कर नजीक पाटोद येथें वडिलांच्या आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों विशेष. अलीकडे वडिलांकडील आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तर ऐसें न करितां सर्वदा ये-णाराबरोबर आशीर्वादपत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर इकडील व नबाबा-कडील फौजेचा मुकाबला जाहला. उभय दळांचें मुकाम आठां कोशांचे छटीनें आहेत. इकडील सब्या फौजा सज्य होऊन त्याच्या मुकामा आलीकडे दिडा कोशावर कंपू तोफखाना सुद्धां आहेत. रोज उभयतांची गोळागोळी होती. नबाब केवळ तयार होऊन बाहेर लढावयास उभा राहत नाहीं. वद्य ४ थींस मागील दीड प्रहर दिवसास बाहेर बुनगे सुद्धां तयार होऊन तेथून कूच पुढां दक्षिणेच्या आंगें कूच करूं जात होता. त्यांच्या तोंडावर श्रीमंतांकडील बाबा फडके व परशराम भाऊ व भोंसलेकडील ऐसी फौज तळोवास उभे होते. त्यांजवर त्यांनीं तोफांची मारगिरी केली. तेव्हां यांणीं जागा सोडिला. हे आपलेकडील फौजा कंपू घेऊन तीर्थरूप राजश्री दादा आलीकडे उभे होते. त्यानीं पाहून बिडी तोफांची मारगिरी नबाबाचे फौजेवर लाविली. तेव्हां अविंदांची[5] फौज माघां हटून दीड दोन कोशांवर मुकामास गेले. आपलेकडील फौज जागच्या जागेसच कायम राहिली. नबाबानें परांडेकडील रोख धरिला आहे. पुढें कसकसें होतें पाहावें. लग्नाचा वगैरे स-विस्तर मजकूर लिहिला आहे. त्यास उत्तर येतांच कापडाची व खर्चाची तरतूद करून पाठवितों. आतां येथें नित्य लढाईचा प्रसंग आहे. सडे फौजेशीं व नबाबासीं कोशाची छटी आहे. वडील[6] रात्रदिवस कंबरा बांधून उभे राहतात. ईश्वर यश देईल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी. पहिलीं पत्रें माघ वद्यचीं वडिलांचे नांवचीं लिहिलीं होतीं. तीं कांहीं कार्यामुळें राहिलीं होतीं. तीं हल्लीं पाठविलीं आहेत. हे विज्ञापी.

तीर्थस्वरूप राजश्री साबाजी काका वडिलांचे सेवेसीं. विश्राम गंगाधर पालयेकर. चरणावर

१. पेशव्यांच्या. २. तुकोजीराव होळकर व काशिराव, बापूजी वगैरे. ३. पटवर्धन. ४. जिवबादादा यांजकडील. ५. ज्यांचे कान विंधलेले ह्मणजे टोंचलेले नसतात अशा मुसलमानांची. ६. जिवबादादा.

मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील वर्तमान रावसाहेबांनीं लिहिलें आहे. वरून विदीत होईल. बहूत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

लें० नं० १५२ श्री. तारीख २१ मार्च सन १७९५.

राजमान्य राजश्री नरबा गणेश केरकर याप्रती राजे खेमसावंत भोंसुले बाहादर सरदेसाई प्रागणें कुडाळ व माहालानीहाय सुरु सन खमस तिसेन मयां व आलफ. फिरंगी याचे मसलतीस तुह्मांकडून कर्ज घेतले रुपये—

५०० छ० २८ सफर राजश्री सांतो राम आकेरकर पेडणेंस गेले तेव्हां बरोबर.
१००० छ० २ रबिलावल राजश्री रुद्राजी सदासिव( ) व सांतो राम याजकडेस पेडणेस.
१००० छ० ७ रबिलावल पेडणेस पाठऊन गुजारत सांतो राम आकेरकर.
१००० छ० २९ रबिलावल गुजारत उत्तमगिंग पेडणें.
१००० छ० ४ रबिलावल राजश्री मांबास राजश्री सांतो राम आकेरकर याजकडेस गुजारत पांडुरंग नारायण चुबे.
३००० छ० १२ रबिलावल वाडीहून पेडणेस पाठविले.
४००० छ० २४ रबिलावल गुजारत राजश्री सांतो राम.
२००० पेडणेस पाठविले.
२००० बक्षी सालांत गुजारत लक्ष्मण फर्जंद.
४०००
१००० छ० १२ जमादिलावल सालचे मुकामीं गुजारत राजश्री सांतो राम आकेरकर.
२००० छ० १२ जमादिलावल रा. उसवास गुजारत राजश्री सांतो राम आकेरकर याजकडेस वगैरे.
६९५॥. छ० २० जमादिलावल पेडणेस गुजारत पांडुरंग नारायण चुबा व सदासिव गोपाळ रांगणेकर.
६०० जमा पेडणेस गुजारत रामसावंत भोंसुले तिरवडेकर.
१०० छ० ३ जमादिलावल.
३०० छ० १७ रजब.
२०० छ० ९ रज्जब.
६००
३५४८≈॥. छ० २ जमादिलाखर जमाव तर्फ पेडणें.
१६६॥=॥. लोकान जमा राजश्री लक्ष्मण काळसेकर.
१८७॥. सोदसीलाल. १००६८=॥. ऐन नांवें.
३५४८≈॥.
२००० छ० २७ साबान रवाना घोटगे नजीक आवाडें येथें पाठवूस गुजारत रा॥ हणमंतराव घांटगे कलवाडकर व दौलतराव मोहिते याजबरोबर ऐवज पाठविला त्याचे भरतीस.
२०० छ० ५ रबिलाखर गुजरात त्रिंबकराव शिवराम चिटणीस वाडींत हुजूर घेतले.

१. हलीं यांचे वंशज वाडी संस्थानांत करवडे गांवीं राहतात.

२५० छ० ११ जमादिलावल रा. विसोजी माहादेव सिश्वेश्वरकर रवाना पुणेस देविलेपैकीं. १८५९९॥≈॥.

एकूण साडे अठरा हजार साडे नव्याणवद रुपये साडे तीन आणे. तुमचे घेतले. ते सरकारांतून देविले जातील. जाणिजे छ० २९ माहे शाभान.

लें० नं. १५३ माहे मार्च १७९५.

पुरवणी—चिरंजीव राजश्री विश्राम काकास आशीर्वाद उपर. तोखीवर व रुपा गुजर वगैरे यांचे घरीं रुपये देणेंविसीं वरात पा॥ त्यास लि॥ अन्वयें रुपये त्यांचे घरीं देतों. इकडील कांहीं चिंता न करावी. राजश्री नरोबा दादांचे गांवचा मजकूर लि॥ त्यास लि॥ प्रमाणें त्याचेही गांवचा फडशा करून मशारनिल्हेची समजोत्री पाडितों. आमचे दुखणेंचा मजकूर. तिजोरीची पाळी येती ती आजवर येत आहे. औषध उपाय, दानधर्म, तोटगी दोरे वगैरे जें करणें; तें बहूत केलें. परंतु अद्याप कांहींच गुणास येत नाहीं. दिवसेंदिवस अधिकच होत आहे. शरीर कृश( ) आहेच. त्यांत चैत्र शु॥ १३ चिरंजीव मूळ बाबास देवी निघोन त्याचा काल झाला. असें दुःखांत दुःख हेंही प्राप्त जाहलें. ईश्वरइच्छा प्रमाण. श्रीहरी ठेविल तसें राहावें लागतें. आह्मी घरास लखोटा लिहून या कामिदाकडे दिला आहे. तो कालेलीस प्रविष्ट केला पाहिजे. फिरंगी याचा तहरह अद्यापी ठरला नाहीं. ह्मणोन लिहिलें. तें कळों आलें. एक वेळ सलूख होऊन मुलेंमाणसें वडीलसुद्धां केरीस जाणें घडल्यास उत्तम आहे. बरें श्रीदेव करील तर मत्वरच मनोदयानुरूप घडून येईल. वैशाख मासीं लग्नें आहेत. ह्मणोन लिहिलें उत्तम आहे. ( ) चा लढाईचा मजकूर फाल्गून वद्य ५ पासून सात रोज लढाई जाहली. मोंगलांचा पराजय होऊन श्रीमंतांची फते झाली. यश तीर्थस्वरूप राजश्री दादांस आलें. मोंगलांचा गळाटा फारच केला. फौज बुनगे लुटून आणले. हत्ती तोफा वगैरे सरंजाम लूट फार आली. एक सरदार मातबर धरून अंबारी हत्तीसहीत आणला. पांच दाहा नामी सरदार ठार व जखमी जाले. आपणाकडील राजश्री परशराम भाऊंस जखम लागली. व मशारनिल्हेचा पुतण्या कामास आला. वरकड सर्व इकडील सरदार सुखरूप आहेत. खासा मोंगल—( ) घेरून आहेत. सलुखा—( ) कडील मुद्दे त्यांणीं कांहीं कबूल केले. कांहीं होयाचे तेही करील. आतां लढाईचा इरादा दिसत नाहीं. मसलत लवकरच समेटणेंत येईल. अजमेरीपासून उज्जनीपावेतों डांक वडिलांनीं ठेविली आहे. त्यामुळें आह्मांस वर्तमान वरचेवर समजत आहे. आपणाकडेही सविस्तर वर्तमान आलेंच असेल. कळावें याकरितां सुचना लिहिली आहे. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

राजश्री साबाजीस साष्टांग नमस्कार विनंती. लि॥ परिसोन लोभ करावा. तुमचे घरचीं सर्व सुखरूप आहेत. कांहीं काळजी न करावी. गांवचे सुटेचा मजकूर लिहिला. त्यास प्रगणेंत सिरस्ता निघाला. त्याप्रमाणें आपलेही गांवचा फडशा होऊन येईल. ( ) तेव्हां आपले—(यापुढील बंद मिळत नाहीं.)

१. यांचे वंशज हल्लीं पेडणें, प्रांत गोवा, येथें राहतात. २. याप्रमाणें आणखीही कागद जिवबादादांचे येथें पुष्कळ आहेत. हे रुपये पुढें परत मिळाले नाहींत. ३. जिवबादादांस.

लें० नं. १५४ पौ॥ छ० १३ शाभान. माहे मार्च १७९५.

राजश्री नरहर गणेश केरकर गोसावी यांस.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नों रामसावंत भोंसुले तिरवडेकर रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. सांप्रत आपणाकडील स्वकी व राजकी वर्तमान कांहींच कळलें नाहीं. तर सविस्तर लिहिणें. पुणेंकडील वर्तमान कांहीं आलें तें सविस्तर लिहिलें पाहिजे. हरीपंत फडके व नाना रास्ते व होळकर तुकोजी बावा या त्रिवर्गांचें वर्तमान देवआज्ञा जाहाली ह्मणोन ऐकितों. तें खरें किंवा लटिक हें लिहिणें. राजश्री जिवबादादांकडील वर्तमान कसें काय आहे. तें लिहिलें पाहिजे. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. १५५ पौ॥ छ० ३ रमजान सन खमस. श्री. तारीख ४ एप्रील सन १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत फाल्गुन व॥११ मुकाम नजीक खर्डें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप आहेत विशेष. इकडील मजकूर सविस्तर पेशजीं लिहिलें आहे. त्यावरून विदीत होईल. लग्नाचा मजकूर पेशजीं लिहिला आहे. त्याप्रमाणें सोरगती निश्चय करून वैशाख मासीं मुहूर्त कोणते करार ठरविला. ते जलदी लिहिलें पाहिजे. त्याप्रमाणें मी वडिलांचा निरोप घेऊन मुहूर्ताप्रमाणें मी यावयास येतों. माझें येणें होईल तेव्हां समागमें लहानमोटीं पावणशें घोडीं येतील. याजकरितां अगोदर कांहीं चंदी हरजिन्नसी सरंजामाबरोबरच खरेदी करून पाठविली पाहिजे. तैसी वैरणीचीही सोई करून ठेविली पाहिजे. वरकड सर्व पेशजी पत्रावरून विदीत होईल. काल श्रीमंत पंतप्रधान यांणीं तीर्थरूपांस[1] बोलाऊन नेऊन बहूत तारीफ व खातरजमा केली. बहुमान देत होते. तो यांनीं घेतला नाहीं. मग घेऊं. तूर्त घेत नाहीं. असें बोलून माघारे आले. चौंकडे लौकिक चांगला झाला. मोंगलांची लढाइ मारली सला ठरला आहे. वरकड मागाहून सविस्तर लिहीन. हे विज्ञाप्ती.

लें० नं. १५६ श्री. तारीख १३ एप्रील १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेशीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत चैत्र वद्य नवमी मुकाम तांदूळवाडी नजीक परांडा येथें सुखरूप असों विशेष. कासिदाकडेस व जासुदाकडेस आशीर्वादपत्र पाठविलें पाहून भेटीसमान हर्ष जाहाला. ऐसेंच सर्वदा पत्रीं सांभाळ केला पाहिजे. लग्नाविसींचें लिहिलें. त्यास मंत्री याचे घरीं सोरगत करावी. असें निश्चयांत आणोन वडिलीं लिहिलें त्यावरून तीर्थरूपांचे ध्यानीं येऊन निश्चय करावयास बागणीस राजश्री भास्कर माहादेव बांदेकर याची रवानगी केली. बागणीस जाऊन वरदक्षिणा वगैरे मंत्री याचे जाणे येणेचा निश्चय करून आपलेकडेस व इकडेस लिहून पाठवितील. त्याप्रमाणें येथून मंत्री यांचे घरीं खर्चाव्यर्चाचा बंदोबस्त-( ) वा व यास येईल. व वडिलांसही लिहून पाठवूं. लग्नें आरवदेंत करावीं. ही सल्ला केली. ती उत्तमच केली. मळगांवीं जागा ठीक नाहीं. कापड पाठविणेविसीं लिहिलें त्यास बराणपुरी, ज्याहानाबादी, व माळवी व बदली आहेतच. लुगडीं मात्र घेतलीं पाहि-

---

१. जिवबादादांस.

जेत. त्यास येथून कारकून पुण्यास पाठवितों. ह्मणजे लुगडीं रुपेचे दागिने चंबू पंचपात्रें वगैरे वडिलांकडे पाठऊन देईल. वरकड वडिलांनीं लिहिलेअन्वयें मागां अवघा सरंजाम पाठवून देवितों. माझें येणेचा मजकूर तर श्रीमंत यजमान साहेब निरोप देत नाहींत. व सिलेदाराचे गुत्ते देणें घेणेचे बहूत आहेत. तत्राप तिर्थरूपांची व पागनीस वगैरे मुत्सद्दी यांची भीड घालून निरोप जाहालेस येतों. माझे चित्तीं वडिलांची भेट घ्यावी हें बहूत आहे. प्रयत्न करून पाहतों. हिंदुस्थानांत लष्कर गेलेस तूर्त येणें होत नाहीं. सारांश. वडिलांच्या भेटीची इच्छा आहे. मोगलांची मामलत ठरली. मोंगलांनीं तीन कोट रुपये व बत्तीस लक्षांचा मुलूख श्रीमंत पंतप्रधान यांस द्यावा. मोंगलांनीं असें ठरविलें. मोंगल पांच सात मजला दरकूच करून बेदराकडेस चालला. तीर्थरूप येथून पांचसहा कोशांवर सडे फौजेंत आहेत. तेही उद्यां येतील. श्रीमंत पंतप्रधान पुणेंस लवकरच जातील. श्रीमंत यजमान साहेबांचें लग्न वैशाख शुद्ध पक्षीं दुसरें करून सडे देवदर्शनास जाऊन तोफखाना व कंपू व फौज बऱ्हाणपुरास रवाना करून पुणेस जातील. मी वडिलांच्या भेटीस येणेंकरितां बहूत प्रयत्न करितों. घडेल तें प्रमाण. वरकड सविस्तर मागाहून पाठवितों. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. चिरंजीव राजश्री विश्राम यासी आशीर्वाद वडिलांच्या पत्रावरून कळेल. हिशोबाचा फडशा लवकर करून घेतों. तुमच्या मनांत कोणती मामलत कर्तव्य असेल ती करून घेऊं. लग्नें जाहल्यावर तुह्मीं वडिलांच्या आज्ञेप्रमाणें यावें. नबाबाची लढाई मारली. याजमुळें तीर्थरूपांस मोठें यश आलें. श्रीमंत पंतप्रधान व श्रीमंत नाना व यजमान साहेब यांची बहूतच आस्था आहे. या समयीं एकदोन गांव कोंकणचे करून घ्यावे. असें वडिलांचे चित्तीं आहे. घडेल तें प्रमाण. तुह्मांकडील सविस्तर लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. १५७ (अ) मे० आक्वर्थसाहेब यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांतून
खर्ड्याचे लढाईबद्दलचा उतरून घेतलेला पोवाडा.
हा पोवाडा रामचंद्र कविकृत आहे.

हिंदुस्थान गुजराथ सोडून शिंदा दक्खनेंत आला ॥ हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ ध्रुवपद ॥
मजल दरमजल नर्मदा उतरून आले पार । धरला दक्खनचा सुमार । बेगुबेग येऊनि पाणि घेतलें गंगेतीर । फौज होती चाळीस हजार । मनीं मनसुबा करुनी चढले बालेघाटावर । धरला व्यंकाजी तस्कर । मग कित्येकांस जरब पोंचली मरुन झाले चूर । पळाले पुंड पाळेकर । तेथून जलदिनें कूच करूनी दाखल तुळजापूर । आले दक्खनांत झाले जाहिर । दक्खनदेशीं अंबा भवानी दैवत अनिवार। देवीस केला नमस्कार । (चाल) दिलें तुळजापूर सोडूनी । गेले चंद्रभागा उतरूनी । खबर ऐकिली श्रीमंतांनीं । दोन कोस आले चालुनी । भेटले हाडपसराचे रानीं । नेमिली पुण्याची छावणी । जवळ पेठ आहे भवानी । मुक्काम वानवडीवर केला ॥ हिंदुस्थान० ॥ १ ॥

सहा चार महिने तिथें गुजरले पुण्यास येऊनी । मनसुबा बहु सबळ करुनी । नबाबांस पत्र लिहिलें फार फार अर्जिनीं । खर्चि द्या आह्मांस पाठवुनी । जासुद जोड्या केल्या रवाना पोंचल्या जाऊनी । पत्र टाकिलें मुजरे करुनी । नबाब, बाहादर मश्रूल्मुलुख एक मसलत करुनी । पत्र पाहिलें त्यांनीं । वाचून परगण्यावर चिठ्या नेमिल्या समय सम पाहुनी । नगदी ऐवज दिला लावुनी ।

१. नरोबादादा. २. जिवबादादा. ३. शिंदे दक्षिणेंत सन १७९२ मध्यें आले. ४. गंगा ह्मणजे गोदावरी.

पांसष्ट लाख रुपये पोंचले नाहीं भरलें मनीं । दक्खनचा हिशोब घेऊं भरुनी । (चाल) ऐसें करणें भगवंताला । हिंदुस्थान ज्यानें काबिज केला । परतुन दक्खनमधीं आला । पुणें शहरीं कौळ झाला। खबर कळली नबाबाला । नबाब बेदरावरी आला । खरें खोटें भासे लोकांला । तर्कीं दवलतराव स्थापिला । हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान० ॥ २ ॥

नबाबानें पत्र लिहिलें श्रीमंत नानाशीं । शिवाय दवलतराव बापूशीं । पांसष्ट लाख रुपये आह्मीं कर्ज दिलें शिंद्याशीं । लवकर द्या आमचे आह्मांशी । आटोकाट सरदार मिळोनी बसले मनसुब्याशीं । क्रोध आला दवलतरावाशीं । तुह्मी बसुन रहा पुणें शहरीं हुकुम करा आह्मांशीं । पाहून घेतों नबाबाशीं । तमाम फौजा मिळोनि दिले रोजमुरे त्यांशीं । बोलाविलें जिवबादादांशीं। तिथें जेवत असलां तर इथें या तुह्मी पाणी पियाशी । घेऊनि देवजी गवळ्याशीं । (चाल) येऊनी लवकर पोंचले । श्रीमंत पुण्याबाहेर निघाले । मुळामुठावर डेरे दिले । बावन उमराव मिळाले । एकंदर बसुनि मनसुबे केले । भोंसले तेहि लवकर आले । शिंदे अघाडीस घातले । येऊन शिनेवर शह दिला ॥ हिंदुस्थान० ॥ ३ ॥

बेदर सोडुन नबाब लवकर बाहेर निघाले । अमीर उमराव संगें घेतले । चला चला ह्मणून लवकर धारूरावर आले । पुण्याकडे झेंडे फिरविले । तेथुन जलदिनें कूच करूनी वांजरा नदीवर आले। फिरंगी अघाडीस घातले । शेकसलाची करूं कंदुरी मशीरन बोलले । पेशवे थरथरां कांपूं लागले । पांसष्ट लाखांचा मुलुख मागतां तेही विसरून गेले । स्वप्नीं नबाब दिसूं लागले । सांडीवरती सांडी फिरती डांकवाले बसविले । वरचेवर बातमी आणवूं लागले । (चाल) घांट उतरले मोहोरीचा । मार्ग धरिला पुण्याचा । एकच गट करुनी फौजेचा । माळ चढले नायगांवाचा । तकवा आला तिकडुन पेशव्यांचा । निश्चय केला यांनीं झुंजायाचा । धडाधड बार सुटे तोफेचा । मुसा रहिमुनचा मोर्चा तुडवीला ॥ हिंदुस्थान० ॥ ४ ॥

नबाबानें मोर्चा तुडविला कळलें श्रीमंताला । अजुरदे जाले बहु मनाला । अमीर सारे बोलावुनी आणिले डेऱ्याला । वक्त हा बुडायाचा आला । नाना फडणवीस एक मसूदी तर्क त्यानें काढिला । बोलाविलें जिवबादादाला । तुह्मीं अघाडीस असतां मनसुबा कसा नाहिं कळला । नबाब गफलतीनें आला । तीच विरश्री धरून सड्या फौजा अघाडीला । चुरस लागली तेव्हां शिंद्याला। भिवराव पानसे तोफखाना त्यांचे हवालीं केला । फिरंगी लोक तैनातीला । (चाल) पेशव्यांनीं विंचरणा रोंखून । सड्या फौजा पुढें देऊन । रास्त्यांनीं एक अलंग धरून । फडक्यांनीं तवाफेरा बांधुन । राजे बहादर नाम निशाण । फौजा नानाच्या आध्यानें । तेथें मिळाले अष्टप्रधान । हौद्याशीं हौदा भिडुनी गेला ॥ हिंदुस्थान० ॥ ५ ॥

१. तारीख १२ फेब्रुवारी सन १७९४ रोजीं वानवडी येथें. २. पुण्यांतील शेकसल्लास. ३. महंमदाची मुलगी फतिमा इच्या नांवानें मुसलमान उत्सव करितात तो. ४. मुसा रहिमान हा पेशव्यांचा आरब सरदार होता. ५. खट्टू, खिन्न. ६ मुत्सद्दी. एक मसूदी=अद्वितीय राजकारणी पुरुष. ७. पुणें येथील शुक्रवारांतील पानसे यांचे पूर्वज. ८. लांब ओळ, बाजू. ९. तवातोबरा ? पूर्वी प्रत्येक घोडेस्वारानें मुलूखगिरीवर जातेवेळीं एक तवा व एक तोबरा इतकी सामुग्री तरी जवळ बाळगावी, असा प्रघात असे. त्यावरून तवातोबरा ह्मणजे मुलूखगिरीवर लागणाऱ्या वस्तु असा अर्थ झाला. १०. सभोंवतीं ?

करून स्वारी तयार नबाब जरदा अंबारींत । बेगम्यापुढें[1] हुजुरात । त्यांची उमेदवारी पेशवे सर करूं सहजांत । बांधली रांडांनीं हिंमत । मुश्रुल्मुलुख त्याचे मसूदी राजा नेमिवंत । झाडुन फौजा त्याच्या अंकित । रोशनाखा परबिनीवाले नबाबाच्या हुकुमांत । भरअमल दोन्ही दळांत माहीत । इस्मालखा पठाण गारदी त्यांचे संगत । नाभी करवेंळ आहे हुजुरांत । फाजलखा रोहिले खांसि बारा हजार जमात । जंबुरे जोडून उंटावरत । (चाल) नबाबानें हल्ला केली । फौज लोणिचा माळ चढली । दोन्ही दळें उभीं टाकलीं । नामी सरदार आसदअली । तोफखान्याला शिलक[3] दिली । देवडी मार जेव्हां बसविली । पेशव्यांची फौज मागें हटविली । फिरुन खर नदीवर मुक्काम केला ॥ हिंदुस्थान० ॥ ६ ॥

रातोरात आणून तोफखाना जोडिला जिवबादादांनीं । लोणीगार माळ पसरुनी । एकापरीस एक शिपाई रांगडा हिंदुस्थानी । दोन कंपू फिरंगाणी । मन्याबापू भोंसले परशरामभाऊ आज्ञा घेऊनी । एक मोर्चा त्यांनीं रोंखुनी । भवानराव प्रतिनिधी आले अनुपान भोगुनी । एक मोर्चा त्यांनीं रोंखुनी । चौकोमांची लांबण पडली कोणांत नाहीं कोणी । बहिऱ्यांमधीं[5] फौज गेली मिसळुनी । (चाल) तोफेचा एकच वर्षला कहर । गगनीं लागुनी गेला धूर । मायेशीं पारखलें[6] लेंकुर । नबाबाशीं कळुन आला फितूर । मजल काय सुटेल तोफेचा बार । पांचजण निवडले रणशूर । मुसा रहिमुनचें बुडविलें लष्कर । रमणा[7] बहुत तिथें मातला ॥ हिंदुस्थान० ॥ ७ ॥

लालखान वजीरखान ह्यांनीं रणांत घोडीं घातलीं । परशुरामभाऊशीं जखम चढविली । दाजीसाहेब येथें शामजंगास स्वारी केली । पठाणी लोक संग हाटेली । कटाव करीत चालले जेव्हां तिराचे मार बसविली । भोंसल्यानें गर्द बाण उडविली । वजिरखानाशीं बाण लागतां हौद्यांत जान[8] मोडिली । लालखांची सुद नाहीं लागली । बाळासाहेब ठार जहाले वस्त[9] सैन्य पडली । खना खना लव्हागर्द उडाली । भले भले सरदार ह्यांनीं बहिरीत तोंडें घातलीं । अंबारी नबाबानें फिरविली । (चाल) लोक लोक झाले चंथत । नबाब मश्रुल्मुलुख हौद्यांत । आनंदराव किल्ला ठेवा नजेरत ।.हावाई लाविली किल्ल्यांत । नबाब दाखल सुलतान दुर्गांत । बुणगे आले शिवपट्टणा भोंवत । वेढा काय शिंद्याचा पडला । हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान० ॥ ८ ॥

खर नदीवर दिले मोर्चे किल्ल्याशीं रोंखून । फौज नबाबाची घेरून । जिवबादादा श्रीमंताशीं बोले अर्ज करून । नबाबास क्षणांत घेईन लुटून । लुटल्यावांचून कारण नाहीं बसा शह देऊन । नाना करील तेंच प्रमाण । बेदड्यांसी[10] हुकूम टाका रस्ते बंद करून । रुपया शेर तेव्हां मिळेना अन्न । पाण्यावांचुनी फौज तरसली[11] नबाबानें ऐकून । सल्ल्यास धाडिले गोविंद किसन । (चाल) गोविंद किसन आले परतून । नबाबाशीं वर्तमान सुचवून । मश्रूल्मुलुख दिले पाठवून । पेशव्यांनीं टाकिलें कैद करून । जसा सांपळ्यांत व्याघ्र कोंडून । नबाबाशीं नानाचें वचन । खातरजमा झाली येथून । अवघा चित्तिंचा विकल्प उडाला । हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान० ॥ ९ ॥

शके सत्राशें सोळा आनंदनाम संवत्सर । फाल्गुन वद्य षष्ठी बुधवार । किल्ल्यामधिं येऊनि नबाबासीं आठवला विचार । द्यावी निंबाळकराशीं जाहागीर । नबाब बोलतां हजर विश्वासराव बापू सु-

१. बेगम्या ? नबाबाचा जनानखाना बरोबर हत्तीवर वागत असे. २. बंदुकीस्वार. ३. सरबत्ती. ४. ? ५. तोफांच्या आवाजामुळें बहिरपणा आला होता. ६. पारखलें=परकें झालें; त्याची ओळख बुझाली. ७. तुमुल युद्ध, हातघाईची लढाई, गर्दी. ८. जीव. ९. मस्त सेना. १०. पेंढाऱ्यांशीं? ११. त्रासली.

पेकर । आणविले आपासाहेब निंबाळकर । भेट घेऊनियां करा कुचाचा विचार । किल्यामधिं सदरज्याहा बाहादर । शके सत्राशें सत्रा राक्षसनाम संवत्सर । चैत्र पौर्णिमा शुक्रवार । दळभार घेऊन नबाब वांजरा नदीच्या वर । संगें होते निंबाळकर । (चाल) करुनियां अखेर त्या वेळेस । नबाब गेले भागानगरास । श्रीमंत पोंचले थेट पुण्यास । गैबिचें देणें भुजंग आयास । कादरभाई चाकरू दिले बिनीस । त्यांनीं जाऊनि गांठिलें हारदास । रामचंद्र गातो मजलशीला । हिंदुस्थान गुजराथ सोडुनी शिंदा दक्खनेंत आला । हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ १० ॥

ले० नं. १५७ (ब.) श्रीगजानन प्रसन्न.

खर्ड्याचे लढाईचे प्रसगींचा जिवबादादांवरील पोवाडा.

शिंद्याचे मुख्य सरदार जिवबादादा एक वीर भारती । पन्नास हजार फौज फिरंगी तिन कंपू संगें जाती ॥ धृ० ॥ आटोकाट सरदार मिळोनी बैसले मनसुभ्यासी । त्यांचा मनसुभा नये एकही कामासी । क्रोध आला दवलतरावासी । तुह्मी बसुन राहा पुणें शहरीं हुकूम करा आह्मासी । पाहून घेतों नबाबासी । पाठविलें पत्र नर्मदापार जिवबादादांशी । तमाम फौज मिळोनी दिले रोजमुरे त्यांसीं । बोलाविलें जिवबादादासी । तेथें जेवत असलां तर इथें या तुह्मी पाणि पीयासी । घेउनी देवजी गौळ्यासी । (चाल) जिवबादादा गर्जत आले । श्रीमंत पुण्याबाहेर सामोरे गेले । मुळामुठा नदीवर डेरे दीले । बावन उमराव मिळाले । एकंदर बसून मनसुभे केले । भोंसुले तेही लवकर आले । जिवबादादानें विडे उचलले । सिंदे अघाडीस घातले । येऊन शिनेवरी शह दिले । हिंदुस्थान सोडून दादा दक्षिणेमधें आले । हुकूम तेव्हां धन्यानें केले ॥ शिंद्याचे मुख्य सरदार जिवबादादा० ॥ १ ॥

जिवबादादा ते रणफंदी । काबिज हिंदुस्थान शिबंदी । करून आले दक्षिण संदी । फौजेंत करिती ताकिद श्रीमंत सडे स्वारिला सद्दीं । त्या गणेशपंत भेऱ्याला बाबा फडक्याला आर्दी । त्या पर्शराम भाऊला जिवबादादाला ह्मणती बांधा हद्दी । दादाबरोबर तुह्मीं मिळून जावें झुंजायाला उठा आधीं । (चाल) श्रीमंताची तयारी जिवबादादा मनीं चरकती । अररररर शाबास बापांनो ह्मणती । नाना फडणिस सखाराम बापू जिवबादादास पूसती । जिवबा बोले गर्जुन मोंगल काय आणिला जिन्नस हरती। उडवीन बावीस टोप्या झेंडे नेउन लाविन आकाशावरती । केलीं वस्त्रें पांच जणांसी दिली आज्ञा झुंजायास तरवार मारती । (चाल) तों पर्शरामभाऊ बाबा फडके एकजूट आधीं नबाबावर गेला । झाले मोंगल तयार तोंड लागलें प्रहर दिवसाला । आपा बळवंत बाबा फडके जखमा पर्शराम भाऊला । जबर मार पडली हुजरातीला । त्या पर्शरामभाऊ बाबा फडक्याला । जखमा चढल्या मर्दाला । त्यांनीं देवडी मार जेव्हां दिला । तेव्हां पेशव्यांची फौज मागें हटविली जमाव पळाला । फिरून खर नदीवर मुकाम केला । नाना फडणवीस एक मुत्सद्दी तर्क त्यानें काढिला । बोलाविलें जिवबादादाला । तो जिवबादादा बक्षी अलबेला । ते वेळे काय बोलला रावसाहेबाला । तो कसला कसा मोंगल आहे पाहुं द्या मजला ॥ शिंद्याचे मुख्य सरदार जिवबादादा० ॥ २ ॥

---

१. मे० आकवर्थ साहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत पृष्ठ १३५ पासून पृ० १७८ पर्यंत खर्ड्यांचे लढाईबद्दल सात आठ पोवाडे आहेत. खर्ड्यांचे लढाईंत जिवबादादांनीं केलेल्या पराक्रमांचें त्या पोवाड्यांतून जें वर्णन आहे, तें एकवट करून हा पोवाडा आह्मीं तयार केला आहे. मूळांतील अर्थ व कवित्वही फारसें बिघडूं न देतां प्रासासाठीं कचित् नवीन शब्द घातले आहेत.

ग्रंथकर्ता.

त्या बुधवारच्या दिवसीं तिसऱ्या प्रहरीं । त्या जिवबादादानीं तोफा लाविल्या दोहीं भारीं । झाला हुकूम तोफखान्याला किल्ली जिवबादादा हातीं धरी । कंपुची झढती लईन गोळ्या जणूं गारा वर्षती फैरी । (चाल) रातोरात आणुन तोफखाना जोडिला जिवबादादांनीं । लोणीगारमाळ पसरूनी । एकापरीस एक शिपाई रांगडा हिंदुस्थानी । तीन कंपु फिरंगाणी । (चाल) जिवबाची मर्दुमकी निराळी मोंगलांची केली टवाळी । जिवबादादाची दिसंदीस बाहाली । (चाल) निसंग नारायणराव बक्षि । हटकुन मारी उडता पक्षी। बंदुकीला कपव्यास नखी । फत्ते होई तों गोड न भक्षी । (चाल) बाळोबास तर लढाईस काळिज नाहीं । पण धीट रणामधें उभाच राही । धोंडिबास जगदंबा साही । जय करण्याची चिंता वाही । सदाशिव मल्हार कांहीं । मागें पुढें तिळमात्र न पाही । देवजी गौळी रिपूस बाही । शत्रुची त्यांनीं करुन दिली लाही । (चाल) गादीवर दौलतराव शिंदा । बहुत शिपायांचा पोशिंदा । त्याच्या नांवें करुनी सनदा । लष्करीं एकही नाहीं अजुरदा । त्याचे पदरचे जिवबादादा सुद्धां । (चाल) मोंगलांचे उजवे बाजूवर उभें जिवबादादांचें लष्कर । भरुन सातशें तोफा तयार मागें लावुन दिलें पेंढार । सीतर पाहाड पाहा जिवबादादा कंबरक्यांत सोडी बार । धडाधडा तोफेचे बार लागतां पडती स्वार । घ्या घ्या ह्मणुन घाव घालिती रक्ताचे वाहाती पूर । पळावया कोठें रीघ दिसेना मध्यें शिरलें पेंढार । माल्यानें टोंचून पाडिती लुटून घेतलें लष्कर ॥ शिंद्याचे मुख्य० ॥ ३ ॥

खर नदीवर दिले मोरचे किल्ह्यांसी रोंखून । फौज नबाबाची घेरून । जिवबादादा श्रीमंतांसीं बोले अर्ज करून। नवाबास क्षणांत घेईन लुटून । लुटल्यावांचुन कारण नाहीं बसा शह देऊन । (चाल) बिनी दौलतराव शिंद्याला कूच करुनी ह्मोरे केला । सिमेवरता तळ दिला तेथें जिवबादादा आला । (चाल) तेव्हां तिन लाख मिळाली झान पेशवेशाई । प्रतिनिधीबरोबर माधव सवाई । दौलत केली खराब मोंगल खर्ड्यामधीं घातला एकच घाई । सभोंवताल्या लाविल्या तोफा जिवबादादानें पिरूस हुकूम केला लवलांई ॥ शिंद्याचे मुख्य स० ॥ ४ ॥

श्रीमंत पेशवे नाना मग सर्व मिळोन येती । जिवबादादाची लोक तारीफ करिती । नवाबानें तरवार मोर्तब दिलें जिवबादादा हातीं । मशिर उल्मुलुक घेतला ओलती । मग बत्तीस लक्षांचा मुलुख सरस घेती । तीन कोट रुपये खर्च गणती । लढाई फत्ते केली घरोघर लोक गजबजती । जिवबादादा भारती वीर प्रसिद्ध नांव नरहरराव घेती ॥ शिंद्याचे मुख्य सरदार जिवबादादा एक वीर० ॥ ५ ॥

लें० नं १५८ तारीख २८ एप्रील सन १७९५.

श्रीमत् सच्चिदानंदसरस्वतीश्रीपादैः

अत्यंत प्रिय शिष्यवर्य राजश्री नरोबा केरकर गृहस्थवर्य यांप्रती कृतानेक नारायणस्मरणपूर्वक आशीर्वादोपरी अद्य राक्षस संवत्सर वैशाख शुक्ल १० म्यवधि श्रीमठकपिलग्रामीं शमस्ति नो भवत्कुशलमाशास्महे सततं विशेषस्तु. लेखनप्रयोजन कीं; संस्थानचा बखेडा जाहला. तो कर्णोपकर्णीं आपणास श्रुत जाहलेंच असणार. वर्तमान काळीं गोमांतकीय समस्त गृहस्थादि आदपच्छात् वृत्तांत श्रीकडील लिहिला आहे. त्याप्रमाणें तो सावकाशें चित्तीं मनन पाहतां ध्यानीं येईल. एतद्विषयीं

१. खर्ड्याचे किल्ह्यांत या लढाईपासून रात्रीचा हुं असा दीर्घ स्वर होतो. कोणी हुंकार घातल्यासारखा आवाज होतो, असें पाहून आलेले लोक सांगतात. । २. लोमेशानंद ऊर्फ गौडपादाचार्य स्वामी श्रीमठ कैवल्यपूर, गोमांतक संस्थानचा.

राजश्री नेर्लेकर यानीं आपणास पत्र पाठविलें आहे. त्याप्रमाणें राजश्री जिवबा बावा यांस पत्र लिहून देवावें. श्रीस्वामी तं येथून प्रयाण करते समयीं बोलून गेले आहेत. कीं आह्मी संस्थानचा बखेडा करून नाश करूं. यास्तव येथील गृहस्थ यानीं पुढील बंदोबस्ताचा प्रकार लष्करांत लिहिला आहे. आपण तं संस्थानचे अभिमानीच आहां. सविस्तर राजश्री आबाजी नारायण व राजश्री चिमणाजी कृष्ण मुखतः सांगतां विदीत होईल. किं बहुना लेखनेन सुज्ञेषु इति नारायणस्मरणं.

ले० नं. १५९ पो छ० ५ रमजान सोमवार. श्री. एप्रील १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

बाळकें नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत माहु शुद्ध १ पदा मुकाम नजीक माहादेव सात कोश जाणोन आपलेकडील लि॥ विशेष. आजच सोमवारीं प्रातःकाळीं मुलांची व मातोश्री ताईची येथून रवानगी कोंकणांत केली. ती आजचा मुकाम महादेव सात कोसांवर जाहालें. दरमजल येऊन पोहोंचतील. स्वार दीडशें व पालख्या तीन बरोबर राजश्री गणपतराव चिटणीस पाठविले आहेत. स्वार व पालख्या पैकीं पालख्या दोन माघारे येतील. एक पालखी मात्र कोंकणांत बरोबर राहील. वरकड( ) न तटां, उट, स्वार व दोन पालख्या माघारे येतील तेव्हां आजरेहून आरवदेस जाईपर्यंत ओझेस माणसें पंनास व बैल बसकेचे सुद्धां पंधरा याशिवाई शिपाई हें पत्र पावतांच पाठवावे. हें पत्र पावतांच माणसें वगैरे लिहिलेप्रमाणें आजरेस आलीं ह्मणजे खोळंबा होणार नाहीं. नसलेस एकदोन रोज खोळंबा होऊन खर्चास दिलें त्याचा तोटा पडेल. वरकड मागून लिहितां येईल. इकडील काळजी न करावी. आपले शरीरीं आलीकडेस आराम जाहलेचें लिहिलें. एक एक काळजी काढतां दिवस गेले. आपले शरीरीं आराम वेळोवेळीं नसतें तेव्हां काळजी प्राप्त होती. बहूत काय लिहिणें. पत्र पावतांच माणसें बैल वगैरे, वर लिहिल्याप्रमाणें आधीं आजेरस पाठवावें. एवढेंत दरमजल लौकर येऊन आजेरस पोहोंचतील. हे विज्ञाप्ती.

ले० नं. १६० श्री. तारीख ४ माहे मे १७९५.

छ० १४ सवाल सलास तिसेन मया व अलफ १२०४.

श्रीमंत[१] क्षत्रियकुलावतंस माहाराज राजश्री छत्रपती स्वामीचे सेवेसीं. विनंती सेवक माधवराव नारायण प्रधान कृतानेक विज्ञापना सेवकाचें वर्तमान तागायत छ० १४ सवाल पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून यथास्थित असे विशेष. नबाब निजाम अलीखान बहादूर याजकडून स्वराज्याचे अमलाचे वगैरे जाबसाल होणें ते सुरळीत होत नाहींत. व कित्येक चाली दौलतेस पेंच पडावा अशा दिसल्या. याजकरितां मसलत करणें प्राप्त जाणून मसलत केली आहे. हें पेशजीं शेवेसीं विनंती लिहिलीच आहे. नंतर नबाबास सांगोन पाठविलें त्याप्रकारें सांगून पाठविलें कीं, परस्परें खलष असेल तो दूर करावा, सरकारचे जाबसाल होणें असतील ते फडशांत यावे, लढाईचा प्रसंग करूं नये, ही गोष्ट चांगली आहे; असें सांगून पाठविलें असतां त्यांचे कारभारी याणीं दुरंदेश चित्तांत न आणितां नबाबाचे चित्तांत विकल्प आणून पंनास साठ हजार फौज व चाळीस हजार गादड

१. हें पत्र पेशव्यांनीं आपले धनी सातारकर छत्रपति महाराज यांस लिहिलेलें आहे. भारतवर्ष मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेलें तें आह्मीं जशाचें तसें उतरून घेतलें आहे.

वगैरे पोख्त सरंजामानिशीं बेदराहून कूच करून दरमजल येऊं लागले. तेव्हां इकडूनही कूच करून जाणें प्राप्त. याजकरितां सरकारचेंही कूच होऊन मजल दरमजल जाऊन वीस कोसांचे फासलयानें सीनेवर मुक्काम केला. तेथूनही त्यांजकडे सांगून पाठविलें. तथापि त्यांचे मर्जीस न आलें. त्यावर मोहरीचा घांट उतरून खर नदीवर त्याणीं येऊन मुक्काम केला. त्याजवरून राजश्री परशराम रामचंद्र हरी यांजसमागमें हुजुरात वगैरे सरंजाम देऊन व राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांजकडील विठ्ठल बल्लाळ फौजसुद्धां व राजश्री दौलतराव शिंदे यांजकडील जिवाजी बल्लाळ फौज बेमय कंपुसुद्धां व राजश्री तुकाजी होळकर यांजकडील काशीराव होळकर व बापूजी होळकर आदी करून तमाम सड्या फौजा पुढें घोडे गांवावर त्याचे मुकाबलयास रवाना केल्या. त्या खर नदीपासून चार कोश आलीकडे मुक्काम करून होत्या. नबाबाकडील कांहीं फौज पुढें वाढून आली. दोघांची गोळागोळी झाली. नंतर नबाबानीं छ० ११ शाबानी खर नदींतून कूच करून परांड्याचे रोखें चालले. ते समयीं सरकारच्या फौजा तयार होऊन लढाईस नमूद जाहले. तेव्हां त्यांनीं परांड्याचा रोख सोडून सरकारचे फौजेवर चालोन घेतलें. लढाई सुरू झाली. तोफांची मारगिरी तिसरा प्रहरपर्यंत झाली. ते समयीं नबाबाचे फौजेचा मोहरा फिरवून गोल फोडून हुजरातीनें हतेर लावून शिकस्त केलें. महाराजांकडील फत्ते झाली. नबाबाकडील हत्ती व घोडे व माणूस ठार व जखमी बहूत जाहले. मोठे मोठे सरदार दोनचार ठार व जखमी जाहले. तोफा, नौबती, उंट पाडाव झाले. बाजार बुणगें वगैरे लुटलें गेलें. व सरकारच्या फौजेंतील घोडे व माणूस जायां व जखमी झाले. परशराम रामचंद्र यांस तरवारीची जखम हलकी लागली. हुजरातीनें भोंसले व जिवाजी बल्लाळ नि॥ सिंदे व होळकर याणीं लढाई चांगली केली. ते वेळेस नबाब खर्डें येथील किल्याचे आश्रयास निघून गेले. पाठिमागें सरकारच्या सड्या फौजा जाऊन चौफेर घेरा दिला. तेव्हां त्यांस दम न धरवे, याजकरितां तहाचें बोलणें लाविलें. व त्यांचे कारभारी मो-उ-दौला याणीं सरकारांत पैगाम लावून त्यांजकडून निघोन इकडे आले. नबाबाची फौज गारत करावी असाच प्रसंग होती. परंतु नबाबाचा स्नेह घरोबा बहूत दिवस चालत आला. हें जाणून तहाचा ठराव करून किल्ले दौलताबाद व बत्तीस लक्षांची जहागीर व स्वराज्याचे अमलाबाबद ऐवज वगैरे जाबसालाचा दार मदार करून घेतला. नबाब निघोन दरमजल बेदरास गेले. सेवकाचेंही फौज मुद्धां कूच होऊन दरमजल पुण्यास आलों. स्वामीस निवेदन व्हावें याजकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले० नं. १६१ पै॥ छ० २२ सवाल. श्रीशंकर. तारीख ४ मे १७९५.

वडिलांचे सेवेसीं. चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १४ सवाल मुकाम नरसिंहपूर जाणोन वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. लष्करांतून आज्ञा घेऊन आज मुकाम मजकुरीं आलों. मजल दरमजल मिरज कापसीवरून आजरेंस येतों. आतां येणेंस गुंता नाहीं. राजश्री भास्कर बावा बागणीस वर कोंकणांत जावयाकरितां पाठविलेच आहेत. पालख्या चार व उंट नव येणेंप्रमाणें सरंजाम भास्करबुवानें लिहिल्या अन्वयें येथून पाठविला आहे. तेही सत्वर कोंकणांत पोहोंचतील. राजेश्री साबाजी दिवाण यांस कापड खरेदी करावयाकरितां पुणेंस पाठविले आहेत. तेथें त्यांणीं कापड घेतलें. तेथून कापड घेऊन परभारें कोंकणांत जाणेंविसीं पत्रें त्यांस

१. जिवबादादा बक्षी. २. मोठा सरंजाम.

गेलीं आहेत. त्याजबरोबर स्वार व पाहारे दोन पलटणचे आहेत. मार्गाच्या बंदोबस्तानें येतील. आह्मांबरोबर सरंजाम पलटणच्या कुपण्या इटेकरी व भालेकरी, नगार, निशाण, लहान मोठे शंभर घोडे आहेत. कळावें याकरितां लिहिलें आहे. समारंभ यथास्थित होईल. तरतूद चांगली जाहली आहे. पर्जन्याचे दिवस याजमुळें मोठी काळजी पडली आहे. येणेंविसींची आज तीन महिने भानगड होती आहे. एक एक किसें. कोटवर लिहावें. भेटीअंतीं सर्व विदीत होईल. आजरेस कांहीं माणसें सरंजाम न्यावयाकरितां पाठवावीं. लग्नें ज्येष्ठ मासीं होतील. बागणीस हलकारा भास्कर बावाकडे कोंकणांत जलद जाणेंविसीं पाठविला आहे. घोडीं शंभर आहेत. दाणावैरणीची तरतूद जाहाली पाहिजे. येविसीं पूर्वपत्रीं विनंती लिहिली होतीच. कळावें. पत्राचें उत्तर जलद पाठविलें पाहिजे. हे वि॥

ले० नं. १६२ पौ छ० २३ माहे सवाल. श्री. तारीख ९ माहे मे १७९५.

सेवेसीं साबाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती तागायत वैशाख वद्य ५ मी शुक्रवार मुकाम मालखेड नजीक इस्लामपूर जाणोन यथास्थित असों विशेष. यजमान स्वामीनीं पुणेंस निराबाई व वरकडांच्या लग्नाकरितां कापड वगैरे सरंजाम खरेदी करावयास पाठविलें होतें. त्याप्रमाणें खरेदी करून व जामगांवीं शिलक पैकीं कापड घेऊन उंट व भाडेचीं तट्टं करून परम जलद येत आहें. उदईक इस्लामपुरीचा मुकाम तेव्हां श्रीमंत राजश्री भास्करराव यांची भेट घेऊन तेही जातिनशीं बंधु सहकुटुंब वरास घेऊन मुहूर्तें बाहेर निघाले ह्मणोन वराडास त्याच्या उपाध्यानें सांगितलें त्यावरून आह्मी जलदी जाऊन सामील जाहलों. मंत्री वाटेस दिवसगत लावतील तर त्यांजलाही ताकीद करितों. परंतु न जाणो एकादा दिवस अधिक उणा लागला तर आह्मी अगोदर कापड घेऊन पुढें येतों. आजेरपर्यंत भाडेकरी याचा करार आहे. पुढें येणार नाहींत. उंटाचा निभाव घांटामुळें पडणार नाहीं. याजकरितां आपणापासीं तेथें भारदारीस व पेंदे ऐसें पुढां रवाना करावे. आमचे येणेंस आतां ढील नाहीं. येऊन पोहचलोंच ह्मणून समजावें. आह्मांस रात्रदिवस पर्जन्यामुळें व समयास कापड पोंहोचलें पाहिजे. लग्नाचा मुहूर्त आषाढ शुद्ध २ येस मंत्री यांणीं निश्चय केला आहे. याजकरितां अगोदर आलों ह्मणजे सर्व सरंजाम पोहोंचेल. बदली पोषाख वगैरे तयार जाहले पाहिजे. त्यास श्रीमंत राजश्री रावसाहेबांची रवानगी यजमान स्वामीनीं पंढरपुराचे मार्गें करणार ह्मणोन आठव्या तारखेचें पत्र आह्मांस पुणेंस आलें होतें. त्याचें येणेंस सरकारचे मर्जीप्रमाणें घडणार. त्याचा पत्ता उद्यां बागणीस लागेल. अगर परभारें आपणाकडेस लिहिलें गेलेंच आसेल. सेवेसीं लवकरच येऊन पोहोंचतों. लोभ असों द्यावा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

हे॥ राजेश्री विश्राम काका स्वामीस साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील सविस्तर वर्तमान वर पत्रीं लिहिल्यावरून विदीत होईल. यजमान स्वामीनीं आह्मांस पुणेंस पो कीं कापडाची रवानगी करून माघारें येणें. त्यास आह्मी त्यांची आज्ञा अमान्य करोन कापड घेऊन तुह्मांकडेस येत आहों. लवकरच जाणें होईल. भेटीअंतीं सविस्तर कळेल.

ले० नं. १६३ श्री. तारीख १५ मे सन १७९५.

श्रीमंत राजश्री नबू स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक भास्कर माहादेव साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २५ सवाल शुक्रवार

चार घटका रात्र मुकाम पारपोलीचा कटा. वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री अण्णासाहेब यांची मावशी व वराचे मामा वगैरे पांचचार बायका व मुलें लग्नास अगत्यरूप श्रीमंतास आणविलीं पाहिजेत. याजकरितां कुंभारजुवेस याजकडील माणसें गेलीं होतीं; तीं आतांच आलीं. त्याणीं जुवेहून सांगून पाठविलें; मी तुह्मांकडून तट्टें साहा व पालखी अगर डोळी एक डिचोलीस आल्यानंतर आह्मी निघोन येतों. श्रीमंतांनीं त्यास पत्र लिहिलें आहे. तट्टें पालखी याजकडीलच ऐसें समजलें पाहिजे. याजकरितां ह्मणोन आज्ञा जाहाली. त्याजवरून विनंती लिहिली आहे. तरी पालखी व तट्टें पत्रदर्शनीं सत्वर श्रीमंतांच्या माणसांबरोबर देऊन रवाना करावीं. बहुत अगत्यपुरष्कर येथील आज्ञा आहे. तेव्हां जुवेहून मंडळी समारंभास येऊन पोंहोचली पाहिजे. वरातीच्या दिवसीं श्रीमंतांस दारूनळ चंद्रजोती, व झाडें चांगलीं पाहिजेत.

२ पुरवणी. श्रीमंत राजश्री बाबू स्वामीचे सेवेसीं. याची तरतूद करून ठेवावी. आह्मी घेणार ह्मणोन आज्ञा आहे. येतेवेळां उतावळीमुळें करविलीं नाहींत. याजकरितां दारू मात्र कारागिराकडून तयार करून ठेवावी. पर्जन्याचा सुमार दृष्टीस पडेल तैसी करतील. जानोस घर व भिक्षुक मंडळी व श्रीमंतांकडील आश्रित, व शास्त्री व पंडित यांस पर्जन्यामुळें जागेची सोई तीन चार जागा जानोस घरासंनीध असावी. मातबर गृहस्थांस निरनिराळीं बिऱ्हाडें पांचसात पाहिजेत. त्यास कांहीं राहुट्या असतील त्या व कोणकोणाचे घरांनीं जागा करून ठेवावा. पर्ज्यन्याचे दिवस ह्मणोन लोकांची सोई यथास्थित असल्यानें ठीक आहे. याजकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

ले० नं. १६४ पो छ० २५ सवाल. श्रीशंकर. तारीख १५ माहे मे १७९५.

वडिलांचे सेवेसीं विज्ञापना आज शुक्रवार प्रातःकाळचा चार घटिका दिवस मुकाम वाडी. वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. काल कारिवडेंहून कूच करून मुकाम मजकुरीं आलों. सरकारांतून सामोर न्यावयाकरितां श्रीमंत दादासाहेब व बाबासाहेब पाठविले होते. गांवाबाहेर भेटी जाहल्या. चार घटका रात्रीस श्रीमंत राजे बाहादर यांची भेट जाहली. दरवाजेजवळ आले होते.[1] दोन मोहरा नजर केल्या. शिष्टाचार होऊन आंत ( ) विडे देऊन जुने बाजारांत मुकामास आलों. आज येथून कूच करून मळगांवीं अथवा आरोलीस मुकाम करूं. शनिवारीं वडिलांच्या दर्शनाचा योग आहे. तेच दिवसीं दर्शन घेतों. सेवेसीं श्रुत होय. वरकड कटक कारिवडेहून आज कूच करून वडिलांपाशीं येईल. येथें[2] कितकें राज्य प्रकर्ण बोलणें तें वडिलाचे आज्ञेप्रमाणें बोलणेंत येईल. हे विज्ञाप्ती.

ले० नं. १६५ श्री. तारीख १६ माहे मे सन १७९५ शनिवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य जिऊबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत वैशाख वद्य १२ मुकाम नजीक परांडा येथें वडिलांचे आशिर्वादें सुखरूप असों विशेष. वडिलांकडून छ० १६[3] सवालचें पत्र आलें तें छ० २३[4] सवालीं पोंहचलें. लग्नाचा निश्चय ज्येष्ठ शुद्ध १[5] चा केला.

---

१. नारायणराव बक्षी यांस वाडी सरकार सामोरे गेले होते. २. एथें लष्कर उतरण्यास खुली जागा होती. ३. तारीख ६ मे सन १७९५ बुधवार. ४. तारीख १३ मे १७९५ बुधवार. ५. तारीख १९ मे सन १७९५ मंगळवार.

त्यास मंत्रि या (   ) आटक आला पाहिजे. तुह्मांकडून उंटें पालख्या लवकर त्या गेल्या न गेल्या कळलें नाहीं. लग्नाचें कापडही न आलें. चिरंजीव बाळोबाची व चिरंजीव मुलाची रवानगी जलदी करावी; ह्मणून लिहिलें असे. त्यांस मंत्री यांजकडेस उंट दहा व पालख्या ४ चार व वाटखर्चास तीन हजार. याप्रमाणें पाठविले. तिकडून काल राजश्री भास्करजी बांदेकर यांचींही पत्रें आलीं. राजश्री भास्कर बाबा व बाळकृष्ण बाबा मंत्री याणें वैशाख वद्य ७ गुरुवारीं प्रस्तान केलें. सोमवारीं दरकूच जावयास जातील. एविसींचीं वडिलांसही पत्रें तिकडून गेलींच असतील. पुणेंस कापड खरेदी केलें; तें त्याच वाटेनें परभारें घेऊन राजश्री साबाजी वासुदेव गेलेच आहेत. ते बागणीस पोंचल्याचें पत्र छ० १६ सवालचें आलें. तेथूनही ते दरमजल जात आहेत. उभयतां चिरंजीवांची रवानगी येथून वैशाख शुद्ध १३ चे दिवशीं केली. ते आजकाल जाऊन पोंहोचलेच असतील. पर्जन्याचे अगोदर वैशाख मासीं लग्नें उरकून घ्यावीं. त्यास येथून कापड वगैरे सरंजाम व चिरंजिवाच्या जाण्यास दिवसगत लागली. यामुळें वडिलांची मर्जी. त्यास दिवसगत लागावयाचें प्रकर्ण सविस्तर पेशजीचे पत्रीं लिहून पाठविलेंच आहे. त्याजवरून कळलेंच असेल. आतां सर्व तरतूद होऊन आलीच आहे. ज्येष्ठ शुद्ध १ च्या मुहूर्तास लग्नें उरकून घेतल्याचें उत्तर वडिलांकडून आलें ह्मणजे चित्ताचें समाधान होईल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

सेवेसीं यसाजी वासुदेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीमंत राजश्री बाबासाहेबांची स्वारी रत्नागिरीस[1] देवदर्शनास गेली आहे. येथून वैशाख वद्य १३[2] चे दिवशीं कूच जाहालें. बरोबर मात्र मुत्सद्यांपैकीं राजश्री भाऊ दिवाण गेले आहेत. वरकडांचें मुकाम येथेंच आहे. येथून कूच करून पुण्यास जातील. आपणाकडून कांहीं गोमांतकी आंबे वगैरे जिन्नस श्रीमंतांचे भेटीस देवाचे डोंगरास एकदोन वेळ रवाना जहाला पाहिजे. यजमान स्वामींनींही याप्रमाणें लिहावयास आज्ञा केली; त्यावरून लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत व्हावें हे वि॥

लें० नं. १६६ पौ॥ छ० १५ जिल्हेज सन खमस तिसेन. श्री. तारीख २४ मे १७९५.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजीबावा स्वामीचे सेवेसीं.

सेवक राघो परशिराम शेट कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ तागायत छ० २३ सवाल. मुकाम रिगस प्रांत सेखावत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. तुह्मांकडून बहूत दिवस पत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं. तेणेंकरून चित्त सापेक्षीत असे. तर असें न करितां हमेशा येणाराबराबर पत्र पाठवून संतोषवीत जाणें. यानंतर राजश्री बाळ बावा पाणीपतास सुखरूप आहेत. तेथून हमेशा पत्रें येत आहेत; कीं आपलें पत्र येत नाहीं. ह्मणोन लिहून येतें. तर आपणाकडील सविस्तर वर्तमान लिहावें. व त्याच्याही घराकडील वर्तमान लिहीत असावें. हल्लीं खर्चास हुंडी पुणेंची रुपये १३०० तेराशें पाठविली आहे. घेऊन पोंचल्याचें उत्तर पाठऊन द्यावें. जाजती पाठवावे तर तूर्त येथें दरसदे रुपये १८ हुंडावळ पडती. याजकरितां तूर्त येवढेच पाठविले आहेत. वरकड मजकूर नवल विशेष लिहावें असें नाहीं. श्रीमंत राजश्री दादा व बापू येथें आहेत. राजश्री भाऊ व मुलें माणसें सर्व अजमेरीस सुखरूप

१. कोल्हापुराजवळ डोंगर रत्नागिरी येथें शिंद्यांचा कुलदेव आहे. त्यास ज्योतिर्लिंग अथवा जोतीबाचा डोंगर असें ह्मणतात. २. तारीख १६ मे १७९५ शनिवार.

आहेत. कळावें. आपणाकडील वरचेवर भेटीचा लाभ देत असावा. आह्मांविसीं राजश्री दादांस व बापूस लिहीत जावें. आमचे घराकडीलही समाचारही घेत जावें. बहूत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती. हुंडी पाठविलेली आहे; ती राजश्री जगंनाथ सेट याचे पत्रीं घातली आहे. हे विनंती.

ले० नं. १६७ पै॥ छ० १ सवाल मंगळवार. श्री. तारीख १७ मे सन १७९५.

श्रीमंत राजश्री बाबू स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक भास्कर माहादेव बांदेकर. चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील तागायत चैत्र वद्य १४ प्रहर रात्र मुकाम बागणी जाणोन स्वकीय कुशल लेखन करवायासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपले आज्ञेवरून श्रीमंत राजश्री दादांनीं आह्मांस श्रीमंत राजश्री मंत्री यांजकडे वर पाहावयास पाठविलें. त्याप्रमाणें आज संध्याकाळींच येथें येऊन पोहोंचलों. श्रीमंतांची भेटी जाहली. मूल पाहिला. चांगला आहे. जोडा निराबाईस उत्तम आहे. श्रीमंत आपले मर्जीप्रमाणें सिद्ध आहेत. राजश्री दळपतराव दळवी श्रीमंतांकडील लष्करांत आहेत. त्याणीं आमचे यावयाचे ठरावाचें वर्तमान बागणीस आपले यजमानास अगोदर लिहिलें होतें. त्या पत्राचीं उत्तरें त्याणीं येथोन लष्करांत पाठविलीं आहेत. एक बेत आजरेंत उरकावा. दुसरें कोंकणांत जावें. ऐसे दोन्ही प्रकार लिहिले आहेत. तें पत्र श्रीमंत राजश्री दादांस मशारनिल्हे दाखवितील. नंतर तेथील आज्ञा जाहल्याप्रमाणें ठरावांत येईल. पालख्या, उंटें वगैरे सरंजाम लष्करांतून आणविला आहे. तो आला पाहिजे. व खर्चाची सोई होऊन आली पाहिजे. त्याप्रमाणें येथोन निघणें होईल. आह्मीं आजच पत्र लष्करांत यजमानास लिहिलें आहे. आजरेचा विचार ठीक पडणार नाहीं. कोंकणांत मांडव सुद्धां तयारी आहे. पर्ज—

२ पु॥ श्रीमंत राजश्री बाबू स्वामीचे सेवेसीं—त्याचे दिवस. यास्तव सत्वर सरंजाम येऊन पोहोंचल्यावर आज्ञेप्रमाणें वरास घेऊन कोंकणांत जातों; ह्मणून विनंतीपत्र लिहून आतांच पाठविलें आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें सेवेसीं येतों. मुहूर्ताचा निश्चय कधीं तो ठरावून आपली आज्ञा येईल त्याप्रमाणें यावयाची तजवीज करूं. श्रीमंत मंत्री यांजकडील येणेंप्रमाणें येणार.

१ खासा.	१५ बायका.
५० गृहस्त.	५० बैल.
८० घोडीं बारगीरसुद्धां.	२०० किरकोळ शागीर्दपेशा वाजंत्री कलावतें वगैरे कुलबाब.
२५० पखादे.	
३५ उंटें.	

१० श्रीमंतांकडील
२५ आपणाकडून वाजखान मागतात.
———
३५

येणेंप्रमाणें येणार ऐसें आहे. त्यास श्रीमंत राजश्री दादांची मर्जी बोलण्यांत होती कीं; मंत्री यांजकडील खर्च एक पैसा न लागावा व त्याजकडून सणंग वगैरे कांहीं काडीमात्र न घ्यावें ऐसें बोलण्यांत होतें. दिवस थोडके राहिले. लष्करांतून तरतूद होऊन आज्ञापत्र येतांच निघोन येतों.

कदाचित् तिकडील तरतुदीस दिवसगत लागल्यास आपली आज्ञा येईल त्याप्रमाणें सेवेसीं येऊन पोंहोंचतों. सत्वर पत्राचें उत्तर आलें पाहिजे. आपल्या उचितास येईल तो मुहूर्ताचा निश्चय करून लिहावें. त्याप्रमाणें येथोन सिद्धता आहे. वरकड देण्याघेण्याचा प्रकार याचा आग्रह नाहीं. जें आपल्या उचितास येईल त्यांत हे संतोष आहेत. यांचा आग्रह काडीमात्र नाहीं. आपल्या थोरपणायोग्य आपण कराल तें आह्मांस बहूत आहे. ऐसें साफ श्रीमंत राजश्री मंत्री यांचें बोलणें पडतें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

३ पुरवणी—श्रीमंत राजश्री बाबू स्वामीस.

श्रीमंत राजश्री मंत्री यांजकडील सरंजाम येणार. त्यासिवाय आपणाकडून लष्करांतून आणून द्यावा; त्याची याद त्यांणीं लिहून दिल्ही. ते आपणाकडे आलाइदा पाठविली आहे. त्याप्रमाणें जे तरतूद होऊन येईल. पालख्या वगैरे पे॥ मिळतें. पाठवावें लागल्यास आपणाकडे याद पाठविली; त्याची नकल श्रीमंत राजश्री दादाकडे एक पाठविली आहे. उंट वगैरे तिकडून कांहीं येईल तेव्हां येथून निघणें होणार. वाटखर्चास येतां जातां तीन हजार रुपये लागतील. ऐसें बोलतात. शिवाय पांच रोज कोंकणांत सिधा चंदी लागेल तें द्यावें; ऐसें बोलतात. ते सविस्तर विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

ले० नं. १६८ श्री. [२] सन १७९५.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री नरोबा बावा केरकर यांप्रती—

फटभट्ट[१] नातू अनेक आशीर्वाद. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री माहाराजांनीं सर्व जाबसाल करावा ह्मणोन मज आज्ञा केली व कृपाळू होऊन पालखी दि[३]ली. आपणास कळावें ह्मणोन विनंती लिहिली आहे. परत हा जाबसाल घडला याचें मूळ आपणाकडे आहे. आपल्या नांवावर मी गुमास्तेपणीं वर्तणूक करितों. सर्व भरंवसा आपल्याखेरीज आणखी कोणाचा नाहीं. भेटीचे अंतीं सर्व विदीत होईल. तूर्त सरकारच्या जमावाची व फिरंगी याची लढाई होऊन फिरंगी मुरांत गेला. त्याचा नाशाड अधीक जाहला ह्मणोन आईकण्यांत आहे. अशास सरकारचा जमाव पुढें सरलेनें फोंडें हस्तगत होईल असें आहे. परंत खर्चाची निकट. येथें उपाई तिळमात्र नाहीं. अशास आपण कृपाळू होऊन हे प्रसंगीं भर दिलेनें सरकारचें काम होऊन आपले पदरीं यश पडेल असी गोष्ट आहे. आपण तंत्र कार्यामुळें ओढींत आहेत; व येथेंही ओढ आहे. रुपये तूर्त पनरा हजार पाहिजेत. अशास लिहिणेंविसीं आह्मांस भय दिसतो. परंत आपणास न लिहितां परिणाम नाहीं. पैशाचाही उगावा पडेल. परंतु तूर्त निकटींत निकट करून ही वेळ राखलेनें बहुतच कार्य घडेल. आपणाखेरीज ही वेळ दुसरेचेनें राखवणार नाहीं. ह्मणोन विनंती लिहिली आहे. रागास न यावें.

१. हे कांदळगांव, तालुका मालवण, एथील राहणारे होते. हा गांव त्या वेळीं वाडी सरकारच्या राज्यांत सामील असे. २. वाडी सरकार. ३ वाडी सरकारचे प्रधान जिवाजी विश्राम सबनीस हे सन १८७४।७५ च्या सुमारास वारले. तेव्हांपासून सन १७९४ पर्यंत ह्मणजे यांचा नातू माधवराव तात्या सबनीस कारभारी होईपर्यंत बरेच कारभारी झाले. खेमसावंतांस दररोज जो इसम चारशें रुपये देई, तो कारभारी होई. असे कारभारी एक वर्ष फार तर दोन वर्षें टिकत; वै त्यांस पालखी मिळत असे. परंतु पालखीस नेमणूक कायमची नव्हती. हे कारभारी हिरू राम सेट घोटगे, फटभट्ट नातू, देवबा लाड असे पुष्कळ झाले होते.

श्रीकृपेकरून राजमान्य राजश्री नारायणरावही घरीं येत आहेत; ह्मणोन परस्पर आईकण्यांत आहे. मुख्य गोष्टी मी आपला गुमास्ता ह्मणोन फिरतों. अशास सर्व गोष्टींचा अभिमान आपणांस रक्षावा लागतो. शरणागताचा त्याग करितां नये. बहूत काय लिहिणें लोभ असों दीजे.

ले० नं. १६९ श्री. माहे मे १७९५.

वडिलांचे सेवेसीं नारायणान चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना आज बुधवार प्रहर रात्र मुकाम आंबोली येथ सुखरूप असों विशेष. आजरेहून कूच करून आटाळें सुद्धां मुकाम मजकुरीं आलों. राजश्री साबाजी वासुदेव यास कापडाकरितां पुणेस पाटविलेप्रमाणें सरंजाम घेऊन काल सामील जाहले. उदईक गुरुवारीं प्रातःकाळीं घाट उतरून कारीवडेस आटाळेचा मुकाम करून गुरुवारीं तिसरे प्रहरीं श्रीमंत राजेबाहाद्दर यांची भेट घ्यावी; आण स्वारीबरोबरचा सरंजाम आहे त्यासुद्धां वाडीस मुकाम करावा. शुक्रवारीं आटाळा कापड व उंट आरवदेस येतील. आह्मी शुक्रवारीं तळवणेस मुकाम करूं. शुक्रवारीं दिनक्षय आहे. तेव्हां मंदवारीं रात्रौ वडिलांचे भेटीस मुहूर्त आहे. आजरेस भाडेकरी मिळेनात. जाणोन उंटासुद्धां घाट उतारावा. ऐसी सल्ला केली. पर्जन्य लागला तर घांट उतरणें संकट आहे. भाडे बारदारी मिळेना. कळावें. श्रीमंत राजेबाहाद्दर यांची भेट घरीं जावयाचे पूर्वींच घ्यावी; ऐशी तीर्थरूपांची आज्ञा होती. भेटीस दोन मोहरा नजर करूं. वरकड वस्त्रें देणें तीं वडिलांची आज्ञेनुरूप लग्नें जाहलेवर द्यावयास येतील. राजश्री मंत्री बागणीहून रविवारीं निघालेचें वर्तमान आहे. मंत्री याचे मत्तें शुद्ध प्रतिपदेस लग्नें करावीं ऐसी आहे. भेटी जाहलेवर आज्ञेप्रमाणें विचार ठरणेंत येतील. हे विज्ञापी.

चिरंजीव राजश्री विश्रामजीस उदयीक वाडीस पाठवावें. हे विज्ञापी.

ले० नं. १७० श्री. माहे मे १७९५.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री साबाजी बावा स्वामीचे सेवेसीं.

सेवक जिवाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. तुह्मीं पुण्याहून व तेथून कूच करून गेल्या उपरांतीक कराडाहून, बागणीहून ऐशीं पत्रें पाठविलीं; तीं पावलीं. कापड खरेदी करून घेऊन दरमजल जलद जात आहों. ह्मणोन लिहिलें. ऐसें यास वडिलांचीं पत्रें वरचेवर येत आहेत. कापड वगैरे सरंजाम व चिरंजीव मूल व चिरंजीव बाळोबा येथून जावयास दिवसगत लागली याजमुळें लग्नाचे मुहूर्त वैशाख मासीं होते; ते साधून येत नाहींत. याजकरितां ज्येष्ठ शु॥ १ च्या मुहूर्तास निश्चय केला आहे. त्याचे अगोदर येथील सर्व सरंजाम व उभयतां चिरंजीव व बागणीहून राजश्री मंत्री यांचें जाणें जाहलें पाहिजे. त्यास कापड तर तुह्मी घेऊन गेलांच आहां. वाटेनें पर्जन्यकाळाचे दिवस आले. सुरक्षीत जाऊन समयास पोंचलें ह्मणजे यथास्थीत जाहलें. मंत्री यांजकडील खटक जावयास येथून उंट १० व पालख्या ४ व खर्चाचीही तरदूत करून पाठविलीच आहे. त्याप्रमाणें पोंचल्याचें उत्तर राजश्री भास्करजी बांदेकर याजकडून आलें. तेही जलदीच जाऊन पोहोंचतील. येथून चिरंजीव--( ) वैशाख शु॥ १३ चे दिवशीं गेलीं. तेही आज उदेक जाऊन पोहोंचावे. पर्जन्याचे अगोदर सर्व साहित्य यथास्थित होऊन मुहूर्ताच्या निश्चयास लग्नें उरकलीं ह्मणजे एवढें

केल्याचें सार्थक जाहालें. तुह्मी न सांगतां गेलां. फार उत्तम केलेंत. असो. हे विनंती. अखेरीस पळून गेलां हे विनंती.

वडिलांचे सेवेसीं येसोबान चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. यजमान साहेबानीं लिहिलें आहे; त्यावरून कळों येईल. येथून यजमान स्वामीचीं पत्रें सरकारांत पाठविलीं आहेत. कळावें. वे० रा० भास्कर जोशी वगैरे मंडळी आज येथून निरोप देऊन पाठविली आहेत. कळावें. हे विज्ञापना.

सेवसीं माहादाजी विठ्ठल चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. जाते समयीं आपली भेट जाहली नाहीं. परभारेंच जाणें जाहलें. वरचेवर पत्रीं सांभाळीत जावें. लोभ करावा हे विज्ञाप्ती.

ले० नं. १७१　　श्री.　　माहे मे सन १७९५.

विज्ञापना तीर्थस्वरूप राजेश्री भाऊ व राजेश्री नारायणराव आजरेंस परवांचे रात्रीस आले. ह्मणोन गोंदशेट गोवेंकर याचा माणूस आला. त्याणीं सांगितलें. व त्याजकडेस लखोटाही आहेत. उत्तर येथें उत्तरवालेची व यांची लढाई जाहली. उत्तरवालेकडील नव आसामी जखमी व यांजकडील सिलेदार आसामी तीन व घोडीं तीन जखमी व घोडीं दोन ठार पडलीं. ऐसें त्याणीं सांगितलें. व आणखीही वाडींतील माणूस आजरेहून एक दोघे आले; त्याणींही सांगितलें. कळावें. गंगाराम यास गा॥ फटभट याच्या कागदाचे जाबसाल करितां ठेविला होता. परंतु सरकारी त्याणीं अद्याप पुसलें नाहीं. सकाळपुढें तो यश सांगितलें. त्याप्रमाणें काय ती जाबसाल लिहून पाठवितों. दारू देऊन उद्यां सायंकाळपावेतं माणसें जेवणाकरितां सध्यां दारवेचा कळलेनवर पडेल; यास्तव तो ह्या वर्मास भीतो कळावें हे विज्ञापना.

ले० नं. १७२　　श्री.　　तारीख ३ जून सन १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य जिवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० १४ जिलकाद मु॥ श्रीपंढरपूर येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. चिरंजीव बाळा व मूल येथून जावयास गेल्यानंतर वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास हल्लीं कासिद जोडी ज्येष्ठ शु॥ १ च्या मुहूर्तास व द्वितीयेस लग्नें उरकून घेतल्याचें वर्तमान सविस्तर लिहून रवाना केली. तीं पत्रें पोहोंचून लिहिलें साद्यंत कळों आलें. ज्येष्ठ मासीं मुहूर्ताचा निश्चय केला. पर्जन्याचे दिवस. लग्नाचा समारंभ यथास्थित होऊन आला पाहिजे; ही काळजी होती. परंतु श्रीचे कृपेकरून वडिलांच्या चित्तानुरूप यथासांग घडोन आल्याचें वर्तमान कळून चित्तास बहूत संतोष जाहला. लौकिकासारखा खर्च करावा लागला. त्यामुळें येथें लोकांचे चार रुपये देणें प्राप्त जाहालें. ह्मणोन लिहिलें. त्यास वडिलांचे पुण्येंकरून कर्जाचाही ( ) होईल. मंत्री यांचे घरीं मूल दिली. तीस पांचा हजारांच्या वस्ता घालाव्या लागतात ह्मणोन लिहिलें. त्यास त्यांचे घरीं मूल द्यावयाचा प्रथम येथें निश्चय जाहाला; तेव्हां बोलणें चालणें जाहलें. त्यांत कांहीं हा जाबसाल नाहीं. वरकड खर्च-वेंच होईल तो त्यांस द्यावा. मुलीस, वस्ता त्यांच्या त्याणों जशा घालणार; तशा घालाव्या. त्यांतील जाबसाल कांहीं आह्मांकडेस नाहीं. यांत रा॥ साबाजी वासु-

देवही माहीत आहेत. त्याचेच विद्यमानें बोलणें जाहालें आहे. आण हल्लीं वडिलीं ऐसें लिहिलें. हें कांहीं कळलें नाहीं. हा जाबसाल कांहीं तेथें गेल्यानंतर ठरावांत आला कीं काय? नकळे. याचें सविस्तर लिहिलें पाहिजे. श्रीमंत राजश्री बाबासाहेबांबरोबर तुमचें येणें देवदर्शनास होईल. तेथें भेटीचा योग घडावा आहे मानस त्यास तें न जाहालें. पुढें कसा विचार ह्मणोन वडिलीं लिहिलें. त्यास येथील साद्यंत चिरंजीवाचे पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून कळेल. यांतून परिणाम शुद्ध होतां दिसत नाहीं. ईश्वरसत्तेकरून यथास्थित होऊन आल्यानंतर भेटीचा योग घडेल. माझेही चित्तीं एक वेळ वडिलांची भेट घ्यावी हें आहे. परंतु ईश्वर घडवील तो सुदीन. हे विज्ञापी. चिरंजीव बाळोबा व साबाजी व विश्राम यांस आशिरवाद. चिरंजीव गणबास आशीर्वाद.

लें० नं. १७३ श्री. तारीख ११ जून सन १७९५.

राजश्री साबाजी बावा केरकर गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—

स्नेहांकित व्यंकटराव सरदेसाई प्रांत खानापूर. राम राम विनंती येथील कुशल तारीख छ० २२ जिलकाद पावेतों यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आलीकडे आपणाकडून पत्रें येऊन परामर्ष जाहाला नाहीं. असें ममतेचे जागां नसावें. सदैव पत्र पाठवून श्रवाभिवृद्धी केली पाहिजे. तदनंतर राजश्री नारायणराव आले ह्मणोन परस्पर वर्तमान समजतें. तरी ते आल्याचें सविस्तर वर्तमान यथास्थित लिहून कळवावें. इकडील वर्तमान अधिकोत्तर लिहिजे असें नाहीं. सर्व यथास्थित आहेच. वारंवार तिकडील राजश्रींचें स्वकीय वर्तमान लिहावें. (   ) द्याव्या अभीज्ञ आहेत. सुज्ञांप्रती विशेष काय लिहिणें. लोभ असावा हे विनंती.

लें० नं. १७४ श्रीशंभू. तारीख ११ जून १७९५.

(शिका आहे.) राजश्री नारायणराव जिवाजी गोसावी यांस.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित राजे खेमसावंत भोंसले बाहादर सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय राम राम विनंती येथील उपरी कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. कित्येक बोलणें तुह्मांसीं जाहलें. तदविसीं जाबसाल राजश्री नरहर गणेश व आपण बोलून लिहून पाठवितों असें सांगितलां. व राजश्री साबाजी वासदेव आरवलीकर यास रवाना करून देतों ह्मणून बोललां. त्यास येथील विचार तुह्मांस लिहून कळवावें असें नाहीं. बोलले सर्व अर्थ ध्यानीं आहेतच. तर प्रसंग ध्यानीं आणोन जलदी उत्तर यावें. छ० १२ माहे जिल्काद. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोर्तब आहे.)

लें० नं. १७५ श्रीशंकर. तारीख १९ जून १७९५.

राजश्री नारायणराव जिवाजी गोसावी यांसी.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव सिंदे. राम राम विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. तुह्मी जाते वेळीं बोलून गेलां होतां कीं; लग्नें उरकून दीड महिन्यांत माघारे येतों. त्यास अद्याप परयंत आलां नाहीं. तर आतां जलद जलद निघून

१. यांस जांबोटकर देसाई असेंही ह्मणत.

येणें. " विलंब झाल्यास ठीक नाहीं. तुह्मीं जाते वेळां दीड महिन्यांत माघारे येतों असें निश्चयांत आणिलें. तेव्हां रवानगी झाली असतां अद्यापवर आलां नाहीं. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तर आतां जलद जलद निघून येणें. विलंब करणें ठीक नाहीं. रवाना छ० १ जिल्हेज सुरु सन सित तिसेन.

ले० नं. १७६ श्रीशंभु. तारीख २० जून १७९५.

राजश्री नारायणराव जिवाजी गोसावी यांस.

छ० अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य-स्नेहांकित राजे खेमसावंत भोंसुले बाहादर सरदेसाई पा कुडाळ व माहालानीहाय. राम राम विनंती उपर येथील कुशल जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. राजश्री कृष्णाजीपंत यांस राजश्री साबाजी राम व विश्राम नरहर यांच्या बोलणें-वरून रवाना केले. त्यास त्यांच्या येण्याची मार्गप्रतीक्षा करीत आहों. या कार्याचें अर्थ संपवून जलद रवाना करावे. चिरंजीव राजश्री जानराव निंबाळकर राजश्री शिंदे यांजबरोबर आहेत. तो सर्व मजकूर तुह्मांस माहीतच आहे. त्यास तूर्त चिरंजीवाची खर्चावेचाची तंग चाई. कर्जाच्या पेचांत. तेथून कांहीं पोंचत नाहीं असें आहे. यास्तव तुह्मीं आपलें एक पत्र राजश्री जिवाजी बल्लाळ यांस चार गोष्टी अगत्यवादें लिहून त्यांचा बंदोबस्त यथास्थित होऊन येईल आण त्याचें चालतें करावें. एविसींचें पत्र लिहून येथें पाठवावें. माणसें वरघांटीं जाणार. तीं या पत्रामुळें ठेवून घेतलीं आहेत. जाणिजे छ० २ जिल्हेज बहूत काय लिहिणें हे विनंती.

ले० नं. १७७ श्री. तारीख २८ जून सन १७९५.

वडिलांचे सेवेसीं चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आषाढ शु॥ ११ एकादशी रविवार मुकाम वाडी. राजश्री मदबा आपाचे घरीं सुखरूप असों विशेष. आपला निरोप घेऊन आलों तेच दिवसीं मुकाम मजकुरीं पोंचलों. दुसरे दिवसीं श्रीमंत राजेबाहादर यांची भेट जाहाली. आज्ञा केली जे; पेशजी बोलणें जाहलें ते श्रीमंत राजश्री आबासाहेब यांसी ( ) त्याजवरून पेशजी विश्रामाची व आबाची भेट जाहली नवती. प्रथम भेट घेणें तेव्हां सेला पागोटीं जाहानाबादी दिले आण भेट घेतली. या उपरांतीक आपणापाशीं बोललों होतों तें सर्व विदीत केलें. त्याजवरून कितिएक येथें राजश्री बापू आह्मीं एकत्र जाहालों ह्मणजे बोलून जाबसालाचा उबाराच धरिला. त्यांतील एक कुंसोबास कारभार सांगत होते त्याणीं न केला. पुढां पायाचे कारभारी ते कोण आण कोणास सांगावा? यांतील विचार तुह्मीच बापूशीं बोला. ऐसें ह्मटलें त्यावरून काल प्रातःकाळीं कृष्णाजीपंतास बोलावून आणून सांगितलें. राजश्रीशीं चार जाबसाल बोलून गेलां होतां. त्यापैकीं करवीरकर व फिरंगी हे दोनही जाबसाल वडिलांस पुण्यास लिहून पाठविल्याविना तेथील जबरेशिवाय सुदरणार नाहीं. हें आपल्यास ठाऊकच आहे. आमचे तर्फेनें आह्मी सरकारचाकरीस कमी करणार नाहीं. फिरंगी याजकडे जाबसालास तुह्मांकडील कारकून

१. हे सावंतवाडी सरकार तिसरे खेमसावंत होत. यांस राजे बाहादरचा किताब मिळाल्यापासून "राजश्री" ह्मणत. शिवाजी महाराजांचे वेळीं जे खेमसावंत होते, ते राज्य स्थापणारे पहिले खेमसावंत होत. नंतर दुसरे झाले व हे तिसरे. पुढें चवथे खेमसावंत झाले त्यांस बापूसाहेब ह्मणत. २. शिवराम जिवाजी सबनीस यांस कुसोबा नाना ह्मणत. हे गोव्यांचे फिरंग्यांकडे वकील ह्मणून गेले होते. पहा गोवें प्रांताचा इतिहास पृष्ठ ९१.

पाठवावा विसीं बोलणें. त्यास येथून आह्मीं कारकून पाठवावा. तर विना तेथील फिरंगी त्याच्या वकिलास जबरी पोहोंचावी; तेव्हां कारकून पाठविण्याचा उपयोग. जबरीशिवाय प्रथमच ( )हलका गोष्ट आहे. मग विशेष होईल चवथी ( ) गोष्ट येथील कारभार आह्मांस करा ह्मणतात. ( ) आमचे हातें निभाव पडणार नाहीं. व आमच्या घरांतही कोणी करता पुरुष नाहीं. आण वडिलांच्या शरिरानंतर घालविलें आहे. आह्मी तिघे वरघांटींहून घरीं आलों. ते साहेबाचे मर्जीमुळें आजवर राहिलों. येथेंही खर्चाच्या पेंचांत आलों. व तेथेंही ज्याची चाकरी करितों; त्याची मर्जी आह्मां ठायीं प्रसन्न राहिली नाहीं. बरें असो. पुढें सर्व लक्ष साहेबाची मर्जी संपादून जावें. त्यास साहेब ह्मणतात कीं कारभार करा. त्यास पायाची गोष्ट साहेबाची साहेबानींच करावी. आण आह्मांस वरघांटीं जावयास निरोप द्यावा. ऐसें कितिएक बोलून पंत मशारनिल्हेस पाठविलें. त्याजकडेस उत्तर केलें कीं; आपण व भाऊ व साबाजी यांजकडेस चार घटका समग्र बोलून चुकले. यासी शीर सुरी तुमचे मांडीवर शीर ठेविलें. यांत तुह्मांस सुचेल आण चौघांत लौकिकांत साजेसें दिसेल ती गोष्ट तुह्मी कराल ऐसें मोघमांत बोलले. याचा जाबसाल काय करावा तो लिहून पाठवावा. हे विज्ञापना. हलकारेबरोबर चिठी पाठविली ती पोंहोंचली. पुणेंहून बाळोबा रेगे याचें पत्र आलें. याजमुळें जाणेंची त्वरा. जलदी जाबसाल उरकून यावी. ऐसियास आल्यापासून सरकारांत विनंती केली. तीवरील पत्रावरून सर्व विदीत होतील. सारांश गोष्ट येथील कारभाराचे पोटीं आवघे बंदोबस्त आहेत. राजश्री लखबादादाचे रुपये व आह्मीं दरबारखर्चाचे रुपये दिले ते व पुढें आणखी कितिएक काजकामास सरकारची व भा-( ) रस विना कारभाराची मिसळ लागल्याशिवाई ( ) ल घडा कसा होतो असें त्याचें बोलणें आहे. घोडा कुमायत व चार जमाविसीं राजेश्रीची फारच निकट होती. त्यास चार जमा व जिन साहेबांचे मर्जीस येईल तर आणून देऊं. पर्जन्यामुळें आणला नाहीं. कुमेत घोडा बाळोजी निंमळकराचा आहे. त्याचा कज्या पडेल येविसीं वडिलांस पुण्यास लिहिलें आहे. परत त्याच्या चित्तांत संशय आला कीं; यांचे चित्तीं घोडा देऊं नये. आपण सबब सांगतात. याजवर वडिलांचे मर्जीस येईल तैसें करावें. घोडेविसीं निखालस जाबसाल नाहीं ह्मणोनच सांगितला आहे. कारभार करा ह्मणोन दुराग्रह आहे. त्यास कारभार करून परिणाम सुद दिसत नाहीं. न केला तर मर्जी ठीक दिसत नाहीं. एसें येथील मर्जी आहे. परंतु कारभार घरीं केला अथवा दुसरेस सांगा ह्मटलें ह्मणजे त्यास निमित्य जाहालें. मग गोष्ट आपले आंगावर आली. ऐसें आह्मांस दिसतें. त्यास ज्याप्रमाणें आपण लिहाल त्याप्रमाणें सरकारांत बोलूं. हे विज्ञापना.

ले० नं. १७८ शके १७१९ सन १७९६ श्रीशंभु. तारीख ९ जुलई १७९५.

राजमान्य राजश्री साबाजी वासदेव आरवलीकर यांस हुजूरची आज्ञा. सुरु सन सीत तिसेन मयां अलफ. कित्येक मजकूर बोलणें तो तुह्मांसीं बोलणेंत आलाच आहे. व राजश्री कृष्णाजीपंत यांसही सांगितल्यावरून रवाना करून द्यावे. कामकाजाचे अर्थ संपवून मशारनिल्हेस जलद रवाना करून द्यावे. चिरंजीव राजश्री जानेराव धारराव निंबाळकर हे राजश्री शिंदे यांबरोबर आहेत. तो

१. वाडी सरकार. २. खेमसावंत राजे वाडी सरकार. ३. हे खेमसावंत राजे बाहादर वाडी सरकार यांचे जांवई. हे शिंदेशाहींत होते. लक्ष्मीबाई शिंदे यांची मुलगी ह्मणजे ह्या खेमसावंतांची बायको. इजपासून झालेली सगुणाबाई नांवाची मुलगी जानरावास दिली होती. तिचे वंशज हल्लीं सावंतवाडीस आहेत.

सर्व मजकूर तुह्मांस समजलाच आहे. चिरंजीवाची तूर्त खर्चाविसीं खराबी आहे. यास्तव राजश्री जिवाजी बल्लाळ यांस पत्र राजश्री नारायण जिवाजी यांचें व तुह्मीं 'आपले नांवें अशीं दोन पत्रें अगत्यवादें चार गोष्टी लिहून तीं पत्रें येथें पावावीं. ज्यांत चिरंजीवाचा अगत्यवाद धरोन बंदोबस्त यथास्थित घडे असें लिहावें. तुमचीं पत्रें येईपर्यंत मनुष्य आलेलीं राहून घेतलीं आहेत. जलद यावीं. छ० २१ जिल्हेज चंद्र मजकूर.

ले० नं. १७९ श्रीशंभु. तारीख १० माहे जुलई १७९५.

राजश्री नारायणराव जिवाजी गोसावी यांसी.

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य–स्ने॥ राजे खेमसावंत भोंसले बाहादर सरदेसाई प॥ कुडाळ व माहाल्यानीहाय. राम राम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. पुणेंस फिरंगी आहे. त्याणें गोवंदर गोव्यास कागद पाठविले ते कागद जासूद घेऊन जात होता. तो मेटावर[1] सांपडला. त्याची येथें चौकशी करून कागदाची नकल काढिली आहे. ती तुह्मांस पाहणेविसीं पाठविली आहे. ती पाहून माघारें पाठवावी. हा मजकूर पुणेंस राजश्री जिवाजी बल्लाळ यांसी लिहून पाठवावा लागतो. त्यास येथून माणसें जाणेचीं तयार करून ठेविलीं आहेत. त्यास तुमचींही पत्रें लिहून याच मनुष्याबरोबर पाठवावीं. इरेची गोष्ट आहे. फिरंगी याणें पत्रांत खुना लिहिला आहे तो पूर्ता ध्यानीं आणून तिकडेस लिहावें. छ० २२ जिल्हेज. हे विनंती.

ले० नं. १८० श्रीशंभु. तारीख १० माहे जुलई १७९५.

राजश्री कृष्णाजी[2] महादेव गोसावी यांस

छ० अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य–स्नेहांकित राजे खेमसावंत भौंसुले बाहादर सरदेसाई प॥ कुडाळ व माहाल्यानीहाय. राम राम विनंती उपरी तुमचे येणेंची मार्गप्रतीक्षा करीत आहों. त्यास अद्याप येणें होंत नाहीं. तर जलद यावें. फिरंगी याचा कागद मेटावर सांपडला. त्याची नकल काढोन पाठविली आहे. ती नकलेंतील मजकूर तुह्मी व राजश्री नारायणराव ध्यानीं आणोन राजश्री नारायणरावांचीं पत्रें व सरकारचीं पत्रें पुणेंस राजश्री जिवाजी बल्लाळ यांस जलद गेलीं पाहिजेत. त्यांस त्याचीं पत्रें लिहून घेऊन तुह्मीं लवकर हुजूर पोंचे. माणसेंही तयार केलीं आहेत. वरकड कितेक मजकूर फिरंगी प्रकरणीं पुणेंस लिहावा तोही तुमचे विचारें रावजीस बोलून पत्रांत लिहून घेऊन यावें. पुढील पैरवीस आतां अवकाश नाहीं. हरएकविसीं मागल पडतां नये. जाणिजे छ० २२ माहे जिल्हेज. हे विनंती.

ले० नं. १८१ श्री. तारीख २६ जुलई १७९५.

ती॥ राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य जिऊबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ तागायत छ० ९ मोहरम मुकाम वानवडी येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप आहों. विशेष. सांप्रत आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळलें नाहीं. तेणेंकरून चित्त सापेक्षीत आहे. तरी वरचेवर लिहावयास आज्ञा असावी. इकडील सविस्तर लिहून पेशजीं जासूद काशीद जोडी रवाना केलीच आहे. त्यावरून

१. सावंतवाडीपासून एक कोशावर रानांत मळगांव व आकेरी येथें पूर्वीं शिपायांचीं ग्याटें होतीं; त्यांस मेटें ह्मणत.
२. हे कृष्णाजी महादेव फळणीकर सावंतवाडीचे राहाणारे. हे वाडी सरकाराकडून पेशव्यांकडे पुण्यास वकील होते, व शिंद्यांचे दरबारीं बक्षीकडेसही हे बोलण्यांत मध्यस्थ वकील होते.

रवाना होईल. श्रीमंत राजश्री राजे बाहादर यांचे प्रकरणीं पेशजी श्रीमंतांचीं[1] पत्रें फिरंगी यांस पाठविलीं होतीं. तीं अद्याप त्यांजपाशीं मधीं दस्तकाचा अटाव पडून पोंचलीं नाहींत. यास्तव हल्लीं राजश्री बहिरोपंत[2] याचीं व वकील फिरंगी याजकडील[3] याचीं व श्रीमंतांकडील वकील गोव्यांस आहेत त्यास अशीं घेऊन पाठविलीं आहेत. हीं तेथें पोंचल्यावर दस्तकही येईल. सरकारांतून राजश्री कृष्णाजीपंत यास जलदी तिकडे रवाना करून पत्राचीं उत्तरें सत्वर फिरंगी याजकडून आणून रवाना करून द्यावीं. जसा आशय असेल त्याप्रमाणें समजल्यावर जावत्काल श्रीमंत यजमान साहेब यांचा मुकाम येथें आहे. तोंपर्यंत पुढें पैरवी केली पाहिजे. येविसींचें सरकारांतही लिहिलें आहे. वरकड चिरंजीवाच्या पत्रावरून कळेल. चिरंजीवाची रवानगी करून द्यावी. तेथें बरोबर खर्चाचा खर्च आहे. आण यावयास विलंब लागला. ह्मणोन यजमान साहेबांची इतराजी. यास्तव आतां पत्र पावतांच चिरंजीवाचे रवानगीस विलंब न करितां सत्वर करून द्यावी. निःकारण सरकारची मर्जी कडवी होऊन द्यावी हें ठीक नाहीं. यास्तव जलद रवाना करावा. हे विज्ञापना.

लें० नं. १८२ श्री. तारीख २६ जुलई सन १७९५.

श्रियासह चिरंजीव मुलेंप्रती जिवाजी बल्लाळ. आशीर्वाद उपरी येथील कुशळ तारीख छ० ९ मोहरम मुकाम वानवडी जाणोन तुह्मांकडील क्षेम लिहीत जावें. विशेष. श्रीमत राजश्री राजेबाहादर या प्रकरणीं पेशजी श्रीमंतांचीं पत्रें फिरंगी यास घेऊन राजश्री कृष्णाजीपंत यांजबरोबर रवाना केलीं होतीं. त्यास गोवेंकर याचें दस्तक न आल्यामुळें कृष्णाजीपंत याचें जाणें तहकूब झालें. तेव्हां हल्लीं राजश्री बहिरोपंत मेहंदळे याचें पत्र श्रीमंतांकडील वकील राजश्री प्रभाकरपंत गोव्यास आहे; त्यास व फिरंगी यास सरकारच्या पेशजीच्या पत्रान्वयें जाबसाल उलगडून घ्यावे. येविसीं व राजश्री विठ्ठल गोरक्ष फिरंगी यांजकडील वकील तेथें आहेत. त्याचे अशीं पाठविलीं आहेत. प्रभाकरपंत यांस कृष्णाजीपंत याणीं लिहून पाठविल्यावर दस्तक तेथून येईल. सारांश. पत्रें घेऊन कृष्णाजीपंत याणीं लौकर जाऊन श्रीमंत यजमान साहेबांचें येथें मुकाम आहे तावत्काळ फिरंगी याजकडील जाबसाल काय होतात. तें लिहून पाठवावें. यजमान साहेबांच्या कुचाचीही गडबड जलदीच व्हावी असें आहे. याजकरितां विलंबवर न पडतां सत्वर समजण्यांत आलें पाहिजे. यासारखें पुढें साधन योजून पैरवी करावी लागेल. तुह्मीं तेथून जलदी निघून येणेंविसीं एकदोन पत्रें आजूरदाराकडेस रवाना केलीं. बरोबर खर्च आहे. येथेंही जलदीच कुचाची गडबड आहे. यजमान साहेब नित्य पुसत असतात. अद्याप आला नाहीं. ह्मणोन सरकारची मर्जी खपा. याजकरितां व पुढें किति एक जाबसाल आहेत. त्यास अतःपर विलंब न करितां पत्र पावतांच सत्वर निघून येणें. आज पावेतों श्रीमंत बाबासाहेबांची मर्जी संपादून घेतली होती. ती विनाकारण कडवी झाली आहे. याजकरितां पत्र पावतांच तेथें पाणी न पितां निघून येणें. हे आशीर्वाद.

लें० नं. १८३ तारीख २६ माहे जुलई १७९५.

( )

विज्ञापना तागायत छ० ९ माहे मोहरम मुकाम पुणें जाणोन वडिलांचे आशीर्वादें-

---

१. पेशव्यांचीं. २. हे बहिरोपंत मेहंदळे पेशव्यांकडील वकील गोव्यांचे फिरंगी यांकडे पूर्वी होते. ३. विठ्ठल गोरख वर्दे वालावलकर हे फिरंग्यांकडील वकील पेशव्यांकडे पुण्यास होते. हे कवीही होते. ४. नारायणराव बक्षी. ५. दौलतराव शिंदे.

करून सुखरूप असों. विशेष वडिलांकडून बहुत दिवस आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. त्यास असें न करावें. हरघडी आशीरवादपत्र पाठवून सांभाळ करावा. यानंतर इकडील वर्तमान तर श्रावण वद्य ५ मीस श्रीमंत राजश्री दौलतराव बाबा निरोप घेऊन श्रीगोदेस जाणार असा निश्चय ठरला आहे. श्रीमंत राजश्री नाना फडणीस याणींही कबूल केलें जे. तुह्मांस सर्वत्रांस निरोप देतों ह्मणोन बोलले. परंतु त्रिवर्ग आठपंधरा दिवस मागें राहतील. दुसरें पथकाचा मजकूर तर लोक कोणीच अद्यापि येथें आले नाहीं ते नाहीं. सर्वत्रांस जांबगांवीं गंगेवर गेलेवर देऊं ह्मणत्यात परत उज्जेन फिरोन पाहातील तेव्हां लाभानें होतील. आलीकडे कांहीं होत नाहींत. राजश्री देवजी बावा गौळी यांची मसलत कबजे करून घ्यावी आण दिल्लीचा सुभा करून घ्यावा असें आहे. अद्यापि बोलणें ठरलें नाहीं. कबज्याची बाकी पे॥ ऐवज कोणता ह्मणाल तर नजराणेचा दिल्ली सुभेंतील ( ) घ्यावे हें मानस येथें कांहीं ये ठिकाणा दिसत नाहीं. त्याजपक्षीं तोडजोड लाऊन घेतलेविना उलगडा होतां दिसत नाहीं. आपण आषाढ मासींचा ठराव करून गेलां. त्या-( ) तेव्हां येथूनच कोकणांत यावें. ही तजवीज केली आहे. यांत वडिलांचे मर्जीस येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. दुसरें. आपण कोंकणांत गेलां. तेथें राहिला कोणते मसलतीवर राहिला. हें समजत नाहीं. येथें वर्तमान तर सावंतांचा कारभार आपण करून तेथील बंदोबस्तास आपण राहतां आण रावजी येणार असें ऐकितों. सत्या मिथ्या कळत नाहीं. ( ) फसतील असें कांहीं आमचे अक्कलेस येत नाहीं. परंत न जाणो ईश्वरसूत्रासीं उपाय नाहीं. असो या उपर वडिलांनीं सत्वर यावें. हें ठीक आहे. तशांत वडिलांची मर्जी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी.

सदरहू ती॥ राजश्री बापूकडील वर्तमान तर फौज सबळगडास लागली आहे. मोर्चे लागले आहेत. आज दीड महिना जाला. आपलेकडील माणूस फार नाशाड जाहलें. परंत अद्यापी किल्ला कांहीं जरंदस्त जाला नाहीं. खर्चवेर्च आंबोजी इंगळे देत असतात. भूपाळवाळा पठाण मृत्यू पावला. त्याच्या मुलखांत अमल करावा. ही मसलत आहे. बाकी सर्व वर्तमान वडिलांनीं लिहिलें आहे. त्यावरून निवेदन होईल. हे विज्ञापना.

हे॥ राजश्री साबाजी बाजी केरकर स्वामीचे सेवेसीं साष्टांग नमस्कार विनंती उपरी. लिखितार्थ परिसोन कृपापत्रीं सांभाळीत गेलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान वडिलांस लिहिलें आहे. त्यावरून विदीत होईल. पासोड्या नारायणपेठी ४ फटसेट याजबरोबर व मोत्यां दोनसें सव्वीस पुंडवा बागणीकर याच्या माणसा- ( )

ले० नं. १८४ पै॥छ० ११ माहे सहूर सन शीत तिसेन. श्री. तारीख १० आगष्ट १७९५.

तारीख २७ आगष्ट १७९५ सोमवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य जिऊबानें चरणांवर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २४ मोहरम मुकाम नजीक पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. वडिलांकडून

---

१. तारीख ५ माहे आगष्ट सन १७९५.

छ० २४ व छ० २७ जिल्हेजचीं पत्रें आलीं तीं पोंहचून लिहिलें वर्तमान कळलें आलें. श्रीमंत राजश्री राजे बाहादर यांज प्रकरणीं फिरंगी व कोल्हापूरकर यांजकडील जाबसालाविसीं विस्तार लिहिला. त्यास फिरंगी यास पत्रें देऊन कासीद जोडी रवाना झालीच आहे. ती पोहोंचलीच असेल. वरकडही त्याच प्रयत्नांत आहों. याविसींचें सर्व चिरंजीवाचे पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून विदीत होईल. करवीरकर यांजकडील जाबसाल तर किल्ले मुलूख प्रथम सोडून देविलाच आहे. त्याप्रमाणें आपल्या जबरदस्ता-( ) सांभाळावयांत आणखी येथून बंदोबस्त व्हावा. तें काय ? त्यांतही ते[2] बखेडे करितात. येविसींचें श्रीमंतांचें पत्र घेऊन पाठवून देवितों. चिरंजीवाची व चिरंजीव भाऊची व वरकडांची रवानगी श्रावण शु॥ ५ मीस करून देतों. श्रीदेवाचाही कौल घेतला ह्मणून लिहिलें. त्यास आपणास तेथून निघावयाचें वर्तमानं नाहीं. येथून श्रीमंतांनीं श्रीमंत यजमान साहेबांस वस्त्रें श्रावण व॥ ५ स दिलीं. त्याच मुहूर्तीं डेरे दाखल जाहाले. लवकरच येथून कूच होऊन जामगांवीं जातील. चिरंजीवाबरोबर मुलांमाणसांची रवानगी करून देतों ह्मणून लिहिलें. त्यास तूर्त रवाना करावयाचीं कांहीं टीक केलें नाहीं. बरें. वडिलाचे मर्जीस आलें तें खरें. भेटीविसींचा मजकूर लिहिला. त्यास माझेही चित्तीं वडिलांची भेट घ्यावी. हें आहे. परंतु वडिलांचे पुण्यें होईल तो सुदीन. हे विज्ञापी.

लें० नं. १८५ श्री. तारीख १० आगष्ट सन १७९५.

सहस्रायु चिरंजीव मुलांप्रती जिवाजी बल्लाळ आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २४ मोहरम मुकाम वानवडी नजीक पुणें जाणोन तुह्मीं ( ) येथून कासीद व जासूद ( ) त्यांसही उत्तरें देऊन माघारें रवाना केल्या नाहींत. यावरून काय समजावें. तेथें तुह्मींच राहून बंदोबस्त होतो; असा अर्थ नाहीं. संस्थानाविषयींचें अगत्य पहिलेपासून आहेच. त्यापेक्षां येथून जेवढा प्रयत्न होईल तेवढा करीत ( )

लें० नं. १८६ श्रीशंकर. तारीख १२ आगष्ट सन १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ मोहरम मुकाम आजरें येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. राजश्री माधवराव तात्या सबनीस याविसीं पेशजी सरकारच्या बोलण्यांत कितिएक जाबसालें होतें. त्याजविसीं सांप्रत सरकारांतून त्यांजकडे कारभारसंबंधी श्रीमंतांची मर्जी होऊन त्याजकडे कारभार होणार ह्मणोन ऐकिलें. त्यास वडिलांकडून ममतापुरस्कर अगत्यवाद धरून त्याचें आपलें एक चित्त असावें. आह्मी इकडे आलों ह्मणोन वडिलीं पुरवतप्रमाणें त्यासीं दुसरा विचार न धरितां घरोबा असावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापी.

---

१. तारीख १५ जुलई १७९५. २. वाडी सरकार. ३. तारीख २१ जुलई १७९५, मंगळवार ४. तारीख ५ आगष्ट, सन १७९५, बुधवार. ५. नारायणराव बक्षी. ६. सावंतवाडी संस्थान. ७. हे वाडी सरकारचे प्रधान, जिवाजी विश्राम सबनीस यांचे नातू माधवराव शिवराम सबनीस होत. ८. माधवराव सबनीस यांस कारभार देण्याबद्दल नारायणराव बक्षी यांनीं राजे खेमसावंत भोंसले यांजकडे रदबदली केलेली होती. पुढें त्यांचे नांवें कारभार झाला.

लें० नं. १८७ पै॥ छ० २७ माहे रबिलावल. श्री. तारीख १७ माहे आगष्ट १७९४.

चिरंजीव विश्राम याप्रती सौभाग्यवती गोपिकाबाई[1]. अनेक आशीर्वाद उपर येथील तागायत छ० १ सफर मुकाम वाडे[2] सर्व सुखरूप जाणोन तुजकडील सविस्तर लिहिणें. मागां आरवंदेकर याचा माणूस आला. त्याकडेस घरांतून कागद दिले आहेत. एक महिनापर्यंत तो पायास नारू जाहला ह्मणून वाडींतच होता. आतां जावयास आला. तेव्हां सुखरूपपणाचें वर्तमान लिहून पत्र दिलें आहे. आह्मीं गांवीं जाणेंचा निर्गम अद्यापी कांहींच नाहीं. राजश्री दादांस कागद गेले आहेत. पुणेंस येतील तेव्हां बंदोबस्त होऊन आह्मी जाऊं या भरवसेवर आहों. आणखी वाडीहून फिरंगी यासी विरोध करावा ऐसी मसलत आहे. परंतु सर्व प्रकारें भरंवसा दादांकडील[3] आहे. ते आलेवर बंदोबस्त होऊन येईल. या भरंवसेवर आहों. बहूत काय लिहिणें हे आशीरवाद.

लें० नं. १८८ श्री. तारीख २८ सपटंबर सन १७९५.

तीर्थरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य विश्रामानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १४ रबिलावल मुकाम वानवडी येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. वडिलीं समशेट याजबरोबर पत्र पाठविलें पावलें. लिहिला मजकूर सर्व कळों आला. कर्जाचा वगैरे सर्व येथें वडिलांस विदीत केलें. त्यास सध्यां ओढ आहे. तशांत आपण वरचेवर लिहीत जाणें. ह्मणजे कांहीं तरी कार्य होऊन येईल. लिहावयास अनमान न करावा. व कापड कसें पाहिजे त्याची यादी तेथून लिहून पाठवावी. ह्मणजे कापड पाठवून देतील. याजप्रमाणें बोलले आहेत. आह्मांकडील मजकूर. सध्यां येथें कांहीं सोई होऊन आली नाहीं. कारण कीं; श्रीमंत यजमान जामगांवीं गेले. आण वडीलें येथें राहिले. ते हे एकत्र होतील त्यानंतर जामगांवाहून कूच होईल. तशांत जाबसाल कसा होऊन येतो. हिशेबाचे फडशेही राहिले. सध्यां जावदेपैकीं दंगा. या अर्थी तुह्मीं जाणें चौं महिन्यानें लष्करांत यावें ह्मणोन वडिलांनीं सांगितलें. त्याजवरून बावीस रोज येथें राहिलों.( ) च निघालों. ते जामगांवावरूनच जाऊं. मागती लष्कर उज्जनेचे सुमारें येतांच येऊं. आपण हिशेबाचे फडशे करून पुढील सोई बनल्यास राहूं. नाहीं तर तोटेची मामलत सोडून देऊं. ऐसा विचार आहे. सध्यां दो जागां जाबसाल पडला. तेव्हां कोठवर येथें राहावें. ऐसें जाणून निघालों. मागती चौं महिन्यांत लष्करांत यावें लागेल. आणखी कांहीं सोई होऊन आली तरी केली जाईल. खर्चाचा मजकूर आह्मांकडून न ह्मणावा तर आह्मी तेथें गेल्यावर अजमेरीस लिहून कांहीं सोई बनून आली तर पाठवून देऊं. फिरंग्याचे[5] सलूकाविसीं वडिलांसी बोललों आहों. त्याच संधानांत वडील आहेत. मागून आपण वरचेवर लिहीत जाणें. राजश्री लक्ष्मुमण नारायण याचा माणूस दस्तकाकरितां पाठविला असे. वडिलांपासीं ठेविला आहे. मागून दस्तकें सरकारचीं करून देतों. ह्मणून वडील बोलले आहेत. मौजे तळगांवाविसींही[6] दस्तक घेऊन पाठवितील. कागद दस्तकाचे येथें वडिलांकडे समजोन दिले आहेत. वडिलांकडील वरचेवर वर्तमान लिहून पत्रें येथें पाठवित

१. ही नरोबा दादांची बायको. २. सावंतवाडी. ३. जिवबादादांकडील. ४. जिवबादादा. ५. गोवें सरकार पोर्तुगीज लोकांचे. ६. हा गांव वाडी सरकाराकडून नारायणराव बक्षी यांस इनाम होता; हल्लीं तो इंग्रजांचे ताब्यांत असून मालवण तालुक्यांत आहे.

जावीं. ह्मणजे आह्मांकडे पावतील. जावदेस गेलेवर सविस्तर वर्तमान लिहितों. सौभाग्यवती लक्ष्मी होनी उज्जनीस सुखरूप पोंचली. उज्जनीहून जावदेस पोंचलेचें वर्तमान आलेवर लिहितों. त्याविसीं चिंता न करावी. उज्जनीहून जावदेस जावयास गेलीं. ह्मणोन पत्रें आलीं होतीं. पोहोंचल्याचें वर्तमान आलेवर लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

लें० नं. १८९ श्रीमंगेश.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारायणरावजी स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक सदाशिव माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ७ माहे सवाल तारागड[1] जाणोन स्वकीयानंद वैभव्य लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष बहूत दिवस आपणाकडील पत्र येऊन सांभाळ जाहाला नाहीं. त्यावरून चिंतातूर आहों. तर ऐसें स्नेहाचे जागां ऐशी निष्ठुरता न धरावी. हरघडी पत्र पाठवून सेवकाचा सांभाळ केला पाहिजे. यानंतर आमची घरची हकीगत पेशजी ती॥ राजश्री नानासाहेबांनीं आपणास पत्र लिहिलेंच आहे; व आह्मींही एक-दोन पत्रें लिहिलीं आहेत. पोहोंचलीं न पोहोंचलीं कळत नाहीं. हलीं कानू खिजमतगार यास मुजरत पाठविला आहे. तर ती॥ राजश्री दादासाहेबांस विनंती करून आमच्या बंधूची मोकळीक जलदी होई तो अर्थ करावा. ( ) तां सर्व भरोसा आपला आहे. कुटुंब झाडून पेंचांत पडलें आहे.[2] जैसें आपणास कळेल तैसें करून सुफळ होई तें करावें. दुसरें. कानू खिजमतगार याचा आपणाकडेस अर्ज आहे. कोणता ह्मणाल तर गारदवडीस राहातो. तेथें याचा भाव खेती करितो. तेथें जांगडी याचे रुपये ४० देणें होते ते रुपये जांगडी मजकूर यास पोंचले नाहीं. ह्मणोन राजश्री बाबुराव कमाविसदार याणेंही माहीत करून बैल चार जांगडी याचे हवालीं केले. त्यास ये ( ) त्याचें भाडें देईल तेव्हां रुपये चाळीस घ्यावे; ऐसें कमाविसदार यास आपलें पत्र पाठविलें ह्मणजे बैलही देईल. आण एक वरीस मेहनत करून जमीन पेरली त्याचें भाडें जमेदार मजकूर सांगतील त्याप्रमाणें रुपये ४० कानूचे बंधूनें देणें त्यामध्यें मजरा देईल. आजकाल आपल्या पत्रानें काम होईल. आण गरिबाची संरक्षणा होईल. आण हा चाकर आपलाच आपणही अहीत करणार नाहीं. तर दुसराही माईत करणारा कोण आहे. जरूर जाणून विनंती लिहिली आहे. कानूही उत बहूत अर्ज करील त्यावरून विदित होईल. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. १९० श्री

राजश्री साबाजी राम केरकर गोसावी यांस

छ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित रामसावंत भोंसुले तिरवडेकर रामराम विनंती उपर येथील कुशल तागायत छ० २५ जिल्हेज जाणोन पेडणेचें वर्तमान यथास्थित असे विशेष. आपणाकडील कांहींच वर्तमान बहूत दिवस कळत नाहीं. तरी असें नसावें. सदैव येणाराबरोबर पत्र पाठवीत जावें. यानंतर हलीं लष्करचे कागद आले. तर वर्तमान लिहावें. तुह्मांस भात पाहिजे तर राजश्री सदाशिव राम नाईक कमाविसदार माहाल तर्पे पेडणें. हा चारशें रुपयांचें भात देणार त्यास आपणास पाहिजे असें असलेस तो पालयेमध्यें केव्हां काडोड बागायत येथें चारशें रुपयेचें दे-

१. अजमीरच्या किल्ल्यास तारागड ह्मणतात. २. अडचणींत पडलों असतां जिवबादादा आपणांस वर काढितील, ह्मणून त्यांचा दादांवर किती भरंवसा होता तो पहा.

ईल.[1] तर हल्लीं आपणाकडेस रघे परब आजगांवकर उत्तर पाठविलें आहे. याकडेस चारशें रुपयेचें काम करून द्यावें. भाताविसीं चिंता नाहीं. ऐवज ठीक आहे. वरकड मजकूर रघे परब व काळू आरवदकर सांगतां कळों येईल. व राजश्री दादा कोण मुकामास आहेत; तें वर्तमान लिहावें. बहूत काय लिहिणें हे विनंती.

• लें० नं १९१ छ० २७ रबिलावल.　　श्री.　　तारीख ३० सपटंबर १७९५.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेशीं.

अपत्य जिऊबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० १६ रबिलावल मुकाम वानवडी येथें वडिलांचे आशिर्वादें सुखरूप असों विशेष. वडिलांकडून छ० २२ सफरचें पत्र आलें तें पावोन लिहिला वृत्तांत कळला. चिरंजीव व वरकड मुलेंमाणसें आलीं; तीं येथें सुखरूप पोहोंचल्याचें वर्तमान पेशजी लिहून पाठविलेंच आहे. श्रीमंत यजमान साहेबांचें कूच होऊन जामगांवीं स्वारी गेली. बरोबर चिरंजीव मूल गेला आहे. पुणेंस सरकारी काजकामामुळें आमचें राहणें तूर्त येथेंच जाहलें आहे. वरकड मुलें माणसें अवघीं येथेंच आहेत. चिरंजीव विश्राम व भाऊ यांची जावेदस जावयाची रवानगी छ० १३ रोजीं करून दिली. ते जावयास गेले. वरकड त्याजबरोबर जावयाची मंडळी चिरंजीव अंतोबा नेरलेकर व वेंकोबा वगैरे जावयास गेले. आमचेंही येथील काजकाम लौकरच आटपून दसऱ्यास जांबगांवीं जावें; ऐसा बेत आहे. घडून येईल त्यासारखें लिहून पाठवूं. सबसेट याजबरोबर जिन्नस मोवे नारळ व घुडघुडी नारळ व काजीचा गर व गूळ आंबसोलें वगैरे पाठविला तो यादीबरहुकूम पावला. कर्जाचें निवारण व भेटीचा योग घडावा ह्मणोन लिहिलें. त्यास कर्ज वारावयाची ही व भेटे व्हावी ही काळजी आहेच. घडून यईल तो सुदीन. येविसीं वडिलीं कांहीं चिंता न करावी. वरकड सविस्तर मागाहून लिहून पाठवूं हे विज्ञाप्ती.

लें० नं. १९२　　श्री.　　तारीख १४ डिसेंबर सन १७९५, सोमवार.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य राघोबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २ जमादिलाखर मुकाम जांबगांव वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. पुणेंकडील वर्तमान आपणास पेशजीं लिहिलें गेलेंच आहे. अद्याप एकही निश्चय झाला नाहीं. नकार याची मर्जी फार करून दत्त घेऊन चालवावें असें आहे. वरकड सर्वांची मर्जी त्या सल्लेंत नाहीं. या उपर कसें काय होतें तें पाहावें. त्याणीं आपलेकडील कारभारी मानीत नाहीं ह्मणोन आकारास उभा करावा येविसीं त्यांची सल्ला आहे. मित्र व वडीलें व धणी एक चित्तें आहेत; तेव्हां कांहीं घडणार नाहीं. तेथें भेटीस

१. त्या काळीं या एका पुरुषाकडे बरेच जणांचें लक्ष लागलें होतें. त्यांपैकींच हे रामसांवत भोंसले एक होत. हे भोंसले वाडी सरकारचे सरदार असून हे वाडी व ग्वालेर या दोन्ही संस्थानांत महाशूर आहेत. २. नारायणराव बक्षी. ३. खर्ड्यांचे लढाईनंतर "जिवबादादा बक्षी यांचीं सरकाराशीं राज्यप्रकर्णीं बोलणीं बहूत झालीं. या गोष्टीस निरोपास आठपंधरा दिवस अवकाश पडला." असें पेशव्यांची बखर पृ० १६१ येथें लिहिलें आहे. तो हाच प्रसंग होता. ४. सरकारच्या कामकाजामुळें जिवबादादांस आपल्या बंधूस भेटावयाचा बारा वर्षांत सुद्धां योग आला नाहीं. ५. नकार ह्मणजे नाना फडणीस. ६. दत्तक. ७. दत्तक घ्यावा असें कोणाचेंच मत नव्हतें. ८. नागपूरकर भोंसले. ९. जिवबादादा. १०. दौलतराव शिंदे.

गेल्यास पांच चार हजार फौज बरोबर जात असती. वडिलांस कळावें. आणखी कांहीं कच्ची हकीगत लिहिण्यास पत्रीं ठीक नाहीं. येतदर्थी लिहिली नाहीं. घरांतून कोणी माणूस जाईल तर सेवेसीं लिहितों. हरद्यांहून वडिलांचीं पत्रें कहीपज पाठविणेविसीं आलीं होती. त्यास येथें व पुण्यास मिळत नाहीं. येतदर्थी वडिलांस लिहिलें आहे. तर अगत्य एक कहिपज घेऊन पाठवून द्यावें. ती॥ राजश्री भाऊ वगैरे पुणेंस सुखरूप आहेत. वडिलांस कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापि.

लें० नं. १९३ सन १७९५.

२ पुरवणी—चिरंजीवास आशीर्वाद उपरी. आह्मीं. मुंबईचा इंग्रज याणीं गोवेस पत्रें पाठविलीं. त्यांतील अर्थ लिहून नकल पाठविली. तोही मजकूर समजला. याजकरितां येथोन सरकारचीं व सदोबा भाऊंचीं पत्रें मुंबईच्या फिरंगी यांस पाठविलीं आहेत. तुह्मीं गोमंतकास फिरंगी यास लिहून पाठवून सावंतांचा व तुमचा पहिलेपासून वहिवाट आहे त्याप्रमाणें चालावें. नवीन ठाणीं मुलूख घेतला तो सोडून देऊन तह करावा. येविसीं श्रीमंतांचींही पत्रें तुह्मांस गेलींच आहेत. ह्मणून लिहून पाठवून तह करवावा. याप्रमाणें व इकडील कांहीं दबाव घालून इंग्रजास पत्रें पाठविलीं आहेत. तेव्हां तो गोवेस पत्रें पाठवील. इकडूनही श्रीमंतांकडून पत्रें गेलींच आहेत. व बहिरोपंत मेहदळे व त्याजकडील वकील याचींही अंतरयामीं इकडील दबावचीं पत्रें गेलींच आहेत. याचीं उत्तरें काय येतात; तीं लवकर जांबगांवास मुकाम आहे. तों आलीं ह्मणजे पुढील विचार कर्तव्य तो केला पाहिजे. तुह्मीं गेल्यासारखे चिरंजीव सौभाग्यवती बायूची भेट जाहाली. उत्तम जाहालें. आतां विलंब न लावितां जलदी निघोन येणें. श्रीमंतांनीं श्रीमंत यजमान साहेबांस निरोपाचीं वस्त्रें दिलीं. त्या समयीं मुत्सद्दी यांस येणेंप्रमाणें—

१ तात्या पागनीस यास चौकडा.
१ तुह्मांस शिरपेंच वस्त्रें.
१ सदोबा भाऊ यास जोडी.
१ आह्मांस जोडी मोत्यांची.
१ वरकडांस वस्त्रें व ज्यांस शिरपेंच द्यावयाचे त्यांस शिरपेंच.

येणेंप्रमाणें व वरकडांस ज्याप्रमाणें पहिलीं दिलीं होतीं त्याप्रमाणें सर्वांस देऊन निरोप दिला. परंतु येथून जाऊन जांबगांवीं दसऱ्यापर्यंत दोन महिने मुकाम करून राहावें. याप्रमाणें श्रीमंतांचें व श्रीमंत नानाचें मानस. यास्तव येथून तर लौकरच कूच होऊन जांबगांवीं जातील. तेथून पुढें काय सल्ला ठरवितात पाहावें. येथें लोकांचा गवगवा आहे. पाणिपतास बहिरो कोजेर याचे तैनातीस लोक होते. येथें येऊन आपला फडशा करून मागतात. आज पांचसात रोज त्यांचें धरणें. त्यांत दोनतीन रोज स्नानही नाहीं. सरकारांतून तोड कांहीं न पडे. रुपयेंची ओढ. पुढेंही जांबगांवीं गेल्यानंतर लोकांचा गवगवा भारी पडेल. धण्याचे पुण्यें पार पडेल तें खरें. हे आशीर्वाद.

१. रस्त्यांत पत्रें फुटत होतीं; यास्तव लिहिण्यास संशय होता. २. दिवा लावण्याचें एक प्रकारचें जें तेलाचें भांडें असतें, त्यास कहीपज ह्मणतात. हीं भांडीं गोव्यास चांगलीं मिळतात. ३. सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण हे शिंद्यांचे प्रधानांपैकीं होत. शिंद्यांचे इंग्रजांबरोबर जे तह झाले, त्यांत यांनीं फारच महत्त्वाचें काम केलें. पहा वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ७६।७७ व महादजी शिंदे यांचें चरित्र पृ० १६९।१७०. ४. 'पत्रें व यादी' यांतील पत्रें १६९।१७१ पहा. ५. पेशव्यांनीं. ६. दौलतराव शिंदे यांस. ७. बाळोबा तात्या. ८. हें पत्र जिवबादादांनीं आपला मुलगा नारायणराव यांस लिहिलेलें आहे असें दिसतें. ९. सदाशिव मल्हार ऊर्फ भाऊ दिवाण. १०. जिवबादादांस.

लें० नं. १९३ सन १७९५.

पुरवणी—वडिलांचे सेवेसीं. नाहीं श्रीमंत नानांचीं पत्रें फिरंगी यास पाठविलीं आहेत. सावंतांकडून इनामा चालत होतें. त्याप्रमाणें चालावें. फिरंग्याकडून कौल घेऊन देवबा लाड यांजकडे द्यावा. याप्रमाणें सरकारचें राजश्री तातांचें व पाटलांचें लिहून गेलें आहे. देवबा लाड कौल आलेवर देवबा आपलेशीं बोलतीलच. ज्यांत तजवीज उत्तम दिसेल ती करावी. श्रीदेवाकडे पुसून उत्तम असेल तें करावें. येथून मसलत तूर्त घडत नाहीं. चार साहा महिने अवकाश आहे. राजश्री धोंडिबा पागनीसही श्रीदेवास गेले आहेत. याचे आपले विचारें ठरेल तें करावें. वरकड आल्लाइदा पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून विदीत होईल. श्रीमंत कैलासवासी जाहलेमुळें इतके विलग पडले. येविसीं श्रीमंतांनीं वचनही दिलें होतें. होणारास उपाय नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापी. सावंतांकडील मामलत निमे आपणाकडे सांगितली. निमे ह्माजन याचे हिशेची कृष्णाजीपंत याजकडे अनामत होती. ती ह्माजन करीत नाहींत. त्यास येविसीं राजश्री बाजीबासीं बोलून मामलत करीत असें करावें. ह्मणोन वडिलीं लिहिलें. त्यास येविसींच बाजिबा दादासीं बोलून मामलत करणेंविसीं राजश्री देवबा आनास पत्र बजिन्नस घेऊन तिकडे पाठविलें आहे. तर्फा आपल्याकडे चांगल्या नेमून घ्याव्या. किल्ला आपल्याकडे ठेवावा कीं न ठेवावा. याची मर्जी वडिलांची असेल तशी करावें. मामलती केल्या त्याची सावधता ठेवून वरचेवर रुपये उगवून धणीवाणी राजी राखावा. हें काम वडील करतीलच. या मामलतीविसीं तळगांवचे इनामाचे सनदीविसीं राजश्री नारायणराव फरके व आपाजी भगवंत कोलापुरास येथून गेले आहेत. त्यांस पत्रें पाठविलीं आहेत. त्यांचीं उत्तरें येतांच पाठवून देतों. मामलतीचा जाबसाल आपण चार घटका बसोन मनन करीत असावा. लक्ष्मण नारायण याचें घर राखावयास आपेसी येविसीं सुचना पेशर्जी लिहिली होती. ध्यानीं असेलच. वरकड सर्व ईश्वर पार पाडीलच. हुंड्याच्या पेट्या पाठविल्या. त्याची चौकशी करून मागाहून लिहून पाठवितों. हे विज्ञापी.

लें० नं. १९४ श्रीगजानन.

तीर्थस्वरूप राजश्री आपा व तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य जिवाजी बल्लाळ चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० १ जमादिलाखर मुकाम रहिमतपूर वडिलांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे वि॥ यानंतर इकडील वर्तमान मागां विठोबा हिरोजीबरोबर लिहिलें आहे. त्यावरून कळेल. आपण लिहितां कर्जदारी याचा उपद्रव लिहितां पुर्वत नाहीं. त्यास आह्मीं आलों तागायत पाठविलें कर्जदारी यास हें ठाऊक आहे. आपण लिहितां आण आह्मीं पाठवावें ऐसें नाहीं. असो. हाल्लीं पुणेंच्या हुंड्या पाठविल्या आहेत. ३ त्या घ्यावे.

१. नाना फडणीस यांचीं. २. महादजी शिंदे. ३. बाजिबा महाजन मोदी. ४. देवबा आना महाजन. ५. ज्या वेळीं पहिल्यानें जिवबादादा पेशव्यांकडेस सन १७५६ चे सुमारास राहिले, त्या वेळचें हें पत्र आहे. हीं नंबर १९३ ते नंबर २१५ चीं पत्रें महादजी व जिवबादादा यांचे कारकीर्दीतील खरीं; पण तारीख सन समजत नसल्यामुळें तीं दादांचे कारकीर्दीचे शेवटीं दिलीं आहेत.

१००० गोदशेट घोटगे.
५०० विठशेट घोटगे.
२५० सोनू गणेश.

१७५० येणेंप्रमाणें पाठविले आहेत. त्यास घ्यावे. आण बाकी त्याची निमे कमपेश राहील, त्यास वाइदा करावा. साफ तुह्मीं एकाचे काढून एकास द्यावे. हें एक खरज करावे. आह्मांकडून ऐवज येईल त्याप्रमाणें पावता करावा. नारायण नाईक खित्रे याचा माणूस आला होता. त्यास पंधराशें दिल्हे. त्याचा माणूस आज (   )

ले० नं. १९५ श्री.

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपर येथील कुशल जाणऊन लेखन केलें पाहिजे विशेष. आह्मांकडील वर्तमान. गुदस्तां लष्करामध्यें जिगणीस श्रीनें आह्मांवर कहर केला. तंवपासून आह्मी तेथील कांहींच कोणापाशीं बोललों नाहीं. आण तेथूनीही चिरंजीवानें कांहींच तपशीलवार लिहिला नाहीं. हालीं तेथून आले गृहस्थ सांगत होते जे. चिरंजीव सदोबा राजश्री जिवबादादाकडेस होते ते सडे फौजेंत गेले उपर तुमचा राजश्री बाळोबाचे रावटेंत होता. तेव्हां राजश्री बाळोबास कालच नेऊन आपल्या काजकामास जात होता. मागां दाहा पांच गृहस्थ तेथ होते. अन्नास सुदामत चालेनासारिखें जाहालें तेव्हां चिरंजीव साबाजी नारायण याणीं चिरंजीवास आपले रावटीमध्यें न्हेलें. त्या उपर राघोगडची मामलत केली. आण चिरंजीवास तेथील काजकाम सांगोन रवाना केलें. तेथ सुखरूप आहे ह्मणून कल शामा काशिदाकडेस उभयतांचीं पत्रें आलीं. जिगणीस मजकूर घडले उपर पांच घोडीं व उंट एक होता. तो राजश्री जिवबादादा यांहीं सातें घोडीं सरकारी रुजू करोन आज तागायत रोजमरा सर्वांप्रमाणें चालतो. चिरंजीव राजश्री पांडुरंग नारायण यांचे निसपतीनें रोजमरा चालतो. सडे फौजेमधें घोडीं आहेत शावणीस कुली फौज दिल्लीस येणार. दसरेस लष्करामधें फौजसुद्धां दादा येणार. तेव्हां सर्व फौजेचे कबज होणार. राजश्री दादांस हालीं

१. प्रस्तुत पत्र जिवबादादांचे दफतरचें आहे. हे साबाजी नारायण राजाध्यक्ष आमचे निपणजे होत. हे शिंदेशाहींत एका स्वतंत्र पागेच्या तुकडीचे सरदार होते. यांचे संबंधानें आमचे दफतरीं असलेले जुने लेख पाहून हें पुस्तक लिहिण्याचे कामीं आह्मांस उत्तेजन मिळालें. आमचे वंशावळीचा तपशील येणेंप्रमाणें—

साबाजी नारायण राजाध्यक्ष.
|
व्यंकाजी साबाजी ऊर्फ बचोबा हवालदार.
|
जिवाजी व्यंकटेश.
|
नारायण. भास्कर. महादेव. व्यंकाजी ऊर्फ भाऊ हवालदार.
|
नरहर व्यंकाजी. (प्रस्तुत ग्रंथाचा कर्ता.)

२. पत्र नंबर १३७.

शामा' काशिदाबरोबर पत्रें पाठविणार त्यामध्यें लिहावें जे. राजश्री जगन्नाथ शेणवी याचे तापत्रामुळें गुतागुत होऊन हजार रुपयांस हात गुंतला ( ) पडणार नाहीं. तर त्यांचे सात राऊत हाजिरीस लाविलेत. त्यांचे कबज होऊन सरकारांतून पैका उगवून जें येईल तें आपणाकडेस पाठवावें. दुसरेकडेस एकंदर पैसा न द्यावा. ऐसें अगत्य धरोन सुचना लिहावी. आह्मीं आपणास लिहिलें ऐसें त्या पत्रामधें न लिहावें. श्रीनें आह्मांस खालीं बगावयास लाविलें. जिगणीस कांहीं नगदी ऐवज होता तो व्याजीं कोणे गृहस्थानें घेतला असेल; ऐसें गृहस्थ सांगत होता. पण आमचेनें कांहींच बोलवत नाहीं. कांहीं चीज वस्त होती ती चिरंजीवाकडेस असणार ऐसें वर्तमान चौदा महिनेंनें एकिलें. आपणास कळावें; याबद्दल लिहिलें आहे. राउताच्या कबज्याच्या पैकेविसीं दादांस लिहूंस तर न करावें. चिरंजीव कुसोबाचे मातोश्री व लहानगा मूल चांदगडेस गेले. कुसोबा येथें आहे. त्यास सोंवळें निपट नाहीं. एकादे दिवशीं रुसोन उपोशित राहतो. ऐसें यास एक सोंवळें हर तलास करून विसां रुपयेंत पाठवावें. वारंवार सविस्तर लिहितों ह्मणोन कोप न करावा. बहूत सोहिरे आहेत. ( )

ले० नं. १९६ श्री.

राजश्री जिवबादादांस राजश्री नरोबा दाजीचे नांवचें पत्र लिहावयाचा मसुदा. विशेष राळप्पा खासनीस हे कितूरकर सरदेसाई यांचे कार्यभागीं विरपा देसाई गेल्यामागें संस्थानविसीं बहुतच कस्त मेहनत केली असतां मलप गोंडा याणीं अविवेकपणें मशारनिल्हेचा प्राणघात केला. या प्रांतीं बरघांटीं आमच्या कोंकणांत लवकिकांत सुज्ञ अथवा धार्मिक राज्यप्रकर्णीं दुसरें नव्हतें. परंतु देसाई यांचे संग्रहीं लुच्चे बहुतेक मिळाले. त्याणीं अपघात केला. होणार होऊन गेलें. परंतु त्याचे मागें बंधू राजश्री भिक्याबावा आहेत. त्यांचें ऊर्जीत सरकारांतून जाहालें पाहिजे. सरकारकामावर एकनिष्ठपणें वर्तणूक केली यास्तव नाश जाहाला. हा सर्व मजकूर श्रीमंत राजश्री नानाचे कानीं पडला आहे. व ऊर्जित करणेचें अगत्यही आहे. परंतु आह्मां लोकांचें अगत्य धरून सरकारांत विनंती करणार कोण आहे. दरबार थोर. ज्या समईचा जाबसाल त्या समयींच जाहला असतां सुलभ. याकरितां वडिलांचें आगमन लष्करांत जाहलेचें कळोन मशारनिल्हेनीं राजश्री कारकून वडिलांकडेस पाठविले आहेत. व राजश्री राजे बाहादूर यांचें पत्रही घेऊन पाठविलें आहे. त्याचे मुखें सर्व विदीत होईल. सारांश वडिलांनीं चित्तावर घेऊन खस्त विनंती करून खासनिसांचें ऊर्जित केलें असतां या राज्यीं लौकिक चांगला होऊन वडिलांस यश येतें. स्वज्ञाती गृहस्थाचा अभिमान इतर लोकांस किती असेल तें वडिलांस ठाउकेंच आहे. वडिलीं केवळ खासगी विचार असें जाणोन मशारनिल्हे कारकून विनंती करितील त्या अन्वयें बंदोबस्त करून देऊन कीर्ती संपादावी. वडिलांचे भरवसेवर त्याणीं यास रवाना केले आहेत.

१. हे सारस्वत ब्राह्मण गृहस्थ कर्नाटक प्रांतांतील कित्तूरचे देसाई यांचे कारभारी होते. "मलसर्जा याला त्याच्या बापाचा कारभारी राळप्पा खासनीस हा स्वच्छंदपणें वागूं देईना. त्यास दूर करावें तर परशरामभाऊ पटवर्धनाचा आणि त्यांचा स्नेह; तो जड जाईल. ह्मणून राळप्पा यास गुप्तपणें मारविण्याचा त्यानें बेत करून मारेकरी पाठविले. तें वर्तमान राळप्पा यास समजलें असतांही तो त्यावर उठला नाहीं. याप्रमाणें यांची इमानीपणाची रीती पूर्वीपासून प्रख्यात आहे." सरस्वतीमंडल पुस्तक पृष्ठ ७४.

लें० नं. १९७ श्री.

राजश्री नरोबा बावा केरकर गोसावी यांसी—

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित धोंडबाराव राइजादे. रामराम विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. लष्करांत जाण्यास मनुष्यें सरकारचीं निघालीं आहेत. याकरितां कृपा करून तीर्थस्वरूप बळवंतराव राइजादे यांविसींचें साहित्य-पत्र राजश्री जिवबादादा यांस आपण द्यावें. आमचा खर्चाचा बहूत गलाम आहे. तेंही पत्रीं लिहावें. सर्व हकीगत पत्रीं लिहून तें पत्र लखोटा न करितां आह्मांकडे लाऊन द्यावें. येथून लखोटा करून पाठवूं. याविसीं आपण अनमान न करावा. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

हेच पत्रीं राजश्री साबाजी नारायण केरकर यांस रामराम. राजश्री बाबूस पत्र लिहिलें आहे. तर आपण दया करून पत्र घेऊन पाठवावें; हे विनंती.

लें० नं. १९८ श्री.

राजश्री नरोबा बावाजी गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित बळवंतराव रायजादे राम राम विनंती उपरी येथील कुशळ तागायत छ० ७ माहे रजब मुकाम लष्कर नजीक अजमेर प्रां मारवाड जाणोन आपले आशीर्वादें क्षेमरूप असों विशेष. आह्मी आले तागायत आपणांकडून पत्र येऊन परामृष जाहाला नाहीं. तरी ऐशी निष्ठुरता नसावी. हरघडी येणार काशिदासमागमें पत्र पाठवून ममता केली पाहिजे. यानंतर आह्मांकडील वर्तमान तर सध्यां राजश्री जिवबादादांनीं शंभर स्वारांचें पतक दिलें आहे. बंदोबस्तही खर्चाचा करून दिला आहे. वरकड वर्तमान रामभट मुखजबानीनें सांगतां कळों येईल. बहूत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. १९९ श्री.

चिरंजीव राजश्री जिऊबा यांप्रती—नरहर गणेश केरकर अनेक आशीर्वाद उपर येथील तागायत वैशाख शुद्ध ७ मी मुकाम आरवदें सर्व मुलेंमाणसें सुखरूप असों विशेष. इकडील सविस्तर वरचेवर लिहून पाठविलेंच आहे. लग्नाचें सर्व साहित्य करून तुह्मांकडेस सरंजाम कापड व खर्चास व चिरंजीव निराबाईस राजश्री मंत्री यांचे घरचा नवरा आणावा. त्याची वाट पाहत आहों. याविसींचें लिहिणें वरचेवर गेलेंच आहे. यानंतर राजश्री सकबा सबनीस यांचे घरचे मूल राजश्री बळवंत राऊ व नारायणराव लष्करांत तुह्मांकडेस आहेत. अगोदर राजश्री बळवंत राऊ याणीं प्रवेश केला. त्याचें तुह्मीं साहित्य करून घरीं रवाना केलें. परंतु ते आपलेच बुद्धीनें पागापतक कांहीं करावें. घोडीं घेतलीं तीं उपयोगी न पडून रुपये व्यर्थ बुडवून घरीं आले. यामुळें तुमची त्यावर कृपा नाहीं ऐसें ऐकिलें. परंतु त्यावर जातां नये. सध्यां काळीं तुमचे आश्रस जे आहेत. आण तुह्मीं कृपा केली. ते सुरक्षित आहेत. परंतु यांचे घरचा तापत्रय अद्यापि दूर जाहला नाहीं. ऐसें यास याजवर चित्तापासून ममता धरून यांची उभारणी करावी. इतरास पागापतक करून दिलेंत. त्याचप्रमाणें पागा व पालखीचा सरंजाम करून द्यावा. आण तेथील हिशेब किंतब उरकून उभयतांपैकीं एकास खुशालीने घरीं रवाना करून द्यावा. सध्यां येथें आमचे काजकामाचे उपयोगी

१. राइजादे हे वाडी सरकारचे मानकरी होते. हल्लीं त्यांचा निर्वंश आहे.

राजश्री सबनीस बहूत आहेत. आण त्या उद्देशीं कितिएक ममता करितात. आमचें स्वकीय काम तों करितीलच. परंतु आह्मीं घरींहून दुसऱ्याचें काम सांगोन पाठविलें तरी होतें. एशी ममता चित्तापासून आह्मांकडे करितात. तव्हां तुह्मांस सविस्तर लिहिणें लागलें. ध्यानीं धरून त्याचें काजकाम होऊन त्याचे हातचा कागद घरीं यावा. घाटचे कारकून मंडळी यांकडे रुपये याचे कारभारांत मागतात. ऐसा लौकीक तिकडेम जाहला. ऐसें त्यांस लिहून आलें. तर त्या कारभागंत हे नाहींत. अगोदरचा सरकारचा पाडे प्रा। ह्मणून आहे. तो जाऊन घरोघर घाटकर याकडे रुपये मागत होता. त्याउपर कागद घालून वाडीस आणले. परंतु राजश्री सबनीस याणीं यश घेऊन अवघेस निरोप देऊन घरीं घालविलें. त्यांत काडीमात्र हे नाहींत. याणींच यश घेऊन सर्वांस निरोप घरीं जाऊस दिला. ( )

ले० नं. २०० श्री.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री बाबू स्वामीचे सेवेसीं.

सेवक गोपाळ शामजी शास्त्री कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती येथील कुशळ तागायत श्रावण वद्य १३ दशी मुकाम तुळस सुखरूप असों विशेष. बहुत दिवस पत्र येऊन परामृश जाहाला नाहीं. यावरून अपूर्व दिसून आलें. तरी ऐसें नसावें. वारंवार पत्रार्थी सांभाळ करीत जावें. पदरींचे जाणोन लेहावें लागतें. आह्मीं आज तीन ( ) लष्करांतून आलेवर नरगुंदास एक वरीस होतों. तेथें दोनशें रुपयांची असामी ( ) करून घेतली आहे. आसामीवर तीर्थस्वरूप रामबास ठेवून घरीं आलों. नरगुंदाहून घरीं आजरेस आलेवर साहा महिने जाहाले. तेथून मृगास मुकाम मजकुरीं कुटुंबसुद्धां आलों. स्वामीस कळावें. लष्करांत दसरा करून जावें. ऐशी कल्पना आहे. आपलेकडून कोणही जावयाचें असल्यास लेहावयास आज्ञा करावी. सोबत लाऊन देणार आपण धणी आहेत. पहिलेपासून आपले अन्नाचे. व पुढांही आपलेशिवाय परिणाम नाहीं. दसरा होतांच आपल्या दर्शनास यावयास येतों. साहित्य पत्र राजश्री दादांस देऊन रोजगाराची सोई करणार आपण आहेत. घरच्या जाबसालास उपरोधिक लेहून जाणवावें; ऐसा अर्थ नाहीं. लोभ कीजे हे विनंती. मुलांकरितां केळीं शंभर १०० पाठविलीं आहेत. पोंहोंचतील. हे विनंती.

राजमान्य राजश्री विठ्ठलराव तात्या व राजश्री गाबाजीबावा दाजी स्वामीचे सेवेसीं साष्टांग नमस्कार विनंती. लि॥ परिसोन लोभ कीजे हे विनंती.

ले० नं. २०१ श्रीशंकर.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य शिवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २३ रबिलाखर जाणोन वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. वडिलांकडील बहूत दिवस आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें त्यास हालीं ( ) स्तेन गेले. आतां श्रीमंत सुभेदार यांचा मु॥ जावदेपासून तीसां कोशांवर आहे. पोत कांहीं ठिकाण राहिलें नाहीं. ऐशी येथील आवस्था आहे. ठाणेंची रक्षणा करावयास स्वार शिबंदी ठेविली आहे. त्यास दरमाहा रुपये साहा हजार द्यावे लागतात. पहिलेपक्षें शिबंदी दुप्पट ठेविली आहे. कारण फौजा नजीक पडल्या आहेत. पेंढारी धांवतात. पोतुन पैसा येत नाहीं. कर्जासीं गांठ आहे. तगीरचे सालचें कर्ज व रां-

गडेनीं जावद घेतली. व हालीं शिबंदीचा खर्च मिळोन दोन आडीच लक्षांच्या पेंचांत आहों. आपलेकडे दोन वर्षें इकडून कांहीं गेलें नाहीं. आण येथें या प्रकारची आव-( )

लें० नं. २०२ ता। छ० २५ रबिलावल. श्रीशंकर.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

( ) ह्मीं भेटावयासी जाणार आहों. मेवाडची मला होत आहे. येथील जाबसाल उरकले. व लष्करचें कूच होऊन उज्जनीकडे जातील. श्रीमंत राजश्री रावजीचेंही पत्र आपले नांवें—( )

लें० नं. २०३ श्री.

साष्टांग नमस्कार विनंती. आज गुरुवार रात्रौ जाणोन स्वकीय कुशळ लिहिलें पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविलें पावलें. लिहिलेलें कळलें. ती॥ भिकबादादा आल्या अलीकडे कांहींच वर्तमान कळलें नाहीं. तर सविस्तर लिहावें; ह्मणोन लिहिलें. त्यास सरकारची निकड बाकीस आहे; तैसीच आहे. दोन तीनशें रुपये हालीं कर्ज काढून दिल्हे. रोज शें पन्नास रुपये दिल्हे पाहिजेत. पट्टी पहिली करार जाहल्याप्रमाणें निकट लाविली होती. त्यास राजश्री साबाजी नारायण याणीं सवाई दोनशें रुपयांची पावती लक्ष्मण काळेची लिहून रुजू करून वरातदारास दिल्ही. आण आपण कुटुंबासुद्धां निघोन गेले. गणेश विठ्ठल याणीं शंभर रुपयेची मना चिटी दिली. शंभूची भास्कर गोविंद एकशें वीस रुपयेचे कुळ दमलेलें आहे. वेंगुरलेकर वगैरे कुळकर्णी देतील. ते मनदी ( ) व कुळकर्णी यास हिशेबापैकीं रुपये लाविले ह्मणोन गैरहाजीर जाहाले आहेत. तव्हां बाकीचा रुपया नाहीं. आण तोटेचीही पटी नाहीं. वरातदाराचा मजकूर तर आपणास सर्व विदीत जाहालाच आहे. सरकारांतून अद्याप हीशेब संपला नाहीं. पोंड परव रोज एक नवें बोलतात. यांतून ईश्वर. एक वेळ कैसा पार करील तो पाहावें. आंबे पाठविलेप्रमाणें पावले. रामचंद्र गंगाधर आपल्यासहवर्तमान नारायणाच्या देवळांत आहेत. दोघे घरीं नेल्याचें वर्तमान परस्पर कळतच आहे. भिकबादादास पा॥कानें पटीची व तोटेची थारावणी एक खेपनें व्हावी; ह्मणून त्यांतील पर्याय एकही न करितां आले. आपला त्यांचा समज कसा जाहला आहे; न कळे. फिरोन बलांढा केव्हां उरकतो, आण आमचा गळा सुटतो पाहावें. बहूत काय लिहिणें लोभ करावा ही विनंती.

लें० नं. २०४ श्री.

राजश्री नरोबा बावा केरकर स्वामीचे सेवेसीं.

सेवक त्रिंबकराव शिवराम कृतानेक नमस्कार विनंती उपरी आज मंगळवार जाणोन क्षेम असों विशेष. ( ) गुळे पाठविलेत याजकरितां दो( ) देऊन पांडजी यास पाठविलें आहे. तर हरबलच्या धवडाकडून गोळे फरम पो आहे. त्याप्रमाणें एका रोजांत एक मण करवून रेडीस पाठविले पाहिजेत. धवड्यांसही चिटी पाठविली आहे. परंतु माहितीनें आपल्या विद्यमानें काम लव-

---

१. वाडी सरकार घांटावर ह्मणजे हिंदुस्थानांत असलेल्या लोकांकडून "घाटपट्टी" या नांवाचा कर घेत असत. २. हे राजाध्यक्ष होत. ३. हे नाबर होत. ४. रामचंद्र गंगाधर रेगे यांस घाटपट्टीसाठींच वाडी सरकारानें अडविलें होतें. ५. वाडी सरकारचे प्रधानांपैकीं पीतांबरराव चिटणीस हे शिवाजी महाराजांकडे वाडी सरकार खेमसावंत लखमसावंत यांचे तर्फेनें तहासाठीं शहाणे वकील ह्मणून गेले होते. शिवछत्रपतींची बखर पृ० ५६ पहा. त्यांचे हे वंशज होत. यांचे वंशांत मंगेशराव व वामनराव चिटणीस हे थोर पुरुष होऊन गेले.

कर होईल जाणून लिहिलें आहे. चित्तावर घेऊन बुधा ( ) काळमर्याद गोळे येत ते ( ) णा गोळ्यास आणखी ( ) रुपये पडतील ते माल घेऊन येईल त्याजकडे तूर्त देऊं. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

ले० नं २०५

( ) गोसावी यांसी[1]

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नें॥ सकल सौभाग्यादि संपन्न लक्षुमीबाई सावंत भोसुले सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय. विनंती उपर येथील कुशळ तागायत छ० १७ रबिलावल यथास्थित जाणोन स्वकीय लि॥ असिलें पाहिजे. यानंतर इकडील मजकूर. किले रांगणामुळें करवीरकर यांचा आमचा (कलह) विपर्यीचा ( ) बयासाहेबानीं लि॥ आहे. त्याजवरून कळेल. याजकरितां ती॥ राजश्री माहादजी सिंदे यांस पत्रें लि॥ आहेत. याचीं उत्तरें घेऊन लौकर मनुष्यें रवाना होत. मा आर्थ करणें. सदैव पत्र पाठवून तोषवीत जाणें. राजश्री शिवबाही गांवीं आलेत. भेटीस वाडीस आले होते. तिकडेही सत्वरच येणार आहेत. ( ) स्थानाचें अगत्य तुह्मांस आहेच. तेथें विशेष काय लिहिणें. बहूत काय लिहिणें हे विनंती.

ले० नं. २०६ श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नरोबा बापू स्वामीचे सेवेसीं.

सेवक गोपाळ नारायण साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ तागायत मार्गशीर्ष शुद्ध २ सोमवासर मुकाम महेश्वर जाणून स्वानंद लेखन करीत असावें. विशेष. बहूत दिवस होत आले. आपलें पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसें न होतां सदोदीत पत्रीं संतोषवित असावें. तदनंतर मागें आश्वीन मासीं आपणास पत्र लिहून घरीं इचलकरजीस पाठविलें होतें. तें घेऊन चिरंजीव तुह्मांपाशीं आलेच असतील. कदाचित पत्र व चिरंजीव कोणी पोहोंचले नसतील तरी आपणांस लिहिलें आहे. राजश्री गोविंदराव जगंनाथ पेडणेंकर[2] तुमचे व्याही याणीं हरदे प्रां हांडेचे मुकामीं आह्मापासून घेतले रुपये २००। दोनशें रुपये एक पावला. कीं मागाल ते समयीं देऊं. त्यास साहा वर्षें जालीं. वरचेवरी पत्रें लिहीत गेलों. रुपये न देतां देशीं घरीं गेले. मातबर गृहस्त तुमचे व्याही हे ओळख ह्मणून दिल्हे असतां पेशजीं दिडशें त्याच्या तीर्थरूपानीं वाडींत पंचाइती करून हुंडीचे रुपये तुमचे विद्यमानें दिले. चिरंजीव जिऊबा वाडीस जाऊन कटकट जाली तेव्हां सदरहू रुपये दीडशें दिल्हे ह्मणून चिरंजीवानें लिहिलें होतें. आतां राजश्री गोविंदराव जगंनाथ यांस पत्र अथवा समक्ष विनंती करून सदरहू रुपये २००। दोनशें एक पावला व्याजसुद्धां देत ऐसें करावें. चिरंजीव घरींहून कोणी आपणापाशीं न आले तरी कृपा करून रुपये व्याजसहीत आपण घेऊन घरीं इचलकरजीस चिरंजीव धाकोबा व जिऊबा व बाळोबा आहे. यास प्रविष्ट करून आपण कबज द्यावी. ह्मणजे राजश्री गोविंदरावजीचें खत आहे तें आपणापाशीं पाठवून देऊं. आपला भरवसा जाणून हें पत्र लिहिलें आहे. आह्मीं लोकांचें देणें. त्याचें व्याज आह्मीं वाहतों; ह्मणून आपणास लिहिलें आहे. राजश्री जिऊबा दादांकडील वर्तमान तरी आपणास पत्रें येतच असतील. श्रीमंत राजश्री पाटील-

१. हे पत्र जिवबादादांस जयाप्पा शिंदे यांची मुलगी लक्ष्मीबाई इनें लिहिलेलें आहे. ही शिंद्यांची मुलगी खेमसावंत वाडी सरकार यांस दिली होती. २. यांचें उपनांव नाडकर्णी.

बावा यांणीं कृपा करून पूर्ववतप्रमाणें कामकाज दादांचें हातें घेत आहेत. पूर्वींपेक्षां कृपा अधीक जाली. लुच्चांनीं भासविलें होतें तें दूर जालें. आपण वारंवार येणारासमागमें आह्मांस पत्र पाठवीत जाणें. बापू रुपयेचें काम जरूर करावें. ते व्याही आह्मी परकी ऐसें न जाणावें. हे विनंती.

लें० नं. २०७ श्री. [1][3]

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य रामाबा व रंगोबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन वद्य ८ मी मु॥ जळगांव नजीक कासारबारी तीन कोश येथें सुखरूप वडिलांचे आशीर्वादेंकरून पोहोंचलों. पुढां दरकूच वडिलांपाशीं यावयासी येतों. बगेबर येणेंप्रमाणें आहे. सौ॥ सुंदराबाई व सौ॥ बायु व सौ॥ सगुणाबाई व सौ॥ लाडूबाई येणेंप्रमाणें आहेत. वाटेचे जाबते करितां वगैरे सरंजाम सौभाग्यवतीच्या याचा तपशील—

२० स्वार.	१ मशालची.	१ पोरगा.
१ खाली घोडी.	१३ घोड्याचे पोरगे.	१ गाई सौ॥ सुंदराबाईचे मुलास दुधास.
१ रा॥ धोंडबाचा घोडा.	१ आच्यारी.	१३ तट्टू.
४ पाणके बामण.	७ कुणबिणी आ॥	१० उंटें.
२५ शिपाई करोल.	६ खिजमतगार आ॥	५ बैल सर.
१ पालखी.	३ तीर्थस्वरूप दादांकडील.	
३ ढोल्या तीन.	१ ती॥ नानाकडील.	
४२ भोई आ॥	२ काळु गोपाळ.	
	६	

येणेंप्रमाणें सरंजाम देऊन आपणाजवळ रवाना केले आहेत. आण आपण श्रीमंतांचें आज्ञापत्र आलें त्याजवरून श्रीमंतांचे भेटीस लष्करांत जावयास गेले. आह्मी सरंजाम सुद्धां आद- ( )

लें० नं. २०८ श्री.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्य बाळोंनें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता। पोष्य वद्य ४ मुकाम लष्कर नजीक श्रीमथुरा येथें सहमंडळी सुखरूप असों विशेष. बहूत दिवस वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ जाहला नाहीं. तरी असें न करितां हर घडी येणाराबरोबर आशीर्वादपत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान सविस्तर पेशजीं राजश्री अंतोजी रामचंद्र याचा काशीद घरीं गेला आहे; त्याजबरोबर सविस्तर लिहिलें आहे. त्यावरून सेवेसीं निवेदन होईल. तीर्थस्वरूप राजश्री दादा व तीर्थस्वरूप बापू सडे स्वारींत कुंजपुरेकडेस सुखरूप आहेत. हमेशा पत्रें येतात. दादाही आठचार रोजीं लष्करांत महाराजांपाशीं येणार आहेत. जावदेकडील सर्व सुखरूप आहेत. मातोश्री मथुबाया ही चिरंजीव यशवंतरायाचे बायकोस घेऊन जावदेस

१. प्रस्तुत पुस्तकाचा भाग ९, पृष्ठें ११२।११३ व पत्र नं. २२ पहा. २. नरहर गणेश ऊर्फ नरोबा दादा यांस घरचे लोक बाबू ह्मणत. हे जिवबादादांचे वडील बंधु होत. ३. बाळाजी राम ऊर्फ बाळाभाऊ बक्षी हे जिवबादादांचे चुलत बंधु होत. ४. हे अंताजी रामचंद्र रेगे आरवलीकर नहींचे आडकर होत.

आलीं आहेत. वडिलांस कळावें. रा॥ अंताजी रामचंद्र याच्या काशिदाबरोबर आपणास येथून कर्ज काढून रुपये ( ) च्या हुंड्या पाठविले आहेत. त्यास वडिलांकडेस जाऊन पोंचल्याचें वर्तमान सविस्तर लिहावें. तीर्थस्वरूप राजश्री दादा आह्मी एक जागां जाहाल्यानंतर सविस्तर लिहितों. काशिदास जावयास जलदी जाहाली; याजकरितां सकलित लिहिलें नाहीं. रागास न यावें. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

शेवेशीं यसोजी वासुदेव साष्टांग नमस्कार विनंती लिहिली परिसोन लोभ असों द्यावा. हे विनंती.

चिरंजीव राजश्री विठोबा ( ) आशीरवाद. जावदेचीं व मुलेंमाणसें सर्व सुखरूप आहेत. तुह्मांस कळावें हे आशीर्वाद. चिरंजीव कृष्णोबा व मुलांस सर्वांस आशीरवाद.

लें० नं. २०९ श्री.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवसीं.

( ) ल चिरंजीव राजश्री बाळोबा व अंतोबा ( ) णकर दिल्लीस सुखरूप आहेत. चिरंजीव बाळोबा खाडाळेकर हे हाल्लीं मामलत अंतरवेद येथील परगणे मुरसान वगैरे तीन करून पाठविले आहेत. तेथून दाहाबारा कोशांवर आहेत. ( )

लें० नं. २१० श्री.

( )

वडिलांचे सेवसीं गोंदबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २९ माहे जिल्हेज मुकाम पुणा जाणोन वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों विशेष. बहुतां दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास राजश्री पुंडबा[1] यांच्या माणसाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. पुंडबा यास तीनशें रुपये वृंदावन शिका देणेंविसीं आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें तीनशें रुपये देऊन पावती घेतली. वडिलांस कळावें. दुसरें इकडील वर्तमान सर्व राजश्री बाळकृष्ण मामानीं लिहिलें आहे. त्याजवरून विदीत होईल. आपल्या देणेंप्रमाणें हवाले दिले त्याप्रमाणें कोणा एकाकडून रुपये वसूल जाहाला नाहीं. निंबाळकर[2] यांणीं देतों देतों ह्मणून अखेरीस ( ) अशीच अवघ्यांची गत जाहाली. चिठ्या बिरदीचंद सावकार याचे घरीं आडकाविल्या परंतु ती॥ राजश्री दादानें माघारें देवविल्या[3]. मग आमचा इलाज नाहीं. ( ) एकदोन पत्रें लिहिलें आहे. त्याजवरून विदीत होईल. घोडीं आपलीं चांगलीं आहेत. घोडी ह्मातारी मयत जाहाली. हें पेशजीं लिहिलेंच आहे. बाकीचीं घोडीं चांगलीं आहेत. भोईटेली घोडी सबर आहे. महिने दोन महिनेनें प्रसवेल. पोट थोर दिसतें. त्यास रादाबा चालू केला आहे. जावदवालीस आठा लाविला आहे. वरकड मजकूर यथास्थित आहे. आमचे घराकडील सुखरूपपणाचें वर्तमान लिहावयास आज्ञा करावी. येथून खर्चास पाठविलें होतें; त्याचें कांहीं आ ( ) ची बेजमी केली किंवा नाहीं; हें कांहींच कळत नाहीं. त्याजवरून चिंता वाटती. तर बेजमी केलीच असेल. त्याचें सविस्तर लिहावयास आज्ञा असावी. ( )

---

१. हे पुंडलीक रेडकर कुलकर्णी होत. यांचे वंशज हल्लीं रेटी येथें आहेत. २. हे जानराव निंबाळकर राजे खेमसावंत सरदेसाई वाडी सरकार यांचे जांवई होत. ३. जिवबादादांच्या औदार्याचें हें एक उदाहरण आहे.

लें० नं. २११ श्री.

राजश्री नरहर गणेश केरकर गोसावी यांस.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित रामसावंत भोंसुले तिरवडेकर राम राम विनंती उपर येथील कुशल तागायत छ० २८ सवाल दीड प्रहर दिवस सकाळ मुकाम पेडणें जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत असिलें पाहिजे. यानंतर इकडील बातमीचा मजकूर तर फिरंगी यार्णे होडी तयार करून कोळवाळीचे मार्गें मुडे उतरले. कांहीं उतरीत आहे. व जमावही सामानसुमानसुद्धां तयार होऊन पलीकडेस आहे. बातमीस गेले होते; ते पाहून आतांच आले. ऐसें यास फिरंगी आलीकडेस उतरतो तेव्हां तुह्मांकडून लोकांचे उपराळेचें काम जें होईल तें करावें. बातमी लिहून तुह्मांस कळावें यास्तव लिहिलें आहे. बहूत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. २१२

( )

पुण्यप्रतापेंकरून एकनिष्ठपणावर आजवर चाललें. पुढांही वडिलांचे आशीर्वादें व धन्याचे कृपेकरून चालेल. चिंता करून काय होतें. आह्मांसही वडिलांची मर्जी घरीं रवाना करावयाची होती. परंतु आमच्या पतकाचें कबज जाहालें नाहीं. आल्यादारभ्य चाकरी करून हैराण; आण रोज मसलतींत. यामुळें यावयास घडलें नाहीं. तूर्त येथील दरबारच्या कामकाजास ( )

लें० नं. २१३ श्रीरामचंद्र.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री नारायणरावजी स्वामीचे सेवेसी.

सेवक पांडुरंग अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपर येथील कुशल ता। वैशाख शुद्ध ५ श्रीभैरजीचे सानीधानी आनंदरूप जाणून स्वकीय लेखन केलें पाहिजे. विशेष. आपण कांहींच पत्र पाठवून सांभाळ केला नाहीं. हें तुह्मांस आउचित आहे. वारंवार पत्र पाठवून संतोषवीत असावें. चिरंजीव विठोबा सैन्यांत आला आहे. त्याचा परामृष घेत जावा. राजश्री नरोबा बाबू यांजकडेस चिरंजीवानीं काळानें लांचार केलें तेव्हां एक बाग गहाण ठेवून कार्य केलीं. आणी लिहून दिलें कीं; पांच वर्षांनीं रुपये देऊं. नाहीं तर बागाशीं संबंध नाहीं. त्यास वाईदा समीप आला. ऐसें मुलांनीं लिहिलें. त्यास तुमचे वडील श्रीमंत दादांस योग्यता कीं; सर्वांचें पालन करावें. आणी जागीरी दुसरेस द्यावी. ही योग्यता श्रीदेवानें दिली आहे. तेथें बाग मुलाचें घेणार ऐसें नाहीं. तुमचे मावस बहिणीचा दादला आहे. तुह्मीं बाग आपण घ्यावें कीं द्यावें हें काय तें समजून मजला उत्तर लिहून पाठवावें. त्यासारिखा विचार केला जाईल. परंतु सेवेशीं विनंती लिहिली आहे. याची उपेक्षा न कीजे. कोकणांतच आहेत त्याचा पुरुषार्थ त्यास ( )

लें० नं. २१४ श्री.

२ पुरवणी. चिरंजीव राजश्री विश्रामजीस आशीर्वाद. गणबास पुत्र जाहला; ह्मणून लिहिलें. त्यावरून बहूत आनंद जाहला. श्रीदेवाचा प्रसाद आह्मांकरितां पाठविला तो पावला. आमचे

१. जिवबादादांचे वडील बंधु नरोबा दादा ऊर्फ बाबू. २. हे वाडी सरकारचे सरदार. यांचे वंशज हल्लीं तिरवडें व ग्वालेर येथें राहतात. ३. जिवबादादांच्या. ४. महादजी शिंदे. ५. हें जगोबा बापूंनीं बाबूस लिहिलेलें पत्र आहे. ६. जिवबादादांस.

चित्तीं केरी आरवदेहून रस्ता वाडीस जातो. व रेडी शिरोड्याहून आजगांवाहून रस्ता वाडीस जातो. हे दोन्ही रस्ते एके जागां निरवड्याच्या वांकडांत एके जागां जाहाला आहे. तेथें लक्ष्मीनारायणाचें देवालय बांधावयाचें आहे. त्यास तेथें जागा शंभर बिघे माळ व शेत जमीन मिळून गांववाले निरवडेकर पाटील विकत देतील तर घ्यावी. आण सरकारांतून कटबाण अथवा दस्तिबाद करून घ्यावें. आणि याजमुळें चार रुपये खर्च लागला तरी करावा. देवालय बांधावयाची जागा कोणती ह्मणाल तरी वाडीस जातेसमयीं अगोदर तेथें सावरीचें झाड मोठें आहे तें डावे बाजूस राहातें. त्याचे पुढें बंदुकीचे गोळीचे टप्पेवर जांबळीचें झाड राहातें. उजवे बाजूस वाडीस जाणार ते जांबळीचे झाडाचे छायेस बसतात; तेथें देवालय बांधावयाचें आहे. जांबळीकडून बंदुकीचे टप्पेवर खालीं शेत आहे. उजवे बाजूस आहे. आणि डावे बाजूस आहे. तें शेत घ्यावें. व वरील भरडी जमीन सावरेकडील घ्यावी. शेत जमीन आहे; त्यांत तळाव अथवा विहीर बांधावयाची आहे. लिहिलेप्रमाणें सरकारांतून होईल तरी खर्च करून सरकारची सनद करून घ्यावी. आणि ते सनदींत लिहून घ्यावें कीं; श्रीलक्ष्मीनारायणाचें देवालय बांधिलें आहे. त्याचे नैवेद्य वगैरे खर्चाबद्दल जमीन दिल्ही आहे ह्मणून सनद दस्तिबाद अथवा कटबाण करून घ्यावी. ही जमीन आह्मीं लिहिली आहे यांत कांहीं जागा सोनुरलीचीही असेल. व निरवडेचीही असेल. याचा शोध घेऊन अगत्य लिहिलेप्रमाणें करून घ्यावें. तीर्थस्वरूप राजश्री बाबूस व चिरंजीव साबाजीस सांगून करून घ्यावी आण आह्मांस लिहून पाठवावें. ह्मणजे तुह्मी दसरेपावेतों घरीं राहणार तोंपावेतों देवालय तयार करून घ्याल. तुमचें पत्र आलें ह्मणजे देवाल्याचे खर्चास पाठवून देऊं. सध्यां तेथें जागा सरकारांतून करून घेण्यासी रुपये पाहिजेत. त्यासी सावकाराकडून कर्ज घ्यावें. आणि आह्मांस लिहून पाठवावें. ह्मणजे हुंडी करून पाठवून देऊं. प्रसंगीं सावकाराकडून रुपये न मिळेत तरी चिरंजीव राजश्री भाऊकडून एकदोन वस्ती घ्याव्या. आणि ते तेथें आलेवर दुसरे वस्ती करून देऊं. हें देवालय बांधून तेथें धर्मशाळा देवालयासभोंवतीं बांधून ब्राह्मणाचें घर बांधून ब्राह्मणास द्यावयाचें आहे. ह्या जागेचा मजकूर चिरंजीव राजश्री व्यंकोबास व मदबास जातेसमयीं सांगितलाच आहे. त्याजकडेस पुसावें. पत्रीं लिहिलेप्रमाणें समज न पडली तरी मशारनिल्हेस पुसोन घ्यावें. आणि आपले खाजनाचा बांध बांधला. त्यात कांहीं फिरंगी याणें मोडला ह्मणून पेशजीं वर्तमान ऐकिलें होतें. त्यास मोडला होता किंवा शाबूद आहे; हें लिहावें. तिकडील फिरंगी याचें वर्तमान कचें लिहावें. बहूत काय लिहिणें. श्रीलक्ष्मीनारायणाच्या मूर्तीही घेऊन ठेविल्या आहेत. तुमचें पत्र आलें ह्मणजे पाठवून देऊं हे आशीरवाद.

चिरंजीव राजश्री बाबास आशीरवाद. इकडील वर्तमान सर्व चिरंजीव राजश्री विश्रामास लिहिलें आहे. त्यावरून कळेल. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद ( ) पीं पैसा आला नाहीं. तुह्मीं लिहिलें कीं; फिरंगी तराणी व जमीयत पांच सातसें येऊन तेरेखोलास उतरला. आणि वर्तमान आलें कीं; रेडीस येतो. त्याजमुळें आह्मी आरवंदेहून निघोन मळगांवास आलों ह्मणून लिहिलें तें कळलें. श्रीमंत राजश्री राजेबाहादर यांची फौज केरीस होती तेथून जाऊन फोंडें माहाल घेऊन अमल केला. हें वर्तमान फिरंगी यास कळलेवर फिरंगी याचा जमाव व आरमार तेरेखोलास आलें होतें. तें फिरून गोवेंस गेलें. ह्मणून लिहिलें तें कळलें. पेशजीं हुंड्या साडेआठ हजारांच्या

१. पुढें अनेक अडचणींमुळें हें काम झालें नाहीं. २. हा फोंडें महाल हल्लीं गोवेंकर फिरंगी यांचे ताब्यांत आहे.

पाठविल्या होत्या. त्यापैकीं उदेचंद कलचंद याजवर हुंड्या नग दोन दिडां हजारांच्या होत्या. ती पटणार नाहीं. त्याच्या मोबादलीं दुसरी हुंडी पाठवावी ह्मणोन लिहिलें. व मागील हुंड्यांच्या पेव्या पाठवाव्या त्याजवरून येणेंप्रमाणें पाठविले आहेत.

१५०० हुंड्या नग दोन जीवनदास गोवर्धनदास दुकान पुणेंत येन लिखी गोपाळदास गाढमल.
पहिली हुंडी फिरली त्याच मितीची ही हुंडी आहे. करार पडणार नाहीं.
७००० पहिल्या हुंड्या नग साहा याच्या पेव्या नग ६ साहा पाठविल्या आहेत.
१५०० हालीं हुंडी पाठविली जिवनदास गोवर्धनदास याजवर त्याची पेटा नग दोन.

( )

लेॅ० नं. २१५ श्री.

स्वामीचे सेवेसीं सेवक सक्के प्रभु मतकरी सांतडें नमस्कार विनंती उपर येथील क्षेम तागायत छ० १४ रजब पावेतों देवाचे कृपेकरून मोरजेमधें सुखरूप आहों विशेष. फिरंगी याकडील वर्तमान करार आहे कीं; खुद्द फिरंगी आरमारसुद्धां यशवंतगडास एका चौं रोजांत जाणार ही बातमी करार आहे. हें वर्तमान कोठलें ह्मणाल तर विजयदुर्गाहून बडे सावकारी दातवेवास गेले होते. ते हल्लीं फिरून गोवेहून आलेत. मोरजीस तळीमध्यें आले. त्यांस आमचे लोकांनीं तडीस आणिलें. त्याणीं बातमी सविस्तर सांगितली. दोन हजार फिरंगी जातीचा आरमारावर भरीत केलें आहे. आणि खुद्द राजा यशवंतगडास जातो. तेव्हां आपण राजश्री जिवाजीराव यांस लिहून पाठवावें. आणि हर-केरीचा बंदोबस्त करवावा. आमचे गुजारतीचा जमावास अडस्री आज तागायत वीस रोज पर्यंत नाहीं ऐशी अवस्था आमची. तेव्हां आमची हकीगत आपणास दखलच आहे. तेव्हां स्वामींनीं कृपा करून कांहीं खर्चास देऊस आज्ञा व तंबाखू नाहीं तर कांहीं तरी तंबाखू वजन ८॥• अर्ध मण देऊस आज्ञा कितिएक आपला भरंवसा आपल्यास आहे. हे विनंती.

लेॅ० नं. २१६ श्री. तारीख २२ जानेवारी सन १७९६.

राजश्री नरहर गणेश गोसावी यांस.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य–स्नेहांकित दौलतराव सिंदे रामराम मु॥ सित तिसेन मया आलफ. जिवाजी बल्लाळ यांचे शरीरीं ज्वरांश जाहला. यांत वायूचा प्रकोप होऊन बहुतच बाअदाम एकाएकीं जाहाल्यामुळें देविक मानवी उपाव व्हावयाचे ते बहूत जाहाले. परंतु एकही गुणावह न होतां मार्गशीर्ष वद्य द्वादशी बुधवारीं दोन प्रहरां काळ जाहाला. ईश्वरें गोष्ट मोटी अनु-चित केली. होणारास उपाय काय आहे. ईश्वरइच्छा प्रमाण. तुह्मीं कोणविसीं खेद न करितां चित्तास विवेक करून शांतवन करावें. येथें राजश्री नारायणराव जिवाजी आहेत. कामकाज पूर्ववत-प्रमाणें चालेल. चिंता नाहीं जाणिजे छ० ११ माहे रजब. बहूत काय लि-हिणें हे विनंती.

(ज्योतिस्वरूप चरणीं तत्पर माहाद-जीसुत दौलतराव सिंदे निरंतर) (मोर्तब.)

१. रेडी येथील किल्ला यशवंतगड. २. जिवबादादा यांस. ३. जिवबादादा ता० ६ जानेवारी १७९६ रोजीं जांबगांवीं वारले. पहा भारतवर्ष मा. पु. अं. ६, पृ. ८६.

लें० नं. २१७ पैवस्त छ० १४ सवाल. श्री. तारीख २९ माहे फेब्रुवारी१७९६.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें शिउबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता० छ० १९ साबान पावेतों सुखरूप असों विशेष. वडिलांकडून पोष शु॥ ११ चें पत्र पाठविलें तें पावलें. त्यांत लिहिला मजकूर कीं चिरंजीव राजश्री साबाजीच्या मुलास कोणी आंगावर वस्ती होत्या प्रातःकाळच्या चार घटका दिवसास नेऊन मारिला असें लिहिलें. त्यावरून मोठें दुःख प्राप्त जाहलें. होणारास उपाय नाहीं. ईश्वराच्या चित्तास आहे तें खरें. दुसरें आपला वृद्धापकाळ आणी तीर्थस्वरूप दादांचें वर्तमान ऐकोन व या मुलाचें असें दुःख आपणास प्राप्त जाहलें. हें तरी विवेक करून दुःखाचें सांतवन करावें. आपले दिवस चांगले होते; तेव्हां सर्व गोष्टी यथास्थितच होत्या. विप्रीत काळ आला तेव्हां अशा गोष्टी घडल्या. सर्व ईश्वराचे स्वाधीन. आतां त्याचे चित्तास येतें तसें करितो. आपण पेशजीं पत्र लिहिलें कीं, कर्जाचा तकादा अनिवार आहे. त्यास पहिले आह्मी येथें तीर्थस्वरूप दादा आले तेव्हां फौजेचे खर्चास कर्ज काढून रुपये दिले होते. त्यापैकीं एक रुपया फिरोन आला नाहीं. आज तागायत उमेद साहूकारास होती कीं रुपये ( ) ल त्यास हें दादांचें वर्तमान ऐकोन त्यांस उमेद नाहीं सारखी जाली. त्याजमुळें सावकार घाबरे जाले आहेत. तीन लाख पावेतों व्याजसुद्धां आहे. याशिवाई आमचे तर्फेनें कर्ज आहे. तेव्हां कांहीं सावकारींत आमची पत राहिली नाहीं. त्यांत दोन वर्षें या प्रांतीं पाणी नाहीं. ( ) जाहले नाहीं. निमे देखील जमा हांसली नाहीं. आणि दर महिनेस येथें खर्चास किंचित् पंचवीस सविस हजार रुपये पाहिजेत. याचें येऊन संकट पडलें आहे. असा मजकूर कोठवर लिहावा. आपण कोंकणच्या कर्जाविसीं काळजी न करावी. कर्ज थोडकें आहे. आणि आह्मी कर्ज वारणार बहूत आहों. सद्यां हें दादांचें वर्तमान ऐकून सावकारांस भरंवसा पडत नाहीं. त्यांत देशचाही दगा ऐकोन फा ( ) भरवसा पडत नाहीं. महिन्या दो महिन्यांत कांहीं राज्याचा बंदोबस्त होईल. आणी सावकारांसही कांहीं खातरजमा होईल. उपरांतीक कर्ज—( )

लें० नं. २१८ श्री. सन १७९५.

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री नरोबा शेणवी केरकर स्वामीचे शेवेसीं.

सेवक भास्कर रामचंद्र साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ऐसे यास घोडीं किती व स्वार किती व पाईचे लोक किती व पालख्या वगैरे किती येणार तें तपशीलवार लिहून पाठवावें. त्याप्रमाणें वोडेद होणार. उघड्या तोंडानें वोडद देवावी ही चाल फिरंगी याची नाहीं. वरकड भाताचेंही लिहिलें तें. त्यास बरोबर पाठवून देतों. व राजश्री अंतोबा कवठणकर यांचीही वोडद पाठवून देतों. आज पाठविणार होतों; परंतु येथें बोवाळ आहे. कळावें बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. २१९ श्री. सन १७९६.

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री बहुगुण कामत स्वामीचे सेवेसीं.

सेवक नरहर गणेश केरकर कृतानेक नमस्कार विनंती येथील तागायत पोष वद्य ५ मी सुखरूप

---

१. जिवबादादा वारल्यानंतरचें हें पत्र आहे. २. हुकूम.

जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा करीत असावें. विशेष. बहूत दिवस आपणाकडून कागदपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. यावरून अपूर्व दिसोन आलें. ऐसें स्नेहाचे जागां नसावें. घडीघडी पत्र पाठवून पत्रीं दर्शनातुल्य लाभ देत असावा. आह्मांकडील सविस्तर राजश्री जगंनाथ शेट घोटगे एकदोन वेळां आपणाकडे गेले; त्याणीं सांगितलेंच असेल. व आपलेकडीलही जाबसाल मशारनिल्हे याणीं आह्मांस सांगितली. परंतु आपलेकडून पत्र येऊन कांहींच कळविलें नाहीं. तर सविस्तर ल्हावें. आमचे पालखीचे रुपये मौजे हरबल व केरी येथें १०५० साडे दाहाशें त्याचे कांहीं आह्मांकडेस तोसीस नाहीं. परंतु आजवर दोनतीन वर्षें तकूब ह्मणून राहातात. त्यास आपण साहित्यास आहां. तेव्हां किंता नाहींच. परंतु गांवचे बेरजेंत वाशील पडून गेले ह्मणजे निःसंशय जाहालें. ऐसें आमचें मानस. तुह्मीं तों निखालस केलेंच असेल. परंतु बाकी ह्मणून गांवाकडेस वोडतात. आण घडीघडी संशय पडतो. ऐसें यास ते रुपये गांवचे बेरजेंत वजा घालून गांवचे जमेंतून तुटलेविना उत्तम नाहीं. हें ल्यावयास कारण, कोण समय कैसा येईल कळेना. या प्रसंगीं सर्व गोष्टी घडणें त्या घडलेवर उत्तम. यास्तव सहस्रां पत्रांचें एक पत्र तुह्मांस लिहिलें आहे. निःसंशय रुपये गांवास मजरा पडून आमचें कार्य व्हावें. ऐसें आमचें मानस. त्याप्रों प्रतिउत्तर लिहून राजश्री जगोबा याकडेस द्यावें. ह्मणजे सर्वप्रकारें आपण आह्मां ठायीं सत्यत्वें चालेचें सार्थक जाहालें. सर्वप्रकारें आपण चित्तावर धरून आमचें कार्य सिद्धीस नेलें याप्रमाणें वरघांटींही चिरंजीव जिवबास लिहून पाठविलें. आण त्यांतील लडा आजवर राहिलेस उत्तम नाहीं; यास्तव स्वज्ञा लिहिली आहे. निखालस करून उत्तर द्यावें. बहूत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

हे॥ राजश्री चिमणोबा[1] पडवळ स्वामीस साष्टांग नमस्कार लिखितार्थ परिसोन सविस्तर वर्तमान लिहीत असावें. आमचे काजकामाविशीं आपण बहूत यत्न करून सिद्धीस नेलें. ऐसें परस्पर ऐकितों. तुह्मांकडील सविस्तर वर्तमान लिहीत असावें. बहूत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. २२० श्री. माहे मार्च १७९६.

सेवेसीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. आह्मीं आज प्रस्थान काढून ठेविलें आहे. उद्यां जावयास जातों. उद्यां प्रातःकाळीं आपले भेटीस येऊन परभारें जावयास जाऊं. पुण्याकडील वर्तमान कळत नाहीं. त्यास लिहिलें पाहिजे. येथें राजश्री मोरोबा नाबर याचा माणूस इस्लामपुराहून आला. तो सांगत होता जे. जुन्नरेचे किल्यांतील दादासाहेबाच्या[2] मुलास घेऊन दरकूच उज्जनीस जातात. त्याचे मागां पुणेकर फौज घेऊन जातात. तेव्हां मार्ग चालत नाहीं. याजकरितां माघारें मंत्री याचा कागद घेऊन आला आहे. ऐसें यास तुह्मांस तेथील बातमी कांहीं मिळाली असल्यास कळविली पाहिजे. दादासाहेबाच्या मुलास घेऊन गेल्यास आज बारा रोज जाहाले. ऐसें वर्तमान आहे. किलेंतील गाडदी येक हजार पर्यंत कापून काढिले. आण उभयतां सरदारांस हस्तगत करून घेऊन गेले. ह्मणोन लिहिलें. यावरून संशय जाहला. हें वर्तमान ऐकतांच वाडीस काल माणूस पाठविला आहे. आण हें वर्तमानही लिहिलें आहे. त्याचा जाण्याचा निःसंशय आला ह्मणजे आह्मी जातों. उद्यां आपले भेटीस येतों. कळावें. आपणास सांगितलेप्रमाणें काम करून नारायण यास पाठवावा. ह्मणजे येथील देणें घेणेंचें काम उरकून घेऊन जाऊं. वर्तमान कळलें तें

---

१. चिमणोबा पडवळ व महादेव भास्कर शिनारी, हे पणजीजवळ रायबंदरांत राहणारे असून हे त्या वेळीं गोंवकर फिरंग्याचे दरबारीं वागणारे मुत्सद्दी होते. २. रघुनाथराव दादा पेशवे.

आहे. कागदही आह्मीं पाहिला. आह्मांस दिकत दिसली तेव्हां जाऊन कागद पाहिला. तेव्हां आपणास लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

कंठाळींत जिन्नस द्यावयाचा तो नारायण याजकडेस द्यावा. कळावें.

लें० नं. २२१ छ० १४ सवाल. श्रीगजानन. तारीख २९ मार्च १७९६ मंगळवार.

तीर्थस्वरूप राजश्री बाबू वडिलांचे सेवेसीं.

बाळकें लक्ष्मणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २९ माहे रमजान जाणोन मुकाम लष्कर नजीक पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों विशेष. वडिलांकडील बहूत दिवस आशीरवादपत्र येऊन बाळकाचा सांभाळ होत नाहीं. तर वडिलीं असें न करितां येणारावरोबर आशीर्वादपत्र पाठवून बाळकाचा सांभाळ करावा. इकडील मजकूर. लष्कर गंगेपावेतों गेलें होतें. तेथून माघारें आलें. कारण श्रीमंत राजश्री सवाई बाजीराव[1] व बंधू[2] असे राजश्री नाना फडणीस याणें पुणेंस आणलें. याकरितां माघारें आलें. गंगेहून सरकारच्या बाया व सर्व मुत्सद्यांच्या बाइका व सौभाग्यवती सुंदराबाई[3] व मातोश्री ताई अशीं सर्व उज्जनीस गेलीं. सुंदराबाईस व ताईस जावदेस उज्जनीहून रवाना करावीं. अशी तजवीज आहे. बरोबर राजश्री लखबा वागळे गेले आहेत. लष्कर बाकी सडें होऊन कंपू व तोफखाना बराणपुरास होता; तोही बरोबर आणिला. लष्कर येथें मुकाम मजकुरीं येतांच[4] राजश्री नाना फडणीस व आबा चिटणीस लष्करची धास्त घेऊन पुणेंहून पळून गेले. श्रीमंत राजश्री बाजिराव यांणीं फार नानाची खातरजमा केली कीं, तूं कोणे गोष्टीविसीं काळजी न करावी. असें कितिएक सांगितलें. परंत त्यास विश्वास पुरला नाहीं. आण लष्करची धास्त घेऊन पळून गेला[5]. श्रीमंत पुण्यास आहेत. व श्रीमंतांच्या[6] व श्रीमंत राजश्री बाबासाहेबांच्या[7] भेटी फाल्गुन वद्य द्वितीयेस[8] जाहल्या. येथून श्रीमंत सुद्धां उद्यां अगर परवां सातारेस जाणार असें आहे. आण चैत्र शु॥ ५ पंचमीस[9] वस्त्रें होणार. आणी मग गादीवर बसणार असें आहे. पुणेंकडील सध्यां आपले कहेत आहेत. पुढें कसें होईल तें पाहावें. वरकड सर्व मजकूर ती॥ राजश्री रावजीनें लिहिला आहे. त्यावरून विदीत होईल. ती॥ राजश्री विश्राम काका जावदेस सुखरूप आहेत. वरचेवर रावजीस कागद येतच आहे. वडिलांस कळावें. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातोश्री मामी वडिलांचे चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. आह्मीं वडिलांस पांच साहा पत्रें पाठविलीं परंतु एकही आशीर्वादपत्र आलें नाहीं. तर असें न करावें. सदैव आशीरवादपत्र पाठवावें. सौभाग्यवती सगुणाबाई व लाडूबाई जावदेस सुखरूप पोंचलीं. कळावें बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

लें० नं. २२२ श्री. तारीख ३० मार्च सन १७९६.

श्रीमत्परमहंसादिबिरुदांकितश्रीमत्सच्चिदानंदसरस्वतीश्रीपादैः

अत्यंतप्रियशिष्यवर्य राजश्री नारायणराव जिवाजी केरकर गृहस्थवर्येषु कृतनारायणस्मरणपूर्वक

---

१. दुसरे बाजीराव पेशवे. २. अमृतराव व चिमाप्पा. ३. ही जिवबादादांची बायको. ४. तारीख २२ मार्च सन १७९६. ५. नाना फडणीस फार भित्रा होता, असें प्रसिद्ध आहे. त्याचें हें उदाहरण आहे. शिवाय वि. ज्ञा. वि. पुस्तक ११, पृ० ९४ पहा. ६. बाजीराव पेशवे यांच्या. ७. दौलतराव शिंदे. ८. तारीख २५ मार्च १७९६. ९. तारीख १२ एप्रील सन १७९६, मंगळवार.

आशीर्वादोपरी अद्य फाल्गुन कृष्ण ७ पर्यंत आरवंदें ग्रामीं वर्तमान यथास्थित जाणोन तुह्मांकडील कल्याण इच्छित आहों. विशेषस्तु. करहाडे याविसींचा जाबसाल वाडीस उभयतां देसाई एकत्र झाले नंतर काय तो जाबसाल सांगतों. ऐसीं कुडाळचे मोकामीं सर्वा गृहस्थांस सांगून घालविलें. त्यावर गृहस्थ मान्य होऊन गेले. ऐसें असतां हल्लीं राजश्री जिवाजी गणेश नेरूरकर व सगुण बाळाजी वैद्य यांचे कतबे ते मजतीस जबरदस्तीनें घेतले होते. त्यांस हल्लीं राजश्री रघुनाथ सावंत याणीं रुपये करितां आणून वाडीमध्यें मारितात. त्याविषयीं राजश्री सबनीस चिटणीस याणीं पुसावें ते धन्याचे मर्जीपुढें पुसत नाहींत. आणि त्या गरिबांस जातीकरितां मारितात. सर्व वृत्तांत मागां तुह्मांस लिहिलाच आहे. त्याचा बंदोबस्त जलदी केल्यास आपण आजपर्यंत केल्या गोष्टी ठीक पडतील. येथील विचार विलक्षण दृष्टीस पडतो. यास्तव सर्व मजकूर राजश्री साबाजी बावा याणीं लिहिला आहे. त्यावरून कळों येईल. किं बहुना लेखनेंनेल्यलं. इति नारायणस्मरणं.

ले० नं. २२३ श्री. तारीख ६ एप्रील १७९६.

(शिक्का) राजश्री रघुनाथराव गोसावी यांस.

छ आखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें विशेष. राजश्री सोयरो आपाजी याणीं विदीत केलें कीं: तालुके शाहापूर येथील गड तो पैकीं मौजे बस्तवाड येथें सय्यद अबदूल रहिम पीरजादे याणीं आपल्यास इनाम शेत करून दिल्हें आहे. त्याप्रमाणें चालत असतां आलीकडे सय्यद मजकूर चालविण्यास दिकत करितो. ह्मणोन त्यावरून आपणांस लिहिलें आहे. त्यास येविसींचें मनास आणून सनदेबरहुकूम शेत त्याचें त्याजकडे चालत आल्याप्रमाणें चालणेंविसीं सय्यद यास व तेथील कमाविसदारास ताकीद करावी. रवाना छ० १४ रमजान सुरुसन सबां तिसेन मयां व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

याप्रमाणें आजवर चालत आहे. (मोर्तब.)

ले० नं. २२४ पै॥ छ ( ) माहे जिल्हेज श्री. तारीख ३ जून १७९६.

सन सबां तिसेन मयां आलफ.

चिरंजीव राजश्री साबाजी प्रती बाळाजी राम आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत छ० २६ जिलकाद जाणोन तुह्मांकडील लिहीत जावें. विशेष. तुमचें पत्र वैशाख शुद्ध चतुर्थीचें आलें तें नव रोजीं येथें पावलें. तीर्थस्वरूप बाबू कैलासवासी जाहाले. हें वर्तमान कळोन बहूतच शोक प्राप्त जाहाला. तो कोठवर लिहावा. तीर्थस्वरूप दादा कैलासवासी जाहाल्याचे चार महिने व्हावयाचे पूर्वी नानांचें वर्तमान आलें. तें कळोन आठ रोज न होतां हें आलें. असें चों महिन्यांत ईश्वरें कहर केला. त्याचा पर्याय कोठवर लिहावा. एकाएकींच पर्वत येऊन पडतो असें जाहालें. होणारास उपाय नाहीं. आतां त्याचे मागां आह्मी तुह्मी अवघे आहों. याणीं हिमत धरून चालावें. हात पाय गाळून बसल्यास परिणाम नाहीं. सर्व पार पडणें वडिलांचें पुण्य व ईश्वरसत्ता प्रमाण आहे. चिरंजीव विश्राम अजमेरीस आहे. तेथें तुमचें पत्र आलें. तेंच बजिन्नस व येथून पत्रें लिहून व सरकारचीं पत्रें अशीं पाठविलीं आहेत. व त्याज उपरही बरचेवर पत्रें पाठवीतच आहों. आतां

१. कऱ्हाडे ब्राह्मण. २. घाटी सरकार राजे बाहादर यांचे. ३. साबाजी राम केरकर उर्फ काका. ४. जिवबादादा. ५. शिवबा नाना.

अजमेरीकडील व जावदेकडील बंदोबस्त पहिलेप्रमाणें राखणें जिमा अगर भरवसा चिरंजीवाचाच आहे. येथून सरकारांतून जसजसा बंदोबस्त करून घेणेंविसीं तेथून त्यांचीं पत्रें येतील त्याप्रमाणें पुरवणी केली जाईल. व तिकडून तीर्थस्वरूप राजश्री बापूंही[1] जडभारी पडल्यास संनिधच आहेत. त्यांजकडूनही पत्रें वरचेवर येत आहेत. हेंही वर्तमान तिकडे लिहून पाठविलें आहे. सारांश वडील होते ते गेले. त्यांचे मागां त्याणीं लौकिक मिळविला. त्यांचें संरक्षण व्हावें. ही हिंमत धरून चालावें. सर्व पार पाडणार ईश्वर आहे. घरीं इति दिवस वडील सर्वांस होते. त्यांचे मागां आतां सर्व संसाराचा भार येऊन तुमचे माथां पडले आहे. तरी तुह्मीं चित्ताचा खंबीर करून ज्याप्रमाणें वडिलांनीं सर्वांची खबर समाचार गृहस्थपणा राखोन लौकिक मिळविला. त्यांत कमती न पडतां त्याचप्रमाणें सर्वांची खातरजमा करून सर्वांस धीर भरंवसा देऊन कोणा एकासीं दुसरा विचार न धरितां यथास्थित पहिलेप्रमाणें लौकिकासारखी वहिवाट चालणें जीमा तुमचीच आहे. येणेंकरून पांच रुपये जरी कर्ज जाहालें; तरी मागीलही कर्जाचा पेंच आहे. येविसीं कांहीं काळजी न करावी. वडिलांचे पुण्येंकरून एकच दिवसांत ईश्वर पार पाडील. चिंता नाहीं. मातोश्री मामींचें समाधान वरचे वर राखीत जाऊन वरकड आप्त आहेत. त्यांचाही समाचार जसजसा वडील घेत होते. त्याचप्रमाणें चाललें पाहिजे. यांत शहाणपण आहे. नाहीं तर आजवर वडिलांनीं द्रव्य कांहीं संग्रह केला नाहीं. परंतु दिगांतीं लौकीक मिळविला. त्याजला बट्टा लागल्यास मग आमचें अवघ्यांचें स्वरूप काय? याजकरितां जेथवर ईश्वर चालवील तेथवर चालवूं. परंतु आपली एकनिष्ठा कुटुंबासीं असावी. येणेंकरून यश कीर्ती जें कांहीं आहे तें सर्व यांत आहे. विस्तारें तुह्मांस लिहावें असें काय? वडिलांनीं पांचा हजारांची चिठी केली होती. ते रुपये येथें आह्मीं पटून दिले. त्याची पावती आपणाकडे पाठवून देतों. आपण कर्जाविसीं चिंता करितां तर एकंदर न करावी. ईश्वर पार पाडील. बहुत लिहून कळवावें असें नाहीं. सावधपणीं वर्तणूक करावी. गांवच्या बागाचा बंदोबस्त राखावा. सर्व बंदोबस्त तुह्मांखेरीज आतां करणार कोण आहे. परंतु सुचेल तें लिहिलें आहे. तीर्थस्वरूप राजश्री बापूचीं पत्रें आलीं आहेत. सर्व सुखरूप आहेत. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव गणबा व अंतोबा व सगूण यासी आशीर्वाद. तुह्मांकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. कोणे गोष्टीविसीं चिंता न करावी. तुह्मीं लिहिण्यांत खबरदार व्हावें. येथून कांहीं पाहिजे असेल तें लिहिणें. पाठवून देऊं. वावगें न फिरतां वडिलांचे आज्ञेंत वर्तणूक करीत जावी. हे आशीर्वाद.

लें० नं. २२५ पा। छ० ३० जिल्हेज श्री. तारीख २२जून १७९६.
सन साबा तिसेन.

चिरंजीव राजश्री साबाजी प्रती बाळाजी राम आशीर्वाद उपरी येथील वर्तमान तागायत छ० १५ जिल्हेज मुकाम नजीक पुणें यथास्थित असे विशेष. अजमेरचीं व तीर्थस्वरूप राजश्री बापूकडील पत्रें आलीं. तींच तुह्माकडेस बजिन्नस पाठविलीं आहेत. सौभाग्यवती सकूबाई बापूची भेट घेऊन येऊन जावदेहून अजमेरीस ज्या दिवसीं तीर्थस्वरूप नानाचा काळ जाहाला त्याच रोजीं गेली. पोटशी होती. आण ताप येत होता. कांजीं निघोन चौथे रोजीं देवाज्ञा जाहाली. मूल जाहालें

---

1. जगोबा बापू.

तेंही चौ रोजीं गेलें. या दुःखाचा विस्तार आतां कोठवर सोसावा. आण नित्य उठोन लिहावें काय ? ईश्वरें काय योजिलें न कळे. तीर्थस्वरूप दादा गेल्यामागां एकही दिवस सुखाचा गेला नाहीं. एका मागां एक दुःखाचींच वर्तमानें ऐकावीं. आतां हृदय केवळ पाषाणवत होऊं पाहातें. दिवस येतो तो संकटांचा. कोणे गोष्टीचा विसर पडों देत नाहीं. असो. प्रारब्धानुरूप होणार तें चुकत नाहीं. तेव्हां शोक कोठवर करावा. इकडील वर्तमान तर शिलेदार याची रुसकतीची हाजरी छ० ७ जिल्हेजीं जहाली. पुढें लोकांचा गवगवा मागील व हालींच्या हिशेबाविसीं पडला आहे. नित्य उठोन धरण्यासीं गांठ. तूर्त दोन रोजमुरे देऊन घोडीं चारणीस लावावीं. याप्रमाणें करून तीन रोज धरणें बसलें; तें उठविलें. पुढें कबजेही करावयाची सुरवात होईल. राजकी वर्तमान तर पेशजीं लिहिलेंच आहे. नाना राईरीस गेले. पुणेंतील बंदोबस्त राजश्री तात्याचे अनुमतें राजश्री परशरामभाऊकडेस आहे. कारभारसंबंधीं श्रीमंतांकडील तेंच मनास आणितात. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २२६ तारीख २५ अकटंबर १७९६.

( ) तुह्मांकडील क्षेम लिहीत जावें. विशेष. वरकड घरीं पत्रीं लिहिणें तें छ० २३ रोजींचीं पत्रें आलाइदा लिहिलीं आहेत. त्यावरून कळेल. अधिकोत्तर वर्तमान काल छ० [1] २४ रोजीं रात्रौ राजश्री बाळोबा तात्या व धोंडिबा व बाजीबा ह्माजन व सदाशिव मल्हार, पांडवा लाड तोफखानेवाला याजवर सरकारची गैरमर्जी होऊन चौक्या बसविल्या. कारभारसंबंधीं काजकाम राजश्री रायाजी पाटील मनास आणीत आहेत. व चिरंजीव राजश्री रावजीस व आह्मांस बोलावून नेऊन सरकारांतून खातरजमा केली कीं; तुमचें काम पहिलेपासून चालत आल्याप्रमाणें पुढें ( ) ऊन सरकार लक्षीं राहावें. आज्ञेप्रमाणें वर्तणूक होत आहे. याचप्रमाणें सडे स्वारीत तीर्थस्वरूप राजश्री बापूसही सरकारांतून पत्रें पाठविलीं आहेत. व चिरंजीव विश्राम व चिरंजीव यशवंतराव भाऊ यांसही खातरजमेचीं पत्रें गेलीं आहेत कीं तिकडील बंदोबस्त यथास्थित राखावा. आह्मींही पत्रें लिहून पाठविलीं. तुह्मांस कळावयाकरितां लिहिलें आहे. पुढें होईल त्याप्रमाणें लिहावयास येईल. राजश्री परशरामभाऊ रात्रींचे श्रीमंत यांस घेऊन निघोन पुणेंहून गेले. त्याजमागें फौजा मोंगलांकडील वगैरे लागल्या आहेत. मागाहून सविस्तर लिहिलें जाईल. ( ) घरांत दखल करून तिकडील बंदोबस्त राखवावा. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

अपत्य नारबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना सर्व वर्तमान तीं॥ भाऊंचे पत्रीं लिहिलें आहे. सरकारांत दखल करवून येथील सरकार लक्षीं राहावें हे विज्ञाप्ती.

लें० नं. २२७ छ० ९ जमादिलावल. श्री. १ नवंबर १७९६.

( ) विशेष. सरकारांतून [6] तुह्मीं व राजश्री लाडोबा याणीं पत्रें पाठविलीं तीं सरकारांतून आह्मांकडेस पाठविलीं. त्याजवरून लिहिला मजकूर सविस्तर कळला. लिहिण्यांतील सारांश सरका-

---

१. तारीख २६ अक्टोंबर सन १७९६. २. नारायणराव बक्षी यांस. ३. यसाजी रामकृष्ण आरंवंदेकर यांस. ४. तारीख २६ अक्टोंबर सन १७९६ बुधवार. ५. नाना फडणीसांनीं या फौजा आपले मदतीसाठीं आणल्या होत्या. ६. हें पत्र वाडी सरकारचे कारभाऱ्याचें आहे.

रांतून वर्तणुकेस जामीन माहाराज व वरकड द्यावे. दुसरें. लाडे[1] व म्हाजेन[2] व सांखवळकर[3] यांच्या जाबसालाविसीं तुमची उदासीनता येविसींचा तपशिलें मजकूर पत्रांतें लाडोबा याणीं लिहिला आहे. अशास हें संस्थान श्रीमंत राजश्री सिंदे याणीं आपलें असें ध्यानीं आणून कैलासवासी श्रीमंत आ-पॉसाहेबांपासून पडल्या प्रसंगीं संरक्षण करीत आले. आण या गोष्टीस पुष्टी एक आपल्या गृह-स्थांची. संस्थान आपलें माहेर या जागेविसीं मेहनत होईल ती आपणा श्रयस्कर हेंच आजपर्यंत त्यास ईश्वरें हातीं धरून लौकिकास आले. त्यांनीं ध्यानीं घेऊन मेहनत कामें उरकून सेवा करीत गेले. त्याप्रमाणें कैलासवासी तीर्थस्वरूप जिवबादादा याणींही लक्ष ठेवून काजकामेंही होत गेलीं. आण तुमचेंही लक्ष तेंच. त्याअर्थीं ईश्वर तुमच्या मेहनतीस सानकूळ होऊन संस्थानची चाकरी घडेल. ती केल्यानें आपली कीर्तच आहे. येथेंही आपलाच भरंवसा मानितात. येविसीं आह्मीं तपशिलें आपणास लिहावें. आण आपण करावें. असें नाहीं. आपलें लक्ष संस्थानाठायीं आ-हेच. यांत हरएक कल्पना चित्तीं न आणितां तूर्त संस्थानावर चहूंकडील अरिष्टें प्राप्त होऊन निकट बसली आहे. त्यापक्षीं जाबसाल विलंबावर पडल्यानें विलग पडेल. नंतर आपणासच भारी पडणार. यास्तव या प्रसंगीं आपणाकडून मेहनत घडेल ती करून संस्थान निर्वेध करून बंदोबस्त घडेल तें करावें. जामीन वर्तणुकेस ह्मणावें तर श्रीमंत शिंदे याणीं पूर्वींच संस्थानचा अंगिकार केला आहे. आण सर्वांविसीं योग्यताही त्यांस आहे. त्यापक्षीं इतर जामीन ह्मणावे असा अर्थ नाहीं. आण श्रीमंतांपेक्षांही विद्यमानीं दुसराही कोणी नाहीं. दुसरा जामीन ह्मटलेस लौकीक ठीक दिसत नाहीं. हें सर्व आपले ध्यानीं आहेच. सरकारांतूनही आपणास लिहिलें आहेच. त्यास आपण यजमान साहेबांकडेस सक्त विनंती करून तेणेंकरून संस्थानावरील पेंच निवारण होऊन निर्वेध होय तें करावें. वडिलांनीं मारवाड आपलें करून मोठमोठ्या चाकऱ्या करून कैलासवासी माँहाराजांकडेस या संस्थानचा बचाव करावा. ही बक्षिसी मागोन घेतली आहे. हें आपणासही ठाऊक आहे. त्यापेक्षां आह्मीं तुह्मांस विस्तारें लिहून जाणवावें नलगे. आह्मांपेक्षां तुह्मांस येथील अगत्य-वाद आहे. हें आह्मीही जाणतों. मुख्य गोष्टी संस्थानावरील तंटे निवारण करून बंदोबस्त निर्वेधपणीं करावा. ह्मणजे संस्थानच्या उपयोगी पडोन सर्वजणांचीं कुटुंबें निरोपद्रव नांदतील. जागा आपली आहे.

( )

लें० नं. २२८ पैवस्त छ० ६ माहे सफर शुक्रवार. श्री.

वडिलांचे सेवेसीं चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना आज शुक्रवार सकाळ जा-णोन क्षेम असों विशेष. राजश्री ह्माजन याकडील मुणगी व बाग सुकटणकर इनाम हीं ठिकाणें सरकारी ह्मणून काल रात्रीस कारभारी याकडेस बोलून कागद शिकेस घातले. त्याप्रमाणें जाऊन

१. लखबादादा लाड. २. बाजीबा कृष्ण महाजन मोदी. ३. अंताजी रघुनाथ सांखवळकर. ४. जयापा शिंदे यांचे वेळेपासून वाडी संस्थानास शिंद्यांचा आधार होता. याचें कारण शिंद्यांकडे रामचंद्र बाबा हे कारभारी होते, हें होय. रामचंद्र बाबा हे मूळचे वाडी संस्थानचे राहणारे. त्यामुळें त्यांस संस्थानचा अभिमान होताच. शिवाय वाडीचे कारभारी जिवाजी विश्राम सबनीस यांची मुलगी रामचंद्र बाबांचा मुलगा सदाशिव रामचंद्र यास आणिल्यापासून वाडी संस्थानच्या कल्याणाकरितां ते फार झटत असत. त्यामुळेंच पत्रकारांनीं वरील उद्गार काढिले आहेत. रामचंद्र बाबांचे वेळीं वाडी सरकाराकडून पेशव्यांकडेस रुपाजी दळवी आरवलीकर हे वकील होते. ५. हें पत्र नारायणराव बक्षी यांस लिहिलें आहे. ६. जिवबादादांनीं. ७. महादजी शिंदे यांजकडे.

त्याजकडील ठिकाणें उतरतील मुलगी नित्य दामाजी व सुकटणकर हे सौभाग्यवती राणूबाई अगर नर्मदाबाई यांस द्यावें ऐसें आहे. पुढें कैसें होतें पाहावें. कराडे प्रकर्णीं जाबसाल आज दोनचार रोज उभयेतां श्रीमंत यांजकडेस घालमेल पडली होती. अखेर रात्रीस सर्वांस मेळवून उभयतां श्रीमंत चौपटीमध्यें बसून जाबसाल सांगितली जे. तुमचा व कराड्यांचा व्यवहार पहिला चालत होता; त्याप्रमाणें निक्षून चालावा. त्यावर धन्याची मर्जी ऐसें बोलले. आठ महिने अमानत ठेवून अखेरीस जाबसाल हीच कीं काय? त्यावर म्हाराज बोलिले; नित्य उठोन कराडे आह्मांकडेस पुसतात. त्यास ज्याप्रमाणें वडिलांवडिलीं व्यवहार चालला त्याप्रमाणें चालावा. त्यावर राजश्री गोपाळराव सबनीस याणें उत्तर केलें जे. न्याय पाहून जाबसाल करावा. त्यावर माहाराज याणीं सांगितलें. जिवोजी विश्राम व देवबा दादा व विश्राम शेणवी. हे मुदतीर होते; ते खुळे कीं काय? परंत त्याणीं यांतील बंदोबस्त काडीमात्र केला नाहीं. आतां तुह्मी त्याचे नातू शाहाणे जाहालां. त्यावर मल्हारनिल्हे सबनीस याणीं उत्तर केलें. जैसे आपले वडील चालत; तेच रीतीनें आमचे वडील चालत. आतां साहेबांस शास्त्रांत समज पडत चालला. तसाच सेवकाकडेस चालतो. परंतु इतर संस्थानीं ब्राह्मण मंडळी आहे. त्यांचा आमचा व्यवहार कसा चालेल? त्यावर उत्तर केलें जे. आजपर्यंत चालला त्याप्रमाणें चालावा. इतरा संस्थानाकडेस आमची आज्ञा कसी चालती. तुह्मांकडे चालती ह्मणोन तुह्मांस आज्ञा करितों. त्यावर त्याणीं उत्तर केलें जे. राजश्री साबाजी बावास पत्र पाठवितों. ते आलेनंतर काय जाबसाल असेल ती सांगूं. त्यावर उत्तर केलें जे. उद्यां सांजमर्याद कोण तुमचे आणणार ते आणून जाबसाल सांगावा. तेव्हां याणीं पुसलें जे. उद्यांच्या दिवसांत कसे येतील. धन्याची मर्जी तसीच असल्यास ते तरी येऊन काय कारण. आह्मांस व त्यांस उत्तर एकूण हेंच. दुसरें उत्तर होणार नाहीं. हेंच कीं काय? त्यावर सांगितलें जे. उत्तर सांगणें तें हेंच. त्याचा तुमचा पुरातनप्रमाणें चालत होता त्याप्रमाणें चालावें. त्याउपर गोपाळराव यानें त्रिंबकरावांस· सांगितलें जे. आज्ञा घेऊन घरीं जावें. त्याबरोबर त्रिंबकराव उठले. तेव्हां सर्व मंडळी निघोन बाहेर आली. आज सर्वांनीं सबनीस यांचे घरीं एकत्र होऊन निघायाची मसलत करावी. याप्रमाणें सिद्ध गोपाळराव यांचें व त्रिंबकरावांचें जाहालें. आह्मांस आतां इत्यर्थ काय होईल. त्याप्रमाणें लिहितों. हे विज्ञापना.

लें० नं. २२९ श्रीशंभु. तारीख १७ मार्च १७९७.

राजमान्य राजश्री साबाजी राम केरकर यांस हुजूरची आज्ञा सुरुसन समान तिसेन मयां व अलफ. राजश्री बुधकर घांटगे यांचें पत्र आतांच आलें. तें देऊन राजश्री दमाजीसेट नेवगी यांस तुह्मांकडेस पाठविला आहे. सविस्तर बोलेल त्याजवरून कळेल. बुदकर याचा मूल चिरंजीव बाकूस निश्चयांत आणल्यास चार वर्षें होतील. यंदां लग्न करावयाची योजना. त्यांत असा प्रकार घडला आहे. तेव्हां कांहींच सुचत नाहीं. या संस्थानचे अभिमानी तुह्मां लोकांवांचून दुसरा कोणी नाहीं. अशा प्रसंगांत तुह्मांकडून येविसींचा उद्योग घडून घाटगे यांचा मूल निश्चयांत आणलेला ठरे ती गोष्ट जाली पाहिजे. वर निश्चयांत आणलेला हातचा सुटतो. तेव्हां आब्रू जावी; असा समय दृष्टीस

१. सावंतवाडीचे खेमसावंत राजे सरदेसाई व सोमसावंत सरदेसाई हे चुलते पुतण्ये होते. २. हे जिवाजी विश्राम सबनीस वाडी सरकारचे कारभारी होते. ३. हे लाड लखबादादांचे येथील होते. ४. हे वाडी सरकारचे त्रिंबकराव चिटणीस होत. ५. हें पत्र वाडीकर खेमसावंत यांचें आहे. ६. सारस्वत ब्राह्मण (शेणवी).

पडतो. आण प्रासही तसेंच जालें. कां ह्मणाल तर येथील विचार सध्यांचे प्रसंगीं सर्वच विलग पडलेला आहे. एक ओढ घस्तीमुळें. तेव्हां घाटगे यांचें पत्र आलें तें पाहून कांहींच सुचेनासें जालें आहे. यांत येविसींची ईर्षा धरून ज्याअर्थी इकडील अब्रू वांचे तो अर्थ तुह्मांकडून होऊन आला पाहिजे. यांत तुह्मांस कळेल तसें करावें. मुख्य गोष्ट समय राखिला पाहिजे. जाणिजे रवाना छ० १७ माहे रमजान चंद्र मजकूर.

ले० नं. २३० श्रीराम. तारीख ३० मार्च सन १७९७.

विनंती उपरी तागायत छ० १ सवाल. यथास्थित असे. ( ) हा प्रकार घडावयाचें कारण कांहींच नसतां ( ) अकस्मातच जाहले. द्वेषी याणीं लोभ दाखवून केलें असें ह्मणतात. रदबदल कांहींएक होत नाहीं. स्वकीय खेरीज करून सर्व एकमतच आहे तेव्हां रदबदल कोण करितो. आबाजी भोंवार याजकडील खटल्यासुद्धां हुजऱ्या येऊन घेऊन गेला. तूर्त कोणताही अर्थ यथास्थित घडेल असें दिसत नाहीं. पुढें श्रीइच्छा. वरकड आपली मंडळी आहे त्या स्थळींच आहे. सर्वां चीजबस्तीची मोजदाद करून याद घेतल्या चीजबस्ती अद्याप नेली नाहीं. पाहाऱ्यामुळें आंत प्रवेश होत नाहीं. भाऊ व रावजी व गर्वेळी मोदी पिता ( ) पुत्र जामगावांतील उभयतां असे नगरास नेऊन ठेविले. भाऊस ज्वर येत होता. मार्गींही श्रम जाहले. मुळें शरीरीं स्वस्थ नाहीं. असें लिहिणें आलें. रावजी व भाऊ मनास आणी होते. ते नूतनमंडळींतील एक दोघांस सांगावयाचा बेत एके समयांत येतो. राजश्री बापू व लाँड यांजविसीं इंगळे यांस पत्रें गेलीं. काय होतें पाहावें. आपल्या मंडळींतील कोणी राहिला नाहीं. सर्व एकत्र येऊन भोंवता पाहारा आहे. मुलें माणसें वाड्यांतच आहेत ( ) पाहारा याप्रमाणें आहे. आपल्या मंडळीखेरीज स्वज्ञातीयांसही निकट लाविली. सारांश. ज्ञातीवर संकट येऊन पडलें आहे. विस्तार कोठवर लिहावा. तेथें श्रीस गाऱ्हाणें घालून प्रार्थना करावी. प्रसादीं येविसीं निवडेल तें कळवावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. आपण सर्व गोष्टीविसीं सावध असावें. भरंवसा कोणीकडेही धरावयाचा समय नाहीं. हे विनंती.

ले० नं. २३१ पै॥ छ० ११ रबिलावल. श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका करकर स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल मणेरकर. साष्टांग नमस्कार विनंती उपर येथील कुशल तागायत छ० १ रबिलावल मुकाम वानवडी जाणोन स्वकीयकुशल लेखन करीत असावें. विशेष आपणाकडोन बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास वरचेवर पत्र पाठवून समाचार कळवीत जावें. यानंतर इकडील वर्तमान तर आपण हुंड्या दोन एक तीनची व एक सत्राशांची केली. ती पावली. आतां याउपर हुंडी येथें करूं नये. हुंडी कराल तर रुपये पटणार नाहीं. पेशजींच्या पत्राची पावती

१. नाना फडणविसांनीं पन्नास लाख रुपये देतों असा लाभ दाखविला होता. पत्र नंबर २३८ पहा. २. यशवंतराव भाऊ किंवा सदाशिव मल्हार ऊर्फ सदोबा भाऊ. ३. नारायणराव बक्षी. ४. देवजी गौळी. ५. बाजिबा मोदी व त्याचा पुत्र. ६. जगोबा बापू. ७. लखबादादा लाड. ८. अंबाजी इंगळे. ९. हा उत्तर हिंदुस्थानचा इंगळे प्रकरणीं वाद येथपासून सुरू झाला. १०. या कलहामुळें पन्नास लाख रुपये किंवा आणखी त्यावर कांहीं देण्याचें करून नाना फडणिसानें हा कलह सुरू केला. पत्र नंबर २३८ पहा.

भाऊचे नांवें ज्याची त्याची व आपली घेऊन पाठवाव्या. येथील प्रकार ह्मणावा तर नाना फडणीस याणीं दरबारीं फितूर माजीवला आहे[१]. इति दिवस तात्या पागनीसाची गत आपली जाली आसती. परंत कांहीं कैलासवासी दादाचे पुण्येंकरून आजवर दिवस काढले आहेत. पुढांही भरवसा दिसत नाहीं. ईश्वरें काय योजिलें आहे कांहीं कळत नाहीं. येथील प्रकार येणें रीतीचा. त्यांत कोंकणचा प्रकार साखोळकर आरवदेहून निघोन साळसीस गेले ह्मणोन ऐकिलें. तेव्हां कोंकणांतही मनुष्यास दम खावयास ठिकाणा नाहीं. तेव्हां हाही ईश्वरक्षोभच जाणावा. असो. अद्यापवर कांहीं फडणीस याची टांकी लागली नाहीं. परंत तो आपले काबूंत आहे. श्रीमंतांची कृपा. रावजीवर चांगली आहे. परंतु बाल राजा कोणे वेळेस काय होईल कांहीं कळत नाहीं. वडिलांचीं पत्रें मथुरेहून काल आलीं होतीं. सर्व सुखरूप आहेत.. सौ॥ मातुश्री आकाबाई व आत्याबाई व मुलें यांस गणेशचतुर्थी होतांच रवाना करून देतों; ह्मणोन लिहिलें होतें. आपणास कळावें. याजवर हुंडी कराल तर रुपये पटणार नाहींत. फिरेल. आण तेथें आपणास तोटा बसेल. दुसरें. आपणास आजपावेतों कर्जाच्या फडशाची बेजमी पाठविली आहे. ऐसें यास आपला हिशेब करून फडशा जाहाला किंवा बाकी राहिली. ऐशी यादी ठरवून पाठवावी. त्यासारखी तजवीज भाऊस पुसोन जे रीतीनें फडशा होईल. ती रीत करायास येईल[illegible]. तह्माकडील व दरबारचें व ( ) लें व श्रीमंत राजश्री आबासाहेबांचें मत कैसें का[illegible] हें तपशीलवार लिहावें. बहूत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. २३२ पै॥ छ० २५ रबिलावल. श्री. तारीख ८ माहे आगष्ट १७९७.

श्रियासह चिरंजीव राजश्री काका यासी प्रती–सौभाग्यवती रमाबाईचे अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १४ माहे सफर मु॥ वानवडी जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंतातूर असों. तरी असें न करितां सर्वदा पत्र पाठवून वर्तमान कळवीत जावें. यानंतर आह्मी आलेपासून तुमच्या शरीराची भावना कसी काय आहे; हें कांहींच समजत नाहीं. त्यावरून चित्त स्थीर नाहीं. त्यास तुमचे शरीरीं कसें आहे; तें लिहून पाठवावें. इकडील वर्तमान सर्व घरच्या पत्रावरून विदीत होतच आहे. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

हेच पत्रीं राजश्री गोंदबानें साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ क्षेम जाणून आज्ञा करावी. इकडील वर्तमान नवल विशेष लिहावेंसें नाहीं. पेशजीं राजश्री मोरोबा दादा फडणीस यांनीं संन्यास घेतला. ह्मणून लिहिलें तें बाजारचे बातमीवरून लिहिलें. त्यास नगरच्या किल्ल्यावरून खालीं बाग आहे; तेथें ठेविला आहे. उभयतांकडेस आहे. अद्याप नानाचे स्वाधीन करून दिला नाहीं. चौकीवर आपली पलटण बाहीर आहे. व आंत त्याचे पेदे आहेत. परंतु पलटणचे परवानगीशिवाय माणूस बाहेर जाऊं देत नाहींत. नाना कांहीं शिंदे यांचे वाड्यांत येत नाहींत. त्यांस संशय दिसतो. पुणेंत श्रीमंत राजश्री दौलतराव बाबांस मेजवानी त्रिंबकराव पडचुरे यांचे घरीं केली. तेथें याणीं व नानानीं यावें असा बेत ठरविला होता. त्यांत बाणाजी हुजरे

---

१. दौलतराव अल्पवयी असल्यामुळें त्यांस नानांनीं शिकवून शिंदेशाही मोडली. महादजी व जिवबादादा यांचे वेळीं जो नानांचा हेतु सिद्धीस गेला नाहीं, तो त्यांनीं त्यांचे मागून सिद्धीस नेला. २. नाना फडणीसांचे.

कारभारी त्यास मेजवानीस गेले. तेथें उभयेतां श्रीमंत आले. व शिंदेही आले. परंतु नाना आले नाहींत. त्यावरून श्रीमंत राजश्री दौलतराव बाबा यानीं बाणाजीस पुसलेवर जाबसाल जाहाली नाहीं. तेव्हां तूर्तकाळीं बाणाजीवर दोन रोज इतराजी आहे. कारभार तंव करितात. परंतु दोन रोज बोलणें चालणें नाहीं. कारभारांत कमी नाहीं. पुढां पाहावें. वरकड सर्व यथास्थित आहे. राजश्री लखबा दादा लाड दतिया प्रांतीं गडीस लागले आहेत. इकडे अंबाजी इंगळे आहेत. तीर्थस्वरूप राजश्री बापूही भेटावयास यवलपुरास जाणार आहेत. कळावें बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

ले० नं. २३३ श्री. तारीख ६ एप्रील १७९७.

आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० ८ सव्वाल पावेतों मुकाम वानवडी नजीक पुणें येथें सुखरूप असों विशेष. तुह्मांकडून रखमाजी जासूद आला तो सातवे रोजीं पोंचला. इकडील वर्तमान वरचेवर लिहून पाठवणें ह्मणोन सांगून पाठविलेंत. त्यास येथें मुलेंमाणसें चीजवस्त याजवर पलटणचे पाहारे व हुजुरे आहेत. त्यास सरकारांतून आज्ञा जाहाली कीं; त्याची चीजवस्त व मुलीच्या व बाईकांची नगनगोटी, चिरगूटपांघरूण सरकारचे कारकून याणीं कागदीं लाविलें होतें. त्याबद्दल सरकारचे कारकून व हुजूर येऊन याची चीजवस्त याचे जिमे केली. व पागेची घोडी सरकारांत नेली ती याची यास सोडून याचे स्वाधीन करणें ह्मणोन आज्ञा जाहाली ह्मणोन ऐकितों. एका दो रोजांत देतील ऐसें आहे. पाहारेही एका दो रोजांत उठावे ऐसें आहे. सर्व गोष्टी श्रीखळनाथ कृपा करील तर आठपंधरा रोजांत उभयेतां चिरंजीव व अटकाव झालेला सुटोन येतील. चिरंजीव हिंदुस्थानांतील व अटकाव झालेला व यांसही जप्त केलें ह्मणोन शनवारीं एकंदर वर्तमान आलें. येथील यांची मोकळिक जाहलियावर त्यांचीही मोकळीक होईल. श्रीची कृपा होईल तेव्हां विलंब लागणार नाहीं. जप्तींतीळ चीजबस्त दविली; आण पागाही घ्याव्या ह्मणोन बोलणें निघालें. तेव्हां श्रीचे कृपेचा भरवसा दिसतो. परंतु सुटका होऊन येतील तेव्हां खरें. तुह्मीं श्रीस विनंती वारंवार करून कौलप्रसाद घ्यावा. उभयतां चिरंजीव व येथील मुलेंमाणसें सर्व सुखरूप आहेत. मागून ज्याप्रमाणें येथें होईल; त्याप्रमाणें लिहून पाठवूं. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले० नं. २३४ श्री. तारीख १९ माहे एप्रील १७९७.

राजश्री साबाजी राम केरकर गोसावी यांसी—

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य-स्नो कमळेजाबाई भोंसुले सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय येथील क्षेम जाणोन स्वकीय लेखन करावें. विशेष. अलीकडे तुह्मांकडील वर्तमान कळलें नाहीं. तर सविस्तर लिहिणें. यानंतर राजश्री नारायणराव जिवाजी यांजवर पेंच आला. हें वर्तमान ऐकून चित्त असंतोषित होतें. हल्लीं इकडील माणसें पुणेंहून आलीं. त्यांस मशारनिल्हेस अटकाव केलें ह्मणून कंपूसुद्धां फौजेनें रुसावा करून राजश्री दौलतराव सिंदे यांस निकट करून बसले होते जे. त्यास अटकाव करावयास कारण कांय ? आपणास निरोप द्यावा. याप्रमाणें

१. बाजीराव व अमृतराव पेशवे. २. दौलतराव शिंदे यांचें मन वळविण्यासाठीं ही मेजवानी होती. ३. नारायणराव बक्षी व यशवंतराव भाऊ. ४. वाडी सरकारचे घराण्यांतील राजस्त्री. ५. फिरंगी गोरे यांचे फौजेनें. ६. मराठी सैन्य घोडेस्वार. ७. यावरून शिंद्यांचे सैन्याची बक्षीवर किती प्रीति होती हें दिसून येतें. पत्र नं. ४२०.

तीनचार रोज दंगा केला. त्याजवर फौजेची समजूत करून नारायणराव यांस समजाविसी करून आणिले. असें वर्तमान सांगितलेवरून संतोष जहाला. तुह्मांकडे तिकडील मनुष्य आला असेल. त्यांकडील बरवेपणाचें वर्तमान सविस्तर लिहावें. रवाना छ० २१ सवाल. बहूत काय लिहिणें (स्वतःची निशाणी मो.) वरकड इकडील वर्तमान राजश्री बाळाजी हरी मांजरेकर सांगतां कळों येईल छ० मजकूर.

लें० नं. २३५ श्री. तारीख २१ माहे मे सन १७९७.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी बावा केरकर स्वामीचे सेवेसीं. सेवक नारायणराव दत्ताजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी क्षेम तागायत छ० २३ जिल्काद मुकाम वानवडी जाणोन. यानंतर आह्मी लष्करांतून रात्रीं आलों. लष्कर सोडून तेरा दिवस जाहाले. तिकडील वर्तमान सर्व सुखरूप आहेत. राजश्री देवजी गौळी यास नगरास आणावयास पत्रें सरकारांतून गेलीं होतीं. लवकरच त्यास आणतील. राजश्री रावजी यासही आणवणेंविसीं सर्व फौजेचा व वरकडांचा आग्रह पडला आहे. त्यास देवजी गौळी आलेवर मागून आठां चौं रोजांत मशारनिल्हेसही आणवितील. ज्या गृहस्थानीं ही गोष्ट केली; त्याचें पारपत्य जाहालें पाहिजे. याजकरितां मतलब साधून यांचें येणें होईल. त्यास ध्यानांत यजमान आहेत. सुचना लिहिली आहे. आपण याजविसीं व वरकडांविसीं व कारकून मंडळीविसीं कोणे गोष्टीविसीं चिंता न करावी. आह्मी एका दों रोजांत आपले भेटीस येतों. भेटीअंतीं सर्व कळों येईल. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. २३६ तारीख २७ मे १७९७.

( ) सेवक भास्करराव जयराम नमस्कार विनंती उपर येथील कुशळ तागायत ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा सौम्यवासर जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष पुण्याहून छ० २५ जिल्काद मंदवारचीं पत्रें ( ) बाळोबा भाऊ व नारायणराव व देवजी गौळी यांसी आणावयाकरितां पाटणकर व प्रीतीजी ( ) गेले होते. त्यास छ० २४ जिल्काद भृगुवारीं प्रहर दिवसास त्रिवर्ग यांस लष्करांत घेऊन आले. सामोरे फौजसुद्धां घाटगे व बाणाजी सेटे व फकीरजी गाडवे एक कोशपर्यंत गेले होते. छत्री पावतों राजश्री शिंदे आडवे जाऊन भेटी जाहल्या. नंतर तिसरे प्रहरीं बक्षीचीं वस्त्रें व शिरपेंच व मोत्यांची कंठी रावजीस दिल्ही. पेशजी प्रमाणें चोपदार व सरंजामसह जे घोडीं सु॥ समारंभें घरीं पोहोंचविले. तुह्मांस कळावें याकरितां लिहिलें असे. भाऊच्या शरीरीं समाधान नाहीं. श्रीकृपेंकरून आरोग्य होईल. शरीरेंकरून उभयतांही कृश जाहाले आहेत. परंतु श्रीनें कृपा करून उठवून आणिलें. पुढेंही कृपा करणार तीच समर्थ आहे. राजश्री राघोबा आंबोणकर मुंमईस गेले होते तेही लष्करांत आले. त्यांचें पत्र येथें आलें होतें. त्यांचे घरीं चिखलीस मुजरद पत्र पाठवून वर्तमान कळवावें. राजश्री बाळोबा तात्या यांसही आणावयाचा बेत आहे. पुढें काय घडेल पाहावें. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. २३७ शके १७२० सन १७९८. श्री. तारीख १५ जून १७९७.

राजमान्य राजश्री साबाजी राम केरकर यांस हुजूरची आज्ञा सकलसौभाग्यादिसंपन्न वज्रचूडेमंडीत

---

१. नारायणराव बक्षी. २. देवजी गौळी यांस सैन्याची समजूत करण्यासाठीं पूर्वी आणिलें होतें; पण नारायणराव यांस आणिल्याशिवाय त्याची समजूत झाली नाहीं. ३. नाना फडणीसांनीं. पत्रें नंबर २३८।२४४।२६६ पहा. ४. तारीख २२ मे १७९७. ५. सरजेराव. ६. दौलतराव. ७. नारायणरावास.

जैवंतीबाई भोंसुले सरदेसाई प्रा माहाल कुडाळ व माहालानीहाय सु॥ समान तिसेन मयां व आलफ. हुजूर वस्ता कार्यास तुह्मांकडून.

३ येलांचे जोड.	१ सरी.	२ सांखळ्यांचे जोड.
२ पाटल्या जोड.	२ तनमनाचे जोड.	२ हरभरवडीच्या माळा.
२ गोट जोड.	३ दोर जोड.	२ कंकण्या जोड.
२ चिंचपटी जोड.	३ पुतळ्यांच्या माळा.	२ चंद्रहार.
५ वेलबाळ्या जोड.	२ गांठलीं.	१ नथ मोठी.
३ दोरे पाल्या लहान व कंकण मुलीचे हातचें.	१ कंठा.	२ गोत्यांचे पेंडे.
		२ लहान सांखळ्यांचे जोड.

येणेंप्रमाणें कागद पावतांच अनमान न करितां पाठवून द्यावा. कार्य उरकलेवर रवाना करून देऊं. कार्य आपले घरचें असें समजोन पाठवून द्यावें. अगत्य अगत्य पाठवून देणें. जाणिजे. रवाना छ० १९ माहे जिल्हेज.

(३१०)

ले० नं. २३८ पै॥ छ० ९ रबिलावल. श्री. तारीख २४ आगष्ट १७९७.

चिरंजीव राजश्री साबाजी यासी प्रती. अंतोबा कवठणकर. अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १ रबिलावल मुकाम वानवडी नजीक पुणें लष्करांत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. यानंतर इकडील वर्तमान तर सर्व मुत्सद्दी कारभारी एकत्र होऊन शिलेदार यांस बक्षिनें[2] मनस्वी लहानास बोल्या[3] लाऊन दिल्या ह्मणून चौकशी मांडली आहे. आण धन्यास[4] समजावून पेंच आणावा या कारस्थानांत आहेत. परंतु धन्याची कृपा आजच्या दिवस पावेतों यथास्थित आहे. तशांत नाना फडणीस यानें बोलणें लाविलें आहे. दिवाण सदाशिव मल्हार व बक्षी या उभयतांस कैद करावें. आणि आपण पन्नास लाख रुपये देतों. त्यास धन्यांनीं कबूल केलें नाहीं. आपले मंडळीपैकीं[5] हे उभयतां शाबूद आहेत. तंव्रवर आपल्या गृहस्थांस जागा आहे. नाहीं तर कळतच आहे. पन्नास लाखांवर नजर दिली तर हा दीसपर्यंत धन्याचें बोलणें. आज हा रुपये देईल. आण आमचे घरीं चार चांगलीं माणसें आहेत; हीं पदरचीं जातील. उद्यां रुपये देतों. हाही कांहीं मागेल ह्मणजे यश घडणार नाहीं. ह्मणून चिरंजीव नारायणरावजींची खातरजमा केली. तूर्त कृपा आहे. पुढें काळवेळ संभोगें कसें घडेल पाहावें. यास्तव आपण श्रीदेवास विनंती करून कौल घ्यावा. पत्र वाचून दुसऱ्यास दखल न करावें. तुमचे शरीरीं कसें आहे तें वारंवार कळवीत जाणें. बहूत काय लिहिणें. तीर्थस्वरूप दादा कवठणकर यांच्या ह्मैसी तुह्मीं आणिल्या हें ठीक केलें. नाहीं तर त्याजकडेस गुत्ता किती तो लिहून पाठवावा. हे आशीर्वाद.

ले० नं. २३९ पै॥ छ० २ माहे रबिलाखर श्री. तारीख १७ सपटंबर १७९७.

सन समा तिसेन मया व आलफ.

चिरंजीव राजश्री साबाजी राम प्रती बाळाजी राम आशिर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० ९

---

१. ह्या बाई सावंतवाडी सरकारच्या राणीसाहेब होत. यांचें नांव आजवर शिरवडें येथील एका मिठागरास चालत आहे. २. नारायणराव बक्षी यांनीं. ३. नोकऱ्या. ४. दौलतरावांस. ५. बाळोबा तात्या वगैरे यांस कैद केल्यावर हेच दोघे काय ते शिल्लक राहिले होते.

रबिलावल जाणोन तुह्मांकडील कुशलतेचें वर्तमान लिहून पाठवावें विशेष. संबा सेट वाणी याजकडे पत्रें व जिन्नस पाठविलेप्रमाणें पावला. व अजमेरचे काशीद याजकडील पत्रें पावलीं. लिहिल्याप्रमाणें त्यांस खर्चास देऊन येथून अस्तीसुद्धां अजमेरीस रवाना केले. (पुढें खासगी मजकूर आहे.)

राजकी वर्तमान तूर्त नानाची मसलत आहे. फौजाही तिकडे आठां चौं रोजांत रवाना कराव्या अशा आहेत. आपला कंपू परांड्याकडे होता तो येऊन पोंचला. पेशजी श्रीमंतांचे हुजराथचे लोक व होळकर व फडके एकत्र होऊन श्रीमंत बाजिराव साहेबांस काढावें. हा इत्यर्थ करून राजश्री मानाजी शिंदे यांस पुढें करून त्याणीं दोनतीनशें स्वार व हजारपांचशें पायदळ आमच्याच गोटाजवळ उतरलें होतें. तेथें ठेविलें होतें. पुढेंही लोक ठेवावे ही मसलत. तेव्हां आपल्या सरकारांतून सांगून पाठविलें कीं, तुह्मीं लोक न ठेवावे. तुह्मीं मात्र पंचवीस स्वारानशीं राहावें. त्याणीं ऐकिलें नाहीं. तेव्हां गोटाभोंवतीं पलटणें व तोफा उभी करून एकदम पाणी कोंडलें. उप्रांत त्याणींही निर्वाणाच्या गोष्टी सांगितल्यावरून बोलण्यांत आलें कीं, तुह्मीं मोंगलांकडे जावें. तेथें आह्मी पत्रें देतों. त्यांणीं न ऐकिल्यास आह्मी तलब भरून देऊं. याप्रमाणें ठरावून त्यांची रवानगी तिकडे केली. मूल व बायको येथें ठेवून घेतलीं. हें मानाजी ( ) चे जाहाल्यावर वरकडही जेथील तेथें दबून राहिले. राजश्री परशरामभाऊ राजश्री तात्या एक विचार.... हे आधादि...

लें० नं. २४० तारीख ७ माहे सपटंबर १७९७.

( ) विशेष. तुह्मीं छ० १५ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. राजश्री वेंकबा मळगांवकर यांचे सुटकेविसींचा पर्याय लिहिला त्यास येथून हल्लीं सरकारचीं निकटीचीं पत्रें व राजश्री बाबा फडके यांचीं व फिरंगी याजकडील वकिलांचीं अशीं परभारें खिजमतगार याजकडेस देऊन तिकडे रवाना करून देवितों. या प्रसंगीं काम होऊन येईल असें आहे. राजश्री देवबा लाड पांडोबा लाड यासही सरकारांतून गैरमर्जी होऊन कैद आहेत. या घालमेलींत पत्र पावतांच सुटोन यावा असें आहे. ( ) न देऊं. तुमचीं पत्रें आलीं तींच तीर्थस्वरूप बापूकडेस पाठविलीं आहेत. येथून काय उत्तर येतें हेंही कळेल. चिरंजीवाचे सोयरिकेचे राजश्री गोंदबा कोचरेकर याच्या मुली आहेत ह्मणून लिहिलें. परंतु त्या मुली लहान आणि डोळे घारे याजकरितां जाईची मूल दाहा वर्षांची व चांगली सुंदर बहूत आहे. ह्मणून एका दोगांनीं सांगितलं. परंतु रुबरु पाहिल्याशिवाय काय कळेल? त्यास तुह्मीं पाहावयास पाठविला आहे. ह्मणोन लिहिलेंच आहे. चांगली असली आण ( ) सारांश. मूल चांगली पाहिजे. आणि थोरही पाहिजे असें आहे. लग्न कोंकणांतच करावयाचा निश्चय जाहाला आहे. हिंदुस्थानांतूनही मुलेंमाणसें येतील. दाण्यादुण्याची बेजमी हंगामशीर करून ठेवावी. येविसींचें पेशजीं लिहिलेंच आहे. काशीद येथून जातात. त्यांस फिरून यावयास बहुत रोज लागतात. तर पोंचतांच उत्तर देऊन रवानगी करावी. येथील वर्तमान राजश्री तात्या पागनीस व बाजीबा मोदी यांस कैद केल्याचें पेशजीं लिहिलेंच आहे. ( )

---

१. हे लखबा दादांचे घरचे. २. हे गोवें प्रांतीं वागाळी येथें राहणारे लखबा दादा लाड यांचे भाऊबंदांपैकीं होत.

ले० नं. २४१ छ० १७ शाभान. श्रीशंकर. तारीख २८ सपटंबर १७९७.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें विश्रोमानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आश्विन शु॥ ८ मुकाम अजमेर येथें आपले आशीर्वादें सुखरूप असों विशेष. वडिलांकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. याजवरून चिंता वाटती. त्यास आशीर्वादपत्रीं संतोषवीत जावें. यानंतर इकडील वर्तमान तरी अजमेर प्रांतीं रांगड्यांनीं दंगा बहुतच केला. भिणायेहून राजश्री रामबा भाऊ मांदरेकर यास धरून नेलें. हा मजकूर वडिलांस कळविलाच होता. त्यावरी तीर्थस्वरूप बापू याजकडून फौज पलटणें आलीं तेव्हां रांगड्यांचें पारिपत्य होऊन रामभाऊस सोडवून आणिलें. त्यास दोन महिने जाहाले. सुखरूप आहेंत. पुढें भिणाये परगणेची वसणूक जाहाली पाहिजे. याकरितां रांगड्यांशीं सलूख करून सर्वत्रांस खातरजमा देऊन आणावयाचें केलें. कित्येक ठिकाणीं येऊन बसले. कित्येक येत आहेत. रामभाऊचा विश्वास रांगडेस पडत नाहीं. यास्तव सध्यां बंदोबस्ताकरितां दुसरा कारकून भिणायास पाठविला आहे. रामभाऊ येथं आह्मांपाशीं आहेत. रांगड्यांच्या दंग्यामुळें लाखों रुपयांची नुकसानी जाली. व शिबंदीच्या पेंचाखालीं आलों. मागील वडिलांचे वेळेचें कर्ज सावकाराचें देणें त्याचा तकादा. व पुढें शिबंदीस खर्चास दिलें पाहिजे त्यास ठिकाण नाहीं. ऐसे नाना प्रकारचे पेंच येऊन पडले आहेत. ते कोठवर लिहावे. या अर्थी घरीं कांहीं खर्चास पाठवावयाची सोय घडोन आली नाहीं. मागील देणेंचा तगादा पहिला होताच. त्या—( )

ले० नं. २४२ पै॥ छ० १२ जमादिलावल. श्री. तारीख १ अकटंबर १७९७.

चिरंजीव राजश्री साबाजी प्रती बाळाजी राम आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १ ( ) मंत चिमापास घेऊन गेले ते जुन्नरास आहेत. फौजाही मागां आहेत. श्रीमंत बाजिराव साहेब पुर्णेस येतील व श्रीमंत नानाही यावे असें आहे. पुर्णेचा बंदोबस्त तूर्त राजश्री बाबों फडके यांचे स्वाधीन आहे. काल पागनिसाचीं घोडीं व चीजवस्त सरकारांत आणिली. पुढें मसलत काय ठरून कोणत्या थरास पावती हें पाहावें. राजश्री रायोंजी पाटील कारभार करीत आहेत. तुमच्या शरीराचें वर्तमान लिहीत जावें. हे आशीरवाद.

ले० नं. २४३ श्री. तारीख २९ अकटंबर १७९७.

राजमान्य राजश्री साबाजी राम केरकर यांस हुजूरची आज्ञा. सुरु सन समान तिसेन मयां व आलफ. राजश्री नारायेणराव जिवाजी व विसाजी माहादेव यांचीं पत्रें सरकारांत आलेलीं, तुह्मांकडेस पाठविलीं होतीं त्यावरून सरकारच्या काजाकामाचा मजकूर तुह्मांस समजलाच आहे. त्याविसींचीं उत्तरें दिलीं पाहिजेत. त्यास तुह्मांस हुजूर येणेंविसीं लिहिलें होतें. परंतु औषध चाललें आहे. तेव्हां तूर्त यावयास घडत नाहीं. मसुदे करून पाठवावे. त्याप्रमाणें पत्र लिहून पाठवूं ह्मणून लिहिलां त्यास मसुदा धरून आलाइदा पाठविला आहे. तो समजोन त्याप्रमाणें पत्रें राजश्री

---

१. जिवबादादांचे वडील बंधु नरोबा दादा घरीं होते, त्यांचा हा मुलगा. हा त्याचे जहागिरीचे ठिकाणीं जावद येथें राहात असे. २. जगोबा बापू. ३. अजमेरीनजीक भिड ह्मणून प्रांत आहे तो. ४. हरिपंत फडके यांचा मुलगा. ५. ग्रांट डफचा इतिहास पहा. हे रायाजी पाटील कांहीं दिवस कारभार पाहात होते. ६. जिवबादादांचे चिरंजीव नारायणराव बक्षी.

बाळाजी राम व नारायणराव यांचे नांवें लिहून पाठवावीं. जासूद जोडी सरकारची तयार जाली आहे. पत्रांत तुह्मीं आपले हातें अगत्यवादें लिहावें. तुमचे शरीरीं तूर्त कसें आहे तें लिहिणें. खासा स्वारी तूर्त वठवणेस आली आहे. जाणिजे. रवाना छ० ८ जमादिलावल मा॥.

ले० नं. २४४ पै॥ छ० २१ रजब सन समान. श्री. तारीख १ जानेवारी १७९८.

चिरंजीव राजश्री साबाजी यास प्रती अंताजी रघुनाथ आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १३ रजब पावेतों मुकाम वानवडी नजीक पुणें येथें सुखरूप असों विशेष. तुह्मांकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी असें न करावें. येणाराबरोबर पत्र पाठवून बरवेपणाचें पत्र लिहीत जावें. चिरंजीव मुलानें पत्र छ० १ रजबचें पाठविलें. त्यांत मजकूर कीं; इंग्रजांचें जाहाज नस्तावर आलें. गडबड होईल कीं काय तें कळेना. ह्मणोन लिहिलें. त्यावरून चिंता प्राप्त जाहाली आहे. त्यास तेथील सविस्तर वर्तमान लिहिणें. इकडील वर्तमान नाना फडणीस आबा सेलुकर व दादा गद्रे व बाजाबा शिरवलकर वगैरे आणखी पांच चार असामी काल आदितवारीं पोष्य शु॥ १४ आपले यजमान श्रीमंत शिंदे यांसीं बोलावयासी आले होते. तेथेंच धरून कैद केलें. आण शहरच्या बंदोबस्तास फौज घेऊन चिरंजीव राजश्री बाळोबा गेले. व नानाकडील आणखी शहरांतील असामी कैद करावयासी पलटण देऊन (३) रायाजी पाटील याचा यायी पाठविला. बहूत रोज नानास धरिला असता; परंतु शहर लुटलें जाईल. अगर लढाई पडल्यास लोक पडतील. किंवा नाना हिरकणी खाऊन जिवंत हातास लागणार नाहीं. यास्तव युक्तीचे ४ वाटेनें लोक जायां न होतां कैद केला. त्याच घटकेस राजश्री बाळोबा तात्या पागनीस यांस ५ आवयास हुजूर गेले. नाना फडणीस हातास लागावयाकरितां आधीं एक रोज सदाशिव मल्हार ६ दिवाण यांचे घरीं चौकी बसविली. आण पुढां आणखी सत्तावीस असामी कैद आपले यजमानाकडील करावी. ऐसा ठराव होऊन दिवाण कैद होतांच भरंवसा पटोन आला होता. पुढां कसें होईल त्यासारखें लिहून पाठवूं. बहूत काय लिहिणें. हे आशीर्वाद. आपले जातीवर किंतु होता. ईश्वरें निवारण केला. कळावें हे आशीर्वाद.

ले० नं. २४५ पै॥ छ० १८ माहे शाभान श्री. तारीख १७ जानेवारी १७९८.
सन तिसां तिसेन.

चिरंजीव राजश्री साबाजी यांस प्रती—अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २९ रजब मु॥ सैने नजीक घोडनदी लष्करांत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. आलीकडेस तुह्मांकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर ऐसें न करितां येणाराबराबर पत्र पाठवून बरवेपणाचें वर्तमान लिहीत असावें. यानंतर इकडील वर्तमाम पेशजींचें त्यास हलकारा याजबरोबर पत्रीं लिहिलें तें कळलेंच असेल. त्या आलीकडेस सांखवळकर गृहस्त रात्रीचा निघोन गेला. मोंबईकडेस ह्मणोन बोलतात. कोण कोण पंढरपुराकडेस ऐसें ह्मणतात. परत लष्करांत कोणास दर्शन न होतां निघोन गेला. आणखीही कितेक जातील. तुमच्या पुतण्यास सोबत शिक्षा चांगल्याची आहे. तव्हां या लष्करांत राहावें याचें ठीक नाहीं. ऐसें लोक बोलतात. चुलत्यांची अन्न ६ घ्यावयास चुकत नाहीं. हा दुसरेचें काय बरें करणार. ऐसें

१. रेडीच्या यशवंतगड किल्ल्यानजीक समुद्राच्या किनाऱ्यावर आलें. २. तारीख ३१ दिसेंबर सन १७९७ रविवार. ३. येथें कंपू असा शब्द व तो ज्यानें पाठविला, त्याचें नांव असावें. ४. यावरून नाना फडणिसाचा फार त्रास होत होता असें दिसतें. ५. नारायणराव बक्षी. ६. दौलतराव शिंदे.

उघड बोलतात. मोदे असतील त्याणें येथें राहावें. परंतु तुमचे बंधु लष्करांत जवपर्यंत आहेत तवपर्यंत लोकांस भरवसा आहे. शिलेदार लोक व सरदार सर्व ह्मणतात कीं, जे दिवसीं हो निघेल ते दिवसीं सोधा असेल तो यांजबरोबर राहिल ह्मणतात. याणें येथून निघावें तर श्रीमंत बायांची सर्वच मसलत बुडेल. यास्तव निघतां नये. ह्मणोन ह्याच्या आज्ञेवरून राहिलों. नाहीं तर येथें राहावें याचा धर्म कांहीं राहिला नाहीं. ताई बिचारी रडून दिवस काडती. एक वेळ आपणास रवाना करोन मग हे चित्तास वाटेल तैसें करोत, ह्मणती. याप्रमाणें येथील वर्तमान आहे. कांहीं करोन श्रीदेवाकडेस विनंती करोन सोबतीचे मोदे यांचें पारपत्य जलदी श्रीनें केलें तर कांहीं दिवस एक जागां राहाल. नाहीं तर महिने पनरा रोजांत काय करितील कळेना. ऐसें येथील वर्तमान आहे. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले० नं. २४६ पै॥ छ० २ शाबान सन समान. श्री. माहे जानेवारी १७९८.

ता० २० जानेवारी १७९८ शनिवार.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेसीं. सेवक सको रंभाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत पोष्य वद्य ( ) जाणोन आपणाकडील बरवेपण लिहित असावें. विशेष. सांप्रत आपले शरीरीं कसें आहे तें लिहावें. इकडील मजकूर. राजश्री नाना फडणीस यांजला व त्याचे कारभारी यांजला श्रीमंत महाराजांनीं कैद केलें[४]. ( ) वगैरे सरंजाम सरकारांत आणविला. मामलतीवर जैसी गेली. पुणेचा बंदोबस्त येथूनच होतो[६]. नंतर आणखी नानाचे तर्फेचे पांचपन्नास मंडळी होती. त्यांसही धरून कैदेंत ठेविली होती. मिरजेवाले यांजला सांगावयाविसीं बोलणें लागलें. त्याजलाही आणितील. राजश्री मोरोबा फडणीस यांसही आणितील. पांचचार रोज पुणेंत फारच बेदा पडला होता. थोडेबहूत पेठाही लुटल्या गेल्या. नाना फार खबरदार ह्मणे. परंतु श्रीमंत माहाराजांच्या प्रतापापुढें नानाचें कारस्थान राहिलें. कैदेंत ठेविला तेथें पलटणा व स्वार, पागा ठिकाणीं बंदोबस्त करून ठेविला. वरकड नानाचे कारभारी यांजलाही कैदेंत ठेविले. आणखी धरून आणिले शेंदोनशें असामी धरून ठेविले. एक नानाचे तर्फेचा चुकला नाहीं. सर्व प्रांतांत मोंगल टिपु सुलतान ( ) श्रीमंतांची स्वारी येथें आली होती. आणखीही येईल. येथून महाराज जसा बंदोबस्त करून देतील, त्याप्रमाणें होईल. सौभाग्यवती रखमाबाईस राजश्री भाऊनें कोंकणांत रवानगी केली होती. ( ) अशी कळल्यावरून जेजूरीहून माघारी आणविली. पुणेंत नानांनीं आरब दहा हजार आणिले. ते अवघे नानाचे आवडते होते. त्यानीं कांहींकाचे पेटा लुटल्या. आरब यांस निघून जाण्याविसीं सांगितल्यावरून थोडे निघून गेले. बाकी आहेत तेही निघून जातील. वरकड सर्व बंदोबस्त उत्तमच आहे. आपल्यास कळावें. तेथील इंग्रजे व फिरंगी यांचा जोरा सांगतात. तूर्त कसा आहे तें लिहावें. करवीरकर

१. जगोबा बापू. २. नारायणराव बक्षी. ३. नारायणराव बक्षी हे बायांच्या पक्षास आपण होऊनच मिळाले नव्हते. तर त्या आपला धनी महादजी यांच्या बायका असून, त्यांनीं आपल्यास त्रास पोंचतो, ह्मणून आज्ञा करून ठेऊन घेतल्यामुळें ते त्यांच्या पक्षास सामील झाले होते, असें या पत्रावरून उघड दिसून येतें. ४. ता० ३१ डिसेंबर १७९७ रविवार. ५. जहागिरीवर. ६. पेशव्यांचा कारभार दौलतरावांकडून होतो. ७. परशरामभाऊ पटवर्धन मिरजकर यांस. ८. मोरोबा फडणीस, यांस नाना फडणिसानें पूर्वीच कैद करविलें होतें. ९. इंग्रज व गोव्याचे फिरंगी यांस पेशवाईंतील व शिंदेशाहींतील आपसांतील अशा प्रकारच्या तंट्यांचे वेळीं राज्यें मिळविण्यास चांगलेंच फावलें होतें.

यांचा तर भय नाहीं. मिरजकर[१] येतील असें बोलणें लाविलें आहे. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

लें० नं. २४७ शके १७२० सन १७९८. श्रीशंभु. माहे जानेवारी १७९८.

राजमान्य राजश्री साबाजी राम केरकर यांस हुजूरची आज्ञा. सुरू सन समान तिसेन मयां व आलफ. राजश्री भवानजी घांटगे झुंजारराव बुदास असतात. त्याचे घरीं चिरंजीव बाकू दिली आहे. त्यास पुणेंहून त्याजकडेस कांहीं उपद्रव लागला आहे. त्याविसीं सरकारचीं पत्रें लष्करांत पाठवितों. त्यास तुह्मीं आपलीं पत्रें अगत्यवादें यथास्थित लिहून पाठवावीं. पत्रांतील अन्वयें तुह्मांस समजावा यास्तव पाठविलीं आहेत. तें ध्यानीं आणोन तुमचीं पत्रें ज्यांत तें काम घडे अशीं जलदी लिहून पाठविणें. रवाना छ० १ माहे रमजान चंद्र मजकूर.

लें० नं. २४८ पै॥ छ० २२ माहे जिल्काद सन श्री. तारीख ५ मार्च १७९८.

तिसां तिसेन मया आलफ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री काशिबा आना व राजश्री रामबा आपा स्वामीचे सेवेसीं. सेवक रावजी रांगणेकर साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ० १६ माहे रमजान मुकाम मयाच प्रांत मेवाड जाणोन स्वकीय कुशळ लिहि ( ) होते. मग हें वर्तमान बाळोजीस कळलें कीं; ( ) जागीं सावध होतेत. मग बाळोजी इंगळे वगैरे चढून आले. तेव्हां हे हजार स्वार व साहा तोफा घेऊन पळून गेले. ते वेळेस बापूकडले लोक व हरबा बापू व येशवंतराव शिंद्या वगैरे आपसांतच लुटावयासीं लागले. तेव्हां बापूस पक्कें कळलें कीं फितूर आहे[२] मग गुजराथीमधें पळून गेले. मग हें वर्तमान राजश्री दादांस कळलें. नंतर बाबुराव दत्तू याच्या लेकाबरोबर दोन हजार स्वार देऊन पाठविले. ते परभारें जावदेस आले. बापूस कांहीं मिळाले नाहींत. मग तेथून—( )

लें० नं. २४९ श्री. तारीख १० मार्च १७९८.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २१ रमजान मुकाम मान नदी वर्तमान यथास्थित असे विशेष. आपले शरीरीं फार समाधान नाहीं ह्मणून पत्रें व माणसें आलीं त्याणें सांगितलें. फार चिंता लागली. त्यास येथें इंग्रेज[३] वैद्य पलटणांतील आह्मांबरोबर आहे. त्याणें आपण प्रतिज्ञेन बरें करीन ह्मणोन सांगतो. त्यास तुह्मीं श्रीचा प्रसाद घेऊन राजश्री भाऊ कोटणीस स्वार पंचवीस देऊन पाठविला आहे. त्याबरोबर यावयास यावें. इकडील वर्तमान. श्रीमंत राजश्री राजे करवीरकर आठां कोशीं आहेत. भेटी उदयीक होणार. स्वारांस आजेरेस राहाणेंविसीं सांगितलें आहे. खर्चास पंधरा रोजांची बेजमी केली आहे. जलदी यावें. त्यास जाणेविसीं फारच सांगितलें. परंतु खालीं आपण जाणार नाहीं; असें ह्मणतो. पुणें स्थळीं जाणार. तेव्हां तुह्मीं जलदी यावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१. बाकूबाई ही खेमसावंत राजे यांची मुलगी बुधच्या घांटग्यांचे येथें दिली होती. इचें नांव शिरवडें पथील एका मिठागरामुळें प्रसिद्ध आहे.' २. लखबादादा लाड. ३. महादजी व दौलतराव यांचे सैन्यांत पोर्तुगीज व फ्रेंच यांजप्रमाणें इंग्रज लोक सुद्धां होते.'

लेख नं. २५० श्री. तारीख १० मार्च सन १७९८.

तीर्थस्वरूप राजश्री साबाजी मामा वडिलांचे सेवेसीं.

बाळकें लक्षुमणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ तागायत छ० २१ रमजान मुकाम वानवडी नजीक पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. वडिलांकडील बहूत दिवस आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास हल्लीं छ० ४ रमजानचें आशीर्वादपत्र पाठविलें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें. अद्यापी शरीरीं निखालस आराम नाहीं; ह्मणोन लिहिलें त्यावरून चिंता जाहाली. त्यास निखालस आराम जाहलेचें लिहावें. इकडील वर्तमान अधिकोत्तर लिहावा ऐसा नाहीं. दोनही लष्करें एकीकडेस जाहालीं. सडे फौजेचे शिलेदार आहेत. त्यांचें कामकाज सर्व ती॥ राजश्री भाऊ मनास आणितात. व हुजूरचे शिलेदार यांजकडील कामकाज रावजी करीत आहेत. कळावें. सर्व इकडील भाऊनें लिहिलेवरून विदीत होईल. राजश्री यशवंतरावजी वागळे यांची सुटका जाहाली. सोनकस व वेळा वगैरे माळवे प्रांतीं महाल आहेत ते यशवंतराव शिवाजीकडेस सांगितले. काल वस्त्रें जाहालीं. हांडेची मामलत पुढले सालीं सांगावी; ऐसें ठरलें आहे. राजश्री देवबा लाड याचीही सुटका जाहाली. कळावें. ग्रहस्त व परूळेकर याचेंही पूर्ववतप्रमाणें होईल ऐसें आहे. धन्याचे चित्तीं आहे. तेव्हां होईल ऐसें आहे. वडिलांस कळावें. राजश्री तातोबा आरंवदकर यास पोतनिशीकडील चौकशी सांगीतली आहे. कळावें. तें काम चांगलेंच आहे. तें काम त्याजकडेस राहिलेस फारच आपले गृहस्तांचें चांगलें आहे. कळावें. रात्रदिवस आपली चिंता आहे. त्यास आराम जाहालेचें लिहावें. आमचे रोजगाराचें कैसें जाहालें तें लिहिणेंविसीं आज्ञा त्यास सध्यां तर शिलेदाराचे कबजाचें काम व लिहिणें आह्मांकडेस आहे. वेतन अद्याप नाहीं. रावजी मनावर घेतील तर घडोन येईल ऐसें आहे. परंत आमचे लाभतकाळाप्रमाणें त्यास ही वासना येत नाहीं. पुढें कैसें होईल पाहावें. ती॥ राजश्री रामभाऊ माद्रेकर भिणावेस होते. तेथून रांगडे याणीं धरून नेलें. ह्मणोन आजच एकंदरींतून लिहिलें आलें होतें. आणखी तर कोणाचे कागद नाहीं. परंत एकंदरींतून लिहिलें आलें होतें. पुढें कैसें होईल त्याप्रमाणें लिहितों. हे विज्ञापना.

लेख नं. २५१ पै० छ०९सवाल सन तिसां. श्री. तारीख २१ मार्च १७९८.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेसीं. सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० २ सवाल पावेतों सुखरूप असों विशेष. आपणाकडोन सांप्रत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून चिंता वाटती. तर तुह्मीं आपणाकडील शरीरभावनेच वर्तमान वरचेवर लिहून चिंता निरसन करावी. इकडील वर्तमान तर करवीरकर महाराज यांच्या भेटी आज जाहाल्या. प्रातःकाळीं रावजी भेटावयास गेले होते. समागमें आरवंदेकर मंडळी गेली होती. मागील बंदोबस्तास भाऊ राहिले होते. संध्याकाळीं भाऊ गेले. समागमें गोंदबा नाबर गेले आहेत. अद्यापि आले नाहीं. प्रातःकाळीं बोलणीं होऊन येतील. वरकड कांहीं अधिकोत्तर नाहीं. माळवेंत ती॥ राजश्री बापू व राजश्री लखबादादा यांची व बाळोजी इंगळे यांची एका दोन रोजीं लढाई होणार आहे. असें वर्तमान आहे. ईश्वरकृपे-

करून व माहाराजांचे पुण्यप्रतापेंकरून[1] इंगळे यांचें पारपत्य होईल. चिंता नाहीं. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

ले० नं. २५२ पै॥ छ० ९ सवाल. श्री. तारीख २१ मार्च सन १७९८.

चिरंजीव राजश्री साबाजी यांजप्रती बाळाजी राम केरकर. अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २ सवाल मुकाम जत जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष. बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी वरचेवर सविस्तर लिहिणें. इकडील वर्तमान माहादेवाच्या घांटाखालीं राजश्री निंबाजी शिंदे समेटाच्या बोलण्याकरीतां आले होते. त्याचे माना बानवडीकर ( ) लतांच शिंदे मजकूर यांची रवानगी केली. कीं तुह्मीं बोलाविण्याकरितां आलेत. तुमचे मागां पलटणें यावयास कारण. तेव्हां लागू गोष्ट करून शिंदे मजकुरांस, निरोप देऊन तेथून दरकूच येथें आलों. पुढां येथें करवीरकर यांचें व आमचें एकचित्त होऊन उद्यां दोनप्रहरीं भेटी होतील. भेटी जाल्यानंतर सडी फौज करून माघारें उलटावें; ही योजना आहे. आपलेकडील लोकांचीं मुलेंमाणसें घरीं आहेत. त्यांस घरामारी करितात. याजकरितां जलदी माघारें उलटूं ही तजवीज आहे. कळावें. यशवंतराव[2] शिवाजीही येऊन सामील जाले. हिंदुस्थानाकडील वर्तमान उभयतां सरदार येकत्र होऊन बाळोजी इंगळे यासीं लढाई घेणार आहेत. आजच एक हार आली. त्यांत लिहिलें कीं; बाळोजी इंगळे याजवर चढाव करून गेलों. आण इंगळे यांस चौंकडून घेरून जरबींत आणला आहे. सकाळच्या दोन घटका दिवसास तोफा लागू केल्या. त्या तिसरे प्रहरपर्यंत चालत होत्या. ह्मणोन एकंदरींतून वर्तमान आलें आहे. उद्या परवां फत्ते जाहाल्याचें वर्तमान येईल. चिंता नाहीं. झाडून हिंदुस्थान ( ) मान करवी व मुलुखांत धुंदी केली आहे. बाळोजी इंगळे व अंबाजीचा मूल मथुरेहून आला. तो एकत्र आहे. आपली फौज तेथें विपूल आहे. चिंता नाहीं. छळीचा पारपत्य करतील. चिंता नाहीं. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. बहूत काय लिहिणें हे विनंती.

ले० नं. २५३ श्री. तारीख ८ एप्रील सन १७९८.

राजश्री साबाजी काका स्वामी गोसावी यांसी

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्त्रां संभाजी सिंदे प्रा जानेफ पुरी प्रांत मिरज दंडवत विनंती विज्ञापना ऐसीजे. आपले कृपेंकरून वर्तमान तागायत छ० २० माहे सवाल पावेतों यथास्थित असे विशेष. आह्मीं लष्करांतून येऊन दोन महिने जाहले. लष्करचें वर्तमान तर. लष्कर चंदेरीवरी सोडिलें. भाऊ व बापूसाहेब व यशवंतराव भाऊ हे सर्वत्र सुखरूप आहे॥ बाळोजी इंगळ्यांची लढाई होऊन त्याजकडील तोफा वगैरे सरंजाम घेतला. आणि राघोगडवाला व दुरजनसाल व लखबादादा मिळून नरवराकडे कुच करून गेले. आह्मी निरोप घेऊन माघारे घरास आलों. जाते समयीं आपला निरोप घेऊन जाऊं. बहूत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विज्ञापना.

ले० नं. २५४ श्री. तारीख ७ जून सन १७९८.

चिरंजीव राजश्री मूल व बाबा यांसी प्रती अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २१ जिल्हेज मुकाम नजीक थेऊर श्रीमंत मातोश्री बाबाच्या लष्करांत जाणोन

---

१. माधवराव महाराज शिंदे यांचे पुण्येंकरून, त्यांचेवर सर्वांची भक्ति असे. २. यशवंतराव भाऊ राजा.

स्वकीय कुशल लेखन करीत जाणें विशेष. तुह्मांकडून बहूत दिवस पत्र येऊन बरवेपणाचें वर्तमान कळत नव्हतें. तेणेंकरून चिंता वाटत होती. [1]त्यास हल्लीं छ०६ रजब व छ० १० रोज येऊन दोनही पत्रें ( ) याजबरोबर पत्रें आलीं. तेणेंकरून सविस्तर वर्तमान लिहीत जाणें. यानंतर इकडील वर्तमान श्रीमंत दौलतराव व श्रीमंत पाटीलबावा सिंदे यांच्या बाइका या उभयतांमध्यें विपरयास येऊन बायांस काढून दिल्या. अबरू घेतली. तेव्हां कोरेगांवचे मुक्कामींहून मुजाफर खान पठाण यानें आडवा जाऊन काढून घेतलें. दुसरे तिसरे रोजीं फौज पलटण तयार होऊन पठाण याचें पारिपत्य करून बायांस काढून द्याव्या. आण बायांचें पुरतें पारिपत्य करावें. तेव्हां लढाईचे समयीं बायांनीं ढालतरवार संभाळून हत्तीचे हवदेंत बसून लढाईस उभ्या राहिल्या. तेव्हां आलीकोठ मराठी फौज एकवटून बायांकडे आह्मीं लढणार नाहीं ह्मणून निघाले, आण बायांपाशीं गेले. तेव्हां सर्जेराव घांटगे व फकीरजी गाडवे दौलतराव याजपाशीं जाऊन नारायणराव बक्षीचें डोकें मारावें. तर ठीक आहे. नाहीं तर ठीक नाहीं. असें समजाविलें. तेव्हां तोफेचे तोंडीं द्यावा, किंवा डोकें मारावें ? ऐसा ठराव करून फौजेंत पत्र पाठवून बोलाविला. हें वर्तमान कळतांच चिरंजीव निघून बायांकडे आला. मागून सर्व मुलेंमाणसें व चिरंजीव बाळोबा व देवजी गौळी ऐसे रात्रीचे निघून आले. व आमची चीजबस्त आह्मीं पुणेंस नेऊन ठेविली. वरकड तेथेंच पुणेस आहेत. साबाजी मात्र आजपर्यंत वानवडीस आहे. तेथील रागरंग पाहून निघल. तेव्हां निघोन लग्नाकरितां खर्चास पाठविणें ह्मणून लिहीत गेलां. ते कागद साबाजीस दाखवीत गेलों. त्याचे मर्जीस येईल तसें करो. हल्लीं या घालमेलींत त्याचे हातें खर्चास पोहोंचतें हें कळतच आहे. पेशजीं साबाजी घरीं जातां माझे नांवचीं खतें सुटत नाहींत. आण तुह्मीं तेथें लोकांचें कर्ज काढून दिल्हें ह्मणून लिहिलेंत. हें तुह्मांस कोणी करूं सांगितलें. मागां साबाजीनें तुह्मांस पत्र लिहिलें होतें कीं सोहिरोबा रुपये मागेल तर पैसा न देणें आण सोहिरोबास लिहिलें कीं तुजकडून पैसा न घेणें. ऐसें असतां तुह्मांस लटका बखेड्यांत पडावें. ही बुद्ध कोणी सांगितली. आह्मी वडीलपणीं करावयास गेलों; ते फजीत पडलों. भाषण देखील आह्मांशीं नाहीं. ऐसा प्रकार आहे. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले० नं. २५५ पै॥ छ० २ माहे मोहरम श्री. तारीख ७ जून १७९८.
तिसां तिसेन.

चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती बाळाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० २१ जिल्हेज मुकाम नजीक थेऊर जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. इकडील वर्तमान आह्मी नगराहून आल्यावर श्रीमंत मातोश्री बायांची रवानगी जबरदस्तीं नगरास यजमानानीं केली. त्याचा मुकाम कोरेगांवीं होता. समागमें बाबाजी पाटणकर होते. तेव्हां मुजाफरखान वगैरे पांच हजार फौज घेऊन पाटणकर याजला हाकून आपले गोठांत घेऊन गेले. ते फौज व पलटणें व चिरंजीव रावजीस व घांटगे यांस त्याच्या पारपत्यास पाठविले. तदनंतर श्रीमंत मातुश्री बाई हत्तीवर बसून लढावयास आलीं. हें पाहोन फौज उठोन बाईसाहेबांकडे मानकरी दरोबस्त गेले. तेव्हां यजमानानीं मसलत केली जे. फौज गेली ही बक्षीचे मतें गेली. तेव्हां यांचें डोकें

१. आटोकाट, सर्व. २. ही मंडळी नारायणरावांस ठार मारण्याविषयींची पुष्कळ दिवस मसलत चालवीत होती, व दौलतरावांसही तसें करण्याविषयीं भुरळ पाडीत होती. ३. नारायणराव बक्षी यांस. ४. सरजेराव घांटगे यांस.

मारावें. अशी तजवीज केली. तेव्हां जीव जगवावयास कोठें ठिकाणा नाहीं. ऐसें जाणोन रात्रीस मुलांमाणसांस पालखींत घालून चिरंजीव रावजी सुद्धां श्रीमंत मातोश्री बाई साहेबांकडे रवाना केली. आह्मीं दोन दिवस चिरंजीवास आणतों ह्मणून वानवडीस दम खाऊन राहिलों. परंतु त्याची मर्जी मारावयाची. तेव्हां आह्मीही एक रोज रात्रीं निघोन आलों. तेव्हां येथें आणखीही तेथोन फौज उठोन आली. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब यांजकडे येऊन भेटोन त्याचा आपला एक विचारें कोरेगांवाहून कूच करोन मुकाम मजकुरीं आलों. आपली फौज पंधरा हजार आहे. व श्रीमंत यांची आठ हजार असे एकत्र आहों. वानवडीस कंपू दोन व फौज तीन हजार आहे. त्याचे समागमें फौजेचा भरणा नाहीं. परंत पलटणचा भरणा तरी आहे. पुढां ईश्वर काय करितो पाहावें. ती॥ बापू व चिरंजीव विश्राम व यसबा सर्व सुखरूप आहेत. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २५६ श्री. माहे जून १७९८.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री काका स्वामीस.

साष्टांग नमस्कार विनंती. घुरा याजबराबर पत्र पाठविलें पावलें. लिहिला मजकुर कळों आला. रामचंद्र कासकर याचे हुंडीबरोबर बाबशेट सडवलकर यास सांगावें ह्मणोन लिहिलें. त्याप्रमाणें सडवलकर यास सांगतों. आपले हुंडीचा ऐवज मुदतीस देतों ह्मणून सांगितला. त्याप्रमाणें घेऊन पाठवितों. आह्मांस एक दिवस श्रीच्या दर्शनास येण्याविसीं आपण आज्ञा केली. त्यास पेशजींच्या पत्रांत आपली आज्ञा आली त्यावर यावें हाच हेत धरिला होता. परंत योग घडला नाहीं. आतां आपण आणखी आज्ञापत्र पाठविलें त्यास श्रीमंतांसीं विनंती करून निरोप घेऊन येतों. आपण शिमगा किती दिवस करणार ती आज्ञा लिहावी. त्याप्रमाणें मग श्रीमंतांसीं विनंती करून येतों. आपली आज्ञा आली; तेव्हांच उठोन यावें. त्यास येथें आह्मांस अधिकारी करून दिल्हा आहे. त्याचे आज्ञेशिवायी जातां नये. यास्तव दिवसगत लागती. हालीं घुरा याजबरोबर चंद्रजोती १०० शंभर व खिलखिल एक व फुगे ५ पांच पाठविले आहेत. व फटकी अर्धशेर व पापडखार अर्धशेर पाठविण्याविसीं लिहिलें. त्यावरून पाठविला आहे. कळे व तूर पाठविल्याची यादी आलाइदा पाठविली आहे. त्याप्रमाणें पोहोंचतील. तुरीस व कळेस रोजचीं दोन माणसें पाठवावीं लागतील. फाल्गुन शुद्ध नवमीचीं पत्रें पुणेंहून आलीं, पौर्णिमे दिवशीं वाडीस आलीं. त्यांतील वर्तमान. श्रीमंत राजश्री सिंदे माद्रीवरून कूच करून वानवडीस आले. मोंगल व भोंसुले पहिल्या मुकामाहून पुढां नदीचे कांठीं उतरले आहेत. कंपू व पलटण मधें ठेवलीं आहेत. श्रीमंत त्रिवर्ग पुणेंत आहेत. यांजकडेस बंदोबस्त आपलेकडील देवजी गौळी याचे स्वाधीन. शहराचाही बंदोबस्त देवबा गौळी याचे स्वाधीन. राजश्री नाना बेल बागींत आहेत. नानाकडेस पेशजी पैकीं ऐवज बाकी होता. त्यापैकीं पंचवीस लक्ष रुपये तूर्त निशा वानवले सावकार याची करून दिली. मोंगल भोसले यांस निरोप द्यावा या प्रों आहे. आपणास कळावें. हें पत्र वाचून बंदोबस्तानें ठेवावें. लोभ करावा हे विनंती.

लें० नं. २५७ पै॥ छ० २८ मोहरम अकबरहा. श्री. तारीख २८ जून १७९८.

वडिलांचे सेवेसीं अपत्याचा साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आषाढ शु॥ १५ पावेतों मुकाम खडकी नजीक पुणें जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. आपण कृष्णाजीकडे व हलकारे

---

१. फडणीस.

यासी जेष्ट शु॥ चतुर्दशीचीं पत्रें आलीं तीं पोंचलीं. मजकूर समजला. इकडील वर्तमान तर मागां लिहिलें वर्तमान कळलेंच असेल. त्यानंतर आपलें बोरघाटाखालोन कूच होऊन खडकीस आले नंतर श्रीमंत त्रिवर्ग मिळोन आपले डेरेस येऊन बहूत प्रकारें खातरजमा करावयाची तसी केली. परंतु आबासाहेबांचे खंबीरता आपणास दखलच आहे. नित्या स्वारीस जाऊं नका नका असें ह्मणोन आठ दिवस लोटले. नंतर सोमवारीं छ० १० मोहरमीं गुल टेंकडीचे आंगें तोंड लढाईस लाविलें. त्याजकडील दोन स्वार ठार जाहाले. व वीस पंचवीस गोळ्यांनीं स्वारांनीं जखमी केले. आपलेकडील किमपि धक्का पावला नाहीं. तेच रोजीं वानवडीपर्यंत जाणार होते. त्यास उभयतां श्रीमंतांचा आग्रह. चार रोज लढाई करूं नका ह्मणून त्याजवरून फिरले. नंतर दुसरे रोजीं पुलावर तीन पलटणें व थोडीसी फौज येऊन छ॰ ११ रोजीं गाफलातीनें घेरलेमुळें श्रीमंतांची खराबी बहूत जाहाली. डेरे जळाले. बाजार लुटला. ते ( ) ही काढूं पावली नाहीं. घोडीं दाहावीस व माणसें दहावीस मारलीं गेलीं. आपलेकडील दोनचार आजपावेतों दोन तीन घोडीं मारलीं. दुपार आले. परंतु बातमी त्यास पोहोंचली. परंतु गाफलतीनें फसले. नंतर आपलेकडील स्वारांनीं कैरोली करून दहावीस असामी जखमी केले. नंतर दहापांच पागा व वहानें व सरनोबत व तात्या फोंडेकर वगैरे दोन तीनसें घोडीं उठोन आलीं. दुसरे रोजीं स्वारी माद्रीचे आंगें केली. तेथें करोलीनें पंचवीस तीस जखमी झाले. परंतु आपलेकडील कोणी जखमी नाहीं. आज सकाळीं बापूखान वगैरे पागे मातबर चारशें घोडीं घेऊन आले. बाकीच्या घरावर चौक्या बसवितात. आण उठोन जा ह्मणतात. त्यास फिरंग्याशिवाय कोणाच्या विचारास पटत नाहीं. तेथें राहिल्याची इज ( ) त नाहींत. रस्ते चौंकडून बंद केले आहेत. तमाम जहाते फिरंगी घेऊन त्यास दिल्ही कसा देतात. आज खंडू कुवर येत होता. त्यास धरून नेऊन मेखसु खांडून मारला ह्मणोन आतांच वदंता ऐकिली होती. नानांस आणावयास पलटणें सहा नगरास गेलीं आहेत. महिना जाहाला. तो निघत नाहीं ह्मणतो. त्यास नगरचा किल्ला व दहा लाखांचा मुलूख घेतला; तो त्यास देऊन आणावा. असें ठरलें आहे. ह्मणोन ऐकितों. परंतु अद्यापि निघाला नाहीं. आपली बातमी तेथें आहे. श्रीमंत राजश्री जगोबा बापू उज्जनीजवळ आहेत. त्यांचीं व लाड यांचीं पत्रें वरचेवर येतात. एकोण आपले प्रांतांचा तेथील कंपूचा व फौजेचा आहे. चिंता नाहीं. होळकर व श्रीमंतही आपलेस सामलत आहेत. पुढां काय होतें पाहावें. परंतु महिना पंधरा दिवस लांबणीखालीं पडेल. आपली मसलत कच्ची पडणार नाहीं. सिदी ( ) ती साबाजी वराडकर याजकडील रुपये उगवून देऊन पत्र पाठवावें. गृहस्थ न सांगतां गेला. त्यास काय ह्मणावें ? व परंतु जर माझी गांठ पडेल तर खडाखड बेअब्रू करून रुपये घेईन. मज फसविला तो देव जाणें. सवा दोनशें रुपये घेऊन गेला आहे. त्यास निकट लाऊन रुपये उगवून घ्यावे. शिवाय व्याज चोहोंत्राप्रमाणें जाले मुदतीनें घ्यावें. एक घोडी तुमची सरकारांत राहिली. कृष्णा सरदाराजवळ आहे. कळावें बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

१. बाजीराव पेशवे, अमृतराव व दौलतराव शिंदे. २. तारीख २५ जून १७९८. ३. तारीख २६ जून १७९८. ४. जुडीनें पराक्रम करून. ५. या प्रसंगीं नाना फडणीस अहमदनगरीं कैदेंत होते. बायांच्या प्रकरणाची मनासारखी तोड नाना काढितील, ह्मणून दौलतरावांनींही त्यांस आणविण्याची तजवीज केली होती. ६. दौलतराव असावे. कारण त्या वेळीं त्यांचे कारभारीच त्यांजविरुद्ध होते.

माहालानीं तमाम जप्तीपत्रें करून जप्ती करविली आहे. कळावें. राघोबा नाबर याजकडील रुपये तूर्त मिळत नाहींत. पली भागा ( ) पीं नाना पोतनीसांचे घरीं द्यावी. हे विज्ञापना.

लें० नं. २५८ श्री. तारीख १ आगष्ट १७९८.

श्रियासह चिरंजीव राजश्री साबाजी यांजप्रती बाळाजी राम—अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १७ माहे सफर मुकाम जेजूर नजीक पुननिरा जाणोन सुखरूप असों विशेष. बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता झाली आहे. तर असें न करितां वरचेवर पत्र पाठवून वर्तमान कळवीत असावें. इकडील वर्तमान चिरंजीव राजश्री रावजी सडी फौज घेऊन पुणें नजीक विठ्ठलवाडीकडेस ( ) बरोबर आह्मी मुलांमाणसें सुद्धां आहों. वानवडीकडील वर्तमान तर फकीरजी गाढवे व सर्जेराव घाटगे व यादव भास्कर व त्याचा बंधू यांसही मुकेल फिरंगी याच्या मुलानें धरून कैद केले आहेत. सर्जेराव घाटगे व फकीरजी गाढवे यांच्या मुसक्या बांधून उभ्या बाजारांतून बंदुकीच्या कुपणानें मारीत पलटणांत घेऊन गेले. आणि तेथें शेतखान्यांत कोंडून एक रोज ठेविले होते. दुसऱ्या दिवशीं बाहेर काढून पाऱ्यांत ठेविले आहेत. यादवराव भास्कर व त्याचा बंधु यासी पलटणींतून आणून सरकारच्या वाड्यापाशीं आणून भास्कर यास पाऱ्यांत ठेविले आहेत. याचा मजकूर मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. राजश्री नाना फडणवीस यासी नगराहून आणून छावणींतून फिरंगी याच्या ठेविला होता. त्यास या उभयतांस कैद केल्यावर त्यास मोकळा केला आहे. तो निराळा शेंदोनशें स्वारानिशीं आहे. उभयतां फिरंगीयांत आपसांत कटकट लागली आहे. तेव्हां मागाहून होईल तें लिहून पाठवूं. कानदास सावकार यासी पुण्यांतून धरून आणिला. तो येथें बाईसाहेबांपाशीं आहे. त्याची खातरजमा केली आहे. वरकड सावकारही तेथें येतील. कोणे गोष्टीची चिंता नाहीं. मुलांमाणसांस रवाना करणार ह्मणून तरतूद केली होती. तुह्मीं श्रीदेवापाशीं प्रसाद कौलाचा घेऊन पाठविणें. तुह्मांस खर्चास नाहीं ह्मणून रागें भराल तर तूर्त आमचा हात चालत नाहीं. मागाहून पाठवून देईन. कोणे गोष्टीची चिंता न करावी. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद. सेवेशीं गोंदबानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. सर्व मजकूर विदीत होईल. वरकड सविस्तर वर्तमान मागाहून लिहून पाठवूं. तूर्तकाळीं ( ) पुनः सूचनार्थ लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

लें० नं. २५९ पै॥ छ० १ रबिलावल. श्री.

चिरंजीव राजश्री साबाजी यास प्रती—अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १६ सफर मुकाम नजीक जंजिरेचा पूल श्रीमंत ( ) चे लष्करांत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें विशेष. बहूत दिवस तुह्मांकडून पत्र येऊन बरवेपणाचें वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता वाटती. ती कोठवर लिहावी. तर ऐसें न करितां येणाराबरोबर पत्र पाठवून बरवेपणाचें वर्तमान लिहीत जावें. यानंतर इकडील वर्तमान तर चिरंजीव राजश्री नारायणराव सडी फौज ( ) श्रीमंत राजश्री अमृतराव याजबराबर पर्वतेकडेस आहेत. व बाया व बुनगे घेऊन चिरंजीव राजश्री बाळोबा येथें आहेत. मुलांमनुशां सर्व सुखरूप आहेत. घरीं रवाना करावें. याचे तजविजेंत होते. त्यास पर्जन्य फार याजमुळें बायांची आज्ञा नाहीं. त्या-

१. हे चार असामी व बाळाजी शेव्ये हे शिंदेशाही मोडण्यास मुख्य कारण झाले. २. माहे आगष्ट सन १७९८.

जमुळें राहणें जाहालें व आपले मंडळीचे द्वेषी होते. त्यांस मुकील याच्या मुलानें कैद करून अब्रू घेतली. आण कंपू सु॥ कैद करून ठेविले. ( ) फकीरजी गाढवे व यादो भास्कर उभयतां बंधु ऐशा चार असाम्या धरल्या आहेत. मुकील व जानेशा या दोन्ही कंपूंचें संधान बायांकडेस आहे. त्याजमुळें असाम्या त्याणें कैद केल्या. पूर्वपणीं येऊन बायांस भेटतील तेव्हां खरें. दुर्जनाचा कल माम्र दवलतराव याजकडेस आहेत. परंत तूर्त मशारनिल्हे मुख्य याजसभोंवता कंपू मुकेलाचा आहे. तेव्हां गोष्ट आटोपेंत येईल. ऐसें दिसतें. परंतु नाना फडणीस ( ) ह्मणोन वर्तमान आहे. मागाहून ज्याप्रमाणें होईल त्याप्रमाणें लिहून पाठवूं. श्रीदेव कृपा करितो तर मास पक्ष या कृत्यास लागेल. ऐसें दिसत नाहीं. श्रीची कृपा जाहाली पाहिजे. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले० नं. २६० तारीख २५ आगष्ट सन १७९८.

तीर्थस्वरूप राजश्री साबाजी मामा वडिलांचे सेवेशीं.

बाळकें लक्षुमणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० १२ जमादिलावल मुकाम वानवडी नजीक पुणें येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. वडिलांकडील सांप्रत पत्र येऊन बाळकाचा सांभाळ होत नव्हता. त्यास काशिदाकडेस आशीर्वादपत्र पाठविलें तें पावोन भेटी ऐसा आनंद झाला. असेंच सदैव आशीर्वादपत्र पाठवून बालकाचा सांभाळ करावा. आपले शरीरीं समाधान नाहीं. हें ऐकिलेपासून चित्त स्वस्त नाहीं. त्यास हल्लीं आराम निखालस जाहाल्याचें लिहिणेस आज्ञा असावी. इकडील मजकूर अधिकोत्तर लिहावें असें नाहीं. सर्व कामकाज पूर्ववतप्रमाणें चालत आहे. कळावें. वरकड ती॥ राजश्री भाऊनें व रावजीनें लिहिलेवरून विदीत होईल. सडे फौजेंतील वरचेवर एका चौं रोजीं पत्रें डाकींतून येतच आहेत. तिकडील चिंता न करावी. राजश्री लखबादादा लाड यांणीं व बापूनें पूर्ववतप्रमाणें उभयतांनीं पहिलेप्रमाणें कामकाज मनास आणावें;- असें सरकारांतून ठरवून उभयतांचे नावें पत्रें सरकारचीं गेलीं. रावजीनें चित्तावर धरून लखबादादांस आणून पूर्ववतप्रमाणें कामकाज सांगितलें. कळावें. वरकड इकडील कच्चा मजकूर सर्व तपशीलवार राजश्री साबाजी बावा मळगांवकर हे गेले आहेत. हे सर्व विदीत करतील. कळावें. वडिलीं वरचेवर आशीर्वादपत्र पाठवून बाळकाचा सांभाळ करावा. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

ले० नं. २६१ पे० छ० ४ जमादिलावल सन श्री. तारीख २६ आगष्ट १७९८.

तिसां तिसेन.

चिरंजीव राजश्री बाळकृष्ण यासी प्रती जगन्नाथ राम आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १३ रबिलावल मुकाम राजगड जाणोन यथास्थित असें विशेष. तुह्मांकडून बहुतां दिवशीं छ० १४ सफरचीं सरकारचीं व तुमचीं पत्रें आलीं. तीं छ० १० माहे मजकुरीं पोंचलीं. लिहिला मजकुर कळों आला. तुह्मीं लिहिलेंत कीं, मुलेंमाणसें कोंकणांत रवाना करणेची तजवीज आहे. त्याप्रमाणें केलींच असतील. वरकड इकडील बंदोबस्त मनोदयानसार जाहाला. असें वर्तमान पेशजीं तपशीलवार लिहून पाठविलें आहे. त्यावरून कळलेंच असेल. तिकडील मसलत अथवा बंदोबस्त पक्केपणीं विचारून करावा. रामपूरवालेही आज आह्मांकडे दाखल जाहाले. त्याचे स्वार

१. जान बत्तीस फिरंगी. २. दुर्जन साहेब फिरंगी.

पहिलेच आले होते. जावदेहूनहीं स्वार शंभर दीडशें आले आहेत. वरकड कांहीं अधिकोत्तर नाहीं. तुह्मांकडील कच्चें वर्तमान दररोज लिहून फिरंगीयाचे डांकींत द्यावें. ह्मणजे आह्मांस पोंचेल. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

हेच पत्रीं गणबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना इकडील वर्तमान वडिलांच्या पत्रावरून निवेदन होईल हे विज्ञाप्ती.

लें० नं. २६२ श्री. तारीख १ सपटंबर १७९८.

चिरंजीव राजश्री साबाजी यास प्रती—अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० १९ माहे रबिलावल मुकाम एवत नजीक भुलेश्वर श्रीमंत बायांच्या लष्करांत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें विशेष. अलीकडे तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर असें न करितां येणाराबरोबर पत्र पाठवून बरेवपणाचें वर्तमान लिहीत जाणें. यानंतर[१] इकडील वर्तमान अद्याप सुधामत नाहीं. रामजी पाटील याचा भाव लक्ष्मण पाटेल व बजा शिरवलकर असे समेट करावयाचें बोलणें घेऊन आले आहेत. परंत मुदलांतच दगा दृष्टीस पडून येतो. तेव्हां समेट होतां दिसत नाहीं. तशांत बजाबा नाना फडणीसाकडील बोलणीं बोलतात परंत पलटणीचे कैदेंतून सुटून तरी निकाल होऊन बोलण्यास भरवसा येईल; तें कांहींच नाहीं. तेव्हां येथून कूच होऊन भीमापार व्हावें. असें आज चिरंजीव नारायणराव श्रीमंत अमृतराव यांजबरोबर विठ्ठलवाडीवर सडे फौज घेऊन होते. श्रीमंत बाजीराव बंधूच्या कह्यांत नाहींत. तेव्हां हे निरोप घेऊन बुनगे व सडे एकजागां जाहाले. यांचे मागून श्रीमंत बाजीराव यांजवर मारेकरी येऊन दगा करावा. तेव्हां त्या मारेकरी यास धरिला. तो नानांनीं पाठविला असें ह्मणतो. पुढें कसें होईल पाहावें. माळवा हिंदुस्थानचा बंदोबस्त चिरंजीव राजश्री जगोबा व राजश्री लखबादादा याणीं केला आहे. शेवट होतो कसें होईल पाहावें. वरकड सर्व ठीक आहे. परंत पैक्याची वळावळ नाहीं. ईश्वर करील तें प्रमाण. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २६३ पो॥ छ० ५ जमादिलावल तिसां. श्री. तारीख ६ सपटंबर १७९८.

चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती—अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २४ रविलाखर मुकाम येवत नजीक भुलेश्वर श्रीमंत बायांच्या लष्करांत जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत जाणें विशेष. तुह्मांकडील पत्र छ० ११ रोजचें आलें. तें छ० २३ मिनहूस पाहून लिहिलें कळों आलें. समेट व्हावा ऐसें आरवंदेकर गृहस्थाचें लिहिलें आलें. आण आह्मीं कांहीं लिहिलें नाहीं. याजवरून तुह्मांस कांहीं खलबतांतील वर्तमान कळत असतें किंवा कसें तें लिहावें. ऐसें लिहिलेंत. त्यास आह्मांस खलबत कशास पाहिजे. आह्मीं खलबतांतून लांब असतों. कदाचित् खलबतांतील मजकूर समजल्यास दौलतराव यांसीं सांगून पाठवीन तर मसलत बुडेल. येथें नवे कारभारी तेव्हां जुनेस कोण पुसतो. तशांत आह्मीं लिहावें कीं; एकोपा निश्चयानें होतो; ऐसें असल्यास लिहावें. दोन तर्फा हितशत्रूपणा आहे. तेव्हां समेट होईल तेव्हां खरें. लक्षुमण पाटील व बजाबा शिरवलकर वानवडीकडील बोलण्यास आले. परंत आंतून बजा-

---

१. नाना फडणीस कैद असतांही त्यांच्या घालमेली होत होत्या असें दिसतें. २. या वेळीं नाना फडणीस कैदेंतून सुटून आले होते व ते शिंद्यांच्या लष्करांत राहात होते. याविषयीं दुसरें एक पत्र आहे. ३. आपसांत मिटवामिटव करण्याच्या मिषानें येणारी ही मंडळी नाना फडणीसांचे तर्फेची होती

याचें बोलणें नाना फडणीस याचे तर्फेचें करोन ह्या हेतकार या उभयतांचा समेटास आले. समेट होतो ऐसें लक्ष्मण पाटील यांस भासवून उभयतां गेले आहेत. त्या फौजेस खर्चायाकरितां चार रुपये देऊन आपले ऐसे करोन पुढां कर्तव्य तें करावें. याप्रमाणें फडणीस याचें बोलणें बजाबा बोलोन गेले आहेत. शेवटीं कसें होतें पाहावें. बायांच्या मनोदयीं नकार जालेला यांणीं सिद्धीस न्यावा. आण त्याच्या मनोदयीं आज्ञा करील त्याप्रमाणें यांणीं करून घ्यावा. याप्रमाणें करार होतांच बोलणीं आहेत. सिद्धीस जाईल तें खरें. मागाहून कैसें होईल. त्यासारखें लिहून पाठवूं. येथून चिरंजीव सौभाग्यवती उमाबाई व आना, आपा, व वरकड घरीं रवाना केलीं. पोहोंचले याचें वर्तमान लिहावें. हे आशीर्वाद.

ले० नं. २६४ पैवस्त छ० ५ जमादिलावल तिसां. श्री. तारीख २ अकटोंबर १७९८.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें नारायणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २१ रबिलाखर वर्तमान यथास्थित असों विशेष. वडिलीं छ० १६ रबिलावलचें आशीर्वादपत्र पाठविलें. तें छ० २७ मिनहूस प्रा झालें. पत्रीं लिहिला मजकूर सविस्तर कळला. करहाडे यांचे प्रकर्णीं तपशील तीर्थस्वरूप राजश्री भाऊ यांचे पत्रीं लिहिलें तें सर्व समजलें. अशास इकडून वाडी सरकारांत व समस्त गृहस्तांस समस्तांचे नांवें पत्रें लिहून पाठविलीं आहेत. वडिलीं मनन करून सरकारांत व सबनीस चिटणीस व वरकड मंडळी गृहस्त संभावित असतील त्यांस देऊन त्यांचे आपले मतें पुढील विचार करणें तो करावा. सारांश अनादि ब्राह्मणांचा कोप करून कराडे मनस्वी वल्गना करून चुकले. पुन्हा पुन्हा करीतच आहेत. तें सोसून त्यांसीं पूर्ववत संबंध करून राखावे. तेथें ही गोष्ट सर्वथैव ज्ञातीमध्यें कोणी कबूल करूं नये. प्रांतांत प्रभूची सत्ता. प्रभू करहाडे यांस मिळून आपल्या गृहस्थावर दाब टाकितात. तेथें चाललें तसें चालावें ह्मणतात. आपले ब्राह्मण वैदिक आलीकडेंत नाहीं. त्यापेक्षां तेथें राहून परिणाम काय? श्रीमंतांच्या राज्यांत फिरंगी याचे तालुक्यांत जिकडेस सोई ज्यास दिसेल तिकडेस खुशाल निघून जावें. ईश्वर उपेक्षा करणार नाहीं. कोणत्याही अर्थी चालवील. पुढां पाहात आहों. वृत भूक कोणी न्हेणार नाहीं. चार दिवस सोडावी असा प्रसंग प्राप्त जाहालेस सोडावी. परंतु ज्ञातीधर्म रक्षण होईल तें करावें. तेथलीं पत्रें वगैरे शास्त्रार्थ पाहिजे तेवढे आज कुकुलवेंतील करहाडे कसकसा न्याय करून त्या राज्यांत राहतात. तेंहि पाहण्यांत येईल. आपण काळजी न करावी. सर्वच मिळून एक विचार असावा. त्यांत फुट नसावी. जेथें जातील गृहस्थ त्या स्थळाहून पत्रें येथें यावीं. ह्मणजे तेथें हरएक विशींची सोई व्हावी. त्याची पैरवी करितां येईलें. मुख्य गोष्ट केल्या कटास बाद न यावा. ज्ञातीअभिमान सोडूं नये. आपला अर्थ सिद्धि नेणार ईश्वर आहे. वारंवार तिकडील कच्चें वर्तमान लिहीत असावें. शेवेसी श्रुत होय. इकडील वर्तमान ( ) वडिलांच्या पत्रावरून कळेल हे विज्ञाप्ति.

---

१. आद्यगौड ह्मणजे सारस्वत ब्राह्मण. २. हें ग्रामण्य मोठें राग येण्याजोगें झालें होतें, असें दिसतें. ३. याच संधीस नारायणराव बक्षी यांनीं आपली मुलगी रत्नागिरी प्रांतीं लोटलीकर यांचे घरीं दिली होती व सारस्वतांत (शेणव्यांत) हटातटानें शेणवी, शेणईपैकीं, कुडाळदेशकर, पेडणेकर, लोटलीकर, भालावलकर, साष्टीकर, बारदेशकर वगैरे जे भेद झाले होते, ते मोडून टाकण्याचा त्यांचा विचार होता. पण त्यांस अकालीं मृत्यूनें गांठल्यामुळें तें सर्व तसेंच राहून गेलें. हल्लींही अशी एकी होण्याबद्दल श्रीस्वामींकडून आज्ञापत्र निघालें आहे, व परस्परांत कचित् अन्नसंबंधही होत आहे.

लें० नं. २६५ पै॥ छ० १२ रजब. श्री. तारीख ६ अकटंबर १७९८.

चिरंजीव राजश्री साबाजी प्रती बाळाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २५ जमादिलाखर मुकाम लष्कर नजीक तळेगांव जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जावें. विशेष. आलीकडे तुमचें पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी वरचेवर सविस्तर लिहीत जावें. काल सडे स्वारींतून वडिलांचीं पत्रें आलीं. त्यांत अजमेरीस चिरंजीव विश्राम याचे बायकोस महिना दोन महिने आराम नसून कार्तिक शु॥ ११ दशीचे दिवशीं काळ जाहाला. ह्मणून लिहिलेंत. तें पत्र बजिन्नस तुह्मांकडे पाठविलें आहे. ईश्वरें अनुचित गोष्ट केली. होणारास उपाय काय ?. तुह्मांस कळावें याकरितां लिहिलें आहे. पुढील विचार केला पाहिजे. त्यास राजश्री लखबादादा लाड यास नवरी आणावयाकरितां राजश्री देवबा लाड यास सडे स्वारींतून पत्रें गेलीं. तीं लखोटे बजिन्नस तुह्मांकडे पाठविले आहेत. ते पावतांच देवबाकडे पाठवून लखबादादांची नवरी ते पाठवितील. त्याजसमागमेंच तुह्मीं चिरंजीव विश्रामाचे नवरीची योजना करून द्यावी. ह्मणजे उज्जनीपर्यंत उभयतां समागमें पोहोंचल्यावर पुढें अजमेरीस इची रवानगी करून देतील. नवरी तयार करून येथें लिहून पाठवावें. त्यासारिखी तजवीज करितां येईल. इकडील वर्तमान तर माळव्याचा बंदोबस्त वडिलांनीं केलाच आहे. पलीकडे मथुरेकडील वगैरे येथें पिरूसाहेब व इंगळे एकत्र होऊन वानवडीकरांच्या पक्षांत मिळोन आपला अमल करितात. याकरितां लखबादादा कोट्यावरून जाऊन वरकड भोपाळवाले वगैरे राजे यांचें संधान आपलेकडे आहेच. ते व हे एके जागां जमेत करून आबाजी इंगळे याजकडील माहालांत उपद्रव करावा ह्मणजे ते सहज हलके पडतील. हें योजून कूच करून जाणार. वडील माळव्याच्या बंदोबस्तास राहतील. तिकडील कांहीं चिंता नाहीं. इकडील जाबसाल तर राजश्री रायाजी पाटील व बजाबा शिरवलकर सलुखाचें बोलणें बोलून यादी करून घेऊन वानवडीस गेले. त्यांस एक महिना होत आला. तेथें बजाबा आहे. व पाटील तेथेंच आहेत. परंतु त्यांतील जाबसाल अद्याप कांहीं नाहीं. परिणामीं सलुखाचें दिसत नाहीं. वानवडीकरांसही कूच करून जाणेविसीं नानाचें बोलणें पडलें आहे. जांबगांवीं गेल्यावर खर्चाची तजवीज करून देऊं ह्मणतात. आपलेकडेही श्रीमंतांचें व नानाचें संधान आहे. परिणामीं कोणत्या थरास गोष्ट जाती पाहावी. वरकड सर्व यथास्थित आहे. कोणे गोष्टीविसीं येथील कमती नाहीं. मात्र खर्चाची मोठी ओढ पडली आहे. ईश्वरसत्तेकरून घडेल तें खरें. मागाहून सविस्तर लिहितों. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २६६ पै॥ छ० २१ रजब सन समान. श्री. तारीख ३१ डिसेंबर १७९८ रविवार.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १२ रजब आप ( )त वारंवार वर्तमान यथास्थित असे विशेष. आपलीं पत्रें छ० ० १ चीं आलीं. तीं काल पावलीं. इंग्रेज प्रकर्णी वगैरे मजकूर लिहिला; तो कळला. इकडील सर्व वर्तमान आज नाना फडणीस यांची स्वारी आपल्या यजमानसाहेबांपाशीं आली होती. आजपर्यंत नानाच्या सांगितल्याप्रमाणें यजमान-

१. दौलतरावांस. २. नाना फडणीसांचें. ३. बाजीराव पेशवे व नाना फडणीस यांचें. ४. तारीख २० डिसेंबर सन १७९८ बुधवारचीं. ५. सावंत समुद्रावर चांचेपणा करीत. त्यावेळीं इंग्रजांनीं रेडी किल्ल्याचे संबंधानें वाडीचे सावंतांबरोबर केलेला हा कज्जा होता.

साहेबांनीं वर्तणूक करून आपल्या मतलबाप्रमाणें चालले. परंतु सर्व गोष्टी ध्यानीं होत्या. त्याचा काबू आज साधावयाचें योजून नाना येतांच ( ),णचा बंदोबस्त करून जेथें खलबतास बसले होते; तेथेंच त्याजकडील दाहापांच मुत्सद्यांसुद्धां नानास धरिलें. समागमें लोक होते; ते पळून गेले. व लुटून घेतलें. हें वर्तमान आपणास तिकडे कळावयाकरितां लिहिलें आहे. आजपर्यंत नाना यानें आपले ज्ञातीविसीं द्वेष करून नानाप्रकारें उत्पात केले[1]. हलीं राजश्री सदोबा भाऊवर चौकी बसवावयाचा आग्रह. त्यावरून जसें त्याणीं ह्मटलें तसें त्याच्या समाधानार्थ चार प्यादेही काल भाऊच्या येथें ( ) जाहाला. यजमानसाहेबांचा पराक्रम शाहाणपण वर्णावयास येत नाहीं. नानाचे सन्निध फौज पडल्यापासून आपल्या जातीस नित्य धुकधुक होती; ती निःकाळजी आज जहाली. यजमानसाहेबांचा प्रताप दिगांत जहाला. सर्वांस दहशत लागली. आतां श्रीमंतांच्या राज्याचा बंदोबस्त यथास्थित होईल. यजमानांच्या प्रतापांत आपलें कल्याण आहे. सर्व चांगलेंच होईल. चिंता नाहीं. सौभाग्यवती मातोश्री काकीची रवानगी परवांच्या रोजीं कोंकणांत केली. ती दोन ( ) ची आल्यावरून त्यास माघारें येण्याविसीं सांगणी पाठविली आहे. आपणाकडून पत्रें वर्तमान आल्यावर पत्रींही लिहिल्याअन्वयें पाठवूं. चिंता नाहीं. हे विज्ञापि. राजश्री ताल्या पागनीस यांस आतांच पत्रें देऊन सांडणीस्वार पाठविला. व राजश्री परशराम भाऊकडेही पाठविला. हे विज्ञापि.

लें० नं. २६७ श्री. सन १७९८.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणराव चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ० २९ जमादिलावल वर्तमान यथास्थित असे विशेष. हालीं तिकडून कोण कोण आले. व कोण कोणाचीं पत्रेंही आलीं. त्यांत कराडे ब्राह्मण याणीं श्रीमंत सोनेवडेकर व वरकड आपल्या गृहस्थांस कळतांच लोक जमा करून घेऊन गेल्यावरून कराडे ब्राह्मण व आपलेकडील स्वज्ञातीचे पंचाइतीचा फूट वाढीस पडणार आहे. ह्मणोन कळल्यावरून येथें समस्त गृहस्तमंडळी मिळोन निश्चय केला कीं, आह्मी ब्राह्मण पूर्वापार आमचे ( ) तां हालीं कराडे लोप करावयास पाहातात. आह्मीं तेथें समाराधना करून पाणी सोडल्यास भोजन करीत नाहींत; व मनस्वी वल्गना करितात. त्यावरून आह्मांसही त्यासीं संबंध नाहीं. त्यांची समाराधना आह्मांस करावयाची नाहीं. व त्यांचे येथें भोजनही ( ) देणें नाहीं. वरकडा हकार भुरसी देऊं. याप्रमाणें सर्वांचे संमतें संमतपत्र जाहालें आहे. तेथेंही श्रीस्वामीनीं असाच सर्वांकडून कट करविला आहे. त्याप्रमाणें चालून आपले स्वज्ञाती ब्राह्मण अगर किरवंत जोशी यांचे हातें कर्म उरकून घेतील. शास्त्रसंमतें पूर्वीं निवाडे जाहालेच आहेत. पुढेंही जसा शोध करावयास सांगतील. तेथें एक पहिला कधीं निर्णय जाहाला होता. ती पत्रिका

१. सारस्वत ब्राह्मण (शेणवी) यांचा नाना फडणीस द्वेष करीत, तो केवळ जातिमत्सरामुळें होय. पेशवाईंत दुसऱ्या लोकांचा फार छल होत होता, हें सर्वप्रसिद्धच आहे. हीं पत्रें त्याचीच साक्ष देत आहेत. आणखीही पुरावा हवा असल्यास प्रभूंच्या इतिहासाचीं साधनें हेंही पुस्तक पाहावें. २. यांना या वेळीं आणविल्याबद्दल इतिहासांत व पत्रांत कोठेंही आधार नाहीं. पुढें मात्र बायांचे समेट करण्यास त्यांस आणिलें होतें. ३. हा सारस्वत ब्राह्मणांच्या स्वामींचा फार जुना मठ सावंतवाडी संस्थानांत कुडाळ प्रांतीं सोनवडें येथें आहे. हा मठ कऱ्हाड्यांनीं एकत्र होऊन एका रात्रींत मोडून टाकण्याचा बेत केला होता. पण तें साधलें नाहीं. यामुळेंच हें ग्रामण्य प्रथमतः उत्पन्न झालें होतें.

बंद १५ पंधरा आपलेकडे पाठविले आहेत. नक्कल कारकुनानें काढिली होती. शुद्ध अशुद्धाचें ज्ञान नाहीं. आपणांकडे पावतांच एक नक्कल काढून ठेवून अगोदर दुसऱ्याकडे न देतां स्वामीपाशीं पाठवून शुद्ध करितील. ही नक्कल व संमतपत्र पावल्याचें उत्तर पाठवावें. राजश्री सबनीस चिटणीस आदीकरून समस्त गृहस्थ तेथें आहेत. त्यांणींही आग्रहपुरःसर येविसींचा अभिमान धरावा. ज्ञातीचें काम आहे. श्रीमंत राजश्री आबासाहेबांसही आपलेकडील ( ) बोलल्याचें ऐकोन संतोष जाहाला ( ) सांप्रतचा नाहीं. पुरातन युगायुगीं चालत आला आहे. त्यापेक्षां हाल्लीं लोप करावयास लागल्यानें कसा होईल. सारांश आपले लिहिले अन्वयें करणें प्राप्त आहे. ज्ञातीचें संरक्षण व्हावें हा मनोदय आहे. हे विज्ञाप्ती.

ताजा कलम. पंधरा बंदांचा ग्रंथ पाठविला आहे ह्मणोन लिहिलें. परंतु शुद्ध करावयास लाविला आहे. याजकरितां मागां वरकड श्रीमंत राजे बाहादर यांस आमचे नांवचें व राजश्रीचे नांवचें ऐशीं दोन पत्रें व समस्त तेथील ज्ञातीस एक पत्र व श्रीस्वामींस एक पत्र ऐशीं पाठविलीं आहेत. आपण यांतील जाबसाल कांहींच लिहिला नाहीं. त्यास जसा तेथें रंग दृष्टीस पडेल; तसें करावें. पत्रें सरकारांत वगैरे लिहिलीं आहेत. व संमतपत्र पाठविलें आहे. याप्रमाणें करावयाचें असलयास माळव्याचा बंदोबस्त वडिलांनीं कला[illegible] लिहावें. येथून कांहीं ताठ दिला नाहीं. याजवर आपली करावें. तेथें सर्वांचे मतें कसें आह[illegible] आपल[illegible] मर्जी असेल त्याप्रमाणें करावें. हे विज्ञाप्ती.

जिवबादादांचे पश्चात् शिंद्यांचे मुत्सद्यांची झालेली दैना.

ले० नं. २६८ श्री. १७९८।९९.

चिरंजीव राजश्री साबाजी यास प्रती अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० ६ जमादिलावर पोष्य शु॥ ८ ( ) लष्करांत जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत जाणें विशेष. तुह्मी पुणेस आलेचें वर्तमान परस्पर ऐकिलें. व राजश्री दादांसही[1] तुमचे कागद एक चार आलेले ह्मणोन ऐकिलें. परंतु आह्मांस कांहींच लिहिलेंत नाहीं. तेव्हां असें कां दिसोन आ ( ) त्यास हाल्लीं तुमचें पत्र मार्गशीर्ष शु॥ ७ मीचें आलेलें ( ) जमादिलावलीं पोंचून लिहिलेलें कळलें. घरीं लिहून श्रीपंढरपुरीस यात्रेस चिरंजीव सौभाग्यवती सकूबाई सु॥ आलीं. त्यास चिरंजीव राजश्री रावजी[2] यांचे भेटीकरितां पुणेंस लष्करांत आणली. परंतु इकडील वर्तमान त्यास दर्शविलें नाहीं. ह्मणोन लिहिलेंत. गोष्ट ठीक न केलेत. मागून येका दो रोजीं रवाना कोंकणांत करितों; ह्मणोन लिहिलेंत. त्यास कोंकणांत पाठविलेचें वर्तमान घरीं सुखरूप पोंहोंचल्याचें ल्याहावें. आह्मांकडील वर्तमान. जंवपर्यंत आयुष्यमर्यादा तंवपर्यंत काळाचे दिवस काढितों. एक एक दिवस वर्षापेक्षां मोठा असा प्रकार आमचा घडला आहे. यांतून ईश्वर जलदी मृत्यू देता, तर उत्तम आहे. कोठवर यवजून दुःख काढावें. आपण ( ) शांतवन करून मागील प्राणी आहेत त्यांवर दृष्टि देऊन विश्रीखालीं घालावें. आह्मींही चित्तास बहूत विवेक करितों. परंतु चित्त ठिकाणीं राहात नाहीं. तेव्हां ईश्वर ( ) होणार तें होईल. जलदी आमचा सेवट लागेल तर उत्तम आहे. शरीर जगवून तरी काय करणार आहों. रोजगार करावयाची उमेद कोणत्या भरवसेवर राहिले. आण रोजगार आहे कोठें. रोजगारास कारण ज्याजकरितां करावा, ते आह्मांस टाकून[3] गेले. पुटां रोजगार घरीं किंचित् शेष राहिला. त्याजकरितां रोजगार येवजावा

---

१. लखबादादांस. २. नारायणराव बक्षी. ३. जिवबादादा.

तर दरबारीं मिळोन आमचे येजमान एक (   ) यांचे हातीं रोजगाराची सोई होऊन रोजगार मिळेल तोही कळतच आहे. शरीरांत प्राण आमचा आहे तोंपर्यंत पंगतीस जेवायास घालतील तेणेंकरून कुटुंबाचें चालेल असें नाहीं. ज्याचें दैव त्याजबरोबर. मनुष्यानें योजिलें होत नाहीं. ईश्वरइच्छेनें घडेल तें प्रमाण. तुह्मी तेथून घरीं जाल किंवा पुढां इकडेस याल तें लिहावें. तुमच्या हातीं समाचार होईल तो करावा. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद. कोंकणांतील कागद आणवून पाठवावे हे आशीर्वाद.

लें० नं. २६९ सन १७९८.

(याचे पूर्वीचा बंद मिळत नाहीं.)

२ पुरवणी. राजश्री आना व आपा स्वामीचे सेवेसीं. तो इतक्यांत अजमेरीहून राजश्री यशवंतराव भाऊ[३] बापूकडे जावयासी आले होते. मग त्यांस हें वर्तमान कळलें. नंतर तेही जावदेस राहिले. व दत्तूचा लेंकही राहिला. मग याजबरोबर जमत तीन हजार जाहाली. तो मेवाड प्रांतीं राजश्री गणेशपंत नाना अंबाजी इंगळे यांचा दिवाण होता; तो जावद घ्यावयासी आला. मग अजमेरचे सुभेदार व यशवंत बाबुराव चढून गेले. मग सुभेदार याची व गणेशपंत याची लढाई जाहाली. तेव्हां तो पळाला. तेव्हां त्याच्या तोफा दोन वीस एक माणसें तर ठार जाहालीं. व जखमी पन्नास पाऊणशें जाहालीं. आपलेकडेस त्याचे लष्करचा सरंजाम घोडीं, उंट जमू (   ) बहूत लुटले गेले. दुसरे बापू गुजराथेहून जावदेस आले. मागती गणेशपंत लढावयासी तयार जाहाला. मग हेही स्वारी करून गेले. मागती लढाई घेतली ती मागती पळून गेला. दुसरें नंतर बहुतच खटले लुटले गेले. आतां तो चितोडवालेचे पाठीस जाहाला आहे. दुसरें. राजश्री लखबादादा सुरज भेलशास आले. तेणेंकरून अंबाजीचा लेजा भाऊ इंगळा आला. दहा हजार स्वार वगैरे फौजेनेंशीं आला होता. तो दादास वर्तमान कळतांच दादाचे फौजेनें जाऊन लुटून घेतला. लढाई दोन घटिका जाहाली. मग तो पळून गेला. हें वर्तमान बाळोजी इंगळे यासी कळतांच पांचशें स्वारांनिशीं जाऊन भाऊस सामील जाहाला. बाळोजी इंगळे यासीं कोटेस आहेत. कोटेवालेही त्यास सामील आहेत. कोटेवालेची जमेत बाळोजीबरोबर चार हजार आहेत. एकूण त्याची फौज पंधरा सतरा हजार आहे. व दादाबरोबर पंचवीस तीस हजार आहेत. दुरजनसाल गिराशा याची सा(   ) ट हजार व भूपाळवालेची दाहा हजार फौज आहे. देवगडवाला व खेची व खासगी मिळून तीस हजार आहे. ते आतां मुकाम मुगलशवंड होडा तिकडे आहे. तेथून बापूस दादाचें पत्र आलें कीं, तुह्मीं घटकेचा विलंब न करितां सारंगपुरास येणें. आह्मीही सारंगपुरास येतों. त्यास बापूस गेलेस आज चारपांच दिवस जाहाले. तेथें दादास सामील होऊन मग लढाई होईल. बाळोजी इंगळे व दादाच्या फौजेचा सहा सातां कोशांचा आंतरा आहे. लढाई दोनचार दिवसांत होणार आहे. बापूच्या व लखबादादांच्या भेटी आज उद्यां होणार आहेत. बापूबरोबर राजश्री यशवंतराव भाऊ गेले आहेत. पांच सहा हजार फौज बापू व भाऊ बरोबर व तोफा वगैरे सरंजाम येथेंच ठेऊन गेले आहेत. सडी फौज पांच सहा हजार आहे. तीर्थस्वरूप राजश्री बापू खुशाल आहेत. मेवाडांत अंबाजी इंगळे यांचीं ठाणीं दोन उठवून आपलीं बसविलीं आहेत. आपलेकडील वर्तमान वरचेवर लिहून कळवीत असलें पाहिजे. कळावें बहूत काय लिहिणें कृपालोभाची वृद्धि सदोदीत करीत असलें पाहिजे.

---

१. नारायणराव बक्षी. २. जगन्नाथ राम ऊर्फ जगोबा बापूंकडे. ३. यशवंतराव भाऊ.

हे॥ राजश्री लखबा मळगांवकर स्वामीस साष्टांग नमस्कार विनंती उपरी. लिहितार्थ परिसोन लोभ कीजे. आपणाकडून बहूत दिवस जाहाले. पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर असें न करावें. हरघडी पत्र पाठवून संतोषवीत असलें पाहिजे. आपण कोंकणांत असतां ममता फार ठेविलीत. तसेंच ममता असावी. कृपालोभ असों दीजे हे विनंती.

ले० नं. २७० श्री. सन १७९८:

राजश्री अंताजीपंत दादा स्वामीचे सेवेसीं.

सेवक अनंदराव आपाजी साष्टांग नमस्कार विनंती. उपरी आह्मांस काल रात्रीं बाजारांतून साबाजी बाबानीं घेऊन आले. आणि गारदी यांच्या पाहाऱ्यांत दिल्हें आहे. तरी याची काय तजवीज करावी. आह्मांसी गेज गांडी मागें लाविला आहे. आमची दशा घडली आहे. तरी तुह्मीं यजमानाच्या कानावर घालून आमची सुटका होई तो अर्थ करावा. बहूत काय लिहिणें हे विनंती. आह्मी पलटणांत आहोंत. कळावें.

ले० नं. २७१ श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका केरकर स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २५ जिल्हेज मुकाम वानवडी जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत आसावें. विशेष. आपण पत्रें पाठविलीं; तीं पावलीं. लिहिला गजकूर कळों आला. सरकारचा खिसा लिहिलेत; त्याचें उत्तर मागाहून घेऊन पाठवितों. दुसरें इंग्रज याजकडील गलबतें मारून राजे बहाद्दर यांणीं न्हेलीं आहेत. त्याचा खिसा त्यांणीं लिहिला आहे जे. पहिले वेंगुर्लेविसीं रदबदली आपण केली. आण त्यास देवविलेंत. याजकरितां तुह्मांस लिहिलें आहे. याजवर आह्मांकडे काय दोष नाहीं. ऐशीं काल पत्रें आलीं आहेत. ( ) न वर्तमान आहे. ही गोष्ट कांहीं ठीक जाहाली नाहीं. असो. राज्याच्या कारभारामुळें आपलेस कांहीं कारण नाहीं. आपण रावजीचे पत्रीं व भाऊचे पत्रीं हुंड्यांचें उत्तर पाठविलें. त्यास हें ठीक नाहीं. उत्तर आमचे कागदीं मात्र लिहावें. व वरकड कर्जाचा जाबसाल उभयतांचे पत्रीं लिहून पाठवावा. त्याचे पत्रीं लिहितां वीस हजार लोकांचें देणें. त्याचें व्याज दरसाल ( ) मात्र लिहावें. आण आपण तेथोन हुंडी लिहिलेत ती पटवून देतों. त्याचें उत्तर पटल्याचें आमचे कागदीं लिहावें. हल्लीं पुणेंच्या हुंड्या गोवर्धनदास नरसिंगदास याचे दुकानच्या पुर्जे तीन ३ बीतपशील.

११००० पुर्जा १ नारायण नाईक वाकले याचे ( )
१५०० शिवराम देवजी यास द्यावे.
३८०० पुर्जा १ पै॥ तपशील.
३००० विठोबा कवठणकर यास.
५०० सक्राबा कुणकेरकर याचे लग्नास.
१०० चिरंजीव सौ॥ यमनाबाई ( ) करीण.

१. यांस धाकटे लखबादादा ह्मणत. २. अंताजी रघुनाथ कवठणकर. ३. हे कोण ? ४. साबाजी नारायण राजाध्यक्ष हवालदार.

१०० चिरंजीव सौ॥ वेणूबाई रेडीकरीण.
१०० चिरंजीव सौ॥ बचूबाई वेंगुर्लेकरीण.

१६३०० ३८००

सदर्हू सोळा हजार तीनशेंचे पुर्जे तीन घेऊन पोंचलेचें उत्तर पाठवावें. व ज्याचें त्यास द्यावें. कर्जापैकीं तुमचे सोईस येईल त्याचें वारावें. हल्लीं आपणाकडील हुंडी १५०० ( ) पंधराशेंची होमाण्णा पुरुषोत्तम यास दिली होती. ती येथें आली आहे. त्याचे रुपयेस वाइदा दोन तीन रोज राहिलेत. वाइदेस रुपये देऊन तुमची हुंडी तुह्मांकडे पाठवून देतों. वरकड वर्तमान कांहीं अधिकोत्तर नाहीं. याउपर कोणाचे गर्जेस चार रुपये लागल्यास दुवोत्राचें खातें घालूं नये. तूर्त मागल्यास चिटी आह्मांवर करीत आहां. परंत सुचना जाणविली आहे. तीर्थ ( ) रूप राजश्री बापूकडील वर्तमान सर्व राजश्री सावकर सांगतां कळों येईल. त्याणीं हुंडी सातशें चाळिसा रुपयेची पाठविली आहे. सावकर बावाबरोबर. त्याची मुहूर्त हरबलास करून द्यावी; ह्मणोन त्यास येथें भाऊ कवठणकर याजवर पुरवस उभा राहिला होता. त्यांणीं सांगितलें आहे जे. मुहूर्त करणें असल्यास श्रीदेव केरी येथें प्रसादीं पुसोन घ्यावें. जरकरितां प्रसाद जाहला. तर मुहूर्त व पालखी द्यावी. नसल्यास मुहूर्त करूं नये. ते रुपये देव सांगेल त्याप्रमाणें हरबल येथें भुमकेपाशीं खर्चास लाऊन जागा बांधावा अगर देव सांगेल त्याप्रमाणें करावें. दुसरे राजश्री येसाजी राम आकेरकर यांचे बागाचा खिसा लिहिलेत. त्यास आह्मीं त्याजपाशीं कांहीं मागितलें न्होतें. त्याणीं आपले काकाकरितां कबूल केलें होतें. देईल तर उत्तम. नसल्यास त्याचें उत्तर घेऊन पाठवून द्यावें. त्याची चिंता नाहीं. ममता करून देतील ( ) रामचंद्र नीळकंठ याची जागा तेथें आहे. ह्मणोन लिहिलेंत. त्यास तें कांहीं ठीक नाहीं. त्या ( ) अगोदर मूल वारला आहे. त्यांत ईश्वरें आपणास कांहीं कमी केली नाहीं. असो. दुसरें लाडकोबा सुभेदार याचा मजकूर लिहिलेत. त्यास ( ) यावयाची दिसत नाहीं. इंग्रज याजकडील वर्तमान लिहिलें आहे. त्याचा आपण बोभाट करूं नये. सहजच लाडोबा लिहून पाठवितील. कळावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंती.

ले० नं. २७२ पै॥ छ० १८ माहे श्री. तारीख ८ जानेवारी १७९९.

शाबान सन तिसां तिसेन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० ३० रजब मुकाम नजीक सिद्धटेक जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपणाकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून काय ह्मणावें. आरंवयाहून सर्वांचीं पत्रें येतात. आण तुह्मांकडून पत्रें येत नाहींत. त्यामुळें चिंता वाटती. तर हरकोणी येत जाईल. त्याजसमागमें पत्र पाठवून देत जावें. ह्मणजे वर्तमान कळत जाईल. पेशजीं चिठ्या पाठविल्या त्याचें उत्तर अद्यापि आलें नाहीं. तर उत्तर सत्वर पाठवावें. उज्जनीकडील वर्तमान चिरंजीव पांडोबा आरंवेदेकर यास लिहिलें आहे. वारु बगार आहेत. सर्व समजाऊन देतील. गणोबा साखवळकर यास येथोन काढोन दिला. शाहाणा होता. परंत येथें कोणीं कोणीं कांटा करून काढिला; हें वर्तमान परस्परें कळलेंच असेल. येथोन विठोजी सिंदे व मोरे वगैरे हजार बाराशें फौज वानवडीकरांकडे उठोन गेली. आणखीही फितूरया

चालला आहे. यांत ईश्वर काय प्रमाण भावितो पाहावें. येथील रीत तों प्राणरक्षणाची दिसत नाहीं. ईश्वर काय करील पाहावें. वरकड वर्तमान राजश्री गोंदबा[1] नाबर लिहीत असतील. त्याजवरून कळतच असेल. चिठ्यांचें उत्तर जलद पाठवावें. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

सदरहू राजश्री विश्रामजीस नवरी पाहिजे. याकरितां होये होते पोंचणार नाहीं याजकरितां हरदेंत मुली तिघी आहेत. अकरा वर्षांच्या दोन व नव वर्षांची एक. त्यांत चांगली पाहून लग्न करितों. ह्मणोन तीर्थरूप राजश्री बापूंचीं पत्रें आलीं होतीं. आपणास कळावें हे विनंती.

लें० नं. २७३ पै॥ छ० १८ माहे श्री. तारीख ११ जानेवारी १७९९.

शाभान सन तिसां.

चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती बाळाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० ४ शाभान मुक्काम श्रीगोंदें जाणोन स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुह्मांकडील बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून चिंतातूर असों. तरी असें न करितां हरघडी पत्र पाठवून वर्तमान कळवीत जाणें. इकडील वर्तमान पेशर्जी[2] वानवडीकर[3] यांजकडून रायाजी पाटील समेटाच्या बोलण्याकरितां आले होते. त्यांणीं यादी करून दिल्या. त्याजप्रमाणें त्याचा करार करून आला नाहीं. त्याजमुळें विघड होऊन तेथून कूच करून मुक्काम मजकुरीं आलों. पुढें काय होतें पाहावें. तेथील शिलेदार मंडळीपैकीं मानाजी मोरे, तुळसाजी सिंदे व खंडेराव माने व विठोजी सिंदे याजप्रमाणें हजार फौज वानवडीस जाऊन भेटली. अगोदर श्रीमंतांपाशीं गेले. त्याणीं उत्तर केलें कीं, तुह्मी पैले कोणत्या मसलतीनें गेलेत. आण तेथून कोणत्या मसलतीनें आलेत. एवंच तुह्मीं कुळास डाग लाविला. थोर माणूस परंतु अक्कल तुह्मांस नाहीं. पैले वानवडीकर यांजकडून गेलेत; आण तेथूनही फितूर करून आलां. तुह्मीं आणा शफतक्रिया केलेत. त्या कोणीकडेस राहिले. असे फारच फजीत केले. नंतर मग वानवडीकर यांजपाशीं गेले. त्यांणीं कांहीं सन्मान केला नाहीं. पैले तुह्मी होतां, आतां आलेत. पैलेप्रमाणें राहावें. चौगांस मिळेल त्याजप्रमाणें तुह्मांस मिळेल. राजश्री आबा चिटणीस यांसी आणून कारभाराचीं वस्त्रें दिलीं आहेत. तूर्तकाळीं तेच कारभार करितात. नानाच्या अनुमतें आले आहेत. पुढां कसें होतें पाहावें. ती॥ राजश्री बापूकडील वर्तमान राजश्री लखबादादा राघोगडाकडेस फौज पलटणें घेऊन गेले. राघोगडची मामलत केली. पुढें ग्वाल्हेर प्रांतीं दुर्दू[4] करावयास जाणार आहेत. बाळोजी इंगळे फौज घेऊन बापूवर लढाई घ्यावयाकरितां आले होते. त्यांची यांची लढाई जाली. इंगळे मजकूर यांसी मोडून माघारें लाविलें. तो ग्वाल्हेर प्रांतीं निघाला आहे. त्याचे मागां फौजही लाविली आहे. बापूचें मुक्काम उज्जनीस आहेत. मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. तुह्मांकडील सविस्तर वर्तमान लिहिणें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २७४ श्रीगजानन. तारीख १४ जानेवारी १७९९.

तीर्थस्वरूप राजश्री साबाजी मामा वडिलांचे सेवेसीं.

बाळकें लक्ष्मणानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ तागायत छ०

---

१. गोविंदराव भिमाजी नाबर हे शिरवडें गांवचे राहणारे होते. २. श्रीमंत पेशवे बाजीराव साहेब यांजकडे. ३. शिंदे पुण्यानजीक वानवडी एथें राहात असत, ह्मणून त्यांस वानवडीकर ह्मणत. ४. स्वारी घेऊन अम्मल करावयास जाणें.

७ साबान मुकाम लष्कर नजीक सिद्धटेक येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. वडिलांकडून फार दिवस आशीर्वादपत्र येऊन कांहींच सांभाळ होत नव्हता. त्यास हल्लीं काशिदाबरोबर पत्र पाठविलें. तें पावोन भेटी ऐसा लाभ जाहाला. असेंच सदैव आशीर्वादपत्र पाठवून बाळकाचा सांभाळ करावा. यानंतर इकडील मजकूर ती॥ राजश्री भाऊनें लिहिलें आहे. त्यावरून विदीत होईल. पेशजीं गयाजी पाटील सलुखावीसीं आले होते. त्यास त्यांचें यांचें बोलणें बनलें नाहीं. तेव्हां पाटील सलुखाचा नाद सोडून माघारे गेले. जाते वेळीं येथील फौज फोडून फितूर करून घेऊन गेले. त्यानंतर हाल्लीं वानवडीकर यानें राजश्री आबा चिटणीस[1] यांस आणिला आहे. सर्व कारभार त्यास सांगितला. त्यांचे मार्फतीनें येथें सलुकाविसीं त्यांचे भाचे आले होते. त्यांजकडेस सांगित्तलें कीं; आबानें येथें यावें आण आह्मांसीं बोलावें. जसें आबा सांगेल त्याप्रमाणें आह्मीं व त्यानीं ऐकावें. अशी जाब सांगून त्यास घालविला. त्यास आबास भरवसा पडून आबा येथें येईल असें दिसत नाहीं. तेव्हां सलुकाचा नाद निखालस तुटला. या उपर त्यांचीं पलटणें लढाईविसीं येणार आहेत. लढाई जलदीच होईल. आतां वाटकर लढाईसीं गांठ आहे. जंववर सलुकाचा नाद होता; तेव्हां लढाईसीं गांठ आहे. पुढें ईश्वर काय करील पाहावें. हिंदुस्थानांतील ती॥ राजश्री बापूकडील पत्रें वरचेवर येत आहेत. बापू व लखबादादा उज्जनीस होते. तेथून दादा हिंदुस्थानांत जावयास गेले. राघोगडचें ठाणें दादानीं घेतलें. तेथेंच मुकाम आहे. पिरू व आबाजी इंगळे एक होऊन ठाणीं बसवीत आहेत. तेथून दिवाणें उभयतांवर लढाईस येणार असें होतें. त्याजवरून दादा पुढें जावयास गेले. बापू उज्जनीस होते. बापूकडील फौज फुटली. बाळोजी इंगळे व बापू सिंदे व सटवाजी फाळके हे फुटोन उलटे बापूवर लढाईसीं आले. लढाई जाहाली. त्याणींच सिकस्त खाली. आण माघारे गेले. या उपर बापू लखबादादाकडेस जावयास गेले. अद्याप उभयतां मिळाले नाहींत. उज्जनीस जावयास गेले. कळावें. आपण लिहिलें पत्र रावजीस दिलें. वाचून पाहिलें. तिकडील प्रकर्णी लिहिलेंत. तें कळलें. त्याच्या उपद्रवाविसीं पेशजीं भाऊनें पत्र पाठविलें त्याप्रमाणें जाबसाल जलदी करावा. ह्मणजे ठीक आहे. भाऊनेंही तीच तजवीज लिहिली आहे. तेंच ठीक आहे. कसें केलें तें लिहावें. येथें अधिक उणें जाहलेस तेथें फारच उपद्रव होईल. याजकरितां पहिलीं जलदीच पत्रें पाठविलीं. त्याप्रमाणें करावें. ह्मणजे ठीक आहे. रावजीचेंही ह्मणणें हेंच आहे. हाल्लीं तिकडे फिरंगी याचा उपद्रव पेडणें प्रांतांत जाहाला आहे. ह्मणोन ऐकिलें. त्यास कसें तें लिहावें. हे विज्ञापना.

लें० नं. २७५ पै० छ० २५ माहे साभान सन ति॥ श्री. तारीख १४ जानेवारी १७९९.

चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती–अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० ७ साबान मुकाम सिद्धटेक लष्करांत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. विशेष. बहूत दिवस तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास छ० २० रजबचें पत्र पाठविलें, तें छ० ४ मिनहूस पावोन लिहिलें कळों आलें. ऐसेंच सदैव येणाराबरोबर पत्र पाठवून सविस्तर वर्तमान लिहीत असावें. यानंतर इकडील वर्तमान तर श्रीमंत बायांचा व वानवडीकर

---

१. आबा चिटणीस हे म्याड होते. पहा पत्रें नंबर २२३।२५७।२८४. यांचें पूर्वीपासून नाना फडणीसाशीं सख्य होतें. पहा पत्रें व यादी पृ. २४३.

यांचा समेट करावयास राजश्री पाटील व लक्ष्मण जाधव ऐसे बोलावयास आले होते. महिना दोन महिने लष्करांत होते. त्यानीं फितूर करून माराजी मोरे व विठोजी सिंदे व तुळसाजी सिंदे व खंडेराव माने व हिंम्मतबाहाद्दर व बापूखान पागे व बहादरखान महमदखान असे वानवडीस घेऊन गेले. हल्लीं काल परवां राजश्री आबा चिटणीस यांचा भाचा रामचंद्रपंत बोलावयास आले होते. त्यांस बायांनीं सांगितलें कीं; जुने कारभारी एकत्र होऊन जें बोलणें असेल तें बोलोन ज्याप्रमाणें ठरावांत आणाल, त्याप्रमाणें होईल. असा जाबसाल जाहाला. तेव्हां ते आज माघारे जाणार आहेत. हिंदुस्थानांतील वर्तमान तर पायागड राघोबा वैद्य येथोन पुलावरून गेला होता त्याणीं घेतला. राघोगड अंबाजी इंगळे याजकडेस होता तो लखबा लाड याणीं घेतला. बाळोजी इंगळे फौज घेऊन माळवेंत आले होते. तेथें चिरंजीव जगोबा बापू याणें लढाई करून सिकस्त केला. तो मेवाडचे लत्यास प्रतापगड देवळ्याकडेस पळोन गेला. लखवादादा लाड राघोगड घेऊन ग्वाल्हेर प्रांतीं जावयास गेला. याप्रमाणें डांकेंतील एकंदरीचें वर्तमान आहे. परंतु कागद येतील तेव्हां खरें. तुह्मीं कागद बापूस पाठविले ते देऊन येथून आह्मीं खिजमतगार पाठविला आहे. कळावें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २७६ पै॥ छ० २२ शाबान मयां तेन श्री. तारीख २१ जानेवारी सन १७९९. रविवार.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री काका साहेब स्वामीचे सेवेसीं.

सेवक गोविंद बाळाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १४ साबान मुकाम वानवडी जाणोन आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी वरचेवरी लिहावयासी आज्ञा करावी. इकडील वर्तमान श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांकडील मामलती वगैरे घ्यावयाचे त्याचीं सनदा पत्रां, हत्ती घोडीं, जडजवाहीर, का वगैरे घेऊन याची तोड जोड करून फिरंगी याचे स्वाधीन केलें आहे. पंचमी दिवसीं राजश्री भाऊ दि[illegible] जातील. आण मातुश्रीची रवानगी करतील. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब ( ) र.स [illegible] रवानगी जाली ह्मणजे येणार आहेत. त्यासी भाऊ दिवाण गेलेवर राजश्री तात्या पागनीस याजपाशीं तजवीज करून, मग तात्यांची मर्जी जशी असेल त्याजप्रमाणें करतील असें आहे. वरकड मजकूर काल रावजीनीं पत्रें पाठविलीं आहेत. त्याजवरून कळेल. घरीं लभाचा मजकूर वडिलीं लिहिला आहे. त्यावरून केलेले सोरगतीविसींचा मजकूर वडिलांच्या पत्रावरून कळेल. खर्चाविसीं आह्मांस लिहिलें आहे. त्यास संक्रांतीकरितां दोन ( ) सुमारें खर्चास अनुकूल होऊन वडिलांची आज्ञा जाल्याप्रमाणें रवाना करितों. कापडाविसीं वडिलांनीं लिहिलें आहे. त्यास सात आठ हजारपर्यंत कापडही घेऊन रवाना करितों. येथून खर्चास पोहोंचेल तेव्हां तेथें तरतूद होणार हें आह्मांस समजतें. परंतु वडिलांनीं आज्ञा केली कीं; सोरगत करार जाली पैकीं यास्तव हलकारा जलदीनें रवाना करणें. त्याजवरून रवाना केलेलें आहे. खर्चास पंचमी दिवशीं हलकारा रवाना करितों. यांत दिगर नाहीं. वरकड वडिलांनीं लिहिलें आहे. त्यावरून कळेल. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

---

१. रायाजी पाटील शिंदे. २. गोसांवी. ३. बाळोबा तात्या, नारायणराव बक्षी, सदाशिव मल्हार वगैरे. ४. यांचा पंढरपुरास मोठा वाडा आहे. ५. हे गोविंद बाळाजी नाबर शिरवडें येथील राहणारे.

ले० नं. २७७ पै॥ छ० १२ रमजान श्री. तारीख २३ जानेवारी १७९९.
माघ सन तिसां ति॥

चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती–अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २६ साबान मुकाम नितातीर नजीक धईगांव तीन कोश लष्करांत जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें. विशेष. तुह्मीं पत्र छ० ६ साबानचें पाठविलें; तें पावोन लिहिलें कळलें. उभयतां चुलते पुतणे या ( ) विपरयास येऊन बिघाड जाहाला. त्यास बाळोबानें घरीं यावें; किंवा जगोबाकडेस जावें. नाहीं तर कोणा वेळास काय करितील भरवसा नाहीं. ह्मणोन लिहिलेंत. त्यास पुतणेच्या चित्तांत कांहीं विकल्प नाहीं. यांत सोध्यांची सोबत. तेव्हां भरवसा नाहीं. ह्मणोन घरीं यावें तर बाया निरोप कैशा देतात. . हा फौजेंत आहे. ह्मणोन लोक आज आठ नव महिने टिकोन राहिले आहेत. तेव्हां हा निघाला तर बायांची मसलत सर्वच विलग पडती. यास्तव उभयतांस वाडेंत न्हेऊन आण शफता घेऊन दोन तीन रोज आंतच आपले आच्यारीया करवीं उभयतांस जेवायास घालून निखालशी केलीशी आहे. सोदे नांदूं देतील तेव्हां खरें. तूर्त एक विचारें आहेत. यश आहे. सोध्यांची वाट श्री लावील तेव्हां खरें. ( ) वानवडीकर कूच करोन खासे माजरीवर आले. परंत वरकड मुत्सदी व पलटणें तेथेंच आहेत. निस्तोक निघोन जातील तेव्हां खरें. कालपासोन बाजारी वर्तमान कीं फिरोन वानवडी ( ) लिहिलें कोणाचें आलें नाहीं. मागून सविस्तर लिहून पाठवूं. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले० नं. २७८ श्रीशंकर. तारीख २८ जानेवारी १७९९.
पै॥ छ० २ मोहरम सुरुइसन मया तेन व आलफ ऊर्फ वैशाख.

तीर्थस्वरूप राजश्री मामा वडिलांचे सेवेसीं.

अपत्य रावजी रांगणेकर चरणावर मस्तक ठेवून सीरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २१ माहे शाबान मुकाम मेडते प्रांत मारवाड जाणोन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. वडिलांकडून बहूत दिवस पत्र येऊन बाळकाचा सांभाळ होत नाहीं. तर असें न करावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. यानंतर आह्मांकडील वर्तमान तर अजमेरीस गेल्यापासून येथ कर्ज काढून खात बसलों आहों. ती॥ राजश्री विश्राम काका वगैरे मंडळी येथेंच आहे. कोठें रोजगारास जावें तर चोंहोंकडून बेदा लागला आहे. कोठेंच जावयास ठिकाणा नाहीं. अशी येथील रीत झाली आहे. राजश्री मजकूर तर शिंदे होळकर यांचे परस्परें लागलें आहे. शिंदे उज्जनी साडेच्यार कोशांवर जाऊन पडले आहेत. होळकर तर इंदुराचे आसपास आहेत. दोघेही बरोबरच आहेत. तेव्हां कसें होतें पाहावें. तदनंतर श्रीमंत बाईसाहेब दतयेस आहेत. बराबर ती॥ राजश्री बापू व भाऊ बरोबरच आहेत. राजश्री लखबादादा तेथून होली उतरून जहाज फिरंगी यास सामील जात होते. तेव्हां जहाज यास पिरूनें मोडला. तेव्हां तेथील संधान तुटलें. त्यास माघारें जावें; तर रस्ता नाहीं. याजकरितां येथें आले. येथून मेवाडांत जावयास गेले आहेत. राजश्री यशवंतराव भाऊ जावदेस आहेत. बरोबर पांच हजार फौज आहे. मेवाडांत पहिले आपले अंमल होते. त्या उपर अंबाजी इंगळे याच्या मुलानें घेतले होते. यास्तव मशारनिल्हे भाऊ जाऊन आपले अमल करणार आहेत. बाईसाहेब यांजकडे खर्चाची तारांबळ. रुपया एक नाहीं. दादा

१. यशवंतराव होळकर. २. महादजींच्या बायका.

तर येथ आले. आण बापूसीं काम पडलें आहे. फौजही थोडी राहिली आहे. जरकरितां यशवंतराव होळकर याणें शिंदे यांचें पारपत्य केलें, तर सर्वांचें बरें आहे. नाहीं तर सर्व आपला आपला रस्ता धरितील. आह्मींही यावयाच्या मनसुब्यांत आहों. परंतु आपले स्वाधीन काय आहे. येऊं तेव्हां खरें. ती॥ राजश्री लाडकोबा भाऊ दाभोळकर यास दसरेचे मुहूर्तानें रवाना केले आहेत. ते आह्मांकडील सर्व वर्तमान प्रविष्ट करितील. वडिलांचे शरीरीं आतां कसें आहे; तें लिहावें. बहूत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

हे॥ राजश्री आना व आपा स्वामीचे सेवेशीं साष्टांग नमस्कार विनंती. आपणास आह्मीं एक दोन पत्रें पाठविलीं. परंतु एकही पत्राचें उत्तर आलें नाहीं. बरें तुह्मीं काय कराल? आमचेच दिवस तसे आले आहेत. आतां तरी कृपा करून पत्र पाठवीत जावें. यानंतर ती॥ राजश्री बापू व भाऊ दत्तयेस सुखरूप आहेत. गणोबा मामा तुमची पागा घेऊन दादाबरोबर येथ आले होते. कळावें. बहूत काय लिहिणें कृपालोभाची वृद्धि करीत जावें. ही विनंती.

ले० नं. २७९ श्री. तारीख २ फेब्रुवारी १७९९.

श्रियासह चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती--बाळाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २६ साबान मुकाम निरा बांयगी जाणून सर्व मंडळी सुखरूप असों विशेष. बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंतातूर असों. तरी असें न करितां हरघडी पत्र पाठवून वर्तमान कळवीत जाणें. इकडील वर्तमान तर पेशजीं वानवडीकर यांजकडून समेटाच्या बोलण्याकरितां येत होते; त्यास हरकोणी आला नाहीं. कागदपत्रीं शिलेदार यांजकडून बोलतात. चांगला माणूस कोणी आला नाहीं. निंबाजी शिंदे, यशवंतराव शिंदे यांचा बंधु आला होता. त्याचें बोलणें पडलें जे. आबा चिटणीस येणार. त्यास तुह्मां सर्वांचें एक चित्त होऊन पुढां आबा सांगतील त्याजप्रमाणें तुह्मी मान्य असल्यास आबा येणार. असें त्याचें बोलणें. त्या उपर याणीं सर्वांनीं त्यास उत्तर केलें कीं; आबा येऊन आह्मां सर्वांचे व मातोश्री बायांचे मनोदयानुरूप करीत असलां तर आह्मी राजीच आहों. याप्रमाणें वचन घेऊन गेला आहे. अद्यापि उत्तर आलें नाहीं. येथील सर्व मराठे लोक आहेत. त्यांचे चित्तास समेट करावा असें आहे. देवजी बावा गौळीही त्यांत सामील आहेत. आमच्या चित्तांत जबरीनें समेट करावा असें आहे. त्यास मराठे करितील त्याप्रमाणें चालावें. असें जाहल्यास ठीक नाहीं. श्रीगोंदें येथें मुकाम करून होता. तेथून कूच करून गंगेवर जावें; असें खचित ठरलें ह्मणजे खानदेशीं फौज यशवंतराव व शामतखान आहेत. ते आह्मीं एकत्र होऊन पुढां मसलत जी कर्णें ती करावी. असें ठरवून कूच करावें असें जाहालें. पुढां मराठे यांच्या चित्तांत गंगेकडेस जावें असें नाहीं. तेव्हां दोन रोज मुकाम करून अडून राहिले. तेव्हां उपाय नाहीं. मग आह्मीं सांगितलें कीं; आमच्यानें कांहीं होत नाहीं. पुढां तुमच्या मसलतीस येईल; त्याप्रमाणें करावें. ह्मणोन सांगितलेवर कूच करून येथें आले आहेत. पुढें कसें होतें पाहावें. फौजेंत कोण कोणास मानीत नाहींत. मन मानेल तसें वर्ततात. यांत ईश्वर अब्रू राखील ती खरी. खर्चासही एक पैसा कोठें नजरेस पडत नाहीं. तेव्हां दाव्यांची गोष्ट राहिली. अशी तूर्तकाळीं दशा आहे. ईश्वर पार पाडील तर पाडूं. चिंता नाहीं. गोष्ट योजिली सिद्धीस जाईल. तुह्मीं चिंता न करावी. तुमच्या शरीरास समाधान नाहीं; ह्मणोन दोनचार पत्रीं लिहून आलें आहे. त्यास औषध उपाय करितात ह्मणून लिहून आलें. त्यास समाधान

जाहालें याचें वर्तमान लिहून पाठवावें. तुमच्या शरीराची काळजी रात्रंदिवस लागली आहे. वरचेवर वर्तमान लिहून पाठवावें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २८० पै॥ छ० १६ रमजान शुक्रवार. श्री. तारीख १० फेब्रुवारी १७९९.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री काका साहेब स्वामीचे सेवेशीं.

सेवक गोविंद बाळाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल क्षेम तागायत छ० ४ रमजान मुकाम वानवडी जाणोन वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान राजश्री घांटगे यांसी पलटणांत ठेविले. त्याची सुटका व्हावी. असें मुख्य यजमानाच्या चित्तांत होतें. परंतु कारभारी याच्या चित्तांत नव्हतें. परंतु धण्यापुढें इलाज नाहीं. यास्तव त्यास सोडला. तेव्हां लष्करांत हवा फिरली. कोण कोणास पुसत नाहीं. तेव्हां कारभारी याणें कारभार सोडून आपले[1] घरीं बसले. तेव्हां लष्करांत कांहींच जाबसाल होत नाहीं. ( ) त्याजबरोबर कापड व खर्चास रवाना करितों. नगदी ऐवज देऊन हुंडी केली ह्मणजे कांहीं चिंता नाहीं. हवाला देऊन हुंडी केली तर मग दिवसांचा भरवसा नाहीं. ह्मणोन पक्का जाबसाल करून पाठवितों. कापडही घेऊन ठेविलें आहे. त्यास रामास पाठविणेंविसीं पत्र पाठविलें आहे. तोही आज अगर उद्यां येईल. आज द्वितीया चार पांच रोजीं निघून जाईल. वरकड वर्तमान बारीक राजश्री लखबा सांगतां विदीत होईल. कापड आठ हजारा ( ) वर याचे पोशाख सुद्धां घेतलें आहे. व नवरीस दागिनेही दोन तीन व चंबू पंचपात्र्या व ताटवाट्या वगैरे सरंजाम घेणेंविसीं लिहून आतांच आलें आहे. त्याचे तजविजेंत आहों. सोबत जलदी जाती. गांठ पडल्यास लिहून प्रविष्ट रवाना करितों. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. २८१ पै॥ छ० २७ माहे रमजान श्री. तारीख २२ फेब्रुवारी १७९९.

सन मयां तेन.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणराव चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १६ रमजान पावेतों सुखरूप असों. विशेष. इकडील वर्तमान तर वरचेवर लिहून जातच आहे. त्यावरून कळत असेल. सर्जेराव घाटगे सुटल्यापासून पांगनिसाची मर्जी निखालस एक चित्त नाहीं. प्रांत जावद अजमेर वगैरे माहालची साडे तीन सालां बाकी आठ लाख मांडून मागतात. बक्षिगिरीचीही घालमेल करावी ही आज च्यार पांच रोज विचार करितात. राजश्री भाऊ दिवाण यास व यादवराव भाऊ यांस बक्षिगिरी करावी विसीं सांगत होते. त्याणीं मान्य न केलें. तेव्हां बाजीबा मोदी यांकडून कामकाज घ्यावें; असें मानस त्यांचें दिसतें. धण्याची मर्जी आह्मांठायीं प्रसन्न आहे. परंतु मुखत्यारी कारभाऱ्यांचे स्वाधीन. तेव्हां याचे चित्तांत घालमेल करणेंचें असल्यास कसें होईल पाहावें. कागदपत्र बक्षिगिरीकडील समजाऊन घ्यावा. व आठ लाख रुपये जावद जिरण अजमेर पैकीं द्यावे. हीं बोलणीं त्यांचीं पडलीं आहेत. माहालचा माहितगार शामराव आज दोन वर्षे घरीं बसला आहे. तेथून येणेंविसीं त्यास पांच सात पत्रें गेलीं. त्याचें येणें अद्यापि होत नाहीं. याजकरितां हाल्लीं मुजरत माणूस पाठविला आहे. त्यास आपणाकडे पोंचतांच शामरावजीकडे

---

[1] बाळोबा तात्या.

रवाना करून देऊन त्याचें जलदी इकडे येणें होये तें करावें. तुह्मींही तेथून बरचेवर माणसावर माणसें त्याजकडे पाठवून जलदी येणें घडे तें करावें. येण्यास याच्या दिरंग लागला तर फजिती आहे. अजमेरीस येथून बरचेवर लिहीत गेलों. त्याचीं उत्तरें एक दोन आलीं. ते सबब लिहितात. चार सालां मामलत सरकारांत न दिल्यामुळें पेंच ये तऱ्हेचा. आण ते तर सबब लिहितात. हालींही येथून लिहिलें आहे. त्याचें उत्तर काय येतें तें पाहावें. पांच रुपये संसारास तुह्मांकडे पाठविले; असेंही नाहीं. भोग भोगावा असेल तो भोगतच असों. तुह्मीं श्रीकडे पुसोन येविसींचा कौल घ्यावा. ती॥ राजश्री भाऊ मातुश्री बायांच्या लष्करांत आहेत. थोरली बाईची मर्जी प्रसन्न दिसत नाहीं. भाऊ आपले तर्फेनें उभयतां बायांची मर्जी रक्षून आहेत. तेथें शिलेदाराच्या धरण्याशिवाई दिवस जात नाहींत. तेथील शिलेदारांचा गवगवा कोठवर लिहावा. पत्राचें उत्तर लवकर पाठवावें. आमच्या प्राणावर आलें आहे. आजगांवकर यांस जलदी पाठवावें. सर्व फिरले. ईश्वर पार पाडील तें खरें. हे विज्ञापना.

ले० नं. २८२ पै॥ छ० २९ रमजान श्री. तारीख २७ फेब्रुवारी १७९९.

सन तिसां तिसेन.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेशीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० २१ रमजान मुकाम सोनपत जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. तुह्मांकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता लागली आहे. तर असें न करितां सदैव पत्र पाठवून आपणाकडील कुशलवृत्त लिहीत जावें. इकडील वर्तमान तर अधिकोत्तर नाहीं. हिंदुस्थानाकडील पत्रें आज पंधरा दिवस आलीं नाहींत. एकंदर येत असतील सुखरूप आहे. आमचे घराकडील खबर समाचार घेऊन चार रुपये लागल्यास द्यावे. तुमचें बरवेपणाचें वर्तमान बरचेवर लिहून पाठवीत असावें. भाऊ येथोन फौज घेऊन वीस पंचवीस कोशांवर गेले आहेत. समागमें गोंदबा नाबर व नारबा पोतनीस उभयतां आहेत. वरकड इकडील वर्तमान ताईनें सांगितलेंच असेल. त्याशिवाई कांहीं अधिकोत्तर नाहीं. माहाराज करवीरकर येथोन आठ कोशीं आले आहेत. त्यांच्या आपल्या भेटी सत्वरच होतील. बहूत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

ले० नं. २८३ माहे फेब्रुवारी सन १७९९.

( ) चार रोज याप्रमाणें जाहले तेव्हां ( ) मुळें कारभार करीत नाहीं. ह्मणोन धण्यासी सांगितलें. तेव्हां धण्याचा सासरा त्यास सोडल्यामुळें कारभार करीत नाहीं; ऐसें सांगितलें. तेव्हां धण्याची व कारभारी यांची बेमर्जी. तेव्हां पुढां कारभार चालला पाहिजे. पैसेस ठिकाण नाहीं. तेव्हां फिरंगी यासी मधीं रदबदली घालून घांटगे यांसी रवाना करितों. ऐसें करून पूर्ववतप्रमाणें कारभार करतात. लग्नाचा मजकूर. खर्चास व कापड पाठविणेंविसीं भाऊनीं सांगितलें आहे. त्यास येथें गडबडीमुळें सावकारी बंद होती. यास्तव विलंब लागला. माघ ( )

---

१. यशवंतराव शिवाजी ऊर्फ यशवंतराव भाऊ राजे. २. बाळोबा तात्या वगैरे मंडळी. ३. हे सखाराम ऊर्फ सरजेराव घाटगे होत.

ले० नं. २८४ पै॥ छ० ९ माहे सवाल सन तिसां. श्री. तारीख ८ माहे मार्च सन १७९९.

तीर्थस्वरूप राजजी काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणराव चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ३० रमजान मु॥ नजीक जथ वर्तमान यथास्थित जाणोन आपणाकडून आलीकडे पत्र न आलें. शरीरभावना कशी आहे. हें कळत नाहीं. त्यावरून चिंता. त्यास सविस्तर लिहून पाठविलें पाहिजे. इकडील वर्तमान लष्कर या रोकीं महाराज करवीरकरवासी यांसी आपली चौं कोशांची छटी आहे. त्याच्या व इकडील आज उद्यां भेटी व्हावयाचें ठरण्यांत आलें आहे. राजश्री पर्शराम भाऊ येथून पन्नास साठ कोशांवर आहेत. त्यांचे ही स ( ) कारकून यांचें येणें लौकर व्हावें ह्मणोन लगेंच आहेत. येणें जाहल्यावर त्रिवर्गांचा एकोपा ठरून पुढील मसलतीची पैरवी केली जाईल. तोंपर्यंत एकत्र व्हावयास आठचार रोज लागतील. तों याच प्रांतांत मुकाम आहे. हिंदुस्थानांतील पत्रें आलीं. उभयतां समागमें चाळीस हजार फौज आहे. उज्जनीस बाळोजी इंगळे याजवर येतात. त्यांची यांची दाहा बारा कोशांची छटी आहे. लढाईही जाहाली असेल. वानवडीकडील वर्तमान चिटणीसास[1] कारभार पुरे होऊन पुणेंस बसले आहेत. पैका नाहीं. लोकांची धरणासकडे पलटणें व फौजा नेमित आहेत. परंतु खर्चाशिवाय जात नाहींत. एकूण अव्यवस्थितच कारभार आहेत. पागनीस यासही आणावयाचें संधान करितात; ह्मणोन वर्तमान एक बरें वर्तमान आलें. तिकडील हे विज्ञाप्ती.

ले० नं. २८५ पै॥ छ० १७ माहे सवाल. श्री. तारीख १६ माहे मार्च १७९९.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ० ८ माहे सवाल जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपण पाठविलीं पावलीं. सोहिरोजी व जासूद यास चिठ्ठी दिली. त्यास रुपये पावले नाहींत; ह्मणोन लिहिलेंत. त्यास जासूद यास पन्नास रुपये देऊन वडिलांकडे रवाना केला. सोहिरोजी यास शंभर रुपयेंची चिठ्ठी; राजश्री यशवंतराव[2] शिवाजी यांच्या लष्करांत दिली आहे. पटली किंवा नाहीं कळलें नाहीं. न पटली असल्यास त्याजलाही आह्मी देतों. हल्लीं भोयाला रुपये तीस देणें ह्मणोन लिहिलेंत. त्यांस देऊं ऐसे दोनशें आह्मी आपलेकडून देतों. आपण लिहितां भाऊकडून देवावे. जरकरितां भाऊकडून देवावयाचे असल्यास आह्मांस लिहून पैसा मिळणार नाहीं. तुह्मीं परभारें गोंदबा नावर यांस लिहावें ह्मणजे देतील. आह्मांकडोन देऊं सांगाल तर आह्मी देऊं. आपण लिहितां भाऊकडोन देवावे. माणसें येतात तीं आह्मांकडे मागतात. भाऊकडून कांहीं पैसा मिळत नाहीं. उगवून घ्यावे; तर आह्मांकडे कांहीं कामही नाहीं. याजकरितां लिहिलें आहे. जिकडोन देवावयाचे तिकडोन देवावे. पेशजीं खर्चाविसीं लिहिलेंत तें पत्र भाऊस पोंचविलें. व गोंदबासही दाखविलें आहे. त्याणीं उत्तर लिहिलें असेल; त्यावरून कळेल. हिंदुस्थानांतील एक बार आज आली. बाळोजी इंगळे याची लढाई मारली. इंगळे याचें लष्कर लुटोन फस्त केलें. उद्यां परवां आपलीं पत्रें येतांच तपशीलवार लिहून पाठवितों. बहूत काय लिहिणें. सदरहू येथें आमचे घरीं खर्चास पाठविलें नाहीं. तर हरकोणी इकडून

१. आबा चिटणीस. २. यशवंतराव भाऊ.

हजार रुपये घेऊन द्यावे. सावकार याची सोई ल्पनतांच हुंडी करून पाठवितों. तुमचे भरवसेवर आहों. लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. २८६ श्रीरामजी. तारीख २२ मार्च सन १७९९.

माहाराजधिराज श्रीराजा जैसिंगजी—राजश्री बापूसाहेब जगंनाथ बहादरजीकों गांवदिने मोः सिंधनपूर मौजे देहरी मोः बिराई एह तुमाराजके गांव तीन बाब बरार माफ नानकार दिये. सो हमेसां पाय जावगे हमारे बनसको होयगो सो तुमारे बनसको होयगो ताहे पाले जायगे. हमेसां परंमपरा आपदत्त परदत्त मजे मेटंत बिसंद राजे नरा नरक जायंती जोगल चंद्रदिवाकरा मिती फाल्गून वदी पाडवा. संमत १८५५.

जल त्रण काष्ट पाषाण माल सायर संमेत दिनोहे काहु बातकौ उजर नहीं.

लें० नं. २८७ पै॥ छ० २० माहे जिल्काद. श्री. तारीख २१ एप्रील सन १७९९.

चिरंजीव राजश्री विठोबा याप्रती—साबाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल ता। छ० १५ जिल्काद मुकाम नजीक येंडूर जाणोन स्वकीय कुशल लेखन करावें. विशेष. मराठे यांस मसाला घालोन वाडीस नेलें ह्मणोन लिहिलेंत. त्याचें कसें जाहलें तें लिहावें. दादाजी व शिवराम पांडुरंग हे वाडीस गेले किंवा नाहीं तें लिहिणें. सांतर्डेकर याणीं रुपये लाविले ह्मणून लिहिलेत. त्यास सरकारी लिहून पाठवावें. मना चिठी दिल्यास फार उत्तम. नसल्यास खत्याचे रुपये तिजावे लागतील. लंगरबाग येथील रुपये लाविले ह्मणू ( ) जे मागील हिशोब करावा. पुढील रुपये त्याचे आपण घेऊं नये. श्रीमंत आबासाहेब लग्नाचे तरतुदींत आहेत. ह्मणून लिहिलें. तेव्हां कारभारी मनास आणतील असें दिसतें. वडिलांस वाडीस लिहून उत्तर आणवावें. ह्मणजे सहजच कळेल. श्रीमठ[3] तळवणें येथील काम लाविलें तें पाडतां येत नाहीं. कर्जवाम काढोन तें काम चालीस लावावें. सरकारांतून सरंजाम पाठवावे. वगैरे जे रुपये लागतील त्यांजविसीं सरकारांत लिहून पाठवावें. मना जाहले असल्यास उत्तम न जाहालें. आल्यास द्यावे. सनदकरी यांचे बार सर्वांचे बार काढले तर आमचेच सोडतील असें नाहीं. कर्जदारी व नित्यखर्च चालला पाहिजे; ह्मणोन लिहिलें. त्यास आह्मी त्याजकरितां उठोन आलों आहों. त्याचा ( ) उठोन येतां चार दिवस तगादा भोगावा. राजश्री बाळकृष्ण विठ्ठल व गोविंद बाळाजी यांचेकडील जाबसाल येते वेळीं करून घेऊन येतों. उसपकर यांचे घरीं भात व तांदूळ तुह्मी घ्याल तेव्हां करावी. नाहीं तर पैले घरांतील घ्यावे लागतील. राजश्री लाडकोबा सुभेदार पुणेंत आहेत. ते भेटले असते तर रुपयेचा जाबसाल करून घेतां आला असता. ते तूर्त येथें नाहींत. राजश्री साजो विश्वंभर याचा कागद रुपें देणें ह्मणोन घेऊन पाठवावा. ह्मणजे चिरंजीवाकडे पाठवून देऊं. सडे स्वारींतील कांहीं पत्रें आह्मीं आले ( ) येत असतीं येकसी वरचेवर राखा विठ्याही यास व सुभेदार यास सरकारचीं पत्रें आलीं ह्मणोन लिहिलेंत त्याचें कसें जाहालें; तें लिहावें. येथोन लष्करचें कूच माघारें पुणेंकडे जलदीच होईल. असें दिसतें. राजश्री तात्या पागनीस व बाजीबा मोदी व धोंडीबा किल्लेंतून बाहेर काढोन तीन कोश आलीकडे आले आहेत. इति दिवस वानवडीस आले असतील. मागोन सविस्तर वर्तमान लिहोन पाठविणें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१. राघोगडचे राजे. २. हे खेमसावंत भोंसले, सरदेसाई वाडी सरकार, यांचे चुलते होत. ३. वाडी संस्थानांत परशुराम भारती या सिद्ध पुरुषाचें स्थान आहे तें. ४. जगोबा बापूंचीं व लखबादादांचीं.

लें० नं. २८८ पै॥ छ० १२ मोहरम जेष्ठ मास. श्री.   , तारीख ७ मे सन १७९९.

चिरंजीव राजश्री साबाजी यास प्रती—जगन्नाथ राम आशीर्वाद उपरी येथील कुशल ता। छ० १ जिल्हेज मु॥ चितोड जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. तुह्मांकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. यावरून चिंता लागली आहे. त्यास येणाराबरोबर पत्र पाठवून वर्तमान बरवेपणाचें लिहीत जावें. आह्मांकडून वर्तमान. आज पांच सहा महिने इंगळेकडील फौज व आह्मांसीं लढाई होत आहे. या मागें दोन चार लढाया जाहल्या. त्यांत कैलासवासी महाराज व वडील यांचे आशीर्वादें आपलीच फत्ते जाहाली. आतां सर्व मराठे एकत्र होऊन आह्मांशीं लढतात. बेवीस रोज नित्य तोफांची लढाई होत आहे. शंभर तोफा आहेत. आपणाजवळ पन्नास साठ तोफा आहेत. तोफा सोडून बाहेर निघत नाहीं. जेव्हां बाहेर येतील ते वक्तीं घोडे चालवून लुटून घेऊं. चिंता नाहीं. त्याजकडे पलटणें माणूस फार आहे. आणी घोडेवरील स्वार थोडके. आह्मांकडे पलटणचे घोडे आण घोडेवरील स्वार फार आहे. आमची जबर त्यांजवर आहे. जे दिवशीं तोफा सोडून बाहेर निघतील. ते दिवशीं लुटून घेऊं. चिंता नाहीं. उदेपूरचा राणा याजकडील फौज व पायदळ आपलेकडे आहे चिंता नाहीं. आतां राजश्री तात्या पागनिस यांसही यजमान याणीं आणले आहेत. आण मातोश्री बायांचीही समजोती करावयाकरितां जाणार आहेत. ह्मणोन लिहिलें आहे. जरकरितां जाहालें तर आठां चौ रोजांत निवडेल. येशही दिसतें. आज दोन अडीच वर्षे या घोळामुळें दुसरें कांहींच सुचत नाहीं. जीव जगतील कसें हेंच येऊन पडलें आहे. तेव्हां एवढें कुभांड उठवावें लागलें. आतां कैलासवासी माहाराज यांचे पुण्येंकरून निर्गमांत येईल तेव्हां खरें. चिरंजीव राजश्री बाळोबाचीं व रावजीचीं पत्रें आज दोन महिने येत नाहींत. ते कोलापुराकडे आहेत. वर्तमान एकंदरीवरून कळत असतें. चिरंजीव राजश्री विश्रामजी अजमेरीस सुखरूप आहे. चिरंजीव राजश्री येशवंत आह्मांजवळ आहे. वरकड मंडळी जागजागीं सुखरूप आहे. व राजश्री बाबुराव पांडुरंग मात्र आमरेस मोर्चे लाविले तेव्हां शहरांत होते ते इंगळे याचे हातीं लागले. ते मात्र मुलेंमाणसें सु॥ कैदेंत आहेत. आतां पागनीस आले. निवाडा जाहालेवर सुटतील. देवाशाकडील वर्तमान. उभयतां चिरंजीव यांचीं पत्रें जातात. असतील; त्याजवरून कळतच असेल. चिरंजीव विश्राम याचें लग्न वैशाख माशीं उरकून घेतलें पाहिजे. त्यास एक कारकून हरदेंत नवरी आणावयाकरितां पाठविला आहे. आठ चौं रोजीं नवरी घेऊन येईल. येतांच रवाना करून देतों. लग्न उरकून घेतील. तुमचे शरीरीं आराम नव्हतें; त्याचें वर्तमान कांहींच कळलें नाहीं. तें आराम जाहलें याचें लिहिलें पाहिजे. एक रोज स्थितीची चिंता व दुसरें तुमच्या शरिराची चिंता. यांत श्रीदेव काय करील तें खरें. चिंतेखालीं आज दोन अडीच वर्षे गेलीं. यामुळें शरीरांत त्राण राहिलें नाहीं. नित्य उठोन स्वारीस जाणें लागतें. ती मेहनत कोठवर लिहावी. दोन दोन रोज आंघोळही होत नाहीं. आण रुपये यांचा तोटा. यामुळें दुप्पट मेहनत पडती. वरकड वर्तमान मागाहून लिहून पाठवूं. आपण चिंता न करावी. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री गणबा व आणा व आपा यांस आशीर्वाद. तुह्मांकडील वर्तमान लिहीत जावें. हे आशीर्वाद.

सेवेसीं भिकाजी बापू रांगणेकर दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती ऐसा जे. आपलें स्वद-

स्तूरचें पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. असें यास हमेशा तिकडून कासीद येत असतात; त्यांजबरोबर पत्र येऊन सांभाळीत असावें. इकडील वर्तमान यजमान स्वामीनें लिहिलें आहे; त्यावरून सेवेशीं कळों येईल. हे विनंती. कृपालोभ कीजे.

लें० नं. २८९ श्री. तारीख २२ जून सन १७९९.

पै॥ छ० मोरम सन मयां तेन व आलफ.

श्रियासह चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती—बाळाजी राम अनेक आशीरवाद उपरी येथील कुशळ ता। छ० १७ मोहरम मुकाम नजीक रहिमतपूर जाणोन स्वकीय कुशळ लिहिणें. विशेष. बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंतातूर असों. तरी असें न करितां हरघडी पत्र पाठऊन वर्तमान कळवीत जाणें. इकडील वर्तमान राजश्री मामा आंग्रे व राजश्री आबा चिटणीस व राजश्री तात्या[1] पागनीस व बाजीबा मोदी असे समेटाच्या बोलण्याकरितां आले आहेत. काल बुधवारीं दोनप्रहरीं भेटी जाहल्या. पुढां कांहीं ठरेल तें मात्र लिहून पाठवितों. आमचे शरीरास वायूचा उपद्रव जाहाला. त्यास नारायण तेल पाहिजे. तेथें शोध घेऊन जलदी पाठवून द्यावें. हालीं वायूचा उपद्रव कांहीं हलका पडला. आपण चिंता न करावी. तुह्मांकडील वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. तुमचे शरीरास कसें आहे तें लिहीत जाणें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. २९० श्री. तारीख २३ जुलई १७९९.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेसीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता। छ० १९ सफर जाणोन स्वकीय कुशळ लेखन केलें पाहिजे. विशेष. आपण सौभाग्यवती पार्वती ( ) सुद्धां श्रीदेवापाशीं केरीस जाऊन राहिलीं. ( ) पत्रें येऊन वर्तमान तुह्मांकडील आराम जाहल्याचें कळलें नाहीं. त्यावरून मोठी रात्रंदिवस चिंता लागली आहे. तर तुह्मांस व सौभाग्यवती बाईस आराम जाहलें याचें वर्तमान लिहून वरचेवर कळवीत जावें. इकडील वर्तमान राजश्री तात्या पागनीस व आबा चिटणीस व बाबूराव आंग्रे व जुरस फिरंगी व बाजीबा मोदी असे आले आहेत. भाऊ रावजीचें व त्यांचें एक चित्त होऊन समेट ठरून बोलणें चालणेचा इत्यर्थ ठरला. श्रीमंत मातोश्री अकरा लाखांची जाहागिरी व असेरचा किल्ला ( ) सुद्धां घ्यावा. व बक्षीनीं फौजेची खातरजमा करून फौज सुद्धां वानवडीस जावें; असें ठरवून सालपेंपर्यंत वानवडीस आलों आहोंत. पुढां पुलाकडे जाऊन आणखी खासगत तुह्मांकडील जाबसाल आहेत ते ठरवून मातोश्रीचें कूच श्रीगोंदेंकडे व्हावें; व भाऊ रावजीचें कूच वानवडीकडे व्हावें. असें ठरलें आहे. पुढें जें होईल तें पाहावें. तीर्थस्वरूप राजश्री बापू व राजश्री लखबादादांचा मुकाम उदेपुरानजीक आहे. वानवडीहून पत्रें सरकारचीं पागनीस यांनीं पाठविलीं होतीं. पिरूस व आंबोजी इंगळे यास पूर्ववतप्रमाणें बापू व दादा यांजकडे हिंदुस्थानचे मुखत्यारीचें काम सांगितलें आहे. त्याची आज्ञेप्रमाणें वागणें करणें परत त्यांनीं कांहीं पत्रें मान्य केलीं नाहींत. याजकरितां चार दिवस उदेपूरचे रोखे आहेत. परस्पर किंतु निवारण जाहला नाहीं. आंबोजीचें ह्मणणें पलटणें व फौज परत उभयतांस इतबार येत नाहीं असें आहे. आपलेकडील वर्तमान वरचेवर लिहून पाठवावें. बहूत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

---

१. बाळोबा तात्या.

लें० नं. २९१ पै॥ छ० २८ श्रीगजानन. तारीख २२ आगष्ट सन १७९९.
रबिलावल शुक्रवार.

तीर्थस्वरूप राजश्री साबाजी काका वडिलांचे सेवेशीं.

बाळकें लक्षुमणानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ता॥ छ० १९ रबिलावल मुकाम निरातीर येथें वडिलांचे आशीर्वादें सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. वडील येथून गेलेपासून एकही आशीर्वादपत्र येऊन सांभाळ जाहाला नाहीं. तर अशी निष्ठुरता न करितां येणाराबरोबर आशीर्वादपत्र पाठवून सांभाळीत असावें. हल्लीं आपले शरीरीं फिरोन समाधान नाहीं व सौभाग्यवती मातोश्री पार्वती होनीस समाधान नाहीं. ह्मणोन परस्पर ऐकिलें. त्यावरून चिंता जाहाली आहे. त्यास औषध उपाय कोणाचा करितां;,हाल्लीं कसें आहे तें लिहावें. बरवेपणाचें लिहून येईल तेव्हां चिंता दूर होईल. इकडील वर्तमान तर समेटाविशीं वानवडीहून राजश्री तात्या पागनीस व आबा चिटणीस व बाबूराव आंग्रे व कंपूवाले फिरंगी असे पुसासावलीचे मुकामीं आले होते. बोलणें जाहलें. बोलणें ठरून येथें मुकाम जाहला. बोलणेंचा ठराव ह्मणाल तर श्रीमंत बायांस आशेरचा किल्ला द्यावा. आण अकरा लाखांची जाहागीर बऱ्हाणपूर व सरकार हांडा व जाहाजाबाद असे व आणखी मिळोन अकरा लक्षांचे माहाल द्यावे. आण बायांची खासगी वस्तभाव जवाहीर जें आहे तें घ्यावें. रावजीनें[1] वानवडीस पहिल्याप्रमाणें कामकाज करावें. आण भाऊनें[2] बरोबर असावें. अगर वानवडीस पहिले प्रमाणें काम करावें. असें ठरावांत आलें आहे. रावजीस वीस हजारांची जाहागिरी व भाऊस दाहा हजारांची द्यावी असें ठरविलें आहे. बायांचे चित्तीं रावजीनें आपले बरोबर असावें. आण भाऊनें वानवडीस असावें. असें बायांचें मत. वानवडीकर यांचें ह्मणणें कीं, रावजीनें वानवडीस असावें. याप्रमाणें ह्मणणें आहे. त्यास अमूक असें अद्याप ठरणेंत आलें नाहीं. कोणास जाणेंचें ठरतें पाहावें. जाहागिरी व किल्ला द्यावा येणेंप्रमाणें येथून पागनीस व चिटणीस व आंग्रे व फिरंगी असे वानवडीस गेले. त्यांजबरोबर येथून देवजी गौळी व यशवंतराव शिवाजी यांजला येथून पाठविले आहेत. ते येथून जाहागिरीच्या सनदा व किल्लेची सोडचिठ्ठी व बायांची वस्तभाव असे घेऊन येणार. ते आलेवर मग येथून कूच होऊन पुलापार होतील. आण बोरघांटाखालीं जाऊन मग माहालास किल्लेस ठाणें बसेल. ह्मणजे मग बराणपुरास जातील; असें बायांचे मतें ठरलें. श्रीमंत दौलतरावांचे चित्तीं बोरघांटाखालीं आलेवर आपण भेटीस येणार. भेटी होऊन मग बऱ्हाणपुरास जावें. असें त्यांचें ह्मणणें पडतें. त्यांस बायांचे चित्तीं कीं आपण कांहीं भेट त्यांची घेणार नाहीं. परभारें बऱ्हाणपुरास जावें असें ह्मणणें बायांचें पडतें. आण त्याचे चित्तीं भेट घ्यावी. भेट घेतल्याविना सलूक जाहला असा—

२ ति॥ राजश्री साबाजी काका यांसी विज्ञापना—मुलकांत समजणार नाहीं याकरितां आपण भेटी घेणार. असा त्याचा निश्चय आहे. आण बाईचें ह्मणणें तर भेटी त्यांची घेणार नाहीं. यामुळें सलूख न जाहाला तर चिंता नाहीं. परंत भेटी घेणार नाहीं; ऐसा बायांचा निश्चय आहे. पुढें कसें होतें पाहावें. फार करून भेटीचें ठरवितील असें आहे. देवजी गौळी व यशवंतराव शिवाजी अद्याप आले नाहींत. आल्यावर पुढें कसें होईल तें लिहितों. मधली बाई भागीरथीबाई

१. नारायणराव बक्षी यांणीं. २. बाळोबा भाऊ बक्षी.

नगरास नेऊन ठेविली होती. ती तिथें देव आज्ञा जाहाली. कळावें. हिंदुस्थानाकडील वर्तमान तर ती॥ राजश्री बापूचे कागद छ० ४ सफरचे काल आले होते. त्यांत त्याणीं लिहिलें होतें कीं; येथील समेट होतो ह्मणून ऐकिलें. त्यास कोणते प्रकारचा ठराव होऊन कसा समेट केला. येथें आपणास सरदारीसंबंधानें दाहा बारा लाख रुपये कर्ज जाहालें. त्याचीही तोड लाऊन घ्यावी. आण आपणास कर्जातून मोकळें करावें. सलूख जाहालेवर दसरा होतांच आपण येणार. श्रीदेवाचा नवस आहे. तेव्हां दसरा जाहलेवर घरीं येणार. असें लिहिलें होतें. विश्राम काकाचें लग्न वैशाख शु॥ एकादशीस जाहालें. सरकार हांडेहून नवरी आणिली ह्मणोन लिहिलें होतें. बापूविसीं काळजी न करावी. आपले शरीरास आराम जाहाल्याचें लिहावें. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

हे॥ ती॥ राजश्री नाना माद्रेकर साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहावें. इकडील वर्तमान तर पत्रीं लिहिलेवरून कळेल. जावदेकडील व अजमेरीकडील हाल्लीं कांहीं पत्रें आलीं नाहीं. येतांच लिहितों. बापूचे कागद आले. त्यांत आपली मंडळी अजमेरीची व जावदेची सुखरूप आहे. ह्मणून लिहिलें होतें. कळावें. आपण वरचेवर पत्र पाठवून सांभाळीत असावें. हे विज्ञापना.

हे॥ राजश्री शिवराम बाबा स्वामीस साष्टांग नमस्कार विनंती. उपरी आपणाकडून फार दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर ममतेचे जागां असें न करावें. येणाराबरोबर पत्र पाठवून ममतेची वृद्धी करावी. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

हे॥ राजश्री नारबा पालयेकर स्वामीस साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील लिहितार्थ परिसोन येणाराबरोबर पत्र पाठवून संतोषवीत असावें. हे विनंती.

हे॥ राजश्री गणपत रावजी व आना व आपा यांस नमस्कार. तुमच्या मातोश्रीस आमचा साष्टांग नमस्कार सांगावा हे विनंती.

ले० नं. २९२ श्री. तारीख २४ आगष्ट सन १७९९.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका वडिलांचे सेवेसीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता॥ छ० २१ रबिलावल मु॥ पूल निरेचा जाणोन स्वकीय कुशळ लेखन करावें. विशेष. सांप्रत आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यांत काल राजश्री येसोजी रामकृष्ण आरंवदेकर यांचें पत्र आलें. त्याणीं लिहिलें होतें कीं; आराम नाहीं. त्यावरून मोठी चिंता लागली आहे. तरी आपले स्वदस्तुरचें पत्र येईस्तं तुह्मांकडे लक्ष आहे. तरी ( ) येऊं. बरवेपणाचें वर्तमान लिहून कळवावें. इकडील वर्तमान तर वानवडीस कंपू दोनही राहिले. बाकी फौज दरोबस्त इकडे आली. येथें हजार दोन हजार स्वार मात्र आहेत. परंत कंपू येथें आहेत. त्यामुळें मसलत जड पडली आहे. ईश्वर पार पाडील तेव्हां खरें. आतां आपले स्वाधीन कांहीं नाहीं. कंपूवाले यांचें बोलणें लागलें आहे. परंत कंपू निघोन अद्यापि येत नाहीं. येथें मुलें मनुष्यें आहेत. त्यांस कोंकणांत रवाना करावें असें होतें. परंत श्रीमंत मातोश्री बाईचा निरोप होत नाहीं. ही एक ईश्वरें गळ्यांत गोणी बांधली

१. दौलतरावांकडे किंवा सर्जेराव घांटगे यांच्याकडेस.

आहे. या अरिष्टांतून ईश्वरें एक वेळ पार पाडलें ह्मणजे उत्तम आहे. नसल्यास घडगत नाहीं. असो. आपण श्रीचा कौल वारंवार घेत असावा. आमचे घरचाही कागद येत नाहीं. असो. आपणास आराम जाहालें याचें वर्तमान लिहून सत्वर पाठवावें. वडिलांचीं पत्रें काल आलीं होतीं. सुखरूप आहेत. कळोन आलें. आतां त्यांजकडील चिंता न करावी. बहूत काय लिहिणें हे विनंती.

ले० नं. २९३ पै॥ छ० २३ माहे जमादिलावल श्री. पै॥ छ० २१ रबिलावर मु॥ खांवगांव. ब्रहस्पतवार सन मयां. तारीख २६ आगष्ट सन १७९९.

चिरंजीव राजश्री बाळकृष्ण यांस प्रती—जगन्नाथ राम अनेक आशीर्वाद उपर कुशळ ता॥ छ० २३ रबिलावल मु॥ नजीक सांवरे जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत जावें. विशेष. तुह्मांकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून काळजी लागली आहे. त्यास दररोज पत्रांतून हांकीत देत जावें. ह्मणजे वर्तमान कळत जाईल. यानंतर इकडील वर्तमान. राजश्री अंबाजी इंगळे याचें पत्र आजच आलें आहे कीं; आतां आपसांत लढावें हें ठीक नाहीं. मी एका स्वारानशीं आपले भेटीस येतों. आण गणेशपंत व डि बाईन यांस लिहिलें कीं; लढाल तर ठीक नाहीं. तुह्मीं जाऊन मिळावें. या प्रों त्यांचें लिहिणें आलें. आण तुमचे आपच चित्तांत अंदेशा कांहीं मागील गोष्टीचा असेल तर दरम्यान गंगाच आहे. परंतु त्याचा विश्वास येत नाहीं. मागां पांच च्यार वेळां गंगा देऊन दगा केला आहे. परंतु त्याचे परिणामीं गंगाच आली. गणेशपंताचें व फिरंगी याचें लष्कर बाजार लढाईचे रोजीं परजन्य पडून वाहून गेलें. आण शाहापूरवाला रसद त्यास देत नाहीं. ह्मणोन गंगा उचलून दिली. आण रसद देत गेला. त्याचा शाहापुरा वाहून गेला. बारारों घर बुडालें. लाखों रुपयांचा खराबा जाहाला. ईश्वरसत्तेकरून इंगळे यास गंगा प्रसन्नच आहे! बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद. सेवेशीं घनश्याम व्यंकाजी साष्टांग नमस्कार विनंती. लिहितार्थ परिसोन लोभ करावा हे विनंती.

ले० नं. २९४ पै॥ छ० १२ माहे रबिलाखर. श्री. माहे सपटंबर १७९९.

श्रियासह चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती–बाळाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यासी सविस्तर लिहावें. इकडील वर्तमान उभयपक्षीं समेट होऊन जाबसालास गेले आहेत. ज्याहागिरीच्या सनदा आणावयाकरितां गेले आहेत. त्या आलेवर येथून कूच होऊन पलीकडेस जातील. कळावें. खर्चास द्यावयाचा ऐवज त्याचीही तोड जोड करून ठेविली आहे. सनदा आल्यावर मग कोणत्या प्रकारें ठरेल तें मागून लिहून पाठवितों. तुमच्या शरीरीं आराम नाहीं. ह्मणोन लिहिलें. त्यास उपाय करीतच आहेत. दिवसेंदिवस गूण यावा तो नाहीं. आण अधिक होतें ह्मणून कळलें. त्यासी श्रीपाशीं कौल घेऊन गुण पडे तें करावें. खर्चाविसीं लिहिलें त्यास आह्मी त्या यत्नास लागलों आहों. जलदीच घडून येईल. आपले दुखणेंचा उपाव करीत असावा. आपण खर्चाविसीं चिंता न करावी. घडून येईल. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद. चिरंजीव राजश्री गणबास आशीर्वाद. उपरी तिकडील वर्तमान लिहिणें हे आशीर्वाद.

---

१. ही इंगळे यांची थट्टा आहे. २. देवापाशीं.

लें० नं. २९५ पै॥ छ० २४ जमादिलावल . श्री. तारीख ११ अकटोबर १७९९.
सन मया तेन व आलफ:

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेशीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ तागायत छ० ११ जमादिलावल जाणोन स्वकीय कुशळ लेखन केलें पाहिजे. विशेष. आपणाकडोन बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून मोठी काळजी लागली आहे. तरी वरचेवर पत्र पाठवून वर्तमान कळवीत जावें. इकडील वर्तमान तर दसरेचे दिवशीं सरकारचे मुकामापासोन बाळापा आण्णा याचा मुकाम दोन कोशांवर होता. तेथें पलटणांनीं येऊन गर्दी करून लुटोन फस्त केला. एका वस्त्रानशीं दैळानें निघाला. त्याजवर दरम्यानीस फिरंगी होता. त्यानीं रदबदली केली. परत फौज तयार होऊन पलटणें घेरून लढाई जाली. इकडील दाहावीस असामी ठार जाहाली. जखमीही पांच वीस जाले. घोडींही दाहा वीस पडलीं. पलटणेचे पन्नास साठ माणूस कापून काढले. मग फिरंगी याणीं अतिशय करून गोष्ट मागून घेतली. जी वस्त भाव गेली असेल ती माघारे घेऊन पलटण काढोन घ्यावें. त्याजवरून झाडा घेऊन पलटण काढोन दिल्हें. आपणाकडील बरवेपणाचें वर्तमान वरचेवर लिहून चिंता निवारण करावी. अंतोबा भाऊ यास करविरास अटकाविलें ह्मणोन ऐकिलेवरून येथोन पत्रें व हुजेरे पाठविले आहेत. कोलापूरकर याजकडोन तुह्मीं येथें रुपये घेतलेत. परंत येत्या जात्यास काळ करून ठेविलेंत. असो. थोर आहां. आह्मांस ह्मणावया कारण नाहीं. परंत अंतोबा भाऊचे उपद्रें पाहवत नाहींत. येथेंही कोणाचे गांवीं नाहीं. ती॥ राजश्री बापूचीं पत्रें आलीं तीं बजिन्नस पाठविलीं आहेत. त्याजवरून कळेल. बहूत काय लिहिणें. कृपालोभ करावा हे विनंती.

लें० नं. २९६ पै॥ छ० २४ माहे जमादिलावल. श्री. तारीख २४ अकटंबर १७९९.

चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती—बाळाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ ता॥ छ० १३ जमादिलावल मुकाम शिकरापूर जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. इकडील वर्तमान पेशजीं पुलाच्या मुकामीं तात्या पागनीस व फिरंगी येऊन व समेट करून बोलीचाली करून गेलेवर मातोश्रीचा जामदारखाना व मुलुकाच्या सनदा आणोन द्याव्या; आण पुढां फौजेस खर्चास देऊन बंदोबस्त करावा असें ठरविलें. त्यास जामदारखाना व सनदा व खर्चास घेऊन आले. मात्र भेटीचा जाबसाल राहिला. त्यास मातोश्रीच्या चित्तांत भेट न घ्यावी. आण त्याचा भेटीचा आड पडला. त्यास फिरंगी यासी भेटीची माफी करावी. येविशीं वानवडीस पाठविले होते. त्यास पेशजीं बाळापा आण्णा पंढरपूरच्या सुमारें आले होते. तेव्हां पत्र पाठविणेंस मानीत नव्हता ह्मणोन वानवडीहून पलटणें त्याजवर रवाना केलीं. परंतु त्याची याची गांठ पडली नव्हती. त्यास बाळाप्पा आण्णा आमच्या लष्करापाशीं आलेवर पलटणाची गांठ पडली. तेव्हां दसरेच्या दिवशीं प्रातःकाळीं छापा घालून बाळाप्पा आण्णास लुटून घेतला. तेव्हां अवघ्यांचा विघड जाहला. तेव्हां मसलत भारी पडली. तेव्हां राजश्री भाऊ दिवाण व तीनही कंपूचे फिरंगी व बाजीबा मोदी आले आहेत. फिरंगी यांजकडून गोष्ट गेली. आह्मीं न सांगतां कर्म त्याणीं केलें. त्याचें पारपत्य करितों ह्मणोन गोष्ट मागून घेतली. तेव्हां फिरून पेशजी बोलणेंप्रमाणें ठरण्यांत आणावें.

---

१. फौजेनें.

मात्र भेट नाहीं. याजप्रमाणें करार करावा. ह्मणोन मागां एक कूच करून मुकाम मजकुरीं आलों आहों. पुढां पेशजीं ठरण्यांत आलें; त्याजप्रमाणें ठरेल चिंता नाहीं. फौज घेऊन बक्षीबावानीं भेटावें. याजप्रमाणें ठरलें. येथील चिंता नाहीं. तुह्मांकडील रात्रदिवस चिंता लागली आहे. खर्चाविना अडचण एक; दुसरें आमच्या शरीरास ठीक नाहीं. असे दोन चिंतेंत पडलों आहों. यांत ईश्वर कसा पार पाडतो कळत नाहीं. खर्चाची तरतुजेंत आहे. घडून येईल तेव्हां खरें. घरांत लुगडीं पाठवावीं ह्मणोन घेऊन ठेविलीं आहेत. रामास एका दो रोजांनीं पाठवावा. हिंदुस्थानांतील सर्व सुखरूप आहेत. त्या उभयेतांस वानवडीहून वस्त्रें सुभेचीं पाठविलीं आहेत. व मेवाड प्रांताचा सुभाही आंबोजी इंगळे याजपाशीं होता, तो यांस सांगितला आहे. पूर्ववतप्रमाणें चालावें विसीं कागद गेले आहेत. मातुश्रीची आज्ञा पाहिजे तेही येथील बंदोबस्त आलेवर पाठवितील. ती॥ राजश्री अंतोबा भाऊ घरीं निघून आले; ते राजोंनीं अडकाविले ह्मणून वर्तमान आलें आहे. त्यास पक्केपणीं समजत नाहीं त्यास काय तें उत्तर पाठवावें. ते प्रांतीं इंग्रज आला आहे. ह्मणोन वर्तमान आहे. गोमंतक प्रांत फिरंगी यांणीं इंग्रजास दिला ह्मणून सांगतात हें सविस्तर लिहिणें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री गणबास व आनास व आपा यांसी आशीर्वाद उपरी तुह्मांकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. चिरंजीव राजश्री काकाच्या शरीरीं कसें आहे तें लिहिणें. व सौभाग्यवती बाईस वाताचा उपद्रव होता तो कसा आहे. तें सविस्तर लिहिणें. तुह्मांकडील सविस्तर लिहिणें. हे आशीर्वाद.

ले० नं. २९७ पै॥ छ० २६ जमादिलाखर श्री. तारीख ११ नवंबर सन १७९९.

व सन मयां.

चिरंजीव राजश्री साबाजी यास बाळाजी राम आशीर्वाद उपरी तागायत छ० १२ जमादिलाखर पावेतों मुकाम पाठाळ येथें आहों. विशेष. चिरंजीव राजश्री रावजीची व श्रीमंत राजश्री दौलतराव बाबांची भेट जाहाली. राजश्री तात्याचे विद्यमानें सल्ला थारला आहे. आपणांस कळावें. आह्मी मातोश्रीबराबर राहिलों आहों. त्यास रोज उठोन पत्रें येतात कीं तुह्मीं लष्करांत यावें. त्यास त्याचे हातें बक्षिगिरीचें काम चालत नाहीं. यास्तव संकट पडलें. आण येथेंही कोणी नाहीं. याजकरितां राजश्री तात्याही एका दो रोजीं येणार आहेत. ते आलेवर जें ठरेल तें लिहून पाठवितों. आपण कोणे गोष्टीची चिंता न करणें. तोरापा नाईक याची चिठी हजार रुपये केलेत ते पटघून देतों. यंदां लग्नें करावीं खर्चासही पाठवितों. कळावें. चिरंजीव राजश्री ओंना व आपो यांस ताकीद करून लिहिणेस लावावें. नाहीं तर दांडगे होतील. चांगलें तें करावें. ती॥ बापू व सर्व सुखरूप आहेत. कळावें. वरकड वर्तमान चिरंजीव रावजीचे पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून कळेल. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले० नं. २९८ पै॥ छ० १२ रजब. श्री. तारीख २५ नवंबर १७९९.

चिरंजीव राजश्री साबाजी याप्रती—अंताजी रघुनाथ अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ

---

१. नारायणरावांनीं. २. जगोबा बापू व लखबादादा यांस. ३. कोल्हापूरचे राजे. ४. काशीबा आना केरकर. ५. रामबा आपा केरकर.

तागायत छ० २६ जमादिलाखर मुकाम ( ) ला तळेगांव लष्करांत जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत जाणें. विशेष. आलीकडे तुह्मांकडोन पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर असें न करितां येणाराबरोबर पत्र पाठवून बरवेपणाचें वर्तमान लिहीत जाणें. यानंतर इकडील वर्तमान तर वानवडीकर यांचें कूच पंचमीस मार्गशीर्ष शुद्ध पक्षीं होणार ह्मणोन बोलवाई आहे. परंत कूच होऊन जातील तेव्हां खरें. हिंदुस्थानाकडील वर्तमान चिरंजीव राजश्री जगोबा बापू व राजश्री लखबादादा माळवेंत उज्जनीस आहेत. माळवेंतील बंदोबस्त करून बापू उज्जनीस राहणार. व राजश्री लखबादादा कोटेकडेस जाणार आहेत. मथुरेकडेस आंबोजी इंगळा व पिरू पलटणवाला एक होऊन तिकडील रान फिरलें आहे. परंत शेकरूचीं पलटणें व जहान फिरंगी खंडेराव हरीकडेस होता. त्यांचीं पलटणें अद्याप बापू व लखबादादा यांकडेस आहेत. यानंतर कसें होईल तें पाहावें. श्रीमंतांची व आला त्याची ममता आपलेकडेस आहे. श्रीमंत बाईसाहेब यांच्या पक्षाचा नाबसाल वानवडीकर याजकडेस करितात. समयास खर्चास आलीकडेस चाळीसपन्नास हजार आला त्यानीं दिले. आणखीही देतों ह्मणोन सांगितलें आहे. त्यावरोन याजकडील कारकून गणोबा चिटणीस व गणोबा बोरकर पुर्णेस गेले आहेत. श्रीची कृपा झाली तर सर्व यथास्थित होईल. अजमेरीकडील वर्तमान उभयतां चिरंजीवांचीं पत्रें बजिन्नस गेलींच आहेत. त्यावरून कळों येईल. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद. चिरंजीव राजश्री जगोबा बापूंचेंही पत्र तुह्मांस आहे. त्यावरून कळों येईल. हे आशीरवाद.

लें० नं. २९९ छ० २७ शाभान. श्री. तारीख १४ डिसेंबर १७९९.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री साबाजी काका स्वामीचे सेवेशीं.

सेवक बाळकृष्ण विठ्ठल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता। छ० १६ रजब मुकाम[१] लष्कर शाहाजापूर जाणोन स्वकीय कुशळ लेखन केलें पाहिजें. विशेष. आपणाकडोन बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यावरून काळजी लागली आहे. त्यास वरचेवर पत्र पाठवून वर्तमान कळवीत असावें. इकडील वर्तमान तर आपलें लष्कर उज्जनीवर मुकाम करून होतें; त्यास यशवंतराव होळकर याचा व आपला एकोपा जाहाला होता. आण लष्कर त्याचें आपले सन्निध उतरलें होतें. त्याणीं विश्वास दाखवून एकाकीं लष्करावर कार्तिक शु॥ १५ चे दिवशीं छापा घालून लष्कर लुटून घेतलें. ते दिवशीं लखबा वागळा यास तोफेचा गोळा लागोन ठार जाहाला. वरकड सर्व आपली मंडळी सुखरूप आहे. ( ) चे दिवशीं एक एक घोडेनशीं हजार दोन हजार जमेतेनिशीं मातोश्री बाईसाहेबांस घेऊन ते दिवशीं वीस कोश आलों. मागां उज्जनीस बेदा होता. लखबास खाटेवर घालोन माणसांनीं शहरांत आणिला. तेथें काळ जाहाला. सरकार मिळाला नाहीं. बेदेमुळें ते पक्षीं प्रेत माघें होतें. त्याणीं टाकला. अग्न द्यावयास समयीं मिळाला नाहीं. वरकड वर्तमान ती॥ वडिलांचे पत्रावरून कळेल. बहूत काय लिहिणें कृपा असों द्यावी. हे विनंती. पेशजीं राजश्री रामचंद्र बापला रांगणेकर याजबरोबर बचकनी सोंवळें कोरदार पाठविलें होतें. तें पावलेचें कळलें नाहीं. तर लिहावें. न दिलें असल्यास मागून घ्यावें. हे विनंती.

---

१. तारीख १ डिसेंबर सन १७९९. २. होळकरांची कैफियत पृ. ८२.

लें० नं. ३०० सन १७९९.

(या पूर्वींचा बंद मिळत नाहीं.)

२ पु॥ तीर्थस्वरूप राजश्री काकास विज्ञापना—चाळीस वर्षांच्या आह्मांकडील मामलती दूर करावयास कांहींच अंदेशा त्यांस न पडला. पुढेंही कितीएक किसें काढोन आह्मांस गिरिफदारींत आणावें. आमचा टिकाव येथें न व्हावा. हें मनापासून त्यांच्या आहे. आह्मीं कितिएक निखालसपणीं चाललों; तरी त्यांच्या मनांत काय आहे समजत नाहीं. त्यांत शिकवणार एक दोन गृहस्त आहेत. ते मेळ पडूं देत नाहींत. अशी अवस्था येथील आहे. खर्चास एक पैसा मिळणें कठीण. आजपर्यंत श्रम करून जे जे जाबसाल जाहाले; ते आपणांस माहितच आहेत. त्याचें फळश्रुत आली. अबरू राहाणें कठीण. नगरच्या किल्ल्यांत होतों परंतु असें दुःख पाहिलें नव्हतें. पुढें ईश्वर कसा परिणाम लावितो पाहावा. तीर्थस्वरूप भाऊ मातुश्री बायांकडे उगेच आहेत. तेथें त्यांचें वजन ठेविलें नाहीं. चौंकडील दशा अशी करावयाची योजिली आहे. ईश्वरें शर्त करून घडेल तें खरें. आपणास कळावयास लिहिलें आहे. श्रीदेवाचा कौलप्रसाद सांगणें येविसीं काय पडतें तें लिहावें. बहूत काय लिहिणें हे विज्ञासी.

लें० नं. ३०१

( )

वर साताऱ्या तागायत तिकडून दंगा होता. येथून कंपू व कांहीं मोंगलांची फौज व राजश्री परशराम भाऊची फौज नेमिली आहे. आपलीही फौज कांहीं कंपू समागमें पाठवावें ऐशी आहे. कंपूचें कूच होऊन पांचसहा कोशीं घांटाचे तोडीं जाऊन पडला आहे. पुढें होईल तें लिहून पाठवूं. कोलापूरवाले यांचें व नानाचें संधान होऊन त्याची कांहीं फौज तासगांवाकडेस आल्याचें वर्तमान उडतें येथें बोलतात. आज उद्यां तहकीक सरकारी समजेल. तिकडील आपलेकडील संस्थानचा बंदोबस्त कसकसा आहे; तें लिहून पाठवावें. या घा ( ) त राखोन राहाणें ठीक आहे. सरकारचीं पत्रें घेऊन जासूद येथें आहेत. त्याचीं उत्तरें राजश्री बाजीबा व आह्मीं मेळून देऊन एका दो रोजीं रवानगी करून देऊं. राजश्री वेंकोबा मलगांवकर याजकडील वर्तमान कळलें नाहीं. येथून पत्रें सरकारचीं वगैरे पाठविलीं होतीं. त्यावरून ( ) तेथील काय जाहाला त्यासारखें लिहून पाठवावें. हालीं फिरंग्याकडील उपद्रवाचें कसें आहे; तेंही लिहिणें. तुह्मीं आपले सावधगिरीनें राहावें. (बाकी मजकूर खासगी सबब घेतला नाहीं.)

लें० नं. ३०२ सन १७९९.

(या पूर्वींचे बंद फाटले आहेत.) पत्र पाठविलें. परंतु आपलेकडून उत्तर देखील आलें नाहीं. त्यास अशी निष्ठुरता न करावी. वारंवार पत्र पाठवून कळवीत जावें. इकडील वर्तमान तर तीर्थस्वरूप राजश्री बापू व लखबादादा हे उ ( ) च फतकवा ( ) लरे प्रांतीं जावयासी जात होते. कां ह्मणाल तर अंबाजी इंगळे व पिरूसाहेब हे श्रीमंत राजश्री दौलतराव बाबांकडून सनदा आणून आगरेचा किल्ला खालीं करीत होते. तें वर्तमान तीर्थस्वरूप राजश्री बापूस कळलें. मग

१. हे दोघे गृहस्थ कोण ? ह्या संधीस सरजेराव व नाना आणि त्यांच्याच तंत्रानें चालणारे बाजीराव, हे खलबतें करीत होते. दौलतरावांस हितबोध करून त्यांचें मन कलुषित करणारी मंडळी हींच.

राजश्री लखबादादा यांजबरोबर फौज देऊन रवाना केलें. तेव्हां राघोगडवाला दाहा हजार फौजेनशीं येऊन भेटला. मग त्यास राघोगड बाळोजी इंगळेकडे होते; ते त्यास खालीं करून दिल्हा. मग हें वर्तमान बाळोजी इंगळे यासीं कळलेवर बापूसी द ( ) व सटवाजी फाळके ( ) केनी इंगळे याणीं एक ( ) करून बापूवर दंगा करावा ऐसा बेत करून बापूस सांगून पाठविलें कीं; आह्मी व तुह्मी एक आहों. तुमचे भेटीस आह्मी येतों. ह्मणोन आले तेव्हां बापूस कळलें कीं; फितूर आहेत. तेव्हां हे—( )

लें० नं. ३०३ श्री.

राजश्री साबाजी राम केरकर गोसावी यांस.

छ० अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्त्रीं कमळजाबाई भोंसुले सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय. येथील क्षेम जाणोन स्वकीय लेखन करावें. विशेष. राजश्री रेवळो रामचंद्र याणें लबाडी आरंभिली याजमुळें त्यास कैद करोन ठाणेंचा बंदोबस्त केला. ऐसीयास राजश्री नारायणराव जिवाजी यांस तुमचें पत्र द्यावें जे. त्याजकडील कोणी दरबारी जाल ते समजावितील. तर तुह्मीं राजश्री दौलतराव शिंदे यांस सांगोन इकडील कोणी तुह्मांकडे पाठवितील तर राजश्री शिंदे यांचीं पत्रें इकडील साहित्याविसीं घेऊन द्यावीं. पुरातनपासोन तुह्मी इकडील अगत्य धरून काजकाम करीत गेलां; त्याप्रमाणें पुढांही करावी. सर्व अभिमान तुह्मांस इकडील आहेच. वरकड राजश्री सदाशीव गोपाळ रांगणेकर लिहितील त्यावरून कळों येईल. रवाना छ० २७ रबिलाखर बहूत काय लिहिणें. मा.

लें० नं. ३०४ श्री.

मोहीबान पन्हां मखलीसान दस्तगाहः अजम साबाजीराव केरकर मुकाम आरवदे दाम मोबतहू.

अजदिल येकलास आंतोन फ्रांक बेलीकु. देवे करुकसें रजेंत मोरदेईफांते रीतिजेरर जरालदे देत्रीच्युदगरे सलाम बाजद सलाम येथील जेकी जाणून मोहिबीं आपणाकडील कारनेकीं कलमे करीत असलें पाहिजे. दिगर लिहावयास कारण जे. अजम ज्यांकी जुजे सेवेरी कपितान दे इस्ताद हा आमचा सासरा आज नव वर्षांपासून मसु फिकेत याच्या कंपूंत होता. त्यास हल्लीं एकदोन मास जाह्मले; उभयतांमध्यें कांहीं विक्षेप येऊन मशारनिल्हे कंपूंतून निघोन बाहीर पुणेंस आहे. पुन्हां त्या कंपूंत तो राहणार नाहीं. ह्मणे. ऐसेंयास आपण दया करून एक पत्र अजम नारायण राव बक्षी यांस लिहून द्यावें कीं; मशारनिले जाकी जुजे यास प्रथुआकेक करून देणेंविसीं लिहून द्यावें. मशारनिल्हे हा चांगला गोलंदाज जातीचा फिरंगी मर्द आहे. ऐसें यास आपण कृपा करून मशारनिल्हे रावजी यांस एक पत्र सदर्हू मजकूर बरहुकूम लिहून आह्मांकडे पाठविण्यास आज्ञा असावी. ह्मणजे आह्मीं त्यांस पोहोंचता करूं. आण आपणही परभारें याचप्रकारें मशारनिल्हे रावजी यांस पत्र लिहून पाठवावें. तेणेंकरून आह्मांवर फार उपकार होतो. येविसीं विस्तार काय लिहावा. येथसारखें काजकाम असेल तर लिहून पाठवूंस अंतर नसावें. ज्यादा काय लिहावें. प्यार मोहबत असों द्यावा.

(फिरंगी सही आहे.)

---

१. हा चंद्रगडेचा राहाणारा होता. २. शिंद्यांचे लष्करांत गोव्यांचे फिरंगी (पोर्तुगीज) असण्याचें कारण गोव्याकडील प्रांतांत राहणारे जिवबादादा हे ह्या लष्करांत होते हें होय. हे लोक त्यांचे मार्फतीनें गोव्यांतून शिंद्यांकडे गेले होते. ३. नारायणराव बक्षी यांस.

लेॅ० नं. ३०५ पै॥ छ० ९ जिल्हेज श्रीशंकर. तारीख १९ एप्रील सन १८००.

सन मर्या आ.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य नारायणरायानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तारीख २४ छ० जिल्काद शनवार सायंकाळ वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. इकडून वरचेवर ( ) आहेत. त्यावरून कळतच असेल. मामलतीचा बंदोबस्त आपल्या आपलेकडे चालण्याचें पेशजीं लिहिलेंच आहे. बक्षिगिरीच्या कामाची आजवर घालमेल राहून चौंकडे जाबसाल होत होता. त्यास सरकारांतून व राजश्री तात्या यानीं खातरजमा करून आज दीडप्रहर दिवसास बक्षिगिरीचीं वस्त्रें व शिरपेंच व मोत्यांची कंठी दिली. पुढें अवघा बंदोबस्तही होऊन येईल. वडिलांस कळावया लिहिलें आहे. वैशाखमाशीं लग्नें उरकून घ्यावीं. चिरंजीव बाबास चिरंजीव राजश्री येसोबाची कन्या नेमस्त करावी ये ( ) दुसरें. अगोदरचें पत्र लिहिलें त्यांत लिहिलेंच आहे. वरदक्षणेचा जाबसाल येथें करून घेऊं. तेथें लग्नाचा निश्चय करून उरकून घ्यावें. लग्नें जाहल्याचें वर्तमान कळल्यावर माणसें येथें आणावयास पालखी पाठवावयाची तजवीज आहे. सडीं मात्र येतील. वरकड ती॥ मातुश्री ताई व मुलें तूर्त आणावयाचीं नाहींत. येथील यथास्थित बंदोबस्त जाहल्याचे अंतीं मग पाहावयास येईल. खर्चास मागाहून पाठवितों. खातरजमा असावी. सारांश यथास्थित समारंभ घडावा. खर्चाविसीं आपण चिंता करूं नये. वरचेवर वर्तमान लिहावें हे विज्ञाप्ती.

लेॅ० नं. ३०६ पै॥ छ १९ माहे सवाल रविवार श्रीशंकर. तारीख २९ फेब्रुवारी १८००.

सन मयां तेन व आलफ.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्य नारायणरावानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार तागायत फाल्गून शु॥ ५ वर्तमान यथास्थित. विशेष. आपलीं पत्रें पावोन लिहिलेलें कळलें. इकडील वर्तमान तरी वीस महिने श्रीमंत मातुश्री बायांसमागमें कस्त खाऊन ( ) गृहस्थास आणऊन त्यांचे विद्यमानें सलूख करून त्याणीं सांगितल्याप्रमाणें फौजसुद्धां वानवडीस येऊन यजमानसाहेबांची गांठ घेतली. तोंपर्यंत दुसरा विचार न दाखवितां पुढें आमचे विद्यमानचे लोक यांस खर्चास न मिळे. कितीक ठेवणें न ठेवणें त्यांचा बंदोबस्त न होय तेव्हां उठोन गेले; कित्येक राहिले. त्यांचाही जाब आह्मांकडून तुटत चालला. बक्षिगिरीच्या कामाचीही वहिवाट विस्कलीत पडली. चाळक इतकेही असोन आपलेकडील माहाल अजमेर जावद वगैरे यांचीं चौपाच साल रसदेचा ऐवज पांचसात लाख रुपये बाकी काढून निकट येथें आह्मांस लागली. याजकरितां आह्मीं येथें आल्यापासोन सरकारांतून पुसतील हें समजोन आज तीन महिनेपर्यंत चिरंजीव विश्राम यास ऐवजाचे तरतुदीविसीं लिहीत असतां एका पैशाची सरबराई होणार नाहीं. असें त्याचें उत्तर आजपर्यंत येऊं लागलें. चार साल सरकारांत एक रुपया न देऊन त्यांचीं लिहिणीं सबबेचीं येतात. मग तेथें अवस्था घडली ते त्यांचें तेथ पतक असों. त्याजकडून आधार नसतांही तेथें कारभारी यांसी आह्मीं बोलणें लाविलें कीं; आमचे फाजील पांच लाखपर्यंत आहे. व सुभ्यास कधीं सावकाराचें देणें बहूत असें असोन

दोन लाख साल मजकूरची रसद आह्मीं देऊं. परंतु येथें आमची एका रुपयाची पत नाहीं. तेव्हां वाडवून घ्यावें. तें कसें तर शिलेदारास ऐवज देणें त्यापैकीं एक लाख मजरा घ्यावा. आह्मी शिलेदारांस महिन्या दोन महिन्यांत ऐवज आणून देऊं व एक लाख सावकारी निशा दोन महिन्यांनीं देऊं. अजमेरीसही लिहिलें आहे. जाबसाल होऊन येईल; असें कितकें सांगितलें असतां ध्यानीं येऊन आह्मांकडील मामलती दूर करून काल राजश्री बाळाजीपंत मिर्जा यांजकडे सांगून सनदा त्यांस दिल्या. (या पुढील बंद मिळत नाहीं.)

लें० नं. ३०७ श्रीशंभू. तारीख २० एप्रील सन १८००.

राजमान्य राजश्री साबाजी राम केरकर यांस हुजूरची आज्ञा सुरु सन मयां तेन व ऑलफ. तुमचे घरीं मुलांच्या मुंजी दोन जहाल्या; त्यास अहेर व पुतळ्या व मोहरा पाठविल्या. तपशील.

सणगां अहेराचीं.	मुलांच्या हातामध्यें घालणेस.
४ तिवटें २ व शेले २	पुतळ्या ४ तारें ह्मोरा २
४ लुगडीं २ व चोळखण २	नग ६
८	

एकूण सणंगां ८ आठ व पुतळ्या चार व ह्मोरा दोन पाठविल्या आहेत. पेशजीं रा॥ विठ्ठल अनंत कवठणकर याजबरोबर दुपाटा जाहानाबाज तिवटें जाहानाबाज. एकूण सणंगां दोन पाठविले तीं पावलीं. छ० २५ माहे जिल्काद चंद्र मजकूर.

लें० नं. ३०८ शके १७२३ सन १८०१. श्रीशंभुः तारीख २३ जून सन १८००.

राजमान्य राजश्री साबाजी राम केरकर यांस हुजूरची आज्ञा. सुरु सन इहिदे मयां तेन व अलफ. आराबेवरून तेरेखोलेचे मार्गें चारशें लोक येऊन तुह्मांस कुटुंबसुद्धां हाताखालीं घालावें; असें केलें आहे. ह्मणोन ऐकितों. त्यास कळली बातमी तुह्मांस लिहिली आहे. तर तुह्मीं बहूत सावधपणें राहावें. घाळ न राहाणें. तुमचेकडील बंदोबस्त पक्का ते सरहद्दीचा असावा. येविसीं लोक पाठवून करणेंविसीं राजश्री दळवी भोंसले यांसही लिहिलें आहे. रवाना छ० १९ मोहरम चंद्र मजकूर.

लें० नं. ३०९ श्री. तारीख १८ सपटंबर सन १८००.

रोखा गांवकरान ता॥ आजगांव सुरुसन इहिदे मयां तेन व आलर्फ. लोकाजदमा राजश्री साबाजी राम केरकर चौकी घराजवळ आसामी पंचवीस २५ यांस रोज तांदूळ ०३॥।१। प्रमाणें एक माहे ता॥ उकडे १।१७०१॥। यास ऐवज सर्द पैकीं उकडे

१. वाडी सरकार. २. तेरेखोल येथें किल्ला आहे. सांप्रत ह्याच किल्ला इंग्रज व फिरंगी यांचे राज्याची हद्द आहे. ३. हे दळवी वाडी सरकारचे सेनापति होते. हे क्षत्रिय मराठे जातीचे असून यांचें घराणें फार जुनें आहे. यांच्या घराण्याकडे वाडी सरकार सावंत यांचे पूर्वीं देसाईपणा होता. "त्यांचे वेळेपासूनच हे आहेत. पहिल्या खेमसावंताच्या कारकीर्दींत शिवाजीचे वेळीं यांचा पुरुप राम दळवी मातबर मर्द माणूस होता." पहा शिवछत्रपतीची बखर पृ० ५६.

.|. मौजे तळवणें.

.|. मौजे आजगांव.

८१७८१॥. मौजे किनळें.

.|. मौजे आरंवदें.

.|. मौजे [illegible].

.|. मौजे आसोली.

१।१७८॥ एकूण तांदूळ उकडे पांच खंडी सत्रा कुडव दीड शेर देविले असेत. देऊन पावती घेणें. जाणिजे रवाना छ० २८ रबिलाखर (शिक्का) बारसुद्र.

लें० नं. ३१० श्री. सन १८००.

पुरवणी. चिरंजीव राजश्री साबाजी यास आशीर्वाद.

अजमेरीस फिरंगी याणें मोर्चे लाविले आहेत. आज दोन महिने जाहाले. किल्ला लढत आहे. किल्लेवर चिरंजीव राजश्री विश्राम आहे. व रंगोबा वगैरे आंत हुषारीनें लढत आहेत. मातोश्री लक्षुमी होनी वगैरे मुलेंमाणसें मारवाडांत मेडतेस रवाना केलीं आहेत. सुखरूप आहेत. अंबाजी ( ) जावदेस मोर्चे लावावे ह्मणून फौजसुद्धां जावदेनजीक आला आहे. चिरंजीव राजश्री बाळकृष्ण आरंवदेकर व मातोश्री ( ) मुलें माणसें गुजराथचे रोकीं मगऱ्यांत गेलीं आहेत. सुखरूप आहेत. याप्रमाणें इकडील अवस्था आहे. चिरंजीव राजश्री यशवंतराव आजमेरीहून आला तो आह्मांबरोबरच आहे. यंदां चोहूंकडून मोठाच बइदा उठला आहे. श्री कृपा करून पार पाडील तें खरें. चोहूंकडून खर्चाची वोढ लागली आहे. आण अमदानीस ठिकाण नाहीं. यांत अबरू राहतां कठीण आहे. तुह्मीं ( ) आह्मी सावधगिरीनें आहों. ( ) लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री गणबा व आना व आपा यांस आशीर्वाद. तुह्मांकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. ३११ पै॥ छ० २९ शाबान. श्री. तारीख १ जानेवारी सन १८०१.

तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातोश्री आका वडिलांचे सेवेसीं.

बाळकें बाळकृष्णानें चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ० १५ माहे साबान मुकाम राशीन जाणोन क्षेम असों. विशेष. आपण पत्र पाठविलें पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री साबाजी काकाचे शरीरीं आराम नाहीं कळलें. त्यास पथ्य यथास्थित करावें. खुबचंदाकडील काम करून पाठवावें. साबाजी काकास संशय पडला ह्मणोन लिहिलें. त्यास गोष्ट खरीच आहे. संशय पडायाचे गोष्टींत आजवर आलों नव्हतों. परंतु या दिवसांत बेदा याजकरितां दैवास गोष्ट आली खरी. परंतु कांहीं चिंता नाहीं. खुबचंदाच्या भावास पत्र पाठविलें आहे. तो इति दिवस येणार होता. परंत दौलतराव सिंदे यांचें कूच वानवडीहून जालें आहे. लढाईस इकडे यावयाची तजवीज आहे. याजकरितां सेट मजकूर आला नाहीं. बेदा मिटतांच जाबसाल उरकून येईल. ते गोष्टीची चिंता नाहीं. वरकड वर्तमान साबाजी काकाच्या पत्रावरून कळों येईल. बहूत काय लिहिणें हे विज्ञापी.

चिरंजीव राजश्री पांडोबा आरंवदेकर व आपा व कृष्णाबाईस अनेक आशीर्वाद उपरी तुह्मांकडील पत्र येत नाहीं. तर वरचेवर पत्र पाठवीत जावें. इकडील वर्तमान राजश्री साबाजी काका व ती॥ मातोश्रीस लिहिलें आहे; त्यावरून कळों येईल. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

---

१. पिरू ऊर्फ पेरण हा शिपायांचा सरदार असून, याच्या मनांचा ओढा सरजेराव घाटग्याकडे होता.

लें० नं. ३१२ पै॥ छ० २५ शाबान रविवार. श्री. [१] सन १८०१.

चिरंजीव राजश्री साबाजी[३] पासी प्रती—जगंनाथ राम व बाळाजी राम आशीर्वाद उपरी येथील कुशळ ता छ० १५ माहे रजब मुकाम लष्कर नजीक शाहाजापूर प्रांत माळवा यथास्थित असे विशेष. अलीकडे तुह्मांकडून कागदपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तेणेंकरून चिंता ( ) राव होळकर यांच्या भेटी जाहाल्या. ( ) प्रथम सलूख एक विचारेंच होता. अलीकडे माण-सार्चे इमान प्रमाणाचें ठिकाण राहिलें नाहीं. विश्वासघात हरामखोरानें केला. मातोश्रीचा मुकाम आणि होळकरांचा मुकाम जवळ लष्करास लष्कर लागूनच होतें. दगा करील हें कोणास ठाऊक. पाहाटेस छापा घालून ( ) चीजवस्त झाडून ( ) वत बाबुराव व घनबादादा व आनंदराव मळगांवकर व सदोबा दादा व साबाजी नारायण यांची बहूत खराबी जाहली. परंतु जिवानशीं सर्व आले. चिंता नाहीं. पुढेंही ईश्वरें कृपा केली तर सर्वच मिळेल. उज्जनीहून निघाले ते आह्मांकडे केरसदानजीक येऊन सर्व पोंचले. त्या गडबडींत एक लखबा वागळे यास तोफेचा गोळा लागून कार्तिक वद्य प्रतिपदेस काळ जाहाला. ( ) चिरंजीव राजश्री बाळोबा श्रीमंत मातोश्री बाईसाहेबांस घेऊन उज्जनीस आले. आह्मी मेवाड प्रांतीं होतों. मातोश्री उज्जनीस आल्यावर राजश्री यशवंतराव ( ) साहेब व चिरंजीव बाळोबा व सर्व मंडळी एका वस्त्रानशीं मात्र आह्मांकडे आले. दुसमानाचे हातीं कोणी लागलें नाहीं. इतकें काम मोठें जाहलें. बहूत खराबी जाहाली. ( )

लें० नं. ३१३ श्री. सन १८०१.

साष्टांग नमस्कार विनंती. पत्रें आलीं; त्यांतील मजकूर. मातोश्री बाया महेश्वराहून निघाले. राजश्री लखबादादा व बापू यांणीं जैपुरवाला यासी शिकस्त करवून खंडणी घेऊन आपणासी सामील जाहाला. पिरूचा अमल झाडून इमाम बक्ष यांच्या दिवाणाजवळ बेगमीचे पलटणांनीं उठविला. तेव्हां पिरू दिल्लीकडेस गेला. अंबाजी इंगळे याणीं बायांसी सामील व्हावें विसीं बोलणें लाविलें. खातरजमा करवून इंगळेस आपणापाशीं आणावें; ही सल्ला ठरविली. पिरून बाबासाहेबांस सामील येणेंविसीं पत्रें पाठविलीं. हिंदुस्थानचा अंमल झाडून आपलेपाशीं बापूनें व लाड याणीं केला. अंबाजीही मिळाले. अमल जाहाला. पिरूचे पारपत्यास उभयतां सरदार पाठीसीं लागले. बापू व लाड यांजवळ फौज चाळीस हजार आहे. यशवंतराव होळकर सामील जाहला. हरदे हांडे वगैरे मामलतीस ठाणीं बायांचीं बसलीं. इंगळे उभयतां बंधु बापू व लाड यांशीं सामील जामीन घेऊन बोलणें लाविलें. जबरी चांगलीच हिंदुस्थानांत बसली. यशवंतराव होळकर याचा बंधु विठ्ठलराव दक्षिणेस आला. तोही फौज घेऊन वानवडीस जाणार. अमृतराव वानवडीस आहे तो उगाच आहे. फौज करीत नाहीं. नंतर फौज पनरा हजार व पलटाणा बारा घेऊन येत ( ) पिरूचा अमल उठविला. तेव्हां तोही बोलणें लाविणार. राजश्री भाऊ वगैरे मंडळी सुखरूप आहेत. बाया उज्जनीस जातांच उभयतां सरदार येणार. पिरूचा आटकाव त्याचें पारपत्य करवून येतील. याप्रमाणें पत्रांत मजकूर होता. कळावें. बायांची जबरी चांगलीच पडत चालली. वानवडीस कंपू आहे. फौज नाहीं. फार काय लिहावें हे विनंती.

---

१. यशवंतराव होळकर. २. ही माहिती होळकरांच्या कैफियतींत पृष्ठ ८२।८३ यांत आहे. ३. साबाजी नारायण राजाध्यक्ष. ४. जगोबा बापू. ५. रजपुतांशीं मालपूर व दोषचे किल्ल्याजवळ झालेली मोठी लढाई. वि. शा. वि. पुस्तक ११, पृष्ठें ८९।९० पहा. ६. जगोबा बापू व लखबादादा लाड. ७. बापू व लाड हे उभयतां. ८, पत्र नं. २८४.

लें० नं ३१४ २

जयपूरवाल्याचा व मारवाडवाल्याचा वकील आला आहे. त्यास आज बोलणें त्याचें काय होईल तें लिहून पाठवूं. जयपूरवाल्याचा प्रकार दिसतो माहाराजांचे आज्ञेशिवाय आपण काडीमात्र चालणार नाहीं. मारवाड्यासीं तुह्मीं बिघाड केला तर आपण सामील तुह्मांस आहों. आज आज्ञा कराल तर फौज सरंजाम दौलतरायास पाठवून देतों. वरचेवर बोलणें जाहलें आहे. आज पक्केपणें बोलणें जयपूरवाल्याशीं होऊन सरकारांत लेहून पाठवूं. सरकार आज्ञा येईल त्याप्रमाणें करावयास येईल. मागाहून कच्चें पक्कें वर्तमान लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. मारवाडचेंही बोलणें होत आहे.

लें० नं. ३१५ श्री.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री साबाजी बावा केरकर स्वामीचे सेवेसीं.

सेवक गोपाळराव अनंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी आज बुधवार दोनप्रहर दिवस जाणोन आपण पत्र पाठविलें पावोन लिहिला मजकूर कळला. रावजीचें वर्तमान आलें त्यास पुढील विधें करण्यास वर्तमान त्या शुद्ध नाहीं. याविसीं केसें करावें. ह्मणोन पत्र लिहिलें. त्यास येविसींचें उत्तर सरकारच्या पत्रीं लिहिलें आहे. त्याप्रमाणें नगरास माणसें पाठवून यथास्थित वर्तमान आणून त्यासारिखा पुढील विध करावा. तोंपर्यंत करों नये. आज येथील वर्तमान आह्मांस आज आकेरीस ( ) जाहलेली आहे. उद्यां आल्यावर सविस्तर लिहूं. पुण्याहून माणसें अगर कागदपत्र कोणाचें आलें नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंती. श्रीमंत राजश्री आबा साहेबांचे कानावरही घातलें. त्यास हा वीध महिना दोन महिने ठेवावा. ऐसें शास्त्रही आहे. त्यापेक्षां शुद्ध वर्तमान येइपर्यंत ठेवावा. चतुर्थी जाहालेवर राजश्री काशिबा आ ( ) सही पाठवावें. येत जात असतां उत्तम हे विनंती.

लें० नं. ३१६ श्री. सन १८०१ अजमास.

राजश्री भाऊस आत्मारामानें साष्टांग नमस्कार विज्ञा ( ) बुधवार रात्रौ जाणोन आज सकाळ मी मेडेंत सरकार का ( ) गेलों होतों. तेथें कुणबिण पाठवून आज्ञा घेतली आण ( )ला रवाना केली. त्या उपर प्रहर दिवसास गोसावी मेडें-( ) आण जसा परजन्य पडतो ( ) यासी बोलला कीं आपणास इंग्रजानें खरा असा केला. ( ) दाखला आणतों. त्याशिवाई खंडाळेचे मुकामीं राजश्री मु ( ) नाईक धननाईक शामरावजी असे पांच दाहा असामी पंक्तीस जेवले. त्यांचा दाखला आणतों. असें फार बोलला. तें कोठवर लिहूं. तेथ मी दुभासपणास होतों. तेचें बोलणें चालूं दिलें नाहीं. समक्ष भिकशेट ( ) होते. ते परस्पर तुह्मांस सांगतील. आणखीही वीस ( ) पंचवीस गृहस्त होते. त्यांत आणखी मजवर इत्राजी ( ) सी पेडणेंतील मुत्सुदी व दुभासपण करितात. ( ) पांचपांचशीं रुपये खाऊन बोलतात. असें बोलतात. परंतु त्याची खातर वागविली नाहीं. श्रीनें आह्मांसच येश देऊन ( ) धण्याची चांगलीच जाहली. मात्र त्यास उत्तर केलें कीं ( ) ही करील असें दिसतें. कुणबिणीविसीं फार अन ( ) आह्मीं त्यास उत्तर केलें

---

१. हें जगोबा बापूचें पत्र असावें. २. नारायणराव बक्षी. ३. मारले गेल्याचें. ४. उत्तरकार्यविधि. ५. बाणांस लावून उडविल्यामुळें ते फार दूर जाऊन पडले होते. त्यांचा कांहीं महिनेपर्यंत शोध लागला नव्हता.

कीं; तो नारायणराव खरी जाहलेस् सर्वच त्याचें. तंव परयंत एक काडीस आढळं देणार नाहीं. ह्मणोन सांगितलें. परंत मी येथें नेहमीं नाहीं. परंत ( ) करीवर आहों. चिंता नाहीं. कृपा कीजे हे विनंती.

लें० नं. ३१७ श्री. सन १८०१.

तीर्थस्वरूप मातोश्री ताईबाई वडिलांचे सेवेसीं बाळकें सौ॥ वती बायूनें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम आज बुधवार रात्रौ जाणोन मुकाम कुंभारजुवें येथें वडिलांचे आशीरवादेंकरून सर्व सुखरूप असों. विशेष. लिहावयास कारण जे. रावजीचें खरेपण लिहून पाठवावें; ह्मणोन मागां लिहिलेंत. तर तो तुह्मांवर भिस्त ठेवून आहे. ताई आलेविना जी गोष्ट ती सांगणार नाहीं. ताई येईल तेव्हां सांगेन. ऐसें राजश्री भगुण कामतीस सांगतो. तेव्हां काल मशारनिल्हे कामत येऊन आह्मांस सांगत होता कीं; ताईस सांगून पाठवा कीं तुह्मीं बहूत तीर्थें केलेत आण ( ) फिरलेत. त्यांत हें एक तीर्थ ह्मणोन येथ येऊन खरें लटीक करून जावें. ऐसें कामत सांगत होते. त्यावरून तुह्मांस हें पत्र लिहिलें आहे. तर आपल्या चित्तास येईल त्यासारिखें यावयास यावें. आह्मांस खरें खोटें दोनही कळत नाहीं. सध्यां कामत ह्मणतो कीं; घालवावा तर शब्द येतो. यास्तव ताईनें यावें. आण निश्चयें काय तें सांगावें. त्यासारिखें त्यास सांगून रवाना करा. ह्मणाला. कामत सांगावयास येतो. तर आपले तजविजेस येईल; त्याप्रमाणें यावयास यावें. मागां पुढां आह्मांवर शब्द येईल. यास्तव पत्र लिहिलें आहे. लौकिकीं तुह्मांवर शब्द ये ( ) कदाचित् घालविला तर तुह्मांवर लौकि ( ) येतो. यावरून हें पत्र लिहिलें आहे. चित्तास येईल ( ) करावें. बहूत काय लिहिणें हे वि॥

लें० नं. ३१८ श्री. सन १८०१.

१ श्रीमंत राजश्री नाना मोरो ( )णीसाचे चिरंजीव.

१ राजश्री बाळाजीपंत यांस.

१ राजश्री बळवंतराव नागनाथ.

१ फकूदी हुसेन खानें यास संग.

लें० नं. ३१९ श्रीशंकर. तारीख २३ मे सन १८०१.

( ) बळवंतरावजी स्वामी ( )

पो यसाजी रामकृष्ण( )नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता॥ छ० ९ माहे मोहरम वर्तमान यथास्थित जाणोन आपलेकडील कुशळ लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. विशेष. प्रथमपासून आपले विद्यमानें सरकारांत विनंती करीत गेलों. सरकारची मर्जी ( ) चा तोच प्रकार जाहाला.

---

१. नारायणराव बक्षी यांस मारल्यावर कांहीं महिनेपर्यंत त्यांचा पत्ता लागला नव्हता. ही संधी साधून नारायणराव ते आपणच असें सांगून एक तोतया कोंकणांत त्यांचे घरीं आला होता. २. बायू ही नारायणराव बक्षी यांची मुलगी. ३. नारायणराव बक्षी यांचें. ४. नारायणराव बक्षी ते आपणच, असें सांगणारा तोतया. ५. जिवबादादांची बायको. ६. फिरंग्यांचा वकील बहुगुण कामत यास भगुण कामत ह्मणत. ७. हीं नंबर ३१८ ते नंबर ३२५ चीं पत्रें येसाजी रामकृष्ण रेगे आंरवदेकर या नांवाचे शिंद्यांकडे एक सरदार होते, त्यांनीं लिहिलेलीं आहेत. यांचे वंशज हल्लीं ग्वाल्हेरीस आहेत. त्यांस बक्षी असें ह्मणतात. ८. नाना फडणिसांचा संबंध दिसतो. पुढें अमक्याचे चिरंजीव ह्मणण्याचें कारण समजत नाहीं. ९. बाळाजीपंत दादा पटवर्धन. १०. हे मशीर उल्मुल्काचे बंधु असावे. ११. हे बळवंतराव नागनाथ होत.

राजश्री रामकृष्णपंत यास सरकारचा अटक आहे; ह्मणोन कळलें. तेव्हां आह्मी पुर्णेहून इकडे आलों. पांचसाहा घोडीं पुर्णेस आलों तेथ सरकारांत गेलीं. संध्याकाळचा अर्जकूर. आह्मांकडील फौजे-पैकीं नवदाहा हजार फौज जागजागां आजवर जमून आहे. ( ) पत्रें आह्मांस फौजे ( ) ह्मणोन येतात. परंतु ( ) च व हालीं राजश्री साबाजी नारायण यांस आपणाकडे पाठ ( )

लें० नं. ३२० तारीख २३ मे सन १८०१.

( )

आपणास ( ) सारिखे वशिले असून आह्मांकडील ( ) कळीत पडावी ऐसें जाहलें. पुढील सर्व भरंवसा आपणाकडील धरितों. याचा अभिमान पुर्ता राखोन सरकारची मर्जी संपादून घ्यावी. आण साबाजी बावास पाठविलें यास आज्ञा व्हावी. बाळकृष्ण तात्यास अटक जाहला; त्याची सुटका जाहाली न जाहाली कळलें नाहीं. अटक असलेस मोकळीक होई तो अर्थ केला पाहिजे. सरकारांत पत्र लिहिलें आहे. हें आपले विचारें प्रविष्ट व्हावें. मुख्य गोष्ट सरकार चाकर ह्मणोन घेतलें आण आपले सारखे स्नेही वसिले असें असोन आतां दुसरेची चाकरी काय करावी. आपला ह्मणविलें असतां सांभाळ करणार धनी आहेत. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

लें० नं. ३२१ तारीख २३ मे सन १८०१.

हजरत बडेसाहेबांचे खिजमतीस.

छ० अर्जी—यसाजी रामकृष्ण बंदगी अर्जी येथील लखेर येत ता॥ छ० ९ मोहरम जाणोन आपली खेरखुशी लिहून संतोष करीत गेलें पाहिजे. दिगर. आह्मांकडील मजकूर आपणास परस्पर कळलाच असेल. त्यापेक्षां विशेष काय लिहावें. राजश्री साबाजी नारायण यांस आपणाकडे पाठविले आहेत. ते आह्मांकडील सर्व मजकूर विदीत करतील. ध्यानीं घेऊन हजरत नवाब निजाम नवाज जंगबहादूर मेहरबानी करीत आहेत. त्याप्रमाणें आपण करीत जावी. पुर्णेचें बोलणें प्रथमपासोन आपुले विद्यमानें करावयाचें होतें. तें परस्पर होत गेलें. पुढां फौज विस्कलीत पडोन दाहा लाखपर्यंत साहुकारी पेंच आंगावर आला. त्याचा निर्वाह काम बनलेचे पोटीं होईल. चिंता नाही. नवदाहा हजार फौज जागजागां आहे. त्यांचीं पत्रें येणेविसीं येतात. परंतु सरकारची आज्ञा घेऊन जावें ह्मणतों. साबाजी बावा सर्व समजावितील; हें ध्यानीं यावें. आपण लहानथोरांचीं कामें करून बजासारखेस बहुतां प्रकारें पार केला पाहून विशेष काय लिहावें. ती॥ रावजी कैलासवासी याचा आपला स्नेह व आपले बंधू नवाब साहेब आह्मांवर मेहरबानगी करतात. तेव्हां आपण उभयतां आह्मास रावजीप्रमाणें आहां. आह्मांकडील उपयोग त्याचे अगत्य आपणास असावें. यत्न करून सरकारची मर्जी प्रसन्न राहून उपयोग होय तें व्हावें. ज्यादा काय लिहावें हे बंदगी.

लें० नं. ३२२ श्रीशंकर. तारीख २३ मे सन १८०१.

श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे सेवेसीं.

विनंती सेवक यसाजी रामकृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशळ ता॥ छ०

---

१. हीं नंबर ३१८ ते ३२५ चीं पत्रें नारायणराव बक्षी यांस मारल्यानंतरचीं आहेत. पण यांत मजकूर सन १७०६ पासून सदर तारखेपर्यंतचा आहे. २. साबाजी नारायण राजाध्यक्ष हे शिंदेशाहींत एका फौजेचे पतकावर अधिकारी सरदार होते. पत्रें नंबर १३७।१९५।२०३।३१२ पहा. ३. नारायणराव बक्षी. ४. हे मोरोबा दादा फडणीस असावे.

९ मोहोरम वर्तमान यथास्थित असे विशेष. सरकार आज्ञेप्रमाणें पंढरपूरचे जवळ येऊन राजश्री बाळकृष्ण गंगाधर यांस पुणेस येऊस प्रस्तान ठेविलें. आण जरीपटका व राजश्री पानसे व गोखले एकत्र होऊन आमचे फौजे सुद्धां मोकाबलेस आले. त्या रोकास चार हजार फौज घेऊन बाळकृष्ण गंगाधर गेले. आपसांत एकाकीं बिघाड होऊं पावणार नाहीं. ह्मणोन गाफील राहिलों. तेणें सर्व प्रकारें नुकसानी जाहाली. तेथून राजश्री जिवाजी यशवंत याचे फौजेजवळ दोन हजार जमेतीनसें राहून बाळकृष्ण गंगाधर यास पुणेंस पाठविला. मागां जिवाजी यशवंताचे फौजेची तीच. तऱ्हा होऊन मशारनिल्हे खानदेशाचे रोके गेलें. आह्मी पुणेंस आलों तेथ बाळकृष्ण गंगाधर यास अटक आहे. असें ऐकिलें. मग इकडे आलों. फौजेपैकीं कांहीं जमेत जागजागां आहे. तेथून फौजेंत येणेंविसीं पत्रें येतात. परंतु सरकारची आज्ञा घेऊन जावें. ह्मणोन राहिलों. आण् राजश्री साबाजी नारायण यांस सेवेसीं पाठविले आहेत. हे विनंती करीतील ती ध्यानीं आणून श्रीमंत राजश्री नानासाहेबाप्रमाणें ह्मणोन वचन पेशजीचें आहे. त्याप्रमाणें सांभाळ करावा. सरकारांत राजश्री बळवंतरावजीस पत्र लिहिलें. हें मनन करून साबाजी बावास आज्ञा करावी. त्याप्रमाणें पावत करतील. प्रथमपासोन आपला भरंवसा धरून आहें. सर्व गोष्टीचा अभिमान आपणास असावा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

लें० नं. ३२३ तारीख २३ मे सन १८०१.

श्रीमंत ( )साहेबाचे ( )

विनंती सेवक येसाजी रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ता। छ० ९ मोहरम पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. साहेबांचे आज्ञेप्रमाणें सुरापुराहून श्रीक्षेत्र पंढरपूर रोकास येऊन राजश्री बाळकृष्ण गंगाधर यास सेवेसीं रवाना करावयास प्रस्तान ठेविलें. आण जरीपटका व राजश्री पानसे व राजश्री गोखले एकत्र होऊन आह्मांकडील फौजेस मोकाबला केला. आह्मीं चार हजार फौज छबिन्यास पाठवून आपसांत एकाकी बिघाड होऊं पावणार नाहीं. ह्मणोन गाफील राहिलों. तेणेंकरून सर्वस्वी नुकसानी जाहाली. बागलकोटानजीक पांच पलटणें व साहा सात हजार फौज राजश्री सर्जेराव घाटगेचे तर्फेनें जाऊन लुटालूट करून मुलकाचा बहूत नाश मांडला. असे परगणेचे बोभाट येऊं लागले. तेव्हां त्यांची गांठ घालावयाची ह्मणोन तीन कोशांवर त्याजकडून मुक्काम केला. तेव्हां हुजरे याणीं पलटणच्या शाहास न गुंतावें. पुणेंस लवकर चालावें. ह्मणोन निकट केल्यावरून दरमजल येत गेलों. आण सरकाऱ्याच फौजांनीं मोकाबला केला. असें आह्मी सरकारच्या लक्षाशिवाई काय होतों. एकनिष्ठेनें सेवा करावी ह्मणोन इच्छितां हें फळ प्राप्त न व्हावें. तस्मात् ती वेळच तशी होती. तेथून राजश्री जिवाजी यशवंताचे फौज नवी दोन हजार जमेतीशीं येऊन राहिलों. आण बाळकृष्ण गंगाधर यास साहेबापाशीं पाठविला. मागाहून जिवाजी यशवंताचेही फौजेचा मजकूर तसा जाहाला. जिवाजी यशवंत खानदेशचे रोकें गेला. आह्मी धन्याच्या चरणाजवळ पुणेस आलों. तेथें बाळकृष्ण गंगाधर यास ( ) पत्र लिहून सेवेशीं राजश्री साबाजी नारायण यांस पाठविलें. ( )

१. शिंद्यांचे सरदार.

लें० नं. ३२४ तारीख २३ मे सन १८०१.

श्री (   ) साहेब (   )

विनंती सेवक यसाजी रामकृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ता। छ०(   ) मोहरम वर्तमान यथास्थित असे विशेष. आह्मांकडील सविस्तर परस्पर विदित जाहलेंच असेल. हाल्लीं राजश्री साबाजी नारायण यांस सेवेशीं पाठविलें. हे विनंती करतील त्यावरून विदीत होईल. ती॥ रावजीस नगरास न्हेले उपर आह्मांस व राजश्री देवजी गौळी यांस नेऊन राजश्री यादवराव भास्कर व सर्जेराव घाटगे याचे विद्यमानें खातरजमा करून बहुमान दिला. कामकाज(   )णांत ही पा। परंतु भेट मिळाली नाहीं. आह्मीं तं आज्ञेप्रमाणें जमेत केली. दाहा लाख परयंत साहुकाराचे मोबदला घातले. त्याचा घोर आहे. स्वामीची कृपा होऊन प्रथम आज्ञा जाहाली त्याचा अभिमान धरून सर्व गोष्टी घडोन येईत. आण स्वामिसेवा होय तो अर्थ व्हावा. तेणेंकरून साहूकारीही तकादे दूर होतील. सरकार चाकर ह्मणून घेतलें. आतां दुसरेची चाकरी करावी हें ठीक नाहीं. सांभाळ क (   )

नंबर सदर. तारीख २३ मे सन १८०१.

२ पुरवणी. सेवेशीं विज्ञापना विशेष. आहेत. हे विनंती करतील (   ) त व्हावी. (   ) वघे फौज पा (   ) त राखोन आहेत. त्याबरोबर पत्रें वारंवार फौजेंत (   ) ह्मणोन येतात. परंतु धण्याची आज्ञा यावी; नंतर फौजेंत जावें. ह्मणोन राहिलों. वरकड फौज आपले ठिकाणास गेली. साहूकारी पेंच दाहा लाख पर्यंत आला. एक धर्ण्याची कृपा असावी. ह्मणजे सर्व पेंच दूर होतील. माझी निष्ठा स्वामीच्या चरणा ठाईं. तेव्हां धनीही कृपा करतील. सरकारचा चाकर ह्मणून घेतलें. आतां दुसरेची चाकरी कर्णें नाहीं. सांभाळ करणार धनी आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापि.

लें० नं. ३२५ तारीख २४ मे सन १८०१.

श्रीमंत रा (   )स्वामी (   )

विनंती सेवक येसाजी रामकृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ता। अधिक शु॥ ११ पावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. आह्मांकडील मजकूर आपणास दाखलच आहे. विस्तारें लिहावें असें नाहीं. हाल्लीं साबाजी नारायण यांस आपणाकडे पाठविले आहेत. हे सर्व विनंती करतील ती ध्यानीं घेऊन पहिलेपासून अगत्य धरून कृपा करीत आहां. त्याप्रमाणें अगत्य अभिमान असा (   )मनास आणावयाची परवानगी वरचेवर होय. परंतु रावजी मागां चित्तास चैन न पडे. तेव्हां कामकाज न करितां येथ होतों. त्याउपर आपलेकडून गृहस्त आले. आण आज्ञेप्रमाणें सांगितलें. मग आज्ञा शिरसावंद्य करून परांडेस गेलों. जें बोलणें जाहालें; यास्तव कारकून पुण्यास पाठविला. तेथ स्वामीची स्वारी कोंकणांत जाऊन (   ) एक कारकून (   )

---

१. नारायणराव बक्षी. २. ही मागची ह्म० सन १७९६ तील हकीकत लिहिली आहे. ३. हें पत्र येसाजी रामकृष्ण रेगे आरंवदेकर यांचें आहे. ४. हे धनी दौलतराव शिंदे होत. ५. रावजी ह्मणजे नारायणराव बक्षी यांस सन १८०१ सालीं मारलें. त्यापूर्वी येसाजी रामकृष्ण हे तिकडील चमत्कारिक राजस्थिति पाहून दक्षिणेंत घरीं आलेले होते. त्या संधीस दौलतराव पुण्याच्या कारभारी मंडळीच्या तंत्रानें वागत असत, हें पाहून त्यांनीं हीं पत्रें लिहिलीं आहेत. ६. नारायणराव बक्षी यांस मारल्यामुळें सर्व लोकांस तळमळ लागली होती. टॉडसाहेब ह्मणतात कीं, नारायणरावांच्या मरणामुळें शिंद्यांचें मोठें नुकसान झालें व रजपुतांचे राज्यावरील त्यांचा दाब गेला.

लेo नं. ३२६ श्रीहरी. तारीख २४ नवंबर १८०१.

तीर्थस्वरूप रा० श्री काका वडिलांचे सेवेसीं.

अपत्य यशेवंतरायानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत कार्तिक वद्य ४ पर्यंत मुकाम जावद येथें वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. बहूत दिवस झाले. वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ न जाहाला. त्यास असें नसावें. निरंतर आशीर्वाद-पत्रीं सांभाळ करीत असिलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर आह्मी दत्यास वडिलांकडेस होतों. तेथें खर्चास मिळेना. बरोबर पांचसात हजार फौज होती. ती॥ ( )होऊन थोडकाच सरंजाम राहिला. तो घेऊन आह्मी जावदेस आलों. तेथें पांच रुपये घेऊन ( )स खर्चास दिल्हे. कांही देणें राहिलें आहे. त्याची ही तजवीज करून लोकांचे फडशा करून कांहीं घरींही खर्चास पाठवितों. चिंता नाहीं. ती॥ मातोश्री होनी वगैरे लहान थोर मेडत्यांस खुशाल आहेत. चिंता नाहीं. ती॥ राजश्री काकाचे शरीरीं आराम नव्हता. त्यास उपाय होऊन आराम आहे. जावदेस येत होते. त्यांस मेवाडांत रांगड्यांनीं फौजेचा मेळ करून राजश्री भास्कर अनंत, राजश्री लखबादादाकडोन मेवाडच्या कामावर होते. त्यांसी लढाई घेऊन यांजला रांगड्यांनीं लुटून घेतलें. आतां जावदेकडेस ( ) बखेडा करणारे आहेत. सध्यां यावयाचे ( )ण नाहीं. ह्मणोन काकांस लिहून पो त्या ( ) ते माघारे गेले. सिंदे होळकर यांच्या ( ) या उज्जन इंदूर या प्रांतांत लागून राहिल्या आहेत. उभयतांकडेसही फौजेचा जोर समानच आहे. यश अपेश ईश्वर कोणास देतो पाहावें. प्रसंग तेरेदार आहे. श्रीहरीच्या इच्छेस येईल तें खरें. होळकर ( ) मेवाडवाले राणाजी यांणीं आह्मांस बोलावणेंविसीं वकील पाठविले ते येऊन बसले आहेत. खर्चाची सरबरा उभयतां कडोनही होत आहे. त्यास कोणाकडे जावयाचें ठरू ( ) दोबस्तांत कार्य घडेल त्याप्रमाणें माग ( ) वडिलांस लेहून पाठवूं. वडिलीं वर्तमान वारंवार लेहून संतोषवीत असिलें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री आना व आपा व सगुण यांस आशीर्वाद उपरी. इकडील पत्रावरून सर्व कळेल. तुह्मांकडील साद्यंत लिहून पाठवावें हे आशीर्वाद.

लेo नं. ३२७ श्री. तारीख १० जानेवारी सन १८०२.

चिरंजीव राजश्री आपा यासी प्रती गणेश पुंडलीक आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० ५ रमजान मुकाम पुणें जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत जावें. विशेष. तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यास हमेशा पत्र पाठवून वर्तमान कळवीत जावें. यानंतर दत्तू खिजमतगार घरींहून तुह्मांकडे जावयास आला आहे. त्यास पाठविला आहे. वडिलांकडील जाधू काशीद आला आहे. वडिलांस यशवंतराव होळकर व श्रीमंत यांचीं पत्रें माळवे प्रांतीं येणेंविसीं पाठविलीं आहेत. आण खर्चास कालपीवर वरात पत्र वीस हजाराची पाठविली आहे. कळावें. वरकड इकडील वर्तमान दत्तू सांगतां कळों येईल. तुह्मांस सेला पागोटीं पाठविणार होतों. परंतु रस्तेनें नीवरत नाहीं. याकरितां मागाहून राजश्री बापू पालकर घरीं जाणार त्याजसमागमें पाठवितों.

---

१. साबाजी राम ऊर्फ काका. २. यशवंतराव शिवाजी केरकर ऊर्फ यशवंतराव भाऊ हे जिवबादादांचे चिरंजीव होत. ३. लढाया.

वडिलांचीं पत्रें बजिन्नस पाठविलीं आहेत. आमची घरीं जाण्याची तूर्त लांबणीवर पडली. सिद्दीस आपली फौज व कंपू श्रीमंत होळकर याणीं खानदेशीं रवाना केले आहेत. समागमें आपणही जाणें जाहालें. आजच कूच होऊन जातों. तुह्मांस कळेल. आमची घरीं जाणेंची तजवीज होती. परंतु खटला गळ्यास तेव्हां सोडून जाणें होत नाहीं. आतां फिरून हिंदुस्थानांतून येणें होईल तेव्हां खरें. राजश्री बापू पालयेकर व बाळकृष्ण बावाही आजच घरीं जाणेस तयार जाहले आहेत. उद्यां निघोन येतील. बहूत काय लिहिणें हे आशीरवाद.

चिरंजीव सौभाग्यवती कृष्णाबाईस आशीर्वाद. तुजकडील वर्तमान वरचेवर पत्र पाठवून वर्तमान लिहीत जावें. चिरंजीव सौभाग्यवती जानकीबाई प्रसूत होऊन कन्या जाहाली ह्मणोन वर्तमान ऐकिलें. त्यास तुमचें पत्र येत नाहीं. तर वरचेवर पत्र पाठवून कळें वर्तमान लिहीत जावें. भरतपुराकडील सुखरूप आहेत. हे आशीर्वाद.

लें० नं. ३२८ श्री. तारीख २२ सपटंबर सन १८०२.

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री मामा वडिलांचे सेवेशीं.

अपत्य रावजीनें[1] चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ० २४ माहे जमादिलावल मुकाम निमच जाणोन वर्तमान यथास्थित असों. विशेष. वडिलांनीं पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाहाला. असेंच पत्र पाठवून बाळकास संतोषवीत जावें. यानंतर इकडील वर्तमान ती॥ राजश्री बापू व राजश्री लखबादादा किसनगडची खंडणी घेऊन मेवाडांत ठाणें बसावयास येणार आहेत. आपणास कळावें. राजश्री आंबोजी इंगळे दिल्लीस आहेत. व राजश्री पिरू[2] दिल्लीचे पलीकडे आहेत. (पुढील मजकूर खासगी आहे, सबब एथें दिला नाहीं.)

लें० नं. ३२९ पै॥ छ० २० सफर सलास. श्री. तारीख ८ मार्च सन १८०३.

चिरंजीव साबाजी याप्रती जगंनाथ राम व बाळाजी राम आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० १३ माहे जिलकाद मुकाम लष्कर नजीक कालिंजर जाणोन क्षेम असों. विशेष. बहूत दिवस तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. यावरून चिंता प्राप्त जाहाली. त्यास सविस्तर वर्तमान आह्मी दतियांत होतों. तेथें इंगळे यांची फौज व कंपू सु॥ दीड महिनापर्यंत लढाई घेत होतों. इतकेंत दतियेवाले याणीं त्यासी वचन कथन करून मातुश्री बायांस द्यावयाच्या केल्या. आण आह्मांस फिरोन गोष्ट सांगितली. तेव्हां आह्मी लखबादादाची वाट पाहात होतों. तेव्हां ते न सांगतां निघोन मेवाडांत जावयास गेले[3]. तेव्हां यासही वखत मिळाला. आण बाया इंगळे यांच्या स्वाधीन केल्या. आण याही जावयास राजी जाहाल्या. तेव्हां गेल्या. मग आह्मी रात्रीचे निघोन यावयास दोनशें स्वारानिशीं श्रीमंत राजश्री अलीबहाद्दर बावा यांचे लष्करांत आलों. त्याचे ( ) जाहाल्या. बोलणेंचालणेंचाही जाबसाल चांगलाच आहे. लखबादादा मेवाडांत गेले. तेथें पांच सहा दिवस ताप येऊन वसंत पंचमीचे[4] दिवसीं देवाज्ञा जाहाले. तेथें फौज आहे. ती चिरंजीव राजश्री यशवंतराव भाऊ, बळवंतराव दिवाण व राजश्री यशवंत बाबुराव व राजश्री लखबा पेडणेकर असे तेथें आहेत. होळकर व त्यांचीं त्यांचीं बोलणीं लागलींच आहेत. त्यास तेथूनही कागद

---

१. हे रावजी दुसरे कोणी असावेसें वाटतें. २. पेरण फिरंगी. ३. शिंदेशाहींत आपसांत चाललेला गोंधळ लखबादादांस पसंत नव्हता. सबब ते कंटाळून गेले होते. ४. माघ शु॥ ५ ह्मणिजे वसंत पंचमी, तारीख २७ जानेवारी १८०३ रोजीं लखबादादा लाड मेवाडांत सालंबरास वारले.

आह्मांस आलेच होते. आण येथूनही पत्रें त्यास गेलींच आहेत. वरकड वर्तमान सविस्तर मागाहून लिहून पाठवूं. आपला सर्व मंडळी सुखरूप आहेत. चिरंजीव राजश्री विश्राम मेडतेस सुखरूप आहेत. त्याजकडील वगैरे प्रांगणे सुटले तेव्हां तेथें राहाणें जाहालें नाहीं. सोळाबारास गेले. त्याविसीं चिंता न करावी. सुखरूप आहों. वरकड वर्तमान मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. आह्मांविशीं चिंता न करावी. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

सेवेशीं बाळकृष्ण विठ्ठल. साष्टांग नमस्कार विनंती. येथील लिहितार्थ परिसोन लोभ करावा हे विनंती.

ले० नं. ३३० श्री. तारीख १ जुलई सन १८०३.

चिरंजीव राजश्री आपा यासी प्रती—गणेश पुंडलीक आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० ११ रबिलाखर मुक्काम क्षेत्र पुन ( ) श्रीगोदावरीतीर जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत जावें. विशेष. बहूत दिवस जाहाले. तुजकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. त्यावरून मोठी चिंता लागली आहे. ( ) त्यास वारंवार पत्र पाठवून आरोग्य त ( ) व्रत लिहीत जावें. यानंतर इकडील वर्तमान आह्मी दतियास होतों तेथून सडे ( ) करून अंबाजी इंगळे याच्या पारपत्या ( ) उभयतां सरदार फौजसुद्धां आलों. ( ) च्या मुक्कामीं होतों. नंतर ती॥ राजश्री बापूसाहेब दिवाळीच्या श्राध ( ) दतियास गेले उपर आह्मांस दादासमागमें ठेऊन गेले. दोन रोजीं येतों असें बोलून गेले. समागमें पागेचे स्वार नवते. परंतु पंचवीस स्वार जबरदस्तीनें दिले. बाकी बारगीर मजकडेस होते. तेव्हां सडे फौजेंत दादासमागमें आह्मी होतों. नंतर आश्वी ( ) न वद्य अमावास्येचे रोजींच इंगळे ( ) पलटणेंसुद्धां चालून लढाईचा मुकाबालेस आला. त्याचे मुकाबलेस फौजसुद्धां गेलों. प्रहरपर्यंत लढाई जाहाली. नंतर संध्याकाळ जाहाला ते आण मुकामास गेले. आह्मीही दोन कोशांचे मुकाबलेनें राहिलों. प्रातःकाळ आ ( ) वडीलांचें येणें दतीयाहून व्हा ( ) त्यास इंगळे रस्तेवर पडले. ते तेथ ( ) बंद होऊन दतियासच राहणें जा ( ) तेथें उभयतां बाया होत्या. तेथ ( ) राहिले. न जाणों तेथेंच लढायी पडल्यास कोणी उभयतांपैकीं पाहिजे. याजकरितां ( ) वडिलांचें राहणें दतियास जाहालें. तेस ( ) च आह्मी दादासमागमें दरकूच मथुरेचे मैदानांत आलों. वडिलांची आज्ञा कीं दादासमागमेंच राहणें. तेथेंही मसलत विसकळीत दिसली. तेव्हां तैसेच ( ) कूच रात्र दिवस करून मेडतेस आ ( ) तेथें श्रीमंत राजश्री काका साहेब यांची गांठ जाहाली. दाहा रोज दादाचा मुकाम तेथें होता. तेथून दरकूच निघाले ते मेवा ( ) वकीलासमागमें प्रतापगडास ( ) तेथें कांहीं खर्चाची सरबेरा होऊन पुढां होळकर यांचे भेटीस खानदेशीं ( ) होडी उतरून आलों. भेटी जाहाल्या प्र ( ) पगडाहून येता वेळां झाली मधीं ( ) शिंद्यांची होती. तेथें कांहीं ख ( ) का होतांच फौज सुद्धां गड ( ) गोळागोळी सहजच जाहाली. आकस्मात्र गोळी येऊन राजश्री बाबा मळगांवकर यांस ( ) प्रहर रात्र चांगले सा ( ) बुद्धीनें होते. प्रातःकाळ होतांच ( )जाहाला. गोळी छातींत लागली. ईश्वरानें अनुचित गोष्ट केली. बाबासारखा मनुष्य होणें कठीण. जो जन्मास ( ) गेला. तो ईश्वरासही चांगला. ( ) लागला. जे दिवशीं बाबा सर्वांस ( )

---

१. जगोबा बापू. २. लखबादादा लाड. ३. लढाईची सुरवात. ४. छटीनें, अंतरानें. ५. तजवीज.

न परलोकीं गेले. तेच रोजीं झाडू ( ) मंडळीचीं अवसानें गेलीं. चांगला दाणा होता. परंतु काळापुढें उपाय कोणा ( ) घात केला. आपल्या ग्रहस्तांचें क्षत्र बुडालें. होणारास उपाय नाहीं. ही गोष्ट जाहालेवर फौजेंत बेदा राहिला. तेव्हां शिंदे होळकर यांचे वकील येऊन बसलेच होते. तेव्हां शिंदे यांजकडे जावें; तर प्राणाशीं गांठी पडतात. याकरितां होळकर यांजकडेस भाऊ ( ) धा. जावें. असें बळेवंतराव दिवाणजी वगैरे याणीं ठरविलें. होळकर यांचे वकील दादास बोलावयाविसीं आलेच होते. त्यासींच येणें रीतीचें बोलणें करून तुह्मीं फौज खर्चास लाख रुपये होळकर याणीं द्यावे; असें ठरलें. उपर राजश्री येशवंतराव ( ) चें व दिवाणजीचें बनत नाहीं. असें ( ) भाऊकडेस कारभारी जे आहेत; ते चांगलेच आहेत. यजमानाचीही वृत्ती चांगलीच आहे. त्याजमुळें ते मेवाडांतच राहिले. आह्मीं दादासमागमेंची फौज व ( ) फौज घेऊन होते त्यांसही बोलावून सामील करून घेतले. तदनंतर दादा व भाऊची फौज वगैरे मिळोन सालेंबा ( ) नजीक गेले. तेथून बगेड वगैरे मुलूख लुटून फस्त केला. दादा ( ) आपली फौज भाऊचे निमीसें करून ( ) बगडांत पाठविले. आण श्रीमंत ( ) सालेंबारास राहिले. तेथेंच कांहीं ज्वरांश होऊन माघ शुा। ५ मी ( ) येशवंतराव बाबा व राजश्री साबाजी ( ) असे कांहीं कामाकरितां मार्गा मेडतेस पंधरा रोज पावितों राहिलों. राजेश्री विश्राम काकाकडेस भोजनास जावें. झाडून ( ) प्रमाण सांपडे तैसें अजमेर संबंधीं आहे. तेथून आह्मीं दादाचे सामल होणें ( ) मारवाडाहून आलों. ते दरकूच उदेपुरास दादाचे सामल जाहालों. आमचे ( ) चे स्वार मिळून पांचशीं साहाशीं होते. राजश्री यशवंतराव भाऊ जावदेस कांहीं येथें बरोबरच आहेत. बाकी मुलें माणसें भरतपुरास आहेत. त्यांच्या दुःखास कांहीं जोडा नाहीं. असो. जे वेळीं जें होणें तें होतेंच आहे. होळकरांची भेट घेतली. सनमान बहुत प्रकारें ( ) आपली फौज व त्याणीं आणखी फौज कंपू देऊन राजश्री नागोजी जिवाजी ( ) जामगांवचा हरगोदे शिंदेचे महाल जप्त करावे; आण पुणेंचे सन्निध राहावें. अशी आज्ञा. त्याप्रमाणें फौजसुद्धां मुकाम मजकुरीं आलों. आतां चौथे रोजीं जामगांवचे सुमारें येत ( ) आपणास कळावें. दुसरें ती॥ राजश्री बापू साहेबांकडील वर्तमान तर दतिया होते तेथें उभयतां बाया होत्या—( ) आपलेकडील झाडून होतीं. तेथें कांहीं कनिष्ठ बाईची फितूर इंगळे यांजकडेस जाहाला कीं; आह्मी तुह्मांकडे येतों. आणि दतिया ( ) राजाचीही मर्जी कीं या उभयतांस इंगळेच्या हवालीं करावें. तेथें कांहीं आपली फौज बहूतशी नव्हती. तीन हजार फौज वडिलांपाशीं होती. बाकी फौज झाडून दादासमागमें ( ) कांहीं बायांचा फितूर

१. हे बाबुराव पांडुरंग मळगांवकर सातशें घोडे स्वारांचे पतकाचे सरदार होते. हे सरकारस्वारीबरोबर असत. एक वेळ महादजींचा डेरा अशा जागीं पडला कीं, त्यावेळीं या बाबुरावजींची मिसल नदींत आली. तेव्हां याणीं नदींत राहून कंबर न सोडतां सारी रात्र डंका देऊन पाहारा केला. तो काळ शत्रूचे छाप्याचा असल्यामुळें त्या रात्रीं छापा आला. तेव्हां यांचें पतक नदींत पाहाऱ्यावर तयार होतेंच. त्यांनीं ताबडतोब जाऊन शत्रूचें पारिपत्य केलें. हें मोठें दंडीपणाचें काम केलें ह्मणून शिंदे सरकारांनीं त्यांस दंडी हा किताब देऊन पांच पोषाख दिले व मेजवानी दिली. तेव्हांपासून मळगांवकर यांस ग्वालेर येथें सरकारच्या कागदोपत्रीं दंडी हा किताब चालत आहे. २. फौज बेदील झाली. फौजेस ही गोष्ट आवडली नाहीं. ३. यशवंतराव भाऊ. ४. हे यशवंतराव भाऊंचे दिवाण होत. ५. सालेंबर. ६. गुजराथचे हद्दीवर आहे. ७. तारीख २७ जानेवारी सन १८०३ रोजीं लखबादादा सालेंबर, प्रांत मेवाड, येथें वारले.

काहीं राजा ( ) मर्जी कांहीं आपलेकडेस खर्चाची ( ) पत्य होऊन बाया इंगळे याजकडे गेल्या. तेव्हां वडिलांचें तेथून जाणें कठीण जाहालें. झाडून खटला गेल्यावर आण राजश्री बाळाभाऊ यांस घोड्यावर बसणें माहा मुसकील. येणेंप्रमाणें समय वडिलांवर प्राप्त होऊन ( ) प्र जाहाले. ते समयांत सडे जर असते ( ) हजार दोन हजार फौज घेऊन निघून जाते. तेव्हां एक महिना दतियास राहणें जाहालें. उपर तेथून इला ( ) नें निघून मंडळी सु॥ अलीबाहादर यांच्या ( ) ( ) तीनचार हजार आहे. समागमें ती॥ राजश्री बाळकृष्णदादा व सावकर बावा आहेत. त्याची आह्मांस चार मासपर्यंत ( ) र येत नव्हती. आण आमची त्यांस ( ) तेव्हां वडिलांकडून हलकरेचा जोडा आला. तेव्हां सकळ वृत्त समजून ( ) नंद जाहाला. आतां त्याजकडेस जासुदाची जोडी आजच रवाना करणार आहों. पत्रें होळकर यांचीं व आपलीं तयार करून ठेविलीं आहेत. होळकर याणीं वडिलांस बोलाविले आहेत. दसरा जाहालेवर येतील.. येथें आल्यावर पहिल्याप्रमाणेंच मनोदयानरूप घडोन येईल. कांही चिंता नाहीं. वडिलांचें पत्र माजे नांवचें आलें. तें बजिन्नस पाठविलें आहे. त्यावरून कळों येईल. तूर्त बळवंतराव दिवाणजी समागमें पागा तुमचीच आहे. देशीं आलों तेव्हां घरीं यावें यास पैसा एक जवळ राहिला नाहीं. आण पागा गेल्यास मंडळी येथें कोणी सबळ राहण्याजोगी नाहीं. ( ) राशीं गांठ आहे. एक कारकून आहे. परंतु त्याचे हातें निभाव होणार नाहीं. घोडीं मरून जातील. आतां वडिलांस किती लिहिली. ज्याप्रमाणें आज्ञा येती. त्याप्रमाणें येणें जाणेंचें करूं. कु ( ) पत्रें येत नाहीं. त्यास हमेशा पत्रें पाठवीत जावीं. याजवरून वडिलांला ( ) पोहोंचत होतील. तेथील उत्तरें आपणाकडे पोंहोंचतील. येणेंकरून वर्तमान कळत जाईल. वेंडील येथून तीनशें कोश आहेत. बुंदेलखंडांत झांशीच्या सुमारें आहेत. आमचे फौजेचें येणें वान ( ) परयंत होईल अथवा कृष्ण ( ) परयंत होईल. असें दिसतें. यावयाचें उत्तर येतांच आपला ज्यासूद जरद पाठवून देऊं. कांहीं चिंता न करावीं. रस्तां चालत नाहीं. तर धोत्रजोड तुह्मांस व सेले पागोटीं पाठवून देणार होतों. आतां पुढचे सुमारें गेलेवर रस्तेची सोई जाहल्यास पाठवून देऊं. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ती॥ सौ॥ स पत्र मातोश्री आकाबाईस साष्टांग नमस्कार विज्ञापना इकडील वर्तमान चिरंजीवास लिहिलें आहे त्यावरून कळेल हे विज्ञापना.

लें० नं. ३३१ पै॥ छ० २ जमादिलावल. श्री. तारीख १ आगष्ट सन १८०३.

तीर्थस्वरूप राजश्री साबाजी काका वडिलांचे सेवेसीं.

बाळकें गणबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत श्रावण शु॥ १२ दशी मुकाम क्षेत्र ( ) जाणोन स्व ( ) पाहिजे. विशेष. बहूत दिवस आपलें पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. त्यावरून चिंता लागली. त्यास पत्रद्वारें आशीर्वाद लिहून चित्त समाधान केलें पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान कर्बे चिरंजीव राजश्री आपाच्या पत्रीं पांच बंद लिहून पाठविले आहेत. ते ध्यानीं आणावे. तूर्त मसलतीसंबंधींचा जाबसाल ( ) जाहला. राजश्री लखबादादा परलोकवासी जाहले. ती॥ राजश्री बापूसाहेब त्या प्रांतीं दूर राहिले. येथें जे आहेत ते कारकूनच आहेत. डोकीवर घेऊन मसलती सफल पडे ऐसा कोणी नाहीं. श्रीमंत माहाराज होळकर यांचीं पत्रें

---

१. जासुदांची जोडी. २. जगोबा बापू. ३. मेवाड प्रांतीं सालेंबरास. (साळुंबा येथें) लखबादादा लाड तारीख २७ जानेवारी १८०३ रोजीं वारले.

वडिलांस बोलावयाविसीं गेलीं आहेत. आणखीही आज पाठ ( ) काम जमून पहिलेसारखें ( ) पडेल. येथें फौज आहे ती आपलीच आहे. मात्र वडिलांचें येणें जाहालें पाहिजे. वरकड कांहीं अधिकोत्तर नाहीं. या पत्राचें उत्तर जरूर आलें पाहिजे. बहूत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापी.

लें० नं. ३३२ श्री

राजश्री साबाजी राम गोसावी यांसी.

स्नेहांकित लक्ष्मीबाई[1] सिंदे दंडवत विनंती उपरी. चिरंजीव चिमाबाईचें लग्न आहे. त्यास तुह्मांबरोबर कोंकणीं माणसें आहेत. तीं पुढां रवाना करून नारळ सुमार २००० व आंबे चांगले २००० इरसाल व फणस चांगले २५ व काजूच्या बिया ८१ कुडव येणेंप्रमाणें जरूर आणवावे. रवाना छ० ३ जिल्हेज. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोर्तब आहे.)

लें० नं. ३३३ श्री.

राजश्री साबाजी बाबा केरकर गोसावी यांस.

छ० अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित सिदोजी राजे घोरपडे कृतानेक रामराम विनंती उपर येथील कुशल जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत असावें. विशेष. आपणाकडून पत्र येऊन परामृष होत नाहीं. तर ऐसें नसावें. हरघडी येणारा वांतिकाबरोबर पत्र पाठवून सांभाळ करावा. हें उचित. आह्मी आपले कुटुंबांतील. आह्मांकडेस परकी विचार नाहीं. वडील कृपा करतात त्यापेक्षां अधिक कृपा आपली असावी. आपण सुज्ञ आहेत. यानंतर आपणाकडेस कांहीं घाटावरील मजकूर बोलण्याचा आहे. तर उद्यां आरवदेस आह्मी येणार. कृपा करून दर्शनाचा लाभ दिला पाहिजे. बहूत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. ३३४ श्री.

राजश्री साबाजी केरकर गोसावी यांस.

छ० अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित सकलसौभाग्यवती सगुणाबाई[2] निंबाळकर विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय क्षेम लिहीत जाणें. विशेष. आह्मांस पुर्णेहून बोलवावयास स्वार व उंटें आले आहेत. भोई पालखीस येणार होते; ते अद्यापि आले नाहींत. आह्मी तर निघणेंची सिद्धता करून वडिलांचे[3] भेटीस आरवलीस आलों आहों. जाणेची बहूत निकड आहे. येथें भोयांची गांठ न पडे जाणोन हें पत्र तुह्मांस मुजरद लिहिलें आहे. तर तुमचे पालखीचे भोई पुर्णेपर्यंत पोंचवावयास आह्मांस द्यावे. पालखी आमची आहे. अनमान करूं नये. भोई तुह्मांकडून न मिळालेस घोडेवरून जावें लागतें. अगत्य भोई देविले पाहिजेत. उद्यां येथें पाठवावे. रवाना छ० १७ रमजान. बहूत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. ३३५ श्री.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री साबाजी काका केरकर यांसी.

प्रती बाळाजी राम नातू आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत छ० २ जिलकाद पावेतों मुकाम

---

१. महादजी शिंदे यांची बायको. २. ही खेमसावंत यांची मुलगी जानराव निंबाळकर यांस दिली होती. ३. राजे खेमसावंत यांचे भेटीस.

'किल्ले मिरज येथें सुखरूप असों. विशेष. तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर असें न करावें. सदैव पत्र पाठवून संभाळ करावा. इकडील मजकूर सर्व यथास्थित आहे. सदैव पत्र पाठवून वर्तमान कळवीत जावें. रोजगाराविसीं यंदां आपली गांठ पडली तेव्हां आपणास सांगितलें होतें. त्याप्रमाणें वडिलांचे मर्जीस आलेस सोई करावी. आपणास ल्याहावें ऐसें नाहीं. सुचना लिहिली आहे. आमची आठवण असावी; ह्मणजे पुरे. रोजगार कोठें तरी मिळेल. परंतु आपल्या सारखे थोर कोठें मिळत नाहीं. आपण असतांना कांहीं चिंता नाहीं. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

सदर्हू गोमांतकी आंबे श्रीमंतास पसंत पाहून दोनशें पाठवून द्यावे. अनमान करूं नये. राजश्री सदाशिव गोपाळ रांगणेकर दाजी यासी आशीर्वाद. सदैव पत्र पाठवून संतोष करीत जावा. हे आशीर्वाद.

लें० नं. ३३६ श्री.

सेवेशीं सेवक साबाजी राम केरकर विज्ञापना तागायत छ० २५ रमजान पावेतों साहेबांचे कृपेकरून क्षेम असों. विशेष. नांगो[1] मादे प्रभु पेडणेंकर व रंघु[2] वेंक नाईक पारसेकर यांचीं माणसें बारदेशीं रवाना करितात. ह्मणोन ऐकिलें. म्हाल फिरंगी याजवळ टिकावयास कारण हे[3]. ऐसें असोन त्यांचीं माणसें त्याकडेस रवाना करितात. तेव्हां माहालीं रयतेची नांदणूक होऊन वसणुक होणार हें कळतच आहे. ऐसें असोन त्याचे कबिले सरकारांतून पलीकडेस रवाना करितील असा ( )त नाहीं. हें वर्तमान ऐकण्यावरून लिहावें लागलें. कसा काय प्रकार जाहाला; तो लिहावयास आज्ञा असावी. सेवेसी श्रुत होय.

लें० नं. ३३७ छ० २५ सफर. श्री.

चिरंजीव राजश्री साबाजी प्रती–बाळाजी राम अनेक आशीर्वाद. उपरी येथील कुशळ तागायत छ० १० सफर जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. अलीकडे तुमचें पत्र आलें नाहीं. तरी सविस्तर लिहीत जावें. येथून काशिदाबराबर पत्रें पाठविलीं. त्यांचीं उत्तरें पाठवावीं. यानंतर चिरंजीव राजश्री नारबाच्या द्वितीय संबंधाची योजना करून मार्गशीर्ष मासीं लग्न उरकून घेतलें पाहिजे. त्यास मधें दोनतीन महिने राहिले. मुलीचा शोध होऊन निश्चयांत आलें पाहिजे. याकरितां हल्लीं मुजरत काशीद रवाना केला आहे. तरी आपले प्रांतीं अगर पलीकडे जेथें चांगली सुंदर आण थोर दाहा अकरा वर्षांची अशी चांगल्या गृहस्ताची मूल शोध मनास आणून तुमचे खातरजमेची लक्षणयुक्त शोदास कोणेविसींची दिकत नसावी. अशी पाहून करार करून ठेऊन लिहून पाठवावी. इतुक्याच कामास महिना दोन महिने लागतील. याजकरितां येविसींची सुचना पेशजी तुह्मांस लिहिली होती. व हालींही लिहिलें आहे. तरी लिहिल्या अन्वयें करारी जाहल्याचें तुमचें लिहून आलें ह्मणजे येथून पालखी सरंजाम पाठवून येथेंच लष्करांत मुलीस आणवून कार्य उरकून

---

१. नागेशराव महादेव प्रभु देसाई, देशप्रभु. यांचे वंशज हल्लीं पेडणें येथें मोठे सुखवस्तु संस्थानिक आहेत. २. हे पारसेकर देसाई आहेत. ३. पोर्तुगीज फिरंगी यांजकडेस वाडी सरकारचे पेडणें, डिचोली, सांखळी, वगैरे महाल राहण्यास नागेशराव व पारसेकर हेच कारण झाले.

घेतलें जाईल. अतःपर याविशींच्या शोधास दिवसगत न लावावी. वरकड तिकडील वर्तमानं वरचेवर लिहून पाठवीत जाणें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. ३३८ श्री.

श्रीमंत राजश्री विश्राम काका यांसी.

प्रती पद्माकरभट्ट गाडगीळ वेदोक्त आशीर्वाद उपरी येथील वर्तमान ता। छ० २६ रमजानपर्यंत स्वामीचे कृपेंकरून श्रीमंत यजमानापाशीं सुखरूप असों. विशेष. आपण गेलीया ता। पत्र येऊन सांभाळ जाला नाहीं. याजकरितां आशीर्वादपत्र पाठविलें आहे. तर पत्रोत्तरीं परामृष केला पाहिजे. यानंतर आह्मी जेथें कुटुंबासुद्धां आहोंत; तेथें राहावयाची किमपी सोई नाहीं. तरी आपले सोईनरूप जागा येवजून आह्मांस देविली पाहिजे. तेथें घर बांधून मुलेंमाणसें ठेवूं. याजकरितां आपण कृपा करून जागा योजून दिली पाहिजे. मुलें पढतील आणि आपलेस आशीर्वाद देतील. घरीं चिरंजीव लक्ष्मणभटास लखोटा पाठविला आहे. तो पावता करून उत्तरें आणवून आपले पत्राबरोबर पाठवावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

लें० नं. ३३९ पौ। छ० ९ माहे शाभान श्री. तारीख १३ नवंबर सन १८०३.

सन आर्बा.

चिरंजीव राजश्री गणबा व काशिबा व रामबा यांप्रती—बाळाजी राम आशीर्वाद उपरी येथील कुशळ ता। छ० २७ रजब जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. तुह्मांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास दत्तू खिजमतगार याजबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. मजकूर समजला. चिरंजीव घनश्याम व मूल यांचीं लग्नें व मुंज बांधावयास पाहिजे. त्यास खर्चास पाहिजे. आमचा बंदोबस्त श्रीमंतानीं करून दिला. चारपांच लक्षांची जहागिरी दिली. व आणखी द्यावयाची मर्जी आहे. परंतु सध्यां सनदा शिक्केस पडल्या आहेत. आठां चौ रोजांनीं हातास आलेवर सर्व बंदोबस्त खर्चास पाठवावयास येईल. चिंता न करावी. सरकारी काम श्रीमंतांचे घरचें. तेव्हां च्यार रोज अधिक लागतात. यास्तव चिंता नाहीं. ( ) चिरंजीव राजश्री यशवंत सुखरूप मेवाडांत राणाजीकडे आहेत. व विश्राम मेडतेमध्यें सुखरूप आहेत. ती॥ राजश्री बापूसाहेब यांजकडे काशीद रवाना करून दिला. ( )

(मोठा शिक्का आहे.)

लें० नं. ३४० श्री. तारीख १९ नवंबर सन १८०३.

राजश्री हवालदार व कारकून किल्ले कलानिधी गोसावी यांसी.

छ० अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित बाजीराव रघुनाथ प्रधान आशीर्वाद व नमस्कार सुरूसन आर्बा मया तेन व आलफ. तालुके कलानिधी देखील ठाणें चंदगड येथील मामलत साल मजकुरीं राजेश्री बाळाजी राम यांजकडे सांगितली असे. तरी तुह्मी सरकार लक्ष राखोन मशारनिल्हेचे रजातलबेत वर्तोन किल्ले मजकूर येथील अलंग चौकी पाहारे याचा बंदोबस्त यथास्थित करीत जाणें. जाणिजे छ० ४ साबान आज्ञा प्रमाण.

बार. (मोर्तब आहे.)

---

१. यांचीं लग्नकार्यें व इतर सर्व प्रापंचिक सुखदुःखाचे प्रसंग लष्करांत घडत असत. कारण यांस लढाईशिवाय फुरसदीचा दुसरा वेळच सांपडत नव्हता.

लें० नं. ३४१

शके १७२६ सन १८०४ श्री. तारीख १९ नवंबर सन १८०३.

श्री
राजाराम नरपती हर्ष-
निधान बाजीराव रघुनाथ
मुख्य प्रधान.

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ता। मोकदम देहाय ता। चंदगड तालुके कलानिधी देखील ठाणें चंदगड येथील मामलत साल मजकुरीं राजश्री बाळाजी राम यांकडे सांगितली असे. तरी यासी रुजू होऊन देहाय मजकूर येथील अमल सुरळीत देणें. जाणिजे. छ० ४ साबान आज्ञा प्रमाण.

बार. (मोर्तब आहे.)

लें० नं. ३४२ श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री काशीराव बल्लाळ स्वामीचे सेवेसीं.

सेवक नागे प्रभु देसाई कसबा देशप्रभु ता। पेडणें कृतानेक नमस्कार विनंती उपर येथील कुशळ जाणोन स्वकीय क्षेम लिहावें. विशेष. वडिलांमागां कार्यां यथास्थित संपादिलेंचें कळोन आनंद पावलों. आह्मी येणार होतों; परंतु कांहीं प्रयोजनास गुंतून उरलों. परंत चिरंजीवास पाठविलाच होता. त्यांत सर्वच आह्मी आलों. माहालामध्यें अग्निहोत्र नाहीं. तर हाली अग्निहोत्रास एक ब्राह्मण वेदमूर्त लक्ष्मणभट्ट निगळे हे घेऊस सिद्ध जाहाले आहेत. मुहूर्तास दाहा दिवस आहेत. ब्राह्मणाचे पदरीं तंव एक पैसा नाहीं. अग्निहोत्रास तंव रुपये किंचित् ३०० तीनशीं अन्न खेरीज करून पाहिजेत. ते देतां कोण दिसेना. तर हर गोष्टीस भरवसा तुमचा. आपहस्तें परहस्तें जें अग्निहोत्राचें काम होईल तें आपले हातें करावें. लग्नाच्या कार्यास पंचवीस ब्राह्मण अधिक आले ह्मणून समजावें. परंत हें कार्य थोर. अग्निहोत्र महालांत होतें; तेव्हां श्रेय आपणास आहे. बहूत काय लिहिणें हे विनंती. सदहू स्वकीय कार्य तुह्मांस लिहिलेंच आहे. परंत गांवचें काम राजश्री शिवराम वेंकाजी व शिवराम पांढरंग यांस व माद्रेकर व आरवदकर तुमचे आप्त यांकडून वीस गांव संबंधी अग्निहोत्राचें कार्य करावें. ब्राह्मण चिरंजीव बरोबर जात असे. हे विनंती.

लें० नं. ३४३ श्री.

चिरंजीव गणबा व काशिबा व कृष्णोबा यांस

आशीर्वाद. येणेंप्रमाणें एकंदर नग सणगीं एकूण ५० पन्नास पाठविलीं आहेत. याशिवाय घरीं लुगडीं व चोळखण व धोत्रजोडे तेथें जांबगांवीं अथवा पुणेस खरेदी करून पाठविणेंविसीं आलाइदा यादी करून दिली आहे. त्याप्रमाणें मशारनिल्हे बलवंतराव खरेदी घेऊन पाठवितील. मौजे कडेगांव व मौजे रावतळें सरकारांतून आपल्याकडेस जाहागीर आहेत. ( ) विषयीं मशारनिल्हे

दळवी यांस जांबगांवचे मुजमीची असामी बागसुद्धां सांगितली आहे. आणि तेथील रुपया घरच्या खर्चास नेमणूक करून दिली आहे. त्याप्रमाणें वसूल होईल तो• तुह्मांकडे जमा करितील. तुह्मीं आपली चौकशी ठेवीत जावी. येथून त्या ऐवजावर वरात अगर चिठ्ठी एक रुपयाची होणार नाहीं. पेशजी राजश्री रामराव वासुदेव वागळे यांजकडून तुह्मांस काय पोहोंचलें असेल त्याची यादी बळवंतराव यांजकडे पाठविणें. ते हिशेब मागील पाहतील. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. ३४४ श्री.

याद तगाईबद्दल बळवंत रघुनाथ याणीं पत्रक कुळारग दिल्हें त्याची रुजवात केली. त्यास बाकी.

	बद्दल पत्रक	पै॥ गैररुजू	बाकी.
शिवराम खंडेराव.	१०	०	१०
खोंदाभाई.	२९	४	२५
लक्ष्मण पा॥ सिंदे.	३	३	०
राणोजी पा॥ चिताळकर.	१३०	०	१३०
बापोजी पा॥ निमे पो.	३८	०	३८
आपाजी पाटील.	२९	२९	०
लाडको बाबुराव.	७	०	७
जनाजी माहार पुडे.	१३५।॥·	·।॥·	१३५
सजना येवला.	१२	०	१२
बाळनाथ गोसावी.	१००	०	१००
घमा माळी कापरा.	२१॥≈	०	२१॥≈
बाळोबा दादा.	१३	०	१३

१०० बाळनाथ गोसावी.
६१ येसू लोढा.
२९ सदाशिव फुलारी.
४२। मल्हारी राऊत.
१९॥= हारी माहार.
१२ भाहुदीन.

३२६।॥≈ बाकी कुळें साल मजकुरीं व पेस्तर सालीं सोईसोईनें वसुलात येतील. रुपये ७९६८–

लें० नं. ३४५ श्री. ४

(याचे पूर्वीचे तीन बंद मिळत नाहींत.)

चिरंजीव राजश्री गणोबा व आनास आशिर्वाद. इकडील वरकड सर्व जावदेस सुखरूप आहे. चिरंजीव राजश्री येशवंतराव भाऊ येथेंच आहेत. मातोश्री भिकूबाया व चिरंजीव राजश्री सदोबा यांची कोंकणांत गुजराथच्या रस्त्यानें रवानगी केली होती. तीं घरीं जाऊन पोहोंचलींच असतील.

---

१. बळवंतराव रघुनाथ दळवी आरवलीकर. २. ही तगाई जिवबादादांची जहागिरी जांबगांव व रायतळें येथील कुळांस त्यांचे कारभाऱ्यांकडून मिळालेली आहे.

वरकड वर्तमान मागाहून लिहून पाठवूं. तुह्मांकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. श्रीचें देऊळ बांधणार त्यास चिरे व लांकडें काढावयास लावावीं. दसरेचे सुमारें देवळाचे खर्चाचीही तजवीज करून पाठवून देऊं. वरकड वर्तमान वर पत्रीं लिहिलें आहे. त्याचीं उत्तरें जलदी पाठवून देणें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री कृष्णोबा व अंतोबा व सगूण व घनबा व पांडोबा व पुरुषोत्तम यासीं आशीर्वाद उपरी. तुमचीं हस्तअक्षरचीं पत्रें येऊन वर्तमान ( ) दरहमेशा आपआपल्या स्वदस्तूर ( ) पाठवीत नाहीं. इकडील मजकूर ( ) चिरंजीवास लिहिला आहे; त्यावरून कळों येईल. लवकर लिहावयास शिकावें. ह्मणजे तुह्मांस रोजगारास घेऊन येऊं. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

मातोश्री गोपिकाबाई व ताई वडिलांचे सेवेसीं. साष्टांग नमस्कार इकडील वर्तमान सर्व चिरंजीवास लिहिलें आहे. त्यावरून कळेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

सेवेसीं सेवक बाजी भिकाजी आरोसकर साष्टांग नमस्कार विनंती. लिहिलेलें परिसोन लोभ करावा हे विनंती.

ले० नं. ३४६ २ श्री.

चिरंजीव राजश्री गणबा व आनास.

पहिलेपासून चालत आली आहे. त्याप्रमाणें करावी. फिरंगी याचें साधन चांगलें ठेवावें. आण आपलें वतनाचें कामकाज जपून करावें. तुमचा मूलस्वभाव आहे. याकरितां जें कराल तें पूर्तेपणीं समजून करावें. मागाहून जें आनुकूळ पडेल; तें खर्चास कार्तिक मासीं पाठवून देऊं ( ) आमचे शरीरानें अगदीं घालविलें आहे. घोडेवर बसायास सामर्थ्य नाहीं. याकरितां त्याचा बंदोबस्त करून द्यावा. हें मानस आहे. याउपर ईश्वरइच्छा प्रमाण. कापडाची वगैरे रवाना केली आहेत. त्याची याद आलायिदा पाठविली आहे. त्याप्रमाणें सनद ठेवून घेऊन उत्तर पाठवावें. बहूत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

ले० नं. ३४७ श्री. १

श्रीमंत राजश्री आणासाहेब स्वामीचे सेवेसीं.

सेवक रामराव वासुदेव वागळे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ० ७ माहे रबिलावल मुकाम जांबगांव जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा करीत गेलें पाहिजे. विशेष. आपणाकडून रामा माडगा पत्राचीं उत्तरें ( ) वस्त व उंसाचीं थळें दोनही गांवीं आहेत. याचा ऐवज ऐसा पा। देणें. मुजमीचे असामीचा ऐवज तुह्मीं तेथील खर्चास ठेवणें. मौजे कडेगांवीं कारकून ठेविला आहे. त्यास उगाच खर्च वाढविणें कारण नाहीं. दाजी लक्ष्मण याजकडून ऐवज येणें. त्यास त्याचे घरीं घोड्या दोन आहेत. त्यांपैकीं एक घोडी चांगली पाहून अगर घोडा तीनशेंपर्यंत

---

१. हें देवालय श्रीरवळनाथाचें आहे. हा देव गोवें प्रांतांतील 'उकसई' गांवचा होय. तिकडे फिरंग्यांनीं बाटविण्यास सुरवात केल्यावर ते लोक पळून केरी गांवीं आले आणि नंतर केरकरांनीं तेथें देवालय बांधलें. जिवबादादा उदयास आल्यावर त्यांचे मनांत मोठें तेथें देऊळ बांधावयाचें होतें. पण देवाचा प्रसाद होईना. ह्मणून बरेच वेळां या देवळाबद्दल प्रसाद लावून खटपट करावी, आणि नको ह्मणून प्रसादीं सांगितलें, ह्मणजे काम बंद पडावें. असें आजवर चाललें आहे. यामुळें हें मध्यम प्रकारचें देवालय बांधलें गेलें आहे.

चांगला खरेदी घेऊन बापू बरवे पंढरपूरकर याजकडे पाठवून देणें. ह्मणजे ते आह्मांकडे पावतें करतील. पालखीची तबकडी पुणेंहून खरेदी घेऊन देणें ह्मणोन लिहिलें. असें यास आपलेकडील मजकुराचीं उत्तरें कलमबंदी.

१ दोनही गांवचे भरलावणीचा मजकूर तर. च्यार वर्षें जाहालीं; दुष्काळ भारी पडला. शेराची धारण जाहाली. तेव्हां प्रांतांतील मिरासदार कुणबी मयत होऊन लावणी पडली. त्याप्रमाणें याही दोन गांवची लावणी पडली. साल गुदस्तपासून आपलेकडील अमल जाहाला. तेव्हां कुळांची बहुतां प्रकारें खातरी करून बोलल्याप्रमाणें निभावणी करितों. तेव्हां साल मजकुरीं लावणीचा अजमास पाढरगण सिपाये व सुधा.

२३०० मौजे कडेगांव खर्च व दर अमल सुधा पो ३०००वजा गांव खर्च दर अमल ७००बाकी.

५७५ मौजे रायतळें येथील लावणी ११०० पैकीं वजा.

१५० पर अमल

१७५ गांव खर्च

२०० सूट. रबीचें पीक जाहालें नाहीं; सबब.

५२५

०

२८७५ बाकी.

सदरहूप्रमाणें साल मजकुरीं आकार अजमासें आहे. यांत अखेर सालीं गांवचा हिशेब होऊन निवळ वसूल आह्मांकडे काय पडतो, बाकी काय राहाती. हें पाहावें. भरजमा आह्मीं येथें घेऊन कमी आपणास ऐवज पाठवावे असें होणार नाहीं. कलम.

१ साहा हजारांचे नेमणुकेस सरकारांतून दोन्ही गांव आहेत. त्यास दोनही गांवचा कमालजमेचा आकार.

४५०० मौजे कडेगांव. भरजमा ५५०० व जामगांव खर्च दर अमल १००० बाकी.

१००० मौजे रायतळें. भरजमा १६०० व जामगांव खर्च दर अमल ६००.

येणेंप्रमाणें मागील कमाल आकार आहे. हाल्लीं कुणबीच मिरासदार राहिला नाहीं. पडिंगाची लावणी कौलानें दाहा रुपयांचें सेत दोन रुपयेस द्यावें लागतें. तें एक वर्ष राहून टाकितों. शेतें कितीक पडलीं आहेत. लावणीविसीं कितीएक खटपट करितों. परंतु कुणबीच थोडके पडले. तेव्हां उपाय नाहीं. कळावें.

१ मुजमूचे असामीचा ऐवज येईल त्यापैकीं; येथील खर्च करून गांवचा ऐवज कोंकणांत पा॥ ह्मणून लिहिलेंत. त्यास गांवची व असामीची जमा येईल ती तु ( )

ले० नं. ३४८ श्रीनाथप्रसन्न. तारीख १६ जानेवारी १८०४.

राजश्री कृष्णराव नारायण गोसावी यांसी.

छ० अखंडीत लक्ष्मीआलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें. विशेष. तुमचें प्रयोजन हुजूर जाणोन हें पत्र तुह्मांस लिहिलें

असे. तरी तुह्मीं कोणविसींचा संशयं मनांत न आणितां खातरजमेनें हुजूर येणें.[1] सरकारांतून बक्षिगिरीचीं वस्त्रें तुमचे नांवें राजश्री येसोजी रामकृष्ण 'याजपाशीं देऊन बक्षिगिरीची वहिवाट त्याचे हातें होत आहे. येविसींची वगैरे सविस्तर मशारनिल्हे लिहितील. तुह्मीं येणें. रवाना छ० २ सवाल. समा आर्बा मयां तेन व आलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोर्तब सुद्र.)

(मोठा शिक्का आहे)

लै० नं. ३४९ श्रीनाथप्रसन्न. तारीख २८ जानेवारी १८०४.

राजश्री कृष्णराव नारायण गोसावी यांसी.

छ० अखंडीत लक्ष्मीआलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहिणें. विशेष. तुह्मांस आणावयाकरितां इकडून राजश्री भास्कर माहादेव पाठविले आहेत. तरी पत्र पावतांच हुजूर येऊन पोहोंचणें. रवाना छ० १४ सवाल समा आर्बा मयां तेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

(मोर्तब सुद्र.)

(मोठा शिक्का आहे.)

लै० नं. ३५० श्रीनाथप्रसन्न. तारीख १८ दिसेंबर १८०४.

राजश्री बाळाजी यशवंतराव कमाविसदार तालुके निबये देहाये
प्रांत स्वदेश गोसावी यांसी.

छ० अखंडीत लक्ष्मीआलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे दंडवत सुरुसन मयां तेन व आलफ. तालुक्यानीहाय व देहाय फुटगांव सुभा प्रांत मजकूर येथील मजकूरची असामी नारायणराव जिवाजी यांचे नांवें वेतन सालीना तीनशें रुपये याची पेशजी सन खमस तिसेनच्या सालीं सरकारांतून करून दिल्ही आहे. दरम्यान मशारनिल्हे शांत झाले साठीं सदरहू असामी मशारनिल्हेकडून तगीर करून सदाशिव सहदेव याजकडे सरकारांतून सांगितली होती. त्याजकडून दूर करून हल्लीं साल मजकूर सन खमस मयां तेनच्या सालापासून पूर्वत्वप्रमाणें नारायणराव जिवाजी मशारनिल्हेचे पुत्र राजश्री कृष्णराव नारायण याजकडे सांगून वेतन पेशजीप्रमाणें सालीना साल मजकूर पासून दरसाल वेतन ३०० रुपये.

एकूण तीनशें रुपये वेतन सालीना पेशजीप्रमाणें करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी तालुक्यानीहाय व देहाय प्रमाणें मजकूर येथील मजकुरीचें कामकाज मशारनिल्हे याचे हातें घेत जाऊन सदरहू ३०० तीनशें रुपये वेतन साल मजकुरापासून साल दरसाल मशारनिल्हे यांसीं पाववीत जाऊन हिशेबीं खर्चीं लिहीत जाणें. याखेरीज भटली दरभोर गांवगन्नाकडून देववीत जाऊन मुजमीच्या कानूकाईदा सुदामतप्रमाणें यांकडे चालवीत जावें. याजशिवाई शहर माधवविलास ऊर्फ भामगांव येथें जिवाजी बल्लाळ यांणीं हवेली वाडा बांधिला आहे. तेथें मशारनिल्हे राहात होते. हवेली व शहर मजकुरानजीक मशारनिल्हेनीं पेशजी बाग तयार केला आहे. तो वाडा व

---

१. सन १८०३ सालीं इंग्रजांशीं झालेल्या लढाईत दौलतरावांचा पराभव झाला व त्यांचे डोळे चांगले उघडले. त्यावर ते पूर्वी मारलेल्या आपले कारभाऱ्यांचे वंशजांस पुनः आपल्या राज्यांत आणविण्याचे खटपटीस लागले.

हवेली याची वहिवाट पेशजीपासून मशारनिल्हेकडे चालत आली होती. त्याप्रमाणें हल्लीं सदरहू बाग व हवेली मजकूर येणें. रवाना याचें याजकडेस चालवणें. हवेली व बाग मजकूर वहिवाट मशारनिल्हे करितील. जाणिजे छ० १५ माहे रमजान. बहूत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. ३५१ श्रीनाथप्रसन्न. तारीख १८ डिसेंबर १८०४.

राजश्री बाळाजी यशवंत कमाविसदार तालुक्यानीहाय
व देहाय प्रांत स्वदेश गोसावी यांसीं—

छ० अखंडीत लक्ष्मीआलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे. दंडवत सुरुसन खमस मैयां तेन व आलफ. जिवाजी बल्लाळ, जगन्नाथ राम व नारायणराव जिवाजी निसबत सरकारचें चालविणें अगत्य जाणोन मशारनिल्हे यांच्या कुटुंबाच्या खर्चाच्या बेगमीबद्दल सालीना दरसाल ठराव साल मजकुरापासून दरसाल रुपये

३०००	जिवाजी बल्लाळच्या कुटुंबाच्या खर्चाच्या बेगमीस दरसाल सालीना	रुपये ३०००
१०००	जगन्नाथ राम यांच्या कुटुंबाच्या खर्चाच्या बेगमीस दरसाल सालीना	रुपये १०००
२०००	नारायणराव जिवाजी यांच्या कुटुंबाच्या खर्चाच्या बेगमीस सालीना दरसाल	रुपये २०००
६०००		

येणेंप्रमाणें साहा हजार रुपये दरसाल ठराव्याशीं गांव प्रांत स्वदेशपैकीं खेरीज हिशेदार पर अमल करून दरोबस्त साल मजकूर सनद खमस मैयां तेनच्या सालापासून लावून देणें ठरले गांव येणेंप्रमाणें.

		देह.
१	मौजे कडेगांव पैकीं पारनेरपैकीं.	देह.
१	मौजे रायतळें तालुका रांजणगांवपैकीं.	देह.
२		

एकूण देह दोन साल मजकूर सन खमस मया तेनच्या सालापासून सरकारांतून करार करून दिल्हे असते तरी सदरहू दोन गांव मशारनिल्हे याच्या जुमाला करून देणें. हे होय. मजकुरीं खेरीज हिशेदार करून सरकार अमलाची वहिवाट मशारनिल्हे करितील. तुह्मीं तेथें खंखळगिरी न करितां गांव याचे स्वाधीन करून देणें. जाणिजे छ० १५ माहे रमजान बहूत काय लिहिणें हे विनंती.

बार.

लें० नं. ३५२ श्री. ३

चिरंजीव[1] राजश्री गणोबा व आनास आशीर्वाद—पर्यंत गेलों होतों. तेथून त्याचा निरोप घेऊन कोटेस आले होते. तेथून हाल्लीं राजश्री सर्जेराव बापूबरोबर अजमेर प्रांतीं आहेत. सगुणबा चिरंजीव राजश्री यशवंतराव भाऊ याजकडे आहेत. राजश्री बाबुराव पांडुरंग मुलेंमाणसें सुद्धां भरतपुराहून निघोन आलीं तीं गोहोदेस आहेत. चिरंजीव राजश्री रामराव नाना येथें आले होते. ते चिरंजीव आपाबरोबर रवाना करून दिल्हे. चिरंजीव बाळकृष्ण व गोपाळबा व गणबा व चिरंजीव

१. या पत्राचे पूर्वीचे दोन बंद मिळत नाहींत.

रामबा माद्रेकर व बाळा पावणे यांची रवानगी चिरंजीवाबरोबर ग्वालेरीस केली. फार करून गृहस्थ मंडळी येथें कोणी ठेविली नाहीं. घनबा व बाजीबा आरोसकर व बाळोबा बांदेकर येथें ठेविले आहेत. वरकड झाडून मंडळी सुभ्याबरोबर रवाना केली. अजमेरचा सुभा चिरंजीव राजश्री यशवंतराव भाऊकडे जाहाला. त्याजकडे चिरंजीव राजश्री लखबा मळगांवकर व रंगूबा साखवळकर हे मात्र अजमेरकडे गेले. केरीचें देवालय बांधावयाकरितां कांहीं तजवीज करून खर्चाची पाठवावी; ह्मणोन लिहिलें यास ग्वालेरच्या सुभ्याचा बंदोबस्त जाहालेवर त्यास सांगितलें आहे. ते पाठवून देतील. खाजनाचा बांध वगैरे बागाची उस्तवारीस हजार दोन हजार रुपये लागले ते करावी. आण लिहून पाठवावें. त्याप्रमाणें पाठवून देऊं. बागाचे व खाजनाचे आगर याचे उस्तवारीस चुकूं नये. फिरंगी यासी साधन चांगलें राखावें. ह्मणजे आपले उपयोगी आहे. शेंदोनशें रुपये लागल्यास चिंता नाहीं. चिरंजीव राजश्री मदबा रांगणेकर याची सून वारली होती. त्याचें लग्न वैशाख शु॥ ३ चा करार आहे. त्याजप्रमाणें होईल. राजश्री लखबा भाऊ कोटेस सुखरूप आहेत. व सूनही सुखरूप आहे. त्यास ग्वाल्हेर प्रांतांतील मामलत करावी ह्मणून सांगोन पाठविली आहे. चिरंजीव ग्वालेरीस जाते वेळीं कोटेवरून गेले आहेत. चिरंजीव राजश्री बाळकृष्ण नाना मातु ( ) व चिरंजीव सौभाग्यवती गंगाबा (यापुढील बंद मिळत नाहीं.)

ले० नं. ३५३ पै॥ छ० ९ मोहरम श्री.
ऊर्फ भाद्रपद शु ॥ ९.

स्वामीचे सेवेसी त्रिंबक येशवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ तागायत चैत्र व॥ प्रतिपदा जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपणाकडून आलीकडेस बहूत दिवस पत्र ( ) हून वर्तणूक करितात कीं कैसें समजलें नाहीं. इकडील मजकूर श्रीमंत राजश्री बापूसाहेब सेनापति देशीं गेले. फार दिवस आले नाहीं सबब श्रीमंत सौ॥ बाईसाहेबांची मर्जी खप्पा होऊन जावेदची जप्ती फडणीसाजवळ सांगितली. वसूल फडणीस घेतात. हुकम-( )

ले० नं. ३५४ पै॥ छ० १९ मा ( ) मयां तेन. श्री. माहे मार्च १८०५.

श्रियासह चिरंजीव राजश्री गणोबा व आना यास प्रती—( ) व बाळाजी राम अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ ता। चैत्र वद्य ( ) येत मुकाम लष्कर नजीक उदेपूर ( ) येथें ( ) मंडळी यथास्थित ( ) विशेष. बहूत दिवस झाले खुशाल ( ) कळत नाहीं. तरी येणारा-समागमें ( ) पत्र पाठवून सं ( ) यानंतर येथील साध्यंत मजकूर. तुह्मांस वरचेवर लिहितच आहों. प्रस्तूत मार्च मासीं श्रीमंत महाराज यांणीं मेहेरबानगी करून गोहद ग्वालेरच्या सुभ्याचीं वस्त्रें दिलीं. ते समई राजश्री लखबादादा यांजसमागमें फौज तोफा पळटणें देऊन बंदोबस्ताकरितां रवाना करून दिल्हे. त्याउपर आठचार रोजांनीं चिरंजीव राजश्री आपा येऊन पोंचले. लखबादा-दांचीं पत्रें ग्वालेरच्या किल्ल्यावर व ठाण्यांनीं ठाणीं बसवून अमल चालू जाहाला. ऐशी हालीं

१. जगोबा बापू ऊर्फ जगन्नाथ राम केरकर. २. नागपुरास होते. दुसरीं पत्रें पहा. ३. बायजाबाई, दौलतरावांची बायको. ४. जावद ही केरकरांची जहागीर होती. ५. जानेवारी सन १८०५. ६. हे मळगांवकर किंवा लखबा पेंडणेकर होत.

चिरंजीव आपा आपली गृहस्थ मंडळी आपासमागमें आली ती व येथें होती ती असे सर्व मंडळी व फौज तोफा पलटण देऊन आज रवाना करून दिल्हे. येथून दाहा कोस मुक्कामास गेले. पुढें मजल दरमजल जाऊन पोंहचतील. प्रथम ग्वालेरचेच सुभ्याचीं वस्त्रें जाहालीं होतीं. मागाहून नरवर, सबलगड, वगैरे माहालांच्याही सनदा जाहाल्या. व अजमीरही चिरंजीव यशवंतराव भाऊ याजकडे सांगितली. ईश्वरसत्तेकरून जाला मजकूर तुह्मांस लिहिला असे. पुढें सत्ता श्रीहरीची. घरचा मजकूर कर्जावामाचा तुह्मीं पेशजी दोनचार वेळ लिहिला ऐकितों. ध्यानांतच आहे. ( ) विनित होतो. तो ग्वालेर वगैरे महाल ( ) जाबसालांत लागलों. थोरल्या कामाची थोरली सरफरासी करितां स ( ) गेले. हल्लीं ( ) तेथें जाबसाल घडून विलंब लागला. आतां तुह्मांकडील जाबसाल खर्चाची मिसळ लाऊन सत्वरच रवानगी करून देऊं. कर्जावामाची तुह्मीं कोणेविषईं काळजी न करणें. श्रीचे कृपेंकरून सर्व घडून येईल. चिरंजीव ( ) याजमाघाहून मोघ्या व कानू ( ) तीन महिने जाहाले (यापुढील बंद मिळत नाहीं.)

लेॅ० नं. ३५५ श्री. २ सन १८०५.

राजश्री गणोबा व आनास आशीर्वाद.

ते पोंचलेच असतील. त्याजबरोबर पत्रें पाठविलीं आहेत तीं पोंचल्यावर सर्व समजण्यांत आलेंच असेल. चिरंजीवानें येथून लिहिलें आहे. त्याप्रमाणें तुह्मीं तेथें केलेंच असेल. माघें यांची व कानूची जलदीच रवानगी करून द्यावी. ह्मणजे तुह्मांकडील सर्व येथें आह्मांस समजेल. आमचे चित्तीं चिरंजीव आल्यावर घरीं यावयाचें होतें. त्यास ग्वाल्हेर नरवरचें काम सुभेचें गळीं पडलें. त्यामुळें येणेंचें स्थंबित आहे. त्यास चिरंजीव सुभ्यावर गेले आहेत. हे एक वर्ष कामकाजांतून पार पडतील तेव्हां येण्याचें होईल तर पाहावें. तुह्मीं आपणांस नेण्याविसीं शफत घालून लिहिलेंत. त्यास तुह्मांस आणावयास चिंता नाहीं. परंतु वाडवडिलांपासून वतनाची जागा आण घर तेथें सांभाळी ऐसा कोण आहे. याचा बंदोबस्त सर्वांनीं मिळोन करून आह्मांस लिहून पाठवावें. त्यासारखें लिहून पाठवूं. मातोश्री गोपिका होनी व वरकड सर्वांस एकवेळ काशीयात्रा करवावी; हें मानस आहे. त्यास त्यांचा कसा विचार आहे तो त्यांजकडे पुसोन लिहून पाठवावें. त्यासारखें येथून आणावयास पाठवूं. राजश्री सावंत यांचा आपसांतील कज्जा कसा ठरला तो तपशीलवार लिहून पाठवावा. सर्व गृहस्थ मंडळी कज्यामुळें केरीस राहिली आहे. त्यास तुमचे हातें त्याचें खबर समाचार होईल तो घेत जावा. श्रीमंत राजश्री दौलतराव बाबा व सौ ॥ मातुश्री बाईजाबाई साहेब यांची मर्जी आह्मां ठायीं चांगलीच आहे. आह्मी त्यांचे मर्जीनुरूप वर्तणूक करितों. ग्वालेरचा सुभा बाईनेंच आपले नांवें करून आह्मांस सांगितला. वरकड मुत्सद्दी यांचे विचारें नव्हता. परंतु बाईनींच कृपा करून ( ) त के राजश्री येसोबा आ ( ) लेंकराबरोबर कहुर—(यापुढील बंद मिळत नाहीं.)

लेॅ० नं. ३५६ श्री. तारीख १ मे सन १८०५.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री काशिबा[2] आना स्वामीचे सेवेसीं.

सेवक सदाशिव वासुदेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ताा छ० १ सफर मुकाम लष्कर जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आह्मांकडील वर्तमान सविस्तर

---

१. रामराव आपा केरकर हे जगोबा बापूंचे चिरंजीव होत. २. काशिबा बळवंत केरकर ऊर्फ आनासाहेब.

चिरंजीव राजश्री भाऊचे पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून समजेल. बक्षीगिरी औरंवदेकर[1] करीत होते. ती हालीं कालच प्रतिपदेस[2] आपल्या तीर्थस्वरूपांकडे[3] सरकारांतून सांगितली आहे. हा सविस्तर मजकूर तुमच्या घरच्या पत्रावरून समजेल. आमचे शरीरीं बहूत आराम नव्हतें; त्यास हालीं कांहीं आरामी आहे. आज पांच महिनेपर्यंत बहुतच हैराण गती जाहाली होती. आतां निखालसती आहे. तुमच्या खर्चाची खबरही जलदीच घेतील. आह्मीही सांगोन हलकारा रवाना करितों. आप्तमंडळी खुशाल आहे. अजम कोमेदात याची मर्जी चांगली राखीत असावी. तोतया प्रकर्ण कसें जाहालें तें सविस्तर लिहावें. आपले मातुश्रीस आमचा साष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा. बहूत काय लिहावें कृपा लोभ करावा हे विनंती.

चिरंजीव राजश्री पुरुषोत्तमराव यास आशीर्वाद. तुह्मी लिहावयास काय शिकलां हें सर्व पुसत असतात; तरी लिहावें. हे विनंती.

ले० नं. ३५७ पै॥ छ० १२ जिल्हेज श्रीशंकर. तारीख १८ नवंबर सन १८०५.
सन सीत मयां तेन.

चिरंजीव राजश्री गणबा व आना व आपा यांप्रती—बाळाजी राम आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० २५ साबान मुकाम लष्कर नजीक देवगड मदारा प्रांत मेवाड जाणोन तुह्मांकडील क्षेम वरचेवर लिहीत जाणें. विशेष. तुह्मांकडून पत्र येऊन फार दिवस वर्तमान कळत नव्हतें. त्यास गणू जाऊन पोहोंचलयाचें पत्र घेऊन कानू ज्यासूद आला. त्यावरून समस्तांचें सुखरूपपणाचें वर्तमान कळून संतोष जाहाला. दोन्ही गांवच्या बागाची मेहनत करितों व कापड्यावाल्याचें व खंडाळे प्रकर्णीं वगैरे लिहिलें तें कळलें. असें यास बागाची मेहनत केली पाहिजे. पहिली कैलासवासी वडिलीं केलीच आहे. त्यांत कोठें कोठें तसनस जाहाला असेल. त्याणें थोडक्यानेंच अवघी खराबी होती. तें वरचेवर पाहात जाऊन मरामत जाहाल्यानें आपलाच उपयोग आहे. कापड पावलें ह्मणून तुह्मी लिहीत गेलां; तीं पत्रें न पोहोंचल्याचे पूर्वीं उत्तर न आलें ह्मणोन लिहिलें होतें. पत्र आल्यावर कळेल. सोहिराजीकडील कापड बागणीस ठेविलें. त्यास बागणीकडे गोडबोले यांचा दंगा इस्लामपुरास लढाई लागली ह्मणोन श्रीमंत भास्करराव आण्णाचें पत्र कानूचे बरोबर आलें होतें. तेथेंही वर्तमान जाऊन घरीं कापड लौकर गेल्यास चांगलें. खंडाळ्याकडील प्रकर्ण तेथें माजलें आहे. येविसीं पेशजीं लिहिलेंच होतें. त्यास मातोश्री ताईचें ह्मणणें आपणास लिहिलें नाहीं. त्यास गंगू कामाठी याजबरोबर चिरंजीव यशवंतराव भाऊ याणीं लिहिलें. तो जाऊन पावलाच असेल. त्यावरून कळेल. आणखीही संशय असल्यास हालीं येथून मातुश्री गोपिका होनीस व ताईस व राजश्री बहुगुण कामत यास पत्रें लिहिलींच आहेत. तीं त्यांस प्रविष्ट करून उत्तरें आणवावीं. याउपर लटकें बंड त्यांस माजवणें असल्यास उपाय काय? हालींही चिरंजीव भाऊनीं कागद परभारें कानूकडे दिले आहेत. इकडील वर्तमान तर तीर्थस्वरूप राजश्री बापू यांस सरकारांतून माळवे प्रांतींच्या बंदोबस्तास पाठविले आहेत. दोन महिने होत आले. माळव्यांत राजश्री सर्जेराव घांटगे यांस सरकारांतून निरोप घरीं जाण्याविसीं जहाँला. ते माळव्यांत येऊन

१. यंसोजी रामकृष्ण आरंवदेकर. २. वैशाख शु॥ १ शके १७२७, तारीख ३० एप्रील सन १८०५. ३. जगोबा बापू. ४. मंत्री बाह्मणीकर. ५. पत्र नं. ३१६ पहा. ६. जगोबा बापू यांस. ७. दौलतराव शिंद्यांबरोबर इंग्रजांचा जो तह झाला, त्यांत सरजेराव घाटग्यास घालवून द्यावें असें ठरलें होतें.

दोन तीन हजार फौज जमवून धूम करूं लागले. याशिवायी किरकोळ होळकराकडील वगैरे सरदार याणीं बेदा केला. त्यास काढून देऊन माळव्याचा बंदोबस्त राखण्याविसीं फौजसुद्धां रवाना केले. त्यास तिकडील बंदोबस्त सरकार मर्जी रक्षुन व सर्जेराव यासही न तोडितां त्याची रवानगी मारवाडच्या रस्त्यानें होळकर यांजकडे पटाल्याकडे जावयाचें ठरवून आपण पुढील किरकोळ बंडें आहेत; त्याच्या बंदोबस्तास गेले आहेत. तेथील काम उरकोन लवकरच सरकारांत येतील. तुमचीं पत्रें अगोदर वडिलांकडे येऊन येथें आलीं. चिरंजीव आपाच्या येण्याच्या बंदोबस्ताविसीं व वडिलांचें घरीं यणें व्हावें येविसीं लिहिलें. त्यास याचें उत्तर वडील लिहितील त्याप्रमाणें करावें. चिरंजीव आपाचें येणें होईल तेव्हां समागमें चिरंजीव सौभाग्यवती कृष्णाबाईस आणावी. चिरंजीव राजश्री रामराव मळगांवकर भरतपुराहून येथें आले. येथें ओढीचा प्रकार जाणोन त्याची खर्चाची तरतूद करोन राजश्री बाणाजी सेटे हुजरे दक्षिणचे महाल जांबगांव वगैरे सरकारांतून करून देशीं जावयास गेले. त्यासमागमें चिरंजीव वडिलांपाशीं माळव्यांत रवाना केले. तेथें सुखरूप पावल्याचें लिहून आलें. राजश्री बाबुरावजी भरतपुरास आहेत. इंग्रजांचा तेथें उपद्रव नाहीं. जाठांचें व इंग्रजांचें सूत आहे. खर्चाच्या हुंड्या पाठविल्या. त्यास हालीं बाजीरावशाई चांदवड ह्मणून जाल्यामुळें तोटा येतो. ह्मणून लिहिलेवरून जुने चांदवड हुंडी चालण ह्मणोन पटा पेशजीचे अडीचसुद्धां पाठविल्या आहेत. पावल्याचें उत्तर पाठवावें. लग्नाच्या समयास झांपसेकर[1] यांजकडून कर्ज घेऊन काम चालविलें. सध्यां तो येऊन हिशेबास बसला. गृहस्थ समयास कामीं आला. त्यापेक्षां त्याची वारावार जाहाली पाहिजे. त्यास तूर्त येथून हात चालला नाहीं. मागाहून कळेल त्या रीतीनें तुमच्या कर्जाचा पेंच परिहार होय तें करितां येईल. चिंता न करणें. सध्याकाळीं येथं बहूतच खर्चाची ओड आहे. नित्याचा खर्च चालणें कठीण. कामकाज मात्र बक्षिगिरीचें लौकिकांत आहे. परंतु पहिला जाबसाल कांहीं नाहीं. सरकारांतच वोढ. तेव्हां वरकडांचें चालतें कशानें ? बरें ईश्वरसत्तेकरून हेही दिवस जातील. चिंता नाहीं. शिवराम देवजीचें वर्तमान ऐकून बहूत चित्तास खेद जाहाला. त्याचे घरची कांहीं खबर घेतली पाहिजे. ध्यानांत आहे. मागाहून होईल तें पाहूं. व चिरंजीव बायासही पाठवूं; ह्मणोन सांगावें. वरकड सविस्तर या टपालांतून वडील लिहितील त्यावरून कळेल. राजकी वर्तमान तर आपल्या सरकाराशीं फिरंगी[2] याचें सलुखाचें बोलणें होऊन यांचा मुकाम मेवाडांत जाहाला. होळकरांस सलूख करणें नाहीं. जाणोन दरकूच जाऊन पटाल्यापलीकडे सीक सामील केले. व गिलच्यांचा वकील येऊन बोलणें स्नेहाचें होऊन चावरदस्तें त्याजकडील येतात. असें वर्तमान आहे. फिरंगी याचीं पलटणें झाडून पाणिपताकडे गेलीं. पुढें त्याची याची लढाई व्हावयाचें वर्तमान आहे. होळकर याचा दम चांगलाच आहे. राजश्री यसाजी रामकृष्ण याजवर सरकारची इतराजी होऊन कैद होते. ते रात्रीचे पळून जाऊन होळकर यास मिळाले. तेथें हजारपांचशें लोकानसीं आहे. आपल्या सरकारांत सलूखाचें बोलणें करून माहाल घेतले ते सोडून द्यावे. व ऐवज कांहीं द्यावा. याप्रमाणें होऊन उज्जनीस याणीं जावें. असें ठरलें. परंतु ग्वाल्हेर वगैरे माहालाच्या सोडचिठ्या आजोन आल्या नाहींत. उज्जनीस गेल्यावर येतील तर पाहावें. कारभारी राजश्री इंगळे व अन्याबा भास्कर संमतास

१. नारायण शेट झांपसेकर या नांवाचे सावंतवाडीकडील एक सावकर. २. इंग्रज.

चिटणीस. असें वर्तमान इकडील आहे. चिरंजीव आपाचें येणें न जाहालेस आपास तेथें घरच्या बंदोबस्तास ठेऊन तुह्मीं यावयाचें करणें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव अंतोबा व सगुण व पांडबा व कृष्णोबा व घनश्याम व पुरुषोत्तम व चिरंजीव सौ॥ मुली यांस अनुक्रमें आशीर्वाद.

लें० नं. ३५८ पै॥ छ० १२ जिल्हेज श्री. तारीख १३ जानेवारी १८०६.
सन सित मयां तेन.

चिरंजीव राजश्री गणबा व आना यांसी प्रती—जगन्नाथ राम आशीर्वाद उपर येथील कुशल तागायत छ० २२ सवाल मुकाम धार प्रांत माळवा यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. अलीकडे तुह्मांकडील कागद येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यास चिरंजीव ( ) आपा व मंडळी आली ते सर्व येथें सुखरूप पोंचले. त्यांचे सांगीवरून कळलें. आह्मी लष्करांतून माळवे प्रांतींच्या बंदोबस्ताकरितां फौज व कंपू घेऊन आलों. तीन महिने जाहाले. इकडील बंदोबस्त जाहाला. हुजूर जाण्याचा बेत लवकरच आहे. चिरंजीव राजश्री बाळोबा भाऊ व यशवंतराव भाऊ हुजूर मेवाड प्रांतीं आहेत. त्यांचीं पत्रें तुह्मांस आहेत. त्यावरून ( ) तुह्मी उभयतां घरीं आहां. संसारकृत्य काम तुमचे माथां. घरांत तुमच्या मातोश्री चुलत्या वडील आहेत. तुह्मी लेंकरें पडलां. बाईकांचा कारभार मनस्वी. त्या चालीवर न जावें. संसार बहूत युक्तीनें करावा. का ( ) आतां पहिले दिवस राहिले नाहींत. रोजगारावर इकडे आह्मी आहों. हा तुह्मांस सर्वत्रांस भ्रम. तर पहिला काळ राहिला नाहीं. क्षणभंगूर विच्यार. राज्यस्थित बिघडली. यांत ईश्वर अब्रू राखील ती खरी. घटकेचा विश्वास कोणही कामाचा पडत नाहीं. याकरितां खर्च वेर्च करणें तो युक्तीनें करून सावधगिरीनें असावें. कर्ज मनस्वी कराल तर पार पडणें कठीण. व्याजकरितां ( ) संग पाहून करीत जाणें. चिरंजीव आला. त्याणीं कर्जाचा वगैरे सांगितल्यावरून सर्व कळलें. त्यास सर्व मजकूर चिरंजीव ( ) ह्यांस लिहिलें त्यावरून कळलें. मातोश्रीनीं करणें तें समजोन करावें. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. ३५९ श्रीगजानन. तारीख १२ मार्च सन १८०६.

श्रियासह चिरंजीव राजश्री आना याप्रती—घनश्याम व्यंकाजी आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० २० जिल्हेज मुकाम लष्कर नजीक उदेपूर पंधरा कोश प्रांत मेवाड जाणोन सर्व सुखरूप आहों. विशेष. एकदोन पत्रें पाठविलीं. तीं पावोन लिहिला मजकूर समजला. दसरेचे दिवसीं आमचे घराकडील हकीगत लिहिली कळली. त्यावरून वडिलांशीं विनंती केली. परंतु लाभतकाळ नजीक नाहीं. यामुळें काम न जाहालें. इकडील वर्तमान तर ग्वालेर प्रांत सरकारांतून किल्ले सुद्धां वडिलांचे जिमे केला. त्याजवरून तीर्थस्वरूप राजश्री लखबादादास फौज देऊन किल्ल्यास ठाणें बसवावयाकरितां पुनः रवाना केलेवर एक महिना जाहाला. ठाणें बसोन पत्रें आल्यावरून हल्लीं चिरंजीव राजश्री आपासाहेब यांची रवानगी फौज पलटणें देऊन जाहाली आहे. एकंदर चंव रोजांत झाडून कोकणची मंडळी सुद्धां जावयास जातील. आह्मी येथ उभयतां वडिलांकडे

१. महादजी व जिवबादादा यांच्या नंतर शिंद्यांचे राज्याची व्यवस्था काय झाली ती पहा! २. हे लखबादादा मळगांवकर होत. ३. सर्जेराव घाटगे यांचे कारकीर्दीत ही मंडळी शिंदेशाहीपासून अलग राहिली होती. नंतर घाटगे यांजमुळें राज्याचा तोटा झाल्यावर पूर्वींचे केरकर वगैरे ज्या मुत्सद्दी मंडळीस दौलतरावांनीं पुनः बोलाविलें, ते हे लोक होत.

आहों. कोणे गोष्टीविसीं चिंता न करावी. चिरंजीव राजश्री बिठोबा धामापूरकर येथून कोंकणांत जावयास गेले. त्यापासून पत्र आलें नाहीं. त्यावरून चिंता आहे. आतां जोतपुराहून मातोश्री मावशीबाईचें पत्र आलें. तिणीं चिंतातूर पत्रें लिहिलीं त्यावरून आपणांस लिहिलें आहे. तरी सुखरूप कोकणांत पोंचले याचें उत्तर लिहावें. आमचे घरीं पत्र लिहावें; तर पत्र लिहावें ऐसा विचार नाहीं. तुह्मांकडे कोणी आल्यास सुखरूप आहे; ह्मणोन सांगावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

सौ॥ मातुश्री बाईसाहेब व सौभाग्यवती मातुश्री मावशीबाईस चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना प्रविष्ट कीजे हे विज्ञाप्ती.

लें० नं. ३६० पै॥ छ० ८ मोहरम. श्री. तारीख १३ मार्च सन १८०६.
छ० २७ सफर सन सबा मुकाम आरंवदें.

श्रियासह चिरंजीव राजश्री साबाजी यांप्रती–जगंनाथ राम अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम तागायत छ० २१ जिल्हेज मुकाम नजीक झांसी जाणोन स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष. तुह्मांकडील बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर येणाराबरोबर पत्र पाठवून वर्तमान लिहीत जावें. यानंतर तुह्मे भेटीस यावें तर सरकारचे निरोपाविसीं चिरंजीवास पुणेंस पांच च्यार पत्रें पाठविलीं. परंतु निरोप होत नाहीं. याकरितां तुह्मीं घराकडील च्यार महिनेचा बंदोबस्त राखोन व श्रीचा कौल घेऊन भाद्रपद मार्गीं घरींहून निघाले तर भेट घेऊन माघारें तसेंच रवाना करून देऊं. बारा वर्षें होत आलीं. तशांत भेट जहाली; तर जाली. नाहीं तर पुन्हां भेट होणार हें कळतच आहे. श्रीमठ तळवणें येथील तळ्या दोनही बांधावयाकरितां हुंडी रुपये दोन हजार रुपयेची पाठविली. ही घेऊन तुह्मीं तेथें जाऊन तळ्या बांधून घ्याव्या. चांगल्या बांधून घ्याव्या. पांच च्यारशें रुपये अधिक उणें लागलेस द्यावे. परंत तळ्या चांगल्या बांधाव्या. तुह्मांकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावें. आणखी तुह्मीं आलेवर तेथील कर्जाचाही तोडजोड लवकर[१] होऊन येईल.[१] बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. ३६१ पै॥ छ० २८ माहे जमादिलावल श्री. तारीख २३ जून सन १८०६.
ऊर्फ अधिक वद्य सन सबा मयां तेन व आलफ.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री नाना केरकर स्वामीचे सेवेसीं.

सेवक भास्कर गोविंद साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ तागायत छ० ५ माहे ( ) जाणोन स्वकीय कुशळ जाणोन लिहीत जावें. विशेष. आह्मीं आले त॥ पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. इकडील( )सुभा सरकारांतून श्रीमंत बापूसाहेबांकडेस सांगितला. आण पांच( ) रु॥ रसद घेतले. बंदोबस्ताकरितां ती॥ राजमान्य राजश्री लखबादादास पाठविले. ग्वाल्हेरीस व गोहदेस ठाणें इंग्रजांचें होतें; तें त्याणीं खालीं करून दिल्हें. तमाम मुलखांतील अमल जाहाले. मात्र आटेर सुटली नाहीं. हालीं ई ( ) ले यांस कैद केलें. आण नरवर सबळगड प्रांत आ ( ) चे नांवें जाहाले. आपाही लष्करांतून सुभेच्या बंदोबस्ताकरितां आले आहेत. समा ( ) कारभारी राजश्री बाळाजी आत्मा करतील तें खरें. चिरंजीव राजश्री सदोबा व राजश्री लाडोबा हवालदार व राजश्री लखबा

---

१. हा मठ सिद्ध पुरुष 'परशराम भारती'चा आहे. या सिद्धस्थानांत केरकर यांची भजणूक पूर्वीपासून असे. जिवबादादा इकडून जाण्यापूर्वीं या मठांत नित्य दर्शनास जात. हें स्थान सावंतवाडी संस्थानांत तळवणें गांवीं आहे. या मठाचें बांधकाम व तेथील पाण्याच्या तळ्या जिवबादादांनीं बांधविल्या होत्या.

मळगांवकर वगैरे झाडून मंडळी त्या ( ) बरोबर आली आहे. ( ) स गेला. दिल्ली आगरें महिने दोन महिने खालीं. कारणःफरांसीस कळला. ते स ( ) वक लढाई होन जाहाल्या. याज-करितां शिंदे होळकर यांसीं सलूख राखून इंग्रज जावयास गेला. राजश्री बाबुराव पांडुरंग मुलें माणसें सुद्धां गोहदेस आहेत. रात्रंदिवस निजध्यास चिरंजीव सौभाग्यवती कृष्णाबाईचा आहे. राजश्री लाडकोबा मोदी कुटुंबासुद्धां येथें आहे. एक मूल व एक कन्या आहे. कळावें. दादाचीं मुलें ( ) उभयतां मूल जोतपुराहून आलीं. चिरंजीव विठोबा धामापूरकर याचे बायकोस व पुत्रास समागमें घेऊन आलीं. सर्व सुखरूप ( ) णांत केरीमध्यें आहेत. ( ) कडून दूर रात्र व मृत व दगाफडका आहे. आपले नजीक एकादी चांगलीसी जागा पाहून देवावी. आण खबर समाचार घेत जावी. तुमचे भरंवसेवर तेथें माणसें ठेविलीं आहेत. दुसरें. राजश्री आपास एक पत्र आह्मांविसीं जरूर पाठवणें. कीं मजला काम काज मामलत सांगोन ममता राखावी. ह्मणजे पत्र पाठवावें. राजश्री बाळकृष्णमामा व गणबा ( ) मा आपाबरोबर आले आहेत. पुत कसला साब ( ) बस्त करतील तें खरें. नरवर सबळगड तूर्त खा ( ) ता दिसत नाहीं. खंडोजी इंगळे जबरीस आ ( ) बापूसाहेब व तीर्थस्वरूप भाऊ लष्करांत ( ) रूप आहेत. रोज पत्रें येतात. तुह्मांस कळावें. ( ) काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. ३६२ पौ॥ छ० ३ जिल्काद श्री. तारीख २४ अकटोंबर सन १८०६.

सन सबा मया तैन.

वडिलांचे सेवेशीं रामबानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ साबान मुकाम नजीक सामावली जाणोन वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून आज ( ) पत्र येऊन सांभाळ होत ( ) असें न करितां सदैव ( ) त्र येऊन सांभाळ केला पाहिंजे. आह्मांकडील वर्तमान. आह्मीं लष्करांत वडिलांजवळ आलों. ते एक मासपर्यंत एक जागीं होतों. नंतर ग्वाल्हेर प्रांताचा सुभा वडिलांस सरकारांतून सांगितला. तेव्हां वडिलांस दरबारीं राहाणें. त्यापेक्षां वडिलांनीं आह्मांस रवाना केलें. आह्मीं आल्यावर आज च्यार महिने जाहाले. हा प्रांत झाडून इंग्रजांचे दंगेमुळें फिरून राहिला आहे. आह्मांस रोज लढाईशीं माळा. रांगेडे जमीदार तमाम माजले आहेत. गडीबंद. एक गडी खालीं करणेंस एक महिना लागतो. असें असोन आह्मीं आल्या तागायत दाहां पांच जागीं ठाणीं बसविलीं. आणखीही बहुतच आहेत. हालीं लढाई रुबकर आहे. जोर तलबी मुलूख त्यांत मारून कुटून रुपये वसूल करावा लागतो. सरकारांत रसद बारा लाख रुपये देणें लागले. येथें फौज वीस हजार पाठविली आहे. ( ) या प्रांतीं वडिलांचेंही आ ( ) तजवीज आहे. पाहिजे प ( ) आपले कडेस खर्चास कांहीं पोहोंचलें नाहीं ह्मणोन पत्र लिहावयास ( ) पडती. चिंता नाहीं. चार रोज आगांमागां येऊन पोहोंचेल. वडिलीं कोणे गोष्टीविसीं काळजी न करावी. वरकड मजकूर अधिकोत्तर नाहीं. वडिलीं वरचेवर आशीर्वादपत्र पाठवीत असावें. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

लें० नं. ३६३. श्री. तारीख ८ नवंबर सन १८०६.

राजश्री कमाविसदार वर्तमान भावी शहर ग्वाल्हेर चौत्रा सायेर गोसावी यांस.

छ० अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे आा राम राम सुरुसन सबा

---

१. जगंनाथ राम ऊर्फ जगोबा बापूजवळ. २. हे पंचगौड ब्राह्मणांपैकीं आहेत.

मयां तेन व अलफ. वो। राजश्री व्यंकटाचार्य दिक्षीत अग्निहोत्री तेलंग वास्तव्य ग्वाल्हेर यांनीं राजश्री जगंनाथ राम याजपाशीं ग्वाल्हेरचे मुकामीं येऊन विदित केलें कीं; कुटुंबाचा योगक्षेम व अग्निहोत्राचा निर्वाह जाला पाहिजे.त्यावरून ब्राह्मण सत्पात्र, अग्निहोत्री, कुटुंबवत्सल, जाणोन शहर ग्वाल्हेर येथील चौत्रा सायर ग्वाल्हेर येथें रोजीना दररोज देणा. १ एकूण. एकूण एक रुपया करार करून सदरहू सन्द करून दिल्ही आहे. व्यंकटाचार्य अग्निहोत्री बावांस शहर ग्वाल्हेरचेच चवुत्र पा पैा रुपये एक देत जाणें. या सनदेची प्रत उतरून असल सनद भोगवटीयास परतोन देणें. रवाना छ० २६ माहे साबान सुरुसन सबा मयां तेन व अलफ. मोर्तब सूद्र.

(मोर्तब.)

(शिक्का.)

लेख नं. ३६४. (यापूर्वीचा बंद मिळत नाहीं.) सन १८०६ सुमार.

सरकारचें मकला कलम आहे. या अन्वयें दरोबस्त गांव आजकाल दरबारीं कारभार करितात; त्यांच्या गांवांसुद्धां ऐवज घ्यावा त्याप्रमाणें यांनींहि येथें घेतला. हें समक्ष आमच्या पाहाण्यांत आलें. आह्मीं कडेगांवीं गांवकरी यासी व बळवंतरावजीस मजकूर होता तो समजाविला. एक साला ऐवज देणें प्राप्त. चुकत नाहीं. असें जाणोन त्यांनीं सांगितलें कीं; निमे ऐवज त्यास दिल्हाच आहे. निमे राहिला त्याचाच ठराव करून सोडचिठी घ्यावी. त्याजवरून आह्मी राजश्री लाडको बाबूराव नारूरकर हे राजश्री नारोबा आवटी श्रीमंतांकडील आहेत. त्याजकडून गंगातीरीं दोन चार माहाल यांजकडेस आहेत. ते मुलांलेंकरांसुद्धां नगरीं राहतात. याचे विद्यमानें खोजी पाठविला; यासीं बोलणें करून हजार रुपये आणखी द्यावयाचे ठराविले. आणि कडेगांवची सोडचिठी घेतली. शिवाई दरबारखर्च शंभर रुपये पडले. याउपर कडेगांवीं त्यानीं चिटीचपाठी करूं नये. रायेताळें येथील परभारें ते वसूल घेतच होते. साल मजकूरचा फडशा जाहाला ह्मणजे तेथीलही सोडचिठी घ्यावी. मुजमीचें काम चालतें करावें. अखेर सालीं खर्चास देऊं. याप्रमाणें त्यांचें बोलणें जाहालें. त्याजवर पंधरा विसां रोजीं लष्करांत आमचीं पत्रें राजश्री मुरलीधर भाऊंस गेलीं होतीं. त्याजवरून त्यानीं दुसरीं पत्रें सरकारचे खुणेचीं पाठविलीं; त्याची नकल पाठविली आहे. त्याजवरून ध्यानास येईल. पत्रीं घेतला ऐवज माघारी देणें ह्मणोन आहे. तें पत्र घेऊन आह्मी मशारनिल्हे जामगांवीं होते त्याजकडेस गेलों. ते समयीं दाभाडे सेनापती याजकडील नवरा लष्करांत जाण्याकरितां जामगांवचे मुकामीं आले. त्याचें वीस बावीस मुकाम जाहालें. त्याचाही उपद्रव गांवांस मनस्वी झाला. आह्मी तेथें लष्करांतच होतों. एक मुकाम त्याजबरोबर जाऊन माघारे आलों. खोजी पाटिल यासीं पत्रें दाखविलीं. त्यांनीं उत्तर केलें कीं; तुमची सोडचिठी आली. याचा मजकूर आह्मांकडीलही वकिलाचें लिहिणें येईल त्याप्रमाणें वर्तणूक होईल. तूर्त आपण नवऱ्यासमागमें गंगेपर्यंत जातों. तेथून आल्यावर काय तें उत्तर सांगूं. त्याजवर आह्मी नगरीं खोजी पाटिला याची वाट पाहत बसलों. दोन च्यार दिवस जाहाले. मशारनिल्हे नगरीं आले. त्यास सरकारचीं पत्रें आलीं कीं, सर्जेराव यांचे चिरंजीव यांनीं नवऱ्याबरोबर लग्नास लष्करांत यावें. ते आले नाहींत. तेव्हां राजश्री दाजीबा देशमुख वकील व खोजी पाटील या उभयतांनीं कागल येथें जाऊन घांटगे मशारनिल्हे यांस आणून लष्करांत रवाना करावें. याप्रमाणें पत्रें आलीं.

---

१. जगोबा बापूंची धर्मांवर फार श्रद्धा होती असें दिसतें.

त्या अन्वयें ते जाण्याचे योजनेंत होते. तेव्हां आह्मीं त्यांस आमचीं पत्रें आलीं, त्याचें उत्तर काय? ह्मणून पुसलें. त्यांनीं सांगितलें कीं; आमचे वकिलाचीं पत्रें आलीं. त्यांत तुमचा मजकूर लिहिला आहे. तो तुह्मीं पाहावा. मजकूर पाहतां अन्वय कीं; बक्षीकडील कडेगांव व रायेताळें येथील सोडचिठी भिडेमुळें दिल्ही आहे. दुसरें पत्र नागोजी गुंड्याचे नांवचें वर त्याचे हातचा मार्तंड या खुणेंचे येईल. तेव्हां गांव मोकळे करून देणें. याप्रमाणें आहे. तुह्मीं लष्करांत लेहून सदरहू अन्वयें खुणेचें पत्र आणवावें. ह्मणजे एक गांवाची सोडचिठी दिल्ही. दुसरे गांवाचीही देईल. त्याजवरून आह्मीं येथून हाल्लीं छ० मजकूरचीं लष्करांत राजश्री मुरलीधर भाऊस पत्रें लिहून पाठविलीं आहेत. हे कागलास जाऊन ये परयंत डांकेंतून पत्रेंही येतील. मग जाबसाल जसा ठरेल; तसा लिहून पाठवूं. राजश्री मुरमीधर भाऊ यांचे नांवें आपणही एक पत्र लिहून पाठऊन द्यावें कीं; गांव व मुजमीचे आसामी विषई हरयेक बोभाटचें पत्र रामरावजी यांजकडून येईल; तसें सरकारचें पत्र घेऊन पाठविण्यांत यावें. याजकडून पत्र आल्यावर हयगई न करितां त्या क्षणीं बंदोबस्त करून पाठवीत जावा. ह्मणोन पत्र अगत्य पाठवून द्यावें. सारांश पुंडबावर आपण रागें भरून त्याचे हातें कांहींयेक काम जाहालें नाहीं. गांवचा ऐवज परभारें कसवटदार यांनीं नेला. यामुळें गैरमर्जी होऊन कोंकणांत रवाना करून द्यावें; ह्मणोन लिहिलें. त्यास इकडील पर्याय घडला तो सविस्तर आपल्यास लिहिलाच आहे. तेव्हां यांजकडेस अपराध तो काय आहे? दुसरें. यासी तूर्त रवाना करून द्यावें; तरी कडेगांवीं कारकून बाकी देखरेखीस पाहिजे. हे आज एक वर्षपर्यंत तेथील माहितगार जाहाले आहेत. इतक्यावर आपल्या मर्जीस येईल तसें लिहावें. त्याप्रमाणें करूं. राजश्री बळवंतरावजी याजकडील हिशोब पेशजी केला होता. तो पाठविला आहे. मशारनिल्हेही समक्ष आलेच आहेत. त्याजकडील सेतमळ्यापैकीं एकशें तीस रुपये वसूल जाहाले ते; व तगाईपैकीं ऐवज वसूल करून पाठविला आहे. तपशील.

५५० ऐन हुंडी हाल्लीं शिक्याची.
४४ हुंडणावळ दरशेंकडा ८ रुपयेप्रमाणें.
३१ जत्या ताा रामजीकडे कंद व तपकीर वजा होऊन बाकी द्यावे.
६२५

येणेंप्रमाणें सवासहाशें पाठविले आहेत. हे घेऊन पावलियाचें उत्तर पाठवावें. श्रीमंत मातोश्री यमुनाबाई सिंदे यांजकडील कसवटदार राजश्री हरी बाजी श्रीगोंद्यास आहेत. त्याचें नांवें मुजमीचे दरखाविषई पत्र आलें. तें पेशजीं आह्मीं त्यास दाखविलें. त्यांनींही पत्र मान्य केलें. अखेरचे सालीं गांवचे जमा वसूल करून ते समयीं दरखाचा ऐवज गांवगला मजुरा देऊं. त्याचा आकार होईल तो तुह्मांस समजावून देऊं. ह्मणोन सांगितलें आहे. हाल्लींही श्रीगोंद्यास राजश्री राघोबामामा आले आहेत. त्यांचें पत्र आह्मांस आलें; त्यावरून श्रीगोंद्यास उदईक जाऊं. मामाकडीलही मजकूर समजेल. कसवटदार याविसींही दरखाविशई बोलून घेऊं. लष्करचीं पत्रें डांकेंतून राजश्री लक्ष्मण विश्राम आरवंदेकर याचीं आह्मांस वरचेवर येतात. श्रीमंत राजश्री बापूसाहेब करीमखान पेंढारी साठ हजार जमेतिसीं होता; त्याचें पारपत्य केलें. लुटून घेतला. तो पळून पंचवीस स्वारानसीं कोट्यास गेला. तेथें फौजसुद्धां बापूसाहेब जाऊन कोटेवाल्याचा मुलूख लुटला. तेव्हां सरकारांतून

---

१. या वेळीं शिंदे दरबारचा कारभार कोणत्या प्रकारें चालला होता पहा. २. महादजी शिंदे यांची बायको.

पत्र आलें कीं; त्याच्या मुलखास उपद्रव न करावा. त्यावरून दीडलक्ष खंडणी तेथें घेऊन भूपाळचा सुभा सरकारांतून सांगितला; तेथें आले आहेत. समागमें सिंतु पेंढारी सुद्धां फौज तीस हजार आहे. व भाऊकडील कंपू आहे. कंपूच्या खर्चास जावद आंबझेरें हे दोन्ही माहाल, खासगी बापूसाहेबांचे खर्चास जिरण व हालीं पेंढारी यांचें पारपत्य केल्यावर फौजेचे खर्चास आरुणशाहा इच्छा वगैरे माहाल तिसां लक्षांचे दिल्हे आहेत. सरकारची मर्जी बापूसाहेबांवर तूर्त काळीं बहूत प्रसन्न आहे. येथून आमचीं पत्रें डांकींतून लष्करांत जातात येतात. अशीं डांकेंतून बापूसाहेबांकडे पोंहोंचत नाहींत. यामुळें उज्जनींत आपले हवेलींत कोण कारकून असतो; त्याची येथून लगत लागती. तरी त्याजकडून पत्रें येतीं जातीं ह्मणजे आह्मी बापूसाहेब यांसीं पत्र लिहिलें होतें कीं, उज्जनीस कारकून असेल त्यास आपलें पत्र पाठवून द्यावें. त्याचें उत्तर आलें नाहीं. याचा बंदोबस्त आपण परभारें तेथून आल्या गेल्या बरोबर लेहून पत्राची लगत लागली तरी आपल्याकडील कोंकणचीं पत्रें येथें आह्मांकडेस आल्यावर आह्मीं उज्जनींत डांकेंतून पाठवावीं. तेथें कारकून असेल त्यानें बापूसाहेबांकडेस पाठवून उत्तरें डांकेंतून आणवून आह्मांकडेस पाठवीत जावीं. ह्मणजे आह्मी येथून माणसाबरोबर आपणाकडे रवाना करीत जाऊं. याप्रमाणें कागदोपत्रीं जाल्यास करावें. मौजे कडेगांव येथें कारभारी व कुळकर्णी याणीं एक होऊन परटाचीं पाटिल किर्से दोनशां वर्षांपलीकडे होतीं. त्यास त्याचा वंश मल्हारी परीट हा आपल्याकडे आलाच होता. त्याची माहिती आपल्यास आहेच. त्यास दुसरे गांवीं राहात होता. तेथें बातमी करून त्यास आणविलें. आणि त्यास सांगितलें कीं; तूं कज्यास उभा राहून खोजी पाठविला ते समई नगरीं फिरंगी याजकडेस वकिलीवर होता. त्याजकडून गांवास चिठी करविली. गांवकरी दरोबस्त जाऊन आमचा जुना पाटील ह्मणून गांवीं घेऊन आले. त्याजवर आलीकडेस ब्राह्मण पाटील यांणीं फिर्यादी आर्यादी केल्या. तेव्हां ब्राह्मण पाटील याजकडेस मिळोन त्याजला बाहेर हिंडवावयास लाविलें आहे. तो लष्करांत गेला होता. हालीं खोजी पाा याजबरोबर येथें आला आहे. तो उपद्रव करील ह्मणून त्रिंबकजी[3] डेंगळे यांजकडील पागा मौजे मजकूरीं ठेविली आहे. पागेवाल्यास खर्चास थोडें बहूत आंतून देतच आहेत. पागा गांवांत आहे; यामुळें सरकार अमल कांहीं एक चालत नाहीं. पागेस तेथून काढून द्यावें; ह्मणोन खोजी पाा यांणीं सरकारांतून पत्र वकील यासी वगैरे आणिले आहेत. पागा काढून देणें विषयीं आह्मींही पाटील यासी सांगितलें आहे. तो कागल्याहून आल्यावर पागा तेथून काढावयाची योजना करूं. तेथील दोन च्यार असाम्याचें पारपत्य जाहालें पाहिजे. तेव्हां अमल सुरळीत चालू लावणीचा वगैरे बंदोबस्त राहील. येविसीं आलाइदा पत्र लिहिलें आहे. त्याप्रमाणें आपलें पत्र पाठऊन द्यावें. ह्मणजे त्यांचें पारपत्य परभारें करावयास येईल. च्यार रुपये गुन्हेगारीचे उत्पन्न होतील; त्यांपैकीं निमे खोजी पाा यांनीं द्यावे. निमे आपल्या सरकारांत द्यावे. आणि त्यांचें पारपत्य करावें. याप्रमाणें त्यासीं बोलणें करून ठेविलें आहे. उत्तर येईल त्यासारखें करूं. मौजे रायतळें येथें साल गुदस्तां जामगांवींहून कसवटदार यानीं जसी केली. त्या समयीं आपला ऐवज गांवांकडेस कमपेश दोनशें रुपये येणें होते. तेव्हां आह्मीं बळवंतरावजीस सांगून दिढाशां रुपयांची पावती गांवास करून दिल्ही. याचें कारण कीं; गांवाकडेस बाकी थोडी

---

१. या स्वारीवर जगोबा बापू गेले होते. नागपूरकर भोंसल्यांची बखर पहा. २. करीमखान पेंढारी याचें. ३. दुसरे बाजीराव पेशवे यांचे प्रधान.

दिसावी. तेव्हां त्यानीं गांवगन्नाबाकी ऐवज कांहीं निघत नाहीं; हा पाहून सवाई बसविली. आणि ऐवज घेतला. त्याप्रमाणें रायतळ्याकडून सवाई बद्दल ह्मणोन ऐवज घेतला. तो गांवकरी यांनीं आमचे पावतीबद्दल दिडशें रुपये शिल्लक होते ते त्याजकडेस दिल्हे. सवाईची पटी बसविली नाहीं. आपले दीडशें रुपये वाजवी राहिले ते घ्यावे. ते न देतां ह्मणतात कीं; खोजी पा यानीं घेतले. त्यास हल्लीं आपण गांवकरी यांसी पत्र पाठवावें कीं; तुह्मांकडेस साल गुद्रस्त बद्दल बळवंतरावजीचे विद्यमानची बाकी बद्दल दीडशें रुपये शिलक आहे; ती देत नाहीं. ह्मणोन येथें बळवंतरावजीनीं समजाविले. तरी चिटी पावतांच दीडशें रुपये फडशा करून देणें. ह्मणे. तरी हरीपंत कसवटदार श्रीगोंदेकर यासी वरात करून देणें. ह्मणोन पुंडबास लिहिलें आहे. ते वरात करून देतील. श्रीगोंदेकर हे बेमुलानें तुह्मांकडून रुपये घेतील. मग दुःख वाटेल याकरितां वाजवी शिलकीचा ऐवज येणें त्याचा फडशा करून देणें. ह्मणोन पत्र पाठवावें. " ह्मणजे परभारें बळवंतरावजीचे मापा निमित्य होऊन आपले दीडशें रुपये येतील. व राजश्री हरीपंत तात्या कसवटदार श्रीगोंदेकर यासी एक पत्र लिहावें. कीं मौजे कडेगांव व रायतळें हे दोन्ही गांव आमचे तेथें आहेत. तेथील हरएक विषयीं कामकाज पडल्यास राजश्री रामराव समजावितील. त्याप्रमाणें तुह्मांकडून बंदोबस्त होत असावा. ह्मणोन पत्र अगत्यरूप पाठवून द्यावें. मोजे कडेगांव येथील साल मजकूरचा बंदोबस्त ऐवज खोजीनें जे मधूकरीचे दाणे जमा होतील; ते व शंभर रुपये शेकदारीबद्दल दोन कलमें मात्र आपल्याकडेस यावीं; असें बोलणें आहे. बहूत काय लिहिणें कृपा लोभ असों द्यावा हे विनंती.

लें० नं. ३६५. सन १८०६ सुमार.

( ) आशीर्वादेंकरून सर्व सुखरूप असों. विशेष. येथ येऊन पोहोंचलेचें सर्व राजश्री पुंडलीक राम पई यांजकडेस लिहिलें. त्यावरून विदीत होईल. मुकाम मजकुरीं येऊन सवाई महिना जाहाला. लष्करांत हलकारे पाठविले; परंतु त्यांचें अद्याप ठिकाण नाहीं. त्यांची वाट पाहत आजवर बसलों. खर्चाची ( ) कर्ज रुपये चारशीं काडले. आतां उपाव कोठें नाहीं. आण परकी स्थळीं येऊन उपहास व्हावा ऐसें जाहालें. लष्करही दूर ग्वाल्हेरीकडेस गेलें ह्मणोन वर्तमान ऐकितों. येथून पुढा जावें. त्यास पैसा खर्चास नाहीं. आण भिल्लांचा उपद्रव भारी. तेव्हां उपाय राहिला. बरोबर खटलाही ऐशी चहूंकडून अडचण येऊन पडली. उपाव काय ? एक वेळ घरांतून आल्या सारिखें वडिलांची भेट जाहाली असती ह्मणजे सर्व आमचें सार्थक होतें. सर्व खटला निभऊन वडिलांचें दर्शन होईल तो सुदीन. ती॥ बापू पेंढारी यांच्या पारपत्याकरितां आले होते. त्यास त्यांचें पारपत्य जाहालें; आण मुख्य पेंढारी होता त्यास दस्त करून लष्करांत जावयास गेले. ऐशी बातमी आहे. ईश्वरें यश दिलें; आतां पुढें कसें होतें पाहावें. बाहीरून वर्तमान ऐकिणें ( ) माणूस कोणच आला नाहीं. त्यावरून रात्रदिवस चिंता वाटती. ( ) दिनें हलकारे पाठविले होते; त्याचेंही ठिकाण नाहीं. त्यामुळें नित्य हुस्का काढतां पुरे. दुसरां. येथून माणूस पाठवावा. तर जाऊन जलदीनें येई ऐसा कोणी नाहीं. तेव्हां आणखी आठ चार रोज वाट पाहून मग पुढां गोजरेस जावयास जाऊं. वडिलांस कळावयाकरितां लिहिलें आहे.

१. बळवंतराव रघुनाथ दळवी आरवलीकर. २. करीमखान पेंढारी. ३. शिक्षा, कैद.

आह्मीं आल्यापासून वडिलांकडून पत्र येऊन बरवेपणाचें वर्तमान कळत नाहीं. त्यावरून चिंता वाटती. तः हरघडी येणारा माणसासमागमें आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ करीत असावें. आह्मांविसीं कांही चिंता न करावी. वरकड सविस्तर मागाहून लिहून ( )

लें० नं. ३६६ श्री. तारीख १६ एप्रील सन १८०९.

तीर्थस्वरूप राजश्री बाबा व आना वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें सगुणानें चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ० ३० सफर मुकाम लष्कर डोणें नजीक जयपूर जाणोन वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. आपणाकडून बहूत दिवस आशीर्वादपत्र येऊन कांहींच वर्तमान कळत नव्हतें. त्यास रामशेट काणेकर वाणी आला; त्याजकडेस पत्र पाठविलें तें पावलें. परम आनंद जाहाला. असेंच घडी घडी आशीर्वादपत्र पाठवून संतोष करावा. यानंतर तीा राजश्री बापूसाहेबांस जयपूरचा सुभा होऊन पंचवीस कोशांवर गेले आहेत. आणि मुलखामध्यें ठाणीं बसविलीं. तेथें कबिलेही गेले होते. त्यास त्यांची जबरी पाहून माघारे कबि ( ) केले. त्याजबरोबर आह्मांस ई ( ) येऊन पांच सात रोज ( ) स बेत ( ) तेव्हां स्वार वगैरे जाऊन ( ) धरून दिले. आण त्यांचीं शेंपन्नास घोडीं आणिलीं. तेव्हां असें जालें; यजमानस्वामीची मर्जी तीर्थस्वरूप राजश्री बापूसाहेबांवर चांगली आहे. जावद करून घेणार आहेत. तेथें आह्मीही जाऊं. सौभाग्यवती कृष्णाबाई पोटशी आहे. पांच महिने झाले आहेत. तेव्हां कबिलेही तेथेंच जातील. मामलतीचें कारण नव्हतें. परंतु कुटुंबें आहेत. त्याचा लष्करांत निभाव पडत नाहीं. तेव्हां जावदचें बोलणें लागलें आहे. एका दोन रोजांत सनदा होतील. मग जाण्यास जाऊं. वरकड वर्तमान मागाहून लिहून पाठवितों. बहूत काय लिहिणें हे विज्ञापना.

हो राजश्री आनासाहेब स्वामीस नारबा तुयेंकर साष्टांग नमस्कार ( ) उपरी आपणाकडून कांहींच ( ) नाहीं. तर असें न करितां पत्र—( )

लें० नं. ३६७. श्री. तारीख ५ माहे मे सन १८०९.

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री काशिबा आना केरकर स्वामीचे सेवेसीं.

शेवक जिवाजीराव यशवंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ तागायत छ० १९ माहे रबिलावल मुकाम संस्थान कोटें जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. बहूत दिवस आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत ( ) वर्ते. त्यास कोणाकडेस पत्र पाठविलें; तें पावलें. पाहून भेटीतुल्य आनंद जाहाला. असेंच निरंतर येणाराबरोबर पत्र पाठवून संतोषित असिलें पाहिजे. चिरंजीव सौभाग्यवती मथुबाई श्रीकाशीस माघ वद्य १४ स प्रातःकाळीं पुष्पवती झाली. वरून साखर पाठविली आहे. जलदीच अशापर्यंत येथें येतील. लष्करचें वर्तमान घरीं पत्रें तुमचीं आहेत; त्यावरून कळेल. तूर्त राजश्री बापूस सुभा जयपूरचा झाला आहे. पण राजश्री भाऊस बक्षिगिरी जाहाली आहे. श्रीनें चालविलेस दोन्ही कामां उभयीं आहेत. तूर्त कारभार राजश्री सर्जेराव बापू करितात. मोरो हरी व अन्या भास्कर यांस कारागृहीं घालून उज्जनीस रवाना केले आहेत. बापूचा कारभार चालेल. व आपल्या गृहस्थांस आश्रयी आहे.

१. जगोबा बापू ऊर्फ जगन्नाथ राम. २. शिंद्यांच्या कारभारांत सर्जेराव असेपर्यंत धरमार चालली होती.

पहिली रीत कांहीं नाहीं. जिवा बेंकबा तेथें आहे; त्याची हरएक विषयीं खबर घेत असावी. आपण घेतच असाल. परंतु सुचना मात्र लिहिली आहे. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. हेच पत्रीं राजश्री विठोबा कवठणकर व राजश्री हरबा स्वामीस साष्टांग नमस्कार विनंती लिहितों जे. परिसोन लोभ करावा. वरचेवर येणाऱ्याबरोबर भेटीचा लाभ देत असावा. इकडील सविस्तर वर्तमान पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून कळूं येईल. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

ले० नं. ३६८. पै० छ० १ माहे शाभान श्री. तारीख ४ जून १८०९ रविवार.

सन आशर मयां तेन व आलफ (तारीख २२ सपटंबर १८०९ मंगळवार.)

श्रीमंत राजश्री आनासाहेब स्वामीचे सेवेसीं.

सेवक नारायेण अनंत परूळेकर[1] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ तागायत छ० २० रबिलाखर मुकाम लष्कर नजीक जाहानपूर प्रांत मेवाड जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा होत असली पाहिजे. विशेष. पांच चार विनंतीपत्रें शेवेशीं लिहिलीं; परंतु प्रत्योत्तर न आलें. त्यावरून चित्त सापेक्षित असे. तरी असें न करावें. सदोदीत पत्रोत्तरीं सांभाळ करावा. इकडील वर्तमान बक्षिगिरीसंबंधी वहिवाट श्रीमंत राजश्री भाऊसाहेब[2] मनास आणीत आहेत. जैपूरचा मामला आज दोन वर्षें होत नव्हता. राजश्री बापूजी सिंदे फौजेसुद्धां त्या प्रांतीं राहून दाहा वीस माहालीं अमल करून होते. सरकारमतलबाचा अर्थ न घडला. सबब श्रीमंत राजश्री बापूसाहेब यांसी फौज कंपू जान बतीसाचा देऊन मोहेरवर रवाना केलें. शिंदे मशारनिले यांसीं हुजूर येणेंविसीं लिहून महालांत अमल यजमानाचा करून देणें ह्मणोन पत्रें सरकारचीं गेल्यावरून शिंदे याणीं आपला अमल दाखल करून देविला. आण आपले सरंजाम दळ घरू पांच व आलीगोळ पोन पांच चार अव्रूनशीं शेखावटी गेले. यजमानानीं जैपूरकरांस दाब दिल्यावरून त्याणीं आपला कारभारी पहिला आनंदराव ( ) कैदींत ठेविला. ते खुशालीराम बेहराजी यास काढून ( )स सरकारांत पाठविले. मामला पंधरा लक्ष ठरवून माहालच्या सोडचिठ्या सरकारच्या गेल्या ( ) जैपूरचा अमल माहालीं करून फौजसुद्धां करोलीचा मामला जाऊन करावा. त्यास यजमानानीं जैपूरवाल्याचे माहाल सरकार आज्ञेप्रमाणें स्वाधीन करून फौजेंत राजश्री रामराव नाना मळगांवकर व राजश्री विठोबा दळवी, मळगांवकर व दळवी करोलीस गेले आहेत. पेशजीचे मुखत्यार तत्रस्थ अवंतिकावासी होऊन कारभार राजश्री सर्जेराव बापू व अंबाजीबावा करीत होते. नंतर अंबाजीबावास ज्वरांश होऊन काळ जाहाला. सर्जेराव बापू कारभार करितात. उभयतांचा आपला एकच मेळ होता. इंगळे[3] यांचा काळ जाहाल्यामुळां ठीक न जाहालें. दौलतींत पुरातन मनुष्य सर्वोपरी चांगले होते. ओड घस्त प्रकार पडल्यामुळें फौजेस पैसा मिळत नाहीं. तीन वर्षें रुपया न मिळालेमुळां फौज घराब आहे. दोन रुपये मागील फडशा करावा; हा बेत आहे. होईल तेव्हां खरें. आपल्या

---

१. यांनीं "नारायणराव जिवाजी व जगंनाथ राम यांजबरोबर राहून सरकार चाकरी व लढायांत वगैरे इमानेंइतबारें केल्यामुळें" जिरण येथें मापी बिघे जमीन १२५ व कुचडोद येथें जमीन २०० बिघे सनद करून दौलतराव शिंदे यांणीं दिली आहे. २. यशवंतराव भाऊ केरकर. ३. अंबाजी इंगळे यांणीं आपल्या वृद्धपणीं चांगुलपणा मिळविला होता असें दिसतें.

जातबोलाची जाहागिरी लावून द्यावी. व ग्वाल्हेरचा हिशेब करून फडशा व्हावा; याप्रमाणें यजमानासीं करार जैपुराकडे जाते समयीं करून रवाना केलें. मागें कांहींच नमुद्यांत आलें नाहीं. याजकरितां सडे आपण हुजूर येऊन फौज सरकार चाकरीवर रवाना केली जाईल. दाद लाऊन देणेंचा विचार आहे. काय होतें पहावें. सविस्तर आपल्यास विदीत व्हावें. जाणोन लिहिलें आहे. वरकड यजमान स्वामीच्या पत्रावरून कळेल. दुसरें. आमचीं मनुष्यें वडिलांकडे बेदा यास्तव स्वस्थळ सुटून पालियेंस राहिलीं आहेत. त्याचा हरएकविसीं उदर येहून परामर्ष घडावा; ह्मणोन पांच चार वेळां विनंती लिहिणेंस आली. ( )

लें० नं. ३६९ श्रीनाथसाहेब. तारीख २४ सपटंबर सन १८१० सोमवार.

राजश्री जगंनाथ राम गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें विशेष. प्रांत जीर्ण येथील मामलत राजश्री जयराम बल्लाळ याजकडून दूर करून साल मजकूर सन इहिदे अशर मयां तेनचे सालापासून पो मजकूर माहाल तुह्मांकडे जातीचे खर्चास सरकारांतून लाऊन दिल्हा असे. तरी सदर्हू प्रमाणें मजकुरीं कुलबाब कुलकानूचा सायरसुद्धां वाजवी अंमल करून येथील ऐवज तुह्मीं जातीचे खर्चास घेत जाणें. रवाना छ० २४ माहे शावान सुरुसन इहिदे आशर मयां तेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

ज्योतिस्वरूप
चरणीं तत्पर माधव-
रावजी सुत दौलतराव
सिंदे निरंतर.

(मोर्तब.)

लें० नं. ३७० श्रीनाथसाहेब. तारीख १३ सपटंबर १८११.

रण्यांत व सुभ्यांत दस्तगाई खोजी पाटील इ॥ ताक

छ अजतर्फे दौलतराव शिंदे सलाम सुरु इसने अशर मयां तेन आलफ. राजश्री जगंनाथ राम प्रांत स्वदेश पैकीं ठाणें जांबगांव वगैरे येथील मुजूमदाराची असामी पूर्वीपासून चालत आली आहे. त्याची वहिवाट हालीं नीट चालत नाहीं. दरम्यान दिकत पडली आहे. ह्मणून विदीत जाहालें. त्यावरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे. तर जगंनाथ राम याची असामी मुजूमदाराची पेशजीपासून चालत आली आहे. त्याप्रमाणें दरखार्चें काम कारकुनाचे हातें घेत जाऊन कानू कायदे भेटी तबरी वतनें सुद्धां देत जाऊन कोणेविसींचा बोभाट फिरून येऊं नये. राजश्री कृष्णराव नारायण यांजकडे स्वदेशपैकीं गांव मौजे रायतळें व कडेगांव देह दोन चालत आहेत. तेथील जप्ती तुह्मीं एक सालाकरितां केली आहे; ह्मणून कळलें. त्यास गांव जिवाजी बल्लाळ यांचे कुटुंबाचे खर्चास लाऊन दिल्हे आहेत. तींतील जप्ती करणें ठीक नाहीं. त्यास मौजे मजकूरचे देह दोन; येथील जप्ती केली असेल ती मोकळी करून तेथील वसूल घेतला असल्यास माघारा देऊन पुन्हां कोणे-

'विसीं गांवास उपसर्ग लागूं नये. एक सालाचा ऐवज हुजूर जगंनाथ राम याणीं देणें ठरविला आहे. त्यास तुह्मीं तेथें उपसर्ग न करणें. दुसरे पत्राचा उजूर न करणें. जाणिजे छ० २४ साबान जादा काय लिहिणें किताबत.

ज्योतिस्वरूप
चरणीं तत्पर माधवजी-
सुत दौलतराव
शिंदे निरंतर.

(मोर्तब)

लें० नं. ३७१ तारीख २८ जून १८१७.

अजम पांडुरंगराव साबाजी केरकर दाम महबतहूं.

आजी मनवेल गुदीन वर दे मिर मारच्याल काप सल्लाम बाजत सल्लाम येथील नेकी कलमें केलीं पा दिगर. काल पत्र पाठविलें पावलें. अजम कपीत तेरेखोल सरकारच्या कामाकाजाविसीं हर-कोणेही गोष्टीचें साहित्य मागेल तें मोहिबीं दिलें पाहिजे. ज्यादा काय लिहावें. क्यालर माहबत हे किताबत. तारीख २८ जून १८१७ इ॥ अजम कोमेदात तेरेखोल यापाशीं येक जयलवार ( ) साहित्य सुदा रवाना करून द्यावा. कळावें.

(सही पोर्तुगीज भाषेंत आहे.)

लें० नं. ३७२ तारीख १७ आगष्ट १८१७.

अजम पांडुरंग साबाजी केरकर दाम महबतहू.

सल्लाम बाजत सल्लाम येथील नेकी जाणून किताबत पाठविली प्रविष्ट होऊन पलीकडील बातमी लिहिली कळों आली. आपआपले बंदोबस्ताकरितां आपले हद्दीं दस्ती फिरतच आहेत. तुह्मीं बारीक मोठें वर्तमान कळेल तें वेळोवेळ लिहावें. जाजती उणें वर्तमानाप्रमाणें साहित्य पुरावा करणें तो करितां येईल. पलीकडून घांटचा जासूद तुमचा येणें बद्दल ओडद काडीत जात असतो. जासूद अलीकडेस आलेवर येथ पेडणेंस रवाना करून द्यावा. व तुमचे घांटींचे कागद येणार त्यांत कांहीं वरघांटचें इंग्रजांकडील वगैरे ज्याजती उणें वर्तमान असल्यास झाडून कळवावें. ज्यादा काय लिहिणें. तारीख १७ आगोस्त सन १८१७.

(फिरंगी सही कोंबेदात यांची)

लें० नं. ३७३ तारीख १४ एप्रील सन १८१८.

अजम पांडुरंग साबाजी केरकर दाम महबतहूं.

आंकी वर घांटी बळेंवंतराव भाऊ निधन पावले व राजश्री यशवंतराव यांस इंग्रज यांजशीं विप-रीयास आली. हें वर्तमान लिहून आलेवरून नाई ( ) थुत आबा आसें ऐकिलें. इज्यान

१. गोवें सरकार. २. शिपायांचीं रोंदें. ३. या वेळीं "दियोगे द सौज कोंद दे रीय दे पाई प्रतिनिधी" हे गोव्याचे गवरनर जनरल होते. ४. बाळाजी राम ऊर्फ बाळाभाऊ बक्षी. ५. पेंढाऱ्यांचे लढाईमुळें वांकडें आलें.

बाही केवळ दुःचीत असेत. परंत ईश्वरी सूत्रास इलाज नाहीं. ह्या स्वाधीनच्या गोष्टी नाईत. मृत्युलोक सर्व नाशिवंत. गती सर्वांची समय आहे. आपापलें आयुष्यमर्यादा पावे तंव विचारण करावें. तर मात्र अनेक वयाव्रतीनें काळ क्रमावा. हें युक्त. तेज सुनक्षीत वागवून विवेक छिन्न करावा. यांत साधन नाहीं. चिंता वागऊन फळ नाहीं. अशांत हेही दिवस जातील. आपण किमाप आठवण न करितां हुशार दिल असावें. खटला घरचा तुमचे माथां त्यापेक्षीं ( ) सान धरून सांगोन सर्वांची कुंबेधना करून घरचा भार चालवावा. फलदाता ईश्वर. ज्यादा काय लिहिणें. तारीख १४ माहे आप्रील सन १८१८ हे किताबत.

(सही फिरंगी गोवें सरकारची आहे.)

लें० नं. ३७४ श्रीनाथसाहेब. तारीख १४ डिसेंबर सन १८१९.

राजश्री कमाविसदार वर्तमान व भावी पो मीमट गोसावी यांस.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नों दौलतराव शिंदे दंडवत व आा रामराम सुरुसन अशेरीन मयां तेन व अलर्फ. जिवाजी धोंडदेव गोरेगांवकर हल्लीं वस्ती कसबे मजकूर यासी धर्मादाय जमीन साठ बिघे उपजीविकेस कसबे मजकूरीं पेशजीं येशवंतराव शिवाजी यांनीं सूर्यपर्वाचे पर्वणीस प्रपंचनिर्वाहास इनाम मि॥ चैत्र शु॥ संमत १८७० चे सालीं सनद करून देऊन चालविल्याप्रमाणें हल्लीं साल मजकुरापासून धर्मादाय जमीन कसबे मजकुरीं खेरीज हा करार करून—

बिघे.

१० कुडा एक पपगव्या झाडा सु॥

५ बागायत. बिघे.

५ गोरमा.

१०

५० माळेठी. बिघे.

६०

येकूण साठ बिघे जमीन पेशजीप्रमाणें साल मजकुरापासून सरकारांतून करार करून देऊन हे सनद तुह्मांस सादर केली असे. तरी कसबे मजकुरीं सदरहू साठ बिघे जमीन धर्मादाय मशारनिल्हे यांजकडे सुदामत पासून चालत आल्याचा दाखला भोगवटा पाहून चालत आल्याप्रमाणें सालदरसाल याजकडे व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवीत जाणें. प्रतिवर्षीं नवीन सनदेचा आक्षेप न करितां या सनेदची प्रती तुह्मी लिहून घेऊन हे असल सनद त्याजपाशीं भोगवटीयास परतून देणें. जाणिजे छ० २५ सफर बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोर्तब सुद्र.)

लें० नं. ३७५ श्री. तारीख ३ आगष्ट १८२१.

चिरंजीव राजश्री घनश्यामराव दादा यांसी प्रती—येशंवतराव शिवाजी अनेक आशीर्वाद उपरी. राजश्री अमृतराव रामचंद्र कसबे नेमावर यांजकडून साल मजकूर १८८२ वगैरे गोविंद रामचंद्र यांजकडून.

१. यशवंराव भाऊ मोठे दानशूर होते. वि. ज्ञा. वि. पु. ११, पृ. ९१ पहा. २. सन १८१४. ३. हा नारायणराव बक्षी यांचा मुलगा होय.

१०००० अमृतराव रामचंद्र.
७००० साल मजकूर १८८२ चे साला पो.
३००० सा॥ १८८३ चे नेमणुक पो.
१००००

१२००० पो सत्वास येथील गोविंद रामचंद्र याजकडून सा॥ १८८३ चे सालीं श्रावण शु॥ १ प्रतिपदेचे मितीस देवविले ते साहेबांचे सहजानसी.

२२०००

येकूण बावीस हजार रु॥ चांदवड शिका याचा हिशेब शिबंदी वगैरे याचे फडशा वगैरे खर्चाचा हिशेब दाम दाम तुह्मांकडून समजून घेऊन ही फारकती रजाबंदीनें तुह्मांस लिहून दिल्ही असे. मागां-पुढां हिशेबकितेबाचा झगडा बावीस हजारांचा राहिला नाहीं. सुरु इहिदे सल्लासीन मयां तेन व अलफ. संमत १८७७ मि॥ श्रावण शु॥ ५ बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

ले० नं. ३७६ श्रीनाथसाहेब. तारीख २९ सपटंबर १८२१ शनिवार.

या सनदीवर इंग्रजी शेरा चार ओळींचा आहे. रेसिडेंटींत दाखल केली.
क्लोस साहेब रेजिंट यांची सही.

राजश्री यशवंतराव[1] शिवाजी गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहिणें. विशेष. माहालांनीहाय प्रांत नेमाड. माहाल.

१ प्रांत नेमावर पंचमाहाल मौजे कोलारी वगैरे देहे ४ चार सुद्धां.
१ प्रांत सत्वास.
२

येकूण दोन माहाल रायेसिंग यांजकडून दूर करून साल मजकूर सन इसने अशरीन मयां तेनचे सालापासून जातीचे व कुटुंबाचे खर्चास सरकारांतून करार करून दिल्हा असे. तरी सदहू माहालांनीहाय मजकुरीं तुह्मीं अमल वहिवाट करून येथील ऐवज तुह्मीं जातीचे व कुटुंबाचे खर्चास घेत जाणें. रवाना छ० २ मोहरम सुरुसन इसन्ने आशरीन मयां तेन व आलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोठा शिक्का.) बार. (मोर्तब.)

ले० नं. ३७७ श्रीनाथसाहेब. तारीख १३ अकटंबर १८२४ बुधवार.

राजश्री पुरुषोत्तमराव[2] जगंनाथ गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहिर्णे विशेष. मौजे कोलारी वगैरे देहे परगणे सतवास. देहे.

१ मौजे कोलारी देहे. १ मौजे विजळगांव देहे.
१ मौजे बाबच्या देहे. १ मौजे खारद्या देह.
४

१. यशवंतराव भाऊ राजे. २. यांस लालासाहेब केरकर असेंही ह्मणत.

येणेंप्रमाणें देहे ४ च्यार यशवंतराव शिवाजी यांजकडून दूर करून साल मजकूर सन खमस अशरीनचे सालापासून तुह्मांस जातीचे व कुटुंबाचे खर्चास लाऊन दिल्हे असेत. तरी सदर्हू देह्यामजकुरीं तुह्मीं एकमेकांची वहिवाट करून तेथील ऐवज जातीचे व कुटुंबाचे खर्चास घेत जाणें. जाणिजे. छ० १९ सफर सुरुसन खमस अशरीन मयां तेन व अलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

ज्योतिस्वरूप
चरणीं तत्पर माधवजी-
सुत दौलतराव
शिंदे निरंतर.

(मोर्तब.)

लें० नं. ३७८ श्रीकृष्ण. तारीख १३ अकटंबर १८२४ बुधवार.

(मोर्तब.) (मोर्तब.) (मोर्तब.)

मोर्तब छ० म॥ आनाम चोवधुरी व कानुगो वगैरे जमीदार प्रांत सत्वास यांस—पुरुषोत्तमराव जगंनाथ सुरूसन खमस आशरीन मयां तेन व अलफ. सरकारांतून जहागिरी आह्मांस दिली.

कोलारी वगैरे.	देहे. ४
१ मौजे कोलारी.	देहे.
१ मौजे विजळगांव.	देहे.
१ मौजे खारद्या.	देहे.
१ मौजे बाबच्या.	देहे.
४	

एकूण देहे चार याचे वहिवाटीस येथून राजश्री यसाजी नारायण यांस पाठविले असत. तर यांसी रुजू होऊन अमल सुरळीत होत जाणें. माजी कमाविसदार यांजकडेस वसूल दिल्हेस मजरा पडणार नाहीं. साल मजकुरापासून वसूल याजकडेस देत जाणें. जाणिजे छ० १९ माहे सफर.

मोर्तबसुद्र.

(मोर्तब.)

लें० नं. ३७९ पै० छ० १ माहे शाबान सन खमस आश्रीन मयां तेन व अलफ. तारीख १४ डिसेंबर १८२४.

चिरंजीव राजश्री काशीराव आना केरकर याप्रती--

घनश्याम व्यंकाजी आशीरवाद उपरी येथील कुशळ तागायत छ० २२ रविलाखर मार्गशीर्ष व॥ ९ मी मुकाम ग्वाल्हेर जाणोन सर्व क्षेम आहों. विशेष. इकडील वर्तमान चिरंजीव राजश्री लाला-साहेब यांणीं लिहिलें आहे; त्यावरून कळों येईल. श्रीमंत राजश्री यशवंतराव भाऊसाहेब यांचे जाहागिरीपैकीं चार गांव सरकारांतून दूर करून चिरंजीवाचे नांवें सनद करून दिल्ही. दोन महिने

१. शेरलेकर. २. यशवंतराव भाऊंनीं पेंढाऱ्यांस साहाय्य केलें ह्मणून इंग्रजांनीं तकादा लावून शिंदे सरकाराकडून हे गांव पुरुषोत्तमराव यांचे नांवें करून दिले होते.

जाहाले. राजश्री येसोबा शेरलेकर गांवांवर गेले आहेत. आपणास कळावें; याकरितां लिहिलें. येथून श्रीमंत राजश्री मंत्री बागणेस जाणेकरितां निघून गेले आहेत. यांजबरोबर आबासी रंगाचें पागोटें एक पाठविलें आहे. तें बागणीहून तुह्मांकडे पोहोंचऊन देतील. तें चिरंजीव राजश्री रंगोबाकडे माजगांवास पोंहोचतें करावें. व त्यांचे नांवचा लखोटा आहे; तोही पोंहोंचऊन द्यावा. आपण आपले कडील वर्तमान सुखरूपपणाचें वरचेवर लिहीत असावें. बहूत काय लिहिणें हे आशीरवाद.

शिवाई जनानी मुकटा १ अशीं दोन सणगें दिल्हीं आहेत. त्यांतच लखोटा घालून दिला आहे. तीं पोहोंचतीं करावीं.

ले० नं. ३८० पो छ० १ माहे शाभान श्री. तारीख ९ जानेवारी १८२५.
सन खमस आश्रीन मयां तेन व आलफ.

स्वामीचे सेवेशीं सेवक शिवराम नारायण सावकर साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ तागायत पोष्य व॥ ५ जाणोन सरकारकृपें वर्तमान मुकाम छावणी नजीक ग्वालेर येथें यथास्थित असे विशेष. अलीकडे फार दिवस जाहाले; आज्ञापत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी हमेशा येणाराबरोबर आज्ञा होऊन कुशलार्थ लिहून सांभाळित गेलें पाहिजे. यानंतर इकडील यजमान यांजकडील वर्तमान पेशजीं सरकार[1] येथें अस्तां त्रिवर्ग[2] यांचे नांवें सनदा होऊन आंग्रेजबहाद्दर[3] यांजकडोन वडील यजमान स्वामीनीं आंग्रेज याजकडून सरकारांत कबूल केलें जे. आह्मी घरीं अवघे एकत्र आहोंत. समजून घेऊं. एका नांवें सनदा करून देणें त्या द्याव्या. त्या काळीं चारी गांव जास्त लाऊन सरकारांतून आंग्रेज यासीं बोलणेंत आलें जे. तुह्मी सर्वांनीं समजून घ्यावें. त्या समई कबूल केलें. आण आह्मांस ठाणें होतांच तुमचा हिसा काढून देवितों. याप्रमाणें सरकारची आज्ञा जाहाली. नंतर आंग्रेज याजकडील वकील सरकारांत राजश्री आत्मारामपंत बाबा यांणीं वडिलांचे पर्यंत येऊन त्यांचे पुस्तपानेवर आज उद्यां याप्रकारें कितिएक वेळें सरकारांची आज्ञा होत आली. व राजश्री पारखजी साहेब याणें कितिएक वेळां ताकिदें करून सरकारांनीं समक्षासमक्ष सांगोन ताकीद केली. आंग्रेजबहाद्दर यांजकडील मोठा ( ) कसा ( ) जे पर्यंत घोळून अखेर शेटजी साहेब मथुरेस निघून गेले. नंतर राजश्री जयशिंगभाऊ हुजरे नि॥ सरकार हेही मागें कार्य करीत आले. त्यासीं आपला मेळ ठेऊन त्याजकडोन सरकारांसीं विनंती करून बहूत वेळ समक्ष वकील मजकूर व साहेबबाहाद्दर याजकडील वकील पहिलेनें बोलणेंत होते; ते न आले. त्याचे भेटीचे वेळीं सुचवून त्याजकडूनही नेमांत आले अन्वयें बोलणेंत आलें. परंतु आजपासून घोळून आलीकडे सरकारची मर्जी नेट पडला. सबब ( ) माहे सफर यांत सनदा परभारें सरकारांनीं करून देऊन राजश्री रायसिंग हवालदार यास सांगोन आपलेआप बढवून दिल्हे. जप्तीवर राजश्री येसोबा तात्यास पाठविले. त्याचे अमल दाखल होऊन चारी गांव आपले अमल जाहालेचे आले. आज एकंदर वर्षें दुसगीवर राहिलेमुळें खराबींत आहेत. आबादी केलेवर जमेस येतील. तूर्त बोलणें परभारें सरकार आज्ञा होऊन येविसीं हवालदार याचें पत्र गेलें आहे. तूर्त जमा तीन यंदा हातीं लागेल. त्यांत कांहीं वसूल अगोदर कसवटदार याणें घेतला. त्याचा

१. दौलतराव शिंदे. २. कृष्णराव, घनश्यामराव नारायण बक्षी व पुरुषोत्तमराव केरकर हे त्रिवर्ग होत. ३. हिंदुस्थानी भाषेंत इंग्लिश लोकांस आंग्रेज ह्मणतात.

घोळ पडला आहे. तोही निवडणेंत येईल. मागाहून समक्ष माजी कमाविसदार यांजला व्हावें.' त्यास हुजरे मजकूर याची कांहीं प्रकृत नीट नाहीं जाणोन राहिले. , वाड्यांत त्यांचें जाणें जालेवर समक्ष आज्ञा होईल. येविसीं आलाइदा यजमान स्वामीनीं लिहिलें आहे. त्याजवरून ध्यानीं येईल. आजपर्यंत सरकार चाकरी संभाळून कार्य कर्ते याचा (   )

लें० नं. ३८१ श्री. तारीख २३ मे सन १८२७.

श्रियासह चिरंजीव राजश्री जिवबा हवालदार राजाधीक्ष यांप्रती—बळवंतराव महादेव अनेक आशीर्वाद उपरी आज वैशाख व॥ १३ जाणोन स्वकीय कुशळ लेखन केलें पाहिजे. विशेष. तुह्मांकडील बहूत दिवस पत्र येत नाहीं. त्यावरून चिंता होती. त्यास चैत्र व॥ १२ दशीचें पत्र पावोन लिहिला मजकूर कळला. राजश्री भास्करराव[1] रेगे हे घरीं सुखरूप पावल्याचें वर्तमान आपण लिहिलें. व चिरंजीव राजश्री नारायणराव[2] यांचीं बंदाचीं पत्रें कोंकणचीं आलीं. त्यांतही वर्तमान लिहून आलें. यंदा लग्नां आहेत. परंतु खर्चाची अडचण लिहिली. मग कसें जाहलें. किंवा तुमचें जाणें न जाहलें. पुण्यांत दोन रुपये कर्ज जाहलेमुळें न जाणें असें लिहिलें कळलें. त्यास इकडून कांहीं मदत व्हावी; त्यास दिवसेंदिवस कठीण. श्रीमंत दौलतराव शिंदे यांस दोन वर्षें पर्यंत दुखणें जाहलें. औषध लागू होऊन उपाय न आला. अखेर फाल्गुन व॥ ९[3] स काळ जाहाला. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट केली. धणी असा होणार मुळें जर ईश्वर इच्छा जसी आहे; तसें होतें. आपल्या हिंदु लोकांत येवडी जागा सर्वांस छाया होती. लहानेंथोरांस उमेद हे स्थळाची होती.[4] आतां पुढां काय काय होईल ( ) नाहीं. तेव्हां अंतकाळाचे समयीं फिर ( ) कडील वकील येथें आहे. त्याजला सांगितलें कीं; जे गादीस दुसरा मूल बसवून शिंदे यांचें नांव चालवावें. त्याजवर त्यांनीं कबूल करून मूलही देशींहून शिंदे यांचे भावबंद यांचे आणले आहेत.[5] येथें अद्याप पोंचले नाहींत. पांच आठ दिवसांत येतील. आल्यावर मूल चांगल्या मुहूर्तें गादीवर बसवितील. पुढां बंदोबस्त कसा होईल तो कळेल. तूर्त फिरंगी यांणीं अगत्य सर्व गोष्टीचें धरलें आहे. दोस्ती जशी ह्मणावी तशी ठेविली आहे. मागाहून गादीवर मूल बसल्यावर लिहून पाठवूं. तूर्त गैरस्तित चांगली दिसत नाहीं.[6] तुह्मीं घरीं लग्नास गेलां असतां तर उत्तम होतें. तुमचे मर्जीस आलें तें खरें. खर्चाविसीं. त्यास तूर्त निरधण्याची दौलत जाहाली[6] आहे. खर्चास किरकोळ जाहलें त्याची व एकादो रोजीं पटतील असें आहे. पत्रां कोंकणचीं वगैरे लिहून आज चार दिवस जाहले. खर्चास येईल ह्मणजे तुह्मांकडे पा। ह्मणोन पत्रें आस्तेन ठेविलीं. आतां लांबणी दिसोन आली. तेव्हां पत्रें रवाना केलीं. मागां जलदीच पत्रें खर्चास देऊन रवाना करितों. तेथें दोन रुपये कर्ज जाहल्यास चिंता करून काय ? श्रीहरी सर्व निवारण करील. चिंता न करावी. राजश्री बाजीबा दादास पत्र दिल्हें उत्तर पाठविलें आहे. रा। भिकबा तात्या हे राजश्री कृष्णोबा[7] ह्मजन यांचे घरीं आहेत. खुशाल आहेत. त्यांजकडीलही उत्तर घेऊन पाठविलें आहे. तूर्त मशारनिल्हे ह्मजन

१. भास्कर त्रिंबक रेगे आरवलीकर. २. नारायणराव जिवाजी राजाध्यक्ष हवालदार यांचीं. ३. तारीख २१ मार्च १८२७ रोजीं दौलतराव वारले. ४. शिंदेशाहींत कोणत्याही दर्जाच्या माणसाला आधार मिळत असे. ५. पाटलोजी शिंदे यांचे मुलगे आणविले होते. त्यांजपैकीं जनकोजी नांवाच्या एका मुलास दत्तक घेतला. ६. या वेळीं कोणाची कोणास दाद नव्हती, असें दिसतें. व या वेळीं जनकोजी दत्तक झालेही नसावे. ७. मोदी यांचे घरीं.

यांचे चिरंजीवास दुखणें अतीशय आहे. माहारोगाची भावना. हे दुखण्यांतून पार होणें श्रीहरीचे हातीं. कोंकणांतील पत्रें त्यांजला पावत-( )

हे॥ चिरंजीव बाचिनाबाई व चिरंजीव सौभाग्यवती आवडाबाईस आशीर्वाद प्रविष्ट करावा. माघाहून केरकर भाऊ यांचें पत्र पाठवून देतों. भास्कर आरवंदेकर यांचें लग्न वैशाख मासीं जाहालें. ह्मणोन ( ) बाचीनास सांगावें. हे आशीर्वाद.

लें० नं. ३८२ श्री. तारीख २५ मार्च सन १८२८.

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीणयमनियमासनप्राणायाम-प्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टांगयोगसाधनसंपन्नसकलसुरनिकरस्फुरन्मुकुटमणिनीराजि-तदिव्यभवानीशंकरपादारविंदाराधकश्रीमत्सच्चिदानंदसरस्वत्यनुग्रहीतश्रीमत्सच्चिदानंदस-रस्वतीश्रीपादस्वामीचे सेवेसीं.

(श्री मांगि-
रीशचरणीं तत्पर
य. शि.)

चरणीं तत्पर शिष्यवर्य यशवंतराव शिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती ऐशी जे. श्रीस्वामीची स्वारी माहायात्रेस जाऊन माघारां मुकाम लष्कर नजीक ग्वाल्हेर येथें येऊन जाहालेवर आज्ञा केली कीं; श्रीक्षेत्र ब्रह्मवर्त येथें मठ बांधून श्रीराधाकृष्णाची स्थापना केली आहे. परंतु तेथील नैवेद्य नंदादीप वगैरे निरंतर चालावयाचा योग होऊन आला नाहीं. तरी सारोत्धार श्रीची ऊर्जा चाले ऐसा निर्बंध खर्चाचा बंदोबस्त करून द्यावा. त्यावरून आज्ञा शिरसा वंद्य करून सेवकाकडून संस्थानची सेवा घडावी; हें जाणून आमचे जाहागिरीपैकीं परगणे सत्वास नेमावर पंचमहाल पैकीं तालुका राजोर येथील गांव भटासा आगर्दा हे श्रीस दत्त करून दिले असेत. तरी हक्कदार इनामदार खेरीज करून चतुःसीमांमधील जलस्थलकाष्टपाषाणतृणनिधिनिक्षेपादी करून दिल्हें असे. तरी श्रीस्वामी व स्वामीचे शिष्यपरंपरागत अनुभवीत जाणें. आमचे वंशपरंपरादिक जाहागिरदार पाळतील. साल मजकुरापासून गांवची आबादी करून यावचंद्रदिवाकर सुखरूप भोगवटा करावा. हा गांव श्रीकडेस चालवणेंविसीं कोणीही दिकत करील तो गुरुद्रोही पंचमहापातकी होईल. श्लोक. स्वदत्ता दुहिता भूमी पितृदत्ता सहोदरी । अन्यदत्ता भवेन्माता यो हरेत्रिषु संगमः ॥ १ ॥

ह्मणोन दत्तपत्र लिहून दिल्हें असे सही. संवत् १८८५ सुरु समान अशरीन मयां तेन व अलफ. शके १७५० सर्वजितनाम संवत्सरे मिति चैत्र शु॥ १० सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

(मोर्तब)

वडिलांनीं गांव करून दिल्हे प्रमाणें—घनश्यामराव नारायण साक्ष.

लें० नं. ३८३ श्री. तारीख २५ मार्च सन १८२८.

राजश्री कमाविसदार वर्तमान भावी प्रागणे सत्वास स्वामी गोसावी यांसी.

सेवक यशवंत शिवाजी नमस्कार व अनुक्रमें रामराम सुरु समा आशरीन १२२८ मयां तेन व आलफ. श्रीगुरुस्थानस्वामी, श्रीमत्छच्चिदानंदसरस्वती यांची स्वारी ग्वालेर नजीक लष्करचे मु-

कामीं आली ते समई आज्ञा केली कीं; श्रीक्षेत्र ब्रह्मवर्त येथें मठ बांधून श्रीराधाकृष्णाची स्थापना केली आहे. परंतु तेथील नैवेद्य नंदादीप वगैरे निरंतर चालावा. ह्मणून त्याजवरून आपलेकडून सेवा घडावी हें जाणून आपले जाहागिरीपैकीं प्रागणे सत्वास नेमावर पंचमहाल पैकीं तालुके राजोर येथील गांव मौजे भटासा व आगरदा श्रीस दत्त करून देऊन सनद श्रीचे नांवें आलाहिदा करून दिली आहे. त्याप्रमाणें सदर्हू गांवीं अमल करवून उत्पन्न होईल त्याचा अनुभव हक्कदार इनामदार खेरीज करून जमा वसेल ती साल मजकुरापासून सालदरसाल स्वामीकडेस भोगत जाईल. असल सनदांच्या नकला तुह्मीं घेऊन पत्रें भोगवटेस श्रीकडेस असों देणें. नवीन पत्राचा आक्षेप न घेतां गांवीं अमल करून देणें. श्रीकडून गांवचे वहिवाटीस कोणी राहील; त्याची हरएकविसीं गोग्दारदास्त ठेवीत जाणें. सुरुसन १२२८ समान अशरीन मयां तेन अलफ. संमत १८८५ शके १७५० सर्वजितनाम संवत्सरे मिती चैत्र शु॥ १० जाणिजे. छ० ८ माहे रमजान बहूत काय लिहिणें हे विनंती.

(शिक्का आहे.) (मोर्तब.)

लें० नं. ३८४ सन १८३१.

चिरंजीव राजश्री जिवाजी वेंकटेश राजादीक्ष प्रती—आशीर्वाद. घरीं तुह्मांस पावतील. बहूतकरून तुमची भेट पुण्यांतच होईल. असें आहे. भेट जाहलेवर ऐवज आपण घ्यावा. कळावें. मागाहून आणखीही खर्चास हातीं आलेवर प्रविष्ट होईल. चिंता न करावी. ईकडील राजस्थित अद्याप कांहीं चांगली नाहीं. आई लेकांचा विपर्यास आहे. पुढां इंग्रज काय बंदोबस्त करितील तो खरा. तंवपरयंत बखेडा आहे. रोजगाराची आस्था कांहींच राहिली नाहीं. माघाहून सविस्तर लिहून पाठवितों. कोंकणांतून तुमचे घरचीं वर्की आमचे घरचीं पत्रें आरोबेवरील आलीं नाहीं. वर्तमान कांहीं कळत नाहीं. ऐसें लिहिलें. त्यास आमचे घरचीं पत्रें क ( ) त्यांनीं आमचा निराष करून आहे. व आधीं तापत्रय. पैशाचा आधार नाहीं. त्यांत आह्मी उमेदच लिहीत गेलों. तेव्हां त्याजला आस्ता कशाची? असो. तुह्मीं तरी त्याजला चिरंजीवाला पत्र पाठवून तिकडील सर्वांचें कल्याणवृत्त कळवीत जाणें. असें लिहावें. इकडील राज्यस्थित कांहीं उमेतां सानदान पैसा हातीं आले ह्मणजे आह्मी निघून येऊं. लिहावयाचें तरी आमचें प्रमाण काय? असो. तुह्मीं तरी तिकडील चिरंजीव राजश्री नारायणास लिहून पाठवून आरोबेवरील व तुह्मांकडील वर्तमान सुखरूपपणाचा कळवावें. असें लिहिलें ह्मणजे तो सविस्तर लिहील. दुसरें. चिरंजीव राजश्री काशीबा लाड हे उमेद रोजगाराची धरून आले. आह्मांस सदो ( ) नि कांहीं त्यास इकडेस येऊन बहूत प्रस्ताई पडतील. आजकाल दिवस सर्वत्री अडचण आहे. केरकर यांची अवस्था जाहागीर असोन नित्या उपवासीं. चवघे चहूंकडेस आहेत. येसोबा बाबा आरंवदेकर याची अवस्ता तशीच आहे. आणखी आपले वळणाचा कोणीं नाहीं. यास्तव त्यांणीं न यावें; हें मानस. परंतु मावीक सान चुकणार असो. तू–( )

१. ग्वाल्हेरची. २. बाइजाबाई–दौलतरावांची बायको. ३. जनकोजी शिंदे यांचा. ४. आरोबा हें एक बेट असून तें पेडणें महाल, प्रांत गोवें, एथें आहे. हें पत्र बळवंतराव महादेव शिरोडकर यांचें आहे. यांचें घर आरोबा येथें होतें.

लें० नं. ३८५ श्री. तारीख २१ आगष्ट सन १८३१.

राजश्रिया विराजीतें राजमान्य राजश्री बाळकृष्ण नारायण स्वामीचे सेवेशीं.

सेवक येशवंतराव शिवाजी साष्टांग नमस्कार विनंती उपरी चिरंजीव गंगारूप यमुनाबाई पालेकरीण श्रीक्षेत्र ब्रह्मवर्त श्रीस्वामीचा घांट ध्रुवघांटीं आहे. तेथें श्रीरामचंद्रजीची स्थापना करून सत्कालक्षेप करीत आहे. तिचें चालवणें आवश्यक आहे. याजकरितां तुह्मांकडून पो नेमावरचे ऐवजीं दरसाल चांदगड शिका २५ हे अक्षरीं पंचवीस श्रीचे नैवेद्याबद्दल करून देऊन हें पत्र तुमचे नांवें दिलें आहे. तरी पेस्तर साल संमत १८८८ सन इसन्ने सलासिन मयां तेन व अलर्फचे सालापासून सालदरसाल सदर्हू २५ रु॥ चांदगड शिकेचा हुंडी करून त्याजकडे ब्रह्मवर्तास पावत करीत जावी. तेथून तिचें येणें वरवर इकडे आल्यास खर्च लागतो; सबब फिरोन पत्राचा आक्षेप न करितां हुंडी सदरहू पंचवीस रुपयांची करून पावते करीत जावे. ऐन व हुंडाधळ पो नेमावरचे ऐवजांत मुजरा दिले जातील. संमत १८८७ मिति श्रावण शु॥ १३ छ० ११ सफर बहूत काय लिहिणें हे विनंती.

लें० नं. ३८६ श्री. तारीख २९ सपटंबर सन १८३१.

श्रियासह चिरंजीव राजश्री जिवबा[1] हवालदार याजप्रती बलवंतराव महादेव अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशळ तागायत छ० २२ रबिलाखर जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपणाकडोन पत्र आश्विन मासचें आलें. त्याजवर पत्र येऊन वर्तमान कांहींच बरवेपणाचें समजलें नाहीं. त्यास सकळ वृत्त कळवीत जावें. यानंतर तुह्मीं पत्रीं लिहिलें कीं; आह्मी दसरा दिपवाळी करून ( ) ऐसें लिहिलें. त्यास गेलां न गेलां हें कांहीं ( ) पाठवावी; तर आपण पुण्यांत असल्यास पत्र पोहोंचेल. आण कोंकणांत गेल्यास पत्र कोणाचेही हातीं पडेल. आण आपणास पोंचणार नाहीं. याजकरितां पत्र देखील लिहिलें नाहीं. तुह्मीं खर्चा विषई लिहिलें. त्यास येथील प्रकार सरदारींत[2] दोन फडकीं[3] आई[4] लेंकांची[5] जाहली आहे. आई सर्व कारभार[6] करितात. फिरंगीयांस लेंकाचा पक्ष आहे. आतां फिरंगी[7] येऊन एकादा बंदोबस्त करील तेव्हां होईल. तंवपर्यंत येथें बेदाच आहे. लोकांस पैसा नाहीं. ही अवस्था आहे. श्रीहरी करितो तर जलदीच फिरंगी येणार आहे. आण लेंकाचा पक्ष धरल्याप्रमाणें सर्व होणार आहे. मग लोकांस दोन रुपये मिळणें ते मिळतील; असें आहे. मागाहून सर्व वर्तमान येथील लिहून पाठवून देऊं. तुह्मीं खर्चाविसीं लिहिलें त्यास आह्मीं चिठी करून पाठवावी; तर डांक पुण्यापरयंत. आण पुढां तुह्मांस पत्र कसें मिळणार? त्यामुळें अंदेशा याजमुळें अंदेशा. घेऊन आज पंधरावीस दिवस जाहाले. हलीं राजश्री साबाजी गोपाळ नाडकर्णी हे घरीं आले आहेत. यांजबरोबर पुण्याची हालीं शिकेची हुंडी रुपये ९० ( ) गाहून आठपंधरा दिवस आण ( ) तजवीज करून पाठवून देतों. कांहीं चिंता न करावी. दुसरें. तुह्मी पुण्याहून गेलां; त्यास येथून डांकेंतून पत्र तुह्मांस पाठविलेस कोणाकडेस पाठवावें. आण आपणास तेथून पत्र घरीं पोंहचे असें समजलें

---

१. हे आमचे (ग्रंथकार) आजोबा होत. त्यांस हें पत्र त्यांचे मेहुण्यानें लिहिलें आहे. २. शिंद्यांचे राज्यांत. ३. दोन लफडीं, दोन पक्ष. ४. बाइजाबाई. ५. जनकोजीराव यांची. ६. बाइजाबाईचे तर्फे तिचा बंधु इंदुराव घांटगे कारभार पाहत असे. ७ इंग्रज सरकार.

पाहिजे. त्यास येविसींचें लिहावें. वरकड आरोबेवरील सर्व चिंता तुह्मांस आहे. तुह्मी घरीं गेलां येणेंकरून चित्तास संतोष वाटला. आण ,घराकडीलही वर्तमान समजत जाईल. वरचेवर पत्र पाठवावें. हे आशीर्वाद.

चिरंजीव सौभाग्यवती भिकूबाईस आशीर्वाद. लिहिलें परिसोन लोभ करावा. चिरंजीव नारायण वगैरेस आशीर्वाद असावा हे आशीर्वाद.

साबाजी नाडकर्णी यांजकडोन शंभर रुपये चांदवड घेऊन शंभर रुपयांची पावती पाठवावी.

लें० नं. ३८७ श्री. तारीख २ एप्रील सन १८३२.

श्रीमांगि-
रीशचरणीं तत्पर
यशवंतराव शिवा-
जी निरं.

मा। अजाम जमीदार व सरमंडळ पो नेमावर यांस.

येशवंतराव शिवाजी–सुरू सलास सलासन मयां तेन व अलफ. पो मजकूर हा महाल राजश्री अमृतराव रामचंद्र यांजकडून दूर करून चिरंजीव राजश्री जगंनाथ रामचंद्र याजकडेस कामाची वहिवाट सांगितली आहे. तरी यासी रुजू राहून वहिवाट सुरळीतपणें चालत असावी. माजी कमाविसदार याजकडील रुजवात वगैरे काम पडेल त्याविसींचा साखसुरत दाखला वाजवी वसूल जाहला असेल त्या प्रो दाम दाम समजून द्यावा. यांत तफावत जाहले असतां मुलाइजा होणार नाहीं. तर बिमखत्रे वाजवी असेल तैशी रुजवात करून देणें. पुनः दुसरे पत्राचा आक्षेप न घेणें. रवाना छ० २९ माहे सवाल मिती चैत्र शु॥ १ संमत १८८९ मोर्तबसुद्र.

लें० नं. ३८८ श्री. तारीख २३ जुलई सन १८३२.

राजश्री यशवंतराव भाऊसाहेब जिनशीवाले गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य–स्नेहांकित आनंदराव भोंसुले यांचे राम राम विनंती, उपरी येथील कुशळ तागायत आषाढ वद्य ११ पावेतों मुकाम कलकत्ता येथें आपले कृपेंकरून सुखरूप असों. विशेष. आपणास पेशजीं दोन पत्रें राजश्री रंगराव बाबा यांजकडून एक व ह्मांर्शीस राजश्री रामचंद्र शिवाजी व नारायणराव शिंदे यांजकडून एक एकूण दोन पत्रें पाठविलीं आहेत. त्या पत्रांचें मनन करून उत्तर जलद पाठवावें. हल्लीं हें पत्र लिहिण्याचें कारण, येथें आह्मीं व मेस्तर पेनटीसाहेब मिळोन लॅाट साहेब यांचे चिरंजीव शेहेरे बर्डीणसाहेब परवींट शिकंतर व उटसाहेब लाटसाहेब यांचा भाचा या उभयतांस सह्यांत घेऊन आपल्या मार्फतीनें पुनरपी ग्वाल्हेरचा बंदोबस्त करावा; याजप्रमाणें जाब ठरून ( ) साहेबांपुढें करून उगाच निमित्यास येऊन ज ( ) ठेवावे. ते आमच्या साहेब याच्या बोलावण्यानें न गेले. येथें लोकांचें कर्ज काढून चार या शहरचे हलके मनुष्य हातांशीं घेऊन ढोंग मोठें माजविलें आहे. ज्या दिवसांत शोभा येईल व आपणासही

---

१. हे यशवंतराव भाऊ राजे जिवबादादांचे चिरंजीव होत. यांस दादांनीं आपल्या बंधूस दत्तक दिलें होतें. २. हे जिवबादादांचे दुसरे चिरंजीव होत. ३. मिस्तर. ४. या वेळीं लार्ड विलियम बेंटिंक हे लाट साहेब ह्मणजे हिंदुस्थानचे गवरनर जनरल होते.

मोठी आशा दरबारची दाखवून पत्रें पाठविणार आहेत. कळावें. मी ताराबाई सौभाग्यवती यांचें बोलणें बोलून ठेविलें. परंतु आपण त्यांच्या राज्यांतील मालक आहां व सरकार कंपनीच्या बुकांत मोठे मनुष्य ह्मणून आपले तीर्थरूपांचें व आपलें नांव लिहिलें आहे. ह्या दरबारांत आपण मान्य आहां याजकरितां आपलें एक पत्र लाटसाहेब यांचे नांवचें पाठवावें. ह्मणजे तुमचे नांवानें हुकूम घेऊन ग्वाल्हेरचे बंदोबस्ताविसीं हुकूम व ( ) पाठवून देतों. आपणाजवळ येतील. आपल्या पत्राबरोबर ताराबाई सौभाग्यवती यांचें पत्र लाटसाहेबांचे नांवचें आल्यास बहूत उत्तम आहे. तें पत्र येण्याविसींचा यत्न करून पत्र हस्तगत करून पाठवून द्यावें. तीं पत्रें येथें एकांतांत लाटसाहेब यांस दाखवून मजकूर लिहिल्या प्रमाणें बंदोबस्त करून आह्मी व सौभाग्यवती येतों. याजविसीं एक घडीचा विलंब न करावा. येथें कार्य सिद्ध आहे. या उपर मर्जी आपली. अशी वेळ पुनः येणार नाहीं. व पेनटी साहेब यांणीं पार्शी पत्र आपणास सलामीचें लिहिलें आहे. त्याचें उत्तर पाठवून द्यावें. ह्मणजे तेही मेहनत करितील. त्यास पत्रांत कांहीं आशा दाखवून लिहावें. बहूत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विज्ञापना.

हेच पत्रीं रंगराव बाबा यांस आमचे रामराम सांगावे. पत्रीं मजकूर लिहिला आहे; त्याप्रमाणें तयारी करून पत्राचें उत्तर जलद पाठवावें. हे विज्ञापना. ( ) तुह्मीं लिहिलां कीं दुसरें द्वार केलें आहे. परंतु सुभेदार शिंदे शत्रूनें कैद केले. ( ) घ मासीं केलें ह्मणून लिहितां आणि आमचीं पत्रें वैशाख मासीं गव्यावरून वाटतें कीं; आमच्या मनेसोबा ( ) बाई सौभाग्यवती यांस समजला नाहीं. आणि राजकारणास जी गोष्ट खरी असेल ती लिहीत नाहीं. कळावें. हे विज्ञापना. हीं कलमें रंगराव बाबांस लिहिलीं.

लेॱ नं. ३८९ श्री. तारीख २२ आगष्ट १८३२.

राजश्री मोहनलाल मुलख मुंजफर दौलेराव पुरुषोत्तमराव जगंनाथ बाहादूर दिलावर जंग गोसावी यांस.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित ताराबाईसाहेब शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० २५ रबिलावल जाणोन स्वकीय लिहीत जावें. विशेष. ज्या कामाकरितां तुह्मांस येथून पाठविले त्या कामाची दुरस्ताई जलदी करून काम बजावून लवकर यावें. वरकड मजकूर तिकडे समजाविणें त्याची कैफियत आलाइदा व राजश्री लाटसाहेब यांचे नांवें खलिता ऐसे पाठविले आहेत. त्याजवरून कळेल. तुह्मीं वडिलोपार्जित सरकार चाकरी करीत आलां. त्याप्रमाणें करून यावें. याची परीक्षा आतांच आहे. कळावें बहूत काय लिहिणें हे विनंती.

---

१. ही समजूत पेनटी वगैरे साहेबांनीं कलकत्त्यास गेल्यावर केली. तेव्हां हे आतां पत्र पाठवून उमजत आहेत. २. इंग्रज सरकारच्या दफतरांत. ३. जिवबादादांचें. ४. यशवंतराव भाऊंचें. ५. इंग्लिशांचे दरबारीं. ६. जनकोजीराव शिंदे यांस त्यांची आई बाइजाबाई यांनीं कैद केलें होतें. ७. त्या वेळीं बाइजाबाईचा बंधु सरजेराव घाटगे याचा मुलगा इंदुराव घाटगे व त्याचे साथीदार हे शत्रु होते. ८. शिंदेशाहींतून मिळालेले हे किताब होते. ९. जनकोजीराव महाराज यांची बायको. १०. जिवबादादांचे वेळेपासून त्यांचे वंशांत शिंदे सरकारची चाकरी इमानेंइतबारें बजाविल्याची प्रसिद्धि फार होती. त्यामुळेंच हे उत्तेजनपर शब्द त्यांचे वंशजांस सरकारांतून लिहिले जात असत.

लें० नं. ३९० श्री. तारीख ४ अकटंबर सन १८३३.

राजश्री येशवंतराव भाऊ गोसावी यांसी.

रामराम विनंती उपरी तुह्मीं सरकारचे नांवें चिठी पाठविली ती पावोन मजकूर सविस्तर कळला. जाफर गोलंदाज वगैरे सर्वांस अन्याय माफ करावा. सरकारांतून खातरी करावी. व त्याजपासून गंगा कुराण उचलून घ्यावी. याप्रमाणें ठरलें आहे. येविसीं काय आज्ञा आहे ह्मणोन लिहिलें. त्यास जाफर वगैरे गोलंदाज यांजला अन्याय माफ करावा. पुढें सरकार आज्ञे-प्रमाणें त्यांणीं चालावें; याप्रमाणें ठरधून गंगाकुराण त्याजपासून घेऊन त्याची खातरी सरकार तर्फेची तुह्मीं करावी. गंगा उचलून मागतात त्यास द्यावी. सरकारांतून निभावणी होईल. खातरजमा करावी. रवाना छ० २० जमादिलावल सुरुसन आर्बा सलासीन मयां तेन व अलफ. मागील बारा घटका दिवस रोज शनवार. या पत्राचें उत्तर जलद पाठवावें. हे विनंती.

लें० नं. ३९१ श्री. तारीख १८ अकटंबर सन १८३३.

राजश्री रावजी भोइटे व देवजी सागले गोसावी यांसी.

रामराम विनंती उपरी जुनें पलटण व नवें पलटण वगैरे पलटणें तीन पैकीं पाहारे जिनसींतील दारुगोळ्याचे कोटावर वगैरे जागां आहेत; त्यास जेथें पाहरे पलटणचे असतील ते उठऊन घेणें. राजश्री यशवंतराव भाऊ बंदोबस्त ठेवतील. रवाना छ० ४ जमादिलाखर सुरुसन आर्बा सल्लासीन मयां तेन व अलफ. हे विनंती.

लें० नं. ३९२ पो आषाढ वद्य ४ श्री. तारीख १० जुलई १८३७.
संमत १८१४.

आशीर्वाद विनंती येथील कुशल तागायत आषाढ शु॥ ७ सोमवार तिसरा प्रहर क्षेम असे. विशेष. आपण गंगासिंग व रतना होळकर बरोबर पत्रें पाठविलीं तीं व डांकेंत एक अशीं तीन पत्रें पावलीं. मजकूर सविस्तर समजला. चिरंजीव राजश्री नानाकडे पत्रें पाठविलीं; तीं कारभारी यांस पावतीं केलीं. त्याचें उत्तर देतों ह्मणून सांगितलेवरून आजपावेतों वाट पाहिली. परंतु काल त्यांनीं जबानी सांगितले त्याचा मजकूर चिरंजीवांनीं लिहिला आहे. व उत्तरही आज उद्यां घेऊन पाठवूं. याजकरितां गंगासिंग ठेवून घेतला आहे. सारांश. मातुलाविसीं मालकाचे मनांत विपर्यास पक्केपणीं येऊन कामकाज रहित केलें. पलटण घरू ठेविली होती; ती दूर करून दिल्ही. स्वार मात्र पांच चारशें आहेत. सरबराय नाहीं. नरवर वगैरे जागापैकीं जाहानाबाद व देवगड गोंदळ मात्र राहिली आहेत. वरकड साऱ्या जागा घेतल्या. शिवाजीपंत व रामराव तात्या व गोपाळराव व बापाजी मुजमदार व भाऊ पोतनीस याप्रमाणें स्थलांतर करविले. कामकाज तूर्त खासगीवाले व आंग्रे व फाळके पाहातात. त्यांत खासगीवाले यांचें चळण विशेष दिसतें. आपले कामाविसीं काबूचा लेस कमी करणार नाहीं. याप्रमाणें बोलतात. ऋणानुबंधानें घडून येईल; तेव्हां जाणावें. घरू जाब इति वेळ विसीं लिहिलें त्यास येथें आतां मिसल लागली नाहीं. आतां कांहीं थोडी बहूत तजवीज येथून लागून आली असतां फिरून काम तेथील पडल्यास बनून येईल. खर्चाच्या

१. हें जिनशी तोफांचें काम यशवंतराव भाऊंस मिळाल्यावर त्यांस जिनसीवाले ह्मणूं लागले. २. हें पत्र जनकोजीराव शिंदे यांचें आहे. ३. कृष्णराव कदम मामासाहेब. ४. जनकोजीराव शिंदे. ५. दादा खासगीवाले. ६. रामराव फाळके.

यादी तेथील कारभारी यानीं घेतल्या. त्याचा मार्ग निघालाच आहे. समयावर नजर ठेऊन साधन सूत्र चांगलें ठेवावें. एखादी सोई घडून आल्यास लौकिकांत ठीक दिसून येईल. तेथील ऋणानुबंधाव घडून आल्यास अधिकाधिक होईल. परंतु तेथें साधनांत कमी होऊं नये. तपकीर अर्धशेर पाठविली आहे. गंगासिंग याजबरोबर लिहून पाठवून रात्रदिवस आपले सोईविसीं काळजी लागून आहे. ईश्वर सुखाचे दिवस दाखवील तेव्हां चित्तास समाधान होईल. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

सेवेशीं गंगाधर व सदाशिव साष्टांग नमस्कार विनंती. वरकड सदरीं लिहिलेवरून ध्यानास येईल. सारांश. पेशजीं लिहिल्याप्रमाणें पांचशें रुपये पैकीं. तेथून काम करून पाठविलें असतां येथें सवदागर याचा जाब खरें करून घेऊं. कापड वगैरे सर्वत्रांचे वायदे जाहाले जाणून ऐवज जास्ती पाठविल्यास ठीक आहे. कळावें बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

लें० नं. ३९३ श्रीनाथसाहेब. तारीख ४ आगष्ट १८४३.

राजश्री पुरुषोत्तमराव जगंनाथ गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित जयाजीराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहिणें विशेष. प्रांत जिरण हा माहाल जगंनाथ राम याजकडे जातीचे व कुटुंबाचे खर्चास पेशजी सन इहिदे अशेर मयां तेनचे सालीं सनद करून देऊन चालविले. त्या अलीकडे सरकारांत जप्त होऊन तेथील मामलत रघुनाथ यशवंत याजकडे होती. ते त्याजकडून दूर करून साल मजकूर सन आर्बा आर्बेन मयां तेनचे सालापासून पो मार व जकात सायेर वा जिरण व पान, सोडावयाची तु असे तीन नाक्याबद्दल व मापा जिरणचे गांवांतील खेरीज करून त्याचा ठराव दोन हजार रुपये माहाल चळणी जावदकर कसवटदार याजपासून दरसाल माहाल १. एकूण एक माहाल जकात खेरीज करून तुह्मांकडे जातीचे व कुटुंबाचे खर्चास सालमजकुरापासून सरकारांतून करार करून दिल्हा असे. तरी सदहू जकात सायेर व मापा खेरीज करून त्याबद्दल दोन हजार रुपये माहाल चळणी जावदकर कसवटदार याजकडून दरसाल घेत जाऊन व गो मार कुलबाब कुलकानू सुद्धां पेशजी प्रो तुह्मी अमल वहिवाट करून तेथील ऐवज सालदरसाल खर्चास घेत जाणें. रवाना छ० ७ माहे रजब सुरूसन आर्बा आर्बेन मयां तेन व अलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

ज्योतिस्वरूपचरणीं
तत्पर जनकोजीसुत
जयाजी सिंदे निरंतर.

(मोर्तब सुद्र.)

लें० नं. ३९४ श्रीनाथसाहेब. तारीख १४ आगष्ट १८४३ सोमवार.

राजश्री यशवंतराव शिवाजी गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित जयाजीराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें विशेष. प्रांत नेमाड पैकीं माहाल.

१ प्रांत नेमावर पंचमहाल.
१ प्रांत सत्वास.
—
२

येकूण दोन महाल तुह्मांकडे जातीचे व कुटुंबाचे खर्चास जाहागीर सन इसने असेरीन मयां तेनचे सालीं लावून दिल्हे होते. ते अलीकडे जप्त होऊन तेथील मामलत रामराव लक्ष्मण याजकडे होती. ते त्याजकडून दूर करून साल मजकूर सन आर्बा अर्बेन मयां तेनचे सालापासून सरकारांतून तुह्मांकडे पेशजी प्रमाणें जातीस व कुटुंबाचे खर्चास जाहागीर साल मजकुरापासून सरकारांतून करार करून दिल्हे असे. तरी सदर्हू माहालानीहाय मजकुरीं तुह्मीं अमल वहिवाट करून तेथील ऐवज जातीचे व कुटुंबाचे खर्चास साल मजकुरीं पासोन दरसाल घेत जाणें. रवाना छ० १७ माहे रजब सुरू आर्बा आर्बेन मयां तेन व अलफ. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोर्तबसुद्र.)

ज्योतीस्वरूप-
चरणीं तत्पर जन-
कोजीसुत जयाजी
शिंदे नि.

बार.

लें० नं. ३९५ श्रीनाथसाहेब. तारीख १४ आगष्ट १८४३ शनिवार.

राजश्री रामराव लक्ष्मण गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित जयाजीराव शिंदे दंडवत सुरूसन अर्बा अर्बेन मयां तेन व आलफ प्रांत नेमावर पंचमाहाल पैकीं सत्वास येथील मामलत तुह्मांकडून दूर करून साल मजकुरापासून सरकारांतून यशवंतराव शिवाजी यांजकडेस जाहागिर पेशजी प्रमाणें लावून दिली असे. तरी सदर्हू माहालानीहाय मजकुरीं मशारनिल्हे अमल वहिवाट करितील. तुह्मीं तेथील दखलगिरी न करितां; आणि याचे स्वाधीन करून कबजे घेणें. जाणिजे छ० १७ माहे रजब बहूत काय लिहिणें हे विनंती.

(मोर्तबसुद्र.)

ज्योतीस्वरूपचरणीं
तत्पर जनकोजीसुत जया-
जी सिंदे निरंतर.

लें० नं. ३९६ श्रीनाथसाहेब. तारीख १४ आगष्ट सन १८४३.

राजश्री अमृतराव कृष्ण कसवटदार प्रांत जावद गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित जयाजीराव शिंदे दंडवत सुरूसन आर्बा आर्बेन मयां तेन व आलफ. प्रांत जिरण हा महाल पुरुषोत्तमराव नि॥ सरकार याजकडे पेशजी प्रमाणें साल मजकुरीं जाहागिरी लावून दिल्हा. तेथील जकाद सायर बा॥ मारनिल्हे व पाय्यान सोडा व चीदु असे तीन नाक्याची वहिवाट प्रांत जावदेकडे आहे. त्याचा ठराव दरसाल दोन हजार रुपये माहाल चळणी पुरुषोत्तमराव जगंनाथ मशारनिल्हे यासी देत जाऊन सदर्हू नाक्याची वहिवाट

पेशजी करीत आलां; त्याप्रमाणें तुह्मीं करींत जाऊन दोन हजार रुपये प्रांत मजकूर येथील हिशेबीं रुपये लिहित जाणें. कबजा प्रमाणें मजरा पडतील. जाणिजे छ० १७ माहे रजब बहूत काय लिहिणें हे विनंती.

बार. (मोर्तबसुद्र.)

ज्योतिस्वरूपचरणीं
तत्पर जनकोजीसुत
जयाजी शिंदे
निरंतर.

लें० नं. ३९७ श्रीनाथसाहेब. तारीख १४ आगष्ट १८४३ सोमवार.

राजश्री रामराव लक्ष्मण गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नेहांकित जयाजीराव शिंदे दंडवत सुरू आर्बा आर्बान मयां तेन व आलफ. मौजे कोलारी वगैरे देहे पैकीं सत्वास येणेंप्रमाणें. देह.

१ मौजे कोलारी.	१ मौजे बांवच्या.
१ मौजे बिजळगांव.	१ मौजे खारद्या.

४

येकूण चार देहे येथील मामलत तुह्मांकडून दूर करून साल मजकुरापासोन सरकारांतून पुरुषोत्तमराव जगंनाथ यांजकडे कुटुंबाचे खर्चास लावून दिल्हे असे. तरी सदर्हू देहये मजकुरीं मशारनिल्हे अमल वहिवाट करितील. तुह्मीं तेथील दखलगिरी न करितां ठाणीं यांचे स्वाधीन करून कबज घेणें. जाणिजे छ० १७ माहे रजब. बहूत काय लिहिणें हे विनंती.

(बार सुद्र.)

ज्योतिस्वरूप-
चरणीं तत्पर जन-
कोजीसुत जयाजी
शिंदे निरंतर.

लें० नं. ३९८ श्री. सन १८४३।४४.

जमा साल गुदस्त बद्दल पत्रक जमीदार प्रांत नेमावर सत्वास वगैरे पंचमहाल संमत १८९९.

खर्च.

१५१५८॥-	प्रांत नेमावर.	८२८१	प्रांत सत्वास.
३३१	जामनेर.	९९	कि॥ सत्वास.
७८२॥	मौजे बिराडा.	११२१	प्रा आतवास.
६७२।	मो दिपगांव.	४१२	मो घुख्या.
३८६॥।	मो रिजगांव.	११६	मो बलवाडा.

४२९	विजापूर.
६६८	मो मवासा मवसी.
१४९६	मो तिवडा तिकवाडा.
५३७।	मो बेहेडी.
४८६॥=	मो देवळ्या.
१५२॥।·	मो बाळेका.
७८६।·	मो नियागांवखेडी.
१७३	मो सोनखेडी.
२०९	मो भुक्या.
४७८॥·	मो सोनगांव गुजास.
७०	मो बाजवाडा.
८७१॥·	मो गुजरगांव मुळगांव.
१८१	मो तुरनाळ.
५५	मो मंडळेश्वर.
८१॥·	मो सवासडी.
१३२	मो निमणपूर.
२७५२॥।≡।·	मो संबळपूर.
६२२	मो चिंचली दयेत.
१२६२४॥।-।· २२	

शिवाय जमा.

१८२१	जकात.
४४९	कजली.
५३	सुतचरसे.
७॥।=	पांढरी.
६	कुंभारपटी.
१८॥·	तळबाजा.
१०४।·	फुरोई गुजगारी.
३२।-॥·	जात्रापाठदाम.
२१	नागाविकरी.
१५०≡॥।.	गयाळीवेतलमान.
५॥।·।	कर्ज चौथाई.
२५३३॥।≡॥।·	
१५१५८॥।-	

१५१	मो चत्रापुरा.
३६८	मो नागझरी.
७८८	मो बामणी.
१६१	मो गर्डी.
११६	मो डांबरी.
९६५	मो कोदू वगैरे.
१८	मो खेरखेडा.
२४९	मो बणमारी.
४३५	मो डांगराखेडा.
४५	मो खरोदा.
१७५१	तालुके बिजवाड.
६९९५	

शिवाय जमा.

९२६	जिकात.
१५५	ककली.
३६	खुटलोखंडी.
६॥।·	गवळी नारक्या.
४७।·	बनचराई.
१४०-	जात्रा.
३	रोज तळवाजा.
६॥।·	कर्ज चौथाई.
४४॥=	दांडफुराई.
८६॥-	गुजगारी.
१२८६ १५	
८२८१	
६७२४॥-	पैकीं राजोर.
५०	कसबे मजकूर.
९३६	मो थुवऱ्या.
२६५	मो जागटा.
१५७	मौजे उसमान्या.
१७१	मौजे भिकई.
२८७॥·	मौजे शेरगोणा.
२५५	मौजे सोमगांव.
१०९	मौजे आमोदा.

३४८५	तालुके हरणगांव इजाराकुळ-काळी वगैरे शिवाय जमेसुद्धां.
१	कसबे मजकूर निमे.
१	मौजे सुळगांव.
१	मौजे बंडी.
१	मौजे गजोरा.
१	मौजे कांकडखुर्द.
१	मौजे मनोरा.
१	मौजे सोजान्या.
१	मौजे किसळपूर.
१	मौजे पटाड्या.
१	मौजे जुनापाणी.
१	मौजे करापेवलीत.
१	मौजे आमला वगैरे.
१	मौजे पटराणी.
१३	
१	जकात सायर.
१४	
१८६४३॥-	

३४५	मौजे सोनखेडी.
५०	मौजे चांदी.
३९	मौजे मवाशा.
८८॥.	मौजे दाडीदपूर आंमाडा.
१३१	मौजे सुराणी सुरसुद्या.
३४२	मौजे कोठडा.
३३३	मौजे देवळी जनाळखेडा.
२००।.	मौजे हेरटी.
१८।.	मौजे मळवा.
१२८	मौजे लिली.
२४७	मौजे देहेल्या.
८६	मौजे वागरदा.
६६	मौजे धनवाणी.
७७५	मौजे चंदवाणा घोडीघांट.
१५४	मौजे आगरदा भटासा.
४०।	मौजे शिया.
८५	किलादो.
४०।.	मौजे पिंपळाणी.
८५	मौजे देवसी राळ्या.
४०	मौजे दाहरी.
२०	मौजे पाटरी.
२५	मौजे कोलारी.
५६४८।-	
	शिवाय जमा.
१०२६	जकात सायर.
२७॥।.	बनचराई.
७॥	फुराई गुजगारी.
१५	खुट आमोदा.
१०७६।.	३०
६७२४॥-	
१५००५॥-	

३३६४९।=

८३५ शिवाय पेशकसीबद्दल एक साल आड बद्दल लागती. त्यांपैकीं दरसाल निमे जमीदार याजकडील.

३०० हटेसिंग ठाकूर नेमावरकर.
१५० मुकुंदराव रामचंद्र सरमंडळ लोई.
१६२॥ नारायणराव पांडुरंग मंडलोई कानगो सत्वास राजोर.
१०० राजा रतनसिंग राजोरकर.
३७॥ हरीसा ठाकूर हरणगांवकर.
३५ बिजवाजकर मंडलोई.
५० विठ्ठल रामचंद्र फडणीस सत्वासकर.

८३५

३४४८४।=

(याचे पुढील केरकरांचे जहागिरीच्या जमाखर्चाचे बंद मिळत नाहींत.)

लें० नं. ३९९ श्री. तारीख ४ डिसेंबर सन १८५०.

तीर्थस्वरूप राजश्री दादाजी[1] वडिलांचे सेवेसीं.

बाळकें घनश्यामरायानें दोन कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत मार्गशीर्ष शु॥ १ पावेतों वर्तमान सुखरूप असों. विशेष. बहुत दिवस पत्र येऊन बरवेपणाचें वृत्त लिहिण्यांत यावें. यानंतर इकडील मजकूर ती॥ राजश्री कृष्णराव बाबाचा देहांत[2] कार्तिक शु॥ १५ मंगळवारीं मागील चार घटिका दिवसास जाहाला. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. आह्मांवर मोठाच शोक गुदरला आहे. कार्तिक शु॥ १२ शीस लघुशंकेस गेले; तेथें एकाएकींच कंबर बसली. तेव्हां दोन माणसांनीं धरून आणून बाहेर बसविलें. ते वेळेपासून दुखणें चढूं लागलें. दुसरे दिवशीं अर्धरात्र पावत शुद्धी होती. नंतर श्रम होत गेला तो तिसरे रोजीं प्रहरदिवस पावत कांहींसी स्मृति होती. मग देहभान नाहींसें जाहलें. कळावें बहूत काय लिहिणें. (खासगी.)

लें० नं. ४०० श्री. तारीख १५ मार्च सन १८५३.

श्रीमंत राजश्री माहाराज बाबासाहेब[3] साहेबांचे सेवेसीं.

आज्ञाधारक घनश्यामराव नारायण चरणीं मस्तक ठेवून विज्ञापना ऐशिजे. कैलासवासी ती॥ राजश्री जिवबादादासाहेब हे आमचे आजे. त्यांचे चिरंजीव कैलासवासी नारायणराव बक्षी हे आमचे तीर्थरूप. कैलासवासी श्रीमंत माधव माहाराज व दवलतराव माहाराज यांचे वेळीं आमचे आजे यांणीं चाकरी केली; त्याचा तपशील. हिंदुस्थानमधीं च्यार उमराव आफरासाहेब व आमदानी व गुलाम कादर व इसमाल बेग ऐसे होते. हे दोन दोन लाख फौजेचे सरदार होते. त्यास पहिली लढाई आफरासाहेब यांची मारून त्याजकडील बाजार होता; त्यास कौल देऊन सरकारांत ठेविला. तो बाजार चावडीचा आहे. पुढें लढाई अमदानी याचीही मारली. दोन सरदार गुलाम कादर व इस्माल बेग हे राहिले. तेव्हां गुलाम कादर यांणीं शाहाअलम बादशाहा यासीं बोलले कीं; तुह्मीं जिवबादादा यांस हिंदुस्थानांत आणून मुसलमान लोकांची सरदारी बुडविली. ह्मणोन या रागांनीं

---

१. सगुणराव दाजी. २. तारीख १९ माहे नवंबर सन १८५० रोजीं नारायणराव यांचे चिरंजीव कृष्णराव हे वारले. ३. जयाजीराव महाराज शिंदे.

बादशाहा याजवर जुलूम करून त्याचे डोळे काढिले. त्या वेळीं जिवबादादांनीं गुलाम कादर याजवर चढाई करून गेले. तेव्हां तो दिल्ली सोडून मेरटेवर गेला. तेथें बावीस दिवस मोर्चेबंदी दोनी फौजेची होऊन मैदानची लढाई जाहली. तेव्हां त्याची लढाई मारून गुलाम कादर यास पिंजऱ्यांत घालून मथुरेचे मुकामीं माहराज साहेब यांजकडेस पाठविलें. तेव्हां श्रीमंत माधव माहाराज साहेब आपल्या स्वमुखेंकरून बोलले कीं; ही चाकरी जिवबादादा यांणीं मोठीच केली. त्यास या चाकरीस इनाम काय द्यावें. परंतु माझ्या गादीचा मालक जो होईल तो पांच साहा लाख रुपयांची जाहागिर यांचे वंशास देऊन चालवील. नंतर इस्माल बेग यासीही लढाई पांचसात वेळां मारून इस्माल बेग यास धरून आग्र्याच्या किल्ल्यांत कैद केला. मारवाडवाले यांचे फौजेंत पांचशें सरदार यांणीं केशऱ्या केला. आणि पस्तीस हजार फौज घेऊन लढाईस आले. तेव्हां सरकारचे फौजेंत एकटे जिवबादादा यांणीं मात्र केशऱ्या केला. आणि मारवाडवाले यांची लढाई मारून त्यांची फौज बारबाद केली. तेव्हां मारवाडचे गादीवर राजे भीमसिंग होते. त्यांजकडून साठ लाख रुपये खंडणी घेतली. आण अजमेर घेतली. त्या वेळीं राजे भीमसिंग यांणीं जिवबादादा यांस वंशपरंपरेस पाऊणलाख रुपयेचे गांव दांडीचे लावून इनाम करून ताम्रपटा करून दिल्हा. तो ताम्रपटा जिवबादादा यांणीं सरकारांत दिल्हा. तेव्हां सरकार बोलले कीं; हे गांव तुमच्या वंशास असों द्यावे. तेव्हां जिवबादादा यांणीं सांगितलें कीं; माझ्या वंशास सरकारचे पाय आहेत. असें बोलून ताम्रपटा सरकारांत दिला. ते गांव अजमेर कंपनी सरकारास दिली; तेव्हां तेही गांव कंपनी सरकारांत अजमेरीबरोबरच गेले. श्रीमंत काशिराव होळकर व तुकोजी होळकर व मल्हारराव होळकर हे लाख फौज व दुर्दर नेकचा कंपू घेऊन हिंदुस्थानांत लढाईस आले. ते वेळी श्रीमंत माहाराज सरकार वानवडीचे मुकामीं व हिंदुस्थानांत सुभे जिवबादादा होते. यांणीं लाखेरीच्या मुकामीं होळकरसाहेब यांची लढाई मारली. श्रीमंत दौलतराव महाराज गादीवर बसले; त्यांचे रुबरू पुणें मुकामीं पेशवेसाहेब व हैदराबादवाले नबाब निजाम उलमुलुख यांचा बिघाड जाहला. तेव्हां हिंदुस्थानांतून जिवबादादा यांस श्रीमंत महाराज दौलतरावसाहेब यांणीं पुणें मुकामीं लढाईकरतां बोलावून घेतले. तेव्हां जाते वेळीं औरंगाबादेवरून नबाब यांचे मुलखांतून नवद लाख रुपये खंडणी घेऊन पुण्यास गेले. तेव्हां श्रीमंतांनीं सर्व सरदार यांस घेऊन नबाब याजवर तयारी केली. व नबाब याणीं चार लक्ष फौज व बाराशें तोफा घेऊन आले. तेव्हां पहिली लढाई होळकरसाहेब व नागपूरवाले व पवार व दरोबस्त हुजरातींतील सरदार असे श्रीमंतांकडील राव रंबा निंबाळकर व मश्रुमुल्मुल्क यासी लढाई होऊन श्रीमंतांकडील फौज माघारे पांच कोश पळाली. नंतर तिसरे दिवसीं जिवबादादा यांस व नबाब यासी लढाई जाहली. तेव्हां जिवबादादा यांणीं लढाई मारली. तेव्हां नबाबसाहेब जनान्या सु॥ पळून खर्डीचे किल्ल्यांत गेले. आणि सांडणीस्वार नबाब यांणीं जिवबादादा यांजकडेस पाठविला. आणि सांगोन पाठविलें कीं; "जिवबा कानोंसे सुनाथा सो आखोंसे देख अब हमारे बुढायेकी शरम आपके हात." त्याजवर जिवबा-

१. महादजी शिंदे. २. दुदर नेक फिरंगी हा होळकरांचा सरदार होता. ३. इंग्रजांशीं झालेल्या लढाईचे वेळीं जिवबादादांस ती लढाई जातीनें चालवितांना महादजी शिंदे यांनीं पाहिलें होतें. लढाई आटोपल्यावर शिंदे दादांस ह्मणाले, कायहो बुवा जे डावपेंच आह्मां मराठ्यांच्या सुद्धां लक्षांत नाहींत, ते खेळतांना आज आह्मीं तुह्मांला पाहिलें. धन्य आहे तुमची!

दादा यांणीं सांगून पाठविलें कीं; श्रीमंतांचा हुकूम आहे कीं; तुमची शिक्केकट्यार व मश्रुल्मुलूक यांस पाठवून द्यावे. आणि तुह्मी बादशहाचे वजीर; याजकरितां तुह्मांस खराब करावयाचे नाहींत. त्याजवर नबाबसाहेब यांणीं मश्रुल्मुलूख याजकडे शिकेकट्यार देऊन पाठविले. तेव्हां लढाई मकूब जाहली. ते वेळीं नबाबसाहेब यांचे नांवें आपणच सनदा लिहून शिक्केही आपण करून चवसष्ट लक्षांचा मुलूख व दवलताबादचा किल्ला व नगरचा किल्ला व पांच क्रोड रुपये फौजखर्चाबद्दल श्रीमंतांनीं घेऊन स्वारी माघारी पुणें मुकामास आली. तेव्हां श्रीमंतांच्या सरकारांतून नाना फडर्णीस आणि आमचे तीर्थरूप यांचे नांवें तीन लाख रुपये इनामी जाहागिरीच्या सनदा जिवबादादानीं चाकरी केली सबब तुमचे पंशपरंपेरेस असा लेख लिा। जिवबादादा यांजकडेस सनदा पाठवून दिल्हा. त्या वेळीं त्या सनदा आपण जिवबादादा यांणीं बरोबर घेऊन श्रीमंत सवाई माधवरावसाहेब यांजकडेस नाना फडणीस यांचे समक्ष दरबारांत सनदा देऊन बोलले कीं; आह्मीं शिंदे सरकारची चाकरी केली; व शिंदे सरकारानीं आपली चाकरी केली. तेव्हां इनाम देणें तें श्रीमंत दौलतराव महाराज यांस द्यावें. त्यावरून नगरचा किल्ला व दाहा लक्षांचा मुलूख शिंदे सरकारांत दिला. पुढें यशवंतराव भाऊसाहेब हे आमचे चुलते. ते व आह्मी दाहावीस हजार फौज घेऊन सरकारांतून रुपया न मिळतां सरकारची चाकरी करून दाहापंधरा लक्षांचा मुलूख रांगड्याचा आह्माकडेस कुमळमेर वगैरे आह्माकडेस व मुलखांत आणखी पैदा करून सरकारची चाकरी करीत होतों. जावद निमच मात्र सरकारांतून जाहागीर आह्मांकडेस होती. त्यांस संमत १८७४ चे सालीं सरकार कंपनीसीं व आमची लढाई जावद मुकामीं जाहली. तेव्हां आह्मांकडील मुलूख घेऊन जावद निमच सरकारांत दिली. व कुमळमेर वगैरे कांहीं जागा उदेपूरवाले राणासाहेब यांस दिली. त्या वेळीं येशवंतराव भाऊसाहेब यांस शंभर रुपये दररोज व आह्मी उभयतां बंधु कृष्णराव नारायण व आह्मांस दररोज पन्नास रुपयेप्रमाणें अठरा हजार रुपये सालिना करून दिला. त्याप्रमाणें साडेतीन वर्षेपर्यंत नगदी मिळाले. पुढें संमत १८७८ चे सालीं सत्वास नेमावर ही जाहागिर या ठरावांत दिली तेव्हां महालची जमा कमती जाहली. सबब पहिले सालीं आमचे तिसरे हिश्शेस चवदा हजार रुपये मिळाले. पुढें आणखी जमा कमती होत गेली. ह्मणोन आठ हजार रुपये तिसरे हिशेचे आह्मां उभयतांस मिळत गेले. संमत १८९१ चे सालीं जाहागिर सरकारांत जप्त जाहली. याजकरितां आह्मां उभयतांस श्रीमंत जनकोजीराव माहाराज यांणीं आठ हजार रुपयांच्या वराता कमाविसदार यांजवर करून रुपये मिळत गेले. पुढें कंटीजंटीकडेस महाल गेला सबब मुल्लाजीच्या दुकानांतून आठ हजार रुपये सालिनाप्रमाणें मिळाले. संमत १९०७ चे सालीं आमचे बंधु कृष्णराव नारायण यांचा काळ जाहला. तेव्हां कैलासवासी राजश्री देवराव जाधव मामासाहेब यांणीं आमच्या वडिलोपार्जित सरकारच्या चाकऱ्या केल्या. याची वाकबगारी कांहीं एक न समजून घेतां आमचे बंधु यांचा कांहीं चढला तो ऐवज देऊन पुढें बिनहकांत हा जाब सांगोन चार हजार रुपये नेमणुक त्यांची बंद आहे. त्यास आमचेबरोबर चाकरी ह्या लष्करांत कोणीच केली नाहीं. ही वाकबगारी लष्करास आहे. व श्रीमंत मातोश्री बायजाबाईसाहेब यांसही

१. या लढाईत यशवंतराव भाऊंचें कुटुंब गंगाबाई यांनीं मोठी बाहादरी केली. या बाई मोठ्या उदार, शूर व घोड्यावर बसण्याचे कामीं पटाईत असल्याबद्दल आजवर तिकडे प्रसिद्धि आहे. २. भारतवर्ष मासिक पुस्तक पृ. १०४ यांतील पंतप्रधानांची दुसरी शकावली पहा.

माहीत आहे. असें असतां लष्करांत सर्वत्रांचे सरकारांत वंशपरंपरेस चालवितात. व ज्यास अवलाद नाहीं; त्यास दत्तक देऊनही चालवितात. त्यास आमचे बंधूची बायको व कन्या व जावई आहेत. त्यांचा निर्वाह आमचे हातून होत नाहीं. कारण चार हजार रुपये आमचे आह्मांस पुरत नाहींत. तेव्हां आमचे हातून त्यांचा निर्वाह होत नाहीं. आणि बंधूस आठदहा हजार रुपये कर्जही आहे. त्यास सरकारांनीं मेहरबानी करून त्यास दत्तक देण्याची परवानगी देऊन जिवबादादा यांचें नांव चालवावें. यास आज्ञा व्हावी. आणि दत्तकाचे नांवें बंदोबस्त करून दिल्हे असतां त्याचे कुटुंबाचा निर्वाह होईल. आणि त्याचे कर्जदारी यांसही सरकार आज्ञेप्रमाणें मिळेल! आमचे संमत १९०९ चे सालाचे रुपये चार हजार आह्मांस पाहिजेत. आमची रुपयांची अडचण आहे. आजपावेतों मार्गशीर्ष पौष यास मिळत होतें. साल मजकुरीं माघ अखेर होऊन गेली. त्यास मेहरबानगी होऊन परवानगी जाहली पाहिजे. आमची बहूत लाचारी आहे. याजकरितां विनंती लिहिली आहे. आणि सरकारचे चरणाची भेट घ्यावी हा हेतु आहे. त्यास आमचे शिरस्तेप्रमाणें भेटीस यावें अशी आज्ञा जाहल्यास भेटीस येऊं. मि॥ फाल्गुन शु॥ ५ संमत १९०९ सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

लें० नं. ४०१ श्री.

कैफियत गणपतराव कृष्ण दंडी–आमचे पूर्वजांतील निपणजेचे वडील बाबुराव पांडुरंग दंडी याजपासोन शिंदे सरकारसीं संबंध एक–तो असा. बाबुराव हे कोकण प्रांतीं सावंतवाडी नजीक मळगांवचे राहणार होते. रोजगारचे उद्देशानें श्रीमंत कैलासवासी महादजी माहाराज देशीं अस्तां त्यांचे सेवेशी येऊन भेटी वगैरे अंतीं कांहीं सिलशिल्यानीं असतां; सरकार स्वारी हिंदुस्थानांत येतानां बाबुरावजी यांजला तीनशें घोड्यांचें पतक देऊन समागमें आणिलें. त्याप्रमाणें हिंदुस्थानांत स्वारीबरोबर राहून हुकुमाप्रमाणें लढाई वगैरे प्रसंगीं चाकरी करीत असोन कांहीं दिवशीं माळवे प्रांतीं कांहीं मुलखाचे बंदोबस्ताकरितां होते. पुढें कांहीं दिवसांनीं ग्वाल्हेरीकडे आंग्रेज सरकाराशीं व रांगडे रैईसासीं लढाईचा प्रसंग एक. त्यांत बाबुरावजी यांणीं चांगलें काम देऊन सरकारची फत्ते जाल्यावर सरकारांनीं बाबुरावजीस सातशें घोड्यांचें पतक पागा देऊन सरदारी दिली. आणि अंत्री माहाल त्याचे ताब्यांत सांगून महालचा वसूल पागेच्या वगैरेच्या खर्चाकडे लाऊन दिल्हे. त्याप्रमाणें अंत्री माहालीं बाबुरावजी पागे पतकासह होते. पुढें कांहीं दिवसांनीं मारवाडांत जोतपुर वगैरेकडे लढाई होण्यापूर्वीं सरकार आज्ञा कांहीं पागेपैकीं लोक महालीं ठेऊन हुजूर येणें भावी आल्यावरून आज्ञेनरूप हजर जाहाल्यानंतर जोतपूर वगैरे लढाया होण्यांत बाबुरावजी यांचे हातें काम चांगलें बनून आलें. त्याजवरून सरकारांनीं बजनरगौर त्याजला पालखी व छडी छत्री वगैरे सरदारी लवाजमा दिल्हा. पुढें कांहीं दिवस सरकार चाकरी करीत असतां बाबुराव देवलोक जाहले. सरकार स्वारीही देशीं जाऊन वैकुंठवासी जाहली. हिंदुस्थानांत जगोबा बापू व लखबादादा सुभे जाहले. त्याचे समागमें चाकरी करण्याची सरकारची आज्ञा जाहली. त्याप्रमाणें आमचे निपणजे येशवंतराव बाबुराव दंडी हे करीत अस्तां सरकार आज्ञा वागमाऱ्याची गडी फत्ते कर्णेची आल्यावरून येशवंतराव पागा सरंजामासह गडीवर चालून गडी फत्ते केली. आणि सरकारचा अमल बसविला. इतक्यांत शत्रूकडील धोक्यानीं त्याजला गोळी लागून सरकार चाकरीवर कामीं आले.

१. जमेदार यांशीं.

बाप पणजे आमचे रामराव येशवंत दंडी सरकार चाकरीवर भरतपूर मुकामीं होते. नंतर श्रीमंत कैलासवासी दौलतराव माहाराजसाहेब देशींहून स्वारी हिंदुस्थानांत आली. संमत १८६१ चे सालीं त्या वेळीं मेवाड प्रांतीं शापूरचे मुकामीं पणजे आमचे रामराव येशवंत हे पागा सरंजामानिसीं येऊन हुजूर चरणसेवेसीं भेटले. त्या वेळीं सरकारांतून त्यांजला वस्त्रें होऊन जातबोली वगैरेचा बंदोबस्त होऊन माळवे प्रांतीं जगोबा बापू सुभे होते; त्यांचे तैनातीस जाणेचा हुकूम जाला. त्याप्रमाणें त्यांचे समागमें राहून चाकऱ्या करीत होते. नंतर सरकार आज्ञा जगो बापू यांस, रामराव येशवंत यांस पेंढाऱ्याचें पारिपत्य कर्णेचा हुकूम आल्याप्रमाणें जाऊन पेंढाऱ्याचें पारिपत्य जाल्यावर संमत १८६८ चे सालीं मेवाड प्रांतीं परगणे जिरण हा माहाल जगो बापू त्यांजला जाहागीर सरकारांतून मिळाला. त्यांत एक गांव पणजे आमचे रामराव येशवंत दंडी याजला देणेंबद्दल हुकूम जाहाल्याप्रमाणें जगो बापू याणीं सरकार आज्ञेनुरूप मौजे कोठडी परगणे जिरण हा गांव जाहागिर करून दिल्हा. नंतर जगो बापू याजला भोपाळ घेण्याचा हुकूम आला. त्याप्रमाणें समागमें पणजे आमचे मे पागा असोन भोपाळावर चढाई होऊन मोर्चे लागून फत्ते होणेस आली. मग असे प्रसंगीं सरकारांतून खर्चाची मदत न होतां फौजेंत खर्चाची फार तंगी पडली. तेणेंकरून सर्व फौज अस्ताव्यस्त होत आहे. असे हाल. तींत जगो बापू याजला वायगोळ्याचा उपद्रव होऊन देवआज्ञा जाहली. त्याणीं फौजेचा फार मोड जाला. त्यांत आमचे पणजे यांची कुल पागा वगैरे अस्ताव्यस्त होऊन शिर्फ एक दोन घोडीं बसण्याचीं राहिलीं. असे हाल. तींत घरीं आल्यावर मागें जिरण माहाल जगो बापूला जाहागीर होता तो दूर होऊन माहाल गंगाधर विठ्ठल मंदोसरवाले याजकडे मामलेनी जाला. त्या वेळीं त्याणीं आमचा गांवही जप्त करून सरकारआज्ञेचा आक्षेप घेतला. त्यावरून पणजे आमचे याणीं हुजूर विनंती करितां मोजा मजकूर इस्तमुरार सुरुसन तिसां अशर मया तेन व अलफचे सालीं करून देऊन बनाम कमाविसदार आज्ञापत्र सादर केलें. जगो बापू वगैरेचा बंदोबस्त होण्याबद्दल आज्ञा होऊन येणार इतक्यांत महाराजांस वैकुंठवास जाहाला. पुढें जनकोजीराव माहाराज साहेब राज्यारूढ जाल्यावर त्याणीं आमचा पुराणा वाका समजून बनजर खाविंदीं बडे पागनीशींत जातबोली दरमहा रुपये १२५ ची तोडीची करून दिली. त्याचे चांदवड होण्यांत वगैरे कमी होऊन हल्लीं माझे नांवें दरमहा रुपये ५० ज्यारी आहेत. व गांव इस्तमुरार सरकारांनीं आमचे पणजेस करून दिल्हेप्रमाणें त्याच नांवीं राहून बाद अर्ज नारायणराव रामचंद्र दंडी याचे नांवें जाहाला. व नंतर वडील कृष्णराव नारायण दंडी यांचे नांवीं असोन हल्लीं माझे नांवीं आहे.

ले. नं. ४०२ श्री. तारीख ६ जुलई १८५४.

यादी घनश्यामराव नारायण—संमत १८७४ चे सालीं श्रीमंत सरकार कंपनींतून वकिलीम राजश्री कर्णेल जाभीलसाहेब बहादूर जावद मुकामीं आले. ते वेळीं लढाई जाहली. नंतर ती॥ कैलासवासी भाऊसाहेब यांस छत्तीस हजार व आह्मी उभयतां बंधु कृष्णराव नारायण व आह्मी अठरा हजार सालिना मुकरार जाहाला; त्याप्रमाणें राजश्री रेसिडेंटसाहेब बाहादूर यांचे विद्यमानें साडेतीन वर्षें नगदी रुपये मिळाले. संमत १८७८ चे सालीं राजश्री रीसीडेंट कलुडसन साहेब बहादूर यांचे विद्यमानें सत्वास नेमावर माहाल चौपन्न हजारांत लावून दिला. महालची जमा कमी बसली. सबब उभयतां बंधूंस तिसरे हिशेचे रुपये अठरे हजार मिळत गेले. संमत १८९१ चे

सालीं माहाल सरकारांत जप्त जाहला. तेव्हां माहालीं अठरा हजारांच्या वराता सरकारांतून हो-ऊन उभयतांस रुपये मिळत गेले. संमत १९०० चे सालीं माहाल कंठीजंठीकडेस लागला. सबब श्रीकृष्ण बळदेव यांचे दुकानांतून बिनबटा आठ हजार रुपये राजश्री रीसीडेंटसाहेब बहाद्दर यांचे मार्फतीनें संमत १९०७ कार्तिक शु॥ १५ पो॥ उभयतांस मिळाले. त्याच मितीस बंधूचा काल जाहाला. तो पो त्यांचे मिळाले. पुढां त्याचे मिळाले नाहींत. आमचे संमत १९०८ चे साल पो च्यार हजार पो आमचे आह्मांस मिळाले. समंत १९०९ चे सालचे चार हजार रुपये आमचे राजश्री केशव भया याजकडेस मागत गेलों. ते सांगत गेले कीं; सरकारची परवानगी घेऊन देवितों. परंतु मिळाले नाहींत. त्याजवरून ज्येष्ठ व॥ १३ सोमवारीं राजश्री रेसिडेंटसाहेब बाहाद्दर यांजकडे इतला केला. त्याचा हुकूम जाहला कीं; राजश्री दिवाणसाहेब यांस इतल्ला द्यावा. ह्मणजे तुमचे रुपये देवितील. त्याजवरून ही याद दिली आहे. तरी मेहरबानगी करून चार हजार रुपये आह्मांस देविले पाहिजेत. संमत १९१० मिती आषाढ शु॥ ११ हस्ताक्षर विठ्ठल सखाराम नि॥ मशारनिल्हे.

---

१. रेसिडेंटसाहेब. २. दिनकरराव राजवाडे. ३. परंतु शेवटीं यांची कांहीं दाद लागली नाहीं. शिंद्यांकडील भाऊ पोतनीस यांचा जहागिरीचा गांव त्यांचेकडे चालावा अशी खटपट चालली होती. परंतु, "महाराज कर्ते होतपर्यंत त्याचा निकाल लागावयाचा नाहीं, असा निकाल पोलिटिकल एजंटांनीं केला होता. तें प्रकरण (दिनकरराव यांनीं) पुढें आणून आणि पोतनीसांचे हक्क (इंग्रज) सरकारास दाखवून तो त्यांचा गांव त्यांस परत देवविला." (दिनकरराव राजवाडे यांचें चरित्र पृष्ठ १०४ पहा.) आणि मुळीं मोठें राज्य मिळविणारे, महादजींस गादीवर बसविणारे व लॉर्ड उइलियम बेंटिक गव्हर्नर जनरल साहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें केवळ राज्याचे मालक (या चरित्राचें पृष्ठ २७९, पत्र नंबर ३८८, पेशव्यांची बखर, म्यालेसनसाहेबांचा इतिहास, सोबतचीं पत्रें इ. पहा.) असे जे या चरित्राचे नायक श्रीमंत बक्षीबहाद्दर जिवबादादा साहेब मोठे कर्तृत्ववान् होऊन गेले, त्यांचे वंशजांस त्यांचे धन्यानें दिलेली जहागीर चालविण्यास दिनकरराव राजवाडे यांनीं धरसोडीचीं उत्तरें दिलीं. ती पोतनीसांचे जहागिरीप्रमाणें चालविण्याची तजवीज केली नाहीं इतकेंच नव्हे, तर खालसा ठेविली ! ज्यांच्या घराण्यांतील जिवबादादांसुद्धां नऊदहा पुरुष सरासरी १०० वर्षेपर्यंत या रयाशतीसाठीं खपून शेवटीं ज्यांनीं त्यांतच आपले देह ठेविले आणि आपले नात्यापात्याचे, ज्ञातीचे लोक, व आपले प्रांतींचे मराठे, फिरंगी, यांचीं कुटुंबें आणून तीं शिंदेशाहींत खर्चीं घातलीं; ज्यांनीं अटक नदीपासून तहत रामेश्वरपर्यंत सार्वभौम महाराज शिंदे सरकारचा झेंडा फडकाविला; ज्यांनीं मोठमोठ्या बहुत चाकऱ्या करून परभारें पैसा मिळवून लढाया मारून राज्यें मिळविलीं; ज्यांनीं अलिजाबहाद्दर ही पदवी आपल्या धन्यास मिळवून दिली; ज्यांनीं वर्षाची पंचवीस कोटी रुपयांची जमा आपले धन्यासाठीं मिळविली; व ज्यांच्या हाताखालीं पांचसहा लक्ष माणसें नित्य रावत होतीं; त्या जिवबादादांच्या जहागिरीचा हक्क दिनकररावांनीं कोठें ठेविला ?

पोतनीसांची नवीन मिळविलेली जहागीर राजवाडे यांनीं चालविली यांत त्यांनीं मोठें न्यायाचें काम केलें असें होत नाहीं. कारण, त्यांचा व यांचे पूर्वजांचा घरोबा होता. (दिनकरराव राजवाडे यांचें चरित्र पृष्ठें २६।२९।३२.) शिंद्यांचे राज्यांतील जहागीर देऊन त्याला ते जागले !! दहा लाख रुपयांचें राजकारण चालून आलें होतें, त्याचेवर दिनकररावांनीं लाथ मारिली, असें लोक ह्मणतात. (राजवाडे यांचें चरित्र पृष्ठ ३०९.) पण तें राजकारण कोठलें, काय वगैरे गुप्तच ठेविलें आहे ! असे जे सर्वगुणमंडित राजवाडे कारभारी—ज्यांनीं शिंद्यांचे राज्यांत उत्तम प्रकारें कारभार केला असें ह्मणतात—त्यांचा आपल्या धन्याशीं "मोठा बेबनांव" कशामुळें झाला ? (राजवाडे यांचें च. पृ. ३०९.) व जयाजीराव महाराज एकदम 'उठून लष्करांत एक मीं राहावें किंवा दिनकररावांनीं राहावें,' असें ह्मणून शिप्रीस जाऊन राहिले हें कां ? हा प्रसंग एकच नसून अशा प्रकारें रागावून जाण्याचे अनेक प्रसंग आले होते. (रा. च. पृ. १५४।१५५।३०९.) एवढ्या शूर, कर्त्या पुरुषानें आपली राजधानी सोडून जाणें ह्मणजे कार-

लें० नं. ४०३　　श्रीमंगेश प्रा.

वडिलांचे सेवेशीं बाळकें जिवबानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. विनंती उपरी आज तागायत कार्तिक शु॥ १५ मा जाणोन मुकाम पुणें रास्तेची पेठ येथें क्षेम असो. विशेष. अलीकडे आपणाक

भाऱ्यापुढें त्याचा नाइलाज झाला होता असेंच ह्मणावें लागतें. आणि झाला कारणही आहे. तें हें कीं, सदर कारभारी यांस मुख्य इंग्रजांचें पाठबळ होतें. (राजवाडे ह्यांचें च. पृ. २०७.) त्याच्या जोरावर कारभारी जात, असें उघड दिसत आहे. हे महाराज शूर (रा. च. पृ. ८२ पहा. आणि यावरूनच या चरित्रास महत्त्व आणिलें आहे.) असून विचारी होते, (यांचेच चिरंजीव प्रस्तुतचे शिंदे सरकार माधवराव महाराज हेही तशाच योग्यतेचे आहेत.) असें दिसतें. अशी ज्या ठिकाणीं स्थिति होती, तेथें जिवबादादांचे नातू घनश्यामराव नारायण बक्षी यांचे हक्कांस कोण विचारतो ? शेवटीं, याच अपमानामुळें व नुकसानीमुळें (जिवबादादांच्या वंशजांनीं आपल्या दरबारांतून जावें असा महाराजांचा विचार नसतांही) नाइलाजानें त्यांस दरबार सोडावें लागलें ! (पत्र नं. ४०५ पहा.) दिनकरराव राजवाडे यांस जहागीर मिळाली तिची कमाई काय ती सन १८५७ सालचे बंडाचे वेळीं झाली. त्याचें कारण शिंदे सरकार बंडवाल्यांस सामील झाले नाहींत हेंच होय. शिंदे सरकार बंडवाल्यांस न मिळाल्याचें कारण दिनकरराव आहेत किंवा खुद्द शिंदे महाराज होत, हें समजणें दुरापास्त आहे. कारण, जयाजीराव महाराज विचारी पुरुष होते आणि ते बंडापूर्वीं लॉर्ड क्यानिंग गव्हरनर जनरल साहेबांस कलकत्ता एथें भेटण्यास गेले होते. ग्वाल्हेरचे राजाचें अस्तित्व व दत्तकाबद्दलचें अभिवचन त्यांस लाटसाहेबांकडून मिळालें होतें. यामुळें इंग्रजांविषयीं त्यांचें मन प्रसन्न होतें, असें सदर चरित्रांत सांगण्यांत आलें आहे. तेव्हां, ते बंडांत जाण्याचा मुळींच संभव नव्हता व गेलेही नाहींत. हें केवळ महाराजांनीं कर्तव्य केलें आहे, हें उघड दिसतें. त्यांत कारभारी यांचें मतही असेल. पण, या कामीं महाराज अल्पवयी होते याचेंच मोठें महत्त्व मानून दिनकरराव यांनींच ही गोष्ट घडवून आणली असें गृहीत धरून त्यांस लाख दीड लाख रुपयांची जहागीर मिळवून दिली, ती शिंद्यांचे सुमारें दीड कोटी उत्पन्नाच्या राज्याचा कारभार सात आठ वर्षें केला व इंग्रजांचे राज्यावर बंडाचे वेळीं शिंदे उठले नाहींत याच कारणामुळें होय. व ती शिंद्यांचेच राज्यांतून देण्यांत आली आहे !! असें असून दिनकरराव हे शिंद्यांचे राज्याचे हितकर्ते, अभिमानी, न्यायी, कायदे करणारे, स्वहित न पाहणारे असे होते, असें त्यांच्या चरित्रांत ओक यांनी लिहिलेलें आढळतें. जिवबादादांनीं आपल्यास दुसऱ्या राजाकडून नव्वद लक्ष रुपयांची मिळालेली जहागीर आपले धनी शिंदे सरकार यांस दिली !!! (पत्र नंबर ४०० व सोबतची घनश्यामराव नारायणराव बक्षी यांची कैफियत पहा.) तद्वत् जर दिनकरराव यांनीं केलें असतें ह्मणजे त्यांनीं आपली जहागीर शिंदे सरकार यांस दिली असती आणि जिवबादादांच्या वंशाकडे त्यांची चालत आलेली जहागीरही कदाचित् दूर केली असती, तरी कोणास दोष काढण्यास जागा राहती ना. तसें न करितां स्वहित पुरें करून घेऊन दुसऱ्याचें अन्यायानें अहित करणें दिनकररावांसारख्यास शोभण्याजोगें नाहीं. दुसरें, यांचे जोडीस त्यांचे परम स्नेही रामराव बाबा फाळके हेही होते. (राजवाडे यांचें चरित्र पृष्ठ ३१।१४५.) ह्मणून आह्मी ह्मणतों कीं, त्यांच्या निरपृहतेबद्दल ओक यांनीं त्यांच्या चरित्रांत जीं कित्येक विधानें केलेलीं आहेत, तीं केवळ चुकीचीं आहेत. कारण, जिवबादादांच्या वंशजांकडे त्यांची जहागीर चालविण्यांत दिनकररावांचा स्वतःचा तोटा होता ! आंबझरें महाल ही मुळची बक्षींची जहागीर (पृष्ठ २७२ व पत्रें नंबर ३६४।३६५ पहा.) व खड्या ताजमीचा मानही त्यांचाच होता. तो दिनकररावांस मिळाला होता. (राजवाडे यांचें चरित्र पृष्ठ २५९ पहा.) सबब, बक्षींची जहागीर चालविली असतां आपल्यास मोठा मान व जहागीर मिळणार नाहीं, या भीतीनें हा अन्याय मुद्दाम केला असें उघड दिसतें. (कोल्हापूर एथील मराठा दीनबंधु वर्तमानपत्र, ता० २ सप्टेंबर सन १९०२, यांतील लेख पहा.) आणि नवीन जहागिरी देखील ते दुसऱ्यास देववीत. (राजवाडे यांचें चरित्र पृष्ठ १०४ पहा.) यावरून या चरित्राच्या २३३ पृष्ठावरील पहिल्या टीपेंत ग्रंथाधारें जें मत लिहिलें आहे, तेंच खरें असावें असें अनुमान निघतें. असो. १. जिवाजी व्यंकटेश राजाध्यक्ष हे शिंद्यांचे सरदार व मुत्सद्दी साबाजी नारायण राजाध्यक्ष यांचे नातू होत. साबाजींच्या संबंधानें १३७।१९५।२०३।२७०।३१२।३१८ ते ३२५ नंबरचीं पत्रें आहेत तीं पहा.

ढून पत्र येऊन कांहींच वर्तमान समजत नव्हतें. त्याजवरून फार चिंतेंत होतों. इतकेंत राजश्री राघोबा शंकर व बिबाडी गुरवंद राजश्री रामचंद्र कोटणीस आला. त्याणीं सविस्तर वर्तमान सांगितलेवरून सर्व ध्यानीं आलें. आपण लिहिलेंत कीं; चाळीस रुपये कर्ज आहेत. तर कांहीं चिंता न करावी. व आपणास खर्चासही पाहिजे. हें सर्व माझे ध्यानीं आहे. परंत येथ कांहीं आह्मांस सिंदेचे घरचा माघेला रोजगार नाहीं. इंग्रजाचे घरची असामी. ती आपणास ठाऊकच आहे. त्यांत विजनेरचें काम चार दिवस असलें तर छईनाभर नाहीं. असें आहे. सर्व गोष्टी तुह्मी आह्मांस लिहितां खऱ्या आहेत. परंत मी येथें कोणास सांगावें. त्यांत जें आपले लाभेंकरून आह्मांस मिळतें तें आपणाकडे हाजीर. कांहीं येथें संग्रह करीत नाहीं.

(..खासगी..)

लें० नं. ४०४ श्रीशंभु. तारीख २ मे सन १८५६.

राजमान्य राजश्री सगुणराव विठ्ठल केरकर यांप्रती राजे खेमसांवत भोंसले बाहादर सरदेसाई प्रांगणें कुडाळ व माहालानीहाय. सुरुसन सीत खमसेन मयां तेन व अलफ. चिरंजीव राजश्री आनासाहेब व भाऊसाहेब यांच्या लग्नाचा निश्चय होऊन चिरंजीव राजश्री आनासाहेब यांस वधू राजश्री सुर्भानराव शिंदे सेनाखासकील तोरगलकर यांची कन्या नेमस्त करून लग्न वैशाख शु॥ १४ रविवारीं शके १७७८ रोजीं व्हावयाचें व चिरंजीव राजश्री भाऊसाहेब यांस वधू राजश्री गंगाजीराव खानविलकर कुवेकर यांची कन्या नेमस्त करून वैशाख व॥ २ बुधवारीं शके मजकुरीं होणार. तरी तुह्मीं समारंभास हुजूर यावें. रवाना छ० २६ माहे साबान चंद्र मजकूर.

लें० नं. ४०५ श्रीकृष्ण. तारीख २२ जानेवारी १८६१.

वडिलांचे सेवेशीं आपत्य पुरुषोत्तमराव केरकर चरणीं मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत पोष्य शु॥ ११ दशी मुकाम धुळें वडिलांचे आशीर्वादें क्षेम असो. विशेष. आह्मीं आजवर येणेंविसीं बहूत प्रयत्न केला. निघणेंच न होऊन पत्र लिहिणेंही सोडलें. आतां सर्व आस्ता सोडून एकवेळ यावें ह्मणून निघणेंस निरोप न मिळे. त्यांत रुसवेत निमित्यानें न सांगतां सर्व बराबरचे सरंजाम सोडून दाहापांच माणसां एकदोन घोडीं सडे निघून आलों. निघालेवर आतां तुह्मांस कळवणेंस्तव हें पत्र राजश्री आत्माराम अनंत सोनार याजकडेस हें पत्र पाठविलें आहे. उद्यां येथून निघूं. कळावें. आतां वडिलीं कांहीं काळजी करूं नये. जलदी येऊन पोहोंचतों. आह्मीं श्रीकुलस्वामी याजकडेस नेम दिला. आणि श्रीदेवास नेम दिला आहे. आण मोठा नेम तुमची भेट आण वडिलांची आस्ता ती पूर्ण जाहली पाहिजे. जाणोन सर्वच मनोदय तोडून न कळवितां निघणेंच न होई जाणून आलों. कळावें. बहूत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञाप्ती.

हे॥ पत्रीं ती॥ राजश्री सगुणबा दाजी याप्रती—दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार प्रविष्ट अ-

---

१. पत्र नंबर १३७. २. जिवबादादांचे वेळीं या मंडळीस त्यांचें शौर्य व मुत्सद्दीपणा यामुळेंच रोजगार मिळत असत. परंतु त्यांच्या पश्चात् गुणी मनुष्यांची फार दैन्यावस्था झाली. ३. यांस बापूसाहेब ह्मणत. ४. हें कोल्हापूर दरबारीं सरदारी घराणें आहे. ५. ता. १८ मे १८५६. ६. ता. २१ मे १८५६. ७. दरबारच्या लोकांकडून पुरुषोत्तमरावांस त्रास पोंचत असे. सरकार जयाजीराव शिंदे यांचें ह्मणणें यांनीं जावूं नये असें होतें. असें असतांही ते निघून दक्षिणेंत आपले घरीं आले. कारण, जयाजीराव हे अल्पवयी असल्यामुळें सरकाराकडूनही त्या वेळीं त्या लोकांचा बंदोबस्त होण्याजोगा नव्हता.

सावा. पत्रावरून कळेल. आह्मी येणेंस आलों. कांहीं चिंता करूं नये. भेट होईल. बहू जाळांतून बनेल तैसे निघून आलों आहोंत. हे विज्ञापना.

लखबादादा लाड यांच्या दसरचीं पत्रें.

लें० नं. ४०६ श्रीशांतादुर्गा. ता. १४ नोवेंबर १७८४.

तीर्थस्वरूप राजश्री बाळोबा दादा साखरदांडे मु॥ वागाल तो बारदेस वडिलांचे सेवेसीं. अपत्य शिवरामानें[1] चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे—येथील वर्तमान मार्गशीर्ष शु॥ २ रविवार मुकाम नजीक भरतपूर जाटवाडा येथ सुखरूप आहों. यानंतर मागां एकदोन पत्रें आलीं. त्यास आज साहा महिने जाहाले. आलीकडे पत्र येत नाहीं. याजकरितां राजश्री लक्ष्मण जगन्नाथ यांस पुसिलें. त्याणीं सांगितलें कीं; एकदोन लखोटे आपणापाशीं पोहोंचले होते. ते हारपले. त्याजवरून चिंता जाहाली आहे. तर हरघडी पत्रीं सांभाळ करावा. इकडील वर्तमान तर ग्वालेरच्या मुकामाहून तीर्थस्वरूप राजश्री नाना वरटीकर याणीं श्रावण मासीं सरंजाममुद्धां आह्मांस श्रीमंत राजश्री अंबाजीबावा इंगळे यांजकडे फडणिसीच्या कामाकरितां रवाना केलें. भाद्रपद मास पावेतों आगऱ्यास मुकाम होता. पादशा याच्या भेटी होऊन भाद्रपद वद्य १० मीस श्रीमथुरास्नानास लष्कर गेलें. श्रीकृपेंकरून मथुरा, वृंदावन, गोकुळ, बळीदेव सुद्धां यात्रा जाहली. मागतीं लष्कर माघारें आमदानी याच्या पारिपत्यास आगेर आलीकडे सोळा कोश आलें. या मुकामीं श्रीमंत माहाराज पाटीलसाहेब याचें लष्कर आलें. तेव्हां दोनी लष्करें नजीक लगत्यास आहे. या मुकामाहून वजीर पादशा याकडील आफराशा होता. त्यास मागां मशारनिल्हे याणें आगाशफी दग्यानें मारला होता. त्याच्या बंधूनें यास दग्यानें वजिरास मारला. उपरांत आफराशाचें लष्कर पाटीलबावाकडे मिळालें. आण आमदानी याजवर चालून गेलें. तेव्हां त्याणें बोली लावून तोफा वगैरे सरंजाम पादशा याचा होता; तो स्वाधीन करून भेटीस आला. आण लष्करांस निरोप दिल्हा. येणेंकरून हा प्रांत यांचे स्वाधीन जाहला. पादशा आज आगरेहून आला. त्याची व श्रीमंतांची भेट जाहाली. पुढां—

२ पु॥ वडिलांचे सेवेसीं—सल्ला मसलत कोणती ठरावून कोणीकडे फौजा नेमणूक करून पाठवितील तें पाहावें. श्रीमंत राजश्री खंडेराव हरी यांस कुलीं मुलकाचा सुभा सांगितला. त्याजकडे फडणिसीच्या कायद्यास ती॥ राजश्री नाना यांस ठेविले आहेत. तूर्तकाळीं या प्रांतीं मशारनिल्हेचा वैवाट चांगला आहे. पुढां श्रीकृपेंकरून आह्मांवर कृपा करितील तेव्हां खरें. तूर्तास फडणिसीचें काम सांगितलें आहे. फळदाता श्रीसमर्थ आहे. मजविसीं वडिलीं किमपि चिंता न करावी. तिकडील हकीगत सर्व दखल आहे. परंतु आपण आजवर वोड काढून संसार चालविला तसाच चालवावा. पुढां कोणेविसींची काळजी न करावी. इकडील प्रकार उतावळी केल्यानें होत नाहीं. लाभकाळानें जें जें घडेल तें खरें. आह्मांस आश्रा चांगला सजीतर लावून दिल्हा. पुढां मुलकाचा बंदोबस्त होऊन येतांच पैकाही मिळेल. चिंता नाहीं. श्रीची कृपा असली ह्मणजे सर्व होईल. मागां पत्रीं लिहिलें कीं, याजउपर कांहीं चालत नाहीं. इजतीचा प्रकार हरप्रकारें राखावा ह्मणोन. ऐसें यास

१. हेच शिवरामपंत साखरदांडे मारवाड ऊर्फ जोधपूरच्या दरबारांत शिंद्यांच्या तर्फे वकील होते. हे सुप्रसिद्ध शांताराम नारायण बोंडसे, मुंबई हायकोर्ट वकील, यांजसारखे, उत्तम वक्ते होते. २. ही माहिती विविधज्ञानविस्तार पुस्तक ११, पृष्ठ ८१ यांत आहे.

आम्हीं जेवढा यत्न होता तेवढा केला. परंतु दैवावर भिस्त आहे. योगानरूप घडोन येईल तें खरें. आपण लिहिणार तो प्रकार साह्या ध्यानांत आहे. अशास एक वरीस अवकाश आहे. इतुक्यांत हर तरतूद करून खर्चास पाठवितों. आपण काळजी न करावी. हल्लीं राजश्री बापोजी गोपाळ आरवंदेकर राजश्री यशवंतराव वागळे याचे मेहुणे मावळ्याचे लेक आले आहेत. त्यांची सोरगत होऊन लग्न व्हावयाचें आहे. आशास त्यांजपासीं जें बोलणें तें बोलिलों आहें. आमच्या कच्चा मजकूर विदीत करितील. कळावें. मशारनिल्हे यांचें साहित्य सोरगतविषयीं परभारां होईल तें करावें. आप्त आहेत. वरकड वर्तमान मशारनिल्हे सांगतां कळों येईल. बहूत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होई. आलीकडे तपशीलवार वर्तमान कळत नाहीं. तर सर्वांचें वर्तमान सुखरूपतेचें लिहावें. हे विज्ञापना.

श्री
ज्योतिस्वरूपचरणीं
तत्पर राणोजीसुत
माहादजी सिंदे निरं-
तर.

लें० नं. ४०७ श्री. ता. १७ फेब्रुआरी स. १७८५.

दस्तक सरकार राजश्री माहादजी सिंदे तॉ क॥ दारान व ठाणेंदारान व चौकीदारान व खाने लोकान जकायेत माहालानीहाय सुरुसन खमस समानेन मैया व आलफ. लक्ष्मण अनंत कारकून नि॥ सरकारच्या कुणबिणी कस ३ तीन जांबगांवींहून कोंकणांत सावंतांचे वाडीस जात आहेत. समागमें तट्टें रास ३ तीन व माणसें आलाहिदा ४ चार आहेत. यांस मार्गीं हर कोणीं हांसलाविसीं मुनाईम न होतां रात्रीचे राहतील तेथें चौकीपाहारा करून आपलाली हद्द पार करून देत जाणें. जाणिजे छ० ७ रविलाखर.

(मोर्तब सुद.)

लें० नं. ४०८ श्री. तारीख १७ सपटंबर १७८७.

सेवेसीं गणेश विठ्ठल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती त॥ छ० ४ जिल्हेज सोमवार जाणोन वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण पत्र पा ( ) लिहिला मजकूर कळला. इकडील मजकूर ( ) बुधवारीं येऊन सिकंदरेवर पडला. तेथें इकडून यजमान स्वामीचे मोर्चे हरी पर्वतावर लागले. दक्षणेकडील बाजूस राजश्री रायाजी पाटील व देवजी गौळी यांचे मोर्चे लागले. एक दिवस तेथें राहिले. आ ( ) मीजा इस्माल याणीं तीन वेळ ( ) खालीं राजघांटाच्या सुमारास व यकलाहकडीच्या सुमारास व एक टोळी दिल्लीदरवाजेकडे येणेंप्रमाणें करून पलटणें व तोफांचे गोळे चालविले. तोफा चालविल्या. चाळीस तोफा बराबर आहेत. त्या तोफखान्याखालीं माणसें टिकत नाहीं. ऐसे प्रकार जाहाले. आपले यजमानानीं ( ) तिनें आपल्याकडील तोफा आणल्या. आण तीन वेळ किल्ला एक बाजू राजेश्री रायाजी पाटील यांस सांगितली. एक बाजू मुसा लुस्तुन फिरंगी

१. यांचें उपनांव नाबर व यांचें राहण्याचें गांव कोंकणांत शिरवडें येथें होय. यांनीं हें पत्र आग्र्याचे किल्ल्यांतून लखबादादांचे घरीं लिहिलें होतें.

याजला सांगितली. एक बाजूस एजमानानीं तीन तोफा व आपले पलटण व स्वार झाडून, एक बाजूस मानसिंगबावासुद्धां ( ) मानाजी मोरेचा लाविला. शुक्रवारीं ( ) कालपासून लढाई जाहाली; ती संध्याकाळची चार घटका रात्र पावेतों लढाई जाहाली. तोफांच्या माराखालीं आपणाकडील फौज घाबरली. आपल्याकडील मोर्चा होता; त्याजवर फार चढाई करून आले. ( ) चालन तीन्हीं मोरचे जे त्यांजला मारधर ( ) शुक्रवारीं राजघांटाच्या मैदानांत आणले. दोनप्रहरीं चढाई केली. आण सुलतानगंजांत येऊन ते दाखल जाहाले. ते समईं येथून येजमान स्वामी त्याणीं शेपन्नास स्वारानिशीं उडी घेतली. त्याजकडील पांचपंचवीस माणसें मारलीं. आणि आपलेकडील ते समईंच पांच च्यार घोडीं जखमी जाहालीं. कांहीं एक दोन पडलीं. व बारगिर च्यार जखमी जाहाले. अचलभारती गोसावी जखमी ते समईं भोजराज दत्ता, रामजी तापीकर हे जखमी व तीन बारगीर तंव ठार जाहाले. मोरचा टाकून पलीकडे गेले. शिवाई आह्मांकडील दाहावीस माणसें ते दिवसीं जखमी पलटणचे वगैरे ( ) याणें शुक्रवार शनवार दोन दिवस फार चढाई जाहाली. तेव्हां आह्मांकडील पन्नास पावेतों माणसें जखमी व ठार जाहालीं. शनवारीं संध्याकाळीं सेहरपना येऊन ( ) काल रविवारीं प्रातःकाळींच त्याणीं फार चढाई करून आले. तशांत तिकडे लढाई होत आहे. ( ) येथील झाडून मोंगल याणीं फिरून राहिले. आण आमच्या हवालीं तंव चौत्रा व सायर येथील माणसें यांजशीं लढाई केली. आण ठाणेंत मोंगल दाखल जाहले. तिकडून त्याजकडील फौज येऊन सामील जाहाली. शहरांत लढाई जाहाली. त्यांजकडील व आह्मांकडील ऐसे पन्नास साठ माणसें पडलीं. ते समयीं सहजांत बचाबा किल्लेंतील हा चौकावर उभा होता; त्यास गोळी लागून ठार जाहाला. चेनरामास धरून घेऊन गेले. येणेंप्रमाणें जाहालें. तें वर्तमान येजमानास कळलें. आण मग ते परभारें यमुनेच्या दरवाजेनें येऊन किल्लेंत दोनप्रहरीं सामील जाहाले. ( ) संध्याकाळीं त्यांचे मोर्चे चालवच्यावर लागले. आह्मी मिरी ( ) सुर यांचे हवेलीजवळ मोर्चे ठेविले आहेत. याजप्रमाणें आहे. कळावें. देवजी गौळी व रायाजी पाटील व मुसा लुस्तुन हे बाहेर पडले आहेत. लष्कर ( ) राजश्री धारराव शिंदे यांजला ( ) सध्यां अर्जी सामील होतील. चिंता न करावी. श्रीमंतांचें दैव विचित्र आहे. आपण कोणेविसीं चिंता न करावी. श्री समर्थ आहे. राजश्री येजेमानाविसीं आपण कोणेविसीं चिंता आपण न करावी. घरास सर्वत्रास ताकीद करून द्यावी. बहूत काय लिहूं. सेवेशीं सेवक पदरचा आहे. हे विज्ञापना. सेवेशीं लक्ष्मण रघुनाथ धोंड सा॥ नमस्कार विज्ञापना इकडील सर्व वर्तमान राजश्री गणपत रावजीनें लिहिलेवरून विदीत होईल हे विज्ञापना.

गणेश भास्कर याणीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. सर्व मजकूर लिहिलेवरून कळेल हे विज्ञापना.

लें० नं. ४०९ श्री. ता. ६ फेब्रुआरी सन १७८८.

तीर्थस्वरूप राजश्री बाळोबा दादा आरवदेकर वडिलांचे सेवेसीं.

बाळकें सखोबानें चरणावर डोई ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २८ रबिलाखर मुकाम किल्ले आगरे जाणोन आपले आशीर्वादें सुखरूप असों. विशेष. आपण पत्र पाठविलें पावलें. आपण राजश्री जिवबादादा यांचे आठलेंतून उज्जनीस आलों. ह्मणोन लिहिलें. उत्तम आहे. आह्मांविसीं

---

१. महादजींचें. २. हे पत्र लिहिणाराचे यजमान लखबादादा लाड होत. ३. आठलें ह्मणजे कटक, लष्कर, फौज. ४. या आद्याचे वेळ्याचे वेळीं जिवबादादा तेथें नसून ते दुसरीकडे स्वारीवर होते, हें या पत्रावरूनही उघड होतें.

रात्रदिवस चिंता लागली आहे ह्मणून लिहिलें त्यास इकडील चिंता कांहीं न करावी. चिंता करून होणें काय? ईश्वर जे दिवसीं छेत्रैत्रें पारपत्य करून यांतून सुटका करील तो सुदीन आसे. आपण कांहीं चिंता न करावी. राजश्री लखबादादा लाड याजबरोबर आह्मी आहों. दादा सर्व गोष्टीविसीं ममता करितात. कोणे गोष्टीविसींची काळजी अडचण नाहीं. पुढील विचार—( ) जें जें होणें तें नशिबानें होईल. परंतु कांहीं चिंता न करावी. लवकरच सुटका होईल. चिंता नाहीं. वहूत काय लिहिणें हे विज्ञापना. तीर्थस्वरूप व्यंकोबा मामास व सौभाग्यवती मातुश्री चेऊबाईस पत्रें लिहिलीं आहेत. तीं पावत करावीं. लखोटा आलाईदा आहे. कळावें हे विज्ञापना. सेवेसीं बाळाजी साबाजी वानरीकर दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. सर्व पत्रावरून कळेल. हे विज्ञापना. तीर्थस्वरूप राजश्री दादांस साष्टांग नमस्कार विनंती उपर येथील कुशल ता० छ० ७ माहे सवाल मु॥ जिलकाद जाणें.

लें० नं. ४१०

पें० छ० ११ रमजान, ज्येष्ठ मास वद्य ६. श्री. ता. १४ जून सन १७८८.

चिरंजीव राजश्री बाळोबा व चिरंजीव राजश्री येसोबा यांजप्रती. वेंकाजी सदाशिव अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० ९ रमजान मुकाम लष्कर कुवारी जाणोन वर्तमान यथास्थित आसे. विशेष. तुह्मांकडील वरचेवर पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सदोदित पत्र पाठवित जावें. येविसीं आळस नसावा. इकडील वर्तमान गुलाम कादर छ० ७ तारिखेस यमुनापार गेला. आपली नवी फौज यमुनापार पाठविली होती. ते फौजेनें हजार दीडहजार रोहिले ठाणेठाणेंत होते ते मारून दाहा तोफा आणिल्या. आण गांव मारूं लागले तेव्हां ठाण बसला ह्मणोन हरामखोर फौज सु॥ पार गेला. व सिकांनीं मेरटेच्या सुमारास फारच दंगा केला आहे. ऐसे दोहींकडून ठाण बसला. इकडेस पैला होता; तेव्हां गुलाम कादराचीं माणसें फार लढाईंत पडलीं. त्यामुळेंही तो फार श्रमी होता. आलों काय आण जाहालें काय ऐसें त्यास जाहालें. इस्माल बेग त्याचे गळीं पडत होता. जे आठ दिवस तरी राहावें. परंतु तो ऐकत नाहीं जाहला. इस्माल ढेरेचे बागेमधें साहा हजार जमियेतीनसीं आहे. श्रीमंतांनीं आतां तजवीज केली आहे. निकड करून हरामखोराचें पारपत्य करावें. एका दो रोजीं लढाई होईल. आतां इस्माल बेगास हे मोजीत नाहींत. ईश्वरें जलदी हरामाचें पारपत्य करावें. किल्लेस मोर्चे अधापि पैलेप्रमाणेंच आहेत. किल्लेंतील सरंजाम अगदीं सरला. तो कोठवर लिहावा? हल्लीं आपले फौजेनें तजवीज केली आहे. मोर्चे मारून सरंजाम घालावा. निकड करून घालतील. इस्माल्याची फौजही घाबरली आहे. खायासही त्याजकडेस नाहीं. व त्याजकडील पलटणेंचीं सूत्रें आपलेकडे लागलीं आहेत. ह्मणोन रा॥ दत्तबा काल सडी स्वारींत गेले आहेत. पलटणें येतीलसें दिसतें. तीं आलीं तर मग काय पाहिजे. सर्वच होऊन येईल. समरूची बेगम चार पलटणें घेऊन श्रीमंतांपासीं येत आहे. पन्नास

---

१. इस्माल बेग व गुलाम कादर. २. जिवबादादा आले असतां आगऱ्याचे वेढ्यांतून आपली सुटका होईल, ह्मणून किलयांतील लोकांस केवढी हिम्मत होती पहा! ३. ता. १२ जून सन १७८८. ४. या नवीन फौजेचे मुख्य सरदार जगोबाबापू हे होते. दुसरीं २२।३४ नंबरचीं पत्रें पहा. ५. शीख लोकांनीं गुलाम कादराचे जहागिरीवर स्वारी केली. जिवबादादांनीं त्यांना तसें करण्यास लावून ते स्वतः आगऱ्याचा वेढा उठविण्यास गेले होते. ६. अशा वेळीं संनिध जिवबादादा नसले ह्मणजे महादजी शिंदे आपल्या कुमकेस दुसऱ्याची फौज मागवीत होते. त्याप्रमाणें पहिल्यानें बोलाविलेली ही सुमरू बेगमची फौज शिंद्यांचे साह्यास येत होती.

हजारांच्या हुंड्या बेगमीस श्रीमंतांनीं पाठविल्या. दिल्लीहून अठरा कोश पलटणें इकडे आलींची बातमी आली. दरमजल येणेविसीं पत्रें गेलीं आहेत. तो सरंजाम[१] चांगला आहे. आगरेस जलदीच कुमक करतील. चिंता नाहीं. श्रीमंतांचें कूचही आठादाहा रोजीं चमेलीपार होणार आहे. तुह्मांस चिरंजीव रा॥ देवबानें पत्रें पेशजीं लि॥ आहे. त्याप्र॥ करावें. समरूचीं पलटणें मथुरेचे सुमारें आलीं ह्मणजे येथून कूच पार आहे. तोफखानेचें काम देवबा लाड फडणिसीचें सांगितलें. श्रीमंत रा॥ तात्यांनीं आह्मांस तोफखानेंत जाणेंविसीं सांगितलें आहे. यजमान कृपा करितात. ती॥ रा॥ दादा यांचीं पत्रें किल्लेंतून दोन दिवसां आड येतच आहेत. सरंजाम जलदी पोंचला ह्मणजे उत्तम आहे. आह्मी सडे स्वारींत दो चौ रोजीं राजश्री जिवबादादा यांचे भेटीसें जाऊं. (पुढील खासगी).

लें० नं. ४११ श्री.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस.

छ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्ने॥ माहादजी सिंदे दंडवत विनंती उपर येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. राजश्री लक्ष्मण अनंत याणीं सांगितलें कीं; रघुनाथ जसवंतराव देसाई त॥ पेडणें याणीं राजश्री गोविंदजी जसवंतराव देसाई यांसी दत्तपुत्र घेतलें. त्यास रघुनाथराव यांचे सावत्र बंधु लक्ष्मणजी जसवंतराव देसाई ता॥ मजकूर याचे भाऊपणीं याचा विभाग होऊन निमेनिम गांव मोकासे व वतन वगैरेची वांटणी करून राजश्री राजे खेमसावंत बाहादर भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ व माहालानीहाय यांणीं उभयतांस सनदा करून दिल्हासी दिकत न करीत तें जालें पाहिजे. लक्ष्मण अनंत येथें आगऱ्याचे किल्ल्यांत आहेत. याचें अगत्य जाणोन आपणास लिहिलें आहे. रवाना छ० २३ मोहरम. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. मोर्तबसूद.

लें० नं. ४१२

पे॥ छ० २९ रमजान ज्येष्ठ मास. श्री. ता. १९ जून सन १७८८.

श्रियासह चिरंजीव राजश्री बाळोबा व येसोबा याजप्रती वेंकाजी सदाशिव अनेक आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत ज्येष्ठ शुद्ध १ दा मुकाम कुंवारी जाणोन वर्तमान यथास्थित असे. विशेष. सडी स्वारीकडील व आगरेकडील वर्तमान तर कॅल पूर्णीमेचे दिवसीं झाडून आपल्या फौजा एकत्र होऊन इस्माल बेग ढेरेच्या बागाजवळ होता. त्याजवर फौज जाऊन लढाई घेतली. आण हल्ला केली. तेव्हां दरोबस्त इस्माल्याचा गोट लुटून घेतला. तोफा व घोडीं व उंटें व डेरे दांडे आदी करून सर्व लुटलें. सुतळीचा तोडा जाऊं दिल्हा नाहीं. तोफा आवघ्या आपल्या त्याजकडे

१. लखबादादा. २. जिवबादादा शिखांचे स्वारीवरून आल्यावर त्यांस भेटण्यासाठीं हें पत्र लिहिणारे वेंकोबा-लखबादादांचे बंधु—तिकडे गेले होते.कारण लखबादादा आगऱ्याचे वेढ्यांत असून त्यांची सुटका यांचेचकडून होईल, अशी सर्वांची खात्री होती. व त्याप्रमाणें पुढें झालेंही. संकटसमयीं जिवबादादा जवळ असल्याशिवाय निभाव लागत नव्हता, असें या व इतर पत्रव्यवहारावरून उघड दिसून येईल. ३. नाना फडणीस. ४. लखबादादा. ५. या देसायांचीं घराणीं आरोबा व वागाळी येथें होतीं. त्यांपैकीं एक वागाळीचें गोव्याचे फिरंग्यांनीं बुडविलें. दुसरें आरोब्याबरील अद्याप आहे. या देसायांच्या पूर्वजांस लखबादादांच्या पूर्वजांनीं देसाई देविविली होती. सबब त्यांची काळजी लाड यांस होतीच. ६. लखबादादा या आग्र्याचे वेढ्याचे वेळीं फार अडचणींत होते. तरी ते अशा वेळीं सुद्धां आपल्या पूर्वजांनीं केलेले देसाई धनी यांस विसरले नाहींत. ७. काल. ८. ता. १८ जून १७८८.

होत्या त्या आल्या. पांच हजार पलटण मोंगल मिळोन त्याजकडील रणास आलें. शिवाई जखमीस गणीत नाहीं. आपले फौजेनें ऐशी लढाई गोटावर हल्ला कधींच जाहली नव्हती. ती दक्षिणी फौजेनें येवढें काम केलें. श्रीनें यश मोठें दिल्हें. तें कोठवर लिहावें? इस्माल्यास लुटून घेतला. हें वर्तमान, आगरेचे किल्लेस मोर्चे होते; त्याणीं ऐकतांच झाडून मोर्चे पळून गेले. किल्ला आतां ईश्वरानें मोकळा केला. ती॥ राजश्री दादा शहरांत आले होते. इस्माल्याकडील पलटणेचे लोक व मोगल्यांकडून सर्वांचीं हत्यारें घेऊन लोकांस काढून दिलें. दांतीं गवत धरूं लागले तेव्हां हत्यारां घेऊन सोडून दिल्हे. येणेंप्रमाणें इस्माल्याची घाण श्रीनें केली. इस्माल बेग पन्नास स्वारानसीं पळून शहराकडे गेला. त्याचे मागोमाग फौजा गेल्या आहेत. धरून आणतील. शहरांत आपला अमल बसला. जिमा महसीदचाही मोर्चा पळून गेला. कळावें. आमदानीचा लेंक ठार जाहला. पलटणचे कामेदान कित्तेक धरून आणिले. कित्तेक मेले. येणेंप्रमाणें वर्तमान राजश्री जिवबादादा यांणीं हुजूर लिहून पाठविलें. व बहूत माणसें आलीं. त्याणींही येणेंप्रमाणें सांगितलें. लढाई जलदी घेतली ह्मणोन किल्ला राहिला. आणखी दोन दिवस लढाई न घेते तर किल्ला इस्माल्याचे हातीं पडता. किल्लेंत सामान पैसाभार नव्हतें. त्याजमुळें लोक मोठे घाबरे जाहले होते. आण गुलाम कादराकडील मणियारसिंग[2] याचे बाहादरीनें निघावें ऐसें ठरलें होतें. ज्येष्ट शु॥ १३[3] चे दिवसीं किल्लेंतून बाहादरीनें निघणार होते. मोर्चेची जकडबंदी केली होती. ती कोठवर लिहावी? दर माणसास पंचवीसप्रमाणें रुपये कबूल करून वीस माणसें किल्लेंत पत्रें देऊन पाठविलीं होतीं. परंतु ते आंत पोहोंचत नाहीं जाहाले. त्यापैकीं एक माणूस मात्र आंत गेला. पत्रांत लिहिलें होतें कीं; आह्मी पौर्णिमाचे दिवशीं लढाई खामाखा घेतों. तुह्मीं पूर्णिमापावेतों हरतरेनें दम धरावा. आमची फत्ते जाहाली तर उत्तम. नाहीं तर तुह्मीं बाहादरीनें निघावें. तेव्हां दादांनीं मणियारसिंग यासी सांगितलें; आह्मी त्रयोदशीस निघूं ह्मणत होतों. परंतु मुहूर्त नाहीं. प्रतिपदा तृतीयापर्यंत मुहूर्त पाहून निघतों. ह्मणोन सबब त्यास सांगोन सचोटी राखिली. श्रीभगवतीनें[4] मोठें यश वडिलांस दिल्हें. आपलेकडील माणसें थोडकींच जखमी व मयत फार नाहींत. हें वर्तमान राजश्री नाना व राजश्री बहिरोबा दादा यांसी सांगावें.—

२ चिरंजीव राजश्री बाळोबा याप्रती.—किल्लेंतील लोक फारच घाबरे जाहले होते. परंतु वडिलांनीं दम धरिला. नाहीं तर किल्ला न राहता. श्रीमंत माहाराज यांणीं तीन चार पत्रें वडिलांस किल्लेंत लिहिलीं कीं; तुमच्या मर्दुमीस जोडा नाहीं. आणखी दोन दिवस जसें कळेल तसें काढून राहावें. त्यावरून मोठे संकटें दिवस काढिले. खायास अगदीं नव्हतें. ह्मणोन लोक घाबरले होते. श्रीमंतांचें कूच जलदीच आगरेकडे जाणार आहेत. छावणी तेच प्रांतीं होईल. श्रीमंत राजश्री तात्या याणीं तोफखानेचा रोजमुरा वांटायास जाणेविसीं आह्मांस आज्ञा केली त्यावरून रोजमुरा देत असतों. चिरंजीव राजश्री देवबा सडी स्वारींत तोफखाने बरोबर गेले आहेत. त्याजविसीं चिंता न करावी. आपले म्हस्त सर्व सुखरूप आहेत. तोफखानेंत राहुटी जुदी केली. आचारी ठेविला. जुदी राहुटी करणेविसीं यजमान स्वामीनीं आज्ञा केली. त्यावरून केली आहे. राजश्री

---

१. हें वर्तमान जिवबादादांनीं महादजी शिंद्यांस छावणींत लिहून कळविलें होतें. ही छावणी चंबळा नदीवर होती.
२. मन्यारसिंग. ३. तारीख १६ माहे जून सन १७८८. ४. हे देवीचें देवालय पारसें गांवीं लाड यांणीं बांधिलें होतें. त्या देवीवर त्यांचा फार भक्ति होती.

भाऊ फडणीस व राजश्री तात्या पोतनीस हे इकडेस येणार आहेत. त्यांचे सोबतीनें तुह्मी उभ-यतां व राजश्री भिकबा सबनीस ऐसे त्रिवर्ग यावें. राजश्री माधवरावजी यांसी सांगावें; तुह्मीं उ-ज्जनीस राहावें. घरचा बंदोबस्त राखावा. माधवरावजी यासी उज्जनीस ठेवणेंविसीं वडिलांनीं आगरेहून लिहिलें आहे. पांडसेटही तेथेंच असों द्यावा. तूर्त इकडे येणेंचें प्रयोजन नाहीं. जर-करितां फडणीस व पोतनीस आले; तर तुह्मीं यावें. नाहीं तर न यावें. वाट चालत नाहीं. आह्मीं लि॥ ह्मणोन गडबड करून याल तर निभाव होणार नाहीं. दोनतीनशें स्वाराविना निभाव होत नाहीं. ते येतील तेव्हां यावें. राजश्री शामराव व राजश्री गोपाळबा पिंगेही येणार आहेत. त्याब-रोबर येणें. राजश्री माधवरावजीची शंभर रुपयांची हुंडी चिट्टी किल्लेंतून आली होती. ती राजश्री पांडुरंग नाईक साहुकार यांचा हलकारा उज्जनीस पेशजी गेला. त्याजबरोबर लाखोटा करून पा-ठविला आहे. चिट्टी पावलेयाचें उत्तर लिहावें. आपलेकडील फौज बहुत आतां जमा जाहाली आहे. एवढी फौज आगरेजवळ असोन एक शेर दाणा किल्लेंत पोंहोचविला नाहीं. आण फौजेच्यानें कांहीं त्याचें जाहालें नाहीं. आण हे समक्ष असतां इस्माल किल्ला घेतो. तेव्हां सर्व सरदार व फौ-जेनें सल्ला केली. इस्माल्यानें किल्ला घेतल्यावर आमची सर्वांची आबरू गेली. आतां एक ल-ढाई घ्यावी आण हल्ला करावी. ऐसें ठरवून श्रीमंतांस येथें पत्र पाठविलें. श्रीमंतांचेही चित्तीं ऐसेंच होतें. तेव्हां सर्वांस खातरजमेचीं पत्रें लिहून पाठविलीं. एकदां त्यांचें पारपत्य करावें. तेव्हां इरेस पडून फौजेनें किल्ला जगवून यश घेतलें. आतां गुलाम कादर यमुनापार होता; त्यास ही दहशत भारी पडली आहे. पैला तो इस्माल्यास सामील होता. तेव्हां तीन हजार माणूस रणास ठेवून पार गेला होता. आतां याचे समोर ठरणें कळतच आहे. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीरवाद. वेळोवेळ पत्र लिहीत असावें. हे आशीरवाद. चिरंजीवी काशीबाईस अनेक आशी-रवाद प्र॥ कीजे. राजश्री माधवरावजी स्वामीस साष्टांग नमस्कार. तुह्मीं तूर्त तेथें राहावें.

ले० नं. ४१३ श्री.[१] तारीख २५ जून १७८८.

तीर्थस्वरूप राजश्री दादा वडिलांचे सेवेसीं.

अपत्य वेंकोबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २० माहे रमजान मुकाम लष्कर नजीक ग्वाल्हेर जाणोन वडिलांचे आशीर्वादें सर्व सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यावरून चिंतातूर होतों. त्यास आपलीं छ० २६ जमादिलाखरचीं पत्रें राजश्री नारो कमळाकर याच्या हलकाराबरो-बर पाठविलीं तीं पावोन लिहिलें कळों आलें. कोलापूरचा राजा घांट चढून गेला ह्मणोन लि॥ त्यावरून चित्त स्वस्थ जाहलें. आतां माणसास बसायास जागा जाहली. ती॥ माहादबा दादा दे-वाज्ञा जाहले ह्मणून ऐकोन चित्तास फार खेद जाहला; तो कोठवर लिहावा ? ईश्वरें आह्मांवर क-हर केला. त्याची आमची भेट होऊन मग भलतेंच जाहलें आसतें तर हेतू होते. ईश्वरइच्छेस उपाय नाहीं. आगरेकडील वर्तमान तर आज दाहा महिने ती॥ राजश्री दादा आगरेचे किल्लेंत होते. वीस हजार फौज घेऊन इस्माल बेग मोंगल याणें मोर्चे लाऊन नित्य लढाई घेत होता. इत-

१. व्यंकाजी सदाशिव लाड हे लखबादादांचे घरचे पुरुष होत. त्यांनीं सावाजी दादा लाड यांस हें पत्र लिहिलें होतें.

कैयांत श्रीमंतांची फौज घेऊन राजश्री जिवबादादा व राजश्री राणेखानभाई आगरेकडे किल्लेचे उपराळेस दोन अडीच महिने जाऊन राहिले. तीस हजार फौज यांजबरोबर होती. इस्माल बेग यास गुलाम कादर रोहिला पनरा वीस हजार फौजेनसीं सामील जाहला. उभयतां आविंदांबरोबर तोफा दीडशेंपर्यंत होत्या. तेव्हां आपले फौजेच्यानें किल्लेस उपराळा होत नाहीं जाहाला. मोंगल जबरदस्त जाहाले. आण आपले फौजेवर चढाई करून आले. तेव्हां दोन तीन लढाया त्यांसीं आपल्यानीं घेतल्या. तीन चार हजार माणूस मोंगल्यांचें ठार मारलें गेलें. शिवाई जखमी जाहले. तेव्हां गुलाम कादर रोहिला यमुनापार गेला. तेव्हां एकटा इस्माल बेग आगरेजवळ राहिला. इतक्यांत आपले फौजेनें जलदी करून इस्माल बेगाशीं लढाई ज्येष्ठ शु॥ १५ मेचे दिवशीं घेतली. मोंगल्यांचे फौजेवर हल्ला केली. तेव्हां इस्माल बेग याचा मोड जाहला. आविंदांचे माणूस पांच हजार पर्यंत ठार जाहले. व जखमी शिवाई व कितेक यमुनेंत बुडोन मेले. इस्माल बेग यांचें लष्कर झाडून लुटून घेतलें. घोडीं व उंट वगैरे चीजबस्त व हत्ती ८ आठ व तोफा ६० साठ होत्या त्या. ऐसा सर्व सरंजाम लुटला. पांच स्वारानशीं इस्माल बेग पळाला. एक तट्टू देखील जाऊं दिल्हा नाहीं. तेव्हां किल्लेचे मोर्चे पळून गेले. किल्ला मोकळा जाहला. मुलुकांत त्याजकडील ठाणीं होतीं तीं पळालीं. आपलेकडील प्रांगणेंत ठाणीं बसलीं. ईश्वरें श्रीमंतांस मोठें यश दिल्हें. आगरेच्या शहराचा शैलेप्रमाणें वडिलीं बंदोबस्त केला. किल्ला वडिलीं लढविला त्याची तारीफ कोठवर लिहावी? त्यामुळें श्रीमंत राजश्री पाटीलबावा—

२ तीं॥ राजश्री साबाजीदादा वडिलांचे सेवेसीं—यांची कृपा वडिलांवर फार जाहाली आहे. वडिलीं किल्ला लढविला. ह्मणोन हिंदुस्थान श्रीमंतांचे पदरीं राहिलें. नाहीं तर उज्जनीस यावें लागतें. आतां श्रीमंतांचा पराक्रम मुलुकांत जाहाला. झाडून हिंदुस्थानांत दहशद बसली. श्रीभगवतीनें मोठें यश घेतलें. विश्वतोमुखीं उत्तम प्रकारचा लौकिक वडिलांचा जाहला. आतां क्लेश वडिलांचा गेला. मोठे दिवस आले होते. ते श्रीनें परिहार केले. हाल्लीं श्रीमंत दों चौं रोजीं आगरेकडे जाणार आहेत. छावणी हिंदुस्थानांत होणार आहे. आगरेस अगर श्रीमथुरेस छावणी करितील. कूच जलदीच आहे. दादा यांचीं रोज पत्रें आगरेहून येत आहेत. सुखरूप आहेत. चिंता न करावी. चिरंजीव राजश्री देवबास तोफखानेचें काम श्रीमंत राजश्री तात्या पागनिसांनीं सांगितलें. आज वीसपंचवीस रोज जाहले. काम चांगलें आहे. राहुटी जुदी करणेविसीं सांगितलें. त्यावरून तोफखानेंत राहुटीही केली. दाहा बारा कारकुनाचें पोट आहे. दाहा कारकून टेविले पाहिजेत. ठेविलेही आहेत. देवबा सडी स्वारींत तोफखानेबरोबर गेला. आह्मी येथें राहिलों. आह्मांसही तोफखानेंत जाणेविसीं तात्यांनीं सांगितलें. त्यास तूर्त रोजमुरा आह्मीं तोफखानेचा दिला. आतां प्रागणे सुटले आहेत. एखादा आह्मी हाताखालीं घालूं. चिरंजीव देवबा आगरेचे किल्लेंत जाऊन वडिलांस भेटले. आह्मी उद्यां आगरेस वडिलांचे भेटीस जाणार आहों. राजश्री जिवबादादा वगैरे सर्व मंडळी सुखरूप आहेत. लढाईंत हत्यारानें सर्वांस रक्षिलें. श्रीमंतांची कृपा दादांवर फार आहे. लढाई दादांनीं मारली. व आगरें वडिलांनीं खले. आतां दिवाणगिरी तात्या करितात. आपल्या लोकांवर श्रीमंतांची पूर्ण कृपा जा-

१. या आग्र्याचे लढाईन्ते वेळीं जिवबादादा व जगोबा बापू राणेखान यांजसह शिखांचे पारपत्यासाठीं गेले होते. त्या मोहिमेस आठ नऊ महिने लागले. पत्र नंबर ४९ पहा. पुढें त्यांनीं येऊन ही लढाई मारिली. २. तारीख १८ माहे जून सन १७८८. ३. जिवबादादांनीं. ४. हे पत्र लिहिणाराचे वडील लखबादादा होत. ५. बाळोबा तात्या.

ह्याली आहे. ती कोठवर लिहावी. मागें ओंगळ[1] दिवस आले होते; ते गेले. अंतरवेदींत हाल्लीं फौज उतरणार आहे. गुलाम कादर पार आहे. त्याचे पारपत्यास फौज जाणार आहे. दों चौं रोजीं उतरतील. चिरंजीव बाळोबा व येसोबा व राजश्री भिकबा सबनिवीस यांसीं उज्जनीस ठेवून आलों होतों. हाल्लीं इकडील यथास्थित जाहलें. तेव्हां हाल्लीं त्या त्रिवर्गास लष्करांत येणेंविसीं उज्जनीस पत्रें आह्मीं पाठविलीं आहेत. पनराविसां रोजीं येथें येतील. उज्जनीस मातुश्री आना मावशी व सौभाग्यवती येशवदाबाई व चिरंजीवी काशीबाई वगैरे सर्व खुशाल आहेत. त्यांजविसीं चिंता न करावी. तात्या यांची मर्जी वडिलांवर चांगली आहे. तुह्मांकडील कच्चें वर्तमान व वतनी वगैरे लिहिलेप्रमाणें परशकोडेचें भात तुह्मांकडे आलें किंवा नाहीं; तें लिहिलें पाहिजे. कवठणी तुह्मांकडे आहे किंवा कैसें तें लिहावें. बहूत काय लिहूं हे विज्ञापी. चिखलीस पत्र पाठविलें तें पावतें करावें. हे विज्ञापी. हे॥ राजश्री महादजीबावा भावोजी स्वामीचे सेवेसीं—साष्टांग नमस्कार विनंती. इकडील वर्तमान वडिलांचे पत्रीं लिहिलें आहे. त्यावरून कळों येईल. तुह्मांकडील वरचेवर वर्तमान लिहीत जावें. हरघडी पत्र पाठवून ममता दुणावीत जावी. बहूत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

सौभाग्यवती भोबे आका व सौभाग्यवती गोदे आका वडिलांस साष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा. राजश्री गोंदसेट दादा स्वामीस आमचा साष्टांग नमस्कार याद करून प्रविष्ट कीजे.

लें० नं. ४१४ श्री. तारीख २९ जुलै सन १७८८.

ती॥ राजश्री दादा वडिलांचे सेवेसीं.

अपत्य वेंकोबानें व देवबानें चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल तागायत आषाढ वद्य ११ सी मुकाम श्रीमथुरा जाणोन वडिलांचे आशीर्वादें सर्व सुखरूप. असों. विशेष. वडिलांकडून बहूत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें. त्यावरून चिंतातूर होतों. त्यास येत्या कासिदाबरोबर सर्वांचीं पत्रें आलीं तीं प्रविष्ट होऊन चिंता निरसन जाहाली. लिहिलें सर्व कळों आलें. तुह्मी गोमंतकीं गेलां होतां. मागती वाडीस आलां. पुढें राजश्री गोविंदराव जसवंत यांसी घेऊन गोमंतकीं जाणार होतां. गेलांच असाल. तेथें गेलेवर कसें काय जाहालें तें सविस्तर लिहिलें पाहिजे. परसकोडचें भातही अमानत ठेविलें होतें. त्याचाही मजकूर कैसा जाहाला तो सविस्तर लिहिला पाहिजे. आपण वतनाचा मजकूर व घरगुतीचा मजकूर विस्तारें लिहिला. त्याचें उत्तर मागाहून पाठवितों. तेथें तुह्मांकडे वतनाचा जाबसाल आहे. तेव्हां लोक राजी राखून वर्तणूक करावी. व सर्वांचें आर्जव करून कार्यसिद्धी होई तें करावें. सरदारीच्या डौलास सरळपणीं सर्वांसीं गोड गोष्टी बोलोन वर्तणूक केलेवर कामास जमाव पडतो. वडिलांस लिहून कळवावें ऐसें नाहीं. परंतु सूचना लिहिली आहे. वराई देत नाहीं. आण तुह्मीं आह्मीं एक विचारें असावें. ऐसें स्वर्दी ह्मटलात ह्मणोन राजश्री भावोजींनीं लिहिलें होतें. वराई न द्यावें हें काय बोलतात कळेना. वराईपैकीं कांहीं कमती करून बाकीचे वराई ठरवून देतील तर उत्तम आहे. उगाच तंटा वाडतो हें ठीक नाहीं. तुह्मांस कळेल तसें एकदां तंटा तोडोन एक विचार राहिल्यास ठीक आहे. तुमचे मर्जीस येईल तसें व दरबार फिरंगी याचा रोंख पाहून

---

१. ज्या दिवशीं लालसोटच्या लढाईंत पराभव झाला, ते दिवस ओंगळ असें ह्मटलें आहे.

जसें कळेल तसें करावें. आह्मी दूर आहों. तेव्हां आह्मीं अमुकच गोष्ट करावी; ह्मणोन काय लिहावें. देशकालवर्तमान पाहून तुमचे नजरेस जशी जशी गोष्ट येत जाईल तशी वर्तणूक करून कार्यसिद्धी होईल ती करावी. इकडील वर्तमान तर इस्माल बेग मोंगल व गुलाम कादर रोहिला ऐसे येऊन आगरेचे किल्लेस मोर्चे दाहा महिनेपर्यंत लाविले होते. दाहा महिनेपर्यंत वडील फार लढले, तें कोठवर लिहावें? इतक्यांत श्रीमंत राजश्री जिवबादादा राजश्री राणेखानभाई ऐसे सर्व फौज घेऊन आगरेचे किल्लेचे कुमकीसे आले होते. दोन तीन वेळां लढाई मातबर जाहाली. रोहिलेकडील व मोंगलेकडील माणसें फार मारलीं. इतक्यांत गुलाम कादर रोहिला यमुना उतरून पार गेला. एक ठाईं इस्माल बेग आगरेजवळ रा—

२ ती॥ राजश्री साबाजीदादा वडिलांचे सेवेसीं.—हिला. तेव्हां आपलेकडील सरदारांनीं तजवीज केली कीं; आतां हल्ला करून मोंगलयास बुडवावा. नाहीं तर किल्ला आज उद्यां जाईल. ऐसें [1]ठरावून जेष्ठ शु॥ १५ मेचे दिवशीं मोंगलयासीं लढाईस उभे राहून आपले फौजेनें हल्ला त्यांजवर केली. तेव्हां इस्माल बेग दरोबस्त बुडवून दिल्हा. सुतळीचा तोडा देखील जाऊं दिल्हा नाहीं. पांचचार हजार माणसें मोंगल्याकडील ठार मारलीं. शिवाई जखमी जाहले. हत्ती १४ चवदा व तोफा ६८ व घोडीं उंट सर्व लुटून आणिलें. बंदुकांची गणीत कोण करील? आपले फौजेस नकदी व चिरकुटें व वस्तभाव लूट फार मिळाली. तेच दिवशीं आगरेचे किल्लेचे मोर्चे पळून गेले. ईश्वरानें एकदां अरिष्ट निवारण करून वडिलांस दाहा महिने कस्त मेहनत केली त्याचें यश दिलें. दिगंतर वडिलांची कीर्त नांवलौकिक चांगला जाहाला. तो कोठवर लिहावा? किल्लेमध्यें सरंजाम अगदीं सरला होता. जुने गहूं व मीठ मात्र दोन तीन दिवसाचे बेजमी राहिली होती. लांकडें आदीकरून जिन्नस नव्हता. ऐसें असोन वडील शर्तमर्दीनें लढाई घेत होते. त्यामुळें श्रीमंत राजश्री [2]पाटीलबावांच्या करारास वडिलांची मर्दुमी पुर्तेपणीं ध्यानीं आली. व मर्जीही वडिलांवर फार प्रसन्न आहे. श्रीमंत राजश्री तात्या पागनिसांचीही कृपा वडिलांवर फार आहे. तात्याचें नांव राखिलें. वडील येथें श्रीमंत माहाराजांचे भेटीस येऊन आज पनरा रोज जाहाले. श्रीमंत माहाराजांची भेट घेतली. श्रीमंतांनीं वडिलांस हत्ती दिला. व शिरपेंच व मोत्यांची माळ दिल्ही. व वस्त्रें सेलापागोटें व शालजोडी व किनखाप व ह्मामोदी येणेंप्रमाणें वस्त्रें दिलीं. पुढेंही ऊर्जित करावें हें माहाराजांचे व पागनिसांचे चित्तीं आहे. सर्व प्रताप श्रीभगवतीचा आहे. आगरेस बंदोबस्त पैलेप्रमाणें वडिलीं केला आहे. येथून वडील आठां पनरा रोजीं आगरेस जातील. चिरंजीव राजश्री देवबास तोफखानेची फडणिसी करून राजश्री तात्या पागनिसांनीं दिल्ही आहे. पेशजी राजश्री बाजीबा ह्माजन याचा हलकारा कोंकणांत गेला आहे. त्याजबरोबर लढाईचें वगैरे सर्व वर्तमान लिहिलें होतें. त्यावरून कळलेंच असेल. चिरंजीव राजश्री बाळोबा व येसोबा राजश्री भिकबा सबनीस व राजश्री नीलकंठ बांदेकर हे उज्जनीस ठेवून आह्मी लष्करांत आलों होतों. आतां त्यांस इकडेस बोलावयास पाठविलें आहे. आठां पनरा रोजीं येतील. हरएक जागां सोई करून देऊं. बाळोबाचीही चांगली सोई करून देणें योजिलें आहे. श्री करील तें खरें. त्यांजविसीं चिंता न करावी. सर्व सुखरूप

१. आगऱ्याचा वेढा जिवबादादा स्वारीवरून येईपर्यंत तसाच होता. पुढें त्यांनीं लढाई करून हा वेढा उठविला. हे गेले तिकडे यांस यशच मिळत गेलें. २. लखबादादास.

आहेत. मातुश्री आना मावशी व सौभाग्यवती येशवदाबाई व चिरंजीवी काशीबाई ऊज्जनीस सुखरूप आहेत. चिंता न करावी. ईश्वरानें आतां खोटे दिवस दूर—

३ ती॥ राजश्री साबाजीदादा वडिलांचे सेवेसीं—करून चांगले दिवस दाखविले आहेत. दाहा महिनेपर्यंत चिंतेच्या डोहांत आह्मी पडलों होतों. तें कोठवर लिहावें ? श्रीनें कृपा करून विघ्न दूर करून वडिलांची भेट दिल्ही. व श्रीमंत माहाराजांस यश दिल्हें. श्रीमंतांची छावणी चातुरमास मथुरेवर आहे. गुलाम कादर दिल्लीस गेला. आण तेथें जमला आहे. आपलेकडील पलटणें व फौज त्याचे तोंडावर गेली आहे. हाल्लीं राजश्री जिवबादादा सर्व फौज घेऊन चार रोजीं दिल्लीस जाणार आहेत. बादशाहा आपलेकडे आहे. गुलाम कादर याचें पारपत्य ईश्वर करील तर सत्वरच होणार आहे. गुलाम कादराच्या पारपत्यास आघाद नाहीं. वडिलांस कळावें, यास्तव सविस्तर इकडील लिहिलें आहे. तुह्मांकडील वरचेवर वर्तमान लिहीत जावें. ह्मणजे चिंता दूर होत जाईल. यंदां तुह्मांकडे दाणेची महर्गता फार आहे. तूर्त येथून कांहीं तरी तुमचें साहित्य करावें तर किलेचा वेढा उठोन आज सवा महिना जाहाला. वडील येथें कामकाजाकरितां आले आहेत. तेव्हां सध्यां तुमचा परामृश घडोन आला नाहीं. सुचना कळावी. तिकडील आप्त व स्नेहिक आहेत. त्यांस पत्रांतील वर्तमान दखल करावें. वरकडांस लिहिलें नाहीं यास्तव सुचना लिहिली आहे. बहूत काय लिहूं हे विज्ञापी.

हेच पत्रीं राजश्री माहादाजीबावा भावोजी स्वामीचे सेवेसीं—कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. आपण लिहिलेलीं पत्रें पावोन लिहिलें कळों आलें. त्याचें उत्तर सविस्तर मागाहून पाठवितों. हाल्लीं कासिदाची जलदी जाहाली. ह्मणोन लि॥ नाहीं. चिरंजीव राजश्री बाळोबास बोलावयास पाठविलें आहे. जलदीच येतील. त्याजविसीं चिंता न करावी. रोजगाराची सोईही होऊन येईल. योजना केली आहे. राजश्री वासुदेवबावा पेडणेकर हे अन्न खात नाहींत. आण वाळून गेले आहेत. ह्मणोन सौभाग्यवती मातुश्री गोदे आकानें लिहिलें. व सौभाग्यवती मातुश्री भोबे आका मोठे चिंतेंत आहे ह्मणोन लिहिलें. तर वासुदेवबावा अन्न खात नाहींत ह्मणोन तुह्मांस कोणीं सांगितलें कळेना. अन्न न खावें ऐसें मशारनिल्हेवर संकट कोणतें येऊन पडलें होतें ? सर्व गोष्टी लटिक्या आहेत; ह्मणोन सांगावें. आंगानेंही ताजे आहेत. तुह्मांस कोणी लुच्यानें सांगितलें कळेना. उभयतां बंधूंमध्यें विक्षेपही नाहीं. घर आहे तेथें गोष्टी उभयतां बऱ्या वाईट बोलतच आहेत. परंतु विक्षेप आला नाहीं. सौभाग्यवती भोबे आकास सांगावें तुह्मीं चिंता न करावी. तुह्मीं आइकिल्या गोष्टी लटिक्या आहेत; ह्मणोन सांगावें. उभयतां बंधू एकविचारें असतां, लोक मनस्वी उपद्रंश करितात. त्यांस काय ह्मणावें. असो. आप्त यांस अनुक्रमें साष्टांग नमस्कार प्रविष्ट कीजे. तुह्मांकडील वरचेवर वर्तमान लिहून चिंता दूर करावी. बहूत काय लिहिणें. वतनाचा मजकूर सविस्तर लिहिला पाहिजे. कृपालोभ कीजे हे विनंती. सौभाग्यवती मातुश्री गोदे आका व सौभाग्यवती भोबे आका वडिलांचे सेवेसीं विज्ञापना. इकडील वडिलांच्या पत्रांत लिहिलें आहे, त्यावरून कळों येईल. तुह्मीं चिंता न करावी. सर्व खुशाल आहों. बहूत काय लिहिणे हें विज्ञापी.

ले० नं. ४१५ श्री. १/२

श्रियासह चिरंजीव राजश्री लक्ष्मण अनंत लाड याप्रती—साबाजी कृष्ण लाड अनेक आशीर्वाद उपर येथील क्षेम तागायत छ० ११ जिल्काद मुकाम भाईडकोर गांव जाणून आपणाकडील सुख

क्षेम लेखन करीत असिलें पाहिजे. [1]विशेष. साल गुदस्त माघ मासां किल्ला सदाशिवगड टिपूकडील फिरंगी इस्ताद या तर्फेनें शासन केला. श्रीमंतांकडील त्या समईं वेढा धारवाडास होता. व कांहीं जुजवी फौज गड मजकुराकडून दोन अडीच कोसांवर होती. परंतु राजकर्ण राजे सौंदे या मारफतीनें आधी चार महिने होते. तेव्हां त्या राजकर्णावरून सौंदेकार इस्ताद येकत्र होऊन किल्ला घेतला. तेव्हां श्रीमंत राजश्री परीशरामपंत भाऊ याणीं फिरंगी यांस पत्रें पाठविलीं कीं, श्रीमंतांची फौज नजीक असतां तुह्मीं किल्ला घेतला हें आयोग्य. ह्मणोन त्याउपर पुणें सरकारांतून फिरंगी यांस पत्रें आलीं कीं; किल्ला सदाशिवगडास श्रीमंतांकडील फौजेनें मोर्चेबंदी करून एक बुरूज व तट फोडोन किल्ला जेर केला असतां तुह्मां तर्फेनें किल्ला घेतला. हें स्नेहास ठीक नाहीं. किल्ला सोडून द्यावा ह्मणोन पत्रें येतात. त्याची जबाब करणें ती करीत आहेत. व यांकडील वकील राजश्री विठ्ठलराव गोरक्ष पुणेंस आहे. त्यास हिकडील सरकारांतून पत्रें या मतलबाविसीं गेलीं होतीं. त्यास त्याणीं जबाब लिहून पाठविली. त्यांत लिहिलें कीं; सध्यां दरबारीं भीड मातबर ह्मणायास श्रीमंत राजश्री माहादजी शिंदे यांकडील वकील राजश्री रामजी पाटील यांची. तेव्हां त्या विद्यमानें बोलणें अगर त्याविसींचा मनसबा केल्यास सिद्धीस पावेल. येणेंप्रमाणें लिहिणें आलेवरून राजश्री बहुगुण कामत यांसी एक हालपन्हां साहेब गोवर्णदोर यांणीं पुसिलें कीं, हा मनसबा कोणते मार्गें होईल? ह्मणोन त्यावरून त्यांणीं सांगितलें जे—राजश्री नरहर गणेश केरकर व साबाजी कृष्ण लाड यांचीं काजकामें या सरकारांत आहेत तीं सोंपून देऊन, त्यांचें समाधान करावें. ह्मणजे ते आपल्या बंधूंस लिहून ही मसलत सिद्धी करितील. आण याविसीं श्रीमंत राजश्री माहादजी सिंदे यांचींही पत्रें या सरकारीं पैलीं आलीं होतीं; व मागतींही आलीं आसेत. ह्मणोन वर्तमान आहे. तेव्हां या उभयतांस हुजूर बोलावून आणून याप्रमाणें करावें ह्मणजे वकील मशारनिल्हेनें लिहिलेचा फलादेश येईल. ऐसें बोलणें जाहालें वरून आह्मांस व राजश्री विठ्ठल नरहर केरकर यांस बोलावून न्हेवून सांगितलें कीं; आपलें सरकार काम ये जिनसीं आहे; तें तुह्मीं बंधूस लिहावें. त्याणीं आभिमानपूर्वक चित्तावर घेऊन किल्ला सदाशिवगड आहे तैसा इस्तादातर्फेनें असावा. आण गड मजकुराविसीं पुणें सरकारांतून तोतीस होऊं नये. उभयपक्षीं पूर्ववतप्रमाणें दोस्ती चालावी. याप्रमाणें श्रीमंत राजश्री माहादजी सिंदे यांसीं तुमचे बंधूंनीं बोलून किंवा मागणें करून याप्रमाणें जाबसाल उरकून घ्यावा. येणेंकरून तुमचें ऊर्जित व लौकिक भूषण हजरत इस्तादपर्यंत होईल. आपलींही पत्रें आलाइदा श्रीमंत राजश्री माधवराव शिंदे व तुमचे बंधू यांस जात आसेत. परंतु सर्व भिस्त तुह्मांवर जाणोन या राजकर्णाची मसलत योजिली असे. याप्रमाणें आह्मां उभयतांस सांगितलें. तेव्हां धन्याच्या वचनास आवश्यक करणेंच लागलें. श्रीमंत राजश्री नाना फडणिवीस यांस या सरकारांतून पत्र पाठविलें. त्याची तालीक सरकारथैलींत गेली असे. व आवल तागायत किल्लेची हकीकत घडलेचा तपसील आलाइदा तीन फोलींवर कलमें १८ लिहून व राजश्री जिवबादादाचे या पत्रीं जात आहेत. त्यास सदर्हू थैलींतील तालिकेंतील मजकूर सविस्तर तुह्मीं व राजश्री जिवबादादा ध्यानीं आणून उभयतांचे विचारें ज्या रीतीनें श्रीमंतांस समजणें समजावून कार्यसिद्धी होईल तो अर्थ करावा. राजश्री रामजी पाटील यांस पत्रें तुमच्या सरकारांतून या मतलबाविसीं यावीं कीं, श्रीमंत राजश्री नाना फडणिवीस

---

[1] पत्र नं. ८६.

यांस सांगोन किल्लेविसींची समजोत पाडोन फिरंगी यांस तोतीस न लागे ऐसें करावें. ह्मणोन परभारें पुणेंस पत्रें यावीं. व याप्रमाणें मशारनिल्हे रामजी पाटील यांस एक व श्रीमंत राजश्री नाना फडणिवीस यांस किल्लेविसीं फिरंगी यांस तोतीस न लावावें. येविसींचें लिहिणें तें वकील रामजी पाटील यांस लिहिलें आहे. तें निवेदन करतील ह्मणोन या अन्वयें एक एकूण दोन्ही पत्रें तेथील रिवाजीप्रमाणें हिकडील सरकारांतून थैल्या गेलेच्या जापा व त्यांत सदरहू उभयतांचे पुणेंस पाठवावे याचे कागद या काशिदाकडे देऊन रवाना करावे. यास आजुरा व इनाम या सरकारांतून यावें करून पाठविलें आसेत. सदरहूप्रमाणें जावसाल करून जलद रवाना करावे. सदर्हू पुणेंस पत्रें पाटीलबावांचीं कासीद मजकुराकडे पाठवाल तीं येथून रवाना करितील. तुह्मांस व राजश्री जिवबादादांस सरकारांतून आजम सकाडतार यांचीं पत्रें बिनथैली गेलीं आहेत. त्याच्या जापा लिहून तुह्मीं उभयतां थैलींतून रवाना कराव्या. उक्त न पाठवाव्या. सदरहू किल्लेचा मजकूर लिहिलेप्रमाणें घडावा हें उत्तम. समयीं तूर्त दिक्तीवर पडल्यास किल्ला मजकूर राजश्री पाटीलबावांच्या ताबीन होऊन येईल आसें तुह्मां उभयतांच्या विचारास येईल तर वकील मशारनिल्हे पाटील यांस तुमचे सरकारचे पत्रीं लिहिणें असावें. आह्मांस योजिली गोष्ट ही लिहिली आहे. पुणें सरकारांतून फिरंगी यास पत्रें येतात. त्यांत श्रीमंतांकडील फौज किल्लेस मोर्चेबंदी करून व तोफेनें तट व बुरूज पाडोन जेर केला असतां इस्तादा तर्फेनें किल्ला घेतला. ऐसें लिहिणें येत आहे. परंतु ती गोष्ट अवघी लटीक. त्यांची फौजेंतून किल्लेवर गोळी उडाली नाहीं. किंवा जमावही जवळ आला नाहीं. आण तोफाही बरोबर नाहींत. सरदार मात्र लटकेंच आपणाकडेस शब्द लागेल याजकरितां लिहितात किंवा सांगतात. समई ही गोष्ट राजश्री पाटीलबावा यांकडेस आली तर याविसींचा खातरजमा आपलेस असावा. श्रीमंत पाटेलबावा यांस येक हालपन्हां गोवर्णदोर याणीं पत्र लिहिलें. त्यांत पांचवें कलम लिहिलेची तालीक आलाइदी तुमचे पत्रीं हाल्लीं जात आहे. त्याप्रमाणें आन्ढई सरकारचीं पत्रें-राजश्री फडणिवीस व मशारनिल्हे रामजी पाटील यांसी येणार. त्यांत घालावा. तुह्मां उभयतांकडील वस्त्रें या दरबारीं येक हालपन्हां गोवर्णदोर व अजम सकाडतार व राजश्री लिंग इस्ताद यांस पाठवावीं. याजप्रमाणें त्रिवर्गासही सरकारचींही असावीं. कदाचित् सरकारचीं पाठविणेस मर्जीस न आल्यास तुह्मीं त्यांचे नांवें तुमचीं वस्त्रें खेरीज करून पाठवावीं. मोबदला येथून तुह्मांस व त्यांस पाठविणार. परंतु सन्मानाचें काम याकरितां सूचना लिहिली असे. खामखस कार्य करावयासच पाहिजे. व पुणेंस पत्रें लिहिणार त्याच्या व फिरंगी यांस पत्रें लिहिणार त्याच्या तालिका आह्मांस समजलेस खेरीज पाठवून द्याव्या. येणेंप्रमाणें राजश्री नरोबाबावा केरकार यांणीं आपले बंधूसही लिहिलें आहे. तुह्मांस कळावें यास्तव लिहिलें असे. खेरीज आ-( )जातो. त्याप्रमाणें सरकारचे कागद या सरकारांत मुख्यांस व प्रधानास येणार. त्यांत सदरीलप्रमाणें कलम लिहावें. तो मजकूर राजश्री जगोबादादा घोटगे यांचा त्याणींही तुह्मांस लिहिलेंच आहे. व याप्रमाणें राजश्री नरोबाबावा याणीं राजश्री जिवबादादा यांस लिहिलें आहे. व याविसीं राजश्री बहुगुण कामत याणीं आपणास पत्र लिहिलें तेंही पाठविलें आहे. व आह्मांकडील मजकूर कांहीं सरकारी नव्हे. तेव्हांही राजकर्णाचे अन्वयें आपला मजकूर सुधारोन घ्यावेयास समयीं पाहून करावेयास पाहिजे. याकरितां सदर्हू आल्या राजकर्णांत राजश्री कामत याणीं ही मसलत दिली आसे. परंतु प्रधान आंतरयामें माहेतीस मिळाला पाहिजे. याअर्थीं पांच रुपये खर्च करावे लागतात.

भलतेंच योजोन करीन ह्मटलेस कैसें होतें ? दरबारीक विचार तंव तुह्मांस ठाऊकच आहे. येणेंकरून आज तीन वर्षें गेलीं. हालीं समर्थी आहे. तेव्हां त्यास हातवटीस राखावा लागतो. तोही उपाव करितों. श्री सिद्धीस न्हेईल तें खरें. यत्नांस तंव चुकतां नये. व राजश्री कामत लुंग इस्ताद याणीं पेशर्जी आपणांस तुमच्या वडिलांनीं देवघेव आहे, येविसीं लिहिलें होतें. परंतु आपली जाब आली नसे. आण राजश्री माहादाजी शेणवी यांस जाऊन हिशेबखिशेब कांहीं असेल तो समजोन लिहून पाठविणें. ऐसें लिहिणें आपलें परभारें आलें ह्मणे. परंतु त्यांणीं आजवर कांहींच मनास आणिलें नाहीं. ह्मणोन सांगे. तर त्याची जाब काय ती त्यास लिहावी. व राजश्री लक्ष्मण धोंड तुह्मांबरावर आहे. आण आपली दयाही त्याजवर आहे. परंतु त्याचा बंधु राजश्री कृष्णाजी धोंड येथ आहेत. त्यांस आपल्या तापत्रयास कांहीं तिकडील उमेद होती. तोही प्रकार सध्यां काळीं दृष्टीस पडत नाहीं. तर तुह्मांस लिहून तापत्रय परिहार होईल तो अर्थ करावा. ह्मणोन तर तें ध्यानीं आणून त्याचा जाबसाल करून परिहार होई तें आपण करणार. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद. श्रीमंत राजश्री पाटीलबावा यांस येथील पत्रें गेलीं त्याची तालीक पाठविली असे. आशीर्वाद.

हेच पत्रीं चिरंजीव वेंकाजी सदाशिव व देवजी मुकुंद यांस आशीर्वाद उपर लिहिलें परिसोन आपणाकडील वर्तमान लिहीत असावें. व या राजकर्णाच्या आंदेशावरून व कांहीं खर्च करोन कार्यभाग आपला उरकोन घ्यावयास पाहिजे. तेव्हां हलीं राजकर्णाचा मजकूर चिरंजीवास लिहिला तो ध्यानीं घेऊन हाताखालीं पडे तो अर्थ करावा. बाहेर घालितां नये. येणेंकरून ऊर्जित होई ऐसें आहे. बहूत काय लिहिणें हे आशीर्वाद.

लें० नं. ४१६ श्री. तारीख ३० डिसेंबर सन १७९०.

दिगर तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें. त्यावरून व राजश्री जिवाजी बल्लाळ व लक्ष्मण अनंत याणीं सांगितलेवरून सविस्तर कळों आलें. सौंवदे संस्थानांतीळ किल्ला सदाशिवगड पहिलेपासोन आह्मांकडे आहे. दरम्यान हैदरआलीखान याणीं घेतला होता. त्यास हालीं कर्नाटकप्रांतीं पुण्याहून सरकारच्या फौजा गेल्या त्यावरून आह्मीं टिपूकडील अमलदाराकडून किल्ला खालीं करून घेऊन आपले लोक असतां सरकारचे फौजेंतील पागे बाबुराव साळुंखे व सखो रामचंद्र इकडे या प्रांतीं आले. त्याणीं सरकारांत गैर साखा लिहिल्यावरून पुण्याहून सरकारचीं पत्रें येथें आलीं आहेत. त्यास येविसीं आपल्याकडून राजश्री बाळाजीपंत नाना यांसी व रामजी पाटील जाधव यांसी पत्रें बंदोबस्त होऊन यावा. ह्मणोन लिहिलें. त्यास आपण लिहिल्याप्रमाणें येथून सदाशिवगडाविसीं राजश्री बाळाजीपंत नाना व रामजी पाटील यांसी पत्रें लिहून पाठविलीं आहेत. हीं पुण्यास आपले वकिलाकडे पाठवून द्यावीं. ह्मणजे सरकारांतून बंदोबस्त होऊन येईल. रवाना छ० २३ रबिलाखर मु॥ देवासंडा प्रांत मेवाड सुरुसन इसन्ने तिसेन.

१. जिवबादादा व लखबादादा यांचे सांगण्यावरून हें पत्र शिंद्यांनीं गोव्याचे गवरनरास लिहिलें होतें. सदाशिवगड ऊर्फ कारवारचा किल्ला आपलेजवळ रहावा ह्मणून गोव्याचे फिरंग्यांनीं जिवबादादा व लखबादादा यांचे मार्फत पेशव्यांशीं बोलणें चालविलें होतें. नंबर ८६ चें दुसरें पत्र पहा.

लें० नं. ४१७ पै॥ फाल्गुन वद्य १४ दशी. श्रीभगवंतीप्री॰. ता. १४ जानुआरी सन १७९१.

तीं॥ राजश्री रामबादादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें वेंकोबानें चरणावर मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती येथील कुशळ तागायत पौष शु॥ १० मी मुकाम लष्कर नजीक आजमेर वीस कोश जाणोन वडिलांचे आशीर्वादें सर्व सुखरूप असों. विशेष. वडिलांचा निरोप घेऊन आलों. ते लष्करांत पोहोंचून आज चार रोज जाहले. वाटेस पावणेतीन महिने लागले. आण सुरक्षीत येऊन दाखल जाहलों. श्रीनें प्रसाद दिलेप्रमाणें सुखरूप वाटेनें आणिलें. पुढेंही श्रीच सर्वप्रकारें सांभाळ करणार समर्थ आहे. तूर्त तोफखानेंत आलों. सडी स्वारी येथून साठ सत्तर कोशांवर आहे. दोनचार रोजीं येथोन निघोन तीं॥ राजश्री लखोबादादा व राजश्री जिवबादादा-खडे फोजेंत आहेत; तेथें जाणार आहों. कळावें. आह्मांकडील हरएकविसीं चिंता न करावी. ह्मणोन मातुश्री बाईस वगैरे बहिणी यांस सांगावें. घरीं असतां शरीरीं तापाची कसर येत होती. घरींहून निघालों तागायेत तापाची कसर अगर सर्दी जाहाली नाहीं. कोंकणची हवा आह्मांस मानली नाहीं. आह्मांविसीं मातुश्री चिंता करतील तर सांगावें. प्रवासी आहों ह्मणाल तर घरापेक्षीं येथें श्रीचे कृपेकरून सर्व अनकूल आहे. तेव्हां प्रवास कशाचा? हरएक विसीं चिंता घरीं सर्वांनीं न करावी.—श्रीमंत राजश्री तात्या पागनीस यांची व आमचे आप्त यांची सर्वांची ममता आह्मांठाई उत्तम आहे. सुचना जाणावी. चिरंजीव राजश्री फटबानें आह्मांस केरी वस्त दिली ती आह्मीं पागनिसास दिली. ह्मणोन त्यांस सांगावें. इकडील वर्तमान तर मारवाडवाला राजाचें पारपत्य यथास्थित जाहलें. तेव्हां हालीं सलूख ठरला. पांसष्ट लक्ष रुपये खंडणी ठरले. व अजमेर द्यावयाची केली आहे. तसाच जैपूरवालेचा सलूख ठरण्यांत आला. सध्या फौजा तेथून माघारे महिनेंत येतील. श्रीनें सलूख ठरविला हें उत्तम केलें. दादा[1] व जिवबादादा यांची काळजी[2] फार आह्मांस होती. ह्या उभयतांनीं चांगली तरवार मारून रांगडे फजीत केले[3]. त्यामुळें श्रीमंत महाराजांची कृपा पूर्ण उभयतांवर आहे. ती कोठवर लिहावी? पुढें लाभकाळ कसा होतो तो पाहावें. कृपा आहे; तेअर्थीं लाभकाळही होईल. पागनिसांवरही श्रीमंतांची मर्जी चांगली आहे. हें वर्तमान तुह्मांस कळावें. यास्तव विस्तारें लिहिलें आहे. (पुढील मजकूर घरगुती असल्यामुळें घेतला नाहीं.)

लें० नं. ४१८ श्री. तारीख १५ नोव्हेंबर सन १७९१.

तीर्थस्वरूप राजश्री दादा व रामबादादा वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें देवजी मुकुंद चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती तागायत छ० १८ रबिलावल मुकाम चितोड प्रांत मेवाड जाणोन वडिलांचे आशिर्वादें वर्तमान यथास्थित असों. विशेष. अलीकडे वर्तमान कळत नव्हतें. त्यास शामा कासीद व गंगाराम नि॥ केरकर यांकडेस पत्रें आलीं तीं प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळला. फिरंगी यार्णी सदाशिवगड घेतला. त्यास पुणेंहून आपल्या फौजा गेल्या असतां तुह्मीं घेतला. तो खालीं करून देणें ह्मणोन ताकीद होत आसती. त्याजवरून वकिलानें इकडील श्रीमंतांचीं पत्रें आल्यास महकूब होईल ह्मणोन व फिरंगी पत्रें श्रीमंतांस आलीं. व

---

१. लखबादादा. २. लढाईचें काम, तेव्हां त्यांचे अस्तित्वाविषयींची काळजी होतीच. ३. या पाटणा व मेरटच्या लढाया होत.

दादाचे नांवें प्रधानाचें पत्र होतें तें प्रावलें. सरकारचीं पत्रें सरकारांत प्रविष्ट केलीं. वाचून पाहून पत्रें आह्मांकडे व राजश्री जिवबादादा केरकर यांचे पुत्र नारायणरावजी यांजकडेस दिलीं. आण आज्ञा जाहाली कीं; यांतील मजकूर मनन करून मसुदा करून समजावून द्यावा. त्याप्रों पत्रें पुण्यास लेहून देऊं. ऐशी आज्ञा जाहाली असे. व आह्मीं केलें. परंतु दरकूच लष्कर चितोडाकडेस आलें. भाद्रपदअखेरीस पत्रें गंगारामाकडील पोहोंचलीं. त्या रोजापासोन दरकुच कुच येऊन चितोडास मोर्चे लाविले आहेत. नेहमीं श्रीमंत मोर्चांत प्रातःकाळपासोन अस्तमानपर्यंत येऊन असतात. व तोफखान्यासुद्धां मोर्चांत आहों. आह्मांकडून लष्कर दोन कोश मागां आहे. तसाच राजश्री नारायणराव आह्मांकडून किल्ल्याचे उजवे बाजूचे मोर्चांत दोनअडीच कोश आहे. या गडबडीमुळें कागद लेहून घेणेस विलंब लागला आहे. तशांत ह्या काशिदाबरोबर पत्रें पाठविणेस मेळ पडला तर उत्तम. नाहीं तर पत्रें होतांच दुसरा काशीद आजुरदार करून पाठवितों. हींच पत्रें मोर्चांत लिहिलीं आहेत. वतनी वगैरे सविस्तर मजकूर ती॥ वेंकोबादादा याणीं लिहिला आहे. येथून पत्रें होतांच काशीद पाठवून देऊं हे विज्ञापी.

लें० नं. ४१९ पै॥ छ० ५ जिलकाद सन सलास. श्री. तारीख १६ एप्रिल सन १७९२.

तीर्थस्वरूप राजश्री दादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्य लक्ष्मण अनंत चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती येथील कुशल तागायत चैत्र वद्य १० मी मुकाम कानाड जाणोन वडिलांचे आशीर्वादें सुखरूप असों. विशेष. तुमचे शरीरीं समाधान फार नव्हतें. श्रीनें कृपा करून आराम जाहलेवरून फार आनंद जाहला. दोनतीन पत्रें तुमचीं आलीं. तीं पावोन सविस्तर लिहिलें कळों आलें. श्रीमंत देशीं गेले आहेत. बरोबर चिरंजीव राजश्री देवबा आहेत. त्याणीं तुह्मांकडील पत्रें आलीं तीं वाचून पाहोन दोन तीन वेळां मग इकडेस पाठवून दिलीं. त्यांचेही ध्यानीं तुह्मीं लिहिला मजकूर आला आहे. तिकडे जशी मसलत पडेल त्याप्रों देवबा सन्निध आहेतच. तुह्मीं महालसंबंधीं वेळोवेळ न लिहावें. जें लिहिणें तें कार्याकारण खुद्द वतनी लिहिल्यास चिंता नाहीं. सुचना लिहिली आहे. वरकड आपल्या खुद्द जाबसालाविसींचीं पत्रें दोहींकडे पत्रें जाऊन आज पांच महिने होत आले. श्री करील तर साध्य होईल. सुचना जाणावी. तपशीलवार पेशजी चिरंजीव वेंकोबानें तुह्मांस लिहिलाच होता. त्याप्रमाणें केलें आहे. तूर्त आह्मीं कानोडच्या किल्लेस मोर्चे लाविल आहेत. इस्माल बेग आंत आहे. ईश्वर करील तर आठांदाहा रोजीं तो धरूं. किल्लाही आठांपनरा रोजीं खालीं होईल. ऐसें आहे. किल्लेचे कामामुळें आह्मांस कांहींच सुचत नाहीं. किल्ला सुटेल पण इस्माल बेग हाताखालीं पडेल तेव्हांच चित्त स्वस्थ होईल. सार्वभौम यांजकडून किताब खिलत व पत्र राजास पाठविलें आहे. तें[२] देवबा तुह्मांकडे पाठवून देतील. ते नेऊन मुख्यांस द्यावे. दिकत कोणे गोष्टीविसीं न घ्यावी. दिलें ह्मणून बद्धकपण नाहीं. पसंत न पडले तर घरांत ठेवितील. पसंत पडले तर लौकिकांत आणतील. परंतु नेऊन द्यावें. श्री करील तर उपयोगी पडेल. तुह्मीं लिंगिस्ताद यांजकडे पुसले ह्मणोन तहकूब न कीजे. लिंगिस्ताद देणेंविसीं सल्ला देणार नाहीं. दिले तर तुह्मावर मेहरवानगी होईल. यास्तव मनस्वी सांगतील त्याजवर न जावें. किताब व वस्त्रें पाठविलीं

१. याजबद्दल ७९ व ८६ नंबरचीं दुसरीं पत्रें आहेत तीं पहा. २. हा किताब गोव्याचे गवरनर यांस लखबादादांनीं दिल्लीचे बादशहाकडून देवविला होता.

आहेत. कळावें. यंदां देवबा घरीं गेले तर ते तुह्मांस वतनी वगैरे सविस्तर सांगतील. तुह्मीं जें लिहिणें तें कार्याकारण लिहावें. भलतेंच न लिहावें. सुचना लिहिली आहे. राज्य खोटें आहे. यास्तव सुचना लिहिली आहे. किताब पाठविली त्याजबरोबर सार्वभौमाचें पत्र पारशी आहे. तें पारसी अक्षर समजणार तेथें कोणी नसेल जाणोन इंग्रजी अक्षरानें नकल करून त्याच लखोटेंत आहे. खुद्दांचे हातीं लखोटा जाईल तेव्हां तोच वाचून पाहील. किताबींत बहुमान मोठे सरदारीचा मातबरीचा आहे. त्याचा तपशील आलाईदा आहे. त्याजवरून कळेल. श्रीमंत देशीं गेले. इस्माल बेग धरून आणून कैद केला. ईश्वरें मोठें यश दिल्हें. कोनाडचा किल्ला खालीं जाहला नाहीं. त्याणीं सलुखावर घातलें आहे. आठां पनरा रोजीं किल्ला खालीं होई. कळावें हे विज्ञापी. वेंकोबास तुह्मीं लखोटा पाठविला तो आतांच पावला. लिहिलें कळों आलें. जें लिहिणें तें देवबास लिहिलें आहे. हे विज्ञापी.

ले० नं. ४२० श्री. सन १७९७.

श्रीमंत राजश्री दादा वडिलांचे सेवेसीं.

पो पांडुरंग कृष्ण पालेकार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी आज बुधवार प्रातःकाळ मुकाम श्रीमंगेश आपले कृपेकरून यथास्थित जाणून स्वकीयें कुशल लिहीत असावें विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लष्करांतील व हिंदुस्थानांतील मजकूर लि॥ आज्ञा. ऐसियास चैत्र शु॥ ७ मीस आह्मी लष्करांतून निघालों. तोंपर्यंत वर्तमान राजश्री बक्षीबावा नगरचे किल्ल्यांत दाखल जाहले. उभयतां मोदी व श्रीमंत राजश्री तात्या व धोंडिबादादा सर्व नगरांत दाखल जाहले. मार्गीं राजश्री बाळाभाऊ दुखणेंनें बहुत हैराण होते. दुर्वार्ताही आल्या. परंतु श्रीकृपेकरून स्वस्तिक्षेम आहेत. नंतर संवत्सरप्रतिपदेस नाना फडणीस सुटून पुणेंस जावे. व लष्करचे मोठे मोठे सरदार स्वकीय गृहस्थ चार आहेत ते व भाऊ फडणीस वगैरे देशस्थ मंडळी फरासखाने आदीकरून व मुजफरखान व एक दोन आणीक मुसलमान आबुदर बेग आदीकरून व आपाजीराव कदम, येशवंतरावजी होळकार, गोंदाजी सिंदे, बापू याबुक, महिपतराव निंबाळकार वगैरे आदीकरून मराठे आदीकरून सत्रा येकूण व मुकेलसाहेब ऐसे कैद करून बेड्या घालून नगरांत पाठवावे. येणेंप्रो मसलतीचा घांट पडला. तो सर्वांस समजणेंत आला. तेव्हां फौजेनें एकोपा करून धरणेंस वाडेंत येऊन बसले. तीन हजार मुसलमान मंडळी व चार हजार मराठे येणेंप्रमाणें तोंड पेटवून बसले. चार रोज बसले. नंतर मुकेलसाहेब दरम्यान पडून बत्तीस लक्ष रुपये रोकडे देऊन पंचवीस लक्ष पंधरा रोजीं द्यावे. बाकी राहिले ते महिनेचे मुदतीस दरोबस्त फडशा करावा. येणेंप्रमाणें तह ठरला. येणें उगाव केला. पुढें नाना सोडूं नये. येणेंप्रमाणें मुकेल फौजेस जामीन राहिला. बक्षी व तात्या वगैरे सोडून आणावे. येणेंप्रमाणें तह ठरला. येणेंविसींचें बोलणें बोलावयास कारकून तात्याकडे नगरास गेला. पुढें लष्करांत कोणांस चौकी कैद करूं नये. येणेंप्रमाणें तह ठरला. चिटणीस[1] व माधवराव, सरजेराव, व गाढवे वगैरे नवे मुत्सद्दी यांस कैद करावे. यांस वाड्यांत ठेवून. याप्रमाणें बोलण्यांत ठराव आहे. आह्मी निघालों. मार्गें गाढव्यांस कैद केल्याचें वर्तमान जेजुरीस ऐकिलें. सत्य मिथ्या समजेना. जासूद आमचा अद्याप आला नाहीं. हिंदुस्थानांतील मजकूर अंबाजीबावांस पत्रें उभयतांस कैद करण्याविसीं गेलीं होतीं. त्याचे अगोदर बातमी दादांस[2]

१. आबा चिटणीस. २. लखबादादा.

समजली. राजश्री दादा व बापू फौजसुद्धां निघोन गेले. दादा आगरेंत आहेत. बापू अंतरवेदींत उतरले. पुढें ब्रह्मावर्तास जाणार. ऐसी खचित बातमी सावकारी लिहिली आली. अंबाजीबावाही आपलेच मत्तांत आहे. मागाहून बाळोजी इंगळे व गुलाबराव कदम यांस पत्रें गेलीं कीं; सुभेचें काजकाम तुह्मीं करणें. अंबाजीबावांस कैद करणें. ह्मणून पत्रें गेलीं. त्यांचें कांहीं समजलें नाहीं. जेपुरावर वामनराव खंडेराव यांचे चिरंजीव आहेत. त्यांस जैपूरवालेनीं वेढिलें आहे. त्याची अवस्था काय जाहली असेल ती असो. दादा व बापू स्वस्थ आहेत. तिकडील कांहीं काळजी नसावी. श्रीकृपेनें सर्वच जीव लावून तिकडे बंदोबस्त होत आहे. एका चौं रोजां आपलेसही पत्रें येतील. आमचाही जासूद येईल. कचें वर्तमान सेवेशीं निवेदिलें जाईल. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

लें० नं. ४२१ श्रीशंकर. सन १८०१:

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन आपलेकडील कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. पत्र आलें पावोन लिहिला मजकूर कळला. इस्लामपूरचें वर्तमान फळफळीत असेल. थेटचें पत्र आलेवर समजेल. ऐसें लिहिलें. त्यास राजश्री बासबा नाडकर्णी कुडाळकर याचा चिरंजीव आजमेरीस होता. त्याचें पत्र त्याच्या जासुदाबरोबर आलें. त्या पत्रांतील वर्तमान मशारनिल्हेनें सांगितलें जे. लढाई होऊन राजश्री दादास यश आलें. पिरू ठार जाहला. दादाकडील दतयावाला[1] पडला. दादास छऱ्याची जखम हातास हलकी लागली. शिपाई लोक दोहींकडील बहूत कामीं आले. अजमेर ठाणें वगैरे सरंजामाची किलेच्या जागां मारवाडवालेस दिली. याप्रमाणें वर्तमान तहकीक आहे. दुसरा मजकूर. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब नासकाजवळ कोंकणांतून आले. तीन हजार सुमारें जमेत आहे. राजश्री जिवाजी यशवंतही ते प्रांतीं दाहा हजारानशीं जमले. अमृतराव व जिवाजी यशवंत या दोघांकडील वर्तमान आमचे माणूस समक्ष पाहून आले. सर्जेराव दर मजल श्रीमंत राजश्री दौलतरावबावाकडे जावयास गेले. हें वर्तमान बागणी, इस्लामपूर व परांडा येथून लिहून आलें; तेव्हां सत्यच असेल. दौलतरावबावा बऱ्हाणपुराहून हिंदुस्थानांत गेले. हें समक्ष माणूस अजमेरचा आला तो हरदेहांडेस पावलेचें सांगे व कितेकांचें लिहून आलें. एकून एकंदर वर्तमान लिहिलें आहे. हें सत्यसें भासतें. याशिवाय बाजारी वर्तमान लिहून आलें जे. आगरेचा किल्ला दादांनीं घेतला. पिरूचीं माणसें धरून तसदी लाविली तेव्हां दौलतराव यास आणोन देतों ऐसा करार केला. सर्जेराव जातां मार्गीं जिवाजी यशवंत व अमृतराव याणीं लुटला तैसाच यशवंतराव होळकर याणीं पेंढारी यांस लुटलें. कोणी ह्मणतात यशवंतराव होळकार याणीं लढाई घेऊन जें केलें तें यशवंतरायानें अवघें केलें. हें वर्तमान अवघें बाजारी आहे. वरकड वर लिहिलें तें तहकीक आहे. कळावें. फुकीरशेट आपणाकडे आलेवर पटा करून घ्यावा. उद्यां आपणाकडे येऊन समजावील. केरीच्या ठिकाणाचें खातें किंवा तिजणूक काय पडती तें लिहिणेंविसीं लिहिलें. त्यास ऐन कुंबळें नारळ तीनशें ब्याण्णव व भात दाहा कुडव व

१. दतियाचा राजा बायांचे लढाईचे वेळीं कामीं आला. २. यशवंतराव होळकर व हेसिंग वगैरे दौलतराव शिंद्यांचे सरदार यांची मोठी लढाई झाली. तींत होळकरानें त्यांचा पराभव केला. पहा ग्रांड डफची बखर पृ. ३७२. यावरून हें वर्तमान खरें आहे—बाजारी नव्हे—असें उघड दिसतें.

फणसाबदल होन एक याप्रमाणें आहे. खतें किंवा तिजणूक काय पडती; तें राजश्री काशिबा केरकर याकडून लिहून आणवून तपशीलवार उद्यां परवां पाठवितों. ऱ्वरकड विशेष लिहावें असें नाहीं. साखवळकराचे घरीं माणूस कोणाचा आला ह्मणोन आपणांस कळलें. त्यास तो माणूस पुणेंहून कोणाचा गोपाळ पंडित याजकडे कामकाजास आला होता. तो साखवळकराचे घरीं आला होता. त्याकडे वर्तमान विशेष नाहीं. बहूत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

लें० नं. ४२२ श्री. सन १८०१.

सेवेस साष्टांग नमस्कार विनंती शनिवार दोन प्रहर जाणून पत्र पा। पावोन लिहिला मजकूर विदीत जाहला. पुणेंकडील वर्तमान नूतन नाहीं. ( ) जासूद आला. नाना फडणीस यास मूल पोसणा करावा ऐसें सिंद्याचें मानस होऊन दरबारीं आले. आण फडणीस यांनिसबत कारभार ( ) नारो चक्रदेव वगैरे यांस कैद करून आपण लष्करांत गेले. ह्मणून लिहिलें आलें. ह्यानीं पोषणा केला असें जबानी वर्तमान तात्या-( ) पाठविलें. व नारायणरावासही कैद केला. तोफेच्या तोंडीं मराठे तिघे दिले. एक सिंदा व एक फाळका ऐसें सांगतो. इकडील वर्तमान तर साहेब कोर्नेल यांस काल माहालाची कोमेदांता जाहली. व कुलीं मुखत्यार ह्मणून पाड तरी जाहली. राजश्री कामत यांस येतांच भेटलों. मर्जी चांगली आहे. मुख्याचे व आमचे चित्तीं सर्व आदमिस्रादोरकी तुह्मा स्वाधीन करून माहालचा एकत्यार द्यावा. ऐसें आहे ह्मणून बोलिले. आण आजवर माहालची बेरीज व खर्च समजावून द्यावयास धरले आहेत. व कौल सादर करूंस कुलीरयतास आदमिस्रादोरी आपणास वसलात करावी. आण देसाई नाडकर्णी व कोमेदांत यांची जमा अमूक वसूल जाहलेची घ्यावी. आण आज्ञेप्रमाणें वारावार करावी. ह्मणजे मागांपुढां लढा राहणार नाहीं. याकरितां या तरेनें आणवा केला आहे. सेवेसीं विदीत व्हावें याकरितां लिहिलें असे. आजम एक दोन रोजांत हे कागत सोंपतांच तिकडे येणार.

लें० नं. ४२२ (अ.) श्रीशंकर. सन १८०३.

साष्टांग नमस्कार विनंती उपर आज सोमवार जाणोन क्षेम असों. विशेष. सांप्रत आपणाकडून पत्र येऊन बरवेपणाचें वर्तमान कळत नाहीं. त्यास सविस्तर लिहावें. यानंतर वडिलांचीं पत्रें मुकाम रावकी नजीक बऱ्हाणपूरचीं आलीं दिडा महिनेचीं होतीं. यशवंतरावभाऊ पांच हजार फौजेनशीं जावदेस आहेत. त्यांस येणेंविसीं सरकारचीं पत्रें गेलीं आहेत. बापू नागपुरास आहेत. इंग्रज याचा सलूख जाहाला. हिंदुस्थानांत ( ) लाखाचा मुलूख ठेवून किकोटीच्या अजमासें देणें ठरला. जालने वगैरे मोगलांकडीलही देणें ठरलें. अशेर व पावागड व दिल्ली व आग्रे सुटून आपला अमल व्हावा. तर कृष्णगड वगैरे हिंदुस्थानांतील आहे. तेथें विंग्रजाचा अमल बसलेवर ठाणीं सुटून येतील. याप्रमाणें ठरावून इंग्रजांकडील वकील व पलटणें माघारे आलीं. सिंदे हिंदुस्थानांत जातात. याप्रमाणें वर्तमान लिहिलें होतें. कुणबावणीच्या शोधास माणसें पाठविलीं तीं माघारे आलीं. त्यास नारगेबरोबर माणसें देऊन पाठवावीं. आपलीं पत्रें द्यावीं ह्मणजे येतील. कळावें. बहूत काय लिहावें हे विनंती.

---

१. या वेळीं इंग्रज व दौलतराव शिंदे यांच्या लढाया चालित होत्या. त्या प्रसंगीं बापूस बोलावणें आलें होतें.

लें० नं. ४२३ श्री. ४ सन १७९३.

इकडील वर्तमान तर—श्रीमंत[1] महाराजांनीं हिंदुस्थानचे सुभेचें[2] काम राजश्री जिवबादादा यांस सांगितलें. राजश्री गोपाळराव भाऊ यांस सांगितलें तुह्मीं उज्जेनीस येऊन बसा ( ) सिके कट्यार वगैरे सर्व यांचे हवालीं करून देऊन तुह्मीं उज्जनीस राहावें ह्मणून त्यांसही पत्रें परभारें गेलीं. त्यांजकडे फौज व कंपू होता तोही इकडेस येत आहे. चिरंजीव राजश्री राघोबा भाऊ बरोबर होता तोही इकडेस येतो. आतां सर्व काम दादा[3] यांजकडे पडलें आहे. श्रीनें मागां सांगितलें मामलत होई सारखी करून ( ) तीं त्यास हल्लींचा प्रसंग चांगला आहे. सिमगावैशाखपर्यंत मारवाडांत दादा राहातील. उपरांतिक श्रीमथुरेकडे[4] जातील. यास्तव श्रीकडे पुसावें. पुढें मृगसालास मामलत मिळऊन देती. आण च्यार रुपये प्रासही होईसारिखें करून देती. ह्मणून प्रसाद घेऊन लिहावें. जर प्रास होईसारिखें करती ह्मणोन प्रसाद होईल; तर मामलत करूं. इजरेनें करावी लागती. तेव्हां तोटा आला तर भरावा कोठून? सरकारी रु॥ सुटणार नाहीं. यास्तव पुर्तेपणीं पुसोन लिहावें. दादाकडे मामलतीचे आह्मी बोलूं तर करा ह्मणतील. आण देतील. परंतु लाभ अगर तोटा हें श्री जाणें. यास्तव श्रीकडे पुसोन लिहावें. सावकारी रुपये कर्ज काढून रसद द्यावी लागेल, यास्तव नफा करून देती ह्मणेल तर चांगली मामलत पाहून करूं. यास्तव लि॥ आहे. पैली मामलत करावी तर गोपाळभाऊ याचा कारभार होता तेव्हां आह्मीं करावी हें ठीक नाहीं. जाणोन केली नाहीं. तें वर्तमान चिरंजीव मांगबास सर्व वाकब आहे. आतां श्रीनें दादाच धणी हिंदुस्थानचे केले आहेत. श्रीमंताची मर्जीही दादा यांवर प्रसन्न आहे. कळावें. कांहीं खर्चास पाठवावें; त्रिमीं मांगबानें लिहिलें. त्यास तूर्त येथें हुंडीचा भाव शेंकडा वीस रुपये जाहली आहे. भाव फार चढला आहे. यास्तव तूर्त पाठवायाचें ठीक नव्हतें. परंतु कोंकणांत भाव चांगला आहे. ऐसें लिहिलें; त्यांवरून हाल्लीं हुंडी पांचशें रुपयांची राजश्री तिलाकचंद याज ( ) घेतली. राजश्री रामनारायण शाळिग्राम या ( ) पुणेस शहरांत सावकार राहत आहे. हुंडी चलणीची[5] हुंडी आहे. कळावें. राजश्री मादबादादा पेडणेकर यांजकडे दिल्ही आहे. ते प्रविष्ट करतील. वरकड वर्तमान ते तुह्मांस सांगतां कळों येईल. आरोबेवर ते जाणार आहेत. मनर्सुरखां[6] याची दिवाणगिरी दिल्ही आहे. खान मजकूर मृत्यू पावला.

ग्वाल्हेरीहून आलेले लेख.

लें० नं. ४२४ श्री.

कैफियेत रामचंद्र नारायण व विठ्ठल नारायण उभयतां बंधु यांजला श्रीमंत कैलासवासी जयापा महाराज सिंदे यांणीं पागेंत भरती करून स्वारीसमागमें हिंदुस्थानांत आणिलें. व मारवाडप्रांतीं

---

१. महादजी शिंदे यांनीं. २. सुभा ह्मणजे कलेक्टर. पहिल्यानें हें हिंदुस्थानचे सुभ्याचें काम गोपाळरावभाऊ चिटणीस यांजकडे होतें. त्यांनीं नाना फडणिसांबरोबर मसलती केल्या ह्मणून त्यांस त्या कामावरून दूर करून तें सेनापती जिवबादादा यांसच सांगितलें. नानांबरोबर मसलती केल्यावरून गोपाळराव यांस भेलसे येथें कैदेंत ठेविलें होतें, असें क्यामटनसाहेबही ह्मणतात. कॅमटनचें पुस्तक पृ. ७७ व नातूकृत महादजींचें चरित्र पृ. २५९ पहा. ३. जिवबादादा यांजकडेस. ४. हें पत्र लखबादादा लाड यांचे येथील आहे. त्यांचे संबंधानें हें कोणीं तरी लिहिलें असावें असें दिसतें. ५. हिंदुस्थानचे सुभ्याचे कामांत फायदा होता. ६. मन्यारसिंग हा बादशाहींतील उमराव होता. ७. हे बावन पागे होत. यांचें उपनांव पनाळकर. हे जातीचे सारस्वत ब्राह्मण होते.

माहाराजे साहेब मंमदुह पुष्कर मुकामीं कामास आले. तेव्हां उभयतां पणजे हामराहा देशीं वापस जाऊन कांहीं अवकाशानें श्रीमंत कैलासवासी अवल जनकोजी माहाराजचे हामरिकाब हिंदुस्थानांत भाऊसाहेब पेशवे यांणीं मोहीम केली. त्यांत मोजूद राहून त्याच भाऊ गर्दीच्या लढाईत जनकोजी महाराज कामास आलेमुळें उभयतां पणजे कैलासवासी माधोराव महाराजाचे हामरीकाब देशीं जाऊन कांहीं आरसेबाद हिंदुस्थानांत वापस येतांना श्रीमंत कैलासवासी जनकोजी माहाराजांचे कुटुंबाचे सांगणेवरून राघो राम पागे माधव माहाराज यांजला हिंदुस्थानांत न जावें बद्दल अडथळा करणेकरितां फौजेसह उज्जन मुकामीं आले. तेथें दत्ताचे आखाड्यावर लढाई होऊन त्यांत माधो माहाराज यांजला दंगा करावा. या संधींत आमचे पणजे रामचंद्र नारायण यांणीं राघो राम पागे याजला मारून त्याचे फौजेस शिकस्त दिल्ही. त्यांवरून सरकारानीं बनजर खांविंदी राघो राम पागे याजकडेस हाजारबाराशें घोड्यांचें जें पंतक होतें; तें आमचे पणजे यांचे नांवें करून देऊन त्यांचे बंधु विठ्ठल नारायण यांजकडे पागनिशीचें काम सांगितलें. त्या बाद विठ्ठल नारायण यांचा देहांत जाल्यावर ती नेमणुक बंद होऊन पुढें रामचंद्र नारायणही देवलोक जाहाले. तेव्हां बजाय त्याचे चिरंजीव बाबाजी रामचंद्र पागे यांचे नांवें पणज्याकडे जो बेडा होता तो कायम झाला.

ले० नं. ४२५ श्री.

कैफियत आमचे पणजे नीळकंठ काशी आरस हे कोंकणांतून मौजे डिगस येथून पुणें मुकामीं आले. तेव्हांपासून वानवडी मुकामीं श्रीमंत कैलासवासी माहादजी माहाराज देशीं कोल्हापुरचे स्वारीस गेले. त सलतनत पागा स्वार शिबंदीसुद्धां सरदारी करून मोहिमीनें सरकारचे हमराह राहून पुढें जामगांव मुकामीं स्वारी आली. तेव्हां वृद्धापकाळामुळें चिरंजीव माधवराव नीळकंठ यांस आमचेबरोबर ठेवून तुह्मीं घरीं जावें. तेव्हांपासून आजे माधवराव हे सरकारचाकरींत राहून मारवाड वगैरे अंतरवेद सर करून ग्वाल्हेरपासून दिली, आगरा वगैरे सुभायत लखबादादाकडेस होती. त्यांत माधवराव यांचे मामा बाळाजी साबाजी होते. मामाजवळ राहून लढाईत वगैरे मोहिमेंत राहून श्रीमंत कैलासवासी दवलतराव महाराज यांणीं ग्वाल्हेरीस लष्करची छावणी केली. तेव्हां आमचे आजे माधवराव नीळकंठ यांस पत्र पाठवून बोलाविलें. व बंदोबस्त करून दिल्हा. त्याची पत्राची नकल कैफियतीचे व तेनात जाबताब॥ मुशाहिरा मिळत राहिल्याची नकल व करार यादीची नकल जुकले ३ मुलाहिजपात्र व सेवेसीं इरसाल करून तपशील लिहिण्यांत येतो तो असा कीं, पूर्वी तेनात जाबत्याबद्दल सालिना रुपये १०००० असोन पुढें नेमणुक ३०० इकरार यादीप्रमाणें मुकार जाहले ते मिळत राहिले. नंतर रामराव बाबासाहेब यांचे कारकीर्दींत सरवानची आठणी जाहली त्या वेळेस रुपये १५० राहून पागनिसीकडे नांव होतें. बाद रावराजे दिनकरराव रघुनाथ यांणीं बेहेडा छांटाछाटी करून पट मुकार केले त्यांत वीस रुपये शेंकड्याप्रमाणें कमी सरवांचेच जाहले. त्यांत आमचेही कमी होऊन रुपये १२० राहिले. भाऊ मामासाहेब जाधव यांचे हयादींत निरवाह कुटुंबाचा होत नसल्यामुळें अर्ज केल्यावरून सडक चौकी पातीचें

१. ज्यांचें वर वर्णन आलें आहे, ते. २. बरोबर. ३. कालानंतर. ४. (फा. पु. ना.) आपण पूर्ण भरंवशानें राहत होतों त्या भरंवशाचा घात. ५. हार. ६. पाहतां. ७. मालकी. ८. रिसाला. ९. यांचें उपनांव जाखी. १०. कारभारी दिनकरराव राजवाडे यांनीं आपल्या पूर्वींचे कारभारी व सरदार यांचा मोठा तोटा केला होता.

काम आमचे वडील रघुनाथराव जाधव यांस नेमणुकीचे आबावे दरमाहा रुपये १५० करून कामगारी दिल्ही. त्याप्रमाणें वडील काम देत राहिले. आणि आज्याचें नांव पटांत संमत १९२६ पावेतों राहून पुढें संमत १९२७ चे सालीं श्रीमंत कैलासवासी जयाजीराव माहाराज साहेब याणीं कंपू कोठींत मनोहर वासुदेव याचे हातून हाजरी केल्यांत खुद्द माझा मुलाहिजा होऊन सरकार तसदी मिळे. या सालांत आज्याचे जागीं माझें नांव दरमहा रुपये ३० वर कायम करून जो प्रालब्धु-योगानें लाभ हुजूरचे पदरीं राहिला. त्याप्रमाणें संमत १९२३ सालपासून सरकार तेनाती चाकरी आप्त आहे ल काराचे कचेरींत हजोन पावेतों तीस वर्ष काम देत आहें. मालकास कुल हाल जाहीर व्हावा. आणि चार पिढ्यांपासून दक्षिणेंतील वतनवृत्ती सोडून मालकाचे चरणापाशीं पडलों आहोंत. परामृश होत आल्याप्रमाणें मालकच करणार समर्थ आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

तारीख १३ माहे मार्च सन १८९७ बळवंतराव रघुनाथ आरस.
संमत १९५३.

लें० नं. ४२६ श्री. तारीख ८ डिसेंबर १८०६.

राजश्री जालमसिंगजी गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नो दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. राजश्री बाळाजी साबाजी यांहीं हुजूर सरकारांत बोलाविले आहेत. कोव्यास आल्यावर मशारनिल्हे समागमें जमियत देऊन लष्करांत पोंचून देणें. मार्गाचा जाबता करून देणें. छ० २७ रमजान सुरु सबा मैयां तेन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. (मोर्तब)

लें० नं. ४२७ श्री. ता. २० सपटंबर सन १८०९.

राजश्री माधवरावजी गोसावी यांसी.

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य—स्नो सखाराम घाटगे सर्जेराव दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुह्मांकडून मजकूर राजश्री लक्ष्मण रघुनाथ यांणीं सरकारांत सांगितल्यावरून सविस्तर समजला. ऐसियास आपले घर सरमजाम समेत व आणिक सरदार असतील त्यांजसह पथकसुद्धां निघून लष्करांत दाखल व्हावें. येथें आलियावर घोडेस्वार पाहून बंदोबस्त मनोदयानुरूप चांगला करून देविला जाईल. तर कोणे

१. हें जाधवांचें घराणें पहिल्यापासून दिलदार व विचारी असल्याचें दिसतें. २. हे रघुनाथराव आरस दक्षिणेंतील आपली वतन जमीन सोडून शिंद्यांचे दरबारीं नौकरीसाठीं येऊन राहिले होते व त्यांनीं कामगिऱ्याही बऱ्याच बजाविल्या होत्या; परंतु शेवटीं त्यांना हेंही नाहीं आणि तेंही नाहीं असें झालें. महादजींचा शेणवी लोकांवर फार विश्वास होता. कारण, शिंद्यांचें राज्य त्यांनींच मिळविलें होतें. याकरितां त्यांस ते सदोदित जवळ बाळगीत. बॉडी गार्डांस शिंदेशाहींत एकांडे ह्मणत. आणि प्रायः याच शेणवी लोकांस शिंद्यांनीं एकांडे ठेविले होते. आणि त्यांचा मानही मोठा होता. ज्या वेळीं आणीबाणीचा प्रसंग येई, त्या वेळीं त्या कामीं यांचीच योजना होई. आणि जे बहादरीचीं कामें करीत, त्यांस सरदारीही मिळे. "महादजीचे कारभारी शेणवी होते." (ग्रांट डफची बखर पृ. ३५८।३२५.) "त्यांचे सेवक त्यांजवर प्रीती करीत होते." "त्यांचे दौलतींत माणसें चांगलीं होतीं." (होळकरांची कैफियत पृ. ५४.) "आपल्या (शेणवी) लोकांवर श्रीमंतांची पूर्ण कृपा जाहली आहे ती कोठवर लिहावी." (पत्र नंबर ४१३.) महादजींचें या लोकांवर असें प्रेम होतें! परंतु शेवटीं कालगतीनें त्याच लोकांच्या जहागिरी नेमणुका कमी झाल्या!! ३. यांचें उपनांव जाधी. ४. यांचें उपनांव आरस.

गोष्टीविषयीं अंदेशा न घेतां पत्र पावतांच जलद निघून यावें. येविसीं आलाइदा सरकारानींही पत्रें लिहिलीं आहेत. त्याप्रमाणें जलद निघून येण्याचें करावें. तुह्मांस लोकांची वगैरे तूर्त खर्चास हुंडी कोठ्याची रुपये हजाराची पाठविली आहे. निघून यावें. छ० ९ रवाना साबान अशर मैयां तेन व आलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तब.

लें० नं. ४२८ श्री. सन १७९६.

चिरंजीव राजश्री बाबा प्रती तुको शंकर अनेक आशिर्वाद उपरी येथील तागायत छ० २० रमजान जाणून स्वकीय कुशल लेखन करणें. ( ) तुझीं पत्रें पैकीं वद्य त्रयोदशीचें एक व माघ शुद्ध नवमीचें एक व दशमीचें एक अशीं तीन पत्रें पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळों आला. मुख्य श्रीमंत दादासाहेब देवआज्ञा जाहले हें वर्तमान ऐकिल्यापासून गात्र गेलें. मोठा अनर्थ; निरुपाय जाहाला. तें कोठवर लिहावें. थोर थोर मागें जाहले व पुढें होतील. परंतु असे भूतदया आण अजातशत्रु होणें दुर्लभ. ( ) मृत्युलोक. ईश्वरसत्तेस उपाय काय? तुजला आस्ता ( ) चिरंजीव राजश्री नारायण राजश्री बाजीबा दादाचे येथें आहे. ( ) येथें रोजगार ह्मणोन नावा ( ) नाहीं राजश्री लखबादादानीं कृपा करून बसले ठिकाणीं आहे. लष्करांत हैराण होऊं ह्मणोन पावेतों येथें शाहाजी आहे. हा एकनिष्ठ त्यास लष्कर मथुरे सुमारें येतील तेव्हां कांहीं बंदोबस्त ( ) दैव प्रतिकूळ. तेव्हां उपयोग नाहीं. असो. आतां काळजी करून काय होतें. बरें श्री वेतोबा करील तें खरें. ( )

समास.

१. शिंदेशाहीनें याप्रकारें नुकसान केल्यावर हे लोक जुने मुत्सद्यांस पुनः आपल्या राज्यांत बोलावूं लागले होते. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दौलतराव शिंदे व बाइजाबाई यांचीं याप्रकारचीं बऱ्याच लोकांस गेलेलीं पत्रें आहेत, तीं यांत घेतलीं नाहींत. २. यांचें उपनांव रेगे. हे आरवली गांवचे राहणारे असून तेथीलच गांवकर, कुळकर्णी होते. हे शिंदेशाहींत मोठे प्रतिष्ठित कामदार होते. यांचा पुष्कळ पत्रव्यवहार आहे. ३. जिवबादादा. ४. भूतदया हाही गुण जिवबादादांचे ठायीं मोठ्या प्रमाणानें वसत होता. पहा "शेणवी वीर व मुत्सद्दी" या नांवाची सोबतची बखर. ५. ज्यांना शत्रूच झाला नाहीं अशा जिवबादादांसारखा पुरुष यापुढें होणें दुर्लभ. जिवबादादा हे पराक्रमी होते हें इतिहासप्रसिद्धच आहे. वरील उद्गारांतही तेंच ह्मटलें आहे. आणि बादशहाकडून मिळालेला "बहादर फत्तेजंग" हा किताबही त्याच अर्थाचा आहे. पहा पृ. १४०. ६. आरवली गांवचे राहणारे बाजी शिवाजी रेगे हे बक्षींचे कारभारी होते. ७. हे लखबादादा लाड. ८. जिवबादादांच्या मरणानें सर्व लोकांस फार दुःख झालें होतें! ९. आरवली गांवीं श्रीदेव वेतोबा (वेताळ) आहे. हा देव केळ्यांच्या व साखरेच्या नवसास पावतो अशी ख्याति आहे. हें देवस्थान साधारणतः एक लहान संस्थानच आहे, असें ह्मटलें असतां चालेल. ९. या पुस्तकांतील पत्रव्यवहार उतरून घेण्याचे कामीं वे. रा. जिवाजी विनायक आपटे आसोलीकर यांनीं आह्मांस बरीच मदत केली, याबद्दल आह्मी त्यांचे फार आभारी आहों. ग्रं०, क०

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
९	२०	त्याला जिवबाबरोबर झोंबी घेण्यास खातरी वाटत नसे	त्याजबरोबर झोंबी घेण्यास जिवबास मुळींच परवा वाटत नसे.
१५	१	मनानेंच	गानेनेंच
,,	२५	आपल्या मस्तकाला	उलट आपल्या मस्तकाला
१७	३३	ते लिहिणें	तें लिहिणें
३०	८	अडल्या	तट्टया
२०	१६	ते नीट विचार करून पूर्वींच ठरवून ठेवीत असत	ते विचार करून आपला बेत पूर्वींच ठरवून ठेवीत असत.
२२	१९	परंतु	त्यांत आणखी
२८	३६	पृष्ठ २३९	पृष्ठ २२९
३२	१७	सुरजमल्ल जाव	सुरजमल्ल जाट.
४०	२०	१७६९	१७६१
४६	२६	कामगारीवर	कामगिऱ्यांवर (याचप्रमाणें अन्यत्रही जेथें जेथें हा 'कामगारी' शब्द आला असेल, तेथें तेथें तो 'कामगिरी' असा वाचावा.)
५१	३	सल्लाम	सल्लास
५६	२७	मुलखासुद्धां	मुलखांसुद्धां
५८	२६	पुन	पुनः
६८	२८	उभय सैन्याचे	उभय सैन्यांचे
७१	२८	वडेजार	वडेजाव
७२	३०	कापट्ययुक्ति	कपटयुक्ति
८२	३	दिली त्यांनीं असली पाहिजे	त्यांनीं दिली असली पाहिजे
८९	३।४	गुजराराथ	गुजराथ
९०	१५	करण्याच	करण्याचें
१००	६	खंडण्यासंबंधानें	खंडण्यांसंबंधानें
१०४	२३	आणून ठेविलें	आणून ठेविलें[1]
११३	१९	झाल्यावर	झाल्याविषयीं
११८	८	फिरकूं ह्मणून दिलें नव्हतें	मुळींच फिरकूं दिलें नव्हतें
१२४	१४।१५।३२	आरोबा	आराबा
१२५	३०	सपाट्यानें गोळीबार व तोफांची अखंड वृष्टि	सपाट्यानें गोळीबार चालवून तोफांची अखंड वृष्टि
१२८	१७	माणूस	माणूसें
१२९	२४	जै दिवशीं	चे दिवशीं

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१३३	२४	इस्मालय	इस्मायल
१३६	१५	ढिंम बसते आहे कशाला	ढिंम होतें आहे कशाला
१४३	२९	ते हेः–कीं,	ते हेः–
१५२	३१	परि. १ पृष्ठ ४९	परि. ३ पृष्ठ ३३९
१६४	२२	तर बारीचे	तरवारीचे
१७५	२९	देवून	देऊन
१७८	३३	माधवरासारखा	माधवरावासारखा
१७९	२	खलब	खलष
१९२	३२	झजायाला	झुंजायाला
१९७	१८	अवलंबून आहे !	अवलंबून आहे ती !
१९८	२१	पुढेंच जावयाचीच	पुढें जावयाचीच
२०९	११	प्रकरणाचे	प्रकरणांचे
२३९	२०	यशवंतराव भाऊ	यशवंतराव शिवाजी वागळे
२४१	२७	हिंदुस्थानानी	हिंदुस्थानची
२५६	१८	कार्यमाग	कार्यभाग
२५९	३५	आत	आतां
३०३	३६	बापूसाहेब	बाबूसाहेब
३३१	१९	हिदुस्थानी	हिंदुस्थानी
३४१	२६	पऱ्या	पऱ्यार
३४८	२६	शरीरसंबंध केल	शरीरसंबंध केले
?७३	१६	मापणें	मायणें
३७३	३४	१७६६	१७८६
३८५	३	रामभठ	रामभट
३८६	३४	साकेरकर	आकेरकर
४५७	३१	१८७४	१७७४
६०४	३२	वडिलांनीं खलें	वडिलांनीं राखलें

या पुस्तकाबद्दलचे कांहीं विद्वज्जनांचे अभिप्राय.

I have glanced through the book cursorily. It throws a flood of light on the Maratha history of the period and places before the public many an incident of historic importance from an altogether new stand-point of view. The author deserves great credit for industry and zeal of his historical research.

16th June 1901. } (Sd.) Raghunath Vyankajee Sabnis.
(B. A., Diwan of Kolhapur.)

I have read a few important portions of the History. It has been so impartially written that it deserves the patronage of public. The History reveals the characters of many brave families of the Marathas & others which were never, it seems, brought to light in their true form.

22nd June 1901. } (Sd.) Dajeerao Amritrao Vichare.
(L. C. E., Executive Engineer,
Kolhapur State.)

" बक्षी बहाद्दर जिवबादादा केरकर यांचें चरित्र " हा ग्रंथ आम्हीं साद्यंत वाचिला. ग्रंथकारांनीं मोठ्या श्रमानें व आयासानें जुनीं पत्रें वगैरे मिळवून व मधुकरवृत्तीनें उपलब्ध माहिती एकत्र करून " शिंदेशाहीचा खरा इतिहास " संगतवार लिहिला आहे. हें काम फार कठिण होतें. परंतु ग्रंथकारांनीं अजस्र मेहनत घेऊन तें उत्तम रीतीनें पार पाडिलें आहे. याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें अवश्य आहे. पुस्तकाची भाषा शुद्ध, सरळ व मनोरम आहे. पुस्तक एकंदरींत चांगलें उतरलें आहे. याच्या योगानें मराठेशाहीच्या इतिहासावर व त्यांतील ठळक ठळक पात्रांवर नवीन प्रकाश पडून रूढ मतें कांहीं अंशीं तरी बदलावीं लागतील.

तारीख २५ डिसेंबर सन १९०२. } (सही) शिवराम सीताराम वागळे.
(बी. ए., एल्. एल्. बी., सबजज्ज मालवण.)

श्री.

" जिवबादादा बक्षी यांचें चरित्र " हा ग्रंथ मीं पाहिला. हा इतिहास फार श्रम घेऊन तयार केला आहे. यांतील प्राचीन व अर्वाचीन भाषा वाचून मोठी मौज वाटते. या ग्रंथांत सुमारें ४३५ जुनीं पत्रें घेतलीं आहेत, व त्या सर्वांच्या नकला मी माझ्या हस्तें लिहून दिल्या आहेत. त्यांवरून हा फार आधारपूर्वक चांगला असा ऐतिहासिक ग्रंथ तयार झालेला आहे.

तारिख १३ नवंबर
सन १९०६ इसवी. } जिवाजी विनायक आपटे,
हरिदास.

या ग्रंथास ज्या उदारधीनीं मदत केली, त्यांपैकीं ठळक अशा कांहीं सद्गृहस्थांचीं नांवें.

श्रीमंत रा. रा. यशवंतराव भाऊ बक्षी ऊर्फ भाऊराजा केरकर, केरी, गोवा.

श्रीमंत रा. रा. आत्माराम प्रभू ऊर्फ बाबूसाहेब देसाई देशप्रभू बारोनेट, व्हैकौंट महाल पेडणें, गोवा.

श्रीमंत रा. रा. बळवंतराव पांडुरंग वागळे सरदार, इंदूर, माळवा.

रा. रा. रामचंद्र महादेव गांवस्कर, कोची.

रा. रा. शंकरराव विठ्ठल कळसूलकर, एम्. ए., एल्. एल्. बी., वकील, सावंतवाडी.

वे. शा. सं. कल्याणशास्त्री गुळगुळे श्रुतिशिरोभूषण, कोल्हापूर.

लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमी, पुस्तकालय
Lal Bahadur Shastri National Academy of Administration Library

मसूरी
MUSSOORIE

अवाप्ति सं०
Acc. No..............................

कृपया इस पुस्तक को निम्नलिखित दिनांक या उससे पहले वापस कर दें।

Please return this book on or before the date last stamped below.

दिनांक Date	उधारकर्ता की संख्या Borrower's No.	दिनांक Date	उधारकर्ता की संख्या Borrower's No.

Mar 3463
954.79092
रह

LIBRARY

LAL BAHADUR SHASTRI

National Academy of Administration

MUSSOORIE

Accession No. _ _ _ _ __

1. Books are issued for 15 days only but may have to be recalled earlier if urgently required.
2. An over-due charge of 25 Paise per day per volume will be charged.
3. Books may be renewed on request, at the discretion of the Librarian.
4. Periodicals, Rare and Reference books may not be issued and may be consulted only in the Library.
5. Books lost, defaced or injured in any way shall have to be replaced or its double price shall be paid by the borrower.

Help to keep this book fresh, clean & moving